१३५
२

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ
तमसो मा ज्योतिर्गमय

संगीतरत्नाकर

भाग २- अध्याय ५ ते ६

श्रीनिःशङ्कःशार्ङ्गदेवविरचित 'संगीतरत्नाकर'
या संस्कृत ग्रंथाचे 'कलानिधि' टीकेसह
सटीप मराठी भाषांतर

भाषांतरकार
प्रा. ग. ह. तारळेकर

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
सं/934
2
मंत्रालय

संगीतरत्नाकर

भाग २ - अध्याय ५, ६

श्रीनिःशङ्कशार्ङ्गदेवविरचित 'संगीतरत्नाकर'
या संस्कृत ग्रंथाचे 'कलानिधि' टीकेसह सटीप मराठी भाषांतर

भाषांतरकार
डॉ. ग. ह. तारळेकर
एम्. ए., पीएच्. डी.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मुंबई.



पहिली आवृत्ती १९७९ (शके १९०१)

प्रकाशक :

सचिव, महाराष्ट्र राज्य
साहित्य संस्कृती मंडळ,
मंत्रालय मुंबई–४०० ०३२.

© भाषांतरित आवृत्तीचे सर्व हक्क प्रकाशकाधीन.



मुद्रक :

पां. गो. आपटे
दी प्राज्ञ प्रेस,
वाई (जि. सातारा)

निवेदन

मराठी भाषेला आणि साहित्याला आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या व आधुनिक सांस्कृतिक मूल्यांच्या आविष्काराचे सामर्थ्य प्राप्त व्हावे; आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी, त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला विद्यापीठाच्या स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे; विविध विद्या व कलाविषयक उत्कृष्ट ग्रंथांची निर्मिती करून मराठी भाषेला जागतिक उच्च स्थान मिळवून द्यावे या उद्देशाने महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाने बहुविध वाङ्मयीन कार्यक्रम आखला असून तो व्यवस्थितपणे कार्यवाहीत आणण्याकरिता विश्वकोश समिती, इतिहास समिती, भाषांतर समिती, मराठी वाङ्मयकोश समिती, ललितकला समिती, प्रकाशन समिती आदी समित्या स्थापन केल्या आहेत.

२. ललितकला समितीच्या कार्यक्रमात, मंडळाच्या बहुविध वाङ्मयीन कार्यक्रमांस अधिक संस्कृतिप्रवण करण्यासाठी ललितकलाविषयक नाट्य, नृत्य, वाद्य, चित्र, मूर्ती व गायन या विषयांचे संशोधन, विवरण व इतिहास यांचा अंतर्भाव आहे. या कार्यक्रमात कला व कलासंबद्ध विषयांवर मूलभूत संशोधन करून लिहिलेले ग्रंथ, संगीत व संगीतशास्त्र, नाटक व नाट्यशास्त्र, नृत्य व शिल्प इत्यादींवरील प्रमाणभूत जुन्या ग्रंथांची भाषांतरे, विविध कलांचा इतिहास, कलाकारांची चरित्रे इत्यादी वाङ्मयांच्या प्रकाशनाबरोबरच संस्कृत व मराठीतर अन्य भारतीय भाषांतील तसेच पश्चिमी व अन्य परदेशी भाषांतील ललितकलांविषयक अभिजात वाङ्मय मराठीत भाषांतरित करून प्रकाशित करण्याचा कार्यक्रम अंतर्भूत आहे. या कलांचा वाङ्मयाच्या द्वारे मराठी वाचकास संक्षेपाने व विस्ताराने परिचय करून देणे हा मंडळाचा महत्त्वाचा उद्देश आहे.

३. या योजनेखाली मंडळाने कै. के. नारायण काळे यांनी अनुवादित केलेले स्तानिस्लाव्स्कीच्या "रबोता अक्त्योरा नात् सबोय" या रशियन पुस्तकाचे भाषांतर "अभिनय साधना", श्री. श्री. ह. देशपांडे यांनी अनुवादित केलेले कोपलँडचे "संगीत व कल्पकता", डॉ. श्री. ना. रातंजनकर यांनी लिहिलेले "पं. विष्णु नारायण भातखंडे", प्रा. र. पं. कंगले अनुवादित "रस-भाव-विचार", व "दशरूपक विधान" (अनुक्रमे भरत नाट्यशास्त्र रससिद्धान्तविषयक अध्याय ६ व ७ आणि नाट्यशास्त्रविषयक अध्याय १८ व १९ ची भाषांतरे), श्री. श्री. ह. देशपांडे अनुवादित "महाराष्ट्राचे संगीतातील कार्य" व श्री. बा. गं. आचरेकर लिखित "भारतीय संगीत व संगीतशास्त्र"; श्री. शं. आ. टेंकशे लिखित "राग-वर्गीकरण", इझाडोरा डंकन लिखित "My Life"चे भाषांतर, "मी-इझाडोरा" स्ट्रॅविन्स्कीचे "सांगीतिक सौंदर्यशास्त्र", स्तानिस्लाव्स्कीच्या "Building of Character"चे भाषां-

तर " भूमिका शिल्प", डॉ. बी. सी. देव यांचे " भारतीय वाद्ये", डॉ. श्री. व्यं. गोखले यांचे " लय ताल विचार " ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. भरतमुनीचे नाट्यशास्त्र (संगीत-विषयक अध्याय २८), नंदिकेश्वराचे " अभिनयदर्पण ", भामहाचे " काव्यालंकार ", आनंदवर्धनाचे " ध्वन्यालोक", दण्डीचे "काव्यादर्श", कवी हालाची " गाथासप्तशती ", कवी बिहारीची " सतसई ", जयदेव कवीचे " गीतगोविन्दम् " स्टूँविन्स्कीचे Poetics of Music , भरत के. अय्यर यांचे Kathakali, आचार्य कैलास चंद्रदेव बृहस्पति-लिखित " मुसलमान और भारतीय संगीत " इत्यादी ग्रंथांची भाषांतरे मंडळाच्या वतीने क्रमाने प्रकाशित व्हावयाची आहेत. तसेच, ललितकलांतर्गत योजनेत मंडळातर्फे श्री. व. वि. ऊर्फ बाबूराव जोशी यांजकडून वृत्त, जाति व छंद ध्वनिमुद्रित करण्यात आले आहे व त्यासंबंधीचा ग्रंथ मुद्रित होत आहे. याशिवाय, श्री. पार्वतीकुमार संपादित " तंजावरची नृत्यसाधना ", डॉ. भा. कृ. आपटे संपादित " Maratha Wall Painting", डॉ. सौ. श्यामला वनारसेलिखित " संगीतिक मानसशास्त्राची मूलतत्त्वे " इत्यादी ग्रंथही लवकरच मंडळाच्या वतीने प्रकाशित होणार आहेत.

४. मंडळाने स्वतः प्रकाशित केलेल्या व करावयाच्या ललितकलाविषयक ग्रंथांखेरीज तज्ञ लेखक, कलाकार व कलासंस्था यांना कलाविषयक संशोधनासाठी व प्रकाशनासाठी अनुदानेही मंडळाने दिली आहेत. श्री. ह. वि. दाल्ये यांचे " गायनी कळा ", श्री. निखिल घोष यांचे " रागतालाची मूलतत्त्वे व अभिनव स्वरलेखन पद्धती " (इंग्रजीत व मराठीत), डॉ. अशोक दा. रानडे यांचे " संगीताचे सौंदर्यशास्त्र ", पं. बाळकृष्ण कपिलेश्वरी यांचे " श्रुतिस्वरदर्शन " व " स्वरप्रकाश ", डॉ. ना. ग. जोशी यांचे " मराठी छंदोरचनेचा विकास ", श्री. बा. र. देवधर यांनी लिहिलेले " कै. विष्णु दिगंबर पलुस्कर यांचे चरित्र " व "थोर संगीतकार " इत्यादी ग्रंथांच्या प्रकाशनाकरिता मंडळाने सुयोग्य अनुदाने दिली आहेत. गांधर्व महाविद्यालयाच्या " संगीत कलाविहार " या मासिकालाही गेली अनेक वर्षे मंडळाचे अनुदान दिले जात आहे.

५. संगीत विषयातील संशोधनाच्या संदर्भात, रूपारेल महाविद्यालय, मुंबई येथील भौतिकी विभागामध्ये मंडळाच्या अनुदानाने संगीत-ध्वनिविज्ञानाचे मौलिक संशोधन झाले आहे. त्यामधून व्यावहारिक उपयोगाच्या दृष्टीने लक्षणीय अशी माहिती वा वाद्य मिळू न शकल्यामुळे ते कार्य आता स्थगित केले आहे. तानसेन म्युझिक ॲकॅडेमी, मुंबई या संस्थेला स्वयंचलित "सूरमंडल" तयार करण्यासाठी मंडळाने अनुदान दिले आहे. श्री. बा दा. मोहिते, सांगली यांना ४८ श्रुतींवर आधारलेल्या सप्तकाची बाजाची पेटी तयार करण्यासाठीही अनुदान दिले आहे. डॉ. ह. वि. मोडक, वास्तव विभाग, वाडिया महाविद्यालय, पुणे यांना दक्षिण भारतातील देवळांमधील स्तंभांमधून निघणाऱ्या संगीतसुरांच्या संशोधनाकरिताही अनुदान दिले असून त्यांची ध्वनिमुद्रिते तयार झाली आहेत. दण्डतारारहित तंबोरा तयार करण्याचा प्रयत्न कै. डॉ. श्री. ब. निंभोरकर, अमरावती यांनी काही वर्षे केला. त्याकरिताही मंडळाने अनुदान दिले आहे. तानपुऱ्याच्या विभिन्न मूलाकृती तयार करण्यासाठी पं. अंबा-

लाल सितारी यांनाही चांगले अनुदान दिले आहे. पारंपरिक भारतीय तंबोऱ्यावर आजवर कोणतेही संशोधन झाले नव्हते. त्या दृष्टीने पं. सितारी यांचे तंबोऱ्याच्या मूलाकृती बनविण्याचे कार्य पायाभूत व म्हणून मौलिक आहे अशी या कामाची शिफारस टाटा मूलभूत संशोधन केंद्र, मुंबई (TIFR, Bombay) व राष्ट्रीय कला केंद्र (NCPA, Bombay) येथील शास्त्रज्ञांनी चाचणीअंती केली आहे. एकंदरीत, संशोधनाच्या प्रयत्नांतून प्रायोगिक उपयुक्ततेच्या दृष्टीने लक्षणीय यश प्राप्त झालेले नाही, हे येथे नमूद केले पाहिजे. परंतु, मूलभूत व महत्त्वाच्या संशोधनाचे प्रयत्न सतत चालले पाहिजेत म्हणून मंडळ सतत प्रयत्नशील आहे. जे. ग्रिफिन्थ्स् या इंग्लिश संशोधक-कलावेत्त्याने अजिंठा येथील चित्रांचा संग्रह काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध केला. अजिंठा येथील चित्रकला ही भारतातील प्राचीन चित्रकलेचा एक वैभवशाली भाग आहे. या चित्रसंग्रहाचे पुनर्मुद्रण करून ते प्रकाशित करण्याची कार्यवाहीसुद्धा मंडळातर्फे चालू आहे.

६. भारतीय संगीतशास्त्रावरील संस्कृत ग्रंथांत शार्ङ्गदेव प्रणीत "संगीतरत्नाकर" हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा असल्याने या ग्रंथाचा मराठी अनुवाद होणे मंडळास आवश्यक वाटले. प्रस्तुत सटीप मराठी भाषांतर चतुर कल्लिनाथाच्या "कलानिधी" टीकेसह प्रा. ग. ह. तारळेकर, धुळे यांनी मंडळास करून दिले. हे भाषांतर दोन भागांत प्रसिद्ध व्हावयाचे आहे. त्यांपैकी पहिल्या चार अध्यायांत गायनविषयक भाग १ – १९७५ मध्ये प्रकाशित केला आहे. सदरहू शास्त्रीय ग्रंथाचे नुसते भाषांतर वाचून मुळातील आशय स्पष्ट होणार नाही हे जाणूनच प्रा. तारळेकर यांनी भाषांतराच्या जोडीला मूळ ग्रंथातील कठीण स्थळांवर टीपाही दिल्या आहेत. प्रा. तारळेकर यांनी अनेक ठिकाणी आनंदाश्रमाने प्रसिद्ध केलेल्या प्रस्तुत ग्रंथातील पाठ व अड्यारच्या आवृत्तीतील पाठ घेऊन त्यावर तुलनात्मक चर्चा केली आहे व त्यांतील कोणता पाठ ग्राह्य वाटतो व का याचे तर्कशुद्ध विवेचन केले आहे. ते आधुनिक समीक्षाशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. याशिवाय, प्रा. तारळेकर यांनी "संगीतदर्पण", "संगीतसारामृत", "मानसोल्लास" वगैरे संगीतविषयक ग्रंथांचा उल्लेख करून त्यांतील अनेक समानस्थळांचे तुलनात्मक विवेचन केले आहे. तेही मूळ ग्रंथाच्या आशयावर प्रकाश पाडणारे असल्यामुळे भाषांतराला साहाय्यकच झाले आहे. या सर्व दृष्टींनी पाहता, प्रा. तारळेकर यांनी केलेले प्रस्तुत मराठी भाषांतर उत्कृष्ट झाले असून ते मराठी वाचकांना सादर करण्यास आनंद होत आहे. प्रा. तारळेकर यांचे भाषांतर आणि टीपा यांच्या साहाय्याने शार्ङ्गदेव व कल्लिनाथ यांचे भारतीय संगीत व संगीतशास्त्र यांवरील विचार समजून घेणे वाचकास सुलभ होईल अशी आशा आहे. या भाषांतराच्या आधी प्रकाशित झालेल्या पहिल्या भागाप्रमाणेच हा दुसरा भागही मंडळाच्या वतीने प्रकाशित करण्यास आनंद होत आहे.

वाई, माघ शु. १०, शके १९०१,
२६ जानेवारी, १९८०.
प्रजासत्ताक दिन.

लक्ष्मणशास्त्री जोशी
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

अनुक्रमणिका

प्रस्तावना १ ते ९७

पाचवा अध्याय : ताल १ ते १९१

मंगलाचरण १, तालशब्दव्युत्पत्ति ३;

मार्गताल प्रकरण ३ ते ११३

मार्गतालस्वरूपकथन ४, मार्गविशेषकथन ५, मात्रा ५, चच्चत्पुट–चाचपुट लक्षण ७, षट्पितापुत्रक ९, पातकलाविधि व अंगुलिनियम ११, उद्घट्ट १६, संपक्वेष्टाक १६, तालधारणप्रकार १८, संकीर्णताल १९, परिवर्तइत्यादींचे लक्षण २०, लयाश्रित यती २१, ग्रहइत्यादींचे लक्षण २२;

प्रकरण नावाच्या गीतांचे प्रकरण २४ ते ११३

मद्रक इत्यादी गीते २५, मद्रक २७, अपरान्तक ३६, उल्लोप्यक ५८, प्रकरी ७२, ओवेणक ७५, रोविन्दक ८३, उत्तर ८७, गीतकातील दोन मार्ग ८९, छन्दक ८९, आसारित ९१, वर्धमान ९८, पाणिका १०८, ऋचा ११०, गाथा ११२, साम ११२

देशीताल प्रकरण ११४ ते १९१

मंगलाचरण ११४, देशीतालांचे सामान्यलक्षण व नामनिर्देश ११४, देशीताल लक्षण व स्वरूप ११९ ते १४३; प्रस्तार इत्यादी एकोणीस प्रत्यय १४३ ते १९१, प्रस्तार १४४, संख्या १४७, नष्ट १५०, उद्दिष्ट १५३, पाताल १५७, द्रुतमेरु १५९, लघुमेरु १६२, गुरुमेरु १६४, प्लुतमेरु १६६, संयोगमेरु १६८, खण्डप्रस्तार १७९, द्रुतमेरुनष्टोद्दिष्ट १८०, लघुमेरुनष्ट १८६, गुरुमेरुनष्ट १८९, प्लुतमेरुनष्ट १९०, लघुमेरु–गुरुमेरु–प्लुतमेरु–उद्दिष्ट १९१

सहावा अध्याय : वाद्य १९३ ते ४४१

मंगलाचरण १९३, चतुर्विध वाद्यांचे सामान्यलक्षण १९६, श्रुतिवीणा व स्वरवीणा १९६, स्वरवीणाप्रकार १९७, सुषिर–अवनद्ध–घन–वाद्यप्रकार १९७, शुष्कइत्यादी भेदांमुळे वाद्यांचे चतुर्विधत्व १९८

ततवाद्ये २०० ते २७६

एकतन्त्री २००, सारणाप्रकार २०५, वीणावादनातील हस्त-व्यापार व वादनप्रकार २०६, सकल व निष्कल वाद्य २१४, नकुलादि पाच वीणांचे लक्षण २१६, रूपइत्यादी करणे २१७, वीणावादनातील घातू २१९,

विस्तारज धातु २२०, करणधातु २२४, आविद्ध धातु २२५, व्यञ्जन धातु २२६, धात्वाश्रित वृत्ती २२९, तत्त्वइत्यादींचे लक्षण व स्वरूप २३०; निर्गीतवाद्य–आश्रावणा २३२, आरम्भविधि २३६, वक्त्रपाणि २३८, संघोटना २३९, परिघट्टना २४०, मार्गासारित २४१, लीलाकृत २४२, आसारित २४४, आलापिनी २४४; किंनरी २४७; देशी प्रसिद्ध किंनरी २५०, बृहती किंनरी २५०, मध्यमा २५४, लघ्वी २५६; देशीप्रसिद्ध रागांचे किंनरी-वादन–मध्यमादि २५७, बंगाल २५८, भैरव २६२, वराटी २६३, गुर्जरी २६३, वसन्त २६४, धन्नासी २६४, देशी २६५, देशाख्या २६५, डोम्बक्री २६५, प्रथममञ्जरी २६६, कामोद २६६, रामकृति २६७, गौडकृति २६७, देवकृति २६८, भैरवी २६८, छायानट्टा २६९, बहुलीरामक्री २६९, मल्हार २६९, कर्णाटगौड २७०, तुरुष्कगौड २७०, द्राविडगौड २७१, ललित २७१. पिनाकी २७३; निःशंकवीणा २७४;
वीणावादनपरिज्ञानाचे फल २७५, वीणावादकगुण २७५

सुषिर वाद्ये २७६–३४३

वंश २७६, वंशातील स्वरोत्पत्तिप्रकार २८०, वंशगति २८४, देशीनुसार वंशलक्षण २८६, अनुपमा वंशश्रेणी ३००, शाङ्गदेविद्या ३०८, फूत्कारगुण ३१३, फूत्कारदोष ३१४, वांशिकगुण ३१६, वांशिकदोष ३१७, वांशिकवृन्द ३१७, काही देशीप्रसिद्ध रागांचे वंशातील वादन–मध्यमादि ३१८, मालवश्री ३२१, तोडी ३२२, बंगाल ३२३, भैरव ३२४, वराटी ३२५, गुर्जरी ३२५, वसन्त ३२६, धन्नासी ३२६, देशी ३२७, देशाख्या ३२७, डोम्बक्री ३२७, वेलावली ३२८, प्रथममंजरी ३२९, आदिकामोदी ३२९, शुद्धवराटी ३३०, शुद्धनट्टा ३३०, रामक्री ३३१, गौडक्री ३३२, देवक्री ३३२, भैरवी ३३३, छायानट्टा ३३३, चिन्धरामक्री ३३४, नाटघरामक्री ३३४, मल्हार ३३५, कर्णाटगौड ३३६, देशवालगौड ३३६, तुरुष्कगौड ३३६, द्राविडगौड ३३७, कैशिकी ३३७, ललिता ३३८, श्रीराग ३३९; पाव ३४०, पाविका ३४०, मुरली ३४०, मधुकरी ३४१, काहला ३४१, तुण्डकिनी ३४२, चुक्का ३४२, शृंग ३४२, शंख ३४३.

अवनद्ध वाद्ये– ३४३–४३१

मार्गपटह ३४३, देशीपटह ३४५, पटहवर्ण ३४६, हस्तपाट ३४७, नागबन्ध इत्यादी पस्तीस हस्तपाट ३५१, नन्दिकेश्वरप्रोक्त हस्तपाट ३५४, एकवीस हस्तपाट ३५४, होडुक्कपाट ३५९, अपाट ३६३, अलगपाट ३६५, चित्रपाट ३६६, पञ्चसञ्च ३६७;

पटहइत्यादींमधील वाद्ये– ३६७–३७१

बोल्लावणी ३६८, चल्लावणी ३६९, उड्डव ३७०, कुचम्बिणी ३७०, चारु-श्रवणिका ३७०, अलग्न ३७०, परिश्रवणिका ३७०, समप्रहार ३७१, कुडुवचारणा ३७१, करचारणा ३७१, दण्डहस्त ३७१, घनरव ३७१.

प्रायिक हौडुक्कवाद्ये– ३७२ ते ३७६

वल्लि ३७२, वल्लिपाट ३७२, घत्ता ३७२, भेद ३७२, झडप्पणी ३७३, अनुश्रवणिका ३७३, हस्त ३७३, जोडणी ३७३, त्रिगुणा ३७४, पञ्चहस्त ३७५, पञ्चपाणि ३७६, पञ्चकर्तरी ३७६, चन्द्रकला ३७६;

वाद्यप्रबन्ध– ३७६ ते ४००

यति ३७८, ओता ३७९, गजर ३८२, रिगोणी ३८३, कवित ३८५, पद ३८७, मेलापक ३८७, उपशम ३८८, उद्ग्राह ३८९, प्रहरण ३९०, अवत्सक ३९०, छण्डण ३९१, तुडुका ३९२, मलप ३९३, मलपाङ्ग ३९४, मलपपाट ३९४, छेद ३९५, रूपक ३९५, अन्तर ३९५, अन्तरपाट ३९५, खोज ३९५, खण्डयति ३९६, खण्डच्छेद ३९६, अवयति ३९६, खण्डपाट ३९७, खण्डक ३९७, खण्डहुल्ल ३९७, सम ३९७, पाट ३९७, ध्रुवक ३९७, अङ्ग ३९७, अङ्गरूपक ३९८, ताल ३९८, वताल ३९८, खलक ३९८, समुदाय ३९८, जोडणी ३९८, उडव ३९९, तलपाट ३९९, उट्टवणी ३९९, तुण्डक ३९९, अङ्गपाटक ४००, पैसार ४००; मर्दल ४००, मार्दलिकभेद ४०४, वादक ४०४, मुखरी ४१०, प्रतिमुखरी ४१०, गीतानुग ४११, मार्दलिकगुणदोष ४११, मार्दलिकवृन्द ४१२;
हुडुक्का ४१३, करटा ४१४, घट ४१५, घडस ४१६, ढवस ४१६, ढक्का ४१७, कुडुक्का ४१७, कुडुवा ४१८, रुञ्जा ४१८, डमरुक ४१९, डक्का ४२०, मण्डिडक्का ४२१, डक्कुली ४२२, सेल्लुका ४२३, झल्लरी ४२४, झाण ४२५, त्रिवली ४२५, दुन्दुभि ४२६, भेरी ४२७, निःसाण ४२७, तुम्बकी ४२८, काष्ठलक्षण ४२८, काष्ठदोष ४३०, चर्मगुणदोष ४३०.

घनवाद्ये ४३१ ते ४३८

ताल ४३२, कांस्यताल ४३३, घण्टा ४३४, क्षुद्रघण्टा ४३५, जयघण्टा ४३५, कत्रा ४३६, शुक्ति ४३७, पट्ट ४३७; वाद्यगुणदोष ४३८, वादकगुणदोष ४३९, हस्तगुण ४४०

साहाय्यक संदर्भ ग्रंथ व लेख यांची सूची १ ते ३
शब्दसूची १ ते १५
वाद्यांची रेखाचित्रे १ ते ८
शुद्धिपत्रक

प्रस्तावना

(१) शार्ङ्गदेव व संगीतरत्नाकराचे टीकाकार

भारतीय संगीतशास्त्रावरील ग्रंथांत शार्ङ्गदेवविरचित संगीतरत्नाकर हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या ग्रंथाचे सात अध्याय असून, पहिल्या चार अध्यायांत गायन-विषयक, पाचव्यात तालविषयक, सहाव्यात वाद्यविषयक व सातव्यात नर्तनविषयक विचार आलेला आहे. संगीतरत्नाकर हा भारतीय संगीतशास्त्रावरील एक प्रमाणभूत ग्रंथ ठरला असून, त्यातील उद्धरणे नंतरच्या संगीतशास्त्रावरील ग्रंथकारांनी अनेक वेळा दिलेली आहेत.

ग्रंथाच्या आरंभी शार्ङ्गदेवाने स्वतःसंबंधी काही माहिती दिली आहे. वृषगण ऋषी-पासून सुरवात झालेला त्याचा वंश काश्मीर देशातला असून, हा वंश अत्यंत कीर्तिमान, वेदपारंगत, धर्मपरायण व याज्ञिक (म्हणजे स्वतः यज्ञ करणाऱ्या) अशा द्विजश्रेष्ठांनी भूषित केलेला होता. अशा या पुनीत वंशात भास्कर नावाचा तेजस्वी ब्राह्मण जन्मला व तो दक्षिणेत आला. या भास्कराचा मुलगा सोढल हा शार्ङ्गदेवाचा पिता होय. तो अत्यंत बुद्धि-मान आणि विनयशील असून भिल्लम या यादव राजाच्या पदरी होता. त्याने आपल्या काम-गिरीने राजाला पुष्कळ वैभव प्राप्त करून दिले व विपुल यश संपादन केले. भिल्लमाचा मुलगा जैत्रपाल यालाही त्याने विजयश्री मिळवून देऊन, जैत्रपालाचा मुलगा श्रीसिंघण याला महान लक्ष्मी प्राप्त करून दिली. शार्ङ्गदेव श्रीसिंघणाच्या पदरी 'श्रीकरणाधिपति' या अधिकारपदावर होता.

यादववंशात भिल्लम हा पहिला अत्यंत प्रभावी राजा होऊन गेला. तो ख्रि. उ. ११८५–८६ या वर्षी गादीवर आला. त्याने प्रथम कोंकण प्रदेशातील किल्ले जिंकून तोरण-गड मिळविला. नंतर सोलापूरच्या बाजूला हल्ला करून तेथील राजाला ठार मारले. भिल्लम हा यादववंशातला पहिला सम्राट असे म्हणता येईल. त्याने गुजरात व माळवा या प्रदेशांवर चढाई करून राजस्थानपर्यंत धडक मारली. चालुक्य राजा चौथा सोमेश्वर यावरील विजय हा भिल्लमाचा सर्वांत मोठा विजय होय. या विजयाने त्याने चालुक्यांची कल्याण ही राज-धानी आपल्या राज्यात समाविष्ट केली. त्याची दक्षिणेकडील होयसाळ राज्यावरील चढाई मात्र यशस्वी झाली नाही. होयसाळ राजाने त्याच्या सेनापतीला नष्ट केले. देवगिरी हे यादवांच्या राजधानीचे नगर भिल्लमाने वसविले हे आपणांस हेमाद्रीच्या विधानावरून समजून येते. अशा रीतीने भिल्लम या पराक्रमी यादव राजाने आपले साम्राज्य प्रस्थापित केले. शार्ङ्गदेवाचा पिता सोढल हा त्याच्या पदरी मोठ्या अधिकारपदावर असल्याचे संगीतरत्ना-करातील त्याच्या वर्णनावरून कळून येते. (१.१.५)[1] सोढलाचा यादव राजघराण्याशी संबंध नंतरच्या जैत्रपाल व सिंघण राजांपर्यंत होता.

---

१. कंसातील आकडे संगीतरत्नाकरातील अध्याय, प्रकरण व श्लोक यांचे आहेत.

भिल्लमाचा मुलगा जैतुगी किंवा जैत्रपाल हा ख्रि. उ. ११९१ मध्ये सत्तेवर आला. पण त्याची राजा म्हणून कारकीर्द ख्रि. उ. ११९३ पासून सुरू झाली. त्याने काकतीय राजा रुद्र याचा पराभव केला. या लढाईत रुद्र ठार झाला. युवराज गणपतीला जैत्रपालाने पकडून नेले आणि अशा प्रकारे काकतीय राज्यावर संपूर्ण विजय मिळविला. नंतर त्याने गणपतीला सोडून देऊन काकतीय राज्यावर पुन्हा स्थापित केले व त्याची राजनिष्ठा संपादित केली. जैतुगी हा नुसताच शूर योद्धा नव्हता तर त्याला विद्वत्तेबद्दल अत्यंत आवड व आदरही होता. गणितज्ञ भास्कराचार्यांचा मुलगा लक्ष्मीधर हा पंडित त्याच्या दरबारी होता. जैत्रपालाला विजय मिळवून देण्यात सोढलाचाही वाटा होता असे शार्ङ्गदेवाने दिलेल्या माहितीवरून वाटते. (१.१.५)

जैतुगीचा मुलगा सिंघण किंवा सिंघणदेव हा ख्रि. उ. १२१० मध्ये गादीवर आला. सिंघणदेव हा अत्यंत पराक्रमी राजा होता. त्याच्या कारकीर्दीत यादवांचे साम्राज्य कळसाला पोचले. त्याने होयसाळ राजावर निर्णायक विजय मिळविला व त्या राज्यातील तुंगभद्रेच्या उत्तरेकडील व पश्चिमेकडील प्रदेश यादव राज्यात समाविष्ट केला. कोल्हापूरच्या शिलाहार राजाचा पराभव करून राजकीय दृष्ट्या एक फार महत्त्वाचा प्रदेश सिंघणाने जिंकला. त्याने गुजरात राज्यावरही स्वाऱ्या केल्या. त्याचे साम्राज्य छत्तिसगड व जबलपूरपर्यंत पसरले होते. त्याने रट्टांचा तसेच गुप्त, कदंब इत्यादी छोट्या राजांचाही पराभव केला. आपल्या विश्वासू व पराक्रमी सेनानींच्या साहाय्याने सिंघणाने विशाल साम्राज्य स्थापिले. कोंकण, लाट, विदर्भासह महाराष्ट्र, म्हैसूर व आंध्र हे प्रदेश त्याच्या साम्राज्यात अंतर्भूत होते. सिंघणाचा राज्यकाल ख्रि. उ. १२४७ पर्यंतचा आहे.

शार्ङ्गदेवाचा पिता सोढल हा भिल्लमाच्या पदरी होता. तेव्हा त्याचा आजोबा भास्कर हा १२ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास किंवा त्यानंतर काही वर्षांत दक्षिणेत सुयोग्य आश्रय मिळविण्यासाठी आला असावा. यावेळी काश्मीरमध्ये जयसिंह हा राजा राज्य करीत होता. त्याने आपल्या धूर्तपणाने विरोधी सामंतांचा पराभव केला. पण तेथील संघर्षमय वातावरणामुळे भास्कराला दक्षिणेकडे जावेसे वाटले असावे. पंजाबात या काळात मुसलमानांचे राज्य स्थापित झाले होते व या राजांचे स्वरूप आक्रमक होते. मुसलमानांच्या भारतावरील अधिराज्याचा वाढता धोका उत्तर भारतातील राजांना जाणवू शकला नाही कारण त्यांची श्रेष्ठत्वासाठी परस्परांत युद्धे चाललेली असत. कर्ण किंवा भोज यासारख्या पराक्रमी राजांनी मुसलमानांचा पराभव केला होता पण त्याच वेळी त्यांनी इतर भारतीय राजांवरही आक्रमणे केली होती. कनोजच्या विजयचंद्र व जयचंद्र या पराक्रमी राजांनी मुसलमानांचे हल्ले परतवून लावले होते. पण जयचंद्र व बंगालचा राजा लक्ष्मणसेन यांच्यामध्ये चाललेल्या सततच्या लढाईमुळे दोघांचेही सामर्थ्य क्षीण होऊन मुसलमानी आक्रमणाचा वीमोड होऊ शकला नाही. ख्रि. उ. ११ व्या शतकात कलचूरि राजांचा प्रभाव उत्तर भारतात होता. ख्रि. उ. ११५९ ते ११६७ या काळात या घराण्यात जयसिंह हा राजा गादीवर आला. त्याच्या काळात तुरुष्कांनी त्याच्या राज्यावर हल्ला केला. ख्रि. उ. १२१२ नंतर या

घराण्याचे अस्तित्व दिसून येत नाही. माळव्याच्या परमार राजांपैकी यशोवर्मन हा ११३३ मध्ये गादीवर आला. चालुक्य राजा जयसिंह सिद्धराज याने यशोवर्म्याचा पराभव करून त्याला कैद केले व माळव्याचे सर्व राज्य स. ११३५ च्या सुमारास आपल्या राज्यात समाविष्ट करून घेतले. चाहमान राजांमध्ये विग्रहराज (११५० ते ११६३) हा विजयी राजा होऊन गेला. तो स्वतः लेखक असून हरकेलि नाटक त्याने रचिले. त्याच्यावर सोमदेव या कवीने ललितविग्रहराज हे नाटक लिहिले. या घराण्यातील पृथ्वीराज हा पराक्रमी राजा स. ११७८ त गादीवर आला. त्याने मुसलमानांच्या हल्ल्याला चांगली टक्कर दिली पण त्यांचा पूर्ण बीमोड केला नाही. त्याचा कनोजच्या जयचंद्राशी संघर्ष चालू असल्याने महंमद घोरीने या दोघांचाही स. ११९२ च्या सुमारास पूर्ण पराभव करून त्यांची राज्ये नष्ट केली. कनोजच्या राजांना तर आश्रयासाठी राजपुतान्यात पळून जावे लागले. या काळात दिल्ली-आग्रा ते गंगा हा सर्व परिसर घोर व त्याच्या गुलाम आक्रमकांपुढे उद्ध्वस्त व हतबल झाला.

संक्षेपाने वर वर्णन केलेली उत्तर भारतातील १२ व्या शतकामधील अशांत परिस्थिती पाहिल्यावर भास्करासारखा पंडितश्रेष्ठ काश्मीरहून दक्षिणेत का आला असावा याची काही अंशी कल्पना करता येते. देवगिरीच्या यादवांचे प्रभावी राज्य स्थापन होण्यास या वेळी सुरवात झाली होती. भिल्लमाचे कर्तृत्व या राज्यस्थापनेत पराक्रमी पहिला राजा या दृष्टीने ठळक व महत्त्वपूर्ण आहे. म्हणून भास्कराचा मुलगा सोढल या आपल्या पित्याचे भिल्लमाच्या पदरी असतानाचे कर्तृत्व शार्ङ्गदेवाने संक्षेपाने वर्णिले आहे. श्री. पी. व्ही. शर्मा यांच्या मते, देवगिरीच्या यादव राजाने भास्कराचे आयुर्वेदातील पारंगतत्व जाणून त्याला आपल्या दरबारी बोलवून घेतले असावे. (पहा– Saṅgīta-ratnākara of Śārṅgadeva, Vol. I. Introduction–PP. XIII–XVI) यादव राजांच्या आश्रयाला अनेक आयुर्वेदपंडित असल्याची माहिती मिळते असे शर्मा सांगतात. यावरून त्यांच्या वरील तर्काला आधार मिळतो. दक्षिणेस अलंकृत करण्यासाठी भास्कर हा काश्मीरहून आला असे जे शार्ङ्गदेवाने म्हटले आहे त्याचा शब्दशः अर्थ घेतला तर श्री. शर्मा यांच्या या मताला आणखी पुष्टी मिळते.

शार्ङ्गदेवाने केलेल्या सिंघणदेवाच्या यशोगानात अतिशयोक्ति आहे असे म्हणता येणार नाही. सिंघणामध्ये युद्धनैपुण्य, प्रशासनकौशल्य व राजनीतिप्रावीण्य यांचा उत्कृष्ट संगम झालेला होता. तो स्वतः संगीतप्रेमी असून त्याने आपल्या दरबारी या कलेला उत्तेजन दिले. चांगदेव व अनंतदेव हे दोन ज्योतिषशास्त्रज्ञ त्याच्या पदरी होते. सिंघणाच्या आश्रयाखाली, भास्कराचार्यांचा नातू चांगदेव याने खानदेशातील (चाळिसगावाजवळ असलेल्या) पाटण येथे आपल्या आजोबांच्या 'सिद्धान्तशिरोमणि' या ग्रंथाचे तसेच त्यांच्या इतर ग्रंथांचे अध्ययन होण्यासाठी विद्यालय स्थापन केले. अनंतदेवाने ब्रह्मगुप्ताच्या ब्रह्मस्फुटसिद्धान्ताच्या एका प्रकरणावर आणि वराहमिहिराच्या बृहज्जातकावर टीका लिहिली.

गुणांची योग्य पारख असणाऱ्या या गुणसंपन्न राजाच्या पदरी असलेल्या सोढलाचे जीवन भरभराटीचे असल्यास त्यात नवल काय ? अशा या पंडितप्रवराचा शार्ङ्गदेव हा सत्पुत्र होय. तो सिंघणदेवाच्या दरबारी 'श्रीकरणाधिपति'[२] या महत्त्वाच्या अधिकारपदावर होता हे, त्याने जो स्वत:विषयी तसा अनेकवार निर्देश केला आहे, त्यावरून समजून येते. स्वत:चा उल्लेख त्याने 'श्रीकरणेश्वर'[३], 'श्रीकरणाग्रणी'[४], 'श्रीकरणनाथ'[५] असाही अनेक वेळा केलेला आहे. 'करण' या शब्दाचा अर्थ सामान्यत: शासकीय अधिकारपद असा केला जातो. 'श्रीकरण' हे पद अर्थखात्याशी निगडित असले पाहिजे. म्हणून 'श्रीकरणाधिपति' या अधिकारपदाचे स्वरूप 'महालेखापरीक्षक' (Auditor-General) असे होते, असे इतिहासज्ञ मानतात.

शार्ङ्गदेव सर्व शास्त्रांत प्रवीण होता. तो दिसायला अत्यंत सुंदर असावा असे 'मन्मथोदारमूर्ति:' म्हणून त्याने स्वत:विषयीच्या केलेल्या उल्लेखावरून वाटते. संगीतशास्त्रावरील सदाशिवापासून ते अभिनवगुप्तापर्यंतचे, तसेच नान्यदेव, भोज, सोमेश्वर इत्यादींचे ग्रंथ अभ्यासून आपण संगीतरत्नाकर हा ग्रंथ लिहिला असे त्याने म्हटले आहे; (सं. र. भा. १ पृ. ११, १२ श्लो. १५ ते २०). संगीतशास्त्राशिवाय योग-वेदान्तादी दर्शने, मीमांसा-व्याकरणादी शास्त्रे (१.७.५८, ५९; ६.३३६), आयुर्वेद, छन्द:शास्त्र (प्रबन्धाध्याय) व गणितशास्त्र (१.४; ५.३१३ ते ४०८) या सर्वांवर त्याचे प्रभुत्व होते हे या ग्रंथाचा अभ्यास करताना कळून येते. 'प्रत्यंगांचा विस्तार आपण लिहिलेल्या 'अध्यात्मविवेक' या ग्रंथामधून पहावा' असे तो म्हणतो (१.२.११९, भा. १ पृ. ४५). यावरून त्याने 'अध्यात्मविवेक' हा ग्रंथ लिहिला असल्याचे समजून येते. हा ग्रंथ अद्यापपर्यंत तरी उपलब्ध झालेला नाही. हा त्याचा ग्रंथ आयुर्वेदासंबंधी असला पाहिजे. शार्ङ्गदेव हा आयुर्वेदात निष्णात होता हे त्याने स्वत:विषयीच्या केलेल्या 'रोगांनी व्याकुळ झालेल्यांची पीडा रसायनांनी नाहीशी करून' या वर्णनावरून तसेच पिण्डोत्पत्ति या प्रकरणावरून कळून येते. (१.१.१२, १३ भा. १ पृ. १० व १.२ पृ. १९-४५.) त्याचे आजोबा श्रीभास्कर हेही आयुर्वेदात पारंगत असून आयुर्वेदविद्या त्यांच्यापासून परंपरेने शार्ङ्गदेवाला प्राप्त झाली होती. (पहा- Saṅgīta-ratnākara of Śārṅgadeva Vol. I; Text and English Translation by Dr. R. K. Shringy; Introduction by Dr.

---

२. अध्यायांची समाप्ति अशी केलेली आहे—उदा०
"इति श्रीमदनवद्यविद्याविनोदश्रीकरणाधिपतिश्रीसोढलदेवतनूजनि:शङ्कशार्ङ्गदेव-विरचिते संगीतरत्नाकरे स्वरगताध्याय: प्रथम:।"

३. भा. १ पृ. १३१ श्लोक ३३, पृ. ३१५ श्लो. १२६; भा. २ पृ. २५७ श्लो. ३२८.

४. भा. १ पृ. १३५ श्लो. ५३, पृ. २५० श्लो. १९, पृ. ३२५ श्लो. १६०;
भा. २ पृ. २९५ श्लो. ५२३, पृ. ३१२ श्लो. ६४४, पृ. ३१७ श्लो. ६६५;
पृ. ३७७ श्लो. ९५०- 'करणाग्रण्या'.

५. भा. २ पृ. ३६२ श्लो. ८८४- 'श्रीश्रीकरणनाथेन'.

Premlatā Sharma, PPXV, XVI) पिण्डोपत्ति या प्रकरणातील १२० ते १६३ या श्लोकांवरून त्याचे हठयोग व तंत्र यांचे ज्ञान समजते.

तो वेदान्तातील भेदाभेद मत मानणारा असून परम शिवभक्त आहे. स्वतःला तो 'महामाहेश्वर' (३.१९).[६] 'श्रीशंकरप्रिय' (३.७३), 'हरप्रिय' (४.१३२), 'शंकर-वल्लभ' (६.८६६), शंकरानुचर (६.९२५) इत्यादी म्हणवितो. भरत, नारद, दुर्गाशक्ति याष्टिक, मतंग, कीर्तिधर, विशाखिल, कश्यप, सोमेश्वर, सव्यसाची (धनंजय) इत्यादि पूर्व-सूरींची मते तो उद्धृत करतो. काही वेळा दुसऱ्या आचार्यांचे मत म्हणून ते ते मत तो देतो. शार्ङ्गदेव, श्रीशार्ङ्गी, निःशङ्क, सोढलात्मज, सोढलसूनु, सोढलतनय अशा प्रकारे तो स्वतःचा निर्देश करतो. प्रत्येक अध्यायाच्या शेवटी शार्ङ्गदेव, स्वतःला 'अनवद्यविद्याविनोद', 'श्रीकरणाधिपति', 'सोढलदेवनन्दन' व 'निःशंक' असे म्हणवितो. 'अनवद्यविद्याविनोद' या शब्दाने निर्दोष ज्ञान हाच त्याच्या मनाचा विरंगुळा असल्याचे कळते. निःशंक या विशेषणाने ज्ञानाच्या बाबतीतला त्याचा ठामपणा समजून येतो. त्याने स्वतःची वेगळी अशी एक वीणा 'निःशङ्कवीणा' या नावाने तयार केलेली होती हेही त्याने दिलेल्या वीणांच्या वर्णनावरून कळते.

शार्ङ्गदेवाने स्वतःचा उल्लेख ६ व्या अध्यायात 'यज्ञपुरमण्डनः',[७] 'यज्ञपुराग्रणीः',[८] 'श्रीयज्ञपुरवर्येण',[९] 'श्रीयज्ञपुरसूरिणा'[१०] असा केलेला असल्याने तो काही काळ यज्ञपुर या नगराचा निवासी असल्याचे समजून येते. हे यज्ञपुर म्हणजे आधुनिक कोणते गाव असू शकेल हे निश्चितपणे कळत नाही. 'हालसातवाहनाची गाथासप्तशती' (प्रसाद प्रकाशन, पुणे स. १९५६) या ग्रंथाच्या प्रस्तावनेत (पृ. ३२६), 'जुन्नर' या नावाची व्युत्पत्ति 'यज्ञ-नगर' या नावापासून असावी असे आपले मत श्री. स. आ. जोगळेकर यांनी दिले आहे. "नाणेघाटातील लेखात उल्लेखिलेले यज्ञ जुन्नर (यज्ञ–नगर, जण्ण = यज्ञ; गाथा २२७) येथे झाले असावेत असेही माझे अनुमान आहे," असे ते म्हणतात. पण 'सह्याद्रि' या आपल्या ग्रंथात (प्रसाद प्रकाशन, पुणे, स. १९५२ पृ. १७३) जुन्नर म्हणजे जुने नगर–जीर्णनगर असे स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. 'जीर्ण' याचे प्राकृतरूप 'जुण्ण' होय. हीच व्युत्पत्ति योग्य आहे. जुन्नर गटातील एका लेण्यातील लेखात 'जुन्निनगर' असे नाव मिळते. जुन्नर ही प्राचीन महाराष्ट्राची राजधानी होती. सातकर्णीने अनेक यज्ञ केले होते. पण तरीही 'यज्ञ' पासून 'जण्ण' हे प्राकृत रूप मानून जुन्नर शब्दाची दिलेली व्युत्पत्ति बरोबर नसल्याने जुन्नर हा शब्द यज्ञ-नगर पासून मानता येत नाही. यज्ञनगर व यज्ञपुर

---

६. अध्यायात प्रकरणे नसल्यास कंसातील आकडे अध्याय व श्लोक यांचे आहेत.

७. भा. २ पृ. २२८ श्लो. १६०

८. भाग २ पृ. २३६ श्लो. १९९

९. भाग २ पृ. ३४५ श्लो. ८१७

१०. भाग २ पृ. ३७० श्लो. ९१४

यांचा अर्थ जरी एकच आहे तरीही यज्ञनगर हे नावही वर सांगितल्याप्रमाणे अनिश्चित ठरल्याने शार्ङ्गदेवाने निर्देशिलेले यज्ञपुर कोणते हा प्रश्न शिल्लकच राहतो. ओरिसामधील वैतरणी नदीच्या काठी असलेले जयपूर हे प्राचीन यज्ञपुर मानले जाते. पण शार्ङ्गदेवनिर्दिष्ट यज्ञपुराचा संबंध या यज्ञपुराशी जोडणे शक्य वाटत नाही.

सिंघणदेवाने अनेक युद्धांत स्थिर स्वरूपाचे विजय मिळवून साम्राज्य विस्तारले. साम्राज्याला स्थैर्य प्राप्त झाल्यावर शासनव्यवस्थेकडे भरपूर लक्ष देण्याचे कार्य सिंघणदेवाने केले असणे स्वाभाविक आहे. यामुळे सिंघणदेवाच्या कारकीर्दीतील उत्तरार्धाच्या काळात संगीतरत्नाकर हा ग्रंथ लिहिला असावा. खुद्द सिंघणराजानेही संगीतरत्नाकरावर टीका लिहिली होती, अशा प्रकारची माहिती डॉ. ओ. पी. वर्मा यांच्या 'The Yādavas and Their Times' या ग्रंथात सिंघणाविषयी लिहिताना मिळते.

शार्ङ्गदेवाच्या या ग्रंथावर अनेक टीका लिहिल्या गेल्या असल्याची माहिती मिळते. कालीवर वेदांतवागीश व शारदाप्रसाद घोष यांनी सिंहभूपालाच्या टीकेसह संगीतरत्नाकराचा पहिला अध्याय कलकत्ता येथील न्यू आर्यप्रेस मधून प्रसिद्ध केला आहे. या कलकत्ता आवृत्तीच्या संपादकांनी, चार संस्कृतमध्ये, एक हिंदीत व दोन तेलुगु भाषेत अशा सात टीका आपणांस ज्ञात असल्याचे म्हटले आहे. पण त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या अशा दोनच संस्कृत टीका (म्हणजे कल्लिनाथ व सिंहभूपाल यांच्या) व एक हिंदी टीका या तीनच टीका होत्या. डॉ. कृष्णमाचार्य[११] यांनी सिंहभूपाल, केशव, कल्लिनाथ, हंसभूपाल व कुंभकर्ण यांच्या टीकांचा तसेच चंद्रिका व गंगारामकृत हिंदी टीका यांचा उल्लेख केला आहे. केशवाची टीका कौस्तुभ नावाची होय. गोविंद दीक्षित यांच्या संगीतसुधा[१२] या ग्रंथातही केशवाच्या टीकेचा उल्लेख आहे. हंसभूपाल हा सिंहभूपाल या ऐवजी प्रमाद असणे शक्य आहे. कुंभकर्णाच्या टीकेबद्दल पुरेसा पुरावा उपलब्ध नाही. कुंभकर्णाच्या 'संगीतराज'[१३]

---

११. 'History of Sanskrit Literature', by M. Krishnamachariar; First Reprint 1970; P. 853.

१२. 'संगीतसुधा' हा ग्रंथ तंजावरच्या रघुनाथराजाच्या नावाने, म्यूझिक ॲकॅडमी, मद्रासमार्फत प्रकाशित झालेला आहे. पण गोविंद दीक्षित यांचा मुलगा वेंकटमखिन् याने आपल्या 'चतुर्दण्डीप्रकाशिके'त (पृ. १४, श्लो. १५४) हा ग्रंथ आपल्या वडिलांनी लिहिला असल्याचे म्हटले आहे. या ग्रंथातील पृ. १५२ वर ४०७ ते ४०९ या श्लोकात केशवाच्या टीकेचा उल्लेख आहे. तो असा–

'श्रीशार्ङ्गदेवेन कृतां च सप्ताध्यायीं तथा लक्ष्मविरोधिलक्ष्याम् ॥
अबोधकात्यल्पतरप्रयोगामुद्दिष्टरागानुदितस्वरूपाम् ।
एतां स्फुटीकर्तुमिहप्रवृत्तौ यौ ब्राह्मणौ केशवकल्लिनाथौ ॥
टीकाद्वयेनापि कृतेन ताभ्याम् .....।

१३. 'संगीतराज' या ग्रंथाचे संपादन डॉ. प्रेमलता शर्मा यांचे आहे. या ग्रंथाचा पहिला भाग बनारस हिंदु युनिव्हर्सिटीने स. १९६३ मध्ये प्रकाशित केला आहे.

या ग्रंथाचा पहिला भाग प्रकाशित झाला आहे व अवशिष्ट ग्रंथाचे मुद्रण चालू आहे. या ग्रंथातील दिसून येणारा संगीतरत्नाकराचा आधार पाहता हा ग्रंथच टीका म्हणून निर्देशिलेला आहे काय असा संदेह उत्पन्न होतो. चन्द्रिका ही टीका अनामिक टीकाकाराची आहे असे डॉ. कृष्णमाचार्य व डॉ. राघवन् यांनी म्हटले आहे. डॉ. राघवन्[१४] यांनी कौस्तुभ या टीकेचा आणि मूळ ग्रंथाचे केवळ दुसऱ्या शब्दांत विवरण असणाऱ्या अशा दुसऱ्या एका टीकेचा उल्लेख केलेला असून कल्लिनाथ, सिंहभूपाल, केशव व गंगाराम यांच्याही टीकांचा निर्देश केला आहे. गंगारामाची हिंदी टीका सेतु या नावाची असून तिचे हस्तलिखित तंजावरच्या ग्रंथालयात आहे. डॉ. राघवन् यांनी एक तामिळ अनुवादही तंजावरच्या ग्रंथालयात असल्याची माहिती दिली आहे.

सिंहभूपाल व कल्लिनाथ यांच्या टीका महत्त्वपूर्ण असून त्या छापलेल्याही आहेत. संगीतरत्नाकराच्या आनन्दाश्रमप्रतीत कल्लिनाथाची कलानिधि ही टीका छापलेली आहे. ही प्रत १८९६-९७ सालातली आहे. अडयारप्रतीत कलानिधि व सिंहभूपालाची सुधाकर या दोन्ही टीका छापलेल्या आहेत. अड्यारप्रत चार भागांत प्रकाशित झाली आहे. [ते चार भाग अनुक्रमे १९४३, १९५९ (दुसरी आवृत्ति), १९५१ व १९५३ या सालांत प्रसिद्ध झालेले या मराठी भाषांतर असणाऱ्या आवृत्तीसाठी वापरले आहेत.]

या दोन्ही टीकांमधील सिंहभूपालाची टीका अगोदरची आहे. सिंहभूपाल हा राजा रेचल्लवंशीय असून त्याच्या पित्याचे नाव अनपोत असे होते. अनपोत व त्याचा भाऊ मद यांनी आपले राज्य दृढपणे स्थापित करून त्याची आपसांत वाटणी केली. या राज्याचा प्रदेश अंध्र हा होता. राज्याच्या उत्तरेकडील भागावर अनपोताची सत्ता असून त्याची राजधानी राजुकोण्ड ही होती. आणि दक्षिणेकडील भागावर मदाचे आधिपत्य असून त्याची राजधानी देवरकोण्ड ही होती. अनपोताला देवगिरीश्वर व सिंहभूपाल हे दोन मुलगे होते. पण देवगिरीश्वर हा लहानपणीच निवर्तला असला पाहिजे. कारण अनपोतानंतर सिंहभूपालच गादीवर आला. याने संगीतरत्नाकरावर संगीतसुधाकर[१५] ही टीका लिहिली.

संगीतशास्त्राचे सार जाणणाऱ्या सर्व पंडितांशी विचारविनिमय करून आपण ही टीका लिहिली असे तो म्हणतो. तो इतर शास्त्रांतही निष्णात होता. अत्यंत गंभीर, विषम स्वरूपाच्या व काहींनाच आकलनीय अशा संगीतरत्नाकर या ग्रंथावर सुयोग्य टीका लिहिण्यास सिंहभूपाल हाच एक कुशल आहे असेही तो सांगतो.[१६] अध्यायसमाप्तीच्या[१७] वेळी

---

१४. पहा.- 'Later Sangita Literature' by Mr. V. Raghavan; The Journal of the Music Academy, Madras, Vol. IV 1933, PP. 16-24.

१५. संगीतरत्नाकर (अडयार आवृत्ति) भाग १ पृ. ६

१६. सं. र. (अडयार आ.) भा. १ पृ. ६

१७. 'इति श्रीमदन्ध्रमण्डलाधीश्वरप्रतिगण्डभैरवश्रीअनपोतनरेन्द्रनन्दनभुजबलभीमश्रीसिंहभूपालविरचितायां संगीतरत्नाकरटीकायां सुधाकराख्यायां स्वरगताध्यायः समाप्तः।'

अंध्रमंडलाधीश्वर, प्रतिगण्डभैरव, अनपोतनरेन्द्रनंदन आणि भुजबलभीम असा तो स्वतःचा निर्देश करतो. 'प्रतिगण्डभैरव' या त्याने योजलेल्या विशेषणावरून विरोधी योद्धयांना भयंकर अशा भैरवाप्रमाणे तो होता हे कळून येते. आपल्या टीकेत त्याने भरत, सुश्रुत, नारद, दत्तिल, काश्यप, मतंग, दक्षप्रजापति, भट्टाचार्य इत्यादी पूर्वसूरींच्या मतांचा निर्देश केला आहे. त्याने पार्श्वदेवाच्या संगीतसमयसारातील उद्धरणे दिली आहेत. तसेच वेदान्तकल्पतरु व तत्त्वप्रदीपिका यांचा आणि भामह, वामन, मम्मट इत्यादी आलंकारिकांचा व श्रीहर्षकृत नैषधचरिताचा उल्लेख केला आहे. छन्दांच्या बाबतीत त्याने पिङ्गलनागाचा व वृत्तरत्नाकराचा निर्देश केला आहे.

त्रिवेन्द्रम संस्कृत सीरीजमध्ये शिङ्गभूपालाचा 'रसार्णवसुधाकर' हा अलंकारग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. शिङ्ग हे सिंहचे प्राकृत रूप होय. या ग्रंथाच्या आरंभी (श्लो. १ ते ४४) त्याने स्वतःविषयी माहिती विस्ताराने दिली आहे, ती अशी–विष्णूच्या पदकमळापासून उत्पन्न झालेल्या म्हणजे शूद्रवर्णाच्या रेचल्लवंशात दाचयनायक हा राजा होऊन गेला. त्याने पांड्य राजाचा पराभव करून खड्गनारायण ही पदवी धारण केली. त्याची पत्नी बोचाम्बा ही तामरसवंशाची होती. या दांपत्याला शिङ्गप्रभु, वेन्नमनायक व रेचमहीपति हे तीन मुलगे होते. दाचयानंतर शिङ्ग हा राजा झाला. या शिङ्गप्रभूचे अनंत व माधव हे दोन पुत्र अनुक्रमे अनपोत व मद या नावानेही ओळखले जात होते. अनंत याची पत्नी अन्नमाम्बा होय. या जोडप्याचे देवगिरीश्वर व शिंगभूपति हे दोन पुत्र होत. शिंगभूपालाचे वर्णन दीर्घायु असे केले आहे. यावरून देवगिरीश्वर अल्पायु झाला असावा असे दिसते. म्हणूनच वडिलानंतर शिंगभूपाल गादीवर आला. ग्रंथकाराने रसार्णवसुधाकरात स्वतःविषयी माहिती जेवढी विस्ताराने दिली आहे तेवढी सुधाकर या टीकेच्या आरंभी दिलेली नाही; म्हणून हे दोन्ही ग्रंथकार वेगळे असे मानण्याचे कारण नाही. रसार्णवसुधाकर आधी लिहून नंतर सुधाकर टीका लिहिली असेल तरीही हे संभवनीय आहे. या ग्रंथांतील अध्यायांच्या शेवटी[१८] व ग्रंथसमाप्तीच्या वेळी मिळणाऱ्या निर्देशावरून या दोन्ही ग्रंथांचा लेखक एकच आहे हे सिद्ध होते. शिवाय दोन्ही ग्रंथांच्या नावांतील 'सुधाकर' हा शब्दही त्या दृष्टीने सूचक आहे. सिंहभूपालाचा तिसरा ग्रंथ 'कुवलयावली' अथवा 'रत्नपाञ्चालिका' हा त्रिवेन्द्रम संस्कृत सिरीजमध्ये १९४१ साली प्रसिद्ध झाला आहे. 'कुवलयावली' ही चार अंकी नाटिका आहे. या नाटिकेच्या प्रस्तावनेत[१९] 'श्रीशिङ्गभूपालेन प्रणीतां' असा स्पष्ट उल्लेख आहे. तसेच 'श्रीयन्नमातात्मजः' असाही नाटिकाकाराचा निर्देश आहे. यन्नमाता म्हणजेच अन्नमातृ अर्थात अन्नमाम्बा होय. 'शिङ्गभूपालाच्या साहित्याचे सौभाग्य असे की त्याची प्रशंसा करण्यासाठी विश्वेश्वराची वाग्देवी सन्नद्ध होती' या कुवलयावलीतील वर्णनावरून त्याचे

---

१८. इति श्रीमदन्ध्रमण्डलाधीश्वरप्रतिगण्डभैरवश्रीअनपोतनरेन्द्रनन्दनभुजबलभीमश्रीशिङ्गभूपालविरचिते रसार्णवसुधाकरनाम्नि...'।

१९. कुवलयावली पृ. २ श्लो. ३

साहित्य विद्वन्मान्य झाल्याची माहिती मिळते. हा विश्वेश्वर 'चमत्कारचन्द्रिका' या ग्रंथाचा लेखक होय. या ग्रंथात रसार्णवसुधाकराचा[२०] निर्देश दिसून येतो. कुवलयावलीतील दोन श्लोक (दुसऱ्या अंकातला पहिला श्लोक व तिसऱ्या अंकातला चवथा) स्वकृत उदाहरणे म्हणून रसार्णवसुधाकरात आढळून येतात. तपशील पाहण्यासाठी रसार्णवसुधाकराचा संदर्भ चमत्कारचन्द्रिकेत दिला आहे म्हणून तेवढ्यावरून रसार्णवसुधाकर हा ग्रंथ विश्वेश्वराने रचला असावा असे अनुमान करण्यास विश्वासार्ह कारण आढळत नाही. या उलट रसार्णवसुधाकराचा कर्ता शिङ्गभूपाल असल्याचे प्रत्यक्ष त्या ग्रंथातील अध्यायसमाप्तीच्या वेळच्या निर्देशावरून स्पष्ट होते.

राजधर्माचे उत्कृष्ट परिपालन करून पूर्वीच्या काही राजांनी कला व शास्त्रे यांत महत्त्वपूर्ण ग्रंथनिर्मिति केली आहे. त्यामुळे सिंहभूपालाचे ग्रंथकर्तृत्व मान्य करण्यात कोणताही प्रत्यवाय असण्याचे कारण नाही. या तीन ग्रंथांशिवाय इतरही ग्रंथरचना त्याने केली असावी असे म्हणण्याला जागा आहे. 'यथा ममैव' असा निर्देश करून पंचवीस श्लोक उदाहरणे म्हणून त्याने रसार्णवसुधाकरात दिले आहेत. कुवलयावलीतील दोन श्लोकासंबंधी पूर्वी सांगितले आहेच. 'यथा कन्दर्पसंभवे ममैव' या निर्देशावरून 'कन्दर्पसंभव' हा ग्रंथ त्याने लिहिला असल्याची माहिती मिळते. बाकीची उदाहरणे त्याच्या कोणत्या ग्रंथातली आहेत हे कळण्यास आजतरी काही साधन नाही.

डॉ. वेंकटरमणय्य[२१] यांनी 'वेलुगोटिवारिवंशावली'च्या प्रस्तावनेत शिंग (सर्वज्ञ) हा रसार्णवसुधाकराचा लेखक म्हणून दिला आहे. त्यांनी अनपोताचा काल खि. उ. १३७० च्या सुमाराचा ठरवला आहे. त्यावरून शिंगभूपालाचा काल चौदाव्या शतकातील शेवटचा कालखंड ठरतो.

अडयारप्रतीच्या संपादकांनी सिंहभूपालाची टीका मुख्यतः दोन हस्तलिखितांवरून तयार करण्यात आली असल्याचे सांगितले आहे. यांतील एक हस्तलिखित बिकानेर फोर्ट संग्रहालयातील असून त्याची प्रतिलिपि संपादकांनी मिळविली. दुसरे हस्तलिखित बडोदा येथील ओरिएण्टल लायब्ररीतील असून त्याचीही प्रतिलिपि त्यांनी मिळविली. तिसरे एक हस्तलिखित पुणे येथील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या हस्तलिखितसंग्रहात आहे. पण त्यात थोडीच व तुरळक अशी पाने आढळल्याने त्याचा उपयोग केलेला नाही असे संपादकांनी म्हटले आहे. श्रीनगर येथील रघुनाथमंदिरात एक हस्तलिखित असल्याचे समजल्यावरून संपादकांनी ते मिळविण्याचा प्रयत्न केला पण ते हस्तलिखित तेथे नसल्याचे त्यांना कळविण्यात आले.

'कलानिधि' या टीकेचा लेखक कल्लिनाथ हा विजयनगरचा यादववंशीय राजा इम्मडिदेवराय याच्या पदरी होता. कावेरी व कृष्णा यांच्यामधील कर्णाट देशाची राजधानी

२०. कुवलयावली– Introduction pp. 1–7
उदा. 'सिंहभूपालविरचिते रसार्णवसुधाकरे अस्य प्रपञ्चो विज्ञेयः'।

२१. कुवलयावली– Introduction pp. 1–7

तुंगभद्रेच्या तीरावरील विद्यानगरी (म्हणजेच विजयनगर) ही होती. यादववंशातील विजयराजपुत्र देवरायराज याचा मुलगा इम्मडिदेवराय हा या नगरीत शासन करीत असता त्याच्या सभेत चतुरकल्लिनाथ विराजमान झालेला होता. त्याच्या आजोबाचे नाव वल्लभेश्वर असून पित्याचे नाव लक्ष्मीधर व आईचे नारायणी होते. तो शाण्डिल्य गोत्राचा असून साक्षात संगीतदेवताच असल्याने राजाने त्याला संगीतरत्नाकरावर टीका लिहिण्यास बहुमानपूर्वक सांगितले.

अध्यायसमाप्तीच्या[२२] वेळी कल्लिनाथ स्वतःचा निर्देश 'अभिनवभरताचार्य, रायबयकार (वाग्गेयकार), तोडरमल्ल लक्ष्मणाचार्यनन्दन, चतुरकल्लिनाथ' असा करतो. त्याच्या पित्याचे नाव लक्ष्मणाचार्य असेही असल्याचे यावरून दिसते. अभिनवभरताचार्य व वाग्गेयकार या विशेषणांवरून संगीतशास्त्रावरील त्याचे श्रेष्ठ प्रभुत्व कळते. श्रुति, वेदान्त, योगयाज्ञवल्क्य, याज्ञवल्क्यस्मृति, योगदर्शन, भगवद्गीता, आयुर्वेद, वाचस्पतिमिश्रांची ब्रह्मसूत्रावरील भामती ही टीका यांचा, तसेच मतंग, काश्यप, शार्दूल, विश्वावसु, तुम्बुरु, वेणु, भरत, कोहल, दत्तिल, आञ्जनेय इत्यादी पूर्वसूरींचा, आणि औमापत्य, हरदत्तमिश्रांची काशिकेवरील पदमञ्जरी ही टीका, नन्दिमत, छन्दोविचिति व वृत्तरत्नाकर इत्यादींचा त्याचा व्यासंग त्याच्या टीकेवरून माहीत होतो. त्याने 'रागकदंब' या प्रबंधावरील आपल्या टीकेत तसेच देशी तालांच्या विवरणात गोपालनायकाचा[२३] उल्लेख केलेला आहे. गोपालनायक हा महान संगीतज्ञ खि. उ. १४ व्या शतकाच्या आरंभीच्या काळात होऊन गेला अशी माहिती मिळते. चतुर्दण्डीप्रकाशिकेतही[२४] दोन वेळा (२.५७ व ९.५) गोपालनायकाचा निर्देश आला आहे. त्यांतील एकात (२.५७) 'मीच श्रुती जाणतो असे गोपालनायक म्हणतो' असा आशय आढळतो.

इतिहासज्ञांनी विजयरायाचा काल खि. उ. १४१८ ते १४२३, दुसऱ्या देवरायाचा १४२३ ते १४४६ व इम्मडिदेवरायाचा १४४६ ते १४६५ असा दिला आहे. यावरून कलानिधिटीका पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धातील आरंभीच्या काही वर्षांत लिहिली गेली असे ठरवता येते.

संगीतरत्नाकराच्या आनन्दाश्रमप्रतीसाठी कल्लिनाथाच्या टीकेसह असलेली मूळ ग्रंथाची तीन हस्तलिखिते, केवळ मूळ ग्रंथ असलेली दोन हस्तलिखिते व केवळ टीकेचे एक देवनागरी लिपीतील व एक आन्ध्र लिपीतील हस्तलिखित यांचा उपयोग संपादकांनी केला आहे.

---

२२. उदा. 'इति श्रीमदभिनवभरताचार्यरायबयकारतोडरमललक्ष्मणाचार्यनन्दनचतुरकल्लिनाथविरचिते संगीतरत्नाकरकलानिधौ प्रथमः स्वरगताध्यायः ।'

२३. संगीतरत्नाकर (अड्यार आ.) भा. २ पृ. ३०५; भा. ३ पृ. १४०.

२४. चतुर्दण्डीप्रकाशिका–श्रीमद्वेङ्कटमखिविरचिता; मद्रास म्यूझिक अॅकॅडमी, मद्रास, १९३४ पृ. २१ श्लो. ५७– 'अहमेव श्रुतीर्वेदेत्याह गोपालनायकः ।'

या टीकाकारांनी भरतोक्त म्हणून दिलेली काही उद्धरणे[२५] सध्याच्या प्रकाशित नाट्यशास्त्रात मिळत नाहीत.

कल्लिनाथाची टीका विस्तृत असून, व्याकरणसूत्रांच्या आधाराने त्याने अनेक संगीत-विषयक पारिभाषिक शब्द सूक्ष्मतेने स्पष्ट केले आहेत. [उदा. आलाप, आलपन, व आलप्ति हे शब्द पहावे. (३.१८९) भा. १ पृ. ३८७–३९२]

काही ठिकाणी (उदा. तालाध्यायातील देशीतालांच्या लक्षणांत व वाद्याध्यायातील वीणाप्रकारांच्या वर्णनात) त्याची टीका अल्प आहे. अशा ठिकाणी तो तो ग्रंथभाग मुळात सुबोध आहे असे म्हणून तो त्यावरील स्वतःची टीका देत नाही.

सिंहभूपालाची टीका सर्वत्र मिळते. पण काही वेळा मूळ ग्रंथातील शब्द स्पष्ट न करता तो आपल्या टीकेत तसेच देतो. वाग्गेयकार व वृंद यांची लक्षणे तो विस्ताराने देतो. क्वचित् त्याच्या टीकेत प्रमादही आढळतात [उदा. 'वेणि' या ऐवजी 'पृथग्वेणि' हे अलंकाराचे नाव, (१.६.२६); 'विशाला संगता वाद्या सुनन्दा संगतादिमा । सुमुखी च सुनन्दाद्या संगता च विशालिका ।। या ग्रंथभागाचे स्पष्टीकरण, (अड्यार आ. भा. ३ पृ. ११८)].

या टीकाकारांच्या समोर संगीतरत्नाकरातील वेगवेगळे पाठ असल्याचेही काही ठिकाणी दिसून येते—

कलानिधिटीका	सुधाकरटीका
गर्भाशयान्वितः (१.२.३५)	गर्भशयान्वितः
त्वक्स्मृती (१.२.३६)	त्वक्श्रुती
कंदीकृत्य (१.२.१५०)	क्रोडीकृत्य
उक्तशुद्धादिभेदेन (१.४.४०)	उक्ताः शुद्धादिभेदेन
अग्रिमखरं (आनन्दाश्रम आ. १.६.३८)	अग्रिवत्परं
यथास्वनियमाद्...(१.७.२२)	यथास्वं नियमाद्...
अनंशाबहुलाः (१.७.७७)	अनंशा बहुलाः
मालवश्रिया (४.२८६)	न्यसनं स्वैरः
अवरैकादशपरा (५.७५)	त्र्यवरैकादशपरा

श्री. नरसिंहाचार्य[२६] यांनी 'सिंहभूपालाने त्याच्या वेळी प्रचारात असलेले एकोणीसच ताल फक्त निर्देशिले आहेत' असे आपल्या लेखात केलेले विधान चुकीचे

२५. उदा. सुधाकरटीका (अड्यार आवृत्ति भा. २ पृ. ९ 'जातिसंभूतत्वाद्रागाणाम् ।'
कलानिधिटीका (अड्यार आ. भा. २ पृ. ८) 'जातिसंभूतत्वाद्ग्रामरागाणाम् ।'
सुधाकरटीका (अ. आ. भा. २ पृ. ३३५) 'ननु भरतेनैलादीनां छायालगत्वमुक्तम्।'
,, (अ. भा. भा. २ पृ. २१८) इदं च मेलापकानां सामान्यलक्षणं सर्वा-स्वेलास्वनुगतं पूर्वाचार्यैर्भरतादिभिरुक्तम् ।

२६. पहा– 'Simhabhūpāla: His Contribution to Music,' by V. V. Narasimhacharya; The Journal of the Music Academy, Madras, Vol XLIV 1973, pp. 248–260

आहे. त्यांचे हे विधान 'ते च लाघवभेदज्ञानोपाया एकोनविंशतिः।' या सुधाकरटीकेतील वाक्यावर आधारलेले आहे. या वाक्याचा आशय (देशीतालांतील) भेदांचे ज्ञान थोडक्यात सहजपणे होण्यासाठीचे ते उपाय एकोणीस आहेत ' असा आहे. हे उपाय म्हणजे प्रस्तार, संख्या, नष्ट, उद्दिष्ट इत्यादी एकोणीस होत. (पहा अड्यार आ. भा. ३ पृ. १६०)

कल्लिनाथाने मूळ ग्रंथात न दिलेली भाषारागांची लक्षणे, त्यांचे संपूर्ण ज्ञान होण्यासाठी, मतंग, आंजनेय इत्यादींच्या मतांना अनुसरून दिली आहेत. (भा. १ पृ. ३३८ ते ३५२) तसेच षड्ज, ऋषभ इत्यादी सात स्वरांच्या नावांची अन्वर्थकता मतंग इत्यादींच्या मतांना अनुसरून स्पष्ट केली आहे. (भा. १ पृ. ६७ ते ६८)

मतंगमुनींच्या बृहद्देशीत जाती व राग यांची स्वरलिपि देताना तार व मंद्र स्वरांची चिन्हे दिलेली नसल्याने त्यांचे स्वरूप स्पष्टपणे कळणे कठिण होते. संगीतरत्नाकरात ही तारमंद्रचिन्हे दिलेली आहेत व कल्लिनाथाने आपल्या टीकेत तार–मध्य–मंद्र स्वरव्यवस्था विस्तारपूर्वक सांगितलेली असल्याने प्राचीन जातिगायन व रागगायन यांचे स्वरूप कळणे शक्य झाले आहे.

(२) शार्ङ्गदेवाने निर्देशिलेले पूर्वाचार्य

(१) सदाशिव– शंकराने चित्रपूर्वरंगासाठी तण्डूकरवी भरताला ताण्डवनृत्य दिले असे नाट्यशास्त्रात म्हटले आहे. (ना. शा. १. १६, १७, १८) नटराज हे शंकराचे भारतीय आद्य नृत्यदेवता म्हणून स्वरूप प्रसिद्धच आहे. अभिनवगुप्ताने नाट्यशास्त्रावरील आपल्या टीकेत अलंकारांच्या संदर्भात 'सदाशिवमता'चा उल्लेख केला आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ९१]

(२) शिवा– अर्थात पार्वती. लास्य म्हणजे सुकुमार नृत्य पार्वतीने बाणासुरकन्या उषा हिला शिकवले असे अभिनयदर्पणात सांगितले आहे. (अभिनयदर्पण– घोषसंपादित आवृत्ति पृ. ८१ श्लो. ४ ते ६) संगीतरत्नाकराच्या काही हस्तलिखितांत गणैलालक्षणात 'पार्वतीमतात्' असा पार्वतीमताचा उल्लेख आहे. (आनन्दाश्रम आ. पृ. २८८)

(३) ब्रह्मा– नाट्यवेद ब्रह्मदेवाने निर्माण केला असे नाटचशास्त्राच्या पहिल्या अध्यायात सांगितले आहे. आरंभी ब्रह्मदेवाने नारद इत्यादींना गांधर्व दिले असे दत्तिलात म्हटले आहे. (द. श्लो. २) 'ब्रह्मदेवाने म्हटलेली कपालगानांची पदावली आम्ही सांगतो' असे म्हणून शार्ङ्गदेवाने ती गीते दिली आहेत. (भा. १ पृ. २२८)

(४) कंबल व (५) अश्वतर–

अश्वतर व त्याचा भाऊ कंबल यांनी सरस्वती देवीला प्रसन्न करून सात स्वर, सात ग्रामराग, सात गीतके, सात मूर्च्छना, तीन ग्राम व एकुणपन्नास ताना यांचे ज्ञान प्राप्त करून घेतले असे वायुपुराणाच्या एकविसाव्या अध्यायात म्हटले आहे. अश्वतर हा नाग कश्यप व कद्रू यांचा मुलगा असल्याचे पुराणांत सांगितले आहे. पंचमी जातीवर आधारलेली जी गीते नागराज कंबलाने शंकराच्या समोर गायिली तीमुळे शंकर संतुष्ट

झाला आणि ही गीते पुढे कंबलगीते म्हणून प्रसिद्ध झाली असे नान्यदेवाने म्हटले आहे. (भ. भा. भाग २ पृ. २२०) कंबलगीतांची स्वरालापासह उदाहरणे नान्यदेवाने दिली आहेत. शार्ङ्गदेवाने कंबलगीताचे लक्षण व ते नाव प्राप्त होण्याचे कारण सांगितले आहे. कंबलगीतांची स्वरालापासह उदाहरणे दिलेली नाहीत.

(६) वायु– वायुपुराणात ८६ व ८७ या दोन अध्यायांत संगीतविषयक भाग आलेला आहे. स्वरमंडलात सात स्वर, तीन ग्राम, एकवीस मूर्च्छना व एकुणपन्नास ताना यांचा समावेश सांगितला आहे. (उत्तरखंड, अध्याय २४ श्लो. ३६) अभिनवगुप्ताने आपल्या नाट्यवेदविवृतीत वायुपुराणाचा निर्देश मूर्च्छनांच्या उपयोगाच्या संदर्भात केला आहे. [ना. शा. (बडोदा आ.) भा. ४ पृ. ३०] तसेच 'श्रीवायुप्रोक्त' असा निर्देश अलंकारांच्या संदर्भात केला आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ९१].

(७) विश्वावसु– गंधर्वराज म्हणून पुराणात सांगितला आहे. (स्कन्द पुराण अ. २५४ श्लो. ६०) मार्कण्डेय पुराणातही त्याचप्रमाणे त्याचे वर्णन मिळते. (मार्कण्डेयपुराण अ. २१ श्लो. २८) नारदीशिक्षेत विश्वावसूचा उल्लेख आहे. (ना. शि. २।६।११) स्वरगत श्रुती व अन्तरश्रुती याबद्दलचे विश्वावसूचे म्हणून एक वचन मतंगाने उद्धृत केले आहे. (बृ. पृ. ४) सिंहभूपालाने आपल्या टीकेत त्याचे उद्धरण दिले आहे. (अड्यार आ. भा. १ पृ. ६८)

(८) रम्भा– नृत्यगानकुशल अप्सरा म्हणून पुराणांत ही वर्णिलेली आहे.

(९) आञ्जनेय– संगीतमकरन्द व संगीतरत्नाकर यांत पूर्वाचार्यांमध्ये आञ्जनेयाचा उल्लेख आहे. भावप्रकाशनात उत्सृष्टिकांकाच्या लक्षणात आञ्जनेयाने तीन अंक सांगितले आहेत असे म्हटले आहे. (भा. प्र. पृ. २५१) स्त्रियांचे जे भाव वेगवेगळे सांगितले आहेत ते सर्व स्त्रियांना साधारण स्वरूपाचे होत असे मारुति म्हणतो म्हणूनही सांगितले आहे. (भा. प्र. पृ. ११४) कल्हिनाथाने देशीरागांच्या स्वरूपासंबंधी आञ्जनेयाचे मत उद्धृत केले आहे (सं. र. भा. १ पृ. ३२६) दामोदर पंडिताने (१६ वे शतक) नादाचे महत्त्व वर्णन करताना आञ्जनेयाचे म्हणून एक उद्धरण दिले आहे. (संगीतदर्पण पृ. ६); तसेच हनुमन्मताने पुरुष व स्त्रिया या स्वरूपाने रागरागिण्यांची नावे दिली आहेत. (सं. द. पृ. ३०) हनूमताचा उल्लेख संगीतसुधा या ग्रंथातही आला आहे. (पृ. २५) या उल्लेखांवरून आञ्जनेय हे नाव पौराणिक स्वरूपाचे असले तरी नाट्य व संगीत या विषयी आञ्जनेयाचा ग्रंथ असावा असे म्हणता येते. पण असा ग्रंथ आज प्रत्यक्ष उपलब्ध नाही.

(१०) नन्दिकेश्वर– संगीत, व्याकरण, तन्त्र व कामशास्त्र या विषयांवरील ग्रंथांचे कर्तृत्व नन्दिकेश्वराकडे दिले जाते. अभिनवगुप्ताने नन्दीचा उल्लेख केला आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ६३, ४१४, ४२०] तसेच नन्दिकेश्वराचा उल्लेखही केला आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. १२०, १२२] ग्रामराग इत्यादि जे गेय त्याच्या संदर्भात मतङ्ग, कश्यप इत्यादीबरोबर नन्दीचा निर्देश केलेला आहे (ना. शा. भा. १ पृ. ६३); तर पुष्करवाद्याच्या संदर्भात नन्दिमताचा उल्लेख केलेला आहे. (ना. शा. भा. ४ पृ. ४१४ व

पृ. ४२०) नन्दिकेश्वरमताला अनुसरून चित्रपूर्वरङ्गाचे वर्णन दिले आहे. (ना. शा. भा. ४ पृ. १२० ते १२२) अभिनवगुप्ताने तण्डूचेच दुसरे नाव नन्दि असेही म्हटले आहे. (ना. शा. भा. १ पृ. ८८) नाट्यशास्त्रातील परंपरेप्रमाणे शंकरांनी तण्डूला अभिजात नृत्य शिकविले व ते तण्डूने भरताला शिकविले. अर्थात त्यामुळे त्याला ताण्डव हे नाव मिळाले. नाटयशास्त्राच्या काव्यमाला प्रतीत शेवटी 'नन्दिभरतसंगीतपुस्तकम्' असे म्हटले आहे. पुष्करवादकाच्या दोषांच्या संदर्भात अभिनवगुप्ताने तण्डूचा निर्देश केलेला आहे. (ना. शा. भा. ४ पृ. ४५६) बृहद्देशीत द्वादशस्वरमूर्च्छनेच्या संदर्भात नन्दिकेश्वराचा उल्लेख आलेला आहे. (बृ. पृ. ३२) नान्यदेवाने एलांच्या संदर्भात नन्दीश्वरमताचा (भ. भा. फोलिओ १६९) व मृदंगवादनाच्या संदर्भात नन्दिमताचा उल्लेख केला आहे. (भ. भा. फोलिओ २१०) भावप्रकाशनात नन्दिकेश्वराने नाटयवेद ब्रह्मयाला शिकविला व ब्रह्मदेवाने तो भरताला शिकविला असे म्हटले आहे. (भा. प्र. पृ. ५६ व पृ. २८५) राजशेखराने काव्यमीमांसेत (पृ. १) 'शंकराने ब्रह्मदेवाला अलंकारशास्त्र दिले व त्याने ते इतरांना शिकविले आणि त्यांमध्ये नन्दिकेश्वराला रसविषयक ज्ञान दिले असे म्हटले आहे. नन्दिकेश्वरविरचित 'अभिनयदर्पण' हा ग्रंथ डॉ. मनमोहन घोष यांनी संपादित करून प्रकाशित केला आहे. नन्दिकेश्वराच्या नावावर सध्या मिळणारा 'भरतार्णव' हा ग्रंथ नंतरचा आहे. नन्दिभरत ग्रंथातील 'नन्दिभरतोक्तसंकरहस्ताध्याय' हा भाग मद्रास गव्हर्मेंट लायब्ररीतील हस्तलिखितांच्या संग्रहात आहे; तसेच या संग्रहात नन्दिकेश्वर व पार्वती यांमधील संवादस्वरूपाचा भरतार्थचन्द्रिका हा ग्रंथही आहे. नन्दिकेश्वरप्रणीत 'तालल्क्षण' या ग्रंथाचे हस्तलिखित तंजावर येथील सरस्वती महाल लायब्ररीत आहे. नन्दिकेश्वराच्या नावावर मिळणाऱ्या ग्रंथांत भरताला अनुसरणारे व त्यापेक्षा वेगळी परंपरा असणारे अशी दोन्ही प्रकारची मते दिसून येतात. पूर्वरंगातील नृत्यप्रयोगाबद्दल सांगताना अभिनवगुप्ताने म्हटले आहे- 'नन्दिकेश्वरमताला अनुसरून कीर्तिधराने जे सांगितले आहे ते आम्ही जरी प्रत्यक्ष पाहिले नसले तरी त्यावरील विश्वासामुळे थोडक्यात लिहितो.' कल्लिनाथाने आपल्या टीकेत 'नन्दिमतानुसार दुसऱ्या मात्रेलांचे लक्षण देत आहे' असे म्हटले आहे. (सं. र. भा. १ पृ. ४२८)

नन्दिकेश्वरासंबंधी मिळणाऱ्या या सर्व माहितीवरून फार प्राचीन काळापासून गायन, वादन व नृत्य या विषयांवरील अधिकारी व्यक्ति असे त्याचे स्वरूप मानलेले असल्याचे दिसून येते. त्याच्या या व्यक्तिमत्त्वाचे पौराणिक व ऐतिहासिक असे मिश्र स्वरूप आढळते.

(११) स्वाति– हा गंधर्व म्हणून वर्णिलेला आहे. पहिल्या नाट्यप्रयोगाच्या वेळी वाद्यांच्या साठी स्वातीची नियुक्ति केली असल्याचे नाट्यशास्त्रात म्हटले आहे. (ना. शा. १.५०–५२) स्वाति स्नानाला गेला असता, सरोवरांतील कमळांच्या पानांवर पडणाऱ्या पावसाच्या जलधारांमुळे निर्माण होणारे वैचित्र्यपूर्ण नाद ऐकून, त्याने पुष्कर वाद्ये निर्माण केली असे वर्णन नाट्यशास्त्रात चौतिसाव्या अध्यायाच्या आरंभी आले आहे. अभिनवगुप्ताने त्याला 'आनद्धवित्' (म्हणजे चामड्याने तोंड मढविलेल्या मृदंगासारख्या वाद्यांचा जाणकार)

असे म्हटले आहे. (ना. शा. भा. १ पृ. ४७) स्वातीने पुष्करवाद्ये निर्माण केल्यासंबंधीचा वरील नाट्यशास्त्रातील उल्लेख भरतभाष्यातही मिळतो. (फोलिओ २०१)

(१२) गण– याबद्दल माहिती मिळत नाही. गंधर्वगणाचा उल्लेख प्राचीन ब्राह्मण-काळातही मिळतो.

(१३) नारद– हा देवर्षि म्हणून पुराणांत म्हटला आहे. नारद व तुंबुरु यांचा मिळून उल्लेख मिळतो. सामवेदसंबद्ध नारदीशिक्षा हा ग्रंथही नारदप्रणीत आहे. ऋग्वेदात तो मंत्रद्रष्टा ब्रह्मर्षि म्हणून मिळतो. (ऋ. आठव्या मंडलातले तेरावे सूक्त व नवव्या मंडलातील १०४ व १०५ ही दोन सूक्ते). ऐतरेय ब्राह्मणातील शुनःशेपाच्या आख्यानात पर्वत व नारद या दोन ऋषींचा उल्लेख आहे. छादोग्यउपनिषदात देवर्षि नारद आत्मज्ञान मिळविण्यासाठी ब्रह्मज्ञानी सनत्कुमाराकडे जातो असे सांगितले आहे. (छा. उ. ७.१.१) नारदीशिक्षा या सामवेदाच्या शिक्षाग्रंथात सामगायकांनी स्वर दाखविण्यासाठी योजायच्या गात्रवीणेचे वर्णन तसेच सामस्वर आणि त्यांची लौकिक स्वरनामे प्रथम निर्दिष्ट केलेली आहेत. महाभारतात त्याचा निर्देश गान्धर्वतज्ज्ञ म्हणून मिळतो. (शान्तिपर्व B. O. R. I. २०३.१९) नाट्यशास्त्रात गन्धर्व म्हणून त्याचा निर्देश आहे. (१.५२) त्याचा निर्देश ध्रुवासंबंधात (३२.१) व अवनद्ध वाद्यांच्या संबंधात (३४.२) आला आहे. 'आचार्याः सममिच्छन्ति...' हा नारदी शिक्षेतील श्लोक नाट्यशास्त्रात मिळतो. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ४५१ श्लो. २२३]

'अप्सरांच्या सह हे नाट्य मी, स्वाति व नारद यांनी स्वर्गात रक्षित केले' असे भरतमुनींनी म्हटले आहे. (३७.१९) दत्तिलात ब्रह्मदेवाने आरंभी गांधर्व नारद इत्यादींना दिले असे म्हटले आहे (द. श्लो. २) तसेच नारद इत्यादींनी अग्निष्टोम इत्यादी यज्ञीय ताननामांनी ताना सांगितल्या असेही म्हटले आहे. (द. श्लो. ३१) आर्चिक, गाथिक, इत्यादी एकापासून क्रमाने सात स्वरांपर्यंतच्या गीतांमधील स्वरयोजनेच्या संदर्भात बृहद्देशीत नारदाचा निर्देश आहे. (बृ. पृ. १७) तसेच 'गांधारग्राम नारद म्हणतो' असा नारदाचा उल्लेख आहे. (पृ. २०) "षड्ज, गान्धार व मध्यम हे देवकुलात उत्पन्न झालेले आहेत" असेही नारदाचे वचन बृहद्देशीत उद्धृत केलेले आहे. (पृ. २१)

अभिनवगुप्तांनी नारदाला गीतज्ञ म्हटले आहे. (ना. शा. भा. १ पृ. ४७) त्यांनी अनेकवार नारदाचा निर्देश केला आहे. (ना. शा. भा. ४ पृ. ६ वर–गन्धर्वाचे नारदीय-निर्वचन; पृ. ११ वर–षडज इत्यादी स्वरनामांची नारद इत्यादींनी दिलेली व्युत्पत्ति; पृ. १२ वर–'यः सामगानां' असा नारदीयशिक्षेतील उल्लेख; पृ.३० वर–नारदीयशिक्षेतील तानपर्यन्त स्वरमण्डल; पृ. ४३ वर–नारदमुनीचे उद्धरण 'यः सामगानां प्रथमः स विशेन्मध्यमस्वरः।'; पृ. ९१; पृ. २८८ वर ध्रुवासंदर्भात; पृ. २९१; पृ. ४०४; पृ. ५११ इ.)

नान्यदेवाने आपल्या भरतभाष्यातील शिक्षाध्यायात नारदीय शिक्षेतील उद्धरणे दिली आहेत.

वरील सर्व उल्लेखांवरून नारदीयशिक्षाकार नारद व गान्धर्वतत्त्वज्ञ नारद अशी नारदाची संगीताशी संबद्ध प्राचीन स्वरूपे दिसून येतात. याशिवाय 'संगीतमकरन्द' हा ग्रंथही नारदाच्या नावावर उपलब्ध आहे. पण हा ग्रंथ मध्ययुगीन वाटतो. पुरुष, स्त्री व नपुंसक असे राग, तुरुष्कतोडी अशा सारखे रागाचे नाव यावरून हा ग्रंथ निश्चितपणे नंतरचा आहे. ब्रह्मा नारदाला देशीरागरहस्य सांगतो असे या ग्रंथात म्हटले आहे. तालाच्या बाबतीत द्रुत व अनुद्रुत यांचा समावेश देशीतालांतच संभवतो. 'चत्वारिंशच्छतरागनिरूपण' या ग्रंथाचाही कर्ता नारद आहे. पण हा ग्रंथ संगीतमकरन्दानंतरचा आहे.

(१४) तुम्बुरु– पुराणांत व महाभारतात नारदाबरोबर तुम्बुरूचा निर्देश मिळतो. तुम्बुरु हा गांधर्वनिपुण आहे. नाटकगेयलक्षणकर्ता तुम्बुरु दिसून येतो. बृहद्देशीत चार प्रकारच्या श्रुतींच्या संदर्भात 'चतुरः' असा निर्देश आहे. (बृ. पृ. ४) पण कल्लिनाथाने संगीतरत्नाकरातील पहिल्या अध्यायामधील तिसऱ्या प्रकरणातील श्रुतिविचारात 'तुम्बुरु' असा या उद्धरणाबाबतचा केलेला निर्देश योग्य वाटतो. (सं. र. भा. १ पृ. ५९) धैवत व निषाद हे स्वर तुम्बुरूने गायिलेले असा निर्देशही बृहद्देशीत मिळतो (पृ. १९) नान्यदेवाने 'तुम्बुरु, भरत, मतङ्ग इत्यादींनी असे म्हणून षड्जकैशिकी जातीच्या संदर्भात त्याचा निर्देश केला आहे. (भ. भा. भाग २ पृ. ९८) सुषिरवाद्यांच्या संदर्भातही नान्यदेवाने गंधर्वपति म्हणून त्याचा निर्देश केला आहे. (भ. भा. फोलिओ १९५) संगीतमकरंदात पूर्वाचार्यांत तुम्बुरु सांगितला आहे. (पृ. १३) जायसेनापतीने रेचकांच्या संदर्भात त्याचा उल्लेख केला आहे. (नृत्तरत्नावली, पृ. १५६)

(१५) रावण– रावणाने गायनाने शंकराला संतुष्ट करण्यासाठी मनगटातील स्नायू बाहेर ओढून काढून त्यावर आघात करून वादन केले. त्या वाद्याचे नाव रावणहस्त हे झाले. अशाप्रकारचे हे वर्णन पौराणिक होय. संगीतमकरन्दात पूर्वाचार्यांत रावणाचा निर्देश आहे. (पृ. १३) रावणहत्थो हे लोकवाद्य सध्याही प्रचारात दिसून येते.

(१६) अर्जुन– महाभारतातील तिसरा शूर पांडव. तो चित्रसेन गंधर्वाकडून गांधर्ववेद शिकला असे वर्णन महाभारतात मिळते. (वनपर्व ९१-१४,१५; विराटपर्व– ११. ८ ते १३) संगीतरत्नाकरात सव्यसाची व धनञ्जय ही अर्जुनाची नावे निर्दिष्ट केलेली आहेत. (भा. १ पृ. ४२८) ही नावे मात्रैलाच्या लक्षणात आलेली आहेत. 'सप्ततालप्रदीपिका' या ग्रंथाचा रचयिता अर्जुन हा शार्ङ्गदेवानंतरचा आहे. 'अर्जुनभरत' नावाच्या ग्रंथाचे हस्तलिखित तंजावरच्या सरस्वती महाल लायब्ररीत आहे. संगीतसुधा या ग्रंथात 'अर्जुनाच्या मतानुसार मी इतर मात्रादि एला सांगतो' असे ग्रंथकाराने म्हटले आहे. (सं. सु. पृ. २९९) तसेच याच ग्रंथात धनञ्जय व सव्यसाची ही नावेही आली आहेत. महाभारतातला अर्जुन व मात्रैलासंदर्भात निर्देशिलेला अर्जुन हे निश्चितपणे वेगळे मानले पाहिजेत.

(१७) भरत–भरतमुनि हे नाट्यशास्त्र या ग्रंथाचे प्रणेते होत. सध्या उपलब्ध असणाऱ्या नाट्यशास्त्राचा काल साधारणपणे ख्रि. पू. २ रे ते ख्रि.उ. २ रे, ३ रे शतक असा धरला

जातो. या ग्रंथात नाट्याची उत्पत्ति, प्रेक्षागृहनिर्मिति, रंगदैवतपूजन, पूर्वरंगात योजायचे नृत्य व इतर विधि, रस, भाव, आंगिक, वाचिक, सात्त्विक व आहार्य असा चतुर्विध अभिनय, सामान्याभिनय व चित्राभिनय, रूपकांचे दहा प्रकार, गांधर्व अर्थात गायन व वाद्यवादन, ध्रुवागीते, नाट्यातील भूमिकांची योजना आणि नटशाप इत्यादी सर्व विषय विस्तारपूर्वक दिलेले आहेत. नाट्यशास्त्रपूर्व नाट्य व संगीतविषयक ग्रंथ उपलब्ध नसल्याने या कलांचे प्राचीन शास्त्रशुद्ध स्वरूप जाणून घेण्यास नाट्यशास्त्र हाच आद्य प्रमाणभूत ग्रंथ मानावा लागतो. नाट्यशास्त्रकाळी स्वरांमधील श्रुत्यन्तरे सर्व दृष्टींनी समान अशा दोन वीणांच्या साहाय्याने प्रथम सांगितली गेली व त्यांवर आधारलेल्या संवादांच्या योगे शुद्ध स्वरसप्तक सिद्ध केले गेले. ब्रह्मदेवाने नाट्यवेद भरताला शिकविला आणि भरताने आपले पुत्र व अप्सरा यांच्या योगे नाट्यपरंपरा निर्माण केली. भरत म्हणजे नट असाही अर्थ पुढे रूढ झाला. नटांना आवश्यक असणारे नाट्यविषयक सर्वज्ञान नाट्यशास्त्रात आलेले असल्याने हा सर्व ग्रंथ एकाच वेळचा असेल असे म्हणता येत नाही. मूळ ग्रंथात आवश्यक अशी योग्य भर पडलेली असणेही स्वाभाविक आहे. अभिनवगुप्तांची नाट्यशास्त्रावरील विस्तृत व पांडित्यपूर्ण टीका अभ्यासून भरतप्रणीत नाट्यविषयक संकल्पना जाणणे आज शक्य आहे.

(१८) दत्तिल– नाट्यशास्त्रात भरताच्या पुत्रांमध्ये दत्तिलाचा निर्देश आहे. याने गांधर्वाचे शास्त्र 'दत्तिलम्' या ग्रंथात संक्षेपाने सांगितले. दत्तिल हा गांधर्वाविषयी अत्यंत प्रमाणभूत मानून, पुढील मतंग, अभिनव, नान्यदेव, शार्ङ्गदेव, इत्यादी संगीतशास्त्रकारांनी त्याची विपुल उद्धरणे दिली आहेत. दत्तिलाने ध्रुव पात दिलेला नाही, नाट्यशास्त्रात अलंकारांची संख्या ३३ दिलेली आहे तर दत्तिलात फक्त १३ च अलंकार सांगितले आहेत; इत्यादी पुराव्याच्या आधारे काही विद्वानांनी[२७] सध्याच्या नाट्यशास्त्रापेक्षा दत्तिलाचा काल अगोदरचा असावा असेही म्हटले आहे. निदान भरतकालाइतका त्याचा काल प्राचीन मानायला हरकत नाही असे डॉ. लथ[२८] यांनी म्हटले आहे. बृहद्देशीत दत्तिलाचा निर्देश त्याची उदाहरणे देऊन दोन वेळा आला आहे. (बृ. पृ. २९, ३०) अभिनवगुप्ताने नाट्यशास्त्राच्या २८ व्या अध्यायावरील टीकेत दत्तिलामधील उद्धरणे अनेक वेळा दिली आहेत. [नाट्यशास्त्र (बडोदा) भा. ४, पृ. ७, १३, १६, १९, २८ इ.] दत्तिलावरील 'प्रयोगस्तबक' नावाच्या टीकेचा उल्लेख सिंहभूपालाने केला आहे. (सं. र. भा. १ पृ. ८७) पण ही टीका उपलब्ध नाही.

(१९) विशाखिल– दत्तिलाने विशाखिलाचा निर्देश अपरान्तक गीताच्या संदर्भात केला आहे. (द. श्लो. १७७ पृ. १७) या निर्देशावरून विशाखिल हा आचार्य दत्तिला-

२७. 'The Nāṭyaśāstra', Ed. by M. Ghosh. Vol II –Introduction P. 22. 'A Study of Dattilam'– (Thesis) by Mukund Lath; preface.

२८. 'A Study of Dattilam' (Thesis) by Mukund Lath; Preface, P. III

च्याही पूर्वीचा ठरतो. बृहद्देशीत मूर्च्छना व तान याबाबतीत विश्राड्खिल याचे म्हणून एक मत दिले आहे. (बृ. पृ. २६) विश्राड्खिल या ऐवजी विशाखिल असाच शुद्ध पाठ घेणे योग्य दिसते. अभिनवगुप्ताने नाट्यशास्त्रावरील टीकेत जवळ जवळ २१ वेळा विशाखिलाचा निर्देश केला आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४– पृ. ६,७,८,१२,१७, २१,४२,४६,६२,७९,९५,१०५,१०९ इ.] नान्यदेवानेही विशाखिलाचा निर्देश केला आहे. (भरत भाष्य– भा. १ पृ. १२३; भा. २ पृ. ७७; सुषिरवाद्याध्यायात फोलिओ १९६) यावरून दत्तिलाप्रमाणेच गांधर्वाच्या बाबतीत विशाखिल हाही एक महान आचार्य होऊन गेला हे स्पष्ट होते.

(२०) कोहल – भरताच्या शंभर पुत्रात कोहलाचा निर्देश आहे. [ना. शा. (बडोदा) भा. १ पृ. १८] नाट्यशास्त्राच्या ३७ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकात 'बाकीचे उत्तरतन्त्रात (म्हणजे नंतरच्या शास्त्रग्रंथात) कोहल सांगेल' असे म्हटले आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ५११] कोहलाने नृत्यगायनप्रधान उपरूपकांचे वर्णन सविस्तर केले आहे. दत्तिलात षट्पितापुत्रक तालाच्या संदर्भात कोहल उद्धृत केला आहे. (दत्तिलम्– श्लो. १२८) बृहद्देशीत श्रुति-स्वर यांच्या संदर्भात (पृ. ५, १२), द्वादश-स्वरमूर्च्छनांच्या संदर्भात (पृ. ३२), व निष्कूजित अलंकाराच्या संदर्भात कोहल उद्धृत केला आहे. (पृ. ३९) अभिनवाने नाट्य व गेय यांच्या संदर्भात कोहलाची मते पुष्कळ वेळेला दिलेली आहेत : [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ७०, ३४२, ३८५, ३८६, ५११, ५१२]. दामोदरभट्टाने कुट्टनीमतात, नृत्यावरील प्रमाणभूत आचार्य म्हणून कोह-लाचा निर्देश केला आहे. (कुट्टनीमत पृ. १० श्लो. ८१, पृ. ११० श्लो. ८७५). भावप्रकाशनात उत्सृष्टिकांकाच्या लक्षणात (पृ. २५१), भाणलक्षणाच्या संदर्भात (पृ. २४५), तसेच वीथीमध्ये लास्याङ्गे योजावी किंवा योजू नये या मताच्या संदर्भात (पृ. २५१) कोहलाचा निर्देश आला आहे. रसार्णवसुधाकरात 'भरताच्या नाट्यशास्त्राला अनुसरून शाण्डिल्य, कोहल, दत्तिल व मतंग यांनी ग्रंथ रचले' असे म्हटले आहे. (र. सु. पृ. ८) नृत्तरत्नावलीत जायसेनापतीने निकुट्टक करणाच्या संदर्भात (पृ. १०८) कोहलसंमत लक्षण दिले आहे. कल्लिनाथाने, शार्ङ्गदेवाने न सांगितलेल्या वर्तनांचे स्वरूप माहीत होण्यासाठी, कोहलाने सांगितलेल्या काही वर्तना दिल्या आहेत. [सं. र. (अड्यार आ.) भा. ४ पृ. १०५] या वर्तना 'संगीतमेरु' या ग्रंथातील 'कोहल–शार्दूल' यांच्या संवादरूपाने सांगितलेल्या आहेत. या सर्व उल्लेखांवरून नाट्यातील उपरूपक प्रकारांचे स्वरूप कोहलाने प्रथम व्यवस्थितपणे वर्णिले आणि नृत्य व गायन–वादन यांचा त्यांमधील उपयोग सविस्तर सांगितला असे दिसून येते.

(२१) शार्दूल– मतंगाने याचा निर्देश भाषागीतीच्या व भाषालक्षणाच्या संदर्भात केला असल्याने तो मतंगपूर्व होय. (मतंगप्रणीत बृहद्देशीचा काल साधारणपणे ख्रि. उ. ८ वे शतक असा मानला जातो.) शार्दूलाचा निर्देश भाषागीतीच्या बाबतींत बृहद्देशीच्या ८२ व्या

व भाषालक्षणाच्या बाबतीत १३३, १३४, १३६ इ. पानांवर मिळतो. कल्लिनाथाने वर्तनांच्या बाबतीत 'कोहल-शार्दूल' यांच्या संवादाचा केलेला उल्लेख वर आलाच आहे. संगीतमकरन्दात शार्दूलाचा निर्देश आहे. (सं. म. पृ. १३; नृत्ताध्याय श्लो. १)

(२२) कश्यप (काश्यप)– मतंगाने ग्रामरागांच्या संदर्भात काश्यपाचा उल्लेख अनेक वेळा केला आहे. (बृ. ग्रामराग–पृ. ८७, ९४, ९९, १०३;) तसेच भाषालक्षणाच्या संदर्भातही केला आहे. (बृ. पृ. १०४) अभिनवगुप्ताने राग व भाषा यांचा कश्यपाने नाट्याच्या बाबतीत सांगितलेला विनियोग दिला आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ७२ ते ७८] नान्यदेवानेही राग व भाषा यांच्या संदर्भात कश्यपाचा अनेकवार उल्लेख केला आहे. [भरतभाष्य भा. २ पृ. २४०, २४२, २४३, २४४, २४७ इ.]. यावरून ग्रामराग व भाषा यांच्या बाबतीत कश्यप अधिकारी संगीतशास्त्रज्ञ मानला जात होता हे स्पष्ट होते.

(२३) दुर्गाशक्ति– दुर्गशक्तीच्या मते गीती पाच असल्याचा उल्लेख बृहद्देशीत, केला आहे. (बृ. पृ. ८२) तसेच पुढे 'राग हेच वेसर होत' हे मत दुर्गशक्तीचे म्हणून दिले आहे. (पृ. ९४) साधारण रागांच्या संदर्भात व गांधारपंचम या रागाच्या संदर्भातही त्याचा निर्देश बृहद्देशीत मिळतो. (अनुक्रमे पृ. ९९ व पृ. १०१) संगीतरत्नाकरात दुर्गाशक्ति असे नाव मिळते. (सं. र. भा. १ पृ. २८३ श्लो. ६५)

(२४) याष्टिक– गीतींच्या बाबतीत (बृहद्देशी पृ. ८२); व भाषांच्या बाबतीत (पृ. १०५, ११३, ११७, १२८ व १३०) मतंगाने याष्टिकाचा उल्लेख केलेला आहे. अभिनवगुप्ताने त्याचा निर्देश ग्रामराग इत्यादि गेयाच्या संदर्भात केला आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ८३] शार्ङ्गदेवाने याष्टिकाने सांगितलेले भाषाजनक राग पंधरा दिले आहेत. (सं. र. भा. १ पृ. २४३)

(२५) मातृगुप्त–(ख्रि. उ. ७ वे शतक) हर्षविक्रमादित्याच्या दरबारी राजकवि असणारा एक मातृगुप्त इतिहासात आढळतो. तो हर्षानंतर सुमारे पाच वर्षे काश्मीरचा राजा होता. अभिनवगुप्ताने व्यञ्जनधातूच्या पुष्प या प्रकाराच्या संदर्भात मातृगुप्त उद्धृत केला आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ९९] भावप्रकाशनात नाट्याच्या कथानकाच्या संदर्भात तो उद्धृत केला आहे. (पृ. २३४ श्लो. २१, २२) सागरनन्दिन् याने नाटकाच्या पाच अवस्था, संधि, प्रवेशक, आमुख इत्यादींच्या संदर्भात मातृगुप्ताची उद्धरणे दिली आहेत. (नाटकलक्षणरत्नकोश–पृ. ५, १४, २०, २३, ५०) राघवभट्टाने अभिज्ञान शाकुन्तलावरील टीकेत सूत्रधारलक्षण (पृ. ५), काव्याची शौरसेनी भाषा (पृ. ८), आमुख (पृ. १३), भूषणलक्षण (पृ. २०), यवनीलक्षण (पृ. ५७). सेनापतिलक्षण (पृ. ६२), हसितलक्षण (पृ. ७४), पताकास्थानक (पृ. १११) इत्यादींच्या संदर्भात मातृगुप्त उद्धृत केला आहे. (अभिज्ञानशाकुन्तल–अर्थद्योतनिकाटीकेसह; निर्णयसागर आ. १९४७)

(२६) मतंग– बृहद्देशी या ग्रंथाचा कर्ता म्हणून मतंगाचे महत्त्व संगीतशास्त्रात मानले जाते. (या ग्रंथाचा काळ ख्रि. उ. ८ वे शतक असा समजला जातो.) मतंगाने देशी संगीताचे लक्षण देऊन रागसंकल्पना विस्तृतपणे प्रथम मांडली. त्याने भरतप्रणीत सप्तस्वर-मूर्च्छना सांगितल्या आहेतच; पण त्याशिवाय जे विविध गानप्रकार भरतानंतर प्रसिद्धी पावले त्यांचा समावेश होण्यासाठी नंदिकेश्वरमताला अनुसरून द्वादशस्वरमूर्च्छनाही दिल्या आहेत. त्याने रागगायनाला आधारभूत असणाऱ्या गीतींचे सविस्तर लक्षण सांगितले. पुढील संगीतशास्त्रकारांनी त्याची वाद्यविषयक उद्धरणे दिलेली असल्याने या ग्रंथाचा वाद्याध्यायही असला पाहिजे हे कळून येते. (भरतभाष्य– वीणालक्षण, फो. १८५, वीणावादकलक्षण, फो. १८७; कुम्भकर्णकृत संगीतराज–बृहद्देशीसमाश्रित तीन किंनरीवीणा, भरतकोश, पृ. ४५४). सध्याचा उपलब्ध मुद्रित बृहद्देशी हा ग्रंथ प्रबन्धाध्यायानंतर समाप्त होतो. वाद्याध्याय त्यात आलेला नाही. बृहद्देशीत काश्यप, कोहल, दत्तिल, दुर्गशक्ति, नन्दिकेश्वर, नारद, ब्रह्मा, भरत, माहेश्वर, याष्टिक, वल्लभ, विश्वावसु व शार्दूल या पूर्वाचार्यांचा उल्लेख आलेला आहे. त्याने एलांच्या संदर्भात दिलेले वल्लभ हे शास्त्रकाराचे नाव इतरत्र कोठे मिळत नाही. (बृ. पृ. १४९) कुट्टनीमतात (श्लो. ८७७) सुषिरस्वरप्रयोगातील पंडित म्हणून मतंगमुनींचा उल्लेख आहे. अभिनवगुप्ताने, शंकराची आराधना करण्याचे साधन म्हणून मतंग इत्यादींनी बांबूचे वाद्य निर्माण केले म्हणून ते वंश म्हणून प्रसिद्ध झाले असे म्हटले आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. १३९] तसेच मतंगमुनींनी सांगितलेला, वंशवादनातील स्वरसाम्यावर आधारलेला रसभावसंबंधी विनियोगही दिला आहे. [ना. शा. भा. ४ पृ. १४७] नान्यदेवाने राग व भाषा यांच्या संदर्भात तसेच वीणा व वीणावादन या संबंधी अनेक वेळा मतंग उद्धृत केला आहे. [भरत भाष्य-भा. २ बृहद्देश्याम् पृ. २६७, मतंग–पृ. २६८, पृ. २७०, २७३; बृहद्देश्याम्– पृ. २७६, २७८, २८२, २८३, २८४, २८५, २८६, २८७, २८८, २८९, २९०, २९१ इ.] आणि चित्रा वीणेचा निष्णात वादक म्हणून मतंगाला चैत्रिक म्हटले आहे. (भ. भा. फो. १८५) जायसेनापतीने 'देशी नृत्ताच्या बाबतीत शोभादायक असणारे १६ पाद (म्हणजे चारी) मतंगाने सांगितलेले आता आम्ही सांगत आहो,' असे म्हटले आहे. (नृत्तरत्नावली, पृ. १७३) तसेच 'देशी नृत्ताचा संक्षेप बृहद्देशीत देताना मतंग म्हणाला....' असेही सांगितले आहे. (पृ. १८०) नृत्ताच्यासाठी योजायच्या वाद्यपद्धतीच्या बाबतीतही मतंग उदधृत केला आहे. (पृ. २०५, २०७). सिंहभूपालाने मतंग हा भरताच्या चार पुत्रांपैकी एक असून त्या चौघांनी नाट्यावर ग्रंथ लिहिले असे म्हटले आहे. (रसार्णवसुधाकर, पृ. ८) या शेवटच्या काही उल्लेखांवरून बृहद्देशीत नृत्तविषयक अध्यायही होता असे कळते.

(२७) राहल–(राहुल ?) राहुल याची नाट्यशास्त्रावर टीका होती असे अभिनव-गुप्ताने दिलेल्या उद्धरणावरून कळून येते. [ना. शा. (बडोदा) भा १ पृ. १९५] सागरनन्दिन् याने प्रच्छेदक या लास्यांगाच्या संदर्भात राहुलाचे मत उद्धृत केले आहे. (नाटकलक्षणरत्नकोश, पृ. ११९)

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय मंत्रालय

(२८) कीर्तिधर– याचीही नाटयशास्त्रावर टीका असली पाहिजे हे अभिनवगुप्ताने दिलेल्या उद्धरणांवरून कळून येते. २९ व्या अध्यायावरील टीकेत [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. १११ व १२०] अभिनवगुप्ताने एकूण चार वेळा कीर्तिधराचा उल्लेख केला आहे. तसेच ४ थ्या अध्यायावरील टीकेत नृत्य व नाटय यांविषयीच्या परस्परसंबंधाबाबत कीर्तिधराचार्यांचे मत उद्धृत केले आहे [ना. शा. (बडोदा) भा. १ पृ. २०६] शार्ङ्गदेवाने वंशांच्या संदर्भात कीर्तिधराचे मत उद्धृत केले आहे. (सं. र. ६. ४६० ते ४६४) जायसेनापतीने नृत्तरत्नावलीत हस्तलक्षणांच्या संदर्भात (पृ. ४६, ५६, ५७, ५८), चारीलक्षणांच्या संदर्भात (पृ. ७३, ७४, ७५), तसेच करणलक्षणांच्या बाबतीत (पृ. १०६, ११०, ११२, ११३ इ.) कीर्तिधराची मते उद्धृत केली आहेत.

(२९) लोल्लट– अभिनवगुप्ताने रसनिष्पत्तीच्या संदर्भात लोल्लटाच्या मताचा निर्देश केला आहे. [ना. शा. (बडोदा) भा. १ पृ. २६४, २७७, २९८,]

(३०) शङ्कुक– अभिनवगुप्ताने रसनिष्पत्तीच्या संदर्भातच शङ्कुकाच्याही मताचा उल्लेख केला आहे [ना. शा. (बडोदा) भा. १ पृ. २७२, २८४, २९२, २९७]

(३१) उद्भट– भट्ट उद्भट हाही काश्मीरी पंडित होय. याचा 'काव्यालंकारसारसंग्रह' हा ग्रंथ प्रकाशित झालेला आहे. जयापीड या काश्मीरच्या राजाचा तो सभापति होता. (जयापीडाचा काल खि. उ. ७७९ ते ८१३ हा आहे.) याने 'भामहविवरण' व 'कुमारसंभव' (महाकाव्य) हे ग्रंथही लिहिले असल्याचे उल्लेखांवरून कळून येते. प्रतीहारेन्दुराजाने भट्टोद्भटाच्या भामहविवरणाचा उल्लेख विशेषोक्ति या अलंकाराच्या संदर्भात केला आहे. भामहविवरणाचे इतरही उल्लेख दिसून येतात. (पहा– History of Sanskrit Poetics, by Kane; pp, 134–135) अभिनवगुप्ताने (१० व्या शतकाचा उत्तरार्ध व ११ व्या शतकाचा पूर्वार्ध) उद्भटाच्या मतांचा निर्देश, नाटयशास्त्रावरील आपल्या टीकेत अनेक वेळा केलेला आहे. उदा. हस्तप्रचार पाच असल्याचे भट्टोद्भटाचे मत त्याने दिले आहे; तसेच समवकाराच्या लक्षणाच्या संदर्भात आणि संधि व संध्यङ्गे यांच्या संदर्भात उद्भटाचा निर्देश केला आहे. उद्भट न्यायचेष्टावृत्ति, अन्यायचेष्टावृत्ति व फलसंवित्तिवृत्ति अथवा फलवृत्ति अशा तीन वृत्तीच मानत असल्याचे सांगितले आहे. या वरील उल्लेखांवरून उद्भटाची नाटयशास्त्रावर टीका होती हे निःसंशय मानले पाहिजे. [पहा– ना. शा. (बडोदा) – भा. २ पृ. ७०, पृ. ४४१ व ४५१; भा. ३ पृ. २८ व ३६]

(३२) रुद्रट– अभिनवगुप्ताने नाटयशास्त्रातील एकतिसाव्या अध्यायावरील टीकेत रुद्रटाचा निर्देश केला आहे. [ना. शा. (बडोदा) भा ४ पृ. २५२] पण कंसात रुद्रटाच्या जागी उद्भट हे नावही दिले असल्याने हा निर्देश निःसंदेह ठरत नाही. 'काव्यालंकार' या ग्रंथाचा कर्ता रुद्रट या नावाचा आहे हे आपणास संस्कृतसाहित्यशास्त्राच्या इतिहासावरून कळते. पण संगीतरत्नाकरातील पूर्वाचार्यांत निर्दिष्ट केलेला रुद्रट व हा काव्यालंकाराचा कर्ता रुद्रट हे एकच होते की काय हे समजायला मार्ग नाही. काव्यालंकार-

कर्त्या रुद्रटाचा काल ख्रि. उ. ८५० हा मानला जातो. काव्यालंकारात वृत्ति व रस यांचे वर्णन आहेच व नाट्यातही हे दोन्ही विषय आवश्यक आहेत एवढाच संबंध या बाबतीत जाणणे शक्य आहे. कल्लिनाथाने नंदयंती जातीच्या बाबतीत रुद्रटाचे मत दिले आहे.

त्याचा आशय असा– " 'तारगति योजताना (गायक) षड्जाच्या वर कधीही जात नाही;' तो तार षड्ज आरंभीची मर्यादा मानल्यास, तार षड्जापासून आरंभ करून सामान्यपणे प्राप्त होणाऱ्या चवथ्या स्वरापर्यंतचा आरोह करावा असे रुद्रट इत्यादींनी सांगितले आहे. कारण षड्ज ही तारगति असता मध्यमही तेव्हा संवादी असल्याने व तो अविनाशी असल्याने रुद्रटाने मध्यमापर्यंत तारगति दिली आहे, यात काही दोष नाही असे मतंगाने म्हटले आहे." (सं. र. भा. १ पृ. १५२) [हे मतंगाचे म्हणून कल्लिनाथाने दिलेले उद्धरण सध्याच्या प्रकाशित बृहद्देशीत मिळत नाही.] कल्लिनाथाच्या या उल्लेखावरून रुद्रटाचा संगीतविषयक ग्रंथ असावा; व हा रुद्रट मतंगपूर्व होऊन गेला असे म्हणता येते.

(३३) अभिनवगुप्त– भट्ट अभिनवगुप्त हा महान काश्मीरी पंडित होऊन गेला. (त्याचा काल साधारणपणे ख्रि. उ. १० व्या शतकाचा उत्तरार्ध व ११ व्या शतकाचा पूर्वार्ध असा मानला जातो.) दर्शन, तंत्र, साहित्य, नाट्य व स्तोत्र इत्यादी विषयांवर त्याने जवळ जवळ ५० ग्रंथ लिहिले. ध्वन्यालोकावरील त्याच्या लोचन या टीकेत साहित्यातील व्यञ्जनावृत्तीचा त्याने इतक्या प्रभावीपणाने पुरस्कार केला आहे की त्यानंतरच्या अनेक संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी तो प्रमाणभूत मानला. भरतप्रणीत नाट्यशास्त्रावरील त्याची टीका नाट्यवेदविवृति किंवा अभिनवभारती ही होय. नाट्यशास्त्रातील सर्व विषयांचे योग्य ज्ञान होण्यासाठी अभिनवभारती हे एकच साधन सध्यातरी उपलब्ध आहे. अभिनवगुप्ताची नाट्यशास्त्रावरील टीका नाट्यशास्त्राच्या बडोदा आवृत्तीत चार भागांत प्रसिद्ध झालेली आहे. रसाच्या उपपत्तीविषयी शंकुक, लोल्लट, उद्भट, भट्टनायक इत्यादींची मते अभिनवगुप्ताने दिल्यामुळेच माहीत होतात. तसेच नन्दिकेश्वर, हर्षवार्त्तिक इत्यादींचे नृत्यविषयक उल्लेखही त्याने दिले असल्यानेच कळून येतात. कारण या शास्त्रकारांचे ग्रंथ आज उपलब्ध नाहीत. संगीतविषयक अध्याय २८ ते ३४ यांवरील टीकेत त्याने गांधर्व व ध्रुवागान या संबंधी सर्व विवेचन मार्मिकपणे केले आहे. त्याने विशाखिल, कश्यप, आपले गुरु भट्टतौत, दत्तिल, आपले परमगुरु उत्पलदेव, मतंग, मातृगुप्त, नारद, नन्दी, याष्टिक, नाटककार हर्ष, कीर्तिधर, भट्टसुमनस्, भाष्यकार पतञ्जलि, वैयाकरण भर्तृहरि, कोहल, भट्टगोपाल, भट्टलोल्लट इत्यादी अनेक आचार्यांची मते निर्देशिलेली आहेत. त्याचे संगीताचे व नृत्याचे सूक्ष्मज्ञान व सखोल शास्त्राध्ययन यामुळे अभिनवभारती हा शार्ङ्गदेवाच्या गांधर्व व नृत्त या विषयीच्या विवेचनाचा प्रबळ आधार आहे.

(३४) भोज – (काल ख्रि. उ. ९९८ ते १०६२) भोजराज स्वतः अत्यंत विद्वान असून त्याने अनेक पंडितांना राजाश्रय दिला होता. त्याचा शृंगारप्रकाश हा ग्रंथ, व्याकरण

व साहित्य यांवर सरस्वतीकंठाभरण या नावाचे दोन ग्रंथ, शिल्पशास्त्रविषयक समरांगण सूत्रधार हा ग्रंथ, पतञ्जलीच्या योगसूत्रावरील टीका, राजमार्तण्ड व तत्त्वप्रकाश हे ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. याशिवाय धर्मशास्त्र व ज्योतिषशास्त्र यांवरही त्याचे ग्रंथ असून, संगीतावरही त्याचा ग्रंथ असला पाहिजे. पण संगीतावरील त्याचा ग्रंथ उपलब्ध नाही.

(३५) नान्यदेव – नान्यदेव हा मिथिलेचा राजा होऊन गेला. (काल ख्रि. उ. १०९७ ते ११३३). त्याचा भरतभाष्य हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. या ग्रंथाची केवळ एकच हस्तलिखित प्रत भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर, पुणे येथील हस्तलिखित संग्रहात असून तीवरून श्री. चैतन्य देसाई यांनी रागाध्यायापर्यंतच्या काही भागाचे प्रकाशन दोन भागांत केले आहे. अर्थात बाकीचा सर्वभाग अजून प्रकाशित व्हावयाचा आहे. नान्यदेवाने केव्हा स्वतःचा उल्लेख नारायण असाही केला आहे. (' राजनारायण ' –भा. १ पृ. ७९ श्लो. ६५) नान्य हा नारायण याचा संक्षेप असावा. त्याच्या बंधूचे नाव कीर्तिराज हे होते. त्याने आपल्या ग्रंथाचे नाव सरस्वतीहृदयालंकार किंवा सरस्वतीहृदयभूषण असेही दिले आहे. १।२ अध्यायात असलेले भरतभाष्य हे नावच प्रचारात आहे. त्याने सूचीत १७ अध्याय दिले आहेत पण हस्तलिखितात १६ व १७ हे अध्याय नाहीत. प्रारंभाचा भागही नाही. शार्ङ्गदेवाच्या पूर्वीचा, जाति, राग, वाद्ये व वाद्यवादन इत्यादींचे सविस्तर वर्णन करणारा हा ग्रंथ असल्याने तो महत्त्वाचा आहे. हस्तलिखितात अशुद्धस्वरूप अनेक ठिकाणी असल्याने जाति व राग यांची त्याने दिलेली स्वरलिपि तारमंद्रमध्य स्वरांचे सुव्यवस्थित स्वरूप जाणून घेण्यास पूर्णपणे उपयोगी पडत नाही. त्याने पूर्वाचार्यांत भरत, नारद, दत्तिल, मतंग, कश्यप, तुम्बरु, विशाखिल, अभिनवगुप्त, नन्दी इत्यादी अनेक आचार्यांचा निर्देश केला आहे.

(३६) परमर्दी– हा चालुक्य वंशातील त्रिभुवनमल्ल अथवा विक्रमांकदेव राजा होय. तो सोमेश्वराचा पिता. त्याने संगीतावर ग्रंथ लिहिला असणे शक्य आहे पण तो ग्रंथ उपलब्ध नाही.

(३७) सोमेश्वर– हा चालुक्य वंशीय राजा (ख्रि. उ. १२ व्या शतकाचा पूर्वार्ध) होऊन गेला. याचा मानसोल्लास अथवा अभिलषितार्थचिंतामणि हा ग्रंथ ओरिएण्टल इन्स्टिटयूट, बडोदा या संस्थेने प्रकाशित केला आहे. मानसोल्लासाच्या तिसऱ्या भागात, विनोदविंशतीमध्ये गीतविनोद, वाद्यविनोद व नृत्यविनोद ही तीन प्रकरणे आली आहेत. गीतविनोदात, वाग्गेयकार, गायकगुणदोष, शारीर, राग, भाषा, विभाषा, क्रियाङ्गराग प्रबन्ध इत्यादी विषय सविस्तर दिले आहेत. त्याने सांगितलेला धवल प्रबंध, महानुभावी वाङ्मयातील महदंबेचे धवळे यामध्ये दिसून येतो. ' ओवी हा प्रबन्ध महाराष्ट्रातील स्त्रियांनी (धान्य) काण्डताना गावा ' असा ओवीचा उल्लेख त्याने केला आहे. (पृ. ८१) वाद्यविनोदात तत, सुषिर, अवनद्ध व घन या चारी प्रकारची वाद्ये व त्यांचे वादन त्याने वर्णिले आहे. तसेच देशीताल दिले आहेत. नृत्यविनोदात नर्तकी, नट, नर्तक, वैतालिक, चारण व कोल्हटिक

असे सहा प्रकारचे नर्तक सांगितले असून, अंगे, उपांगे व प्रत्यंगे यांचे नृत्तातील योजायचे प्रकार दिले आहेत. यात त्याने स्थाने, भौमीचारी, आकाशिकी चारी व करणे वर्णिली आहेत. यांमध्ये देशी स्थाने, चारी व करणेही सांगितली आहेत. सोमेश्वराचा हा ग्रंथ गीत, वाद्य व नृत्य यांचे मध्ययुगीन स्वरूप माहीत होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. सोमेश्वर स्वतःला भूलोकमल्लदेव असे म्हणवितो.

(३८) जगदेकमहीपति– हा सोमेश्वराचा पुत्र (काल– ख्रि. उ. ११३४ ते ११४५) याचा संगीतचूडामणि हा ग्रंथ बडोद्याहून प्रकाशित झाला आहे. जगदेकमल्ल या आपल्या नावाचा निर्देश त्याने ग्रंथाच्या आरंभी केला आहे. या ग्रंथात मुख्यतः संगीताचे देशी स्वरूप त्याने सांगितले आहे. या ग्रंथाचे प्रबन्ध, राग, वाद्य, नृत्त व ताल असे पाच अध्याय आहेत. त्यांतील प्रबन्धाध्याय (अपूर्ण), रागाध्यायातील रागनामनिर्देश, वाद्याध्यायातील तीन श्लोक, व तालाध्याय यांचे मुद्रण बडोदा आवृत्तीत झालेले आहे. यातील पुष्कळ श्लोक मूळ ग्रंथकर्त्याचा नामनिर्देश न करता पार्श्वदेवाच्या संगीतसमयसारात उद्धृत झालेले आहेत.

(३९) बिन्दुराज – याच्याबद्दलची माहिती मिळत नाही.

(४०) क्षेत्रराज– कुम्भकर्णाने आपल्या संगीतराज या ग्रंथात स्वरसाधारणाच्या संदर्भात (पृ. १६३ श्लो. ३५) व वर्णालंकारांच्या संदर्भात (पृ. १६८ श्लो. ४) क्षेत्रराजाचा उल्लेख केला आहे. यावरून ख्रि. उ. १५ वे शतक किंवा त्यापूर्वी तो होऊन गेला असावा. कल्लिनाथाने चालकांच्या लक्षणात (सं. र. अड्यार आ. भा. ४ पृ. १२३) क्षेमराज याचा निर्देश केला आहे. क्षेत्रराज व क्षेमराज हे एकच आहेत की हे दोन वेगळे ग्रंथकार आहेत हे समजायला साधन नाही.

शार्ङ्गदेवाने निर्दिष्ट केलेल्या चाळीस पूर्वाचार्यांच्या संबंधी जेवढी माहिती मिळू शकली तेवढी स्थूलमानाने कालक्रमाला अनुसरून येथे दिली आहे. प्राचीन संस्कृत वाङ्मयातील कवि व शास्त्रकार यांच्या कालासंबंधी निःसंदिग्ध माहिती उपलब्ध होणे किती कठिण व काही वेळा अशक्यही असते याची जाणीव सुज्ञांना आहेच. या पूर्वाचार्यांतील, सदाशिव, शिवा, ब्रह्मा, रम्भा, वायु, कंबल, अश्वतर, स्वाति, तुम्बुरु, रावण यासारखी काही नावे पौराणिक स्वरूपाची असून, नारद, अर्जुन, नन्दिकेश्वर, भरत अशा काही आचार्यांचे व्यक्तिमत्त्व पौराणिक व ऐतिहासिक असे संमिश्र आहे. मतंग, याष्टिक, कश्यप, दुर्गाशक्ति, मातृगुप्त, राहल, रुद्रट, भोज, कीर्तिधर, अभिनवगुप्त, सोमेश्वर इत्यादींचे व्यक्तिमत्त्व ऐतिहासिक आहे. हे वरील सर्व माहितीवरून वाचकांच्या ध्यानी येईल अशी आशा आहे.

[३] संगीतरत्नाकरातील गायन-वादन-विषयक विचार

(१) मार्ग व देशी संगीत

'ब्रह्मदेव इत्यादींनी जो शोधून काढला व भरत इत्यादींनी भगवान शंकराच्या पुढे प्रयुक्त केला तो निश्चितपणे अभ्युदय प्राप्त करून देणारा मार्ग होय' अशी 'मार्ग' या

शब्दाची व्याख्या शार्ङ्गदेवाने दिली आहे; (सं. र. १.१.२२, २३) तसेच 'ज्या त्या देशात लोकांच्या आवडीनुसार मनोरंजन करणारे गीत, वादन व नृत्त देशी म्हटले जाते' अशी 'देशी' या शब्दाची व्याख्या दिली आहे. 'संगीत' या शब्दात गायन, वादन व नर्तन या तिन्हींचा समावेश आहे हे त्याने अगोदर सांगितले आहे. (१.१.२१) ते संगीत मार्ग व देशी असे दोन प्रकारचे असल्याचे सांगून मग 'मार्ग' व 'देशी' या शब्दांच्या व्याख्या वरीलप्रमाणे दिल्या आहेत. 'संगीत' या शब्दाच्या व्याख्येत समाविष्ट असणाऱ्या नर्तनाचा विचार नर्तनाध्यायाच्या प्रस्तावनेत होणार असल्याने येथे फक्त गायन व वादन यांचाच विचार प्रस्तुत आहे.

नाट्यशास्त्राच्या आरंभीच्या भागात नाट्याची उत्पत्ति सांगताना भरताने म्हटले आहे की, 'ब्रह्मदेवाने ध्यानपूर्वक, नाट्याचे पाठ्य, गान, अभिनय व रस हे चार घटक अनुक्रमे ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद व अथर्ववेद यांपासून घेऊन नाट्य नावाचा पाचवा वेद निर्माण केला. [ना. शा. १.१६, १७] हा नाट्यवेद त्याने भरताला शिकविला व पुढे भरताने आपल्या शिष्यांकरवी 'त्रिपुरदाह' या रूपकाचा प्रयोग भगवान शंकरापुढे करून दाखविला. अर्थात या नाट्यप्रयोगात योजलेले गायन व वादन मार्ग या नावाचे होय. 'मार्ग्' या धातूचा अर्थ शोधणे असा असल्याने ब्रह्मदेवाने शोधून काढलेला म्हणून मार्ग या नावाची सार्थकता स्पष्ट होते. ही आद्य गायन-वादन परंपरा पुढे भरताच्या अनुयायांनी चालवल्याने मार्ग या शब्दाचा अर्थ प्राचीन संप्रदाय असा निर्माण झाला. 'मार्ग' या शब्दाचा उपयोग, जातींच्या लक्षणांत अंतरमार्ग या शब्दात [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ४९] तसेच मृदंगवादनातील चार मार्ग (म्हणजे अङ्कित, आलिप्त, वितस्त व गोमुखी) यांत आला आहे. [ना. शा. भा. ४ पृ. ४१८]. पण यांत मार्ग या शब्दाचा, संगीतसंबद्ध प्राचीनकाळापासून चालत आलेला संप्रदाय हा अर्थ नाही. विशिष्ट स्वरयोजना-प्रकार असा 'मार्ग' याचा अर्थ अंतरमार्ग या शब्दात अभिप्रेत आहे; तसेच मृदंगवादनातले विशिष्ट वादनप्रकार या अर्थाने चार मार्ग सांगितले आहेत. मतंगाने मार्ग[२९] हा शब्द देशीचे लक्षण सांगताना योजला आहे. त्याने देशीचे लक्षण–'स्त्रिया, बाल, गोपाल व राजे यांच्याकडून आपल्या देशात जे स्वेच्छेने अनुरागयुक्त गायन केले जाते ते "देशि" म्हटले आहे' असे दिले आहे; आणि लगेच पुढे 'निबद्ध व अनिबद्ध असा हा मार्ग दोन प्रकारचा मानलेला आहे.' असे म्हटले आहे. त्या पुढील ओळीत 'मार्ग' शब्दाचे दिलेले लक्षण अपभ्रष्ट पाठामुळे स्पष्ट कळत नाही. 'आप्लापादि..' या ऐवजी 'आलापादि..' असा पाठ दुरुस्त केल्यास आलाप इत्यादींनी बंदिस्त असणारा तो

---

२९ अबलाबालगोपालैः क्षितिपालैर्निजेच्छया ।
गीयते सानुरागेण स्वदेशे देशिरुच्यते ॥ १३ ॥
निबद्धश्चानिबद्धश्च मार्गोऽयं द्विविधो मतः ।
आप्लापादि (?) निबन्धो यः स च मार्गः प्रकीर्तितः ॥ १४ (बृहद्देशी पृ. २)

मार्ग असा अर्थ निष्पन्न होईल. पण तरीही मार्ग या शब्दाचा अनादि प्राचीन संप्रदाय असा अर्थ दिसून येत नाही. नाटयशास्त्रात, गांधर्वात योजायचे पद (म्हणजे शब्द) निबद्ध व अनिबद्ध असे दोन प्रकारचे दिले आहे. अभिनवगुप्तांनी[३०] गद्य हे अनिबद्ध व त्याउलट असणारे (छन्दोबद्ध पद्य) हे निबद्ध होय असे स्पष्टीकरण दिले आहे. मृदंग-वादनाच्या संदर्भात 'अनिबद्ध' म्हणजे निरर्थक असे बोल होत.

नाटयशास्त्रात 'गान्धर्व' या शब्दाने प्राचीन गायन व वादन यांचे शास्त्र सांगितले आहे. नाटयशास्त्रापूर्वीच्या नारदीशिक्षेत[३१] 'गान्धर्व' या शब्दाचे स्पष्टीकरण "'गा' म्हणजे गेय, 'ध' म्हणजे कारुप्रवादन व 'व' म्हणजे वाद्य" असे दिले आहे. या श्लोकावरील आपल्या टीकेत भट्टशोभाकाराने, 'गा' शब्दाने गान निदर्शित होते, 'ध' याने वैणिकाचे प्रवादन आणि 'व' याने वादन निदर्शित होते असे विवरण दिले आहे. 'प्रवादन' या शब्दाने कौशल्यपूर्वक अशी हातांच्या बोटांची योजना त्यानें सांगितली आहे. अभिनवगुप्तांनी (ना. शा. भा. ४ पृ. ६) 'गां वाचं धारयति' अशी गान्धर्व या शब्दाची व्युत्पत्ति सांगितली आहे. अर्थात ही वाचा म्हणजे वाणी गानस्वरूपाची होय. 'गंधर्वांचे ते गान्धर्व म्हणजेच गन्धर्वांकडून प्रयुक्त होणारे ते गान्धर्व, हीही व्युत्पत्ति नाट्यशास्त्रावरून कळतेच. अभिनवगुप्तांनी नारदीयशिक्षेतील विवेचनाच्या संदर्भात 'गेति गेयं विदुः धेति धातुः प्रवादजमिति, (वेति ?) वाक्यस्य संज्ञेति, रेफस्तु वाद्योपलक्षणं काकुप्रवादनमिति वा' असे नारदीशिक्षेतील या श्लोकाचे टीकाकाराने सांगितलेले तात्पर्य दिले आहे. यातील 'धातुः प्रवादजम्' हे शब्द कारुप्रवादन या अर्थाने असले पाहिजेत. कारु या शब्दाचा अर्थ शिल्पी किंवा कलाकार असा आहे त्यामुळे कारु-प्रवादन याचा वैणिकाचे चातुर्ययुक्त वादन असा अर्थ घेता येईल. नारदादि गन्धर्वांच्या वीणेसह गायनाचा उल्लेख पुराणांत तसेच महाभारतात अनेकवार मिळतो. अभिनवगुप्तांनी निर्दिष्ट केलेल्या 'धातुः प्रवादजम्' यांतील 'धातुः' शब्दाच्या बाबतीत ते रूप 'धातृ' या शब्दाच्या षष्ठीचे एकवचन घेतल्यास '(वीणा) धारण करणाऱ्याच्या कौशल्यपूर्ण वादनाने निर्माण झालेले' असा अर्थ निष्पन्न होईल. 'धातुः' या पाठात 'गान्धर्व' शब्दा-तील 'ध' या वर्णाचा समावेश मिळतो हाही एक विशेष आहे. (व ?) ही वाक्याची निदर्शक संज्ञा असल्याचे या स्पष्टीकरणात सांगितले आहे. वाक्य याने गीतातील शब्द-योजना हा अर्थ घेता येईल. गान्धर्वशब्दातील रेफाचे स्पष्टीकरण भट्टशोभाकराने दिलेले नाही तेही या टीकाकाराच्या विवरणात मिळते. रेफाने वाद्य किंवा काकुप्रवादन निदर्शित होते असे या विवरणात सांगितले आहे. काकु म्हणजे नादाचा (परिणामकारक असा) बदल. गांधर्वाची योनि म्हणजे मूळ, गान, वीणा व वंश असल्याचे नाट्यशास्त्रात म्हटले आहे (ना. शा. २८.१०) अभिनवगुप्तांनी, 'गान म्हणजे साम हे योनि म्हणजे मूळ

---

३० ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ९

३१ नारदीया शिक्षा– १. ४. १२.

कारण असणाऱ्या गीती असून, वीणा म्हणजे महाव्रतात उपयोगी पडणारी औदुंबरी वीणा होय असे स्पष्टीकरण दिले आहे. गान्धर्व हे स्वर, ताल व पद यांचे मिळून होणारे गान-स्वरूप होय. ते तन्त्रीकृत म्हणजे तन्त्रीयुक्त वीणावाद्याने निर्माण झालेले आणि अनेक वाद्यांचा आश्रय असणारे असे सांगितले आहे. 'स्वर, पद व ताल यांचे समन्वित स्वरूप म्हणजे गान्धर्व' हे विशाखिलाचार्यांचे मत या संदर्भात अभिनवगुप्तांनी उद्धृत केले आहे. (ना. शा. भा. ४ पृ. ७) यात स्वराला प्राधान्य दिलेले असून, ताल साम्यासाठी उपकारक म्हणून असतो. पद (म्हणजे शब्द) या दोन्हींना आधारभूत होय. दत्तिलाने गान्धर्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे—

पदस्थस्वरसङ्घातस्तालेन सुमितस्तथा ।
प्रयुक्तश्चावधानेन गान्धर्वमभिधीयते ॥ (दत्तिलम्– श्लो. ३)

याचा अर्थ असा– 'शब्दांच्या आश्रयाने केलेली स्वरसमूह योजना ज्यात तालाने योग्यप्रकारे मापिली जाते व अवधानपूर्वक प्रयुक्त केली जाते ते गान्धर्व म्हटले आहे.' या व्याख्येतील अवधान हा शब्द महत्त्वाचा आहे. योग म्हणजे चित्तवृत्तीची एकरूपता या स्वरूपाचे अवधान गान्धर्वात उपयोगी नाही असे म्हणणे योग्य नाही. कारण अवधानाशिवाय गानसिद्धी संभवत नाही. लक्षणाच्या बाबतीत योजलेल्या 'पद' या शब्दासंबंधी दत्तिलाने म्हटले आहे की शब्द (हे भाषास्वरूप असल्याने) लोकांपासून व शब्दशास्त्र इत्यादींच्या साहाय्याने जाणून घ्यावेत. 'योग्य प्रकारे बुद्धि इत्यादींची योजना' म्हणजे 'अवधान' होय. म्हणून दत्तिलाने आपल्या ग्रंथात फक्त स्वर व ताल हे दोन विषय संक्षेपाने सांगितले आहेत. गान्धर्व हे अनादिसिद्ध संप्रदाय या स्वरूपाचे असल्याने ते पुढे मार्ग या शब्दाने सांगितले गेले.

गान्धर्व व गान यांतला फरक नाट्यात योजल्या जाणाऱ्या ध्रुवागानाच्या संदर्भात व गुणदोषांच्या संदर्भात अभिनवगुप्तांनी[३२] स्पष्ट केला आहे. मद्रक, अपरान्तक इत्यादी गान्धर्वस्वरूपाची जी गीते त्यांतील ध्रुवागानाला उपकारक ठरणारे काही घटक योजून ध्रुवागान नाट्यांत प्रयुक्त करायचे असे. गान्धर्व हा शब्द दोन प्रकारच्या अर्थाने लोकांत व शास्त्रांत योजला जात असे. ज्याप्रमाणे 'नाटक' हा शब्द दहा प्रकारच्या रूपकांतील एक विशिष्ट रूपकप्रकार या अर्थाने योजलेला आहे व नाटक हाच शब्द वेगवेगळ्या रूपकांना सामान्यपणेही लावला गेलेला आहे त्याप्रमाणेच गान्धर्व हा शब्दही विशेषपणे व सामान्यपणे योजीत असत. स्वर, पद व ताल हे तिन्ही घटक जरी गान्धर्व व गान यांत समान असले तरी गान्धर्व हे स्वरूप, फल, काल व धर्म यांमधील भेदाने गानापासून वेगळे ठरते. स्वरांचे त्यांच्या त्यांच्या श्रुत्यंतरांसह असणारे शुद्ध स्वरूपच गान्धर्वात आवश्यकपणे असते; त्यात ठराविक स्वरांचाच लोप असतो. गानात रक्तीला (म्हणजे रंजकतेला) अनुसरून स्वरांचे स्वरूप योजले जाते. तसेच तालाच्याही बाबतीत गान्धर्वाचे स्वरूप गानापेक्षा

३२. ना. शा. भा. ४ पृ. ३९३ ते ३९७.

वेगळे असते. गान्धर्वाच्या तालांत आवापादि पातक्रियांचा उपयोग असावाच लागतो. गांधर्व हे मुख्यतः अदृष्ट फलासाठी व गौणपणे दृष्ट फलासाठी असते तर गान हे मुख्यतः रंजन या दृष्टफलासाठी असते असा फलाच्या संबंधीही दोन्हींत भेद आहे. गान्धर्वाचा नाट्यातला काळ पूर्वरंग हा होय. कारण पूर्वरंगात गान्धर्व हेच मुख्य असते. ध्रुवास्वरूपाचे गान नाट्यात त्या त्या प्रसंगाला अनुसरून भिन्न काळी योजायचे असते. गान्धर्वाचा विशेष धर्म म्हणजे त्यात पदाला स्वर व ताल यापेक्षा द्युय्यम स्थान असते तर गानाचे या बाबतीतले वेगळेपण म्हणजे त्यात पदाला स्वर व ताल यापेक्षा अधिक महत्त्वाचे स्थान असते. गान्धर्व हे संप्रदायातील प्राचीन काळापासून चालत आलेल्या नियमांनी पूर्णपणे नियंत्रित असल्याने त्यात बदल होणे वा करणे अनिष्ट स्वरूपाचे व अनर्थकारक मानले गेले आहे. गानात रंजकतेलाच प्राधान्य असल्याने नियमांची चाकोरी सोडून इष्ट ते बदल करणे केवळ क्षम्यच नव्हे तर उपकारकही मानले आहे. यावरून गांधर्व हे मार्ग संगीत तर गान हे देशी संगीत असा या दोन्हीमधला भेद शास्त्रकारांनी स्पष्ट केला. देशी संगीतात बदल होण्याला अवकाश असल्याने त्यात नवनवीन भर पडत गेली. त्या दृष्टीने जे प्राचीन संगीत ते साचेबंद असल्याने त्या त्या काळी त्याचे 'मार्ग' या प्रकाराने शास्त्रकारांनी वर्णन केले व परिवर्तनशील आणि सतत विस्तार पावणारे, लोकांत प्रचलित असणारे संगीत 'देशी' या नावाने वर्णिले. शार्ङ्गदेवाने योजलेले मार्ग व देशी हे शब्द या वर सांगितलेल्या अर्थाने घ्यायला हवेत.

(२) प्राचीन भारतीय स्वरसप्तक–

'सामवेदापासून स्वर उत्पन्न झाले', असे मतंगाने व सोमेश्वराने म्हटले आहे. (बृ. दे. पृ. २०; मानसोल्लास भा. ३ पृ. १२) सामवेदाच्या नारदीशिक्षेत सामगानांतून मिळणाऱ्या सात स्वरांची नावे कुष्ट, प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ, मन्द्र व अतिस्वार अशी मिळतात. मन्द्रालाच पंचम असेही म्हटले आहे. सध्या उपलब्ध असणाऱ्या राणायनीय, जैमिनीय व कौथुम या तीन शाखांच्या सामगानाचा अभ्यास केला असता, म ग रे सा नि ध प असे प्रचलित स्वर असणारे अवरोही क्रमाचे भारतीय स्वरसप्तक मिळते. या सप्तकातील रे व ध हे शुद्ध स्वर असून ग व नि हे कोमल स्वर आहेत. क्वचित ऋषभस्वर कोमलसदृश आढळतो. सामगानातील स्वरसप्तक अवरोही होते हे स्पष्टच आहे. सामगानामधल्या कुष्ट इत्यादी सात स्वरांचे स्वरूप तत्कालीन गान्धर्वात (म्हणजे लौकिक संगीतात) कोणत्या स्वरनामांनी जाणले जात होते हे माहीत होण्यासाठी नारदीशिक्षा हा ग्रंथ सर्वांत प्राचीन आधार होय. कारण याच शिक्षेत सामिक स्वर व गान्धर्वस्वर यांचा मेळ घातलेला दिसून येतो. या शिक्षेत प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ, मन्द्र, कुष्ट व अतिस्वार हे स्वर सामगायक घेतात असे पहिल्या प्रपाठकातील पहिल्या कंडिकेतील बाराव्या श्लोकात म्हटले आहे; पाचव्या कंडिकेतील पहिल्या व दुसऱ्या श्लोकांत, जो सामगायकांचा प्रथम स्वर तो वेणु (म्हणजे वंश) यातून निघणारा मध्यम स्वर, जो द्वितीय तो गांधार, तृतीय तो ऋषभ, चतुर्थ तो षड्ज, पाचवा तो धैवत, सहावा तो निषाद व सातवा तो पंचम असा क्रम दिला आहे. यातील क्रमानुसार पहिला स्वर सर्वोच्च म्हणून समजून

तो मध्यम म्हणून मानल्याने सामगानातील स्वरसप्तकाचे स्वरूप वर दिलेल्या अवरोही क्रमाच्या भारतीय स्वरसप्तकाच्या रूपाने मिळते. यात एक विशेष उपलब्ध होतो व तो म्हणजे हे अवरोही सप्तक म ग रे सा नि ध प असे न मिळता ते म ग रे सा ध नि प असे मिळते. 'ध नि प' या व्यत्यासाचे कारण शाखाभेद असणे संभवनीय आहे. राणायनीय शाखेच्या होसाकोळे येथील परंपरेत 'सा ध' असा अवरोह मिळतो; तर त्याच शाखेच्या सिंहाचलम् येथील परंपरेत व कौथुम आणि जैमिनीय शाखांमध्ये सा नि असा अवरोह दिसून येतो. या मिळणाऱ्या स्वरसप्तकात आणखी एक विशेष जाणवतो व तो म्हणजे क्रुष्ट या स्वराचे स्थान. ते अवरोह क्रमाने सहावे आहे म्हणजे त्याचा गांधर्वस्वर निषाद असा मिळतो. नारदीशिक्षेतील पहिल्या प्रपाठकाच्या सातव्या कंडिकेत क्रुष्टादि स्वरक्रम मिळतो. हाच स्वरक्रम सामवेदाच्या सामविधान ब्राह्मणातही मिळतो. नारदी शिक्षेतील या क्रमाचे स्वरूप सांगताना भट्टशोभाकराने आपल्या शिक्षाविवरण टीकेत क्रुष्ट हा सातवा म्हणजे पंचम स्वर व अतिस्वार हा सहावा म्हणजे निषाद स्वर असे म्हटले आहे. यावरून काही विद्वानांनी क्रुष्टाला पंचम मानून सामस्वरसप्तक प म ग रे सा नि ध असे दिले आहे. क्रुष्टादि स्वरसप्तकातील क्रुष्ट हा स्वर सर्वोच्च आहे हे नारदीशिक्षेत गात्रवीणेच्या साहाय्याने लगेच पुढे दिलेल्या क्रुष्ट, प्रथम, इत्यादी स्वरक्रमावरून स्पष्ट होते. गात्रवीणेत क्रमाने अंगठ्याचे टोक व अंगठा यांवर क्रुष्ट व प्रथम स्वर आणि नंतर पहिल्या बोटाच्या मधल्या पेराला अंगठ्याने स्पर्श करून गांधार, मग तसाच स्पर्श (मधल्या बोटाच्या मधल्या पेराला) करून ऋषभ, अनामिकेच्या (मधल्या पेराला) स्पर्श करून षड्ज, करंगळीच्या मधल्या पेराला स्पर्श करून धैवत व त्या खाली (म्हणजे करंगळीच्या मुळाशी) स्पर्श करून निषाद असे स्वर दाखवावेत असे सांगितले आहे. यातील प्रथम स्वर हा मध्यम होय. यामुळे गात्रवीणेवरून मिळणारे क्रुष्ट, प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ, मंद्र व अतिस्वार या स्वरांचे स्वरूप प्रथम म्हणजे मध्यम असे मानल्यास प म ग रे सा ध नि असे मिळते. यातील ध, नि हा व्यत्यास दूर केल्यास प म ग रे सा नि ध असे हे सामिक स्वरसप्तकाचे स्वरूप होते असे काही विद्वान मानतात. सध्याच्या उपलब्ध होणाऱ्या सामगानांत मध्यम हाच स्वर सर्वोच्च मिळतो. सामगानाच्या कौथुम गानग्रंथात क्रुष्ट स्वराचे चिन्ह फक्त तीनच सामांमध्ये आढळते व त्याचे उच्चारण प्रथम स्वराच्या उच्चारणानंतर लगेच क्रमाने प्राप्त व्हावयाच्या वरच्या पंचमासारखे नसून बरेच उच्च असते. कौथुमशाखीय सामगानात सर्वत्र मिळणारे स्वर ग, रे, सा, नि, ध, प असे आहेत. ताम्रपर्णी राणायनीय परंपरेत गान्धाराच्या वर जाताना मध्यम स्वराचा उपयोग होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. होसाकोळे राणायनीय परंपरेतही मध्यम स्वराला स्पर्श होत असल्याचे जाणवते. यावरून सामसप्तकाचे स्वरूप प म ग रे सा नि ध असे घेण्यापेक्षा ते म ग रे सा नि ध प असे घेणेच योग्य वाटते. याशिवाय अन्तरग व काकलिनि या दोन स्वरांचा गांधर्वात होणारा उपयोगही नारदीशिक्षेच्या पहिल्या प्रपाठकाच्या चवथ्या कंडिकेतील नवव्या श्लोकात दिसून येतो. गांधर्वसंबंधात 'सात स्वर, तीन ग्राम, एकवीस मूर्च्छना व एकुणपन्नास ताना'

यांस स्वरमण्डल म्हटले आहे. काही पुराणांतही हा श्लोक आढळतो. (वायुपुराण उत्तर खंड, अध्याय २४; ब्रह्माण्डपुराण अ. ६१; नारदपुराण अ. ५०). षड्ज, ऋषभ इत्यादी स्वरनामे प्रथम आपणांस पाणिनिशिक्षा, नारदीशिक्षा, व माण्डूकीशिक्षा या ग्रंथांत मिळतात.

(३) स्वर व श्रुति–

नारदीशिक्षेत ' श्रुति ' हा शब्द स्वराचा विशिष्ट आविष्कार या अर्थाने दिसून येतो. गानाच्या ' पूर्ण ' नावाच्या गुणाच्या लक्षणात ' स्वरश्रुतिपूर्णात् ' असा शब्द मिळतो. (ना. शि. १.३.२) ' ज्याप्रमाणे पाण्यात संचार करणाऱ्या माशांचा मार्ग कळून येत नाही त्याप्रमाणे स्वरगत म्हणजे स्वरसंबद्ध श्रुति होय. ज्या प्रमाणे दह्यात असणारे तूप किंवा लाकडात असणारा अग्नि प्रयत्नाने उपलब्ध होतो त्याप्रमाणे स्वरगत श्रुति होय ' (ना. शि. १.६.१५ ते १७) यांतही स्वरसंबद्ध श्रुतीची सूक्ष्म स्वरूपाची अभिव्यक्ति वर्णिलेली आहे. ''श्रावणत्व' (म्हणजे स्पष्टपणे ऐकू येणे) हाच श्रुतीचा शब्दशः अर्थ आहे. या श्रुतीचे पाच प्रकार नारदीशिक्षेत दिले आहेत. ते दीप्ता, आयता, करुणा, मृदु व मध्या हे होत. ' या श्रुतींचे विशेषत्व जो जाणत नाही तो आचार्य नव्हे ' असेही सामिक स्वरांच्या बाबतीत ही शिक्षा सांगते (१.७.९) अतिस्वार, मंद्र, चतुर्थ, तृतीय व द्वितीय (शोभाकरमते अनुक्रमे नि, ध, स, रि, ग) या पाच स्वरांची दीप्ता श्रुति असून क्रुष्टाची करुणा श्रुति सांगितली आहे. (अर्थात राहिलेल्या प्रथम म्हणजे मध्यम या स्वराची मृदु ही श्रुति समजायची). (१.७.१०) द्वितीयस्वराच्या बाबतीत पुन्हा मृदु, मध्या व आयता या तीन श्रुती वेगळ्या सांगितल्या आहेत. नीच स्वर म्हणजे ह्या खालचा तृतीय स्वर (अर्थात रि) पुढे असता, द्वितीयस्वराची आयता श्रुति असते आणि उच्च स्वर (म्हणजे म) पुढे असता, मृदु श्रुति असते. पुढे दुसरा स्वर नसता द्वितीयस्वराची श्रुति ती मध्या होय. (ना. शि. १.७.११–१२) द्वितीयस्वराच्या या तीन श्रुती पुढे नीच स्वर असणे, पुढे उच्च स्वर असणे आणि पुढे द्वितीयस्वरच असणे अशा या कारणांमुळे सांगितल्या आहेत. [पहा– ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ८९] ज्यावेळी क्रुष्ट स्वर पुढे असतो त्यावेळी विराम असता द्वितीय स्वराची दीप्ता श्रुति असते. तसेच सामसमाप्तीच्या वेळी स्वराची दीप्ता श्रुति असते. दोन प्रकारच्या गती (म्हणजे तालव्य इकाराचा आइभाव व आउभाव), आणि श्, ष्, स् या ऊष्म व्यंजनांबरोबर पदाच्या शेवटी होणारा संधि, या पाच ठिकाणी ' घुट ' नावाचा विशेष सांगितला आहे. विराम नसताना व घुट असताना दीप्ता इत्यादी श्रुती योजू नयेत; श्रुतिसदृश स्वरच योजावेत. सामगानाव्यतिरिक्त इतरत्र म्हणजे उदात्त, स्वरित व अनुदात्त यांच्या बाबतीत दोनच श्रुती असतात. उदात्त व स्वरित यांची दीप्ता श्रुति व अनुदात्ताची मृदु श्रुति जाणावी. गान्धर्वात (श्रुति नसल्याने) श्रुतिसदृश स्वर योजावा. (१. ७. १३–१८)

हे नारदीशिक्षेतील श्रुतिविषयक सर्व विवेचन जाणून घेतल्यावर स्वराचा दीप्त, करुण, मृदु व आयत आविष्कार आणि द्वितीय स्वराच्या बाबतीत आयत व मृदु असा आविष्कार नसता, मधील होणारा मध्यम आविष्कार श्रुतीच्या ज्ञानात अपेक्षित होता हे ध्यानी येते.

स्वराचे आयत म्हणजे विस्तारित व मृदु म्हणजे कोमल हे द्विविध स्वरूप गान्धर्वात अभिप्रेत होते.

स्वरितानंतर येणारे अनुदात्त स्वर उदात्तश्रुति होतात असे ऋक्तन्त्रात सांगितले आहे. (३. १. १) स्वरितानंतरच्या या अनुदात्त स्वरांना प्रचय ही संज्ञा असून त्यांना एकश्रुति म्हटले आहे. कारण त्यांचा आविष्कार उदात्तसदृश होता. ऋक्प्रातिशाख्यातील 'सप्तस्वरा यमास्ते' व 'पृथग्वा' या दोन सूत्रांचे स्पष्टीकरण देताना 'यम म्हणजे ते सात स्वर होत' व 'किंवा सात स्वरांपेक्षा वेगळे असणारे (ते यम होत)' असे उवटाचार्यांनी म्हटले आहे. यावरून स्वरांमधील अंतराळांची कल्पना प्रातिशाख्यकाळी होती असे म्हणता येईल. पण सायणाचार्यांनी या सूत्रांचे स्पष्टीकरण वेगळे दिले आहे– 'ते कुष्ट इत्यादी सात स्वर यम होत किंवा त्यांपेक्षा वेगळे असणारे म्हणजे षड्ज इत्यादी नावे असणारे सात स्वर यम होत,' असे त्यांनी म्हटले आहे. यावरून स्वरांमधील अंतराळांचे ज्ञान प्रातिशाख्यकाळी होते की नाही ते निश्चित ठरवणे शक्य होत नाही. पण स्वरांचे दीप्त, करुण, मृदु असे आविष्कार शिक्षाकारांना निश्चित माहीत होते एवढे म्हणता येते. सामगानातील या स्वराविष्कारांवरून शुद्ध स्वर व त्याचा भिन्न भिन्न आविष्कार ध्यानात आल्याने पुढे नाटचशास्त्रकाळात, संवादावर आधारलेले ग्राम निश्चित करताना श्रुति म्हणजे स्वरांमधील अंतराळ ही कल्पना वीणावादनातील प्रगतीमुळे मांडता आली.

नाटचशास्त्रातील श्रुतिनिदर्शन या प्रयोगामुळे श्रुतींची सप्तकातील संख्या बावीस ही कळते. श्रुतिनिदर्शन दोन वीणांच्या साहाय्याने केले आहे. कंठसंगीताच्या वर्णनात श्रुतींचा निर्देश आलेला नाही. श्रुतिनिदर्शन-प्रयोगाने नाटचशास्त्रात प्रत्येक ग्रामात बावीस श्रुति निश्चित केल्या आहेत. तसेच स्वरांमधील श्रुत्यन्तरे सांगून शुद्ध स्वरांचे स्वरूपही निश्चित केले आहे. हा श्रुतिनिदर्शनप्रयोग असा– सर्व दृष्टींनी सारख्या असणाऱ्या दोन वीणा घेऊन त्या षड्जग्रामात लावाव्या. नंतर एक वीणा अचल ठेवून दुसऱ्या म्हणजे चल वीणेतील पंचम स्वर इतका उतरवावा की तो ऋषभाशी मध्यम-संवाद करील. म्हणजे ऋषभ हा स्वर सा मानला तर पंचम हा त्याच्या अपेक्षेने मध्यम स्वर म्हणून ऐकू येईल. आता या दोन्ही वीणांतील पंचम या स्वरात दिसून येणारे अन्तर एक श्रुतीचे होय. यालाच नाटचशास्त्रात प्रमाणश्रुति म्हटले आहे. षड्जग्राम व मध्यमग्राम ही दोन स्वरसप्तके प्रचारात असल्याने तत्कालीन गायकवादकांना त्यांचे चांगले ज्ञान होते. षड्जग्रामात षड्जाचा संवाद मध्यम व पंचम या दोन्ही स्वरांबरोबर होता. ऋषभाचा संवाद धैवताशी होता. पण मध्यमग्रामात षड्जाचा संवाद फक्त मध्यमाबरोबर होता आणि ऋषभाचा संवाद पंचम व धैवत या दोन स्वरांबरोबर होता. थोडक्यात सांगायचे म्हणजे स-म संवाद ऋषभ व पंचम या दोन स्वरांत मध्यमग्रामात होता. अशा रीतीने षड्जग्रामात लावलेल्या दोन्ही वीणांतील एका वीणेत पंचमाची तार थोडी उतरवून ती मध्यमग्रामाची करणे वादकांना सुलभ होते. नंतर हा उतरलेला पंचम षड्जग्रामाचा मानून या चल वीणेच्या बाकीच्या सर्व तारा उतरवून ती षड्जग्रामाची करायची. पुन्हा वरील सांगितलेला प्रयोग करून चलवीणेतील

पंचमाची तार त्याचप्रमाणे उतरविल्यावर चलवीणेतील गांधाराची तार नादाच्या दृष्टीने अचल वीणेतील ऋषभाच्या तारेशी मिळालेली अशी होईल. तसेच चलवीणेतील निषादाची तार नादाच्या दृष्टीने अचलवीणेतील धैवताच्या तारेशी मिळून जाईल. या दुसऱ्या खेपेच्या प्रयोगामुळे रे-ग व ध-नि या जोड्यांतील प्रत्येकीत दोन श्रुतींचे अंतर असल्याने एकूण चार श्रुती मिळतात. असा प्रयोग पुन्हा एकवार केल्याने चलवीणेतील ऋषभ व धैवत हे स्वर अचलवीणेतील अनुक्रमे षड्ज व पंचम या स्वरांशी मिळून जातील. यामुळे या जोड्यांत प्रत्येकी तीन श्रुतींचे अंतर असल्याने एकूण सहा श्रुती प्राप्त होतात. आणखी एक वेळा हा प्रयोग केल्यावर चलवीणेतील षड्ज, मध्यम व पंचम हे अचलवीणेतील अनुक्रमे निषाद, गांधार व मध्यम या स्वरांशी मिळून गेलेले दिसतील. यावरून नि-स, ग-म आणि म-प ही प्रत्येकी चार श्रुत्यंतराची असल्याने बारा श्रुती मिळतात. सप्तकात अशा या एकूण बावीस श्रुती सिद्ध केल्या आहेत.

प्रत्येक वेळी 'त्याप्रमाणेच अपकर्ष करावा' असे म्हटले असल्याने या सर्व श्रुती समान प्रमाणाच्या होत्या असे काही आधुनिक विद्वान मानतात. पण प्रत्यक्ष प्रयोग करून पाहून काही तज्ज्ञांनी श्रुती समान प्रमाणाच्या नाहीत असे ठरविले आहे. स्वरांचे संवाद सांगताना ज्या दोन स्वरांत ९ आणि १३ श्रुतींचे अंतर असते त्यांना परस्पर संवादी म्हटले आहे. व स-म, स-प, रि-ध आणि ग-नि या संवादी जोड्या षड्जग्रामात सांगितल्या आहेत. मध्यमग्रामात पंचम त्रिश्रुतिक असल्याने त्याचा ऋषभाशी मध्यम संवाद असतो. या संवादी जोड्यांत षड्जग्रामात प-स हा मध्यम संवाद आणि म-नि हा मध्यम संवाद दिलेला नाही. तसेच मध्यग्रामातही म नि हा मध्यम संवाद दिलेला नाही. श्रुत्यंतरांवर आधारित स्वरसंवाद वीणांच्या आधाराने सांगितलेले असल्याने व तत्कालीन या सात तारांच्या वीणांवर शेवटची तार निषादाची असल्याने निषादाच्या वरचा षड्ज मिळणे शक्य नव्हते. म्हणून षड्जग्रामातील प-स ही, नऊ श्रुत्यंतरे असल्याने मध्यम संवाद असणारी जोडी, नाट्यशास्त्रात का दिलेली नाही याला कारण सापडू शकते. तसेच मध्यमग्रामातील म-स ही जोडी तेरा श्रुत्यंतरे असूनही का दिली नाही याचेही कारण हेच सांगता येते. पण म-नि ही जोडी षड्ज व मध्यम या दोन्ही ग्रामांत नऊ श्रुत्यंतरे असणारी असून ती संवादी जोडी मध्ये न देता अनुवादी जोडीमध्ये दिली आहे. यावरून श्रुती समप्रमाणाच्या नव्हत्या या म्हणण्याला आधार मिळतो.

सामिक स्वरांचे सध्या मिळणारे स्वरूप पाहता त्यात रे व ध यांचे तीव्र स्वरूप दिसून येते. अर्थात् हे ऋषभ व धैवत प्रत्येकी चार श्रुतींचे आहेत. भरतोक्त षड्जग्रामात म्हणजे षड्जारंभक स्वरसप्तकात स्वरांची श्रुतिसंख्या ४सा ३रे २ग ४म ४प ३ध २नि = २२ अशी आहे. यात ऋषभ व धैवत हे तीन श्रुतींचे मिळतात. सामसप्तकाचे अवरोही सप्तक आरोही म्हणून योजले जात असता हा बदल झाला असेल एवढेच एक संभाव्य कारण कल्पिता येते. वरील सप्तकातील रे चार श्रुतींचा मानल्यास त्यापुढील द्विश्रुतिक गांधार एक श्रुतीचा होतो, म्हणून हा गांधार दोन श्रुतींचा होण्यासाठी तो षड्जापासून पाचव्या

श्रुतीवर न मानता सहाव्या श्रुतीवर मानणे योग्य नाही. नाटयशास्त्रात सांगितल्याप्रमाणे चवथी सारणा (म्हणजे चलवीणेतील स्वरांची हलवाहलव) केल्यावर चलवीणेतील स्वर ₂नि ₄सा ₃रे ₂ग ₄म ₄प ₃ध असे मिळतात. हेच क्रमाने सध्याचे हिंदुस्थानी शुद्ध स्वर-सप्तकात मिळणारे ₂सा ₄रे ₃ग ₂म ₄प ₄ध ₃नि हे स्वर होत असे श्री. मुळे[३३] व श्री. आचरेकर यांनी मानले आहे. पं. कै. बृहस्पति यांनी तंबोऱ्यातील खर्जाच्या तारेतून ऐकू येणारा तीव्र (म्हणजे चतुःश्रुति गांधार) भरतोक्त अन्तर गांधार मानून तो षड्जापासून सात श्रुती या अंतरावर दिला आहे. अर्थात यामुळे कोमल गांधार पाचव्या श्रुतीवर स्थापित होतो. अभिनवगुप्तांनी[३४] उदात्त स्वर हा चतुःश्रुति, अनुदात्त स्वर हा द्विश्रुति व स्वरित हा त्रिश्रुति सांगितला आहे. वैदिक पठनात येणारा कंप हा स्वरिताच्या बाबतीतच विशिष्ट स्थानी येतो. या कंपामुळे स्वरिताचे स्वरूप चतुःश्रुति उदात्त व द्विश्रुति अनुदात्त यांमधील त्रिश्रुति स्वर असे निष्पन्न होते. सामगायनांतील स्वराविष्कारांत क्वचित ऋषभाचे थोडे कोमलसदृश स्वरूपही दिसून येते. प्राचीन काळी लौकिक आरोही स्वरसप्तकातले मिळणारे ऋषभाचे स्वरूप नाट्यशास्त्रात स्वीकृत झालेले असावे, म्हणून ते स्वीकारून ग्रामात ऋषभ त्रिश्रुतीचा ठरला व त्याचा संवादी धैवतही त्रिश्रुतीचा ठरला.

चवथ्या सारणेत चलवीणेत मिळणारे निषादाने सुरू होणारे नि सा रे ग म प ध [नि] हेच भरतकालीन स्वरसप्तक. आजचे षड्जाने सुरू होणारे हिंदुस्थानी स्वरसप्तक मानल्याने रे व ध चार श्रुतींचे मिळतात व ग आणि नि प्रत्येकी तीन श्रुतींचे मिळतात. अर्थात षड्जापासून गांधार सात श्रुतींवर व पंचमापासून निषाद सात श्रुतींवर मिळतो. हेच भरतोक्त अन्तर गांधार आणि काकली निषाद हे दोन साधारण स्वर होत. सध्याच्या तीव्र ग व तीव्र नि यांचे भरतप्रणीत अन्तर ग व काकली नि असे स्वरूप मानण्यास भरताने सांगितलेल्या एका मूर्च्छनेची दोन प्रकारे होणारी सिद्धि साहाय्यक ठरते. ही सिद्धि पुढीलप्रमाणे सांगितली आहे. मध्यम ग्रामातील धैवत दोन श्रुतींनी उतरवून तो जर गांधार मानला व बाकीचे स्वर त्यानुसार योजले तर षड्जग्रामाची मूर्च्छना तयार होते.

मग्राम ₄म ₃प ₄ध ₂नि ₄स ₃रि ₂ग

धैवत स्वर दोन श्रुतींनी उतरवून

₄म ₃प ₂ध ₄नि ₄स ₃रि ₂ग

मध्यमाला षड्ज मानून त्यानुसार पुढील स्वर योजले असता—

₄स ₃रि ₂ग ₄म ₄प ₃ध ₂नि

हीच षड्जग्रामाची पहिली उत्तरमन्द्रा मूर्च्छना होय.

---

३३. भारतीय संगीत— ले. कृ. ग. मुळे, पृ. १३१; भारतीय संगीत व संगीत शास्त्र— ले. श्री. बा. गं. आचरेकर, पृ. २२ व २३.

३४. नाटयशास्त्र (बडोदा) भा. ४ पृ. १४.

मध्यमग्रामातील चतुःश्रुति धैवत गांधार मानून बाकीचे स्वर त्यानुसार योजले तर

४म ३ प ४ ध २ नि ४ स ३ रि २ ग

४स ३ रि ४ ग २ म ४ प ३ ध २ नि

षड्जग्रामाची जी मूर्च्छना मिळते तिच्यात गांधार चार श्रुतींचा मिळतो.

या षड्जग्रामातील मूर्च्छनेमध्ये गांधाराने मध्यमाच्या दोन श्रुती घेतल्याने त्याचे स्वरूप गांधार व मध्यम या दोन स्वरांच्या मधले व त्या दोन स्वरांना साधारण असणाऱ्या स्वरूपाचे होते म्हणून हा चतुःश्रुति साधारण गांधार अंतर गांधार या नावाने दिला आहे. तसेच षड्जग्रामातील गांधार दोन श्रुतींनी चढवून त्याला धैवत मानले व त्यानुसार पुढील मध्यम, पंचम इत्यादी स्वर निषाद, षड्ज इत्यादी मानले तर पुढीलप्रमाणे मूर्च्छना मिळते–

षड्जग्राम	:	४स	३रि	२ग	४म	४प	३ध	२नि
दोन श्रुतींनी गांधार चढवून	:	४स	३रि	४ग	२म	४प	३ध	२नि
गांधाराला धैवत मानून	:	४म	३प	४ध	३नि	४स	३रि	२ग

हीच मध्यमग्रामाची सौवीरी ही पहिली मूर्च्छना होय. अंतर गांधाराशी पंचमसंवादाने चार श्रुतींचा निषाद हा साधारण स्वर प्राप्त होतो. त्यालाच काकली म्हटले आहे. या षड्जापासून सात श्रुतींवर असणाऱ्या अंतर गांधाराची प्राप्ति सध्याच्या स्वरसप्तकात मिळायला हवी असेल तर चवथ्या सारणेतील निषादादि स्वर षड्जादि मानून मिळू शकते हे वर आलेच आहे. यावरून भरताच्या षड्जग्रामाचे स्वरूप प्राप्त करून घेणेही सुलभ होते. म्हणजे सध्याच्या भारतीय स्वरसप्तकातील षड्जादि स्वर निषादादि योजले असता भरतप्रणीत षड्जग्रामाचे स्वर मिळतात.

सध्याचे स्वर सप्तक	:	सा	४रे	३ग	२म	४प	४ध	३नि	२सा
भरतप्रणीत षड्जग्राम	:	[नि]	४स	३रि	२ग	४म	४प	३ध	२नि

नाट्यशास्त्रात श्रुतींचे निदर्शन फक्त शुद्ध स्वरांतील श्रुत्यन्तरे निश्चित करून त्यांचे स्वरूप ठरविणे व संवादसिद्धीवर आधारलेल्या मूलभूत दोन सप्तकांचे वैशिष्ट्य स्पष्ट करणे यासाठी असल्याने व हे वीणेच्या साहाय्याने होत असल्याने गायनात श्रुती निर्दिष्ट केलेल्या नाहीत. षड्जापासून आरंभ होणारा ४स ३ रि २ ग ४म ४प ३ध २नि हा षड्जग्राम व मध्यमापासून आरंभ होणारा ४म ३प ४ध २नि ४स ३रि २ग हा मध्यमग्राम या दोन ग्रामांवर आधारलेले जातिगायन नाट्यशास्त्रात सविस्तर सांगितलेले आहे. अन्तर ग व काकली नि यांना स्वतन्त्रपणे स्वरत्व नव्हते. कारण हे दोन्ही स्वर अंश स्वर म्हणून गायनात योजायचे नसत. त्यामुळे संवाद सांगताना त्यांचा अन्तर्भाव नव-त्रयोदश श्रुत्यंतराच्या सामान्य नियमाने होत असल्याने वेगळा निर्देश करण्याची आवश्यकता शास्त्रदृष्ट्या वाटली नसावी.

अशा रीतीने षड्ज व मध्यम ग्राम ही दोन्ही मूलभूत स्वरसप्तके नाट्यशास्त्रात संवादाच्या आधारे सिद्ध केली गेली व हा संवाद श्रुत्यंतराच्या साहाय्याने सिद्ध केला गेला.

गीतगायनातील विशिष्ट आविष्कार निष्पन्न होण्यासाठी मुख्य स्वर अंश म्हणजेच वादी हा होय. या स्वराशी संवाद व अनुवाद करणारे स्वर योजून त्या त्या जातीचा स्वरसन्निवेश केला जाई. ज्या दोन स्वरांत ९ वा १३ श्रुतींचे अंतर असते ते परस्परांचे संवादी होत. दोन श्रुती अंतर असणारे ते विवादी होत. या शिवाय इतर श्रुत्यंतरे असणारे ते अनुवादी होत. याप्रमाणे संवाद, विवाद व अनुवाद यांचे स्वरूप सांगून नाट्यशास्त्रात संवादी स्वरांच्या व विवादी स्वरांच्या जोड्या दिल्या आहेत व प्रत्येक स्वराचे अनुवादी स्वर सांगितले आहेत. षड्जग्रामात षड्जाचा मध्यम व पंचम यांच्याशी, ऋषभाचा धैवताशी आणि गांधाराचा निषादाशी संवाद असतो. मध्यमग्रामात षड्जाचा मध्यमाशी, ऋषभाचा पंचमाशी आणि गांधाराचा निषादाशी संवाद असतो. संवाद इत्यादि सांगताना स्वरांचा आरोही क्रम फक्त दिला आहे. षड्जग्रामात १३ श्रुत्यंतरे असणाऱ्या पंचम संवादाच्या तीन जोड्या आहेत. ९ श्रुत्यंतरे असणारी मध्यम संवादाची स-म ही एकच जोडी आहे. मध्यमग्रामात ९ श्रुत्यंतरे असणाऱ्या दोन जोड्या व १३ श्रुत्यंतरे असणारी एक जोडी आहे. यावरून मध्यमग्रामात मध्यमसंवादाचे तर षड्जग्रामात पंचम संवादाचे आधिक्य दिसून येते.

संवादी स्वरांच्या बाबतीत ९ किंवा १३ श्रुतींचे अंतर असणे हे जसे आवश्यक आहे तसेच ते दोन्ही स्वर समश्रुतिक असणेही आवश्यक आहे असे नाट्यशास्त्रात[३५] दिलेल्या या संवादी स्वरांच्या जोड्यांवरून दिसून येते. षड्जग्रामातील स–म, स–प या जोड्यातील स्वर चतुःश्रुतिक आहेत, रि–ध यातील त्रिश्रुतिक व ग–नि यांतील द्विश्रुतिक; मध्यमग्रामात स–म यातील चतुःश्रुतिक, रि–प यातील त्रिश्रुतिक व ग–नि यातील द्विश्रुतिक. यामुळे षड्जग्रामात मध्यम व निषाद यांमधील अंतर ९ श्रुतींचे असूनही त्यांचा संवाद दिलेला नाही कारण मध्यम हा चतुःश्रुतिक व निषाद हा द्विश्रुतिक आहे. मध्यम व निषाद यांत अनुवाद दिला आहे. तसेच मध्यमग्रामातील ऋषभ व धैवत यांमध्ये १३ श्रुतींचे अंतर असूनही त्यांना संवादी न मानता अनुवादी मानले आहे. संवादी स्वरांच्या लक्षणात समश्रुतिकत्वही आवश्यक असल्याचे मतंगाने[३६] व अभिनवगुप्तांनी सांगितले आहे. चतुःश्रुतिक स्वर हे स्वरितापासून, त्रिश्रुत्रिक स्वर अनुदात्तापासून व द्विश्रुतिक स्वर उदात्तापासून उत्पन्न झाले असे जे शिक्षाशास्त्रात[३७] सांगितले आहे ते कारण समश्रुतिकत्वाच्या मुळाशी दिसते. याशिवाय त्याची दुसरी योग्य उपपत्ति सांगता येत नाही.

दोन श्रुतींचे अंतर असणारे स्वर विवादी होत. नाट्यशास्त्रात रि–ग आणि ध–नि या दोन जोड्या विवादी स्वरांच्या दिल्या आहेत. यावरून गांधार हा ऋषभाचा विवादी व निषाद हा धैवताचा विवादी असतो हे स्पष्ट होते. संवादी व अनुवादी हे वादी स्वरांच्या

---

३५. नाट्यशास्त्र (बडोदा) भा. ४ पृ. १५

३६. बृहद्देशी–पृ. १४ 'संवादिनस्तु पुनः समश्रुतिकत्वे सति त्रयोदश–नवान्तरत्वेनावबोद्धव्याः।' नाट्यशास्त्र (बडोदा) भा. ४ पृ. १७.

३७. पाणिनिशिक्षा– श्लो. १२; नारदीशिक्षा– १–८–८.

संदर्भात ठरत असल्याने विवादी स्वरही वादीच्या संदर्भात मानायचे झाले तर ते बाकीच्या पाच स्वरांचे विवादी की फक्त गांधार हा ऋषभाचा आणि निषाद हा धैवताचा विवादी मानायचा अशी दोन[३८] मते मध्ययुगीन संगीतशास्त्रात प्रचलित असल्याचे संगीतरत्नाकरातील विवादिलक्षणावरून कळून येते. कल्लिनाथाने यावरील टीकेत स्पष्टीकरण देताना, निषाद व गांधार यांचे बाकीच्या पाचही स्वरांशी सांगितलेले विवादी स्वरूप संतोषजनक नसल्याने ग्रंथकार दुसरे मत देत आहे असे म्हटले आहे. त्याने शुद्धमध्यम व शुद्धनिषाद यांचा परस्परसंवाद दिसून येतो हे कारण पहिले मत अयोग्य आहे यासाठी दिले आहे. या संबंधात नाट्यशास्त्रात विवादी स्वरांच्या बाबतीत दिलेल्या जोड्यांवरून गांधार हा ऋषभाचा व निषाद हा धैवताचा विवादी हे मत भरताला अभिप्रेत होते असे दिसून येते. मतंगाने[३९] विवादी स्वरांचा प्रयोग देऊन हे स्पष्ट केले आहे. ऋषभाच्या जागी गांधार किंवा गांधाराच्या जागी ऋषभ प्रयुक्त केला तर जातीच्या रागाची (म्हणजे रंजक आविष्काराची) हानि होते. तसेच धैवताच्या जागी निषाद किंवा निषादाच्या जागी धैवत प्रयुक्त केला असता जातीच्या रागाची हानि होते. विवादी स्वर शत्रुवत् असल्याने त्याचा प्रयोग अल्प असतो असे अभिनवगुप्तांनी म्हटले आहे. विवादी स्वराचे स्वरूप संगीतसमयसारात[४०] सांगितले आहे ते असे– विवादी स्वर अल्प योजावा किंवा तो प्रच्छादनीय अथवा लोप्य करावा. स्वराला थोडा स्पर्श करणे म्हणजे प्रच्छादन व संपूर्णपणे तो न योजणे म्हणजे लोप होय. यावरून रंजकतेसाठी विवादी स्वराचा अल्पप्रयोग मध्ययुगीन संगीत शास्त्रात मान्य होता हे कळते.

नाट्यशास्त्रात षड्जग्रामात मध्यम व निषाद यांचा आणि मध्यमग्रामात ऋषभ व धैवत यांचा संवाद मानलेला नाही हे सिद्ध करण्यासाठी अभिनवगुप्तांनी[४१] षड्जमध्यमा व कैशिकी या जातींचे उदाहरण दिले आहे. षड्जग्रामातील षड्जमध्यमा जातीत मध्यम अंश असता निषादलोपाने षाडव स्वरूप सांगितले आहे. आणि मध्यमग्रामातील कैशिकी जातीत धैवत अंश असता ऋषभ लोपाने षाडव स्वरूप सांगितले आहे. अंशाचा म्हणजे वादीचा संवादी स्वर जातिगायनात अवश्यपणे पाहिजेच. कारण वादीने निर्माण केलेले रागस्वरूप संवादी स्वराने प्रतिपादित होते. हा संवादिक्रम लोप पावणार नाही असा प्रयत्न गांधर्वात करायचा असतो. म्हणून काकलीनि व अंतरग यांचा प्रयोग करायचा असताही षड्ज इत्यादी स्वरांच्या श्रुतींचा अपहार करू नये. यासाठीच शुद्ध गांधार व शुद्ध निषाद यांचे जेव्हा अल्पत्व असते तेव्हाच काकली निषाद व अंतरगांधार यांचा प्रयोग आणि तोही फक्त आरोहात करायला सांगितले आहे; कारण काकली नि व अंतरग हे साधारण स्वर अनुक्रमे

---

३८. सं. र. भा. १. पृ. ७६

३९. बृहद्देशी– पृ. १६

४०. संगीतसमयसार– पृ. ६ श्लो. ९–१०

४१. नाटचशास्त्र (बडोदा) भा. ४ पृ. १७

षड्ज व मध्यम यांच्या श्रुती घेतात. साधारण स्वरांचा संचार असता संवादी अंतर लुप्त झाले तरी चालेल कारण अंशाने रागनिर्मिति होतेच. शुद्ध मध्यम व शुद्ध निषाद यांचा संवाद मध्ययुगीन संगीतात मान्य होता असे कल्लिनाथाच्या पूर्वी दिलेल्या स्पष्टीकरणात म्हटलेच आहे. नान्यदेवाने[४२] ९ व १३ श्रुतींचे अंतर असणे एवढेच संवादाचे लक्षण भरताला अनुसरून दिले आहे. पार्श्वदेवाने वादी म्हणजे जीवस्वर याच्यासारखा तो संवादी असे संवादी स्वराचे लक्षण दिले आहे. यावरून समश्रुतिकत्व असणे हे संवादाच्या बाबतीतले स्वरूप मागे पडून तत्कालीन प्रचाराला धरून केवळ नऊ व तेरा श्रुतींचे अंतर असणे एवढेच स्वरूप शास्त्रात मान्य म्हणून राहिले असे संगीतरत्नाकरावरून दिसून येते. म्हणून कल्लिनाथाने शु. म व शु. नि यांचा संवाद मानला आहे. सिंहभूपालानेही हा संवाद मानला आहे.

शार्ङ्गदेवाने श्रावणत्व (म्हणजे स्पष्टपणे ऐकू येणे) हे 'श्रुति' शब्दाचे लक्षण देऊन नंतर अभिनवगुप्तांच्या मताला अनुसरून श्रुति व स्वर यांतील वेगळेपणा सांगितला आहे. 'श्रुतीच्या स्थानी आघात केल्यावर उत्पन्न होणाऱ्या नादाने प्रभावित झालेला असा अनुरणन स्वरूपाचा स्निग्ध व मधुर नाद म्हणजे स्वर होय,' असे अभिनवगुप्तांनी[४३] म्हटले आहे. श्रुतींपासून स्वर उत्पन्न होतात या म्हणण्याचा अर्थ एका स्वरापासून विवक्षित श्रुत्यंतरांवर दुसरा स्वर अभिव्यक्त होतो असाच ध्यायला पाहिजे. एकवीस तारांची मत्तकोकिला वीणा मुख्य वीणा म्हणून अभिनवगुप्तांनी सांगितली आहे. मत्तकोकिला हिचेच दुसरे नाव स्वरमण्डल हे होय. यावरून स्वरमण्डलासारख्या वीणेवर बावीस तारा लावून श्रुतिनिदर्शनाचा प्रयोग मध्यकाळात प्रचारात आला असे वाटते. कारण शार्ङ्गदेवाने तसाच प्रयोग दिला आहे. स्वर आपल्या स्थानापासून हलवून दुसऱ्या तारेवर नेणे ही क्रिया या प्रयोगात असल्याने सारणाप्रयोग हे नाव मिळाले. नारदीशिक्षेत जसा 'स्वरमण्डल' हा शब्द आला आहे तसा बृहद्देशीत 'श्रुतिमण्डल' हा शब्द आला आहे. शुद्ध स्वरांचे स्वरूप व संवाद, अनुवाद आणि विवाद यांचे स्वरूप कळण्यासाठी नाट्यशास्त्रकाळात जे श्रुतींचे ज्ञान सात तारा असणाऱ्या वीणांच्या साहाय्याने मांडले गेले ते पुढे बावीस श्रुतींसाठी बावीस तारा असणाऱ्या वीणांच्या द्वारा मांडले गेले. भरतकालीन धनुष्याकृति वीणा ख्रि. उ. ७।८ शतकानंतर सामान्यतः प्रचारात राहिल्या नाहीत. त्याऐवजी स्वरमण्डलासारख्या वीणा प्रचारात आल्या. एकवीस तारांच्या वीणेवर तिन्ही सप्तकातले स्वर मिळतात. शार्ङ्गदेवाचा सारणाप्रयोग संभवतः स्वरमण्डलप्रकारच्या दोन बावीस तारांच्या वीणांच्या साहाय्याने दिलेला असावा. भरतानंतरच्या काळात श्रुतींच्या ज्ञानासंबंधी अधिक स्पष्ट अशी जाणकारी निर्माण होण्याचे कारण म्हणजे प्रत्येक तारेवर एक एक श्रुति स्थापित करून श्रुतींचा अभ्यास केला गेला. याचे एक गमक असे की श्रुतींची नावे नाट्यशास्त्रात नाहीत. ही नावे, आज

४२. भरतभाष्य भा. १ पृ. १५८

४३. नाट्यशास्त्र (बडोदा) भा. ४ पृ. ११

उपलब्ध असणाऱ्या संगीत शास्त्राच्या ग्रंथांत प्रथम नान्यदेवाच्या[४४] भरतभाष्यात मिळतात. ती पुढीलप्रमाणे–

१ तीव्रा, २ कुमुद्वती, ३ मन्दा, ४ छन्दोवती, ५ दयावती, ६ रञ्जनी, ७ रतिका, ८ रौद्री, ९ क्रोधा, १० वज्री, ११ प्रसारिणी, १२ प्रीति, १३ मार्जनी, १४ क्षिती, १५ रक्ता, १६ सन्दीपनी, १७ आलापिनी, १८ मदन्ती, १९ रोहिणी, २० रम्या, २१ उग्रा, २२ क्षोभिणी. यांतील पहिल्या चार षड्जाच्या, नंतरच्या तीन ऋषभाच्या, त्या पुढील दोन गांधाराच्या, मग चार मध्यमाच्या व चार पंचमाच्या, नंतर तीन धैवताच्या व शेवटच्या दोन निषादाच्या. श्रुतींच्या दीप्ता, आयता, करुणा, मृदु व मध्या या पाच जाती, त्यांची स्वरामधील अवस्थिति व त्या जातींचे प्रकार हेही नान्यदेवाने दिलेले असून त्याप्रमाणेच ते संगीतरत्नाकरातही मिळतात. यावरून एक प्रश्न निर्माण होतो, तो असा की बावीस श्रुतींसाठी बावीस तारा लावणे ही कल्पना प्रत्येक श्रुतीचे पूर्ण ज्ञान असल्याशिवाय कशी शक्य आहे ? शार्ङ्गदेवाने सांगितल्याप्रमाणे पहिली तार ज्या नादापेक्षा खालचा संगीतोपयोगी नाद ऐकू येणार नाही, असा सर्वांत मन्द्र असणारा नाद देणारी अशी लावायची, नंतर क्रमाने पुढच्या तारा असा थोडा थोडा उच्च नाद देणाऱ्या लावायच्या की लागून असणाऱ्या दोन तारांमधून निघणाऱ्या नादांपेक्षा मधला तिसरा नाद ऐकू येणार नाही. अशा सर्व तारा लावल्यावर मग चवथ्या तारेवर षड्ज, सातवीवर ऋषभ इत्यादी क्रमाने साती स्वर स्थापित करायचे. मग अशा दोन वीणा घेऊन सारणाप्रयोग करायचा. शार्ङ्गदेवाने सांगितल्याप्रमाणे तारा लावण्यासाठी संगीताचे परिपूर्ण ज्ञान अनिवार्य आहे. सप्तकातील संवादसिद्ध स–म, स–प, ग–नि हे स्वर संगीतज्ञाला सहज जाणता येतातच. रि–ध या संवादयुक्त स्वरांचे ज्ञानही अशा संगीतज्ञाला असणारच. असे ज्ञान गृहीत धरूनच चवथ्या इत्यादी तारांवर षड्ज इत्यादी स्वरांची स्थापना करणे संभवते. शार्ङ्गदेवाने दिलेल्या या सारणाप्रयोगात श्रुती समान प्रमाणाच्या मानल्या आहेत का ? अशीही शंका येणे साहजिकच आहे. पण श्रुतींच्या नावांना व श्रुतींची जाति सांगणाऱ्या शब्दांना काही अर्थवत्ता असेल तर सर्व श्रुती समान प्रमाणाच्या असाव्या असे मानण्यास काही सबळ आधार रहात नाही. त्यावेळच्या श्रुतिपंडितांनी केलेला हा प्रयोग श्रुतींचे पूर्ण ज्ञान होते एवढे माहीत करून घेण्यासाठी पुरेसा आहे. यापेक्षा अधिक काही सांगणे प्रत्यक्ष असा प्रयोग करून पाहिल्याशिवाय शक्य नाही.[४५] नान्यदेवाने तर भरताला मान्य असणारा असा दीप्ता, आयता, करुणा, मृदु व मध्या या श्रुतिजातींचा रसांतील विनियोगही सांगितला आहे. हा विनियोग नाट्यशास्त्रात मिळत नाही. नाट्यशास्त्रात श्रुतिजातिविषयक आलेले दोन श्लोक नारदी शिक्षेतील असून ते ऊर्मि व बिंदु या दोन अलंकारलक्षणांच्या मध्येच आलेले असल्याने प्रक्षिप्त मानले गेले आहेत पण नान्यदेवाने दिलेल्या श्रुतिजातींच्या रसविषयक विनियोगावरून श्रुतिविषयक अभ्यास किती सूक्ष्मपणे त्याकाळी होत होता याची कल्पना येते.

४४. भरतभाष्य भा. १. पृ. ९९ ते १०४

४५. भरतभाष्य, भा. १ पृ० १०७.

श्रुतींची संख्या किती या विषयीची वेगवेगळी मते मतंगाने[४६] दिली आहेत. 'विश्वावसूच्या मते श्रुति म्हणजे श्रवणेंद्रियाने वळणारा ध्वनिच होय. त्यामुळे श्रुति एक असूनही स्वर व अंतर या भिन्नतेने दोन प्रकारची जाणावी. ठराविक श्रुतीच्या ठिकाणी (त्या त्या स्वराच्या जागी) सात गीतींत गायिली जाते ती स्वरसंबद्ध श्रुति होय. (स्वरांच्या) मध्ये असणाऱ्या श्रुती अन्तरश्रुती होत. यांचेही ऐश्वर्य म्हणजे प्रभुत्व गानव्यापार व ग्राम यांच्या भेदानुसार दिसून येते. काही तीन स्थानांच्या संबंधामुळे तीन प्रकारच्या श्रुती मानतात. इन्द्रियवैगुण्यामुळे श्रुतींचे त्रिविध स्वरूप काही मानतात. हे वैगुण्य तीन प्रकारचे आहे– (१) सहज म्हणजे स्वाभाविक (२) दोषज म्हणजे दोषापासून निर्माण होणारे व (३) अभिघातज म्हणजे आंबट, तुरट इत्यादींनी प्रभावित झालेले. इतर काही आचार्य वातापासून, पित्तापासून, कफापासून आणि या तिन्हींच्या मिश्रणापासून उत्पन्न होणारा असा चार प्रकारचा ध्वनि मानून श्रुति चार प्रकारची सांगतात. दोन श्रुतींचे, तीन श्रुतींचे व चार श्रुतींचे स्वर यामुळे वेणु इत्यादी नऊ प्रकारची श्रुति मानतात. श्रुतिज्ञाननिष्णात काही आचार्य श्रुतींची संख्या बावीस सांगतात, काही सहासष्ट सांगतात तर काही श्रुतींची संख्या अनंत असल्याचे मानतात.'

स्वतःचे मत मतंगाने आरंभी दिले आहे. ते असे की 'वास्तविक ध्वनि एकच असून तो बेंबीच्या वरच्या आकाशातून जात असता अनेक प्रकाराने आरोहण करतो त्यामुळे वेगवेगळा भासतो.' खालपासून वर जाताना ध्वनीचे सातत्य जाणवते त्यामुळे ध्वनि एकच असतो. त्याचे वेगवेगळे असे मध्ये असणारे विभाग आपण त्यावर आरोपित करतो. त्यादृष्टीने ध्वनीचे जरी एकरूपत्व असले तरी उच्चनीच भेदांमुळे त्याची भिन्नता जाणवतेच. सप्तकात बावीस श्रुती सारणाप्रयोगाने निश्चित झालेल्या असल्याने त्याचा आदर बहुतेक शास्त्रकारांनी केला आहे. मंद्रस्थानांतील हे बावीस ध्वनीच पुन्हा त्यांच्या त्यांच्या द्विगुण प्रमाणाचे अनुक्रमे मध्य व तार या सप्तकांत आवृत्त होत असल्याने सहासष्ट श्रुती मानणे योग्य ठरत नाही. कर्णेंद्रियाने ऐकू येणे एवढेच श्रुतीचे लक्षण घेतल्यास, असे असंख्य नाद संभवत असल्याने संगीतशास्त्राच्या दृष्टीने श्रुतींची अनंत ही संख्या मानल्याने काहीच लाभ नाही. सुधाकरटीकेत, पार्श्वदेवाच्या संगीतसमयसार या ग्रंथातून मिळणारी म्हणून मंद्र, मध्य व तार या तीन स्थानांतील प्रत्येकी बावीस श्रुतींची या प्रमाणे सहासष्ट श्रुतींची वेगवेगळी नावे उद्धृत केलेली आहेत. (सं. र. भा. १ पृ. ६४, ६५) यांतील मध्यसप्तकातल्या श्रुतींची नावे आणि विद्यारण्यकृत 'संगीतसार' या ग्रंथातील म्हणून चिक्कभूपाने[४७] (१७ वे शतक) आपल्या 'अभिनवभरतसारसंग्रह' या ग्रंथात उद्धृत केलेली नावे यांमध्ये काही नावांत थोडा फरक असून काही समान आहेत. 'संगीतमकरन्द' या ग्रंथात नारदाला[४८] बावीस

---

४६. बृहद्देशी, पृ० ४,५.

४७. पहा– 'The Vedic Octave and Extracts from Sangita Sara in Abhinava Bharata Sara Sangraha,' P. 34 व अनुबन्ध.

४८. संगीतमकरन्द—पृ. ८

श्रुती विवक्षित असल्याचे म्हटले आहे, पण दिलेली नावे चोवीस आहेत. त्यांत प्रभावती हे नाव दोनदा आले आहे. तिरुवेंकटकवीच्या संगीतसारसंग्रहात[४९] (खि. उ. १८००) चोवीस श्रुती मानलेल्या असून त्यांची वेगळी नावे आढळतात. यावरून सप्तकात चोवीस श्रुति मानणारा पक्षही दिसून येतो. सप्तकात[५०] अठरा श्रुती मानणारा पक्षही होता. या सर्व निर्देशांवरून श्रुतींचे स्वरूप स्पष्ट करून सांगण्यासाठी मध्ययुगीन व नंतरच्या शास्त्रकारांनी केलेल्या प्रयत्नांची कल्पना येते.

(४) ग्राम–मूर्च्छना–तान

'मूर्च्छना इत्यादींचा आश्रय असणारा स्वरसमूह म्हणजे ग्राम होय' अशी 'ग्राम' या शब्दाची व्याख्या शार्ङ्गदेवाने दिली आहे. (सं. र. भा. १ पृ. ७९) 'मूर्च्छना इत्यादि' यातील 'इत्यादि' या शब्दाने 'तान' याचा समावेश होतो. ऋग्वेदातील ऋचांच्या पठनात उदात्त, अनुदात्त व स्वरित या अनुक्रमे उच्च, नीच व मध्यम अशा ध्वनींच्या तीन अवस्था आढळतात. या ऋचांच्या सामसंहितेत यांचेच गेय स्वरूप दिसून येते. पठनाच्या दृष्टीने उदात्ताचे उच्च स्वरूप मानलेले आहे. पण गेय स्वरांच्या दृष्टीने स्वरिताचे उच्चारण, उदात्तापेक्षा एक स्वर वर असल्याचे प्रत्यक्ष वेद ऐकताना प्रत्ययाला येते. ऋचेच्या पठनात आज उदात्त, स्वरित व अनुदात्त या पाठ्य स्वरांच्या बाबतीत अनुक्रमे सा रे नि हे सांगीतिक स्वर आढळून येतात. यांत रे हा शुद्ध म्हणजे चतुःश्रुतिक ऋषभ असून नि हा कोमल म्हणजे द्विश्रुतिक निषाद आहे. यामध्ये स्वरिताच्या बाबतीत आढळून येणारा रे हा स्वर उदात्ताच्या बाबतीत आढळून येणाऱ्या सा या स्वरापेक्षा उच्च आहे हे स्पष्टच आहे.

शिक्षाग्रंथानुसार आजचे सात स्वर स्वरित, उदात्त व अनुदात्त यांनी अंकित केले असता त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते–

सा	रे	ग	म	प	ध	नि
स्व.	अ.	उ.	स्व.	स्व.	अ.	उ.

अभिनवगुप्तांनी म्हटले आहे– "खरे पाहता स रि ग व प ध नि हे तीनच स्वर होत. मध्यम अचल स्वरूपाचा आहे कारण तो मध्ये आहे. उदात्त हा उच्च म्हणून चतुःश्रुति स्वर होय. अनुदात्त हा खालचा म्हणून द्विश्रुतिक स्वर होय. स्वरित हा दोन्हींच्या समाहार स्वरूपाचा असा मध्यवर्ती असल्याने त्रिश्रुतिक होय. म्हणूनच स्वरिताच्या बाबतीत वैदिक कंपित सांगतात. गांधर्वातही अलंकारांत त्रिश्रुति स्वराचे कंपन सांगितले आहेच. त्याचा वरच्या व खालच्या स्वराला स्पर्श होत असला तरीही स्वर-स्वरूपाला पात्र नसल्याने चार श्रुतींच्या वरचे व दोन श्रुतींच्या खालचे स्वरूप नसते." [ना० शा० (बडोदा) भा. १ पृ. १४] या विवरणानुसार भरतनिर्दिष्ट षड्जग्रामातील स, म, प हे चतुःश्रुतिक स्वर

---

४९. 'The Vedic Octave and Extracts from Sangita Sara in Abhinava Bharata Sara Sangraha, P. 36

५०. " " " " P. 37

उदात्त ठरतात, रि ध हे त्रिश्रुति स्वर स्वरित ठरतात व ग नि हे द्विश्रुति स्वर अनुदात्त ठरतात. पाठ्याच्या दृष्टीने स्वरिताचे स्थान उदात्त व अनुदात्त यांमध्ये असते. पण गेयतेच्या दृष्टीने आजच्या ऋग्वेदपठनात स्वरिताचे स्थान उदात्ताच्या पेक्षा उच्च आढळते. शिक्षा ग्रंथ, अभिनवगुप्तकृत वरील विवरण व प्रत्यक्ष आज मिळणारे स्वरूप यांचा मेळ कसा घालायचा हे नीटपणे समजत नाही.

सामगानातून मिळणारे स्वरसप्तक म ग रि स नि ध प असे घ्यायला परंपरेचा आधार आहे हे पूर्वी सांगितले आहेच. कौथुम गानातील ग रि स नि ध प हे स्वर पंचमापासून आरोहाने घेतले असता प ध नि स रि ग असे होतात. यात षड्जाने सुरवात केल्यास स रि ग व पंचमाने सुरवात केल्यास प ध नि अशा या प्रत्येकी तीन स्वरांच्या दोन जोड्या निष्पन्न होतात. त्यांतील स–प, रि–ध, ग–नि या समश्रुतिक स्वरजोड्यांमुळे स्वर वस्तुतः तीनच होत हे अभिनवगुप्तांचे म्हणणे जुळते. यांत मध्यमाची प्राप्ति स्वरसंवादज्ञानाने होताच स्वरसप्तक सिद्ध होते. स रि ग व प ध नि यांचे अनुक्रमे उदात्त, स्वरित व अनुदात्त हे अभिनवगुप्तांनी सांगितलेले स्वरूप षड्जग्रामातील चतुःश्रुतिक, त्रिश्रुतिक व द्विश्रुतिक स्वरांच्या संदर्भात जुळते. पण शिक्षाग्रंथातील वर्णनास ते जुळत नाही. संगीतातील स्वरांच्या दृष्टीने उदात्तापेक्षा स्वरितस्वर थोडा उच्च होऊन मग तो खाली येतो. त्यामुळे उदात्त, स्वरित व अनुदात्त यांचे अनुक्रमे स रि नि असे स्वरूप मिळते. स्वरितानंतर येणाऱ्या प्रचयस्वरूपाच्या अनुदात्ताचा उच्चार उदात्तासारखाच होतो व पुढे पुन्हा उदात्त स्वर आल्यास अनुदात्त स्वरूप प्राप्त होण्यामुळे अनुदात्तासारखा होतो. अर्थात प्रचयस्वराचे गेय स्वरूप षड्ज स्वर, स्वरिताचे ऋषभ स्वर व अनुदात्ताचे निषाद स्वर असे मिळते. उदात्ताचे स्वरूप मध्यम स्वर मानल्यास उदात्त, स्वरित व अनुदात्त यांचे स्वरूप मध्यम, पंचम व गांधार असे होते. अर्थात हा पंचम त्रिश्रुतिक आहे. यामुळे हे आरोही स्वर अनुक्रमे नि स रि ग म प असे मिळतात. यांत रि व प हे त्रिश्रुतिक आहेत. एका राणायनीय शाखेत षड्जाच्या खाली निषाद न घेता धैवत स्वर घेतला जातो. हा धैवतस्वर चतुःश्रुतिक आहे. अशा प्रकारे सामगानातून मिळणाऱ्या सप्तकातील सात स्वर $_{४}$स $_{३}$ रि $_{२}$ ग $_{४}$ म $_{३}$ प $_{४}$ ध $_{२}$ नि असे असल्याने हे मध्यमग्रामाचे स्वर ठरतात. मध्यम स्वर मध्यवर्ती ठरल्यावर स रि ग व त्यांना सदृश अनुक्रमे प ध नि हे स्वर घेतल्याने $_{४}$स $_{३}$ रि $_{२}$ ग $_{४}$ म $_{४}$ प $_{३}$ ध $_{२}$ नि असे षड्ज ग्रामाचे स्वर मिळतात. अर्थात हे दोन ग्राम सिद्ध होत असताना संवादाची अनुभूति पायाभूत झाली असल्याची कल्पना मान्य करावी लागते. सामसप्तक मध्यमापासून सुरू होत असल्याने, तेथून सुरू होणारे मध्यमग्रामाचे आरोही स्वरूप $_{४}$म $_{३}$प $_{४}$ध $_{२}$नि $_{४}$स $_{३}$रि $_{२}$ग असे नाट्यशास्त्रातील श्रुतिनिदर्शनाने कळले; तसेच षड्जापासून सुरू होणारे $_{४}$स $_{३}$ रि $_{२}$ ग $_{४}$ म $_{४}$ प $_{३}$ ध $_{२}$ नि असे आरोही स्वरूप षड्जग्रामाचेही कळले. गांधर्वपरंपरेत वीणावादनामुळे व सामगानपरंपरेत मन्द्र स्वराचा आधार मिळत असलेल्या उपगानामुळे स–म आणि स–प हे संवाद ध्यानात येतात

वरील दोन्ही ग्राम संवादसिद्धतेच्या दृष्टीने संवादी स्वरांमधील निश्चित श्रुत्यन्तरे देऊन सांगता आले.

षड्ज व मध्यम ग्रामांत प्रत्येकी सात मूर्च्छना नाट्यशास्त्रात सांगितल्या आहेत. मूर्च्छना या शब्दाची व्याख्या 'सात स्वर क्रमयुक्त घेणे' अशी नाट्यशास्त्रात दिली आहे. मूर्च्छना हा शब्द 'मूर्च्छ्' (म्हणजे 'वृद्धिंगत होणे', 'व्यापणे') या धातूपासून निष्पन्न झाला आहे. क्रमाने एक एक स्वर वाढवीत सात स्वर आरोहाने घेणे हा मूर्च्छना या शब्दाचा मूळ अर्थ होय असे मतंगाने व अभिनवगुप्ताने दिलेल्या स्पष्टीकरणावरून कळून येते. बृहद्देशीत मूर्च्छना व तान यांतील भेद सांगताना मूर्च्छना आरोह-क्रमाने व तान अवरोह-क्रमाने असते असे म्हटले आहे. (बृ. पृ. २६) पण त्याआधी (पृ० २४) 'ज्यामुळे राग मूर्च्छित होतो म्हणजे व्याप्त होतो ती मूर्च्छना' असे सांगून, पुढे 'आरोह व अवरोह क्रमाने योजलेले स्वरसप्तक मूर्च्छना या शब्दाने सांगितले आहे' असेही म्हटले आहे. नाट्यशास्त्रात क्रमयुक्त स्वरसप्तक एवढेच मूर्च्छनेचे लक्षण दिलेले आहे. अभिनवगुप्तांनी मूर्च्छनेचा अर्थ समुच्छ्राय (स्वर वर वर नेणे) हा स्वीकारून, षड्जापासून क्रमाने आरोहाने निषाद, (निषादापासून धैवत), धैवतापासून पंचम, पंचमापासून मध्यम, मध्यमापासून गांधार, गांधारापासून ऋषभ आणि ऋषभापासून षड्ज अशा सात मूर्च्छना षड्जग्रामात व मध्यमापासून आरोहाने क्रमाने गांधार, गांधारापासून ऋषभ, ऋषभापासून षड्ज, षड्जापासून निषाद, निषादापासून धैवत, धैवतापासून पंचम व पंचमापासून मध्यम या मध्यमग्रामातील सात मूर्च्छना सांगितल्या आहेत. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. २४] नाट्यशास्त्रात दिलेल्या मूर्च्छनांवरून एक गोष्ट ध्यानात येते ती ही की मूर्च्छनेत स्वरांचा क्रम आरोही आहे. पण प्रत्येक ग्रामातील आरंभीच्या मूर्च्छनेनंतर बाकीच्या सहा, क्रमाने त्या खालच्या आरंभक स्वरापासून निष्पन्न होतात. मूर्च्छनांच्या या अशा अवरोही स्वराने आरंभ होणाऱ्या स्वरूपाचे कारण सामसप्तकाचे अवरोही स्वरूप हे असले पाहिजे. मूर्च्छनांची नावे ही वैदिक कर्माचे अंग होत. कारण 'उत्तरमन्द्रा (मूर्च्छनेने) तीन गाथा गाव्या' असे वैदिक वचन आहे. ('तिस्रो गाथा गायत्युत्तरमन्द्रायाम्'- शतपथब्राह्मण १३।४-२-८)

पंचमाच्या भिन्नत्वामुळे दोन्ही ग्रामांत प्रत्येकी सात अशा एकूण चौदा मूर्च्छना होतात. त्यांची भरतोक्त नावे क्रमाने अशी-

षड्जग्राम- षड्जाने सुरू होणारी उत्तरमन्द्रा, निषादाने रजनी, धैवताने उत्तरायता, पंचमाने शुद्धषड्जा, मध्यमाने मत्सरीकृता, गांधाराने अश्वक्रान्ता व ऋषभाने सुरू होणारी अभिरुद्गता.

मध्यमग्राम- मध्यमाने सुरू होणारी सौवीरी, गांधाराने हरिणाश्वा, ऋषभाने कलोपनता, षड्जाने शुद्धमध्या, निषादाने मार्गी, धैवताने पौरवी व पंचमाने सुरू होणारी हृष्यका.

मूर्च्छनांची हीच नांवे पुढे मतंग, शार्ङ्गदेव आणि नंतरच्या शास्त्रकारांनी दिली आहेत. 'क्रम' याचा मतंगाने जो 'क्रमाने आरोहण व अवरोहण' असा अर्थ दिला आहे तोच अभिनवगुप्त [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. २५] व शार्ङ्गदेव यांनी सांगितला आहे.

षड्ज व मध्यम ग्रामांतील भेद सांगताना दत्तिलाने षड्ज ग्रामात धैवत, मध्यम ग्रामात पंचम व दोन्ही ग्रामांत मध्यम अविनाशी असल्याचे म्हटले आहे. (दत्तिलम् श्लो. २०) मध्यमाचे अविनाशी स्वरूप भरताने सांगितले आहेच. सामगानातील प्रथम स्वर मध्यम असल्याने आद्यत्व व आधारभूतत्व म्हणून मध्यम स्वर अविनाशी होताच. गांधर्वातही आद्यत्व व मूर्च्छनाप्रारंभाचा आधार यामुळे षड्जग्रामात षड्ज व मध्यम-ग्रामात मध्यम आवश्यक होताच. मग या दोन्ही ग्रामांत लोप्यस्वराच्या दृष्टीने भेदक वैशिष्ट्य कोणते तर ते पंचम व धैवत यांचे स्वरूप. षड्जग्रामात पंचम चार श्रुतींचा व धैवत तीन श्रुतींचा आणि मध्यम ग्रामात पंचम तीन श्रुतींचा व धैवत चार श्रुतींचा. धैवत स्वर उत्पन्न होण्याचे स्थान म्हणजे धैवताची तार तीच असणार. षड्ज ग्रामात धैवत स्वर वाजला नाही तर धैवताचे त्रिश्रुतिक हे स्वरूप कसे कळणार? मध्यमग्रामात त्रिश्रुतिक पंचम वाजला तरच धैवताचे चतुःश्रुतिक हे स्वरूप कळणार. म्हणून दत्तिलाने ग्रामभेदक स्वरूप वरीलप्रमाणे सांगितले आहे. हाच श्लोक नान्यदेवानेही उद्धृत केला आहे.

नारदीशिक्षेत षड्ज, मध्यम व गांधार हे तीन ग्राम दिले असून, प्रत्येकी सात अशा तिन्ही ग्रामांतील एकवीस मूर्च्छना सांगितल्या आहेत. भरताने गांधारग्राम दिलेला नाही. काही पुराणांत व महाभारतातही गांधारग्रामाचा निर्देश आहे. गांधारग्रामाची श्रुतिव्यवस्था संगीतमकरंद, भरतभाष्य व संगीतरत्नाकर इत्यादींत दिली आहे. नान्यदेव व शार्ङ्गदेव यांनी दिलेला गांधारग्राम असा–

$_{४}$ग $_{३}$म $_{३}$प $_{३}$ध $_{४}$नि $_{३}$स $_{२}$रि

यांतील ग व नि हे स्वर शिक्षाग्रंथानुसार उदात्तापासून उत्पन्न झालेले असल्याने व अभिनव-गुप्तांनी म्हटल्याप्रमाणे उदात्तस्वर चार श्रुतींचा असल्याने ते चार श्रुतींचे आहेत. शिक्षाग्रंथा-नुसार रि व ध हे अनुदात्तप्रभव असल्याने द्विश्रुतिक ह्वेत. पण वरील श्रुतिव्यवस्थेत फक्त रि हा स्वरच द्विश्रुतिक आहे. शिक्षाग्रंथात सांगितल्याप्रमाणे स, म व प हे स्वरितप्रभव असल्याने त्रिश्रुतिक ठरतात. यातील त्रिश्रुतिक धैवताचा उलगडा मात्र होत नाही. या गांधारग्रामात ग–नि यांत पंचमसंवाद व म–स यांत पंचम संवाद आहे. ग–ध यांत समश्रुतिकत्वाभावी संवाद नाही. प–स यांत संवाद नाही व म–नि यांतही संवाद नाही. त्यामुळे या ग्रामाचा दत्तिल इत्यादींनी जो लोप सांगितला आहे त्याला संवाद कमी असण्याचे स्वरूप हे एक कारण असावे. नान्यदेवाने[५१] म्हटल्याप्रमाणे अतितारत्व व अति-मन्द्रत्व हेही त्याच्या लोपास कारणीभूत असल्याचे दिसून येते.

---

५१. भरतभाष्य भा. १ पृ. ७६

शार्ङ्गदेवाने भरताप्रमाणेच षड्ज व मध्यमग्राम सांगितले आहेत. त्याने नारदमतानुसार गांधारग्रामाची श्रुतिव्यवस्था वर सांगितल्याप्रमाणे दिली आहे. अहोबलाने[५२] दिलेल्या लक्षणानुसार,

$_{3}$ग $_{3}$म $_{3}$प $_{3}$ध $_{4}$नि $_{3}$स $_{3}$रि हे गांधारग्रामाचे स्वरूप योग्य वाटत नाही. कारण गांधारग्रामात गांधार चतुःश्रुतिक हवा. तसेच अहोबलाने मध्यमग्रामात निषाद चार श्रुतींचा सांगितला आहे तेही बरोबर नाही.

षड्ज व मध्यम ग्रामांतील मिळून होणाऱ्या चौदा मूर्च्छनांची भरतनिर्दिष्ट नावे मागे दिलेली आहेतच. या मूर्च्छना अंतर ग याने युक्त, काकली नि याने युक्त, या दोन्हींनी युक्त व दोन्ही नसतांना अशा योजल्याने एकूण छप्पन्न प्रकारच्या होतात. नारदीशिक्षेत टीकाकार भट्टशोभाकराने मूर्च्छनेचे विवरण, 'समुच्छ्रयणामुळे वर वर नेण्यामुळे होणारे स्वरांचे प्रेरण' असे दिले आहे. यावरूनही मूर्च्छनेत मुळात सात स्वरांचा आरोह अभिप्रेत होता असे कळते. ग्रामातील प्रत्येक स्वरापासून हा आरोह होत असल्याने तिन्ही ग्रामांतील एकवीस मूर्च्छना नावांसह नारदीशिक्षेत सांगितल्या आहेत. "नन्दा, विशाला, सुमुखी, चित्रा, चित्रवती, सुखा व बला या देवांच्या सात मूर्च्छना होत. आप्यायनी, विश्वभृता, चन्द्रा, हेमा, कपर्दिनी, मैत्री व बार्हती या सात पितरांच्या मूर्च्छना होत. षड्जापासून आरंभ होणारी उत्तरमन्द्रा, ऋषभापासूनची अभिरुद्गता, गांधारापासूनची अश्वक्रान्ता, मध्यमापासूनची सौवीरी, पंचमापासूनची हृष्यका, धैवतापासूनची उत्तरायता व निषादापासूनची रजनी या सात ऋषींच्या मूर्च्छना होत. देवमूर्च्छनांचे अनुयायी गंधर्व, पितृमूर्च्छनांचे यक्ष व ऋषींच्या मूर्च्छनांचे मनुष्य होत." ऋषींच्या सात मूर्च्छनाच लौकिक मूर्च्छना होत. नारदपुराणातही हीच नावे आहेत. वायुपुराणात[५३] षड्ज व मध्यम ग्रामांतील मूर्च्छनांची दिलेली काही नावे नाट्यशास्त्रातल्या सारखीच आहेत. नान्यदेवाने[५४] दिलेल्या नारदोक्त मूर्च्छनांच्या नावांत विश्वभृता या ऐवजी विश्वदूता व बार्हती याऐवजी चान्द्रमसी ही नावे पितरांच्या मूर्च्छनांत आहेत. देवांच्या मूर्च्छनांत बला याऐवजी आलापा हे नाव दिले आहे. तसेच ऋषींच्या मूर्च्छना षड्जग्रामातील, पितरांच्या मध्यमग्रामातील व देवांच्या गांधारग्रामातील म्हणून सांगितल्या आहेत. शार्ङ्गदेवाने दिलेल्या नावांत उत्तरमन्द्रा याऐवजी उत्तरवर्णा, विश्वभृता या ऐवजी विश्वकृता असा वेगळेपणा आढळतो.

---

५२. संगीतपारिजात–' श्रुतित्रयसमायुक्तो यदा गो मेरुगो भवेत् ॥१०१॥
गान्धारग्राम आख्यातस्तिसृभिः श्रुतिभिः परे।
चतुःश्रुतिर्निषादःस्यात् षड्जोऽपि तिसृभिर्युतः ॥१०२॥

५३. वायुपुराण–(वेंकटेश्वर प्रेस, मुंबई) उत्तरार्ध–पृ. १४४, १४५.

५४. भरतभाष्य भा. १ पृ. ७६

नारदमताने दिलेल्या ऋषींच्या मूर्च्छनांत पहिली षड्जापासून आरंभ होणारी, दुसरी ऋषभापासूनची इत्यादी प्रकाराने मूर्च्छनांच्या आरंभक स्वरांचा आरोही क्रम सांगितला आहे. पण भरतप्रणीत क्रमात, षड्जग्रामाच्या मूर्च्छनांत पहिली षड्जापासून आरंभ होणारी, दुसरी निषादापासून, तिसरी धैवतापासून इत्यादी प्रकाराने मूर्च्छनांच्या आरंभक स्वरांचा अवरोही क्रम दिसून येतो. यांत सामसप्तकाचा अवरोही क्रम व गांधर्वाच्या सप्तकाचा आरोही क्रम यांचा समन्वय केलेला आढळतो. मूर्च्छना या शब्दाच्या मूळ अर्थानुसार आरंभापासून प्रथम आरोहाने सात स्वर घ्यायचे व मग ते अवरोहाने घेऊन आरंभक स्वराला परत यायचे हा अर्थ पुढे अभिनवगुप्त व त्यानंतरच्या नान्यदेव, शार्ङ्गदेव इत्यादी शास्त्रकारांनी दिला आहे. मूर्च्छना व तान यांतील वेगळेपणा देताना मतंगाने मूर्च्छना आरोहक्रमाने व तान अवरोहक्रमाने असे जे एक मत दिले आहे ते या दृष्टीने विचारणीय ठरते.

मूर्च्छनेतील सात स्वरांच्या क्रमातून ठराविक एक किंवा दोन स्वर गाळून होणारे षाडव (म्हणजे सहा स्वरांचे) व औडुव (म्हणजे पाच स्वरांचे) प्रकार मूर्च्छनाश्रित तान म्हणून भरताने दिले आहेत. नारदमताने ही तानसंख्या एकूण एकुणपन्नास आहे– मध्यमग्रामात वीस, षड्जग्रामात चौदा व गांधारग्रामात पंधरा. पण भरताने ही तानसंख्या चौऱ्याऐंशी दिली आहे. तन् म्हणजे विस्तारणे, ताणणे या धातूपासून तान हा शब्द निष्पन्न झाला आहे. अर्थात स्वरांचा परस्पर विस्तार तान या शब्दाने अभिप्रेत होतो. भट्टशोभाकराने[५५] आपल्या स्पष्टीकरणात मध्यमानंतर गांधार घेऊन मग षड्ज आणि ऋषभ अशा प्रकारे स्वरांचा प्रयोग केल्याने ताना होतात असे म्हटले आहे. यात मध्यम, गांधार व षड्ज यांचा अवरोही क्रम आहे तसेच ऋषभ हा षड्जानंतर घेतल्याने आरोहही आहे. म ग रि स असा सरळ अवरोह न होता म ग स रि अशी स्वरयोजना झाल्याने षड्ज व ऋषभ यांच्या क्रमाचा व्यत्यास झाला आहे.

मतंगाने[५६] सात स्वरांची व बारा स्वरांची अशा दोन प्रकारच्या मूर्च्छना दिल्या आहेत. सात स्वरांच्या मूर्च्छनेचे चार भेद असे– (१) पूर्ण (साती स्वर असणारी), (२) षाडव (सहा स्वरांची), (३) औडुवित (पाच स्वरांची) व (४) अन्तर ग व काकली नि या साधारण स्वरांसह योजिली जाणारी. नाट्यशास्त्रात सहा व पाच स्वरांच्या मूर्च्छनाच ताना होत असे म्हटले आहे. मतंगाने नंदिकेश्वर व कोहल यांची मते उद्धृत करून जाति–राग–भाषा इत्यादींच्या सिद्धीसाठी बारा स्वरांच्या मूर्च्छना सांगितल्या आहेत. अर्थात या बारा स्वरांच्या मूर्च्छनांमुळे मन्द्र व तार या स्थानचे स्वर प्राप्त होतात. या बारा स्वरांची मूर्च्छना सांगणाऱ्या मताचा उल्लेख अभिनवगुप्त, नान्यदेव व शार्ङ्गदेव यांनी केलेला नाही. कुंभाने बारा स्वरांची मूर्च्छना मानणारे मत विविध कारणे देऊन अमान्य केले आहे.

---

५५. ना. शि. पृ. १७

५६. बृहद्देशी–पृ. ३२, ३३; सं. र. भा. १ पृ. ८७, ८८.

कूटतानांत या मूर्च्छनांचे मुख्य प्रयोजन असून त्या राग उत्पन्न करणाऱ्या नसल्याने सात स्वरांची मूर्च्छना हेच मत सुंदर होय असे तो म्हणतो. (संगीतराज– पृ. १२५ श्लो. ३५४–३६४) 'मतंगाचे मत अनुसरून कोहल व नन्दिकेश्वर यांनी द्वादशस्वरमूर्च्छना सांगितल्या आहेत'. असे जे कुंभाने म्हटले आहे ते मात्र बरोबर नाही. कोहल व नन्दिकेश्वर यांच्या मतास अनुसरून मतंगाने द्वादशस्वरमूर्च्छना दिल्या आहेत हे बृहद्देशी-तील वचनावरून स्पष्ट आहे. द्वादशस्वरमूर्च्छना मानणारे मत पुढे कोणी स्वीकारल्याचे दिसून येत नाही.

भरताने दिलेल्या ८४ तानांत ४९ षाडव व ३५ औडुव आहेत. वीणेच्या तारेवरून दोन प्रकारची तानक्रिया नाट्यशास्त्रात सांगितली आहे. तानेत गाळावयाचा स्वर वीणेवर दोन प्रकारांनी गाळणे संभवते; एक प्रकार प्रवेश या नावाचा व दुसरा निग्रह या नावाचा. खालच्या स्वराची तार ताणून तो वरच्या स्वरात मिळविणे किंवा वरच्या स्वराची तार ढिली करून तो खालच्या स्वरात मिळविणे म्हणजे प्रवेश होय. जो स्वर गाळायचा त्या स्वराच्या तारेला स्पर्श न करणे म्हणजे निग्रह होय. हे मूर्च्छनांचे अनेक प्रकार गायक, वादक व श्रोता यांना सुख मिळावे यासाठी असत. मूर्च्छनाश्रित तानांचा हेतु स्थानप्राप्ति हा होय असे भरताने म्हटले आहे. [ना. शा. (बडोदा) भा० ४ पृ. २७] अभिनव-गुप्तांनी सांगितले आहे की जरी या शास्त्रात मूर्च्छनांचा उपयोग नसला तरी साम-गानात त्यांचा उपयोग स्पष्टपणे दिसून येतो. कारण 'उत्तरमन्द्रा मूर्च्छनेने तीन गाथा गाव्या' असा मूर्च्छनेचा प्रयोग यज्ञसंबंधात दिला आहे. अग्निष्टोमीय इत्यादी तानांची जी नावे वायुपुराण इत्यादींत दिली आहेत तीही यज्ञसंबद्धच आहेत. यावरून असे म्हटले आहे की जरी जातींच्या बाबतीत षाडव व औडुवित स्वरूप करताना ठराविक स्वरांचाच लोप सांगितला आहे, तरी श्रोत्याच्या बाबतीत आनंद निर्माण करणारे रागभाषावैचित्र्य संपन्न करण्यासाठी, मध्यमाशिवाय इतर स्वरांचा लोप करण्याचे स्वातंत्र्य आहे. सामगायनात स्वरांचा आरोह व अवरोह दिसून येतो. यात काही वेळा मधले एक किंवा अनेक स्वर गाळलेलेही आढळतात. त्या त्या सामात विशिष्ट स्वरांचाच अवरोह किंवा आरोह असल्याने तो तो तानप्रकार त्या त्या यज्ञविधीशी संबद्ध असाच योजायचा असतो. गांधर्वात साथीचे वीणावादनही असल्याने आरंभक स्वर ठरवून नंतर सात स्वरांचा आरोह व अवरोह करणे यामुळे तो तो गानप्रकार आविष्कृत करणे सुलभ होत असे. म्हणून भरतानंतर मतंगाने जातींच्या बाबतीत त्या त्या जातीची मूर्च्छना सांगितली व तीच पद्धत पुढे शार्ङ्गदेवाने स्वीकारली आहे. यज्ञीय अशी अग्निष्टोम, अत्यग्निष्टोम इत्यादी ८४ तानांची नावे मतंग व शार्ङ्गदेव यांनी दिली आहेत. (बृहद्देशी पृ. २७, २८; सं. र. भाग १ पृ. ११७, ११८) नान्यदेवाने नारदोक्त ४९ तानांची प्रसारक, पैशाच, सावित्र इत्यादी नावे दिली आहेत. (भ. भा. भा. १ पृ. १२६, १२७).

षड्जग्रामातील षाडव तानांत स, रि, नि व प यांपैकी एकाचा लोप करायचा असल्याने एकूण २८ तानप्रकार होतात; औडुव तानात स - प, रि - प, ग - नि या स्वरांच्या

तीन जोड्यांपैकी एका जोडीचा लोप करायचा असल्याने एकूण २१ प्रकार होतात. मध्यमग्रामातील षाडव तानांत स, रि व ग यांपैकी एका स्वराचा लोप करायचा असल्याने एकूण २१ प्रकार होतात; तसेच औडुव तानांत ग - नि व रि - ध या दोन जोड्यांपैकी एक जोडी गाळायची असल्याने एकूण १४ प्रकार होतात. अशा या एकूण ८४ ताना होत. हे तानस्वरूप ठराविक प्रकारचे असल्याने गांधर्वात त्याचे प्रयोजन दृष्टादृष्ट फल प्राप्त होणे हे आहे. औडुवित करताना सामान्यतः संवादी स्वरांची जोडी गाळायची असे. 'संवादिलोपाने औडुवित स्वरूप' असे वचन असल्याचे मतंगाने म्हटले आहे. (बृ. पृ. २५) पण केव्हा परस्परांशी अनुवाद असणारे दोन स्वर गाळूनही औडुवित स्वरूप होत असे. कारण षड्जग्रामात रि - प गाळून औडुवित सांगितले आहे व हे दोन स्वर परस्परांचे अनुवादी आहेत, संवादी नाहीत.

पहिली षड्जग्रामिक मूर्च्छना स रि ग म प ध नि व सातवी रि ग म प ध नि स या दोन्हींत षड्ज गाळल्यावर त्यांचे षाडव स्वरूप सारखेच होते. मग त्यांतला फरक कसा जाणायचा ? असा प्रश्न उत्पन्न होतो. या प्रश्नाला मतंगाने उत्तर दिले आहे ते असे की मंद्र व तार या स्वरूपाचा भेद यांत आहे. (बृ. पृ. ३०) मध्य षड्जाने पहिली मूर्च्छना योजून नंतर क्रमाने मंद्र नि ध प म ग या स्वरांनी आरंभ होणाऱ्या मूर्च्छना योजल्यावर सातवी मूर्च्छना रि ग म प ध नि स ही होते. हिच्यात षड्ज गाळल्यावर रि ग म प ध नि ही षाडव तान मंद्र सप्तकातील होते. पहिल्या मूर्च्छनेतील षड्ज गाळल्यावर होणारी रि ग म प ध नि ही षाडव तान मध्यसप्तकातील होते. किंवा मध्यमस्थानातील षड्जाच्या जागी ऋषभ मानून मूर्च्छना केल्याने ऋषभाखालचा षड्ज नसल्याने रि ग म प ध नि हे स्वर क्रमाने ऐकताच तार षड्जाची अपेक्षा उत्पन्न होते. पण तो ऐकू येत नसल्याने ही सातवी मूर्च्छना ठरते. स रि ग म प ध नि ही षड्जग्रामाची मध्यम स्थानातली मूर्च्छना मध्य षड्ज गाळून षाडव केल्याने ती पहिली असल्याचे कळते. सुधाकरटीकेतही या संबंधात मतंगाचे उद्धरण देऊन विवरण केले आहे. 'मध्यमस्वरानेच मूर्च्छना निर्दिष्ट करावयाच्या' [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. २७] हे भरताचे वचन आहे. मतंग,[५७] अभिनवगुप्त आणि शार्ङ्गदेव यांनी मध्यमस्वर हे समूहवाचक एकवचन घेऊन मध्यसप्तकाने असा अर्थ केला आहे. सप्तकातल्या सात स्वरांसाठी सात तारा असणाऱ्या वीणेत मध्यसप्तक आवश्यकच ठरते. एकवीस तारा असणाऱ्या वीणेत मंद्र, मध्य व तार या तिन्ही स्थानांचे स्वर मिळतात. 'मूर्च्छना, मानवी कंठ व वीणा या दोहोंत समानपणे प्रयुक्त होतात. पण तान मानवी कंठात संभवत असली तरी ती गानप्रयोगाला योग्य नाही कारण ती सुखदायक होत नाही. अभ्यासासाठी त्यांच्या केलेल्या प्रयोगात, कमी किंवा जास्त नसणाऱ्या म्हणजे योग्य स्थानी उत्पन्न होणाऱ्या वीणेच्या स्वरांनीच तानसिद्धि होते. कंठातून न निघणारे स्वरविशेष वीणेच्या बाबतीत प्रयुक्त करणे शक्य

---

५७. बृहद्देशी पृ. २९; नाट्यशास्त्र (बडोदा) भा. ४ पृ. २७, २८; सं. र. भा. १ पृ. ८५

होते', असेही अभिनवगुप्तांनी म्हटले आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ८, ९] गाथा-गायन व सामगान यांमधून प्रयुक्त होत असलेल्या मूर्च्छनांची व मूर्च्छनाश्रित तानांची प्रकर्षाने केलेली योजना ही, गायनवादनांतील रंजकतेचे वैशिष्ट्य निर्माण करणाऱ्या ज्या जागा त्यांच्या प्राप्तीसाठी असते. ग्रामराग इत्यादींत मूर्च्छनांचा विविध प्रयोग असल्याने त्यांचे अनेकत्व योग्य ठरते. साधारणस्वर असणाऱ्या मूर्च्छनांच्या बाबतीत काकली निषादाचा प्रयोग षड्जग्रामात व अंतरगांधाराचा प्रयोग मध्यमग्रामात नियमित केलेला आहे. या दोन साधारण स्वरांचा प्रयोग शुद्ध नि व शुद्ध ग यांचे अल्पत्व असणाऱ्या जातीत करायचा असे व तोही फक्त आरोहात. त्यांचा प्रयोग अवरोहात केला तर जातीच्या रंजक आविष्काराला बाधा पोचते असेही भरताने सांगितले आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ३२-३३] या स्वरांचा दोन्ही ग्रामांतील प्रयोग भरताला मान्य असल्याचे अभिनवगुप्तांनी म्हटले आहे. त्यांनी दुसरे मत म्हणून असे दिले आहे की षड्जसाधारण म्हणजे षड्जग्रामात षाडव स्वरूपात काकली नि व औडुवितात अंतर ग व मध्यम साधारण म्हणजे याच्या उलट योजना- (अर्थात षाडवस्वरूपात अंतर ग व औडुवितात काकली नि अशी योजना). पण स्वतःचे मत म्हणून षड्ज व मध्यम साधारणासंबंधी असे म्हटले आहे की जेव्हा निषाद षड्जाची पहिली श्रुति घेतो व ऋषभ शेवटची श्रुति घेतो तेव्हा षड्ज दोन श्रुतींचा राहतो, निषाद त्रिश्रुतिक होतो व ऋषभ चार श्रुतींचा होतो. निषाद व ऋषभ यांनी षड्जाची एक एक श्रुति घेतल्याने हे षड्जसाधारण होय. जेव्हा मध्यमग्रामात गांधार व पंचम मध्यमाची अनुक्रमे पहिली व शेवटची श्रुति घेतात तेव्हा गांधार तीन श्रुतींचा, मध्यम दोन श्रुतींचा व पंचम चार श्रुतींचा होतो. यात मध्यम दोन श्रुतींचा होत असल्याने हे मध्यमसाधारण होय. षड्ज व मध्यम साधारणांचे हेच स्वरूप शार्ङ्गदेव व नंतरचे शास्त्रकार यांनी दिले आहे. यातील प्रयोग सूक्ष्मत्वामुळे याला कैशिक हे नाव असल्याचे अभिनवगुप्त व शार्ङ्गदेव यांनी स्पष्ट केले आहे. काकली निषाद षड्जग्रामातच व अंतरगांधार मध्यमग्रामातच प्रयुक्त होतो, म्हणून षड्जग्रामात अंतर ग व मध्यमग्रामात काकली नि यांचा प्रयोग केव्हाही करू नये हे मत कुंभाने खोडून काढले आहे. त्याने म्हटले आहे की हे दोन्ही साधारणस्वर समानपणे दोन्ही ग्रामांत योजिले जातात. त्याने उदाहरणासाठी मध्यमग्रामातील मालवकैशिक रागाच्या हर्षपुरी या भाषेचा निर्देश केला आहे. हर्षपुरीत काकलीनि व अंतरग हे दोन्ही स्वरूप प्रयुक्त होतात. (संगीतराज पृ. १२६-१२७) षड्जसाधारण षड्जग्रामात व मध्यमसाधारण मध्यमग्रामात योजायचे हा नियम शार्ङ्गदेवाने दिला आहे. (सं. र. भा. १ पृ. १२२) या बाबतीत वृद्धकाश्यपाचे म्हणून एक उद्धरण अभिनवगुप्तांनी दिले आहे ते असे- " राग व भाषा यांत काकली व अंतर या स्वरांच्या योगाने चार, तीन, दोन व एक श्रुति असणारे सर्व स्वर योजावे. षड्ज इत्यादी सात स्वर, उत्कृष्ट पंचम, दुसरा धैवत, काकली व अंतर स्वर आणि षड्ज, मध्यम, गांधार व निषाद असे चार मिळून हे पंधरा स्वर जातीत योजावे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ३४] (हे स्वर क्रमाने असे- शुद्धस्वरसप्तक ४ स ३ रि

$_{२}$ग $_{४}$म $_{४}$प $_{३}$ध $_{२}$नि, त्रिश्रुति पंचम, चतुःश्रुति धैवत, काकली व अंतर स्वर, द्विश्रुति षड्ज व द्विश्रुति मध्यम, त्रिश्रुति गांधार व त्रिश्रुति निषाद.]

मूर्च्छनांमधला क्रम ठेवून विवक्षित स्वर गाळून होणाऱ्या ८४ ताना या पुढे शुद्ध ताना म्हणून गणल्या गेल्या. गानप्रकारांचे क्षेत्र वाढत राहिल्याने, क्रम सोडून योजले जाणारे विविध स्वररचनेचे प्रयोग कूटतान म्हणून शास्त्रकारांनी दिले आहेत. दत्तिल व मतंग यांनी एकेक मूर्च्छनेतील कूटतानांची सर्व मिळून संख्या ५०३३ सांगितली आहे. सात क्रमांचा यात समावेश करून शार्ङ्गदेवाने ती ५०४० दिली आहे. सर्व मिळून एकूण होणारी कूटतान संख्या ३१७९३० अशी शार्ङ्गदेवाने दिली आहे. तानांच्या योजनेने रंजक आविष्कारात वैचित्र्य निर्माण होऊन रागस्वरूपात विविधता उत्पन्न होत असल्याने, मूळ शुद्ध तानांपासून आरंभ होऊन पुढे कूटतानांचे हे विपुल प्रकार शास्त्रकारांनी सांगितले.

(५) वर्ण व अलंकार

स्थायी, आरोही, अवरोही व संचारी या चार वर्णांचे स्वरूप प्रथम नाट्यशास्त्रात मिळते. गानक्रियेचा विस्तार या अर्थाने वर्ण हा शब्द वापरलेला दिसतो. या अर्थाची वर्ण ही कल्पना नारदीशिक्षेत दिलेली नाही. जातींच्या स्वरूपात वर्ण व अलंकार यांचा समावेश असल्याने, जातींच्या वर्णनानंतर नाट्यशास्त्रात वर्ण सांगितले आहेत. याबाबत अभिनवगुप्तांचे म्हणणे असे आहे की जाती केवळ स्वरसमूहमात्र होत, पण वर्णव्यवहार शब्दसंबंधाच्या अधीन आहे. अलंकार हे वर्णावर आधारलेले असतात. गांधर्वात स्वर, शब्द व ताल यांचे समन्वित स्वरूप असते. शब्दांच्या संबंधाविना वर्णाचे लक्षण करणे शक्य नसते. गान-क्रियेचा विस्तार हा वर्ण शब्दाचा अर्थ आहे. कुंभाने वर्ण या शब्दाची व्युत्पत्ति देताना, वर्ण् म्हणजे वर्णन करणे, विस्तार करणे, स्तुति करणे किंवा प्रकाशमान करणे हे अर्थ घेऊन तो शब्द निष्पन्न केला आहे. ते गीतीचे सर्वस्व असल्याने स्तविले जातात किंवा ते गीत विस्तारतात अथवा ते शब्दाला कान्ति प्राप्त करून देतात म्हणून त्यांना वर्ण म्हटले आहे. (संगीतराज पृ. १६८) गानव्यापारात स्वरविस्तार, स्थायी, आरोही, अवरोही व संचारी (म्हणजे आरोह व अवरोह या दोन्हींनी युक्त) या चार प्रकारांनीच संभवत असल्याने वर्ण चारच होत. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ७९]

यज्ञीय गानात या सर्व वर्णांचे स्वरूप होतेच. ते सम्यक्‌पणे लक्षणे देऊन गांधर्वशास्त्रात सांगितले आहे. स्थायी वर्णावर आधारलेले सात, आरोही वर्णावर आधारलेले तेरा, अवरोही वर्णावर आधारलेले पाच व संचारी वर्णावर आधारलेले चौदा असे एकूण एकुणचाळीस अलंकार नाट्यशास्त्रात दिले आहेत. गांधर्वात हे सर्व अलंकार जरी इष्ट असले तरी ध्रुवागानांत त्या सर्वांचा वापर करायचा नसे. अर्थाला अनुसरून ध्रुवागान योजायचे असल्याने या अलंकारांतील काही अलंकारच ध्रुवागानात इष्ट मानले आहेत. दत्तिलात 'वर्णावर आधारलेले अलंकार एकूण तेरा जाणावे' असे म्हटले आहे. (दत्तिलम् पृ. १०) अलंकार याचा अर्थ शोभादायक भूषण. 'या अलंकारांनी शोभिवंत होणारी, वर्णांवर आधारलेली

अशी गीति गायक व श्रोते यांना सुखदायक होते ' असे सांगून मतंगाने अलंकार वर्णिले आहेत. (बृ. पृ. ३५ ते ४३) हे अलंकार पुढीलप्रमाणे होत– प्रसन्नादि, प्रसन्नान्त, प्रसन्नाद्यन्त, प्रसन्नमध्य, सम, बिन्दु, निवृत्त, वेणु, कंपित, कुहरित, रेचित, प्रेंखोलित, तारमन्द्रप्रसन्न, मन्द्रतारप्रसन्न, प्रस्तार, प्रसाद, उद्वाहित, उपलोलक, क्रम, निष्कूजित, ह्रादमान, रञ्जित, आवर्तक, परिवर्तक, उद्घटित, आक्षिप्तक, संप्रदान, हसित, हुंकार, सन्धिप्रच्छादन, विधुत, उद्गीत व गात्रवर्ण. मतंगाने दिलेली थोडी उदाहरणे पुढे देत आहे–

प्रसन्नादि– सा री गा मा पा धा नी सा
(प्रसन्न याचा अर्थ मन्द्र हा घ्यायचा.)

प्रसन्नान्त– तारस्वरापासून आरंभ करून अवरोह क्रमाने
मंद्र स्वर शेवटी– सा नी ध प म ग री सा.

प्रसन्नाद्यन्त– आरंभी व शेवटी प्रसन्न व मध्ये तारस्वर.
सा रि ग म प ध नि (सा) सानिधपमगरीसा.

प्रसन्नमध्य– आरंभी व शेवटी तार स्वर आणि मध्ये मंद्र स्वर.
सा नी ध प म ग री सा सा री ग म प ध नी सा.

याप्रमाणे लक्षणे व उदाहरणे यांसह वर सांगितलेले अलंकार सांगून नंतर बृहद्देशीत भरतोक्त उद्धरण देऊन चारी वर्णांवर आधारलेले अलंकार दिले आहेत. त्यांत स्थायी वर्णाचे आठ, संचारीचे अकरा (प्रत्यक्षात नऊच मिळतात), आरोहीचे तेरा व अवरोहीचे पाच दिले आहेत. तसेच प्रसन्नादि, प्रसन्नान्त, बिन्दु, कंपित, रेचित, प्रेंखोलित, तारमन्द्र, मन्द्रतार, सन्निवृत्त, प्रवृत्त, उपलोलक व वेणु हे बारा अलंकार सर्ववर्णांवर आधारलेले म्हणून दिले आहेत. भरताने स्थायी वर्णावर आधारलेल्या अलंकारांत क्रमरेचित असा एकच अलंकार सांगितला आहे. पण मतंगाने सम व रेचित हे दोन अलंकार घेतल्याने त्याची संख्या आठ झाली आहे. संचारीवर्णांच्या अलंकारांत नाट्यशास्त्रात अवलोकित हा अलंकार आहे तर बृहद्देशीत उपलोलक हा आहे. संचारीवर्णाच्या अलंकारांत फक्त नऊच नावे मिळतात. बृहद्देशीतील हा पाठ अशुद्ध असणेही संभवते.

या अलंकारांच्या बाबतीत मन्द्राचे चिन्ह स्वराबर बिन्दु व ताराचे स्वरावर उभी रेघ असे आहे. नान्यदेवाने आरोही १४, अवरोही ५, स्थायी ७ व संचारी १४ मिळून ४० ही अलंकारांची संख्या दिली आहे. यांत नाट्यशास्त्रातील निष्कर्ष व अभ्युच्चय ही नांवे नाहीत. त्या ऐवजी निष्कूजित व हुंकार ही नावे आहेत. विस्तीर्णोद्घटित या ऐवजी विधुत व उद्वाहित ही दोन नावे असल्याने नान्यदेवाची संख्या चाळीस झाली आहे. शार्ङ्गदेवाने स्थायीचे सात, आरोहीचे बारा तसेच अवरोहीचेही बारा आणि संचारीचे पंचवीस असे एकूण छप्पन्न अलंकार सोदाहरण दिले असून त्याशिवाय आणखी सात अलंकारही सांगितले असल्याने त्याची संख्या त्रेसष्ट होते. या अलंकारप्रकरणात मंद्र स्वर या शब्दाचा अर्थ मूर्च्छनेचा आरंभक स्वर हा घ्यायचा असे शार्ङ्गदेवाने सांगितले आहे ते

बरोबरच आहे. त्याने दिलेला प्रसन्नादि हा अलंकार सं सं सं असा आहे. यातील मन्द्र षड्जानंतर एकदम तार षड्ज घेणे कठिण असल्याने या अलंकाराचे खारस्यच नाहीसे होईल. नारदीशिक्षेत गानाचे जे गुण सांगितले आहेत त्यांत अलंकृत हा एक गुण आहे. त्याचे लक्षण कंठयुक्त स्वर हृदयात व मस्तकात योजणे असे आहे. (ना. शि. पृ. २०) भट्टशोभाकराने याचे स्पष्टीकरण, 'कंठयुक्त गान जेव्हा खाली हृदयात (अर्थात मंद्रस्थानी) व वर मस्तकात (अर्थात तारस्थानी) योजले जाते तेव्हा ते अलंकृत होते', असे दिले आहे. कंठातून उच्चारताना गद्गद्पणा नसणे म्हणजे प्रसन्न होय. मंद्र, मध्य व तार स्वर घेणे हा जो अलंकृत गुण म्हणून नारदीशिक्षेत सांगितला आहे तो पुढच्या प्रसन्नादि इत्यादी अलंकारांचे बीजस्वरूप म्हणता येईल. अलंकारांची संख्या प्राचीन कालापेक्षा मध्यकाळात वाढलेली असणे हे संगीतातील विकासाच्या दृष्टीने स्वाभाविकच ठरते. प्रसन्नादि इत्यादी अलंकारांचे शार्ङ्गदेवाने दिलेले स्वरूप अभिनवगुप्तांच्या मताला अनुसरून असल्याचे दिसते. पण बृहद्देशीतील मतंगाने दिलेले अलंकारांचे स्वरूप वेगळे आहे. उदा. शार्ङ्गदेवाने प्रसन्नादि अलंकार 'दोन मंद्र स्वरानंतर पुढचा तार स्वर असणे' असा दिला आहे. तर मतंगाने (मंद्र) षड्जापासून क्रमाने तारषड्जापर्यंत जाणे असा प्रसन्नादि अलंकार दिला आहे. त्याचे स्वरूप सां री ग म प ध नि सां असे त्याच्या मते म्हणता येईल. हा अलंकार स्थायी वर्णाचा आहे. नाट्यशास्त्रात प्रसन्नादि अलंकाराचे लक्षण 'क्रमशः दीपित' असे दिले आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ८४] 'क्रमाने उच्च होत जाणारा' या लक्षणावरून मतंगाने या अलंकाराच्या दिलेल्या स्वरूपाचा आधार कळून येतो. हे अलंकार मद्रक इत्यादी सात गीते व मागधी इत्यादी चार गीती यांत योजायचे असत. या गीती गांधर्वामध्येच योजायच्या असून, त्या ध्रुवागानात योजायच्या नाहीत असे भरताने सांगितले आहे. [ना. शा. भा. ४ पृ. ९४] या गीतींचे व गीतांचे विशद सोदाहरण स्वरूप आपणाला संगीतरत्नाकरात मिळते. (सं. र. भा. १ पृ. २३० ते २३६; भा. २ पृ. २५-८९)

(६) जाति-ग्रामराग

नारदीशिक्षेत जातींचा उल्लेख नाही. षाडव, पञ्चम, मध्यमग्राम, षड्जग्राम, कैशिक, कैशिकमध्यम, व मध्यमग्रामसंभव कैशिक यांचे लक्षण या शिक्षेत मिळते. भट्टशोभाकराने यातील कैशिकमध्यमास 'ग्रामराग' म्हटले आहे (ना. शि. १-४-श्लो. ५ ते ११) 'स्वररागविशेषेण ग्रामरागा इति स्मृताः । ' (ना. शि. १.२.७) म्हणजे 'स्वररागविशेषाने ग्रामराग म्हणून म्हटले आहेत', अशी ग्रामराग याची व्याख्या दिली आहे. त्यावरून षाडव इत्यादी वर दिलेले ग्रामराग होत. ग्रामांतील स्वरांच्या विशिष्ट रंजकतेने म्हणजेच दीप्ता, आयता इत्यादी श्रुतींच्या विशिष्ट आविष्कारामुळे ग्रामराग निष्पन्न होतात. या ग्रामरागांची लक्षणे भट्टशोभाकराने पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहेतः-

"ऋषभानंतर, षड्ज, धैवत व पंचम यांसह मध्यमरागात म्हणजे मध्यमग्रामात ज्यात गान केले जाते तो निषाद षाडव होय. (यात मध्यम अविनाशी म्हणून आहेच. गांधार

नसल्याने म रि, स, ध, प, नि ह्या सहा स्वरांमुळे षाडव होय.) मध्यमग्रामात पंचमाच्या विरामानंतर, गांधार अंतरस्वर मग ऋषभ आणि निषाद योजल्याने पंचम होय. मध्यमापासून आरंभ करून गांधार अधिकवार योजून निषाद पुन्हा पुन्हा घेऊन आणि धैवत दुर्बल योजल्याने म्हणजे एकवारच योजल्याने षड्ज व ऋषभ (यांसह) पाच स्वरांचे ज्यात सामान्यपणे अवस्थान असते तो मध्यमग्राम होय. षड्जापासून आरंभ करून, निषादाला थोडा स्पर्श करून, गांधार अधिकवार योजून आणि धैवत कंपित योजून (इतर स्वरांचे यथारुचि गान केले असता) तो षड्ज ग्राम होय. आरंभी षड्ज घेऊन ज्यात काकलि व अंतरस्वर (म्हणजे अनुक्रमे चार श्रुतींचा निषाद व चार श्रुतींचा गांधार) योजतात ते पंचमावर आधारलेले साधारित असणारे, कैशिक (हे ग्रामरागस्वरूप होय). सर्व स्वरांनी युक्त असणारा असा कैशिक योजून, मध्यमापासून ज्यात आरंभ केला जातो व मध्यमावर शेवट केला जातो तेव्हा तो कैशिकमध्यम ग्रामराग होय. मध्यमग्रामात, ज्यात काकली निषाद दिसून येतो व पंचमाचे प्राधान्य (म्हणजे पुन्हा पुन्हा योजना) असते आणि बाकीचे स्वर सामान्यपणाने योजतात तो कश्यपाने सांगितलेला मध्यमग्राम-संभव कैशिक होय." मुखसंधीत मध्यमग्राम, प्रतिमुखसंधीत षड्जग्राम, गर्भसंधीत साधारित, विमर्शसंधीत पंचम व निर्वहणसंधीत कैशिक अशी पाच ग्रामरागांची योजना नाट्यशास्त्रात दिली आहे. [नाट्यशास्त्र (बडोदा) भा. ४ पृ. ३९०] यावर भाष्य करताना अभिनवगुप्तांनी म्हटले आहे की काश्यपमुनि इत्यादींनी दिलेल्या ग्रामरागांतील गायनही भरतमुनींनी स्वीकारले आहे. अर्थात् हे शुद्धग्रामराग होत. अभिनवगुप्तांनी[५८] स्वीकारलेल्या पाठानुसार 'पूर्वरंगात चोक्षषाडव योजावा' हेही नाट्यशास्त्रातून कळते. रामायणात कुश-लवांनी केलेल्या रामायणाच्या गायनात सात जातींच्या योजनेचा उल्लेख आहे. त्यावरून जातिगायनाची परंपरा ही प्राचीन असल्याचे दिसून येते. नाटयशास्त्रात जातींचे स्वरूप तपशीलवार सांगितले आहे. सहा ग्रामरागांचा फक्त नामनिर्देश आहे.

नाटयशास्त्रात सात शुद्ध व अकरा संसर्गजविकृत अशा एकूण अठरा जाती वर्णिलेल्या आहेत. त्यांतील स्वरांच्या नावांने असणाऱ्या सात जाती शुद्ध व विकृत अशा दोन्ही स्वरूपाच्या होत्या. षड्जग्रामात षाड्जी, आर्षभी, धैवती व निषादिनी या चार आणि मध्यमग्रामात गांधारी, मध्यमा व पंचमी या तीन शुद्ध जाती होत. जातींच्या स्वरूपात, ग्रह (म्हणजे आरंभाचा स्वर), अंश (म्हणजे रागजनक मुख्य स्वर), न्यास (म्हणजे समाप्तीचा स्वर), अपन्यास (म्हणजे गीताच्या अर्ध्या भागाच्या शेवटी येणारा स्वर), अल्पत्व (म्हणजे एकवार स्पर्शाने योजायचा किंवा गाळायचा स्वर असणारे स्वरूप), बहुत्व

---

५८. ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ३९०.

बडोदा आवृत्तीतील पाठ, 'पूर्वरङ्गविधाने तु कर्तव्यो रागजो विधिः ।' असा आहे. अभिनवगुप्तांनी घेतलेला पाठ, 'पूर्वरङ्गविधाने तु कुर्याद्वै चोक्षषाडवम् ।' असा आहे.

मंत्रालय

(म्हणजे पुष्कळ वेळा योजायचा स्वर असणारे स्वरूप), षाडव (म्हणजे ठराविक स्वर गाळून होणारे सहा स्वरयुक्त स्वरूप), औडुवित (म्हणजे ठराविक दोन स्वर गाळून होणारे पाच स्वरयुक्त स्वरूप), तारगति (म्हणजे अंश स्वरापासून योजायची तार स्वरांची मर्यादा) व मंद्रगति (म्हणजे मंद्र सप्तकातील योजायची मंद्र स्वरांची मर्यादा) या दहा लक्षणांचा समावेश भरताने केला आहे.

शुद्ध जाती या सात स्वर घेणाऱ्या आणि स्वतःच्या नावातला स्वर हाच अंश, ग्रह, न्यास व अपन्यास असणाऱ्या अशा होत. न्यास कायम ठेवून बाकीच्या पूर्णत्व, ग्रह, अंश व अपन्यास यांच्या बदलाने शुद्धा जातींचे विकृत स्वरूप होते. शुद्धा जातींत न्यास नियमाने मंद्रच असे. संसर्गजविकृत जाती या दोन किंवा अधिक जातींच्या मिश्रणाने होणाऱ्या होत. या अकरा संसर्गजविकृत जातींतील षड्जोदीच्यवती, षड्जकैशिकी, व षड्जमध्या या षड्जग्रामातल्या असून गान्धारोदीच्यवा, रक्तगांधारी, गान्धारपंचमी, मध्यमोदीच्यवा, नंदयन्ती, कर्मारवी, आन्ध्री व कैशिकी या मध्यग्रामातल्या आहेत.

दत्तिल, मतंग, नान्यदेव व शार्ङ्गदेव या सर्वांनी या भरतोक्त जातींचे स्वरूप सांगितले आहे. जातींची स्वर व ताल योजना, जातींचे रस आणि त्यांचा विनियोग मतंगाने दिला आहे. पुढे नान्यदेवाने जातींची गीते व त्या त्या शुद्धा जातीचे होणारे विकृत प्रकार तपशिलासह सांगितले आहेत. शार्ङ्गदेवाने जातींच्या प्रस्तारात गीतातील अक्षरांची कलानुसार योजना दिली आहे. तसेच स्वरयोजनेत मंद्र, मध्य व तार स्वर कोणते तेही मंद्र स्वरासाठी वर बिंदू व तार स्वरासाठी वर उभी रेघ या चिन्हांनी दाखविले आहेत. यामुळे शार्ङ्गदेवाने दिलेले जातींचे वर्णन, जातिगायनाचे ज्ञान मिळण्यास तज्ज्ञांना उपयुक्त आहे. अंशाच्या लक्षणात 'विन्यास व संन्यास यांत आढळून येणारा' असा जो भाग नाट्यशास्त्रात आहे [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ४५] त्यातील विन्यास व संन्यास यांचा समावेश शार्ङ्गदेवाने स्वतंत्रपणे केला आहे. तसेच जातींची अभिव्यक्ति करणाऱ्या अंतरमार्गाचाही स्वतंत्र समावेश केला आहे. त्यामुळे जातीच्या स्वरूपात त्याने तेरा लक्षणांचा अंतर्भाव केला आहे. पहिल्या विदारीत (म्हणजे गीताच्या भागात) अंशाला विवादी नसणारा स्वर शेवटी योजला असता तो संन्यास होय व विदारीचाही भाग असणाऱ्या पदाच्या शेवटी अंशाचा संवादी किंवा अनुवादी स्वर योजला असता तो विन्यास होय. [बृहद्देशी पृ. ५७,५८; भरतभाष्य भा. २ पृ. ८; सं. र. भा. १ पृ. १५५]

अन्तरमार्गाचे लक्षण अल्पत्वाच्या व बहुत्वाच्या संदर्भात नाट्यशास्त्रात मिळते. अंश नसणाऱ्या स्वरांची गीतात केलेली प्रचुर योजना अंतरमार्ग म्हटली जात होती. अंतरमार्गात अंश नसणारा स्वर अल्प न योजता पुष्कळ योजला जातो. उदा. कार्मारवी जातीत गांधारस्वराची संगति सर्व स्वरांबरोबर योजल्याने त्याचा बाहुल्याने प्रयोग अंतरमार्गात सांगितला आहे. ज्या जातीत अनेक स्वर अंश असतात, त्यांतील एक अंश म्हणून योजला असता बाकीचे पर्यायाने अंश होतात. त्या दुर्बल जातीतील न्यास व अन्तरमार्ग

जातीचे स्वरूप अभिव्यक्त करणारा असतो. अभिनवगुप्तांनी अन्तरमार्गाच्या बाबतीत दुसरे म्हणून मत असे दिले आहे की "अन्तरमार्ग सर्वत्र मुख्य असल्याने अल्पत्व व बहुत्व याशिवाय त्याचे स्वरूपच उपलब्ध होत नाही; आणि म्हणून तो जातीची अभिव्यक्ति करणारा आहे. अनुवादी स्वर व अंश स्वर मुख्य असता, बलवान असावयाच्या संवादी स्वरांच्या अल्पत्वामुळे दुर्बल असणाऱ्या जातीतील स्वरांना न ओलांडता जो न्यास केला जातो तो अंतरमार्ग होय. म्हणून अल्पत्व व बहुत्व सांगितले आहे. दुसरे आचार्य न्यास व अंतरमार्ग यांच्या योगाने पर्यायी अंशाचे बहुत्व प्रयुक्त करावे असा या श्लोकाचा अर्थ घेतात." [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ४९, ५०] मतंगाने अंतरमार्गाचे स्वरूप थोडक्यात असे सांगितले आहे की 'जातीत केव्हा केव्हा अंश नसणाऱ्या स्वराचे अल्पत्व न योजता बहुत्व योजले जाते तेव्हा तो अंतरमार्ग होय.' 'न्यासश्चान्तरमार्गश्च' या ऐवजी बृहद्देशीत 'द्विविधान्तरमार्गस्तु' असा पाठ आहे. [बृ. पृ. ६०] अल्प असणाऱ्या स्वरांचे बहुत्व व बहुत्व असणाऱ्या स्वरांचे अल्पत्व असे हे दोन प्रकारचे अंतरमार्गस्वरूप होईल. नान्यदेवानेही अन्तरमार्गण व न्यास जातींची अभिव्यक्ति निर्माण करतात असे म्हटले आहे. (भ. भा. भा. २ पृ. १३२) शार्ङ्गदेवाने 'न्यास इत्यादींची जागा सोडून, अल्पत्व असणाऱ्या स्वरांची जी अंश इत्यादी स्वरांबरोबर वैचित्र्य निर्माण करणारी अशी संगति, मध्ये मध्ये, केव्हा एकवार योजल्याने तर केव्हा केवळ गाळल्याने योजिली जाते तो अंतरमार्ग होय' असे म्हटले आहे. तो बहुधा विकृत जातीत योजायचा असतो. (सं. र. भा. १ पृ. १५७) कल्लिनाथाने याचे विशदीकरण पुढीलप्रमाणे केले आहे. न्यास इत्यादी म्हणजे न्यास, अपन्यास, विन्यास, संन्यास, ग्रह व अंश हे होत. यांचे स्थान म्हणजे गीताचा शेवटचा भाग इत्यादी सोडून, न्यास इत्यादी दोहो दोहोंच्या मध्ये, दोन्ही प्रकारच्या अल्पत्वाने युक्त अशा स्वरांची, अंश, ग्रह, अपन्यास इत्यादींच्या बरोबर योजिली जाणारी वैचित्र्य निर्माण करणारी संगति म्हणजे अंतरमार्ग होय. 'मध्ये मध्ये' या पुनरावृत्तीवरून बहुत्व कळून येते. हा अंतरमार्ग बहुशः विकृत जातीत योजायचा असतो; अर्थात् शुद्ध जातीत त्याचा प्रयोग क्वचितच योजायचा असतो. जातींचे अंश स्वर भिन्न भिन्न जातीत एक किंवा अनेक दिले असून षड्जमध्या या एका जातीत सातही स्वर अंश म्हणून सांगितले आहेत. न्यास स्वर मात्र सोळा जातींत प्रत्येकी एकच असून षड्जमध्या या जातीत षड्ज व मध्यम हे दोन स्वर न्यास आहेत. तसेच कैशिकी या जातीत ऋषभ सोडून बाकीचे सहा स्वर अंश असल्याने, निषाद वा धैवत स्वर अंश असताना पंचम हा न्यास स्वर असतो व बाकीचे स्वर अंश असता गांधार व निषाद हे न्यास स्वर असतात असे भरताने म्हटले आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ६३] दत्तिलानेही या जातीत गांधार व निषाद हे न्यास स्वर सांगितले असून, निषाद तसेच धैवत स्वर अंश असता पंचम स्वरही न्यास असतो असे म्हटले आहे. (द. पृ. ९) मतंगाने भरतप्रणीत लक्षण देऊन, दुसरे मत म्हणून निषाद व धैवत अंश असता नि, ग व प हे न्यास असतात असे सांगितले आहे. (बृ. पृ. ७६) नान्यदेवाने ग व

नि हे न्यास स्वर सांगितले आहेत. (भ. भा. भा. २ पृ. २०१) मतंगाने दिलेले दुसरे मत शार्ङ्गदेवानेही तसेच सांगितले आहे. (सं. र. भा. १ पृ. २०१) पंचम हा न्यास स्वर निषाद व धैवत हे अंश असतानाच असतो हे या सर्वांच्या सांगण्यावरून कळून येते. शुद्ध जातीचे विकृत स्वरूप करताना न्यास स्वर सोडून बाकीच्या पूर्णत्व, ग्रह, अंश व अपन्यास यांच्या बाबतीत बदल करायचा असे. यावरून न्यास स्वराचे स्वरूप जातिगायनात परिवर्तनीय नव्हते हे समजून येते. शुद्ध जातींची षाड्जी इत्यादी स्वरांवरून योजलेली नावे न्यास स्वराच्या दृष्टीने होत. या शुद्ध जातींच्या न्यासयोजनेत मंद्र स्वरावर न्यास नियमाने सांगितला आहे. त्यांच्या विकृत स्वरूपात मंद्रन्यासाचा नियम नव्हता. शुद्ध जातीत न्यास स्वर हाच अंश व ग्रहही असे व तिच्यात साती स्वर असत. ज्या स्वरावरून आरंभ झाला त्याच स्वरावर शेवटही होत होता. अंश स्वराचे प्राधान्य त्या त्या जातीच्या आविष्कारात अपरिहार्य असल्याने शेवटीही तोच स्वर येणे आवश्यक होते. पण जेव्हा एका जातीत अनेक अंशस्वरांची योजना असते तेव्हा त्या जातीच्या बाबतीत न्यास स्वराचे स्थान निश्चित होणे अनिवार्य होते. म्हणूनच शुद्ध जातींत न्यास स्वर अपरिवर्तनीय सांगितला आहे. ग्रह, अंश व न्यास एकच स्वर असता शुद्ध षाड्जीचे स्वरूप षड्जाने आरंभ, षड्जबाहुल्य व षड्जावर शेवट असे होईल. सातही स्वर असल्याने स रि ग म प ध नि अशी पहिली मूर्च्छना या जातीचा आधार असणे स्वाभाविक ठरते. तसेच आर्षभी इत्यादींच्या बाबतीतही म्हणता येईल. त्यामुळे पुढे जातीचे स्वरूप सांगताना मूर्च्छना देण्याची आवश्यकता शास्त्रकारांना वाटू लागली. म्हणून मतंग व शार्ङ्गदेव यांनी त्या त्या जातीची मूर्च्छना दिली आहे. भरताने जातींच्या बाबतीत मूर्च्छना न देण्याचे कारण त्या काळची सात स्वरांसाठी सात तारा असणारी चित्रा ही वीणा व अंतर आणि काकली या दोन स्वरांसाठी दोन अधिक तारा योजल्या जाणारी नऊ तारा असणारी त्रिपंची ही वीणा या साथीच्या वाद्यांत असणे संभवते. मंद्र, मध्य व तार या स्थानातले स्वर मिळणे हाच मुख्य उद्देश भरतकाळी मूर्च्छनांच्या योगाने वीणांच्या साहाय्याने सिद्ध होत असे. पुढे बारा तारांच्या योजनेने द्वादशस्वर मूर्च्छना येऊन स्थानप्राप्ति अधिक व्यापक झाली व नंतर एकवीस तारांच्या वीणा मुख्य झाल्यावर या वीणांत तिन्ही स्थानचे स्वर सहजपणे मिळत असल्याने, मूर्च्छनांचे प्रयोजन जातिव्यवस्थेतही अंतर्भूत झाले.

नान्यदेवाने जातींचे वर्णन देताना त्या त्या जातीत मूर्च्छना दिलेली नाही. शार्ङ्गदेवाने मतंगाला अनुसरून जातींच्या बाबतीत मूर्च्छना दिल्या आहेत. उदा. षाड्जी जातीची मूर्च्छना धैवतादिका ही दिली आहे. ही जाती षड्जग्रामाची आहे. धैवताने आरंभ होणारी अर्थात उत्तरायता ही हिची मूर्च्छना होय. ह्या मूर्च्छनेचे स्वरूप असे–

$$_{३}ध\ _{२}नि\ _{४}स\ _{३}रि\ _{२}ग\ _{४}म\ _{४}प = २२\ श्रुती$$

षाड्जीत अंश स्वर स, ग, म, प आणि ध हे आहेत. वरील मूर्च्छनेत ध व नि हे मंद्र स्वर असून बाकीचे मध्य स्थानातले आहेत. या जातीत स–ग आणि स–ध यांच्या संगती

असून गांधाराचे बहुत्व आहे. गांधार अंश असता निषादाचा लोप होत नाही कारण जातिगायनात अंशाच्या संवादी स्वराची अपेक्षा प्राधान्याने असते. शुद्ध जातीचा न्यास मंद्र असावा या नियमाऐवजी शार्ङ्गदेवाने तार न्यास नसावा हा नियम दिला आहे. (सं. र. भा. १ पृ. १३९) कल्लिनाथाने याचे स्पष्टीकरण देताना "यथासंभव मंद्र व मध्य स्थानात न्यास असण्याचा नियम इष्ट होय" असे म्हटले आहे. "शुद्ध जातीत मंद्र न्यास असावा हे भरताचे म्हणणे तारस्थानात न्यास नसावा अशा अर्थाने घेतले नाही तर मतंगाने षाड्जी जातीत मध्य षड्ज हा न्यास असतो असे जे सांगितले आहे त्याच्याशी विरोध उत्पन्न होईल," असेही कल्लिनाथ स्पष्ट करतो.

मंद्र शब्दाचा अर्थ अलंकारांच्या संदर्भात 'मूर्च्छनेचा आरंभाचा स्वर' असा जो शार्ङ्गदेवाने सांगितला आहे तो घेतल्यास मंद्र न्यास असणे या भरताने दिलेल्या नियमाचा उलगडा कदाचित होऊ शकेल. सप्ततंत्री वीणेच्या तारा मध्य सप्तकातल्या सात स्वरांना लावल्यावर षड्जग्रामाची सातवी मूर्च्छना मंद्र ऋषभापासून सुरू होईल व मध्यमग्रामाची सातवी मूर्च्छना मंद्र पंचमापासून सुरू होईल. मध्यमग्रामिक वीणेच्या बाबतीत मंद्र मध्यमावर न्यास योजणे गायनाच्या दृष्टीने सहजपणे शक्य होते. पण षड्जग्रामिक वीणेच्या बाबतीत मंद्र षड्जावर न्यास योजणे गायनाच्या बाबतीत कठिण स्वरूपाचे होते. अर्थात भरतकालीन जातिगायनात मंद्र षड्ज हा स्वर गायनात घेणे शक्य होईल अशा प्रकारचे मंद्र स्थानाचे स्वरूप होते असे मानल्यासच मंद्र न्यासाचा नियम पाळणे संभवते. पण पुढे तीनही स्थानांचे स्वर मिळणाऱ्या एकवीस तारांच्या वीणा प्रचारात आल्यावर मंद्र, मध्य व तार या स्थानांचे स्वरूप ठरल्यामुळे व स रि ग म प ध नि सं असे स्वरांचे अष्टकही गायनप्रचारात आल्यामुळे, मध्यस्थानचा षड्ज इत्यादि स्वरही न्यास म्हणून योजला जाऊ लागला असे मतंगाच्या व शार्ङ्गदेवाच्या जातिस्वरूपावरून वाटते.

गांधर्वात स्वर, पद व ताल यांचे समन्वित स्वरूप असल्याने, स्वरसंदर्भात येणारे सर्व विषय म्हणजे शुद्ध व साधारण स्वर, ग्राम, मूर्च्छना व तान, स्वरांचे वादी, संवादी इत्यादी चार प्रकारचे स्वरूप, स्वरांच्या योजनेतील स्थायी, आरोही इत्यादी चार वर्ण व त्यांवर आधारलेले अलंकार इत्यादि भरताने दिले आहेत. तसेच ज्या दहा लक्षणांचा उपयोग केल्याने स्वरयोजनेच्या द्वारे गायनवादनात विवक्षित आविष्कार उत्पन्न होतात त्या जातींचे स्वरूप वर्णिलेले आहे. याच पद्धतीने पुढील शास्त्रकारांनी मांडणी केली आहे. भरतप्रणीत स्वरांच्या स्वरूपात सात शुद्ध स्वर व अंतर आणि काकली हे दोन साधारण स्वर असे नऊ स्वर होते; तसेच मध्यमग्रामातला त्रिश्रुतिक पंचम हाही स्वर होता, आणि त्यामुळे पंचमाचे चतुःश्रुतिक व त्रिश्रुतिक असे दोन प्रकारचे स्वरूप होते. पुढे मूर्च्छनांचा समावेश जातींच्या आविष्काराचा आधार म्हणून सांगितला गेल्याने, मूर्च्छनेचा आरंभक स्वर बदलताच त्याच्या संदर्भात इतर स्वरांची नावे तीच राहिली असली, तरी त्यांचे स्वरूप श्रुतिमूल्यांच्या दृष्टीने बदलत असल्याने जातींच्या आविष्कारातील भिन्नता निर्माण होई. मध्यमग्रामाचे स्वतंत्र अस्तित्व राहण्याचे कारणही त्यामुळे न उरल्याने

षड्जग्राम हाच मुख्य ग्राम राहिला. बावीस श्रुतींच्यासाठी बावीस तारांची वीणा योजल्यामुळे श्रुतिमूल्यांचा विचार नव्याने होऊ लागला. त्यामुळे शार्ङ्गदेवाने दिलेल्या स्वरांच्या स्वरूपात सात शुद्ध व बारा विकृत असे एकोणीस स्वर आढळतात. षड्जग्राम हा मुख्य मानल्याने सात शुद्ध स्वरांचे स्वरूप या ग्रामातल्या स्वरांचे ठरते, ते असे–


$_{४}$स $_{३}$रि $_{२}$ग $_{४}$म $_{४}$प $_{३}$ध $_{२}$नि $_{४}$सं

षड्जग्रामातल्या षड्ज–साधारणात षड्जाची पहिली श्रुति निषाद व शेवटची ऋषभ घेत असल्याने निषाद तीन श्रुतींचा व ऋषभ चार श्रुतींचा होतो आणि षड्ज दोन श्रुतींचा राहतो. यामुळे हे तीन विकृत स्वर प्राप्त होतात. निषाद काकली असता तो षड्जाच्या दोन श्रुती घेतल्याने चतुःश्रुतिक होतो व षड्ज दोन श्रुतींचा राहतो. षड्ज जरी आपल्या श्रुतिस्थानीच वाजत असतो तरी निषादापासून त्याचे अंतर दोन श्रुतीचे रहात असल्याने शार्ङ्गदेवाने षड्जाचे हे विकृत स्वरूप तात्त्विक दृष्ट्या मानले आहे. मध्यमग्रामात मध्यम-साधारण असता पंचम चतुःश्रुतिक होतो व गांधार त्रिश्रुतिक होतो आणि मध्यमाचे स्वरूप द्विश्रुतिक राहते. यामुळे हे तीन विकृत स्वर प्राप्त होतात. गांधाराचे अंतरगांधार हे स्वरूप असता मध्यम त्यापासून दोन श्रुतींच्या अंतरावर असतो. येथेही मध्यम स्वर जरी आपल्या श्रुतिस्थानीच वाजत असतो तरी त्याचे द्विश्रुतिक हे स्वरूप झाल्याने शार्ङ्गदेवाने तात्त्विक दृष्ट्या त्याचे हे विकृत स्वरूप मानले आहे. षड्जग्रामाचे मुख्यत्व मानल्याने, मध्यमग्रामातले पंचमाचे त्रिश्रुतिक स्वरूप हेही विकृत स्वरस्वरूप होते व त्यानुसार होणारे धैवताचे चतुःश्रुतिक स्वरूपही विकृत स्वरस्वरूप ठरते. याशिवाय चतुःश्रुतिक अंतर गांधार व चतुःश्रुतिक काकली निषाद हे दोन विकृत स्वर पूर्वीपासून प्रचारात होतेच. त्यामुळे एकूण विकृत स्वर बारा होतात. तात्त्विकदृष्ट्या सूक्ष्म विचार करता शार्ङ्गदेवाने मानलेली विकृत स्वरांची बारा ही संख्या शास्त्रसंमत ठरते. पण प्रत्यक्ष होणाऱ्या व्यवहाराला अनुसरून पुढील शास्त्रकारांनी विकृत स्वरांची संख्या सात ही मानली व आधुनिक प्रचारात षड्ज व पंचम यांचे स्वरूप अचल राहिल्याने ती संख्या पाच एवढीच राहिली आहे. शार्ङ्गदेवाने केलेल्या विकृत स्वरांच्या मांडणीवरून एक गोष्ट ध्यानात येते ती ही की विकृत स्वरांच्या बाबतीत द्विश्रुतिस्वरूप कमीतकमी मानले गेले आहे. शार्ङ्गदेवाने दिलेले विकृत स्वर पुढीलप्रमाणे–

द्विश्रुति स्वर– च्युत षड्ज (षड्ज साधारणात), अच्युतषड्ज (निषाद काकली असता), च्युत मध्यम (मध्यम साधारणात), अच्युत मध्यम (गांधार अंतर स्वर असता);

त्रिश्रुति स्वर– कैशिक गांधार (मध्यम साधारणात), पंचम (मध्यमग्रामात), कैशिक निषाद (षड्ज साधारणात);

चतुःश्रुति स्वर– ऋषभ (षड्ज साधारणात), अंतरगांधार, पंचम (मध्यम साधारणात), धैवत (मध्यमग्रामात), काकली निषाद.



वरील स्वरस्वरूपात ऋषभाची पहिली व दुसरी श्रुति (म्हणजे वरील मांडणीतील पाचवी व सहावी श्रुति), गांधाराची पहिली श्रुति (म्हणजे वरील मांडणीतील आठवी श्रुति), पंचमाची पहिली व दुसरी श्रुति (म्हणजे वरील मांडणीतील चौदावी व पंधरावी श्रुति), धैवताची पहिली व दुसरी श्रुति (म्हणजे वरील मांडणीतील अठरावी व एकोणिसावी श्रुति) व निषादाची पहिली (म्हणजे वरील मांडणीतील एकविसावी श्रुति) यांना शार्ङ्गदेवाच्या शुद्ध व विकृत स्वरयोजनेत स्वरत्व आलेले नाही. या बाबतीत दत्तिलाने केलेले विधान स्वीकरणीय आहे. तो म्हणतो की, "जे श्रुती नावाचे ध्वनिविशेष आहेत त्यांतील काही घेऊन ते सर्व गीतींत गायिले जातात. त्यांना स्वरत्व प्राप्त होऊन त्यांचा आदर केला जातो." (दत्तिलम्-श्लोक ९, १०) शार्ङ्गदेवाच्या विकृत स्वरयोजनेत अच्युत स, षड्ज साधारणातील चतुःश्रुति विकृत रि, अच्युत म व मध्यमग्रामिक ध हे चार विकृत स्वर जरी आपापल्या श्रुतिस्थानीच वाजत असतात तरी त्यांची श्रुतिसंख्या त्यांच्या शुद्धस्वरूपातील श्रुतिसंख्येपेक्षा भिन्न असल्याने केवळ तात्त्विक दृष्टीने त्यांचे विकृतस्वरूप मानले आहे. मध्यमग्रामातील त्रिश्रुतिक पंचम व चतुःश्रुतिक धैवत मध्यमग्रामाच्या दृष्टीने शुद्धच आहेत पण षड्ज ग्रामाचे मुख्यत्व मानले म्हणजेच त्यांचे हे स्वरूप विकृत स्वर या स्वरूपाचे होते. मध्यमग्रामातील त्रिश्रुतिक पंचम ज्या श्रुतिस्थानी वाजतो त्याच स्थानी मध्यमसाधारणातील चतुःश्रुतिक पंचम हा स्वरही वाजतो. पण याही बाबतीतील त्याचे चतुःश्रुतिक स्वरूप मध्यमग्रामाच्या दृष्टीने विकृत ठरते. अहोबलाने या बाबतीत वेगळीच कल्पना मांडली आहे. तो सात शुद्ध स्वर व बावीस विकृत स्वर मानतो. उत्तरगामी स्वरांच्या बाबतीत पुढच्या पुढच्या श्रुति घेण्यामुळे तो क्रमाने तीव्र, तीव्रतर, तीव्रतम अशा संज्ञा वापरतो व स्वर मागे येत असता तो कोमल, मृदु इत्यादि संज्ञा योजतो. "स्वरापेक्षा अभिन्न असणाऱ्या, ऐकू येणे या कारणामुळे श्रुति-संज्ञेच्या होत. त्या त्या रागात त्या त्या श्रुति स्वररूपत्व पावतात.

रागाला कारणीभूत होत असल्याने यांचे श्रुति हे नाव संमत आहे." (सं. परिजात-पृ. ४) संगीतशास्त्रातील रागपद्धतीच्या अतिसूक्ष्म अशा विकसित स्वरूपामुळे अहोबलाचा श्रुतिविचार प्रचाराला अनुसरून मांडला गेला आहे असे मानणे या संबंधात योग्य ठरते. रागांच्या विशिष्ट अशा आविष्कारात सध्या प्रचारात असणाऱ्या सात शुद्ध व पाच विकृत स्वरांच्या केवळ स्थूल योजनेने सर्वत्र सफलता प्राप्त होत नाही. काही रागांची अभिव्यक्ति, त्या त्या स्वरांच्या विशिष्ट छटा प्रभावीपणाने गायक वा वादकाने आविष्कृत केल्या तरच यशस्वीपणे होऊ शकते. अशा वेळी प्राचीनकाळापासून चालत आलेला व अधिकाधिक स्पष्ट रूप प्राप्त होत असलेला श्रुतिविचार समजून घेणे आवश्यक ठरते.

जाति फक्त स्वरयोजनांनी निर्माण होतात. त्यांचा उपयोग गीतांमध्ये योजून करायला पाहिजे. वाद्यप्रधान संगीतात केवळ स्वरयोजना अपेक्षित आहे. पण भारतीय संगीतात शब्दाचेही महत्त्व आहे. कारण मद्रक, अपरान्तक इत्यादी गीते, तसेच मागधी इत्यादी चार गीती देवतांना आनंद देण्यासाठी असून ब्रह्मप्रोक्त शब्दरचना असणारे कपाल, तसेच कंबल इत्यादी गीतप्रकारही देवताराधनासाठी होते. जातिगायनाचा आविष्कार या गीतांमधून केला जात असे. या गीतांत सुनिश्चित अशी तालयोजनाही होतीच. म्हणून गांधर्व या शब्दाने स्वर, पद व ताल यांचे एकत्र असे सुसंवादी स्वरूप सांगितले आहे. मागधी इत्यादी गीतींचे सामान्य लक्षण अभिनवगुप्तांनी असे दिले आहे– "यतिकालविभागाने व वर्ण आणि अलंकार यांच्या नियमाने लययुक्त अशी विशिष्ट गानक्रिया म्हणजे गीति होय." [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ९३] या गीती ध्रुवागानात योजायच्या नसून फक्त गांधर्वातच योजाव्या असे भरताने सांगितले आहे. (ना. शा. अध्याय २९ श्लो. ४९) कल्लिनाथाने या गीती जातींना उपयोगी असणाऱ्या म्हणून म्हटल्या आहेत. मतंगाने व शार्ङ्गदेवाने जातींच्या वर्णनात जातींत योजायच्या गीतीही दिल्या आहेत.

(७) गीति व राग

एकापेक्षा अधिक अंश असणाऱ्या जातीत एक स्वर अंश म्हणून योजून इतर अंश स्वर पर्यायी अंश म्हणून योजण्याने, जो स्वर अंश म्हणून योजलेला असतो त्यामुळे निर्माण होणारा त्या जातीचा रंजक आविष्कार व इतर स्वर अंश म्हणून योजण्याने निर्माण होणारे रंजक आविष्कार यांत भिन्नपणा असणे स्वाभाविकच आहे. शिवाय जातींच्या परस्पर मिश्रणाने होणाऱ्या विकृत जातींचे आविष्कार वेगवेगळे होतेच. एका ग्रामातून उत्पन्न होणाऱ्या व एक अंश असणाऱ्या जातींचे समान स्वरूपाचे गान जातिसाधारण म्हणून नाट्यशास्त्रकालापासून प्रचारात होते. जातिगायनाचे हे साधारण स्वरूप वर्णसाम्यामुळे उत्पन्न होते असे कल्लिनाथाने स्पष्ट केले आहे. (सं.र. भा. १ पृ. १२२) दत्तिलाने 'एका ग्रामातील जातीत जे दुसऱ्या जातीसारखे स्वरूप बाहुल्याने प्राप्त होते ते जातिसाधारण होय' असे म्हटले आहे (द. श्लो. ४७). जातिसाधारण यालाच राग म्हणून काही आचार्य म्हणतात असे शार्ङ्गदेवाने सांगितले आहे. (सं. र. भा. १ पृ. १२२) जातिगायनामधून प्रकट होणाऱ्या अनेकविध रंजक आविष्कारांचे स्वरूप सर्वसामान्यपणे सांगता येण्यासाठी 'राग' ही संकल्पना भारतीय

संगीतशास्त्रात आली असे दिसून येते. अर्थात या संकल्पनेला पायाभूत असणारे गायनातील स्वरयोजनांचे विविध प्रकारचे वैशिष्ट्य ध्यानी घेऊन रागगायन निर्माण करणाऱ्या अशा गीती संगीतशास्त्रात सांगितल्या गेल्या. या गीती दुर्गाशक्तीच्या मताने शुद्धा, भिन्ना, गौडी, वेसरा व साधारणी या पाच होत. शार्ङ्गदेवाने याच पाच गीती रागजनक म्हणून मानल्या आहेत. मतंगाने रागगायनाचे स्वरूप स्पष्टपणे प्रथम मांडल्याचे त्याच्याच म्हणण्यावरून कळून येते. तो म्हणतो 'रागमार्गाचे जे स्वरूप भरत इत्यादींनी सांगितले नाही ते आता मी लक्षण व उदाहरणे यांसह वर्णितो.' (बृ. पृ. ८१) सामान्यपणे रञ्ज् म्हणजे रंजविणे या धातूपासून 'रंजक स्वरसंदर्भ' असा राग या शब्दाचा अर्थ होय. "स्वर व वर्ण यांनी विभूषित असा जो ध्वनिविशेष लोकांचे मन रंजवितो तो राग होय" अशी त्याची व्याख्या दिली आहे. रागसंदर्भात भाषा हा शब्द आलाप या अर्थाने योजलेला आहे. ज्याप्रमाणे शब्दार्थांनी भाषा विशिष्ट ज्ञान करून देते त्याप्रमाणे आलाप रंजक आविष्कारांचे विशिष्ट ज्ञान करून देत असल्याने या पद्धतीच्या गानप्रकाराला भाषा हा शब्द प्राचीन आचार्यांनी योजलेला असावा.

स्वरयोजनांच्या वैशिष्ट्यामुळे ज्यांचे स्वरूप निष्पन्न होते अशा या गीतींच्या संख्येविषयी बृहद्देशीत प्राचीन आचार्यांची मते दिली आहेत. शार्दूलाने भाषा ही एकच गीति मानली आहे. भाषेच्याच जोडीला तिचा उपप्रकार विभाषा हा मतंगानेही सांगितला आहे. भाषा, विभाषा व आणखी एक पोट प्रकार अंतरभाषा अशा तीन गीती याष्टिकाने सांगितल्या आहेत. दुर्गाशक्तीने सांगितलेल्या शुद्धा इत्यादि पाच गीती वर दिल्या आहेतच. बृहद्देशीत शुद्धा, भिन्ना, गौडी, राग, साधारणी, भाषा व विभाषा या सात गीतींचे स्वरूप वर्णिलेले आहे. चोक्षा म्हणजे शुद्धा या गीतीत, मंद्र, मध्य व तार या स्थानांत समुचित श्रुत्यन्तरयुक्त असे स्वर ललित, सम व सरळपणाने योजलेले असतात. भिन्ना या गीतीत तार व मंद्र स्वर सूक्ष्म व वक्र असे उच्छासयुक्त योजलेले असतात. गौडी या गीतीत हकारयुक्त असे स्वर तिन्ही स्थानांत अखंडपणे गमकांसह आरोहात व अवरोहात घेतले जातात आणि अक्षरयोजना सम प्रकारची असते. रागगीतीत ललित, सुंदर, प्रसन्न आणि हृदयापासून निघालेल्या गमकांनी युक्त अशी स्वरयोजना असते. सरळ, ललित, किंचित सूक्ष्म व स्थूल अशा मृदु आणि थोड्या द्रुत असणाऱ्या काकुयुक्त स्वरयोजनेने साधारणा गीति निष्पन्न होते. ही गीति सर्व गीतींना आधारभूत मानली आहे. कंठातून निघणाऱ्या सफाईदार, योग्य प्रकारे योजलेल्या, काकु (म्हणजे स्वराच्या उच्चारण्यातील बदल) यामुळे रंजक, कंपित, कोमल, दीप्त, ललित, सुसंयत व सुकुमार अशा स्वरप्रयोगांनी नटलेली ती भाषा गीति होय. लोकांना आवडेल अशा तऱ्हेने ती योजिली जाते. पुष्कळशा ललित, दीप्त, कंपित, हृदयापासून निघणाऱ्या, तार व अतितार, नाजूक, मध्यमाने दीप्तियुक्त, अशा कानाला सुखद होणाऱ्या ललित गमकांनी इच्छेनुसार प्रयुक्त केलेली विभाषा गीति होय. (बृ. पृ. ८२ ते ८४) मतंगाने दिलेल्या रागगीतीचे वेसरा हे दुसरे नाव होय. शार्ङ्गदेवाने रागगीतीच्या वेसरा या नावाचे स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की "चारही वर्णांत अत्यंत

रंजक प्रकाराने वेगाने योजलेल्या स्वरांनी युक्त अशी वेगस्वरा गीति विद्वानांच्याकडून वेसरा म्हटली जाते." (सं. र. भा. १ पृ. २४०) भरतप्रणीत मागधी इत्यादी गीती मुख्यतः पद व ताल यांवर आधारलेल्या असून, शुद्धा इत्यादी मुख्यतः स्वरांवर आधारलेल्या आहेत अशा या दोन प्रकारच्या गीतिसमूहांतला भेद कल्लिनाथाने दिला आहे. (सं. र. भा. १ पृ. २४१) यावरून स्वरालाप घेताना योजलेल्या स्वरोच्चारांतील विविध प्रकारांमुळे व अनेकविध गमकांमुळे जे मनोहारि असे गानस्वरूप आविष्कृत होते ते 'गीति' या शब्दाने मतंग इत्यादींनी रागसंदर्भात सांगितले आहे हे कळून येते.

मतंगाने सांगितलेल्या शुद्धा इत्यादी गीतींवर आधारलेल्या रागांना 'ग्रामराग' ही संज्ञा नान्यदेव, अभिनवगुप्त व शार्ङ्गदेव यांनी दिली आहे. शुद्धा गीतीवर आधारलेले षाडव, पञ्चम, कैशिकमध्यम, चोक्षसाधारित व चोक्षकैशिक (चोक्ष म्हणजेच शुद्ध) हे पाच चोक्ष; भिन्ना गीतीवर आधारलेले पाच भिन्न; गौडीवर आधारलेले तीन गौड; राग-गीतीवर आधारलेले आठ व साधारणा गीतीवर आधारलेले सात; भाषाराग सोळा आणि विभाषा बारा असे एकूण राग बृहद्देशीत सांगितले आहेत. षाडव या रागाच्या नावा-संबंधाने मतंगाने म्हटले आहे की "तो सहा स्वरांनी गायिला जातो म्हणून किंवा सहा रागांत मुख्य आहे म्हणून त्याचे षाडव हे नाव होय. पण हा राग संपूर्ण असल्याने सहा रागांत मुख्य असणे यावरूनच हे नाव जाणणे योग्य आहे." (बृ. पृ. ८५) हे सांगितल्यावर मग, पूर्वरंगात याचा प्रयोग पुष्कळ असल्याने शुद्धषाडव राग प्रथम दिला आहे असे मतंगाने म्हटले आहे. नारदीशिक्षेवरून, गांधार नसल्याने या रागाचे स्वरूप सहा स्वरांनी निष्पन्न होत असल्याचे समजून येते. पण या रागाचा निर्देश नारदीशिक्षेतही प्रथम आहे. नारदीशिक्षेतील षड्जग्राम व मध्यमग्राम हे दोन मतंगाने दिलेल्या चोक्ष रागांत नाहीत. मतंगाने दिलेल्या शुद्धषाडवाच्या वर्णनात, "शुद्ध गांधार अल्प असल्याने अंतर गांधार व काकलीनिषाद यांत प्रयुक्त होतात, म्हणून हा राग संपूर्ण स्वराचा होय" असे म्हटले आहे. कुडुमियामलाई शिलालेखात (खि. उ. ७ वे शतक) कैशिकमध्यम, कैशिक, षाडव, मध्यमग्राम, षड्जग्राम, पंचम व साधारित या सात ग्रामरागांचा स्वरागमासह निर्देश आहे. (Epigraphia Indica, Vol. XII, PP. 226–237) ग्रामातील स्वरांच्या विशेष योजनेमुळे निर्माण होणारे रंजक आविष्कार ग्रामराग म्हणून प्राचीन काळापासून दिसून येतात. त्यांचा निर्देश नाट्यशास्त्रातही पाच संधी व पूर्वरंग यांमध्ये योजण्याच्या संबंधात आहे.. जातिगायनात, जातीच्या अंश इत्यादी दहा लक्षणांनी युक्त असे निष्पन्न होणारे आविष्कार शास्त्रबद्ध रीतीने सांगितल्याने त्यांचे स्वरूप सुनियंत्रित असे झाले. त्यामुळे स्वर-योजनेच्या वैशिष्ट्यांमुळे निर्माण होणाऱ्या विभिन्न आविष्कारांचे वर्णन गीतीवर आधारलेले राग म्हणून मतंगाने केले व प्राचीन ग्रामराग ही संज्ञा या रागप्रकारांना नंतरच्या शास्त्रकारांनी दिली. मतंगाने दिलेल्या देशीसंगीताचे क्षेत्र पुढे विस्तारित होत राहिल्याने ग्रामरागांचा प्रचार कमी होऊन नवनवीन देशी राग प्रचारात मान्यता पावले. पण संप्रदाय कायम ठेवून मग नवीन गोष्टी शास्त्रात द्यायच्या या शास्त्रपरंपरेमुळे, प्राचीन जातिगायन, व ग्रामराग

इत्यादींचा समावेश परंपरेने चालत आलेल्या अशा मार्गसंगीतात शार्ङ्गदेवाने केला आहे. सोमेश्वराने तर फक्त प्रचारातील देशी गायन व वादनच वर्णिलेले आहे. त्याने शुद्धषाडव शुद्धपंचम, शुद्धसाधारित, शुद्धकैशिकमध्यम आणि शुद्धकैशिक हे पाच शुद्ध राग, भिन्नषड्ज, भिन्नता (न), भिन्नकैशिकमध्यम, भिन्नपंचम व भिन्नकैशिक हे पाच भिन्न राग, गौडपंचम, गौडकैशिक मध्यम व गौडकैशिक, हे तीन गौड राग, षाडव, बोट्टराग, मालवपंचम, टक्ककैशिक, सौवीर, मालवकैशिक, हिंदोल, टक्कराग हे आठ राग, नर्तराग, शक, कोह, भम्माणपंचम, रूपसाधारित, गांधारपंचम आणि षड्जकैशिक हे सात साधारण राग अशा रागांचा ते मुनीने सांगितले म्हणून फक्त नामनिर्देश केला आहे. पण मनोविनोदनात त्यांचा उपयोग होत नसल्याने त्यांची लक्षणे न देता मनोविनोदनात ज्यांचा प्रत्यक्ष प्रचार त्यावेळी होता अशाच श्रीराग, सोमराग इत्यादींची लक्षणे सांगितली आहेत. (मानसोल्लास भा. ३ पृ. १३, १४) नान्यदेवाने या रागांचे आलाप व रूपक यांची स्वरयोजनाही सांगितली आहे. त्याने गांधारग्रामिक रागांत शुद्धा गीतीवर आधारलेले तीन, भिन्ना गीतीवर आधारलेले तीन, गौडी गीतीवर आधारलेले दोन, वेसरावर आधारलेले दोन आणि साधारणा गीतीवर आधारलेले दोन राग त्यांचप्रमाणे भाषा, विभाषा, अंतरभाषा व क्रियांग रागही दिले आहेत. (भ. भा. भाग २ पृ. २३६, २३७) लक्षणे वेगळी असूनही काही भाषांची नावे समान आहेत असे शार्ङ्गदेवाने म्हटले आहे. याष्टिकाने सांगितलेले म्हणून भाषांचे पंधरा जनक राग शार्ङ्गदेवाने दिले आहेत. भाषा म्हणजे ग्रामरागांच्या आलापाचे प्रकार होत असे स्पष्टीकरण कल्लिनाथाने मतंगमताला अनुसरून दिले आहे. (सं. र. भा. १ पृ. २४३) मतंगाने भाषांचे जनक म्हणून सहाच ग्रामराग सांगितले आहेत, काश्यपाने बारा सांगितले आहेत, शार्दूलाने चारच सांगितले आहेत असे जे कल्लिनाथाने म्हटले आहे (सं. र. भा. १ पृ. २४१) त्यावरून रागगायनाच्या होत असलेल्या विस्ताराची कल्पना येते.

स्वर–पद–ताल यांच्या समन्वयावर आधारलेले जे प्राचीन संगीत गांधर्व म्हणून प्रचारात होते त्यांत जातिगायन हे मुख्य असून काही मोजक्या ग्रामरागांचाही समावेश होता. हे संगीत अत्यंत नियमबद्ध होते. तरी त्यात अंश स्वरांच्या भिन्नतेने व जातींच्या परस्पर मिश्रणाने विविधता निर्माण होत होती. संगीताच्या विकासामुळे व विस्तारामुळे ग्रामरागांचे भाषा, विभाषा व अंतरभाषा असे उपप्रकार निर्माण झाले. जाति किंवा ग्रामराग व भाषा इत्यादी स्वरयोजनांवर आधारलेल्या गानप्रकारांचा शब्दांच्या बरोबर संबंध गीत-गायनात येतो. नाट्यशास्त्रातील ध्रुवागानांत गीतगायनामधील काही सुयोग्य घटकांचा समावेश असे. परंपरेने जातिगायनाला प्राप्त झालेले पवित्र व नियमबद्ध स्वरूप नंतर मार्ग-संगीत ठरले. इतकेच नव्हे तर जाती या वेदाप्रमाणे अत्यंत पवित्र मानल्या गेल्या. देशो-देशींचे जे गानप्रकार निर्माण होत होते त्यांची मांडणी देशी गान म्हणून मतंगाने राग-कल्पनेत केली. रागकल्पनेचा पुढे विस्तार होतच राहिला. त्यामुळे या ग्रामराग इत्यादींचे स्वरूपही मार्गसंगीतात समाविष्ट झाले. जाती व ग्रामराग इत्यादींचे स्वरूप परंपरेने आलेल्या

शास्त्रानुसार जरी अभिनवगुप्त, नान्यदेव, शार्ङ्गदेव, तसेच कुंभ यांनी वर्णिले असले तरी प्रत्यक्ष प्रचारात मुख्यतः देशीगायनच होते. जनक जातींत तज्ज्ञांना जन्य रागांचे अंश दिसून येतात असे शार्ङ्गदेवाने म्हटले आहे. (सं. र. भा. १ पृ. २२४) त्याने काही ग्रामराग वर्णिताना त्यांच्या जनक जाती दिल्या आहेत; व देशीरागांना कारणीभूत नसणारे ग्रामराग प्रथम सांगून नंतर त्यांना कारणीभूत असणारे ग्रामराग दिले आहेत. यावरून जाति–ग्रामराग–देशीराग असा हा उत्पत्तिविषयक क्रम दिसून येतो. जातींमधून ग्रामराग व ग्रामरागांमधून देशीराग उत्पन्न झाले असे म्हणण्याचे कारण जातींत ग्रामरागांचे व ग्रामरागांत देशीरागांचे दिसून येणारे स्वरूप हे होय.

रागांग, भाषांग, क्रियांग व उपांग हे चार प्रकारचे राग देशी राग होत. त्यांतील चौतीस शार्ङ्गदेवाने पूर्वी प्रसिद्ध असलेले व बावन्न त्याच्या वेळी प्रसिद्ध असलेले म्हणून दिले आहेत.

ग्रामरागांची छाया असल्याने रागांग, भाषारागांच्या छायेवर आधारलेले भाषांग, करुणा, उत्साह, शोक इत्यादींपासून उत्पन्न होणाऱ्या क्रिया (म्हणजे मानसिक व्यापार) ज्यांपासून निर्माण होतात ते क्रियांग असे मतंगाचे म्हणून स्पष्टीकरण कल्लिनाथाने दिले आहे. (सं. र. भा. १ पृ. २४७, २४८), मतंगाने उपांगांचा समावेश रागांगातच केलेला आहे. शार्ङ्गदेवाने उपांग हा एक वेगळा प्रकार म्हणून सांगितला आहे. रागांग हे जसे ग्रामरागांच्या छायेचे अनुकरण या स्वरूपाचे तसेच उपांग हे रागांगाच्या छायेचे अनुकरण या स्वरूपाचे होत. मार्गगायनात नियमांचे जसे काटेकोरपणाने पालन अपेक्षित असते तसे ते देशीगायनात नसते. त्या नियमांत शिथिलपणा आणून नवीन नवीन रंजक आविष्कार निर्माण करणे हेच देशी रागगायनाचे वैशिष्ट्य होय.

स्वर व राग यांचे रंग, देवता इत्यादी त्यांचे ध्यान करण्यासाठी शास्त्रात दिले आहेत. रागांच्या गाण्याचा काळ, रस इत्यादींही मतंग, नान्यदेव व शार्ङ्गदेव इत्यादी शास्त्रकारांनी दिले आहेत. कुंभाने रागांचे मूर्तिस्वरूपही सांगितले आहे. रागगायनात प्रथम त्या त्या रागातील ग्रह, अंश, मंद्रस्वर, तारस्वर, न्यास, अपन्यास, अल्पत्व, बहुत्व व यथासंभव षाडव आणि औडुवित यांचा आविष्कार करणारी अशी स्वरयोजना दिलेली असते. जेव्हा गीताचे भाग वेगवेगळे असे गायिले जाऊन गीतयोजना केलेली असते तेव्हा त्यास रूपक म्हणतात. आक्षिप्तिकेत स्वर, शब्द व ताल यांनी रचलेले गीत दिलेले असते. याचे स्वरूप सध्याच्या बंदिशीसारखे किंवा चिजेसारखे म्हणता येईल. रागगायनात गमकप्रधान स्वर योजण्याने रागांचे वैचित्र्य वाढत गेले. नान्यदेव व सोमेश्वर यांनी गमकांचे सात प्रकार दिले आहेत. शार्ङ्गदेवाने पंधरा गमक प्रकार वर्णिले आहेत. रागाचा अवयव म्हणजे स्थाय होय. गमकाला दुसरा शब्द वाग हा होता. न्यास, अपन्यास, संन्यास व विन्यास यांपैकी कोणत्या तरी एका स्वरावर थांबून योजिली जाणारी जी अंश इत्यादी स्वरांची रचना ती स्थाय म्हटली आहे. असे ९६ स्थाय

शार्ङ्गदेवाने दिलेले आहेत. रागगायनातील ही स्थायकल्पना फारच महत्त्वाची आहे. यामुळे रागगायनाच्या पद्धतीचा केवढा सूक्ष्म अभ्यास मध्ययुगीन संगीतशास्त्रात झाला होता हे ध्यानात येते. शार्ङ्गदेवाच्या काळातील पार्श्वदेवानेही स्थाय सांगितले आहेत. त्यांतील सादाचे ठाय, चित्ताचे ठाय, गुन्थागुन्थी, मोडामोडी, निस्सरड इत्यादी मराठी नावांवरून त्यांच्या देशी स्वरूपाचे ज्ञान आपणांस चटकन होते. रागाचे आलाप घेताना थांबायची जागा म्हणजे स्वस्थान होय. अशी चार स्वस्थाने योजून रागाची आलप्ति निष्पन्न होते. स्थायी म्हणजे ज्यावर राग स्थापित होतो त्या स्वरापासून आरंभ करून चवथ्या स्वराखालचे स्वर गमकयुक्त योजून स्थायीवर न्यास केल्याने पहिले स्वस्थान होते. यात स्थायीच्या खालचेही स्वर घेतले जातात. यात स्थायीच्या वरचा चवथा स्वरही योजल्यास ते दुसरे स्वस्थान होय. स्थायीपासून आठव्या स्वराखालचे स्वर वरीलप्रमाणे योजून न्यास केल्यावर ते तिसरे स्वस्थान होय व स्थायीपासून वरच्या आठव्या स्वराचीही योजना केल्यास ते चवथे स्वस्थान होय. याप्रमाणे रागाचा आलाप योजून जीवस्वराची म्हणजे अंश स्वराची अनेकवार योजना मुख्यपणे असणाऱ्या विविध प्रकारच्या स्थायांनी रागाची स्थापना केली जाते. कल्लिनाथाने आलाप व आलप्ति यांतील फरक स्पष्ट करताना जे सूक्ष्म विवेचन केले आहे त्यावरून, रागगायनात प्रसंगी भिन्न स्वरयोजनेने रागस्वरूप थोडे झाकून ठेवून पुन्हा मूळचा राग कौशल्याने अभिव्यक्त करणे अशा मनोज्ञ रंजकपणाचे स्वरूपही त्या वेळी होते हे समजते. स्वर, बिरुद, पद, तेनक, पाट व ताल या सहा अंगांचा उपयोग करून प्रबंधगायन होत असे. बिरुद म्हणजे स्तुतिवाचक शब्द होय. तेन हा मंगल अर्थ प्रकट करणारा शब्द होय. वाद्याक्षरांचा समुदाय म्हणजे पाट होय. यांतील दोन ते सहा अंगे असणाऱ्या अशा प्रबंधांच्या पाच जाती होत्या. अनिर्युक्त प्रबंधात छंद, ताल इत्यादींच्या बाबतीत नियम नसतो; निर्युक्त प्रबंधात तो असतो. आठ वृत्ते, आठ ताल व आठ राग आणि त्याच्या दुप्पट व चौपट वृत्ते, ताल व राग यांची योजना असणारा रागकदंब प्रबंध सुदीर्घ प्रबंधगायनाचे स्वरूप दर्शवितो. तसेच पुष्कळ तालांची योजना असणारा तालार्णव सारखा प्रबंधही शार्ङ्गदेवाच्या वेळी प्रचारात होता. यात महाराष्ट्रात प्रसिद्ध असणाऱ्या धवल व ओवी या प्रबंधांचाही समावेश आहे. शार्ङ्गदेवाने वर्णिलेल्या ध्रुव या प्रबंधावरून, ध्रुपद हा ख्यालापूर्वीचा गंभीर प्रवृत्तीचा शास्त्रीय गानप्रकार राजा मानसिंग याने प्रसिद्धीला आणला असे आधुनिक संगीत शास्त्रज्ञ मानतात. ऐतिहासिक दृष्टीने विचार करता, जाती व ग्रामराग यांतून राग निर्माण होऊन, रागपद्धतीचे अनेकविध विकसित व विस्तारित स्वरूप कश्यप, मतंग, नान्यदेव, सोमेश्वर, शार्ङ्गदेव, पार्श्वदेव व कुंभ इत्यादींनी मांडले व नंतर पूर्वीच्या प्रबंधपद्धतीतून ध्रुपदगायन व शेवटी आज विशेष प्रचार पावलेली उत्तरीय शास्त्रीय संगीतातील ख्यालगायनपद्धति व दाक्षिणात्य कर्नाटक गायनपद्धति निर्माण झाली असे हे थोडक्यात भारतीय-गायन-परंपरेचे स्वरूप सांगता येईल.

(८) गायनातील गुण व दोष

सामगान व गांधर्वप्रणीत जातिगायन यांचे शास्त्र तयार होत असता गायनातील गुण-दोषांची चर्चा सुरू होणे अपरिहार्यच आहे. नारदीशिक्षेत गानाचे दहा गुण सांगितले आहेत– (ना. शि. १. ३. १ ते १३).

(१) रक्त– वेणु (म्हणजे वंश), वीणा व कंठ यांमधून निघणाऱ्या स्वराचा एकीभाव.

(२) पूर्ण– स्वर व श्रुती यांचा पूर्णपणा व त्यांच्याशी छंदाचे चरण व अक्षरे यांचा संयोग म्हणजे त्यांचे स्पष्टपणे उच्चारण असणारे.

(३) अलंकृत– कंठगत स्वराचे मंद्र व तार स्वरूप योजणे याने युक्त.

(४) प्रसन्न– गळा पिळवटून उच्चारण करण्यामुळे निष्पन्न होणारे गद्गदित स्वरूप नसणारे.

(५) व्यक्त– शब्द व त्यांचे अर्थ, मूळ शब्द व त्यामधील बदल, वर्णलोप, तद्धित, धातु, निपात, उपसर्ग, उदात्त इत्यादी स्वर, पुंलिंग इत्यादी लिंगे, सामान्यपणे होणारे अर्थांचे ज्ञान व ऊहापोह करून प्राप्त होणारे निश्चयात्मक अर्थज्ञान, कर्ता, कर्म, इत्यादी कारकांचे निश्चित स्वरूप, विभक्तींचे अर्थ आणि वचन या सर्वांचे संपूर्ण ज्ञान असल्यामुळे गाण्यातील अर्थज्ञान स्पष्टपणे होणारे.

(६) विकृष्ट– उच्चपणे उच्चारूनही शब्दातील अक्षरांचा स्पष्टपणा असणारे.

(७) श्लक्ष्ण– अद्भुत म्हणजे घाई नसणारे, विलंबित नसलेले, उच्च, नीच व प्लुत यांचा समाहार असणारे म्हणजे फार उच्च, फार नीच किंवा प्लुत नसल्याने सहजपणा असणारे असे स्वरूप असणारे.

(८) सम– स्वर भरणे व कमी करणे यांच्या जागा क्रमवार योजण्याने युक्त.

(९) सुकुमार– कोमल शब्द, वर्ण व स्वर यांनी युक्त तसेच कुहरणाने म्हणजे अस्पष्ट वर्णांच्या गळा पिळवटून केलेल्या उच्चारणाने युक्त असणारे.

(१०) मधुर– नैसर्गिकपणे मुखातून निघणाऱ्या ललित अशा शब्द व अक्षरे यांच्या गुणांनी सुखदायक असणारे.

नारदीशिक्षेतील गानाचे सांगितलेले दोष असे–

(१) शंकित (खात्री नसणे); (२) भीत (घाबरटपणा असणे); (३) उद्घृष्ट (क्षुब्धपणा असणे); (४) अव्यक्त (म्हणजे अस्पष्ट); (५) अनुनासिक (नाकातून गाणे); (६) काकस्वर (कावळ्यासारखा कर्कश व रूक्ष आवाज असणे), (७) शिरसिगत (म्हणजे फार उंच स्वरातले अपरिपूर्ण गायन), (८) स्थानविवर्जित (एका स्थानातले गायन अनेक स्थानांत योजणे); (९) विस्वर (बेसूर); (१०) विरस (म्हणजे गाताना मध्येच लक्ष दुसरीकडे गेल्याने निष्पन्न होणारे नीरस गान); (११) विश्लिष्ट (पर्वांच्या म्हणजे सामगानातील भक्तींमधील विभागांच्या बाबतीत नसलेले व्यवधान योजणे); (१२) विषमाहत (म्हणजे प्लुताचे जलद व ह्रस्वदीर्घाचे विलंबाने योजन); (१३) व्याकुल (वर्ण व स्वर

यांच्या वैषम्यामुळे निर्माण होणारे गान); (१४) तालहीन (द्रुत, मध्य इत्यादी वृत्तींच्या बाबतीत नियम सोडून होणारे गान).

नाट्यशास्त्रात चांगले गान कोणते ते सांगताना, पूर्णस्वर, सुंदर वर्ण असलेले, तिन्ही स्थानांत शोभिवंत, तीन लयी व तीन मार्ग यांत योजलेले, रक्त, सम, श्लक्ष्ण, अलंकृत व मधुर हे गुण सांगितले आहेत. 'पूर्णस्वर' यातील 'पूर्ण' याचे स्पष्टीकरण अभिनवगुप्तांनी 'स्पष्टपणे असणारा स्थायी इत्यादि वर्ण' असे दिले आहे. तसेच सम म्हणजे ताल-लययुक्त, श्लक्ष्ण म्हणजे अस्फुटित व रक्त म्हणजे नाट्योपरंजक असेही स्पष्ट केले आहे. [ना० शा० (बडोदा) भा० ४ पृ. ३९१–३९२] यानंतर नाटयशास्त्रात गायक व गायिका यांचे गुण सांगितले असून कंठाचे म्हणजे आवाजाचे सहा गुण सांगितले आहेत ते असे – श्रावक किंवा श्रावण म्हणजे सुस्वर असा दुरूनही ऐकू येणारा, घन म्हणजे अखंडित (भरदार), स्निग्ध म्हणजे रूक्ष नसलेला, मधुर म्हणजे मनाला आल्हाद देणारा, अवधानवान म्हणजे चढा स्वर किंवा कमी स्वर लागला असताही मनाच्या एकाग्रतेमुळे रंजकता टिकविणारा आणि स्थिरस्थानशोभी म्हणजे तिन्ही स्थानांत गोड असणारा. तसेच आवाजाचे पाच दोषही दिले आहेत. ते असे–कपिल म्हणजे गळ्यात कफ दाटल्याने (खर येऊन) घरघर उत्पन्न होण्यामुळे बेसूर असणारा, अव्यवस्थित म्हणजे स्वरांचे चढे किंवा कमी स्वरूप असून रूक्षता असणारा, सन्दष्ट म्हणजे दात चावून निर्माण होणारा, काकी म्हणजे उच्चारलेल्या स्वराचा त्या स्थानात विस्तार न पावणारा व रूक्ष आणि तुम्बकी म्हणजे नाकाच्या शेंड्याने ग्रासलेला (अर्थात नाकांतून निघणारा) [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ४००, ४०१] सोमेश्वराने युक्त, मधुर, स्निग्ध, घन, श्रावक व स्थानकशोभन असे आवाजाचे गुण सांगितले आहेत. युक्त याचे लक्षण 'वेणु व वीणा यांच्या स्वरांशी एकरूप असणारा' असे दिले आहे. नारदीशिक्षेत रक्त याचेही हेच लक्षण आहे. स्थानकशोभन याचे लक्षण 'उच्च स्थानांतही सुश्राव्य असल्याने शोभिवंत' असे दिले आहे व हा आवाजातील उत्तम म्हटला आहे.

शार्ङ्गदेवाने आवाजाचे मृष्ट इत्यादी पंधरा गुण दिले असून रूक्ष इत्यादी आठ दोष दिले आहेत. (सं. र. भा. १ पृ. ३६५ ते ३६७). गायक व गायिका यांचे गुणदोषही अत्यंत बारकाव्याने सांगितले गेले आहेत. नाट्यशास्त्रात म्हटले आहे की "गायक हा तरुण, सुरेल गळ्याचा व तालाच्या सर्व अंगांत निपुण असावा; तसेच गायिका ही श्यामा म्हणजे तरुण, सुंदर, गुणवान, सतेज, गोड मनाची, गळ्याचे सर्व गुण असणारी, योग्य प्रकारे गमके योजू शकणारी, क्षुब्ध न होणारी, ताल व लय यांत कुशल आणि वाद्यांचा अभ्यास असलेली अशी असावी. स्त्रियांचा कंठ स्वभावतः मधुर असल्याने प्रायः नाटकातील गायन स्त्रियांनी व पाठ्य पुरुषांनी योजावे. पुरुषांच्या बाबतीत गानमाधुर्य व स्त्रियांच्या बाबतीत पाठ्यगुण हा अलंकारासारखा होय (म्हणजे स्वाभाविक नव्हे.)" [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ३९८, ३९९] यावरून नाट्यात तरी गायनाचे काम प्रामुख्याने गायिकांच्याकडे

म. रा. ... ग्रंथालय
मंत्रालय

होते असे समजून येते म्हणून गायकवादक-वृंदाची रचना सांगताना गायक एक व गायिका अनेक (म्हणजे कमीत कमी तीन) सांगितल्या आहेत.

काव्याची रचना व त्याची गेय गुंफण उत्कृष्टपणे करणारा हा श्रेष्ठ वाग्गेयकार म्हणून सोमेश्वर व शार्ङ्गदेव यांनी सांगितले आहे. उत्तमोत्तम वाग्गेयकार हा शब्दशास्त्र, काव्यशास्त्र, संगीतशास्त्र, लोकव्यवहार, प्रबंधाची उत्कृष्ट रचना करणे, देशभाषा व ताल यांत निपुण असून निर्भय, प्रतिभावान व शीघ्र गीतरचना करून त्याप्रमाणे गाणारा, अशा प्रकारे विचक्षण बुद्धिमत्तेचा असतो. नाकातून गाणारा, श्रुतिहीन स्वर घेत तिन्ही स्थानांत गाणारा, राग गातांना त्यातील वर्ज्य स्वर घेणारा, आरंभलेला राग बुद्धिकौशल्याने पुन्हा स्थापू न शकणारा, चंबूसारखे तोंड करून गाणारा, गाताना ताणल्याने मानेवर व गालांवर शिरांचे जाळे दिसून येत आहे असा, दात चावून गाणारा, मान अत्यंत तिरपी करून गाणारा, डोळे मिटून गाणारा, गुडघे टेकून जमिनीवर बसून उंटाप्रमाणे लांब मान करून गाणारा व कापऱ्या आवाजाचा इत्यादी अनेक दोष गायकांच्या बाबतींत सोमेश्वराने सांगितले आहेत (मानसोल्लास भा. ३ पृ. ६, ७) तसेच गायकांचे रंजक, रसिक, शिक्षाकार, भावक इत्यादी प्रकार वर्णिले आहेत. श्रोत्यांची आवड जाणून त्यानुसार गाऊन त्यांना खूष करणारा हा रंजक गायक होय. आपला स्वतःचा स्निग्धमधुर स्वर ऐकून सर्वांग पुलकित होणारा रसिक गायक होय. वाग्गेयकाराची रचना काही न गाळता झटकन शिकून ती न विसरता गाणारा शिक्षाकार होय. रसयुक्त गाणारा भावक होय. दुसऱ्या गायकाच्या गाण्याची उत्कृष्ट नक्कल करणारा कूटकार होय. विविध आलप्ति योजण्यात कुशल, ग्रह व मोक्ष (म्हणजे आरंभ व शेवट) यांत निष्णात, तिन्ही स्थानांत गावू शकणारा, न दमणारा, गळा स्वाधीन असलेला, अंश स्वर योजण्यात कुशल, निर्भय, वक्र किंवा सरळ प्रकारच्या गायनात व प्रबंधातील सर्व रीतींत जाणकार असा गायक हा प्रौढगायक होय.

शार्ङ्गदेवानेही गायकांचे दोष अधिक विस्ताराने दिले असून गायकांचे वर सांगितलेले रंजक इत्यादी प्रकारही वर्णिले आहेत. शिक्षाकाराच्या बाबतीत त्याने संपूर्ण शिक्षण देण्यात तत्पर असणारा हे लक्षण दिले आहे. तसेच गीताचा प्रभाव अत्यंत निर्माण करणारा भावक म्हटला आहे. गायकाप्रमाणेच गायिकेचेही गुणदोष जाणावेत असे शार्ङ्गदेव सांगतो. याशिवाय एकट्या गायकाचे गायन, जोडीने दोघांचे मिळून गायन व वृंदगायन यांचाही उल्लेख शार्ङ्गदेवाने केला आहे. (सं. र. भा. १ पृ. ३५८ ते ३६०)

गायक व गायन यांचे गुण-दोष प्रकरण अभ्यासताना प्राचीन काळापासून संगीतशास्त्रकारांची जाण कशी सूक्ष्म होती व ती अधिकाधिक सूक्ष्म कशी होत गेली याचा प्रत्यय आल्यावाचून रहात नाही.

गायनाच्या बाबतीत मध्ययुगातील शास्त्रकारांची आणखी एक संकल्पना 'शारीर' ही आहे. याचे लक्षण शार्ङ्गदेवाने पुढीलप्रमाणे दिले आहे– "पुन्हा पुन्हा प्रयत्न न करताही राग अभिव्यक्त करण्याचे आवाजाचे जे सामर्थ्य त्यास शारीर म्हटले आहे, कारण ते शरीराबरोबरच उत्पन्न होते." शारीराची व्याख्या जवळ जवळ यासारखीच सोमेश्वर,

पार्श्वदेव, दामोदर इत्यादींनी दिली आहे. (मानसोल्लास भा. ३ पृ. ६ श्लोक ५१; सं. स. सार, पृ. २ श्लो. १६; सं. दर्पण, पृ. ५५ श्लो. ३१७, ३१८). सोमेश्वराने पुढे थोडे अलंकारिकपणाने म्हटले आहे– " जसा चाफ्यांच्या फुलांत सुगंध, टपोऱ्या मोत्यांत जशी झळाळी, उसांत जशी गोडी तशीच शारीरात स्निग्धता असते." शारीर म्हणजे गळ्याची गायनविषयक जन्मजात शक्ति अर्थात प्रतिभा होय. कल्लिनाथाने यावर भाष्य करताना असे म्हटले आहे की हे सामर्थ्य म्हणजे राग प्रकट करण्याला कारणीभूत होणारा बीज-रूपाचा संस्कारविशेष होय. हे सामर्थ्य असेल तर रागाचा आविष्कार करता येईल. हे जन्मजात सामर्थ्य असून जर पुन्हा पुन्हा प्रयत्न केला तर रागाचा आविष्कार उत्कृष्टपणे होतो. पण हे सामर्थ्य नसेल तर केवळ प्रयत्नाने तो उत्पन्न करता येत नाही. विद्यादान, तप किंवा शंकराच्या भक्तीमुळे थोर नशिबाने चांगले शारीर प्राप्त होते असेही शार्ङ्गदेवाने म्हटले आहे. " दुसऱ्या जन्मात केलेल्या प्रयत्नामुळे, ज्ञानसाधनेने, शंकराच्या पूजनाने निर्माण होणाऱ्या पुण्याच्या योगाने शारीर प्राप्त होते केवळ प्रयत्नाने प्राप्त होत नाही," असे सोमेश्वराने सांगितले आहे. (मानसोल्लास भा. ३ पृ. ६४ श्लो. ५३)

ज्याप्रमाणे आवाजाची जात शरीराबरोबरच उत्पन्न होते त्याप्रमाणे रागाचा आविष्कार करण्याचे त्या आवाजाचे सामर्थ्यही जन्मजात असते. यावरून खरा गायकही इतर कलावंता-प्रमाणेच जन्मावा लागतो. काव्याच्या बाबतीतही काव्य करण्याची ही शक्ति अर्थात प्रतिभा कवीच्या अंगी जन्मजात असते. प्रतिभाहीन व्यक्तीने केलेली काव्यरचना हास्यास्पद होते. ही प्रतिभा म्हणजे पूर्वजन्मीच्या कर्माचा परिणाम असणारी विशिष्ट अशा वासनास्वरूपाची शक्ति होय. अर्थात प्रयत्नांमुळे कलाकृतीची गुणवत्ता अधिक वाढते. काही थोड्या संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी प्रतिभा ही नैसर्गिक व प्राप्त करून घेतलेली अशा दोन प्रकारची मानली आहे. दंडी हा साहित्यशास्त्रज्ञ म्हणतो की, जरी जन्मजात प्रतिभा नसली तरी शिक्षण व प्रयत्न यांनी सरस्वतीदेवीची मनःपूर्वक भक्ति केली तर ती प्रसन्न होते (काव्या-दर्श–१. १०४-१०५). कवित्वशक्ति थोडी असणारा कवीही, योग्य प्रकारे भरपूर प्रयत्न केले असता, कविगोष्ठींत भाग घेऊ शकतो. हीच गोष्ट गायनकलेच्या बाबतीतही लागू करता येईल. परमेश्वराच्या भक्तीने ही दैवी गायनशक्ति प्राप्त करून घेणे हा मार्ग म्हणजे ती केवळ मानवी प्रयत्नाने प्राप्त होत नाही हे सांगण्याचाच दुसरा पर्याय आहे. खूप रियाज केल्याने आवाजाचे नैसर्गिक गुणधर्म अधिक प्रभावीपणाने प्रकट होतात व कल्पनाशक्ति अधिकाधिक विकसित होऊन गायकाची कला असामान्य कोटीला पोचू शकते. राग-गायनाच्या शास्त्रीयस्वरूपाच्या बाबतीतही चांगले शारीर अनिवार्य मानले आहे. शारीरगुण अल्प असल्यास रियाजाने दुय्यम प्रतीचा गायक होणे शक्य आहे. गवयाला आपली कला उत्कृष्टपणे प्रकट करण्यासाठी जी चित्ताची एकाग्रता व असामान्य कल्पकता लागते ती प्रतिभा असल्याशिवाय शक्यच नाही हाच निष्कर्ष शार्ङ्गदेव व इतर मध्ययुगीन संगीत-शास्त्रकारांनी सांगितलेल्या ' शारीर ' या धारणेवरून निघतो. शारीराचे गुण तसेच दोषही सांगितले आहेत. अर्थात मुळात गायनशक्ति नसल्यास हे दोष असणारच.

(९) ताल– मार्गताल व देशी ताल

मार्ग ताल

शार्ङ्गदेवाने गायनाप्रमाणेच तालाच्याही बाबतीत मार्गस्वरूप प्रथम सांगून मग देशी-स्वरूप प्रतिपादिले आहे. गायन, वादन व नर्तन या तिन्हींना आधारभूत असणारा असा ताल लघु इत्यादी कालाच्या प्रमाणाने मोजला जातो. तल् म्हणजे स्थिरपणे स्थापित करणे या धातूपासून, गीत इत्यादींची स्थिरपणे स्थापना करणारा या अर्थी, ताल हा शब्द निष्पन्न होतो. तल म्हणजे हाताचा तळवा असा अर्थही असल्याने हातांनी टाळी वाजवून ताल धरण्याची पद्धतही प्राचीन काळात होतीच. हातांनी ताल धरण्याचा प्रकार प्राचीन वाङ्मय व शिल्प यांवरून दिसून येतो. ताल हा टाळांच्या आघातांनी दाखवण्याचे मुख्य काम टाळ धरणाऱ्यांचे होते. शिवाय हाताच्या क्रियेनेही गायक ताल धरत असे. टाळी वाजवून ताल धरण्यातही, टाळांनी ताल धरण्यातला जो ताल ठळकपणे ऐकू येण्याचा गुण आहे तो तितकासा स्पष्ट नसतो.

तालाच्या बाबतीत मात्रा हे कालाचे प्रमाण पाच निमेषांचे म्हणजे पाच ऱ्हस्व अक्षरे उच्चारण्याच्या प्रमाणाचे असते. तालाच्या प्रहारानंतर जो थांबण्याचा काल तोच लीन होणे या लय शब्दाच्या अर्थानुसार लय होय. लयीशिवाय कलेचे स्वरूप प्राप्त होत नाही. द्रुत, मध्य व विलंबित हे लयीचे तीन प्रकार होत. सामगानाच्या संदर्भात, अभ्यासासाठी द्रुता वृत्ति, प्रयोगात मध्यमा वृत्ति व शिष्यांना शिकविण्यात विलंबिता वृत्ति योजण्याचा नियम नारदीशिक्षेत दिला आहे. (ना. शि. १.६.२१). येथे वृत्ति या शब्दाने लय या शब्दाचा आशय सांगितला आहे. सामगानात प्रत्यक्ष ताल धरलेला नसला तरी स्वरोच्चारात कालाचे प्रमाण 'मात्रा' या परिमाणाने अंतर्भूत होतेच. अर्ध्या मात्रेपासून साडेतीन मात्रांच्या उच्चाराचा काल गानात योजीत असत. ऋग्वेदात ऋचांच्या पठनात छंदांची लय होतीच. प्रथम हातांच्या विक्षेपांनी, मग हाताने टाळी देऊन आणि नंतर टाळांसारखी वाद्ये निर्माण झाल्यावर त्यांनी हे मात्रांचे कालपरिमाण संगीतात दाखवले जात असे. मार्गतालांचे स्वरूप माहीत होण्यासाठी, शार्ङ्गदेवपूर्व आचार्यांचे म्हणणे समजण्याच्या दृष्टीने नाट्यशास्त्र, दत्तिल व अभिनवभारती यांचाच मुख्यतः उपयोग होतो.

कला हे कालप्रमाण एक मात्रेचे, दोन मात्रांचे, चार मात्रांचे व आठ मात्रांचे असे चार प्रकारचे असे. या चार प्रकारांना मार्ग हे नाव होते. एक मात्रेची कला ध्रुवमार्गात, दोन मात्रांची कला चित्रमार्गात, चार मात्रांची वृत्तिमार्गात व आठ मात्रांची दक्षिणमार्गात असे. तालाचे त्र्यश्र व चतुरश्र असे दोन मुख्य प्रकार होते व त्यांची नावे क्रमाने चाचपुट व चच्चत्पुट अशी होती. चाचपुट हा ताल सहा मात्रांचा व चच्चत्पुट आठ मात्रांचा होता. यातील मात्रा गुरु म्हणजे दोन लघू या प्रमाणाची होय. नावातील अक्षरानुरूप ताल योजला असता तो यथाक्षर होय. त्यामुळे नावातील अक्षरांचे स्वरूप लघु, गुरु, प्लुत यानुसार दिले आहे. 'चाचपुटः' यातले पहिले अक्षर गुरु, नंतरची दोन

लघू व शेवटचे (सविसर्ग ऱ्हस्व असल्याने) गुरु यामुळे यात सहा मात्रा होतात. 'चच्चत्पुटः' यातले (पुढच्या संयुक्त अक्षरामुळे) पहिले अक्षर गुरु, (तिसऱ्या संयुक्त अक्षरामुळे) दुसरे गुरु, तिसरे लघु व शेवटचे (सविसर्ग ऱ्हस्व अक्षर) प्लुत (म्हणजे त्रिमात्रिक) यामुळे यात आठ मात्रा होतात. टाळांचे आघात योजताना या प्रमाणांचे योजून हे ताल दाखवीत असत. गायक हे ताल हाताच्या क्रियेनेही दाखवीत असत. क्रिया निःशब्द व सशब्द अशी दोन प्रकारची होती. निःशब्द क्रियेचे पुन्हा आवाप, निष्क्राम, विक्षेप व प्रवेश हे चार प्रकार असून सशब्द क्रियेचे शम्या, ताल, ध्रुव आणि संनिपात हे चार प्रकार होते. उताण्या उजव्या हाताची बोटे मिटविणे म्हणजे आवाप, तोच हात खाली (पालथा) करून बोटे पसरणे म्हणजे निष्क्राम, तो उजवा हात उताणा व बोटे पसरलेला असा उजव्या बाजूला फेकणे म्हणजे विक्षेप व तोच पालथा योजून बोटे मिटवून मागे घेणे म्हणजे प्रवेश होय. सशब्द क्रियेतील शम्येत उजव्या हाताने टाळी वाजविली जाई; तालात डाव्या हाताने, संनिपातात दोन्ही हातांनी मिळून व ध्रुवात चुटकी वाजवून हात खाली नेला जाई. सशब्द क्रिया ही पात व कला या दोन्ही शब्दांनी सांगितली जाते पण निःशब्द क्रिया फक्त कला या शब्दानेच सांगितली जाते असा फरक शार्ङ्गदेवाने सांगितला आहे. एकच गुरु स्वरूपाची कला जेव्हा विस्तृत होऊन चार कलांच्या प्रमाणाची होते तेव्हा आवाप इत्यादी चारींची योजना करायची असे व जेव्हा दोन कलांच्या प्रमाणाची होते तेव्हा निष्क्राम व प्रवेश किंवा आवाप व निष्क्राम यांची योजना करायची असे. यांच्यामध्ये शम्या, ताल व संनिपात हे पात योजायचे असत. ध्रुव-पात हा एका कलेच्या बाबतीत सांगितला आहे. चुटकी वाजवून हात खाली घेऊन तो डाव्या उजव्या बाजूला घेणे यास ध्रुवपात म्हटले आहे. यथाक्षर तालाच्या बाबतीत तो गुरु अक्षराच्या प्रमाणाचा मानला आहे. ध्रुवपात भरताने शेवटी सांगायचे कारण अभिनवगुप्तांनी असे दिले आहे की यथाक्षर, द्विकल व चतुष्कल यांच्या बाबतीतील निष्क्राम व आवाप इत्यादींच्या मध्ये तो योजायचा नसतो तर त्या पेक्षा वेगळा योजायचा असतो. यावरून उपोहनध्रुवागति हा या ध्रुवपाताचा विषय आहे हे सूचित होते. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. १७२] या संबंधात अभिनवगुप्तांनी दिलेले दत्तिलातील उद्धरण असे--

" हिचे[५९] उपोहनस्वरूप असल्याने ते तालविवर्जित म्हटले आहे." प्रकाशित दत्ति-लम्[६०] या ग्रंथात " अर्थरहित असे उपोहन त्यात (म्हणजे प्रकरीत) प्रथम सांगितले आहे." असे वचन मिळते. दत्तिलाने हस्तक्रिया सात प्रकारची सांगितली आहे. तिच्यात ध्रुवाचा निर्देश नाही. याचे कारण संभवतः ध्रुवाचा उपयोग विशिष्ट व मर्यादित आणि बाकींच्याचा सर्वत्र असतो हे असावे.

ऋचा, गाथा, साम, पाणिका, आसारित, वर्धमान व छंदक या सप्तरूप गीतांत व मद्रक, अपरान्तक, उल्लोप्यक, प्रकरी, ओवेणक, रोविन्द आणि उत्तर या सात गीतकांत या

---

५९. उपोहनत्वाद्वैतस्याः स्मृतं तालविवर्जितम् । ना. शा. भा. ४ पृ. १७२.

६०. उपोहनं च तत्राद्यं स्मृतं चार्थविवर्जितम् । दत्तिलम् श्लो. १९९.

मार्गतालांचा उपयोग असे. लघु, गुरु इत्यादींनी मुख्य तालांचे स्वरूप पुढीलप्रमाणे होय– । हे लघूचे चिन्ह, ऽ हे गुरूचे चिन्ह व ऽ̀ हे प्लुताचे चिन्ह आहे–

यथाक्षर चच्चत्पुट– ऽऽ । ऽ̀ = ८ मात्रा.

,, चाचपुट– ऽ । । ऽ = ६ मात्रा.

यात पादभागांत दोन दोन गुरू योजल्याने द्विकल स्वरूप होते–

उदा. ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ हे चच्चत्पुटाचे द्विकल स्वरूप.

व पादभागात चार चार गुरू योजल्याने चतुष्कल स्वरूप होते.

उदा. ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ हे चच्चत्पुटाचे चतुष्कल स्वरूप.

षट्पितापुत्रक हा ताल बारा मात्रांचा होता.

त्याचे यथाक्षर स्वरूप असे– ऽ̀ । ऽऽ । ऽ̀ = १२ मात्रा.

यालाच पंचपाणि किंवा उत्तर असेही नाव होते. संपक्केष्टाक या यथाक्षर तालाचे स्वरूपही बारा मात्रांचे होते– ते असे– ऽ̀ ऽ ऽ ऽ ऽ̀ = १२ मात्रा

उद्घट्टाचे यथाक्षर स्वरूप सहा मात्रांचे होते. ते असे– ऽ ऽ ऽ

या शिवाय मिश्रतालही प्रचारात होते. हस्तक्रियेतील प्रकारांच्या आद्याक्षरांनी यांचे स्वरूप क्रमाने असे–

(१) चच्चत्पुट– ऽ ऽ । ऽ̀ (सं श ता श) आसारित इत्यादींत शम्येपासून सुरवात होई;
किंवा श ता श ता व पाणिका इत्यादींत तालापासून सुरवात होई.
अथवा ता श ता श

(२) चाचपुट– ऽ । । ऽ (श ता श ता)
किंवा ता श ता श

(३) षट्पिता पुत्रक– ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀ (सं ता श ता श ता)

(४) संपक्केष्टाक– ऽ̀ ऽ ऽ ऽ ऽ̀ (ता श ता श ता)

(५) उद्घट्ट– ऽ ऽ ऽ (नि श श)

यांच्या द्विकल व चतुष्कल प्रकारांची योजना अशीच सुनिश्चित होती. तालांची आवृत्ति म्हणजे परिवर्त होय. या प्राचीन गीतांतील त्यांचे विशिष्ट भागही तालयोजनेच्या नियमांनी बद्ध असत. लयीच्या तिन्ही प्रकारांची योजना भिन्न भिन्न तऱ्हेने केल्याने नियंत्रित होणारे स्वरूप म्हणजे यति हे होय. यती समा, स्रोतोगता व गोपुच्छा अशा तीन होत्या.

आरंभी, मध्ये व शेवटी तीच एकलय असता समा यति होय. प्रवाहाप्रमाणे असल्याने स्रोतोगता यति होय. तिचे प्रकार असे–

	आरंभी	मध्ये	शेवटी
(१)	विलंबित	मध्य	द्रुत लय;
(२)	विलंबित	मध्य	मध्य लय;
(३)	मध्य	द्रुत	द्रुत लय.

गोपुच्छा ही गाईच्या शेपटाप्रमाणे शेवटी विस्तृत असणारी होय. तिचे प्रकार असे–

	आरंभी	मध्ये	शेवटी
(१)	द्रुत	मध्य	विलंबित लय;
(२)	द्रुत	मध्य	मध्य लय;
(३)	मध्य	मध्य	विलंबित लय.

तालाच्या बाबतीत ग्रह म्हणजे आरंभ तीन प्रकारचा असे, समपाणि, अवरपाणि व उपरिपाणि. यांतील पाणि हा शब्द ताल या अर्थाचा होय. समपाणि म्हणजे गीताबरोबरच ताल सुरू होणे; अवरपाणि म्हणजे गीताच्या अगोदर ताल सुरू होणे; उपरिपाणि म्हणजे गीतानंतर ताल सुरू होणे. मार्गतालातील निःशब्द ही क्रिया, जैमिनीय या प्राचीन सामगान परंपरेतील सामगानात, स्वरांच्या उच्चारण्याचे, व कालप्रमाणाच्या मात्रा योजनेने निष्पन्न होणारे असे स्वरांचे प्रकार दाखविण्यासाठी गात्रवीणेमध्ये जे हस्तविक्षेप योजले जातात, उदा. हात जवळ घेणे, खाली व वर करणे, उताणा व पालथा असा हात बोटे फिरवून योजणे इत्यादी, त्यांवरून गांधर्वात घेतली असणे संभवनीय वाटते. म्हणूनच त्यांची योजना अदृष्ट फलासाठी आवश्यक अशी सांगितली आहे.

देशी ताल

सोमेश्वराने चतुरस्र, त्र्यस्र, मिश्र व खंड असे तालांचे चार प्रकार दिले आहेत. चार गुरू असणारा व दोन दोन गुरूंनी वाढत जाणारा किंवा दोन गुरूंनी कमी असणारा असा ताल चतुरस्र होय. ज्यांत तीन गुरु असतात व सहा सहा गुरूंनी ताल वाढतो तो त्र्यस्र होय. चतुरस्रात एक व त्र्यस्रात दोन गुरू अधिक योजण्याने मिश्र ताल होय. त्र्यस्र आणि चतुरस्र यांत गुरूचा भंग करून होणारा खंड हा प्रकार होय. तालाच्या स्वतःच्या (म्हणजे मध्य) प्रमाणाने वार्तिक, विलंबित प्रमाणाने दक्षिण, शीघ्र प्रमाणाने चित्र व अत्यंत शीघ्र प्रमाणाने चित्रतर असे चार मार्ग त्याने सांगितले आहेत. नंतर आदिताल इत्यादी देशी ताल दिले आहेत. मार्ग तालांत द्रुताचा प्रयोग नसतो पण देशी तालांत द्रुत व द्रुतक यांचाही प्रयोग असतो. द्रुताचे प्रमाण अर्धी मात्रा व द्रुतकाचे एकचतुर्थांश (म्हणजे पाव) मात्रा हे होय. द्रुताची खूण बिंदु म्हणजे शून्य ही होय. (मानसोल्लास भा. ३ पृ. १०८, १०९) हरिपालदेवाने आपल्या संगीतसुधेत व पार्श्वदेवाने

संगीतसमयसारात चच्चत्पुट, चाचपुट इत्यादी पाच तालांचा नामनिर्देश प्रथम करून नंतर आदिताल इत्यादी देशी ताल दिले आहेत. (सं. स. सा. पृ. ७६) मार्गतालात द्रुताचा प्रयोग नसल्याचे कल्लिनाथाने स्पष्ट केले आहे. [सं. र. (अड्यार) भा. ३ पृ. ४] तसेच सिंहभूपालाने मतंगाने दिलेले म्हणून बारा ताल उद्धृत केले आहेत. ते असे—

" मूळ असणारे त्र्यश्र व चतुरश्र हे दोन (ताल) होत. त्यांतील चच्चत्पुट हा (चतुरश्र) युग्म म्हटला आहे व चाचपुट (त्र्यश्र, अयुग्म) म्हटला आहे. ते दोन विद्वानांकडून अन्यप्रकारासाठी अनेक रीतीने भिन्न भिन्न केले जातात. चच्चत्पुट, चाचपुट, षट्पितापुत्रक, तसेच हेला, त्रिगता, संपक्वेष्ट, नक्कुट, नत्कुटी, खंजक, खंजिका, त्याचप्रमाणे आक्रीडिता व विलंबा हे बारा भंग सांगितले आहेत. कुटिला, आक्षिप्तिका, त्र्यश्रा, चतुरश्रा, मिश्रका व चटुला हे सहा उपभंग सांगितले आहेत." [सं. र. (अड्यार) भा. ३ पृ. ८, ९] यांचा निर्देश जगदेकमल्लानेही केला असून, प्रबंधताल वेगळे दिले आहेत. (संगीतचूडामणि–पृ. १०१) पार्श्वदेवाने (सं. स. सार पृ. ५९) सुधाकरटीकेत दिल्याप्रमाणे भंग व विभंग दिले आहेत. वीणांच्या मिळून होणाऱ्या 'करण' नावाच्या वादनात प्राचीन काळी एका वीणेवर गुरु स्वर वाजत असता दुसऱ्या वीणेत दोन लघू वाजवायचे व या उलट वादन असे प्रकार होते. या प्रकारांत लघूच्या जागी दोन द्रुत योजणे याचाही समावेश मध्यकाळात झाल्याचे शार्ङ्गदेवाने वर्णिलेल्या करणांच्या प्रकारांवरून दिसून येते. या सर्वांवरून द्रुत (अर्धी मात्रा), लघु (एक मात्रा), गुरु (दोन मात्रा) व प्लुत (तीन मात्रा) या मात्राप्रमाणांचा उपयोग करून देशीताल निष्पन्न झाले असून, त्यांची संख्या संगीतचूडामणि व संगीतसमयसार या ग्रंथांत एकशेएक दिली आहे. 'काही ताल मी नावे व लक्षणे देऊन सांगितले आहेत' असे म्हणून सोमेश्वराने आदितालापासून आरंभकरून जवळ जवळ तीस ताल दिले आहेत. (मानसोल्लास भा. ३ पृ. ११० ते ११३) न थांबता एका प्रहाराने एक लघु वाजवल्याने तो आदि ताल होय; किंवा ज्यात तीन द्रुत तीन प्रहारांनी वाजविले जातात तोही आदिताल म्हणून सोमेश्वराने सांगितला आहे. तसेच वर्णतालाचेही दोन प्रकार दिले आहेत. तालांचे मार्ग व देशी असे स्वतंत्र विवेचन शार्ङ्गदेवानेच प्रथम विस्तारपूर्वक दिले आहे असे सध्या उपलब्ध असणाऱ्या मध्ययुगीन संगीतशास्त्रग्रंथांवरून कळून येते. गांधर्वात व चित्र इत्यादी मार्गांत कुशल असणारा टाळ धारण करणारा दुसरा गायक, गाणाऱ्याला साहाय्यक म्हणून योजावा असे शार्ङ्गदेवाने सांगितले आहे. कारण मग तालात चूक होणे संभवत नाही. गांधर्वातील मुख्य गायक हस्तक्रियांनी ताल दाखवत असे. गांधर्वाचे स्वरूपही अत्यंत निश्चित व नियमबद्ध असल्याने त्यात थोडा जरी प्रमाद झाला तरी प्रत्यवाय (म्हणजे पाप) निर्माण होते. म्हणून ही दुहेरी ताल धरण्याची योजना आवश्यक होती. देशीताल हा शोभिवंत होईल अशा रीतीने लघु इत्यादी कालप्रमाणाने युक्त असून टाळाच्या नादांनी व्यक्त होणारा असा आहे. मार्ग तालात मात्रेचे प्रमाण पाच लघू अक्षरे हे होते. देशी गायनात गीतभागांत अक्षरांच्या प्रमाणे मात्रा योजून टाळांनी दाखवल्या जाणाऱ्या कालाचे साम्य निष्पन्न करायचे असते.

त्यामुळे मात्रेचे प्रमाण क्वचित चार लघू अक्षरांचे किंवा क्वचित सहा लघू अक्षरांचे असते. देशी तालात आरंभ व शेवट यांत लघूचेच मुख्यत्व असते. म्हणून केवळ द्रुत असणाऱ्या तालात दोन द्रुतांऐवजी एक लघु योजून आरंभ व शेवट करावा असा संप्रदाय कल्लिनाथाने सांगितला आहे. [सं. र. (अड्यार) भा. ३ पृ. १३५] क्वचित नाद मोकळा योजणे, क्वचित तो धरून ठेवणे, केव्हा प्रहार करताना हाताचा कौशल्यपूर्ण वापर करणे इत्यादी प्रकारे टाळांच्या नादातून वैचित्र्यपूर्ण शोभा निर्माण होते.

शार्ङ्गदेवाने एकशेवीस देशी ताल दिले आहेत. आदिताल हा पहिला देशीताल एक लघु असणारा असा सांगितला आहे. दोन द्रुत व लघु असणारा द्वितीय ताल, द्रुतानंतर विरामान्त दोन द्रुत असणारा तृतीय ताल इत्यादी प्रकाराने द्रुत, लघु, गुरु व प्लुत देऊन हे सर्व ताल वर्णिले आहेत. यांत सिंहनंदन या तालात सर्वांत जास्त म्हणजे बत्तीस लघूंचे प्रमाण आहे. याशिवाय आणखी जरी पुष्कळ ताल असले तरी प्रचारात नसल्याने ते शार्ङ्गदेवाने दिलेले नाहीत.

(१०) वाद्ये व वादन.

भारतीय वाद्यांची व वादनाची तपशीलवार माहिती सध्याच्या उपलब्ध प्राचीन वाङ्मयात, नाट्यशास्त्रात प्रथम मिळते. भरतमुनींनी दिलेले, तत, सुषिर, अवनद्ध व घन हे चार प्रकारचे वर्गीकरणच नंतरच्या संगीतशास्त्रकारांनी सांगितले आहे. अभिनवगुप्त, नान्यदेव, शार्ङ्गदेव इत्यादी पंडितांनी वाद्यविषयक माहिती देताना, मतंग, विशाखिल, कीर्तिधर इत्यादी आचार्यांची मते दिलेली आहेत. पण या आचार्यांचे वाद्यविषयक ग्रंथ उपलब्ध नसल्याने वाद्याची माहिती, नाट्यशास्त्रानंतर आपणांस अभिनवगुप्त, नान्यदेव, सोमेश्वर, शार्ङ्गदेव, पार्श्वदेव आणि नंतरचे शास्त्रकार यांच्या ग्रंथांतूनच घ्यावी लागते. येथे शार्ङ्गदेवाने दिलेली वाद्ये व वादन एवढ्यापुरतेच विवेचन मर्यादित ठेवले आहे.

प्राचीन भारतीय शिल्पांतून आढळून येणाऱ्या वाद्यांवरून, तत म्हणजे तारा असणाऱ्या वीणा, नाट्यशास्त्रकालात व नंतर काही शतके धनुष्याकृति होत्या हे कळून येते. एका तारेची आधारस्वर देणारी घोषका ही वीणा किंवा सरोदसारख्या प्रकारच्या चार ते सहा तारा असणाऱ्या कच्छपी वीणा भरतकाळी मुख्य वीणा म्हणून प्रचारात नव्हत्या. या धनुष्याकृति वीणांत सप्तकातील सात स्वरांसाठी सात तारा असणारी चित्रा व अंतरगांधार आणि काकली निषाद या दोन साधारण स्वरांसाठी आणखी दोन तारा असणारी विपंची वीणा या दोन प्राचीन काळातील मुख्य वीणा होत. महाभारतात[६१] ही सप्ततन्त्री (म्हणजे सात तारा असणारी) वीणा प्रसिद्ध म्हणून सांगितली आहे. पालिजातकांतही[६२] सत्ततन्ती ही सात तारा असणारी वीणा दिसून येते. शिलप्पदिकारम्[६३] या प्राचीन तामिळ महाकाव्यातील याळ ही वीणाही धनुष्याकृति होती.

६१. महाभारत (भां. ओ. रि. इन्स्टिटचूट आ.)–आरण्यकपर्व, १३४. १३.

६२. जातक, भा. २ पृ. २२४–२२६.

६३. शिलप्पदिकारम् (इंग्रजी भाषान्तर, भाषांतरकार श्री. दीक्षितार) पृ. ९९.

वीणेच्या तारांवर विशिष्ट आघात करून स्वर निर्माण केले जात. यालाच धातु म्हटले आहे. कोण व बोटे यांच्या वापराने हे धातू निर्माण होत. नाट्यशास्त्रात हे धातू विस्तार, करण, आविद्ध व व्यंजन या प्रकारचे दिले आहेत. विस्तीर्ण स्वरूप असणे हे विस्तार धातूचे सामान्य लक्षण होय. याचे मुख्य उपप्रकार विस्तारज, संघातज, समवायज व अनुबंध हे होते. विस्तारज धातूत एका आघाताने एक स्वर उत्पन्न होई. संघातज धातूत दोन आघातांनी दोन स्वर निर्माण केले जात व समवायज धातूत तीन आघातांनी तीन स्वर निर्माण केले जात. अनुबंधात वरील तिन्हींचे मिश्रण असे. संघातज प्रकारात दोन्ही मंद्रस्वर, दोन्ही तार स्वर, प्रथम मंद्र व नंतर तार स्वर आणि प्रथम तार व नंतर मंद्र स्वर असे चार पोट प्रकार होते. समवायजात तीन मंद्र स्वर, तीन तार स्वर, दोन मंद्र व तार स्वर, दोन तार व मंद्र स्वर, एक तार व दोन मंद्र स्वर, एक मंद्र व दोन तार स्वर, तार, मंद्र व तार स्वर आणि मंद्र, तार व मंद्र स्वर असे आठ पोट प्रकार होते. करण धातूत तीन, पाच, सात व नऊ असे प्रहार क्रमाने योजून, अनुक्रमे दोन, चार, सहा व आठ लघू वाजवून शेवटचा गुरु वाजवायचा असे. म्हणजे या चार प्रकारांत क्रमाने चार, सहा, आठ व दहा मात्रा योजायच्या असत. यांच्या मिश्रणाने अनुबंध हा प्रकार होई. दोन, तीन, चार व नऊ प्रहारांनी क्रमशः आविद्ध धातूचे चार प्रकार होतात. शार्ङ्गदेवाने करण या धातूत गुरूचे अल्पत्व असते व आविद्ध धातूत गुरूचे प्राचुर्य असते किंवा गुरु नसतो असा या दोन्हींतील फरक स्पष्ट केला आहे. (सं. र. ६. १४८ व १५१) या धातूचा क्षेप हा उपप्रकार एक लघु व दोन गुरु यांनी, प्लुत हा[६४] लघु व गुरु यांनी, अतिपात हा लघु, गुरु, लघु, गुरु यांनी व अतिकीर्ण हा लघु, गुरु, लघु, गुरु, लघु, गुरु, लघु, गुरु व शेवटी लघु यांनी होतो. अनुबंध हा यांच्या मिश्रणाने होतो. शार्ङ्गदेवाने, अभिनवगुप्तांनी सूचित केलेले, दोन, तीन, चार व नऊ लघूंनी क्रमाने हे चार प्रकार होतात हे दुसरे मत म्हणून दिले आहे. (सं. र. ६ पृ. १५२–१५३) व्यंजन धातूत डाव्या व उजव्या हाताच्या बोटांनी कौशल्याने वादन करायचे असे. त्याचे प्रकार खालीलप्रमाणे होते--

(१) पुष्प– यात करंगळी व अंगठा यांनी युक्त असे वादन असे. अभिनवगुप्तांनी याचे स्पष्टीकरण देतांना दोन्ही अंगठे योजायचे असे सांगून, करंगळी व दोन्ही अंगठे यांनी क्रमाने एका तारेवर तीन आघात केल्याने पुष्प हा प्रकार होतो असे म्हटले आहे; व त्यासाठी मातृगुप्ताचे वचन उद्धृत केले आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ९९] शार्ङ्गदेवाने दोन्ही अंगठे व करंगळी यांनी तारेवर एकाच वेळी आघात करणे असे याचे लक्षण दिले आहे. (सं. र. ६, १५४, १५५)

६४. सुधाकरटीकेत प्लुत हा लघु, गुरु व लघु यांनी होतो असे म्हटले आहे, व क्षेप हा लघु व दोन गुरू यांनी सांगितला आहे. [सं. र. (अडयार) भा. ३ पृ. २५८] क्षेप दोन प्रहारांचा असल्यास लघु व गुरु यांनी व प्लुत तीन प्रहारांचा असल्यास लघु, गुरु व लघु यांनी योजणे सयुक्तिक वाटते.

(२) कल– दोन्ही तारांवर एकाच वेळी दोन्ही अंगठ्यांनी आघात करून नाना स्थानांतील स्वर निर्माण करणे असे याचे लक्षण अभिनवगुप्तांना अनुसरून शार्ङ्गदेवाने दिले आहे.

(३) तल– डाव्या अंगठ्याने तार दाबून उजव्याने आघात करणे.

(४) निष्कोटित– डाव्या अंगठ्याने वर व खाली प्रहार करणे.

(५) उन्मृष्ट– डाव्या हाताच्या पहिल्या बोटाने आघात करणे. याचे स्पष्टीकरण देताना अभिनवगुप्तांनी म्हटले आहे, ' तारेवर अशा रीतीने आघात करायचा की जणु प्रहार न होता स्पर्श केल्याप्रमाणे मधुर नाद उत्पन्न व्हावा.' शार्ङ्गदेवानेही हेच संक्षेपाने सांगितले आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ९९]

(६) रेफ–सर्व बोटांनी आघात करून एक स्वर वाजवणे. शार्ङ्गदेवाने यात सर्व बोटांनी क्रमाने आघात सांगितला आहे.

(७) अनुस्वनित– तल हा प्रकार योजून तारांवर खाली आघात करावे. ' खाली ' याऐवजी शार्ङ्गदेवाने ' अवरोहाने ' असे म्हटले आहे. [सं. र. ६. १५८]

(८) बिंदु– गुरु प्रमाणाचा स्वर तारेवर वाजविणे. अभिनवगुप्तांनी याचे स्पष्टीकरण देताना ' एकाच तारेवर विलंबित कालाचा आघात करणे ' असे म्हटले आहे. [ना० शा० (बडोदा) भा. ४ पृ. ९९]

(९) अवमृष्ट – उजव्या हाताची करंगळी व अंगठा यांनी खाली टोके करून तीन तारांवर तीन आघात करणे. अभिनवगुप्तांनी यात तीन स्थानांतील एकच स्वर तीन तारांवर प्रत्येकी करंगळी व अंगठा यांनी खाली घेऊन आघात करून निर्माण करणे असे म्हटले आहे. [ना. शा. (बडोदा) भा० ४ पृ. १००]. शार्ङ्गदेवाने याचे लक्षण ' उजव्या हाताची करंगळी व दोन्ही आंगठे यांनी खाली घेत, तीन स्थानांतील तोच स्वर तीन तारांवर वेगवेगळा आघात करून निर्माण करणे ' असे दिले आहे. (सं. र. ६·१६०).

(१०) अनुबंध म्हणजे वरील प्रकारांचे मिश्रण.

वृत्ति म्हणजे गायनवादनातील मुख्य व गुणीभूत (अंगभूत) अशा स्वरूपाचा व्यवहार होय. गुणीभूत याचा अर्थ दुय्यम असा न घेता तो उत्कर्ष असा घ्यायचा. गायनवादनात गायनाचे प्राधान्य असता चित्रा वृत्ति, दोन्हींचे समान स्वरूप असता वृत्ति हा वृत्तिप्रकार व वादनाचे प्राधान्य असता दक्षिणा वृत्ति होय. अभिनवगुप्तांनी, ' इतर काही आचार्यांनी लयीनुसार हे वृत्तिप्रकार सांगितले आहेत ' असे म्हटले आहे. म्हणजे चित्रावृत्तीत द्रुत लय, वृत्तीत मध्य लय व दक्षिणा वृत्तीत विलंबित लय असा अर्थ होय. याशिवाय नाट्यशास्त्राला अनुसरून शार्ङ्गदेवाने, ' चित्रा वृत्तीत समा यति, मागधी गीति, ओघ वाद्य (म्हणजे वादन) चित्र मार्ग, अनागत ग्रह; वृत्तीत स्रोतोगता यति, संभाविता गीति, अनुगत वाद्य, वार्तिक मार्ग, सम ग्रह; दक्षिणावृत्तीत गोपुच्छा यति, पृथुला गीति, तत्त्व वाद्य, दक्षिण मार्ग व अतीतग्रह ' असे वृत्तींचे स्वरूप दिले आहे.

गायनाशी संपूर्णपणे मिळून जाणारे वादन तत्त्व होय. गीताला थोडे अनुसरणारे (म्हणजे गीताची साथ करणारे) वादन अनुगत होय. आविद्ध धातूचे प्राचुर्य असणारे, उपर्युपरिपाणि व द्रुत लय असणारे आणि गीतार्थाची अपेक्षा नसणारे असे वादन ओघात योजावे असे भरताने म्हटले आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. १०३] अनुगत वादनाचे स्वरूप सांगताना, गाणे थांबले असता वादन थांबणे, गायनात स्वराचे स्थान बदलले असता तसेच ते वादनात ठेवणे, गाण्याची लय विलंबित असता चातुर्याने द्रुतलय योजणे हे तपशील शार्ङ्गदेवाने दिले आहेत. (सं. र. ६·१७३,१७४) ओघाच्या लक्षणातील ' उपर्युपरिपाणिक ' याचे स्पष्टीकरण, अभिनवगुप्तांनी अखंडपणे पाणि म्हणजे आघात असणारे तसेच ' गीतार्थाची अपेक्षा नसणारे ' याचे स्पष्टीकरण, गीतातील विदारी स्वरूपाचे जे भाग त्यांचीही अपेक्षा नसणारे म्हणजेच अखंडपणे सुरू असणारे, असे दिले आहे. [ना० शा० (बडोदा) भा. ४ पृ. १०४] शार्ङ्गदेवाने गीताच्या शेवटी, साथ करणारा वादक गीताच्या भागांनुसार चातुर्याने अखंड अशा हाताच्या आघातांनी सर्व भागांचे अनुकरण करतो ते ओघ वादन होय असे म्हटले आहे. (सं. र० ६. १७५,१७६)

वीणांचे मिळून होणारे वादनप्रकार करण म्हणून नाटयशास्त्रात दिले असून अशी एकूण सहा करणे वर्णिलेली आहेत. ही करणे विपंचीवादनयुक्त म्हणून नाट्यशास्त्रात म्हटली आहेत. यावरून मुख्य वीणा चित्रा व दुसरी वीणा विपंची यांचे मिळून वादन नाट्यशास्त्रात अपेक्षित आहे. ही करणे खालीलप्रमाणे होत–

(१) रूप– मुख्य वीणेत गुरु म्हणजे दीर्घ स्वर वाजत असता विपंचीत दोन लघू स्वर योजणे.

(अभिनवगुप्तांनी मुख्य वीणेत लघु स्वर वाजत असता विपंचीत दोन द्रुत वाजवणे असेही या करणाच्या बाबतीत सांगितले आहे. अभिनवगुप्तांनी व शार्ङ्गदेवाने मुख्य वीणा ही एकवीस तारांची, तीन सप्तकांच्या स्वरांनी युक्त अशी सांगितली आहे. तर नाट्यशास्त्रातली मुख्य वीणा सात तारांची आहे हा या करणांच्या वर्णनांच्या बाबतीतला विशेष ध्यानी घेणे आवश्यक आहे.)

(२) कृतप्रतिकृत– रूपवादनातील मुख्य वीणेत वाजवले जाणारे गुरु व लघु स्वर विपंचीत नंतर वाजवणे.

(३) प्रतिभेद– रूपवादनाच्या उलट वादन योजणे. म्हणजे मुख्य वीणेत दोन लघू स्वर वाजत असता विपंचीत एक गुरु स्वर योजणे; तसेच मुख्य वीणेत दोन गुरू स्वर वाजवले जातात त्यावेळी विपंचीत प्लुत व लघु स्वर वाजवणे.

(४) रूपशेष– गीतखंडाच्या शेवटी मुख्य वीणेचे वादन थांबले असता विपंचीवर ते न थांबता चालू ठेवणे.

(५) ओघ– आविद्धधातुयुक्त अखंडपणे आघात असणारे वादन.

(अभिनवगुप्तांनी यात विपंचीवादनात अतिद्रुतप्रयोग सांगितला आहे. हेच शार्ङ्ग-

देवाने आणखी स्पष्ट केले आहे. त्याने म्हटले आहे की जेव्हा मुख्य वीणेत विलंबित लय असते तेव्हा हस्तचातुर्याने विपंची इत्यादी इतर वीणांत अतिद्रुत लय योजिली जाते.)

(६) प्रतिशुष्का किंवा प्रतिशुक्ला– (मुख्य वीणा व विपंची यांत) एकाच तारेवर वादन एवढाच अर्थ नाट्यशास्त्रातील या करणाच्या वर्णनावरून मिळतो. अभिनवगुप्तांनी या करणाच्या स्पष्टीकरणात म्हटले आहे की विपंचीवीणावादक जेव्हा अंशाचा संवादी स्वर देणाऱ्या एकाच तारेवर अल्पत्व इत्यादी योजतो तेव्हा हे करण होते. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. १२३] शार्ङ्गदेवाने म्हटले आहे की अंश व त्याचा संवादी यांपैकी कोणता तरी स्वर देणाऱ्या एकाच तारेवर मुख्य व अमुख्य वीणांचे करण योजले जाते तेव्हा ते प्रतिशुष्का[६५] करण होय.

वीणावादनात सांगितलेल्या या धातु इत्यादी सर्व प्रकारांचा उपयोग नाट्यातील पूर्वरंगात, केवळ वाद्यवादन ज्यात असते अशा निर्गीत किंवा बहिर्गीत यात करायचा असे, असे भरताने म्हटले आहे. त्याचे आश्रावणा, आरंभ इत्यादी नाट्यशास्त्रात दिलेले भेद शार्ङ्गदेवानेही सविस्तर दिले आहेत. या धातूंच्या योजनेने चार जाती निष्पन्न होत. उदात्त जातीत विस्तार धातु, ललिता जातीत व्यंजन धातु, रिंभिता जातीत आविद्ध धातु व घन नावाच्या जातीत करण धातु अशी योजना करायची असे.

नाट्यशास्त्रात विपंची कोणाने वाजवायची व चित्रा बोटाने वाजवायची असा सामान्य नियम सांगितला आहे. लाकडाच्या किंवा धातूच्या निमुळते टोक असणाऱ्या तुकड्याला शार्ङ्गदेवाने कम्रिका हा शब्द वापरला आहे. या कम्रिकेच्या तारेवर होणाऱ्या योजनेला सारणा म्हणून म्हटले आहे. या सारणा सोमेश्वरानेही दिल्या आहेत. उजव्या हाताच्या बोटांनी निष्पन्न होणारे नऊ, डाव्या हातात धारण केलेल्या कम्रिकेच्या सारणेने निष्पन्न होणारे दोन व दोन्ही हातांच्या योजनेने निष्पन्न होणारे तेरा असे चौवीस हस्तव्यापार देऊन मग शार्ङ्गदेवाने त्यांच्या मिळून होणाऱ्या योजनांनी निष्पन्न होणारे छंद, धारा इत्यादी दहा प्रकारचे वादन वाद्य या नावाने वर्णिले आहे. जीवा म्हणजे जवारी तारेला लागल्याने निर्माण होणारा स्थूल नाद ज्यात असतो ते वादन सकल प्रकारचे म्हटले आहे. दुसऱ्या आचार्यांच्या मताने सकल वादन वेगळ्या प्रकारांनी होते. पत्रिकेला तर्जनीने स्पर्श न करता कम्रिकेने सारणा केली असता ते सकल वादन म्हटले आहे व निषाद स्वरस्थानापासून कम्रिका खाली तारेवर सारून तर्जनी स्पर्श केला नाही तर ते निष्कल वादन होय. निष्कल वादनात नाद सूक्ष्म निर्माण होतो.

---

६५. सुधाकरटीकेत 'अंश व त्याचा संवादी हे स्वर सोडून, दुसरा कोणता तरी स्वर व्यक्त करणाऱ्या एकाच तारेवर करण योजले जाते तेव्हा ते प्रतिशुष्का होय' असे म्हटले आहे. [सं. र. (अड्यार) भा. ३ पृ. २५१]

वीणावादनासंबंधी प्राचीन व तत्कालीन माहिती शार्ङ्गदेवाने दिली आहे. तसेच वीणांच्या मुख्य प्रकारांचे वर्णनही केले आहे. एकतंत्री वीणा ही सर्व वीणांची मूळ वीणा म्हणून अत्यंत पवित्र व मंगल म्हटली आहे व तिचे सविस्तर वर्णन दिले आहे. नान्यदेवाने तिच्यात सरस्वती निवास करते असेही म्हटले आहे. प्राचीन काळची एक तार असलेली भोपळायुक्त घोषका वीणा केवळ आधार स्वर देत असावी. मध्य काळात तिच्यातील तारेवर तिन्ही सप्तकातील स्वर वाजवण्याचे हस्तकौशल्य निर्माण झाले. दोन तारांची नकुल वीणा, तीन तारांची त्रितंत्रिका, सात तारांची चित्रा, नऊ तारांची विपंची व एकवीस तारांची मत्तकोकिला एवढेच वर्णन शार्ङ्गदेवाने नकुल इत्यादी पाच वीणांचे दिले आहे. नंतर आलापिनी, किंनरी, पिनाकी व निःशंकवीणा वर्णिल्या आहेत. एकतंत्रीप्रमाणेच आलापिनी, किंनरी (मार्ग व देशी), पिनाकी व निःशंकवीणा यांची रचना सर्व तपशिलांसह दिलेली आहे. निःशंकवीणा या नावावरून ही वीणा शार्ङ्गदेवाने बनविली होती हे समजते.

नाट्यशास्त्रकाल व तत्पूर्वकालीन धनुष्याकार वीणा ख्रि. उ. सातव्या, आठव्या शतकानंतर प्रचारात न राहण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची तारा स्वरांला लावण्यातील व त्या तशा टिकवून ठेवण्यातील कठिणता हे होय. वक्राकार दांडीला गाठी मारून तारा लावलेल्या असत. कारण प्राचीन काळी या वीणांना खुंट्या नव्हत्या. खुंट्या असणाऱ्या सरोद प्रकारच्या वीणांचा प्रचार सुरू झाल्याने धनुष्याकार वीणांचे महत्त्व कमी झाले. प्राचीन भारतीय शिल्पात धनुष्याकृति वीणा व सरोद प्रकारच्या वीणा आढळतात. ख्रि. पू. आठव्या शतकातील इराणमधील एका शिल्पात सरोद प्रकारची वीणा दिसून येते. त्यामुळे हे वाद्य भारतात तिकडून आले असणे संभवनीय आहे. कारण भारत व इराण या देशांत अतिप्राचीन काळापासून दळणवळण होते. अभिनवगुप्तांनी वक्रा, कूर्मा व अलाबु या आद्य वीणा म्हणून दिल्या आहेत. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. १२२]. वक्रा म्हणजे अतिप्राचीन काळापासून प्रचारात असलेली धनुष्याकृति वीणा होय. कूर्म अर्थात कच्छपी ही प्राचीन शिल्पात आढळून येणारी सरोदसदृश वीणा होय. अलाबुवीणा ही भोपळायुक्त असून तिला दोन तारा असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सध्याच्या एकतारीसारखी एक तारेची वीणा, तसेच दोन किंवा तीन तारा असणाऱ्या या प्रकारच्या वीणा ख्रि. उ. आठव्या-दहाव्या शतकातील भारतीय शिल्पात आढळतात. (उ. जयपूर येथील आंबेर संग्रहालयातील अबानेरी-शिल्पात दिसून येणाऱ्या वीणा). अभिनवगुप्तांनी सांगितलेली अलाबुवीणा या प्रकारचीच असावी. या सर्व वीणा पडदे नसणाऱ्या होत्या. भारतीय शिल्पावरून मध्यकाळाच्या आरंभी वीणेच्या दांडीवर पडदे असलेले आढळून येतात. अबानेरी येथील मंदिरशिल्पात (ख्रि. उ. आठवे ते दहावे शतक) सात, आठ पडदे असलेली वीणा दिसून येते. नंतर बाराव्या शतकातील बेळूर[६६]– शिल्पात खाली भोपळा असलेली व तेरा पडद्यांनी युक्त अशी एकतार असणारी वीणा आढळते. नंतरच्या

६६. पाहा– "Musical Instruments in Indian Sculpture" PP. 31–36

भारतीय शिल्पात पडदे असणाऱ्या अनेक वीणा आढळतात. सोमेश्वराने व त्याच्या थोडे पूर्वी नान्यदेवाने पडदे असणारी किंनरी वीणा वर्णिली आहे. दोन सप्तकांतील स्वरांसाठी मुक्त तन्त्रीवर मिळणारा पहिला स्वर व पुढील तेरा स्वरांसाठी तेरा पडदे, तसेच अधिक स्वरांसाठी एकूण चौदा किंवा सतरा पडदे असणाऱ्या या किंनरीवीणांमुळे गमकांचे प्रयोग वाढले. स्वरांची स्थाने निश्चित होऊन, मींडसारखे प्रकार सुलभतेने निर्माण करता येऊ लागले व अनेक प्रकारचे स्वरालंकार योजले जाऊ लागले. कुंभाने बृहद्देशीवर आधारलेल्या किंनरी वीणा सांगतो असे म्हटले आहे. सध्याच्या मुद्रित बृहद्देशीत वाद्याध्याय नाही. पण मतंगाची वाद्यविषयक उद्धरणे पुढील ग्रंथांतून मिळतात. त्यांवरून बृहद्देशीत वाद्याध्याय असणे संभवते. किंनरी हे लोकवाद्य तीन, चार पडदे असणारे असे होते. या लोकवाद्याचे रूपांतर पुढे सर्व स्वरांसाठी पडदे असणाऱ्या मध्यकालीन किंनरी वाद्यात झाले.

प्राचीन काळापासून भारतीय संगीतात वीणा किंवा वंश ही मुख्यतः साथीची वाद्ये होती. गायनातील स्वरालंकारांची साथ करता करता, पडद्यांमुळे उत्पन्न होऊ शकणाऱ्या भिन्न भिन्न स्वराविष्काराच्या प्रकारांचा गायनावरही प्रभाव पडला असला पाहिजे. नाट्यशास्त्रात गायिकेच्या गुणांत 'सुविहितगमकविधायिनी' (म्हणजे सुयोग्य प्रकारे गमके योजणारी) याचा निर्देश आहे. गमक हा शब्द नाट्यशास्त्रात येथेच एकवार आला आहे. [ना० शा० (बडोदा) भा० ४ पृ. ३९८] पण वरील शब्दाच्या जागी 'अवहितशरीर-मनसा' असा पाठ तळटीपेत दिला आहे. त्याचा अर्थ 'अवधानयुक्तशरीर व मनाने' असा होतो. यावरून गमकांविषयी नाट्यशास्त्रकालात सुनिश्चित कल्पना होती असे वाटत नाही. मध्ययुगीन ग्रंथकारांत काहींनी सात गमके वर्णिलेली आहेत. शार्ङ्गदेवाने पंधरा गमके दिली आहेत.

धनुष्याकार वीणेत तीन सप्तकांसाठी एकवीस तारा लावल्या जात होत्या. पण सध्याच्या स्वरमंडळासारख्या मत्तकोकिळा या वीणेत चौकोनी लाकडी पेटीवरही एकवीस तारा लावल्या जाऊ लागल्या. मत्तकोकिळा या वीणेलाच पुढे स्वरमंडळ हे नाव दिले गेले. सरोदासारख्या वाद्यात एका बोटाने तार छेडून नंतर दुसऱ्या बोटांनी तारेवर दाबून स्वर निर्माण करीत. हाही प्रकार प्राचीन काळापासून प्रचारात होता. मध्यकाळात धनुकलीने वाजवले जाणारे फिडलसारखे वाद्यही भारतीय शिल्पांत दोनतीन ठिकाणी आढळते. शार्ङ्गदेवाने वर्णिलेले पिनाकी हे वाद्य भोपळायुक्त असून ते धनुकलीने वाजवायचे असे. या वाजवायच्या धनुकलीची दोरी घोड्याच्या शेपटीच्या केसांची बनवलेली असे. या प्रकारची ही भारतीय वीणा आधुनिक व्हायोलिनसारख्या वाद्यांचे मूळ म्हणता येईल. आलापिनी वीणेला सोमेश्वराने आलवणी (किंवा आलावणी), तसेच लावणिका असे म्हटले आहे. (मानसोल्लास भा. ३ पृ. ९२) त्याने तिच्यावर उजव्या हाताने तीन व डाव्या हाताने चार स्वर वाजविण्याबद्दल सांगितले आहे. पण त्याने दिलेल्या आलापिनीच्या वर्णनात

सारिका (म्हणजे पडदा) हा शब्द नाही. नान्यदेवाने ही वीणा आलापिनी म्हणून सांगितली आहे. पार्श्वदेवाने तिला आलावणी म्हटले आहे. संगीतरत्नाकराच्या अड्यार आवृत्तीतील पाठानुसार हिच्यात सारिका बांधल्या जात असल्याचे वर्णन मिळते. सारिका हा शब्द बहुवचनी योजला असल्याने कमीत कमी तीन पडदे आलापिनी या वीणेला होते असे काही विद्वान मानतात. पण आनंदाश्रम आवृत्तीत 'सारिका' या ऐवजी 'दोरिका' हा पाठ आहे. अशा प्रकारची एक तार असलेली व पडदे नसणारी वीणा भारतीय शिल्पात आढळते. यामुळे आलापिनी या वीणेला पडदे नसण्याचीच शक्यता जास्त आहे. सितार किंवा सतार या आधुनिक अत्यंत प्रसिद्ध वाद्याचे नाव ख्रि. उ. अठराव्या शतकाच्या अखेरीस लिहिलेल्या संगीतसार या ग्रंथात प्रथम मिळते. 'पडदे असणारा तंबूर म्हणजे सितार होय' असे त्यात म्हटले आहे. (सं. सा. भा. २ वाद्याध्याय पृ. ६, ७) सध्याच्या तंबोऱ्यासारख्या वाद्याचेही वर्णन प्रथम याच ग्रंथात मिळते.

शार्ङ्गदेवाने तपशिलाने वर्णन केलेल्या वाद्यांखेरीज इतर वाद्यांची माहिती लोकांकडून जाणून घ्यावी असे कल्लिनाथाने म्हटले आहे. संगीतरत्नाकराच्या तिसऱ्या अध्यायात शार्ङ्गदेवाने घोषवती, परिवादिनी, वल्लकी, कुब्जिका, ज्येष्ठा, जया, कूर्मी, हस्तिका, शततन्त्रिका, औदुम्बरी, षट्कर्ण, पौण, रावणहस्तक, सारंगी ही अधिक नावे दिली आहेत. (सं. र. भा. १, सा. सं. मं. पृ. ३९९) यांतील रावणहस्त ही वीणा म्हणजे 'रावणहत्थो' या नावाचे सध्या मिळणारे लोकवाद्य असावे. पेन्ना या नावाचे आसामी लोकवाद्य आहे. त्याचा व पौण या नावाचा काही संबंध आहे का ते ठरविण्यास निश्चित साधन नाही. परिवादिनी ही वीणा सात तारांची होती.

सुषिर वाद्ये– बांबूपासून बनवलेला वंश किंवा वेणु (म्हणजे बासरी) हे फुंकून वाजवायचे सुषिर वाद्य फार प्राचीन काळापासून भारतीय संगीतात प्रचारात आहे. बोटांच्या योजनेने वंशातून द्विश्रुति, त्रिश्रुति व चतुःश्रुति स्वर कसे निर्माण करायचे ते भरताने सांगितले आहे. स्वराचे छिद्र पूर्णपणे मोकळे सोडून चतुःश्रुति स्वर, भोकावर बोट कंपित ठेवून त्रिश्रुति स्वर व भोक बोटाने अर्धे झाकून द्विश्रुति स्वर निर्माण करायचा असे. तिन्ही स्थानचे स्वर मिळण्यासाठी, नऊ प्रकारचे वंश भरताचार्याने सांगितले आहेत असे नान्यदेवाने म्हटले आहे. तिन्ही स्थानचे स्वर मिळण्यासाठी, कीर्तिधर इत्यादी आचार्यांनी नऊ प्रकारचे वंश सांगितले आहेत असे कुंभाने म्हटले आहे. वेमभूपालाने तसेच शार्ङ्गदेवाने कीर्तिधरमताने नऊ वंश असल्याचे सांगितले आहे. यावरून कीर्तिधर या आचार्यांचे वंशाच्या बाबतीतले महत्त्व कळून येते. तोंडातून हवा फुंकण्याचे एक, स्वरासाठी सात व हवा बाहेर जाण्यासाठी वंशाच्या दुसऱ्या टोकाचे एक अशी नऊ रंध्रे वंशाला असत. वंशात त्रिविध मूर्च्छना सांगणारे मत अभिनवगुप्तांनी पुढीलप्रमाणे दिले आहे– "तोंडातून हवा फुंकण्याने तार व मंद्र स्वर निष्पन्न करणारी अशी दोन प्रकारची व बोटाच्या योजनेने निष्पन्न होणारी (मध्यस्थानचे स्वर देणारी) एक, अशी वंशातील दोन वेळा प्रयुक्त होणारी त्रिविध मूर्च्छना होय.

[ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. १४३] त्यांनी बोटांची क्रिया पाच प्रकारची सांगणारे मतही दिले आहे. ते असे– कंपित क्रियेमुळे वर्ण व अलंकार निर्माण होतात; चलित क्रियेत हलणाऱ्या बोटांमुळे संचारिवर्ण निर्माण होतो; छिद्र मोकळे ठेवल्याने मुक्ता, अर्धे मोकळे ठेवल्याने अर्धमुक्ता व बोटांनी सर्व भोके झाकून वंशातून फुंक योजल्याने निपीडिता ही क्रिया होते. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. १४५, १४६] वेणूचे वादन मधुर, ललित व स्निग्ध म्हटले आहे. गायकाच्या प्रत्येक स्वराची साथ वंशवादकाने करायची असे. प्राचीन काळी बांबूपासून बनवत असल्याने या वाद्याचे वेणु किंवा वंश हे नाव सार्थच होते. पण पुढे खैराचे लाकूड, रुपे, कासे व सोने यांच्यापासून वंश बनवू लागले. शार्ङ्गदेवाने बांबू, खैर, हस्तिदंत, चंदन, रक्तचंदन, लोखंड, कासे, रुपे व सोने यांच्यापासून बनवलेले वंश सांगितले आहेत. वारा फुंकण्याच्या भोकाला मुखरंध्र हे नाव असून, ज्या पहिल्या भोकातून तार स्वर निघतो ते तारंध्र म्हटले आहे. मुखरंध्र व तारंध्र यांमधील अंतर एकेक अंगुळाने (म्हणजे साधारणपणे पाऊण इंचाने) क्रमाक्रमाने वाढवून होणारे चौदा प्रकारचे व मूळचा एकवीर हा एक असे पंधरा वंश तपशिलासह शार्ङ्गदेवाने दिले आहेत. यात मुखरंध्र व तारंध्र यांतील सर्वांत मोठे अंतर अठरा अंगुळे हे होय. तेरा, पंधरा व सतरा अंगुळे अंतर असणारे वंश त्यांच्या अविस्पष्ट स्वरूपामुळे योग्य मानलेले नाहीत. वीस अंगुळे अंतर असणारा मुरली नावाचा वंश व बावीस अंगुळे अंतर असणारा श्रुतिनिधि नावाचा वंश हेही तत्कालीन इतर आचार्यांनी सांगितले होते. पण श्रुतिनिधि हा वंश अत्यंत मंद्र नादामुळे निष्णात वादकांना मान्य नव्हता. पाच अंगुळांपेक्षा कमी अंतर असणारे वंश अत्यंत तार नादामुळे विरळपणेच प्रचारात होते. अठरा अंगुळे अंतर असणाऱ्या वंशातील सात स्वररंध्रे झाकून फुंकण्याने मंद्र षड्ज, सोळा अंगुळे अंतर असणाऱ्या वंशात त्याचप्रमाणे वाजवल्याने मंद्र ऋषभ, चौदा अंगुळे अंतर असणाऱ्या वंशात तसेच बारा, अकरा, दहा व नऊ अंगुळे अंतर असणाऱ्या वंशांत तशीच योजना केल्याने अनुक्रमे मंद्र गांधार, मंद्र मध्यम, मंद्र पंचम, मंद्र धैवत व मंद्र निषाद हे स्वर निर्माण होत. आठ अंगुळे अंतर असणाऱ्या वंशापासून ते दोन अंगुळे अंतर असणाऱ्या वंशापर्यंत क्रमाने त्याप्रमाणेच योजना केली असता अनुक्रमे मध्यस्थानचे षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत व निषाद हे स्वर मिळत. एकवीर वंशातून तारषड्ज मिळे. या सर्व वंशांत शेवटची दोन भोके मोकळी ठेवल्याने त्या त्या वंशात त्यापुढचा दुसरा स्वर, तीन मोकळी ठेवल्यास तिसरा स्वर, चार मोकळी ठेवल्यास चौथा स्वर, पाच मोकळी ठेवल्याने पाचवा स्वर, सहा मोकळी ठेवल्याने सहावा स्वर व साती मोकळी ठेवल्याने सातवा स्वर, बाकीची भोके झाकून फक्त तारंध्र मोकळे ठेवल्याने आठवा स्वर निर्माण होई. यापेक्षा आणखी एका प्रकारेही वंशातून स्वरनिष्पत्ति सांगितली आहे. यात दोन्ही हातांच्या बोटांचा उपयोग असे. डाव्या हाताच्या तिसऱ्या बोटाने षड्ज, मधल्या बोटाने ऋषभ, पहिल्या बोटाने गांधार, तसेच उजव्या हाताच्या करंगळीने मध्यम, तिसऱ्या बोटाने पंचम, मधल्या बोटाने धैवत व पहिल्या बोटाने निषाद निष्पन्न केला जात असे. मुखरंध्र अत्यंत जवळ घेऊन फुंक योजल्याने (वाऱ्याचा जोर जास्त होत

असल्याने) तार स्थानचे व ते दूर ठेवून फुंक योजण्याने (वाऱ्याचा जोर कमी होण्यामुळे) मंद्र स्वर निष्पन्न करायचे असत.

बोटांच्या क्रियांचे कंपिता इत्यादी अभिनवगुप्तांनी सांगितलेले पाच प्रकार शार्ङ्गदेवाने दिले आहेतच. मुखरंध्र अत्यंत जवळ ठेवून फुंक योजल्याने तारस्वर निर्माण करावयाच्या वादनप्रकाराला टीपा हा शब्द होता. कीर्तिधराने याबाबतीत सांगितलेली दुसरी व्यवस्थाही शार्ङ्गदेवाने दिली आहे. कीर्तिधरमताने सहा, सात व आठ अंगुळांचे तीन वंश तार स्वर देणारे, नऊ, दहा व अकरा अंगुळांचे तीन मध्य स्वर देणारे, बारा व तेरा अंगुळांचे दोन वंश मंद्र स्वर देणारे व चौदा अंगुळांचा वंश तिन्ही स्थानचे स्वर देणारा, तसेच वर्ण, अलंकार, धातू इत्यादी निष्पन्न करू शकणारा असे एकूण नऊ वंश होत. शार्ङ्गदेवाने अंगुळाचे प्रमाण भिन्न योजून देशी मतानुसार मानले गेलेले हे पंधरा वंशही दिले आहेत व शेवटी देशी प्रचाराला अनुसरून दुसऱ्या प्रकारे वंशांचे स्वरूप प्रतिपादिले आहे. याप्रमाणे त्याने शास्त्रोक्त व देशी अशी दोन्ही लक्षणे देऊन, प्राचीन महान आचार्यांच्या मताचा अधिक्षेप करणे अयोग्य आहे असे सांगून काही आचार्यांच्या देशीविषयक मताला दोष दिला आहे व आपल्या मताने चौदा वंश सविस्तर वर्णिले आहेत. वंशवादनातील फुंक योजण्यामधले, स्निग्धता, घनता, रक्ति (म्हणजे रंजकत्व), व्यक्ति (स्पष्टता), आवाजाची प्रचुरता, लालित्य, कोमलपणा, नादाचे अनुरणन, तिन्ही स्थानचे स्वर निर्माण करणे, श्रोत्यांना सुखप्रद होणे, मधुरपणा व सावधानता हे बारा गुण तसेच फुंकीचे, यमल (म्हणजे पुन्हा फुंकावे लागणे), स्तोक (म्हणजे थोडी फुंक), कृश (म्हणजे बारीक) व स्खलित (म्हणजे अडखळणारी फुंक) हे चार दोष सांगितले आहेत. दुसऱ्या विद्वानांनी सांगितलेले कपिल, तुम्बकी, काकी, संदष्ट व अव्यवस्थित हे आणखी पाच दोषही शार्ङ्गदेवाने दिले आहेत. तोंडात कफ असल्यामुळे बेसूर नाद निर्माण करणारी फुंक कपिल होय. तुंब असा आवाज उत्पन्न करणारी तुंबकी होय. तारस्थानात श्रुतिहीनतेमुळे कावळ्यासारखा (रूक्ष व कर्कश) नाद निर्माण करणारी काकी, तोंडीलावण्याप्रमाणे थोडी असणारी ती अल्प व कमी किंवा जास्ती असा रूक्ष नाद निर्माण करणारी अव्यवस्थित होय. वंशवादकाच्या बाबतीत, बोटांच्या योजनेचा सराव, योग्य स्थानप्राप्ति, उत्कृष्ट रंजकता, चांगल्या प्रकारे राग व्यक्त करणे, वेगाने आरोह व अवरोह करत असता वादनांतील गोडवा राखणे, गीत वाजवण्यात दक्षता, गायकांच्या बाबतीत तिन्ही स्थाने दाखविणे (स्थानदायिता) किंवा गायकाला अभिप्रेत तान त्या त्या रागाला अनुसरून प्रथम दाखविणे (तानदायिता), मार्ग व देशी रागांतील कौशल्य, स्वस्थानाप्रमाणेच त्याहून वेगळ्या अशा अतिरिक्त स्वस्थानातही राग निर्माण करण्यात प्रगल्भता हे गुण सांगितले आहेत. अस्थानी गमकालापाची प्रचुरता, वरील गुणांच्या उलट स्थिती असणे, इष्ट स्थान प्राप्त करून न घेणे, डोके हलविणे हे वंशवादकाचे दोष होत. वांशिकांच्या वृंदात एक मुख्य वंशवादक असून त्याला अनुसरणारे चार वंशवादक सांगितले आहेत. मध्यमादि, मालवश्री, तोडी इत्यादी एकतीस देशी रागांचे वंशातून योजायचे वादनही शार्ङ्गदेवाने सविस्तर दिले आहे.

शंख, तुण्डकिनी इत्यादी नाट्यशास्त्रातील सुषिर वाद्ये केवळ नाद निर्माण करणारी होती. गायनाला साथ करण्याचे सामर्थ्य या वाद्यांत शक्य नसल्याने ती दुय्यम म्हणून दिलेली आहेत. वंशाप्रमाणेच पावा, पाविका, मुरली, मधुकरी इत्यादीही वाद्ये प्रचारांत असल्याने ती शार्ङ्गदेवाने वर्णिली आहेत. काहला ही हा हू असा नाद निर्माण करीत असे. तुण्डकिनीचाच चार हात लांब असणारा प्रकार चुक्का हा होता. याशिवाय प्राचीन कालापासून मिळणारा शंख व शिंग यांचेही वर्णन त्याने केले आहे. मधुकरी ही महुरी या नावाने सध्याही आढळते. हीच शहनाईसारख्या वाद्यांचे मूळ म्हणता येईल. शार्ङ्गदेवाने वर्णिलेल्या मुरलीत चारच छिद्रे सांगितली आहेत.

अवनद्ध वाद्ये– चामड्याने तोंड मढवून त्यावर आघात करून वाजवायची वाद्ये अवनद्ध वाद्ये होत. नाट्यशास्त्रात मृदंग, पणव व दर्दुर या वाद्यांचे वादन नाट्याच्या पूर्वरंगात व नंतर सांगितले आहे. मृद् म्हणजे माती व अंग म्हणजे शरीर. मृदंगाचे भांडे मातीचे योजीत असल्याने त्याला मृदंग हे नाव प्राप्त झाले. वैदिक काळात, जमिनीत खोदलेल्या रुंद तोंडाच्या गोलसर भोकावर कातडे ताणून बसवून, त्यावर काठीने प्रहार करून वाजवायचे भूमिदुंदुभि हे यज्ञात योजायचे वाद्य, तसेच मोठा आवाज करणारे दुंदुभि हे वाद्य होते. यावरून पुढे गायनात ताल देण्यासाठी मृदंग, पणव इत्यादी वाद्ये निर्माण झाली. भरताने अवनद्ध वाद्यांच्या वर्णनात त्रिपुष्कर हा शब्द वापरला आहे. पुष्कर म्हणजे वाद्याच्या भांड्याचे तोंड असा अर्थ कोशात मिळतो. त्रिपुष्कर या शब्दाने तीन [६७] तोंडांचे अवनद्ध वाद्य निर्दिष्ट होते, असे डॉ. व्ही. राघवन् या पंडितांचे म्हणणे आहे. 'अवनद्ध वाद्याचे लक्षण जसे पूर्वी स्वाति, नारद व पुष्कर यांनी सांगितले त्यानुसार मी सांगतो' असे भरताने म्हटले आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ४०३] यात पुष्कर हे मुनीचे विशेषनाम आहे. अवनद्ध वाद्यांच्या निर्मितीविषयी एक आख्यायिका नाट्यशास्त्रात सांगितली आहे ती अशी—

"स्वाति हे मुनि एकदा कमलयुक्त सरोवरात पाणी आणण्यासाठी गेले असता पावसाचा प्रचंड वर्षाव सुरू झाला. लहानमोठ्या कमलपत्रांवर त्या जलधारा पडत असता टप् टप् टप् असा विविध तऱ्हेचा गंभीर व मधुर नाद निर्माण झाला. तो नंतर आठवून त्यांनी विश्वकर्म्याच्या साहाय्याने मृदंग, पणव व दुंदुभि ही वाद्ये निर्माण केली; तसेच देवांची दुंदुभि पाहून आलिङ्ग्य, ऊर्ध्वक व आंकिक हे तीन वाद्यप्रकार निर्माण केले." अभिनवगुप्तांनी मृदंग या शब्दाची व्युत्पत्ति मृद् म्हणजे माती हे ज्याचे अंग म्हणजे शरीर आहे अशी दिली आहे. दुसऱ्या काही आचार्यांनी दिलेली व्युत्पत्तीही त्यांनी सांगितली आहे. ती अशी—

मृदंग या शब्दातील मृद् याचा अर्थ मर्दन करणे असा असल्याने मृद् म्हणजे चामडे होय. [यावरून चामडे हे ज्याचे अंग (म्हणजे मुख्यावयव) आहे तो मृदंग असा अर्थ निष्पन्न होईल.] मृदंगाला, मुरज असाही शब्द आहे. मुरा म्हणजे मृद्; त्यापासून निर्माण

६७. पाहा– "Musical Instruments in Indian Sculpture." pp. 59–61.

झालेला तो मुरज म्हणजेच मृदंग होय. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ४०५] [मुरज यातील र हे मुरा शब्दातील 'रा'चे ऱ्हस्व रूप (पा. ६.३.६४) या सूत्राधारे झाले आहे.] मृदंग व पणव ही वाद्ये दोन तोंडाची आहेत. तीन तोंडाचे अवनद्ध वाद्य भारतीय शिल्पात दोन तीन ठिकाणी आढळते. पण इतर अनेक शिल्पांत दोन तोंडाचा मृदंगच सातत्याने ख्रि. पू. एक ते पुढील सर्व शतकांत दिसून येतो. यावरून तीन तोंडाच्या मृदंगाचा प्रचार फारच थोडा होता हे ध्यानात येते. पण असे वाद्य अस्तित्वात नव्हतेच असेही म्हणता येत नाही. जसे दोन तीन भारतीय मध्ययुगीन शिल्पांत ते आढळते, तसेच त्याचे प्रत्यक्ष अस्तित्व पुणे येथील राजा केळकर संग्रहालयातील वाद्यसंग्रहात 'पुष्कर' या नावाने दिसून येते. मध्ययुगीन जैन साहित्यात 'तिउक्खर'[६८] (त्रिपुष्कर) या शब्दाचे स्पष्टीकरण मुरजाची म्हणजेच मृदंगाची दोन तोंडे व दर्दुरकाचे एक तोंड मिळून होणारी तीन तोंडे असे दिले आहे. भरताने वर्णिलेली आलिंग (किंवा आलिंग्य,) ऊर्ध्वक व आंकिक ही तीन वाद्ये मिळून त्रिपुष्कर पूर्ण होते असे अभिनवगुप्तांनी म्हटले आहे. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ४०६] आंकिकाचा आकार हिरड्यासारखा, ऊर्ध्वकाचा यवासारखा व आलिंग्याचा गाईंच्या शेपटासारखा असे. आंकिक मांडीवर ठेवून व ऊर्ध्वक उभा ठेवून वाजवीत असत असे प्राचीन भारतीय शिल्पावरून दिसून येते. यामुळे आडव्या मृदंगाचे उजवीकडचे तोंड व डावीकडचे तोंड आणि ऊर्ध्वकाचे वरचे तोंड अशी ही तीन तोंडे मार्जनायुक्त वादनासाठी योजीत असल्याचे कळते. वाद्याला बांधलेली पट्टी खांद्यावर घेऊन ते अंगाला बिलगून ठेवून वाजवले जात असल्याने त्याला आलिंग्य हे नाव दिले असणे शक्य आहे. नाट्यशास्त्रातील मृदंगवादनामधले आगळे वैशिष्ट्य म्हणजे 'मार्जना' हे होय. गाळीव व मुलायम अशा काळ्या मातीचा लेप मृदंगाच्या तोंडावरील चामड्याच्या मध्यभागी गोलाकार देऊन मृदंग ग्रामानुसार तीन वेगवेगळ्या स्वरांना लावले जात. यालाच मार्जना म्हटले आहे. या मार्जना तीन होत्या. त्या अशा–

मार्जनेचे नाव	ग्राम	त्रिपुष्कराच्या तीन तोंडांवर मिळायचे स्वर		
		डावे तोंड	उजवे तोंड	वरचे तोंड
मायूरी	मध्यमग्राम	गांधार	षड्ज	पंचम
अर्धमायूरी	षड्जग्राम	षड्ज	ऋषभ	धैवत (किंवा पंचम)
कार्मारवी	साधारणसमाश्रया	ऋषभ	षड्ज	पंचम

मध्यमग्रामात योजायच्या मायूरी मार्जनेतील पंचम त्रिश्रुति आहे व षड्जग्रामात योजायच्या अर्धमायूरीतील पंचम चतुःश्रुति आहे. कार्मारवीत पंचम त्रिश्रुतिक किंवा चतुःश्रुतिक असल्याने दोन्ही ग्रामाचा आश्रय ती करीत असल्यामुळे साधारणसमाश्रय होय. मायूरीत आलिंगकात गांधार, आङ्किकात (म्हणजेच आंकिकात) षड्ज व ऊर्ध्वकात पंचम योजायचा असे अभिनवगुप्तांनी सांगितले आहे; तसेच अर्धमायूरीत अनुक्रमे षड्ज, ऋषभ व चतुःश्रुति

६८. पाहा– Musical Instruments in Indian Sculpture, p. 61

धैवत योजायचा आणि कार्मारवीत अनुक्रमे ऋषभ, षड्ज व त्रिश्रुति किंवा चतुःश्रुति पंचम योजायचा असेही म्हटले आहे. मायूरीत राहिलेल्या चवथ्या तोंडावर मध्यम योजण्याबद्दल सांगितले आहे. जाति व राग यांत, मायूरीतील आलिंगकात निर्माण होणाऱ्या गांधाराचा संवादी जो निषाद तो अंश असता प्राधान्याने योजला जातो. [ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ४३१, ४३२] गायनाला अनुसरून अंश स्वर तसेच त्यांचे संवादी स्वर निष्पन्न झाले असता मृदंगवादन अत्यंत समुचित होते ही दृष्टि मार्जनांच्या उपयोगासंबंधी आढळून येते. संवादपूर्तीसाठी आवश्यक असे, मार्जनेतील मिळणाऱ्या तीन स्वरांखेरीज बाकीचे स्वर मृदंगाच्या तोंडावरील चामड्यावर योग्य प्रकारे दाब देऊन काढीत असत. वामक व ऊर्ध्वक यांवर नेहमी मातीच्या लेपानेच मार्जना योजीत. यव किंवा गहू यांच्या पिठाचा लेपही चालत असे. पण त्यामुळे एकच स्वर निर्माण होतो हा त्यातील दोष होता. मृदंग-वादनात क, ख, ग, घ, ट, ठ, ड, ढ, त, थ, द, ध, म, र, ल आणि ह या सोळा अक्षरां-सारखे निघणारे बोल योजीत. दोन्ही हातांचा वापर करून जोडाक्षरांसारखे बोलही उत्पन्न करीत असत. ही सोळा अक्षरे व संयुक्त अक्षरे मृदंगामधून हस्तकौशल्याने कशी निर्माण करायची तेही नाट्यशास्त्रात सांगितले आहे. अङ्कित, आलिप्त, वितस्त व गोमुखी हे चार मार्ग, रूप, कृतप्रतिकृत, प्रतिभेद, रूपशेष, ओघ व प्रतिशुल्का ही सहा करणे, समा, स्रोतोगता व गोपुच्छा या तीन यति, तीन लयी, तत्त्व, अनुगत व ओघ हे तीन वादन-प्रकार, गुरू अक्षरांचा संयोग, लघू अक्षरांचा संयोग, व गुरू आणि लघू अक्षरांचा संयोग, समपाणि, अवपाणि व उपरिपाणि, पंचपाणिप्रहार म्हणजे समपाणि, अर्धसमपाणि, अर्धार्धसमपाणि, पार्श्वपाणि व प्रदेशिनी यांनी योजायचे पाच प्रकारचे हस्तप्रहार, निगृहीत, अर्धनिगृहीत व मुक्त असे तीन प्रकारचे आघात; तीन मार्जना, वीस अलंकार व वादनाच्या अठरा जाति एवढा सर्व विषय मृदंगवादनाच्या तपशिलात भरताने दिला आहे. पंचपाणिप्रहारातील चारीचे स्पष्टीकरण शार्ङ्गदेवाने दिले आहे. (सं. र. भा. २ पृ. ३५६, ३५७) दोन्ही हातांचे आंगठे व सर्व बोटे मिळून ज्यावेळी दोन्ही तोंडांवर एकाच वेळी प्रहार केला जातो तेव्हा तो समपाणि होय. दोन्ही हातांच्या अर्ध्या भागाने प्रहार केल्यास तो अर्धार्धपाणि होय. एका हाताच्या टोकाने प्रहार केल्यास तो अर्धपाणि होय. नखाच्या टोकाने वाजविल्यास तो पार्श्वपाणि होय. [प्रदेशिनी याचे स्पष्टीकरण संगीतरत्नाकरात मिळत नाही. अर्थात प्रदेशिनीने म्हणजे पहिल्या बोटाने वाजवल्याने प्रदेशिनी हे नाव सार्थ ठरते.] समपाणि, अवपाणि व उपरिपाणि यांचे स्पष्टी-करण तालविषयक माहिती देतांना मागे दिले आहे. आंकिक मृदंगातील प्रहार असलेला तो अङ्कित मार्ग, वाम व ऊर्ध्वक या तोंडावर प्रहार असणारा तो आलिप्त मार्ग, ऊर्ध्वक व आंकिकाचे उजवे तोंड यांवर जोराने आघात करून होणारा तो वितस्त मार्ग व आलिंग्य-वादन पुष्कळ असलेला आणि सर्व तोंडांवर वादन केला जाणारा तो गोमुखी मार्ग होय. या चारी मार्गांची अक्षरयोजनाही भरताने दिली आहे. डाव्या तोंडावर डाव्या हाताने व उजव्या तोंडावर उजव्या हाताने प्रहार करणे हा समप्रचार, या उलट म्हणजे हातांचे

स्वस्तिक करून उजव्या हाताने डाव्या तोंडावर व डाव्या हाताने उजव्या तोंडावर प्रहार हा विषमप्रचार आणि या दोन्हींचे मिश्रण हा समविषम प्रचार होय. मृदंगाप्रमाणेच पणव व दर्दुर यांचेही वादन भरताने वर्णिलेले आहे. दर्दुर हे घटाकार एक तोंडाचे वाद्य होते. या सर्व अवनद्ध वाद्यांच्या वादनात आठ प्रकारचे साम्य नाट्यशास्त्रात सांगितलेले आहे ते असे--

(१) अक्षरसम--गीतातील लघु व गुरु अक्षरांशी जुळून होणारे वादन.
(२) अंगसम--गीतातील अंगांशी (म्हणजे भागांशी) जुळून होणारे वादन.
(३) तालसम--गीतातील तालाशी जुळून होणारे वादन.
(४) लयसम--गीतातील लयीशी जुळून होणारे वादन.
(५) यतिसम--गीतातील यतीशी जुळून होणारे वादन.
(६) ग्रहसम--गीताच्या आरंभाबरोबर सुरू होणारे वादन.
(७) न्यासापन्याससम – न्यास व अपन्यास स्वरांशी जुळून होणारे वादन.
(८) पाणिसम – गीतातील समपाणि, अवपाणि व उपरिपाणि यांनुसार वादन.

[ना. शा. (बडोदा) भा. ४ पृ. ४३६, ४३७] भरताने मृदंग, पणव व दर्दुर यांची रचना, त्यासाठी निर्दोष व योग्य चामडे याबाबतचे तपशील देऊन, वादकांचे व वादनाचे गुणदोष सांगितले आहेत. ताल, लय, ग्रह (म्हणजे आरंभ), मोक्ष (म्हणजे शेवट), (गायनातील) छिद्र झाकणे, मार्जना, शरीर व मन यांचे अवधान, हाताचा हलकेपणा व गोडवा, चार मार्गांचा अभ्यास इत्यादी गुण मृदंगवादकाचे होत. गोलाकार असा हात वर योजू शकणारा, काळाचा जाणकार, छिद्र झाकण्यात कुशल व करणांचा अभ्यास असणारा पणववादक गुणी होय. निश्चल, निपुण, शीघ्र, हलका हात असलेला, मृदंगवादनाच्या-मध्ये योग्यपणे वाजविणारा असा दर्दरवादक गुणवान होय. प्रहार स्पष्ट असणारे, विशद, विभक्त, रंजक, दुरूनही ऐकण्यास योग्य, तीन मार्जनांनी पूर्ण असल्याने रागाला अनुसर-णारे असे मृदंगवादन गुणसंपन्न होय. नाट्यशास्त्रातील हे सर्व विवरण पाहता प्राचीन काळातही भारतात मृदंगवादनात केवढी प्रगति झाली होती हे ध्यानात येते.

शार्ङ्गदेवाने, ' त्रिपुष्कर, (म्हणजे तीन तोंडाचा मृदंग) हे भरतमुनींनी सांगितलेले वाद्य अत्यंत अव्यवहार्य असल्याने मी विस्ताराने वर्णीत नाही ' असे म्हटले आहे. यावरून या वाद्याचा प्रचार मध्यकाळात राहिलेला नव्हता हे कळते. शार्ङ्गदेवाने दोन तोंडाचे पटह हे वाद्य प्रथम वर्णिले आहे. मार्ग व देशी असे दोन्ही पटह त्यांची रचना सांगून त्याने दिले आहेत व त्यांवर योजायचे हस्तपाट वर्णिले आहेत. भरताने सांगितलेले सोळा वर्ण मध्ययुगीन शास्त्रात पाट म्हणून म्हटले आहेत. त्यांच्या विविध गुंफणीमुळे होणारे एकूण अठ्याऐंशी हस्तपाट त्याने दिले आहेत. शंकराच्या पांच तोंडांतून प्रत्येकी सात याप्रमाणे निघालेले मूळ पस्तीस हस्तपाट, नंदिकेश्वराने सांगितलेले चार, याशिवाय प्रचारात असणारे एकवीस, बहुशः हुडुक्का या वाद्यात योजले जाणारे सोळा, अवपाट नावाचे आठ,

दोन अलगपाट व दोन चित्रपाट मिळून हे अठ्याऐंशी हस्तपाट होत. या पाटांच्या योजनांनी पटह इत्यादींत निष्पन्न होणारे बोल्हावणी, चल्हावणी इत्यादी बारा वादन-प्रकार व प्रायः हुडुक्केत योजले जाणारे वल्हि, घत्ता, भेद इत्यादी तेरा मिळून पंचवीस वादनप्रकार सांगून मग यति, ओता, गजर इत्यादी त्रेचाळीस वाद्यप्रबंध शार्ङ्गदेवाने वर्णिलेले आहेत. खांदा, कोपर, अंगठा, मनगट व डावा पाय यांचा कंप संच म्हटला आहे. अंगठा व मनगट यांचा कंप योजणारा श्रेष्ठ पटहवादक होय; खांदा व कोपर यांचा कंप असणारा कनिष्ठ पटहवादक होय. तसेच अंगठा, कोपर व खांदा यांचा कंप योजणारा श्रेष्ठ हुडुक्कावादक होय; मनगट व कोपर यांचा कंप योजणारा मध्यम आणि डाव्या पायाचा कंप योजणारा कनिष्ठ प्रकारचा हुडुक्कावादक होय. मर्दल म्हणजेच मृदंग किंवा मुरज होय. मर्दलवादनात वादक, मुखरी, प्रतिमुखरी, व गीतानुग असे चार प्रकार वादकांचे दिले आहेत व मर्दलवादकाचे गुण व दोष सांगितले आहेत. ते असे –

"बोलांची स्पष्टता, सुरेखपणा, वादनाच्या अनुकरणातले प्रावीण्य, गोड व जोरदार अशा उभयविध वादनातील जाणकारी, हाताचा हलकेपणा, अवधान, श्रमाने थकून न जाणे, तोंडाने बोल म्हणण्यातील कौशल्य, रंजकता, हुडुक्कावादनाला अनुसरणे, यति–ताल–लय यांचे ज्ञान, गीताला अनुसरणे हे मर्दलवादकाचे गुण असून त्याच्या उलट स्वरूपाचे ते दोष होत." मर्दलवादकांचा वृंद मुख्यतः दोन, तीन व चार तज्ज्ञ मर्दलधारकांचा असे. वृंदातील मर्दलवादकांनी मुखरी (म्हणजे मुख्य वादक) याचे अनुसरण करायचे असे.

शार्ङ्गदेवाने पटह, मर्दल, हुडुक्का, करटा, घट, घडस, ढवस, ढक्का, कुडुक्का, कुडुवा, रुंजा, डमरु, डक्का, मंडिडक्का इत्यादी वाद्यांची रचना वर्णिली आहे. काही अवनद्ध वाद्यांचे भांडे धातूचेही असे. अवनद्ध वाद्यांच्या बाबतीत योजायचे योग्य लाकूड व चामडे यांचे सूक्ष्म तपशील त्याने दिले आहेत. प्राचीन काळी मृदंगाचे भांडे मातीचे असे. मध्यकालात ते लाकडाचे बनवले जाऊ लागले. बोलांच्या योजनेतील विविधताही विस्तृतपणे वाढली. मृदंग स्वरांत मिळविण्यासाठी बोहण नावाचे मिश्रण तोंडावरच्या चामड्यावर लावीत. भातात राख खूप मळून ते मिश्रण चिकणे झाल्यावर त्याचा पुरीसारखा गोळा डाव्या तोंडावर थापायचा असे. उजव्या तोंडावर हे बोहण थोडे थापायचे असे. या बोहणाच्या लेपामुळे मृदंगातून मेघासारखा गंभीर नाद उत्पन्न होई. सध्या मृदंगाच्या तोंडावर कणकीच्या गोळ्याचा लेप देतात, किंवा कायम टिकणारी शाई लावून त्या त्या स्वराला मृदंग मिळवितात. मृदंगवादनात प्रतिस्पर्ध्याला जिंकण्यासाठी योजायचे खास वादनप्रकारही 'वादका'च्या वर्णनात शार्ङ्गदेवाने दिले आहेत. दक्षिणेतील तालवाद्यांच्या कचेरीत (म्हणजे मैफिलीत) या प्रकारांचा प्रकर्ष सध्याही अनुभवाला येतो. शार्ङ्गदेवाने वर्णन केलेले अवनद्ध वाद्यांचे सर्व तपशील, मूळ संस्कृत ग्रंथाच्या मराठी भाषांतरावरून समजण्यासारखे असल्याने येथे थोडक्यात त्यांचे दिग्दर्शन केले आहे.

घनवाद्ये– टाळ व झांज ही वाद्ये प्राचीन काळापासून होतीच. कांस्यताल हे मध्ययुगीन वाद्य झांजेप्रमाणेच पण त्यापेक्षा मोठ्या आकाराचे होते. याशिवाय शार्ङ्गदेवाने घंटा, घर्घरिका (म्हणजे घुंगरु), जयघंटा, कम्रा, शुक्ति, पट्टवाद्य इत्यादी लोकवाद्य-स्वरूपाची घनवाद्येही वर्णिलेली आहेत. शेवटी रक्त, विरक्त इत्यादी दहा गुणांनी युक्त असणारे वादन व आठ प्रकारचे साम्य असणारे गुणयुक्त वादन सांगून, वादकाचे गुणदोष व हस्तगुण वर्णिले आहेत.

गांधर्वात योजायचे पात मध्ययुगीन देशी गायनवादनांत प्रचारात राहिले नाहीत. त्यामुळे आवाप, निष्काम इत्यादी निःशब्द पात न योजता टाळांच्या योगेच ताल दाखविला जाई. सध्या टाळी व खाली (हाताचा विक्षेप) यांनी ताल दाखवण्याचा प्रकार, हाताने ताल धरण्याच्या बाबतीत दिसून येतो. तालाची एक आवृत्ति संपल्यावर पुन्हा होणारा तालारंभ सध्याच्या हिंदुस्थानी संगीतात सम या नावाने जाणला जातो. पण या अर्थाने 'सम' हा शब्द संगीतरत्नाकरात दिसून येत नाही. तालांच्या नावातील अक्षरावरून मात्रासंख्या जाणण्याचा प्राचीन प्रकारही मध्यकाळात राहिलेला नाही. फक्त द्रुत, लघु, गुरु व प्लुत यांची योजना दिसून येते. ध्रुव हा पात ध्रुवमार्गात पूर्वी होता. लघु प्रमाणाचा एकच आघात असणारा आदिताल हा मध्यकाळातील आरंभीचा ताल होता. पडदे असणारी तंतुवाद्ये या काळात होती पण त्यात सितार किंवा सतार याचा निर्देश नाही. संगीतरत्नाकरात सारंगीचा निर्देश आहे पण तिचे सविस्तर वर्णन नाही. त्यामुळे ती सारंगी सध्याच्या सारंगीप्रमाणे होती की नाही हे ठरवता येत नाही. पक्षावज हे जे मृदंगाच्या जातीचे वाद्य या काळात होते त्याचे स्वरूप म्हणजे सध्या आढळून येणारे पखावज हे वाद्य असावे. मधुकरी हे वाद्य शहनाईसारख्या वाद्यांचे मूळ म्हणता येईल. तबला व तंबोरा यांचाही निर्देश संगीत-रत्नाकरात नाही.

× × × ×

संगीतरत्नाकरातील गायन व वादन यांचे मिळणारे स्वरूप पाहता, नाट्यशास्त्रा-तील प्राचीन गांधर्व व नंतरच्या काही शतकांतील प्राचीन देशी गायन–वादन हे मार्ग या प्रकारात शास्त्रपरंपरेनुसार वर्णिलेले असून, मध्ययुगातले देशी गायन तत्कालीन प्रचारानुसार दिले आहे हे स्पष्ट होते. शार्ङ्गदेवाने किंनरी वीणा व वंश यांतील देशी रागांचे वादन सांगताना आपले मतभेद स्पष्ट करून कोणते चुकीचे आहे हे विशद केले आहे. किंनरी व वंश यांवर वाजवायच्या रागांच्या वर्णनावरून वाद्य-संगीताचे स्वतंत्र असे स्वरूप प्रचारात होते हे कळते. जातिगायन, ग्रामराग-उपराग, भाषा, विभाषा इत्यादी प्राचीन प्रकारांतून विकसित झालेले राग, रागांग इत्यादी प्रकारचे देशी गायन व वादन विस्ताराने शार्ङ्गदेवाने विवेचिले आहे. जातींच्या मूर्च्छना बृहद्देशीत दिल्या आहेत. शार्ङ्गदेवानेही जातींच्या मूर्च्छना दिल्या आहेत व जातींची लक्षणे सांगून गीतासह प्रस्तार व विनियोग दिला आहे. त्यामुळे जातिगायनाची कल्पना येते. त्याने केलेल्या प्राचीन आचार्यांच्या मतांच्या निर्देशांवरून त्याचा व्यासंग सूक्ष्म असल्याचे कळते.

दत्तिलाने ध्रुवपात दिलेला नाही. पण शार्ङ्गदेवाने भरतमताला अनुसरून तो दिला आहे. नाट्य सांगायचे नसल्याने, त्याने नाट्यशास्त्रात आवश्यकपणे आलेला ध्रुवांविषयीचा विस्तीर्ण तपशील गाळला आहे. संगीतशास्त्र लक्ष्यप्रधान असल्याने त्याने तत्कालीन प्रचारातील वाद्ये व वाद्यप्रबंध वर्णिले आहेत. मतंगाला अनुसरून त्याने जातींच्या मूर्च्छना दिल्या आहेत. पण हे अनुसरण इतके आहे की मतंगाने षड्जकैशिकी जातीची मूर्च्छना दिली नसल्याने शार्ङ्गदेवानेही ती निर्देशिलेली नाही. मतंगाप्रमाणे त्याने जातींचा विनियोग व प्रस्तार दिला आहे. बृहद्देशीतील द्वादशस्वरमूर्च्छनांचा उल्लेखही त्याने केलेला नाही. यावरून त्याकाळी त्यांचा लोप झाला असावा असे म्हणता येते. संगीतरत्नाकरातील प्राचीन रागविषयक वर्णनाचा आधार बृहद्देशी असणे स्वाभाविकच आहे. श्रुति व स्वर यांचे लक्षण आणि षड्जसाधारण व मध्यमसाधारण यांचे स्वरूप त्याने अभिनवगुप्तमतानुसार दिले आहे. जातींच्या स्वरसंनिवेशानंतरची पद्ये, कपालगानांचे तपशील इत्यादी गोष्टी त्याच्यापूर्वी नान्यदेवाने सांगितलेल्या असल्याने शार्ङ्गदेवालाही त्या आधारभूत असणे साहजिक आहे. नान्यदेवाने केलेला पाणिकांचा विस्तार मात्र त्याने दिलेला नाही. गायकाचे शिक्षक, भावक इत्यादी पाच प्रकार, गायकाचे गुणदोष, देशी राग व प्रबंध, वाद्यप्रकार इत्यादींच्या बाबतीत त्याच्यावर सोमेश्वराचा प्रभाव असणे हे सहज शक्य आहे. मध्ययुगीन संगीतप्रचारात रागाविष्कारामध्ये स्थायांचे जे वैशिष्ट्यपूर्ण महत्त्व होते ते, शार्ङ्गदेवाने त्यांचे वर्णन अत्यंत विस्ताराने करून, स्पष्ट केले आहे. या स्थायांच्या नावांचे देशी भाषेतील स्वरूप तत्कालीन संगीतसमयसार या ग्रंथात मिळते. यावरून हा स्थायविषयक भाग संगीत-रत्नाकरात त्यावेळच्या लक्ष्यांमधून आला असल्याचे नक्की होते. तसेच या काळातील प्रचारात असलेली देशी तालांची लक्षणेही त्याने लक्ष्यांमधूनच घेतली असल्याचे स्पष्ट होते. अधुना प्रसिद्ध राग हे तर लक्ष्यातीलच होत. शार्ङ्गदेवाचा समकालीन विद्वान जायसेनापति याचा 'नृत्तरत्नावली' हा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. जायसेनापतीने त्यात आपल्या 'गीतरत्नावली'चा उल्लेख केला आहे. (नृ.र.पृ.१७२) हा ग्रंथ अद्याप उपलब्ध नाही. पण तो जर उपलब्ध झाला तर मध्ययुगीन संगीताचे स्वरूप कळण्यास निश्चित साहाय्यक होईल. शार्ङ्गदेवानंतरच्या संगीतराज, संगीतदामोदर, संगीतसार इत्यादी ग्रंथांवर संगीतरत्नाकराचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. संगीतशास्त्राखेरीजच्या इतर साहित्यातही संगीतरत्नाकरातील उद्धरणे आढळतात. उदा. माघकवीच्या शिशुपालवध या महाकाव्याच्या पहिल्या सर्गातील दहाव्या श्लोकावर टीका करताना मल्लिनाथाने श्रुति व स्वर या विषयीचे संगीतरत्नाकरातील श्लोक उद्धृत केले आहेत. (सं.र.१.३. २३,२४,२५) या उद्धरणात स्वरलक्षणात 'स्वतो' याऐवजी 'स्वनो' व 'श्रोतृचित्तं' या ऐवजी 'श्रोतुश्चित्तं' असा पाठभेद आढळतो. तसेच पंडितराज जगन्नाथाने आपल्या 'रसगंगाधर'[६९] या ग्रंथात रत्नाकरोक्त दोन उद्धरणे रसभावविचारामध्ये दिली आहेत.

---

६९. पाहा– पंडितराज जगन्नाथ याचा रसगंगाधर (खंड १), अनुवादक– प्रो. रा. ब. आठवले; टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, १९५३, पृ. ८१, ८२.

(सं. र. अड्यार आ. ७.१३६० व ७.१५१९, १५२०) पहिल्या उद्धरणातील दुसऱ्या ओळीत 'अचोद्यं' या ऐवजी जगन्नाथाने 'अचारु' असा पाठ दिला आहे.

शार्ङ्गदेवाची भाषा शास्त्रीय विषयाला अनुरूप अशी साध्या प्रकारची आहे. ग्रंथाच्या व अध्यायांच्या सुरवातीच्या आणि शेवटच्या (म्हणजे सातव्या अध्यायाच्या शेवटी आलेल्या) मजकुरात समासोक्ति, श्लेष, विशेषोक्ति, रूपक इत्यादी अलंकारांचा यथासंभव उपयोग त्याने केला आहे. विधि (१.७.५८), परिसंख्या (१.७.५९), नियम (६.३३६) हे मीमांसा-शास्त्रातील पारिभाषिक शब्द तो योजितो. सुवर्णकुण्डल व रज्जुभुजंगम हे वेदांतातील दृष्टान्त तो देतो. (१.२.११, १२) ग्रंथविस्तार होईल या भीतीने तो काही तपशील देत नाही. (उदा. मलपानंतरच्या वाद्यप्रबंधांचा प्रस्तार त्याने दिलेला नाही.) त्याने सुषिर-वाद्यांतील वंश-प्रकरणात यवाचा एकबत्तिसांश, किंवा एकसोळांश अथवा एकअष्टमांश या प्रमाणांचा केलेला समावेश गणिती हिशेबाला अनुसरून असला पाहिजे. प्रत्यक्ष व्यवहारात अशी प्रमाणे योजणे असंभवनीय आहे.

महाराष्ट्रासारख्या भारताच्या मध्य केन्द्रात, यादव राजांच्या भरभराटीच्या काळात तो झाला असल्याने उत्तरेकडील व दक्षिणेकडील देशोदेशीच्या गायक-वादकांच्या कला-विष्काराचा अनुभव घेण्याचा लाभही त्याला झाला असला पाहिजे.

मूर्च्छनेऐवजी रागांचे मेळ देऊन रागांचे वर्गीकरण करण्याची पद्धत मुख्यतः दक्षिणे-तील पंडितांनी पंधराव्या शतकापासून सुरू केली. दक्षिणेतील माधव विद्यारण्यांनी (१५ वे शतक) पंधरा जनक किंवा मेळ राग मानले. उत्तरेकडील लोचनकवींनी बारा मेळ जनक राग म्हणून सांगितले. सोळाव्या शतकातील रामामात्य या दक्षिणी पंडितांनी वीस जनक मेळ मानले. सतराव्या शतकातील वेंकटमखींनी बहात्तर मेळ सांगितले.

रागरागिणी ही पति-पत्नी स्वरूपाची कल्पना पं. दामोदर यांनी मांडली; (१६ व्या शतकाचा अखेरचा व १७ व्या शतकाचा आरंभाचा काल) पुंडरीक विट्ठल यांनी पुरुषराग, स्त्रीराग व पुत्रराग असे वर्गीकरण दिले; (१६ व्या शतकाचा अखेरचा व १७ व्या शतकाचा आरंभाचा काल). कोणत्या वेळी कोणते राग गायचे याचाही तपशील संगीत-शास्त्रग्रंथांत सांगितला गेला.

मेळ व रागरागिणीकल्पना यांचा निर्देश संगीतरत्नाकरात नाही. कल्लिनाथाने 'मेलन' हा शब्द वापरला आहे पण मेळपद्धती दिलेली नाही. मेळपद्धतीचा प्रभाव सुरू होण्यापूर्वीचा संगीतरत्नाकर हा ग्रंथ आहे हे निश्चित. हिंदुस्थानी अथवा उत्तरीय व कर्नाटक अथवा दाक्षिणात्य अशा दोन प्रमुख गायनपद्धती सध्या भारतीय संगीतात प्रचलित आहेत. "अकराव्या शतकापासून भारतीय संगीतावर इराणी व अरब संगीताचा प्रभाव पडू लागला व 'इंद्रप्रस्थमत' म्हणून संगीतातील एक नवीन परंपरा सुरू झाली. इराणी संगीतातील मुकामांच्या धर्तीवर भारतीय रागांचे वर्गीकरण, देशी व परदेशी बंदिशींचे मिश्रण करून व त्याला भारतीय नाव देऊन नवे राग तयार करणे, जुनी भारतीय रागनामे कायम ठेवून

रागांच्या नवीन बंदिशी तयार करणे इत्यादी या मताची वैशिष्ट्ये होत. दक्षिणेतही, बहामनी राज्याची स्थापना १३४७ साली झाल्यावर मुसलमानांची संगीतकला पसरू लागली. विद्यारण्यांचा हेजुज्जी मेळ या गोष्टीचा निदर्शक आहे. हे परिवर्तन तेराव्या शतकानंतर सुरू झाले व त्यामुळे संगीताच्या कर्नाटक व हिंदुस्थानी अशा दोन शाखा झाल्या." वरील अवतरण चिन्हात दिलेल्या आशयाचे विचार डॉ. चैतन्य[७०] देव व इतर काही विद्वानांनी मांडले आहेत. याच बाबतीत मांडला जाणारा आणखी एक विचार म्हणजे मुसलमानांच्या शासनकालात उत्तरभारतीय संगीतावर इराणी व अरबी संगीताचा प्रभाव पडून त्याचे वेगळे स्वरूप झाले व दाक्षिणात्य संगीतावर तसा प्रभाव न पडल्याने मूळचे भारतीय संगीताचे स्वरूप दाक्षिणात्य पद्धतीतच राहिले. हे दोन्ही प्रकारचे विचार संपूर्णपणे सयुक्तिक वाटत नाहीत. कारण अरबी व इराणी संगीतपद्धती बह्वंशी भारतीय संगीताच्या आविष्कारातूनच विकसित झाल्या असेही दिसून येते. अर्थात हे मान्यच करायला हवे की मुस्लीम शासन कालात मुस्लीम गायकांनी काही नव्या रागरचना निर्माण करून उत्तर भारतीय संगीतात मोलाची भर टाकली तसेच काही मुस्लीम शास्त्रकारांनीही ग्रंथरचना केली.

अमीर खुस्रौने (खि. उ. तेरावे शतक) गोपालनायकाच्या प्रभावाखाली ख्याल-गायन निर्माण केले तसेच सतार व तबला ही वाद्येही त्यानेच निर्माण केली हे मत आता विद्वान मान्य करीत नाहीत. मध्ययुगातील प्रबंधगायनामधील ध्रुवप्रबंधाचा विशेष आविष्कार निर्माण करून ग्वाल्हेरराजा मानसिंग तोमर याने ध्रुपद गायन लोकप्रिय केले (खि. उ. १६ व्या शतकाचा उत्तरार्ध). नंतरच्या प्रख्यात गायकांपैकी बहुतेकांनी आरंभी ध्रुपदगायनात प्रावीण्य मिळविलेले होते. अठराव्या शतकातील मुहमदशहा रंगीले याच्या काळात ध्रुपदाचे थोडे ललित व आकर्षक स्वरूप योजून न्यामतखान ऊर्फ सदारंग व अदारंग यांनी ख्याल निर्माण केले. 'ख्याल' या शब्दाच्या अर्थानुसार कलाकाराच्या कल्पकतेला ख्यालगायनात अधिक वाव असतो. ध्रुपदाचा साचा स्वर-पद-ताल निबद्ध व नियमित असा असल्याने त्यात कल्पकतेला तसा वाव नव्हता. याच काळात, रुद्रवीणा हाताळण्यास कठीण म्हणून न्यामतखानाचा भाऊ फकीर खुसरूने सितार हे वाद्य निर्माण केले. ख्यालगायनाला पोषक अशा तबला या वाद्याचा जन्मही याच काळात झाला.

सारंगीसारख्या तंतुवाद्यांच्या साथीमुळे मींडयुक्त अशी स्वरयोजना प्राधान्याने असणारा विलंबित लयीने युक्त असा रागगायनाचा आविष्कार उत्तर भारतीय अर्थात हिंदुस्थानी संगीतात दिसून येतो तर कंपयुक्त गमकप्रधान अशी स्वरयोजना व ताल व लय यांची गतिमानता असणारा रागगायनाचा आविष्कार दाक्षिणात्य अर्थात कर्नाटक पद्धतीत दिसून येतो. भारतीय संगीताच्या या दोन्ही शैलीत खरा फरक तालाच्या आविष्कारांबाबत दिसून येतो. हिंदुस्थानी संगीतात तालाच्या मात्रांचे बोल योजून ताल सांगितला जातो. उदा.

---

७०. पहा—'Musical Instruments of India'—by Dr. B. C. Deva, PP. 21-23.

त्रितालातील सोळा मात्रा, धाधिंधिंधा धाधिंधिंधा धातिंतिंता ताधिंधिंधा अशा बोलांनी दाखविल्या जातात. तालाचे एक आवर्तन पुरे झाल्यावर पुन्हा जी तालाची आरंभीची मात्रा असते ती सम म्हणून म्हटली आहे. गायन-वादनात समेवर अचूकपणे येणे याला हिंदुस्थानी संगीतात फार महत्त्व आहे. कर्नाटक पद्धतीत तालदृष्ट्या गीताच्या आरंभाला फार महत्त्व असते व ताल लघु, द्रुत, अनुद्रुत किंवा विराम यांनी सांगितला जातो. दक्षिणेतील तालपद्धति संगीतरत्नाकरातील तालपद्धतीला जवळ असल्याचे दिसून येते.

शार्ङ्गदेवाने रागविषयक सविस्तर निरूपण सोदाहरण व स्वरलिपि देऊन योग्यप्रकारे केले आहे. जातिगायन व रागगायन यांचे स्वरलिपीसह विवरण नान्यदेवानेही दिले आहे. पण स्वरलिपीतील मंद्र-मध्य-तार स्वरांची योजना सुस्पष्टपणे शार्ङ्गदेवाने दिली आहे. भरत-निर्दिष्ट मागधी इत्यादी चार गीतींचे स्वरूपही त्याने याप्रमाणेच स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्राचीन मार्ग प्रकारचे जातिगायन व गीतिगायन तसेच मध्ययुगीन देशी प्रकारचे रागगायन यांचे स्वरूप व्यवस्थितपणे कळण्यासाठी संगीत रत्नाकराचे अध्ययन अनिवार्य आहे. तालाच्याही बाबतीत प्राचीन मद्रक इत्यादी चौदा गीतांचे मार्ग स्वरूपाचे ताल शार्ङ्गदेवाने दिले असून देशी तालही तत्कालीन प्रचारानुसार दिले आहेत. मध्ययुगीन संगीत सांगत असताना त्याने पूर्वप्रसिद्ध व त्या काळचे प्रसिद्ध राग दिले असल्याने रागगायनातील प्राचीन मार्गस्वरूप व तत्कालीन देशी स्वरूप याचा उलगडा होतो. वाद्यांचेही तपशील त्याने विवेचकपणे दिले आहेत. किन्नरीवीणेच्या वादनात तसेच वंशवादनात त्याने काही रागांचे वादन सांगितले आहे व लक्षण आणि लक्ष्य यांतील भेद दिला आहे. वंशाच्या बाबतीत त्याने स्वतःची विद्या शाङ्र्गविद्या म्हणून सांगितली आहे. मध्ययुगीन मार्ग व देशी अशा उभयविध गायनवादनाचे स्वरूप माहीत होण्यासाठी संगीतरत्नाकर हा ग्रंथ अत्यंत प्रमाणभूत ठरला आहे.

मेल (अर्थात मेळ) किंवा थाट यावरून केलेले रागांचे वर्गीकरण, मूर्च्छनापद्धतीचा अभाव, नवीन रागनामे, हिंदुस्थानी व कर्नाटक या दोन पद्धतींचा आविष्कार इत्यादी गोष्टी भारतीय संगीतामध्ये, संगीतरत्नाकरानंतर आढळतात. मध्ययुगीन भारतीय संगीताचे जे दर्शन संगीतरत्नाकरात मिळते ते हिंदुस्थानी व कर्नाटक या दोन भिन्न शैलींचा आविष्कार निर्माण होण्यापूर्वीचे असल्याने ऐतिहासिक दृष्ट्या संगीतरत्नाकर या ग्रंथाचे मध्यवर्ती टप्प्यावर असणारे स्थान निश्चितच महत्त्वाचे आहे.

शाङ्र्गदेवाने प्रत्यक्ष उद्धृत केलेले पूर्वाचार्य–

नारद– (१. ४. ५, १. ४. २२)
भरत– [१. ७. २१; ५. ७५, ९१, १०१, २०४, (मुनि–) २२६; ६.२२०]
कम्बल व अश्वतर–(१. ७. २२); कम्बल– (१. ८. १३)
मतंग– (२. १. ४४, २. २. १७७, ४. ४१, ६. ६५३, ६. ११०८);
बृहद्देशी– (२. १. ४२)

याष्टिक– (२. १. २१, २. १. ४५)
दुर्गाशक्ति– (२. २. ६५)
कश्यप– (२. २. ६४)
सोमेश्वर– (४. ३६)
दत्तिल– (५. ७४, १००, ११९, १४२)
विशाखिल– (५. ९०, १११; ६. १८२)
याज्ञवल्क्य– (६. ४२१)
कीर्तिधर– (६. ४६०)
नन्दिकेश्वर– (६. ८४०)

संगीतरत्नाकरात निर्दिष्ट भौगोलिक प्रदेश, लोक व भाषा–

भौगोलिक प्रदेश–

अ० २ प्रकरण १ श्लो० १९ ते ४६; अ० ३ श्लो० २२०, २२१; अ० ४ श्लो. १८७, १८८.

सौवीर – (सिंधप्रांत)
सौराष्ट्र – (काठेवाड)
गान्धार – (भारत व इराण यामधील प्रदेश; पुरुषपूर (पेशावर) व तक्षशिला या राजधान्या)
काम्भोज – (अफगाणिस्थानचा उत्तर भाग)
सिन्धु – (सिन्धु नदीच्या उत्तरेकडील काठावरचा प्रदेश)
द्रविड – (कृष्णेच्या दक्षिणेकडील प्रदेश; कांची ही राजधानी)
कुन्तल – (चोल देशाच्या उत्तरेकडील प्रदेश, अर्थात हैदराबादच्या नैऋत्येकडील प्रदेश; यालाच कर्णाट असेही नाव होते)
विदर्भ किंवा वराट } (वऱ्हाड)
पाञ्चाल – (यमुना व गंगा यांमधील प्रदेश)
लाट – (दक्षिण गुजराथ)
गौड – (उत्तर बंगाल)
गुर्जर – (गुजराथ)
कोंकण – (कोकण प्रदेश)
महाराष्ट्र – (विदर्भ व कोंकण सोडून बाकीचा महाराष्ट्र)
आन्ध्र – (आन्ध्र प्रदेश)
हम्मीर – (?) (मेवाडचा शेवटचा चौहान राजा हम्मीर हा तेराव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला एवढी माहिती हम्मीर या नावाविषयी इतिहासात मिळते.)

चोल – (कावेरीच्या किनाऱ्यावर, म्हैसूर राज्याच्या दक्षिणेकडील प्रदेश; याची कांचीपुर ही एक राजधानी होती. या प्रदेशाचे नंतर कर्णाटक हे नाव मिळते.)

मलय – (मलयपर्वताच्या दक्षिणेस, म्हैसूरच्या दक्षिण भागापासून त्रावणकोरच्या पूर्वेकडील सीमेपर्यंत)

मालव – (माळवा, राजधानी उज्जयिनी)

अंग – (गंगेच्या पूर्व किनाऱ्यावरील प्रदेश)

वंग – (पूर्व बंगाल)

कलिंग – (ओरिसाच्या दक्षिणेस गोदावरी नदीच्या मुखापर्यंतचा प्रदेश)

आभीर – (गुजराथचा आग्नेय भाग, तापी ते देवगड यामधील प्रदेश)

लोक – शक, आभीर, तुरुष्क (तुर्क), द्रविड, गुर्जर इ०

भाषा – (अ० ४ श्लो. ११४ व ३०४) कर्णाटभाषा, लाटभाषा, गौडभाषा, आन्ध्रभाषा, द्रविडभाषा, महाराष्ट्रभाषा इ०

संगीतरत्नाकराच्या अध्याय १ ते ६ यांतील एकूण श्लोकसंख्या –

अध्याय १ – प्र. १ – ४८½, प्र. २ – १६७½, प्र. ३ – ५९½, प्र. ४ – ९१, प्र. ५ – १०½, प्र. ६ – ६४, प्र. ७ – ११४½, प्र. ८ – २५ = एकूण ५८०½

अध्याय २ –	प्र. १–४७, प्र. २ – १९४	=	,, २४१
अध्याय ३ –	——	=	,, २२३
अध्याय ४ –	——	=	,, ३८०
अध्याय ५ –	——	=	,, ४०८½
अध्याय ६ –	——	=	,, १२२०
			३०५३

या प्रस्तावनेतील ' शार्ङ्गदेव व संगीतरत्नाकराचे टीकाकार ' हा भाग लिहिण्यात मला अड्यार आवृत्तीच्या पहिल्या भागातील प्रस्तावनेचा मुख्यतः उपयोग झाला हे मी कृतज्ञपणाने नमूद करतो. ' शार्ङ्गदेवाने निर्देशिलेले पूर्वाचार्य ' हा भाग लिहिण्यात डॉ. प्रेमलता शर्मा यांनी संपादित केलेल्या ' संगीतराज भाग १ ' यामधील परिशिष्ट ३ याचा बराच उपयोग झाला. तसेच डॉ. राघवन् यांच्या, जायसेनापतिविरचित नृत्तरत्नावलीच्या प्रस्तावनेचाही उपयोग झाला. या दोघांचे ऋण मी कृतज्ञतापूर्वक निर्दिष्ट करतो. ही प्रस्तावना लिहिण्यात 'Saṅgīta-ratnākara of Śārṅgadeva Vol. 1 या ग्रंथातील Introduction ' या भागाचा मला उपयोग झाला. ही ' Introduction ' डॉ. प्रेमलता शर्मा यांची आहे. मी डॉ. शर्मा यांचा कृतज्ञतापूर्वक निर्देश करतो.

पहिल्या भागातील चार अध्यायांत गायनविषयक विचार आला आहे व या दुसऱ्या भागात ताल व वाद्य या अनुक्रमे पाचवा व सहावा या दोन अध्यायांचा समावेश केला

आहे. अशा रीतीने या दोन भागांत गायन-वादन हा विषय पूर्ण झाला आहे. पहिल्या भागाप्रमाणेच, मूळ संस्कृत ग्रंथ, त्याचे मराठी भाषांतर, नंतर कल्लिनाथाच्या टीकेचा संपूर्ण आशय व शेवटी टीपांत सिंहभूपालाच्या टीकेचा आवश्यक तेवढा आशय आणि भाषांतरकर्त्याच्या टीपा या क्रमाने हाही भाग सादर केला आहे. आवश्यक तेथे पाठभेद चर्चा केली आहे व संगीतसारामृत, संगीतदर्पण आणि आनन्दाश्रम आवृत्ति इत्यादी ग्रंथांच्या साहाय्याने पाठ निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे.

मूळ ग्रंथाचे भाषांतर करताना व टीकांचा आशय देताना स्पष्टतेसाठी आवश्यक असणारा अधिक मजकूर कंसात घातलेला आहे. संगीतरत्नाकरातील संदर्भ देताना मी अनुवादित केलेल्या आवृत्तीचा उपयोग केला आहे. अध्यायात प्रकरणे असल्यास संदर्भातील आकडयांचा क्रम अध्याय, प्रकरण व श्लोक असा आहे व प्रकरणे नसल्यास अध्याय व श्लोक असा आहे. जेथे संदर्भ अड्यार किंवा आनंदाश्रम आवृत्तीतले आहेत तेथे तसे नमूद केले आहे.

शेवटी शार्ङ्गदेवाने सविस्तर वर्णिलेल्या वाद्यांची रेखाचित्रे दिली आहेत. त्यांसाठी भारतीय मध्ययुगीन शिल्पांत आढळून येणाऱ्या वाद्यांचा आधार घेतला आहे. या रेखाचित्रांच्या बाबतीत शार्ङ्गदेववर्णित वाद्यांची स्थूलमानाने कल्पना यावी एवढाच मर्यादित उद्देश आहे. वंशांच्या प्रकारांत एकवीर आणि मनु हे दोनच वंश दिले आहेत. त्यावरून इतर प्रकारांची कल्पना येऊ शकेल. स्वरूपाने सारख्या असणाऱ्या पण आकारात फक्त लहानमोठा फरक असणाऱ्या वाद्यांची रेखाचित्रे काही वेळा दिलेली नाहीत. उदा. निःसाण व तुंबकी यांतील तुंबकीचे चित्र दिलेले नाही. एकवीर वंश इत्यादी सुषिरवाद्ये व ताल इत्यादी घनवाद्ये व भाण आणि झल्लरी ही अवनद्ध वाद्ये यांच्या बाबतीत सोयीसाठी आठ इंचांस एक इंच तसेच डक्कुलीच्या बाबतीत बारा इंचास एक इंच असे प्रमाण घेतले असून इतर वाद्यांच्या बाबतीत सोळा इंचास एक इंच असे प्रमाण घेतले आहे. शार्ङ्गदेवाने वर्णिलेल्या वाद्याचे स्वरूप जेथे नीट कळले नाही तेथे चित्र दिलेले नाही. उदा. निःशंक-वीणा. पिनाकीवीणेचे चित्र भारतीय शिल्पांत आढळून येणाऱ्या एका वाद्याच्या आधाराने दिले असले तरी त्यात संदेहाला जागा आहे. नकुल, त्रितन्त्रिका, चित्रा, विपञ्ची व मत्त-कोकिला या ततवाद्यांच्या बाबतीत शार्ङ्गदेवाने अनुक्रमे २, ३, ७, ९ आणि २१ अशी तारांची संख्याच फक्त सांगितली आहे. त्यावरून त्यांच्या स्वरूपाचा बोध होत नाही. मी व सौ. तारळेकर यांनी लिहिलेल्या 'Musical Instruments in Indian Sculpture' या पुस्तकात भारतीय शिल्पांत आढळणाऱ्या दोन व तीन तारा असणाऱ्या वीणांची चित्रे दिली आहेत. नाट्यशास्त्रातील सात तारा असणारी चित्रावीणा व नऊ तारा असणारी विपंची वीणा या दोन्ही धनुष्याकृति वीणा होत्या. धनुष्याकृति वीणा मध्ययुगात प्रचारात राहिलेल्या नव्हत्या. त्यामुळे त्यांचे कोणते स्वरूप शार्ङ्गदेवाला विवक्षित आहे ते कळत नाही. मत्तकोकिळा ही वीणा स्वरमंडळाच्या स्वरूपाची असल्याचे नंतरच्या शास्त्रकारांनी तिचे जे वर्णन केले आहे त्यावरून म्हणता येते. नकुल इत्यादी या पाच वीणांच्या स्वरूपासंबंधी

जिज्ञासूंनी 'Musical Instruments in Indian Sculpture' या पुस्तकातील पृष्ठे १८, ३४ व ४२ ही कृपया पहावीत. दुन्दुभि व निःसाण यांच्या बाबतीत प्रमाण योजलेले नाही.

ही रेखाचित्रे शार्ङ्गदेवाने दिलेल्या प्रमाणानुसार सुबकपणे काढून देण्याचे काम सौ. नलिनी तारळेकर यांनी उत्साहाने केले. त्यांचे आभार मानलेले त्यांना आवडणार नसल्याने त्याबद्दलची कृतज्ञता फक्त व्यक्त करतो.

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळाने हे काम माझ्याकडे सोपविले याबद्दल मंडळाचा मी ऋणी आहे. तसेच प्राज्ञ प्रेस, वाई यांनी छपाईचे काम अत्यंत परिश्रमपूर्वक करून ते सुबकपणाने पार पाडले यासाठी प्राज्ञ प्रेसचे व्यवस्थापक व कर्मचारी यांचाही मी आभारी आहे.

काळजीपूर्वक प्रयत्न करूनही काही अशुद्धीचे दोष राहिले आहेत. त्याकरिता शेवटी दिलेले शुद्धिपत्रक वाचकांनी कृपया अवश्य पहावे अशी नम्र प्रार्थना आहे. संगीतप्रेमी रसिक विद्वान माझ्या या प्रयत्नाकडे सहृदयतेने बघतील अशी आशा आहे.

प्रोफेसर कॉलनी, देवपूर, धुळे.
चैत्र शुद्ध प्रतिपदा, शके १९०१
दि. २८-३-१९७९

ग. ह. तारळेकर

ब. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
मंचाल ब.

श्रीनिःशङ्कशार्ङ्गदेवप्रणीतः

संगीतरत्नाकरः

पञ्चमस्तालाध्यायः

नानामार्गैर्लयो यत्र यतीनां[1] स्यात्कलानिधौ ।
तं दक्षिणं शिवं नौमि चित्रं वृत्तिमयं ध्रुवम् ॥ १ ॥

श्रीनिःशङ्कशार्ङ्गदेवविरचित

संगीतरत्नाकर

पाचवा अध्याय – ताल

ज्या कलानिधी (शंकरामध्ये) नाना मार्गांनी यतींचा लय होतो, त्या नित्य, दक्षिण, चित्र आणि वृत्तिमय शिवाला मी स्तवितो. (१)

क० प्रबंधाचे अंग म्हणून प्राप्त होणाऱ्या (व) गायन, वादन आणि नृत्य या तिन्हींना आधारभूत असणाऱ्या तालाचे लक्षण देणारा ग्रंथकार, समान विशेषणांनी त्या (तालाचा) बोध करून देत, प्रकरणाच्या आरंभी इष्ट देवतेची स्तुति करीत आहे–

सुधाकर टीका— ' चित्रवृत्तिमयं ' असा पाठ सु० टीकेत आढळतो.

(मुख्यार्थ जी शंकराची स्तुति तिच्यात योजलेल्या विशेषणांचे स्पष्टीकरण) – दक्षिण म्हणजे दाक्षिण्ययुक्त अर्थात भक्तांच्या बाबतीत वत्सल; चित्रवृत्तिमय म्हणजे विचित्र असा जगाची उत्पत्ति, स्थिति व संहार इत्यादी कार्य करणारा व्यापार, त्याने प्रचुर; थकलेल्याच्या प्रयत्नात प्रचुरता संभवत नसल्याने येथे शंकराचे नित्यत्व (स्पष्ट होते) त्यामुळे नित्य प्रयत्नयुक्त असा अर्थ; ध्रुव म्हणजे नित्य; यती म्हणजे नियमयुक्त संन्यासी, तसेच स्वधर्मात तत्पर असणारे गृहस्थही होत. कारण श्रुति सांगते–

' न्यायाने धन प्राप्त करून घेणारा, तत्त्वज्ञानात तत्पर असणारा, अतिथिप्रिय, (पितरांची) श्राद्धे करणारा व सत्य बोलणारा गृहस्थही (संसारापासून) मुक्त होतो. '

आपापला जो स्वधर्म त्या स्वरूपाच्या मार्गांनी विशेष अशा ध्यानाने या यतींचा त्या कलानिधि शंकरामध्ये लय होतो. चंद्रकलेचा आश्रय असल्याने शंकराला कलानिधि म्हटले आहे.

तालविषयक अर्थ घेताना ' दक्षिण, चित्र, वार्तिक व ध्रुव अशा चार प्रकारच्या कल्याणदायक मार्गाची मी स्तुति करतो ' असे ध्यावयाचे. यतींचा नानामार्गांनी म्हणजे अनेक प्रकारांनी दिसून येणारा असा जो द्रुत, मध्य व विलंबित नावाचा लय तो ज्या मार्गात असतो तसेच तालव्यापारस्वरूपाच्या कलांचा जो आश्रय अशा त्या (मार्गांची मी स्तुति करतो.).

---

१. यतींचे स्पष्टीकरण देताना कल्लिनाथाने अष्टांगयोगाचा उल्लेख केला आहे. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि ही योगाची आठ अंगे होत.

[सूचित होणारा अप्रस्तुत असा दुसरा अर्थ :– नाना मार्गांनी ज्यात यतींचा लय होतो त्या, कलांचा आश्रय असणाऱ्या व (मार्गभिन्नतेने) दक्षिण, चित्र, वृत्तिमय व ध्रुव (अशी नावे धारण करणाऱ्या) मंगल अशा (तालाला) मी स्तवितो. (१)]

शिवाच्या संदर्भात 'कला' या शब्दाने शंकराच्या ठिकाणी असणाऱ्या शक्ती सांगितल्या आहेत. किरण इत्यादी आगमग्रंथांत तसे म्हटलेच आहे –

"निवृत्ति, प्रतिष्ठा, विद्या, शान्ति तसेच शान्त्यतीता अशा पाच प्रकारच्या कला ज्ञात्यांनी सांगितल्या आहेत."

त्याचप्रमाणे श्वेता इत्यादी इतर पुष्कळ कलाही त्याच ग्रंथात सांगितलेल्या आहेत. त्या सर्व कला त्याच्यामध्ये निहित असल्याने शिवाला कलानिधि असे म्हटले आहे. यती म्हणजे यम, नियम इत्यादी अष्टांगयोगात तत्पर असलेले मुमुक्षू होत. नाना मार्गांनी म्हणजे सांख्य, योग इत्यादी ईश्वरप्राप्तीच्या अनेक साधनांनी त्या मुमुक्षूंचा शंकराच्या ठिकाणी लय म्हणजे अंतर्भाव होतो. अर्थात परमात्मा अशा शिवाशी ते एकरूप होतात. दक्षिण म्हणजे शिवाची दक्षिणामूर्ति होय. नावाचा निर्देश येथे नावाच्या एका भागाने केलेला आहे असे जाणावे; जसे भीमसेनाचा भीम असा निर्देश किंवा सत्यभामेचा भामा असा निर्देश केला जातो. चित्र म्हणजे प्रपंचरूपाने विविध स्वरूपाचा. विषयांसहित असणारी ज्ञाने 'वृत्ति' या शब्दाने सांगितली आहेत. शिव वृत्तिमय आहे म्हणजे ज्ञानाकार आहे. तो उपाधिरहित असल्याने ध्रुव म्हणजेच नित्य आहे. अशा त्या शिवाची मी स्तुती करतो. (हा या श्लोकाचा मुख्य अर्थ होय.) याच योजलेल्या विशेषणांनी सूचित होणारा 'तालविषयक' दुसरा अर्थ असा– 'कलानिधि' या विशेषणामधल्या कला या शब्दाने पुढे सांगितल्या गेलेल्या आवाप इत्यादी निःशब्द व ध्रुव इत्यादी सशब्द कला सांगितल्या आहेत. या कलांचा आश्रय तो कलानिधि होय. यती म्हणजे पुढे सांगितल्या गेलेल्या समा, स्रोतोवहा व गोपुच्छा या तीन यती होत. पुढे सांगितले गेलेले ध्रुव इत्यादी नाना मार्ग होत. लय म्हणजे विश्रान्ति होय. मार्गांच्या वेगळेपणाप्रमाणे दक्षिण, चित्र, वृत्तिमय व ध्रुव अशी नावे धारण करणाऱ्या शिव म्हणजे मंगल अशा त्या तालाची मी स्तुति करतो. यावरून या श्लोकात समासोक्ति अलंकार साधल्याचे दिसून येते. 'समान विशेषणे योजून जेव्हा अप्रस्तुत असा (दुसरा) अर्थ सूचित होतो तेव्हा ती समासोक्ति होय;' असे समासोक्ति या अलंकाराचे लक्षण (अलं. सू. ३१) दिले आहे.

या स्तुतिपर श्लोकात प्रस्तुत अर्थ शिव हा असून अप्रस्तुत अर्थ ताल हा आहे.

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह हे पाच यम म्हणून सांगितले आहेत. शुचिता, संतोष, तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान इत्यादी नियम होत. आसन व प्राणायाम यांचा अर्थ स्पष्टच आहे. बाह्य विषयांपासून इंद्रिये परावृत्त करून अंतर्मुख होणे म्हणजे प्रत्याहार होय. चित्त एका ठिकाणी स्थिर करणे म्हणजे धारणा होय. तेथेच जाणिवेची एकतानता म्हणजे ध्यान होय. (बाह्यविषयशून्य अशी) ध्यानविषयामध्ये चित्ताची संपूर्ण एकाग्रता म्हणजे समाधि होय.

अथ तालः —

[२]तालस्तलप्रतिष्ठायामिति धातोर्घञि स्मृतः ।
गीतं वाद्यं तथा नृत्तं यतस्ताले प्रतिष्ठितम् ॥ २ ॥
कालो लघ्वादिमितया क्रियया संमितो मितिम् ।
गीतादेर्विदधत्तालः स च द्वेधा बुधैः स्मृतः ॥ ३ ॥
मार्गदेशीगतत्वेन तत्राद्यस्य क्रिया द्विधा ।
निःशब्दा शब्दयुक्ता च निःशब्दा तु कलोच्यते ॥ ४ ॥

आता ताल–

स्थिरपणाने स्थापित असणे या अर्थाच्या 'तल्' या धातूला (आद्य स्वराची वृद्धि होऊन) (अधिकरण या अर्थी) 'अ' प्रत्यय लागून 'ताल' हे शब्दरूप (व्याकरण-शास्त्रात) सांगितले आहे. कारण गीत, वाद्य तसेच नृत्त तालामध्ये स्थिरपणाने स्थापित होते. (२)

लघु इत्यादी प्रमाणाच्या क्रियेने मापला जाणारा (व) गीत इत्यादींचे परिमाण धारण करणारा काल (म्हणजे) ताल होय. तो ज्ञात्यांनी दोन प्रकारचा सांगितला आहे. (३)

मार्ग व देशी या संबंधामुळे (दोन प्रकारच्या असणाऱ्या तालांपैकी) पहिल्याची क्रिया निःशब्द व शब्दयुक्त अशी दोन प्रकारची आहे. निःशब्द (क्रिया) कला म्हटली जाते. (४)

क० आता ताल या शब्दाची व्युत्पत्ति ग्रंथकार देत आहे. प्रतिष्ठा या अर्थी असणाऱ्या 'तल्' धातूपासून, 'पद्, रुज्, विश्, स्पृश् या धातूंना घञ् म्हणजे 'अ' प्रत्यय लागतो' (पा. ३–३–१६) असे अनुवृत्त झाल्यावर, 'संज्ञा हा अर्थ असता जर ती संज्ञा कर्ता म्हणून क्रियेशी संबद्ध नसेल तर (घञ् हा प्रत्यय धातूला लागतो)' (पा. ३–३–१९) या सूत्राने अधिकरण म्हणजे स्थान या अर्थी 'घञ्' प्रत्यय लागून 'ताल' हे शब्दरूप सिद्ध होते. (२)

तालाचे स्वरूप वर्णन करण्यासाठी सांगत आहे –

'लघु इत्यादी' यातील 'इत्यादी' या शब्दाने द्रुत, गुरु व प्लुत हे यथासंभव घ्यायचे. 'लघु' या कालप्रमाणाच्या दृष्टीने द्रुत हे कालप्रमाण थोडे असल्याने 'द्रुत इत्यादी' असे म्हणणे जरी योग्य असले तरी 'लघु इत्यादी' असे म्हटले आहे. असे म्हणण्याचे कारण म्हणजे मार्ग व देशी या दोन्ही तालांसंबंधी साधारणपणे सांगता यावे हे आहे असे जाणावे. नाहीतर मार्गतालाचे

---

२. सुधाकर टीकेत 'तल्यते प्रतिपाद्यते गीतं, नृत्तं वाद्यं च यस्मिन्' म्हणजे : ज्यात गीत, नृत्य व वाद्य प्रतिपादले जाते तो (ताल होय)' असे ताल या शब्दाचे स्पष्टीकरण दिले आहे. कल्लिनाथाने दिलेल्या पा० ३–३–१६ या सूत्राने पद्, रुज्, विश्, स्पृश् यानंतर घञ् म्हणजे अ प्रत्यय येऊन पाद, रोग, वेश, स्पर्श असे शब्द तयार होतात.

स्यादावापोऽथ निष्क्रामो विक्षेपश्च प्रवेशकः ।
निःशब्देति चतुर्धोक्ता सशब्दापि चतुर्विधा ॥ ५ ॥
ध्रुवः शम्या ततस्तालः संनिपात इतीरिता ।
पातः कला तु सा ज्ञेया तासां लक्ष्माभिदध्महे ॥ ६ ॥
आवापस्तत्र हस्तस्योत्तानस्याङ्गुलिकुञ्चनम् ।
निष्क्रामोऽधस्तलस्य स्यादङ्गुलीनां प्रसारणम् ॥ ७ ॥
क्षेपो दक्षिणपार्श्वस्योत्तानस्य प्रसृताङ्गुलेः ।
विक्षेपोऽधस्तलस्यास्य प्रवेशोऽङ्गुलिकुञ्चनम् ॥ ८ ॥
ध्रुवो हस्तस्य पातः स्याच्छोटिकाशब्दपूर्वकः[३] ।
शम्या दक्षिणहस्तस्य तालो वामकरस्य तु ॥ ९ ॥

आवाप, निष्क्राम, विक्षेप आणि प्रवेशक अशी निःशब्द (कला) चार प्रकारची सांगितली आहे. सशब्द (क्रियाही) चार प्रकारची आहे. (५)

ध्रुव, शम्या, नंतर ताल (आणि) संनिपात अशी ती सांगितली आहे.

ती (सशब्द क्रिया) पात व कला अशी (दोन्ही नावे असलेली) जाणावी. त्यांचे लक्षण सांगतो. (६)

त्यांतील आवाप म्हणजे उताण्या हाताची (पसरलेली) बोटे आकुंचित करणे. निष्क्राम म्हणजे पालथ्या हाताची बोटे पसरणे. (७)

बोटें पसरलेला असा उताणा हात उजव्या बाजूला फेकणे म्हणजे विक्षेप होय. तोच पालथा योजून बोटे आकुंचित करणे म्हणजे प्रवेश होय. (८)

चुटकी वाजवून हात खाली आणणे म्हणजे ध्रुव होय. उजव्या हाताने टाळी वाजवणे म्हणजे शम्या (व) डाव्या हाताने टाळी वाजवणे म्हणजे ताल होय. (९)

लक्षण दिले गेले नसते. कारण मार्गतालात द्रुताचा प्रयोग नसतो. त्या लघु इत्यादींनी मोजलेली म्हणजे त्यांच्याएवढ्या प्रमाणाची निःशब्द व सशब्द अशी दोन प्रकारची जी क्रिया त्या क्रियेने मापलेला काल ताल होय. 'गीत इत्यादी' यांतील इत्यादी या शब्दाने वाद्य व नृत्त हे घ्यावयाचे. अशा प्रकारचा विशेष काल हाच ताल या शब्दाचा मुख्य अर्थ होय. काशापासून बनवलेला घनवाद्याचा जो (ताल नांवाचा) प्रकार तो आपल्या नादाने या तालाची अभिव्यक्ति करीत असल्याने लक्षणेने तशाप्रकारे म्हटला आहे. (३ ते ५, ६ –)

क० ती सशब्द क्रिया पात किंवा कला या दोन्ही नावांनी सांगितली जाते. निःशब्द कला मात्र कला या नावानेच सांगितली जाते असा 'तु' या शब्दाचा अर्थ होय. मिति म्हणजे प्रमाण.

---

३. अंगठा व मधले बोट यांनी वाजवली जाणारी चुटकी म्हणजे छोटिका होय.

उभयोः संनिपातः स्यात्तेषां मार्गवशान्मितिः ।
मार्गाः स्युस्तत्र चत्वारो ध्रुवश्चित्रश्च वार्तिकः ॥ १० ॥
दक्षिणश्चेति तत्र स्याद् ध्रुवके मात्रिका कला ।
शेषेषु द्वे चतस्रोऽष्टौ क्रमान्मात्राः कला भवेत् ॥ ११ ॥
ध्रुवका सर्पिणी कृष्णा पद्मिनी च विसर्जिता ।
विक्षिप्ताख्या पताका च मात्रा स्यात्पतिताष्टमी ॥ १२ ॥
सशब्दा तु ध्रुवा ज्ञेया सर्पिणी वामगामिनी ।
कृष्णा दक्षिणतो गन्त्री पद्मिनी स्यादधोगता ॥ १३ ॥
विसर्जिता बहिर्याता विक्षिप्ताकुञ्चनात्मिका ।
पताका तूर्ध्वगमनात्पतिता करपातनात् ॥ १४ ॥
ध्रुवपाते प्रयोज्यास्ता नावापादौ कदाचन ।
ध्रुवका पतिता चित्रे वार्तिके त्वादिमे उभे ॥ १५ ॥

दोन्ही (हातांनी टाळी वाजवणे) म्हणजे संनिपात होय. त्यांचे प्रमाण मार्गानुसार असते. त्यात ध्रुव, चित्र, वार्तिक आणि दक्षिण असे चार मार्ग आहेत. त्यांमधील ध्रुव मार्गात कला एक मात्रेची असते. बाकीच्या मार्गांत क्रमाने दोन, चार व आठ मात्रांची कला असते. (१०, ११)

ध्रुवका, सर्पिणी, कृष्णा, पद्मिनी, विसर्जिता, विक्षिप्ता नावाची, पताका आणि आठवी पतिता मात्रा (अशा आठ मात्रा) होत. (१२)

आवाजपूर्वक असणारी ती ध्रुवा जाणावी; डाव्या बाजूकडे हात नेला जाणारी ती सर्पिणी (होय). उजव्या बाजूकडे हात नेला जाणारी कृष्णा आणि खालच्या बाजूला हात नेला जाणारी पद्मिनी (जाणावी). (१३)

हात बाहेर नेला जाणारी विसर्जिता, (पसरलेली बोटे) आकुंचित करणे या स्वरूपाची विक्षिप्ता, हात वर नेला जाणारी पताका आणि हात (विकल्पाने) खाली आणल्याने होणारी पतिता होय. (१४).

त्या (मात्रा) ध्रुवपातामध्ये योजाव्या. आवाप इत्यादींमध्ये कधीही योजू नयेत. चित्र मार्गात ध्रुवका व पतिता आणि वार्तिकात पहिल्या दोन (१५)

बाकीच्या म्हणजे चित्र, वार्तिक आणि दक्षिण या मार्गात कला अनुक्रमाने दोन, चार व आठ मात्रांची असते. म्हणजे चित्र मार्गात कला दोन मात्रांची, वार्तिक मार्गात चार मात्रांची व दक्षिण मार्गात आठ मात्रांची असते असा क्रम जाणावा. (६ ते ११)

क० त्या आठ मात्रा ध्रुवपातात, म्हणजे ध्रुव इत्यादी पातात योजाव्या. याचा अर्थ त्या आवाजयुक्त क्रियेमध्ये योजाव्या. आवाप इत्यादी निःशब्द क्रियेमध्ये निश्चितपणे योजू नयेत.

अन्त्ये द्वे च प्रयोक्तव्ये क्रमादष्टौ च दक्षिणे ।
पञ्चलघ्वक्षरोच्चारमिता मात्रेह कथ्यते ॥ १६ ॥
अनया मात्रयात्र स्याल्लघुगुर्वादिकल्पना ।
चतुरश्रस्तथा त्र्यश्र इति तालो द्विधा मतः ॥ १७ ॥

व शेवटच्या दोन योजाव्या; दक्षिण मार्गात क्रमाने आठ (मात्रा योजाव्या). येथे पाच लघु अक्षरांच्या उच्चाराचे कालप्रमाण मात्रा म्हटली आहे. (१६)

येथील लघु गुरु इत्यादी कल्पना या मात्रेने (करावयाची) आहे.

चतुरश्र तसेच त्र्यश्र असा दोन प्रकारचा ताल मानला आहे. (१७)

'आवाप इत्यादींत (योजायच्या) नाहीत' असे म्हटले आहे त्यामुळे निःशब्द क्रिया हाच या निषेधाचा विषय सांगितला आहे. 'ध्रुवपातात' या शब्दाच्या बाबतीत अर्थसामर्थ्यावरून 'इत्यादी' हा शब्द अध्याहृत घेऊन या नियमाचा विषय सर्व सशब्द क्रिया असा घेतला असल्याचे जाणावे. (१२ ते १४,१५–)

'बाकीच्यांमध्ये दोन, चार, आठ' असा संख्येबद्दलचा नियम सांगितला आहे. पण ज्या मात्रांची ही संख्या सांगितली आहे त्यांचा अनियमितपणे प्रयोग प्राप्त होईल यासाठी त्यांच्याबाबतीत नियम सांगत आहे.

पहिल्या दोन म्हणजे ध्रुवका व सर्पिणी आणि शेवटच्या दोन म्हणजे पताका व पतिता या होत. या चार मात्रा वार्तिक मार्गात योजाव्या असा क्रमही येथे नियमित केला आहे. 'दक्षिण मार्गात क्रमाने आठ मात्रा (योजाव्या)' यामध्ये मात्रांचा क्रमच फक्त नियमित केला आहे. ध्रुवमार्गात राहिलेला ध्रुव नावाचा पातच योजावा असे जाणावे. 'शिल्लक राहणे' हे ध्रुवाखेरीज बाकीच्या कलांच्या दृष्टीने (संभवते); कारण तालांत त्यांचा प्रयोग होतो. नाहीतर ध्रुवपाताचा प्रयोग कोठेच झाला नसता. म्हणून त्यात ध्रुवका हीच मात्रा योजावी असे मानणाऱ्या ग्रंथकाराने 'ध्रुवकात एक मात्रेची कला (असते)' असे प्रथम म्हटले आहे. याचा अर्थ ध्रुवमार्गात एक मात्रेची ध्रुवका ही कला (योजावी) असा आहे. ध्रुवपाताला योग्य व पहिली या दोन्हींमुळे तिचाच स्वीकार उचित होय. (१५)

---

* सुधाकर टीका– अर्ध्या मात्रेचा काल म्हणजे द्रुत होय. अनुद्रुत इत्यादी भेदही काही (आचार्यांनी) सांगितले आहेत. ते भरत इत्यादींच्या प्रयोगांत व ग्रंथांत सांगितलेले नाहीत तसेच प्रचारातही प्रसिद्ध नाहीत म्हणून त्यांची येथे दखल घेतलेली नाही.

या बाबतीत मतंगाने बारा ताल सांगितले आहेत. तो म्हणतो––

" त्र्यश्र व चतुरश्र हे दोन प्रथमचे होत. त्यातील चच्चत्पुट हा युग्म (म्हणजे चतुरश्र) असून चाचपुट (हा त्र्यश्र) म्हटला आहे. ते दोन्ही अन्यप्रकारांच्या दृष्टीने अनेक तऱ्हांनी विद्वानांनी दिले आहेत. चच्चत्पुट, चाचपुट, षट्पितापुत्रक, हेला, त्रिगता, संपक्वेष्ट, नत्कुट, नत्कुटी, खंजक, खंजिका, आक्रीडिता आणि विलंबा हे बारा भंग म्हणून सांगितले आहेत. कुटिला, आक्षिप्तिका, त्र्यश्रा, चतुरश्रा, मिश्रका व चटुला हे सहाच उपभंग म्हणून सांगितले आहेत." (१५, १६, १७—)

चच्चत्पुटश्चाचपुट इति नाम्नी तयोः क्रमात् ।
यथाक्षरश्च द्विकलश्चतुष्कल इति त्रिधा ॥ १८ ॥
प्रत्येकं तौ नामगतैर्गलैस्तत्र यथाक्षरः ।
अयमेककलश्चच्चत्पुटे त्वन्त्यं प्लुतं विदुः ॥ १९ ॥

त्यांची नावे क्रमाने चच्चत्पुट व चाचपुट अशी होत. ते प्रत्येकी पुन्हा यथाक्षर, द्विकल व चतुष्कल असे तीन प्रकारचे असतात. त्यांतील नावात असणाऱ्या (अक्षरांच्या) गुरु–लघूंनी होणारा यथाक्षर हा एककल होय. चच्चत्पुटात मात्र शेवटचे अक्षर प्लुत म्हणून जाणतात. (१८, १९)

'मात्रा' या शब्दावरून येथेही "निमेषाचा (म्हणजे पापण्यांची एकवार उघडझाप होण्याचा) काल 'मात्रा' होय' या दुसऱ्या शास्त्रात प्रसिद्ध असलेली 'मात्रा' (म्हणजे एक लघु अक्षर उच्चारण्याचा काल) असा अर्थ प्राप्त होत असल्याने त्याचा अपवाद सांगण्यासाठी ग्रंथकार सांगत आहे. 'येथे' म्हणजे मार्गतालाच्या बाबतीत पाच लघू अक्षरे उच्चारण्याच्या प्रमाणाचा काल मात्रा या शब्दाने समजायचा आहे; उदा० 'कचटतप' यांच्या उच्चारण्याचा काल. भरतमुनींनी तसे म्हटलेच आहे–

'गीताच्या कालाच्या बाबतीत कलेचे अंतर पाच निमेष हे जाणावे' (नाटयशास्त्र (बडोदा) ३१.४) मार्गतालात, या मात्रेने म्हणजे पाच लघू अक्षरांच्या उच्चारण्याच्या प्रमाणाच्या कालाने लघु, गुरु इत्यादी कालप्रमाण मानावे. 'इत्यादी' या शब्दाने प्लुत हे कालप्रमाण घ्यावयाचे. (पाच लघू अक्षरांच्या उच्चारण्याच्या प्रमाणाचा म्हणजे एक मात्रेचा काल लघु होय. दहा लघू अक्षरांच्या उच्चारण्याच्या प्रमाणाचा म्हणजे दोन मात्रांचा काल म्हणजे गुरु होय. पंधरा लघू अक्षरे उच्चारण्याच्या प्रमाणाचा म्हणजे तीन मात्रांचा काल हा प्लुत असा मानायचा. (१६,१७–)

क० त्या मार्ग तालाचे भेद आता ग्रंथकार दाखवीत आहे. नावात असलेल्या गलंनी (गुरु–लघूंनी) यथाक्षर तालाचे प्रमाण होते. 'ग' हा गुरु याचा संक्षेप असून 'ल' हा लघु याचा संक्षेप आहे. 'चच्चत्पुटः' या नावात पहिली दोन अक्षरे गुरु आहेत पकार एक मात्रेचा म्हणून लघु होय. विसर्गासह ट गुरु असल्याने नावातील चवथे अक्षर गुरू म्हणून प्राप्त होते. पण चच्चत्पुटात शेवटचे अक्षर प्लुत घ्यायचे असा विशेष नियम सांगितला असल्याने 'टः' हे प्लुत घ्यावयाचे. अशारीतीने यथाक्षर चच्चत्पुट ताल आठ मात्रांचा होतो. (गुरूच्या दोन मात्रा, लघूची एक व प्लुताच्या तीन मात्रा असल्याने पहिल्या दोन गुरूंच्या मिळून चार, तिसऱ्या लघूची एक व शेवटच्या प्लुताच्या तीन अशा एकूण आठ मात्रा होतात.) (यथाक्षर चाचपुट सहा मात्रांचा असतो. पहिल्या गुरू अक्षराच्या दोन मात्रा, नंतर दुसऱ्या व तिसऱ्या लघु अक्षरांची प्रत्येकी एक एक मात्रा व शेवटच्या विसर्गासह असणाऱ्या 'टः' या गुरु अक्षराच्या दोन मात्रा अशा एकूण सहा मात्रा होतात.)

अक्षरानुसार असल्याने त्याचे यथाक्षर हे नाव होय. 'यथाक्षरम्' हा अव्ययीभाव समास आहे. अक्षरांचा अनतिक्रम (अक्षरांना न ओलांडणे, अक्षरानुसार असणे) असा त्याचा विग्रह होतो. यथाक्षर ज्याचे असते तो यथाक्षरताल होय. यथाक्षर याला 'मत्' या अर्थाचा 'अ' प्रत्यय लागून 'यथाक्षर' असे शब्दरूप होते. (उ० कीर्ति ज्याच्यापाशी असते तो कीर्तिमान् होय. येथे 'मत्' हा प्रत्यय योजला आहे.) स्वतःच्या नावातील गुरू व लघू अक्षरांनुसार गुरू व लघू असलेले ज्याचे स्वरूप असते तो यथाक्षर होय. हा यथाक्षर, एककल असाही म्हटला जातो. प्रत्येक पादभागात तो एकेक कलेने युक्त असतो असा त्याचा अर्थ होय. (१७ ते १९)

[४]ऽ ऽ । ऽ इति यथाक्षरश्चच्चत्पुटः, ऽ । । ऽ इति यथाक्षरश्चाचपुटः ।
गुरुः कलात्र द्विकलेऽष्टावाद्येऽन्यत्र षट्कलाः ।
ऽऽ ऽ ऽ ऽऽ ऽऽ इति द्विकलश्चच्चत्पुटः ।
ऽ ऽ ऽऽ ऽ ऽ इति द्विकलश्चाचपुटः ।
चतुष्कलौ तौ द्विगुणौ
ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ इति चतुष्कलश्चच्चत्पुटः ।
ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ इति चतुष्कलश्चाचपुटः ।
द्विकले द्विकलो मतः ॥ २० ॥
पादभागः कलानां तु चतुष्केण चतुष्कले ।
पादभागैश्चतुर्भिस्तैर्मात्रा स्यान्मद्रकादिषु ॥ २१ ॥

ऽऽ । ऽ हा यथाक्षर चच्चत्पुट होय. ऽ । । ऽ हा यथाक्षर चाचपुट होय.

यात कला म्हणजे गुरु होय. पहिल्या (म्हणजे चच्चत्पुट) द्विकलात आठ कला व दुसऱ्या (म्हणजे चाचपुट) द्विकलात सहा कला असतात.

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ हा द्विकल चच्चत्पुट होय.

ऽऽ ऽऽ ऽऽ हा द्विकल चाचपुट होय.

ते दोन्ही चतुष्कल (द्विकलाच्या) दुप्पट प्रमाणाचे होत. ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ हा चतुष्कल चच्चत्पुट होय. ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ हा चतुष्कल चाचपुट होय.

द्विकलात (पादभाग) दोन कलांचा मानला आहे. (२०)

चतुष्कलात चार कलांनी पादभाग होतो. त्या चार पादभागांनी मद्रक इत्यादी गीतांत मात्रा होते. (२१)

क० येथे एककल, द्विकल व चतुष्कल या शब्दांतील कला या शब्दाने गुरू सांगितला आहे. इतर ठिकाणी कला म्हणजे मात्रा होय. कारण 'लघु ल होय' यात कला हा शब्द लघु या शब्दाचा पर्याय म्हणून सांगितला आहे. पहिल्या द्विकलात म्हणजे द्विकल चच्चत्पुटात आठ कला म्हणजे आठ गुरू असतात. दुसऱ्यात म्हणजे द्विकल चाचपुटात सहा कला म्हणजे सहा गुरू असतात. ते द्विकल चच्चत्पुट व चाचपुट दुप्पट प्रमाणाचे केले असता चतुष्कल म्हटले जातात. आठ गुरू या प्रमाणाचा द्विकल चच्चत्पुट दुप्पट केल्याने सोळा गुरू या प्रमाणाचा होऊन चतुष्कल होतो. सहा गुरू या प्रमाणाचा द्विकल चाचपुट दुप्पट केली असता बारा गुरू या प्रमाणाचा होऊन चतुष्कल होतो. मद्रक इत्यादी जी गीतके व गीते पुढे सांगितली आहेत त्यांत द्विकलांत व चतुष्कलांत सांगितलेल्या चार पादभागांनी मात्रा होते. हा मात्रा शब्द पारिभाषिक होय. (२०–२१).

---

४. सुधाकर टीकेत चच्चत्पुटातील शेवटचे अक्षर प्लुत घेण्याविषयी मतंगवचन उद्धृत केले आहे.

गुरूची खूण ऽ, लघूची खूण । व प्लुताची खूण ऽ ही आहे. द्विकलात प्रत्येक पादभाग दोन कलांचा व चतुष्कलात प्रत्येक पादभाग चार कलांचा असतो.

षट्पितापुत्रकस्त्र्यश्रभेदः सोऽपि तथा त्रिधा ।
यथाक्षरे विशेषोऽत्र प्लुतमाद्यन्तयोर्भवेत् ॥ २२ ॥

ऽ । ऽऽ । ऽ इति यथाक्षरः षट्पितापुत्रकः[५] ।

द्विकले द्वादश कलाः

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ इति द्विकलः षट्पितापुत्रकः ।

द्विगुणस्तु चतुष्कले ।

ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ इति

चतुष्कलः षट्पितापुत्रकः ।

उत्तरः पञ्चपाणिश्च तस्य संज्ञाद्वयं परम् ॥ २३ ॥

षट्पितापुत्रक हा त्र्यश्र तालाचा भेद असून तोही तशाच रीतीने तीन प्रकारचा आहे. यांतील यथाक्षराच्या बाबतीतला विशेष म्हणजे त्यात प्रारंभी व शेवटी प्लुत असतो. (२२)

ऽ । ऽऽ । ऽ हा यथाक्षर षट्पितापुत्रक होय.

द्विकलात बारा कला असतात.

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ हा द्विकल षट्पितापुत्रक होय.

चतुष्कलात (तो द्विकलाच्या) दुप्पटीचा असतो.

ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ हा चतुष्कल षट्पितापुत्रक होय.

उत्तर व पंचपाणि ही त्याची आणखी दोन नावे होत. (२३)

क० त्र्यश्रभेद म्हणजे चाचपुटाचा भेद होय. (२२–२३)

---

५. यथाक्षर षट्पितापुत्रक तालाच्या बारा मात्रा असतात. (पुढील संयुक्त व्यंजनाने 'ष' याला दीर्घत्व आले असल्याने) पहिले अक्षर गुरू आहे पण ते प्लुत घेऊन त्याच्या तीन मात्रा; दुसऱ्या लघु अक्षराची एक मात्रा; तिसऱ्या गुरु अक्षराच्या दोन मात्रा; (पुढील संयुक्त अक्षराने 'पु' याला दीर्घत्व आल्याने) चवथ्या गुरु अक्षराच्या दोन मात्रा; पाचव्या लघु अक्षराची एक मात्रा; शेवटचे 'कः' हे विसर्गयुक्त अक्षर गुरु आहे पण ते प्लुत घेऊन त्याच्या तीन मात्रा : अशा एकूण बारा मात्रा होतात.

सुधाकर टीकेत, "पलगा गलपाश्चैव षट्पितापुत्रके मताः ।" असे संगीतचूडामणीत दिलेले लक्षण उद्धृत केले आहे. याचा अर्थ असा– 'प्लुत, लघु, गुरु, गुरु, लघु व प्लुत हे षट्–पितापुत्रकात मानलेले आहेत.'

उद्घट्टोऽपि त्र्यश्रभेदः स प्रस्तारे यथाक्षरः ।
ऽऽऽ इति यथाक्षरोद्घट्टः[६] । ऽऽ ऽऽ ऽऽ इति द्विकलोद्घट्टः ।
ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ इति चतुष्कलोद्घट्टः ।
संपक्वेष्टाकोऽपि भेदः षट्पितापुत्रकस्य सः ॥ २४ ॥
तद्वद्यथाक्षरः कार्यः प्लुतमाद्यन्तयोर्भवेत् ।
ऽ̀ऽऽऽऽ́ इति यक्षाक्षरः संपक्वेष्टाकः[७] ।
एतौ स्वयोनिवत्स्यातां द्विकलौ च चतुष्कलौ ॥ २५ ॥
ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ इति द्विकलः संपक्वेष्टाकः ।
ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ इति
चतुष्कलः संपक्वेष्टाकः ।
अन्यद्भेदत्रयं चाचपुटेऽप्यस्ति चतुष्कलात् ।
द्विगुणद्विगुणत्वेन षण्णवत्यवधि क्रमात् ॥ २६ ॥

उद्घट्ट हाही त्र्यश्राचा भेद असून तो प्रस्तारात यथाक्षर (समजावा).

ऽऽऽ हा यथाक्षर उद्घट्ट होय. ऽऽ ऽऽ ऽऽ हा द्विकल उद्घट्ट होय.

ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ हा चतुष्कल उद्घट्ट होय.

संपक्वेष्टाक हाही षट्पितापुत्रकाचा भेद होय. (२४). तो त्या (म्हणजे षट्पितापुत्रका) प्रमाणे यथाक्षर योजावा. (अर्थात) पहिले व शेवटचे अक्षर प्लुत होय.

ऽ̀ऽऽऽऽ́ हा यथाक्षर संपक्वेष्टाक होय.

हे दोन्ही (म्हणजे उद्घट्ट व संपक्वेष्टाक) त्यांचे मूळ असणाऱ्या तालाप्रमाणे द्विकल व चतुष्कल योजावे. (२५).

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ हा द्विकल संपक्वेष्टाक होय.

ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ हा चतुष्कल संपक्वेष्टाक होय.

चाचपुटातही दुसरे (आणखी) तीन भेद आहेत. ते चतुष्कलापासून क्रमाने दुप्पट (व त्याची पुन्हा) दुप्पट केल्याने शहाण्णव गुरूंपर्यंत (होतात). (२६)

हे दोन्ही म्हणजे उद्घट्ट व संपक्वेष्टाक ताल होत. उद्घट्टाचे मूळ चाचपुट आणि संपक्वेष्टाकाचे षट्पितापुत्रक होय. त्या मुळाप्रमाणे द्विकल व चतुष्कल योजावे. (२४–२५)

क० चतुष्कल चाचपुट बारा कलांचा असतो. त्याची दुप्पट म्हणजे चोवीस कला हा पहिला भेद. त्याची दुप्पट म्हणजे अठ्ठेचाळीस कला हा दुसरा भेद. त्याची दुप्पट शहाण्णव

---

६. यथाक्षर उद्घट्ट तालातील तिन्ही अक्षरे गुरू असल्याने त्यात सहा मात्रा असतात.

७. यथाक्षर संपक्वेष्टाक तालात, पहिल्या गुरु अक्षराचे प्लुत स्वरूप मानून होणाऱ्या तीन मात्रा; दुसऱ्या गुरु अक्षराच्या दोन मात्रा; तिसऱ्या गुरु अक्षराच्या दोन मात्रा; चवथ्या गुरु

ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ इत्येको भेदः ।
ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ
ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ इति द्वितीयो भेदः ।
ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ
ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ
ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ इति तृतीयो भेदः ।
एषां पातकलायोगं श्रेयसे व्याहरामहे ।
आद्यवर्णैः[८] पातकला निःशङ्कः पर्यभाषत ॥ २७ ॥
चच्चत्पुटे त्वेककले संशताशं यथाक्रमम् ।
ऽ ऽ । ऽ
सं श ता शं ।
यद्वा शताशता तालः शम्या वा द्विर्भवेदिह ॥ २८ ॥

ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ हा एक भेद होय.

ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ
हा दुसरा भेद.

ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ
ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ
हा तिसरा भेद.

यांच्या पातकलांची जोडणी हितासाठी सांगतो. आद्याक्षरांनी निःशंकाने पातकला सांगितल्या आहेत. (२७) (त्या) एकेकल चच्चत्पुटात क्रमाने सं श ता शं (अशा होत).

ऽ ऽ । ऽ
सं श ता शं ।

किंवा यांत शताशता अथवा ताल आणि शम्या दोन वेळा असतात. (२८)

कला हा तिसरा भेद. (२६) चच्चत्पुट इत्यादी या पाचही तालांचा, सशब्द ध्रुव इत्यादी पात व निःशब्द आवाप इत्यादी कला यांच्याशी संबंध सांगत आहे. (२७) मद्रक इत्यादींमधील आसारित नावाचे एक गीत आहे तसेच पाणिका हेही दुसरे एक गीत आहे.

शताशता हा एक व ताशताश हा दुसरा भेद; (हे चाचपुटातही असतात.) (२८-२९)

अक्षराच्या दोन मात्रा व 'कः' या शेवटच्या गुरु अक्षराला प्लुत मानून होणाऱ्या तीन मात्रा अशा एकूण बारा मात्रा असतात.

८. शम्या, ताल, संनिपात, आवाप, निष्क्राम, विक्षेप व प्रवेशक यांच्या पहिल्या अक्षराने पातकला शाङ्गदेवाने सांगितल्या आहेत. उदा० 'श' याने शम्या, 'नि' याने निष्क्राम इत्यादी.

ऽ ऽ । ऽ ऽ ऽ । ऽ
श ता श ता ; ता श ता श ।
आसारितादौ शम्यादिस्तालादिः पाणिकादिषु ।
इत्येककलचच्चत्पुटकलाविधिः ।
अन्यद्भेदद्वयं चाचपुटेऽप्यस्ति मुनेर्मतम् ॥ २९ ॥

ऽ । । ऽ ऽ । । ऽ
श ता श ता ; ता श ता श ।
इत्येककलचाचपुटकलाविधिः ।
उत्तरे सं ततस्तालः शतालौ द्विरनन्तरम् ।
ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ।
इत्येककलषट्पितापुत्रककलाविधिः ।
निशौ निताशप्रनिसं[९] द्विकले युग्मके मताः ॥ ३० ॥

ऽ ऽ । ऽ ऽ ऽ । ऽ
श ता श ता; ता श ता श ।

शम्यापासून आरंभ होणारा आसारित इत्यादीमध्ये व तालापासून आरंभ होणारा पाणिका इत्यादीमध्ये (योजतात).

हा एककल चच्चत्पुटाचा कलाप्रकार होय.

दुसरे दोन भेद चाचपुटातही आहेत असे मुनीचे मत आहे. (२९)

ऽ ऽ । ऽ ऽ ऽ । ऽ
श ता श ता; ता श ता श

हा एककल चाचपुटाचा कलाप्रकार होय.

उत्तर (म्हणजे षट्पितापुत्रक) तालात सं, मग ताल, व नंतर शम्या आणि ताल दोन वेळा (योजावे).

ऽ । ऽऽ । ऽ
संता शता शता. हा एककल षट्पितापुत्रकाचा कलाप्रकार होय.

द्विकल युग्मकात (म्हणजे चच्चत्पुटात) निश निताशप्रनिसं (अशा कला) मानलेल्या आहेत. (३०)

---

९. 'निशौ निताशप्रविशं' असा पाठ अडचार आवृत्तीत घेतला आहे. तो सुधाकरटीकेला अनुसरून घेतल्याचे दिसते. पण पुढे जी कलांची योजना दिलेली आहे त्यानुसार हा पाठ 'निशौ निताशप्रनिसं' असा पाहिजे हे स्पष्ट आहे.

संगीतसारामृतात असाच पाठ दिलेला आहे. (संगीतसारामृत पृ. १६३)

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
निश निता शप्र निसं ।

इति द्विकलचच्चत्पुटकलाविधिः ।

निशौ ताशौ निसमिति ज्ञेयाश्चाचपुटे क्रमात् ।
ऽऽ ऽऽ ऽऽ
निश ताश निसं ।

इति द्विकलचाचपुटकलाविधिः ।

निप्रताशनितानिशताप्रनिसं तथोत्तरे ॥ ३१ ॥
ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
निप्र ताश निता निश ताप्र निसं ।

इति द्विकलषट्पितापुत्रककलाविधिः ।

आदावधिक आवापे क्षिप्ते विक्षेपकेऽन्तरा ।
द्विकले पादभागः स्यात्पादभागश्चतुष्कले ॥ ३२ ॥

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
निश निता शप्र निसं

हा द्विकल चच्चत्पुटातील कलाप्रकार होय.

निश ताश निसं अशा (कला) चाचपुटात क्रमाने जाणाव्या.

ऽऽ ऽऽ ऽऽ

निश ताश निसं हा द्विकल चाचपुटाचा कलाप्रकार होय. तसेच निप्रताशनिता-निशताप्रनिसं (अशा कला) उत्तर तालात (म्हणजे षट्पितापुत्रकात जाणाव्या.) (३१)

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
निप्र ताश निता निश ताप्र निसं

हा द्विकल षट्पितापुत्रकाचा कलाप्रकार होय.

द्विकलातील पादभाग, आरंभी आवाप अधिक योजून, मध्ये विक्षेप ठेवला असता, चतुष्कलातील पादभाग होतो. (३२)

क० चच्चत्पुट तालाचे चतुरश्र स्वरूप असल्याने तो समत्वयुक्त आहे. म्हणून युग्मक हे त्याचे दुसरे नाव आहे. (३०) याप्रमाणे एककलांचा पातकलासंबंध व द्विकलांचा पातकला-संबंध दाखवून झाल्यावर चतुष्कलांचाही पातकलासंबंध दाखविण्यासाठी ग्रंथकार सांगत आहे –

दोन गुरू असलेला असा द्विकलाचा पादभाग, वर दिल्याप्रमाणे पात व कला यांनी युक्त असतो. त्या पातकलांच्या आरंभी निःशब्द क्रियेचा आवाप हा प्रकार अधिक योजून, त्यांच्यांमध्ये विक्षेप हा निःशब्दक्रियेचा आणखी एक प्रकार योजला असता चतुष्कलातील पादभाग होतो.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ नि वि ता आ श वि प्र आ नि वि सं ।

इति चतुष्कलचच्चत्पुटकलाविधिः ।

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ ता वि श आ नि वि सं ।

इति चतुष्कलचाचपुटकलाविधिः ।

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ ता वि श आ नि वि ता आ नि वि श

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ ता वि प्र आ नि वि सं ।

इति चतुष्कलषट्पितापुत्रककलाविधिः ।

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ नि वि ता आ श वि प्र आ नि वि सं

हा चतुष्कल चच्चत्पुटाचा कलाप्रकार होय.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ ता वि श आ नि वि सं

हा चतुष्कल चाचपुटाचा कलाप्रकार होय.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ ता वि श आ नि वि ता आ नि वि श

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ ता वि प्र आ नि वि सं

हा चतुष्कल षट्पितापुत्रकाचा कलाप्रकार होय.

द्विकल पादभागातील दोन गुरूंमध्ये आवाप व विक्षेप हे दोन गुरू अधिक योजल्याने चतुष्कल पादभाग होतो असा अर्थ. द्विकल चच्चत्पुटात निश असा दोन गुरु असणारा पहिला पादभाग आहे. त्यात वर सांगितल्याप्रमाणे आणखी दोन गुरू योजले असता आनिविश असा चतुष्कल चच्चत्पुटातील चार गुरू असणारा पहिला पादभाग होतो. निता या दुसऱ्या पादभागात वर सांगितल्याप्रमाणे आणखी दोन गुरू योजले असता आनिविता असा चतुष्कलाचा दुसरा पादभाग होतो. शप्र या तिसऱ्या पादभागात वर दिल्याप्रमाणे आणखी दोन गुरू योजले असता आशविप्र असा चतुष्कलाचा तिसरा पादभाग होतो. निसं या चवथ्या पादभागात वरीलप्रमाणे आणखी दोन गुरू योजले असता आनिविसं असा चतुष्कलाचा चवथा पादभाग होतो. अशाप्रकारे चाचपुट इत्यादी तालांतही योजना करावी. (३२)

प्रथमे पादभागे स्यात्कलाङ्गुल्या कनिष्ठया ।
तया चानामयान्यत्र ताभ्यां मध्यमया तथा ॥ ३३ ॥
तृतीये स्याच्चतसृभिस्तुर्ये चच्चत्पुटस्य तु ।
ओजस्य पादभागेषु कला मध्याङ्गुलीं विना ॥ ३४ ॥
पञ्चपाणेः [१०]कनिष्ठादिचतुष्केण कनिष्ठया ।
तर्जन्या च पृथक्पादभागषट्के क्रमात्कलाः ॥ ३५ ॥

(चच्चत्पुटाच्या) पहिल्या पादभागात कला (म्हणजे निःशब्दक्रिया) करंगळीने (योजावी). दुसऱ्या (पादभागात) ती (म्हणजे करंगळी) व अनामिका (म्हणजे तिसरे बोट) यांनी (योजावी). ती दोन्ही (म्हणजे करंगळी व अनामिका) तसेच मध्यमा (म्हणजे मधले बोट) या (तिन्हींनी) (३३) तिसऱ्या पादभागात (योजावी) व चच्चत्पुटाच्या चवथ्या (पादभागात) (या) चारी बोटांनी कलेची योजना होते. ओजाच्या (म्हणजे चाचपुटाच्या) (तीन) पादभागांत मधले बोट सोडून कला (योजाव्या). (३४)

पञ्चपाणीच्या (म्हणजे षट्पितापुत्रकाच्या) पादभागांत (पहिल्या चारींमध्ये क्रमाने) करंगळी इत्यादी चार बोटांनी (योजना करून), करंगळीने (पाचव्यात) व तर्जनीने (म्हणजे पहिल्या बोटाने) (सहाव्यात) अशा कला सहा पादभागांत क्रमाने वेगवेगळ्या योजाव्या. (३५)

क० अन्यत्र याचा अर्थ दुसऱ्या पादभागात असा घ्यायचा. चाचपुट हा त्र्यश्र ताल असल्याने त्याचे विषम स्वरूप आहे. म्हणून त्याला ओज असे म्हटले आहे. त्याच्या तीन पादभागांत मधले बोट सोडून कला योजावी. म्हणजेच चाचपुटाच्या तीन पादभागांत करंगळी, अनामिका व तर्जनी यांनी क्रमाने कलायोजना करावी. (पहिल्या पादभागात करंगळीने, दुसऱ्या पादभागांत करंगळी व तिसरे बोट यांनी व तिसऱ्या पादभागात करंगळी, तिसरे बोट व पहिले बोट यांनी कलायोजना करावी असा याचा अर्थ होय.) (३३–३४)

भावी म्हणजे पुढे योजायचा जो शम्या इत्यादि पात तो भाविपात होय. त्या भाविपाताशी संबंधित अशा दक्षिण इत्यादी हाताने आवाप इत्यादी योजावे. शम्या उजव्या हाताने, ताल डाव्या हाताने व संनिपात डाव्या आणि उजव्या अशा दोन्ही हातांनी मिळून योजायचा असतो. त्या त्या संबंधित हाताने आवाप इत्यादी क्रिया योजाव्या. शम्या इत्यादी पातांनी म्हणजे सशब्द क्रियांनी पादभाग योजला जात असता बोटांनी कला योजायची नसते. कारण केवळ बोटांच्या योजनेने सशब्द स्वरूप निष्पन्न होत नाही. म्हणून तेथे सगळ्या हाताने पात योजावा. (३५–३७)

१०. पंचपाणि म्हणजे षट्पितापुत्रकाच्या सहा पादभागांतील पहिल्या पादभागात करंगळीने, दुसऱ्यात करंगळी व तिसरे बोट यांनी, तिसऱ्या पादभागात करंगळी, तिसरे बोट व मधले बोट यांनी, चवथ्या पादभागात करंगळी, तिसरे बोट, मधले बोट व पहिले बोट यांनी, पाचव्या पादभागात करंगळीने व सहाव्यात पहिल्या बोटाने कलायोजना करावी.

आवापादिः प्रयोक्तव्यो भाविपातस्य पाणिना ।
पातयुक्ते पादभागे नाड्गुल्या क्रियते कला ॥ ३६ ॥
उद्घट्टे तु सनिष्क्रामं शम्याद्वन्द्वं च योजयेत् ।
ऽ ऽ ऽ
नि श श इत्येककलोद्घट्टकलाविधिः ।
संपक्वेष्टाकस्य कलाः षट्पितापुत्रकोदिताः ॥ ३७ ॥
संनिपातस्तु नास्त्यत्र योनिवद् द्विकलादिके ।
ऽ ऽ ऽ ऽ ऽ
ता श ता श ता
इत्येककलसंपक्वेष्टाककलाविधिः ।
भेदद्वयेऽस्योद्घट्टाख्यतालस्य च कलाविधिः ॥ ३८ ॥

व्हावयाच्या (अशा त्या त्या हाताच्या) पातामध्ये योजल्या जाणाऱ्या हाताने आवाप इत्यादी योजावे. पात असणाऱ्या पादभागात बोटाने कला योजली जात नाही. (३६)

उद्घट्टात मात्र निष्क्रामासह दोन शम्या योजाव्या.

ऽ ऽ ऽ

नि श श हा एककल उद्घट्टाचा कलाप्रकार होय.

षट्पितापुत्रकात सांगितलेल्या कला (संनिपात सोडून) संपक्वेष्टाक या तालाच्याही होत. (३७)

यात (म्हणजे संपक्वेष्टाक तालात, षट्पितापुत्रकात सांगितलेला आरंभीचा) संनिपात नसतो.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ

ता श ता श ता ही एककल संपक्वेष्टाकाची कलायोजना होय. याच्या (म्हणजे संपक्वेष्टाकाच्या) आणि उद्घट्टनामक तालाच्या द्विकल इत्यादी दोन भेदांत, त्यांचे मूळ कारण असणाऱ्या तालाप्रमाणे कलायोजना (करायची असते). (३८)

क० जवळ लागूनच सांगितलेला संपक्वेष्टाक व उद्घट्ट या तालांच्या द्विकल इत्यादी म्हणजे द्विकल व चतुष्कल या दोन भेदांत, निःशब्द व सशब्द कलांची योजना, त्यांच्या मूळ कारणाप्रमाणे म्हणजे संपक्वेष्टाकाचे मूळ कारण असणाऱ्या षट्पितापुत्रकाप्रमाणे व उद्घट्टाचे मूळ कारण असणाऱ्या चच्चत्पुटाप्रमाणे करायची असते. म्हणजे त्या द्विकल व चतुष्कल (षट्पितापुत्रक आणि चच्चत्पुट) तालांतील गुरूंच्या बाबतीत जी पातकलायोजना पूर्वी सांगितली आहे तीच येथे योजावी असा याचा अर्थ होय. पण एककल इत्यादी तालभेदांत शम्या इत्यादी

ऽऽ ऽऽ ऽऽ
निश ताश निसं ।

इति द्विकलोद्घट्टकलाविधिः ।

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ ता वि श आ नि वि सं ।

इति चतुष्कलोद्घट्टकलाविधिः ।

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
निप्र ताश निता निश ताप्र निसं ।

इति द्विकलसंपक्वेष्टाककलाविधिः ।

ऽऽ ऽऽ ऽऽ
निश ताश निसं. ही द्विकल उद्घट्टाची कलायोजना होय.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ ता वि श आ नि वि सं.

ही चतुष्कल उद्घट्टाची कलायोजना होय.

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
निप्र ताश निता निश ताप्र निसं.

ही द्विकल संपक्वेष्टाकतालाची कलायोजना होय.

तीन पातांचीच योजना दाखवली आहे. ध्रुव या पाताची योजना कोठेही दाखवलेली नाही. म्हणून त्याचा निर्देश व त्याचे लक्षण दोन्ही निरर्थकच होत असा आक्षेप कोणी घेतल्यास त्याला उत्तर असे की त्यांची निरर्थकता नाही. कारण ध्रुव मार्गात त्याचा (म्हणजे ध्रुव-पाताचा) प्रयोग करावयाचा असल्याने त्याचा निर्देश व त्याचे लक्षण दोन्ही सार्थ आहेत.

हे स्पष्ट करायचे म्हणजे असे– एक मात्रेच्या कलेचे प्रमाण असणारा ध्रुवमार्ग, चित्र इत्यादी मार्गांत अनुस्यूत असल्याने जेव्हा गायक गीत इत्यादींची योजना ध्रुवमार्गाने करायचे इच्छितो तेव्हा ध्रुवपाताचा प्रयोग त्याने करायचा असतो. म्हणून त्या पाताचे व मार्गाचे अचल स्वरूप असल्याने सर्व तालांत अस्तित्व असते. या नित्य स्वरूपामुळे त्याचे ध्रुव हे स्वरूप असल्याचे जाणावे. म्हणूनच त्याचा वेगळा प्रयोगही दाखवलेला नाही. उपोद्घात इत्यादींत ध्रुव-पाताचा प्रयोग पुढे दाखवला जाणार आहेच. आणि दुसऱ्या मतानुसार सांगितलेल्या ध्रुवा-सारितात व यथाक्षर आसारितात ध्रुवमार्गाचाही प्रयोग दिला आहे. म्हणून ध्रुवपाताचा निर्देश व लक्षण यांचा निरर्थकपणा असल्याची शंका कोणी घेऊ नये. (३८)

क० पुढे सांगितली जाणारी मद्रक इत्यादी चौदा गीते, पूर्वी सांगितलेल्या षाड्जी इत्यादी जाती व ग्रामराग इत्यादी सहा प्रकारचे राग गांधर्व या शब्दाने सांगितले आहेत. त्या गांधर्वात व चित्र इत्यादी मार्गांत कुशल असा कांस्यतालधारी दुसरा (इसम) गायकाचा मदतनीस

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ ता वि श आ नि वि ता आ नि वि श
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ ता वि प्र आ नि वि सं ।

इति चतुष्कलसंपक्केष्टाककलाविधिः ।

गान्धर्वमार्गकुशलः कांस्यतालधरोऽपरः ।
गातुः सहायः कर्तव्यः प्रमादविनिवृत्तये ॥ ३९ ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ ता वि श आ नि वि ता आ नि वि श
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ ता वि प्र आ नि वि सं.

ही चतुष्कल संपक्केष्टाक तालाची कलायोजना होय.

गांधर्व व मार्ग यांत कुशल असा कांस्यताल धारण करणारा दुसरा (गायक) प्रमाद टाळण्यासाठी गायकाचा मदतनीस करावा. (३९)

करावा. याकरून त्या दुसऱ्याचेही गायकस्वरूप कळून येते. मुख्य गायकाचा साहाय्यक योजण्यातील उद्देश सांगत आहे. तो उद्देश म्हणजे चूक होऊ नये हा आहे. गांधर्वाचे स्वरूप अत्यंत निश्चित असल्याने अदृष्ट फलाचे ते साधन होय. गांधर्वाच्या प्रयोगात मुख्य गायकाने बोटांच्याबद्दलचा नियम वगैरे पाळून गायन करावे. दुसऱ्या कांस्यताल धारण करणाऱ्या गायकाने चूक होणार नाही अशाप्रकारे मुख्य गायकाचे साहाय्य करावे. नाहीतर प्रमाद घडल्यास केवळ अदृष्ट फळ मिळणार नाही एवढेच नव्हे, तर पापदेखील निर्माण होईल असा अभिप्राय (समजावा). (३९)

युग्माचे म्हणजे चच्चत्पुटाचे एककल, द्विकल आणि चतुष्कल या नावांचे तीन भेद होत. अयुग्माचे म्हणजे चाचपुटाचे एककल, द्विकल, चतुष्कल व नंतर दुपटी दुपटीने होणारे तीन (म्हणजे चोवीस, अठ्ठेचाळीस व शहाण्णव गुरू असणारे) असे सहा भेद होत. या नऊ भेदांच्या (परस्पर मिश्रणाने होणारे संकीर्ण भेद होत). त्यांच्या गुरु या स्वरूपाच्या कला (येथे दिल्या आहेत). चौदा कला इत्यादी असणारे चार भेद म्हणजे पहिला चौदा कला, दुसरा पंधरा कला, तिसरा सोळा कला व चौथा सतरा कला असणारा हे होत. असे चार संकीर्ण भेद दुसरे काही विद्वान सांगतात. ' चच्चत्पुट इत्यादि ' यातील ' इत्यादि ' शब्दाने चाचपुट वगैरे ताल घ्यायचे. प्रथम चच्चत्पुट इत्यादींचे स्वरूप लिहून त्याखाली ' पहिल्या मोठ्याच्या (खाली) लहान ठेवून ' इत्यादी पुढे सांगितल्या जाणाऱ्या प्रकाराने तालाचा प्रस्तार केला असता जे भेद उत्पन्न होतात त्यांना खंडताल हे नाव आहे. देशी तालाच्या विस्तारात त्यांतील काही (ग्रंथकार सांगणार आहे). ' व्याहरामहे ' हा वर्तमानकाळाचा प्रयोग, पाणिनीच्या " वर्तमानकाळाच्या जवळ असणाऱ्या भूत किंवा भविष्यकाळाच्या अर्थासाठी वर्तमानकाळाचे प्रत्यय विकल्पाने वापरले जातात " असे सांगणाऱ्या (पाणिनि ३.३.१३१) या सूत्रानुसार केला आहे. तसेच " एकवचन किंवा द्विवचन हा

युग्मस्य ये त्रयो भेदाः षड्वायुग्मस्य[११] कीर्तिताः ।
तेषामन्योन्यसंसर्गात्संकीर्णा बहवो मताः ॥ ४० ॥
अन्ये पञ्चैव संकीर्णान् गान्धर्वेऽभिदधुर्बुधाः ।
पञ्च सप्त नवापि स्युर्दशैकादश तत्कलाः ॥ ४१ ॥
तालाश्चत्वार इत्यन्ये चतुर्दशकलादिकाः ।
चच्चत्पुटादिभेदास्तु सन्ति खण्डाभिधाः परे ॥ ४२ ॥
देशीतालप्रपञ्चेन तानपि व्याहरामहे ।

युग्माचे (म्हणजे चच्चत्पुटाचे) जे तीन भेद व अयुग्माचे (म्हणजे चाचपुटाचे) जे सहा भेद सांगितले, त्यांच्या परस्पर मिश्रणाने होणारे अनेक संकीर्ण भेद मानले आहेत (४०).

दुसऱ्या (काही) विद्वानांनी गांधर्वात पाचच संकीर्ण (भेद) सांगितले आहेत. त्यांच्या कला पाच, सात, नऊ, दहा व अकरा (अशा क्रमाने) होत. (४१)

दुसरे (काही जाणकार) चौदा कला इत्यादी असणारे चार (संकीर्ण) ताल (सांगतात). चच्चत्पुट इत्यादींचे जे दुसरे खंड नावाचे भेद आहेत, (४२) तेही देशीतालाचा विस्तार देताना आम्ही सांगू. (४३–)

अर्थ असताही 'अस्मद्' म्हणजे 'मी' या (सर्वनामाचे) बहुवचन विकल्पाने वापरले जाते" असे सांगणाऱ्या पाणिनीच्या (पाणिनि १.२.५९) या सूत्रानुसार ग्रंथकाराने बहुवचन योजिले आहे. अशा तऱ्हेने चतुरश्र, त्र्यश्र, संकीर्ण आणि खंड या चार प्रकारांनी सर्व ताल सांगितले आहेत. मिश्र या स्वरूपाचा दुसऱ्या प्रकारचा भेद मुनीने (म्हणजे भरतमुनींनी) सांगितला आहे. तो असा– "यांच्या (म्हणजे चच्चत्पुट व चाचपुट तालांच्या) मिश्रणाने मिश्र ताल सांगितला आहे. तो षट्पितापुत्रक आणि पंचपाणि (या नावाचा) मानला आहे.' (पहा– नाट्यशास्त्र भाग २– घोषसंपादित; अध्याय ३१ श्लोक १२–१३)."

"ताल (या सशब्दक्रियेने) सुरू होणारा दुसरा मिश्रभेद संपक्वेष्टाकनावाचा (सांगितला आहे)." (पहा– नाट्यशास्त्र भाग ४ बडोदा आवृत्ति, अध्याय ३१ श्लोक २१)." (नाट्यशास्त्रात 'मिश्र' ऐवजी 'त्र्यश्र' असे आहे.) भरतमुनींच्या मताने षट्पितापुत्रक व संपक्वेष्टाक हे मिश्रताल होत. म्हणून त्यांचे भेद मिश्रस्वरूपाचे जाणावे. त्यांच्या मताला अनुसरणाऱ्या ग्रंथकाराने तेही त्र्यश्र तालाचे भेद म्हणून सांगितले आहेत. म्हणून त्यामुळे तालाचे चार प्रकारचे स्वरूपच दाखवले आहे. (३९–४२, ४३–)

---

११. सुधाकर टीकेत, चाचपुटाचे चोवीस, अठ्ठेचाळीस व शहाण्णव गुरू असणारे तीन भेद मुनीने (म्हणजे भरताने) व मतंगाने सांगितले आहेत असे म्हटले आहे.

आवृत्तिः पादभागादेः परिवर्तनमिष्यते ॥ ४३ ॥
विश्रान्तियुक्तया काले क्रियया मानमिष्यते ।
क्रियानन्तरविश्रान्तिर्लयः स त्रिविधो मतः ॥ ४४ ॥
द्रुतो मध्यो विलम्बश्च द्रुतः शीघ्रतमो मतः ।
द्विगुणद्विगुणौ ज्ञेयौ तस्मान्मध्यविलम्बितौ ॥ ४५ ॥

पादभाग इत्यादींची आवृत्ति परिवर्तन (म्हणून) मानली जाते. (४३)

विश्रान्तीने युक्त अशा (सशब्द किंवा निःशब्द) क्रियेने, कालाच्या बाबतीत, (तालांचे) प्रमाण मानले जाते. क्रियेच्या नंतरची जी विश्रान्ति (म्हणजे थांबणे) ती लय होय. ती (लय) तीन प्रकारची मानली आहे. (४४)

द्रुत, मध्य व विलंबित (असे ते तीन प्रकार होत). अत्यंत जलद लय द्रुत मानली आहे. त्याच्या दुप्पट प्रमाणाची मध्य व (मध्याच्या) दुप्पट प्रमाणाची विलंबित जाणावी. (४५)

क० आता तालांचे परिवर्तन (म्हणजे आवर्तन) इत्यादींचे लक्षण देत आहे– 'पादभाग इत्यादींची' वगैरे शब्दाने पादभाग हे अवयव असणारा ताल घ्यायचा. त्याची आवृत्ति म्हणजे पुन्हा योजना. पाच लघू अक्षरांचे उच्चारण इत्यादि प्रमाण असलेला, व तापणे, कंपन इत्यादी उपाधिप्रकारांनी युक्त असणाऱ्या द्रव्यापेक्षा वेगळा असणारा असा द्रव्यविशेष म्हणजे काल होय. अशा कालाच्या बाबतीत विश्रांतीने म्हणजे थांबण्याने युक्त अशा सशब्द अथवा निःशब्द क्रियेने तालांचे प्रमाण मानले जाते.

यापूर्वी सांगितलेल्या क्रियेनंतर लगेच जे थांबणे त्यालाच लय म्हणतात. क्रियेनंतर अखंडपणाने दुसरी क्रिया चालू राहिल्यास विश्रांति नसल्याने लय नसतेच. उदा. गुरूचे अवयव असणाऱ्या दोन लघूंच्या मध्ये, किंवा प्लुताचे अवयव असणाऱ्या तीन लघूंच्यामध्ये (विश्रांति नसते). म्हणून तालांच्या मध्येच लय योजावी. त्यात जी असताना क्रियेचे थांबणे दिसून येते व जी नसताना क्रियेचे थांबणे दिसून येत नाही व अशातऱ्हेने क्रियेच्या थांबण्याने असणारी व न थांबण्याने नसणारी अशी जी अत्यंत जलद लय तीच द्रुतलय होय. या द्रुतलयीत योजलेल्या थांबण्याच्या कालाच्या दुप्पट प्रमाणाचा थांबण्याचा काल असणारी मध्य लय होय. त्या मध्यलयीत योजलेल्या थांबण्याच्या कालाच्या दुप्पट प्रमाणाचा थांबण्याचा काल असणारी विलंबित लय होय.

अशा तऱ्हेने एककल इत्यादी तालांत एकेका मार्गामध्ये थांबण्याच्या कालाच्या वेगवेगळ्या प्रमाणानुसार तीन लयी दाखवल्या आहेत. जसे लोकांत एकाच मार्गावरून जाण्यासाठी तिघे प्रवृत्त होतात; पण त्यांतील एक पळतो म्हणून त्याची गति जलद असते, त्यापेक्षा दुसरा सावकाश जातो म्हणून त्याची मध्यम गति असते आणि तिसरा त्यापेक्षाही हळू जातो म्हणून त्याची विलंबित गति असते. याप्रकारे पाऊल टाकण्याच्या क्रियेतील थांबण्याच्या कालाच्या वेगळेपणामुळे गतींचा फरक होतो. अशाच रीतीने तालातील लयींचा भेद जाणावा.

दक्षिणमार्गात सावकाशपणा, चित्रमार्गात जलदपणा, व वार्त्तिक मार्गात मध्यमपणा यांमुळे लय अनेक प्रकारची होते. उदा. चित्रमार्गात दहा लघू अक्षरांच्या उच्चाराच्या प्रमाणाच्या

मार्गभेदाच्चिरक्षिप्रमध्यभावैरनेकधा ।
लयोऽक्षरे पदे वाक्ये योऽसौ नात्रोपयुज्यते ॥ ४६ ॥
लयप्रवृत्तिनियमो यतिरित्यभिधीयते ।
समा स्रोतोगता चान्या गोपुच्छा त्रिविधेति सा ॥ ४७ ॥
आदिमध्यावसानेषु लयैकत्वे समा त्रिधा ।
[१२]लयत्रैधादादिमध्यावसानेषु यथाक्रमात् ॥ ४८ ॥

मार्गांच्या वेगळेपणानुसार सावकाश, जलद व मध्य स्वरूपाची अशी अनेक प्रकारची लय असते.

अक्षर, पद व वाक्य यांत जी लय असते ती येथे उपयोगी नसते. (४६)

लयीच्या प्रयोगाचा नियम यति म्हणून म्हटली आहे. समा, स्रोतोगता व तिसरी गोपुच्छा अशी ती तीन प्रकारची आहे. (४७)

आरंभी, मध्ये व शेवटी एकच लय योजिली असता ती समा यति होय. आरंभी, मध्ये व शेवटी लयीचे तीन प्रकार क्रमाने योजल्याने ती तीन प्रकारची होते. (४८)

कालानंतर जी लय म्हणजे (थांबणे) असते ती द्रुत लय होय. वार्त्तिक मार्गात, पूर्वी सांगितलेल्या क्रमानुसार दोन कलांच्या नंतर जी लय असते ती मध्य लय होय. दक्षिणमार्गात चार कलांनंतर जी लय असते ती विलंबित म्हटली आहे. विश्रांतीच्या कालाचे स्वरूप जरी एकसारखे असले तरी त्या त्या तालक्रियेच्या प्रमाणाने निर्दिष्ट होणाऱ्या मार्गांच्या वेगवेगळेपणानुसार लयभिन्नता जाणावी. जसे लोकात एकाच गावाचे गंगेकडे जाणारे तीन मार्ग असताना, जवळच्या मार्गाने आलेल्याला तो जलद आला असे म्हटले जाते; त्याच्या दुप्पट दूर असणाऱ्या मार्गाने आलेल्याला तो पूर्वीच्या दृष्टीने मध्यमपणाने आला असे म्हटले जाते; त्याच्याही पेक्षा दुप्पट दूर असणाऱ्या मार्गाने आलेल्याला, पहिल्या व त्यानंतरच्या येणाऱ्याच्या दृष्टीने विलंबाने आला असे म्हटले जाते. या तऱ्हेने जाण्याच्या क्रियेत वेगळेपणा नसताही, मार्गांच्या वेगवेगळेपणामुळे द्रुत इत्यादी व्यवहार केला जातो. तसेच प्रस्तुतच्या बाबतीत समजावे. येथेही प्रत्येक मार्गात विश्रांतिकालाच्या प्रमाणाच्या भिन्नतेनुसार तीन लयी योजल्या असता, द्रुतात द्रुत, द्रुतात मध्य, द्रुतात विलंबित; मध्यात द्रुत, मध्यात मध्यम, मध्यात विलंबित; तसेच विलंबितात द्रुत, विलंबितात मध्यम, विलंबितात विलंबित असे लयीचे प्रकार होतात. हाच 'अनेकधा' याचा अर्थ होय. अशा प्रकारे तालासंबंधीच्या लयीचाच गीत इत्यादींत उपयोग असतो. अक्षर इत्यादी संबंधीच्या लयीचा नसतो. अक्षरात द्रुत लय, पदात मध्य लय व वाक्यात विलंबित लय असते. त्याचे संगीताला साहाय्य होत नसल्याने ती येथे उपयोगी नसते. (४३–४६)

क० आता लयीवर आधारलेल्या यतींचे लक्षण ग्रंथकार सांगत आहे. तीन लयी आरंभी, मध्ये व शेवटी क्रमाने योजल्याने समा तीन प्रकारची होते. लयत्रैध म्हणजे लयीचे तीन प्रकार.

---

१२. समा यतीचे तीन प्रकार असे– आरंभी, मध्ये व शेवटी द्रुत असणे; आरंभी, मध्ये व शेवटी मध्य लय असणे; व आरंभी, मध्ये आणि शेवटी विलंबित लय असणे.

चिरमध्यद्रुतलया[१३] तदा स्रोतोगता मता ।
अन्या विलम्बिमध्याभ्यां मध्यद्रुतवती परा ॥ ४९ ॥
द्रुतमध्यविलम्बैः स्याद् गोपुच्छा द्रुतमध्यभाक् ।
द्वितीयान्या भवेन्मध्यविलम्बितलयान्विता ॥ ५० ॥
समोऽतीतोऽनागतश्च ग्रहस्ताले त्रिधा मतः ।
गीतादिसमकालस्तु समपाणिः समग्रहः ॥ ५१ ॥

(क्रमाने) विलंबित, मध्य व द्रुत लय योजलेली असते तेव्हां ती पहिली स्रोतोगता मानली आहे. विलंबित व मध्य लय योजल्याने दुसऱ्या प्रकारची आणि मध्य व द्रुत लय असणारी तिसऱ्या प्रकारची (स्रोतोगता) होय. (४९)

द्रुत, मध्य व विलंबित लय (क्रमाने) योजल्याने (पहिली) गोपुच्छा होते. दुसरी द्रुत, व मध्य या लयींनी युक्त आणि तिसरी (गोपुच्छा) मध्य व विलंबित या लयींनी युक्त असते. (५०)

तालाच्या बाबतीत सम, अतीत व अनागत असा तीन प्रकारचा ग्रह मानला आहे. गीत इत्यादींमध्ये (त्यांच्या) आरंभाबरोबर (सुरू होण्यामुळे) समकाल असणारा समपाणि असा सम हा ग्रह होय. (५१)

त्रि (म्हणजे तीन) या शब्दाला धा हा प्रकारवाचक प्रत्यय लागून त्रिधा असा शब्द होतो. पाणिनीच्या (पा. ५.३.४५) या सूत्रानुसार द्वि आणि त्रि यानंतर विकल्पाने 'धा'च्या जागी 'धम्' येतो. त्यानुसार येथे त्रैध हे शब्दरूप झाले आहे. अन्या म्हणजे दुसरी स्रोतोगता होय. परा म्हणजे तिसरी स्रोतोगता, मध्य व द्रुत लयींनी युक्त असते. स्रोत (म्हणजे प्रवाह) जसा प्रथम (पाणी थोडे असता) सावकाश वाहतो व मग पाणी भरपूर झाल्यावर जलद वाहतो तसे स्वरूप स्रोतोगता या यतीचे असल्याने तिचे नाव सार्थ आहे. गोपुच्छा या यतीच्या नावाचीही सार्थकता वरच्या उलटस्वरूप असल्याने जाणावी. गाईचे शेपूट जसे शेवटी विस्तृत असते तसे गोपुच्छा यतीचे स्वरूप असते. (४६–५०)

क० आता ग्रहांचे लक्षण देत आहे–

ग्रह म्हणजे (तालाचे) ग्रहण (अर्थात ताल सुरू करणे). 'गीतादि' यातील 'आदि' (म्हणजे इत्यादि) याने वाद्य व नृत्त दोन्ही ध्यायची. गीत इत्यादींच्या बरोबर समान काल

---

१३. सुधाकर टीकेत स्रोतोगता यतीच्या दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारांचे स्पष्टीकरण असे दिले आहे– गीताचे तीन भाग करून पहिल्या भागात विलंबित लय, दुसऱ्यात मध्य लय व तिसऱ्यात द्रुत (मध्य ?) लय योजिली असता दुसरी स्रोतोगता; पूर्वभागात विलंबित (मध्य ?) लय, मध्यभागात मध्य (द्रुत ?) लय व शेवटी द्रुत लय योजिली असता तिसरी स्रोतोगता.

तसेच गोपुच्छा यतीच्या दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारांचे स्पष्टीकरण असे दिले आहे– पूर्वभागात द्रुत लय, मध्यभागात विलंबित लय व शेवटी विलंबित लय योजिली असता दुसरी गोपुच्छा; प्रथम मध्यलय, मध्ये विलंबित लय व शेवटी विलंबित लय योजिली असता तिसरी गोपुच्छा.

सोऽवपाणिरतीतः[१४] स्याद्यो गीतादौ प्रवर्तते ।
अनागतः प्राक्प्रवृत्तग्रहस्तूपरिपाणिकः[१५] ॥ ५२ ॥
लयाः क्रमात्समादौ स्युर्मध्यद्रुतविलम्बिताः ।

जो गीत (तसेच वाद्य व नृत्त) सुरू होण्यापूर्वी सुरू होतो तो अवपाणि असा अतीत (ग्रह होय). (गीत तसेच वाद्य व नृत्त) सुरू झाल्यावर सुरू होतो तो उपरिपाणि असा अनागत ग्रह होय. (५२)

सम इत्यादी (तीन ग्रहांत) मध्य, द्रुत व विलंबित या लयी क्रमाने (योजायच्या) असतात. (५३ –)

असणारा तो सम ग्रह होय. येथे 'काल' या शब्दाने ताल आणि गीत इत्यादी यांचा आरंभ-कालच सांगितला आहे. कारण त्यांची समानताच येथे विवक्षित आहे. समपाणि (सम पाणि असणारा) हे ग्रह या शब्दाचे विशेषण आहे. येथे पाणि (म्हणजे हात) या शब्दाने ताल निर्देशिलेला आहे. कारण ताल हाताच्या क्रियेने व्यक्त होत असतो. जो गीताच्या आधी असा अवपाणि असतो तो अतीत ग्रह होय. येथे गीत या शब्दाने वाद्य व नृत्तही निर्दिष्ट आहेत. त्यांच्याही आधी (जो सुरू होतो) असा अर्थ घ्यायचा. 'अवपाणि' यातील अव हा शब्द खालचा याचा पर्याय होय. म्हणजे कालाच्या दृष्टीने पूर्वीचा. गीत इत्यादींच्या अगोदर ताल सुरू होत असल्याने तो अवपाणि असा अतीतग्रह होय. तालाचा काल ओलांडून नंतर गीत इत्यादी सुरू होतात. ताल अगोदर निघून जात असल्याने तो अतीत ग्रह होय. 'पावप्रवृत्तग्रह' म्हणजे प्रथम आरंभ होणारा ग्रह, तो अनागत ग्रह होय. 'प्राक्प्रवृत्तग्रह' यातील 'ग्रह' या शब्दाने ज्याचे ग्रहण केले जाते तो ग्रह असा अर्थ घेऊन, 'ग्रहण करणे' या क्रियेचे कर्म असणारे गीत इत्यादी तिन्ही सांगितले आहेत. गीत इत्यादींच्या आरंभानंतर तालाची सुरवात होत असल्याने हा अनागत ग्रह होय. त्याचेच उपरि म्हणजे नंतर पाणि म्हणजे ताल सुरू होत असल्याने हे विशेषण (योग्यच आहे). गीत इत्यादींच्या आरंभाच्या वेळी तो आलेला नसतो म्हणन अनागत (अन् + आगत = न आलेला) हे त्याचे नाव आहे.

१४–१५. सुधाकरटीकेत अतीत ग्रहाचे स्पष्टीकरण 'जो गीत आधी सुरू झाल्यावर मग प्रवृत्त होतो तो अतीत ग्रह होय' असे दिले आहे; तसेच 'जो गीताच्या आरंभाच्या अगोदर प्रवृत्त होतो तो अनागत ग्रह होय' असे म्हटले आहे.

संगीतसार या ग्रंथातही असेच स्पष्टीकरण मिळते. या ग्रंथात, 'गीताचा आरंभ प्रथम होऊन मग तालाचा आरंभ होतो तो अतीत ग्रह व तालाचा आरंभ प्रथम होऊन मग गीताचा आरंभ होतो तो अनागत ग्रह' असे म्हटले आहे. (पहा– संगीतसार, तालाध्याय पृ. १०).

संगीतदर्पण या ग्रंथातही अतीत व अनागत या ग्रहांचे लक्षण वरीलप्रमाणेच दिले आहे. (पहा– संगीतदर्पण, पृ. ११८, श्लोक ६९३, ६९४).

अतीत ग्रहाचे अवपाणि या शब्दानेही शार्ङ्गदेवाने वर्णन केले आहे; तसेच अनागत ग्रहाचे उपरिपाणि या शब्दानेही केले आहे. हे दोन्ही शब्द नाट्यशास्त्रातले आहेत. त्यांचे लक्षण तालाध्यायात दिले आहे. (पहा– नाट्यशास्त्र : बडोदा आवृत्ति, भाग ४, पृ. २८५; घोष संपादित आवृत्ति, भाग २, पृ. ८६).

एतैः प्रकरणाख्यानि[१६] तालैर्यानि जगुर्बुधाः ॥ ५३ ॥

या (मार्ग–) तालांनी (योजिली जाणारी) जी प्रकरण नावाची (गीते) ज्ञात्यांनी सांगितली आहेत (५३)

सम ग्रहात मध्यलय, अतीत ग्रहात द्रुतलय व अनागत ग्रहात विलंबित लय योजावी असा क्रम जाणावा. जसे– लोकांत एकादा माणूस आपल्या मित्र इत्यादीसह एकाद्या प्रदेशाकडे जायचे म्हणून ठरवतो. पण आपला मित्र इत्यादि आपल्याला मागे ठेवून पुढे जात असल्याचे ऐकून, मित्राच्या मागे असलेला तो, त्या आपल्या मित्राबरोबर जाण्यासाठी स्वतः द्रुत गतीने जातो; किंवा मित्र इत्यादींच्या येण्याच्या आरंभाच्यावेळी स्वतः आलेला नसल्याने, त्यांच्या पुढे असणारा असा तो जात असता, मागून मित्र इत्यादी येत आहेत हे ऐकून त्यांच्याबरोबर जाण्यासाठी पावला-पावला गणीक विलंबाने (म्हणजे सावकाश) जातो. त्याप्रमाणेच प्रस्तुत लयींच्या योजनेबाबत जाणावे. यावरून गीत इत्यादी मुख्य असून त्यांना अनुसरून ताल योजावा असे सांगितले आहे. (५१, ५२, ५३–)

मार्गताल प्रकरण समाप्त

अभिनवगुप्ताची जी प्रकाशित टीका यावर उपलब्ध आहे, त्यावरून अर्थ सुस्पष्ट होत नाही.

'भारतीय संगीत' या ग्रंथाच्या लेखकाने तालाचा आरंभ केल्यावर गीताचा आरंभ केला असता तो अवपाणि व गीताचा आरंभ झाल्यावर ताल धरण्याचा आरंभ केला असता तो उपरिपाणि असे म्हटले आहे. (भारतीय संगीत, पृ. २०८).

नाट्यशास्त्रात दिलेल्या लक्षणानुसार गीताच्या पूर्वी वाद्य सुरू होते तो अवपाणि व गीताच्या नंतर वाद्य सुरू होते तो उपरिपाणि होय असे दिसून येते. नाटचशास्त्रात लय हा शब्द या लक्षणात वापरला आहे. त्याचा अर्थ गीत घ्यायचा असे अभिनवगुप्ताने सांगितले आहे. नाट्यशास्त्रातल्या अवपाणि व उपरिपाणि यांच्या लक्षणांना अनुसरून अतीत व अनागत या ग्रहांचे लक्षण शाङ्गदेवाने दिले आहे. नाट्यशास्त्रातील पाणि या ऐवजी ग्रह हा शब्द मध्य-युगात व नंतर प्रचारात आलेला दिसतो. म्हणून शार्ङ्गदेवाने पाणि या शब्दाने ताल निर्दिष्ट होतो असे म्हटले आहे. अर्थात ग्रह या शब्दाने तालाचे ग्रहण म्हणजे तालाचा आरंभ असा अर्थ घ्यायचा. संगीत रत्नाकराच्या अडचार आवृत्तीत 'प्राक्प्रवृत्तग्रहस्तूपरिपाणिकः ।' असा पाठ दिला आहे. तो कल्लिनाथाच्या टीकेला अनुसरून आहे. याला सदृश असे लक्षण संगीतसारामृतात दिले आहे ते असे– 'प्राक्प्रवृत्तग्रहः सोपरिपाणिकः' । संगीतरत्नाकराच्या आनंदाश्रम आवृत्तीत 'प्राक्प्रवृत्तः स एवोपरिपाणिकः' असा पाठ छापला आहे. हा पाठ सिंहभूपालासमोर असावा असे त्याच्या स्पष्टीकरणावरून वाटते.

१६. सुधाकर टीकेत प्रकरण याचे स्पष्टीकरण असे दिले आहे – 'प्रक्रियन्ते' (प्रकृत केली जातात) [म्हणजेच] 'प्रस्तूयन्ते' (प्रस्तुत केली जातात) ती प्रकरणे होत. प्रकरणांच्या संदर्भात पुढे म्हटले आहे --

पंचतालेश्वर इत्यादी प्रबंधांचा जरी मार्गतालाशी संबंध आहे, तरी त्यांत ताल मुख्य नसल्याने, व मार्ग स्वरूपात असण्याचा नियम नसल्याने, त्यांचा प्रबंधाध्यायात निर्देश केला. पण मद्रक इत्यादीत ताल प्रधान असल्याने ती येथे सांगितली आहेत.

तानि गीतानि वक्ष्यामस्तेषामाद्यं तु मद्रकम् ।
अपरान्तकमुल्लोप्यं प्रकर्यावेणकं ततः ॥ ५४ ॥
रोविन्दकोत्तरे सप्त गीतकानीत्यवादिषुः ।
छन्दकासारिते वर्धमानकं पाणिकं तथा ॥ ५५ ॥
ऋचो गाथा च सामानि गीतानीति चतुर्दश ।
शिवस्तुतौ प्रयोज्यानि मोक्षाय विदधे विधिः ॥ ५६ ॥
कुलकं छेद्यकं चेति तानि द्वेधा जगुर्बुधाः ।
वस्तूनामेकवाक्यत्वे कुलकं संप्रचक्षते ॥ ५७ ॥
वस्तूनां भिन्नवाक्यत्वे छेद्यकं ते पुनः पृथक् ।
निर्युक्तं पदनिर्युक्तमनिर्युक्तमिति त्रिधा ॥ ५८ ॥

ती गीते आता आम्ही सांगतो. त्यांतले पहिले मद्रक होय. मग अपरांतक, उल्लोप्य, प्रकरी आणि ओवेणक (ही होत). (५४) (त्यानंतर) रोविंदक व उत्तर (ही होत.) ही सात गीतके म्हणून सांगितली आहेत. छंदक, आसारित, वर्धमानक, पाणिक तसेच (५५) ऋचा, गाथा आणि सामे ही (सात) गीते (होत). अशी एकूण चौदा (होत). (ही) मोक्षासाठी शंकराच्या स्तुतीमध्ये योजावी (म्हणून) ब्रह्मदेवाने प्रयुक्त केली. (५६) ज्ञात्यांनी ती कुलक व छेद्यक अशी दोन प्रकारची सांगितली आहेत. ज्यात (अवयवस्वरूप) वस्तूंचे एकवाक्यत्व असते त्याला कुलक म्हणतात. (५७) वस्तूंचे भिन्नवाक्यत्व असता ते छेद्यक होय. ती दोन्ही पुन्हा प्रत्येकी निर्युक्त, पदनिर्युक्त व अनिर्युक्त अशी तीन प्रकारची असतात. (५८)

क० अशा प्रकारे लक्षणे सांगितल्या गेलेल्या मार्गतालांचा उपयोग दाखविण्यासाठी मद्रक इत्यादी गीते सांगण्याचे ठरवीत आहे – बुध म्हणजे भरत इत्यादी आचार्य होत. मद्रक इत्यादी सात गीतके व छंदक इत्यादी सात गीते यांचा सामान्यपणे निर्देश येथे केला आहे. ही (प्रकरण नांवाची चौदा गीते) मोक्ष इच्छिणाऱ्या ब्रह्मदेवाने शंकराच्या स्तुतीमध्ये प्रयुक्त केली असा अर्थ घ्यायचा. (५३–५६).

एककल इत्यादी पुढे सांगितल्या जाणाऱ्या, गीताचे अवयव असणाऱ्या, वस्तूंचे एकवाक्यत्व असता ते कुलक होय. एकवाक्यत्व म्हणजे एका क्रियेशी अन्वय. वस्तूंचे भिन्नवाक्यत्व असता ते छेद्यक होय. वस्तूंचे भिन्नवाक्यत्व म्हणजे प्रत्येक वस्तूची क्रिया वेगवेगळी असणे. ती दोन्ही म्हणजे कुलक व छेद्यक, पृथक् म्हणजे प्रत्येकी, निर्युक्त इत्यादी भेदांमुळे तीन प्रकारची असतात. (५७–५८)

सर्वाङ्गयुक्तं निर्युक्तं पदनिर्युक्तकं पुनः ।
बद्धं स्तुतिपदैस्त्यक्तोपोहनप्रत्युपोहनम्[१७] ॥ ५९ ॥

(विविध इत्यादी सर्व) अंगांनी युक्त ते निर्युक्त होय; आणि स्तुतिवाचक शब्दांनी बांधलेले ते पदनिर्युक्त होय. उपोहन व प्रत्युपोहन नसणारे (५९) आणि केवळ वस्तूंनीच

क० पुढे सांगितल्या गेलेल्या विविध इत्यादी सर्व अंगांनी युक्त असणारे ते निर्युक्त होय. स्तुतिवाचक शब्दांनी रचलेले ते पदनिर्युक्त म्हटले जाते. उपोहन व प्रत्युपोहन नसलेले व केवळ वस्तूंनीच रचलेले ते अनिर्युक्त होय. ध्रुवा इत्यादी गाण्यांमध्ये रागाचा आविष्कार होण्यासाठी स्थायी स्वराच्या आधाराने 'झण्टुम्' इत्यादी अक्षरे म्हणणे व लघु इत्यादी कालाचे ज्ञान होण्यासाठी ताल धरणे म्हणजे उपोहन होय. जे 'उप' म्हणजे जवळ 'ऊह्यते' म्हणजे विचार केले जाते त्याला उपोहन असे म्हटले आहे. भरताने तसे सांगितलेच आहे–

"ज्यापासून स्वर समीपतेने समजला जातो व ज्याच्या योगाने गीत सुरू होते ते स्थायी स्वराच्या आश्रयाने असणारे उपोहन म्हणून जाणावे."

---

१७. गीताच्या स्वरांची सुयोग्य धारणा व्हावी यासाठी गीताच्या आरंभी म्हणायचे उपोहन भरताने त्या त्या गीताच्या वेळी सांगितले आहे. उपोहन या शब्दात उप + ऊहन असे दोन शब्द आहेत. उप म्हणजे जवळ व ऊहन म्हणजे तर्काने जाणणे, समजणे किंवा धारण करणे. गीतांतील स्वर, शुष्काक्षरे (म्हणजे अर्थहीन अक्षरे) योजून उपोहनात म्हटले जात. ही अक्षरे झण्टुं जगति यवलित इत्यादी प्रकारची असत. कल्लिनाथाने स्वीकारलेल्या नाट्यशास्त्राच्या पाठात 'स्थायिस्वरसमाश्रयम्' असा शब्द आहे. नाट्यशास्त्राच्या एकतिसाव्या अध्यायात, बडोदा आवृत्ति व घोषसंपादित आवृत्ति या दोन्हींत, 'शुष्काक्षरसमन्वितम्' हा शब्द आहे. तसेच कल्लिनाथाने दिलेल्या पुढील दुसऱ्या श्लोकात जो 'स्तवनादिकः' हा शब्द आहे त्याऐवजी नाट्यशास्त्रात 'सूचनादिभिः' असा शब्द मिळतो. अभिनवगुप्ताने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार या श्लोकाचा अर्थ असा –

'सूचना (इत्यादी) अभिनयाच्या योगाने ज्यामुळे प्रयोग सूचित होतो ते वाद्यांच्या आधाराने (म्हटले जाणारे) (शुष्काक्षर) गान उपोहन होय.'

'तत वाद्यवादन व शब्दप्रयोग (म्हणजे शुष्काक्षरगान) यांमुळे जे अंतरमार्ग सांगितले आहेत त्यांत, ताण्डवात (म्हणजे मार्गनृत्यात), वाद्यवादनासह सूची योजावी', असे भरताने नाट्यशास्त्राच्या चवथ्या अध्यायात सांगितले आहे. (नाट्यशास्त्र बडोदा आवृत्ति, भाग १ पृ. २०३, अध्याय ४, श्लोक ३१८). जातिलक्षण देताना शेवटी अंतरमार्गाचे लक्षण शार्ङ्गदेवाने पहिल्या अध्यायात दिले आहे. (पहा – संगीत रत्नाकर, भाग. १, पृ. १५७, अध्याय १, प्रकरण ७, श्लोक ५२–५३). अभिनवगुप्ताने 'अंतर म्हणजे परस्परांचा वेगळेपणा ज्या उपायाने शोधला जातो तो अंतरमार्ग होय', असे 'अन्तरमार्ग' या शब्दाचे स्पष्टीकरण दिले आहे –

लास्यांगात योजलेल्या काव्याच्या अर्थाला अनुसरून, हस्ताभिनयरहित असा, केवळ सात्त्विक अंगव्यापारांनी नर्तकीने योजलेला अभिनय म्हणजे सूची हा अभिनय होय. यालाच सूची किंवा सूचना असेही म्हटले आहे. हा अभिनय काव्यार्थ सुचविणारा असतो. सूची अभिनयानंतर वाक्याभिनय योजला जातो. (५९–६०, ६१ –)

वस्तुमात्रैरनिर्युक्तं तत्र त्रेधा तु मद्रकम् ।
विधिनैककलाद्येन चतुर्वस्तु त्रिवस्त्विति ॥ ६० ॥
पुनर्द्वेधा शीर्षकं तु त्रिवस्तुन्येव बोध्यते ।
गुरूण्यष्टौ लघून्यष्टौ वस्त्वेककलमद्रके ॥ ६१ ॥
स्वरागयोनिजातेस्तु न्यासेऽपन्यासनेऽथवा ।
संन्यासेंऽशेऽथवा न्यासः सर्वगीतस्थवस्तुनः ॥ ६२ ॥

रचलेले ते अनिर्युक्त होय. त्यांतील मद्रक, एककल, इत्यादी प्रकारांमुळे तीन प्रकारचे असते. (तसेच) चार वस्तू असणारे व तीन वस्तू असणारे असे (६०) ते पुन्हा दोन प्रकारचे (असते). शीर्षक मात्र तीन वस्तू असणाऱ्या (मद्रकातच) जाणले जाते.

एककल मद्रकातील वस्तु आठ गुरू व आठ लघू असलेली अशी असते. (६१) स्वतःच्या रागाचे (मूळ) कारण असणाऱ्या जातीच्या न्यास किंवा अपन्यास या स्वरांवर अथवा संन्यास किंवा अंश या स्वरांवर सर्व गीतांतील वस्तूचा न्यास करावा. (६२)

किंवा स्तुति इत्यादीचा प्रयोग ज्यामुळे समीपतेने समजला जातो ते भाण्ड (म्हणजे वाद्य) याचा आश्रय करणारे गान उपोहन (म्हणून जाणावे).” [पहा— नाटचशास्त्र— (बडोदा आवृत्ति) भाग ४ पृ. २१६ अध्याय ३१, श्लोक १३८, १३९]

त्याचप्रमाणे—

“ गुरु व लघु यांनी युक्त आणि कला व ताल यांसहित असणारे उपोहन पूर्वरंगात चित्र-मार्गात नेहमी जाणावे. ” असेही भरताने सांगितले आहे [नाटचशास्त्र (बडोदा आवृत्ति) भाग १, पृ. २५२]. त्यातील पहिल्या वस्तूच्या आरंभाला योजलेले ते उपोहन म्हटले जाते व दुसऱ्या व इतर बाकीच्या वस्तूंच्या आरंभी योजलेले ते प्रत्युपोहन म्हटले जाते. किंवा एका वस्तूत प्रथम योजलेले ते उपोहन व नंतर योजलेले ते प्रत्युपोहन म्हटले जाते. अशा तऱ्हेचे उपोहन व प्रत्युपोहन नसणारे ते अनिर्युक्त होय.

एककलमद्रक, द्विकलमद्रक व चतुष्कलमद्रक असे मद्रक तीन प्रकारचे असते. चार वस्तू असणारे ते चतुर्वस्तु व तीन वस्तू असणारे ते त्रिवस्तु मद्रक होय. शीर्षक नावाचे गीतांग चतुर्वस्तु मद्रकाच्या आधी योजायचे नसते. ते त्रिवस्तु मद्रकातच योजायचे असते. (५९, ६०, ६१—)

क० एककल मद्रकातील वस्तूचे प्रमाण ग्रंथकार सांगत आहे. ‘ स्वरागयोनिजातेः ’ यातल्या ‘ स्व ’ या शब्दाने मद्रक इत्यादी गीते सांगितली आहेत. त्या त्या गीताच्या रागाची योनि म्हणजे कारण असणारी जी षाड्जी इत्यादि जाति ती स्वरागयोनिजाति होय. त्या जातीच्या न्यास, अपन्यास, व संन्यास यांपैकी एका स्वरावर न्यास म्हणजे त्या वस्तूची समाप्ति करावी. यावरून ग्रामराग व उपराग यांपैकी एका रागात मद्रक इत्यादी गीते गावी असे सूचित होते. कारण ते राग च त्या जातींपासून उत्पन्न झालेले आहेत. ‘ सर्वगीतस्थवस्तुनः ’ या शब्दाने ‘ स्वराग ’ इत्यादीत ‘ स्व ’ शब्दाने एकटचा मद्रकाचेच ज्ञान होण्याची संभवनीयता दूर करीत आहे. सर्व गीते म्हणजे मद्रक इत्यादी चौदा प्रकारची गीते. त्यामध्ये असणारी वस्तु ती ‘ सर्वगीतस्थवस्तु ’ होय. येथे ‘ वस्तु ’ हा शब्द ‘ समूह ’ याअर्थी एकवचनी वापरला आहे. यावरून अपरांतक इत्यादींमध्येही असणाऱ्या वस्तूंचा न्यास या वर सांगितलेल्या प्रकाराने करावा असा आशय समजून येतो. (६१–६२)

ध्रुवपातमपातं वा तद्गुरुत्रयमादिमम् ।
शद्वयं ताद्वयं शम्ये तालौ च द्विः शतौ च सम् ॥ ६३ ॥
क्रमाद् गलेषु शेषेषु तस्य स्यात्पातकल्पना ।
एवं वस्तुत्रयं गीत्वा शीर्षकं तु प्रयुज्यते ॥ ६४ ॥
चतुष्कलेनैककलेनाथवा पञ्चपाणिना ।
आद्ये वस्तुनि कर्तव्यं गुरुद्वयमुपोहनम् ॥ ६५ ॥
गुरुणागुरुणा कार्यं शेषयोः प्रत्युपोहनम् ।
झण्टुमाद्याक्षरैरेव रचना स्यात्तयोर्द्वयोः ॥ ६६ ॥
एकवस्तुकमप्याहुर्मद्रकं[१८] केऽपि सूरयः ।
तृतीये गुरुणि प्रोक्तं तत्र तैः प्रत्युपोहनम् ॥ ६७ ॥

(त्यांतील) पहिले तीन गुरू ध्रुवपातयुक्त किंवा पातरहित (योजावे). बाकीचे गुरू व लघू यांच्या बाबतीत, दोन शम्या, दोन ताल, (पुन्हा) दोन शम्या (आणि) दोन ताल, शम्या व ताल असे दोन वेळा, (व शेवटी) संनिपात अशी पातयोजना करावी. अशा प्रकारे तीन वस्तू गाऊन शीर्षक प्रयुक्त केले जाते. (६३, ६४). (ते) चतुष्कल किंवा एककल पंचपाणि तालात (योजायचे असते). पहिल्या वस्तूत दोन गुरू असणारे उपोहन योजावे. (६५) बाकीच्या दोनींत गुरु व लघु यांनी प्रत्युपोहन योजावे. झण्टुं आरंभी असणाऱ्या अक्षरांनीच त्या (उपोहन व प्रत्युपोहन) या दोनींची रचना असावी. (६६)

काही विद्वान मद्रक एका वस्तूचेही सांगतात. त्यात त्यांनी तिसऱ्या गुरूवर प्रत्युपोहन सांगितले आहे. (६७)

त्या मद्रकातील वस्तूच्या आठ गुरूंपैकी पहिले तीन गुरू ध्रुवपातयुक्त म्हणजे ध्रुव या सशब्द क्रियेने युक्त असे योजावे, किंवा अपात म्हणजे पातारहित म्हणजे पातारेरीजच्या दुसऱ्या क्रियेने योजावे; यावरून विकल्पाने निःशब्दक्रियेने युक्त असे योजावे असा अर्थ कळतो. चवथा व पाचवा गुरु दोन शम्यांनी युक्त, सहावा व सातवा गुरु दोन तालांनी युक्त आणि आठवा गुरु शम्येने युक्त असा योजावा. अनुक्रमाने नववा असणारा (म्हणजे लघूंमधला पहिला) लघु शम्येने, युक्त, दहावा व अकरावा लघु प्रत्येकी तालाने युक्त, बारावा व तेरावा लघु क्रमाने शम्या व ताल याने युक्त तसेच चवदावा व पंधरावा लघु क्रमाने शम्या व ताल याने युक्त आणि सोळावा लघु संनिपाताने युक्त अशी क्रमाने बाकीच्या गुरू व लघू यांच्या बाबतीत पातयोजना करावी. (६३–६६)

---

१८. काही आचार्यांनी म्हणजे भरत इ. नी एक वस्तु असणारेही मद्रक सांगितले आहे असे सुधाकर टीकेत म्हटले आहे. अर्थात त्यात दुसरी व तिसरी वस्तु नसल्याने उपोहन पहिल्या दोन गुरूंचे योजून प्रत्युपोहन तिसऱ्या गुरूने योजावे, असा सदुसष्टाव्या श्लोकाचा आशय आहे.

गुर्वष्टके स्याद्विविधं लघुष्वष्टस्वथैककम् ।
विविधो द्विविदारीकः स त्रिधा परिकीर्तितः ।। ६८ ।।
सामुद्रश्चार्धसामुद्रो विवृत्तश्चेति सूरिभिः ।
विदार्योः पदवर्णादिसाम्यात्सामुद्रको[१९] मतः ।। ६९ ।।
विदारीभागयोः साम्याच्चार्धसामुद्रको मतः ।
पूर्वस्या वा परस्या वा द्वयोर्वेति त्रिधा च सः ।। ७० ।।
न्यासान्तो विविधः कार्यः सर्वो द्वैगेयकं विना ।
असमानविदारीको न्यासापन्यासनिर्मितः ।। ७१ ।।
विवृत्तः स्याद्विदारी तु गीतखण्डं द्विधा च सा ।
महत्यवान्तराचेति महती व्याप्तवस्तुका ।। ७२ ।।
समाप्ता पदवर्णान्तेऽवान्तरा त्वन्तराभवा[२०] ।

(त्यामध्ये) आठ गुरूंत विविध व आठ लघूंत एकक (योजावा). विविधात दोन विदारी असून तो तीन प्रकारचा सांगितला आहे; (६८)

ज्ञात्यांनी (सांगितलेले ते तीन प्रकार) म्हणजे सामुद्र, अर्धसामुद्र व विवृत्त हे होत. दोन विदारींतील पद, वर्ण इत्यादींच्या सारखेपणामुळे (होणारा तो) सामुद्र मानला आहे. (६९)

विदारीच्या दोन भागांमधील (पद, वर्ण इत्यादींच्या) सारखेपणामुळे (होणारा तो) अर्धसामुद्र मानला आहे. तो पहिल्या (विदारींतील दोन भागांच्या सारखेपणामुळे होणारा), नंतरच्या (म्हणजे दुसऱ्या विदारीतील दोन भागांच्या सारखेपणाने होणारा) आणि दोन्हींतील (भागांच्या सारखेपणाने होणारा असा) तीन प्रकारचा असतो. (७०)

द्वैगेयक सोडून इतर सर्व प्रकारचा विविध शेवटी (त्याच्या रागाच्या जनक जातीचा) न्यास स्वर असलेला असा योजावा. विदारींतील (पदवर्ण इत्यादींची) समानता नसणारा व न्यास आणि अपन्यास यांनी निर्मिलेला (७१) तो विवृत्त होय. विदारी म्हणजे गीताचा खंड (म्हणजे भाग) होय. महती व अवांतरा अशी ती दोन प्रकारची असते. जी (सर्व) वस्तु व्यापते ती महती होय. (७२)

जी पद व वर्ण यांच्या शेवटीच समाप्त होते ती अवांतरा (मानली आहे) कारण ती अंतरा म्हणजे मध्ये असते. (७३ –)

क० या महाविदारी व अवांतर विदारींचा न्यास वस्तूप्रमाणे योजावा. म्हणजे वस्तूच्या बाबतीत ' स्वतःच्या रागाच्या जनकजातीचा ' इत्यादीने जो न्यास सांगितला आहे, तसाच न्यास

---

१९. ' पदवर्णादि ' म्हणजे पद व वर्ण इत्यादि; यातील ' इत्यादि ' या शब्दाने स्वर घ्यायचे.

२०. अडचार आवृत्तीत ' अन्तरा मता ' असा पाठ आहे. आनंदाश्रम आवृत्तीत ' अन्तराभवा ' असा पाठ मिळतो. अर्थ सुलभ होत असल्याने तो येथे घेतला आहे.

अनयोर्वस्तुवन्न्यासो जात्यंशोंऽशोऽल्पके पुनः ॥ ७३ ॥
अंशे तदनुवादी वा संवादी वांश इष्यते ।
संख्यानियममेतासां नावोचन् दत्तिलादयः ॥ ७४ ॥
भगवान् भरतस्त्वासां संख्यानियममभ्यधात् ।
त्र्यवरैकादशपरा[२१] विदार्यः परिकीर्तिताः ॥ ७५ ॥
चतुर्विंशतिरासां तु प्रमाणं परमं स्मृतम् ।
अवान्तरविदारीणां चतुर्विंशतिसंख्यया ॥ ७६ ॥
न्यासान्तमथवांशान्तं विदार्येकैकमं मतम् ।
आद्यं वस्तुद्वयं मन्द्रांशग्रहं[२२] (?) मद्रके मतम् ॥ ७७ ॥

(महाविदारी व अवांतरविदारी) या दोन्हींचा न्यास वस्तूप्रमाणे (योजावा). यांचा अंश (त्यांच्या रागाच्या जनक) जातीचा अंशच (असावा). (जातीचा अंश) अल्प असता (७३) त्या अंशाचा अनुवादी किंवा संवादी अंश म्हणून इष्ट होय. दत्तिल इत्यादी (आचार्यांनी) या (विदारींच्या) संख्येबाबतचा नियम सांगितलेला नाही. (७४) भगवान् भरताने यांचा संख्यानियम सांगितला आहे. विदारींची कनिष्ठ संख्या तीन व श्रेष्ठ संख्या अकरा म्हणून सांगितली आहे. (७५)

यांचे सर्वात जास्त प्रमाण चोवीस संख्येचे म्हटले आहे. (तसेच) अवांतर विदारींचे (सर्वात जास्त प्रमाण) चोवीस संख्येचे (म्हटले आहे). (७६) विदारीचे एकक (म्हणजे एक विदारी) न्यास शेवटी असणारे किंवा अंश शेवटी असणारे मानले आहे. मद्रकातील पहिल्या दोन वस्तू अंश व ग्रह मंद्र असलेल्या मानल्या आहेत. (७७)

येथेही योजावा. विदारींचा अंश मात्र स्वतःच्या रागाच्या जनकजातीचा अंशच योजावा. जातीच्या अंशाचा प्रयोग अल्प असेल तर त्या जातीच्या अंशाचा अनुवादी किंवा संवादी स्वर अंश म्हणून इष्ट होय. तीन विदारी ही विदारींची अल्प संख्या असून अकरा विदारी ही अधिक संख्या होय. असा हा महाविदारींच्या संख्येबद्दलचा भरताने दिलेला नियम होय. अवांतरविदारींची संख्या चोवीस दिली आहे. मद्रकातील प्रथम वस्तूचा, मद्रकस्थानात असणारा स्वर, अंश व ग्रह योजावा असा नियम समजावा. (७३-७७)

---

२१. 'त्र्यवरैकादशपराः' असा पाठ नाट्यशास्त्राच्या बडोदा व घोषसंपादित आवृत्तीत आहे. (नाट्यशास्त्र बडोदा आ. भा. १, पृ. २३२; नाट्यशास्त्र घोषसंपादित आ. भाग २ पृ. ६१) सुधाकरटीकेतही तोच पाठ घेतला आहे. म्हणून येथे तोच पाठ घेतला आहे. कल्लिनाथाने दिलेला पाठ 'अवरैकादशपराः' असा आहे. स्पष्टीकरणात तीन ही विदारींची अवर म्हणजे कमी संख्या व अकरा ही जास्त संख्या म्हणून दिली आहे.

२२. कल्लिनाथाने 'मद्रांशग्रहं' हा पाठ घेऊन जे स्पष्टीकरण दिले आहे त्यावरून आशय विशद होत नाही. शिवाय 'वस्तुद्वयं' या पदाचेही स्पष्टीकरण त्यात नाही. सुधाकरटीकेत 'मद्र-

अस्य[२३] प्रस्तारः– याचा प्रस्तार—

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ । । । । । । । ।

उ उ उ श श ता श श श ता ता श ता श ता सं ॥

(उ = उपोहन)

एवं वस्तुत्रयं वस्तुचतुष्टयं वा गीत्वा वस्तुत्रयान्ते शीर्षकं चतुष्कलेन पञ्चपाणिना यथाक्षरेण वा गायेत् ।

द्विकले मद्रके वस्तु स्याच्चतुर्विंशतिः कला ।

पादभागा द्वादश स्युस्तैस्तु मात्रात्रयं भवेत् ॥ ७८ ॥

या प्रमाणे तीन वस्तू किंवा चार वस्तू गाऊन तीन वस्तूंच्या शेवटी चतुष्कल किंवा यथाक्षर पंचपाणि तालात शीर्षक गावे.

अथैककला– आता एक कला–

ऽ । ऽ ऽ । ऽ

सं ता श ता श ता । **इत्येककला ॥** ही एक कला होय.

ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ
आ	नि	वि	प्र	आ	ता	वि	श	आ	नि	वि	ता

ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ	ऽ
आ	नि	वि	श	आ	ता	वि	प्र	आ	नि	वि	स

इति शीर्षकम् । हे शीर्षक होय.

इत्येककलमद्रकम् । हे एककल मद्रक होय.

द्विकल मद्रकात चोवीस कला असलेली वस्तु असते. (ब) बारा पादभाग असतात. त्यांनी तीन मात्रा होतात. (७८) तीन वस्तूंनंतर द्विकल किंवा यथाक्षर उत्तर तालात

क० या एककल मद्रकाचा प्रस्तार, सांगितलेल्या लक्षणाला अनुसरून लिहून दाखवीत आहे-- पहिल्या वस्तूंत आठ गुरूंच्या आठ वक्र रेषा व आठ लघूंच्या आठ उभ्या सरळ रेषा आडव्या ओळीत लिहून, त्यांतील पहिल्या तीन गुरूंच्या खाली, उपोहन कळण्यासाठी, उपोहनाचे

कातील प्रथम असणाऱ्या दोन वस्तूंत मंद्र स्वरच अंश व ग्रह योजावा ' असे स्पष्टीकरण दिले आहे. यावरून ' मन्द्रांशग्रहं ' हा पाठ स्वीकारलेला दिसतो. म्हणून तो पाठ येथे दुरुस्त पाठ या दृष्टीने दिला आहे. ' पहिली वस्तु मन्द्र अंश (असलेली)' असे वर्णन दत्तिलाने दिले आहे. तसेच ' दुसरी वस्तु ग्रहाप्रमाणे ' असे म्हटले आहे. (दत्तिलम् – पृ. १६)

२३. प्रस्ताराच्या वेळी संस्कृत ग्रंथाचे भाषांतर लगेच त्यापुढे दिले आहे.

द्विकलेनोत्तरेण स्याच्छीर्षं वस्तुत्रयात्परम् ।
यथाक्षरेण वा तत्र त्रिकलं स्यादुपोहनम् ॥ ७९ ॥
प्रत्युपोहनमत्र स्यात्कलिकं द्विकलं न वा ।
विविधः प्रतिवस्तु स्यान्मात्रयोरेककं पुनः ॥ ८० ॥
भवेत्तृतीयमात्रायामथ पातकलाविधिः ।
पादभागत्रये निप्रौ पञ्चस्वन्येषु याः कलाः ॥ ८१ ॥
आद्यास्तासु निरेवान्यत्पूर्वमद्रकवद्भवेत् ।

शीर्षक योजावे. त्यात उपोहन तीन कलांचे असावे. (७९) यात प्रत्युपोहन एक कलेचे किंवा दोन कलांचे असावे किंवा (मुळीच) नसावे. प्रत्येक वस्तूत दोन मात्रांत विविध असावा. आणि एकक (८०) तिसऱ्या मात्रेत असावा. आता पातकलांचा प्रकार (असा–) (पहिल्या) तीन पादभागांत (प्रत्येकी) नि प्र (अशी अक्षरे) योजावी. बाकीच्यांपैकी पुढील पाच पादभागांत पहिल्या कलांच्याखाली (८१) प्रत्येकी फक्त नि हेच अक्षर लिहून बाकी पूर्वीच्या (म्हणजे एककल मद्रकाच्या) प्रमाणे योजावे. (८२–)

पहिले अक्षर उ प्रत्येक गुरूसाठी लिहावे. चवथ्या गुरूपासून पाच गुरूंच्या खाली क्रमाने श श ता श श ही अक्षरे लिहावी. आठ लघूंच्या खाली क्रमाने शताताशताशतास ही आठ अक्षरे लिहावी. या तऱ्हेने तीन वस्तू किंवा चार वस्तू लिहाव्या. तीन वस्तू असणाऱ्या मद्रकात, तीन वस्तूंच्या शेवटी चतुष्कल षट्पितापुत्रक तालात शीर्षक नावाचे अंग योजावे. त्याचा प्रस्तार असा–

सहा पादभागात, प्रत्येक पादभागामध्ये चार गुरू वेगवेगळे असे आडव्या ओळीत लिहावे. त्यांच्या खाली पहिल्या पादभागात आ नि वि प्र, दुसऱ्यात आ ता वि श, तिसऱ्यात आ नि वि ता, चवथ्यात आ नि वि श, पाचव्यात आ ता वि प्र व सहाव्यात आ नि वि स अशी अक्षरे क्रमाने लिहावी. किंवा यथाक्षर षट्पितापुत्रक तालात शीर्षक गावे. त्याचे लेखन असे– प ल ग ग ल प लिहून त्या खाली क्रमाने सं ता श ता श ता ही अक्षरे लिहावी.

क० आता द्विकल मद्रकाचे लक्षण देत आहे—

एककल मद्रकाच्या अपेक्षेने द्विकल मद्रकातील वस्तूचे प्रमाण दुप्पट सांगितले आहे. एकेक पादभाग दोन कलांचा असे चोवीस कला असल्याने बारा पादभाग होतात. नाहीतर चतुष्कल स्वरूपामुळे सहा पादभाग अशी कल्पना निर्माण होणे संभवनीय आहे. पहिले चार पादभाग मिळून एक मात्रा, मधले चार पादभाग मिळून दुसरी मात्रा व शेवटचे चार भाग मिळून तिसरी मात्रा (अशा एकूण तीन मात्रा होतात). या संबंधात 'त्या चार पादभागांनी मद्रक इत्यादीत मात्रा होते' हे पूर्वी सांगितलेले जोडून घ्यावे. या तीन मात्रा मिळून एक वस्तु होय. अशा तीन वस्तूंनंतर द्विकल किंवा यथाक्षर षट्पितापुत्रक तालात शीर्षक नावाचे अंग गावे. या द्विकल मद्रकात तीन कलांचे उपोहन योजावे. प्रत्युपोहन एक कलेचे, किंवा दोन कलांचे असावे किंवा मुळीच नसावे असे तीन पक्ष दिले आहेत.

ज्यांची योजना सांगितली आहे त्या (अकरा कला) सोडून बाकीच्या तेरा कलांच्या बाबतीत 'दोन शम्या, दोन ताल, दोन शम्या, दोन ताल, शम्या व ताल दोन वेळा व शेवटी सं या सांगितलेल्या रीतीने पातांची योजना करावी. (७८ ते ८१, ८२–)

अस्य प्रस्तारः – याचा प्रस्तार—

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि प्र नि प्र नि प्र नि श ॥ मात्रा १ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि श नि ता नि ता नि श ॥ मात्रा २ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
श ता ता श ता श ता सं ॥ मात्रा ३ ॥

इत्येकं वस्तु । ही एक वस्तु होय.

ईदृग्वस्तुत्रयान्ते शीर्षकं यथाक्षरेण द्विकलेनोत्तरेण वा ।
चतुष्कले तु द्विगुणं वस्तु द्विकलवस्तुनः ॥ ८२ ॥
लक्ष्म द्विकलवत्किंतु पादभागश्चतुष्कलः ।
चतुष्कलेनोत्तरेण केवलेनास्य शीर्षकम् ॥ ८३ ॥

या प्रकारे तीन वस्तू योजून शेवटी यथाक्षर किंवा द्विकल उत्तर तालात शीर्षक (गावे).

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि प्र ता श नि ता नि श ता प्र नि सं ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ **इति शीर्षकम्** । हे शीर्षक होय.

इति द्विकलमद्रकम् । हे द्विकलमद्रक होय.

द्विकल मद्रकातील वस्तूच्या दुप्पट प्रमाणाची वस्तु चतुष्कल मद्रकात असते. (८२)

त्याचे लक्षण द्विकल मद्रकाप्रमाणेच आहे; पण पादभाग चार कलांचा (म्हणजे गुरूंचा) असतो. याचे शीर्षक केवळ चतुष्कल उत्तर तालात (गायचे असते); (८३)

क० याचा प्रस्तार—

प्रत्येकी दोन दोन कलांचे बारा पादभाग लिहून, मात्रा विभागानुसार क्रमाने निप्र, निप्र, निप्र निश; निश निता निता निश; शता ताश ताश तासं अशी अक्षरे त्याखाली लिहावी. अशा तीन वस्तूंनंतर यथाक्षर उत्तर तालात शीर्षक पूर्वीप्रमाणे लिहावे किंवा द्विकल उत्तर तालात शीर्षक योजावे. त्यात सहा पादविभागांत बारा गुरू लिहून त्यांच्या खाली क्रमाने निप्र ताश निता निश ताप्र निसं ही अक्षरे लिहावी.

क० द्विकलमद्रकातील वस्तूच्या दुप्पट म्ह. अठ्ठेचाळीस कला चतुष्कल मद्रकातील प्रत्येक वस्तूत असतात. प्रत्येक वस्तूत बारा पादभाग असून चार भागांची मात्रा होते. त्यात पहिल्या दोन मात्रांत विविध नावाचे अंग योजायचे असून तिसऱ्या मात्रेत एकक नावाचे अंग योजायचे असते.

युक्तैनैककलाद्यैर्वाष्टकलं स्यादुपोहनम् ।
विविधोऽन्तिमवस्त्वन्ते कार्यो द्वैगेयकाभिधः ॥ ८४ ॥
असावंशादिरंशान्तपदावृत्तियुतो मतः ।
आनिविप्राः पादभागात्रितयेऽभिमताः क्रमात् ॥ ८५ ॥
द्वयोरानिविशास्तद्वद्द्वयोरानिवितास्ततः ।
एकत्रानिविशा आशविताश्चाताविशा द्वयोः ॥ ८६ ॥
अन्त्ये तानिविसं पातकलाविधिरयं मतः ।
चच्चत्पुटवदङ्गुल्यः कर्तव्या मद्रके बुधैः ॥ ८७ ॥

किंवा एककल इत्यादींनी युक्त (चतुष्कल उत्तर तालात गायचे असते.) उपोहन आठ कलांचे असते. शेवटच्या वस्तूच्या अखेरीला द्वैगेयक नावाचा विविध योजावा. (८४)

तो अंशाने आरंभ होणारा (व) अंशाने शेवट होणारा आणि पदांच्या आवृत्तीने युक्त असणारा असा मानला आहे. (या मद्रकाच्या) तीन पादभागांत क्रमाने आ नि वि प्र ही अक्षरे इष्ट होत; (८५)

(पुढील) दोन पादभागांत आनिविश तसेच (नंतरच्या) दोनींत आनिविता मग एकात आनिविश (आणि) दोनींत (क्रमाने) आशविता व आताविश, (८६) आणि शेवटच्या (पादभागात) तानिविसं असा हा पातकला-योजनेचा प्रकार मानला आहे. ज्ञात्यांनी मद्रकात चच्चत्पुटाप्रमाणे अंगुली योजाव्या. (८७)

तीन वस्तू असतात तेव्हा तीन वस्तूंच्या नंतर शीर्षक नावाचे अंग योजायचे इत्यादि लक्षण येथे जोडून घ्यावे. त्यातील फरक दाखवीत आहे– नुसत्या चतुष्कल उत्तरतालात, किंवा एककलयुक्त चतुष्कल उत्तरतालात, अथवा द्विकलयुक्त चतुष्कल उत्तरतालात किंवा चतुष्कलयुक्त चतुष्कल (म्हणजे दोन चतुष्कल अशा) उत्तरतालात शीर्षक योजावे असे शीर्षकाच्या बाबतीत चार प्रकार दिलेले आहेत. प्रत्युपोहनाच्या बाबतीतही चार पक्ष आहेत; एक कलेचे, दोन कलांचे किंवा चार कलांचे प्रत्युपोहन योजावे किंवा मुळीच योजू नये. विविध नावाच्या अंगाचे एक विशेष नाव द्वैगेयक हे होय. हा द्वैगेयक अंश स्वर आरंभी असणारा म्हणजे अंश हाच ग्रह असणारा आणि अंश स्वर शेवटी असणारा म्हणजे अंश हाच न्यास असणारा असा असतो. 'तो पदांच्या आवृत्तीने युक्त असतो' असे सांगण्याने द्वैगेयक या नांवाची सार्थकता दाखविली आहे.

बारा पादभागांतील पातकलाप्रकार दाखवीत आहे– 'एकत्रानिविशाः" यांतील एकत्र म्हणजे आठव्या या एका पादभागात; 'आशविताश्च' यातील 'च'कारावरून 'एकत्र' हे त्याला जोडून घ्यायचे, म्हणजे नवव्या या एका पादभागात आशविता ही अक्षरे; 'आताविशा द्वयोः' यानुसार बाराव्या व अकराव्या या दोन पादभागांत 'आताविश' ही अक्षरे असतात. शेवटच्या म्हणजे बाराव्या पादभागात. मद्रकात चच्चत्पुटाप्रमाणे अंगुली योजाव्या याचा अर्थ असा– पहिल्या इत्यादी चार पादभागांत करंगळी इत्यादी बोटे उत्तरोत्तर (इतर बोटांसहित) योजून तसेच पाचव्या इत्यादी चार पादभागांतही तशीच योजून मग नवव्या इत्यादी चार पादभागांतही पुन्हा तशीच योजावी. (८२–८७)

अस्य प्रस्तारः– याचा प्रस्तार–

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि प्र आ नि वि प्र आ नि वि श ॥ मात्रा १ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ नि वि ता आ वि वि ता आ नि वि श ॥ मात्रा २ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ श वि ता आ ता वि श आ ता वि श ता नि वि सं ॥ मात्रा ३ ॥

इत्येकं वस्तु । ही एक वस्तु होय.

एवं पूर्ववत् वस्तुत्रयानन्तरं शीर्षकं चतुष्कलेन पञ्चपाणिना यथा–

याप्रमाणें पूर्वीसारख्या तीन वस्तू योजून, चतुष्कल पंचपाणि तालात शीर्षक (योजावे). ते असे–

ऽ ऽ
आ नि वि प्र आ ता वि श आ नि वि ता आ नि वि श आ ता वि प्र आ नि वि सं ॥

एककलचतुष्कलाभ्यां वा–

किंवा एककल व चतुष्कल (पंचपाणि) तालांत (योजावे)–

ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
सं ता श ता श ता ॥ आ नि वि प्र आ ता वि श आ नि वि ता

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ ता वि प्र आ नि वि सं ॥

क. याचा प्रस्तार असा–

प्रत्येकी चार गुरू असणारे बारा पादभाग मात्राविभागानुसार वेगवेगळे लिहावे. त्यांच्या खाली पहिल्या मात्रेत आनिविप्र, आनिविप्र, आनिविप्र, आनिविश, दुसऱ्या मात्रेत आनिविश, आनिविता, आनिविता, आनिविश व तिसऱ्या मात्रेत आशविता, आताविश, आताविश, तानिविसं अशी अक्षरे लिहावी. ही एक वस्तु होय. अशा तीन वस्तूंनंतर चतुष्कल पंचपाणि तालात शीर्षक योजावे ते असे—

प्रत्येकी चार गुरूंचे पादभाग वेगवेगळे लिहून त्यांच्याखाली आनिविप्र, आताविश, आनिविता, आनिविश, आताविप्र, आनिविसं ही अक्षरे क्रमाने लिहावी. आता एककल व चतुष्कल उत्तर तालात योजायचे शीर्षक असे– पलगगलप लिहून त्याखाली सं ता श ता श ता अशी अक्षरे क्रमाने लिहावी व चतुष्कल उत्तर तालही वरच्याप्रमाणे लिहावा. द्विकल व चतुष्कल उत्तर-तालातील शीर्षक असे– प्रत्येकी दोन गुरू असणारे सहा पादभाग लिहून त्यांखाली निप्र ताश निता निश ताप्र निसं ही अक्षरे लिहावी, तसेच चतुष्कल उत्तर तालही लिहावा. दोन चतुष्कल उत्तरतालांतील शीर्षकासाठी पूर्वीप्रमाणे दोन चतुष्कल उत्तर ताल लिहावे.

त्रिधापरान्तकं तद्वद्भेदैनैककलादिना ।
अस्मिन्नेककले वस्तु चतुर्गुरु चतुर्लघु ॥ ८८ ॥
पञ्च षट् सप्त वा वस्तून्यस्य शाखा निगद्यते ।
शाखेव प्रतिशाखा स्यात्किं त्वन्यपदनिर्मिता ॥ ८९ ॥

द्विकलचतुष्कलाभ्यां वा–

किंवा द्विकल व चतुष्कल (पंचपाणि) तालांत (योजावे) –

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि प्र ता श नि ता नि श ता प्र नि सं ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ ता वि श आ नि वि ता आ नि वि श आ ता वि प्र आ नि वि सं ॥

चतुष्कलाभ्यां वा–

किंवा दोन चतुष्कल (पंचपाणि) तालांत (शीर्षक गावे)—

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ ता वि श आ नि वि ता आ नि वि श आ ता वि प्र आ नि वि सं ॥

ऽ ऽ
आ नि वि प्र आ ता वि श आ नि वि ता आ नि वि श आ ता वि प्र आ नि वि सं ॥

इति शीर्षकम् । हे शीर्षक होय.

इति चतुष्कलमद्रकम् । हे चतुष्कल मद्रक होय.

त्याप्रमाणेच एककल इत्यादी भेदांमुळे अपरांतक तीन प्रकारचे असते. यातील एककलामध्ये चार गुरू व चार लघू असणारी वस्तु असते. (८८)

याची शाखा पाच, सहा किंवा सात वस्तूंची सांगितली आहे. शाखेप्रमाणेच प्रतिशाखा असते; पण ती दुसऱ्या शब्दांनी निर्मिलेली असते. (८९)

क० आता अपरांतकाचे लक्षण देत आहे. पाच वस्तूंची शाखा, सहा वस्तूंची शाखा किंवा सात वस्तूंची शाखा असणारे असे तीन प्रकारचे अपरांतक असते. शाखा हे गीताच्या अवयवाचे नाव होय. प्रतिशाखेतला विशेष म्हणजे ती दुसऱ्या शब्दांनी निर्माण केलेली असते. अर्थात शाखेत योजलेल्या शब्दांहून वेगळे शब्द तिच्यात योजावे. यावरून शाखा व प्रतिशाखा या या दोन्हींत एकच धातु योजावा हे समजते असें कांहींचे मत आहे. (८८-८९)

शाखार्धं पश्चिमं त्वाह प्रतिशाखां विशाखिलः ।
शाखा वस्तूच्यते तस्याः परार्धं प्रतिशाखिका ॥ ९० ॥
इत्याह भरतस्तत्रोपोहनं कलिकं मतम् ।
प्रत्युपोहनमत्र स्यान्न वान्ये त्वेकवस्तुकम् ॥ ९१ ॥
इदमाहुः कला तेषां द्वितीया प्रत्युपोहनम् ।
शीर्षमेककलेन स्याच्छाखान्ते पञ्चपाणिना ॥ ९२ ॥
अन्ये तु प्रतिशाखान्तेऽप्येतदाहुर्मनीषिणः ।
शाखायाः प्रतिशाखायाः कलाषट्केऽन्त्यवस्तुनः ॥ ९३ ॥
अन्त्ये पदावृत्तियुक्तः पञ्चपाणिर्यथाक्षरः ।
निजपातैर्विना यद्वा तत्पाता एव केवलाः ॥ ९४ ॥

विशाखिलाने शाखेच्या दुसऱ्या अर्ध्या भागास प्रतिशाखा म्हटले आहे. (एक) वस्तु शाखा म्हटली आहे; तिचा दुसरा अर्धा भाग प्रतिशाखा होय, (९०) असे भरताने सांगितले आहे. त्यात उपोहन एका कलेचे मानले आहे. यात प्रत्युपोहन योजावे किंवा योजू नये. दुसरे (काही आचार्य) हे (अपरांतक) एका वस्तूचे सांगतात. त्यांच्या बाबतीत दुसरी कला प्रत्युपोहन होय. शाखेच्या शेवटी एककल पंचपाणि तालात शीर्षक (योजायचे) असते. (९१, ९२)

दुसरे काही विद्वान तर प्रतिशाखेच्या शेवटीही हे (शीर्षक) सांगतात. शेवटच्या वस्तूच्या शाखा व प्रतिशाखा यांतील अखेरच्या सहा कला पदाच्या आवृत्तीने युक्त अशा यथाक्षर पंचपाणि तालात (योजाव्या); त्या (पंचपाणि तालाच्या) स्वतःच्या पातांशिवाय (योजाव्या) अथवा त्याचे पातच केवळ (योजावे) (९३,९४). यथाक्षर पंचपाणि तालात

विशाखिलाच्या मताने शाखेचा नंतरचा अर्धा भाग प्रतिशाखा होय. या मतानुसार एक वस्तु असणाऱ्या अपरांतकात वस्तूच्या प्रमाणाची शाखा योजून, वस्तूच्या उत्तरार्धातील चार लघूंची प्रतिशाखा योजावी. पाच वस्तूंची शाखा इत्यादी तीन प्रकारात क्रमाने पहिल्या अडीच, तीन व साडेतीन वस्तूंची शाखा योजावी व तसाच असणारा उत्तरार्ध प्रतिशाखा म्हणून योजावा. भरताच्या मतानुसार विशेष म्हणजे पाच वस्तूंची शाखा इत्यादी तिन्ही प्रकारांत प्रत्येक वस्तूतला पहिला अर्धा भाग शाखा आणि नंतरचा अर्धा भाग प्रतिशाखा (अशी योजना) मानावी.

एका कलेने पूर्ण होणारे ते कलिक होय. जेथे उपोहन सांगितले नसेल तेथे पहिल्या वस्तूतील दोन गुरूंनी उपोहन योजावे असा नियम जाणावा. (९० ते ९२)

शाखेच्या शेवटी शीर्षक योजावे हे एक मत होय. दुसऱ्या मते प्रतिशाखेच्या शेवटी शीर्षक योजावे. शेवटच्या वस्तूच्या शाखेच्या व प्रतिशाखेच्या अखेरच्या सहा कलांमध्ये पदाच्या आवृत्तीने युक्त असा यथाक्षर पंचपाणि ताल योजावा. षट्पितापुत्रकाचे स्वतःचे पात म्हणजे सं ता श ता शता हे होत. त्या खेरीजच्या पातांनी म्हणजे देशी तालाप्रमाणे केवळ शम्येनेच ताल योजावा हे

तालिकेयं पृथग्यद्वा पञ्चपाणौ यथाक्षरे ।
तृतीयादिगलेषु स्युः शताताशाश्च तालसम् ॥ ९५ ॥

अस्य प्रस्तारः– याचा प्रस्तार–

ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ प्र श ता ता श ता सं ॥ इति वस्तु । ही वस्तु होय.

ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ इति शीर्षकम् । हे शीर्षक होय.

ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ इति प्रतिशाखा । ही प्रतिशाखा होय.

। । । ।
ता श ता श ॥ इति [२४]तालिका । ही तालिका होय.

योजलेली हीच तालिका होय. किंवा ती वेगळी (योजावी). तिसऱ्या इत्यादी गुरू व लघूंच्यामध्ये श ता ता श ता सं ही अक्षरे योजावी. (९५)

एक मत होय किंवा षट्पितापुत्रकाचे पूर्वी सांगितलेले पात योजावे. केवळ म्हणजे पातकलांतर-सहित, हेही दुसरे एक मत होय. पंचपाणि तालाने युक्त ज्या सहा कला सांगितल्या त्याच तालिका या नावाने सांगितल्या जातात. किंवा वेगळी म्हणजे वस्तूमध्ये समावेश न करता तालिका योजावी हे दुसरे मत होय. चार गुरू व चार लघू असणाऱ्या वस्तूत पहिल्या कलेत उपोहन व दुसऱ्या कलेत प्रत्युपोहन योजल्यावर, तिसऱ्या व चवथ्या गुरूंत शम्या व ताल आणि पाचव्या पासूनच्या चार लघूंत क्रमाने 'ताशतासं' हे पात योजावे. (९३–९५)

क० याचा प्रस्तार– चार गुरू व चार लघू लिहून पहिल्या गुरूच्या खाली उ व दुसऱ्या गुरूच्या खाली प्रत्युपोहनाचे पहिले अक्षर प्र लिहावे. मग तिसऱ्या इत्यादी गुरूलघूंच्या खाली 'श ता ता श ता सं' ही अक्षरे क्रमाने लिहावी. ही वस्तु होय, हीच शाखा होय. नंतर यथाक्षर उत्तर तालात शीर्षक लिहून त्याखाली 'ताश ताश' ही अक्षरे लिहावी. मग पूर्वीप्रमाणे शीर्षक लिहावे.

---

२४. तालिकेच्या दिलेल्या वर्णनानुसार ती सहा कलांची पाहिजे. विशाखिलाच्या मताने

। । । ।
शाखेचा दुसरा अर्ध प्रतिशाखा होय. त्यानुसार येथे दुसरा अर्धा ता श ता सं असा चार लघूंचा आहे. त्यामुळे येथे चार लघूंची तालिका दिलेली बरोबर नाही. ती 'ताशताश' या पातांनी युक्त प्रतिशाखा असायला हवी. कल्लिनाथाच्या टीकेतील हा भाग आनंदाश्रम व अडचार या दोन्ही आवृत्तींत समान आहे. त्यात दुरुस्ती असणे योग्य आहे. तसेच पंचाण्णवाव्या श्लोकावरील टीकेत वस्तूतील शेवटच्या चार लघूंच्या खाली 'ता श ता श' ही अक्षरे दिली आहेत. मूळ श्लोकात शेवटचे अक्षर 'सं' हे आहे. त्यामुळे ही दुरुस्तीही उचित वाटते.

इत्येकवस्तुकम् । हे एका वस्तूचे (अपरांतक) होय.

अथ पञ्चवस्तुकम् । आता पाच वस्तूंचे (अपरांतक) –

ऽ ऽ ऽ ऽ | | | |
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु १ ॥

ऽ ऽ ऽ ऽ | | | |
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु २ ॥

ऽ ऽ ऽ ऽ | | | |
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु ३ ॥

ऽ ऽ ऽ ऽ | | | |
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु ४ ॥

ऽ ऽ ऽ ऽ | | | |
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु ५ ॥

ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀
सं ता श ता श ता ॥ इति तालिका ॥ ही तालिका होय.

ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀
सं ता श ता श ता ॥ इति शीर्षकम् ॥ हे शीर्षक होय.

इयं शाखा; ईदृश्येव पदान्तरनिर्मिता प्रतिशाखा ।
ही शाखा होय; अशीच (पण) वेगळ्या शब्दांनी निर्मिलेली प्रतिशाखा होय.

इति पञ्चवस्तुकम् । हे पाच वस्तूंचे (अपरांतक) होय.

अथ षड्वस्तुकम् । **अस्य प्रस्तारः** – आता सहा वस्तूंचें (अपरांतक); याचा प्रस्तार –

ऽ ऽ ऽ ऽ | | | |
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु १ ॥

क० आता पाच वस्तूंचे अपरांतक– चार गुरु व चार लघू असणाऱ्या पाच वस्तू वेगवेगळ्या लिहून, प्रत्येक वस्तूत पहिल्या दोन गुरूंच्या खाली मात्रकात सांगितल्याप्रमाणे उ उ ही अक्षरे लिहावी. बाकीच्यांच्या खाली 'श ता ता श ता सं' ही अक्षरे क्रमाने लिहावी. मग यथाक्षर उत्तर तालात तालिका लिहावी. त्याच तालात शीर्षक लिहावे. हीच शाखा होय. अशीच प्रतिशाखा होय.

ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु २ ॥

ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु ३ ॥

ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु ४ ॥

ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु ५ ॥

ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु ६ ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ इति तालिका ॥ ही तालिका होय.

ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ इति शीर्षकम् ॥ हे शीर्षक होय.

ईदृश्येव पदान्तरनिर्मिता प्रतिशाखा ।

अशीच वेगळ्या शब्दांनी निर्मिलेली प्रतिशाखा होय.

इति षड्वस्तुकम् । हे सहा वस्तूंचे (अपरांतक) होय.

अथ सप्तवस्तुकम् । अस्य प्रस्तारः —

आता सात वस्तूंचे (अपरांतक); याचा प्रस्तार –

ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु १ ॥

ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ २ ॥

ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ ३ ॥

ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु ४ ॥

ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु ५ ॥
ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ ,, ६ ॥
ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ ,, ७ ॥

ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀
सं ता श ता श ता ॥ इति तालिका ॥ ही तालिका होय.

ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀
सं ता श ता श ता ॥ इति शीर्षकम् ॥ हे शीर्षक होय.

इति सप्तवस्तुकम् । हे सात वस्तूंचे (अपरांतक) होय.

सर्वेषां वस्तूनां शाखात्वे तदुत्तरार्धानां प्रतिशाखात्वे ताशताशाः ।
ईदृश्येव प्रतिशाखा । प्रतिशाखापक्षे त्वेवम् –

सर्व वस्तूंची प्रत्येकी शाखा व त्या शाखेच्या उत्तरार्धांची प्रतिशाखा (योजिली) असता ता श ता श ही अक्षरे (लिहावी). अशीच प्रतिशाखा होय. प्रतिशाखा असता (स्वरूप) असे –

ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ इति शाखा ॥ ही शाखा होय.

ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀
सं ता श ता श ता ॥ इति शीर्षकम् ॥ हे शीर्षक होय.

ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀
सं ता श ता श ता ॥ इति तालिका ॥ ही तालिका होय.

। । । ।
ता श ता श ॥ प्रतिशाखा ॥

ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀
सं ता श ता श ता ॥ शीर्षकम् ॥

ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀
सं ता श ता श ता ॥ तालिका ॥ १ ॥

ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ शाखा ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ शीर्षकम् ॥ सं ता श ता श ता ॥ तालिका ॥
। । । । ऽ । ऽ ऽ । ऽ
ता श ता श ॥ प्रतिशाखा ॥ सं ता श ता श ता ॥ शीर्षकम् ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ तालिका ॥ २ ॥
ऽ ऽ ऽ ऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ शाखा ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ शीर्षकम् ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ तालिका ॥
। । । ।
ता श ता श ॥ प्रतिशाखा ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ शीर्षकम् ॥ सं ता श ता श ता ॥ तालिका ॥ ३ ॥
ऽ ऽ ऽ ऽ । । । । ऽ । ऽ ऽ । ऽ
उ उ श ता ता श ता सं ॥ शाखा ॥ सं ता श ता श ता ॥ शीर्षकम् ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ । । । ।
सं ता श ता श ता ॥ तालिका ॥ ता श ता श ॥ प्रतिशाखा ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ शीर्षकम् ॥ सं ता श ता श ता ॥ तालिका ॥ ४ ॥
ऽ ऽ ऽ ऽ । । । । ऽ । ऽ ऽ । ऽ
उ उ श ता ता श ता सं ॥ शाखा ॥ सं ता श ता श ता ॥ शीर्षकम् ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ । । । ।
सं ता श ता श ता ॥ तालिका ॥ ता श ता श ॥ प्रतिशाखा ॥

ऽ । ऽऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ

सं ता श ता श ता ॥ शीर्षकम् ॥ सं ता श ता श ता ॥ तालिका ॥ ५ ॥

एवं षड्वस्तुकसप्तवस्तुकयोरप्यूहनीयम् । शाखोत्तरार्धस्य प्रतिशाखात्वपक्षे तु पञ्चवस्तुकम् ॥ यथा –

असेच सहा व सात वस्तूंच्या अपरांतकाविषयी तर्काने जाणावे. शाखेचा उत्तरार्ध प्रतिशाखा असता पंचवस्तुक असे (असते) –

ऽ ऽऽऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ वस्तु १ ॥
ऽ ऽऽऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ ,, २ ॥
ऽ ऽऽऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ ,, ३ ॥
ऽ ऽऽऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ ,, ४ ॥
ऽ ऽऽऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ ,, ५ ॥
ऽ ऽऽऽ । । । ।
उ उ श ता ता श ता सं ॥ इति शाखा ॥ ही शाखा होय.

ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ इति तालिका ॥ ही तालिका होय.

ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ इति शीर्षकम् ॥ हे शीर्षक होय.

इति पञ्चवस्तुकम् । हे पंचवस्तुक (अपरांतक) होय.

(यातील प्रतिशाखेचे स्वरूप कल्लिनाथाने टीकेत दिले आहे. ते जोडून घ्यावे.)

क० शाखेचा उत्तरार्ध प्रतिशाखा म्हणून योजणे या पक्षी– पाच वस्तूंच्या अपरांतकात पाच वस्तूंची शाखा गाऊन मग प्रतिशाखा (योजावी). तिच्यात तिसऱ्या वस्तूच्या उत्तरार्धातले चार लघू लिहून त्यांखाली ' (ता) श ता स ' ही अक्षरे लिहावी. मग पूर्वी सांगितल्या तऱ्हेने चवथी व पाचवी वस्तु लिहावी. नंतर तालिका व शीर्षक ही दोन्ही पूर्वीप्रमाणे उत्तर तालात लिहावी. अशी पाच वस्तूंच्या अपरांतकातील प्रतिशाखा होय. सहा वस्तूच्या अपरांतकात शेवटच्या तीन

षड्वस्तुके शाखां शीर्षकं च लिखित्वा तदर्धेन वस्तुत्रयेण प्रतिशाखां लिखित्वा तालिकां शीर्षकं च पूर्ववल्लिखेत्। एवं सप्तवस्तुके सप्तवस्तुकां शाखां तालिकां शीर्षकं च लिखित्वा तदर्धेन सार्धवस्तुत्रयेण प्रतिशाखां लिखेत्। ततस्तालिकां शीर्षकं च पूर्ववल्लिखेत्।

इत्येककलमपरान्तकम्।

द्विकले द्वादशकलं वस्तु स्यादपरान्तके।
तच्चैककलवत्कार्यं विशेषस्त्वभिधीयते ॥ ९६ ॥
उपोहनं स्यात्कलिकं द्विकलं वा कलैव तु।
प्रत्युपोहनमत्रोपवर्तनं तुर्यवस्तुनि ॥ ९७ ॥
गीते तत्पदगीतिभ्यां तल्लयार्धलयं भवेत्।
यथाक्षरेणोत्तरेण वृत्तिदक्षिणमार्गयोः ॥ ९८ ॥

सहा वस्तूंच्या अपरांतकात शाखा व शीर्षक लिहून त्याच्या अर्ध्याने म्हणजे तीन वस्तूंनी प्रतिशाखा लिहून मग तालिका व शीर्षक पूर्वीच्या प्रमाणे लिहावे. तसेच सात वस्तूंच्या अपरांतकात सात वस्तूंची शाखा, तालिका व शीर्षक लिहून त्याच्या अर्ध्या भागाने म्हणजे साडेतीन वस्तूंनी प्रतिशाखा लिहावी. नंतर तालिका आणि शीर्षक पूर्वीप्रमाणे लिहावे.

एककल अपरांतक समाप्त.

द्विकल अपरांतकात बारा कलांची (म्हणजे गुरूंची) वस्तु असते. ते एककलाप्रमाणेच योजावे; पण त्यातला विशेष सांगतो. (९६)

(त्यात) एक कलेचे किंवा दोन कलांचे उपोहन असावे. प्रत्युपोहन मात्र एक कलेचेच असावे. चवथी वस्तु गायिली असता, तिच्या पदांनी व गीतीने (युक्त असणारे) आणि तिच्या लयीच्या अर्ध्या लयीत असणारे उपवर्तन यात असते. ते यथाक्षर उत्तर तालात व वृत्ति आणि दक्षिण मार्गात (योजावे). (९७, ९८)

वस्तूंची प्रतिशाखा तसेच सात वस्तूंच्या अपरांतकात नंतरच्या साडेतीन वस्तूंची प्रतिशाखा असते. सर्व वस्तूंची प्रत्येकी शाखा आणि तिच्या उत्तरार्धांची प्रतिशाखा या पक्षी प्रस्तार दाखवला आहे तो असा– प्रथम सर्व वस्तु लिहून ती शाखा (योजावी). तिचा उत्तरार्ध म्हणजे चार लघू ही प्रतिशाखा होय. याचप्रमाणे पाच वस्तूंचे किंवा सहा वस्तूंचे अपरांतक लिहून शेवटच्या वस्तुशाखेच्या अखेरीस यथाक्षर उत्तर तालात तालिका व शीर्षक लिहावे, किंवा त्याच्या प्रतिशाखेच्या शेवटी लिहावे.

क० आता द्विकल अपरांतकाचे लक्षण देत आहे—

एककल अपरांतकाप्रमाणे यातही एकवस्तु असणारे इत्यादी चार प्रकार आणि शाखा व प्रतिशाखा इत्यादींच्या योजण्याने होणारे भेद प्रयुक्त करावे. यातला विशेष म्हणजे उपोहन एक कला

समाप्तार्थन्यासयुक्तं केचित्पञ्चमवस्तुनः ।
एतदाद्ये कलाषट्के गातव्यमिति मन्वते ॥ ९९ ॥
निप्रनिप्रा निशनितास्ताशास्तासं[२५] कला स्विह ।
एकैकं विविधं वात्र गीताङ्गं [२६]दत्तिलोऽवदत् ॥ १०० ॥
गीताङ्गनियमं कंचिन्नाब्रूत भगवान्मुनिः ।

(याचा प्रस्तार) --

S S S S S S S S S S S S

वस्तु ॥ १ ॥ नि प्र नि प्र नि श नि ता ता श ता सं ॥

S S S S S S S S | S S | S

प्रतिशाखा– नि ता ता श ता सं ॥ शीर्षकम्– सं ता श ता श ता ॥

त्यात अर्थ संपताच न्यास योजावा. काही (विद्वान) पाचव्या वस्तुच्या पहिल्या सहा कलांत ते गावे असे मानतात. (९९)

या (द्विकल अपरांतकात) निप्रनिप्र निशनिता ताशतासं (अशी अक्षरे) असणाऱ्या कला असतात. दत्तिलाने यात एकक किंवा विविध हे गीताचे अंग सांगितले आहे. (१००)

भगवान भरतमुनीने गीतांगासंबंधी कोणताही नियम सांगितलेला नाही. (१०१–)

किंवा दोन कलांचे व प्रत्युपोहन एक कलेचे. तसेच यात उपवर्तन असते. चवथी वस्तु गायिल्यावर, विभक्तिप्रत्यय व क्रियापदप्रत्यय यांनी युक्त असणारी जी त्या चवथ्या वस्तूतील पदे (म्हणजे प्रत्यययुक्त शब्द) व जी मागधी इत्यादी गीति त्यांनी ते (उपवर्तन) गायिले जाते. तसेच त्या चवथ्या वस्तूच्या लयीच्या निम्म्या लयीत ते योजले जाते. 'वृत्ति व दक्षिण मार्गात' ते (प्रयुक्त केले जाते) या सांगण्यावरून द्विकल व चतुष्कल तालांत ते योजले जाते असे कळून येते. अर्थ हा की या उपवर्तनात यथाक्षर, द्विकल व चतुष्कल हे षट्पितापुत्रकाचे तीनही भेद योजायचे असतात. या उपवर्तनात अर्थ म्हणजे वाक्याचा अर्थ संपताच न्यास योजायचा असतो म्हणजे गीत संपवायचे असते. काही आचार्य पाचव्या वस्तूच्या पहिल्या सहा कलांत ते गावे असे मानतात. यावरून फक्त यथाक्षर उत्तर तालात ते गायचे असते असे त्यांचे मत समजून येते. (९५–१००)

क० याचा प्रस्तार असा–

दोन गुरू प्रत्येकी असणारे सहा पादभाग लिहून त्यांखाली क्रमाने निप्रनिप्रनिशनितताश तासं ही अक्षरे क्रमाने लिहावी. ही एक वस्तु होय. अशा चार वस्तू लिहाव्या. मग यथाक्षर

---

२५ आनंदाश्रम व अडचार या दोन्ही आवृत्तींत 'ताशास्तासं' असा पाठ आहे. 'ताशतासं' अशी अक्षरे प्रत्यक्ष योजलेली असल्याने 'ताशतासं' किंवा 'ताशतासाः' असा पाठ अपेक्षित आहे.

२६ दत्तिलम् – पृ. १७ श्लोक १७९.

तालिका- ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥

शीर्षकम्- ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥

प्रतिशाखा- । । । ।
ता श ता श ॥

शीर्षकम्- ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥

प्रतिशाखा- ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि ता ता श ता सं

तालिका- ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥

तालिका- ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥

इत्येकवस्तु ॥ हे एकवस्तूचे (द्विकल अपरांतक).

अथ पञ्चवस्तुकम्- आता पाच वस्तू असणारे (द्विकल अपरांतक) –

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
निप्र निप्र निश निता ता श ता सं ॥ १ ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
निप्र निप्र निश निता ता श ता सं ॥ २ ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
निप्र निप्र निश निता ता श ता सं ॥ ३ ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
निप्र निप्र निश निता ता श ता सं ॥ ४ ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ इत्युपवर्तनम् । हे उपवर्तन होय.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
निप्र निप्र निश निता ता श ता सं ॥ ५ ॥

उत्तर तालात उपवर्तन लिहावे. नंतर पाचवी वस्तु लिहून यथाक्षर उत्तर तालात तालिका व त्याच तालात शीर्षकही लिहावे. ही शाखा होय. हीच प्रतिशाखा होय. शाखेचा उत्तरार्ध प्रतिशाखा म्हणून योजणे या मतानुसार पाच वस्तूंची शाखा गाऊन उत्तरार्धातील अडीच वस्तूंची प्रतिशाखा योजावी. ती अशी– तिसऱ्या वस्तूच्या उत्तरार्धातील, दोन गुरू प्रत्येकी असणारे तीन पादभाग लिहून त्यांखाली क्रमाने निता ताश तासं ही अक्षरे लिहावी. मग चवथी वस्तु पूर्वीप्रमाणे लिहावी. नंतर यथाक्षर उत्तरतालात उपवर्तन योजन पाचवी वस्तु पूर्वीप्रमाणे लिहावी. मग यथाक्षर उत्तरतालात तालिका व शीर्षक योजावे.

ऽ । ऽऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ इति तालिका । ही तालिका होय.

ऽ । ऽऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥ इति शीर्षकम् । हे शीर्षक होय.

एवं पदान्तरनिर्मिता प्रतिशाखा । एवं षड्वस्तुकं सप्तवस्तुकं च । इयमेव शाखा । शाखोत्तरार्धस्य प्रतिशाखात्वे प्रतिशाखा यथा– [२७]वस्तुनोऽर्धम् ।

अशीच दुसऱ्या शब्दांनी निर्मिलेली प्रतिशाखा होय. याप्रमाणे सहा व सात वस्तूंचे (द्विकल अपरांतक जाणावे). शाखेचा उत्तरार्ध म्हणजे प्रतिशाखा या दृष्टीने (पाच वस्तूंच्या द्विकल अपरांतकात) प्रतिशाखा (तिसऱ्या) वस्तूचा (नंतरचा) अर्धभाग (व मग चवथी वस्तु, उपवर्तन, पाचवी वस्तु, तालिका व शीर्षक) अशी होय.

सर्व वस्तूंचा शाखांत मानून (म्हणजे प्रत्येक वस्तु ही शाखा मानून) तिचा उत्तरार्ध प्रतिशाखा म्हणून योजणे या दृष्टीने योजना अशी– पूर्वीप्रमाणे पहिली वस्तु शाखा म्हणून योजावी. तिचा उत्तरार्ध प्रतिशाखा म्हणून योजावा. अशा तीन वस्तू शाखाप्रतिशाखा यांनी युक्त असणाऱ्या गाऊन चवथ्या वस्तूच्या शेवटी यथाक्षर उत्तरतालात उपवर्तन योजावे. मग वस्तूच्या उत्तरार्धाने प्रतिशाखा योजावी. नंतर पाचवी वस्तु शाखा म्हणून योजून यथाक्षर उत्तरतालात तालिका आणि त्याच तालात शीर्षक योजावे. मग वस्तूच्या उत्तरार्धाने प्रतिशाखा योजून पूर्वीप्रमाणे तालिका व शीर्षक योजावे. याप्रमाणेच सहा व सात वस्तूंचे (द्विकल अपरांतक) जाणावे.

---

२७. कल्लिनाथाने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार शाखेचा उत्तरार्ध म्हणजे प्रतिशाखा या मतानुसार पांच वस्तू असणाऱ्या द्विकल अपरांतकाच्या प्रतिशाखेचे संपूर्ण स्वरूप पुढीलप्रमाणे होईल––

तिसऱ्या वस्तूचा उत्तरार्ध – ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि ता ता श ता सं ॥

वस्तु (४) ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि प्र नि प्र नि श नि ता ता श ता सं ॥

उपवर्तन ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥

वस्तु (५) ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि प्र नि प्र नि श नि ता ता श ता सं ॥

तालिका– ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥

शीर्षक– ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

वस्तु (१) नि प्र नि प्र नि श नि ता ता श ता सं ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

वस्तु (२) नि प्र नि प्र नि श नि ता ता श ता सं ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

वस्तु (३) नि प्र नि प्र नि श नि ता ता श ता सं ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

वस्तु (४) नि प्र नि प्र नि श नि ता ता श ता सं ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ

सं ता श ता श ता ॥ इत्युपवर्तनम् । हे उपवर्तन होय.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

वस्तु (५) नि प्र नि प्र नि श नि ता ता श ता सं ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

नि ता ता श ता सं ॥ प्रतिशाखा ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ

सं ता श ता श ता ॥ तालिका ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ

सं ता श ता श ता ॥ शीर्षकम् ॥

इति पञ्चवस्तुकम्– हे पाच वस्तूंचे होय.

एवं षड्वस्तुकसप्तवस्तुके; (षड्वस्तुके)[२८] शाखां चतुर्थशाखान्त उपवर्तनं शाखान्ते पूर्ववत् तालिकां शीर्षकं च लिखित्वा वस्तुत्रयात्मकं शाखार्धरूपं प्रतिशाखां, तुर्यवस्त्वन्त उपवर्तनं तालिकां शीर्षकं च लिखेत् । एवमेव सप्त-वस्तुके[२९] वस्तुत्रयात्मकं शाखार्धरूपां प्रतिशाखां तुर्यवस्त्वन्त उपवर्तनयुक्तां

---

२८. सहा वस्तूंच्या द्विकल अपरांतकात सहा वस्तूंची शाखा होईल. चवथ्या वस्तूच्या शेवटी उपवर्तन व शाखेच्या शेवटी (म्हणजे सहाव्या वस्तूनंतर) तालिका व शीर्षक येऊन शाखेचा उत्तरार्ध असणाऱ्या तीन वस्तू प्रतिशाखा म्हणून असतील. चवथ्या वस्तूच्या शेवटी उपवर्तन येऊन मग पाचवी व सहावी वस्तु योजून शेवटी तालिका व शीर्षक असेल. 'चतुर्थ-शाखान्ते' या ऐवजी 'चतुर्थवस्त्वन्ते' असा पाठ अधिक योग्य वाटतो.

२९. सात वस्तूंच्या द्विकल अपरांतकांत सात वस्तूंची शाखा योजून, शाखेचा उत्तरार्ध असणाऱ्या साडेतीन वस्तूंची प्रतिशाखा असेल. चवथ्या वस्तूचा नंतरचा अर्धाभाग घेऊन मग

तालिकां शीर्षकं च लिखित्वा सार्धवस्तुत्रयात्मिकां तुर्यवस्त्वन्तोपवर्तनयुक्तां प्रतिशाखां तालिकां च शीर्षकं च लिखेत् । सर्ववस्तूनां प्रतिवस्तु शाखात्वपक्षे तत्तदर्धानां प्रतिशाखात्वे प्रस्तारः—

याप्रमाणे सहा व सात वस्तूंची जाणावी. (सहा वस्तूंच्या द्विकल अपरांतकात) शाखा, चवथ्या शाखेच्या शेवटी उपवर्तन, शाखेच्या शेवटी पूर्वीप्रमाणे तालिका व शीर्षक लिहून, शाखेचा अर्धा भाग या स्वरूपाची तीन वस्तूंची प्रतिशाखा, चवथ्या वस्तूच्या शेवटी उपवर्तन, तालिका व शीर्षक लिहावे. याचप्रमाणे सात वस्तूंच्या (द्विकल अपरांतकात) शाखेचा अर्धा भाग अशी तीन वस्तूंची प्रतिशाखा, चवथ्या वस्तूच्या शेवटी उपवर्तनयुक्त तालिका व शीर्षक लिहून साडेतीन वस्तूंची व चवथ्या वस्तूच्या शेवटी उपवर्तन असलेली अशी प्रतिशाखा, तालिका व शीर्षक लिहावे. सर्व वस्तूंच्या बाबतीत प्रत्येक वस्तूची, शाखा म्हणून योजना करणे या मताने त्या त्या (वस्तूच्या) अर्ध्या भागांचा प्रतिशाखा म्हणून प्रस्तार असा—

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

शाखा– नि प्र नि प्र निश निता ता श तासं ॥ १ ॥

ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀

तालिका – सं ता श ता श ता ॥ १ ॥

ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀

शीर्षकम् – सं ता श ता श ता ॥ १ ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

प्रतिशाखा– नि ता ता श ता सं ॥ १ ॥

ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀

तालिका – सं ता श ता श ता ॥ १ ॥

ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀

शीर्षकम् – सं ता श ता श ता ॥ १ ॥


ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

शाखा – नि प्र नि प्र नि श नि ता ता श ता सं ॥ २ ॥

उपवर्तन नंतर पाचवी, सहावी व सातवी वस्तु योजून शेवटी तालिका व शीर्षक असेल. सप्त-वस्तुकाच्या बाबतीत मूळ ग्रंथात असलेले 'वस्तुत्रयात्मकं शाखार्धरूपं प्रतिशाखां' हे शब्द षड्वस्तुकाच्या वर्णनातून पुनरुक्त झालेले दिसतात.

ऽ । ऽ ऽ । ऽ
तालिका – सं ता श ता श ता ॥ २ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
शीर्षकम् – सं ता श ता श ता ॥ २ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
[प्रतिशाखा– नि ता ता श ता सं ॥ २ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
तालिका – सं ता श ता श ता ॥ २ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
शीर्षकम् – सं ता श ता श ता ॥ २ ॥]
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
वस्तु – नि प्र नि प्र नि श नि ता ता श ता सं ॥ ३ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
तालिका – सं ता श ता श ता ॥ ३ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
शीर्षकम् – सं ता श ता श ता ॥ ३ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
प्रतिशाखा– नि ता ता श ता सं ॥ ३ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
तालिका – सं ता श ता श ता ॥ ३ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
शीर्षकम् – सं ता श ता श ता ॥ ३ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
शाखा – नि प्र नि प्र नि श नि ता ता श ता सं ॥ ४ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
तालिका – सं ता श ता श ता ॥ ४ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
शीर्षकम् – सं ता श ता श ता ॥ ४ ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
प्रतिशाखा– नि ता ता श ता सं ॥ ४ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
तालिका – सं ता श ता श ता ॥ ४ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
शीर्षकम् – सं ता श ता श ता ॥ ४ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
उपवर्तनम्– सं ता श ता श ता ॥ ४ ॥



ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
शाखा – नि प्र नि प्र नि श नि ता ता श ता सं ॥५॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
तालिका – सं ता श ता श ता ॥ ५ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
शीर्षकम् – सं ता श ता श ता ॥ ५ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
प्रतिशाखा– नि ता ता श ता सं ॥ ५ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
तालिका – सं ता श ता श ता ॥ ५ ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
शीर्षकम् – सं ता श ता श ता ॥ ५ ॥

इति पञ्चवस्तुकम् । एवमेव षड्वस्तुकमपि ।
हे पाच वस्तूंचे; असेच सहा वस्तूंचेही (जाणावे).
इति द्विकलमपरान्तकम् । हे द्विकल अपरांतक होय.

चतुष्कलं तु द्विगुणं द्विकलात्पूर्ववन्मतम् ॥ १०१ ॥

पूर्वीप्रमाणे द्विकलाच्या दुप्पट प्रमाणाचे चतुष्कल मानले आहे. (१०१)

क० आता चतुष्कल अपरांतकाचे लक्षण देत आहे–

पूर्वीप्रमाणे म्हणजे मत्रकाप्रमाणे द्विकलाच्या दुप्पट चतुष्कलाचा पादभाग जाणावा. म्हणजे वस्तूतील प्रत्येक पादभाग चार गुरूंचा योजावा. वस्तूचा अर्धा भाग म्हणजे बारा गुरू

उपोहनं तु वस्त्वर्धं द्विकलं प्रत्युपोहनम् ।
दक्षिणे वार्त्तिके त्वेतद्[३०] द्विकलं वा चतुष्कलम् ॥ १०२ ॥
न वा तत्सर्वमार्गेषु विशेषस्तूपवर्तनम् ।
तुर्यवस्तूत्तरार्धस्थैः पदैर्निर्माणमिष्यते ॥ १०३ ॥
आनिविप्रा आनिविप्रा आवापनिविशास्ततः ।
आवापनिविता आताविशास्तानिविसं कलाः ॥ १०४ ॥
शतालप्रान्प्राहुरन्येऽष्टमद्वादशषोडशान् ।

(त्यात) वस्तूचा अर्धा भाग उपोहन असून प्रत्युपोहन दोन कलांचे असते. ते (प्रत्युपोहन) दक्षिण व वार्त्तिक मार्गांत द्विकल वा चतुष्कल योजावे किंवा योजू नये. यात विशेष म्हणजे उपवर्तन सर्वमार्गांत (योजायचे असते). चवथ्या वस्तूच्या उत्तरार्धातील शब्दांनी त्याची रचना मानली आहे. (१०२, १०३)

आनिविप्र आनिविप्र आवाप, निष्क्राम, विक्षेप, शम्या नंतर आवाप, निष्क्राम, विक्षेप, ताल, आताविश व तानिविसं अशा (पातकलांची योजना असणाऱ्या) कला (जाणाव्या). (१०४)

दुसरे (काही आचार्य) आठवा, बारावा व सोळावा गुरु (क्रमाने) शम्या, ताल व प्रवेश यांनी युक्त असणारा सांगतात. (१०५-)

यांचे उपोहन योजावे. प्रत्युपोहन द्विकल म्हणजे दोन गुरूंचे योजावे. हे प्रत्युपोहन वार्त्तिक मार्गात दोन कलांचे व दक्षिण मार्गांत चार कलांचे अशी यथासंभव योजना करावी. प्रत्युपोहन योजू नये हा तिसरा पक्ष होय. चतुष्कल अपरांतकातील विशेष म्हणजे ध्रुव इत्यादी सर्व मार्गांत उपवर्तन योजावे. त्या उपवर्तनाची रचना चवथ्या वस्तूच्या उत्तरार्धात असणाऱ्या शब्दांनी करावी. आनिविप्र इत्यादी पातकलांची योजना वस्तूच्या पादभागांत करावी. दुसरे काही आचार्य वस्तूतील चोवीस गुरूंपैकी आठवा, बारावा व सोळावा गुरु क्रमाने शम्या, ताल व प्रवेश यांनी युक्त असल्याचे सांगतात. पहिल्या योजनेप्रमाणे आठव्या गुरूत प्रवेश सांगितला आहे त्याऐवजी शम्या सांगतात; बाराव्यात शम्या सांगितली आहे त्याऐवजी ताल सांगतात व सोळाव्यात ताल सांगितला आहे त्याऐवजी प्रवेश सांगतात अशी क्रमाने योजना करावी. (१०१-१०४, १०५-)

---

३० सुधारकटीका – हे द्विकल किंवा चतुष्कल अपरांतक दक्षिण व वार्त्तिक मार्गांत गावे. उपवर्तनात मार्गविशेष नसतो.

अस्य प्रस्तारः– याचा प्रस्तार–

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥१॥[३१]

ऽ । ऽ ऽ । ऽ

तालिका– सं ता श ता श ता ॥ १ ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ

शीर्षकम्– सं ता श ता श ता ॥ १ ॥

प्रतिशाखा – ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

आ नि वि ता आ ता वि श ता नि वि सं ॥ १ ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ

तालिका– सं ता श ता श ता ॥ १ ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ

शीर्षकम्– सं ता श ता श ता ॥ १ ॥

इत्येकवस्तुकम् । हे एक वस्तूचे (चतुष्कल अपरांतक) होय.

अथ पञ्चस्तुकं यथा–

आता पाच वस्तूंचे पुढीलप्रमाणे–

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

वस्तु ॥ १ ॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

वस्तु ॥ २ ॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

---

३१. या अपरांतकाचा प्रस्तार देताना, सहाव्या पादभागात ' तानिविसं ' या ऐवजी काही वेळा ' आनिविसं ' अशी अक्षरे मूळ ग्रंथात दिली आहेत. कल्लिनाथाच्या टीकेतही ' आनिविसं ' ही अक्षरे या पादभागात दिली आहेत. दत्तिलाने एकविसावा गुरु ' ताल ' याने सांगितला आहे. म्हणजे ' तानिविसं ' असा हा शेवटचा पादभाग होईल. दत्तिलाने आठवा गुरु ' शम्या ' याने व बारावा ' ताल ' याने सांगितला आहे. त्यामुळे दत्तिलमताने दुसरा पादभाग ' आनिविश ' असा होईल व तिसरा पादभाग ' आनिविता ' असा होईल. (दत्तिलम्– पृ० १७) दत्तिलइत्यादींनी चवथा पादभाग ' आनिविप्र ' या स्वरूपाने सांगितला आहे असे अभिनवगुप्तांनी म्हटले आहे. (पहा नाट्यशास्त्र, बडोदा आ. भाग ४, पृ. २४७).

चतुष्कल अपरांतकाचा प्रस्तार देतांना येथे सहावा भाग सर्वत्र ' तानिविसं ' या अक्षरांनी दिला आहे कारण शाङ्गदेवाने लक्षण देताना तसेच सांगितले आहे; या प्रस्तारात, कल्लिनाथाच्या टीकेला अनुसरून जरूर तेथे दुरुस्त पाठ किंवा अधिक मजकूर कंसात दिला आहे.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
वस्तु ॥ ३ ॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
वस्तु ॥ ४ ॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ
उपवर्तनम् – सं ता श ता श ता ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
वस्तु ॥ ५ ॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ
तालिका- सं ता श ता श ता ॥ शीर्षकम्- सं ता श ता श ता ॥

एवमुपवर्तनतालिकाशीर्षकसहितपञ्चवस्तुका शाखा । तत एवमेव प्रतिशाखा । शाखापश्चिमार्धस्य प्रतिशाखात्वे तु पञ्चवस्तुकं यथा- प्रस्तारः-

याप्रमाणे उपवर्तन, तालिका व शीर्षक यांसहित पाच वस्तूंची शाखा होय. नंतर अशीच प्रतिशाखा होय. शाखेचा उत्तरार्ध प्रतिशाखा म्हणून योजणे या मताने पाच वस्तूंचे (चतुष्कल अपरांतक) असे- (शाखेप्रमाणेच प्रतिशाखा याचा) प्रस्तार-

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
वस्तु ॥ १ ॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
वस्तु ॥ २ ॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
वस्तु ॥ ३ ॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
वस्तु ॥ ४ ॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ
उपवर्तनम्- सं ता श ता श ता ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
वस्तु ॥ ५ ॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ

तालिका– सं ता श ता श ता ॥ शीर्षकम्– सं ता श ता श ता ॥

इति पञ्चवस्तुकम् । हे पाच वस्तूंचे (चतुष्कल अपरांतक) होय.

एवमेव षड्वस्तुकं सप्तवस्तुकं च । शाखोत्तरार्धस्य प्रतिशाखापक्षत्वे पक्षद्वयं प्रतिशाखा । यथा– पञ्चवस्तुके पूर्ववत् पञ्चवस्तुकां शाखां लिखित्वा शाखोत्तरार्धरूपा सार्धवस्तुद्वयात्मिका (प्रतिशाखा); प्रतिशाखायाः शाखातृतीयवस्तूत्तरार्धादिसार्धवस्तु (द्वयम् ?) ॥ प्रस्तारः–

याप्रमाणे सहा व सात वस्तूंचे (जाणावे). शाखेचा उत्तरार्ध हा प्रतिशाखा म्हणून योजणे या मताने प्रतिशाखा दोन प्रकारांनी (मानली जाते). (एक प्रकार सर्व वस्तूंची शाखा मानली असता होतो व दुसरा प्रकार प्रत्येक वस्तु शाखा मानली असता होतो.) (पहिला प्रकार) असा– पाच वस्तूंच्या (चतुष्कल अपरांतकात) पूर्वीसारखी पाच वस्तूंची शाखा लिहून शाखेच्या उत्तरार्धाची, अडीच वस्तू या स्वरूपाची (प्रतिशाखा) (असावी); प्रतिशाखेच्या बाबतीत शाखेच्या तिसऱ्या वस्तूच्या उत्तरार्धाने आरंभ केलेल्या (अडीच) वस्तू योजाव्या.

प्रस्तार –

ऽ ऽ

वस्तु ॥१॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

एवं वस्तुचतुष्टयम् । अशा चार वस्तू (लिहाव्या).

उपवर्तनम्– ऽ । ऽ ऽ । ऽ

सं ता श ता श ता ॥

ऽ ऽ

वस्तु ॥ ७ ॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

[तालिका– ऽ । ऽ ऽ । ऽ शीर्षकम्– ऽ । ऽ ऽ । ऽ

सं ता श ता श ता ॥ सं ता श ता श ता ॥]

प्रतिशाखेयम्– ही प्रतिशाखा होय– (जशे–)

[ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

आ नि वि ता आ ता वि श ता नि वि सं ॥

ऽ ऽ

वस्तु ॥४॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

वस्तु ॥५॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आताविश तानिविसं ॥

तालिका– ऽ । ऽ ऽ । ऽ शीर्षकम्– ऽ । ऽ ऽ । ऽ

सं ता श ता श ता सं ता श ता श ता ॥]

एवं षड्वस्तु सप्तवस्तुकमपि ज्ञेयम् । याप्रमाणे सहा वस्तूंचे व सात वस्तूंचे जाणावे.

सर्व वस्तूनां प्रतिशाखात्वपक्षे ? (शाखात्वपक्षे) तदुत्तरार्धानां प्रतिशाखात्वपक्षे प्रस्तारः–

सर्व वस्तूंचे शाखास्वरूप व त्यांच्या उत्तरार्धांचे प्रतिशाखास्वरूप असता प्रस्तार–

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

शाखा– ॥१॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आनिविश तानिविसं ॥

शीर्षकम्– ऽ । ऽ ऽ । ऽ तालिका– ऽ । ऽ ऽ । ऽ

सं ता श ता श ता ॥ सं ता श ता श ता ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

प्रतिशाखा– ॥१॥ आ नि वि ता आ नि वि श ता नि वि सं ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ

तालिका ॥ १ ॥ सं ता श ता श ता ॥ शीर्षकम् ॥ १ ॥ सं ता श ता श ता ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

शाखा ॥२॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आनिविश तानिविसं ॥

क० याचा प्रस्तार असा–

प्रत्येकी चार गुरू असणारे सहा पादभाग लिहून त्यांखाली पहिल्या पादभागात आनिविप्र, दुसऱ्यात पुन्हा आनिविप्र, तिसऱ्यात आनिविश, चवथ्यात आनिविता, पाचव्यात आता (नि ?) विश व सहाव्यात आ (ता ?) निविसं अशी अक्षरे लिहावी. ही एक वस्तु होय. अशा चार वस्तू गाऊन यथाक्षर उत्तर तालात उपवर्तन गावे. मग पूर्वीप्रमाणे पाचवी वस्तु लिहावी. नंतर यथाक्षर उत्तर तालात तालिका व शीर्षक लिहावे. अशी ही उपवर्तन, तालिका व शीर्षक यांच्यासह पाच वस्तूंची शाखा होय. मग हीच प्रतिशाखा म्हणून (योजावी.). शाखेचा जो उत्तरार्ध ती प्रतिशाखा या मताने पाच वस्तूंच्या या अपरांतकात पाच वस्तूंची शाखा गाऊन, तिसऱ्या वस्तूचा उत्तरार्ध आधी असणाऱ्या अशा अडीचवस्तू प्रतिशाखा म्हणून योजाव्या. ती योजना अशी– चार चार गुरूंचे असे तीन भाग म्हणजे बारा गुरू लिहून त्यांखाली आनिविश, आताविश व आनिविसं ही अक्षरे क्रमाने लिहावी– (आनिविता, आनिविश, तानिविसं ?). हा तिसऱ्या वस्तूचा उत्तरार्ध होय. मग पूर्वीप्रमाणे चवथी व पाचवी वस्तु लिहावी. नंतर यथाक्षर उत्तर तालात तालिका व शीर्षक लिहावे.

ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ

शीर्षकम् ॥ २ ॥ सं ता श ता श ता ॥ तालिका ॥ २ ॥ सं ता श ता श ता ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

प्रतिशाखा ॥ २ ॥ आ नि वि ता आ नि वि श ता नि वि सं ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ

तालिका ॥ २ ॥ सं ता श ता श ता ॥ शीर्षकम् ॥ २ ॥ सं ता श ता श ता ॥

ऽ ऽ

शाखा ॥३॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आनिविश तानिविसं ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ

शीर्षकम् ॥ ३ ॥ सं ता श ता श ता ॥ तालिका ॥ ३ ॥ सं ता श ता श ता ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

प्रतिशाखा ॥ ३ ॥ आ नि वि ता आ नि वि श ता नि वि सं ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ

तालिका ॥ ३ ॥ सं ता श ता श ता ॥ शीर्षकम् ॥ ३ ॥ सं ता श ता श ता ॥

ऽ ऽ

शाखा ॥ ४ ॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आनिविश तानिविसं ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ

शीर्षकम् ॥ ४ ॥ सं ता श ता श ता ॥ तालिका ॥ ४ ॥ सं ता श ता श ता ॥

ऽ ऽ

शाखा ॥५॥ आनिविप्र आनिविप्र आनिविश आनिविता आनिविश तानिविसं ॥

सर्व वस्तूंचे शाखास्वरूप व त्यांच्या उत्तरार्धांचे प्रतिशाखास्वरूप असता प्रस्तार असा– प्रथम सर्व वस्तु लिहून शाखा योजावी. मग तिचा उत्तरार्ध लिहून प्रतिशाखा योजावी. अशा तीन वस्तू तीन शाखा म्हणून व त्यांचा उत्तरार्ध प्रतिशाखा म्हणून योजाव्या. मग चवथी वस्तु शाखा म्हणून लिहून यथाक्षर उत्तर तालात उपवर्तन लिहावे. मग या वस्तूचा उत्तरार्ध प्रतिशाखा म्हणून योजून पाचवी वस्तु शाखा म्हणून लिहावी. नंतर तालिका व शीर्षक यथाक्षर उत्तर तालात लिहावे. मग (या पाचव्या) वस्तूचा उत्तरार्ध प्रतिशाखा म्हणून योजून यथाक्षर उत्तर तालात तालिका व शीर्षक लिहावे. असे हे पाच वस्तू असणाऱ्या चतुष्कल अपरांतकाचे प्रकार होत. अशाच रीतीने सहा व सात वस्तू असणाऱ्या या अपरांतकाचे प्रकार जाणून घ्यावे.
(या प्रस्ताराचे कल्लिनाथाचे विवरण आनन्दाश्रम आवृत्तीतील आहे; कारण तेच अधिक योग्य आहे.)

ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ

शीर्षकम् ॥ ५ ॥ सं ता श ता श ता ॥ तालिका ॥ ५ ॥ सं ता श ता श ता ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

प्रतिशखा ॥ ५ ॥ आ नि वि ता आ नि वि श ता नि वि सं ॥

ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ ऽ । ऽ

तालिका ॥ ५ ॥ सं ता श ता श ता ॥ शीर्षकम्- सं ता श ता श ता ॥

एवं पञ्चवस्तुकभेदाः ॥ एवं षड्वस्तुकसप्तवस्तुकम् ॥

असे हे पाच वस्तूंच्या (चतुष्कल अपरांतकाचे) प्रकार होत. याचप्रमाणे सहा व सात वस्तूंच्या बाबतीतही (जाणावे).

इति चतुष्कलमपरान्तकम् । चतुष्कल अपरांतक समाप्त.

भेदैरेककलाद्यैः स्यादुल्लोप्यकमपि त्रिधा ॥ १०५ ॥

भवेदेककले तस्मिन् गुरुद्वन्द्वं लघुद्वयम् ।

गुर्वन्ते चेति मात्रैका तच्च मात्रासमाप्तिकम् ॥ १०६ ॥

द्विकलेऽष्टकला मात्रा द्विगुणा तु चतुष्कला ।

मात्रापूर्वदले कार्यो विविधो मुखसंज्ञकः ॥ १०७ ॥

एककल इत्यादी (म्हणजे एककल, द्विकल व चतुष्कल या) भेदांमुळे उल्लोप्यकही तीन प्रकारचे असते. (१०५)

त्याच्या एककल या प्रकारात दोन गुरू, दोन लघू व शेवटी गुरू असणारी अशी एक मात्रा असते. ते मात्रेने समाप्त होते. (१०६)

(त्याच्या) द्विकल प्रकारात आठ कलांची व चतुष्कलात त्याच्या दुप्पट (म्हणजे सोळा कलांची) मात्रा असते. मात्रेच्या पूर्वार्धात मुख नावाचा विविध योजावा; (१०७)

क० आतां उल्लोप्यकाचे लक्षण देत आहे-

एककलातील मात्रेचे प्रमाण दोन गुरू, दोन लघू व शेवटी गुरु असे असते. एककल उल्लोप्यक मात्रेमध्ये समाप्ति असणारे असे असते. म्हणजे एका मात्रेनेच ते संपते. द्विकलात आठ गुरू व चतुष्कलात त्याच्या दुप्पट म्हणजे सोळा गुरू असतात. पूर्वदल म्हणजे पूर्वार्ध होय. तिन्ही प्रकारच्या उल्लोप्यकात मात्रेच्या पूर्वार्धात म्हणजे एककलात दोन गुरुंत, द्विकलांत चार गुरुंत व चतुष्कलात आठ गुरुंत विविध योजावा. 'दोन विदारी असणारा विविध होय' असे ज्याचे लक्षण सांगितले गेले आहे तो विविध गीताचे एक विशेष अंग होय. तो येथे मुख नावाचा असतो. पश्चिमार्धात वृत्तयुक्त असा योजलेला विविध प्रतिमुख म्हणून म्हटला जातो.

पश्चिमार्धे प्रतिमुखं विविधो वृत्तसंयुतः ।
वृत्तं तिस्रश्चतस्रो वा पञ्च षड्वा विदारिकाः ॥ १०८ ॥
अवगाढं प्रवृत्तं च तद् द्विधेति निरूपितम् ।
आद्यमारोहिवर्णेन प्रवृत्तमवरोहिणा ॥ १०९ ॥
न्यासापन्यासंन्यासविन्यासानां तु कुत्रचित् ।
न्यासोऽस्यांशेऽस्य संवादिन्यनुवादिनि वा भवेत् ॥ ११० ॥
अनन्तरस्वरैरेकान्तरितैर्वा समापनम् ।
विदारीणां भवेदत्रेत्यभ्यधत्त विशाखिलः ॥ १११ ॥

(व) पश्चिमार्धात वृत्ताने युक्त असा प्रतिमुख नावाचा विविध (योजावा). तीन, चार, पाच किंवा सहा विदारिका म्हणजे वृत्त होय. (१०८)

ते अवगाढ आणि प्रवृत्त असे दोन प्रकारचे सांगितले आहे. पहिले आरोही वर्णाने व (दुसरे) प्रवृत्त अवरोही वर्णाने (योजलेले असते). (१०९)

याचा न्यास (रागाच्या जनक जातीचा जो) न्यास, अपन्यास, संन्यास आणि विन्यास यांपैकी कोठेही किंवा अंशावर अथवा त्याच्या संवादी किंवा अनुवादी स्वरावर होतो. (११०)

यात विदारींची समाप्ति अंशस्वरापासून लगेच नंतरच्या किंवा एक स्वर सोडून त्यानंतरच्या स्वरांवरही करावी असे विशाखिलाने म्हटले आहे. (१११)

तीन, चार, पाच किंवा सहा विदारी हे वृत्ताचे स्वरूप होय. त्याच्या अवगाढ या प्रकारात आरोही वर्ण असतो व प्रवृत्त या प्रकारात अवरोही वर्ण असतो. रागाचा जो न्यास इत्यादी त्यांपैकी एकावर किंवा अंशावर या वृत्ताची समाप्ति असते; किंवा अंशाच्या संवादी स्वरावर अथवा अनुवादी स्वरावर असते. (१०५–११०)

क० विशाखिलाच्या मताप्रमाणे विदारींचा न्यास सांगत आहे. अंशस्वराला लागून असणाऱ्या किंवा अंश स्वरापासून एक स्वर सोडून असणाऱ्या स्वरांनी न्यास योजावा. 'अत्र' म्हणजे या वृत्तात, न्यास इत्यादी चारांपैकी (क्रमाने) एकापासून आरोहण व अवरोहण केले असता ते चार प्रकारचे होते. चतुष्कल उल्लोप्यकात मात्रेनंतर वैहायस योजावे. अर्थात सोळा कला असणाऱ्या मात्रेनंतर वैहायस नावाचे अंग योजावे.

दुसऱ्या मतानुसार वैहायसाचा प्रयोग सांगत आहे. 'वैहायसात निविश' इत्यादीने सांगितल्या जाणाऱ्या कलांचा उपयोग न करता, मात्रेनंतरच्या चार कलांच्या कालानंतर तीन एकके योजून हे वैहायस प्रयुक्त करावे. हे वैहायस एक अंगापासून ते सहा अंगे असणारे असे सहा प्रकारचे असते असे एक मत होय. दुसऱ्या मताने एक अंगापासून ते बारा अंगे असणारे

अन्यत्र[३२] (अत्र ?) न्यासमपन्यासमंशं संवादिनं तथा ।
उपक्रम्य चतुर्धा स्यादारोहो वावरोहणम् ॥ ११२ ॥
वैहायसं विधातव्यं मात्रोपरि चतुष्कले ।
यद्वा कलाप्रयोगेण शून्यान्मात्रोपरिस्थितात् ॥ ११३ ॥
कलाचतुष्ककालात्स्यादेककत्रितयादिदम् ।
एकाङ्गादिषडङ्गान्तं द्वादशाङ्गान्तमप्यदः ॥ ११४ ॥
विविधोऽस्याद्यमङ्गं स्यादेककानि ततः परम् ।
तद् द्वादशकलं प्रोक्तमुल्लोप्यकसमापकम् ॥ ११५ ॥

या (वृत्तात) न्यास, अपन्यास, अंश तसेच संवादी स्वर यांपैकी एकेकापासून आरंभ करून चार प्रकारांनी आरोहण किंवा अवरोहण करावे. (११२)

चतुष्कल (उल्लोप्यकात) मात्रेनंतर वैहायस योजावे; किंवा कलांचा प्रयोग नसलेल्या, मात्रेनंतरच्या चार गुरूंच्या कालानंतर योजलेल्या (११३)

तीन एककांनी हे (वैहायस) प्रयुक्त करावे. हे (वैहायस) एक अंगापासून ते सहा अंगे असलेले किंवा बारा अंगे असलेलेही असते. (११४)

याचे पहिले अंग विविध असते व त्यानंतर एकके असतात. ते (वैहायस) बारा कलांचे सांगितले असून उल्लोप्यकाची समाप्ति करणारे असते. (११५)

असे बारा प्रकारचे असते. सर्व प्रकारांत पहिले अंग विविध हे असते. नंतर पुढची अंगे एकके असतात. एकच अंग असता विविध योजायचा; दोन अंगे असणारे इत्यादी भेदांत दुसऱ्या अंगापासूनची पुढची अंगे एकके असतात. ते वैहायस बारा गुरू या कालप्रमाणाचे असते व त्याने उल्लोप्यकाची समाप्ति होते. विविध इत्यादी अंगांची योजना करताना वर्णाचे अनुकर्षण म्हणजे पुन्हा उच्चारण आणि तालाची आवृत्ति ही दोन्ही करायची असतात. वैहायस स्वरूपाची ही मात्रा काहींच्या मतानुसार शाखा म्हणून म्हटली गेली आहे. याचा अर्थ असा की काही आचार्य वैहायसालाच शाखा म्हणतात. ती शाखाच दुसऱ्या शब्दांनी रचली असता प्रतिशाखा होय.

नंतर यथाक्षर पंचपाणि तालात अंताहरण नावाचे अंग सांगितले आहे. उल्लोप्यक या गीतकाची समाप्ति करणारे हे अंग संहरण या नावानेही सांगितले आहे. या संहरणात, ' तीन,

---

३२. ' अन्यत्र न्यास '– असा पाठ अड्यार आवृत्तीत घेतला आहे. आनंदाश्रम आवृत्तीत ' अन्यत्रा (त्र न्या) स ... ' असे छापले आहे. ' अन्यत्र ' असा पाठ घेण्यात वृत्ताच्या दृष्टीने एक अक्षर जास्त होते. कलानिधि व सुधाकर या दोन्ही टीकांत ' अत्र ' म्हणजे ' वृत्ते ' असे स्पष्टीकरण मिळते. यामुळे ' अत्र ' असा पाठ योग्य वाटतो. आनंदाश्रमपाठात ' अन्यत्रा स ' असे जे मिळते त्यात लेखनप्रमादामुळे ' अत्र न्यास ' या ऐवजी त्र व न्य यांची उलटापालट झालेली असणे शक्य आहे.

वर्णानुकर्षणं तालावृत्तिर्वाङ्गनिवेशने ।
यद्वा शाखेयमुदिता मात्रा वैहायसात्मिका ॥ ११६ ॥
शाखैव प्रतिशाखोक्ता सा त्वन्यपदनिर्मिता ।
ततोऽन्ताहरणं[३३] प्रोक्तं पञ्चपाणौ यथाक्षरे ॥ ११७ ॥
एतत्संहरणं प्रोक्तं गीतकस्य समाप्तिकृत् ।
वृत्तं संहरणेऽत्र स्यादन्यदा त्वेककं भवेत् ॥ ११८ ॥
विविधो वा त्रिधान्तोऽथ युगयुङ्मिश्रभेदतः ।
युग्मोऽन्तः प्रथमस्तेषां त्र्यश्र इत्याह दत्तिलः ॥ ११९ ॥
स्थितं प्रवृत्तमपरं महाजनिकमित्यपि ।
त्रीण्यङ्गानि पृथक् तेषां लक्षणं प्रतिपाद्यते ॥ १२० ॥

अंगे योजताना, अक्षरांचे पुन्हा उच्चारण व तालाची आवृत्ति करावी. किंवा वैहायस स्वरूपाची ही मात्रा (काहींनी) शाखा म्हणून सांगितली आहे. (११६)

शाखेप्रमाणेच प्रतिशाखा सांगितली आहे, फक्त ती वेगळ्या शब्दांनी रचलेली असते. नंतर पञ्चपाणी यथाक्षर तालात अंताहरण सांगितले आहे. (११७)

हे संहरण या नावानेही सांगितले आहे. ते गीतकाची समाप्ति करणारे असते. या संहरणात वृत्त (योजायचे) असते. दुसऱ्या पक्षी (म्हणजे अंताहरण नसताना) एकक (योजायचे) असते. (११८)

किंवा विविध (योजायचा असतो). मग युग्म (म्हणजे चतुरश्र), अयुग्म (म्हणजे त्र्यश्र) आणि मिश्र (म्हणजे युग्मायुग्म) या (तीन) भेदांनी तीन प्रकारचे असणारे अंत (हे अंग योजायचे असते). त्यांतील युग्म अंत प्रथम (योजायचा असतो). दत्तिलाने त्र्यश्र अंत (प्रथम) सांगितला आहे. (११९)

त्या युग्म इत्यादींची प्रत्येकी स्थित, प्रवृत्त व तिसरे महाजनिक अशी तीन अंगे असतात. त्यांचे लक्षण (आता) प्रतिपादितो. (१२०)

चार, पाच किंवा सहा विदारी म्हणजे वृत्त होय' या लक्षणाने सांगितलेले वृत्त योजायचे असते. नाहीतर म्हणजे अंताहरण योजले नसताना, एकक किंवा विविध योजायचा असतो. अंताहरणानंतर अंत हे अंग योजायचे असते. ते युग्म (म्हणजे चतुरश्र), अयुग्म (म्हणजे त्र्यश्र) व मिश्र असे तीन प्रकारचे असते. भरत इत्यादींच्या मताने त्यांतील युग्म अंत प्रथम योजायचा असतो. दत्तिलाने त्र्यश्र प्रथम योजायचा असतो असे सांगितले आहे. (११९–११९)

क० त्या युग्म इत्यादींची प्रत्येकी स्थित, प्रवृत्त व महाजनिक अशी तीन अंगे होत. युग्म अंतात द्विकल चच्चत्पुट तालात स्थायिवर्णयुक्त (तसेच) स्थायी स्वराने युक्त स्थित होय. त्या

---

३३. अडचार आवृत्तीत हा श्लोकार्ध चुकीचा छापला आहे. तसेच पुढचा श्लोकार्ध गाळला आहे. आनंदाश्रम पाठावरून योग्य ती दुरुस्ती येथे केली आहे.

युग्मे द्विकलयुग्मेन स्थितं स्थायिगतं मतम् ।
तेनैव तत्प्रवृत्तं स्याद् उद्‌घट्टस्तत्कलात्रये ॥ १२१ ॥
आद्ये कलाचतुष्केऽन्त्ये पदानि प्राञ्चि योजयेत् ।
विविधोऽस्याद्यभागे स्यादेकं तु ततः परम् ॥ १२२ ॥
पूर्वार्धस्थपदावृत्या युङ्महाजनिकं विदुः ।
स्थिततालयुतं तस्य गीताङ्गनियमो न च ॥ १२३ ॥
त्र्यश्रेऽन्ते त्र्यश्रतालेन द्विकलेन स्थितं भवेत् ।
यथाक्षरेणोत्तरेण प्रवृत्तं तत्र कीर्तितम् ॥ १२४ ॥
त्र्यश्रेण महाजनिकं महाजनिकवन्मतम् ।

युग्म (अंतात), द्विकल युग्म (म्हणजे द्विकल चच्चत्पुट) तालात स्थायी वर्ण असलेले स्थित मानले आहे. त्या (तालातच) त्या (युग्माचे) प्रवृत्त ही होय. त्यात पहिल्या तीन कलांत उद्‌घट्ट योजायचा असतो. (व) शेवटच्या चार कलांत पूर्वीचे (म्हणजे पहिल्या चार कलांत योजलेले) शब्द प्रयुक्त करावे. याच्या (म्हणजे युग्म प्रवृत्ताच्या) पहिल्या भागात विविध असावा व नंतर एकक असावे. (१२१, १२२)

पूर्वार्धातील शब्दांच्या आवृत्तीने होणारे ते युग्म महाजनिक म्हणून जाणतात. ते स्थितातील तालाने युक्त असते. त्याच्या बाबतीत गीताच्या अंगांसंबंधी काही नियम नाही. (१२३)

त्र्यश्र अंतात द्विकल त्र्यश्र (म्हणजे द्विकल चाचपुट) तालात स्थित (योजायचे) असते. त्यात यथाक्षर उत्तर तालात प्रवृत्त सांगितले आहे. (१२४) (युग्माच्या) महाजनिकाप्रमाणेच त्र्यश्राने (म्हणजे द्विकल चाचपुट तालाने) (यातील) महाजनिक मानले आहे. (१२५-)

द्विकल चच्चत्पुट तालातच युग्माचे प्रवृत्तही होय. त्यात पहिल्या तीन कलांत उद्‌घट्ट योजायचा असतो. म्हणजे उद्‌घट्टात सांगितलेल्या निष्काम व दोन शम्या या पातकला निशश अशा योजायच्या असतात. पहिल्या चार कलांत सांगितलेले शब्दच शेवटच्या चार कलांतही गावे. या युग्म प्रवृत्ताचे पहिले अंग विविध असते. त्यानंतर पुढे एकक असते. युग्माच्या महाजनिकात पूर्वार्धात असलेल्या शब्दांचीच आवृत्ति करावी; उत्तरार्धातील शब्दांची करू नये. हे महाजनिक युग्माच्या स्थितात सांगितलेल्या तालाने म्हणजे द्विकल चच्चत्पुट तालाने युक्त असते. यात विविध इत्यादी गीताच्या अंगांच्या योजनेबद्दल नियम नसल्याने ती आवडीनुसार योजावी.

द्विकल त्र्यश्र ताल म्हणजे द्विकल चाचपुट होय. या तालात त्र्यश्र अंतातले स्थित योजावे. त्यात (म्हणजे अयुग्म अर्थात त्र्यश्र अंतात) यथाक्षर उत्तर तालात प्रवृत्त सांगितले आहे; व त्र्यश्र म्हणजे द्विकल चाचपुट तालात महाजनिक सांगितले आहे. ते युग्माच्या महाजनिकाप्रमाणेच पूर्वार्धातील शब्दांच्या आवृत्तीने योजावे. (१२०-१२४, १२५-)

मिश्रोऽन्तः षड्विधः प्रोक्तो युग्मायुग्माङ्गमिश्रणात् ॥ १२५ ॥
एककं विविधो वा स्यादनुक्ताङ्गस्थितादिषु ।
विविधाभ्यां[३४] वैककाभ्यां यद्वा युग्मस्थितं भवेत् ॥ १२६ ॥
अयुगन्यतराङ्गं स्यात्प्रवृत्तं स्थितवन्मतम् ।
प्रवृत्ताभ्यां प्रवृत्तेन युगयुग्मं परेऽब्रुवन् ॥ १२७ ॥
महाजनिकमन्तः स्याद् द्व्यङ्गमेकाङ्गकं[३५] (द्व्यङ्ग एकाङ्गकः ?) परम् ।
द्व्यङ्गो यदा तदान्तः स्यान्महाजनिकवर्जितः ॥ १२८ ॥

युग्म व अयुग्म यांच्या अंगांच्या मिश्रणाने मिश्र अंत सहा प्रकारचा सांगितला आहे. (१२५)

ज्यांतील अंगे सांगितली नाहीत अशा स्थित इत्यादींमध्ये (म्हणजे स्थित, प्रवृत्त व महाजनिक यांत) एकक किंवा विविध योजावा. किंवा दोन विविध अथवा दोन एकक यांनी युग्माचे स्थित योजावे. (१२६)

(या) स्थिताप्रमाणेच (युग्माचे) प्रवृत्त मानले आहे. इतर अंग (म्हणजे महाजनिक) अयुग्माचे असावे. दुसऱ्या (आचार्यांनी) दोन प्रवृत्तांनी युक्त (महाजनिक) व एक प्रवृत्ताने युक्त महाजनिक असे युग्म व अयुग्म (म्हणजेच मिश्र स्वरूप) सांगितले आहे. (पुन्हा) आणखी अंत दोन अंगे असणारा व एक अंग असणारा असा (दोन प्रकारचा) असतो. अंत दोन अंगांनी युक्त असतो तेव्हा महाजनिकरहित असावा. (१२७, १२८)

क० युग्माचे अंग व अयुग्माचे अंग यांच्या मिश्रणाने मिश्र अंत सहा प्रकारचा होतो. ज्यांत विविध इत्यादी अंगे सांगितली नाहीत त्या स्थित इत्यादींत म्हणजे स्थित, प्रवृत्त व महाजनिक

---

३४. 'युग्माचे स्थित दोन विविध व दोन एकक यांनी मिळून योजावे; व अयुग्माचे स्थित अन्यतरांग म्हणजेच विविध अथवा एकक हे अंग असणारे योजावे' असा अर्थ "विविधाभ्यां वैककाभ्यां यद्वा युग्मस्थितं भवेत् ॥ अयुगन्यतराङ्गं स्यात्" या ग्रंथाचा सुधाकरटीकेत दिला असून हा दुसरा पक्ष म्हणून सांगितला आहे. छापील सुधाकरटीकेत (अडचार आवृत्ति भा. ३ पृ. ७४) 'दोन विविधांनी व दोन एककांनी मिळून अयुग्माच्या अंताचे स्थित योजावे' असा आशय असणारे वाक्य आहे. यामधील 'अयुग्म' शब्द बरोबर नसून तो 'युग्म' असा पाहिजे हे उघड आहे.

पुढे दुसऱ्या आचार्यांचे मत देताना युगयुग्मात (युग्म) ? दोन प्रवृत्तांनी व अयुग्म एक प्रवृत्ताने योजावे असे म्हटले आहे.

३५. 'द्व्यङ्गमेकाङ्गकं' असा पाठ अडचार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तींत घेतलेला आहे. आनंदाश्रम आवृत्तीत 'द्व्यङ्ग एकाङ्गकः' असा सूचित पाठ कंसात दिला आहे. 'द्व्यङ्ग' व 'एकाङ्गक' ही अंत या पुल्लिंगी शब्दाची विशेषणे घेणे योग्य असल्याने हा सूचित पाठ दुरुस्त पाठ म्हणून स्वीकारणे प्रशस्त ठरते.

स्थितप्रवृत्तहीनोऽयं यदैकाङ्गश्चिकीर्षितः ।
शताशतासमित्येककल उच्छोप्यके कलाः ॥ १२९ ॥
द्विकले स्युर्निशनिता शतानिसमिति क्रमात् ।
चतुष्कले त्वानिविशास्तत आनिविताः क्रमात् ॥ १३० ॥
भवन्त्याशविता आनिविसं मात्रा मताः कलाः ।
वैहायसे तु निविशनिवितानिशताशताः ॥ १३१ ॥

जेव्हा हा (अंत) एक अंगाचा योजायची इच्छा असेल तेव्हा स्थित व प्रवृत्त यांनी रहित (योजावा). शताशतासं या एककल उच्छोप्यकातील कला (होत). (१२९)

द्विकलात क्रमाने निशनिता शतानिसं या (कला) होत; व चतुष्कलात क्रमाने आनिविश नंतर आनिविता (१३०) आशविता आनिविसं या होत. (अशा) मात्रा-विषयक कला मानल्या आहेत. वैहायसात मात्र निविशनिवितानिशताशता (१३१)

यांत एकक किंवा विविध इच्छेनुसार योजायचा असतो. "दोन विविध अथवा दोन एकक यांनी युग्मस्थित होते. प्रवृत्त स्थिताप्रमाणेच मानले आहे. इतर अंग अयुग्माचे असते" या म्हणण्यावरून सहाही मिश्रभेद जाणून घ्यावे. दोन विविध अथवा दोन एकक यांनी किंवा दोन्ही मिळून प्रथम युग्मस्थित होते. दोन विविध किंवा दोन एकक यांनी युग्म प्रवृत्त होते असा अर्थ 'प्रवृत्त स्थिताप्रमाणे मानले आहे' या म्हणण्याचा आहे. युग्माच्या अंगाच्या अपेक्षेने अयुग्माच्या संबंधीचे महाजनिक इत्यादि अंग असते असा अर्थ 'इतर अंग अयुग्माचे असते' या म्हणण्याचा आहे. पहिल्या भेदात युग्माचे स्थित व प्रवृत्त आणि अयुग्माचे म्हणजे ओजाचे महाजनिक योजावे. दुसऱ्या मिश्रभेदात ओजाचे स्थित व प्रवृत्त आणि युग्माचे महाजनिक; तिसऱ्या भेदात युग्माचे स्थित व ओजाचे प्रवृत्त आणि महाजनिक; चवथ्या भेदात ओजाचे स्थित व युग्माचे प्रवृत्त आणि महाजनिक; पाचव्या भेदात युग्माचे स्थित, ओजाचे प्रवृत्त आणि युग्माचे महाजनिक; सहाव्या भेदात ओजाचे स्थित, युग्माचे प्रवृत्त व ओजाचे महाजनिक; अशी ही सहा भेदांत लक्षणाची यथासंभव योजना करावी.

दुसऱ्या आचार्यांनी दोन प्रवृत्तांनी युक्त व एका प्रवृत्ताने युक्त महाजनिक असे युग्म व अयुग्म म्हणजेच मिश्र स्वरूप सांगितले आहे.

पुन्हा अंताचे दोन प्रकारचे स्वरूप सांगत आहे– दोन अंगांचा व एक अंगाचा. दोन अंगांचा अंत महाजनिकरहित असतो म्हणजेच स्थित आणि प्रवृत्त यांनी युक्त असतो. एक अंगाचा अंत स्थित व प्रवृत्त नसलेला म्हणजेच फक्त महाजनिक असलेला असा असतो. (१२५–१२८, १२९–)

क० आता एककल इत्यादी उल्लोप्यकाच्या प्रकारांतील पातकलांची योजना ग्रंथकार दाखवीत आहे—

'युग्मात द्विकल युग्माने' या विधानाने युग्माच्या स्थितात द्विकलयुक्त चच्चत्पुट सांगितला आहे. त्याची पातकलांची योजना 'निश निता शप्र निसं द्विकल युग्मात मानले आहेत' अशी पूर्वीच सांगितली आहे. या वरून पाचव्या गुरूची शम्या प्राप्त होते. त्याचा अपवाद सांगण्यासाठी

संनिपातश्चेति कलाः स्थिते निः पञ्चमो भवेत् ।
शताशतासंनिपाताः प्रवृत्ते त्रिकलादनु ॥ १३२ ॥
त्र्यश्रे स्थिते चतुर्थः प्र[३६] इत्युल्लोप्ये कलाविधिः ।
वैहायसादिनिर्युक्तमथवा स्याच्चतुष्कलम् ॥ १३३ ॥
अन्तान्तमन्ताहरणप्रान्तं वैहायसान्तिमम् ।
मात्रामात्रमिति प्रोक्तं तच्चतुर्धा पुरातनैः ॥ १३४ ॥

आणि संनिपात या कला होत. स्थिताचा पाचवा नि असतो. प्रवृत्तात तीन कलांनंतर शताशतासंनिपात (या कला असतात). (१३२). त्र्यश्र स्थितात चवथा प्र (असतो). असा उल्लोप्यकातील कलाप्रकार होय. अथवा चतुष्कल (उल्लोप्यक) वैहायस इत्यादींनी रहित योजावे. (१३३) ते (उल्लोप्यक) अन्तान्त (म्हणजे अंत शेवटी असलेले), अन्ताहरणप्रान्त (म्हणजे अन्ताहरण शेवटी असलेले), वैहायसान्तिम (म्हणजे वैहायस शेवटी असलेले) व मात्रामात्र असे प्राचीन (आचार्यांनी) चार प्रकारचे सांगितले आहे. (१३४).

'स्थितात पाचवा निष्काम असतो' असे निष्कामाचे विधान केले आहे. पाचव्या खेरीज बाकीच्यांच्या कला पूर्वी सांगितल्याप्रमाणेच होत. (१२९ ते १३१, १३२–)

प्रवृत्तात तीन कलांनंतर पुढील पाच कला श ता श ता सं या योजायच्या. पहिल्या तीन कलांत उद्घट्ट योजायचा असे सांगितले आहेच.

त्र्यश्र स्थितात चवथा 'प्र' असतो. त्र्यश्र म्हणजे चाचपुटात निश ताश निसं या कला जाणाव्या; 'चाचपुटात क्रमाने' (या कला होत) असे म्हटले असल्याने, चवथी कला शम्या ही मिळते. त्याचा अपवाद म्हणून येथे प्रवेशाचे विधान केले आहे. चवथ्याखेरीज बाकीच्या कला पूर्वी सांगितलेल्याच होत.

'अथवा' या शब्दाने दुसरे मत दाखवले आहे. चतुष्कल उल्लोप्यक वैहायस इत्यादींनी रहित योजावे (हा तो दुसरा पक्ष होय).

'वैहायस इ०' यातील इत्यादी या शब्दाने अन्तान्त व अन्ताहरणान्त हे घ्यावयाचे; वैहायस, अन्ताहरण व अन्त यांनी रहित असते असा अर्थ. ते उल्लोप्यक केव्हा अन्तान्त असते– मात्रेनंतर लगेच वैहायस योजून मग अंताहरण व नंतर अंत योजला असता ते अन्तान्त उल्लोप्यक होते. केव्हा मात्रा, वैहायस व अन्ताहरण हे पूर्वीप्रमाणे योजले असता ते अन्ताहरणान्त उल्लोप्यक होते. केव्हा मात्रा व वैहायस हेच योजले असता वैहायसान्तिम उल्लोप्यक होते. केव्हा फक्त मात्राच योजिली असता मात्रामात्र उल्लोप्यक होते– म्हणजेच ते वैहायस इत्यादींनी रहित असते. (१३२–१३४)

---

३६. १३३ व्या श्लोकावरील कल्लिनाथाच्या टीकेत 'निष्कामोऽनेन विधीयते' असा पाठ अडचार आवृत्तीत घेतला आहे. (भा. ३ पृ. ७६). तो अर्थातच चुकीचा आहे. 'प्रवेशोऽनेन विधीयते' हा आनंदाश्रम आवृत्तीतील पाठ (पृ. ३९५) बरोबर आहे.

प्रस्तारः–

ऽ ऽ । । ऽ
श ता श ता सं । इत्येककलोल्लोप्यकमात्रा ।
ही एककल उल्लोप्यकाची मात्रा होय.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि श नि ता श ता नि सं । इति द्विकलमात्रा ।
ही द्विकलाची मात्रा होय.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ नि वि ता आ श वि ता आ नि वि सं ।
इति चतुष्कलमात्रा । ही चतुष्कलाची मात्रा होय.
इति मात्रामात्रमुल्लोप्यकम् । मात्रामात्र उल्लोप्यक समाप्त.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ नि वि ता आ श वि ता आ नि वि सं ।
वैहायसान्तं चतुष्कलमुल्लोप्यकम् । (हे) वैहायसान्त चतुष्कल उल्लोप्यक.

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
आनि विश आनि विता आनि (श?) विता आनि विसं।
चतुर्मात्रामात्रप्रयोगशून्यचतुष्कला (?)।

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ नि वि ता आ श वि ता आ नि वि सं ।
चतुष्कलान्तमुल्लोप्यकम् । चतुष्कलान्त उल्लोप्यक.

क० याचा प्रस्तार असा– दोन गुरू व दोन लघू व एक गुरू लिहून त्यांखाली शता शतासं लिहावे. ही एककल उल्लोप्यक मात्रा होय.

नंतर चार गुरू दोन वेळा वेगवेगळे लिहून त्यांखाली निशनिता व शतानिसं लिहावे. ही द्विकल उल्लोप्यक मात्रा होय.

मग चार गुरू चार वेळा वेगवेगळे लिहून त्यांखाली क्रमाने आनिविश, आनिविता आशविता, आनिविसं लिहावे. ही चतुष्कल उल्लोप्यकमात्रा होय.

मात्रामात्र उल्लोप्यक समाप्त.

क० किंवा मात्रेच्या नंतर वैहायसात तीन गुरू वेगवेगळे चार वेळा लिहून त्यांखाली निविश निविता निशता व शतासं लिहावे. अथवा कलाप्रयोगरहित कलाचतुष्ककालानंतर वैहायस योजावे.

हे वैहायसान्त उल्लोप्यक होय. किंवा वैहायसानंतर यथाक्षर उत्तरतालाने अंताहरण लिहावे. हे अन्ताहरणान्त उल्लोप्यक होय.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि वि श नि वि ता वि (नि?) श ता श ता सं । मात्रा ॥ १ ॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ नि वि ता आ नि (श?) वि ता आ नि वि सं

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि वि श नि वि ता नि श ता श ता सं ।

इत्युच्छोप्यककलाप्रयोगः[३७] । शून्यकलाचतुष्कलानन्तरवैहायसरूपम् । चतुष्कला मात्रा ।

हा उच्छोप्यकातील कलाप्रयोग. शून्यकलाचतुष्कलानन्तर वैहायसरूप. चतुष्कला मात्रा.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ नि वि ता आ श वि ता आ नि वि सं ।
शाखा ॥ ही शाखा.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि वि श नि वि ता नि श ता श ता सं ।

एवमेव पदान्तरनिर्मिता प्रतिशाखा । ततः संहरणाख्यमन्ताहरणम् ।

याचप्रमाणे दुसऱ्या शब्दांनी निर्मिलेली प्रतिशाखा होय. नंतर संहरण नावाचे अंताहरण (योजायचे).

इत्यन्ताहरणान्तमुच्छोप्यकम् । हे अन्ताहरणान्त उच्छोप्यक.

अथ युग्मस्यान्तस्यायुग्मस्य च त्रयो भेदाः; स्थितं, प्रवृत्तं, महाजनिकं चेति । तत्र युग्मस्थितान्तमुच्छोप्यकं यथा –

आता युग्माच्या अंताचे व अयुग्माच्या अंताचे स्थित, प्रवृत्त आणि महाजनिक (असे) तीन भेद आहेत. त्यातले युग्माचे स्थित अंत असणारे उच्छोप्यक असे–

ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता । इदमेव वैहायसम् । हेच वैहायस होय.

चतुष्कलमात्रा– ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आनिविश आनिविता आशा (श?) विता आनिविसं ।

---

३७. हा पाठ आनन्दाश्रम आवृत्तीतील कल्लिनाथाच्या टीकेवरून '...कलाप्रयोगशून्यकलाचतुष्ककालानन्तरं...' असा घेणे योग्य वाटते.

– (पहा आनन्दाश्रम आवृत्ती पृ. ३९६)

वैहायसम् – ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
वैहायस नि वि श नि वि ता नि श ता श ता सं ।
युग्मप्रवृत्तम् – ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
युग्मप्रवृत्त नि श श ता ता श ता सं ।
युग्मस्थितम् – ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
युग्मस्थित नि श नि ता नि प्र नि सं ।

अथ युग्मप्रवृत्तान्तं महाजनिकस्थितान्तमुल्लोप्यकं यथा–

युग्मप्रवृत्तान्तमुल्लोप्यकं यथा–

आता युग्मप्रवृत्त अंत असलेले, महाजनिकस्थित (?) अंत असलेले उल्लोप्यक असे–
युग्मप्रवृत्त अंत असलेले उल्लोप्यक असे–

चतुष्कलमात्रा– ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आनिविश आनिविता आशविता आनिविसं ।
वैहायसम् – ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
वैहायस नि वि श नि वि ता नि श ता श ता सं ।

युग्मस्थितमयुग्मस्थितान्तमुल्लोप्यकम्–

युग्मस्थित (?) अयुग्मस्थित अंत असलेले उल्लोप्यक–

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि श नि ता श प्र नि सं ।

अथायुग्मप्रवृत्तकम्– आता अयुग्माचे प्रवृत्त–

चतुष्कलमात्रा– ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आनिविश आनिविता आशविता आनिविसं ।
वैहायसम् – ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
वैहायस निविश निविता निशता शतासं । सं ता श ता श ता

इति युग्मप्रवृत्तम् । हे युग्मप्रवृत्त (?) होय.

अथायुग्मप्रवृत्तान्तमुल्लोप्यकम् । आता अयुग्माचे प्रवृत्त अंत असलेले उल्लोप्यक–

क० किंवा नंतर युग्म, अयुग्म व मिश्र असा तीन प्रकारचा अंत योजावा. त्याची प्रत्येकी स्थित, प्रवृत्त व महाजनिक या नावांची तीन अंगे योजावी. त्यातले युग्मस्थित असे– चार गुरू वेगवेगळे दोन वेळा लिहून त्यांखाली निशनिता निप्रविसं लिहावे. युग्मप्रवृत्त असे– पूर्वीप्रमाणेच आठ गुरू लिहून त्यांखाली निशशता ताशतास लिहावे. मग युग्ममहाजनिक युग्मस्थिताप्रमाणे लिहावे.

चतुष्कलमात्रा यथा– ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

चतुष्कल मात्रा अशी– आनिविश आनिविता आशविता आनिविसं ।

वैहायसम्– ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

वैहायस– नि वि श नि वि ता नि श ता श ता सं ।

स्थितप्रवृत्तयुग्ममहाजनिकम्– ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

स्थितप्रवृत्तयुग्ममहाजनिक – नि श नि ता श प्र नि सं ।

अथ मिश्रान्तस्य षड्भेदाः । तत्र युग्मस्थितप्रवृत्तायुग्ममहाजनिकमिश्रान्तान्तमुल्लोप्यकं यथा–

आता मिश्र अन्ताचे सहा भेद (पुढीलप्रमाणे). त्यांतील–

(१) युग्माचे स्थित व प्रवृत्त आणि अयुग्माचे महाजनिक असणाऱ्या मिश्र अन्ताने शेवट होणारे उल्लोप्यक असे ––

चतुष्कलमात्रा– ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

आ नि वि श आ नि वि ता आ श वि ता आ नि वि सं

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

नि वि श नि वि ता नि श ता श ता सं । इति

वैहायसम् । हे वैहायस होय.

युग्मस्थितप्रवृत्ते युग्मस्य महाजनिकम् –

युग्म (अयुग्म ?) स्थित व प्रवृत्त आणि युग्ममहाजनिक ––

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

निश निता शप्र निसं निश ताश निसं

अयुग्माचे स्थित असे– सहा गुरू लिहून त्यांखाली निशता प्रनिस लिहावे.

सहा प्रकारचा मिश्र अंत असा––

त्यात युग्म स्थित व युग्म प्रवृत्त आणि अयुग्म महाजनिक पूर्वी सांगितल्याप्रमाणे लिहावे; हा एक मिश्रभेद होय, अयुग्माचे स्थित व प्रवृत्त आणि युग्माचे महाजनिक लिहावे, हा दुसरा मिश्रभेद; युग्माचे स्थित व अयुग्माचे प्रवृत्त आणि महाजनिक लिहावे, हा तिसरा मिश्रभेद; अयुग्माचे स्थित व युग्माचे प्रवृत्त आणि महाजनिक लिहावे, हा चवथा मिश्रभेद; युग्माचे स्थित अयुग्माचे प्रवृत्त व युग्माचे महाजनिक लिहावे, हा पाचवा मिश्रभेद; अयुग्माचे स्थित, युग्माचे प्रवृत्त व अयुग्माचे महाजनिक लिहावे, हा सहावा मिश्रभेद होय. असे हे मिश्र अंताचे सहा भेद होत. दोन अंगे असणारा अंत स्थित व प्रवृत्त यांनी आणि एक अंग असणारा महाजनिकाने जाणावा.

अथ युग्मस्थितप्रवृत्ते युग्ममहाजनिकमिश्रान्तान्तमुल्लोप्यकं यथा—

(२) आता युग्म (अयुग्म?) स्थित व प्रवृत्त आणि युग्ममहाजनिक मिश्र अन्त शेवटी असणारे उल्लोप्यक असे—

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

निशता शनिस निशनि ताश प्रनिसं

इत्ययुग्मस्थितप्रवृत्ते युग्मस्य महाजनिकम् ।

हे अयुग्माचे स्थित व प्रवृत्त आणि युग्माचे महाजनिक.

अथायुग्मस्थितायुग्मप्रवृत्तमहाजनिकमिश्रान्तमुल्लोप्यकं यथा—

(३) आता अयुग्म (युग्म?) स्थित व अयुग्म प्रवृत्त आणि महाजनिक असणारे मिश्रान्त उल्लोप्यक असे—

चतुष्कलमात्रा— ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

आनिवश आनिविता आशविता आनिविसं ।

वैहायसम्—ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

वैहायस— नि वि श नि वि ता नि श ता श ता सं। नि श नि ता श प्र

ऽ ऽ ऽ। ऽ ऽ ।ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

नि सं। सं ता श ता श ता। नि श ता श नि सं।

युग्मस्य स्थितमयुग्मस्य प्रवृत्तमहाजनिकमिति ।

हे युग्माचे स्थित व अयुग्माचे प्रवृत्त आणि महाजनिक.

युग्मप्रवृत्तकं यथा— महाजनिकमिश्रान्तान्तमुल्लोप्यकं यथा—

(४) (अयुग्माचे स्थित) व युग्माचे प्रवृत्त आणि महाजनिक असणाऱ्या मिश्र अन्ताने शेवट होणारे उल्लोप्यक असे—

चतुष्कलमात्रा— ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

आनिविश आनिविता आशविता आनिविसं ।

वैहायसम्—ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

वैहायस नि वि श नि वि ता नि श ता श ता सं। नि श ता प्र नि सं।

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

नि श श ता श ता श सं नि श नि ता श प्र नि सं।

इत्ययुग्मस्थितयुग्मस्य प्रवृत्तमहाजनिके—

हे अयुग्माचे स्थित व युग्माचे प्रवृत्त आणि महाजनिक.

---

३८. अडचार आ. भाग ३ पृ. ८०, ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
संता शता शता। निशता निसं।

अथ युग्मस्थितायुग्मप्रवृत्तयुग्ममहाजनिकमिश्रान्तान्तमुल्लोप्यकं यथा–

(५) आता युग्माचे स्थित, अयुग्माचे प्रवृत्त व युग्माचे महाजनिक असणाऱ्या मिश्र अंताने शेवट होणारे उल्लोप्यक असे–

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि श नि ता श प्र नि सं। आ नि वि श आ नि वि ता आ श वि ता

ऽ ऽ ऽ ऽ ऽ[३९] । ऽ ऽ । ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि सं। सं ता श ता श ता। नि श नि ता श प्र नि सं।

इति युग्मस्य स्थितमयुग्मस्यप्रवृत्तं महाजनिकम् ।

हे युग्माचे स्थित, अयुग्माचे प्रवृत्त व (युग्माचे) महाजनिक.

अथायुग्मस्थितं युग्मप्रवृत्तायुग्ममहाजनिकमिश्रान्तमुल्लोप्यकं यथा–

(६) आता अयुग्माचे स्थित, युग्माचे प्रवृत्त व अयुग्माचे महाजनिक असणारे मिश्रान्त उल्लोप्यक असे–

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ नि वि ता आ श वि ता आ नि वि सं।

चतुष्कलमात्रा– ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि वि श नि वि ता नि श ता श ता सं।

वैहायसम्– ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
वैहायस– नि श नि ता श प्र नि सं। नि श नि ता श प्र नि सं। नि श ता
ऽ ऽ ऽ
श नि सं।

इति युग्मस्थितमयुग्मस्य प्रवृत्ताभ्यामेकाङ्गो महाजनिकेन । (?)

(हे अयुग्माचे स्थित, युग्माचे प्रवृत्त व अयुग्माचे महाजनिक.)

एते षण्मिश्रभेदाः । हे सहा मिश्र भेद होत.

द्व्यङ्गो वा मिश्रः स्थितप्रवृत्ताभ्यामेकाङ्गो वा महाजनिकेन ।

अथवा स्थित व प्रवृत्त यांनी दोन अंगे असणारा मिश्र व महाजनिकाने एक अंग असणारा मिश्र होय.

इत्यन्तान्तमुल्लोप्यकम्— अन्तान्त उल्लोप्यक समाप्त.

---

३९. अडचार आ. भाग ३ पृ. ८१, ऽ ऽ ऽ ऽ
संता शता शता ।

चतुष्कलानि चत्वारि प्रकर्यादीन्युदाहरन् ।
प्रकरी स्याच्चतुर्वस्तु यद्वा सार्धत्रिवस्तुका ॥ १३५ ॥
तत्रार्धमन्त्यमादौ स्याद्वस्तु षण्मात्रमिष्यते ।
सार्धत्रिवस्तुपक्षे तु भवेदर्धमुपोहनम् ॥ १३६ ॥
पक्षान्तरे वस्तुमात्रं न वा स्यात्प्रत्युपोहनम् ।
कनिष्ठासारितं प्रोक्तमत्र संहरणं बुधैः ॥ १३७ ॥
वृत्तं च त्रिविदारीकमस्मिन्संहरणे मतम् ।
अन्त्यस्य त्वन्तिमा मात्रा कैश्चित्संहरणं मता ॥ १३८ ॥

प्रकरी इत्यादी चार (आचार्यांनी) चार, कलांची सांगितली आहेत. प्रकरी चार वस्तूंची किंवा साडेतीन वस्तूंची असते. (१३५)

त्यातले अन्त्य अर्ध प्रथम (योजलेले) असते. वस्तू सहा मात्रांची मानली आहे. साडेतीन वस्तू असणे या पक्षी अर्धी वस्तु उपोहन असते. (१३६)

दुसऱ्या पक्षी (म्हणजे चार वस्तू असता) एक वस्तूचे उपोहन (सांगितले आहे). प्रत्युपोहन (योजलेले) असावे किंवा नसावे. हिच्यात कनिष्ठासारित हे ज्ञात्यांनी संहरण (म्हणून) सांगितले आहे. (१३७)

या संहरणात तीन विदारींचे वृत्त मानले आहे. काहींनी शेवटच्या वस्तूची शेवटची मात्रा संहरण (म्हणून) मानली आहे. (१३८)

क० आता आरंभी अगोदर प्रकरी इत्यादी चारींचे सामान्य लक्षण सांगत आहे. प्रकरी इत्यादी चार म्हणजे प्रकरी, ओवेणक, रोविन्दक व उत्तर ही चार कलांचीच असतात. त्यांत एककल व द्विकल हे भेद नसतात असा याचा अर्थ.

(नंतर) प्रकरीचे लक्षण देत आहे–

साडेतीन वस्तू असणाऱ्या प्रकरीत शेवटची अर्धी वस्तु ही न्यायानुसार तीन वस्तूंच्या नंतर येत असल्याने अन्त्य अर्धी वस्तु होय. पण ती 'आरंभी योजावी' या सांगण्यावरून तीन वस्तूंच्या आधी योजावी. म्हणजेच प्रथम अर्धी वस्तु गाऊन नंतर तीन वस्तू गाव्या असा अर्थ घ्यायचा. 'साडेतीन वस्तू असणे या पक्षी अर्धी वस्तु उपोहन असते' असे सांगण्याने अर्धी वस्तु आरंभी योजण्यातला उद्देश दाखविला आहे. दुसऱ्या पक्षी म्हणजे चार वस्तू असताना एका वस्तूचे उपोहन असते. प्रत्युपोहन असावे किंवा नसावे या म्हणण्यावरून प्रत्युपोहनाविषयी विकल्प दिला आहे. या प्रकरीत कनिष्ठासारित हेच संहरण म्हणून सांगितले आहे. कनिष्ठासारिताचे लक्षण पुढे सांगितले आहे, ते असे–

सुधाकर टीका —

षोडश कला प्रकरीची मात्रा होय असे भरत इत्यादींनी सांगितले आहे. वस्तूत सहा मात्रा योजाव्या. (१३५)

अन्ते वा सप्तमी मात्रा परैः संहरणं स्मृता ।
वस्त्वर्धेष्विह गीताङ्गविधिर्मद्रकवद्भवेत् ॥ १३९ ॥
द्वितीयमात्रा तालान्ता प्रकर्या वस्तुनो मता ।
तुर्यायां द्वादशस्तालः पञ्चम्यामष्टमस्तु शः ॥ १४० ॥
या षोडश कलाः प्रोक्ता द्विकले मद्रकेऽन्तिमाः ।
ताः षष्ठ्यामद्वितीयान्त्या मात्राः शम्यान्तिमा मताः ॥ १४१ ॥
शेषस्थानेष्वानिविप्रान्पादभागेषु निक्षिपेत् ।
उपोहने कलापातान्न्यषेधन् दत्तिलादयः ॥ १४२ ॥

दुसऱ्या (आचार्यांनी) शेवटी सातवी मात्रा संहरण म्हणून सांगितली आहे. यात वस्तूंच्या अर्ध्या भागांत, मद्रकाप्रमाणे गीताच्या अंगांची योजना असते. (१३९)

प्रकरीच्या वस्तूची दुसरी मात्रा ताल शेवटी असलेली मानली आहे; चवथीत बारावा ताल व पाचवीत आठवा श (म्हणजे शम्या) असतो. (१४०) द्विकल मद्रकात ज्या शेवटच्या सोळा कला सांगितल्या आहेत, त्या सहावीत (योजाव्या) दुसरी व शेवटची (म्हणजे सहावी मात्रा) सोडून इतर मात्रा शम्या शेवटी असलेल्या मानल्या आहेत. (१४१) पादभागांत बाकीच्या स्थानांमध्ये आनिविप्र ठेवावे. दत्तिल इत्यादींनी उपोहनात कलापात नाकारले आहेत. (१४२) जेव्हा सहावी किंवा सातवी मात्रा संहरण असते,

---

" कनिष्ठासारितात शम्यादि (म्हणजे शता शता या पातांनी युक्त) असा युग्म (म्हणजे चच्चत्पुट) व मग दोन उत्तर ताल (योजावे). हे यथाक्षर (योजावे). त्यांत शेवटचा संनिपात अधिक (योजावा)." हे कनिष्ठासारितच येथे योजले असता तेच संहरण नावाचे अंग म्हटले आहे. या संहरणात तीन विदारींचे वृत्त मानले आहे. " वृत्त तीन, चार, पाच किंवा सहा विदारी असणारे असते, " असे जे वृत्ताचे भेद सांगितले आहेत त्यांतील तीन विदारींचेच वृत्त येथे योजावे असा अर्थ घ्यायचा. शेवटच्या वस्तूची शेवटची म्हणजे सहावी मात्रा संहरण होय असे काहींचे मत आहे.

' अन्ते ' म्हणजे शेवटच्या वस्तूच्या नाशानंतर (म्हणजे ती संपल्यावर) अर्थात शेवटच्या वस्तूनंतर, शेवटच्या वस्तूचा अवयव म्हणून सातवी मात्रा कल्पून ती संहरण म्हणून इतर आचार्यांनी सांगितली आहे. प्रकरीत वस्तूंच्या अर्ध्या भागांत मद्रकाप्रमाणे गीताची अंगे योजावीत या अतिदेशाचा अर्थ पूर्वार्धांत विविध व उत्तरार्धात एकक अशी योजना करावी असा जाणून घ्यायचा. (१३५–१३९)

क० प्रकरीतील वस्तूच्या सहा मात्रांमधली पातकलांची योजना दाखवीत आहे. यात मात्रा सोळा कला या स्वरूपाची असते. त्यांतील दुसरी मात्रा ताल हा पात शेवटी असलेली असते. चवथ्या मात्रेतील बारावा म्हणजे तिसऱ्या पादभागाचा शेवटचा गुरु ताल या पाताने योजावा. पाचव्या मात्रेतील आठवा म्हणजे दुसऱ्या पादभागाचा शेवटचा गुरु शम्या या पाताने योजावा. द्विकल मद्रकातील शेवटच्या सोळा कला निशनितार, नितानिश, शताताश, ताशतासं या सांगितल्या आहेत. त्या सहाव्या मात्रेत योजाव्या. दुसरी व सहावी मात्रा सोडून बाकीच्या

षष्ठी वा सप्तमी मात्रा यदा संहरणं तदा।
कनिष्ठासारितकला विनान्त्यां परिकीर्तिता ॥ १४३ ॥

प्रस्तारः– (प्रकरीचा) प्रस्तार–

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि प्र आ नि वि प्र आ नि वि श । मात्रा ॥ १ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि प्र आ नि वि प्र आ नि वि ता । मात्रा ॥ २ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि प्र आ नि वि प्र आ नि वि श । मात्रा ॥ ३ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि प्र आ नि वि ता आ नि वि श । ॥ ४ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि श आ नि वि प्र आ नि वि श । ॥ ५ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि श नि ता नि ता नि श श ता ता श ता श ता सं । ॥ ६ ॥

इति षण्मात्रं वस्तु– ही सहामात्रांची वस्तु होय.

तेव्हा शेवटची कला सोडून (इतर) कनिष्ठासारिताच्या कला सांगितल्या आहेत. (१४३)

पहिली, तिसरी, चवथी, आणि पाचवी या शम्या शेवटी असलेल्या योजाव्या; म्हणजे त्यांचा सोळावा गुरू शम्या या पाताने योजावा. सांगितलेल्या या पादभागांखेरीजच्या इतर पादभागांत आनिविप्र योजावे. दत्तिल इत्यादींनी उपोहनात कलापात स्वीकारलेला नाही या म्हणण्यावरून काहींनी दुसऱ्या मतानुसार ध्रुवपात सांगितला आहे असे कळून येते. "ध्रुवपात (असावा) किंवा पात नसावा" हा मद्रकात सांगितलेला नियम लागू पडत असल्याने (वरील दोन्ही मते संभवतात). "शेवटचा संनिपात अधिक (योजावा)" अशी कनिष्ठासारितात संनिपात ही शेवटची कला पुढे सांगितली जाणार आहे; ती सोडून असा 'अन्त्यां विना' इत्यादीचा अर्थ घ्यायचा. (१४०–१४३)

क० या प्रकरीचा प्रस्तार असा—

वस्तूच्या पहिल्या मात्रेत चार कलांचे पादभाग असणारे १६ गुरू लिहून, त्यांतील पहिल्या तीन पादभागांत प्रत्येकी आनिविप्र लिहावे. चवथ्या पादभागात आनिविश लिहावे. ही पहिली मात्रा होय. दुसरी मात्रा अशीच लिहावी. पण सोळाव्या गुरूच्या खाली ताल लिहावा. ही दुसरी मात्रा होय. तिसरी मात्रा पहिल्या मात्रेसारखीच लिहावी. ही तिसरी मात्रा. चवथ्या मात्रेत पूर्वीप्रमाणे सोळा गुरू लिहून, त्यांतील पहिल्या दोन पादभागांत प्रत्येकी आनिविप्र, तिसऱ्या पादभागात आनिविता व चवथ्या पादभागात आनिविश लिहावे. ही चवथी मात्रा. पाचव्या मात्रेत पहिल्या व तिसऱ्या पादभागांत प्रत्येकी आनिविप्र आणि दुसऱ्या व चवथ्या पादभागांत प्रत्येकी

एवं चत्वारि वस्तूनि त्रीणि सार्धानि वा गीत्वा कनिष्ठासारितात्मकं संहरणं कार्यं यथा, अथवा अन्त्यसंनिपातवर्जिताभिः कनिष्ठासारितस्य कलाभिरन्विता अन्त्यवस्तुनः षष्ठी मात्रा संहरणं कार्यम् । अथवा एवमात्मिका सप्तमी मात्रा संहरणं कार्यम् । यथा–

या प्रमाणे चार वस्तू किंवा साडेतीन वस्तू गाऊन कनिष्ठासारित या स्वरूपाचे संहरण योजावे; अथवा शेवटच्या संनिपाताने रहित असणाऱ्या कनिष्ठासारिताच्या कलांनी युक्त असलेल्या, शेवटच्या वस्तूच्या सहाव्या मात्रेने संहरण योजावे; किंवा अशा प्रकारच्या सातव्या मात्रेने संहरण योजावे. ते असे–

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
शता शता संता शता । संता शता शता । संता शता शता
इति प्रकरी । ही प्रकरी होय.

ओवेणकं द्वादशाङ्गं सप्ताङ्गं च परावरम् ।
स्यात्पादः प्रतिपादश्च माषघातोपवर्तनम् ॥ १४४ ॥

जास्तीत जास्त बारा अंगे व कमीत कमी सात अंगे असणारे ओवेणक होय. पाद व प्रतिपाद, माषघात, उपवर्तन, (१४४) संधि आणि चतुरश्र, वज्र, नंतर संपिष्टक, वेणी

आनिविश लिहावे. ही पाचवी मात्रा. सहाव्या मात्रेत सोळा गुरूंच्या खाली निशनिता, नितानिश शताताश व ताशतासं हे पादभागांचे विभाग लिहावे. ही सहावी मात्रा.

ही सहा मात्रांची एक वस्तू होय.

क० अशा चार वस्तू किंवा साडेतीन वस्तू गाऊन मग कनिष्ठासारित या स्वरूपाचे संहरण योजावे. त्याचा प्रस्तार असा– प्रथम यथाक्षर चच्चत्पुटाचा प्रस्तार लिहून, "आसारित इत्यादींत शम्या इत्यादि असा नियम असल्याने, त्यांखाली शताशता लिहावे. मग यथाक्षर दोन षट्पिता-पुत्रकांचा प्रस्तार लिहून त्यांखाली प्रत्येकी संता शता शता लिहावे. 'शेवटचा संनिपात अधिक योजावा' असे म्हटले असल्याने शेवटचा गुरु अधिक लिहून त्याखाली संनिपात लिहावा. किंवा या अधिक असणाऱ्या शेवटच्या संनिपाताला वगळून होणाऱ्या कनिष्ठासारिताच्या कलांनी युक्त अशी शेवटच्या वस्तूची सहावी मात्रा संहरण म्हणून योजावी. अथवा अशाच स्वरूपाची सातवी मात्रा संहरण म्हणून योजावी. म्हणजे पूर्वी सांगितलेल्या पातकलांनी युक्त अशी जी सहावी मात्रा तिच्या सारखीच सातवी मात्रा लिहावी.

प्रकरी समाप्त.

क० नंतर ओवेणकाचे लक्षण देत आहे. त्याची अंगे अशी– पाद, प्रतिपाद, माषघात, उपवर्तन, संधि, चतुरश्र, वज्र, संपिष्टक, वेणी, प्रवेणी, उपपात व अंताहरण ही बारा अंगे सांगितली आहेत. सात अंगांच्या ओवेणकात संपिष्टक इत्यादी (जी अंगे सोडायला सांगितली आहेत), त्यांखेरीजची बाकीची म्हणजे पाद, प्रतिपाद, माषघात, संधि, चतुरश्र, वज्र व अन्ताहरण ही सात अंगे मानली आहेत.

संधिश्च चतुरश्रं स्याद्वज्रं संपिष्टकं ततः ।
वेणी तथा प्रवेणी स्यादुपपातस्ततः परम् ॥ १४५ ॥
अन्ताहरणमित्येतान्यङ्गानि द्वादशावदन् ।
संपिष्टकं तथा वेणीं प्रवेणीमुपवर्तनम् ॥ १४६ ॥
उपपातं विनान्यानि सप्ताङ्गानि च मेनिरे ।
यादृक् चतुष्कले वस्तु प्रागुक्तमपरान्तिके ॥ १४७ ॥
तादृक् पादस्ततस्तद्वत्प्रतिपादः पदान्तरैः ।
समं पादपरार्धेन प्रतिपादं परे जगुः ॥ १४८ ॥
यथाक्षरोत्तरे शीर्षं केचिदाहुरतः परम् ।
शीर्षात्परो माषघातो द्विकलोत्तरतालतः ॥ १४९ ॥

तसेच प्रवेणी, मग उपपात (हे अंग) होय; (१४५) नंतर अन्ताहरण अशी ही बारा अंगे सांगितली आहेत. संपिष्टक तसेच वेणी, प्रवेणी, उपवर्तन (१४६) आणि उपपात ही सोडून बाकीची सात अंगे (सात अंगे असणाऱ्या ओवेणकात) मानली आहेत. जशा तऱ्हेची वस्तु पूर्वी चतुष्कल अपरान्तकात सांगितली (१४७) तशा प्रकारचा पाद होय. मग दुसऱ्या शब्दांनी रचलेला त्या (पादा) प्रमाणेच असणारा प्रतिपाद होय. दुसऱ्या (आचार्यांनी) पादाच्या उत्तरार्धासमान प्रतिपाद सांगितला आहे. (१४८)

त्यानंतर काही (आचार्य) यथाक्षर उत्तर तालाने शीर्षक सांगतात. शीर्षकानंतर द्विकल उत्तर तालात माषघात (हे अंग होय). (१४९)

पाद इत्यादींचे लक्षण सांगत आहे—

चतुष्कल अपरान्तकात जशा प्रकारची म्हणजे चोवीस गुरू असणारी वस्तु पूर्वी सांगितली आहे तशाच स्वरूपाचा येथे पाद सांगितला आहे. पादात योजलेल्या शब्दांपेक्षा वेगळे शब्द योजून प्रतिपाद योजावा. यावरून पाद व प्रतिपाद यांतील धातूची समानता कळते. पादाच्या उत्तरार्धाने म्हणजे बारा गुरूंनी, दुसऱ्या (आचार्यांनी) प्रतिपाद सांगितला आहे. येथेही पादाचा उत्तरार्ध व प्रतिपाद यांमध्ये धातूची समानता जाणावी. (१४४-१४८)

क० प्रतिपादाच्या नंतर यथाक्षर उत्तरतालात काही (आचार्य) शीर्षक सांगतात. मग द्विकल उत्तरतालात माषघात हे अंग होय. त्यापुढे म्हणजे माषघातानंतर अपरान्तकाप्रमाणे म्हणजे द्विकल अपरान्तकाप्रमाणे उपवर्तन हे अंग होय. अथवा उपवर्तन संपिष्टकानंतर योजावे किंवा दोन्हींच्या म्हणजे माषघात व संपिष्टक यांच्या नंतर योजावे. माषघातानंतर किंवा संपिष्टकानंतर उपवर्तन गावे असा दुसरा पक्ष होय. मग उपवर्तनासारखेच, उपवर्तनानंतरचे संधि नावाचे अंग होय. म्हणजे उपवर्तन यथाक्षर उत्तरतालात योजले त्याप्रमाणेच संधि हे अंगही त्याच तालात योजावे. संधीनंतर चतुरश्रक नावाचे अंग होय. ते युग्मप्रवृत्ताप्रमाणे म्हणजे उद्घट्टात सांगितलेल्या पातकलांनी अगोदर युक्त असणाऱ्या द्विकल चच्चत्पुट तालात योजावे. चतुरश्रानंतर

अपरान्तकवत्तस्मात्परं स्यादुपवर्तनम् ।
ऊर्ध्वं संपिष्टकाद्वा स्यादुभाभ्यामथवा परम् ॥ १५० ॥
तद्वदेव ततः संधिस्ततोऽपि चतुरश्रकम् ।
युग्मप्रवृत्तवत्तस्माद्वज्रं संधिवदिष्यते ॥ १५१ ॥
संपिष्टकं ततः कार्यं दश द्वादश वा कलाः ।
द्वादशाङ्गे दशकलं सप्ताङ्गे त्वितरन्मतम् ॥ १५२ ॥
सप्ताङ्गद्वादशाङ्गत्वे वर्णाङ्गैः केचिदूचिरे ।
चतुर्थी पञ्चमी चेह त्याज्ये दशकले कले ॥ १५३ ॥

त्याच्या नंतर अपरान्तकाप्रमाणे उपवर्तन होय. किंवा ते संपिष्टकानंतर असावे. अथवा दोन्हींच्या (म्हणजे मार्गघात व संपिष्टक यांच्या) नंतर असावे. (१५०)

त्या प्रमाणेच नंतर संधि व त्याच्याही पुढे मग चतुरश्रक (हे अंग) युग्मप्रवृत्ताप्रमाणे (योजावे). त्यानंतर संधीसारखेच वज्र (हे अंग) मानले आहे. (१५१)

त्यापुढे संपिष्टक योजावे. त्याच्या दहा किंवा बारा कला (होत). बारा अंगे असणाऱ्या (ओवेणकात) दहा कलांचे व सात अंगे असणाऱ्या (ओवेणकात) दुसरे (म्हणजे बारा कलांचे संपिष्टक) मानले आहे. (१५२)

सात अंगे असणे हे (संपिष्टकाचे) स्वरूप आणि बारा अंगे असणे हे (संपिष्टकाचे) स्वरूप काहींनी वर्णाङ्गांनी सांगितले आहे. या (संपिष्टकात) दहा कला असता चवथी व पाचवी या कला सोडाव्या. (१५३)

वज्र हे अंग होय. ते संधि या अंगाप्रमाणे म्हणजे यथाक्षर उत्तर तालात योजावे. मग म्हणजे वज्रानंतर संपिष्टक नावाचे अंग योजावे. 'ते दहा किंवा बारा कला असणारे असावे' या म्हणण्याने संपिष्टकाच्या बाबतीत कलासंख्येचा नियम वैकल्पिक दाखविला आहे. 'बारा अंगे असणाऱ्या (ओवेणकात) दहा कलांचे व सात अंगे असणाऱ्या (ओवेणकात) दुसरे म्हणजे बारा कलांचे' या म्हणण्याने त्या दोन्ही संपिष्टकांच्या भेदांचे विषय कोणते ती व्यवस्था दाखविली आहे. (१४९–१५२)

क० बारा कला असणाऱ्या संपिष्टकात ज्या कला सांगितल्या आहेत त्यांतली चवथी म्हणजे शम्या व पाचवी म्हणजे ताल, या कला दहा कला असणाऱ्या संपिष्टकात सोडून द्याव्या; म्हणजे या दोन कला सोडून बारा कलांच्या संपिष्टकातील राहिलेल्या दहा कला योजाव्या. वेणी व प्रवेणी ही दोन अंगे यथाक्षर पंचपाणि तालात योजावी हे एक मत होय; किंवा द्विकल पंचपाणि तालात योजावी हे दुसरे मत होय; अथवा यथाक्षर चच्चत्पुटानंतर द्विकल चच्चत्पुट तालात योजावी हे तिसरे मत होय; किंवा यथाक्षर पंचपाणि तालात वेणी व द्विकल पंचपाणि तालात प्रवेणी योजावी हे चवथे मत होय. प्रवेणीनंतर उपवर्तन योजावे असे काहींचे मत आहे.

भवेद्वेण्यां प्रवेण्यां च पञ्चपाणिर्यथाक्षरः ।
द्विकलो वाथवा चच्चत्पुटादूर्ध्वं यथाक्षरात् ॥ १५४ ॥
चच्चत्पुटः स्याद् द्विकलो यद्वा वेणी यथाक्षरे ।
पञ्चपाणौ प्रवेणी तु द्विकले मुनिभिर्मताः ॥ १५५ ॥
प्रवेण्यनन्तरं कैश्चिदुपवर्तनमिष्यते ।
पादोत्तरार्धतालेन द्विकलेनोत्तरेण वा ॥ १५६ ॥
उपपातस्ततोऽन्तेन विनान्ताहरणं न[४०] वा ।
सत्यन्तेऽस्त्येव स द्वेधा सप्ताङ्गेऽन्यत्र तु त्रिधा ॥ १५७ ॥
लक्ष्मान्ताहरणादीनां ज्ञेयमुल्लोप्यकादिह ।

वेणी व प्रवेणी यांत यथाक्षर पंचपाणी ताल असतो; किंवा द्विकल (पंचपाणि) असतो; अथवा यथाक्षर चच्चत्पुटानंतर (१५४) द्विकल चच्चत्पुट असतो; किंवा यथाक्षर पंचपाणि तालात वेणी व द्विकल (पंचपाणि) तालात प्रवेणी, मुनींनी मानल्या आहेत. (१५५) काहींनी प्रवेणीनंतर उपवर्तन मानले आहे. पादाच्या उत्तरार्धाच्या तालात किंवा द्विकल उत्तर तालात, (१५६) उपपात (योजावा). नंतर अंताशिवाय अंताहरण (योजावे) किंवा (तसे) योजू नये, (म्हणजे अंत असलेले अंताहरण योजावे). अंत असता सात अंगांच्या (ओवेणकात) तो दोन प्रकारचा (म्हणजे युग्म व अयुग्म असा) असतोच. इतरत्र (म्हणजे बारा अंगांच्या ओवेणकात) तो तीन प्रकारचा (युग्म, अयुग्म व मिश्र असा असतो). (१५७) अंताहरण इत्यादींचे लक्षण येथे उल्लोप्यकातून जाणावे. (१५८–)

पादाच्या उत्तरार्धाच्या तालात म्हणजे आनिविता इत्यादी कलांनी युक्त असणाऱ्या बारा गुरूंच्या तालात किंवा द्विकल उत्तर तालात उपपात योजावा. मग म्हणजे उपपातानंतर अंताशिवाय अंताहरण योजावे हे एक मत होय; 'किंवा योजू नये' असा त्याचा अस्वीकार हे दुसरे मत होय. हा अस्वीकार 'अंताशिवाय' एवढ्याच भागाचा जाणावा. कारण विशेषणाच्या निषेधानेही विशिष्टाचा निषेध सिद्ध होतो. त्यामुळे (अंताशिवाय अंताहरण योजू नये असा अर्थ सिद्ध होऊन) अंतासहित अंताहरण योजावे असे दुसरे मत कळून येते. अंत असता, तो सात अंगांच्या ओवेणकात युग्म व अयुग्म असा दोन प्रकारचा असतो; इतरत्र म्हणजे बारा अंगांच्या ओवेणकात तो युग्म, अयुग्म व मिश्र असा तीन प्रकारचा असतो–'अंताहरण इत्यादींचे' यातील 'इत्यादि' शब्दाने युग्म इत्यादी अंतभेद घेतले आहेत. (१५३–१५७, १५८–)

---

४० "उपपातानंतर, अंताशिवाय अंताहरण (योजावे) किंवा (योजू) नये; अंत असताना असतेच" याचा अर्थ सुधाकरटीकेत पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

"उपपातानंतर, अंत नसेल तर अंताहरण योजावे किंवा योजू नये. अंत असेल तर मात्र अंताहरण अवश्य असतेच." दत्तिलाने "यात अंतयुक्त अंताहरणही असते" असे म्हटले आहे. (दत्तिलम् पृ. २०) यावरून 'अंतासह अंताहरण' हे एक मत व 'अंताविना अंताहरण' हे दुसरे मत असे जे कल्लिनाथाने स्पष्टीकरण दिले आहे ते योग्य वाटते.

विधेयो विविधो वेण्यां प्रवृत्तं वा मतान्तरात् ॥ १५८ ॥
प्रवेण्यां तु प्रवृत्तं स्यादवगाढं परे जगुः ।
पादोपपातसंपिष्टेऽप्यभ्यधुर्विविधं बुधाः ॥ १५९ ॥
विविधो वैककं वज्र एककं तूपवर्तने ।
विविधश्चतुरश्रे स्यादेककं वाथवैककम् ॥ १६० ॥
कलाप्रयोगनिर्मुक्तं संप्रयुज्यावपाणिना ।
कलास्वष्टासु विविधो विधेयो गानवेदिभिः ॥ १६१ ॥
शनिता माषघाते स्युर्द्वितीयाद्यास्त्रयः क्रमात् ।
संपिष्टके निशम्यास्त्रिस्त्रितालो द्विः शतौ च सम् ॥ १६२ ॥
अन्तो गीतिपदावृत्तियुक्तः सप्ताङ्गके मतः ।
ओवेणके द्वादशाङ्गे तुल्यगीतिः पृथक्पदः ॥ १६३ ॥

वेणीमध्ये विविध योजावा किंवा दुसऱ्या मताप्रमाणे प्रवृत्त योजावे. (१५८) प्रवेणीत मात्र प्रवृत्त (योजायचे) असते; दुसऱ्या (आचार्यांनी) (तिच्यात) अवगाढ सांगितले आहे. ज्ञात्यांनी पाद, उपपात व संपिष्टक यांतही विविध सांगितला आहे. (१५९)

वज्रात विविध किंवा एकक (योजावे); पण उपवर्तनात (फक्त) एकक (योजावे). चतुरश्रात विविध किंवा एकक असावा, अथवा गानजाणकारांनी कलाप्रयोग नसलेले एकक अवपाणीने योजून (मग) आठ कलांत विविध योजावा. (१६०, १६१) माषघातात दुसरी इत्यादी तीन (म्हणजे दुसरी, तिसरी व चवथी या कला) शनिता यांनी क्रमाने योजाव्या. संपिष्टकात नि, (मग) तीन शम्या, तीन ताल, दोन वेळा श ता आणि सं (असे योजावे). (१६२) सात अंगांच्या ओवेणकात गीतीच्या व शब्दांच्या आवृत्तीने युक्त असा अंत

क० वेणी इत्यादींत विविध इत्यादी गीताच्या अंगांची यथासंभव योजना सांगत आहे. चतुरश्रात विविध आणि एकक योजावा हे एक मत; किंवा कलाप्रयोग रहित म्हणजे युग्मप्रवृत्तात सांगितलेल्या निष्काम इत्यादी कलांची योजना नसलेले एकक अवपाणीने म्हणजे अतीतग्रहाने प्रथम प्रयुक्त करून मग आठ कलांत निष्काम इत्यादींमध्ये विविध योजावा (हे दुसरे मत). (१५८–१६१) काही ठिकाणी पातकलांची विशेष योजना दाखवीत आहे– माषघातात द्विकल उत्तरताल सांगितला आहे. त्याची ' निप्रताशनितानिशताप्रनिसं ' अशी पातकलायोजना पूर्वी सांगितली आहे. त्यातील एका भागाचा अपवाद सांगणारा शनिता हा शब्द जाणावा. पूर्वी दुसरी, तिसरी व चवथी या कला प्रताश यांनी सांगितल्या आहेत. येथे त्याऐवजी शनिता यांची योजना करावी. संपिष्टकात बारा कला असता, कलांची योजना दाखवीत आहे–

निष्काम मग शम्या तीन वेळा, ताल तीन वेळा, नंतर शम्या व ताल, पुन्हा शम्या व ताल व शेवटी संनिपात. गीति म्हणजे गेय अर्थात धातु होय; पद म्हणजे सार्थ शब्द अर्थात मातु होय. त्या गीति व पद यांच्या आवृत्तीने युक्त असा अंत सप्तांग ओवेणकात योजावा. द्वादशांग

अस्य प्रस्तारः– याचा प्रस्तार –

ऽ ऽ ऽऽ ऽ ऽ ऽऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि प्र आ नि वि श आ नि वि ता ।
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ ता वि श आ नि वि श ॥ **इति पादः** । हा पाद होय.

एवमेव प्रतिपादः ॥ असाच प्रतिपाद होय.

पादोत्तरार्धं वा प्रतिपादः यथा– गीतिः (?) किंवा पादाचा उत्तरार्ध प्रतिपाद होय जसे– गीति (?)

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
ता नि वि सं आ नि वि श आ ता वि श ।

इति प्रतिपादः[४१] । हा प्रतिपाद होय.

ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀
संता शता शता ॥ **शीर्षकम्** ॥ हे शीर्षक होय.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि प्र ता श नि ता ता श ता प्र नि सं ॥ **मापघातः** ॥ हा मापघात.

मानला आहे; बारा अंगांच्या (ओवेणकात) गीति समान (पण) शब्द वेगळे असलेला (असा अंत मानला आहे). (१६३)

ओवेणकात गीति तीच पण शब्द वेगळे असणारा अंत योजावा; यावरून त्यात मातूचाच फक्त वेगळेपणा असतो धातूचा नसतो असा अर्थ कळून येतो. (१६२–१६३)

क० या ओवेणकाचा प्रस्तार असा–

चार चार कलांचे पाद भाग असणारे चोवीस गुरू लिहून त्यांखाली (क्रमाने) आनि विप्र, पुन्हा आनिविप्र मग आनिविश, आनिविता, आताविश आणि आनिविसं हे लिहावे. हा पाद होय. नंतर असाच प्रतिपाद होय. किंवा पादाचा उत्तरार्ध प्रतिपाद होय. तो असा– बारा गुरू लिहून त्याखाली आनिविता इत्यादी (म्हणजे आनिविता, आताविश व आनिविश) लिहावे.

---

४१ कल्लिनाथाच्या टीकेनुसार मिळणारा प्रस्तार ग्रंथात काही ठिकाणी दिसून येत नाही–

उदा०– पादाचा उत्तरार्ध म्हणजे प्रतिपाद याचा प्रस्तार; चतुरश्राचा प्रस्तार; दशकल संपिष्टकाचा प्रस्तार.

पहा– नाट्यशास्त्र (घोष संपादित) पृ, ७२–७३. द्वादशकल संपिष्टकाचे कलापात– निष्क्राम, शम्या, शम्या, शम्या, ताल, ताल, ताल, शम्या, ताल, शम्या, ताल, संनिपात; दशकल संपिष्टकाचे कलापात–निष्क्राम, शम्या, शम्या, ताल, ताल, शम्या, ताल, शम्या, ताल, संनिपात.

पहा– बडोदा आवृत्ति– पृ. २५८

S̀ । S S । S̀
सं ता श ता श ता ॥ इत्युपवर्तनम् ॥ हे उपवर्तन.
S̀ । S S । S̀
सं ता श ता श ता ॥ इति संधिः ॥ हा संधि होय.
S S S S S S S S
नि श श श श ता सं ॥ चतुरश्रः (म् ?) हे चतुरश्र.
S̀ । S S । S̀
सं ता श ता श ता ॥ इति वज्रम् ॥ हे वज्र होय.

S S S S S S S S S S S S
नि श श श श ता ता ता श श ता सं ॥ इति सप्ताङ्ग ओवेणके
द्वादशकलं संपिष्टकम् ॥ हे सप्तांग ओवेणकातील बारा कलांचे संपिष्टक होय.

S S S S S S S S S S S S S̀ । S S । S̀
नि श श ता ता श ता श ता ता श सं ॥ सं ता श ता श ता ॥
इति द्वादशकलं संपिष्टकम् । हे बारा कलांचे संपिष्टक होय.

S S S S S S S S S S S S S̀ । S S । S̀
नि श श ता ता श ता श ता ता श सं ॥ सं ता श ता श ता ॥
इति द्वादशकलं संपिष्टकम् ॥ हे बारा कलांचे संपिष्टक होय.
संपिष्टकानन्तरमुपवर्तनं वा । किंवा संपिष्टकानंतर उपवर्तन (योजावे).

S̀ । S S । S̀
सं ता श ता श ता ॥ इति वेणी ॥ ही वेणी होय.
S̀ । S S । S̀
सं ता श ता श ता ॥ इति प्रवेणी ॥ ही प्रवेणी होय.
S S S S S S S S S S S S
नि प्र ता श नि ता नि श ता प्र नि सं ॥ इति वा वेणी ॥ किंवा ही वेणी.
एवमेव प्रवेणी ॥ अशीच प्रवेणी होय.
ततो मतान्तरेण प्रवेण्यनन्तरमुपवर्तनम् – मग दुसऱ्या मतानुसार प्रवेणीनंतर उपवर्तन –

ऽ। ऽऽ ।ऽ

संता श ता श ता ॥ इत्युपवर्तनम् ॥ हे उपवर्तन होय.

ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ

आ नि वि ता आ नि वि श ता नि वि सं ॥ इति पादोत्तरार्धतालेनोपपातः ॥ हा पादाच्या उत्तरार्धाच्या तालाने उपपात होय.

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽऽ

नि प्र ता श नि ता श नि श ता प्र नि सं ॥ इति द्विकलेनोत्तरेण वोपपातः ॥ किंवा द्विकल उत्तरतालाने उपपात होय.

ऽ। ऽऽ ।ऽ

सं ता श ता शता ॥ इत्यन्ताहरणम् ॥ हे अंताहरण होय.

ततः पाक्षिकान्तो ज्ञेयः । स च सप्ताङ्गे युग्मोऽयुग्मश्चेति द्विविधः कर्तव्यः । द्वादशाङ्गे तु युग्मोऽयुग्मो मिश्रश्चेति त्रिविधः ।

नंतर विकल्पाने असणारा अंत जाणावा. तो सप्तांग (ओवेणकात) युग्म व अयुग्म दोन प्रकारचा योजावा व द्वादशांग (ओवेणकात) युग्म, अयुग्म व मिश्र असा तीन प्रकारचा (योजावा).

इत्योवेणकम् । ओवेणक समाप्त.

हा प्रतिपाद होय. मग यथाक्षर उत्तर तालाने शीर्षक लिहावे. नंतर प्रत्येकी दोन कलांचे असे (सहा) पादभाग असणारे बारा गुरू लिहून त्यांखाली निश, निता, निता, निश, ताप्र, निसं हे लिहावे. हा माषघात होय. मग यथाक्षर उत्तर तालाने उपवर्तन लिहावे. हे उपवर्तन होय. नंतर त्याच तालाने संधि लिहावा. हा संधि होय. मग आठ गुरू लिहून त्याखाली निशशशताशतासं हे लिहावे. हे चतुरश्र होय. नंतर यथाक्षर उत्तर तालाने वज्र लिहावे. मग बारा गुरू लिहून त्यांखाली निशशश शताता (ता) शशतासं लिहावे. किंवा बहा गुरू लिहून त्यांखाली निशशताताश ताशतासं लिहावे. हे संपिष्टक होय.

नंतर यथाक्षर उत्तर तालाने वेणी व त्यानेच प्रवेणी (ही अंगे) लिहावी. किंवा द्विकल उत्तर तालाने वेणी व प्रवेणी लिहावी. अथवा यथाक्षर व द्विकल चच्चत्पुटांनी वेणी व त्या दोन्हींनीच प्रवेणी लिहावी. किंवा यथाक्षर उत्तर तालाने वेणी व द्विकल उत्तर तालाने प्रवेणी लिहावी. ही वेणी व प्रवेणी अंगे होत. मग दुसऱ्या मतानुसार पूर्वी सांगितलेले उपवर्तन लिहावे. नंतर पादाच्या उत्तरार्धाच्या तालाने किंवा द्विकल उत्तर तालाने उपपात लिहावा. मग यथाक्षर उत्तर तालाने अंताहरण लिहावे. नंतर वैकल्पिक अंत सप्तांग ओवेणकात युग्म व अयुग्म असा दोन प्रकारचा व द्वादशांग ओवेणकात मिश्रासह पूर्वीच्या दोन्हींनी युक्त असा तीन प्रकारचा योजावा.

ओवेणक समाप्त.

सप्ताङ्गमवरं ज्ञेयं षोडशाङ्गं परं तथा ।
रोविन्दं तस्य षण्मात्रः पादोऽस्याद्ये कलाष्टके ॥ १६४ ॥
उपोहनं मद्रकस्थवस्तुवच्च तदर्धयोः ।
विविधैककसंयोगः प्रत्येकं पादवत्ततः ॥ १६५ ॥
प्रतिपादः पदैरन्यैः पादस्यान्ते कलाष्टके ।
प्रतिपादादिमे चैका गीतिः प्रस्तारसंज्ञका ॥ १६६ ॥
शरीरं प्रतिपादान्त्यकलाद्वादशकस्थया ।
गीत्या ततः परं गेयमुत्तरे द्विकले बुधैः ॥ १६७ ॥
प्लुताकाराश्चिचतुराः स्युः शरीरेऽन्तरान्तरा ।
तेषु वृत्तं तदूर्ध्वाधः स्वैरमङ्गानि योजयेत् ॥ १६८ ॥

सात अंगांचे रोविंदक निकृष्ट तसेच सोळा अंगांचे उत्कृष्ट असे जाणावे. त्याचा पाद सहा मात्रांचा असतो. या (पादाच्या) पहिल्या आठ कलांत (१६४) उपोहन (योजावे). त्या (पादाच्या) (पूर्वार्ध व उत्तरार्ध या) दोन्ही अर्धांत प्रत्येकी मद्रकातल्या वस्तूप्रमाणे विविध व एकक यांची योजना (करावी). मग पादाप्रमाणेच (१६५) (पण) वेगळ्या शब्दांनी प्रतिपाद (योजावा). पादाच्या शेवटच्या आठ कलांत व प्रतिपादाच्या पहिल्या आठ कलांत प्रस्तार नावाची गीति (योजावी). (१६६)

नंतर प्रतिपादाच्या शेवटच्या बारा कलांत असणाऱ्या गीतीने (म्हणजे धातूने) द्विकल उत्तर तालात ज्ञात्यांनी शरीर (हे अंग) गावे. (१६७)

(त्या) शरीरात मध्ये मध्ये प्लुत (या स्वरूपाचे) तीन किंवा चार आकार योजावे. त्यांत वृत्त (योजावे). त्या (वृत्ताच्या) वर, व खाली (म्हणजे पुढे व मागे) इच्छेनुसार (विविध इत्यादी) अंगे योजावी. (१६८)

क० आता रोविंदकाचे लक्षण देत आहे–

सात अंगांचे रोविंदक कमी अंगे असल्याने निकृष्ट होय. त्यांपेक्षाही कमी म्हणजे सहा इत्यादी अंगे असणारे योजू नये असा याचा अर्थ. सोळा अंगांचे रोविंदक अधिक अंगे असल्याने उत्कृष्ट होय. त्यांपेक्षाही अधिक अंगे असणारे म्हणजे सतरा इत्यादी अंगे असणारे योजावे (योजू नये ?) असा याचा अर्थ. सातांपासून सोळांपर्यंत अंगे स्वेच्छेनुसार योजावी. त्या रोविंदाचा पाद सहा मात्रांचा सांगितला आहे. यात मात्रेचे प्रमाण ' मद्रक इत्यादींत त्या चार पाद भागांनी मात्रा होते ' या पूर्वी सांगितलेल्या वचनानुसार सोळा कला या स्वरूपाचे जाणावे. या पादाच्या पहिल्या आठ कलांत उपोहन योजावे. त्या पादाच्या पूर्वार्धात उत्तरार्धात प्रत्येकी, मद्रकात असणाऱ्या वस्तूप्रमाणे, विविध व एकक योजावे. मद्रकात ज्याप्रमाणे पहिल्या दोन मात्रांत विविध व तिसऱ्या मात्रेत एकक योजलेले असते त्याप्रमाणे या रोविंदकाच्या पादातही प्रत्येकी तीन मात्रा या स्वरूपाचे दोन्ही अर्ध योजावे. मग पादानंतर पादाप्रमाणेच सहा मात्रांचा

शरीराद्यकलाषट्के प्रयोक्तव्यमुपोहनम् ।
विविधो वा प्रवृत्तं वा गीताङ्गं स्यादुपोहनम् ॥ १६९ ॥
अथोपवर्तनं केचिदपरान्तकवज्जगुः ।
शीर्षकं गीतकान्ते स्यात्पञ्चपाणौ यथाक्षरे ॥ १७० ॥
गीतावृत्त्या पदावृत्त्याप्युभयावृत्तितोऽथवा ।
आवृत्त्या द्विस्त्रिरथवा स्यादावृत्त्या विनाथवा ॥ १७१ ॥
आकारैः प्रथमावृत्तिः कर्तव्यं तत्र चैककम् ।
द्वितीया तु पदैर्युक्ता प्रवृत्तेन प्रकीर्तिता ॥ १७२ ॥

शरीराच्या पहिल्या सहा कलांत उपोहन योजावे. विविध किंवा प्रवृत्त (हे) गीताचे अंग (ज्यात योजले आहे असे) उपोहन असावे. (१६९)

नंतर काहींनी अपरान्तकाप्रमाणे (षट्पितापुत्रकतालात) उपवर्तन सांगितले आहे. गीतकाच्या (म्हणजे रोविंदकाच्या) शेवटी यथाक्षर पंचपाणि तालात (१७०) गीताच्या आवृत्तीने (अथवा) पदांच्या आवृत्तीने किंवा दोन्हींच्या आवृत्तीने शीर्षक योजावे. ती आवृत्ति दोन वेळा किंवा तीन वेळा असावी किंवा (दुसऱ्या पक्षी) आवृत्तीविना (ते योजावे). (१७१) पहिली आवृत्ति आकारांनी (योजावी) व तिच्यात एककच प्रयुक्त करावे. दुसरी आवृत्ति पदांनी (योजावी) व ती प्रवृत्ताने सांगितली आहे. (१७२)

प्रतिपाद पादात असणाऱ्या शब्दांपेक्षा वेगळ्या शब्दांनी योजावा. ' प्रतिपादादिमे च ' यातील चकाराने ' कलाष्टके ' हा शब्दही जोडून घ्यायचा. याचा अर्थ असा की प्रथम पादाच्या शेवटच्या आठ कलांत प्रस्तार नावाची गीति योजावी. मग प्रतिपादाच्या पहिल्या आठ कलांतही तीच गीति योजावी. प्रतिपादानंतर, त्या प्रतिपादाच्या शेवटच्या बारा कलांत योजलेल्या गीतीने युक्त असे शरीर नावाचे अंग ज्ञात्यांनी द्विकल उत्तर तालात गावे. प्रतिपादात योजलेल्या शेवटच्या धातूने युक्त असे शरीर गावे असा अर्थ. त्या शरीरात मध्ये मध्ये प्लुत असे आकार योजावे. प्लुताकार हा ' प्लुत असे आकार ' असा कर्मधारय समास होय. त्या आकारात पूर्वी लक्षण सांगितलेले वृत्त योजावे. त्या वृत्ताच्या नंतर व अगोदर विविध इत्यादी अंगे स्वेच्छेने योजावी. शरीराच्या पहिल्या सहा कलांत उपोहन योजावे. त्या उपोहनात पूर्वी लक्षण सांगितलेले विविध किंवा प्रवृत्त हे गीतांग योजावे. (१६४–१६९)

क० ' गीतकाच्या शेवटी ' यातील सामान्य स्वरूपाचा गीतक शब्द विशेष स्वरूप सांगणारा आहे असे जाणावे. गीतकाच्या म्हणजे रोविंदक या विशेष स्वरूपाच्या गीतकाच्या शेवटी (असा अर्थ घ्यायचा). यथाक्षर पंचपाणि तालात शीर्षक योजावे. ते शीर्षक गीताच्या आवृत्तीने किंवा पदांच्या आवृत्तीने अथवा गीत व पद या दोन्हींच्या आवृत्तीने योजलेले असे तीन प्रकारचे असते. आवृत्तियुक्त असता दोन वेळा योजलेली आवृत्ति व तीन वेळा योजलेली आवृत्ति यांनी होणारे असे ते दोन प्रकारचे असते. किंवा आवृत्तिरहित योजावे हा आणखी एक

त्रिरावृत्तौ मध्यमा स्यात्स्वैरं गीताङ्गसंगता ।
पादभागेष्वानिविप्रा विशेषस्तूच्यतेऽधुना ॥ १७३ ॥
तालोऽष्टमोऽन्तिमा शम्या तत्र मात्रासु पञ्चसु ।
चतुर्दशस्तु पञ्चम्यां तालोऽन्त्यान्त्येव मद्रके ॥ १७४ ॥
शरीरे प्राक्कलास्तिस्रः केऽप्याहुर्माषघातवत् ।

तिसऱ्या आवृत्तीत मध्यम स्थिति (म्हणजे गीति व पद यांनी मिश्रित स्वरूप) असते; (ही मिश्र अवस्था) स्वेच्छेनुसार (विविध इत्यादी) गीतांगांनी युक्त असते.

पादभागांत आनिविप्र (योजावेत). आता (त्यातील) विशेष सांगतो. (१७३) त्यामध्ये (पहिल्या) पाच मात्रांत आठवा ताल व शेवटची शम्या असते. पाचवीत चौदावा ताल असतो. शेवटची (म्हणजे सहावी मात्रा), (चतुष्कल) मद्रकातल्या शेवटच्या (मात्रे)प्रमाणे असते. (१७४).

काहींनी शरीरात पहिल्या तीन कला माषघाताप्रमाणे सांगितल्या आहेत. (१७५–)

पक्ष होय. पहिली म्हणजे गीताची आवृत्ति होय. तिच्यात एकक हेच योजावे. "एककं च" यातला चकार निश्चय या अर्थांचा आहे म्हणून " फक्त एकक हेच " असा असा अर्थ घ्यायचा. दुसरी म्हणजे पदांची योजलेली आवृत्ति होय. ती प्रवृत्त या गीताच्या अंगाने सांगितली आहे. तिसऱ्या आवृत्तीत योजलेली मध्यमा (म्हणजे) गीति व पद यांनी मिश्र असणारी अशी त्या दोन्हींची आवृत्ति स्वेच्छेनुसार विविध इत्यादी गीतांगांनी युक्त असते. (१७०–१७२, १७३–)

आता पातकलांची योजना दाखवीत आहे–

सर्व पादभागांत 'आनिविप्र' हे सामान्यपणे असून विशेष तेवढा आता सांगितला आहे. आठवा म्हणजे दुसऱ्या पादभागाच्या शेवटचा (गुरु) ताल याने योजावा. शेवटची म्हणजे चवथ्या पादभागाच्या अखेरची शम्या योजावी. येथे दिलेल्या ताल व शम्या यानुसार पुंलिंग व स्त्रीलिंग यांचा निर्देश जाणावा. ही विशेष योजना पहिल्या पाच मात्रांत प्रयुक्त करावी. पाचव्या मात्रेत आणखी एक विशेष योजायचा असतो. तो म्हणजे चवथ्या पादभागातील दुसरा ताल योजणे हा होय. शेवटची म्हणजे सहावी मात्रा; ती चतुष्कल मद्रकातील अन्त्य म्हणजे शेवटच्या मात्रेप्रमाणे योजावी. त्या मद्रकात वस्तूची तिसरी मात्रा अन्त्य म्हटली आहे, ती ज्या पातकलांनी युक्त असते त्यांनीच ही रोविंदकाची सहावी मात्रा योजावी असा अर्थ मद्रकातील अन्त्य मात्रेप्रमाणे या अतिदेशाचा होय. त्या कला आशविता, आताविश, आताविश, तानिविसं अशा होत. काही आचार्य द्विकल उत्तर तालाने युक्त असणाऱ्या शरीरातील पहिल्या तीन कला माषघाताप्रमाणे (सांगतात). म्हणजे माषघातात ज्या निशनि या पहिल्या तीन कला आहेत तशा येथेही सांगतात. शरीरात पहिल्या तीन कलांत निष्काम, शम्या, निष्काम योजावे असा याचा अर्थ. (१७३–१७४, १७५–)

अस्य प्रस्तारः – याचा प्रस्तार

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि ता ॥ इत्युपोहनम् ॥ हे उपोहन.
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि श ॥ इत्युपोहनेन सह मात्रा ॥ ही उपोहनासह मात्रा.
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि ता आ नि वि प्र आ नि वि श ॥ मात्रा १ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि ता आ नि वि प्र आ नि वि श ॥ मात्रा २ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि ता आ नि वि प्र आ नि वि श ॥ मात्रा ३ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि ता आ नि वि प्र आ नि वि श ॥ मात्रा ४ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ[४२] ऽ ऽ
आ नि वि प्र आ नि वि ता आ नि वि प्र आ नि (ता ?) वि श ॥ ५ ॥
ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ[४३] ऽ ऽ ऽ
आ श वि ता आ ता वि श आ ता वि श ता नि वि सं ॥ मात्रा ६ ॥

क० या रोविंदकाचा प्रस्तार असा–

प्रथम उपोहनात दोन पादभागांचे आठ गुरू लिहून त्यांखाली आनिविप्र व आनिविता लिहावे. हे उपोहन होय. मग शेवटच्या दोन पादभागांचे आठ गुरू लिहून त्याखाली आनिविप्र व आनिविश लिहावे. ही उपोहनासह पहिली मात्रा होय. त्याप्रमाणेच प्रत्येकी सोळा गुरूंच्या, चार पादभाग असणाऱ्या, पातकलांनी युक्त अशा पहिल्या मात्रेसह पाच मात्रा लिहाव्या. मग

---

४२. पाचव्या मात्रेच्या चवथ्या पादभागात 'आनिविश' अशी कलायोजना अडयार व आनंदाश्रम आवृत्तीत दिली आहे. पण रोविंदकाचे लक्षण देताना शाङ्गदेवाने सांगितलेला पाचव्या मात्रेतला आणखी विशेष म्हणजे चवदावा गुरु ताल याने योजावा हा असल्याने 'आनिविश' या ऐवजी 'आताविश' असणे योग्य ठरते. म्हणून 'नि' च्या पुढे कंसात 'ता' हा दुरुस्त पाठ सुचवला आहे.

४३. शेवटची सहावी मात्रा चतुष्कल मद्रकातील वस्तूच्या शेवटच्या म्हणजे तिसऱ्या मात्रेप्रमाणे दिली आहे. ही मद्रकातील वस्तूची तिसरी मात्रा आशविता, आताविश, आताविश तानिविसं या कलापातांनी युक्त असते. श्लोकाच्या स्पष्टीकरणात कल्लिनाथाने तसे दिलेही आहे. पण प्रस्तारात मात्र चवथा पादभाग 'आनिविसं' असा दिला आहे. 'आनिविसं' हा पाठ अडयार आवृत्तीत मिळतो. आनंदाश्रम आवृत्तीत तो 'तानिविसं' असा आहे. तोच पाठ बरोबर असल्याने येथे स्वीकारला आहे.

इति षण्मात्रः पादः । हा सहा मात्रांचा पाद होय.

एवमेव पदान्तरैः प्रतिपादः । असाच दुसऱ्या शब्दांनी योजलेला प्रतिपाद होय.

ततः शरीरम् ॥ नंतर शरीर (योजायचे).

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ

निप्र ताश निता निश ताप्र निसं ॥ शरीरस्याद्याः षट्कला उपोहनम् ॥

शरीराच्या पहिल्या सहा कला उपोहन होय.

ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ

निश निश निता निश ताप्र निसं ॥

इति माषघाताद्यकलात्रययुक्तं शरीरम् ॥

हे माषघाताच्या पहिल्या तीन कलांनी युक्त शरीर होय.

ऽ̀ । ऽऽ ऽऽ̀

संता शता शता ॥ इत्युपवर्तनम् । हे उपवर्तन होय.

ऽ̀ । ऽऽ ऽऽ̀

संता शता शता ॥ इति शीर्षकम् ॥ हे शीर्षक होय.

इति रोविन्दकम् ॥ रोविंदक समाप्त.

चतुष्कलोल्लोप्यकवदादौ मात्रोत्तरे भवेत् ॥ १७५ ॥

उत्तर (या गीतकात) प्रथम चतुष्कल उल्लोप्यकाप्रमाणे मात्रा (योजायची) असते. (१७५).

सहाव्या मात्रेत पूर्वीप्रमाणेच सोळा गुरू लिहून त्यांखाली आशविता, आताविश, पुन्हा आताविश व आनिविसं हे लिहावेत. ही सहावी मात्रा होय. हा मात्रांनी युक्त पाद होय. असाच प्रतिपाद होय. मग द्विकल उत्तर तालाने शीर्षक लिहावे. त्यात पहिल्या सहा कलांचे उपोहन योजावे. किंवा द्विकल उत्तर तालाने युक्त बारा गुरू लिहून त्यांखाली निशनिश नितानिश ताप्रनिसं हे लिहावेत. हे माषघाताच्या पहिल्या तीन कलांनी युक्त शरीर होय. नंतर यथाक्षर उत्तर तालात वैकल्पिक उपवर्तन लिहावे. मग त्याच तालात शीर्षक लिहावे.

रोविंदक समाप्त.

क० आता उत्तराचे लक्षण देत आहे––

उत्तर या गीतकात प्रथम चतुष्कल उल्लोप्यकाप्रमाणे मात्रा असते. म्हणजे चतुष्कल उल्लोप्यकात 'द्विकलात आठ कलांची मात्रा व त्याच्या दुप्पट चतुष्कलात' असे सांगून द्विकलाच्यापेक्षा दुप्पट म्हणजे सोळा कलांची मात्रा जशी म्हटली आहे, त्याचप्रमाणे या उत्तरातही त्या पातकलांनी युक्त सोळा कला असणारी मात्रा योजावी. सहा अंगांची शाखा निकृष्ट होय.

शाखावरा षडङ्गा स्याद् द्वादशाङ्गा परा ततः ।
द्विकले पञ्चपाणौ सा प्रतिशाखा च तत्समा ॥ १७६ ॥
किंतु बद्धा पदैरन्यैः शीर्षं मध्ये तयोर्भवेत् ।
मध्यान्तयोश्च वा भिन्नगीतेनैककलान्तरे ॥ १७७ ॥
ततोऽनन्तरमेकोऽन्तो यद्वान्तो नात्र विद्यते ।
आकारवर्जं शाखायां गीताङ्गानि शरीरवत् ॥ १७८ ॥

अस्य प्रस्तारो यथा — याचा प्रस्तार असा --

ऽ ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श	आ नि वि ता	आ श वि ता	आ नि वि सं ॥ मात्रा १ ॥

निकृष्ट (म्हणजे कमीत कमी अंगे असणारी) शाखा सहा अंगांची असून, उत्कृष्ट (म्हणजे जास्तीत जास्त अंग असणारी) बारा अंगांची असते. मग (म्हणजे मात्रेनंतर) ती (शाखा) द्विकल पंचपाणि तालात (गावी). प्रतिशाखा तिच्यासारखीच (होय). (१७६).

पण ती वेगळ्या शब्दांनी रचलेली असते. त्या दोन्हींच्या (म्हणजे शाखा व प्रतिशाखा यांच्या) मध्ये शीर्षक असते किंवा त्यांच्या मध्ये व शेवटी वेगळ्या गीताने युक्त असे ते असते. (हे शीर्षक) एककल उत्तर तालात (गावे). (१७७)

त्यानंतर (अंताच्या प्रकारांपैकी) एक अंत (योजायचा) असतो, किंवा या (उत्तरात) अंत असत नाही. शाखेत शरीराप्रमाणे (पण) आकाररहित गीतांगे योजावी. (१७८)

त्यापेक्षा कमी अंगे असणारी योजू नये. बारा अंगांची शाखा उत्कृष्ट होय. त्यांपेक्षा अधिक अंगे असणारी योजू नये असा अर्थ. सहांपासून ते बारांपर्यंत अंगे इच्छेनुसार योजावी. मात्रेच्यानंतर ती शाखा द्विकल पंचपाणि तालात गावी. त्या शाखेसारखीच प्रतिशाखा असते. पण फरक एवढाच की ती दुसऱ्या शब्दांनी रचलेली असते. हे पूर्वीच स्पष्ट करून सांगितले आहे. शाखा व प्रतिशाखा यांच्या मध्ये शीर्षक असते; किंवा मध्ये व शेवटी असते. दोन शीर्षके प्रयुक्त असणे यापक्षी मध्ये असणाऱ्या शीर्षकात जे गीत योजलेले असते त्यापेक्षा वेगळे गीत शेवटी असणाऱ्या शीर्षकात योजावे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ही दोन्ही शीर्षके वेगवेगळ्या धातूमध्ये योजायची असतात. दोन्ही शीर्षके एककल उत्तर तालात गावी. नंतर उल्लोप्यकात सांगितलेले, युग्म, अयुग्म, मिश्र, स्थित, प्रवृत्त व महाजनिक असे जे अंताचे प्रकार त्यांपैकी एक अंत स्वेच्छेने योजावा. दुसऱ्या मतानुसार या उत्तरात अंताची योजना करू नये. शाखेत सहापासून बारापर्यंत जी गीतांगे सांगितली आहेत ती शरीराप्रमाणे पण आकाररहित योजावी. शरीरात विविध इत्यादी गीतांगे आकारयुक्त प्रयुक्त केलेली असतात. येथे ती आकार सोडून, त्याप्रमाणे योजावी. (१७५–१७८)

क० या उत्तराचा प्रस्तार असा--

प्रथम, चार चार कलांचे पादभाग असणारे सोळा गुरु लिहून त्यांखाली चतुष्कल उल्लोप्य-

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि प्र ता श नि ता नि श ता प्र नि सं ॥ शाखा ॥
ऽ । ऽ ऽ । ऽ
सं ता श ता श ता । इति शीर्षकम् । हे शीर्षक होय.



ततः शाखेव प्रतिशाखा । मग शाखेप्रमाणे प्रतिशाखा (योजावी).
(शाखा व प्रतिशाखा यांमध्ये शीर्षक योजावे).

शाखा प्रतिशाखान्तरयोरपि (शाखा प्रतिशाखामध्यान्तयोरपि ?)
शीर्षकमित्यन्ये ।

शाखा व प्रतिशाखा यांच्यामध्ये व शेवटीही शीर्षक योजावे असे दुसरे (काही) म्हणतात.

ततः कोप्येकोऽन्तः, अन्तर्हितं वा ॥

नंतर कोणतातरी एक अंत योजावा किंवा तो नसावा.

इत्युत्तरम् । हे उत्तर होय.

द्वौ मार्गौ गीतकेषूक्तौ शङ्खश्छत्रकसंज्ञकौ ।
शङ्खमार्गोऽङ्गसंक्षेपश्छत्रकस्त्वङ्गविस्तरः ॥ १७९ ॥
विकल्पो बहुधा तेषु लयमार्गानुसारतः ।
इति सप्त गीतकानि ।
अन्ते गेयं गीतकानां छन्दकं तस्य च द्विधा ॥ १८० ॥

गीतकांत शंख व छत्रक असे दोन मार्ग सांगितले आहेत. अंगांचा संक्षेप (असणे) म्हणजे शंख मार्ग व अंगांचा विस्तार (असणे) म्हणजे छत्रक मार्ग होय. (१७९)
त्यांत लय व मार्ग यानुसार पुष्कळ प्रकारचा भेद (असतो) (१८०–)
सात गीतके समाप्त.

कातील मात्रेप्रमाणे आनिविश, आनिविता, आशविता व आनिविसं हे लिहावेत. ही मात्रा होय. मग द्विकल उत्तर तालाने शाखा लिहावी. ही शाखा होय. नंतर यथाक्षर उत्तर तालाने शीर्षक लिहावे. हे शीर्षक होय. मग शाखेप्रमाणे प्रतिशाखा लिहावी. नंतर वैकल्पिक शीर्षक पूर्वीप्रमाणे लिहावे. मग अंताच्या प्रकारांपैकी एक अंत लिहावा अथवा नसावा.

उत्तर समाप्त.

क० मद्रक इत्यादी जी सात गीतके सांगितली त्यांत शंख व छत्रक या नावांचे दोन मार्ग सांगितले आहेत. अंगांचा संकोच केल्यामुळे शंखासारखा असणारा शंख मार्ग होय; अंगांचा विस्तार केल्यामुळे छत्रासारखा असणारा छत्रक मार्ग होय, असे जाणावे. गीतकांत सांगितलेल्या अंगांचाच संक्षेप व विस्तार हे मातृपरतन्त्र (म्हणजे मूळावर अवलंबून असणारे) होत हे

शरीरं चतुरश्रं वा त्र्यश्रं वा चतुरश्रकम् ।
यैः कैश्चिदङ्गैर्नवभिश्चतुर्भिस्त्र्यश्रमुच्यते ॥ १८१ ॥
पादान्मुखं छन्दके स्यात्पादेन प्रतिवक्त्रकम् ।
मुखतालेन वा कार्यं गीतान्ते शीर्षकं भवेत् ॥ १८२ ॥

गीतकांच्या शेवटी छंदक गावे. त्याचे शरीर चतुरश्र अथवा त्र्यश्र (असे) दोन प्रकारचे (असते). चतुरश्र कोणत्याही नऊ अंगांनी व त्र्यश्र चार अंगांनी सांगितले आहे. (१८०, १८१). छंदकात पादाने (म्हणजे पादाच्या प्रमाणाने) मुख योजावे व पादाने प्रतिमुख (योजावे). किंवा ते मुखात योजलेल्या तालाने प्रयुक्त करावे. गीताच्या शेवटी शीर्षक असावे. (१८२)

दाखविण्यासाठी सांगत आहे की त्या अंगांत पूर्वी सांगितलेल्या लयींच्या व मार्गांच्यामुळे पुष्कळ प्रकारचा भेद (उत्पन्न) होतो.

ही सात गीतके होत. (१७९, १८०–)

क० आता गीतांत प्रथम निर्दिष्ट केलेल्या छंदकाचे लक्षण सांगत आहे– मद्रक इत्यादी गीतांपैकी एक गाऊन त्याच्या शेवटी छंदक गावे. यावरून त्याचा (म्हणजे छंदकाचा) स्वतंत्रपणे प्रयोग नसतो हे कळून येते. पण वेगळा निर्देश असल्याने वेगळा असा प्रयोगही जाणावा. छन्दकाचे शरीर चतुरश्र व त्र्यश्र असे दोन प्रकारचे सांगितले आहे. चार अंगांनी चतुरश्र व नऊ अंगांनी त्र्यश्र अशी क्रमाने योजना करावी. छंदक या गीतात ओवेणकात सांगितलेल्या पादाच्या प्रमाणाचे मुख नावाचे अंग योजावे व पादाच्या प्रमाणाचे प्रतिमुख नावाचे अंग योजावे. किंवा ते प्रतिमुख पादप्रमाणाने निर्दिष्ट केलेल्या मुखात जो ताल सांगितला आहे त्या तालाने योजावे असे एक मत (सांगितले आहे); त्यापेक्षा वेगळ्या तालाने योजावे असे विकल्पाने कळणारे दुसरे मत होय. छंदकाच्या शेवटी शीर्षक योजावे. (१८०, १८१–१८२).

---

४४. कल्लिनाथाने चतुरश्र शरीर चार अंगांनी व त्र्यश्र नऊ अंगांनी युक्त असते असे टीकेत म्हटले आहे. सुधाकर टीकेत चतुरश्र शरीर नऊ अंगांनी रचलेले व त्र्यश्र चार अंगांनी रचलेले असते असे म्हटले आहे. अभिनवगुप्ताच्या नाट्यशास्त्रावरील टीकेवरून त्र्यश्र शरीरात चार अंगे योजायची असल्याचे कळून येते. (पहा नाट्यशास्त्र, बडोदा आवृत्ति, भाग ४ पृष्ठ २६९). यावरून सुधाकर टीकेतील स्पष्टीकरणास पुष्टि मिळते.

४५. ' पादान्मुखं ' या ऐवजी आनंदाश्रम आवृत्तीत (पृ. ४१३) ' प्राग्वन्मुखं ' असा पाठ घेतलेला आहे. ' पादान्मुखं ' हा पाठ तळटीपेत दिला आहे. ' पादात् ओवेणकोक्तात् पादप्रमाणात् मुखं नामाङ्गं स्यात् ' असे जे स्पष्टीकरण कल्लिनाथाने दिले आहे त्यावरून ' पादान्मुखं' हा पाठ त्याच्या समोर असल्याचे कळून येते. सुधाकर टीकेत, ' छंदकात, पूर्वी सांगितलेल्या लक्षणाने लक्षित असे मुख योजावे ' असे म्हटले आहे. त्यावरून ' प्राग्वन्मुखं (पूर्वीप्रमाणे मुख) ' असा पाठ सिंहभूपालासमोर असावा असे वाटते.

अस्य प्रस्तारः —

ऽ ऽ । ऽ̀ ऽ । । ऽ

सं ता ता श ॥ इति चतुरश्रं शरीरम् ॥ अथवा – श ता श ता ॥ इति त्र्यश्रं शरीरम् । अस्य मुखं गीतकान्तरमुखवत् । प्रतिमुखं मुखवत् पादवद्वा । अन्ते शीर्षकं येन केनचिच्छीर्षकेण सदृशम् । इतरे मुखवत् प्रतिमुखम् ।

इति च्छन्दकम् ।

आसारितं चतुर्धा स्यात्कनिष्ठं च लयान्तरम् ।
मध्यमं ज्येष्ठमित्येषां लक्ष्माणि व्याहरामहे ॥ १८३ ॥
कनिष्ठासारिते युग्मः शम्यादिर्द्वावथोत्तरौ ।
एते यथाक्षरास्तेषां संनिपातो ऽन्तिमे ऽधिकः ॥ १८४ ॥

याचा प्रस्तार—

ऽ ऽ । ऽ̀ ऽ । । ऽ

सं ता ता श ॥ हे चतुरश्र शरीर अथवा – श ता श ता ॥ हे त्र्यश्र शरीर.

याचे मुख गीतकातल्या मुखाप्रमाणे (योजावे). प्रतिमुख, मुखाप्रमाणे किंवा पादाप्रमाणे (योजावे). शेवटी कोणत्यातरी शीर्षकासारखे शीर्षक (योजावे). दुसरे (आचार्य) मुखाप्रमाणे प्रतिमुख (मानतात). छंदक समाप्त.

कनिष्ठ, लयांतर, मध्यम व ज्येष्ठ असे चार प्रकारचे आसारित असते. यांची लक्षणे सांगतो. (१८३)

कनिष्ठ आसारितात शम्या इत्यादी (असलेला) युग्म व नंतर दोन उत्तर ताल (योजावे). हे (ताल) यथाक्षर (असावेत). त्यांच्या शेवटी संनिपात अधिक (योजावा). (१८४)

क० या छंदकाचा प्रस्तार असा– यथाक्षर चच्चत्पुट तालात चतुरश्र शरीर लिहावे. किंवा यथाक्षर चाचपुट तालात त्र्यश्र शरीर लिहावे. हे शरीर होय. मग पादाच्या प्रमाणाचे मुख लिहावे नंतर त्याच प्रमाणाचे प्रतिमुख लिहावे. ही मुख व प्रतिमुख अंगे होत. मग पूर्वी-प्रमाणेच यथाक्षर उत्तर तालात शीर्षक लिहावे. हे शीर्षक होय.

छंदक समाप्त

क० आता आसारिताचे लक्षण देण्यासाठी त्याचे भेद सांगत आहे. प्रथम कनिष्ठ आसारिताचे लक्षण देत आहे. युग्म म्हणजे चच्चत्पुट होय. तो शताशता अशा पातांनी योजावा. कारण "आसारित इत्यादींत शम्या आरंभी असलेला" असा नियम सांगितला आहे. नंतर दोन उत्तर म्हणजे षट्पितापुत्रक योजावे. हे तीन ताल यथाक्षर योजायचे असतात. त्या तिन्हींच्या शेवटचा प्लुत संनिपातयुक्त असा अधिक योजावा. अर्थ असा की तिन्हींच्या शेवटी एक प्लुत अधिक योजून तो प्लुत संनिपाताने प्रयुक्त करावा. (१८३-१८४).

अस्य प्रस्तारः —

ऽ ऽ । ऽ̀ ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀ ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀ ऽ̀

श ता श ता सं ता श ता श ता सं ता श ता श ता सं ॥

इति कनिष्ठासारितम् ।

तद्ह्लयान्तरं मार्गलयाभ्यां द्विगुणं ततः ।

वर्धमानाङ्गमित्यन्ये;

अस्य प्रस्तारः कनिष्ठासारितेन व्याख्यात एव ।

इति लयान्तरासारितम् ।

मध्यमासारिते पुनः ॥ १८५ ॥

उत्तरा द्विकला ज्ञेयास्त्रयस्तेष्वादिमे कलाः ।

याचा प्रस्तार—

ऽ ऽ । ऽ̀ ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀ ऽ̀ । ऽ ऽ । ऽ̀ ऽ̀

श ता श ता सं ता श ता श ता सं ता श ता श ता सं ॥

हे कनिष्ठ आसारित होय.

त्याप्रमाणेच मार्ग व लय यांच्या दुप्पटीने नंतर लयांतर (आसारित) होय. दुसरे (आचार्य) वर्धमानांग असे (त्याचे नाव सांगतात). (१८५-)

याचा प्रस्तार कनिष्ठासारिताच्या (प्रस्ताराने) सांगितलाच आहे.

हे लयांतर आसारित होय.

मध्यम आसारितात पुनः (१८५) तीन द्विकल उत्तर ताल जाणावे. त्यांतील पहिल्यात पहिल्या तीन कला सोडाव्या (१८६-)

या कनिष्ठासारिताचा प्रस्तार असा–

यथाक्षर चच्चत्पुट, दोन यथाक्षर षट्पितापुत्रक व एक अधिक प्लुत असे मिळून लिहून त्यांखाली शताशता, संताशताशता, संताशताशता सं हे लिहावेत.

कनिष्ठ आसारित समाप्त.

आता लयांतर आसारिताचे लक्षण देत आहे– त्याप्रमाणेच म्हणजे कनिष्ठ आसारिताप्रमाणेच (पण) कनिष्ठासारितात योजलेल्या मार्ग व लय यांच्या दुप्पटीने लयांतर आसारित होते. दुसरे आचार्य वर्धमानांग हे या लयांतर आसारिताचे दुसरे नाव सांगतात. कनिष्ठ आसारितापेक्षा याची अंगे वाढत असल्याने यास वर्धमानांग (वाढणारी अंगे ज्याची आहेत ते) असे म्हटले आहे. (१८५-)

या लयांतर आसारिताचा प्रस्तार कनिष्ठासारिताप्रमाणेच योजावा.

क० आता मध्यम आसारिताचे लक्षण देत आहे– उत्तर म्हणजे षट्पितापुत्रक होय. त्या तीन उत्तर तालांतील पहिल्या उत्तर तालात आरंभीच्या तीन कला सोडाव्या. म्हणजे षट्पिता-

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
934
2
मंत्रालय.

आद्यास्तिस्रस्त्यजेत्;

अस्य प्रस्तारः[४६] —

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

श नि ता नि श ता प्र नि सं। नि प्र ता सं नि श ता प्र नि सं॥

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

नि प्र ता श नि ता नि श ता प्र नि सं॥

इति मध्यमासारितम्।

ज्येष्ठासारिते तूत्तरास्त्रयः॥ १८६॥

चतुष्कलाः स्युस्तेष्वाद्ये त्यजेत्सप्तादिमाः कलाः।

याचा प्रस्तार–

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

श नि ता नि श ता प्र नि सं। नि प्र ता श नि ता नि श ता प्र नि सं।

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

नि प्र ता श नि ता नि श ता प्र नि सं॥

हे मध्यम आसारित होय.

आणि ज्येष्ठ आसारितात तीन उत्तर ताल (१८६) चतुष्कल (योजायचे) असतात. त्यातील पहिल्यात आरंभीच्या सात कला सोडाव्या. (१८७–)

पुत्रकात सांगितलेल्या कलांपैकी आरंभीच्या तीन सोडाव्या. अर्थात निप्रता या तीन कला सोडून बाकीच्या योजाव्या. (१८५,१८६–) मध्यम आसारिताचा प्रस्तार असा– आरंभी दुसऱ्या पादभागातील शेवटचा गुरु लिहून मग द्विकल चार पादभागांत आठ गुरू लिहावेत. अशा रीतीने नऊ गुरूंच्या खाली क्रमाने शनिता निशता प्रनिसं हे लिहावेत. असा हा द्विकल पहिला षट्पितापुत्रक होय. नंतर द्विकल दोन षट्पितापुत्रक संपूर्णपणे लिहावेत.

आता ज्येष्ठ आसारिताचे लक्षण देत आहे–

यात तीन चतुष्कल उत्तर ताल योजायचे असतात. त्यांतील पहिल्या षट्पितापुत्रकात, चतुष्कल षट्पितापुत्रकात ज्या कला सांगितल्या आहेत त्यांतल्या आरंभीच्या सात म्हणजे आनिविप्र, आतावि या सोडून, शम्यापासून पुढील कला योजाव्या. (१८६,१८७–)

---

४६. मध्यम आसारित व ज्येष्ठ आसारित यांच्या प्रस्तारांत मूळ ग्रंथामध्ये पातयोजना बरोबर मिळत नाही. म्हणून भाषांतर देताना, कल्लिनाथाच्या टीकेप्रमाणे ही पातयोजना बरोबर लिहून दाखविली आहे.

अस्य प्रस्तारः —

ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ
आनिविप्र आताविश आनिविता आनिविश आताविप्र आनिविसं ॥

इदमन्त्यखण्डं ज्ञेयम् ॥

ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ
आनिविप्र आताविश आनिविता आनिविश आताविप्र आनिविसं
ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ
आनिविसं आनिविश आताविप्र आनिविसं ॥

इति ज्येष्ठासारितम् ।

एतेषां पञ्च षट् सप्ताष्टौ कलाः स्युः क्रमेण तु ॥ १८७ ॥

याचा प्रस्तार–

ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ
आ नि वि प्र आ ता वि श आ नि वि ता आ नि वि श आ ता वि प्र आ नि वि सं॥

हे शेवटचे खंड जाणावे (म्हणजे हा तिसरा चतुष्कल उत्तर होय.)

ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ
आ नि वि प्र आ ता वि श आ नि वि ता आ नि वि श आ ता वि प्र आ नि वि सं॥

(हा दुसरा चतुष्कल उत्तर ताल होय.)

ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽ
श आ नि वि ता आ नि वि श आ ता वि प्र आ नि वि सं ॥

(हा पहिला म्हणजे आरंभीचा चतुष्कल उत्तरताल होय.)

हे ज्येष्ठ आसारित होय.

यांची क्रमाने पाच, सहा, सात व आठ कला (असणारी) (१८७) उपोहने (होत).

या ज्येष्ठ आसारिताचा प्रस्तार असा–

प्रथम दुसऱ्या पादभागातील शेवटचा एक गुरु लिहावा. मग चतुष्कल चार पादभागांत सोळा गुरू लिहावेत. अशा रीतीने सतरा गुरूंच्या खाली (क्रमाने) श आनिविता आनिविश आताविप्र आनिविसं हे लिहावेत. हा चतुष्कल पहिला षट्पितापुत्रक होय. नंतर चतुष्कल दोन षट्पितापुत्रक संपूर्ण लिहावेत.

हे ज्येष्ठ आसारित होय.

क० या कनिष्ठ इत्यादी चार आसारितांची उपोहने क्रमाने पाच, सहा, सात व आठ कलांची असावी. कनिष्ठ आसारितात पाच कलांचे उपोहन, लयांतर आसारितात सहा कलांचे उपोहन, मध्यम आसारितात सात कलांचे उपोहन व ज्येष्ठ आसारितात आठ कलांचे उपोहन असा हा क्रम जाणावा.

उपोहनानि वस्तूनि त्रीणि त्रीणि च निर्दिशेत् ।
संनिपातसमाप्तीनि तेषामुखमुपोहनम् ॥ १८८ ॥
युग्मतालः प्रतिमुखं कनिष्ठे च लयान्तरे ।
मध्यमेऽष्टौ कलास्त्वाद्या ज्येष्ठे षोडश कीर्तिताः ॥ १८९ ॥
त्र्यश्रौ शरीरसंहारौ क्रमात्सर्वेषु कीर्तितौ ।
पादभागा विहायाद्यां शम्यामङ्गुलिकर्मणि ॥ १९० ॥
विभक्ताङ्गेषु तेषु स्युरविभागे यथास्थितम् ।

(त्यांत) तीन तीन वस्तू निर्दिष्ट कराव्या. (त्या) संनिपाताने शेवट होणाऱ्या (असाव्या). त्यांचे (म्हणजे त्या आसारितांच्या नंतर) उपोहन मुख हे अंग होय. कनिष्ठ व लयान्तर यांत (१८८) युग्मतालयुक्त प्रतिमुख (असते). मध्यम (आसारितात) पहिल्या आठ कला (प्रतिमुख होत). ज्येष्ठ (आसारितात) पहिल्या सोळा कला प्रतिमुख म्हणून सांगितल्या आहेत. (१८९)

त्र्यश्र (तालयुक्त) शरीर व संहरण (ही अंगे) क्रमाने सर्व (आसारितांत) सांगितली आहेत. विभक्त अंगे असणाऱ्या (त्या आसारितांत), पहिली शम्या सोडून, (पुढील) पादभाग बोटांचा वापर करून योजावेत. अंगांचा विभाग नसता जसे पूर्वी (सांगितले) आहे त्याप्रमाणे (बोटांचा वापर करावा). (१९०, १९१–)

प्रत्येक आसारिताच्या प्रकारात तीन तीन वस्तू निर्दिष्ट कराव्या. याचे स्पष्टीकरण असे– कनिष्ठ आसारितात चच्चत्पुट तालात पहिली वस्तु व दुसरी आणि तिसरी वस्तु दोन उत्तर तालांत; लयांतर आसारितात याच प्रमाणे; मध्यम आसारितात (पहिल्या) तीन कला सोडून द्विकल उत्तर तालात पहिली वस्तु व दुसरी आणि तिसरी वस्तु संपूर्ण अशा दोन द्विकल उत्तर तालांत; ज्येष्ठ आसारितात (पहिल्या) सात कला सोडून चतुष्कल उत्तर तालात पहिली वस्तु व दुसरी आणि तिसरी वस्तु संपूर्ण अशा दोन चतुष्कल उत्तर तालांत. या वस्तूंचा शेवट संनिपाताने करावा. त्यांतील मध्यम व ज्येष्ठ आसारितांत द्विकल व चतुष्कल उत्तर तालांच्या प्रमाणाच्या वस्तू असल्याने संनिपाताने शेवट प्राप्त होतोच. कनिष्ठ व लयांतर या आसारितांत, ती आसारिते यथाक्षर उत्तर तालाने युक्त असल्याने, शेवटी संनिपात जरी मिळत नसला, तरी "शेवटी संनिपात अधिक (योजावा)" याने तो प्राप्त होतो. म्हणून येथे 'संनिपाताने शेवट होणाऱ्या" असे पुन्हा म्हटले आहे असे मानावे. त्या आसारितांच्या नंतर मुख नावाचे अंग उपोहन असते. कनिष्ठ व लयांतर या आसारितांत युग्मताल म्हणजे चच्चत्पुट (या तालाने युक्त) प्रतिमुख नावाचे अंग असते. मध्यम आसारितात पहिल्या आठ कला प्रतिमुख हे अंग (होत). ज्येष्ठ आसारितात सोळा कला प्रतिमुख अंग म्हणून सांगितल्या आहेत. सर्व आसारितांत क्रमाने शरीर व संहरण ही अंगे त्र्यश्र म्हणजे चाचपुट तालाने युक्त अशी सांगितली आहेत. हा क्रम पहिल्या चाचपुटाने शरीर व दुसऱ्या चाचपुटाने संहरण असा जाणावा. ही आसारिते विभक्त (म्हणजे वेगवेगळी) अंगे असणारी व अविभक्त (म्हणजे मिश्र) अंगे असणारी अशी दोन प्रकारची असतात. विभक्त

उपोहनानां गुरुणी द्वे द्वे आद्यन्तयोर्मते ॥ १९१ ॥
अष्टौ द्वादश मध्ये लाः क्रमात् षोडश विंशतिः ।
एतेषु स्याद् ध्रुवः पातः कलयोरन्त्ययोर्गुरुः ॥ १९२ ॥
एकैकमक्षरं शेषाश्चतुर्मात्रगणाः कलाः ।
चतुर्मात्राक्षरगणा [४७]सर्वाप्यासारिते कला ॥ १९३ ॥
संनिपातस्त्वर्धगणोऽवसाने ऽन्यैरयं पुनः ।
विभक्ताङ्गमध्यवर्ती गणेनार्धेन वा मतः ॥ १९४ ॥

उपोहनांच्या मध्ये, शेवटी व आरंभी दोन दोन गुरू मानले आहेत. (१९१)

(तसेच) मध्ये आठ, बारा, सोळा व वीस असे लघू क्रमाने (मानले आहेत.) या (उपोहनांत) ध्रुव हा पात असावा. (आणि) शेवटच्या दोन कलांत एकेक गुरु अक्षर योजावे; बाकीच्या कला चार मात्रांचे गण असणाऱ्या अशा योजाव्या. आसारितात सर्वही कला चार मात्रांचे अक्षरगण असणारी (योजावी.) (१९२, १९३)

शेवटी संनिपात मात्र अर्ध्या गणाचा (योजावा). किंवा दुसऱ्या (आचार्यांनी) पुन्हा हा (संनिपात) विभक्त अंगे असणाऱ्या (वस्तूत) अर्ध्या गणाने मध्यवर्ती (प्रयुक्त करावा) असे मानले आहे. (१९४)

अंगे असणाऱ्या आसारितांत ज्या पादभागात पहिली शम्या असते त्यात तो सर्व हाताने प्रयुक्त-करून इतर कलांच्या बाबतीत पूर्वी सांगितलेला बोटांच्या वापराचा नियम पाळावा. अविभक्त अंगे असता सामान्यपणे पूर्वी सांगितलेल्या नियमांचे पालन करावे. (१८७–१९०, १९१–)

क० आता उपोहनांतील गुरु व लघु अक्षरांच्या संख्येसंबंधी नियम सांगत आहे–

कनिष्ठ आसारिताच्या उपोहनात आरंभी दोन गुरू अक्षरे शेवटी दोन गुरू अक्षरे व मध्ये आठ लघू अक्षरे (योजायची असतात); लयांतर आसारिताच्या उपोहनात आरंभी व शेवटी पूर्वीच्याप्रमाणेच (दोन दोन गुरू) व मध्ये बारा लघू अक्षरे (योजायची असतात); मध्यम आसारिताच्या उपोहनात आरंभी व शेवटी पूर्वीप्रमाणेच (दोन दोन गुरू) व मध्ये सोळा लघू अक्षरे (योजायची असतात) आणि ज्येष्ठ आसारितात आरंभी व शेवटी पूर्वीप्रमाणेच (दोन दोन गुरू) व मध्ये वीस लघू अक्षरे योजायची असतात, असा हा क्रम जाणावा. या उपोहनांत ध्रुव पात योजावा. शेवटच्या दोन कलांत एकेक गुरू अक्षर योजावे. बाकीच्या कला चार मात्रांच्या गणांच्या योजाव्या. याचाच तपशील सांगत आहे–

सुधाकर टीका—

४७. " सर्वही आसारितात, चार मात्रांचे गण असणाऱ्या कला (योजाव्या). त्यात सर्वगणांनी संनिपात (योजावा). दुसऱ्या (आचार्यांनी) विभक्त अंगांच्या आसारितात मध्यवर्ती अर्ध्या गणाने संनिपात सांगितला आहे. " या स्पष्टीकरणावरून या टीकाकारासमोर वेगळा पाठ असावा, असे वाटते. कारण सर्व हे विशेषण ' कला ' या शब्दाचे न घेता ते ' आसारित ' या शब्दाचे घेतले आहे.

आसारितान्याहुरन्ये हीनान्यङ्गैरुपोहनैः ।
यथाक्षरं द्विसंख्यातं त्रिसंख्यातमिति त्रिधा ॥ १९५ ॥
सर्वमासारितं तत्रावृत्तिहीनं यथाक्षरम् ।
द्विसंख्यातं त्रिसंख्यातं द्वित्रिरुच्चारणे क्रमात् ॥ १९६ ॥
आवृत्तिद्वयमत्राद्यादर्धार्धलयमिष्यते ।
यथाक्षरं सर्वमार्गे वृत्तिदक्षिणयोः परम् ॥ १९७ ॥
दक्षिणे स्यात् त्रिसंख्यातं कनिष्ठं वृत्तिचित्रयोः ।
लयान्तरे स्वतन्त्रे स्यादपरे त्वपरं जगुः ॥ १९८ ॥
ध्रुवासारितमावृत्तिविधुरं ध्रुवमार्गतः ।
त्रयोदशविधमासारितम् ।

दुसरे (आचार्य) उपोहने व अंगे यांनी रहित अशी आसारिते सांगतात. सर्व (तऱ्हेचे) आसारित, यथाक्षर, द्विसंख्यात व त्रिसंख्यात असे तीन प्रकारचे (असते). त्यातले आवृत्ति नसणारे (ते) यक्षाक्षर होय. दोन वेळा व तीन वेळा म्हणण्याने क्रमाने द्विसंख्यात व त्रिसंख्यात (हे प्रकार होतात) (१९५, १९६).

यात दोन वेळा आवृत्ति (म्हणजे दुसरे व तिसरे आवर्तन) (क्रमाने) पहिल्याच्या अर्ध्या लयीने व त्याच्या अर्ध्या लयीने मानली आहे. यथाक्षर हे सर्व मार्गांत, नंतरचे (म्हणजे द्विसंख्यात) हे वृत्ति आणि दक्षिण या मार्गांत (योजावे) (१९७) व त्रिसंख्यात हे दक्षिण मार्गात (योजावे). कनिष्ठ (आसारित) वृत्ति व चित्र मार्गांत आणि लयांतर स्वतंत्र अशा मार्गात (म्हणजे मार्गविषयक नियम नाही अशा प्रकारे) योजावे. दुसऱ्या (आचार्यांनी) ध्रुवमार्गानुसार आवृत्ति नसणारे असे दुसरे ध्रुवासारित सांगितले आहे. (१९८, १९९–)

तेरा प्रकारचे आसारित समाप्त.

अक्षरांचा गण तो अक्षरगण होय. चार मात्रा असणारा तो चतुर्मात्र होय. आसारितात सर्व कला चार मात्रांचे अक्षरगण असणारी योजावी असे सामान्यपणे सांगितले आहे. वस्तूच्या शेवटी अर्ध्यागिणाच्या प्रमाणाचा संनिपात योजावा. विभक्त अंगे असणाऱ्या वस्तूत हा संनिपात अर्ध्या गणाने मध्यवर्ती प्रयुक्त करावा असा विकल्प दुसऱ्या आचार्यांनी मानला आहे. (१९१–१९४)

क० यथाक्षर आवृत्तिहीन म्हणजेच एकवार योजलेले असते. संख्यात आसारितात आवृत्तिद्वय म्हणजे दुसरे व तिसरे अर्धार्धलयीत मानले आहे. याचा अर्थ असा की पहिल्या आवृत्तीत विलंबित लय, दुसऱ्या आवृत्तीत त्याच्या अर्धी म्हणजे मध्यलय व तिसऱ्या आवृत्तीत त्याच्या अर्धी म्हणजे द्रुत लय योजावी. यथाक्षर आसारित सर्व मार्गांत म्हणजे ध्रुव इत्यादी चारी मार्गांत योजावे. नंतर द्विसंख्यात वृत्ति व दक्षिण मार्गांत योजावे. त्रिसंख्यात दक्षिण मार्गात

कण्डिकावर्धमानं चासारिताभासमित्यपि ॥ १९९ ॥
वर्धमानासारितं तु वर्धमानमिति त्रिधा ।
कण्डिकाभिश्चतसृभिः कण्डिकावर्धमानकम् ॥ २०० ॥
विशालाद्या संगता च सुनन्दा सुमुखी तथा ।
चतस्रः कण्डिकास्तासां नवाष्टौ षोडश क्रमात् ॥ २०१ ॥
द्वात्रिंशच्च कला ज्ञेयाश्चतुरासारितस्थवत् ।
क्रमादुपोहनान्यासां झण्टुमित्यादिमौ गुरू ॥ २०२ ॥
वा इत्यन्ते मुखानां स्याद्विशालायां तु मध्यमाः ।
लाश्चतुर्दश चत्वारश्चत्वारोऽन्येषु तेऽधिकाः ॥ २०३ ॥

कण्डिकावर्धमान व आसारिताभास आणि (१९९) वर्धमानासारित असें वर्धमान तीन प्रकारचे (असते). चार कण्डिकांनी कण्डिकावर्धमान (होते). (२००) पहिली विशाला व (मग) संगता, सुनंदा तशीच सुमुखी अशा त्या चार कण्डिका होत. त्यांच्या, क्रमाने नऊ, आठ, सोळा (२०१) व बत्तीस कला जाणाव्या. यांची उपोहने क्रमाने चार आसारितांत असलेल्या (उपोहना–) प्रमाणे (असतात). (मुखांच्या म्हणजे उपोहनांच्या बाबतीत) ' झण्टुम् ' ही पहिली दोन अक्षरे गुरू (योजावी). (२०२)

' वा ' हा एक गुरु शेवटी (योजावा). (अशी ही) मुखांच्या बाबतीत (पहिल्या व शेवटच्या वर्णाविषयी व्यवस्था असते). विशाला या कण्डिकेत मध्ये चौदा लघू व बाकीच्यांत (यांपेक्षा) ते चार चार (लघू) अधिक (योजावे). (२०३)

प्रयुक्त करावे. कनिष्ठ आसारित वृत्ति व चित्र मार्गांत योजावे. लयांतर, स्वतंत्र मार्गात म्हणजे नियमरहित अशा ध्रुव इत्यादी मार्गाचे मिश्र स्वरूप योजून प्रयुक्त करावे. दुसऱ्या आचार्यांनी ध्रुवासारित हे आवृत्ति नसणारे दुसरे एक आसारित सांगितले आहे. ' आवृत्तिरहित ' हे ध्रुवासारिताचे लक्षण जाणावे. ते (ध्रुवमार्गानुसार योजायचे असते). कनिष्ठ आसारित, लयांतर आसारित, मध्यम आसारित व ज्येष्ठ आसारित ही चारी आसारिते प्रत्येकी यथाक्षर, द्विसंख्यात व त्रिसंख्यात हे तीन भेद असल्याने एकूण बारा प्रकारची होतात. दुसऱ्या मतानुसार सांगितले गेलेले ध्रुवासारित धरून सर्व मिळून तेरा प्रकारचे आसारित होते. (१९५-१९८, १९९–)

आसारिताचे लक्षण समाप्त.

क० कण्डिकावर्धमानाचे लक्षण सांगत आहे. विशाला इत्यादी चार कण्डिकांतील कलांची संख्या नियमाने क्रमपूर्वक अशी दिली आहे– विशालामध्ये नऊ कला, संगतात आठ कला, सुनंदात सोळा कला व सुमुखी या कण्डिकेत बत्तीस कला. चार आसारितांत असणाऱ्या उपोहनांप्रमाणे त्यांची उपोहने होत. अर्थात विशालामध्ये पाच कलांचे उपोहन, संगतात सहा कलांचे, सुनंदात सात कलांचे आणि सुमुखीत आठ कलांचे अशी क्रमाने उपोहने जाणावी. त्यांची अक्षरे व अक्षरसंख्या देत आहे– उपोहनांच्या आरंभी ' झण्टुम् ' ही दोन अक्षरे गुरू योजावी व

एष्वक्षराणि नियतान्यब्रूत श्रेयसे विधिः ।
भगवान् भरतस्त्वाह तानि व्यक्तानि तद्यथा ॥ २०४ ॥
" तान्यक्षराणि वक्ष्ये यानि पुरा ब्रह्मगीतानि ॥
झण्टुं झण्टुं दिगिदिगिदिगिदिगिदिगिदिगि कुचझलझण्टुमिति ।
एतद्बाले ज्ञेयं तितिझलवृद्धं लयान्तरे गदितम् ॥
कुचझलसहितं मध्ये तितिकुचयुक्तं भवेज्ज्येष्ठे । " इति ॥
मध्यमासारितादिस्थवस्तुवत्ताल इष्यते ।
विशालायां संगतायां द्विकलो युग्मसंज्ञकः ॥ २०५ ॥

या (उपोहनांत) ब्रह्मदेवाने कल्याणासाठी ठराविक अक्षरे सांगितली आहेत. ती भगवान् भरतमुनींनी स्पष्ट अशी सांगितली आहेत. ती अशी– (२०४)

" जी पूर्वी ब्रह्मदेवाने गायिली ती अक्षरे सांगतो.

' झण्टुं झण्टुं दिगिदिगिदिगिदिगिदिगि कुचझल झण्टुं ' अशी (ती अक्षरे होत.) हे बाल (म्हणजे कनिष्ठ) आसारितात जाणावे. लयांतर आसारितात तितिझल (या अक्षरांची) वाढ असलेले सांगितले आहे. मध्यम आसारितात (आणखी) कुचझल यांनी युक्त व ज्येष्ठ आसारितात (आणखी) तितिकुच यांनी युक्त असे (हे अक्षरांचे स्वरूप) होय. "

मध्यम आसारितातील आरंभीच्या वस्तूप्रमाणे विशाला (या कण्डिकेत) ताल मानला आहे. संगतेमध्ये द्विकल युग्म नावाचा होय. (२०५)

' वा ' हे एक गुरु अक्षर शेवटी योजावे. असा हा मुख नावाच्या उपोहनांतील आरंभीच्या व शेवटच्या अक्षरांविषयीचा नियम होय. प्रत्येकातील मधल्या अक्षरांची संख्या सांगत आहे. विशाला या कण्डिकेत उपोहनामध्ये मधली अक्षरे चौदा लघू व संगता इत्यादींच्या उपोहनांत चारचार लघू अक्षरे अधिक योजावी. (म्हणजे संगता या कण्डिकेच्या उपोहनात मध्ये अठरा लघू, सुनंदा या कण्डिकेच्या उपोहनात मध्ये बावीस व सुमुखी हिच्या उपोहनात मध्ये सव्वीस लघू योजावे.) या उपोहनांत ब्रह्मदेवाने अभ्युदयासाठी ठराविक अक्षरे सांगितली आहेत. ती भरतमुनींच्या सांगण्यावरूनच स्पष्ट होत. तेच देण्यासाठी सांगत आहे. (१९९–२०४)

क० ती अक्षरे अशी– ' झण्टुं झण्टुं दिगिदिगिदिगिदिगिदिगि कुचझलवा ' ही अक्षरे विशालाकण्डिकेच्या उपोहनात व कनिष्ठ आसारिताच्या उपोहनात (जाणावी). हे बाल म्हणजे कनिष्ठ आसारितात जाणावे. ' झण्टुं झण्टुं दिगिदिगिदिगिदिगिदिगि कुचझलतितिझलवा ' ही अक्षरे संगता–उपोहनात आणावी. ' झण्टुं झण्टुं दिगिदिगिदिगिदिगिदिगि कुचझलतितिझल-कुचझलवा ' ही अक्षरे सुनंदा–उपोहनात आणावी, ' झण्टुं झण्टुं दिगिदिगिदिगिदिगिदिगि कुचझल तितिझलकुचझलतितिकुचवा ' ही अक्षरे सुमुखीच्या उपोहनात व ज्येष्ठ आसारिताच्या उपोहनात जाणावी– असा भरताच्या म्हणण्याचा अर्थ होय.

चतुष्कलः सुनन्दायां सुमुख्यां स द्विरुच्यते ।
शम्यातालं द्विरन्ते च संनिपात उपोहने ॥ २०६ ॥
आद्याया द्विकलश्चाचपुटेऽन्यस्या उपोहने ।
उद्घट्टादिः सुनन्दायां भवेद्युग्मो यथाक्षरः ॥ २०७ ॥
स एव तालो द्विकलः सुमुख्याः स्यादुपोहने ।
कण्डिकानां वदन्तीत्थं [४८]परिवर्तान्दशापरे ॥ २०८ ॥

सुनंदा (या कण्डिकेत) चतुष्कल (युग्म) व सुमुखीत तो (चतुष्कल युग्म) दोन वेळा सांगितला आहे. पहिल्या (म्हणजे विशाला या) कण्डिकेच्या उपोहनात दोन वेळा शम्या व ताल आणि शेवटी संनिपात, (तसेच) दुसरीच्या (म्हणजे संगता या कण्डिकेच्या) उपोहनात द्विकल चाचपुट (योजावा). सुनंदा या (कण्डिकेच्या) उपोहनात, उद्घट्ट आरंभी व मग यथाक्षर युग्म होय. (२०६, २०७).

सुमुखीच्या उपोहनात तोच ताल द्विकल योजावा.

दुसरे (आचार्य) कण्डिकांचे दहा परिवर्त असे सांगतात– (२०८)

विशाला इत्यादींतील तालांची योजना देत आहे–

विशाला या कण्डिकेत, मध्यम आसारिताच्या आरंभी जी नऊ कला असणारी वस्तु असते तिचा ताल योजावा; संगतामध्ये द्विकल युग्म म्हणजे चच्चत्पुट योजावा; सुनंदामध्ये चतुष्कल युग्म योजावा; सुमुखीत चतुष्कल चच्चत्पुट दोनदा सांगितला आहे.

आता उपोहनातील तालयोजना देत आहे–

विशाला–उपोहनातील पाच कलांत शताशता योजून शेवटी पाचव्या कलेत संनिपात योजावा, ' शम्यातालं ' यात शम्या व ताल असा द्वन्द्व समास आहे व तो समाहार या अर्थी असलेमुळे एकवचनी नपुंसकलिंगी योजला आहे. दुसऱ्या म्हणजे संगतेच्या उपोहनातील सहा कलांत द्विकल चाचपुट योजावा. सुनंदेच्या उपोहनातील सात कलांत आरंभी उद्घट्ट व मग

---

४८. कंडिकांचे दहा परिवर्त पुढीलप्रमाणे होत– (पहा–नाटचशास्त्र (बडोदा) भाग ४, पृ. २१९–२२२) आरंभी, पाच कलांच्या उपोहनाने युक्त असणारी नऊ कलांची विशाला योजल्याने एक परिवर्त होते. यात नऊ कलांमुळे कनिष्ठासारिताचे स्वरूप होते. मग सहा कलांच्या उपोहनाने युक्त असणारी आठ कलांची संगता प्रथम योजून नंतर विशाला योजल्याने सतरा कला असणारे लयांतर आसारिताचे स्वरूप होते. यात दोन परिवर्त योजले आहेत. नंतर सातकलांचे उपोहन असणारी सोळा कलांची सुनंदा आरंभी योजून मग संगता व विशाला प्रयुक्त केल्याने तेहतीस कला होतात व मध्यम आसारिताचे स्वरूप होते. यात तीन परिवर्त योजले आहेत. मग आठ कलांचे उपोहन असणारी बत्तीस कलांची सुमुखी आरंभी योजून नंतर क्रमाने सुनंदा, संगता व विशाला प्रयुक्त केल्यास पासष्ट कलांनी युक्त असणारे ज्येष्ठ आसारिताचे स्वरूप होते. यात चार परिवर्त योजले आहेत. असे हे एकूण दहा परिवर्त होत. यांची एकूण कलासंख्या एकशेचोवीस होते.

विशाला संगता वाद्या सुनन्दा संगतादिमा ।
सुमुखी च सुनन्दाद्या संगता च विशालिका ॥ २०९ ॥
आसारितवदत्रापि कलानां गणकल्पना ।

अस्य प्रस्तारः -- याचा प्रस्तार —

ऽ ऽऽऽ ऽ ऽऽ ऽऽ
नि श ता नि श ता प्र नि सं ॥ इति विशाला ॥ ही विशाला होय.

ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
नि श नि ता श प्र नि सं ॥ इति संगता ॥ ही संगता होय.

ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ
आनिविश आनिविता आशविप्र आनिविसं ॥ इति सुनन्दा ॥ ही सुनंदा.

ऽ ऽऽऽ ऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
आ नि वि श आ नि वि ता आ श वि प्र आ नि वि सं ॥

ऽ ऽ ऽऽ ऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
आ नि वि श आ नि वि ता आ श वि प्र आ नि वि सं ॥

इति सुमुखी ॥ ही सुमुखी.

इति चतस्रः कण्डिकाः ॥ या चार कंडिका होत.

विशाला; संगता व विशाला; सुनंदा, संगता व विशाला; सुमुखी (मग) प्रथम; सुंनदा (नंतर) संगता व विशाला . (२०९)

या (कण्डिकावर्धमानातही) आसारिताप्रमाणे कलांच्या गणांची योजना (करावी).
(२१०–)

यथाक्षर चच्चत्पुट योजावा. सुमुखीच्या उपोहनातील आठ कलांत द्विकल चच्चत्पुट योजावा. दुसरे आचार्य पुढे सांगितलेल्या प्रकाराने कंडिकांचे दहा परिवर्त सांगतात. ते 'विशाला' इत्यादीने दाखवीत आहे. आद्या म्हणजे विशाला, पुन्हा आदिमा म्हणजे विशाला.

'आसारितात चारमात्रांचे अक्षरगण असणारी सर्वही कला होय' या म्हणण्याप्रमाणे (कलांच्या बाबतीत जी अक्षरगणांची योजना आसारितात दिली आहे), तशीच या कण्डिकावर्धमानात योजावी. (२०५–२०९, २१०–)

क० या कंडिकावर्धमानाचा प्रस्तार असा—

नऊ गुरू लिहून त्यांखाली निशतानिशताप्रनिसं हे लिहावे. ही विशाला होय. मग आठ गुरू लिहून त्यांखाली निश निता शप्र निसं हे लिहावे. ही संगता होय. नंतर सोळा गुरू लिहून त्यांखाली आनिविश आनिविता आशविप्र आनिविसं हे लिहावे. ही सुनंदा होय. मग बत्तीस गुरू लिहून त्यांखाली पूर्वी (म्हणजे सुनंदात) सांगितलेली अक्षरे दोनवेळा लिहावी. ही सुमुखी होय. अशा या चार कंडिका होत.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ
श ता श ता सं ॥ इति विशालाया उपोहनम् ॥ हे विशालेचे उपोहन.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि श ता श नि सं ॥ इति संगताया उपोहनम् ॥ हे संगतेचे उपोहन.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि श श ता श ता श ॥ इति सुनन्दाया उपोहनम् ॥ हे सुनंदेचे उपोहन.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
नि श नि ता श प्र नि सं ॥ इति सुमुख्या उपोहनम् ॥ हे सुमुखीचे उपोहन.

परिवर्तनपक्षे तु विशाला संगता वाद्येति क्रमेण कण्डिकानां प्रस्तारो ज्ञेयः ॥

परिवर्तन या पक्षी 'विशाला किंवा संगता प्रथम' इत्यादी क्रमाने कंडिकांचा प्रस्तार जाणावा.

इति कण्डिकावर्धमानम् । कंडिकावर्धमान समाप्त.

आसारितानामुत्पत्तिर्वर्धमानाद्भवत्यतः ॥ २१० ॥
तदासारितवद्भाति विधया वक्ष्यमाणया ।
विशाला चेन्नव कला भित्त्वाष्टादशधा कृता ॥ २११ ॥
त्यक्त्वा चान्त्यां कलां तत्तु तदा भाति कनिष्ठवत् ।

आसारितांची उत्पत्ति वर्धमानापासून होते. म्हणून (२१०) ते पुढे सांगितलेल्या प्रकाराने आसारिताप्रमाणे दिसते. विशालेच्या नऊ कला अठरा इतक्या भिन्न करून, (२११)

आता उपोहने—

पाच गुरू लिहून त्यांखाली शताशतासं हे लिहावे. हे विशालेचे उपोहन होय. सहा गुरू लिहून त्यांखाली निशताशनिसं हे लिहावे. हे संगतेचे उपोहन. मग यथाक्षर उद्घट्ट व चच्चत्पुट हे ताल लिहावे. त्यातल्या चच्चत्पुटाच्या खाली शता शता लिहावे. हे सुनंदेचे उपोहन. नंतर द्विकल चच्चत्पुट ताल लिहावा. हे सुमुखीचे उपोहन होय. परिवर्तन या पक्षी 'विशाला, संगता व विशाला' इत्यादी क्रमाने कंडिकांचा प्रस्तार जाणावा.

इति कण्डिकावर्धमानम् । हे कंडिकावर्धमान होय.

क० आता आसारितामास नावाच्या वर्धमानाचे लक्षण सांगत आहे—

ज्या अर्थी आसारितांची उत्पत्ति वर्धमानापासून होते त्या अर्थी पुढे सांगितलेल्या प्रकाराने ते वर्धमान, आसारिताप्रमाणे दिसते. तो प्रकार सांगत आहे—

विशालेच्या नऊ कला अठरा होतील अशा भिन्न करून म्हणजे वाढवून अर्थात दुप्पट करून, शेवटची म्हणजे अठरावी कला सोडून दिली असता, सतरा कला असणारे ते वर्धमान कनिष्ठ आसारिताप्रमाणे वाटते. (२१०, २११, २१२-)

अस्य प्रस्तारः –

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
शता शता संता शता शता संता शता शता सं ॥

इति कनिष्ठासारिताभासं वर्धमानम् ।

संगता षट्कलमुखी विशाला चेत्ततः परा ॥ २१२ ॥

भवेल्लयान्तराभासं तत्तालं वर्धमानकम् ।

अस्य प्रस्तारः —

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
श ता श ता सं ता श ता श ता सं ता श ता श ता सं ॥

आदावुपोहनं प्राग्वत्तालल्यमार्गद्वैगुण्यं च ॥

इति लयान्तराभासं वर्धमानम् ।

शेवटची कला सोडली तर ते कनिष्ठ (आसारिताप्रमाणे) दिसते.

याचा प्रस्तार—

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
शता शता संता शता शता संता शता शता सं.

हे कनिष्ठासारिताभास वर्धमान होय.

सहा कलांचे मुख असलेली संगता (प्रथम योजून) नंतर विशाला (योजली) (२१२) तर ते, त्याच्या (म्हणजे लयांतराच्या) ताला ने युक्त असे लयांतराभास वर्धमान होय. (२१३–)

याचा प्रस्तार—

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
शता शता संता शता शता संता शता शता सं.

प्रारंभी उपोहन पूर्वीच्याप्रमाणे (योजून) ताल, लय व मार्ग यांची दुगण करावी.

हे लयांतराभास वर्धमान होय.

कनिष्ठासारिताभास वर्धमानाचा प्रस्तार असा– सतरा गुरू लिहून त्यांखाली, कनिष्ठ आसारितात सांगितलेले शता शता संता शता शता संता शता शता सं हे वर्ण लिहावे.

हे कनिष्ठासारिताभास वर्धमान होय.

आता लयांतराभास वर्धमानाचे लक्षण देत आहे– सहा कलांचे मुख म्हणजे उपोहन असणारी, आठ कलांची संगता प्रथम योजावी. संगतेनंतर नऊ कलांची विशाला योजावी. ताल लयान्तराचाच योजावा. (२१२, २१३–)

याचा प्रस्तार–

लयांतराभास वर्धमानाचा प्रस्तार पूर्वीच्या वर्धमानाप्रमाणेच लिहावा. आरंभी उपोहन पूर्वीप्रमाणेच योजावे. ताल, लय व मार्ग यांची दुप्पट हा यातील विशेष होय.

हे लयांतराभास वर्धमान होय.

सोपोहना सुनन्दादौ संगते द्वे ततः परः ॥ २१३ ॥
मध्यमासारिते ताले स्यात्तदाभासकं तदा ।

अस्य प्रस्तारः —

ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ
श नि ता	नि श ता	प्र नि सं	नि प्र ता	श नि ता	नि श ता
ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	
प्र नि सं	नि प्र ता	श नि ता	नि श ता	प्र नि सं, आदौ	

सप्तकलमुपोहनम् ।

इति मध्यमासारितामासं वर्धमानम् ।

सुमुखीकण्डिका पश्चात्सुनन्दा संगतादिमा ॥ २१४ ॥

आरंभी उपोहनासह सुनंदा व नंतर पुढे दोन संगता (२१३) जेव्हा मध्यमासारितातील तालात (योजल्या जातात) तेव्हा ते त्याचे (म्हणजे मध्यमासारिताचे) आभासक होय. (२१४–)

याचा प्रस्तार–

ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ
श नि ता	नि श ता	प्र नि सं	नि प्र ता	श नि ता	नि श ता	प्र नि सं
ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ	ऽ ऽ ऽ			
नि प्र ता	श नि ता	नि श ता	प्र नि सं; आरंभी सात कलांचे उपोहन.			

हे मध्यमासारिताभास वर्धमान होय.

(आधी) सुमुखी ही कंडिका (योजून) नंतर सुनंदा, संगता व आदिमा (म्हणजे पहिली अर्थात विशाला) (२१४)

क० आता मध्यमासारिताभास वर्धमान सांगत आहे–

आरंभी सातकलांच्या उपोहनाने युक्त अशी सोळा कलांची सुनंदा योजून मग प्रत्येकी आठ कलांच्या दोन संगता प्रयुक्त कराव्या. याप्रकारे बत्तीस कला होतात. 'मध्यम आसारितातील तालात' असे म्हटले असल्याने शेवटी संनिपातयुक्त एक कला अधिक योजावी. नाहीतर तो ताल अपूर्ण राहील. त्यामुळे यात तेहतीस कला होतात. 'तदाभासक' म्हणजे मध्यमासारिताभास वर्धमान असा अर्थ होय. (२१३, २१४–)

या मध्यमासारिताभासाचा प्रस्तार मध्यमासारिताच्या प्रस्ताराप्रमाणे लिहावा. आरंभी सात कलांचे उपोहन पूर्वीप्रमाणे योजावे.

हे मध्यमासारिताभास वर्धमान होय.

आदिमा म्हणजे विशाला. याप्रमाणे चार कंडिकांतील कला पासष्ट होतात. ज्येष्ठ आसारितात आधी सातकला सोडलेला चतुष्कल षट्पितापुत्रक व मग संपूर्ण चतुष्कल षट्पिता-

ज्येष्ठतालेन चेज्ज्येष्ठासारिताभासकं तथा।

अस्य [४९]प्रस्तारः --

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ नि वि प्र आ नि वि प्र आ नि वि श आ नि वि प्र

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ नि वि ता आ नि वि ता आ नि वि श आ नि वि प्र

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आनिविसं आनिविप्र आनिविश आनिविता आनिविप्र आनिविसं।

आदावष्टकलमुपोहनम्।

इति ज्येष्ठासारिताभासवर्धमानम्।

ज्येष्ठातील तालात प्रयुक्त केली असता ज्येष्ठासारिताभास त्याप्रमाणेच (होते). (२१५–)

याचा प्रस्तार–

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ नि वि प्र आ नि वि प्र आ नि वि श आ नि वि प्र

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि श आ नि वि ता आ नि वि ता आ नि वि श आ नि वि प्र

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि सं आ नि वि प्र आ नि वि श आ नि वि ता आ नि वि प्र

ऽ ऽ ऽ ऽ
आ नि वि सं; आरंभी आठ कलांचे उपोहन.

हे ज्येष्ठासारिताभास वर्धमान होय.

पुत्र दोन वेळा असा तीन वेळा असणारा षट्पितापुत्रक सांगितला आहे. त्याचाच येथे प्रयोग केला असता ज्येष्ठासारिताभास वर्धमान होते. (२१४,२१५–)

ज्येष्ठासारिताभासाचा प्रस्तार असा– ज्येष्ठासारिताच्या प्रस्ताराप्रमाणे तो लिहावा– आरंभी आठ कलांचे उपोहन पूर्वीप्रमाणेच योजावे.

हे ज्येष्ठासारिताभास वर्धमान होय.

---

४९. ज्येष्ठासारिताभास वर्धमानाचा प्रस्तार देताना अडचार आवृत्तीतील मूळ ग्रंथात अडुसष्ट कला दिल्या आहेत तर आनंदाश्रम आवृत्तीत चौसष्ट कला दिल्या आहेत. कल्लिनाथाने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार पासष्ट कला हव्यात. तसेच कलापातही ज्येष्ठासारिताच्या कलापातांशी संपूर्णपणे जुळत नाहीत.

आसारितेभ्य उत्पन्नं वर्धमानं विवक्ष्यते ॥ २१५ ॥
यदा तदा वर्धमानासारितं तदुदाहरन् ।
यदा पूर्वक्रमाद्गीतास्तालैस्तैरेव कण्डिकाः ॥ २१६ ॥
वर्धमानासारितानि तदा चत्वारि पूर्ववत् ।
कनिष्ठादीनि भान्त्यत्र तालांशा वर्धमानवत् ॥ २१७ ॥
यथाक्षरादिभेदेन पुनः सर्वाण्यपि त्रिधा ।
यथाक्षरादित्रितयं दाक्षिणे वार्तिके द्वयम् ॥ २१८ ॥
चित्रे त्वेकमितीमानि षट्प्रकाराणि मार्गतः ।

आसारितांपासून उत्पन्न झालेले वर्धमान जेव्हा सांगायचे असते (२१५) तेव्हा त्याला वर्धमानासारित म्हटले आहे. जेव्हा पूर्वीच्या क्रमाने व त्याच तालांनी कंडिका गायिल्या जातात तेव्हा पूर्वीप्रमाणेच कनिष्ठ इत्यादी चार वर्धमानासारिते दिसून येतात. यात तालांचे अंश वर्धमानाप्रमाणेच होत. (२१६, २१७)

यथाक्षर इत्यादी भेदाने ती सर्वेही (म्हणजे नऊ) (प्रत्येकी) तीन प्रकारची होतात. यथाक्षर इत्यादी तीन (म्हणजे यथाक्षर, द्विकल व चतुष्कल) दक्षिण मार्गात, दोन (म्हणजे यथाक्षर व द्विकल) वार्तिक मार्गात (२१८) आणि एक (म्हणजे यथाक्षर) चित्र मार्गात अशी ही मार्गाप्रमाणे सहा प्रकारची होतात. (२१९)

क० पूर्वी आसारितामासात 'वर्धमानापासून आसारितांची उत्पत्ति' असे दाखविले. आता त्याच्या उलट प्रकार सांगत आहे–

जेव्हा आसारितांच्या पासून वर्धमान उत्पन्न होते असे सांगायचे असते तेव्हा त्याला आचार्य वर्धमानासारित असे म्हणतात. यावरून हा भेद फक्त सांगण्याच्या इच्छेनुसार जाणावा. स्वरूपाच्या दृष्टीने फार भेद नसतो असे मानणारा ग्रंथकार सांगत आहे– जेव्हा पूर्वीच्या क्रमाने व त्याच तालांत कंडिका गायिल्या जातात तेव्हा वर्धमान आसारितांत कनिष्ठ इत्यादी आसारिते दिसून येतात. तालांचे भाग वर्धमानाप्रमाणे दिसून येतात. सर्वेही आसारिते म्हणजे एकूण नऊ आसारिते यथाक्षर इत्यादी भेदाने प्रत्येकी तीन प्रकारची होतात. कनिष्ठ आसारित इत्यादी-पेक्षा केवळ मार्ग व लय यांचे वेगळेपण असणाऱ्या लयांतर आसारितापासून उत्पन्न होणारी तीन वर्धमाने सोडून बाकीची म्हणजे तीन कंडिका वर्धमाने, तीन आसारितामास वर्धमाने व तीन वर्धमान आसारिते अशी ही सर्व मिळून नऊ होतात. ती नऊही यथाक्षर, द्विकल व चतुष्कल या भेदांनी तीन प्रकारची होतात. पूर्वी सांगितलेली ही नऊ दक्षिण मार्गात यथाक्षर, द्विकल व चतुष्कल होतात. वार्त्तिक मार्गात यथाक्षर व द्विकल होतात व चित्र मार्गात फक्त यथाक्षर होतात. ही वर्धमाने मार्गभेदानुसार सहा प्रकारची होतात, ती अशी– प्रथम सांगितलेलीच जी वर्धमाने विद्यमान नसतात (?) ती दक्षिण मार्गात यथाक्षरतालयुक्त असणे हा एक प्रकार; त्याच मार्गात द्विकल युक्त हा दुसरा प्रकार; त्याच मार्गात त्रिकलयुक्त हा तिसरा प्रकार; वार्त्तिक मार्गात यथाक्षरयुक्त हा चवथा प्रकार व त्यातच द्विकलयुक्त हा पाचवा प्रकार; चित्र मार्गात यथाक्षरयुक्त हा सहावा प्रकार. या प्रमाणे नऊ वर्धमानांचे प्रत्येकी सहा प्रकार होत असल्याने चौपन्न वर्धमाने होतात. (२१५–२१८, २१९–)

एतेषां प्रस्तारो यथा— यांचा प्रस्तार असा–

ऽ ऽऽ ऽऽ ऽऽऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ ऽऽ
श आनि विता आनि विश आता विप्र तानि विसं ।
इति वर्धमानाभासं कनिष्ठासारितम् । हे वर्धमानाभास कनिष्ठासारित.

ऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ
श निशनिता शप्रनिसं शनिताश ताप्रनिसं ।
इति वर्धमानाभासं लयान्तरम् । हे वर्धमानाभास लयांतर.

ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ
आनिविश आनिविता आनिविप्र आनिविसं
ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽऽ
निशनिता शप्रनिसं शनितानि शताप्रनिसं ।
इति वर्धमानाभासं मध्यमासारितम् ॥ हे वर्धमानाभास मध्यमासारित

ऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ
श आनिविश आनिविता आशविप्र आनिविसं आनिविश
ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ
आनिविता आशविप्र आनिविसं आनिविश आनिविता आशविप्र
ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽऽ ऽऽऽ ऽऽऽऽऽ
आनिविसं निशनिता शप्रनिश नितानि शताप्रनिसं । इति
वर्धमानाभासं ज्येष्ठासारितम् ॥ हे वर्धमानाभास ज्येष्ठासारित.

इति चतुष्पञ्चाशद्भेदानि वर्धमानानि । ही चौपन्न प्रकारची वर्धमाने होत.

क० या वर्धमानासारितांचा प्रस्तार दाखवीत आहे, तो असा– सतरा गुरू लिहून, त्यांखाली शआनिविता, आनिविश, आनिविप्र आनिविसं हे लिहावे. हे वर्धमानाभास कनिष्ठासारित होय. नंतरही सतरा गुरू लिहून, त्यांखाली शनिशनिता, शप्रनिसं, शनिताश, ताप्रनिसं हे लिहावे. हे वर्धमानाभास लयांतर होय. मग तेहतीस गुरू लिहून, त्यांखाली आनिविश, आनिविता, आनिविप्र, आनिविसं, निशनिता, शप्रनिसं, शनितानि, शताप्रनिसं हे लिहावे. हे वर्धमानाभास मध्यमासारित होय. नंतर पासष्ट गुरू लिहून, त्यांखाली शआनिविश, आनिविता, आशविप्र आनिविसं आनिविश आनिविता आशविप्र आनिविसं आनिविश आनिविता आशविप्र आनिविसं निशनिता शप्रनिश नितानि शताप्रनिसं हे वर्ण लिहावे. हे वर्धमानाभास ज्येष्ठासारित होय.

चौपन्न प्रकारची वर्धमाने समाप्त.

आद्या रोविन्दकगता मात्रैका [५०]पाणिका मुखम् ॥ २१९ ॥
मात्रा स्यादवराष्टाङ्गा षोडशाङ्गा परा मता ।
उल्लोप्यकवदङ्गानां निवेशं कोविदा विदुः ॥ २२० ॥
विदार्याः स्युः स्तुतिपदैराकारान्तरितैरिह ।
निरन्तरैः स्तुतिपदैराकारैश्चाथवा क्रमात् ॥ २२१ ॥
मुखात्परं प्रतिमुखं मुखवत्स्यात्पदान्तरैः ।
अथोत्तरैश्चतुर्भिः स्याच्छरीरं तु यथाक्षरैः ॥ २२२ ॥
ततः शीर्षं सैककेन कार्यं संपिष्टकेन तु ।
अन्येऽन्ताहरणेनान्तान्वितेनेच्छन्ति शीर्षकम् ॥ २२३ ॥

रोविंदकात असलेली पहिली मात्रा पाणिका होय. (रोविंदकात असलेले) मुख (म्हणजे उपोहन) (पाणिकेचेही) मुख होय. (२१९)

आठ अंगांची मात्रा कनिष्ठ होय; सोळा अंगांची मात्रा उत्कृष्ट मानली आहे. (हिच्यात) जाणकार उल्लोप्यकाप्रमाणे अंगांची योजना समजतात. (२२०)

या (पाणिकेत) मध्ये आकार असलेल्या स्तुतिवाचक शब्दांनी विदारी म्हणजे गीतांचे भाग (योजलेले) असावे; किंवा क्रमाने, मध्ये आकार नसलेल्या म्हणजे सलग अशा (स्तुतिवाचक शब्दांनी) व सलग अशा आकारांनी ते (योजलेले) असावे. (२२१)

मुखानंतर, मुखाप्रमाणेच (पण) वेगळ्या शब्दांनी (रचलेले) प्रतिमुख योजावे. नंतर चार यथाक्षर उत्तर तालांनी शरीर योजावे. (२२२)

मग एककयुक्त संपिष्टकाने शीर्षक प्रयुक्त करावे. दुसरे (आचार्य) अंताने युक्त अशा अंताहरणाने शीर्षक इच्छितात. (२२३)

क० आता पाणिकेचे लक्षण देत आहे— रोविंदकाची पहिली एक मात्रा पाणिका होय. 'रोविंदकात असलेली' यावरून मात्रेच्या सोळा कला असणे व आनिविप्र इत्यादी कलापात असणे हे जाणावे. रोविन्दकगत मुख म्हणजे उपोहन (हिच्यात असावे) असे 'रोविन्दकगता' हे विशेषण लिंग बदलून 'रोविन्दकगत' असे नपुंसकलिंगी घेऊन जोडून घ्यावे. यावरून येथेही आठ कलांचे उपोहन जाणावे. आठ अंगांची मात्रा कनिष्ठ होय. सोळा अंगांची मात्रा उत्कृष्ट होय. उल्लोप्यकात जशी विविध इत्यादी अंगांची योजना असते तशीच जाणकार येथेही समजतात. या पाणिकेत मध्ये आकार असणाऱ्या स्तुतिवाचक शब्दांनी विदारी योजाव्या हे एक मत होय. किंवा सलग अशा स्तुतिवाचक शब्दांनी व सलग आकारांनी अशा क्रमाने त्या योजाव्या असे दुसरे मत होय. मुख व प्रतिमुख यांत शब्दांची भिन्नता असते गीतीची नसते असा अर्थ 'मुखाप्रमाणे पण दुसऱ्या शब्दांनी प्रतिमुख होय' याचा घ्यावा. प्रतिमुखानंतर शरीर व त्यानंतर एककासह असणाऱ्या दहा कलांच्या संपिष्टकाने शीर्षक योजावे. दुसरे आचार्य अंताने युक्त अशा अंताहरणाने शीर्षक इच्छितात. (२१९–२२३)

---

५०. पाणिका या शब्दाची व्युत्पत्ति 'पण्' – स्तुति करणे या धातूपासून दिली आहे. कारण ती स्तुतिवाचक पदांनी युक्त असते. (पहा– नाटयशास्त्र (बडोदा) भाग ४ पृ. २६९).

अस्याः प्रस्तारः – हिचा प्रस्तार–

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

आ नि वि प्र आ नि वि ता । इत्युपोहनम् । हे उपोहन होय.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

आ नि वि प्र आ नि वि श । [५१]इत्युपोहनमिदं मिलितमुखम् । हे मुख- मिळून उपोहन होय.

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

आनिविश आनिविता आनिविप्र आनिविसं संताशताशता ।

इति प्रतिमुखम् । हे प्रतिमुख होय.

ततो यथाक्षरैः चतुर्भिरुत्तरैः शरीरम् । मग यथाक्षर अशा चार उत्तर तालांनी शरीर (योजावे). प्रस्तारो यथा– प्रस्तार असा–

ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ

निश शश ताता ताश ताश तासं । इति शीर्षकम् । हे शीर्षक.

अन्ये त्वन्ताहरणसहितमन्तं शीर्षकमाहुः । स चोल्लोप्यके दर्शितः ।

दुसरे (आचार्य) अंताहरणासह अंत शीर्षक म्हणून सांगतात. तो उल्लोप्यकात दाखविला आहे.

इति पाणिका । ही पाणिका होय.

क० या पाणिकेचा प्रस्तार असा––

प्रथम उपोहनात आठ गुरू लिहून त्यांखाली आनिविप्र आनिविता हे लिहावे. हे उपोहन होय. मग आठ गुरू लिहून त्यांखाली आनिविप्र आनिविश लिहावे. ही उपोहनासह पहिली मात्रा होय. नंतर मुखाप्रमाणेच प्रतिमुख लिहावे. हे प्रतिमुख होय.

मग चार यथाक्षर उत्तर तालांनी शरीर लिहावे. हे शरीर होय. नंतर शीर्षकात बारा गुरू लिहून त्यांखाली निशशश तातातात ताशतासं हे लिहावे. हे संपिष्टकाने युक्त शीर्षक होय. दुसरे आचार्य अंताहरणासह (अंत) शीर्षक सांगतात. तो उल्लोप्यकात दाखवलेला येथे जोडून घ्यावा.

---

५१. या म्हणण्याचा अर्थबोध होत नाही. 'इत्युपोहनेन सहिता आद्या मात्रा ।' असे कल्लिनाथाने म्हटले आहे. 'ही उपोहनासह पहिली मात्रा' असा याचा अर्थ असल्याने तो येथे जुळतो.

आरभ्यानुष्टुभं वृत्तैर्जगत्यन्तैः पदैरपि ।
लौकिकैर्वैदिकैर्वापि [५२]गातव्यामृचमूचिरे ॥ २२४ ॥

अनुष्टुभ् (छंदापासून) सुरवात करून जगती (छंद) शेवटी असलेल्या लौकिक वा वैदिक वृत्तांनी व पदांनीही गावयाची ऋचा म्हटली आहे. (२२४)

क० आता ऋचेचे लक्षण देत आहे—

अनुष्टुभ् हा आठ अक्षरांचा पाद असणारा छंद होय. जगती हा बारा अक्षरांचा पाद असणारा छंद होय. त्यांपासून (म्हणजे अनुष्टुभापासून ते जगतीपर्यंतच्या छंदापासून) उत्पन्न

५२. ऋचा या गीतप्रकाराचे लक्षण देताना शार्ङ्गदेवाने योजलेल्या काही शब्दांचे स्वरूप स्पष्ट होण्यासाठी तसेच यावरील टीकेत कल्लिनाथाने योजलेल्या काही शब्दांच्या विषयी थोडा अधिक तपशील असा– ऋग्वेदातल्या ऋचा वेगवेगळ्या छंदांत आहेत. वैदिक छंद पादात असणाऱ्या अक्षरसंख्येनुसार व पादांच्या संख्येनुसार असतात. उदा.–आठ अक्षरांचा पाद असणारा गायत्री हा छंद असून दहा अक्षरांचा पाद असणारा विराज् हा छंद होय. त्रिष्टुभ् या छंदाच्या पादात अकरा अक्षरे असतात. गायत्रीचे तीन पाद व अनुष्टुभाचे आणि त्रिष्टुभाचे चार पाद असतात. पाच पाद असणारा व पादात आठ अक्षरे असणारा पंक्तिसारखा छंद विरळपणे दिसतो. छंदांचे मिश्र स्वरूपही वेदात आढळते. येथे छंदःशास्त्रात दिलेले अनुष्टुभ् पासून जगतीपर्यंत असणारे छंद म्हटले आहेत. पादातील अक्षरसंख्येनुसार ते असे– अनुष्टुभ् याची पादात आठ अक्षरे, बृहतीच्या पादात नऊ अक्षरे, पंक्तीच्या पादात दहा अक्षरे, त्रिष्टुभाच्या पादात अकरा अक्षरे व जगतीच्या पादात बारा अक्षरे. यांपासून उत्पन्न होणाऱ्या लौकिक वृत्तांत पादातील अक्षरगणांचा नियम असतो म्हणून ती अक्षरगणवृत्ते होत. पादात मात्रागणांचा नियम असणारी मात्रावृत्ते होत. (यांचे विवरण प्रबंधाध्यायात आले आहे.) कलांची पूर्ति मंत्रपदांनी व स्तोभाक्षरांनी सांगितली आहे. मंत्र म्हणजे संहितावाङ्मय होय. सामगानात 'स्तोभ' नावाचा अंश गायचा असतो. ऋचेचे गेय स्वरूप म्हणजे साम होय. यात मूळ ऋचेत नसलेले असे जे वर्ण किंवा शब्द अधिकपणे योजलेले असतात त्यांना स्तोभ हे नाव आहे. 'ब्राह्मणाः,' 'देवाः' ही ब्राह्मण व देव या शब्दांची, अभिजात संस्कृतची प्रथमेच्या बहुवचनाची रूपे आहेत. यांचीच वैदिक रूपे 'ब्राह्मणासः', 'देवासः' अशी होत.

सामगायकांत उद्गाता हा मुख्य असून प्रस्तोता व प्रतिहर्ता हे त्याचे साहाय्यक असतात. सामगानांत हिंकार, प्रस्ताव, उद्गीथ, प्रतिहार व निधन असे पाच भाग असतात. त्यांना 'भक्ति' असे नाव आहे. याशिवाय उद्गीथाचा, उपद्रव व निधनाचा, अंतर्निधन असे दोन अवांतर विभाग काही सामांत गायिले जातात. 'हुम्' यास हिंकार म्हणतात. तो ओंकाराचा पर्याय होय. हा तिन्ही सामगायकांनी गायचा असतो. सामगान ज्या ऋचेच्या आधाराने करायचे असते त्या ऋचेच्या पहिल्या चरणास 'प्रस्ताव' म्हणतात. तो प्रस्तोत्याने गायचा असतो. उद्गीथ हा भाग आरंभी ॐ म्हणून उद्गात्याने गावयाचा असतो. प्रतिहार हा भाग प्रतिहर्त्याने गायचा असतो व निधन तिघांनी गावयाचे असते. उपद्रव हा अवांतर विभाग उद्गात्याने गायचा असून अंतर्निधन तिघांनी गायचे असते. सामाची समाप्ति होत असल्याने शेवटच्या भक्तीचे निधन हे नाव सार्थ होय. (पहा– 'वैदिक संगीत,' ले. श्रौताचार्य धुंडिराजशास्त्री बापट, पुणे गायन समाज, पुणे, पृ. १८–२०) छान्दोग्य उपनिषदात सामाच्या सात भक्ति हिंकार, प्रस्ताव, आदि, उद्गीथ, प्रतिहार, उपद्रव व निधन अशा दिल्या आहेत. ओंकार हा आदि होय. (छां. उ. २. ८. १, २)

एकाक्षराः कला अष्टाचत्वारिंशदिहोदिताः ।
कलाणां पूरणं मन्त्रपदैः स्तोभाक्षरैरपि ॥ २२५ ॥
तान्यत्र ब्रह्मगीतानि निर्दिश्यन्तेऽधुना यथा ।
झण्टुं जगतियवलितककुचझलतितिझलपशुपतिदिगिदिगिवादिगोंगणपतितितिधा, इत्येतान्यत्रवीद्ब्रह्मा ।
ओंकारश्च हकारोऽपि स्वरव्यञ्जनसंयुतः ॥ २२६ ॥
त्रिकलः षट्कलो वात्र स्तोभः स्यान्मुनिसंमतः ।
प्रस्तावादीनि सप्तापि सामाङ्गान्यत्र चावदन् ॥ २२७ ॥
यथाशोभं विदारी च वर्णांश्च रचयेदिह ।
इति ऋक् ।

तिच्यात एका अक्षराच्या अठ्ठेचाळीस कला सांगितल्या आहेत. कलांची पूर्ति मंत्र-शब्दांनी व स्तोभाक्षरांनीही (करावी). (२२५)

ब्रह्मदेवाने गायिलेली ती (स्तोभाक्षरे) आता निर्दिष्ट करतो. ती अशी–

' झण्टुं जगतियवलितककुचझलतितिझलपशुपतिदिगिदिगिवादिगोंगणपतितितिधा ' अशी ही ब्रह्मदेवाने उच्चारली.

स्वर व व्यंजन यांनी युक्त असणारा ओंकार व हकारही (२२६) तीन कला किंवा सहा कला असणारा असा स्तोभ (म्हणून) मुनींना मान्य आहे.

प्रस्ताव इत्यादी सातही सामांगे या (ऋचेत) सांगितली आहेत. (२२७)

शोभेल त्याप्रमाणे विदारी व वर्णांची रचना या (ऋचेत) करावी.(२२८–)

ही ऋचा होय.

झालेल्या लौकिक किंवा वैदिक वृत्तांनी तसेच लौकिक संस्कृत अथवा वैदिक शब्दांनी (ती ऋचा युक्त असते). विचित्रपदा इत्यादी लौकिक वृत्ते होत व पुरउष्णिक् इत्यादी वैदिक वृत्ते होत. ' ब्राह्मणाः ' ' ' देवाः ' इत्यादी लौकिक पदे होत. ' ब्राह्मणासः ' ' देवासः ' इत्यादी वैदिक पदे होत.

या ऋचेत एकेक कलेत एकेक अक्षर योजावे. ह्यिच्यात ज्या अठ्ठेचाळीस कला सांगितल्या आहेत त्यांतील काही वृत्तांमधील अक्षरांनी पूर्ण केल्यावर, राहिलेल्या कला, पुढे सांगितलेल्या स्तोभाक्षरांनीही पूर्ण करण्यास सांगितले आहे. ती स्तोभाक्षरे ' झण्टुं ... ' इत्यादी दिली आहेत. व्यंजनयुक्त ओंकार व स्वरयुक्त हकार असा अर्थक्रम जाणावा. ओंकार व हकार हे तीन कलांच्या कालाने युक्त किंवा सहा कलांच्या कालाने युक्त असे योजावे. प्रस्ताव इत्यादी सात सामांगे म्हणजे प्रस्ताव, उद्गीथ, प्रतिहार, उपद्रव, निधन, हिंकार व हुंकार ही होत. वर्ण म्हणजे स्थायी इ० (अर्थात स्थायी आरोही, अवरोही व संचारी हे) होत. (२२४–२२७, २२८–).

कला मुनिजनैरुक्ता गाथायाश्चतुरक्षरा ॥ २२८ ॥
अध्यष्टाविंशतिशतं कलानां तत्र कीर्तितम् ।
मात्रावृत्तैः कलानां च पूर्तिः स्तोभाक्षरैरपि ॥ २२९ ॥
कर्तव्यान्येककान्यत्र वर्णालंकारगीतयः ।
सामाङ्गानि च भूयांसि विविधानामिहाल्पता ॥ २३० ॥

इति गाथा ।

स्तोभभङ्गीं विजानीयात् साम्नो वैदिकसामवत् ।
ब्रह्मणा च पुरा गीतं प्रस्तावोद्गीथकौ ततः ॥ २३१ ॥
प्रतिहारोपद्रवौ च निधनं पञ्चमं मतम् ।
ततो हिंकार ओंकारः सप्ताङ्गानीति तत्र तु ॥ २३२ ॥

मुनिजनांनी गाथेची कला चार अक्षरांची सांगितली आहे. (२२८)

तिच्यात एकशेअठ्ठावीस कला सांगितल्या आहेत. कलांची पूर्ति मात्रावृत्तांनी आणि स्तोभाक्षरांनीही (करायची असते). (२२९) हिच्यात एकके योजावीत (तसेच) वर्ण, अलंकार व गीति (प्रयुक्त) कराव्या. हिच्यात सामाची अंगे पुष्कळ असून विविध थोडे असतात. (२३०)

ही गाथा होय.

सामाचा स्तोभप्रकार वैदिक सामाप्रमाणेच जाणावा. पूर्वी ब्रह्मदेवाने (साम) गायिले. प्रस्ताव व उद्गीथ तसेच (२३१) प्रतिहार, उपद्रव आणि पाचवे निधन (हे अंग) मानले आहे. मग हिंकार आणि ओंकार अशी सात अंगे त्या (सामात असतात). (२३२)

क० आता गाथेचे लक्षण देत आहे–

'गाथेची कला मुनिजनांनी चार अक्षरांची सांगितली आहे' याचा अर्थ असा की एकेक कलेत चार चार अक्षरे योजायची असतात. त्या गाथेत एकशअठ्ठावीस (शब्दशः शंभर अधिक अठ्ठावीस) कला सांगितल्या आहेत. कलांची पूर्ति मात्रावृत्तांनी व स्तोभाक्षरांनीही होते. या गाथेत एकके प्रयुक्त करावी तसेच वर्ण, अलंकार आणि गीति योजाव्या. प्रस्ताव इत्यादी सामाची अंगे (पुष्कळपणे योजावी). (२२८–२३०)

क. आता सामाचे लक्षण देत आहे–

ऋचा इत्यादी गीतीप्रमाणे साम नावाच्या गीतातही स्तोमाक्षरांचा प्रकार वैदिक सामाप्रमाणे जाणावा. म्हटलेच आहे की– 'गीतींत सामनावाची गीति (होय.).' वैदिक सामातील प्रस्ताव नावाच्या अंगाचे साम या गीतात उद्ग्राह हे नाव होय; उद्गीथाचे अनुद्ग्राह हे नाव होय; प्रतिहाराचे संबोध हे नाव होय; उपद्रवाचे ध्रुवक हे नाव होय व निधनाचे आभोग हे नाव होय. असा हा क्रम जाणावा. या गीतात हिंकार व ओंकार कलापूर्तीसाठी असतात असे समजावे.

उद्ग्राहः स्यादनुद्ग्राहः संबोधो[५३] ध्रुवकस्तथा ।
आभोगश्चेति पञ्चानामाद्यानामभिधाः क्रमात् ॥ २३३ ॥
हिंकारोंकारयोस्तत्र कलापूरकता मता ।
गायत्रीप्रभृतिच्छन्दः[५४] संकृत्यन्तमिहेष्यते ॥ २३४ ॥
ऋग्व्यूढमिति सामोक्तं गद्ये षण्णवतिः कलाः ।
एकाक्षराः सामगाने तदर्धमपरे जगुः ॥ २३५ ॥
अत्रापि मन्त्रस्तोभानामृचां च त्रिकलादिकम् ।
इति साम । इति गीतप्रकरणानि । इति मार्गतालप्रकरणम् ।

(साम या गीतप्रकारात) उद्ग्राह, अनुद्ग्राह, संबोध तसेच ध्रुवक (हे अंग) आणि आभोग अशी ही पहिल्या पाच (सामांगांची) क्रमाने नावे होत. (२३३)

त्यात हिंकार व ओंकार हे कला पूर्ण करण्यासाठी मानले आहेत. यात गायत्रीपासून संकृतिअखेरपर्यंतचे छंद इष्ट होत. (२३४)

ऋचेवर स्थापित असलेले (म्हणजे आधारलेले) असे साम म्हटले आहे. गद्यात (म्हणजे गाथेत) एक अक्षराच्या शहाण्णव कला असतात व त्याच्या निम्म्या (म्हणजे अठ्ठेचाळीस कला) सामगानात (असतात) असे दुसऱ्या आचार्यांनी म्हटले आहे. यातही मंत्रस्तोभांचे त्रिकल इत्यादि स्वरूप ऋचाप्रमाणे (योजावे). (२३५, २३६–)

हे साम होय. गीत प्रकरणे समाप्त. मार्गताल प्रकरण समाप्त.

या सामगीतात गायत्रीपासून संकृतिपर्यंतचे छंद सांगितले आहेत. गायत्रीचा पाद सहा अक्षरांचा व संकृतीचा पाद चोवीस अक्षरांचा असतो. दुसऱ्या मतानुसार गाथेमध्ये तसेच सामाच्या बाबतीत कलांच्या संख्येविषयी नियम सांगत आहे. गद्यात म्हणजे गाथेत शहाण्णव कला असतात. सामगानात त्याच्या निम्म्या म्हणजे अठ्ठेचाळीस कला असतात. ऋचा या गीताप्रमाणे या साम नावाच्या गीतातही मंत्ररूपी ओंकार इत्यादी स्तोभाक्षरांचे त्रिकल इत्यादि स्वरूप योजायचे असते. मंत्र हे स्तोभाक्षरांचे विशेषण गीतस्वरूपाची स्तोभाक्षरे वगळण्यासाठी योजले आहे. 'त्रिकलइत्यादि' यातील 'इत्यादि' या शब्दाने षट्कल हे स्वरूप घ्यावयाचे आहे. (२३१–२३५, २३६–)

हे साम होय. गीतप्रकरणे समाप्त. मार्गताल प्रकरण समाप्त.

---

५३. मूळ ग्रंथात अडचार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तींत 'संबोध' हा शब्द आहे. पण कल्लिनाथ व सिंहभूपाल या दोघांनीही वैदिक सामातील प्रतिहाराचे सामगीतातले नाव 'संबन्ध' असे दिले आहे.

५४. गायत्रीपासून ते संकृति अखेरच्या छंदांची नावे अशी– गायत्री, उष्णिक्, अनुष्टुभ्, बृहती, पंक्ति, त्रिष्टुभ्, जगती, अतिजगती, शक्वरी, अतिशक्वरी, अष्टि, अत्यष्टि, धृति, अतिधृति, कृति, प्रकृति, आकृति, विकृति व संकृति. यांच्या पादातील अक्षरसंख्या क्रमाने सहा, सात, आठ, नऊ, दहा, अकरा, बारा, तेरा, चवदा, पंधरा, सोळा, सतरा, अठरा, एकोणीस, वीस, एकवीस, बावीस, तेवीस, व चोवीस अशी असते.

श्रीकीर्तिविजयानन्दं पार्वतीलोचनोत्सवम् ।
राजचूडामणिं नत्वा तालं देशीगतं ब्रुवे ॥ २३६ ॥
देशीतालस्तु लघ्वादिमितया क्रियया मतः ।
यथाशोभं कांस्यतालध्वननादिकया मतः ॥ २३७ ॥

लक्ष्मी, कीर्ति व विजय यांनी ज्याचा आनंद (उत्पन्न झाला आहे), पार्वतीच्या नेत्रांचा जो उत्सव (असतो आणि) चंद्र ज्याचा चूडामणि (आहे) (अशा त्या शंकराला) नमस्कार करून देशीविषयक ताल (आता) सांगतो. (२३६).

[शंकर या इष्टदेवतेला नमस्कार करताना वापरलेली श्लिष्ट विशेषणे तालालाही लागू पडतात. त्यामुळे या श्लोकातून दुसरा अर्थ निघतो तो असा–

' श्रीकीर्ति, विजयानंद, पार्वतीलोचन, उत्सव व राजचूडामणि इत्यादींनी निदर्शित होणारा देशीताल (आता) सांगतो. ']

पण देशीताल हा (शोभिवंत होईल अशा) लघु इत्यादी प्रमाणाच्या क्रियेने मानला आहे. (तसेच) शोभिवंत होईल अशा प्रकारच्या कांस्यतालाच्या नाद इत्यादी उत्पन्न करण्याच्या (क्रियेने) मानला आहे. (२३७).

क० आता देशीताल या प्रकरणाच्या आरंभी इष्टदेवतेला नमन करून प्रतिपाद्य विषय देत आहे. या श्लोकातली ताल व ईश्वर यांची विशेषणे श्लिष्ट आहेत असे जाणावे. ' श्रीकीर्ति-विजयानन्द ' (याचा ईश्वराला लागू पडणारा अर्थ असा)– श्री, कीर्ति व विजय यांनी उत्पन्न झालेला आनंद हाच ईश्वर (असा कर्मधारय समास घ्यावा) किंवा तसाच आनंद ज्याचा आहे असा ईश्वर असा बहुव्रीहि समास घ्यावा. ताल या पक्षी श्रीकीर्ति हे एका तालाचे नाव आहे. तसेच विजयानंद हे दुसऱ्या एका तालाचे नाव आहे. ' पार्वतीलोचनोत्सव ' (याचा ईश्वराला लागू होणारा अर्थ)– पार्वतीच्या लोचनांचा उत्सव या रूपाने असणारा; ताल या पक्षी पार्वतीलोचन व उत्सव असे दोन ताल. ' राजचूडामणि (याचा ईश्वराला लागू पडणारा अर्थ)– राजा म्हणजे चंद्र ज्याचा चूडामणि आहे असा ईश्वर; ' ताल या पक्षी राजचूडामणि हे एका तालाचे नाव आहे. या सांगितलेल्या लक्षणांनी युक्त असणाऱ्या ईश्वराला नमन करून श्रीकीर्ति इत्यादींनी निर्दिशत होणारा देशीविषयक ताल सांगतो असा संबंध (जाणायचा). येथे ' ताल ' या शब्दाचे योजलेले एकवचन समूहवाचक होय. ईश्वर एक असल्याने ते तसे योजलेले आहे. ईश्वरविषयक विशेषणांचा सारखेपणा सिद्ध होण्यासाठी तालाचे एकवचन योजिले आहे असे समजावे. (२३६)

क० त्या देशीतालाचे सामान्य लक्षण सांगत आहे. यातील ' तु ' हा शब्द मार्गतालापासून देशीतालाचा वेगळेपणा प्रकट करतो. तो वेगळेपणा ' शोभिवंत होईल अशा प्रकारच्या लघु इत्यादी क्रियेने मानला आहे. ' व ' शोभिवंत होईल अशा प्रकारच्या कांस्यतालाच्या नाद इत्यादी उत्पन्न करण्याच्या क्रियेने मानला आहे ' या दोन विशेषणांनी जाणावा. यातले ' यथाशोभं ' (म्हणजे शोभिवंत होईल अशा तऱ्हेने) हे पद देहलीप्रदीपन्यायाने किंवा काकाक्षिन्यायाने दोन्हीकडे योजायचे आहे. (उंबऱ्यावर ठेवलेला दिवा दोन्ही बाजूच्या खोल्यांना प्रकाश देतो.

अर्धमात्रं द्रुतो मात्रात्रितयं प्लुत उच्यते ।
द्रुतादिरचनाभेदात्तालभेदोऽप्यनेकधा ॥ २३८ ॥
तालानामधुना तेषामुद्देशं संगिरामहे ।

अर्धी मात्रा (प्रमाणाचा) द्रुत व तीन मात्रा (प्रमाणाचा) प्लुत म्हटला जातो. द्रुत इत्यादींच्या रचनेच्या वेगळेपणाने तालांचे भेदही अनेक प्रकारचे होतात. (२३८)
त्या तालांचा नामनिर्देश आता सांगत आहो. (२३९–)

हा देहलीप्रदीपन्याय होय. जेव्हा एक गोष्ट एकाच वेळी दुहेरी कार्य साधते त्यावेळी हा न्याय योजतात. कावळा आपला एकच डोळा दोन्ही बाजूला फिरवतो. हा काकाक्षिन्याय होय. याचीही योजना देहलीप्रदीपन्यायासारखीच करतात.) यातील ' शोभिवंत होईल अशा प्रकारच्या लघु इत्यादी प्रमाणाच्या ' याचा अर्थ असा– येथे शोभा या शब्दाने गीतांच्या अवयवांतली, कालसाम्यावर आधारलेली अशी तालांच्या आवृत्तींची सहृदयांना अनुभवायला येणारी मनोहारिता म्हटली आहे. तीनुसार म्हणजे ज्या गीताच्या भागात जितक्या अक्षरांच्या प्रमाणाच्या मात्रेने कांस्यतालाच्या कालाचा सारखेपणा होईल त्याप्रमाणे. मार्गतालात पाच लघू अक्षरांच्या उच्चारण्याच्या प्रमाणाची मात्रा नियमाने सांगितली आहे. येथे केव्हा त्यापेक्षा कमी प्रमाणाच्या म्हणजे चार लघू अक्षरांच्या उच्चारण्याच्या प्रमाणाच्या मात्रेने कालाचा सारखेपणा; इतरत्र त्यापेक्षा जास्त प्रमाणाच्या म्हणजे सहा लघू अक्षरांच्या उच्चारण्याच्या प्रमाणाच्या मात्रेने कालाचा सारखेपणा अशा प्रकारे जेथे जसे शोभादायक होईल त्या तऱ्हेने. ' लघ्वादि ' म्हणजे ' लघु इत्यादि ' यांतील ' इत्यादि ' शब्दाने गुरु, प्लुत व द्रुत घ्यायचे. येथे थोडा काळ घ्यायचा असेल तर ' द्रुत इत्यादि ' किंवा मोठा काळ घ्यायचा असेल तर ' प्लुत इत्यादि ' असे म्हणणे योग्य असता ' लघु इत्यादि ' असे म्हटले आहे. ते देशी तालांत ग्रह व मोक्ष (म्हणजे आरंभ व शेवट) यांच्याबाबतीत लघूच प्रमुख आहे हे प्रकाशित करण्यासाठी होय. यावरून केवळ द्रुत स्वरूपाच्या तालातही दोन द्रुतांचा लघु करून ग्रह व मोक्ष योजावे असा संप्रदाय जाणावा. येथे सांगितलेल्या मात्रेच्या प्रमाणांच्या भेदाचे, विशिष्ट तालातले उदाहरण, पुढे तालांच्या पुनरुक्तीबाबतच्या मताचा परिहार करण्याच्या वेळी देण्यात येईल. कांस्यतालाच्या नादात, क्वचित् नाद मोकळा सोडून, क्वचित् नाद धारण करून, क्वचित् प्रहार करताना हाताच्या वैशिष्ट्ययुक्त क्रियांनी, क्वचित् प्रहार करताना आघाताच्या कल्पकतेने जी शोभा उत्पन्न होते तिच्यानुसार कांस्यतालाचा नाद निर्माण केला तर तो विस्मय व वैचित्र्य यांनी निर्माण होणाऱ्या आश्चर्याने युक्त असतो. असा हा देशी तालाचा प्रकार लोकसंमत आहे. यामुळे मार्गतालापासून देशीतालाचा वेगळेपणा दिसून येतो. मात्रेचा अर्धा भाग म्हणजे द्रुत होय. द्रुत इत्यादींच्या म्हणजे द्रुत, लघु, गुरु व प्लुत यांच्या विशिष्ट रचनेमुळे म्हणजे योजनेमुळे व विशिष्ट प्रमाणामुळे तालांचे भेदही अनेक प्रकारे होतात. तालांचे वैचित्र्यही द्रुतइत्यादींच्या वेगवेगळ्या योजनेमुळे व भिन्न भिन्न प्रमाणाने होते असे जाणावे. आता त्या देशी तालांची नावे (सांगत आहे). (२३७, २३८, २३९–)

आदितालो द्वितीयश्च तृतीयोऽथ चतुर्थकः ॥ २३९ ॥
पञ्चमो निःशङ्कलीलो दर्पणः सिंहविक्रमः ।
रतिलीलः सिंहलीलः कन्दर्पो वीरविक्रमः ॥ २४० ॥
रङ्गः श्रीरङ्गचर्यौ प्रत्यङ्गो यतिलग्नकः ।
गजलीलो हंसलीलो वर्णभिन्नस्त्रिभिन्नकः ॥ २४१ ॥
राजचूडामणी रङ्गोद्योतो रङ्गप्रदीपकः ।
राजतालो वर्णतालः सिंहविक्रीडितो जयः ॥ २४२ ॥
वनमाली हंसनादः सिंहनादः कुडुक्कः ।
तुरङ्गलीलः शरभलीलः स्यात्सिंहनन्दनः ॥ २४३ ॥
त्रिभङ्गिरङ्गाभरणो[५५] मण्ठकः कोकिलाप्रियः ।
निःसारुको राजविद्याधरश्च जयमङ्गलः ॥ २४४ ॥
मल्लिकामोदविजयानन्दौ क्रीडाजयश्रियौ ।
मकरन्दः कीर्तितालः श्रीकीर्तिः प्रतितालकः ॥ २४५ ॥
विजयो बिन्दुमाली च समनन्दनमण्ठिकाः ।
दीपकोदीक्षणौ ढेङ्की विषमो वर्णमण्ठिका ॥ २४६ ॥

आदिताल व द्वितीय, तृतीय, नंतर चतुर्थक, (२३९) पंचम, निःशंकलील, दर्पण, सिंहविक्रम, रतिलील, सिंहलील, कंदर्प, वीरविक्रम, (२४०) रंग, श्रीरंग, चच्चरी, प्रत्यंग, यतिलग्नक, गजलील, हंसलील, वर्णभिन्न, त्रिभिन्नक, (२४१) राजचूडामणि, रंगोद्योत, रंगप्रदीपक, राजताल, वर्णताल, सिंहविक्रीडित, जय, (२४२) वनमाली, हंसनाद, सिंहनाद, कुडुक्कक, तुरंगलील, शरभलील, सिंहनंदन, (२४३) त्रिभङ्गि, रंगाभरण, मण्ठक, कोकिलाप्रिय, निःसारुक, राजविद्याधर, जयमंगल, (२४४) मल्लिकामोद, विजयानंद, क्रीडा, जयश्री, मकरंद, कीर्तिताल, श्रीकीर्ति, प्रतितालक, (२४५) विजय, बिंदुमाली, सम, नंदन, मंठिक, दीपक, उदीक्षण, ढेंकी, विषम, वर्णमंठिका, (२४६) अभिनंद, अनंग,

---

क० एकशेविसाव्या तालाला स्वतःचे नाव देऊन, देशीतालांची अनंत संख्या व स्वेच्छेनुसार नाव देणे या दोन्ही गोष्टी ग्रंथकाराने दाखविल्या आहेत. एकशेवीस ही संख्येची मर्यादा प्रसिद्धीचा आधार घेऊन दिली आहे असे जाणावे. (२३९–२५४)

---

५५. 'त्रिभङ्गिरङ्गाभरणौ' असा हा द्वन्द्व समास पाहिजे. 'त्रिभङ्गि व रङ्गाभरण' असा त्याचा विग्रह होय. 'त्रिभङ्गिरङ्गाभरणो'—हा पाठ बरोबर नव्हे. पण अड्यार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तींत तो दिला असल्याने येथे घेतला आहे. संगीतसारामृत (पृ. १६७) यात 'त्रिभङ्गी रङ्गाभरणो'—असा पाठ मिळतो.

अभिनन्दोऽनङ्गनान्दीमल्लकङ्कालकन्दुकाः ।
एकताली च कुमुदश्चतुस्ताली च डोम्बुली ॥ २४७ ॥
अभङ्गो रायवङ्कोलो वसन्तो लघुशेखरः ।
प्रतापशेखरो झम्पा गजझम्पश्चतुर्मुखः ॥ २४८ ॥
मदनः प्रतिमण्ठश्च पार्वतीलोचनो रतिः ।
लीलाकरणयत्याख्यौ ललितो गारुगिस्तथा ॥ २४९ ॥
राजनारायणाख्यश्च लक्ष्मीशो ललितप्रियः ।
श्रीनन्दनश्च जनको वर्धनो रागवर्धनः ॥ २५० ॥
षट्तालश्चान्तरक्रीडा हंसोत्सवविलोकिताः ।
गजो वर्णयतिः सिंहः करणः सारसस्तथा ॥ २५१ ॥
चण्डतालश्चन्द्रकलालयस्कन्दोऽडुतालिकाः ।
घत्ता[५६] द्वन्द्वमुकुन्दौ च कुविन्दश्च कलध्वनिः ॥ २५२ ॥
गौरी सरस्वतीकण्ठाभरणो भग्नसंज्ञकः ।
तालो राजमृगाङ्कश्च राजमार्तण्डसंज्ञकः ॥ २५३ ॥
निःशङ्कः शार्ङ्गदेवश्चेत्येते सोढलसूनुना ।
देशीतालाः समादिष्टा विंशत्यभ्यधिकं शतम् ॥ २५४ ॥

नांदी, मल्ल, कंकाल, कंदुक, एकताली, कुमुद, चतुस्ताली, डोंबुली, (२४७) अभंग, रायवंकोल, वसंत, लघुशेखर, प्रतापशेखर, झंपा, गजझंप, चतुर्मुख, (२४८) मदन, प्रतिमंठ, पार्वतीलोचन, रति, लीला व करणयति या नावांचे, ललित तसेच गारुगि, (२४९) राजनारायण नावाचा, लक्ष्मीश, ललितप्रिय, श्रीनंदन, जनक, वर्धन, रागवर्धन, (२५०) षट्ताल, अंतरक्रीडा, हंस, उत्सव, विलोकित, गज, वर्णयति, सिंह, करण तसेच सारस, (२५१) चंडताल व चंद्रकला, लय, स्कंद, अडुतालिका, घत्ता, द्वन्द्व, मुकुंद, कुविंद आणि कलध्वनि, (२५२) गौरी, सरस्वतीकंठाभरण, भग्न नावाचा, राजमृगांक ताल व राजमार्तंड नावाचा (२५३), निःशंक आणि शार्ङ्गदेव असे हे एकशेवीस देशी ताल सोढलपुत्र (शार्ङ्गदेव) याने सांगितले आहेत. (२५४)

---

५६. 'घत्ता' या ऐवजी 'धत्ता' असा पाठ आनंदाश्रम आवृत्ती (पृ. ४३२) व संगीतसारामृत (पृ. १६७) यांत मिळतो. संगीतदर्पण (पृ. १३१) यात घत्ता असा पाठ आहे.

गुर्वाद्याश्चतुरश्रादेः खण्डयित्वा निवेशिताः ।
यद्वा लघ्वादिखण्डानामाधिक्यमिह दृश्यते ॥ २५५ ॥
तेनैषां खण्डतालत्वमभाषन्त पुरातनाः ।
द्रुताद्याद्यक्षरैर्ज्ञेयं सन्ति संज्ञान्तराण्यपि ॥ २५६ ॥
अर्धमात्रं तथा व्योम व्यञ्जनं बिन्दुकं द्रुते ।
लघुनि व्यापकं ह्रस्वं मात्रिकं सरलं तथा ॥ २५७ ॥
द्विमात्रं च कला वक्रं दीर्घं गुरुणि कीर्तितम् ।
प्लुते त्र्यङ्गं त्रिमात्रं च दीप्तं सामोद्भवं तथा ॥ २५८ ॥
द्रुते शंभुर्लघौ देवी गुरौ गौरीयुतः शिवः ।
प्लुते त्रयो विरिञ्चाद्या देवता मुनिभिः स्मृताः ॥ २५९ ॥
द्रुते बिन्दुर्विरामान्ते तूक्ता मात्रायुता लिपिः ।
प्लुते मात्रायुतो वक्रो लिपौ श्रीशार्ङ्गिणोदितः ॥ २६० ॥

यांत चतुरश्र इत्यादी तालांचे गुरू खंडित म्हणजे विभक्त करून योजले जातात किंवा लघु इत्यादी खंडांचे (म्हणजे भागांचे) आधिक्य दिसून येते, (२५५) म्हणून यांचे खंडताल हे स्वरूप प्राचीन (आचार्यांनी) सांगितले आहे. (या देशीतालांत) द्रुत इत्यादि (म्हणजे द्रुत, लघु, गुरु व प्लुत) त्यांच्या आरंभीच्या अक्षरांनी जाणावे. त्यांची इतरही नावे आहेत. (२५६)

द्रुताच्या बाबतीत, अर्धमात्र तसेच व्योम, व्यंजन व बिंदुक, लघूच्या बाबतीत, व्यापक, ह्रस्व, मात्रिक तसेच सरल, (२५७) (व) गुरूच्या बाबतीत, द्विमात्र, कला, वक्र आणि दीर्घ (अशी दुसरी नावे) सांगितली आहेत. प्लुताच्या बाबतीत, त्र्यंग, त्रिमात्र आणि दीप्त तसेच सामोद्भव (ही दुसरी नावे सांगितलेली आहेत.) (२५८)

द्रुताची शंभु, लघूची देवी, गुरूची गौरीसह शिव, व प्लुताची ब्रह्मदेव इत्यादि त्रयी (म्हणजे ब्रह्मा, विष्णु व महेश्वर या तीन) अशा देवता मुनींनी सांगितल्या आहेत. (२५९)

द्रुताच्या बाबतीत बिंदु (ही) लिपि (असून), विराम शेवटी असता ती मात्रायुक्त सांगितली आहे. प्लुताच्या बाबतीत लिपि योजताना, श्रीशार्ङ्गदेवाने मात्रायुक्त वक्र सांगितला आहे. (२६०)

क० देशीतालाचे खंडताल हे स्वरूप सयुक्तिकपणे दाखवीत आहे. द्रुत इत्यादि म्हणजे द्रुत, लघु, गुरु व प्लुत हे त्यांच्या नावांच्या आरंभीच्या अक्षरांनी जाणावेत, द्रुताचे पहिले अक्षर द, लघूचे ल, गुरूचे ग व प्लुताचे प अशी ही आद्यक्षरे पुढे जी लक्षणे सांगितली जाणार आहेत त्यांत योजिली आहेत. त्यांवरून द्रुत इत्यादी जाणावेत. द्रुत इत्यादींची अर्धमात्र इत्यादी दुसरी नावेही आहेत. तीही लक्षणवाक्यात (त्यांची नावे म्हणून) पहावीत. त्यात मगण इत्यादी आठ गणही क्वचित् मकार इत्यादी आद्याक्षरांनी जाणायचे आहेत. (२५५–२६०)

तालानां लक्षणं[५७] वक्ष्ये तेषां सूरिमताश्रितम् ।
लघ्वादितालो लोकेऽसौ रासः,
। इत्यादितालः (१)
द्वौ लौ द्वितीयकः ॥ २६१ ॥
० ० । इति द्वितीयकः (२)

आचार्यांच्या मतावर आधारलेले त्या तालांचे लक्षण (आता) सांगतो. एक लघु असलेला आदिताल (होय). लोकांत तो रास (या नावाने जाणला जातो).

। हा आदिताल होय. (१)

दोन द्रुतांनंतर एक लघु असणारा द्वितीयक (होय). (२६१)

० ० । हा द्वितीयक (होय). (२)

क० देशी तालांच्या लक्षणांचा अर्थ स्पष्ट आहे. पण त्यांतील काही तालांच्या लक्षणांत, नांवे वेगळी असली तरी अर्थ वेगळा नसल्याने पुनरुक्ति जाणवते. उदा. झंटुक तालाचे लक्षण, "दोन द्रुत व दोन लघू (असणारा) झंटुक होय" असे आहे; अड्डतालाचे लक्षण, "दोन द्रुत व दोन लघू (असणारा) अड्डताल होय" असे आहे; सालगसूड निःसारुतालाच्या वैकुंद या प्रकाराचे लक्षण, 'दोन द्रुत व दोन लघू यांनी वैकुंद होतो तो मंगलात योजावा." असे आहे; या तीन तालांत फक्त नावांचाच फरक आहे; स्वरूपाचा नाही. असाच प्रकार दर्पण, मदन व मकरंद यांच्या बाबतीत, तसेच निःसारु, हंसलील व हंस यांबाबत, त्याप्रमाणेच जया, शील व कमल यांच्या बाबतीत आणि उदीक्षण, सौंदर व सगण असणारा प्रतिमंठ यांच्या बाबतीत आहे; ढेंकी व वर्णमंठ, करुण व अमर, त्रिभंगि व रतिलील, क्रीडा व आनंद, शंख (क ?) व प्रतिताल, मंगलाभरण व प्रतिमंठ, कांतार व रतिलील, कलाप व विचार, तृतीय व अंतरक्रीडा, वर्णभिन्न व राजमृगांक, अभंग व उत्सव आणि विजय व द्वितीय यांतही परस्पर स्वरूपभेद नसल्याने पुनरुक्ति हा दोष उत्पन्न होतो; असे म्हटल्यास 'यासंबंधी, उत्कृष्ट बुद्धि असणारा कल्लिनाथ योग्य उत्तर देत आहे, (ते असे)– लक्ष्यानुसार (म्हणजे प्रत्यक्ष प्रचारात असल्याप्रमाणे) तालाबद्दलची (ही) पुनरुक्ति होय.'

या बाबतीत, पुनरुक्तस्वरूपाने गणना केलेल्या कुडुक्क इत्यादी तालांत जे लघु इत्यादी दिले आहेत त्यांचे प्रमाण देशीताल म्हणून ठराविक नसल्याने, प्रमाण वेगळे असल्यानेही स्वरूपाचा वेगळेपणा उत्पन्न होत असल्यामुळे पुनरुक्ति होत नाही; म्हणून तो दोष येत नाही असे म्हणता येते. उदा. गोपालनायकाने रागकदंबात कुडुक्कताल रेवगुप्ताप्रमाणे योजलेला नाही. त्यातला लघु चार लघू

---

५७. काही देशीतालांच्या लक्षणात, त्या तालांची नावे वेगळी असली तरी अर्थाचा फरक नसल्याने, पुनरुक्ति झाल्यासारखी दिसते. पण हा पुनरुक्तीचा दोष कसा येत नाही हे विस्ताराने व योग्य कारणे देऊन कल्लिनाथाने स्पष्ट केले आहे. लक्षण सारखे असले तरी लघु इत्यादींचे प्रमाण देशीतालांत ठराविक नसल्याने त्या तालाच्या स्वरूपाचा वेगळेपणा उत्पन्न होतो. म्हणून पुनरुक्ति होत नाही.

अक्षरांच्या उच्चाराच्या प्रमाणाचा विसून येतो. त्यानुसार त्यातला द्रुतही दोन लघू अक्षरांच्या उच्चाराच्या प्रमाणाचा दिसून येतो. अडुतालीत तर पाच लघू अक्षरांच्या उच्चाराच्या प्रमाणाचा लघु व त्याच्या अर्ध्या प्रमाणाचा द्रुत दिसून येतो. निःसारु तालाच्या वैकुंद या प्रकारात सहा लघू अक्षरांच्या उच्चाराच्या प्रमाणाचा लघु व त्याच्या अर्ध्या प्रमाणाचा द्रुत योजलेला असतो. याप्रमाणेच तिन्हींच्या पुनरुक्तीबाबतही सर्वत्र लघु इत्यादींच्या प्रमाणाचा वेगळेपणा जाणावा.

त्याचप्रमाणे ढेंकी या तालात पाच लघू अक्षरांच्या उच्चाराच्या प्रमाणाचा लघु व त्याच्या दुपटीने गुरु दिसून येतो. वल्लभमंठात तर चार लघू अक्षरांच्या उच्चाराच्या प्रमाणाचा लघु व त्याच्या दुपटीने गुरु दिसून येतो. अशा रीतीने दोन्हींच्या पुनरक्तिबाबतही, प्रस्तुत कमी वा अधिक असणाऱ्या प्रमाणांच्या वेगळेपणामध्ये प्रचारास अनुसरून लघु इत्यादींच्या दोन्ही प्रमाणांनी तालाच्या स्वरूपाचा वेगळेपणा जाणावा.

गीत इत्यादींत काही ठिकाणी केव्हा एकाच तालाच्या आवर्तनांत प्रमाणभिन्नता दिसून येते तर कोठे एकाच आवर्तनातही लघु इत्यादी तालाच्या भागांत प्रमाणभिन्नता दिसून येते. हे सर्व देशीतालप्रकारांचे भूषणच होय, दूषण नव्हे. असे हे देशीतालांचे रहस्य आचार्यांना मान्य असल्याचे समजावे.

पण देशीतालांच्या लक्षणांत विराम सांगितला आहे– उदा० 'विराम शेवटी असणारे दोन द्रुत (तो) तृतीय ताल होय' (यासारख्या लक्षणांत) तृतीयताल इ० काही देशी तालांमध्ये, द्रुताचा शेष म्हणून विराम दिला आहे. तसेच 'गजलीलात विराम शेवटी असणारे चार लघू सांगितले आहेत' अशा या गजताल इत्यादींत शेष म्हणून विराम दिला आहे. त्यांतल्या ह्या विरामाचे स्वरूप कोणते? असे विचारल्यास सांगतो की दोन्ही ठिकाणी विराम हा विच्छेदाचा पर्याय होय. तालव्यापारानंतरच्या विश्रांतीच्या (म्हणजे थांबण्याच्या) स्वरूपामुळे तो भिन्न कालयुक्त असतो. म्हणजेच द्रुताचा शेष असा विराम तालप्रचारात द्रुताच्या निम्म्या कालाचा असतो. लघूचा शेष (असणारा विराम त्याच्या निम्म्या कालाचा म्हणजे) द्रुतकालाचा असतो. अशा रीतीने विरामाचे भिन्नकाल असण्याचे स्वरूप समजण्याच्या बाबतीत गुरु व प्लुत यांचे विराम शेवटी असणारे सांगणेच ज्ञापक (म्हणजे ज्ञान करून देणारे) होय. स्पष्ट करायचे म्हणजे असे की जर विराम शेवटी असणारा गुरु म्हटला असेल तर गुरूचा विरामही त्याच्या अर्ध्याप्रमाणाचा म्हणून लघु या कालाचा होईल. म्हणजेच दुसऱ्या प्रकाराने प्लुत सांगितला आहे असे होईल. तसेच प्लुताचाही विराम दीड मात्रा या कालाचा होईल. म्हणजे प्लुत साडेचार मात्रांचा होईल. तसेच तशाप्रकारचा तालभाग कोठेही मिळत नसल्याने अपसिद्धांत व अपप्रयोग हे दोष प्राप्त होतील. म्हणून विरामयुक्त गुरु व प्लुत हे सांगणेच द्रुत व लघु यांच्या विरामांची भिन्नरूपता जाणवून देते असे सिद्ध होते.

या बाबतीत स्वतःला भरत मानणारे काही आधुनिक (आचार्य) विराम हाही तालाचा अवयव म्हणून स्वीकारून, प्रस्तार इत्यादी तालप्रत्ययांत त्याचाही समावेश करून स्वतःची विद्वत्ता प्रकाशित करीत अडाणी लोकांची प्रतारणा करतात. ते स्वतःचे शास्त्रविषयक अपूर्ण ज्ञानच प्रकाशित करीत आहेत असे प्रकट करणाऱ्या अभिनव भरताचार्य सर्वज्ञ चतुर व विद्वान कल्लिनाथाने विराम हा तालाचा अवयव नसण्याच्या संबंधी चार कारणे देऊन संग्रह श्लोक रचलेला आहे. तो असा– 'तालव्यापार नसल्याने, तालक्रिया नसणे हे स्वरूप असल्याने, दुसऱ्यावर अवलंबून असल्याने व भिन्नरूप असल्याने विराम प्रस्तार इत्यादीत (तालाचा अवयव म्हणून सांगण्यास) योग्य नाही.

द्रुताद् द्रुतौ विरामान्तौ तृतीयः स्यात्

० ० ◌̆ इति तृतीयः (३)

चतुर्थकः ।

लघुद्वयं द्रुतश्चैकः

।। ० इति चतुर्थकः (४)

पञ्चमस्तु द्रुतद्वयम् ॥ २६२ ॥

०० इति पञ्चमः (५)

ताले निःशङ्कलीलाख्ये प्लुतौ द्वौ गद्वयं लघुः ।

ऽ̀ ऽ̀ ऽ ऽ ऽ । इति निःशङ्कलीलः (६)

दर्पणे द्वद्वयं गश्च

द्रुतानंतर विराम शेवटी असणारे दोन द्रुत (हा) तृतीय ताल होय.

० ० ◌̆ हा तृतीय ताल. (३)

चतुर्थ ताल दोन लघू व एक द्रुत (हा होय).

।। ० हा चतुर्थ ताल. (४)

द्रोन द्रुत (असणारा) पंचम ताल (होय). (२६२)

०० हा पंचम ताल. (५)

निःशंकलील नावाच्या तालात दोन प्लुत, दोन गुरू व एक लघु (असतो).

ऽ̀ ऽ̀ ऽ ऽ ऽ । हा निःशंकलील. (६)

दर्पणात दोन द्रुत व गुरु असतो.

विराम हा प्रस्तार इत्यादींना योग्य नाही या कार्याच्या निषेधाने कारणाचा म्हणजे तालाचा अवयव असणे या स्वरूपाचा निषेधही (कार्य व कारण यांच्या) सततच्या साहचर्यामुळे सिद्ध होत असल्याचे जाणावे. येथे वरील चारही कारणे प्रत्येकी साध्य व साधन या बाबतीत समर्थ आहेत असे जाणावे. हे मान्य न करणाऱ्याला उद्देशून त्यानेच दोन श्लोकांनी आपले म्हणणे सांगितले आहे–

'क्रियाविश्रान्ति हे स्वरूप असणाऱ्या विरामाचे जर हे प्रस्तार इत्यादी होतील तर लयीची अनंतता प्राप्त होईल. त्याचा स्वीकार केल्यास अतिव्याप्तीच्या दोषाने शास्त्र व्याकुळ होईल. म्हणून विरामासह प्रस्तार इत्यादी सांगणे व्यर्थ आहे.'

आता प्रस्तुत विषयाला अनुसरतो. (२६१).

००ऽ इति दर्पणः (७)

सिंहविक्रमसंज्ञकः ॥ २६३ ॥

गत्रयं लः पलगपाः

ऽऽऽ।ऽ।ऽऽ इति सिंहविक्रमः (८)

रतिलीले लघू गुरू ।

।।ऽऽ इति रतिलीलः (९)

लघ्वन्ते दत्रयं सिंहलीलो[५८]

०००। इति सिंहलीलः (१०)

दौ यगणस्तथा ॥ २६४ ॥

कंदर्पतालस्तस्यैव पर्यायः स्यात्परिक्रमः ।

००।ऽऽ इति कंदर्पः (११)

लघुर्द्रुतद्वयं चान्ते गुरुः स्याद्वीरविक्रमः ॥ २६५ ॥

००ऽ हा दर्पण. (७)

सिंहविक्रम नावाचा ताल (२६३) तीन गुरू, लघु, प्लुत, लघु, गुरु व प्लुत (यांनी होतो).

ऽऽऽ।ऽ।ऽऽ हा सिंहविक्रम. (८)

रतिलीलात दोन लघू व दोन गुरू (असतात).

।।ऽऽ हा रतिलील. (९)

तीन द्रुत व शेवटी लघु (असणारा) सिंहलील (होय).

०००। हा सिंहलील. (१०)

तसेच दोन द्रुत व यगण (म्हणजे लघु, गुरु व गुरु) हा (२६४) कंदर्पताल होय; परिक्रम हा त्याचाच पर्याय (म्हणजे दुसरे नाव).

००।ऽऽ हा कंदर्प. (११)

लघु, दोन द्रुत व शेवटी गुरु (असणारा) वीरविक्रम होय. (२६५)

---

५८. सुधाकरटीकेत 'आरंभी व शेवटी लघु असणारे तीन द्रुत (हा) सिंहलील ताल' असे म्हटले आहे. त्यानुसार सिंहलीलाचे स्वरूप ।०००। असे होते. यावरून 'लघ्वद्यन्ते' असा पाठ या टीकाकाराने घेतलेला दिसतो. पण असा पाठ वृत्ताच्या दृष्टीने जुळत नाही. शिवाय अडघार आवृत्ति, संगीतसारामृत व संगीतदर्पण यांत 'लघ्वन्ते' असाच पाठ मिळतो. तोच पाठ स्वीकारणे योग्य आहे.

।०० ऽ इति वीरविक्रमः (१२)

रङ्गश्चतुर्द्रुती गश्च

०००० ऽ इति रङ्गः (१३)

श्रीरङ्गः सगणो लघौ ।

।। ऽ । ऽ इति श्रीरङ्गः (१४)

विरामान्तद्रुतद्वन्द्वान्यष्टौ लघु च चच्चरी ॥ २६६ ॥

०००००००००००००००। इति चच्चरी (१५)

प्रत्यङ्गो मगणो लौ द्वौ

ऽ ऽ ऽ । । इति प्रत्यङ्गः (१६)

यतिलग्नो द्रुतो लघुः ।

०। इति यतिलग्नः (१७)

गजलीलो[५९] विरामान्तमुक्तं लघुचतुष्टयम् ॥ २६७ ॥

।०० ऽ हा वीरविक्रम. (१२)

चार द्रुत व गुरु असणारा रंगताल (होय).

०००० ऽ हा रंग (१३)

सगण (म्हणजे लघु, लघु व गुरु), लघु व प्लुत असणारा श्रीरंगताल (होय).

।। ऽ । ऽ हा श्रीरंग. (१४)

विराम शेवटी असणाऱ्या द्रुतांच्या आठ जोड्या व लघु (असणारा) चच्चरी ताल (होय). (२६६)

०००००००००००००००। हा चच्चरीताल. (१५)

मगण (म्हणजे तीन गुरू) व दोन लघू (असणारा) प्रत्यंग (होय).

ऽ ऽ ऽ । । हा प्रत्यंग. (१६)

द्रुत व लघु (असणारा) यतिलग्न (होय).

०। हा यतिलग्न. (१७)

गजलील (तालात) विराम शेवटी असणारे चार लघू सांगितले आहेत.

।।।। हा गजलील. (१८) (२६७)

---

५९. कल्लिनाथाने देशीतालांच्या लक्षणांतील पुनरुक्तीचा भासणारा दोष दूर करण्यासाठी आरंभी विवेचन केले आहे व नंतर विरामाचे स्पष्टीकरण दिले आहे. ते देताना गजलीलाचे लक्षण उद्धृत केले आहे. त्यात 'गजलीले' असा पाठ आहे. भाषांतराच्या दृष्टीने तो अधिक जुळतो. पण आनंदाश्रम व अडचार या दोन्ही आवृत्तींत तसेच संगीतसारामृत व संगीतदर्पण यांतही 'गजलीलो' असा पाठ मिळत असल्याने तो येथे घेतला आहे.

।।।।ं इति गजलीलः (१८)

हंसलीले विरामान्तं लघुद्वयमुदाहृतम् ।

।।ं इति हंसलीलः (१९)

वर्णभिन्नो द्रुतौ लो गः

० ०।ऽ इति वर्णभिन्नः (२०)

त्रिभिन्नो लगुरप्लुताः ॥ २६८ ॥

।ऽऽ इति त्रिभिन्नः (२१)

राजचूडामणिर्दौ द्वौ नगणश्च द्रुतौ लगौ ।

०० ।।।०० ।ऽ इति राजचूडामणिः (२२)

मगणो लप्लुतौ रङ्गोद्योतः

ऽऽऽ।ऽ इति रङ्गोद्योतः (२३)

रङ्गप्रदीपकः ॥ २६९ ॥

तो गप्लुतौ

ऽऽ।ऽऽ इति रङ्गप्रदीपकः (२४)

हंसलीलात विराम शेवटी असणारे दोन लघू सांगितले आहेत.

।।ं हा हंसलील. (१९)

दोन द्रुत, लघु व गुरु (असणारा) वर्णभिन्न (होय).

०० ।ऽ हा वर्णभिन्न. (२०)

लघु, गुरु व प्लुत (असणारा) त्रिभिन्न होय. (२६८)

।ऽऽ हा त्रिभिन्न. (२१)

दोन द्रुत, नगण (म्हणजे लघु, लघु, लघु), दोन द्रुत आणि लघु व गुरु (असणारा) राजचूडामणि (होय).

०० ।।।०० ।ऽ हा राजचूडामणि. (२२)

मगण (म्हणजे गुरु, गुरु, गुरु), लघु व प्लुत (असणारा) रंगोद्योत (होय).

ऽऽऽ।ऽ हा रंगोद्योत. (२३)

रंगप्रदीपक (तालात) (२६९), तगण (म्हणजे गुरु, गुरु, लघु), गुरु व प्लुत (हे असतात).

ऽऽ।ऽऽ हा रंगप्रदीपक. (२४)

राजतालो गपौ दौ च गलौ प्लुतः।

ऽऽ॰ ० ऽ। ऽ इति राजतालः (२५)

त्र्यश्रो मिश्रो द्विधा वर्णस्त्र्यश्रो लौ दौ लघुद्वयम् ॥ २७० ॥

(१) ।। ० ०।। इति त्र्यश्रवर्णः

मिश्रो द्रुतचतुष्काः स्युर्विरामान्तास्त्रयः पृथक्।

ततः पगौ दौ गलौ गः

(२) ० ० ० ० ० ० ० ० ० ० ऽ ऽ ० ० ऽ। ऽ

इति मिश्रवर्णः

चतुरश्रोऽपि दृश्यते ॥ २७१ ॥

गलौ द्रुतौ गुरुश्चेति

(३) ऽ। ० ० ऽ इति चतुरश्रवर्णः (२६)

सिंहविक्रीडितः पुनः।

लपौ गपौ पगौ लाद्रः पलौ पश्च

गुरु, प्लुत, दोन द्रुत, गुरु आणि लघु व प्लुत (असणारा) राजताल (होय).

ऽऽ॰ ० ऽ। ऽ हा राजताल. (२५)

वर्णताल त्र्यश्र व मिश्र असा दोन प्रकारचा (आहे). दोन लघू, दोन द्रुत व दोन लघू (असणारा) त्र्यश्र (होय). (२७०)

(१) ।। ० ०।। हा त्र्यश्र वर्ण.

विराम शेवटी असलेले असे तीन वेळा वेगवेगळे चार द्रुत, नंतर प्लुत, गुरु, दोन द्रुत, गुरु, लघु व गुरु (हे असणारा) मिश्रवर्ण (होय).

(२) ० ० ० ० ० ० ० ० ० ० ऽ ऽ ० ० ऽ। ऽ हा मिश्रवर्ण.

चतुरश्र (वर्ण) ही दिसून येतो. (२७१) तो गुरु, लघु, दोन द्रुत व गुरु (असणारा) असा होय.

(३) ऽ। ० ० ऽ हा चतुरश्र वर्ण. (२६)

पुन्हा सिंहविक्रीडित लघु, प्लुत, गुरु, प्लुत, प्लुत, गुरु, लघु व नंतर गुरु, (मग) प्लुत, लघु आणि प्लुत (हे असणारा होय).

।ऽऽऽऽऽ।ऽऽ।ऽ इति सिंहविक्रीडितः (२७)
जयः पुनः॥ २७२॥

जो लघुर्द्वौ द्रुतौ पश्च

।ऽ।।००ऽ इति जयः (२८)
वनमाली चतुर्द्रुती।

लघुर्दौ द्वौ गुरुरिति

००००।००ऽ इति वनमाली (२९)
लप्लुतौ द्वौ द्रुतौ प्लुतः॥ २७३॥

हंसनादः

।ऽ००ऽ इति हंसनादः (३०)
सिंहनादो यगणश्च लघुर्गुरुः।

।ऽऽ।ऽ इति सिंहनादः (३१)

कुडुक्को द्वौ द्रुतौ लौ द्वौ

००।। इति कुडुक्कः (३२)
विरामान्तद्रुतद्वयात्॥ २७४॥

द्रुतौ तुरङ्गलीलः स्यात्,

।ऽऽऽऽऽ।ऽऽ।ऽ हा सिंहविक्रीडित. (२७)

आणि जय (हा ताल) (२७२), जगण (म्हणजे लघु, गुरु व लघु), लघु, दोन द्रुत व प्लुत (हे असणारा होय).

।ऽ।।००ऽ हा जय. (२८)

वनमाली ताल चार द्रुत, लघु, दोन द्रुत व गुरु (हे असणारा होय).

००००।००ऽ हा वनमाली. (२९)

लघु, प्लुत, दोन द्रुत व प्लुत (असणारा) (२७३) हंसनाद (होय).

।ऽ००ऽ हा हंसनाद. (३०)

यगण (म्हणजे लघु, गुरु व गुरु), लघु आणि गुरु (असणारा) सिंहनाद (ताल होय).

।ऽऽ।ऽ हा सिंहनाद. (३१)

दोन द्रुत व दोन लघू (असणारा) कुडुक्क (होय).

००।। हा कुडुक्क. (३२)

विराम शेवटी असणाऱ्या दोन द्रुतानंतर (२७४) दोन द्रुत (म्हणजे) तुरंगलील (होय).

ᵒ ᵒ
ᵒ ᵒ ᵒ ᵒ इति तुरङ्गलीलः (३३)

भवेच्छरभलीलकः ।

लौ द्वौ चतुर्द्रुती द्वौ लौ

।। ᵒ ᵒ ᵒ ᵒ ।। इति शरभलीलः (३४)

सिंहनन्दनकः पुनः ॥ २७५ ॥

तपौ लगौ द्रुतौ गौ लः पलपा गो लघू ततः ।

चत्वारो लघवोऽशब्दाः[६०],

ऽऽ।ऽ।ऽ००ऽऽ।ऽ।ऽऽ।। ४ × इति सिंहनन्दनः (३५)

त्रिभङ्गिः सगणाद्गुरुः ॥ २७६ ॥

।।ऽऽ इति त्रिभङ्गिः (३६)

रङ्गाभरणताले ताल्लप्लुतौ

ऽऽ।।ऽ इति रङ्गाभरणः (३७)

ᵒ ᵒ
ᵒ ᵒ ᵒ ᵒ हा तुरंगलील. (३३)

शरभलील (म्हणजे) दोन लघू, चार द्रुत, व दोन लघू (असणारा असा) होय.

।। ᵒ ᵒ ᵒ ᵒ ।। हा शरभलील. (३४)

पुन्हा सिंहनंदन (हा ताल) (२७५) तगण (म्हणजे गुरु, गुरु, लघु), प्लुत, लघु, गुरु, दोन द्रुत, दोन गुरु, लघु, प्लुत, लघु, प्लुत, गुरु, दोन लघू नंतर शब्दरहित चार लघू (हे असणारा होय).

ऽऽ।ऽ।ऽ ०० ऽऽ।ऽ।ऽऽ।। ४ × हा सिंहनंदन (३५)

सगणानंतर (म्हणजे लघु, लघु व गुरु यांनंतर) गुरु (असणारा) त्रिभंगि (होय). (२७६)

।।ऽऽ हा त्रिभंगि. (३६)

रंगाभरण तालात तगणानंतर (म्हणजे गुरु, गुरु, लघु यांनंतर) लघु व प्लुत (हे असतात).

ऽऽ।।ऽ हा रंगाभरण. (३७)

---

६०. ' अशब्द ' याचे स्पष्टीकरण सुधाकरटीकेत ' अशब्दपाटाने धारण करायचे , असे दिले आहे.

मण्ठके पुनः ।

साच्चतुर्लघु निःशब्दं

(१) ।।ऽ४ × इति मण्ठः (३८)

यद्वा भाद् [६१]भावशब्दकौ ॥ २७७ ॥

(२) ऽ।।२ × इति वा मण्ठः ।

भाच्चतुर्लघु निःशब्दं भवेन्मुद्रितमण्ठके ।

(३) ऽ।।४ × इति मुद्रितमण्ठः ।

मण्ठो नजौ लघुर्यद्वा

(४) ।।।।ऽ।। इति वा मण्ठः ।

प्रोक्ताः षडपरे भिदाः ॥ २७८ ॥

मण्ठरूपकवेलायाम्,

इति दशविधो मण्ठः ।

मंठकात पुन्हा सगणानंतर (म्हणजे लघु, लघु, गुरु यांनंतर) निःशब्द (पाठाने धारण करायचे) चार लघू (असतात).

(१) ।।ऽ४ × हा मंठ. (३८)

किंवा भगणानंतर (म्हणजे गुरु, लघु, लघु यांच्यानंतर) निःशब्द दोन भगण (असतात). (२७७)

(२) ऽ।।२ × किंवा हा (दुसरा) मंठ.

मुद्रितमंठात भगणानंतर निःशब्द चार लघू असतात.

(३) ऽ।।४ × हा मुद्रितमंठ.

अथवा नगण (म्हणजे लघु, लघु, लघु), जगण (म्हणजे लघु, गुरु, लघु) आणि लघु (असणारा) मंठ (होय).

(४) ।।।।ऽ।। किंवा हा मंठ.

मंठाचे दुसरे सहा प्रकार (२७८) मंठरूपकाच्या वेळी सांगितले आहेत.

असा हा दहा प्रकारचा मंठ होय.

---

६१. आनंदाश्रम आवृत्तीत 'भाद्भावशब्दकौ' असा पाठ आहे. हाच पाठ संगीतसारामृत यातही मिळतो. त्यानुसार 'भगणानंतर दोन निःशब्द भगण' असे या मंठप्रकाराचे लक्षण होईल. संगीतदर्पणात या लक्षणानुसार हा मंठप्रकार ऽ।।ऽ।।ऽ।। असा दिला आहे. अड्यार आवृत्ती-प्रमाणेच आनंदाश्रम आवृत्तीतही हा ताल 'ऽ।।२×' असाच दिला असल्याने अड्यार आवृत्तीतील 'भाद्द्वावशब्दकौ' हा पाठ बरोबर नाही. म्हणून आनंदाश्रम आवृत्तीप्रमाणे पाठ स्वीकारला आहे. सुधाकर टीकेतील स्पष्टीकरणही 'भगणानंतर दोन निःशब्द भगण' असेच आहे.

कोकिलाप्रियनाम्नि तु ।

गलपाः स्युः,

ऽ । ऽ इति कोकिलाप्रियः (३९)

विरामान्तौ लघू निःसारुको मतः ॥ २७९ ॥

। । इति निःसारुकः (४०)

लघुर्गुरुर्द्रुतद्वन्द्वं राजविद्याधरो भवेत् ।

। ऽ ० ० इति राजविद्याधरः (४१)

सगणद्वितयं यत्र स तालो जयमङ्गलः ॥ २८० ॥

। । ऽ । । ऽ इति जयमङ्गलः (४२)

मल्लिकामोदताले तु लौ द्वौ द्रुतचतुष्टयम् ।

। । ० ० ० ० इति मल्लिकामोदः (४३)

विजयानन्दसंज्ञे तु लघुद्वन्द्वं गुरुत्रयम् ॥ २८१ ॥

। । ऽ ऽ ऽ इति विजयानन्दः (४४)

क्रीडा द्रुतौ विरामान्तौ चण्डनिःसारुकश्च सः ।

कोकिलाप्रिय नावाच्या तालात गुरु, लघु व प्लुत (हे) असतात.

ऽ । ऽ हा कोकिलाप्रिय. (३९)

विराम शेवटी असलेले दोन लघू (असणारा) निःसारुक मानला आहे (२७९)

। । हा निःसारुक. (४०)

लघु, गुरु व दोन द्रुत (असणारा) राजविद्याधर होय.

। ऽ ० ० हा राजविद्याधर. (४१)

ज्यात दोन सगण (असतात) तो जयमंगल ताल (होय). (२८०)

। । ऽ । । ऽ हा जयमंगल. (४२)

मल्लिकामोद तालात दोन लघू व चार द्रुत (असतात)

। । ० ० ० ० हा मल्लिकामोद. (४३)

विजयानंद नावाच्या तालात दोन लघू व तीन गुरू (असतात) (२८१)

। । ऽ ऽ ऽ हा विजयानंद. (४४)

विराम शेवटी असणारे दोन द्रुत (हा) क्रीडाताल होय व तोच चंडनिःसारुक होय.

ᵒ ᵒ इति क्रीडातालः, चण्डनिःसारुकश्च (४५)

जयश्री रगणाल्लो गः

ऽ।ऽ।ऽ इति जयश्रीः (४६)

दौ लौ लो मकरन्दकः ॥ २८२ ॥

ᴗ ᴗ।।। इति मकरन्दः (४७)

लघौ गलौ प्लुतः कीर्तिः

।ऽ̀ऽ।ऽ̀ इति कीर्तितालः (४८)

श्रीकीर्तिर्द्वौ गुरू लघू ।

ऽऽ।। इति श्रीकीर्तिः (४९)

लौ द्रुतौ प्रतितालः स्यात्,

।।ᴗ ᴗ इति प्रतितालः (५०)

विजयः पगणा लघुः ॥ २८३ ॥

ऽ̀ऽऽ̀। इति विजयः (५१)

गुर्वोर्मध्ये तु चत्वारो बिन्दवो बिन्दुमालिनि ।

ᵒ ᵒ हा क्रीडाताल व चंडनिःसारुकताल. (४५)

रगणानंतर (म्हणजे गुरु, लघु, गुरु यांनंतर) लघु आणि गुरु (असणारा) जयश्री (होय).

ऽ।ऽ।ऽ हा जयश्री. (४६)

दोन द्रुत, दोन लघू व लघु (असणारा) मकरंद (होय). (२८२)

ᴗ ᴗ।।। हा मकरंद. (४७)

लघु, प्लुत, गुरु, लघु व प्लुत (असणारा) कीर्ति (होय).

।ऽ̀ऽ।ऽ̀ हा कीर्तिताल. (४८)

दोन गुरू व दोन लघू (असणारा) श्रीकीर्ति (होय).

ऽऽ।। हा श्रीकीर्ति. (४९)

दोन लघू व दोन द्रुत (असणारा) प्रतिताल होय.

।।ᴗ ᴗ हा प्रतिताल. (५०)

प्लुत, गुरु, प्लुत व लघु (असणारा) विजय (होय). (२८३)

ऽ̀ऽऽ̀। हा विजय. (५१)

बिंदुमाली तालात दोन गुरूंच्या मध्ये चार बिंदु (म्हणजे) द्रुत (असतात).

ऽ ० ० ० ० ऽ इति बिन्दुमाली (५२)

समो लौ दौ विरामान्तौ

।। ० ० इति समः (५३)

लघुर्दौ पश्च नन्दनः ॥ २८४ ॥

। ० ० ऽ इति नन्दनः (५४)

गुरुद्रुतप्लुताः प्रोक्ता मण्ठिका,

ऽ ० ऽ इति मण्ठिका ।

अन्यैस्तु लद्वयम् ।

विरामादिद्रुतौ द्वौ च मण्ठिका परिकीर्तिता ॥ २८५ ॥

।। ० ० इति मण्ठिका (५५)

दीपको दलगा द्विर्द्विः,

० ०।। ऽ ऽ इति दीपकः (५६)

लौ द्वौ गुरुरुदीक्षणः ।

।। ऽ इत्युदीक्षणः । (५७)

ऽ ० ० ० ० ऽ हा बिंदुमाली. (५२)

दोन लघू व विराम शेवटी असणारे दोन द्रुत (हा) सम(होय).

।। ० ० हा सम. (५३)

लघु, दोन द्रुत व प्लुत (असणारा) नंदन (होय). (२८४)

। ० ० ऽ हा नंदन. (५४)

गुरु, द्रुत व प्लुत (यांनी) मंठिका सांगितली आहे.

ऽ ० ऽ ही मंठिका.

पण दुसऱ्या (आचार्यांनी) दोन लघू व विराम आरंभी असणारे दोन द्रुत (यांनी) मंठिका सांगितली आहे. (२८५)

।। ० ० ही मंठिका. (५५)

दोन दोनदा द्रुत, लघु व गुरु (असणारा) दीपक (होय).

० ०।। ऽ ऽ हा दीपक. (५६)

दोन लघू व गुरु (असणारा) उदीक्षण (होय).

।। ऽ हा उदीक्षण. (५७).

रगणो ढेङ्किका कैश्चिदेष प्रोक्तस्तु योजनः ॥ २८६ ॥

ऽ।ऽ इति ढेङ्की (५८)

द्विश्चत्वारो विरामान्ता द्रुतास्तु विषमे मताः ।

ऽ ० ० ऽ ० ० ० ऽ इति विषमः (५९)

द्वौ लौ द्वौ दौ लघुर्दौ द्वौ कीर्तिता वर्णमण्ठिका ॥ २८७ ॥

।।००।०० इति वर्णमण्ठिका (६०)

अभिनन्दो लघुद्वन्द्वं द्रुतयुग्मं गुरुस्तथा ।

।।०० ऽ इत्यभिनन्दः (६१)

लप्लुतौ सगणोऽनङ्गः,

।ऽ।। ऽ इत्यनङ्गः (६२)

नान्दी लो दौ लघू गुरू ॥ २८८ ॥

।००।।ऽऽ इति नान्दी (६३)

मल्लतालो विरामान्तद्विबिन्द्वन्तं चतुर्लघु ।

र गण (म्हणजे गुरु, लघु व गुरु) (असणारा) ढेंकीताल (होय); पण काहींनी हा योजन म्हणून सांगितला आहे. (२८६)

ऽ।ऽ ही ढेंकी. (५८)

विषमतालात विराम शेवटी असणारे चार द्रुत दोन वेळा मानले आहेत.

ऽ ० ० ऽ ० ० ० ऽ हा विषम. (५९).

दोन लघू, दोन द्रुत, लघु व दोन द्रुत (असणारी) वर्णमंठिका म्हटली आहे. (२८७)

।।००।०० ही वर्णमंठिका. (६०)

दोन लघु, दोन द्रुत तसेच गुरु (असणारा) अभिनंद (होय).

।।०० ऽ हा अभिनंद. (६१)

लघु, प्लुत व सगण (म्हणजे लघु, लघु व गुरु) (असणारा) अनंगताल (होय).

।ऽ।। ऽ हा अनंग. (६२)

लघु, दोन द्रुत, दोन लघू व दोन गुरू (असणारा) नांदी (होय). (२८८)

।००।।ऽऽ हा नांदी. (६३)

चार लघूंच्या शेवटी, विराम अंती असणारे दोन बिंदू (म्हणजे द्रुत) (ज्यात आहेत तो) मल्लताल (होय).

।।।।ं ० ० इति मल्लतालः (६४)

उक्तश्चतुर्धा कङ्कालः पूर्णः खण्डः समोऽसमः ॥ २८९ ॥

चतुर्द्रुती गलौ पूर्णः

(१) ० ० ० ० ऽ। इति पूर्णः

खण्डो द्वौ द्वौ गुरुद्वयम्।

(२) ० ० ऽऽ इति खण्डः

समो गुरू द्वौ [६२]लघ्वन्तौ

(३) ऽऽ। इति समः

विषमो लाद् गुरुद्वयम् ॥ २९० ॥

(४) ।ऽऽ इति विषमः (६५)

इति चतुर्धा कङ्कालः।

कन्दुको लौ च सगणः,

।।।।ऽ इति कन्दुकः (६६)

द्रुतेन त्वेकतालिका।

।।।।ं ० ० हा मल्लताल. (६४)

पूर्ण, खंड, सम व असम असा चार प्रकारचा कंकाल सांगितला आहे. (२८९)

चार द्रुत, गुरु व लघु (असणारा) पूर्ण (कंकाल) (होय).

(१) ० ० ० ० ऽ। हा पूर्ण.

दोन द्रुत व दोन गुरू (असणारा) खंड (होय).

(२) ० ० ऽ ऽ हा खंड.

लघु शेवटी असणारे दोन गुरू (ज्यात आहेत तो) सम (होय).

(३) ऽ ऽ। हा सम.

लघूनंतर दोन गुरू (असणारा) विषम (होय). (२९०)

(४) ।ऽ ऽ हा विषम. (६५)

असा हा चार प्रकारचा कंकाल होय.

दोन लघू व सगण (म्हणजे लघु, लघु, गुरु) (असणारा) कंदुक (होय).

।।।।ऽ हा कंदुक. (६६)

एका द्रुताने एकताली (हा ताल होतो).

---

६२. आनंदाश्रम आवृत्ति, संगीतसारामृत व संगीतदर्पण यांत 'लघ्वन्तौ' असा पाठ मिळतो. तो स्वीकारून त्याप्रमाणे भाषांतर केले आहे. अडचार आवृत्तीत 'लघ्वन्ते' असा पाठ घेतलेला आहे. आणि सुधाकरटीकेत 'गुरुद्वय व शेवटी लघु' असे स्पष्टीकरण दिले आहे.

० इत्येकताली (६७)

कुमुदो लाद् द्रुतौ लौ गश्च ,

।००।।ऽ इति कुमुदः (६८)

अन्येषां लश्चतुर्द्रुती ॥ २९१ ॥

अन्ते गुरुश्च कुमुदः ,

।०००० ऽ इति वा कुमुदः ।

चतुस्तालो गुरोःपरे ।

त्रयो द्रुताः ,

ऽ००० इति चतुस्तालः (६९)

डोम्बुली तु द्विर्लघु स्याद्विरामवत्* ॥ २९२ ॥

।। इति डोम्बुली (७०)

अभङ्गो लप्लुतौ ,

।ऽ इत्यभङ्गः (७१)

रायवङ्कोलो रगणाद् द्रुतौ ।

---

० हा एकताली. (६७)

एका लघूनंतर दोन द्रुत, दोन लघू व गुरु (असणारा) कुमुद (होय).

।००।।ऽ हा कुमुद. (६८)

इतरांच्या (मते) लघु, चार द्रुत (२९१) व शेवटी गुरु (असणारा) कुमुद (होय).

।०००० ऽ किंवा हा कुमुद.

गुरूच्या नंतर तीन द्रुत (असणारा) चतुस्ताल (होय).

ऽ००० हा चतुस्ताल. (६९)

आणि विरामयुक्त दोन वेळा लघू (असणारा) डोंबुली होय. (२९२)

।। हा डोंबुली. (७०)

लघु व प्लुत (असणारा) अभंग (ताल होय).

।ऽ हा अभंग. (७१)

र गणानंतर (म्हणजे गुरु, लघु व गुरु यांनंतर) दोन द्रुत (असणारा) रायवंकोल (होय).

---

* अडचार आवृत्तीत 'द्विर्लघुः स्याद्विरामवत् ।' असा पाठ आहे. तो बरोबर नाही. संगीतदर्पणात (पृ. १४८) 'द्विलघुः स्याद्विरामवान् ।' असा पाठ आहे. आनंदाश्रम आवृत्तीतील 'द्विर्लघु स्याद्विरामवत् ।' हा योग्य पाठ येथे घेतला आहे.

ऽ।ऽ०० इति रायवङ्कोलः (७२)

वसन्तो न्मौ ,

।।।ऽऽऽ इति वसन्तः (७३)

विरामान्तलघुना लघुशेखरः ॥ २९३ ॥

ऽ इति लघुशेखरः (७४)

प्रतापशेखरो दीप्ताद्विरामान्तं द्रुतद्वयम् ।

ऽ० ० इति प्रतापशेखरः (७५)

झम्पातालो विरामान्तं द्रुतद्वन्द्वं लघुस्तथा ॥ २९४ ॥

० ०। इति झम्पातालः (७६)

गजझम्पो गुरोरूर्ध्वं विरामान्तं द्रुतत्रयम् ।

ऽ० ० ० इति गजझम्पः (७७)

चतुर्मुखो जप्लुताभ्यां स एवोन्मातृको[६३] मतः ॥ २९५ ॥

ऽ।ऽ०० हा रायवंकोल. (७२)

नगण (म्हणजे लघु, लघु व लघु) व मगण (म्हणजे गुरु, गुरु व गुरु) (असणारा) वसंत (होय).

।।।ऽऽऽ हा वसंत. (७३)

विराम शेवटी असणाऱ्या लघूने लघुशेखर (हा ताल होतो). (२९३)

ऽ हा लघुशेखर. (७४)

दीप्तानंतर (म्हणजे प्लुतानंतर) विराम शेवटी असणारे दोन द्रुत (ज्यात आहेत तो) प्रतापशेखर (होय).

ऽ०० हा प्रतापशेखर (७५)

विराम शेवटी असणारे दोन द्रुत व लघु (यांनी) झंपाताल (होतो). (२९४)

०० । हा झंपाताल. (७६)

गुरूच्या नंतर विराम शेवटी असणारे तीन द्रुत (ज्यात आहेत तो) गजझंप (होय).

ऽ०० ० हा गजझंप. (७७)

जगण (म्हणजे लघु, गुरु व लघु) आणि प्लुत यांनी चतुर्मुख (होतो). तोच उन्मातृक मानला आहे. (२९५)

---

६३. अडचार आवृत्तीत 'मात्रिकः स्यात्स एव हि' असा पाठ आहे. यावरून 'मात्रिक' हे नाव मिळते. संगीतदर्पणांत (पृ. १४४) 'उमानक' हे नाव मिळते.

।ऽ।ऽ इति चतुर्मुखः (७८)

द्वयं गश्च मदनः,

००ऽ इति मदनः (७९)

सो भो [६४]वा प्रतिमण्ठकः।

कोल्लकोऽन्यैरयं प्रोक्तः,

।।ऽऽ।। इति प्रतिमण्ठकः (८०)

पार्वतीलोचने पुनः ॥२९६॥

मलपा द्वौ गुरू दौ द्वौ,

ऽऽऽ।ऽऽऽ०० इति पार्वतीलोचनः (८१)

रतितालो लघुर्गुरुः।

।ऽ इति रतितालः (८२)

लीला दलौ पः,

०।ऽ इति लीलातालः (८३)

।ऽ।ऽ हा चतुर्मुख. (७८)

दोन द्रुत व गुरु (असणारा) मदन (होय).

००ऽ हा मदन. (७९)

सगण व भगण (असणारा) प्रतिमंठक (होय); हा दुसऱ्या (आचार्यांनी) कोल्लक मानला आहे.

।।ऽऽ।। हा प्रतिमंठक. (८०)

आणखी पार्वतीलोचन तालात (२९६) मगण (म्हणजे तीन गुरू), लघु, प्लुत, दोन गुरू व दोन द्रुत (असतात).

ऽऽऽ।ऽऽऽ०० हा पार्वतीलोचन. (८१)

लघु व गुरु (यांनी) रतिताल (होतो).

।ऽ हा रतिताल. (८२)

द्रुत, लघु व प्लुत (असणारा) लीला ताल (होय)

०।ऽ हा लीलाताल. (८३)

६४. अडचार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तींत 'वा' याचा 'आणि' हा अर्थ घेऊन प्रतिमंठक ताल दिला आहे. संगीतदर्पण (पृ. १४४) यात मात्र 'वा' याचा 'अथवा' हा अर्थ घेऊन प्रतिमंठक ताल ।।ऽ किंवा ऽ।। असा दिला आहे.

करणयतौ द्रुतचतुष्टयम् ॥ २९७ ॥

० ० ० ० इति करणयतिः (८४)

ललिते द्वौ द्रुतौ लो गः,

० ०।ऽ इति ललितः (८५)

गारुगिस्तु चतुर्द्रुती ।

[६५]विरामान्ता बुधैरुक्ता,

० ० ० ॰ इति गारुगिः (८६)

राजनारायणे पुनः ॥ २९८ ॥

द्रुतौ द्वौ जगणो वक्रः,

० ०।ऽ।ऽ इति राजनारायणः (८७)

लक्ष्मीशे तु द्रुतद्वयम् ।

विरामान्तं लप्लुतौ च,

० ०।ऽ̀ इति लक्ष्मीशः (८८)

करणयति तालात चार द्रुत (असतात). (२९७)

० ० ० ० हा करणयति. (८४)

ललित तालात दोन द्रुत, लघु व गुरु (हे असतात).

० ०।ऽ हा ललित. (८५)

विराम शेवटी असणाऱ्या चार द्रुतांनी, विद्वानांनी गारुगि ताल सांगितला आहे.

० ० ० ॰ हा गारुगि (८६)

आणखी राजनारायण तालात (२९८) दोन द्रुत, जगण (म्हणजे लघु, गुरु, लघु) व वक्र (म्हणजे गुरु) (हे असतात).

० ०।ऽ।ऽ हा राजनारायण. (८७)

लक्ष्मीश तालात विराम शेवटी असणारे दोन द्रुत, आणि लघु व प्लुत (असतात).

० ०।ऽ̀ हा लक्ष्मीश. (८८)

---

६५. 'विरामान्ता' हे 'चतुर्द्रुती'चे विशेषण होय. 'विरामान्ता' हा पाठ आनंदाश्रम आवृत्ति (पृ. ४४२), संगीतदर्पण (पृ. १४५) व संगीतसारामृत (पृ. १७०) यांत आहे. अडचार आवृत्तीत 'विरामान्तं' असा पाठ आहे. 'विरामान्ता' हा पाठ योग्य असल्याने तोच येथे घेतला आहे.

तालस्तु ललितप्रियः ॥ २९९ ॥

ऊर्ध्वं लघुभ्यां रगणः,

।।ऽ।ऽ इति ललितप्रियः (८९)

स्यातां श्रीनन्दने भपौ ।

ऽ।।ऽ इति श्रीनन्दनः (९०)

जनको नयसा वक्रः,

।।।।ऽऽ।।ऽऽ इति जनकः (९१)

वर्धनो द्वौ द्रुतौ लपौ ॥ ३०० ॥

००।ऽ इति वर्धनः (९२)

विरामान्तौ द्रुतौ बिन्दुस्त्रिमात्रो रागवर्धनः।

०॰०ऽ इति रागवर्धनः (९३)

द्रुतैः षड्भिस्तु षट्तालः,

०००००० इति षट्तालः (९४)

ललितप्रिय ताल (२९९) दोन लघूंच्या नंतर रगण (म्हणजे गुरु, लघु, गुरु) (असणारा होय).

।।ऽ।ऽ हा ललितप्रिय. (८९)

श्रीनंदन तालात भगण (म्हणजे गुरु, लघु, लघु) व प्लुत (हे) असतात.

ऽ।।ऽ हा श्रीनंदन. (९०)

नगण (म्हणजे तीन लघू), यगण (म्हणजे लघु, गुरु, गुरु) व सगण (म्हणजे लघु, लघु, गुरु) आणि गुरु (असणारा) जनक ताल (होय).

।।।।ऽऽ।।ऽऽ हा जनक. (९१)

दोन द्रुत, लघु व प्लुत (असणारा) वर्धन (होय). (३००)

००।ऽ हा वर्धन. (९२)

विराम शेवटी असणारे दोन द्रुत, बिंदु (म्हणजे द्रुत) व त्रिमात्र (म्हणजे प्लुत) (ग्यात आहेत तो) रागवर्धन (होय).

०॰०ऽ हा रागवर्धन. (९३)

सहा द्रुतांनी षट्ताल (होतो).

०००००० हा षट्ताल. (९४)

अन्तरक्रीडा तु कथ्यते ॥ ३०१ ॥

द्रुतत्रयं विरामान्तं,

ᵕ
० ० ० इत्यन्तरक्रीडा (९५)

हंसे सविरती लघू ।

ᵕ
। । इति हंसः (९६)

लघुप्लुतावुत्सवः स्यात्,

ऽ
। ऽ इत्युत्सवः (९७)

गो दौ दीप्तो विलोकिते ॥ ३०२ ॥

ऽ
ऽ ० ० ऽ इति विलोकितः (९८)

गजश्चतुर्लो धारासौ,

। । । । इति गजः (९९)

लौ दौ वर्णयतिर्भवेत् ।

। । ० ० इति वर्णयतिः (१००)

(आता) अंतरक्रीडा सांगतो (३०१); विराम शेवटी असणारे तीन द्रुत (यांनी तो होतो).

ᵕ
० ० ० हा अंतरक्रीडा. (९५)

हंसतालात विरामयुक्त दोन लघू (असतात).

ᵕ
। । हा हंस. (९६)

लघु व प्लुत (असणारा) उत्सव होय.

ऽ
। ऽ हा उत्सव. (९७)

विलोकित तालात गुरु, दोन द्रुत व दीप्त (म्हणजे प्लुत) (हे असतात). (३०२)

ऽ
ऽ ० ० ऽ हा विलोकित. (९८)

चार लघू (असणारा) गज ताल (होय). तो धारा (या नावानेही जाणला जातो).

। । । । हा गज. (९९)

दोन लघू व दोन द्रुत (असणारा) वर्णयति (होय).

। । ० ० हा वर्णयति. (१००)

सिंहे लदौ लत्रयं च,
।०।।। इति सिंहः (१०१)
गुरुणा करणो मतः ॥ ३०३ ॥
ऽ इति करणः (१०२)
लघुर्द्रुतानां त्रितयं लघू द्वौ सारसः स्मृतः ।
।०००।। इति सारसः (१०३)
द्रुतत्रयं लघुद्वन्द्वं चण्डताले बभाषिरे ॥ ३०४ ॥
०००।। इति चण्डतालः (१०४)
मगणश्च त्रयो दीप्ता लघुश्चन्द्रकलाभिधे ।
ऽऽऽऽ̀ऽ̀ऽ̀। इति चन्द्रकला (१०५)
गलौ प्लुतत्रयं वक्रः प्लुतो बिन्दुत्रयं लये ॥ ३०५ ॥
ऽ।ऽ̀ऽ̀ऽ̀ऽऽ̀ ००० इति लयः (१०६)
रो द्रुतो द्वौ गुरू स्कन्दे,
ऽ।ऽ० ऽऽ इति स्कन्दः (१०७)

सिंह तालात लघु, द्रुत व तीन लघू (असतात).
।०।।। हा सिंह. (१०१)
एका गुरूने करण ताल मानला आहे. (३०३)
ऽ हा करण. (१०२)
लघु, तीन द्रुत व दोन लघू (यांनी) सारस ताल म्हटला आहे.
।०००।। हा सारस. (१०३)
चंडतालात तीन द्रुत व दोन लघू सांगितले आहेत. (३०४)
०००।। हा चंडताल. (१०४)
चंद्रकला नावाच्या तालात मगण (म्हणजे तीन गुरू) आणि तीन दीप्त (म्हणजे प्लुत) व लघु (हे असतात).
ऽऽऽऽ̀ऽ̀ऽ̀। हा चंद्रकला ताल. (१०५)
लय तालात गुरु, लघु, तीन प्लुत, वक्र (म्हणजे गुरु), प्लुत आणि तीन बिंदु (म्हणजे द्रुत) (हे असतात). (३०५)
ऽ।ऽ̀ऽ̀ऽ̀ऽऽ̀ ००० हा लय. (१०६)
स्कंद तालात रगण (म्हणजे गुरु, लघु, गुरु), द्रुत व दोन गुरू (असतात).
ऽ।ऽ०ऽऽ हा स्कंद. (१०७)

अड्डताली दो लघुद्वयम्।
इममेवोचिरे[६६] तालं केचित्त्रिपुटसंज्ञया ॥ ३०६ ॥
०।। इत्यड्डताली (१०८)
द्वौ लौ द्वौ दौ लगौ घत्ता,
।।००।ऽ इति घत्ता (१०९)
द्वन्द्वः सतगणौ प्लुतः।
।।ऽऽऽ।ऽ इति द्वन्द्वः (११०)
मुकुन्दे तु लघुर्बिन्दुचतुष्टयमथो गुरुः ॥ ३०७ ॥
।०००० ऽ इति मुकुन्दः (१११)
कुविन्दके लघुर्बिन्दुद्वयं गुरुरथ प्लुतः।
।००ऽऽ इति कुविन्दकः (११२)

एक द्रुत व दोन लघू (यांनी) अड्डताली (हा ताल होतो).
या तालालाच काही (विद्वानांनी) त्रिपुट या नावाने सांगितले आहे. (३०६)
०।। हा अड्डताली ताल. (१०८)
दोन लघू, दोन द्रुत, लघु व गुरु (असणारा) घत्ता (होय).
।।००।ऽ हा घत्ता. (१०९)
सगण (म्हणजे लघु, लघु, गुरु), तगण (म्हणजे गुरु, गुरु, लघु) व प्लुत (असणारा) द्वंद्व (होय).
।।ऽऽऽ।ऽ हा द्वंद्व. (११०)
मुकुंद तालात लघु, चार बिंदू (म्हणजे द्रुत) आणि गुरु (हे असतात). (३०७).
।०००० ऽ हा मुकुंद. (१११)
कुविंदकात लघु, दोन बिंदू (म्हणजे द्रुत), गुरु व प्लुत (हे असतात).
।००ऽऽ हा कुविंदक. (११२)

---

६६. 'इमम्' हे 'तालं' या पदाचे विशेषण आहे : 'इमम्' हा पाठ आनंदाश्रम आवृत्ति (पृ. ४४४) व संगीतसारामृत (पृ. १७१) यांत आहे. 'इयम्' हा पाठ अडचार आवृत्तीत आहे. ते अड्डतालीचे विशेषण होईल. 'इमम्' हा पाठ जुळत असल्याने येथे घेतला आहे.

कलध्वनिर्लघुद्वन्द्वं गुरुर्लघुरथ प्लुतः ॥ ३०८ ॥

।।ऽ।ऽ इति कलध्वनिः (११३)

पञ्चभिर्लघुभिर्गौरी,

।।।।। इति गौरी (११४)

द्वौ गुरू द्वौ लघुद्रुतौ ।

ताले सरस्वतीकण्ठाभरणे शार्ङ्गिसंमतौ ॥ ३०९ ॥

ऽऽ।।०० इति सरस्वतीकण्ठाभरणः (११५)

भग्नताले चतुर्बिन्दुर्नगणश्च विरामवान् ।

००००।।ऽ इति भग्नतालः (११६)

ताले राजमृगाङ्के तु द्रुतौ रघुरथो गुरुः ॥ ३१० ॥

००।ऽ इति राजमृगाङ्कः (११७)

गुरुर्लघुर्द्रुतस्ताले राजमार्तण्डसंज्ञके ।

ऽ।० इति राजमार्तण्डः (११८)

दोन लघू, गुरु, लघु व प्लुत (असणारा) कलध्वनि (होय). (३०८)

।।ऽ।ऽ हा कलध्वनि. (११३).

पाच लघूंनी गौरी (हा ताल होतो).

।।।।। हा गौरी ताल. (११४)

सरस्वतीकंठाभरण तालात दोन गुरू, दोन लघू व दोन द्रुत हे शार्ङ्गदेवाला मान्य आहेत. (३०९)

ऽऽ।।०० हा सरस्वतीकंठाभरण. (११५).

भग्नतालात चार बिंदू (म्हणजे द्रुत) व विरामयुक्त नगण (म्हणजे तीन लघू) (हे असतात).

००००।।ऽ हा भग्नताल. (११६)

राजमृगांक तालात दोन द्रुत, लघु व गुरु (हे असतात). (३१०)

००।ऽ हा राजमृगांक. (११७)

राजमार्तंड नावाच्या तालात गुरु, लघु व द्रुत (हे असतात).

ऽ।० हा राजमार्तंड. (११८)

निःशङ्कसंज्ञके[६७] ताले लगुरू पगुरू गलौ ॥ ३११ ॥

। ऽ ऽ ऽ ऽ । इति निःशङ्कः (११९)

शार्ङ्गदेवे द्रुतद्वन्द्वं गप्लुतौ गद्वयं लघुः ।

० ० ऽ ऽ ऽ ऽ । इति शार्ङ्गदेवः (१२०)

इति विंशत्युत्तरं देशीतालाः

अन्येपि सन्ति भूयांसस्तालास्ते लक्ष्यवर्त्मनि ॥ ३१२ ॥

प्रसिद्धिविधुरत्वेन शास्त्रेऽस्मिन्न प्रदर्शिताः ।

तद्भेदप्रत्ययार्थं तु लघूपाया भवन्त्यमी ॥ ३१३ ॥

निःशंक नावाच्या तालात लघु, गुरु, प्लुत, गुरु, गुरु व लघु (हे असतात). (३११)

। ऽ ऽ ऽ ऽ । हा निःशंक. (११९)

शार्ङ्गदेव तालात दोन द्रुत, गुरु, प्लुत, दोन गुरू व लघु (हे असतात). (३१२–)

० ० ऽ ऽ ऽ ऽ । हा शार्ङ्गदेव. (१२०)

असे हे एकशेवीस देशीताल होत.

(यांशिवाय) इतरही पुष्कळ (देशी) ताल आहेत. (पण) लक्ष्यमार्गात (३१२) प्रसिद्ध नसल्याने ते या शास्त्रात दाखविले नाहीत. त्यांच्या भेदाच्या प्रत्ययासाठी म्हणजे पूर्ण ज्ञानासाठी हे (सुलभ असे) छोटे उपाय होत. (३१३) प्रस्तार, संख्या, नष्ट आणि

क० या एकशेवीस तालांखेरीज इतरही पुष्कळ ताल आहेत. मग ते का दाखवले नाहीत ? असे विचारल्यास सांगत आहे की ते (प्रचारात) प्रसिद्ध नाहीत. त्या प्रसिद्ध व अप्रसिद्ध तालांचा भेद पूर्णपणे माहीत व्हावा यासाठी हे पुढे सांगितले जाणारे प्रस्तार इत्यादी संक्षिप्त स्वरूपाचे उपाय होत. जाणण्याचा विषय मोठा असताही, त्याच्या ज्ञानाचे साधन होणारे हे उपाय अल्प-

---

६७. निःशंक हा ताल आनंदाश्रम व अडयार या दोन्ही आवृत्तीत '। ऽऽऽऽऽ।' असा दिला आहे. पण दिलेल्या लक्षणानुसार तो '। ऽऽऽऽ।' असा असणे योग्य आहे. त्याप्रमाणे तो संगीतदर्पणात (पृ० १४९) दिला आहे. अडयार व आनंदाश्रम या आवृत्तींत दिल्याप्रमाणे हा ताल घ्यायचा असेल तर त्याच्या लक्षणात लघु, दोन गुरू, प्लुत, दोन गुरू, गुरु व लघु असे असायला हवेत. ते तसे असणारा पाठ संगीतसारामृतात (पृ० १७१) मिळतो. तो असा —

'निःशङ्कसंज्ञके ताले लो गुरू पो गुरू गलौ '।

याचे भाषांतर असे —

'निःशंक नावाच्या तालात, लघु, दोन गुरू, प्लुत, दोन गुरू, गुरु व लघु, (हे असतात).

या तालाच्या लक्षणात मतभिन्नता दिसून येते.

प्रस्तारसंख्ये नष्टं चोद्दिष्टं पातालकस्ततः ।
द्रुतमेरुर्लघोर्मेरुर्गुरुमेरुः प्लुतस्य च ॥ ३१४ ॥
मेरुः संयोगमेरुश्च खण्डप्रस्तारकस्ततः ।
प्राचां चतुर्णां मेरूणां नष्टोद्दिष्टे पृथक्पृथक् ॥ ३१५ ॥
एकोनविंशतिरिति प्रत्ययास्तान्[६८] ब्रुवेऽधुना ।
न्यस्याल्पमाद्यान्महतोऽधस्ताच्छेषं यथोपरि ॥ ३१६ ॥
प्रागूने वामसंस्थांस्तु संभवे महतो लिखेत् ।
अल्पानसंभवे तालपूर्त्यै भूयोऽप्ययं विधिः ॥ ३१७ ॥

उद्दिष्ट, पातालक मग द्रुतमेरु, लघूचा मेरु, गुरुमेरु आणि प्लुताचा (३१४) मेरु, संयोगमेरु, व खंडप्रस्तारक, नंतर पहिल्या चार मेरूंचे वेगवेगळे नष्ट व उद्दिष्ट (३१५) असे (हे) एकोणीस प्रत्यय होत. ते आता सांगतो (३१६–)

(अगोदर ताल लिहून, त्यातल्या) पहिल्या महान म्हणजे मोठ्याच्या खाली (त्याच्या अपेक्षेने असणारा) अल्प म्हणजे लहान ठेवून, बाकीचे वरच्या (ओळी) प्रमाणे (खाली उजव्या बाजूस लिहावे). (३१६) (तालाचा अंश मात्रांच्या दृष्टीने) कमी असेल तर (प्रस्तुत) तालाच्या पूर्तीसाठी, संभव असताना महान पूर्वभागात डाव्या बाजूला लिहावे; संभव नसताना अल्प लिहावे. पुन्हाही हा प्रकार (३१७) सर्व द्रुतांपर्यंत करावा.

स्वरूपाचे असल्याने ते सांगण्यास सुलभ होत असा याचा अर्थ आहे. (तालभेदांच्या) पूर्णज्ञानाचे (म्ह. प्रत्ययाचे) कारण होणारे प्रस्तार इत्यादीही लक्षणेने प्रत्यय म्हटले आहेत. किंवा यांनी विशिष्ट अर्थ प्रतीत होतो म्हणूनही ते प्रत्यय होत. (प्रतीयन्ते म्हणजे प्रतीत होतात अशी ही प्रत्यय शब्दाची व्युत्पत्ति यावरून कळते.) (३१२–३१५, ३१६–)

क. त्यांतील प्रस्ताराचे लक्षण (ग्रंथकार) देत आहे. स्वतःला अभिप्रेत असलेला असा कोणताही ताल प्रस्तुत (प्रस्ताराचा विषय) म्हणून आरंभी लिहून, त्याच्या अवयवांपैकी पहिल्या महानच्या खाली अल्प लिहावा. येथे महान या शब्दाने लघु, गुरु व प्लुत हे सांगितले आहेत व अल्प या शब्दाने द्रुत, लघु व गुरु हे सांगितले आहेत. म्हणजे असे की जेथे पहिला लघु महान असतो तेथे त्याच्या अपेक्षेने अल्प असणारा द्रुत त्याच्याखाली लिहावा. जेथे पहिला गुरु महान असतो तेथे त्याच्या अपेक्षेने अल्प असणारा लघु लिहावा व जेथे पहिला प्लुत महान असतो

---

६८. प्रत्यय म्हणजे ज्ञान. प्रस्तार इत्यादी, तालांच्या भेदांचे ज्ञान होण्याची साधने होत. म्हणून त्यांना लक्षणेने प्रत्यय हा शब्द योजला आहे. साधनाच्या जागी साध्यवाचक शब्द वापरणे हा गौण म्हणजे लक्षणेचा प्रयोग होय. प्रति + इ या धातूचा अर्थ जाणणे असा आहे. त्यावरून 'ज्याने (ज्ञानाचा विषय) जाणला जातो' तो प्रत्यय अशी ही व्युत्पत्ति कल्लिनाथाने दिली आहे. कारण प्रस्तार इत्यादीमुळे तालभेद सहज कळतात.

सर्वद्रुतावधिः कार्यः प्रस्तारोऽयं[६९] लघौ गुरौ ।
प्लुतौ व्यस्ते समस्ते च न तु व्यस्ते द्रुतेऽस्ति सः ॥ ३१८ ॥

इति प्रस्तार :

हा प्रस्तार लघु, गुरु व प्लुत यांत समस्त (म्हणजे मिळून असता) आणि व्यस्त (म्हणजे वेगवेगळे असता) असतो; पण व्यस्त द्रुतात मात्र असत नाही. (३१८).

हा प्रस्तार होय.

तेथे त्याच्या अपेक्षेने अल्प असणारा गुरु लिहावा. अशा रीतीने प्लुत हा नेहमीच महान असतो व द्रुत हा नेहमीच अल्प असतो. लघु व गुरु यांच्याबाबतीत महत्त्व व अल्पत्व अपेक्षेनुसार जाणावे. बाकीचे तालभाग जसे वर तसे खाली लिहावे. म्हणजे असे की अनेक अवयव असणाऱ्या तालाच्या बाबतीत पहिल्या महानच्या खाली अल्प लिहून बाकीचे तालाचे अवयव उजव्या बाजला रहातील असे लिहावे. अर्थात वरच्या ओळीतल्या प्रमाणेच खाली लिहावे. ज्या तालाचा एकच अवयव असतो आणि एक महान अन्त्य अवयव असतो तेथे त्यावरील दुसरा अवयव नसल्याने या लक्षणाच्या भागाचा वापर असतच नाही. तालभागांत (मात्रांच्या दृष्टीने) उणीव असता प्रस्तुत ताल पूर्ण होण्यासाठी. संभव असता पूर्वभागात महान म्हणजे प्लुत, गुरु व लघु लिहावे; संभव नसताना अल्प म्हणजे द्रुत लिहावे. अर्थात ते लेखकाच्या अपेक्षेने डाव्या बाजूला पूर्वी लिहिलेल्या अवयवांच्या जवळ लिहावे. 'पुन्हाही हा प्रकार सर्व द्रुतांपर्यंत योजावा' या विधानावरून पुनरावृत्ति करावी हे कळते, म्हणजे पुन्हा पुन्हा ही योजना करावी. याचा अर्थ दुसऱ्या इत्यादी ओळीत असणारे ताल प्रस्तुत मानून खाली खाली, सर्व द्रुत असणाऱ्या तालप्रकाराने शेवट होईपर्यंत ही योजना चालू ठेवावी. असे लक्षण असणारा हा प्रस्तार होय.

व्यस्त (म्हणजे वेगळेपणाने) केवळ लघु असता प्रस्तार असा– एक लघु लिहून त्याखाली त्यापेक्षा भिन्न असणारा द्रुत लिहावा. वर तालाचा अवयव नसल्याने शेष म्हणजे शिल्लक राहिलेला तालभाग नसतो. तालांशात उणीव असता ताल पूर्ण होण्यासाठी महान अवयवाचा संभव नसल्याने अल्प म्हणजे द्रुत डाव्या बाजूला लिहावा. अशा रीतीने दुसऱ्या भेदात सर्व द्रुत असल्याने त्यानंतर प्रस्तार उत्पन्न होत नाही. म्हणून लघूच्या प्रस्तारात दोनच प्रकार होतात. व्यस्त म्हणजे केवळ गुरु असता प्रस्तार असा–

एक गुरु लिहून, त्याखाली त्याच्या अपेक्षेने अल्प असणारा लघु लिहावा. यातही पूर्वीच्या म्हणजे वरच्याप्रमाणे शेष नाही. तालभागात उणीव असता तालपूर्ण होण्यासाठी महान लघु संभवत असल्याने तो पूर्वभागात म्हणजे डाव्या बाजूला लिहावा. या प्रमाणे दुसऱ्या प्रकारात दोन लघू झाले. नंतर या दुसऱ्या प्रकारातील पहिल्या लघूच्या खाली अल्प म्हणजे द्रुत लिहावा. वर लघु असल्याने त्याखाली शेष म्हणून लघु लिहावा. तालभागात उणीव असता तालपूर्ण होण्यासाठी द्रुत लिहावा. या प्रमाणे दोन द्रुत व लघु हा तिसरा

---

६९. सुधाकर टीका : प्लुताचा प्रस्तार :—

'प्रथम प्लुत लिहावा. मग त्याखाली गुरु लिहावा व तालपूर्तीसाठी त्या मागे लघु लिहावा. असा हा लघु व गुरु असणारा दुसरा भेद. नंतर लघूच्या खाली द्रुत, द्रुताच्या पुढे गुरु व मागे द्रुत लिहावा. याप्रमाणे दोन द्रुत व गुरु असणारा तिसरा भेद. मग गुरूच्या खाली लघु

प्रकार होय. नंतर लघूच्या खाली द्रुत लिहावा. वर अवयव नसल्याने शेष राहात नाही. तालभागात उणीव असता, संभव असल्याने पूर्वभागात द्रुताच्या जवळ लघु लिहावा. मग ताल पूर्ण होण्यासाठी अर्धी मात्रा असणारा द्रुत संभवत असल्याने लघूच्या जवळ द्रुत लिहावा. अशाप्रकारे द्रुत, लघु व द्रुत असणारा चवथा प्रकार होय. नंतर लघूच्या खाली द्रुत लिहावा. वरच्या बाजूला द्रुत असल्याने शेष म्हणून द्रुत लिहावा. तालांशात उणीव असता, संभव असल्याने पूर्वभागात लघु लिहावा. या रीतीने लघु व दोन द्रुत हा पाचवा प्रकार झाला. मग लघूच्या खाली द्रुत लिहावा. वर दोन द्रुत असल्याने शेष म्हणून दोन द्रुत लिहावे. तालांशात उणीव असता, संभव नसल्याने पूर्वभागात द्रुत लिहावा. असा हा चार द्रुत असणारा सहावा प्रकार होय. या प्रकारात सर्व द्रुत असल्याने यापुढे प्रस्तार संभवत नाही. म्हणून गुरूच्या प्रस्तारात सहा भेद होतात. व्यस्त प्लुताच्या प्रस्तारात वर सांगितल्याप्रमाणे योजना केल्याने एकोणीस प्रकार होतात. व्यस्त लघूच्या बाबतीत लघूचे आद्यत्व, 'एकाच (अक्षरातही) आदि व अंत यांच्या बाबतीत (सांगितलेल्या कार्याची जी योजना) तशी (योजना) करावी, (पा. १.१.२१) या न्यायाने जाणावे.

सजातीय किंवा विजातीय यांच्यासह असणाऱ्या लघु इत्यादींच्या बाबतीत प्रस्तार असतो. व्यस्त द्रुताच्या बाबतीत तो नसतो. कारण त्याच्यापेक्षाही लहान असा तालाचा अवयव नसतो. (३१६–३१८)

प्रस्तार समाप्त

लिहावा व त्याच्या मागे गुरु लिहावा. गुरु व लघु असणारा असा हा चौथा प्रकार. नंतर गुरूच्या खाली लघु त्यापुढे लघु व मागे लघु असा हा तीन लघू असणारा पाचवा भेद. नंतर पहिल्या लघूच्या खाली द्रुत, त्यापुढे दोन लघू व मागे द्रुत असा दोन द्रुत व दोन लघू असणारा सहावा प्रकार. मग पहिल्या लघूच्या खाली द्रुत, त्याच्यापुढे लघु व मागे लघु आणि द्रुत हे लिहावे. द्रुत, लघु, द्रुत व लघु असणारा हा सातवा प्रकार. नंतर पहिल्या लघूच्या खाली द्रुत, त्यापुढे द्रुत व लघु आणि मागे लघु हे लिहावे. लघु, द्रुत, द्रुत व लघु असणारा असा हा आठवा प्रकार. मग पहिल्या लघूच्या खाली द्रुत, त्यापुढे दोन द्रुत व लघु आणि मागे द्रुत हे लिहावे. चार द्रुत व लघु असणारा हा नववा भेद. नंतर लघूच्या खाली द्रुत आणि त्याच्यामागे गुरु व द्रुत हे लिहावे. द्रुत, गुरु व द्रुत असणारा हा दहावा प्रकार. मग गुरूच्या खाली लघु, त्यापुढे द्रुत व मागे लघु आणि द्रुत हे लिहावे. द्रुत, दोन लघू व द्रुत असणारा हा अकरावा प्रकार. नंतर पहिल्या लघूच्या खाली द्रुत, त्यापुढे लघु व द्रुत आणि मागे लघु हे लिहावे. लघु, द्रुत, लघु व द्रुत असणारा हा बारावा भेद. मग पहिल्या लघूच्या खाली द्रुत, त्यापुढे द्रुत, लघु व द्रुत आणि मागे द्रुत हे लिहावे. तीन द्रुत, लघु व द्रुत असणारा हा तेरावा भेद. नंतर लघूच्या खाली द्रुत, त्यापुढे द्रुत व मागे गुरु हे लिहावे. गुरु व दोन द्रुत असणारा हा चौदावा प्रकार. मग गुरूच्या खाली लघु, त्यापुढे दोन द्रुत व मागे लघु हे लिहावे. दोन लघू व दोन द्रुत असणारा हा पंधरावा प्रकार. नंतर पहिल्या लघूच्या खाली द्रुत, त्याच्यापुढे लघु व दोन द्रुत आणि मागे द्रुत लिहावे. दोन द्रुत, लघु व दोन द्रुत असणारा असा हा सोळावा प्रकार. मग लघूच्या खाली द्रुत, त्यापुढे दोन द्रुत व मागे लघु आणि द्रुत हे लिहावे, द्रुत, लघु व तीन द्रुत असणारा हा सतरावा प्रकार. नंतर लघूच्या खाली द्रुत, त्यापुढे तीन द्रुत व मागे लघु हे लिहावे. लघु व चार द्रुत असणारा हा अठरावा प्रकार. मग लघूच्या खाली द्रुत, त्यापुढे चार द्रुत व मागे द्रुत हे लिहावे, सहा द्रुत असणारा असा हा एकोणिसावा प्रकार.

एकद्व्यङ्कौ क्रमान्न्यस्य युञ्जीतान्त्यं पुरातनैः ।
द्वितीयतुर्यषष्ठाङ्कैरभावे तुर्यषष्ठयोः ॥ ३१९ ॥

एक व दोन हे आकडे क्रमाने लिहून, शेवटचा आकडा भागच्या बाजूस असलेल्या दुसऱ्या, चवथ्या व सहाव्या आकड्याबरोबर मिळवावा; चवथा व सहावा (या आकड्यांचा) अभाव असता, (३१९) तिसऱ्या व पाचव्या आकड्याबरोबर क्रमाने मिळवावा. ती बेरीज

क० आता संख्येचे लक्षण देत आहे.

प्रथम एक हा आकडा लिहून नंतर आडव्या ओळीत उजव्या बाजूला दोन हा आकडा लिहावा. शेवटचा आकडा, त्याच्यापासून मागच्या बाजूस असणाऱ्या दुसऱ्या, चवथ्या व सहाव्या आकड्याबरोबर यथासंभव मिळवावा. आता अगोदर दोन हा शेवटचा आकडा होतो. त्याच्या

कलानिधि व सुधाकर या टीकांवरून केवळ लघु, केवळ गुरु व केवळ प्लुत यांचा प्रस्तार पुढीलप्रमाणे होय—

लघूचा प्रस्तार—

।	(१)
० ०	(२)

गुरूचा प्रस्तार—

ऽ	(१)
। ।	(२)
० ० ।	(३)
० । ०	(४)
। ० ०	(५)
० ० ० ०	(६)

प्लुताचा प्रस्तार—

ऽ̃	(१)
। ऽ	(२)
० ० ऽ	(३)
ऽ ।	(४)
। । ।	(५)
० ० । ।	(६)
० । ० ।	(७)
। ० ० ।	(८)
० ० ० ० ।	(९)
० ऽ ०	(१०)
० । । ०	(११)
। ० । ०	(१२)
० ० ० । ०	(१३)
ऽ ० ०	(१४)
। । ० ०	(१५)
० ० । ० ०	(१६)
० । ० ० ०	(१७)
। ० ० ० ०	(१८)
० ० ० ० ० ०	(१९)

तृतीयपञ्चमाङ्काभ्यां क्रमात्तं योगमग्रतः ।
लिक्षेद्दक्षिणसंस्थैवमङ्कश्रेणी विधीयते ॥ ३२० ॥
सा चाङ्कैरिष्टतालस्थद्रुतसंख्यैः समाप्यते ।
द्रुतो लघुः सार्धमात्रो गुरुः सार्धद्विमात्रिकः ॥ ३२१ ॥

पुढच्या बाजूस लिहावी. अशी ही उजव्या बाजूस असणारी अंकश्रेणी (म्हणजे आकड्यांची पंक्ति) निर्माण होते. (३२०)

व ती इष्ट तालातील द्रुतांची संख्या असणाऱ्या आकड्यांनी समाप्त होते. द्रुत, लघु, दीड मात्रा, गुरु, अडीच मात्रा, (३२१) प्लुत, आणि साडेतीन मात्रा अशी एकेक

मागच्या बाजूस असणाऱ्या एक या आकडयाबरोबर तो मिळवून तीन हा आकडा उजव्या बाजूस लिहावा. मग तो शेवटचा होतो. त्याची, त्याच्या मागच्या दोन व एक या आकडयांशी बेरीज केली असता मिळणारा सहा हा आकडा, तीन या आकडयानंतर लिहावा. येथे चवथा क्रमांकाचा आकडा नसल्याने, 'चवथा व सहावा यांचा अभाव असता, तिसऱ्या व पाचव्या आकडयांशी तो क्रमाने मिळवावा' असे सांगितले असल्याने, चवथ्याचा प्रतिनिधि असणाऱ्या अशा तिसऱ्या क्रमांकाच्या एक या आकडयाबरोबर तो शेवटचा तीन हा आकडा मिळवायचा आहे. (३+२+१ = ६). हा शेवटचा सहा आकडा, पूर्वीच्या दुसऱ्या क्रमांकाच्या तीन या आकडयाबरोबर व चवथ्या क्रमांकाच्या एक या आकडयाबरोबर मिळवल्यावर होणारा दहा हा आकडा, (६ + ३ + १ = १०) सहा या आकडयानंतर लिहावा. नंतर हा शेवटचा दहा आकडा, त्या मागच्या दुसऱ्या क्रमांकाच्या सहा या आकडयाबरोबर व चवथ्या क्रमांकाच्या दोन या आकडयाबरोबर आणि सहाव्या क्रमांकाचा आकडा नसल्याने त्याचा प्रतिनिधि म्हणून पाचव्या क्रमांकाच्या एक या आकडयाबरोबर मिळवल्यावर येणारा एकोणीस हा आकडा (१० + ६ + २ + १ = १९), दहा या आकडयानंतर लिहावा. मग हा शेवटचा एकोणीस आकडा, मागचा दुसरा दहा, चवथा तीन व सहावा एक यांबरोबर मिळवून येणारा तेहतीस (१९ + १० + ३ + १ = ३३) हा आकडा एकोणीस या आकडयानंतर लिहावा. लिहिणाऱ्याच्या दृष्टीने उजव्या बाजूस असणारी ही आकडयांची श्रेणी अशा रीतीने मिळते. ती वरच्या, खालच्या किंवा डाव्या बाजूंना मिळत नाही. ती अंकश्रेणी जाणून घेणाऱ्या व्यक्तीच्या इष्ट तालात असणाऱ्या द्रुतांच्या संख्येच्या आकडयांनी समाप्त होते. याचा अर्थ असा की प्रस्तार इत्यादींची परीक्षा करणाऱ्याचा जो ताल अभिप्रेत असेल, त्यात सर्व द्रुत केले असता, जेवढे द्रुत होतात, तेवढया संख्येचे आकडे लिहावे. (३१८ ते ३२१-)

हाच अर्थ स्पष्ट करीत संख्येने जाणायचे प्रयोजन सांगत आहे–

या अंकश्रेणीत असलेल्या एका द्रुताने एक हा आकडा, लघूने दोन हा आकडा, दीड मात्रांनी तीन हा आकडा, गुरूने सहा हा आकडा, अडीच मात्रांनी दहा हा आकडा, एका प्लुताने वीस (?) (एकोणीस) हा आकडा, साडेतीन मात्रांनी तेहतीस हा आकडा अशा एकेक द्रुताने वाढलेल्या एक इत्यादी आकडयांनी क्रमाने, प्रस्तारात दिसून येणारे तालांचे प्रकार संख्येने कळतात. येथे मात्रा या शब्दाने लघु व अर्धी मात्रा याने द्रुत सांगितला आहे. यावरून दुसरीही एक गोष्ट कळून येते. यथासंभव शेवटचा, दुसरा, चवथा व सहावा

प्लुतः[७०] सार्धत्रिमात्रश्चेत्येकैकद्रुतवर्धितैः ।
तालभेदाः क्रमादङ्कैः संख्यायन्ते स्थितैरिह ॥ ३२२ ॥
यदङ्कयोगादन्त्योऽङ्को लब्धस्तैरन्ततः क्रमात् ।
भेदा द्रुतान्तलघ्वन्तगुर्वन्ताश्च प्लुतान्तकाः ॥ ३२३ ॥
संख्यायन्त इति प्रोक्ता संख्या निःशङ्कसूरिणा ।

१	२	३	६	१०	१९	३३

इति संख्या

द्रुताने वाढविलेल्या, येथे असणाऱ्या आकड्यांनी क्रमाने ताल प्रकारांची संख्या मिळते. (३२२) ज्या अंकांची बेरीज झाल्यावर शेवटचा आकडा मिळतो, त्यांनी शेवटापासून क्रमाने द्रुत शेवटी असणारे, लघु शेवटी असणारे, गुरु शेवटी असणारे व प्लुत शेवटी असणारे असे जे प्रकार (३२३) त्यांची संख्या कळते. अशी ही निःशंकसूरीने संख्या सांगितली आहे. (३२४–)

ही संख्या होय.

असे असणाऱ्या व चवथा आणि सहावा यांचा अभाव असता त्यांचे प्रतिनिधि म्हणून तिसरे व पाचवे असणाऱ्या ज्या आकड्यांची बेरीज केल्याने शेवटचा आकडा मिळतो, त्या शेवटचा आकडा प्राप्त करून देण्यास कारणीभूत असणाऱ्या शेवटच्या आकड्यावरून शेवटापासून क्रमाने शेवटी द्रुत असणारे भेद, लघु असणारे भेद, गुरु असणारे भेद व प्लुत असणारे भेद संख्येने कळतात. म्हणजे शेवटच्या आकड्याने शेवटी द्रुत असणाऱ्या, दुसऱ्या आकड्याने शेवटी लघु असणाऱ्या, चवथ्याने व त्याच्या अभावी त्याचा प्रतिनिधि अशा तिसऱ्याने शेवटी गुरु असणाऱ्या, सहाव्याने व त्याच्या अभावी त्याचा प्रतिनिधि अशा पाचव्याने शेवटी प्लुत असणाऱ्या भेदांची संख्या कळते, असे क्रमाने जाणावे. प्रतिनिधि म्हणून येणे या बाबतीत बहुवचन हे विवक्षित नाही. कारण तेथे बहुत्व संभवत नाही. उदाहरणासाठी प्लुताच्या प्रस्तारातील शेवटी द्रुत असणारे इत्यादी प्रकार दाखवितो. प्लुताच्या प्रस्तारात एकोणीस भेद होतात. एकोणीस या संख्येतील अंकसमूहात पुष्कळ आकडे आहेत. (बहुत्व म्हणजे तीन किंवा त्याहून जास्त संख्या असणे.) शेवटचा आकडा वहा हा आहे. त्यावरून द्रुत शेवटी असणारे वहा प्रकार होत. दुसरा आकडा सहा हा आहे; त्यावरून शेवटी लघु असणारे सहा प्रकार होत. चवथा आकडा दोन हा आहे; त्यावरून गुरु शेवटी असणारे दोन भेद होत. सहाव्याचा प्रतिनिधि म्हणून पाचवा आकडा एक हा आहे; त्यावरून प्लुत शेवटी असणारा एक भेद होय. असे एकोणीस भेद संख्येने कळतात. या प्रकारे सर्वत्र जाणावे (३२१ ते ३२४ –)

ही संख्या.

७०. 'प्लुतेनैकेन विंशत्यङ्कः' असा कलानिधि टीकेतील पाठ आनंदाश्रम व अडयार या दोन्ही आवृत्तीत मिळतो. त्याचा अर्थ 'एका प्लुताने वीस हा आकडा' असा होतो. पण अंकश्रेणीत दहानंतर एकोणीस हा आकडा येतो. मागील क्रम ध्यानात घेता 'प्लुताने एकोणीस हा आकडा' असा अर्थ अपेक्षित आहे. त्यावरून 'प्लुतेनैकोनविंशत्यङ्कः' असा पाठ असणे योग्य ठरते.

अत्रैतावतिथो भेदः किंरूप इति पृच्छति ॥ ३२४ ॥
यत्र तन्नष्टमाख्यातं तस्योत्तरमिहोच्यते ।
भेदानां यावतां मध्ये नष्टप्रश्नः कृतो भवेत् ॥ ३२५ ॥
तावत्संख्याङ्कपर्यन्तां लिखेत्संख्याङ्कसंततिम् ।
अन्त्याङ्के तत्र नष्टाङ्कं पातयेदथ शेषतः ॥ ३२६ ॥
पातयेत्पूर्वपूर्वाङ्कं तत्र त्वपतितो द्रुतः ।
पूर्वश्चेत्पतितो न स्याल्लघुस्तु पतिताद्भवेत् ॥ ३२७ ॥

यात (म्हणजे इतके भेद असणाऱ्या अमक्या तालात) (एवढ्या संख्येचा) अमुक एक भेद कोणत्या स्वरूपाचा असे जेथे (एखादा) विचारतो (३२४) तेथे ते नष्ट म्हटले जाते. त्याचे उत्तर येथे सांगतो. जितक्या भेदांच्या मध्ये नष्टविषयक प्रश्न केला असेल (३२५) तितक्या संख्येच्या आकड्यापर्यंत अंकश्रेणी लिहावी. तिच्यातील शेवटच्या आकड्यामधून नष्टविषयक आकडा वजा करावा. मग शेषांतून (३२६) पूर्वीपूर्वीचे आकडे (क्रमाने) वजा करावे. (शेवटच्या आकड्यामधून नष्टांक वजा केल्यावर राहणाऱ्या शेषातून, शेवटच्या आकड्याच्या पूर्वीचा आकडा वजा करावा. या शेषातून त्यापूर्वीचा आकडा वजा करावा. त्या शेषातून त्यापूर्वीचा आकडा वजा करावा इत्यादि प्रकारे क्रमाने वजा करण्याची योजना करावी.) त्यात (ज्यास्त असल्याने) वजा न होणाऱ्या आकड्यापासून द्रुत (मिळतो). पूर्वीचा आकडा जर वजा होत नसेल, तर अकृतार्थ म्हणजे वजा न होणाऱ्या नंतरच्या

क. आता नष्टाचे लक्षण देत आहे–

इतके भेद असणाऱ्या अमुक तालातील एवढ्या संख्येचा भेद कोणत्या स्वरूपाचा असा भेदाच्या स्वरूपाविषयी ज्यावेळी प्रश्न विचारला जातो तेव्हा त्याला नष्ट म्हटले जाते. (त्या भेदाचे स्वरूप माहीत नसल्याने नष्ट म्हणजे हरवल्यासारखे असते.) त्याचे उत्तर म्हणजे त्या भेदाचे स्वरूप वर्णन करण्याचा उपाय येथे सांगितला जात आहे. तो उपाय ग्रंथकार पुढीलप्रमाणे दाखवीत आहे. तो उदाहरणासह आम्ही स्पष्ट करून सांगतो–

प्लुताच्या प्रस्तारात एकोणीस भेद असतात. त्यांमध्ये नष्टविषयक प्रश्न विचारला जातो; तो असा की नष्ट असा पंधरावा प्रकार कोणत्या स्वरूपाचा ? आता पुढील अंकश्रेणी लिहावी.

१	२	३	६	१०	१९

त्यातील शेवटच्या एकोणीस या आकड्यातून नष्ट विषयक भेदसंख्येचा पंधरा हा आकडा वजा केल्यावर चार हा आकडा शिल्लक रहातो. त्या चार या आकड्यामधून प्रथम जवळ असणारा पूर्वीचा दहा हा आकडा वजा करावा. या शेष चार आकड्यामधून दहा हा आकडा वजा होत नसल्याने त्यापासून एक द्रुत प्राप्त होतो. दहा आकड्याच्या पूर्वीचा सहा हा आकडाही चार मधून वजा होत नसल्याने त्यापासून आणखी दुसरा द्रुत प्राप्त होतो. हे प्राप्त होणारे

उत्तरेणाकृतार्थेन सहितात्तदसंभवे ।
अकृतार्थेन पूर्वेण सान्तरे पतिते पृथक् ॥ ३२८ ॥
लघुर्निरन्तरे त्वस्मिँल्लघुरेव गुरुर्भवेत् ।
गुरुहेतोस्तृतीये तु पतिते गः प्लुती भवेत् ॥ ३२९ ॥
अङ्काभावे द्रुता ग्राह्यास्तालपूरणहेतवः ।
इति नष्टस्य विज्ञेयमुत्तरं रूपनिर्णयात् ॥ ३३० ॥

इति नष्टम्

आकड्यासह किंवा तो संभवत नसता वजा न होणाऱ्या पूर्वीच्या आकड्यासह वजा होणाऱ्या आकड्यापासून लघु मिळतो. वजा होणाऱ्या सांतर (म्हणजे मध्ये वजा न होणारा आकडा असणाऱ्या) आकड्यापासून वेगळा लघु मिळतो. (३२७, ३२८)

(वजा होणारा) हा आकडा निरंतर (म्हणजे सलग) असता (पूर्वीच्या लघूसह) हा लघूच गुरु होतो. गुरूला कारणीभूत होणाऱ्या आकड्यापासून पूर्वीचा तिसरा (जर शेषातून) वजा होत असेल तर (हा) गुरु प्लुत होतो. (३२९) (शेष किंवा वजा व्हावयाचा) आकडा मिळत नसेल तर (त्यावेळी) ताल पूर्ण होण्यासाठी कारणीभूत होणारे द्रुत घ्यावे. असे हे भेदाच्या स्वरूपाच्या निर्णयामुळे (प्राप्त होणारे) नष्टाचे उत्तर जाणावे. (३३०)

हे नष्ट होय.

द्रुत इत्यादी डाव्या बाजूला लिहावे. मागचा आकडा जर (शेषामधून) वजा होत नसेल तर वजा न होणाऱ्या नंतरच्या आकड्यासह किंवा तो संभवत नसेल तर वजा न होणाऱ्या पूर्वीच्या आकड्यासह, वजा होणाऱ्या आकड्यापासून लघु प्राप्त होतो. येथे चार या आकड्यामधून पूर्वीचा तीन आकडा वजा जात असल्याने एक हा शेष राहतो. या एकामधून पूर्वीचा दोन हा आकडा वजा होत नसल्याने, नंतरच्या वजा न होणाऱ्या सहा या अंकासह, चार आकड्यामधून वजा होणाऱ्या तीन या आकड्याने लघु मिळतो. आता शेष एक राहिला. या एकामधून पूर्वीचा एक हा सान्तर आकडा वजा होत असल्याने वजा न होणाऱ्या दोन या आकड्यासह त्यापासून वेगळा एक लघु मिळतो. (पहिला एक हा आकडा सान्तर वजा होणारा आहे. कारण तो व शेष यांत दोन हा वजा न होणारा आकडा मध्ये येतो.) 'वेगळा लघु मिळतो' हे सांगण्याचे कारण असे की अगोदरचा लघु व हा लघु दोन्ही मिळून गुरु होत नाही. यात शेष अंक व वजा करायचा अंक यांचा अभाव असला तरी तीन मात्रा असणाऱ्या तालाची पूर्ति दोन लघु व दोन द्रुत यांनी होत असल्याने ताल पूर्ण होण्यासाठी द्रुत घ्यावे लागत नाहीत. (हा पंधरावा भेद । । ० ० असा होतो.). शेषामधून पूर्वीचा निरन्तर आकडा वजा होत असेल तर अगोदरचा लघु व नंतरचा मिळणारा लघु हे दोन्ही मिळून एक गुरु होतो. (निरंतर वजा होणारे म्हणजे शेषांतून वजा होणारे दोन सलग असे आकडे.) यासाठी या प्लुताच्या प्रस्तारातील दहावा भेद कोणत्या स्वरूपाचा (ते पाहू). शेवटच्या एकोणीस या आकड्यामधून नष्ट पूर्ण करणारा दहा आकडा वजा केल्यावर राहिलेल्या नऊ या आकड्यामधून दहा आकडा वजा होत नसल्याने एक द्रुत मिळतो. त्यापूर्वीचे सहा व तीन हे आकडे हे निरन्तर

वजा होणारे आहेत; (कारण नऊमधून सहा वजा होतात व शेष तीनमधून तीन वजा होतात). यात लघु मिळण्यास कारणीभूत असणारा सहा हा आकडा व दुसरा लघु मिळण्यास कारणीभूत असणारा तीन हा आकडा या दोन्हीत मध्ये (तिसरा) आकडा नाही. म्हणून अगोदरचा लघु दुसऱ्या लघूबरोबर मिळून जातो व एक गुरु होतो. हा प्राप्त झालेला गुरु द्रुताच्या डाव्या बाजूला म्हणजे मागे लिहावा. आता वजा करावयाचा एक आकडा जरी आहे तरी शेष आकडा नसल्याने ताल पूर्ण होण्यासाठी एक द्रुत घ्यावा व तो मागे लिहावा. (हा वहावा भेद ०ऽ० असा होतो). (शेष आकडा नाही म्हणण्याचे कारण असे की नऊमधून सहा गेल्यावर तीन हा शेष राहतो. या तीनमधून तीन वजा केल्यावर शेष राहात नाही.)

याच प्लुताच्या प्रस्तारातला पहिला प्रकार कोणत्या स्वरूपाचा ? असा नष्टविषयक प्रश्न केला तर त्यातील शेवटच्या एकोणीस या आकडयामधून एक वजा केल्यावर अठरा शिल्लक राहतात. या अठरातून पूर्वीचे दहा व सहा हे आकडे निरंतर वजा होत असल्याने एक गुरु मिळतो. (अठरातून दहा गेल्यावर राहणाऱ्या आठ या आकडयामधून सहा हा आकडा वजा होतो.) (गुरु मिळण्यास कारणीभूत होणाऱ्या) सहा या आकडयापासून पूर्वीचा तिसरा असणारा दोन हा आकडा, (आठातून सहा गेल्यावर मिळणाऱ्या) दोन या शेषामधून वजा होत असल्याने हा मिळालेला गुरु प्लुत होतो. पूर्वी प्लुत नसलेला असा तो आता प्लुत होतो. तोच पहिला म्हणून लिहावा. (ताल यानेच पूर्ण होत असल्याने, ऽ असा हा पहिला प्रकार झाला.)

'शेष आकडा व वजा करायचा आकडा या दोन्हींपैकी एक जरी संभवत नसला तरी ताल पूर्ण होण्यासाठी आवश्यक असणारे द्रुत घ्यावे.' या वाक्यातील द्रुतांविषयीचे बहुवचन अविवक्षित असल्याने ही द्रुत घेण्याची योजना यथासंभव जाणावी. (म्हणजे आवश्यक त्याप्रमाणे एक वा अनेक द्रुत घ्यावे.)

आता याच प्लुताच्या प्रस्तारात सातवा प्रकार कोणत्या स्वरूपाचा ? असा नष्टविषयक प्रश्न विचारला असता एकोणीसमधून सात गेल्यावर बारा शेष म्हणून राहतात. (बारातून पूर्वीचा दहा वजा केल्यावर दोन शेष राहतात. या दोनीतून, त्या पूर्वीचा सहा वजा होत नसल्याने तो अकृतार्थ होय.) दहा नंतरचा वजा न होणारा आकडा येथे जरी संभवत नाही तरी त्यापूर्वीच्या (शेषातून) वजा न होणाऱ्या सहा या आकडयासह, (वजा होणाऱ्या) या दहा आकडयापासून लघू मिळतो. आता दोन शेष म्हणून राहिले. त्यांतून वजा न होणाऱ्या पूर्वीच्या तीन या आकडयापासून द्रुत मिळतो. नंतर वजा होणाऱ्या दोन या आकडयापासून, त्यापूर्वीच्या वजा न होणाऱ्या एक या आकडयासह, लघु मिळतो. (दोन या शेषातून दोन वजा होतात. पण नंतर शून्य या शेषातून एक वजा होत नसल्याने तो अकृतार्थ होतो.) मग आकडा रहात नसल्याने तालपूर्ण होण्यासाठी एक द्रुत घ्यावा. (०।०। असा हा सातवा प्रकार होतो.) या बाबतीत पुढील संप्रदाय जाणावा– जेथे नंतरच्या वजा न होणाऱ्या किंवा त्या अभावी पूर्वीच्या वजा न होणाऱ्या आकडयासह, वजा होणाऱ्या आकडयापासून पहिला लघु मिळतो तेथे दुसऱ्या लघूच्याही बाबतीत हाच क्रम जोडून घ्यावा. असे हे सर्व (स्पष्टीकरण) प्लुताच्या प्रस्तारात आम्ही दाखवले आहे. असेच सर्वत्र प्रस्तारांच्या बाबतीत जाणावे. असे हे भेदाचे स्वरूप निश्चितपणे कळवून देणारे नष्ट प्रश्नाचे उत्तर जाणावे. नष्टाचे स्वरूप सांगणारा हा उपाय जरी प्रत्ययच होय तरी गौणवृत्तीने नष्ट या शब्दाने सांगितला आहे. उत्तर यापुढील शब्दाशी संलग्न असल्याने तो नपुंसकलिंगी योजिला आहे. (३२४ ते ३३०)

नष्ट समाप्त.

ईद्यूपोऽत्र कतिधा भेदः प्रश्न इतीदृशः ।
उद्दिष्टं तत्र संख्याङ्कसंततिं नष्टवल्लिखेत् ॥ ३३१ ॥
यैरङ्कैः पतितैर्नष्टे लभ्यन्ते ये प्लुतादयः ।
तानेवाङ्काँल्लभन्ते ते भेदमुद्दिष्टमाश्रिताः ॥ ३३२ ॥
यद्वा षट्प्लुतहेत्वङ्कमध्येऽन्त्यात्प्राचि सप्तमे ।
तदभावे तु षष्ठाङ्के पातितेऽन्त्याङ्कमध्यतः ॥ ३३३ ॥
यः शेषः स प्लुताल्लभ्यो लब्धहीनान्त्यशेषतः ।
ज्ञानं पूरणसंख्याया उद्दिष्टोत्तरमिष्यते ॥ ३३४ ॥

इत्युद्दिष्टम्

येथे (म्हणजे प्रस्तुत तालप्रस्तारात) अशा स्वरूपाचा (हा) प्रकार कितवा ? असा प्रश्न (विचारला) म्हणजे (ते) उद्दिष्ट (होय). त्यात संख्येच्या आकड्यांची श्रेणी नष्टाप्रमाणे लिहावी. (३३१)

जे आकडे वजा केल्याने नष्टात जे प्लुत इत्यादी मिळतात, ते उद्दिष्टाच्या प्रकाराचा आश्रय असणारे (प्लुत इत्यादी) तेच आकडे प्राप्त करतात. (३३२)

किंवा सहावा इत्यादी प्लुत मिळण्यास कारणीभूत होणाऱ्या आकड्यांमधील जो शेवटचा आकडा, त्यापासून पूर्वीचा सातवा व तो नसेल तर सहावा आकडा शेवटच्या आकड्यातून वजा केल्यावर (३३३) जो शेष राहतो तो प्लुतापासून प्राप्त करून घ्यावा. हा मिळालेला आकडा शेवटच्या आकड्यातून कमी केल्यावर राहिलेल्या शेष आकड्याने पूरणसंख्येचे (म्हणजे तो प्रकार कितवा) याचे ज्ञान (मिळते). (हे ज्ञान) उद्दिष्टाचे उत्तर मानले आहे. (३३४)

हे उद्दिष्ट होय.

क० आता उद्दिष्टाचे लक्षण देत आहे–

प्रस्तुत तालाच्या प्रस्तारात, भेदाच्या स्वरूपाला उद्देशून तो भेद कितवा असा पूरणसंख्येविषयी (म्हणजे क्रमांकासंबंधी) प्रश्न विचारला तर असा प्रश्न उद्दिष्ट म्हणून म्हटला आहे. या उद्दिष्टात नष्टाप्रमाणेच संख्येच्या आकड्यांची श्रेणी लिहावी. येथेही आम्ही उदाहरणासह (स्पष्ट करून) सांगतो. प्लुताच्या प्रस्तारात एकोणीसपर्यंतची अंकश्रेणी लिहिल्यावर दोन लघू व दोन द्रुत यांनी युक्त असणारा भेद कितवा असे उद्दिष्ट (मानू).

१	२	३	६	१०	१९

नष्टात जे आकडे वजा केले असता प्लुत इत्यादी मिळतात, तेच उद्दिष्टाच्या भेदात असणारे प्लुत इत्यादी तेच आकडे प्राप्त करून घेतात. नष्टात शेवटचा अवयव पूर्वीप्रमाणेच प्राप्त होण्यामुळे उद्दिष्टातही शेवटचा अवयव (प्राप्त होणे) इत्यादी जाणावे. नष्टात ताल पूर्ण होण्यासाठी किंवा वजा न होणाऱ्या आकड्यामुळे द्रुत मिळतात. त्यामुळे उद्दिष्टाच्या भेदात असणाऱ्या द्रुतापासून कोणताही आकडा मिळत नाही. या भेदात शेवटचा व त्याच्या अलीकडचा असे जे दोन द्रुत त्यांनी (कळणारे) शेवटचा व त्यापासून दुसरा असे वजा न होणारे दहा व सहा हे आकडे सोडून, तिसऱ्या लघूने वजा होणारा तीन हा आकडा मिळतो. नंतर चवथ्या लघु या अवयवाने सान्तर वजा होणारा एक हा आकडा मिळतो. या मिळालेल्या दोन आकड्यांनी मिळून चार ही संख्या होते. ही मिळालेली चार संख्या एकोणीसमधून वजा केल्यावर पंधरा शिल्लक राहतात. या शेष आकड्यावरून हा पंधरावा प्रकार अशी क्रमवाचक संख्या मिळते. तिचे ज्ञान हे उद्दिष्टाचे उत्तर मानले आहे.

द्रुत, गुरु व द्रुत असे स्वरूप असणारा प्रकार कितवा ?

असा प्रश्न केला असता, शेवटच्या द्रुतामुळे, वजा न होणारा शेवटचा दहा हा आकडा सोडून, त्या अगोदरच्या गुरुमुळे सलग वजा होणारे दुसरे व तिसरे जे सहा आणि तीन ते आकडे मिळतात, त्यांची बेरीज नऊ होते. एकोणिसातून नऊ वजा केल्यावर दहा शेष राहतात. त्यावरून हा दहावा भेद असे क्रमवाचक संख्येचे ज्ञान मिळते. तेच उद्दिष्टाचे उत्तर होय. असे सर्वत्र प्रस्तारांत पहावे. हेच (सर्वत्र लागू पडण्यामुळे) व्यापक असे उद्दिष्टाचे उत्तर जाणावे.

क्वचित सुलभपणासाठी (केवळ प्लुत असणाऱ्या प्रकारांमध्ये लागू पडण्यामुळे) व्यापक नसणारे उत्तर दाखवीत आहे. 'प्लुताला कारणीभूत असणाऱ्या सहा (इत्यादी) आकड्यांमध्ये' यातील सहा हा शब्द क्रमवाचक संख्येचा म्हणजे सहावा असा निर्दिष्ट केलेला आहे. 'प्लुताला कारणीभूत होणारे आकडे' यावरून सहावा व त्यापासून पुढील उजव्या बाजूचे सर्व आकडे असे समजायचे. कारण ते सर्व प्लुत प्राप्त होण्यास कारणीभूत होण्यासाठी समर्थ आहेत. 'आदि' हा शब्द अध्याहृत घ्यायचा. यावरून याचा अर्थ 'सहावा इत्यादी प्लुताला कारणीभूत असणाऱ्या आकड्यांमध्ये' असा समजायचा. सहावा आकडा एकोणीस, सातवा तेहतीस, आठवा साठ, नववा एकशेसहा असेच दहावा इत्यादीही जाणावे. याप्रकारे एकोणीस इत्यादी उजव्या बाजूचे सर्व आकडे प्लुत मिळण्यास कारणीभूत असणारे होत. प्रस्तुत तालाच्या दृष्टीने त्यांतला जो कोणचा आकडा शेवटचा म्हणून कल्पिला असेल त्याच्या मागचा (म्हणजे डाव्या बाजूचा) सातवा किंवा तो नसेल तर सहावा म्हणजे शेवटच्या आकड्याच्या पासून सहावा, शेवटच्या आकड्यातून वजा केल्यावर जो आकडा शिल्लक राहतो तो प्लुतापासून मिळतो.

याचा अर्थ असा– ज्या उद्दिष्टाच्या प्रकारात आरंभी, मध्ये किंवा शेवटी प्लुत दिसून येतो त्यात याप्रमाणे जाणावे– प्लुताच्या प्रस्तारात पहिला भेदच फक्त प्लुत असणारा असतो. बाकीच्या कुठल्याही भेदात प्लुत नसतो. तोच प्लुत असणारा भेद उद्दिष्ट असता, प्लुताला कारणीभूत होणाऱ्या शेवटच्या एकोणीस या आकड्यामधून, त्याच्या पूर्वीचा सातवा आकडा नसल्याने सहावा जो एक हा आकडा तो वजा केल्यावर अठरा शिल्लक राहतात. ते प्लुतापासून मिळतात. शेवटच्या एकोणीस या आकड्यातून अठरा वजा केल्यावर एक शिल्लक राहतो. त्यावरून हा पहिला भेद असे उद्दिष्टाचे-उत्तर होय. 'शेवटच्या आकड्यामधून मिळालेला

आकडा कमी केल्यावर राहिलेल्या आकड्यापासून' हा भाग दोन्ही पद्धतीत समान आहे असे जाणावे.

द्रुताने वाढलेल्या प्लुताच्या प्रस्तारातील (म्हणजे द्रुत व प्लुत अशा साडेतीन मात्रांच्या ताल प्रस्तारातील) द्रुतात्मक भेद उद्दिष्ट असता (पुढील प्रमाणे योजना करावी). प्लुताला कारणीभूत असणाऱ्या शेवटच्या तेहतीस या आकड्यातून, त्याच्या पूर्वीचा सातवा एक हा आकडा वजा केल्यावर बत्तीस शिल्लक राहतात. हा बत्तीस आकडा प्लुतापासून मिळतो. शेवटच्या तेहतीस या आकड्यामधून बत्तीस वजा केल्यावर एक हा आकडा शिल्लक राहतो. त्यावरून हा पहिला भेद असे उद्दिष्टाचे उत्तर मिळते. याच प्रस्तारातील प्लुत व द्रुत या स्वरूपाचा भेद उद्दिष्ट असता, द्रुत शेवटी असल्याने शेवटचा तेहतीस हा आकडा सोडावा. प्लुत हा उपान्त्य (म्हणजे शेवटच्या अलीकडचा) असल्याने एकोणीस या उपान्त्य आकड्यामधून, त्याच्यापासून मागचा सहावा एक हा आकडा वजा केल्यावर अठरा शिल्लक राहतात. तेव्हा प्लुतापासून अठरा हा आकडा मिळतो. शेवटच्या तेहतीस या आकड्यातून अठरा वजा केल्यावर पंधरा शिल्लक राहतात. त्यावरून हा पंधरावा भेद असे उद्दिष्टाचे उत्तर होय.

तसेच लघु व प्लुत या स्वरूपाच्या तालप्रस्तारातील प्लुत व लघु या स्वरूपाचा भेद उद्दिष्ट असता, लघु शेवटी असल्याने, त्याने प्लुताला कारणीभूत होणाऱ्या शेवटच्या साठ या आकड्यामधून वजा होणारा, त्या पूर्वीचा तेहतीस हा आकडा मिळतो. नंतर उपान्त्य प्लुताने, प्लुताला कारणीभूत होणाऱ्या एकोणीस या आकड्यामधून, त्याच्या मागचा सहावा एक हा आकडा वजा केल्यावर अठरा राहतात. असे लघु व प्लुत यांनी मिळालेले तेहतीस व अठरा मिळून होणारे एक्कावन शेवटच्या साठ या आकड्यातून वजा केल्यावर नऊ शिल्लक राहतात. यावरून हा नववा भेद असे उद्दिष्टाचे उत्तर मिळते.

तसेच याच प्रस्तारातील द्रुत, प्लुत व द्रुत या स्वरूपाचा भेद उद्दिष्ट असता, द्रुत शेवटी असल्याने शेवटचा साठ हा आकडा सोडावा. प्लुत उपान्त्य असल्याने, उपान्त्य तेहतीस मधून, त्याच्यापासूनचा मागचा सातवा एक हा आकडा वजा केल्यावर राहणारा बत्तीस हा आकडा प्लुतापासून मिळतो. तो शेवटच्या साठ या आकड्यातून वजा केल्यावर अठ्ठावीस शिल्लक राहतात. म्हणून हा अठ्ठाविसावा भेद असे उद्दिष्टाचे उत्तर होय.

याच प्रस्तारातील प्लुत व दोन द्रुत या स्वरूपाचा भेद उद्दिष्ट असता, दोन द्रुत शेवटी असल्याने अन्त्य व उपान्त्य असणारे साठ व तेहतीस हे आकडे सोडावे. एकोणीसमधून त्याच्या मागचा सहावा एक हा आकडा वजा केल्यावर अठरा राहतात. हा अठरा आकडा प्लुतापासून मिळतो. तो शेवटच्या साठ या आकड्यातून वजा केल्यावर बेचाळीस शिल्लक राहतात. म्हणून हा बेचाळिसावा भेद असे उद्दिष्टाचे उत्तर मिळते. याच प्रस्तारातील दोन द्रुत व प्लुत या स्वरूपाचा भेद उद्दिष्ट असता, प्लुत शेवटी असल्याने, शेवटच्या साठ या आकड्यामधून त्याच्या मागचा सातवा दोन हा आकडा वजा केल्यावर अठ्ठावन राहतात. हा अठ्ठावन आकडा प्लुतापासून मिळतो. शेवटच्या साठामधून तो वजा केल्यावर दोन शिल्लक राहतात. म्हणून हा दुसरा भेद असे उद्दिष्टाचे उत्तर होय. याच प्रस्तारातील लघु व प्लुत या स्वरूपाचा भेद उद्दिष्ट असता वरच्या-प्रमाणेच दोन हा आकडा शिल्लक राहतो. येथे उद्दिष्टात असणाऱ्या उपान्त्य लघूने, नष्टात त्या लघूचे स्वरूप मिळण्यास कारणीभूत असणारा जो एक हा आकडा मिळतो तो दोनमधून वजा

केल्यावर एक शिल्लक राहतो. म्हणून हा पहिला भेद असे उत्तर मिळते. याप्रकारे नंतरनंतरच्या आकड्यांमध्येही प्लुतयुक्त भेद जाणावा. प्लुत असणाऱ्या भेदांच्याच बाबतीत ही उत्तराची योजना करायची असल्याने हे उत्तर व्यापक नसणारे म्हटले आहे.

नुकत्याच सांगितलेल्या लघु व प्लुत या स्वरूपाच्या भेदात, प्लुत शेवटी असल्याने, 'किंवा' असे म्हणून उत्तर काढण्याची जी दुसरी पद्धत दिली आहे तिचा वापर करून, शेवटच्या साठ या आकड्यामधून त्याच्या मागचा सातवा असणारा जो दोन आकडा तो वजा केल्यावर शिल्लक राहिलेला अठ्ठावन हा आकडा प्लुतापासून मिळाला. नंतर लघूने वजा होणारा आकडा मिळायचा आहे. त्याबाबतीत अन्त्य शेष असणाऱ्या दोन्हींतून गुरूला कारणीभूत असणाऱ्या, तिसरा म्हणून वजा होणाऱ्या सहा या आकड्याच्या पूर्वीचा तीन हा आकडा वजा होत नसल्याने नष्टात द्रुत कसा मिळाला नाही ? येथे दोन व एक या आकड्यांपैकी कोणताही वजा होत असल्याने लघूने कोणता आकडा मिळतो असा संदेह उत्पन्न होतो. त्यात एक आकडा वजा केल्यावर एक शिल्लक राहतो. म्हणून हा पहिला भेद असे उद्दिष्टाचे उत्तर सिद्ध होते. दोन हा आकडा वजा केल्यावर शेष राहात नसल्याने ते सिद्ध होत नाहीच. यात निर्णय कसा घ्यायचा ? असे म्हटल्यास त्याचेबद्दल सांगतो– अगोदर नष्टात नष्ट अंक, भिन्न अंक व शेष या क्रमाने पूर्वीचे आकडे वजा केल्यावर, जितके वजा होत नाहीत त्यांच्यापासून तितके द्रुत मिळतातच. द्रुताच्या प्राप्तीनंतर किंवा आरंभीच एकटाच वजा होत असेल तर त्या आकड्यापासून लघु, सान्तर वजा होत असेल तर त्यापासून वेगळा लघु, निरन्तर बजा होत असेल तर त्यापासून गुरु, गुरूला कारणीभूत होणाऱ्या आकड्यापासून तिसरा वजा होत असेल तर त्यापासून प्लुत मिळतो असे पूर्वी सांगितले आहेच.

येथे हा विशेष जाणावा– प्रथम वजा न होणाऱ्या आकड्यापासून द्रुत मिळतोच. वजा होणाऱ्या आकड्यानंतर, वजा न होणारा आकडा असला तर त्यापासून सर्वत्र द्रुत मिळत नाही. पण जेथे द्रुताला कारणीभूत होणाऱ्या किंवा न होणाऱ्या, नंतरच्या वजा न होणाऱ्या आकड्यासह वजा होणारा आकडा लघु प्राप्त करून देण्यास कारणीभूत होतो तेथे वजा होणाऱ्या आकड्यानंतर वजा न होणाऱ्या पूर्वीच्या आकड्यापासूनही द्रुत मिळत नाही.

अशाप्रकारे वजा होणाऱ्या आकड्यानतर वजा न होणाऱ्या आकड्यापासून सर्वत्र प्लुत मिळत नाही. जेथे वजा न होणाऱ्या पूर्वीच्या आकड्यासह वजा होणारा आकडा लघूला कारणीभूत होतो, तेथे त्या वजा न होणाऱ्या आकड्यापासूनही द्रुत मिळत नाही. त्यापासूनच्या पूर्वीच्या वजा न होणाऱ्या आकड्यापासून मात्र द्रुत मिळतोच. म्हणून जेथे लघु मिळतो तेथे दोन आकडे निवृत्त होतात; जेथे गुरु मिळतो तेथे चार आकडे निवृत्त होतात; जेथे प्लुत मिळतो तेथे सहा आकडे निवृत्त होतात. अशा या नियमाचे व्यापकत्व 'नंतरच्या वजा न होणाऱ्या आकड्यासह, तो संभवत नसता पूर्वीच्या वजा न होणाऱ्या (आकड्यासह)' असे म्हणणाऱ्या ग्रंथकारानेच सूचित केलेले आहे. म्हणून प्रस्तुतच्या उदाहरणात वजा न होणाऱ्या तीन या आकड्यापासून द्रुत मिळत नाहीच. वजा होणाऱ्या दोन या आकड्यापासूनही लघु मिळत नाहीच. कारण ते दोन्हीही, प्लुत प्राप्त करून देणाऱ्या सहा आकड्यांत समाविष्ट असल्याने निवृत्त होतात. म्हणून जसे प्रस्तुत भेदातील लघु नष्टातही एक या आकड्याने मिळतो, तसेच उद्दिष्टातही या लघूने एक हाच वजा होणारा आकडा मिळतो. असे हे सर्व (विवरण) निर्दोष आहे. (३३१–३४)

हे उद्दिष्ट होय.

आदौ रूपमथैकैक[७१]मङ्कसंख्याङ्कसंततेः ।
क्रमादधोऽधो विन्यस्येदन्त्यादींश्चतुरस्तथा ॥ ३३५ ॥
स्वपङ्क्तिस्थाँल्लिखेदङ्कानग्रसंख्याङ्कवद्युतान् ।
किंतु प्रतिनिधिर्नात्र विद्यते तुर्यषष्ठयोः ॥ ३३६ ॥
इष्टतालद्रुतमितेष्वङ्केषु लिखितेष्विति ।
क्रमादन्त्योपान्त्यतुर्यषष्ठैर्यत्र द्रुतादयः ॥ ३३७ ॥

प्रथम रूप म्हणजे एक (हा आकडा लिहावा). नंतर संख्येच्या आकड्यांच्या ओळीतील (दोन इत्यादी आकड्यांच्या) खाली खाली (३३५) क्रमाने शेवटचा इत्यादी एकेक आकडा ठेवावा. तसेच (हे शेवटचा इत्यादी) चार आपल्याच (म्हणजे खालील) ओळीत असणारे आकडे, वरच्या ओळीतील संख्येच्या आकड्याने (युक्त असणाऱ्या आकड्यासह) मिळून लिहावे. पण यात चवथा व सहावा यांचा प्रतिनिधि असत नाही. (३३६)

अभिप्रेत असणाऱ्या तालाच्या द्रुतांच्या प्रमाणाइतके आकडे लिहिल्यावर ज्यात

क. आता पातालाचे लक्षण देत आहे. पूर्वीप्रमाणे लिहिलेल्या संख्येच्या आकड्यांच्या ओळीत आरंभी म्हणजे पहिल्या कोष्टकात, एक या आकड्याच्या खाली गणिती लोकात रूप म्हणून प्रसिद्ध असणारा एक हा आकडा लिहावा. किंवा संख्येच्या आकड्याच्या ओळीत आरंभी असणारे स्वरूप म्हणजे एक हा आकडा (असाही अर्थ घेता येईल); तो ओळीच्या आरंभी ठेवावा. असा अर्थ घेताना 'आरंभी' या शब्दाची योजना दोन वेळा करावी लागते. मग दोन इत्यादी आकड्यांच्या खाली क्रमाने एकेक आकडा ठेवावा; हे सामान्यपणे सांगितले. ते आकडे शेवटचा इत्यादी चार होत हे विशेषेकरून सांगितले. त्यांची ओळ म्हणजे खालची आडवी ओळ तीमध्ये शेवटचा, त्याअलीकडचा, चवथा व सहावा हे आकडे संख्येच्या आकड्यांच्या ओळीतल्याप्रमाणे पण अग्रसंख्यांकासह मिळून लिहावे. चवथा व सहावा यांचा प्रतिनिधी यात असत नाही. अग्रभागी म्हणजे वरच्या ओळीत असणारा संख्येचा जो आकडा त्याने युक्त असणारा तो अग्रसंख्यांकवान होय. या सांगण्यानुसार शेवटचा आकडाच घेतला जातो कारण तोच सर्वत्र संभवतो. 'अग्रसंख्यांकवान याने युक्त असणारे' या म्हणण्यानुसार यथासंभव युक्त असणारे जे

---

७१. कल्लिनाथ व सिंहभूपाल यांच्या टीकांनुसार 'आदौ रूपमथैकैकमङ्कं संख्याङ्कसंततेः' हा पाठ योग्य वाटतो. अडचार व आनन्दाश्रम आवृत्तींत 'आदौरूपमथैकैकमङ्कसंख्याङ्कसंततेः' असे छापलेले आहे.

प्लुत प्रस्तार संख्यांकसंतति	१	२	३	६	१०	१९
पाताल	१	२	५	१०	२२	४४

मीयन्ते सर्वभेदस्थाः पातालः सोऽभिधीयते ।

१	२	५	१०	२२	४४	९१

इति पातालः

क्रमाने शेवटचा, त्याच्या अलीकडचा, चवथा व सहावा यांनी त्या तालाच्या सर्व भेदांतील द्रुत इत्यादी मोजले जातात तो पाताल म्हटला आहे. (३३७, ३३८–)

उपान्त्य इ. तेच फक्त घ्यायचे. नाहीतर अग्रसंख्यांकवान एवढेच म्हटले असते. 'युक्त असणारे शेवटचा इत्यादि' या म्हणण्याने उपान्त्य इत्यादीच घ्यायचे, अन्त्य घ्यायचा नाही. कारण तो स्वतःशीच युक्त होणे संभवत नाही.

या पातालात आकडे लिहिण्याचा प्रकार असा--

आरंभी लिहिलेल्या एक आकडघाच्या बाबतीत शेवटचा असणे हेच संभवत असल्याने वरील संख्येच्या आकडघातील एक या आकडघाशी मिळून होणारा दोन हा आकडा दोनच्या खाली लिहावा. त्या शेवटच्या दोन आकडघाशी वरच्या ओळीतील दोन हा आकडा मिळवून व अलीकडचा एक हा आकडा मिळवून होणारा पाच हा आकडा तीनच्या खाली लिहावा. त्या पाच या शेवटच्या आकडघाशी, वरच्या ओळीतील असणाऱ्या आकडघाने युक्त असा उपान्त्य म्हणजे पाच हा आकडा मिळवून होणारा दहा हा आकडा सहा या आकडघाखाली लिहावा. मग त्या शेवटच्या दहा या आकडघाबरोबर, वरच्या बाजूस असणाऱ्या सहा या संख्येच्या आकडघाने युक्त उपान्त्य पाच हा आकडा व चवथ्या क्रमांकाचा एक हा आकडा असे मिळवून होणारा बावीस हा आकडा दहा या आकडघाखाली लिहावा. त्या शेवटच्या बावीस या आकडघाबरोबर, वरच्या बाजूस असणाऱ्या दहा या आकडघाने युक्त असणारा उपान्त्य दहा हा आकडा व चवथा दोन हा आकडा मिळवून होणारा चव्वेचाळीस हा आकडा एकोणीस या आकडघाखाली लिहावा. त्या शेवटच्या चव्वेचाळीस या आकडघाबरोबर, वरच्या बाजूच्या एकोणीस या आकडघाने युक्त असणारा उपान्त्य बावीस हा आकडा, चवथा पाच हा आकडा, व सहावा एक हा आकडा मिळवून होणारा एक्याण्णव हा आकडा तेहतीस या आकडघाखाली लिहावा. याच प्रमाणे पुढेही अभिप्रेत असणाऱ्या तालाच्या बाबतीत जेवढे द्रुत असतील तितक्या प्रमाणाचे आकडे लिहावे. अशा प्रकारे इष्ट तालातील द्रुतांच्या संख्येचे आकडे लिहिल्यावर, खालच्या ओळीतील, शेवटचा, त्या अलीकडचा, चवथा व सहावा या आकडघांनी क्रमाने सर्व भेदांतील द्रुत इत्यादींची संख्या कळते. उदा. प्लुताच्या प्रस्तारात शेवटच्या चव्वेचाळीस या आकडघाने सर्व भेदातील द्रुतांची असणारी (चव्वेचाळीस ही) संख्या समजते. उपान्त्य बावीस या आकडघाने सर्व भेदांतील लघूंची संख्या कळते. चवथ्या क्रमांकाच्या पाच या आकडघाने सर्व भेदांतील गुरूंची संख्या कळते. सहाव्या एक या आकडघाने प्लुतसंख्या कळते. असेच सर्वत्र जाणावे. (३३५–३३७, ३३८–)

पङ्क्तिं कृत्वेष्टतालस्थद्रुतसंमितकोष्ठिकाम् ॥ ३३८॥
तिरश्चीं तत्परामूनां कोष्ठेनाथ ततः पराः ।
द्विद्विकोष्ठोनिताः स्वस्वपूर्वतोऽथाङ्कयोजना ॥ ३३९ ॥
द्वौ द्वौ तासामाद्यकोष्ठौ स्यातामेकाङ्कसंयुतौ ।
अधस्तन्यास्तृतीयादौ विषमे कोष्ठके लिखेत् ॥ ३४० ॥
अन्त्याद्यङ्कचतुष्कस्य योगं संख्याङ्कसंघवत् ।
समे त्वन्त्यं विनैतेषां योगं न्यस्याथ पङ्क्तिषु ॥ ३४१ ॥

(आपल्यास) अभिप्रेत असलेल्या तालातील द्रुतांच्या संख्येच्या प्रमाणाची कोष्टके असणारी आडवी ओळ (तयार) करून (३३८) मग तिच्यावरची (आडवी ओळ) एका कोष्टकाने कमी असणारी (अशी योजावी). नंतर (तिच्यावरील) बाकीच्या आडव्या ओळी, मागील प्रत्येकीच्या पेक्षा दोन दोन कोष्टकांनी कमी असणाऱ्या अशा योजाव्या. आता (कोष्टकांतील) आकड्यांची योजना अशी– (३३९) (त्या ओळींतील) पहिली दोन कोष्टके एक या आकड्याने युक्त योजावी. खालच्या ओळीतील तिसऱ्या इत्यादी विषम कोष्टकात, (३४०) अन्त्य इत्यादी चार आकड्यांचा योग (म्हणजे बेरीज) संख्येच्या आकड्यांच्या संघाप्रमाणे लिहावा; आणि सम (कोष्टकात) अन्त्याखेरीज त्यांचा योग लिहावा. मग इतर ओळींत (३४१) राहिलेल्या कोष्टकांत (म्हणजे सम कोष्टके

क. द्रुतमेरूचे लक्षण देत आहे आता आम्ही इष्टताल द्रुत व प्लुत असणारा असा मानला तर त्यात सात द्रुत आहेत. तेव्हा सात कोष्टके असणारी आडवी ओळ योजायची. प्रथम उजव्या बाजूला जाणारी सात कोष्टके असणारी आडवी खालची ओळ तयार करून मग तिच्यावरची ओळ डाव्या बाजूच्या एक कोष्टकाने कमी असणारी म्हणजे सहा कोष्टके असणारी अशी योजावी. नंतर या दुसऱ्या ओळीच्या वरच्या ओळी म्हणजे तिसऱ्या इत्यादी ओळी आपआपल्या पूर्वीच्या ओळीपेक्षा दोन दोन कोष्टकांनी कमी अशा योजाव्या. म्हणजेच वरची तिसरी, दुसरीपेक्षा, डाव्या बाजूच्या दोन कोष्टकांनी कमी असणारी अशी चार कोष्टकांची योजावी. त्यावरची चवथी ओळ पूर्वीप्रमाणे दोन कोष्टकांनी कमी असणारी म्हणजेच दोन कोष्टके असणारी अशी योजावी. उदाहरणासाठी हे एवढेच सांगितले. या पुढेही इष्ट (तालातील द्रुतांच्या संख्येनुसार) मेरूच्या उजव्या बाजूस वाढवावे. आता यातील आकड्यांची योजना अशी– या ओळीतील दोन दोन पहिली कोष्टके एक या आकड्याने युक्त अशी लिहावी. खालच्या ओळीतील तिसऱ्या इत्यादी विषम कोष्टकात संख्येच्या आकड्यांच्या ओळीप्रमाणे अन्त्य इत्यादी चार आकड्यांची बेरीज लिहावी. संख्येच्या आकड्यांच्या ओळीप्रमाणे या अतिदेशाचा अर्थ असा की चवथा व सहावा हे आकडे नसल्यास त्यांचे प्रतिनिधी म्हणून तिसरा व पाचवा हे योजावे. अशा तऱ्हेने खालच्या ओळीतल्या तिसऱ्या कोष्टकात अन्त्य व उपान्त्य या आकड्यांची बेरीज लिहावी. सम-संख्येच्या चवथ्या इत्यादी कोष्टकात अन्त्याखेरीज बाकीच्या म्हणजे उपान्त्य, चवथा व सहावा यांची बेरीज लिहावी. यात अन्त्य नाही हा विशेष होय. याप्रकारे खालच्या ओळीतील सम अशा चवथ्या कोष्टकात अन्त्य जो दोन हा आकडा त्याशिवाय, उपान्त्य एक आकडा व चवथा

परासु शेषकोष्ठेषु चतुर्योगोऽयमिष्यते ।
नास्ति प्रतिनिधिस्त्वासामङ्कयोस्तुर्यषष्ठयोः ॥ ३४२ ॥
तासु स्वभावतो यास्तु निष्पन्ना ऊर्ध्वपङ्क्तयः ।
तन्मध्ये तु समाकोष्ठेऽन्त्यस्थानेऽन्त्यादधस्तनः ॥ ३४३ ॥
अङ्कः कार्योऽथ तैरङ्कैर्भेदसंख्याभिधीयते ।
विषमायामूर्ध्वपङ्क्तौ स्थितैरङ्कैरधः क्रमात् ॥ ३४४ ॥
एकद्रुताद्या विषमत्र्यादिसंख्या द्रुता भिदाः ।
सर्वद्रुतान्ता मीयन्ते समपङ्क्तिस्थितैः पुनः ॥ ३४५ ॥
द्रुतहीनादयो द्व्यादिसमसंख्या द्रुता भिदाः ।
सर्वद्रुतान्ता ज्ञायन्ते द्रुतमेरुरयं मतः ॥ ३४६ ॥
ऊर्ध्वपङ्क्तिस्थसर्वाङ्कयोगात्संख्यापि गम्यते ।

इति द्रुतमेरुः

सोडून बाकीच्या विषम कोष्टकांत' हा (अन्त्य इत्यादी) चारीचा योग (म्हणजे बेरीज) इष्ट होय. चवथ्या व सहाव्या आकड्यांचा प्रतिनिधी यांच्या बाबतीत असत नाही. (३४२) त्या (आडव्या ओळींत) स्वाभाविकपणेच उत्पन्न झालेल्या ज्या उभ्या ओळी आहेत, त्यांमध्ये सम संख्येच्या ओळीतील कोष्टकात (मागील ओळीतील) अन्त्य आकड्याच्या जागी, अन्त्याच्या खालचा (३४३) आकडा योजावा. आता त्या आकड्यांनी भेदांची संख्या सांगितली जाते. विषम अशा उभ्या ओळीत असणाऱ्या आकडयांनी, क्रमाने, खाली असणाऱ्या (कोष्टकापासून आरंभ केला असता) (३४४) एक द्रुत असणारे, विषम तीन इत्यादी संख्येचे व शेवटी सर्व द्रुत असणारे असे द्रुतांचे भेद संख्येने कळतात. आणि सम ओळीतील (आकड्यांनी) (३४५) द्रुत नसलेले इत्यादी (व) दोन इत्यादी सम संख्येचे आणि शेवटी सर्व द्रुत असणारे असे द्रुतांचे भेद कळतात. हा द्रुतमेरु मानला आहे. (३४६)

उभ्या ओळीतील सर्व आकड्यांच्या बेरजेने संख्याही कळते. (३४७–)

हा द्रुतमेरु होय.

नसल्याने तिसरा असा जो एक आकडा, त्यांची दोन ही बेरीज लिहावी. तिच्या विषम संख्येच्या पाचव्या कोष्टकात अन्त्य दोन हा आकडा व उपान्त्य दोन हा आकडा आणि चवथा एक हा आकडा यांची बेरीज पाच ही लिहावी. तिच्या सम संख्येच्या सहाव्या कोष्टकात अन्त्य पाच आकडा सोडून, उपान्त्य दोन हा आकडा, चवथा एक हा आकडा व सहावा नसल्याने पाचवा एक हा आकडा यांची चार ही बेरीज लिहावी. तिच्या विषमसंख्येच्या सातव्या कोष्टकात, अन्त्य, उपान्त्य, चवथा व सहावा असे क्रमाने असणारे जे चार, पाच, दोन व एक हे आकडे, त्यांची बारा ही बेरीज लिहावी.

						१	१
				१	१	७	८
			१	१	५	६	२०	२७
		१	१	३	४	९	१४	२५	४४
१	१	२	२	५	४	१२	७	२६	
१	२	३	४	५	६	७	८	९	

इति द्रुतमेरुकोष्ठकम् – हे द्रुतमेरुकोष्टक.

दुसऱ्या इत्यादी वरच्या ओळीतील बाकीच्या, म्हणजे सम कोष्टके सोडून इतर असणाऱ्या विषम कोष्टकांत, ही चारींची बेरीज (म्हणजे अन्त्य इत्यादी चारींची बेरीज) मानली आहे. 'त्यामधील सम कोष्टकांत' असे पुढे सांगितले असल्याने बाकीच्या म्हणजे सम सोडून इतर जी विषम कोष्टके त्यांत असा 'शेषकोष्टकांत' याचा अर्थ घ्यायचा. या वरच्या ओळींतील चवथ्या व सहाव्याचा प्रतिनिधि असत नाही. या आडव्या ओळीतून स्वाभाविकपणे निष्पन्न होणाऱ्या ज्या उभ्या ओळी त्यांमध्ये सम कोष्टकात अन्त्याच्या जागी, अन्त्याच्या खालचा आकडा योजावा.

पहिली खालची ओळ मूळ म्हणून मानल्यास, तिच्या बाबतीत निष्पन्न होणाऱ्या उभ्या ओळीतील, पहिली ओळ एक कोष्टकाची, दुसरी दोन कोष्टकांची, तिसरीही दोन कोष्टकांची, चवथी व पाचवी प्रत्येकी तीन कोष्टकांच्या व सहावी आणि सातवी प्रत्येकी चार कोष्टकांच्या अशा, या सांगितलेल्या द्रुतमेरूच्या बाबतीत सात उभ्या ओळी होतात. त्या उभ्या ओळींच्या मध्ये सम संख्येच्या ओळीतील कोष्टकात, पूर्वीच्या ओळीतील अन्त्य आकड्याच्या जागी अन्त्याच्या खालचा आकडा लिहावा. प्रस्तुत द्रुतमेरूत तीन उभ्या ओळींमध्ये आकड्यांची योजना केल्यावर, तीन कोष्टके असणाऱ्या चवथ्या उभ्या ओळीत, मधल्या कोष्टकात, अन्त्य जो एक हा आकडा त्या खालचा दोन हा आकडा घेऊन व त्यात उपान्त्य एक हा आकडा मिळवून होणारा तीन हा आकडा लिहावा. मग विषम संख्येच्या पाचव्या ओळीत खालच्या कोष्टकात, अन्त्य व उपान्त्य असणाऱ्या तीन व एक या आकड्यांची चार ही बेरीज लिहावी. मग सम संख्येच्या सहाव्या ओळीच्या दुसऱ्या कोष्टकात, अन्त्याच्या खालचा पाच आकडा, उपान्त्य तीन हा आकडा व चवथा एक हा आकडा यांची होणारी नऊ ही बेरीज लिहावी. नंतर विषम संख्येच्या सातव्या ओळीतील दुसऱ्या कोष्टकात, अन्त्य नऊ हा आकडा, उपान्त्य चार हा आकडा, व चवथा एक हा आकडा यांची होणारी चौदा ही बेरीज लिहावी. तिच्याच तिसऱ्या कोष्टकात, अन्त्याच्या खालचा चार हा आकडा व उपान्त्य एक हा आकडा यांची बेरीज पाच ही लिहावी. तिच्याच चवथ्या कोष्टकात, अन्त्य पाच हा आकडा व उपान्त्य एक हा आकडा यांची बेरीज सहा ही लिहावी. या आकड्यांनी प्रस्तारातल्या तालाच्या भेदांची संख्या कळते.

लघुमेरौ कोष्ठपङ्क्तीः प्राग्वन्न्यस्येत्तदादिमः ॥ ३४७ ॥
एकैककोष्ठ एकाङ्कयुक्तोऽधःपङ्क्तिकेषु तु ।
शेषकोष्ठेष्वन्त्यतूर्यषष्ठयोगं निवेशयेत् ॥ ३४८ ॥

लघुमेरूमध्ये पूर्वीप्रमाणे (म्हणजे द्रुतमेरूप्रमाणे) कोष्टकांच्या ओळी लिहाव्या. त्यांतले पहिले (३४७) एकेक कोष्टक एक या आकड्याने युक्त (करावे). खालच्या ओळीतील बाकीच्या कोष्टकांत अन्त्य, चवथा व सहावा यांची बेरीज ठेवावी. (३४८)

तेच विषयाच्या व्यवस्थेच्या दृष्टीने विवरण करून ग्रंथकार सांगत आहे. यात विषम म्हणजे सातव्या उभ्या ओळीत खालपासून आरंभ केला असता एक द्रुत असलेल्या व विषम तीन इत्यादी द्रुत संख्या असणारे व शेवटी सर्व द्रुत असणारे भेद (क्रमाने) संख्येने कळतात. पहिल्या असलेल्या बारा या आकड्याने द्रुतप्लुत प्रस्तारातील एक द्रुत असणाऱ्या भेदांची संख्या समजते. दुसऱ्या कोष्टकातील चौदा या आकड्याने तीन द्रुत असणाऱ्या भेदांची संख्या कळते. तिसऱ्या कोष्टकातील सहा या आकड्याने पाच द्रुत असणाऱ्या भेदांची संख्या कळते. शेवटच्या कोष्टकातील एक या आकड्याने सर्व द्रुत असणाऱ्या भेदांची संख्या कळते. यात सम संख्येच्या सहाव्या उभ्या ओळीत असणाऱ्या आकड्यांनी, द्रुत नसणारे, दोन इत्यादी सम संख्येचे द्रुत असणारे व शेवटी सर्व असणारे भेद कळतात. उदाहरणार्थ – सहा द्रुत असणाऱ्या प्लुताच्या प्रस्तारातील द्रुत नसलेले भेद खालच्या कोष्टकातील चार या आकड्याने समजतात. दुसऱ्या कोष्टकातील नऊ या आकड्याने दोन द्रुत असणाऱ्या भेदांची संख्या कळते. तिसऱ्या कोष्टकातील पाच या आकड्याने चार द्रुत असणाऱ्या भेदांची संख्या समजते. शेवटच्या कोष्टकातील एक या आकड्याने सर्व द्रुत असणाऱ्या भेदाची संख्या कळते. अशाच प्रकारे सर्वत्र जाणावे. उभ्या ओळींबील सर्व आकड्यांच्या बेरजेने संख्याही कळते. (३३८–३४६, ३४७–)

क० आता लघुमेरूचे लक्षण देत आहे –

यात कोष्टकांच्या ओळी द्रुतमेरूप्रमाणे लिहाव्या. आडव्या ओळींतील प्रत्येकीचे पहिले कोष्टक एक या आकड्याने युक्त करावे. मात्र खालच्या बाकीच्या कोष्टकात अन्त्य, चवथा व सहावा यांची बेरीज लिहावी. यातला ' तु ' म्हणजे मात्र हा शब्द वरच्या ओळीतल्या बाकीच्या कोष्टकांपासून वेगळेपणा असल्याचे प्रकाशित करतो. यात उपान्त्य हा आकडा सोडलेला आहे. येथे पहिल्या ओळींतल्या दुसऱ्या कोष्टकात, पहिल्या कोष्टकातला अन्त्य एक हा आकडा लिहावा. तिसऱ्या कोष्टकातही दुसऱ्या कोष्टकातला अन्त्य एक हाच आकडा लिहावा. द्रुतमेरूप्रमाणे प्रतिनिधी असणे किंवा नसणे हे योजायचे असल्याचे पुढे सांगितले आहे. त्यानुसार चवथ्या कोष्टकात प्रतिनिधि घ्यायचा असल्याने, अन्त्य एक हा आकडा व चवथा नसल्याने त्याचा प्रतिनिधि तिसरा एक हा आकडा यांची दोन ही बेरीज लिहावी. पाचव्या कोष्टकात अन्त्य व चवथा असे जे दोन व एक हे आकडे, त्यांची तीन ही बेरीज लिहावी. सहाव्या कोष्टकात अन्त्य तीन हा आकडा, चवथा एक हा आकडा व सहावा नसल्याने पाचवा एक हा आकडा यांची पाच ही बेरीज लिहावी. सातव्या कोष्टकात अन्त्य पाच हा आकडा, चवथा एक हा आकडा व सहावा एक हा आकडा यांची सात ही बेरीज लिहावी. बाकीच्या वरच्या ओळींतील दुसऱ्या इत्यादी कोष्टकांत, उपान्त्याच्या खालच्या आकड्याने युक्त अशी तिन्हींची बेरीज लिहावी.

परासां शेषकोष्ठेषूपान्त्याधस्तनसंयुतम् ।
त्रियोगमेवमादध्यादत्र च द्रुतमेरुवत् ॥ ३४९ ॥
सदसत्त्वे प्रतिनिधेः कोष्ठाङ्कैरूर्ध्वपङ्क्तिगैः ।
[७२]लघुहीनादुपक्रम्यैकाद्येकोत्तरवृद्धलाः ॥ ३५० ॥
सर्वलान्ताः क्रमाज्ज्ञेयाः संख्या सर्वाङ्कसंगतेः ।

इति लघुमेरुः

									१
						१	५	१५
					१	४	१०	२०	२९
				१	३	६	१०	१८	३३	६१
			१	२	३	४	७	१२	२१	३४	५५
		१	१	१	२	३	५	७	१०	१४	२१
	१	२	३	४	५	६	७	८	९	१०

इति लघुमेरुकोष्ठकम्— हे लघुमेरूचे कोष्टक

बाकीच्या (ओळींतील) राहिलेल्या कोष्टकांत उपान्त्याच्या खाली असणाऱ्या आकड्याने युक्त अशी तिन्हींची बेरीज लिहावी. यात द्रुतमेरूप्रमाणे (३४९) प्रतिनिधि असणे किंवा नसणे (हे समजायचे.) उभ्या ओळींतील कोष्टकांतल्या आकड्यांनी, लघु नसल्यापासून आरंभ करून एक लघु असणारे व पुढे एकेक लघूने वाढत जाणारे (३५०) आणि शेवटी सर्व लघू असणारे असे भेद क्रमाने जाणावे. सर्व आकड्यांच्या बेरजेने संख्या (कळते). (३५१ —)

हा लघुमेरु होय.

वरच्या दुसऱ्या ओळीतल्या दुसऱ्या कोष्टकात अन्त्य एक हा आकडा व उपान्त्य नसला तरी त्या खालचे कोष्टक असल्याने त्यातला एक हा आकडा यांची दोन ही बेरीज लिहावी. तिसऱ्या

७२. ' खालच्या ओळीतल्या कोष्टकातील आकड्याने द्रुतहीन भेद जाणावे.' असा आशय कल्लिनाथाच्या टीकेवरून दिसून येतो. तसेच सुधाकर टीकेवरूनही ' खालच्या कोष्टकापासून आरंभ करून द्रुत इत्यादी भेद जाणावे ' असा आशय कळतो (अड्यार आ० भाग ३ पृ. १८५–१८६) पण द्रुतमेरूत ' द्रुत नसणारे भेद ' आरंभी घेतले आहेत. लघुमेरूतही मूळ ग्रंथात

गुरुमेरावधःपङ्क्तेः परा कोष्ठत्रयोनिता ॥ ३५१ ॥

गुरुमेरूत खालच्या ओळीच्या वरची (ओळ) तीन कोष्टकांनी कमी असणारी (अशी योजावी). (३५१)

कोष्टकात अन्त्य दोन हा आकडा व उपान्त्याच्या खालचा एक हा आकडा यांची तीन ही बेरीज लिहावी. चवथ्या कोष्टकात अन्त्य तीन हा आकडा व उपान्त्याच्या खालचा एक हा आकडा यांची चार ही बेरीज लिहावी. येथे प्रतिनिधि नसल्याने चवथ्या अभावी तिसरा घेतलेला नाही. पाचव्या कोष्टकात अन्त्य चार, उपान्त्याखालचा दोन व चवथा एक यांची सात ही बेरीज लिहावी. सहाव्या कोष्टकात अन्त्य सात हा आकडा, उपान्त्याच्या खालचा तीन हा आकडा व चवथा दोन हा आकडा यांची बारा ही बेरीज लिहावी. मग तिसऱ्या ओळीतल्या दुसऱ्या कोष्टकात अन्त्य एक हा आकडा व उपान्त्याच्या खालचा दोन हा आकडा यांची तीन ही बेरीज लिहावी. तिसऱ्या कोष्टकात अन्त्य तीन हा आकडा व उपान्त्याच्या खालचा तीन हा आकडा यांची सहा ही बेरीज लिहावी. चवथ्या कोष्टकात अन्त्य सहा हा आकडा व उपान्त्याच्या खालचा चार हा आकडा यांची दहा ही बेरीज लिहावी. नंतर चवथ्या ओळीतील दुसऱ्या कोष्टकात अन्त्य एक हा आकडा व उपान्त्याच्या खालचा तीन हा आकडा यांची चार ही बेरीज लिहावी. याचप्रमाणे पुढेही इच्छेनुसार वाढवावे. यातून काय जाणायचे ते आता सांगत आहे–

द्रुतमेरूत सांगितल्याप्रमाणे हे जाणावे. 'खालपासून क्रमाने' हे येथेही जोडून घ्यावे. खालच्या ओळीतील कोष्टकातल्या आकड्याने लघू नसणारे भेद जाणावे. दुसऱ्या कोष्टकातल्या आकड्याने एक लघु असणारे भेद, तिसऱ्या कोष्टकातल्या आकड्याने दोन लघू असणारे भेद असे क्रमाने एकेक लघु वाढत जाणारे भेद जाणावे. शेवटच्या कोष्टकातल्या आकड्याने सर्व लघू असणारे भेद जाणावे. प्रस्तुत द्रुतप्लुतप्रस्तारात सातव्या उभ्या ओळीतल्या खालच्या कोष्टकातील सात या आकड्याने लघू नसणारे भेद जाणावे; दुसऱ्या कोष्टकातल्या बारा या आकड्याने एक लघु असणारे भेद जाणावे; तिसऱ्या कोष्टकातल्या दहा या आकड्याने दोन लघू असणारे भेद जाणावे; शेवटच्या कोष्टकातल्या चार या आकड्याने सर्व लघू असणारे भेद जाणावे. असेच सर्वत्र जाणून घ्यावे. सर्व आकड्यांच्या बेरजेने संख्या कळते. (३४७–३५०, ३५१–)

क० आता गुरुमेरूचे लक्षण देत आहे–

यात (वरची) दुसरी ओळ खालच्या ओळीपेक्षा तीन कोष्टकांनी कमी असणारी योजावी. बाकीच्या म्हणजे तिसऱ्या इत्यादी त्यापूर्वीच्या ओळीपेक्षा चार कोष्टकांनी कमी योजाव्या. उदा. खालची ओळ सात कोष्टकांची करावी. त्यावरची दुसरी ओळ, खालच्या ओळीची तीन कोष्टके सोडून, चवथ्या इत्यादी कोष्टकापासूनची पुढची कोष्टके समान असणारी अशी लिहावी. तेव्हा

लघू नसणारे भेद आरंभी घेतले आहेत आणि गुरुमेरूत गुरू नसणारे भेद आरंभी घेतले आहेत. म्हणून कल्लिनाथाच्या लघुमेरूवरील टीकेचा आशय देताना 'लघु नसणारे भेद' असेच शब्द घेतले आहेत.

लघुमेरूच्या कोष्टकात वरच्या दुसऱ्या ओळीतील शेवटच्या कोष्टकात ५५ आकडा छापलेला आहे. अन्त्य ३४, उपान्त्याखालचा १०, चवथा ७ व सहावा ३ यांची बेरीज ५४ होते. तसेच चवथ्या ओळीतील शेवटच्या कोष्टकात २९ हा आकडा दिला आहे. अन्त्य २०, उपान्त्याखालचा १८ व चवथा १ यांची बेरीज ३९ होते.

चतुश्चतुःष्कोष्ठहीनाः स्वस्वपूर्वावलेः पराः ।
एकाङ्कवन्त आद्याद्यकोष्ठाः प्रथमपङ्क्तिगः ॥ ३५२ ॥
द्वितीयो द्व्यङ्कवानन्त्योपान्त्यषष्ठाङ्कयोगिनः ।
शेषकोष्ठाः परासां तु द्वितीयादिषु लिख्यते ॥ ३५३ ॥
योगोऽन्त्योपान्त्यषष्ठानामधस्तुर्याङ्कसंयुतः ।
लघुस्थाने गुरुर्ज्ञेयः शेषं तु लघुमेरुवत् ॥ ३५४ ॥

इति गुरुमेरुः

						८	३	१
			१	२	५	१०	२०	३८	७३
१	२	३	५	८	१४	२३	३९	६५	१०९
१	२	३	४	५	६	७	८	९	१०

इति गुरुमेरुकोष्ठकम् [७३] – हे गुरुमेरूचे कोष्टक.

(त्यानंतरच्या) बाकीच्या (वरच्या ओळी), अगोदरच्या अगोदरच्या ओळीपेक्षा चार चार कोष्टकांनी कमी (अशा योजाव्या). (प्रत्येकीचे) पहिले पहिले कोष्टक एक आकड्याने युक्त (करावे). पहिल्या ओळीतले (३५२) दुसरे (कोष्टक) दोन या आकड्याने युक्त व बाकीची अन्त्य, उपान्त्य व सहावा आकडा यांच्या बेरजेने युक्त (करावी). बाकीच्या ओळींच्या दुसऱ्या इत्यादी (कोष्टकांच्या) मध्ये, चवथ्याच्या खालच्या आकड्यासह होणारी अन्त्य, उपान्त्य व सहावा आकडा यांची बेरीज लिहावी. (लघुमेरू-मधल्या) लघूच्या जागी गुरु जाणावा. बाकीचे (सर्व) लघुमेरूप्रमाणे (होय). (३५४) हा गुरुमेरु होय.

ती स्वतः चार कोष्टकांची होते. सर्व ओळींची पहिली कोष्टके एक या आकड्याने युक्त करावी. पहिल्या ओळीतले दुसरे कोष्टक दोन या आकड्याने युक्त करावे. खालच्या ओळीतली, तिसरे

---

७३. ग्रंथात दिलेल्या गुरुमेरूच्या सर्वांत वरच्या ओळीतील तीन कोष्टकात क्रमाने ८,३ व १ असे आकडे आनन्दाश्रम व अडचार आवृत्तींत तसेच संगीतदर्पण (पृ. १७७) या ग्रंथातही छापलेले आहेत. गुरुमेरूच्या लक्षणाचे जे विवरण कल्लिनाथाने दिले आहे त्यानुसार हे आकडे १,३ व ९ असे असायला हवेत, (म्हणजे पहिल्या कोष्टकात एक हा आकडा, दुसऱ्यात तीन हा आकडा व तिसऱ्यात ९ हा आकडा). असे घेतले असता, सर्वांत वरच्या ओळीतील दुसऱ्या कोष्टकात अन्त्य एक हा आकडा व खालचा चवथा दोन हा आकडा यांची तीन ही बेरीज मिळते. तसेच तिसऱ्या कोष्टकात अन्त्य तीन हा आकडा, उपान्त्य एक हा आकडा व खालचा चवथा पाच हा आकडा यांची नऊ ही बेरीज मिळते.

प्लुतमेरावधःपङ्क्तेः पञ्चकोष्ठोनिता परा ।
तत्पराः स्वस्वपूर्वातः षट्षट्कोष्ठोनिता मताः ॥ ३५५ ॥

प्लुतमेरूत खालच्या ओळीपेक्षा वरची ओळ पाच कोष्टकांनी कमी (ठेवावी). त्यानंतरच्या वरच्या (ओळी) आपापल्या पूर्वीच्या पेक्षा सहा सहा कोष्टकांनी कमी असणाऱ्या मानल्या आहेत. (३५५)

इत्यादी बाकीची कोष्टके चवथा सोडून, अन्त्य, उपान्त्य व सहावा आकडा यांच्या बेरजेने युक्त करावी. या प्रकारे खालच्या ओळीतल्या तिसऱ्या कोष्टकात अन्त्य दोन हा आकडा व उपान्त्य एक हा आकडा यांची होणारी तीन ही बेरीज लिहावी. चवथ्या कोष्टकात अन्त्य तीन हा आकडा व उपान्त्य दोन हा आकडा यांची बेरीज पाच ही लिहावी. येथे चवथा घ्यायचा नसल्याने त्याचा प्रतिनिधि म्हणून एक हा आकडा घ्यायचा नाही. मग पाचव्या कोष्टकात अन्त्य पाच हा आकडा व उपान्त्य तीन हा आकडा यांची बेरीज आठ ही लिहावी. सहाव्या कोष्टकात अन्त्य आठ हा आकडा, उपान्त्य पाच हा आकडा व सहावा नसल्याने (त्याचा प्रतिनिधि) पाचवा एक हा आकडा यांची होणारी चौदा ही बेरीज लिहावी. सातव्या कोष्टकात अन्त्य चौदा हा आकडा, उपान्त्य आठ हा आकडा व सहावा एक हा आकडा यांची होणारी तेवीस ही बेरीज लिहावी. वरच्या दुसऱ्या इत्यादी ओळींतील दुसऱ्या इत्यादी कोष्टकांत खालचा चवथा आकडा, अन्त्य, उपान्त्य व सहावा यांची बेरीज (यथासंभव) लिहावी. वरच्या दुसऱ्या ओळीतील दुसऱ्या कोष्टकात अन्त्य एक हा आकडा व खालचा चवथा (म्हणजे खालच्या ओळीतला चवथा) एक हा आकडा यांची दोन ही बेरीज लिहावी. तिसऱ्या कोष्टकात अन्त्य दोन हा आकडा, उपान्त्य एक हा आकडा व खालचा चवथा दोन हा आकडा यांची पाच ही बेरीज लिहावी. चवथ्या कोष्टकात अन्त्य पाच हा आकडा, उपान्त्य दोन हा आकडा व खालचा चवथा तीन हा आकडा यांची दहा ही बेरीज लिहावी. याचप्रमाणे पुढे वाढवीत जावे. यात जाणून काय घ्यायचे ते सांगत आहे. (लघुमेरूतील) लघूच्या जागी गुरु समजावा. (म्हणजेच) गुरु नसणे यापासून आरंभ करून एक गुरु असणे व क्रमाने एकेक अधिक गुरु असणे आणि शेवटी सर्व गुरू असणे असे भेद जाणावे हे तर्काने समजून घ्यावे. उदा. द्रुतप्लुतप्रस्तारात गुरुमेरूमधील सातव्या उभ्या ओळीत खालून सुरवात केली असता, पहिल्या कोष्टकातल्या तेवीस या आकडचाने गुरु नसणारे भेद जाणावे. दुसऱ्या कोष्टकातल्या दहा या आकडचाने एक गुरु असणारे भेद जाणावे. असेच सर्वत्र समजून घ्यावे. लघुमेरूप्रमाणे बाकीचे सर्व जाणावे. या अतिदेशाचा अर्थ, खालच्या ओळीत प्रतिनिधि असणे, वरच्या ओळीत प्रतिनिधि नसणे सर्व आकडचांच्या बेरजेने संख्या माहीत होणे या गोष्टींची जाणकारी असा आहे. (३५१–३५४)

क० आता प्लुतमेरूचे लक्षण देत आहे—

प्लुतमेरूत खालच्या ओळीच्या वरची ओळ पाच कोष्टकांनी कमी योजावी. यातही खालची ओळ सात कोष्टकांची करून, तिच्या वरची ओळ, तिच्या (म्हणजे खालच्या ओळीच्या) सहाव्या कोष्टकापासून आरंभ करून पुढची कोष्टके समान असणारी अशी लिहावी. ती यात दोन कोष्टकांची होते. त्यावरच्या म्हणजे तिसऱ्या इत्यादी ओळी आपापल्या म्हणजे दुसऱ्या इत्यादी ओळींच्यापेक्षा सहा सहा कोष्टकांनी कमी अशा (क्रमाने) योजाव्या. म्हणजे तिसरी ओळ दुसरीपेक्षा सहा कोष्टकांनी कमी योजावी. तसेच चवथी ओळ तिसरीपेक्षा सहा कोष्टकांनी कमी

अधःपङ्क्तौ तु षष्ठाङ्कस्थाने तुर्यं नियोजयेत् ।
त्रियोगोऽयमधः षष्ठयुक्तः स्यात्परपङ्क्तिषु ॥ ३५६ ॥
प्लुतो ज्ञेयो गुरुस्थाने शेषं तु गुरुमेरुवत् ।

इति प्लुतमेरुः

					१	२	५	१०	२२	४४
१	२	३	६	१०	१८	३१	५५	९६	१६८	२९६

इति प्लुतमेरुकोष्ठकम्[७४] – हे प्लुतमेरूचे कोष्टक होय.

खालच्या ओळीत सहाव्या आकड्याच्या जागी चवथा योजावा.

वरच्या ओळींत ही तिन्हींची (म्हणजे अन्त्य, उपान्त्य व चवथा यांची) बेरीज खालच्या सहाव्या आकड्याशी मिळवून (यथासंभव) योजावी. (३५६)

गुरूच्या जागी (यात) प्लुत जाणावा व बाकी (सर्व) गुरुमेरूप्रमाणे (समजावे). (३५७–)

हा प्लुतमेरु होय.

योजावी. याप्रमाणे अभिप्रेत असेल तेवढ्या पाचव्या इत्यादी ओळी लिहाव्या. आता आकडे लिहिण्याविषयी सांगत आहे––

'खालच्या ओळीत सहाव्याच्या जागी चवथा योजावा' याचा अर्थ असा की सहावा सोडावा. बाकीचे गुरुमेरूप्रमाणे या अतिदेशानुसार पहिली पहिली कोष्टके एक आकड्याने युक्त, पहिल्या ओळीतले दुसरे कोष्टक दोन या आकड्याने युक्त, खालच्या ओळीत प्रतिनिधि असणे, वरच्या ओळीत नसणे, सर्व आकड्यांच्या बेरजेने संख्या, हे सर्व जोडून घ्यावे.

यानुसार खालच्या ओळीतल्या पहिल्या कोष्टकात एक हा आकडा लिहावा व दुसऱ्यात दोन हा आकडा लिहावा. तिसऱ्यात अन्त्य दोन हा आकडा व उपान्त्य एक हा आकडा यांची तीन ही बेरीज लिहावी. चवथ्यात अन्त्य तीन हा आकडा, उपान्त्य दोन हा आकडा व चवथा नसल्याने (त्याचा प्रतिनिधि) तिसरा एक हा आकडा यांची बेरीज सहा ही लिहावी, पाचव्यात अन्त्य सहा हा आकडा, उपान्त्य तीन हा आकडा व चवथा एक हा आकडा यांची बेरीज दहा ही लिहावी. सहाव्यात अन्त्य दहा हा आकडा, उपान्त्य सहा हा आकडा व चवथा दोन हा आकडा

---

७४. प्लुतमेरूच्या लक्षणानुसार, प्लुतमेरूच्या कोष्टकातील खालच्या ओळीतल्या दहाव्या कोष्टकात अन्त्य शहाण्णव हा आकडा, उपान्त्य पंचावन्न हा आकडा व चवथा अठरा हा आकडा यांची होणारी एकशेएकोणसत्तर ही बेरीज असायला पाहिजे. पण ती आनन्दाश्रम व अड्यार आवृत्तीत आणि संगीतदर्पण (पृ. १७७) यात एकशेअडुसष्ट अशी दिली आहे. अकराव्या कोष्टकात अन्त्य एकशेएकोणसत्तर, उपान्त्य शहाण्णव व चवथा एकतीस यांची होणारी बेरीज दोनशेशहाण्णव ही बरोबर दिली आहे. यावरून दहाव्या कोष्टकात [छापलेला एकशेअडुसष्ट हा आकडा चुकीचा ठरतो.

संयोगमेरावूर्ध्वाः स्युश्चतस्रः कोष्ठपङ्क्तयः ॥ ३५७ ॥
इष्टतालद्रुतमितैः कोष्ठैर्युक्तास्ततः परे ।
द्वे पङ्क्ती स्वस्वपूर्वातो द्विद्विकोष्ठोनिते ततः ॥ ३५८ ॥
द्वे षष्ठ्या एककोष्ठोने ततस्तिस्रोऽष्टमावलेः ।
एककोष्ठोनिताः पश्चाद् द्विद्विकोष्ठोनिते परे ॥ ३५९ ॥
पङ्क्तिभ्यां स्वस्वपूर्वाभ्यां तथैकैकोनिते परे ।

संयोगमेरूत, अभिप्रेत असलेल्या तालातल्या द्रुतांच्या संख्येइतकी कोष्टके असलेल्या चार उभ्या ओळी असतात. नंतर पुढच्या (म्हणजे उजव्या बाजूला असणाऱ्या) दोन ओळी आपापल्या मागच्या ओळीपेक्षा दोन दोन कोष्टकांनी कमी अशा योजाव्या. मग (३५७, ३५८) दोन (ओळी) सहावीपेक्षा एक कोष्टक कमी असणाऱ्या (अशा लिहाव्या). नंतर तीन (ओळी) आठव्या ओळीपेक्षा एक कोष्टक कमी असलेल्या (अशा लिहाव्या). पुढे दोन ओळी (म्हणजे १२ व १३ या ओळी) आपापल्या मागच्या ओळीपेक्षा दोन दोन कोष्टके कमी असणाऱ्या (अशा योजाव्या). नंतरच्या दोन ओळी त्याचप्रमाणे (म्हणजे आपापल्या मागच्या ओळीपेक्षा) एकेक कोष्टकाने कमी असलेल्या (अशा योजाव्या). (३५९, ३६०–)

यांची बेरीज अठरा ही लिहावी. सातव्यात अन्त्य अठरा हा आकडा, उपान्त्य दहा हा आकडा व चवथा तीन हा आकडा यांची एकतीस ही बेरीज लिहावी. वरच्या दुसऱ्या ओळीतील दुसऱ्या कोष्टकात अन्त्य एक हा आकडा व खालचा सहावा एक हा आकडा यांची दोन ही बेरीज लिहावी. यात जाणायचा विषय सांगत आहे. 'गुरूच्या जागी प्लुत जाणावा' यावरून, प्लुत नसणे यापासून आरंभ करून, (एक प्लुत असणे इत्यादी सर्व) समजून घ्यावे. यानुसार, द्रुतप्लुतप्रस्तारात, प्लुतमेरूमधील सातव्या उभ्या ओळीतल्या, खालपासून क्रमाने पहिल्या कोष्टकात असलेल्या एकतीस या आकड्याने प्लुत नसणाऱ्या भेदांची संख्या जाणावी. दुसऱ्या कोष्टकातल्या दोन या आकड्याने एक प्लुत असणारे भेद जाणावे. असे सर्वत्र प्रस्तारात जाणावे. (३५५–३५६, ३५७–)

क० आता संयोगमेरूचे लक्षण देत आहे––

संयोगमेरूत, कोष्टकांच्या चार उभ्या ओळी इष्टतालातील द्रुतांच्या संख्येइतक्या कोष्टकांनी युक्त असणाऱ्या योजाव्या.

आता प्रथम मेरूचे स्वरूप निष्पन्न व्हावे हे दाखविण्यासाठी प्रत्येकी तेरा कोष्टके असलेल्या कोष्टकांच्या चार ओळी उभ्या लिहाव्या. मग उजव्या बाजूला दोन ओळी आपापल्या मागच्या ओळीपेक्षा दोन दोन कोष्टकांनी कमी असणाऱ्या अशा लिहाव्या. यातील पहिल्या 'स्व' या शब्दाने लिहायची ओळ सांगितली आहे. तिच्या पूर्वीची म्हणजे चवथी ओळ होय. तिच्यापेक्षा पाचवी दोन कोष्टकांनी कमी अशी योजावी. तेव्हा ही ओळ अकरा कोष्टकांची होते. दुसऱ्या 'स्व' शब्दाने सहावी ओळ सांगितली आहे. तिच्या पूर्वीची पाचवी ओळ होय. तिच्यापेक्षा सहावी दोन कोष्टकांनी कमी योजावी. तेव्हा ती नऊ कोष्टकांची होते. येथे कमी असणे हे वरची वरची उभी कोष्टके सोडण्याने जाणावे. नंतरच्या सातवी व आठवी या दोन ओळी

आद्यासु चतसृष्वासां क्रमेण सकला द्रुताः ॥ ३६० ॥
समस्तलघवः सर्वगुरवः सकलप्लुताः ।
एकाङ्कयुक्तनिःशेषकोष्ठाद्या स्यात्परा पुनः ॥ ३६१ ॥
स्वयुक्तैर्विषमैः कोष्ठैः समैस्त्वेकाङ्कसंयुतैः ।
कर्तव्या गुरुषड्क्तेस्तु त्रयः कोष्ठा नभोन्विताः ॥ ३६२ ॥

यांपैकी पहिल्या चारींत क्रमाने सर्व द्रुत, (३६०) सर्व लघू, सर्व गुरू व सर्व प्लुत (असणारे भेद जाणावे). पहिलीची सर्व कोष्टके एक या आकड्याने युक्त करावी. दुसरीची पुन्हा (३६१) विषम कोष्टके बिंदुयुक्त व सम कोष्टके एक या आकड्याने युक्त करावी. गुरूच्या ओळीची (म्हणजे तिसऱ्या ओळीची) तीन कोष्टके बिन्दुयुक्त (३६२)

सहाव्या ओळीपेक्षा एक कोष्टक कमी असणाऱ्या अशा योजाव्या. तेव्हा त्या प्रत्येकी आठ आठ कोष्टकांच्या होतात. मग नववी, दहावी व अकरावी या तीन ओळी आठव्या ओळीपेक्षा एक कोष्टक कमी असणाऱ्या अशा योजाव्या. तेव्हा त्या प्रत्येकी सात सात कोष्टकांच्या होतात. नंतर बारावी व तेरावी या पुढील दोन ओळी अनुक्रमाने अकरावी व बारावी या ओळींपेक्षा दोन दोन कोष्टकांनी कमी योजाव्या. म्हणजे अकरावीपेक्षा बारावी दोन कोष्टकांनी कमी योजावी; तेव्हा ती पाच कोष्टकांची होते. तसेच बारावीपेक्षा तेरावी दोन कोष्टकांनी कमी योजावी; तेव्हा ती तीन कोष्टकांची होते. पुढच्या दोन म्हणजे चौदावी व पंधरावी या ओळी आपापल्या मागच्या ओळीपेक्षा एकेक कोष्टकाने कमी योजाव्या. म्हणजे तेरावीपेक्षा चौदावी एक कोष्टकाने कमी योजावी; तेव्हा ती दोन कोष्टकांची होते. तसेच चौदावीपेक्षा पंधरावी एक कोष्टकाने कमी योजावी; तेव्हा ती एक कोष्टकाची होते. याप्रमाणे पंधरा ओळी होतात. यापुढेही याच, इच्छेनुसार खाली वाढवाव्या. (३५७–३५९, ३६०–)

क० आता उभ्या ओळीतील द्रुत इत्यादींचा नियम व त्या त्या कोष्टकात लिहायच्या आकड्यांच्या बद्दलचा नियम सांगण्यासाठी आरंभ करीत आहे—

या पंधरा ओळीतील पहिल्या चार उभ्या ओळींत क्रमाने म्हणजे पहिल्या इत्यादी क्रमाने सर्वद्रुत (इ. भेद जाणावे). म्हणजे पहिल्या ओळीत सर्व द्रुत, दुसरीत सर्व लघू, तिसरीत सर्व गुरू व चवथीत सर्व प्लुत भेद जाणावे. यात प्रथम द्रुत इत्यादी ओळींचा भेद सहजपणाने पूर्णतया माहीत व्हावा यासाठी पंधरा उभ्या ओळीतील कोष्टकांत, वर पहिल्या इत्यादी क्रमाने द्रुत इत्यादी, त्या दोन्हींची बेरीज, तिन्हींची बेरीज व चारींची बेरीज लिहावी. म्हणजे पहिलीत द्रुत, दुसरीत लघु, तिसरीत गुरु, चवथीत प्लुत, पाचवीत दल, सहावीत दग, सातवीत दप, आठवीत लग, नववीत लप, दहावीत गप, अकरावीत दलग, बारावीत व तेरावीत दगप, चौदावीत लगप व पंधरावीत दलगप, उजव्या बाजूला लिहावे. (द = द्रुत, ल = लघु, ग = गुरु, प = प्लुत). या उभ्या ओळीत तेरा आडव्या ओळी संभवतात. 'जितक्या संख्येची आडवी ओळ (असते) तेवढा येथे द्रुत ताल असतो' (अ. ५, श्लोक ३७६) असे पुढे म्हटले असल्याने, आडव्या ओळीत तालभेद माहीत होण्यासाठी त्या ओळीच्या डाव्या बाजूला वरून आरंभ करून एकेक द्रुताने वाढलेले असे द्रुत इ. तालभेद लिहावे. म्हणजे पहिल्या आडव्या

तुर्य एकाङ्कवानेवं चतुष्कोष्ठाः[७५] परा अपि।
प्लुतपङ्क्तौ सशून्याः स्युः पञ्च षष्ठस्तु रूपवान्[७६] ॥ ३६३ ॥

व चवथे एक या आकड्याने युक्त (करावे). याप्रमाणे पुढची चार (चार) कोष्टकेही (योजावी). (३६३–)

प्लुताच्या ओळीत (म्हणजे चवथ्या ओळीत) (पहिली) पाच कोष्टके बिन्दुयुक्त व सहावे रूप (म्हणजे एक) याने युक्त असावे. (३६३)

ओळीत द्रुत, दुसरीत लघु, तिसरीत लघु व द्रुत, चवथीत गुरु, पाचवीत गुरु व द्रुत, सहावीत प्लुत, सातवीत प्लुत व द्रुत, आठवीत प्लुत व लघु, नववीत प्लुत, लघु व द्रुत, दहावीत प्लुत व गुरु, अकरावीत प्लुत, गुरु व द्रुत, बारावीत दोन प्लुत व तेरावीत दोन प्लुत व द्रुत, डाव्या बाजूला लिहावे. यात उभ्या ओळीतली पहिली ओळ जिची सर्व कोष्टके एक या आकड्याने युक्त आहेत अशी योजावी. म्हणजे तिच्या तेरा कोष्टकांत एक हाच आकडा लिहावा. दुसरीच्या विषम म्हणजे एक, तीन, पाच इत्यादी कोष्टकांत बिन्दु व सम म्हणजे दोन, चार, सहा इत्यादी कोष्टकांत एक हा आकडा लिहावा. अर्थात दुसरीच्या पहिल्या कोष्टकात बिन्दु, दुसऱ्यात एक, तिसऱ्यात बिन्दु, चवथ्यात एक असे एक सोडून एक (क्रमाने) लिहावे.

गुरुच्या ओळीत म्हणजे तिसऱ्या ओळीत पहिली तीन कोष्टके नभोयुक्त म्हणजे बिन्दुयुक्त लिहावी व चवथे एक या आकड्याने युक्त लिहावे. असेच नंतरचेही चार चार कोष्टकांचे समूह लिहावे. 'चतुष्कोष्ठ' यात पुनरावृत्ति जाणावी. यावरून चवथे, आठवे, बारावे, सोळावे इत्यादी कोष्टके, त्यापूर्वीच्या तीन कोष्टकांत बिन्दु असलेली व त्यांत एक आकडा असलेली अशी लिहावी, असा अर्थ कळतो. (३६०–३६२, ३६३–)

क० चौथ्या ओळीत पहिली पाच कोष्टके शून्ययुक्त म्हणजे बिंदुयुक्त लिहावी. सहावे कोष्टक गणिती लोकांच्या परिभाषेत रूप या शब्दाने सांगितला जाणारा जो एक हा आकडा त्याने युक्त असे योजावे. उदा. 'रूपाग्रसप्तविंशति' असे त्यांच्या वाक्यांत म्हटले जाते. यात रूप म्हणजे एक हा आकडा होय. बाकीची सहा सहा कोष्टके त्याचप्रमाणे योजावी. म्हणजे सहावे, बारावे अठरावे इत्यादी कोष्टके एक आकड्याने युक्त व बाकीची बिंदुयुक्त लिहावी. असा अर्थ होय. 'नंतर सहा ओळींत' इ. ग्रंथभागाचे स्पष्टीकरण पूर्वी केले आहेच. (म्हणजे त्यांत क्रमाने दल, दग, दप, लग, लप, गप हे दोन्हींनी मिळून होणारे भेद लिहावे.) त्या सहा ओळींतील आकडे लिहायची पद्धत सांगण्यासाठी म्हणत आहे.

---

७५. 'चतुष्कोष्ठाः' या ऐवजी सुधाकरटीकेत 'चतुष्कोठ्यः' असा पाठ घेतलेला आहे व त्याचे स्पष्टीकरण 'चार कोष्ठकांचा समाहार (ती चतुष्कोष्ठी)' असे दिले आहे. ही चार चार कोष्टके, त्यांतील (पहिली) तीन शून्य युक्त व चवथे एक या आकड्याने युक्त (अशी योजावी).

७६. गणिती लोकांच्या परिभाषेत रूप म्हणजे एक हा आकडा होय. याच्या स्पष्टीकरणासाठी म्हणून कल्लिनाथाने 'रूपाग्रसप्तविंशतिः' हे उदाहरण दिले आहे. यात 'रूप' याचा अर्थ एक हा आहे.

षट्कोष्ठास्तद्वदन्ये[७७] स्युः षट्सु पङ्क्तिष्वनन्तरम् ।
द्वियोगजाः क्रमाद्भेदा दलघू दगुरू दपौ ॥ ३६४ ॥
लगौ लपौ गपौ चेति तदङ्कप्रक्रिया त्वियम् ।
अत्रोपरिष्टादारभ्य स्यादधोऽधोऽङ्कलेखनम् ॥ ३६५ ॥
अन्त्यपूर्वद्वितीयाङ्ककुर्यषष्ठास्तथा क्रमात् ।
योज्या दलगपेषु स्युस्तेषु तद्योगजा भिदाः ॥ ३६६ ॥
पङ्क्तौ तदङ्कयोगाङ्कं तत्कोष्ठे संभवाँल्लिखेत् ।

इतर सहा (सहा) कोष्टके त्याचप्रमाणे योजावी. नंतर सहा ओळींत दोन्ही मिळून होणारे भेद, (म्हणजे) द्रुत व लघु, द्रुत व गुरु, द्रुत व प्लुत, (३६४) लघु व गुरु, लघु व प्लुत आणि गुरु व प्लुत असे (लिहावे). त्यातील आकड्यांची योजना ही (अशी)– यात वरून सुरवात करून खाली खाली आकडे लिहावे. (३६५)

द, ल, ग, प यांत अन्त्याच्या पूर्वीचा दुसरा आकडा, चवथा व सहावा क्रमाने (यथासंभव) योजावा. तसेच त्या (द ल ग प ओळींतल्या कोष्टकांत) त्यांच्या (म्हणजे अन्त्य इत्यादींच्या) बेरजेने होणारे भेद (यथासंभव योजावे). (३६६)

(पाचव्या इत्यादी) ओळीत त्या (त्या) आकड्यांच्या बेरजेने होणारा आकडा, त्या (त्या) ओळीच्या कोष्टकात संभव (असतील त्यांप्रमाणे) लिहावा. (३६७–)

यात आकडे लिहिण्यामध्ये पूर्वीच्या मेरूपेक्षा असणारा प्रकाराचा फरक दाखवीत आहे. अन्त्यपूर्व दुसरा इ. म्हणजे दुसरा, चवथा व सहावा हे आकडे क्रमाने योजावे. याचा अर्थ असा– पाचव्या पूर्वीच्या ओळीत अन्त्यपूर्व दुसरा योजावा. सहाव्या उभ्या ओळीत अन्त्यपूर्व चवथा योजावा. सातवीत अन्त्यपूर्व सहावा योजावा. आठवीत दुसऱ्याच्या पूर्वीचा म्हणजे चवथा, नववीत तिसऱ्याच्या पूर्वीचा म्हणजे सहावा (व) दहावीत चवथ्याच्या पूर्वीचा म्हणजे सहावा योजावा. त्याचप्रमाणे त्यांच्या बेरजेने होणारे भेद म्हणजे अन्त्य इत्यादींच्या बेरजेने होणारे भेद त्या द्रुत, लघु, गुरु व प्लुत या ओळींच्या कोष्टकातील आकड्यामध्ये यथासंभव योजावे. पाचव्या इत्यादी ओळीत त्या त्या आकड्यांच्या बेरजेने मिळणारा आकडा त्या त्या ओळीच्या कोष्टकात संभव (असतील त्यांनुसार) लिहावा. संभव या शब्दाचा अर्थ पुढे विस्ताराने सांगितला जाणार आहे. तोही तेथूनच समजून घ्यावा. (३६३ ते ३६६, ३६७–)

---

७७. 'षट्कोष्ठाः' या ऐवजी सुधाकरपाठ 'षट्कोष्ठचः' असा आहे. अर्थात 'सहा कोष्टकांचा समाहार' असा त्याचा विग्रह होईल.

लेख्यपङ्क्त्युपरिश्रेणी या तिरश्ची तदाश्रिताः ॥ ३६७ ॥

(संयोगमेरूतील) लिहावयाच्या (आडव्या) ओळीवरची जी आडवी ओळ तिच्या आश्रयाने असलेले (३६७) द ल ग व प यांचे आकडे पहिल्या (उभ्या) चार ओळीत

क० पहिल्या चार ओळी म्हणजे उभ्या असणाऱ्या द, ल, ग आणि प यांच्या चार ओळी होत. (संयोगमेरुत) लिहावयाच्या ओळीच्या वरची आडवी ओळ असे म्हणण्यामुळे, लिहावयाची ओळही आडवी असल्याचे जाणावे. वरच्या ओळीत असणारे जे द, ल, ग आणि प यांचे आकडे त्या आकड्यांमध्ये, प्रस्तुत द, व ल इत्यादी दोन्हींच्या योगामुळे होणाऱ्या भेदांतले जे द्रुत इत्यादी, त्यांचे ज्ञान करून देणारे आकडे (जाणून) घ्यावे. 'ते अपि' यांतील 'अपि' हा शब्द समुच्चय या अर्थाचा असून तो क्रम सोडून घ्यायचा आहे. 'ते' या 'तद्' शब्दाच्या बहुवचनाने पहिल्या चार ओळींतील द्रुत इत्यादींच्या ज्ञानाचा आश्रय असणारे जे आकडे त्यांचे ज्ञान होते. द्रुत इत्यादी दोन्हींनी युक्त होणारे आकडे प्रस्तुत झाल्यावर, अन्त्य, द्वितीय इत्यादी विपर्यस्त योजावे; म्हणजे ते एकमेक एका ओळीचे अंतर सोडून असणाऱ्या ओळीतील कोष्टकांत लिहावे असा अर्थ. 'लिहावयाच्या ओळीच्या वरची ओळ' यामध्ये जवळ लागून असणारी ओळच विवक्षित असल्याने त्याचा विपर्यास म्हणजे येथे अंतर असणे (असा समजायचा). यावरून यथाभूत असे आकडेही क्वचित अंतर असतानाही योजायचे असतात, (असे कळून येते). जवळ लागून असणाऱ्या वरच्या ओळीतील किंवा विपर्यस्त असणारे प्रस्तुत द्रुत इत्यादी आकडे संभवत नसतील तर शून्य लिहावे.

वर सांगितलेल्या प्रकाराप्रमाणे दोन्हींनी युक्त असणाऱ्या ओळीतल्या कोष्टकात लिहावयाचे आकडे सांगतो.

त्यातील द व ल यांच्या ओळीतील पहिल्या कोष्टकात तिच्या वरच्या आडव्या ओळीतील द व ल यांच्या आकड्यांची बेरीज करून येणारा दोन हा आकडा लिहावा. दुसऱ्या कोष्टकात, वरच्या ओळीतील द्रुताचा आकडाच संभवत असल्याने, त्याच्यासह अन्त्य दोन आकड्यांची बेरीज करून येणारा तीन हा आकडा लिहावा. तिसऱ्या कोष्टकात, वरच्या ओळीतील द व ल यांचे आकडे संभवत असल्याने त्यांच्यासह, अन्त्य दोन हा आकडा व उपान्त्य तीन हा आकडा यांची बेरीज करून येणारा सात हा आकडा लिहावा. या तऱ्हेने 'संभव' या शब्दाचा अर्थ सर्वत्र जाणावा.

चवथ्या इत्यादी कोष्टकात यथासंभव द व ल यांच्या आकड्यांसह अन्त्य व उपान्त्य आकड्यांची बेरीज करून येणारा तो तो आकडा लिहावा. या रीतीने चवथ्या कोष्टकात अकरा हा आकडा, पाचव्यात वीस हा आकडा, सहाव्या कोष्टकात बत्तीस हा आकडा, सातव्या कोष्टकात चोपन्न हा आकडा, आठव्या कोष्टकात सत्याऐंशी हा आकडा, नवव्या कोष्टकात एकशेत्रेचाळीस हा आकडा, दहाव्या कोष्टकात दोनशे एकतीस हा आकडा आणि अकराव्या कोष्टकात तीनशेशहात्तर हा आकडा लिहावा. नंतर द आणि ग यांच्या ओळीत पहिल्या कोष्टकात, तिच्या वरच्या आड्व्या ओळीतील द व ग यांचे आकडे घेऊन होणारा दोन हा आकडा लिहावा. दुसऱ्या कोष्टकात अन्त्य दोन हा आकडा वरच्या ओळीतील द्रुताच्या आकड्या बरोबर (म्हणजे एक या आकड्याबरोबर) मिळवून होणारा तीन हा आकडा लिहावा. तिसऱ्या इत्यादी कोष्टकांत यथासंभव अन्त्य व चवथा हे आकडे, यथासंभव वरच्या ओळीतील द व ग यांच्या आकड्यांबरोबर

अङ्का दलगपानां स्युराद्यपङ्क्तिचतुष्टये ।
तेषु प्रस्तुतभेदस्थद्रुतादिव्यक्तिसंश्रितान् ॥ ३६८ ॥
अङ्कान् गृह्णीत तेऽप्यन्त्यद्वितीयाद्या द्रुतादिषु ।
प्रस्तुतेषु विपर्यस्ताः स्युरङ्कासंभवे तु खम् ॥ ३६९ ॥

योजावे. त्यांमध्ये प्रस्तुत (द्रुत व लघु इत्यादी दोन्हींच्या योगाने होणाऱ्या) भेदांतील द्रुत इत्यादींच्या स्पष्टतेचा आधार (होणारे) आकडे (जाणून) घ्यावे. आणि ते अन्त्य, द्वितीय इत्यादी द्रुत इत्यादी प्रस्तुत असलेल्यांत विपर्यस्त (म्हणजे एक ओळ सोडून असणाऱ्या ओळीतील कोष्ठकांत) असतात. प्रस्तुत द्रुत इत्यादी अंकांचा संभव नसल्यास ख (म्हणजे शून्य) लिहावे. (३६८, ३६९)

मिळवून तो तो आकडा लिहावा. अशा रीतीने तिसऱ्या कोष्टकात चार हा आकडा, चवथ्या कोष्टकात पाच हा आकडा, पाचव्या कोष्टकात नऊ हा आकडा, सहाव्या कोष्टकात तेरा हा आकडा, सातव्या कोष्टकात अठरा हा आकडा, आठव्या कोष्टकात चोवीस हा आकडा व नवव्या कोष्ठकात पस्तीस हा आकडा लिहावा.

मग द्रुत व प्लुत यांच्या ओळीत पहिल्या कोष्टकात, लिहायच्या ओळीच्या वरच्या ओळीत लागून असताना किंवा अंतर सोडून असल्याने व्यस्त असताना द, ल, ग व प यांच्या आकडचांमध्ये द्रुताचा आकडा संभवत असला तरीही क्वचित प्लुताचा आकडा नसल्याने द व प यांच्या आकडचांची बेरीज संभवत नसल्याने "आकडा संभवत नसता 'ख' (लिहावे)" या म्हणण्यानुसार बिन्दूच लिहावा. दुसऱ्या कोष्टकात मात्र वरच्या ओळीतील द व प यांचे आकडे मिळवून होणारा दोन हा आकडा लिहावा. तिसऱ्या इत्यादी कोष्टकांत यथासंभव अन्त्य व सहावा यथासंभव वरच्या ओळीतील द व प यांच्या आकडचांबरोबर मिळवून होणारा तो तो आकडा लिहावा. या रीतीने तिसऱ्या कोष्टकांत तीन हा आकडा, चवथ्या कोष्टकात चार हा आकडा, पाचव्या कोष्टकात पाच हा आकडा, सहाव्या कोष्टकात सहा हा आकडा, सातव्या कोष्टकात सात हा आकडा व आठव्या कोष्टकात अकरा हा आकडा लिहावा.

नंतर ल व ग यांच्या ओळीतील पहिल्या कोष्टकात, लागूनच्या वरच्या ओळीत ल व ग यांचे आकडे नसल्याने, तिच्यावरील अंतर सोडून असणाऱ्या ओळीतले ल व ग यांचे आकडे घेऊन होणारा दोन हा आकडा लिहावा. हाच विपर्यस्त या शब्दाचा अर्थ जाणावा. दुसऱ्या कोष्टकात पूर्वीप्रमाणेच बिन्दु लिहावा कारण ल व ग यांचे आकडे संभवत नाहीत. येथे अन्त्य दोन हा आकडा घ्यायचा नसल्याने जरी लागूनच्या वरच्या ओळीत लघूचा आकडा असला तरी गुरूचा आकडा नाही. (तसेच) (एक ओळ) अंतर सोडून असणाऱ्या वरच्या ओळीतील गुरूच्या आकडचाचा, लघूच्या ओळीतील पहिल्या कोष्टकात उपयोग केला गेला असल्याने तो पुन्हा घ्यायचा नाही. तिसऱ्या कोष्टकात उपान्त्य दोन हा आकडा (एक ओळ) अंतर सोडून असणाऱ्या वरच्या ओळीतील लघूच्या (एक या) आकडचाबरोबर मिळवून होणारा तीन हा आकडा लिहावा. चवथ्या इत्यादी सम संख्येच्या कोष्टकात, जरी क्वचित वरच्या ओळीत ल व ग यांच्या आकडचाची बेरीज संभवत असली तरीही ओळीत प्रस्तुत उपान्त्य व चवथा यांचा अभाव

त्रियोगजाश्च ये भेदाश्चतुर्योगभवश्च यः ।
तत्पङ्क्तीनामपि ज्ञेयमेवमेवाङ्कपूरणम् ॥ ३७० ॥
किंतु त्रियोगजे भेदे ये त्रयः स्युर्द्वियोगजाः ।
तेषां संनिहिताद्यानां प्रागुक्तोऽङ्कविपर्ययः ॥ ३७१ ॥

तिन्हींनी युक्त असणारे जे भेद तसेच चारींनी युक्त असणारा जो भेद त्यांच्या ओळींच्या बाबतीतही अशा तऱ्हेनेच आकड्यांची पूर्ती जाणावी. (३७०)

पण तिन्हींनी युक्त असणाऱ्या भेदांत, दोन्हींनी युक्त असणारे जे तीन (भेद) आहेत, त्यांमध्ये जवळ लागून असणाऱ्या पहिल्या (आकड्यांच्या) बाबतीत पूर्वी सांगितलेला आकड्याचा विपर्यास (जाणावा). (३७१)

असल्याने त्या त्या आडव्या ओळीच्या डाव्या बाजूला असणाऱ्या भागात लिहिलेल्या द्रुत, लघु, प्लुत इत्यादी स्वरूपाच्या, विषम संख्येच्या द्रुततालप्रस्तारात केवळ ल व ग यांनी युक्त असणारे भेद संभवत नसल्याने, बिंदूच लिहावे. पाचव्या इत्यादी विषम संख्येच्या कोष्टकांत, उपान्त्य व चवथा हे आकडे, यथासंभव त्या त्या वरच्या ओळीतील ल व ग यांच्या आकड्यांबरोबर मिळवून होणारा तो तो आकडा लिहावा.

मग ल व प यांच्या ओळीतील पहिल्या कोष्टकात, तिच्या वरच्या ओळीत ल व प यांचा आकडा संभवत असला तरीही तिच्या आडव्या ओळीत डाव्या भागात लिहिलेल्या त्या त्या द्रुत व प्लुत स्वरूपाच्या तालाच्या प्रस्तारात लघु व प्लुत यांनी युक्त असणारा भेद संभवत नसल्याने बिंदु लिहावा. दुसऱ्या कोष्टकात तशा तऱ्हेचा तालप्रकार संभवत असल्याने विपर्यस्त (म्हणजे एक ओळ अंतर सोडून असणाऱ्या ओळीतील) ल व प यांचे आकडे घेऊन होणारा दोन हा आकडा लिहावा. तिसऱ्या इत्यादी विषम संख्येच्या कोष्टकात उपान्त्य व सहावा हे आकडे नसल्याने त्या त्या तालप्रस्तारात तशा तऱ्हेचे तालप्रकार संभवत नसल्याने बिंदूच लिहावे. चवथ्या इत्यादी सम संख्येच्या कोष्टकांत यथासंभव उपान्त्य व सहावा हे आकडे यथासंभव ल आणि प यांच्या आकड्यांबरोबर मिळवून होणारा तो तो आकडा लिहावा. (म्हणजे) तिसऱ्या कोष्टकात बिंदु, चवथ्या कोष्टकात तीन हा आकडा, पाचव्या कोष्टकात बिंदु, सहाव्या कोष्टकात चार हा आकडा आणि सातव्या कोष्टकात बिंदु लिहावा.

नंतर ग व प यांच्या ओळीत पहिल्या इत्यादी तीन कोष्टकांत पूर्वीप्रमाणे त्या त्या तालांत तशा तऱ्हेचे भेद संभवत नसल्याने बिंदूच लिहावे. चवथ्या कोष्टकात तशा तऱ्हेचा तालाचा प्रकार संभवत असल्याने, वरच्या ओळींतील विपर्यस्त असणारे ग व प यांचे आकडे घेऊन होणारा दोन हा आकडा लिहावा. पाचव्या इत्यादी तीन कोष्टकांत पूर्वीप्रमाणेच तालप्रकार संभवत नसल्याने बिंदूच लिहावे. आठव्या, बाराव्या इत्यादी, तीन कोष्टके मध्ये सोडून असणाऱ्या कोष्टकांत, यथासंभव चवथा व सहावा हे आकडे, यथासंभव विपर्यस्त अशाही ग व प यांच्या आकड्यांबरोबर मिळवून होणारा तो तो आकडा लिहावा. याप्रकारे आठव्या कोष्टकात चार हा आकडा लिहावा. (३६७–३६९)

क० आता द ल ग ओळ इत्यादी तिन्हींनी युक्त असणाऱ्या चार ओळी आणि चारींनी (म्हणजे द ल ग प यांनी) युक्त एक ओळ, यांत आकडे लिहिणे अतिदेशाने सांगत आहे. येथे

(आकडयाचा) संभव असणे, नसणे व विपर्यास असणे हा अतिदेशाचा अर्थ होय. वेगळेपणाने सांगण्यातला विशेष दाखवीत आहे. (तो असा–) तिन्हींनी युक्त असणाऱ्या भेदांत, दोन्हींनी युक्त असणारे असे तीन भेद संभवतात. जवळचा लागून असणारा आकडा ज्यांच्यांत पहिला असतो असे ते सांगितले आहेत. यात 'जवळचा लागून असणारा' या शब्दाने संदर्भामुळे आकडा हाच विषय कळतो. आशय असा की दोन्हींनी युक्त असणाऱ्या ओळींत जी एक किंवा अनेक पहिली कोष्टके संभवतात, त्यांमध्ये ती सोडून देऊन त्यांजवळचे आकडयाने युक्त कोष्टकच पहिले म्हणून घ्यायचे. नंतर शून्ययुक्त नसणारेच कोष्टक दुसरे इत्यादी मोजावयाचे असते. दोन्हींनी युक्त असणाऱ्या ओळींच्या बाबतीत असे योजावे, एकाने युक्त असणाऱ्या ओळीच्या बाबतीत योजू नये हाही विशेष होय. आकडयांचा विपर्यास याचा अर्थ पूर्वी सांगितला आहेच. म्हणायचे आहे ते हे की तिन्हींनी युक्त असणाऱ्या ओळींत, आकडे लिहायच्या कोष्टकाशी सारखी संख्या असणाऱ्या कोष्टकातील संभवणाऱ्या, त्या त्या दोन्हींनी युक्त असणाऱ्या ओळींतील आकडे घेऊन त्यांच्याबरोबर अन्त्य इत्यादी आकडे यथायोग्य प्रकारे मिळवून तो तो आकडा लिहावा. या रीतीने, सांगितलेल्या प्रकारानुसार द ल ग यांच्या ओळीतील पहिल्या कोष्टकात, द ल, द ग आणि आणि ल ग यांच्या ओळींतील पहिल्या म्हणून मानावयाच्या कोष्टकांत क्रमाने असलेले दोनचे तीन आकडे घेऊन होणारा सहा हा आकडा लिहावा. दुसऱ्या कोष्टकात अन्त्य सहा हा आकडा, दल आणि दग यांच्या ओळींतील दुसऱ्या कोष्टकांत असणाऱ्या तीनच्या दोन आकडयांबरोबर (म्हणजे सहाबरोबर) मिळवून होणारा बारा हा आकडा लिहावा. ल आणि ग यांच्या ओळीत दुसऱ्या कोष्टकात शून्य असल्याने आकडा नाही. तिसऱ्या इत्यादी कोष्टकांत अन्त्य, उपान्त्य व चवथा हे आकडे, आकडा लिहायच्या कोष्टकाशी सारखी संख्या असणाऱ्या कोष्टकांतील संभवणाऱ्या दल, दग आणि लग यांच्या ओळींतल्या आकडयांबरोबर मिळवून होणारा तो तो आकडा लिहावा. या रीतीने तिसऱ्या कोष्टकात बत्तीस हा आकडा लिहावा आणि चवथ्या कोष्टकात साठ, पाचव्या कोष्टकात एकशेचौतीस, सहाव्या कोष्टकात दोनशेएकावन्न व सातव्या कोष्टकात पाचशे हा आकडा लिहावा.

मग द ल प यांच्या ओळीतील पहिल्या कोष्टकात, दल यांच्या ओळीतल्या पहिल्या कोष्टकातला दोन हा आकडा, दप आणि लप यांच्या ओळीतल्या दुसऱ्या कोष्टकात (क्रमाने) असणारे दोन व दोन या आकडयांबरोबर मिळवून होणारा सहा हा आकडा लिहावा. दप आणि लप यांच्या ओळींतली पहिली कोष्टके शून्ययुक्त आहेत. (म्हणून त्यांच्या बाबतीतली दुसरी कोष्टके पहिली म्हणून समजून त्यांतले आकडे घ्यायचे.) 'जवळ लागून असणारे पहिले' या सांगण्याने आकडायुक्त असे कोष्टकच पहिले म्हणून घ्यायचे आहे. म्हणून दुसऱ्या कोष्टकात, अन्त्य सहा हा आकडा, दल यांच्या ओळीतील दुसऱ्या कोष्टकातील तीन हा आकडा व दप यांच्या ओळीतील दुसऱ्या म्हणून मानायच्या कोष्टकातला तीन हा आकडा हे सर्व मिळून होणारा बारा हा आकडा लिहावा. लप यांच्या ओळीतील दुसऱ्या म्हणून समजायच्या कोष्टकात शून्य लिहिलेले आहे, म्हणून आकडयाचा अभाव आहे. अशा रीतीने तिसऱ्या इत्यादी कोष्टकात यथासंभव अन्त्य, उपान्त्य व सहावा हे आकडे, यथासंभव त्या त्या दोन्हींच्या बेरजेने होणाऱ्या ओळींतील, लिहावयाच्या कोष्टकाशी समान संख्या असणाऱ्या कोष्टकांतल्या आकडयांबरोबर मिळवून होणारे ते ते आकडे लिहावे. याप्रकारे तिसऱ्या कोष्टकात बत्तीस हा आकडा, चवथ्या कोष्टकात साठ हा आकडा आणि पाचव्या कोष्टकात एकशेबत्तीस हा आकडा लिहावा. नंतर द ग प ओळीतल्या पहिल्या कोष्टकात पूर्वी सांगितलेल्या रीतीने सहा हा आकडा लिहावा.

चतुर्योगे तु चत्वारो ये स्युर्भेदास्त्रियोगजाः ।
तदङ्केष्वेव पूर्वोक्तं स्याद्विपर्यासयोजनम् ॥ ३७२ ॥
ये चत्वारस्त्रियोगोत्थाश्चतुर्योगोत्थपञ्चमाः ।
भेदास्ते पङ्क्तिषु ज्ञेयाः क्रमादन्त्यासु पङ्क्तिषु ॥ ३७३ ॥

चारींनी (म्हणजे द ल ग प यांनी) युक्त असता, जे तिन्हींनी युक्त असणारे चार भेद (असतात) त्यांच्या आकड्यांमध्येच पूर्वी सांगितलेल्या विपर्यासाची योजना करावी. (३७२) चारींच्या योगाने होणारा पाचवा भेद धरून तिन्हींच्या योगाने होणारे जे चार भेद ते शेवटच्या (पाच) ओळींच्या मध्ये क्रमाने जाणावे. (३७३)

दुसऱ्या इत्यादी कोष्टकांत यथासंभव अन्त्य, उपान्त्य व सहावा हे आकडे यथाक्रम त्या त्या दोन्हींनी युक्त असणाऱ्या ओळींतल्या कोष्टकांतील आकड्यांबरोबर यथासंभव मिळवून तो तो आकडा लिहावा. याप्रकारे दुसऱ्या कोष्टकात बारा हा आकडा व तिसऱ्या कोष्टकात वीस हा आकडा लिहावा. मग ल, ग आणि प यांच्या ओळीत पहिल्या कोष्टकात, ल ग यांच्या ओळीतील पहिल्या कोष्टकातला दोन हा आकडा, ल प यांच्या ओळीतल्या दुसऱ्या कोष्टकातला दोन हा आकडा आणि ग प यांच्या ओळीतल्या चवथ्या कोष्टकातला दोन हा आकडा हे घेऊन होणारा सहा हा आकडा लिहावा. दुसऱ्या इत्यादी सम संख्येच्या कोष्टकांत, अन्त्य आकडा असला तरी तो येथे घ्यायचा नसल्याने व उपान्त्य, चवथा आणि सहावा हे घ्यायचे असले तरी ते संभवत नसल्याने व त्या त्या दोन्हींनी युक्त असणाऱ्या ओळींतील, लिहायच्या कोष्टकाशी समान संख्या असणाऱ्या कोष्टकांतील आकडे संभवत असल्याने त्या त्या आडव्या ओळीच्या डाव्या बाजूला लिहिलेल्या ताल प्रस्तारांत केवळ ल ग प यांनी युक्त असणारे तालांचे प्रकार संभवत नसल्याने बिन्दूच लिहावे. या रीतीने दुसऱ्या कोष्टकात बिंदु लिहावा. तिसऱ्या इत्यादी विषम संख्येच्या कोष्टकांत यथासंभव उपान्त्य, चवथा व सहावा हे आकडे यथाक्रम त्या त्या दोन्हींनी युक्त असणाऱ्या ओळीतल्या विषम संख्येच्या कोष्टकांतील आकड्यांबरोबर यथासंभव मिळवून होणारा तो तो आकडा लिहावा. (३७०–३७१)

क० आता द ल ग प यांनी युक्त असणाऱ्या ओळीतील विशेष दाखवीत आहे. चारींनी होणाऱ्या भेदींत, तिन्हींनी होणारे जे चार भेद त्यांच्या आकड्यांमध्येच पूर्वी सांगितलेली विपर्यासाची योजना करावी. असा नियम सांगण्यात, दोन्हींनी होणारे एकेक आकडे घ्यायचे नाहीत हा विशेष दाखविला आहे. या रीतीने द ल ग प यांच्या ओळीतील पहिल्या कोष्टकात, तिन्हींनी युक्त असणाऱ्या चार ओळींतल्या पहिल्या कोष्टकांत असणारे सहाचे चार आकडे घेऊन होणारा चोवीस हा आकडा लिहावा. दुसऱ्या इत्यादी कोष्टकांत यथासंभव अन्त्य, उपान्त्य, चवथा व सहावा हे आकडे, यथाक्रम तिन्हींनी युक्त असणाऱ्या ओळींतील कोष्टकांत असणाऱ्या आकड्यांबरोबर यथासंभव मिळवून होणारे ते ते आकडे लिहावे. 'जे चार–' इत्यादी ग्रंथाचा अर्थ ओळींची पुरी माहिती होण्यासाठी म्हणून आरंभीच सांगितला आहे. हा संयोगमेरू, द्रुत इत्यादींच्या संयोगाने होणाऱ्या विविध भेदांचे ज्ञान करून देणारा असल्याने सार्थ नावाचा होय. अनिष्ट (अनेक ?) विषय देण्यामुळे यांचे मेरूप्रमाणे मेरुस्वरूप समजावे. यापासून जाणायचे काय ते सांगत आहे. त्या त्या आडव्या ओळींतील कोष्टकातल्या आकड्यांनी उभ्या ओळींतील कोष्टकांत असणारे सर्व द्रुत इत्यादी (म्हणजे सर्व द्रुत, सर्व लघु व सर्व गुरू) असणारे भेद संख्येने

दलगा दलपाश्चैव दगपा लगपाः क्रमात् ।
त्रियोगजाश्चतुर्योगोद्भवा दलगपा इति ॥ ३७४ ॥
एष संयोगमेरुः स्यादतो ज्ञेयमथोच्यते ।
तिर्यक्पङ्क्तिस्थकोष्ठाङ्कैस्तैस्तैः सर्वद्रुतादयः ॥ ३७५ ॥
ऊर्ध्वपङ्क्तिगता मेयास्तदभावस्तु शून्यतः ।
तावद् द्रुतोऽत्र तालः स्यात्पङ्क्तिर्यावतिथी तिरः ॥ ३७६ ॥

तिन्हींनी होणारे द ल ग, द ल प, द ग प व ल ग प हे क्रमाने (पहिल्या चार ओळींत) आणि चारींनी होणारा द ल ग प (हा पाचव्या ओळींत) असे (पांच) ओळीत (ते समजावे.) (३७४)

हा संयोगमेरु होय. यापासून जाणायचे काय ते (आता) सांगतो. त्या त्या आडव्या ओळींतल्या कोष्टकांतल्या आकड्यांनी, उभ्या ओळींतील सर्व द्रुत असणारे इत्यादी भेद संख्येने जाणावे. शून्याने त्या (भेदाचा) अभाव (जाणावा). जितक्या संख्येची आडवी ओळ (घेतलेली) असते तितके द्रुत असणारा ताल यात असतो. (३७५, ३७६) वरच्या

जाणावे. म्हणजे त्या त्या कोष्टकांतील आकड्यांची संख्या असणारे असे जाणावे. त्या त्या कोष्टकात असणाऱ्या शून्याने त्या त्या भेदाचा अभाव जाणावा. उदा० तेराव्या आडव्या ओळीतल्या पहिल्या कोष्टकातील एक या आकड्याने सर्व द्रुत असणाऱ्या भेदांची संख्या कळते. नंतर तीन कोष्टकांत असणाऱ्या बिंदूंनी, ल ग प या स्वरूपाच्या त्या ओळीतील तालाच्या प्रस्तारांत सर्व लघु, सर्वगुरु व सर्व प्लुत असणाऱ्या भेदांचा अभाव जाणावा. पाचव्या कोष्टकातल्या तीनशेशहात्तर या आकड्याने दलयुक्त भेद संख्येने जाणावे. सहाव्या कोष्टकातल्या पस्तीस या आकड्याने द्रुतगुरुयुक्त भेद व सातव्या कोष्टकातल्या अकरा या आकड्याने द्रुतप्लुतयुक्त भेद जाणावे. आठव्या, नवव्या व दहाव्या कोष्टकांत असणाऱ्या शून्यांनी लगयुक्त, लपयुक्त आणि गपयुक्त भेद नाहीत असे जाणावे. अकराव्या कोष्टकातल्या पाचशे या आकड्याने दलगयुक्त भेद, बाराव्या कोष्टकातल्या एकशेबावीस या आकड्याने दलपयुक्त भेद; (तेराव्या कोष्टकातल्या वीस या आकड्याने दगपयुक्त भेद), चवदाव्या कोष्टकातल्या बिंदूने लगपयुक्त भेदाचा अभाव आणि पंधराव्या कोष्टकातल्या चोवीस या आकड्याने द ल ग प युक्त भेद, जाणावे. या रीतीने इच्छेनुसार खाली वाढवलेल्या पंधरा कोष्टकांच्या विपर्ययेयुक्त ओळींतील कोष्टकांनी जाणावे. त्याचप्रमाणे या रीतीने पूर्व बाजूच्या उत्तरोत्तर कमीत कमी कोष्टके असणाऱ्या आडव्या ओळींतील कोष्टकांमधल्या आकड्यांनी यथासंभव भेद जाणावे. 'तितके द्रुत असणारा' इत्यादी वाक्याचा अर्थ पूर्वीच सांगितला आहे.

वरच्या आडव्या ओळीपासून सुरवात करून, खालच्या खालच्या आडव्या ओळीतील आकड्यांच्या बेरजेने पूर्वी सांगितलेली संख्या कळून येते. ती अशी – पहिल्या आडव्या ओळीत एक, दुसरीत दोन, तिसरीत तीन, चवथीत सहा, पाचवीत दहा, सहावीत एकोणीस, सातवीत तेहतीस, आठवीत साठ, नववीत एकशेसहा, दहावीत एकशेएक्याण्णव, अकरावीत तीनशेचाळीस, बारावीत

उपरिष्टात्समारभ्य संख्या पङ्क्त्यङ्कसंगतेः ।

इति संयोगमेरुः

०	१	ऽ	ऽ̀										
१	०	०	०										
१	१	०	०	०१									
१	०	०	०	२									
१	१	१	०	३	०ऽ								
१	०	०	०	७	२	०ऽ̀	१ऽ						
१	१	०	१	११	३	०	२	१ऽ̀	ऽऽ̀	०१ऽ			
१	०	०	०	२०	४	२	०	०	०	६			
१	१	१	०	३२	५	३	३	२	०	१२	०१ऽ̀		
१	०	०	०	५४	९	४	०	०	०	३२	६		
१	१	०	०	८७	१३	५	७	३	२	६०	१२	०ऽऽ̀	
१	०	०	०	१४३	१८	६	०	०	०	१३४	३२	६	१ऽऽ̀
१	१	१	१	२३१	२४	७	११	४	०	२५१	६०	१२	६	०१ऽऽ̀
१	०	०	०	३७६	३५	११	०	०	०	५००	१२२	२०	०	२४

इति संयोगमेरुकोष्ठकम् – हे संयोगमेरूचे कोष्टक.

आडव्या ओळीपासून सुरवात करून (खाली खाली असणाऱ्या) ओळींतील आकड्यांच्या बेरजेने संख्या (कळते). (३७७–)

सहाशेवहा व तेरावीत एकहजारएकूणनव्वद. अशा रीतीने (याहून) खालच्या खालच्या (असलेल्या) ओळींच्याही बाबतीत (त्या त्या) ओळीतील आकड्यांच्या बेरजेने संख्या जाणावी.
(३७२–३७६,३७७–)

द्रुतहीनादयो भेदोद्धारा ये मेरुबोधिताः ॥ ३७७ ॥
सर्वप्रस्तारवत्तेषां प्रस्तारः किं तु तेषु यः ।
द्रुतादिनियमः सोऽत्र न भङ्क्तव्यः[७८] प्रयत्नतः ॥ ३७८ ॥

जी द्रुतहीन इत्यादी भेदांची निष्पन्न स्वरूपे मेरूमध्ये कळून येतात (३७७) त्यांचा प्रस्तार सर्व (साधारणपणे सांगितलेल्या) प्रस्ताराप्रमाणेच होय. पण त्यांत जो द्रुत इत्यादीबद्दलचा नियम आहे तो येथे प्रयत्नपूर्वक मोडू नये. (३७८)

क० आता खंडप्रस्ताराचे लक्षण देत आहे. द्रुतमेरु, लघुमेरु, गुरुमेरु व प्लुतमेरु या चार मेरूंत कळून येणारी जी भेदांची स्वरूपे, त्यांचा प्रस्तार ' पहिल्या मोठ्याच्या खाली लहान ठेवून ' (श्लोक ३१६) इत्यादी रीतीने जो प्रस्तार पूर्वी सांगितला आहे त्याचप्रमाणे योजावा. ही भेदांची स्वरूपे, द्रुतहीन इत्यादी दोन इत्यादी समसंख्येचे द्रुत भेद, सर्व द्रुत शेवटी असणारे भेद, लघुहीनापासून आरंभ करून आधी एकयुक्त व नंतर क्रमाने एकाने वाढणारे भेद आणि बाकीचे लघुमेरूप्रमाणे, अशा तऱ्हेने निष्पन्न होणारी होत. येथील विशेष सांगत आहे. त्या भेदांतील जो दोन द्रुत, चार द्रुत, एक लघु, दोन लघू इत्यादी द्रुत इत्यादींच्या संख्येचा नियम असतो तो येथे मानू नये. (' भङ्क्तव्यः ' या ऐवजी ' मन्तव्यः ' असा शब्द कल्लिनाथाने येथे योजलेला आहे) अर्थ असा की–

खंडप्रस्तारात सर्व प्रस्तारात सांगितलेल्या रीतीने द्रुत इत्यादींच्या संख्येच्या नियमाचा भंग प्राप्त झाला तरी द्रुत इत्यादींच्या संख्येचा नियम न सोडताच प्रस्तार करावा. उदाहरणासाठी प्लुतभेदात खंडप्रस्तार दाखवितो–

प्रथम प्लुत लिहून त्याच्याखाली त्यापेक्षा लहान असा गुरु ठेवून, तालाचा कमी असणारा अंश जो लघु तो लिहावा. मग पहिल्या लघूच्या खाली त्यापेक्षा लहान द्रुत लिहायचा असता द्रुतहीन भेद प्रस्तुत असल्याने, ' द्रुत इत्यादींचा नियम मोडू नये ' या म्हणण्यानुसार तेथे द्रुत न लिहिता, गुरूच्या खाली लघु ठेवून कमी तालांश गुरु लिहावा. मग पहिल्या गुरूच्या खाली लघु ठेवून ' बाकीचा वरच्या प्रमाणे ' या सांगण्यानुसार शेष (म्हणजे बाकीचा) लघु लिहून, कमी तालांशही लघु लिहावा. या प्रकारे द्रुतहीन चार भेद, द्रुतमेरूच्या सहाव्या उभ्या ओळीत खालच्या क्रमाने पहिल्या कोष्टकातल्या चार या आकड्याने कळून येतात. मग दुसऱ्या कोष्टकातील नऊ या आकड्याने दोन द्रुत असणारे भेद कळत असल्याने प्रथम दोन द्रुत व गुरु लिहून सर्व प्रस्ताराप्रमाणे गुरूच्या खाली लघु ठेवावा. कमी असणारा तालांश म्हणून गुरूचा संभव असला तरीही द्रुतविषयक नियम मोडला जाऊ नये यासाठी लघु व (दोन) द्रुत डाव्या बाजूला लिहावे. याप्रकारे बाकीचेही सात भेद सर्व प्रस्ताराप्रमाणे योजून, खंडप्रस्ताराला विरोध न येईल अशा रीतीने लिहावे. नंतर तिसऱ्या कोष्टकातील पाच या आकड्याने चार द्रुत असणारे भेद कळतात.

---

७८. अडचार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तीत ' भङ्क्तव्यः ' हाच पाठ घेतलेला आहे. आनंदाश्रम आवृत्तीत तळटीपेत (पृ. ४७०) ' मन्तव्यः ' हा पाठ दिला आहे. कल्लिनाथाने ३७८ व्या श्लोकाच्या स्पष्टीकरणात ' भङ्क्तव्यः ' हा पाठ घेऊनच तो विशद केला आहे. पण कल्लिनाथाच्या टीकेत (अडचार आवृत्ति भाग ३ पृ. २०६ व आनंदाश्रम आवृत्ति पृ. ४७०) ' मन्तव्यः ' हा शब्द एकवार आला आहे. तो योग्य वाटत नाही.

संख्यैषा[७९] मेरुकोष्ठाङ्काद्यस्मात्पूर्वोक्तरीतितः ।
लभ्यते तत्र नष्टाङ्कं पातयेदथ शेषतः ॥ ३७९ ॥

मेरूच्या कोष्टकातील ज्या आकड्यापासून पूर्वी सांगितलेल्या रीतीने ही संख्या मिळते तीमधून नष्टांक वजा करावा. नंतर बाकी राहिलेल्यातून (३७९) तिसरा व पाचवा

त्यात आरंभी चार द्रुत व एक लघु लिहून पूर्वी सांगितलेल्या प्रकाराने खाली खाली (बाकीचे चार भेद) लिहावे. मग चवथ्या कोष्टकातल्या एक या आकड्याने सर्व द्रुत असणाऱ्या भेदाची संख्या जाणावी. याच प्लुताच्या प्रस्तारात, लघूमेरूमधील सहाव्या उभ्या ओळीतल्या सर्वात खालच्या कोष्टकातील पाच या आकड्याने लघुहीन भेद जाणावे. दुसऱ्या कोष्टकातल्या सात या आकड्याने एक लघु असणारे भेद जाणावे. तिसऱ्या कोष्टकातल्या सहा या आकड्याने दोन लघू असणारे भेद जाणावे व चवथ्या कोष्टकातल्या एक या आकड्याने सर्व लघू असणारे भेद जाणावे. गुरुमेरूमध्येही उभ्या सहाव्या ओळीतल्या सर्वात खालच्या कोष्टकातील चौदा या आकड्याने गुरुहीन भेद जाणावे. दुसऱ्या कोष्टकातल्या पाच या आकड्याने एक गुरु असणारे भेद जाणावे. तसेच प्लुतमेरूतही सहाव्या उभ्या ओळीतील खालच्या कोष्टकातल्या अठरा या आकड्याने प्लुतहीन भेद जाणावे, दुसऱ्या कोष्टकातल्या एक या आकड्याने सर्व प्लुत असणारा भेद जाणावा.

अशा रीतीने सर्वत्र खंडप्रस्तार जाणून घ्यावा. (३७७–३७८)

क० आता द्रुतमेरूच्या पहिल्या ओळीतील सम संख्येच्या कोष्टकातल्या नष्टाचे लक्षण वैत आहे–

सम कोष्टकात अन्त्याखेरीज त्यांची बेरीज योजून, ज्या मेरूच्या कोष्टकातील आकड्याने ही संख्या मिळते, त्या संख्येच्या आकड्यामधून नष्टांक वजा करावा. 'सम कोष्टकात अन्त्याखेरीज' असे सांगितले असल्याने तिसरा व पाचवा हेच प्रथम त्या कोष्टकात द्रुतहीन-संख्येचे कारण म्हणून क्रमाने उपान्त्य होतात. हा तिसरा किंवा पाचवा आकडा शेषातून (म्हणजे राहिलेल्यातून) वजा होत नसेल तर लघु मिळतो. तिसऱ्याच्या पुढच्या विषम कोष्टकातील

---

७९. 'एषा' याऐवजी 'एषाम्' असा पाठ सुधाकरटीकेत घेतलेला आहे व 'एषाम्' याचे स्पष्टीकरण 'द्रुतहीन इत्यादी भेदांची' असे दिले आहे.

सुधाकरटीकेत द्रुतमेरूच्या खालच्या ओळीतल्या समसंख्येच्या कोष्टकातील नष्टाचे उदाहरण पुढीलप्रमाणे दिले आहे —

आठ द्रुतांच्या प्रस्तारात द्रुतहीन सात भेद होतात. त्यांतला पहिला भेद कशाप्रकारचा ? असा नष्टविषयक प्रश्न असता सातातून एक वजा करायचा. राहिलेल्या सहांमधून तिसरा व पाचवा वजा केल्यावर 'गुरु प्लुत होतो' या न्यायाने तो गुरूच प्लुत होतो. ताल पूर्ण होण्यासाठी एक लघु घ्यायचा. अशा रीतीने लघु व प्लुत हा पहिला भेद मिळतो. दुसऱ्या भेदाचे स्वरूप विचारले असता, अन्त्यामधून म्हणजे सातामधून दोन हा आकडा वजा केल्यावर राहिलेल्या पाचातून तिसरा चार हा आकडा वजा केल्यावर गुरु मिळतो. पाचवा दोन हा आकडा शेष-स्वरूपाचा होतो. नंतर या राहिलेल्यातून तिसरा एक हा आकडा वजा केल्यावर एकापासून पुन्हा गुरु मिळतो. (म्हणजे दुसरा भेद दोन गुरू या स्वरूपाचा मिळतो.) अशाप्रकारे जाणावे.

तृतीयपञ्चमोपान्त्यावपाते लभ्यते लघुः ।
परो यद्यकृतार्थः स्यात्सह तेनाथ चेदुभौ ॥ ३८० ॥
अकृतार्थौ ततस्ताभ्यां स्वं विनैवैष लभ्यते ।
परे कृतार्थे ग्राह्यः स्यादकृतार्थः पुरातनः ॥ ३८१ ॥
पतिताद् गुरुलाभः स्यात्सह प्राचा तदा परा ।
चतुरङ्की निवर्तेत पतिते पञ्चमेऽप्यथ ॥ ३८२ ॥
गुरुः प्लुती भवेत्प्राचा सह चैषा निवर्तते ।
रूपाप्तौ प्रापकाङ्केभ्यः शेषेष्वेष पुनर्विधिः ॥ ३८३ ॥
गुरुलाभे त्वपात्रार्हः पञ्चमः शेषतां व्रजेत् ।
अङ्काभावे तु गृह्यन्ते लघवस्तालपूर्तये ॥ ३८४ ॥

इति द्रुतमेरुवधःपङ्क्तिसमकोष्ठनष्टम्

हे उपान्त्य (म्हणजे त्याजवळचे) आकडे (वजा करावे). ते वजा होत नसतील तर लघु मिळतो. पुढचा (म्हणजे तिसऱ्याच्या पुढच्या विषम कोष्टकातला आकडा) अकृतार्थ (म्हणजे वजा न होणारा) असेल तर त्याच्यासह (लघु मिळतो). जर (पुढचे) दोन्ही वजा न होणारे असतील तर त्यांपासून स्वतःविना (म्हणजे तिसरा व पाचवा यांविना) तो (म्हणजे लघु) मिळतो. पुढचा कृतार्थ (म्हणजे वजा होणारा) असल्यास, मागचा वजा न होणारा घ्यावा. (३८०, ३८१)

(तिसरा किंवा पाचवा) वजा होत असल्यास गुरु मिळतो. त्यावेळी (वजा होणाऱ्या आकड्यांच्या) पूर्वीच्या (आकड्या) सह पुढील चार आकडे निवृत्त होतात. (तिसरा वजा होऊन) नंतर पाचवा आकडाही वजा होत असल्यास (३८२) गुरु प्लुत होतो. (त्यावेळी) पूर्वीच्या (सहाव्या आकड्या)सह हे (सहा आकडे) निवृत्त होतात.

प्राप्त करून देणाऱ्या आकड्यांपासून (लघु इत्यादींचे) स्वरूप प्राप्त झाल्यावर, राहिलेल्या (आकड्यांच्या) बाबतीत ही योजना पुन्हा करावी. (३८३) गुरु मिळाला असता वजा न होण्यास पात्र असलेला पाचवा शेष होतो. आकडा संभवत नसेल तेव्हा ताल पूर्ण होण्यासाठी लघू घेतले जातात. (३८४)

हे द्रुतमेरूच्या खालच्या ओळीतल्या सम कोष्टकातील नष्ट होय.

आकडा वजा होत नसेल तर त्याच्यासह लघु मिळतो. यावरून हा पुढचा आकडा क्वचित वजा होतो हेही संभवते. पुढचे दोन्ही जर वजा होत नसतील, तर त्यांपासून 'स्व' खेरीज हा लघु मिळतो. त्यांपासून म्हणजे वजा न होणाऱ्या पुढच्या दोन्हींपासून 'स्व' या शब्दाने येथे तिसरा व पाचवा हे सांगितले आहेत. 'स्व' विना म्हणजे तिसऱ्या किंवा पाचव्या शिवाय, अशा रीतीने लघु मिळतो. पुढचा वजा होत असल्यास वजा न होणारा मागचा घ्यावा. तिसरा किंवा पाचवा वजा होत असल्यास गुरु मिळतो. तेव्हा म्हणजे गुरु प्राप्त झाल्यावेळी मागच्यासह म्हणजे वजा

उद्दिष्टे तु गुरोर्लभ्यस्तृतीयोऽन्त्यात्पुरातनः ।
प्राग्वच्चतुर्निवृत्तिः स्याच्तृतीयः पञ्चमस्तथा ॥ ३८५ ॥
प्लुताल्लभ्यौ निवृत्तिस्तु षण्णामथ पुनर्विधिः ।
लघोरङ्को न लभ्येत निवृत्तिस्त्वङ्कयोर्द्वयोः ॥ ३८६ ॥

उद्दिष्टात (अन्त्य म्हणून गुरु प्राप्त झाला असता), (त्या) अन्त्य गुरूच्या (आकड्यापासून) मागचा तिसरा (म्हणून) प्राप्त करून घ्यावा. पूर्वीप्रमाणे चारींची निवृत्ति होते. प्लुतापासून तिसरा व पाचवा मिळतो (व) सहांची निवृत्ति होते. (आकडा शेष म्हणून मिळत असल्यास) मग पुन्हा (अशीच) योजना (करायची). लघूपासून आकडा मिळत नसतो (व) दोन आकड्यांची निवृत्ति होते. (३८४, ३८५).

मिळालेला आकडा अन्त्यामधून कमी केल्यावर राहिलेल्या (आकड्यापासून) उद्दिष्ट कळते. (३८६–)

हे द्रुतमेरूच्या खालच्या ओळीतील समसंख्येच्या कोष्टकातले उद्दिष्ट होय.

झालेल्या आकडयाच्या पूर्वीच्या आकडयासह पुढची चतुरङ्की, गुरु प्राप्त होण्यास कारणीभूत झाल्याने कृतार्थ होऊन निवृत्त होते. चार अंकांचा समाहार ती चतुरङ्की होय. तिसरा वजा होऊन नंतर पाचवाही वजा होत असल्यास गुरु प्लुत होतो. (त्या वेळी) पूर्वीच्या सहाव्या आकडयासह ही पुढची षडङ्की प्लुत प्राप्त होण्यास कारणीभूत झाल्याने कृतार्थ होऊन निवृत्त होते. सहा अंकांचा समाहार ती षडङ्की होय. प्राप्त करून देणाऱ्या आकडयांपासून लघु इत्यादींचे स्वरूप प्राप्त झाले असता जर शेष म्हणजे शिल्लक राहिलेले आकडे संभवत असतील तर त्या आकडयांच्या बाबतीत ही योजना पुन्हा करावी. गुरु मिळाला असता, वजा होण्यास पात्र नसलेला पाचवा आकडा शेष स्वरूपाचा होतो, म्हणजे पाचव्यापासून आरंभ करून पूर्वीचे शेष होतात. अशा रीतीने प्लुत मिळाला असता सातवा शेष स्वरूपाचा होतो असे जाणावे. शेष आकडा संभवत नसेल तर ताल पूर्ण होण्यासाठी लघू घ्यावेत. (३७९–३८४)

क० आता त्या कोष्टकातील उद्दिष्ट सांगत आहे–

उद्दिष्टविषयक भेदामध्ये जर अन्त्य म्हणून गुरु दिसला तर त्या गुरूच्या अन्त्य अशा आकडयाच्या मागचा तिसरा आकडा होतो. नष्टात सांगितलेल्या तऱ्हेने चार आकडयांची निवृत्ति होते. उद्दिष्टात प्लुत दिसत असल्यास, त्या प्लुतापासून तिसरा तसेच पाचवा प्राप्त होतो. म्हणजेच प्लुतापासून तिसरा व पाचवा मिळतो. (तसेच) सहा आकडयांची निवृत्ति होते. निवृत्तिखेरीज आकडा मिळत असल्यास पुन्हा (अशी) योजना करावी. उद्दिष्टाच्या भेदात जर लघु दिसून आला तर त्या लघूपासून आकडा मिळत नाही. लघु दिसल्यास दोन आकडे निवृत्त करावे. अन्त्यामधून, (लघूचे दोन आकडे घेतल्यावर ?) मिळालेला आकडा कमी केल्यावर राहिलेल्या आकडयाने उद्दिष्ट कळते. हे सर्व उद्दिष्टांप्रमाणेच जाणावे. (३८४–३८५, ३८६–)

लब्धाङ्कयोगहीनेऽन्त्ये शेषादुद्दिष्टबोधनम् ।
इति द्रुतमेर्वधःपङ्क्तिसमकोष्ठोद्दिष्टम्[८०]
समस्तनष्टवन्नष्टं विषमे कोष्ठके भवेत् ॥ ३८७ ॥
द्रुते लब्धे ततः पूर्वैरङ्कैः स्यात्समकोष्ठवत् ।
इत्याद्यपङ्क्तिविषमकोष्ठनष्टम्[८१]
समस्तोद्दिष्टवत्प्रोक्तमुद्दिष्टमिह सूरिभिः ॥ ३८८ ॥

सगळ्या (म्हणजे सर्वसाधारण) नष्टाप्रमाणे विषम कोष्टकातील नष्ट होय. (३८७)

द्रुत मिळाल्यावर मग (शिल्लक राहिलेल्या) पूर्वीच्या आकड्यांनी सम कोष्टकाप्रमाणे (ते) होय. (३८८–)

हे पहिल्या ओळीतल्या विषम कोष्टकातले नष्ट होय.

सर्वसाधारण उद्दिष्टाप्रमाणे येथे विद्वानांनी उद्दिष्ट सांगितले आहे. (३८८) द्रुताचा

क० आता द्रुतमेरूच्या विषम कोष्टकातील नष्टाचे लक्षण देत आहे–

('सर्व नष्टाप्रमाणे' या सांगण्यावरून) 'पूर्व पूर्व आकडा वजा करावा; त्यात वजा न होणारे द्रुत (होत) ' इत्यादी सर्व जोडून घ्यावे. यातला विशेष सांगत आहे– यात द्रुत मिळाल्यावर, 'उपान्त्य तिसरा किंवा पाचवा वजा होत नसल्यास लघु मिळतो' इत्यादी सर्व जोडून घ्यावे. (३८७; ३८८–)

क० आता त्या कोष्टकातील उद्दिष्टाचे लक्षण देत आहे–

यात 'जे आकडे वजा केल्याने नष्टात–' इत्यादी जोडून घ्यावे. यातला विशेष सांगत

---

८०. सुधाकरटीकेत या उद्दिष्टाचे उदाहरण दिले आहे. ते असे — आठ द्रुतांच्या प्रस्तारात द्रुतहीनांत दोन द्रुत, गुरु व लघु हा भेद (उद्दिष्ट) म्हणून सांगितला आहे. अन्त्यापासून तिसरा चार हा आकडा मिळतो. अन्त्य (सात) आकड्यामधून चार वजा केल्यावर तीन शिल्लक राहतात. म्हणून हा भेद तिसरा असे या उद्दिष्टप्रश्नाचे उत्तर आहे.

८१. सुधाकरटीकेतील याचे उदाहरण —

सात द्रुतांच्या प्रस्तारात पहिला भेद कशा स्वरूपाचा ? असा प्रश्न असता, शेवटच्या बारा या आकड्यातून एक वजा जाता अकरा राहतात. त्यातून चार व पाच हे आकडे वजा होतात. 'अंतर नसलेल्या यात' या न्यायाने गुरु मिळतो. मग गुरूला कारणीभूत होणाऱ्या तिसऱ्या दोन आकड्यातून, शेष दोन आकडा वजा होत असल्याने, तो गुरूच प्लुत होतो. या रीतीने द्रुत व प्लुत या स्वरूपाचा पहिला भेद मिळतो.

दहावा भेद कशा स्वरूपाचा ? असा प्रश्न असता, दहा वजा जाता राहिलेल्या दोन मधून चार वजा होत नसल्याने द्रुत मिळतो. द्रुत मिळाल्यावर समकोष्टकाप्रमाणे योजना करायची असल्याने, चार या आकड्यामधून तिसरा (दोन हा) आकडा वजा होत असल्याने गुरु मिळतो. मग तालपूर्ण होण्यासाठी लघु घ्यायचा. या प्रकारे लघु, गुरु व द्रुत या स्वरूपाचा दहावा भेद मिळतो.

द्रुताङ्कानन्तरं कार्यं विधानं समकोष्ठवत् ।
इति प्रथमपङ्क्तिविषमकोष्ठोद्दिष्टम्[८२]
कोष्ठे समोर्ध्वपङ्क्तिस्थे परासामधिको भवेत् ॥ ३८९ ॥
द्वितीयाधस्तनः पात्यस्तत्र त्वपतिताद् द्रुतः ।
पतिताल्लघुः पात्यपातानन्तर्येऽल्पो महान् भवेत् ॥ ३९० ॥
रूपपूर्तौ निवर्तन्ते पूर्ववत्स्वीयपङ्क्तिगाः ।
अधःसमवदन्यत्स्यान्निवृत्तौ तु पुनर्विधिः ॥ ३९१ ॥
यस्मात्स यस्यामूर्ध्वायां पङ्क्तौ सा विषमा यदि ।
विधिर्विषमकोष्ठोक्तः समा चेत्तर्ह्ययं मतः ॥ ३९२ ॥

आकडा (मिळाल्या) नंतर सम कोष्टकाप्रमाणे योजना करावी. (३८९–)

हे पहिल्या ओळीच्या विषम कोष्टकांतील उद्दिष्ट होय.

इतर (ओळींतील) सम संख्येच्या उभ्या ओळीमधल्या कोष्टकातील (आकड्यामधून) दुसऱ्याच्या खालचा आकडा व अधिक (असणारा म्हणजे तिसरा आकडा) वजा करावा. त्यात वजा न होणाऱ्या (आकड्याने) द्रुत मिळतो. वजा होणाऱ्या (आकड्या-) पासून लघु (मिळतो). वजा होणारे आकडे निरंतर (म्हणजे) लागून असल्यास अल्प महान होतो. (म्हणजे लघु गुरु होतो.) (३८९, ३९०)

(लघु इत्यादींच्या) स्वरूपाची पूर्ति झाल्यावर, आपापल्या ओळीतले (ते आकडे) पूर्वीप्रमाणे निवृत्त होतात. बाकी (सर्व) खालच्या (ओळीतल्या सम कोष्टका-) प्रमाणे होय. निवृत्त झाल्यावर पुन्हा योजना करावी. (३९१)

ज्या उभ्या ओळीतल्या ज्या (आकड्या-) पासून ती योजना होते, ती (ओळ) जर विषम संख्येची असेल तर विषम कोष्टकात सांगितलेली योजना (करावी); सम संख्येची असेल तर ही (सांगितलेली योजना) मानली आहे. (३९२)

आहे– द्रुताच्या आकड्याचे ज्ञान झाल्यावर समकोष्टकाप्रमाणे योजना करावी. यात 'उद्दिष्टात अन्त्य गुरूपासून, मागचा, तिसरा (म्हणून) प्राप्त करून घ्यावा' इत्यादी जोडून घ्यावे. (३८८–३८९–)

क० आता द्रुतमेरूच्या इतर ओळींतल्या नष्टाचे लक्षण देत आहे. इतर ओळींतील सम संख्येच्या उभ्या ओळीतील कोष्टकात दुसऱ्याच्या खालचा (व दुसऱ्याच्यापेक्षा अधिक म्हणजे तिसरा इत्यादी आकडा) वजा करावा. त्या आकड्यांतील वजा न होणाऱ्या आकड्यापासून

---

८२. सुधाकरटीकेतील याचे उदाहरण ––

सात द्रुतांच्या प्रस्तारात द्रुत व प्लुत या स्वरूपाचा भेद कितवा असा प्रश्न केला असता, चार, दोन व दोन वजा होत असल्याने आठ मिळतात. ते अन्त्य बारामधून कमी केल्यावर चार शिल्लक राहतात. म्हणून हा चवथा भेद असे उत्तर मिळते.

विषमोर्ध्वश्रेणिसंस्थे कोष्ठेऽधोविषमोदितः ।
इति द्रुतमेरुपरपङ्क्तिनष्टम्[८३]
यैरङ्कैः पतितैर्नष्टे लभ्यन्ते[८४] ये प्लुतादयः ॥ ३९३ ॥

विषम संख्येच्या उभ्या ओळीतल्या कोष्टकात, खालच्या (ओळीतल्या) विषम (कोष्टकात) सांगितलेली (योजना करावी). (३९३–)

हे द्रुतमेरूच्या इतर ओळींतील नष्ट होय.

ज्या वजा होणाऱ्या आकड्यांपासून नष्टात जे प्लुत इत्यादी मिळतात, (३९३)

द्रुत मिळतो. वजा होणाऱ्या आकड्यापासून लघु मिळतो. वजा होणारे दोन आकडे लागून असल्यास अल्प महान होतो म्हणजे लघु गुरु होतो. लघु इत्यादींचे स्वरूप प्राप्त झाल्यावर त्या त्या आपापल्या ओळीतले आकडे पूर्वीप्रमाणे म्हणजे खालच्या ओळीतल्याप्रमाणे निवृत्त होतात; म्हणजे लघु मिळाल्यावर दोन आकडे, गुरु मिळाल्यावर चार आकडे आणि प्लुत मिळाल्यावर सहा आकडे निवृत्त होतात. अर्थात पुन्हा योजना करताना त्यांची गणना केली जात नाही. बाकीचे सर्व खालच्या ओळीतल्या सम कोष्टकाप्रमाणे जाणावे. (लघु इत्यादींचे) स्वरूप प्राप्त करून देण्याला कारणीभूत होणारे आकडे निवृत्त झाल्यावर, (त्याखेरीज) दुसऱ्यांचे स्वरूप प्राप्त होण्यासाठी पुन्हा योजना करावी. ज्या उभ्या ओळीतल्या ज्या आकड्यापासून ही योजना करायची ती ओळ जर विषम संख्येची असेल तर खालच्या ओळीतल्या विषम कोष्टकात सांगितलेली योजना करावी; सम संख्येची असेल तर ही आता सांगितलेली योजना करावी. विषम संख्येच्या उभ्या ओळीतल्या कोष्टकात, खालच्या ओळीतल्या विषम कोष्टकातील नष्टाविषयी सांगितलेली योजना करावी. (३८९–३९२, ३९३–)

क० आता द्रुतमेरूच्या इतर ओळींतील उद्दिष्टाचे लक्षण देत आहे –

द्रुताने हीन असणारी पहिली कोष्टके असणाऱ्या उभ्या ओळींतील उद्दिष्टभेदातला जो लघु,

८३. सुधाकरटीकेतले याचे उदाहरण –

सहा द्रुतांच्या प्रस्तारात नऊ भेद होतात. त्यांतला पहिला भेद कशा स्वरूपाचा ? असा प्रश्न केला असता, नऊ मधून एक वजा केल्यावर आठ शिल्लक राहतात. त्यातून दुसऱ्याच्या खालचा पाच हा आकडा व तिसरा तीन हा आकडा वजा होतात. पहिला आकडा वजा झाल्याने लघु मिळतो. त्याला लागून असणारा आकडाही वजा होत असल्याने तो लघु, गुरु होतो. त्यामुळे दोन द्रुत व गुरु अशा स्वरूपाचा हा पहिला भेद होय असे उत्तर मिळते.

८४. 'नष्टैः' असा पाठ अड्यार आवृत्तीत घेतलेला आहे. (भाग ३ पृ. २१५–२१६) सुधाकरटीकेत तोच पाठ दिसतो. आनन्दाश्रम आवृत्तीत (पृ. ४७५) 'नष्टं (ष्टे)' असे छापलेले आहे व तळटीपेत 'नष्टैः' असा पाठ दिला आहे. उद्दिष्टाच्या लक्षणात अड्यार आवृत्ति (भा. ३ पृ. १७२) व आनन्दाश्रम आवृत्ति (पृ. ४५०) 'नष्टे' असा पाठ घेतलेला आहे. तोच सुबोध वाटल्याने स्वीकारला आहे.

सुधाकरटीकेतले याचे उदाहरण –

सहा द्रुतांच्या प्रस्तारात दोन द्रुत व गुरु या स्वरूपाचा भेद कितवा ? असा प्रश्न. दुसऱ्याच्या खालचा पाच हा आकडा व त्याला लागून असणारा तिसरा तीन हा आकडा हे वजा होऊन गुरु मिळतो. त्यामुळे आठ हा आकडा प्राप्त होतो. आठ हा आकडा पहिल्या नऊ या आकड्यामधून वजा केल्यावर एक शिल्लक राहतो. म्हणून हा पहिला भेद हे उत्तर होय.

तेभ्य उद्दिष्टसंस्थेभ्यस्तदङ्कावाप्तिरिष्यते ।
द्रुतहीनाद्यकोष्ठासु पङ्क्तिषूर्ध्वासु यो लघुः ॥ ३९४ ॥
तस्मादुद्दिष्टरूपस्थान्नाङ्कः कश्चिदवाप्यते ।
लब्धाङ्कन्यूनितान्त्याङ्कशेषादुद्दिष्टवेदनम् ॥ ३९५ ॥
इति द्रुतमेरुपरपङ्क्त्युद्दिष्टम् ।
लघुमेरावधःपङ्क्तेर्नष्टाङ्केनान्त्यशेषतः ।
पूर्वेषां पात्यमानानामपाते पूर्ववद् द्रुतः ॥ ३९६ ॥
पतितात्सह पूर्वाभ्यां परेण च गुरुर्भवेत् ।
पतिते वृत्तगुर्वङ्कानन्तरे गः प्लुती भवेत् ॥ ३९७ ॥

उद्दिष्टात असणाऱ्या त्यांच्यापासून त्या आकड्यांची प्राप्ति मानली आहे. द्रुतहीन असे पहिले कोष्टक असणाऱ्या उभ्या ओळींत (उद्दिष्टभेदातला) जो लघु, (३९४) त्या उद्दिष्ट स्वरूपात असणाऱ्या (लघू–) पासून कोणताही आकडा मिळत नाही. अन्त्य आकड्यामधून, मिळालेला आकडा कमी केल्यावर राहिलेल्या आकड्यापासून उद्दिष्टाचे ज्ञान होते. (३९५)

हे द्रुतमेरूच्या इतर ओळींतले उद्दिष्ट होय.

लघुमेरूत, खालच्या ओळीच्या, नष्टांकाने कमी झालेल्या अन्त्य आकड्याच्या शेषामधून, पूर्वीचे (आकडे) वजा केले जात असता, वजा न होणाऱ्या आकड्यापासून पूर्वीप्रमाणे द्रुत (मिळतो). (३९६)

पूर्वीचे दोन (आकडे) व नंतरचा (आकडा) यांसह, वजा होणाऱ्या आकड्यापासून गुरु (प्राप्त) होतो. निष्पन्न झालेल्या गुरूच्या आकड्यांना लागून असणारा (आकडा) वजा झाल्यास गुरु प्लुत होतो. (३९७)

त्या उद्दिष्टस्वरूपातल्या लघूपासून कोणताही आकडा मिळत नाही. कारण नष्टात, तो लघु वजा न होणाऱ्या आकड्यापासून मिळालेला असतो. (३९३–३९५)

क० आता लघुमेरूच्या खालच्या ओळीतील नष्टाचे लक्षण देत आहे–

नष्टांकाने कमी झालेल्या शेवटच्या आकड्याच्या पूर्वीचे म्हणजे दुसरा इत्यादी होत. ते वजा केले जात असता, त्यांतील एक, दोन इत्यादी आकडे वजा न झाल्यास पूर्वीच्या नष्टाप्रमाणे यातही द्रुत मिळतो. कारण 'त्यात वजा न होणाऱ्या आकड्यापासून द्रुत (मिळतो)' असे म्हटले आहेच. दोन आकडे वजा होत नसल्यास त्यांपासून दोन द्रुत, तीन आकडे वजा होत नसल्यास त्यांपासून तीन द्रुत मिळतात अशा रीतीने जाणावे. यात वजा होणाऱ्या आकड्यापासून गुरू मिळतो; अर्थात पूर्वीच्या दोन व नंतरच्या एका आकड्यासह. यावरून ' गुरू प्राप्त झाल्यावर चार आकडे निवृत्त होतात ' हे सांगितले आहे. या ओळीत लघुहीन भेदच प्रस्तुत असल्याने, वजा न होणाऱ्या आकड्यापासूनही लघु मिळत नाही, तर गुरूच मिळतो, हा यातला

एवं नष्टस्य बोधः स्यादित्युक्तं सूरिशार्ङ्गिणा ।
इति लघुमेर्वधःपङ्क्तिनष्टम्[८५]
नष्टे तु परपङ्क्तीनां पातयेत्प्रातिलोम्यतः ॥ ३९८ ॥
द्वितीयं च तृतीयाधस्तनमङ्कं च पञ्चमम् ।
परेषु च निवृत्तेषु शेषेष्वेष पुनर्विधिः ॥ ३९९ ॥
समस्तनष्टवच्चात्र द्रुतादेः प्राप्तिरिष्यते ।
किंतु लब्धे लघौ शेषेष्वाद्याधस्तनतः क्रिया ॥ ४०० ॥

असे नष्टाचे ज्ञान होते म्हणून विद्वान शार्ङ्गदेवाने सांगितले आहे. (३९८–)

हे लघुमेरूतील खालच्या ओळीतले नष्ट होय.

(लघुमेरूतील) इतर ओळींच्या नष्टाच्या बाबतीत, दुसरा, तिसऱ्याच्या खालचा व पाचवा हे आकडे उलट क्रमाने वजा करावे. पुढचे (आकडे) निवृत्त झाल्यावर, राहिलेल्यांच्या बाबतीत ही योजना पुन्हा करावी. (३९८, ३९९)

सर्व (साधारण) नष्टाप्रमाणे यात द्रुत इत्यादींची प्राप्ति मानली आहे. पण लघु मिळाल्यावर, राहिलेल्यांच्या बाबतीत पहिल्याच्या खाली असणाऱ्या (आकड्यापासून) योजना करावी. (४००)

विशेष होय. ज्या आकड्यांनी गुरु वृत्त म्हणजे निष्पन्न होतो ते 'वृत्तगुरु' होत. त्यांना लागूनचा म्हणजे गुरूला कारणीभूत होणाऱ्या चार आकड्यांच्या पूर्वीचा होय. तो वजा होत असल्यास 'ग' म्हणजे गुरु प्लुत होतो. अर्थात तोच गुरु प्लुत करावा असा अर्थ. (३९६–३९७, ३९८–)

क० आता लघुमेरूच्या इतर ओळीतील नष्ट सांगत आहे–

येथील 'प्रातिलोम्य' या शब्दाने, दुसरा, तिसऱ्याच्या खालचा व पाचवा हे आकडे वजा करायचे असता, क्वचित ही (तिसऱ्याच्या खालचा वजा करायची) योजना संभवत नसल्यामुळे तिसरा आकडा वजा करणे (ही गोष्ट प्राप्त होते). 'सर्वसाधारण नष्टाप्रमाणे यात द्रुत इत्यादींची प्राप्ति मानली आहे', तसेच 'राहिलेल्यांच्या बाबतीत पहिल्याच्या खालच्या आकड्यापासून योजना' असे म्हटले आहे. तो खालचा आकडा आपल्या ओळीतल्याबाबतची योजना अशा तऱ्हेने प्रवृत्त करील अशा अतिदेशाने सांगितलेल्या विषयांत क्वचित ही योजना संभवत नसल्याने वेगळ्या प्रकारे योजना करणे हे सांगायचे आहे. पण त्यात योजनेचा असंभव

---

८५. सुधाकरटीकेतले याचे उदाहरण––

सहा द्रुतांच्या प्रस्तारात लघुहीन पाच भेद असतात. त्यांतला पहिला भेद कशा स्वरूपाचा ? असा प्रश्न. पाचांतून एक वजा केल्यावर राहिलेल्या चारांतून पूर्वीचा तीन वजा होतो. मागचे दोन व पुढील एक यांसह, या वजा होणाऱ्या आकड्यापासून गुरु मिळतो. त्यापूर्वीचा एक हा आकडाही वजा झाल्याने गुरु प्लुत होतो. (गुरूला कारणीभूत होणाऱ्या चार आकड्यांच्या पूर्वीचा लागून असणारा पाचवा आकडा एक हा आहे.) यावरून सहा द्रुतांच्या प्रस्तारात लघुहीनांमधला पहिला भेद प्लुतयुक्त होय असे उत्तर मिळते.

सोऽधस्तनः खपङ्क्तिस्थविधिमेवं प्रवर्तयेत् ।
शेषेऽङ्काश्रितपङ्क्त्यङ्काभावे तु लघवो मताः ॥ ४०१ ॥
अधस्तनश्रेणिसंख्या नष्टस्यैष विधिः स्मृतः ।
इति लघुमेरुपरपङ्क्तिनष्टम्[८६]

तो खालचा (आकडा) आपल्या ओळीतल्या (आकड्याबाबतची) योजना या प्रकारे प्रवृत्त करील. राहिलेल्याच्या बाबतीत, (वजा करण्यास पात्र अशा) आकड्यांचा आश्रय असणारा ओळीतला आकडा संभवत नसल्यास लघू मानले आहेत. (४०१)

(ते लघू) खालच्या ओळींच्या संख्येचे (असतात). ही नष्टाची योजना म्हटली आहे. (४०२–)

हे लघुमेरूच्या इतर ओळीतील नष्ट होय.

कोणता ? असे म्हटल्यास सांगतो – प्रस्तुत एक लघु इत्यादी भेदांच्या नियमाचा भंग हाच तो योजनेचा असंभव होय. तो होऊ नये म्हणून प्रातिलोम्याचा आश्रय करावा.

'आद्याधस्तन' म्हणजे पहिल्या आडव्या ओळीत असलेल्या, लघूचे कारण असणाऱ्याच्या खालचा. येथे 'आद्य' हा शब्द घेतला नसता तर तिसऱ्या इत्यादी आडव्या ओळींत, दुसऱ्या इत्यादी आडव्या ओळीतलाही खालचा म्हणून प्राप्त झाला नसता. म्हणून 'आद्य' हा शब्द घातला आहे. 'अङ्काश्रितपङ्क्त्यङ्काभाव' याचा अर्थ असा – वजा करण्यास योग्य अशा आकड्यांनी आश्रित असणारा असा जो ओळीतला आकडा त्याचा अभाव. हा आकडा म्हणजे त्या नष्टाच्या भेदाला योग्य असणाऱ्या ओळीतला त्या त्या तालाच्या अपेक्षेने असणारा अन्त्य आकडा होय. शेषामध्ये म्हणजे राहिलेल्यात या आकड्याचा संभव नसेल तर त्या त्या भेदानुसार एक, दोन इत्यादी लघू घ्यावे. 'शेषामध्ये' म्हणजे त्या त्या नष्टाच्या भेदाच्या स्वरूपलेखनात, डाव्या बाजूला प्रवृत्त होत असताना शेवटच्या भागात. 'अधस्तनश्रेणिसंख्या' हे लघू याचे विशेषण आहे. नष्टाच्या आकड्याचा आश्रय असणाऱ्या आकड्यात खालची ओळ एक असेल तर एक लघु घ्यावा, दोन असतील तर दोन घ्यावे, तीन असतील तर तीन घ्यावे अशा प्रकारे जाणावे. (३९८-४०१, ४०२–)

---

८६. सुधाकरटीकेतले याचे उदाहरण –

सहा द्रुतांच्या प्रस्तारात एक लघु असणारे सात भेद असतात. त्यांतला पहिला भेद कशा स्वरूपाचा ? असा प्रश्न केला असता, शेवटच्या सात या आकड्यातून एक वजा करायचा. राहिलेल्या सहांमधून दुसरा चार हा आकडा व तिसऱ्याच्या खालचा दोन हा आकडा हे आकडे वजा होतात. हे लागून असणारे आकडे वजा झाल्याने गुरु मिळतो. नंतर आकडा संभवत नसल्याने लघु घ्यायचा. याप्रमाणे लघु व गुरु या स्वरूपाचा पहिला भेद असे उत्तर मिळते.

'प्रातिलोम्यतः' याचा अर्थ सुधाकरटीकेत 'मागचा मागचा दुसरा, तिसऱ्यांच्या खालचा व पाचवा हे आकडे या तऱ्हेने' अशा आशयाचा दिला आहे.

गुरुमेरोरधःपङ्क्तौ नष्टं सकलनष्टवत् ॥ ४०२ ॥
प्लुतलाभस्तु गुरुवत्,
इति गुरुमेर्वधःपङ्क्तिनष्टम्[८७]
परपङ्क्तिष्वथोच्यते ।
तृतीयाधस्तनस्थाने तृतीयोऽङ्कोऽत्र पात्यते ॥ ४०३ ॥
स्थाने तु पञ्चमस्याधः पञ्चमो लघुवद्गुरौ ।
लब्धेऽधोव्रजनं शेषाल्लघुवद्गुरुलम्भनम् ॥ ४०४ ॥

गुरुमेरूच्या खालच्या ओळीतील नष्ट सर्व (साधारण) नष्टाप्रमाणे (होय). (४०२) व प्लुताची प्राप्ति गुरूप्रमाणे (होय).

हे गुरुमेरूच्या खालच्या ओळीतले नष्ट होय.

आता (गुरुमेरूच्या) इतर ओळींतील (नष्ट) सांगतो. यात तिसऱ्याच्या खालच्या (आकड्याच्या) जागी तिसरा आकडा वजा केला जातो. (४०३) आणि पाचव्याच्या जागी त्याच्या खालचा पाचवा (आकडा) (वजा केला जातो). (लघुमेरूत) लघु मिळाल्यावर (जसे खालच्यापासून जायचे असते) तसे (गुरुमेरूत) गुरु मिळाल्यावर शेषाच्या बाबतीत खालच्या पासून जायचे असते. (यात) (लघुमेरूतील) लघूंप्रमाणे गुरूंची प्राप्ति होते. (४०४)

क० आता गुरुमेरूच्या खालच्या ओळीतील नष्ट सांगत आहे–

यात प्लुतलाभ गुरूप्रमाणे होय. म्हणजे ज्याप्रमाणे लघुमेरूच्या खालच्या ओळीत वजा होणाऱ्या आकड्यापासून गुरु मिळतो तसा गुरुमेरूच्या खालच्या ओळीत लागून असणारे दोन आकडे वजा होत असल्यास त्यांपासून प्लुत मिळतो. (४०२)

क० आता गुरुमेरूच्या इतर ओळीतील नष्ट सांगत आहे–

लघुमेरूत इतर ओळींत लघु मिळाल्यावर जशी पहिल्याच्या खालच्या आकड्यापासून योजना केली जाते तशीच यात गुरु मिळाल्यावर शेषावर आधारून पहिल्याच्या खालच्या आकड्यापासून योजना करावी. 'शेषात्' ही ल्यप्चा लोप होऊन झालेली पञ्चमी विभक्ति आहे. त्याचा अर्थ 'शेषम् अधिष्ठाय' म्हणजे शेषावर अधिष्ठित करून असा घ्यायचा. ('ल्यप्' हा पूर्वकालवाचक अव्ययाचा 'य' प्रत्यय होय. तो उपसर्गसहित धातूला लागतो. मात्र असा

---

८७. सुधाकरटीकेतील याचे उदाहरण --

सहा द्रुतांच्या प्रस्तारात गुरुहीन भेद चौदा असतात. त्यांतला पहिला भेद कशा स्वरूपाचा ? असे विचारल्यास शेवटच्या चौदा या आकड्यातून एक वजा केल्यास तेरा शिल्लक राहतात. त्यातून मागील आठ हा आकडा व त्यामागचा पाच हा आकडा हे वजा होतात. त्यामुळे गुरु मिळायचा असता, हे दोन लागून असणारे आकडे वजा होत असल्याने, गुरु प्लुत होतो या नियमाने प्लुत प्राप्त होतो. म्हणून पहिला भेद प्लुत स्वरूपाचा मिळतो.

लघुमेरुवदन्यत्तु नष्टे स्यात्परपङ्क्तिषु ।
इति गुरुमेरुपरपङ्क्तिनष्टम्[८८] ।
समस्तनष्टवन्नष्टं प्लुतमेरावुदाहृतम् ॥ ४०५ ॥
इति प्लुतमेरु – (अधःपङ्क्ति) – नष्टम्
विशेषः कथ्यते त्वेष द्वितीयादिषु पङ्क्तिषु ।
अधो गच्छेत्प्लुते पूर्णे गुरुमेरौ गुराविव ॥ ४०६ ॥

इतर ओळींतील नष्टामध्ये बाकीचे लघुमेरूप्रमाणे (होय). (४०५–)

हे गुरुमेरूच्या इतर ओळींतील नष्ट होय.

सर्व (साधारण) नष्टाप्रमाणे प्लुतमेरूतील नष्ट सांगितले आहे. (४०५)

हे प्लुतमेरूच्या (खालच्या ओळीतील) नष्ट होय.

दुसऱ्या इत्यादी ओळीतील मात्र हा विशेष सांगतो. गुरुमेरूत गुरु मिळाल्यावर जसे (खालच्या आकड्यापासून जाण्याची योजना सांगितली) तसे यात प्लुत पूर्ण झाल्यावर (म्हणजे मिळाल्यावर) खालच्या आकड्यापासून जावे. (४०६)

धातु ह्रस्व स्वरान्त असल्यास 'त्य' हा प्रत्यय लागतो.) लघुमेरूच्या इतर ओळीत जशी वजा होणाऱ्या आकड्यापासून लघूची प्राप्ति होते तशी यात वजा होणाऱ्या आकड्यापासून गुरूची प्राप्ति होते. बाकीचे लघुमेरूप्रमाणे जाणावे. (४०३, ४०४, ४०५–)

क० प्लुतमेरूच्या खालच्या ओळीतील नष्ट सर्वनष्टाप्रमाणे जाणावे. दुसऱ्या इत्यादी बाकीच्या ओळींतल्या (नष्टासंबंधी) विशेष दाखवीत आहे– गुरुमेरूत गुरु मिळाल्यावर ज्याप्रमाणे खालच्या आकड्यापासून जाण्यास सांगितले आहे त्याचप्रमाणे यात प्लुत पूर्ण असता म्हणजे तो मिळाल्यावर पहिल्याच्या खालच्या आकड्यापासून योजना करावी. यात प्लुत अपूर्ण असता असा शब्द संधि सोडवून पुन्हा घेऊन त्याप्रमाणे स्पष्टीकरण द्यावे. ('प्लुते पूर्णे' हा शब्द 'प्लुतेऽपूर्णे' असा पुन्हा घेतल्यास संधि सोडवून त्याचे स्वरूप 'प्लुते अपूर्णे' असे होईल.) प्लुत अपूर्ण असता म्हणजे मिळाला नसता, शेवटच्या आकड्याने मिळालेला द्रुत, लघु किंवा गुरु प्लुत करावा. अथवा 'प्लुत होतो' यानेच 'अगोदर प्लुताने मिळालेला' हे

---

८८. सुधाकरटीकेतील याचे उदाहरण –

सहा द्रुतांच्या प्रस्तारात एक गुरु असणारे पाच भेद असतात. त्यातला पहिला भेद कशा स्वरूपाचा ? असे विचारल्यास शेवटच्या पाच या आकड्यामधून एक वजा करावा. राहिलेल्या चारातून, मागचा दोन हा आकडा व त्यामागचा एक हा आकडा वजा होत असल्याने गुरु मिळतो. गुरु मिळाल्यावर पहिल्या सहा द्रुतातल्या तीन आकड्यापासून आरंभ करून (?) योजना केल्यावर मिळालेला एक आकडा वजा झाल्यावर लघु प्राप्त होतो. तेव्हा लघु व गुरू या स्वरूपाचा पहिला भेद हे उत्तर मिळते.

द्रुतो लघुर्गुरुर्वान्त्यैरङ्कैर्लब्धः प्लुती भवेत् ।
तदङ्कावधस्तनैः सार्धमङ्कषट्कमतीत्य च ॥ ४०७ ॥
अधःपङ्क्तौ स्थितैरङ्कैः शेषैरेष पुनर्विधिः ।
पङ्क्तौ तु प्लुतहीनायां नान्तिमः प्लुततां व्रजेत् ॥ ४०८ ॥

इति प्लुतमेरुपरपङ्क्तिनष्टम्[८९]

सर्वोद्दिष्टवदुद्दिष्टं लघुमेर्वादिषु त्रिषु ।

इति लघुमेर्वादिमेरुत्रयोद्दिष्टम्

(प्लुत मिळाला नाही तर) अन्त्य आकड्यांनी प्राप्त होणारा द्रुत, लघु किंवा गुरु प्लुत होतो. तेव्हा तो त्या आकड्याच्या खाली असणाऱ्या आकड्यांसह सहा आकडे ओलांडून (प्लुत होतो). (४०७)

शेष राहिलेल्या आकड्यांनी खालच्या ओळीत ही योजना पुन्हा करावी. पण प्लुतहीन ओळीतील शेवटचा प्लुतस्वरूपाला प्राप्त होत नाही. (४०८)

हे प्लुतमेरूच्या इतर ओळीतील नष्ट होय.

लघुमेरु इत्यादी तीन (मेरूंत) सर्व (- साधारण) उद्दिष्टाप्रमाणे उद्दिष्ट (जाणावे).

हे लघुमेरु इत्यादी तीन मेरूंतील उद्दिष्ट होय.

कळून येते. प्लुतहीन ओळ म्हणजे पहिलीच्या खालची ओळ (म्हणजेच सर्वात खालची ओळ). या ओळीत आकड्याने मिळालेला शेवटचा द्रुत इत्यादि प्लुत होत नाही. (४०५–४०७, ४०८)

क० 'जे आकडे वजा केल्याने नष्टात' इत्यादी येथे जे सांगितले आहे तेच सर्वत्र जोडून घ्यावे.

अशा तऱ्हेने स्पष्टीकरण देणाऱ्या कल्लिनाथाने, मार्ग व देशी या विभागांनुसार योग्यप्रकारे जो तालप्रत्यय तो निर्णायक स्वरूपाने सांगितला आहे.

---

८९. प्लुतमेरूच्या इतर ओळीतील नष्टाचे सुधाकरटीकेतले उदाहरण --

आठ द्रुतांच्या प्रस्तारात एक प्लुत असणारे पाच भेद असतात. त्यातला पहिला भेद विचारला असता पाचातून एक वजा करावा. नंतर शिल्लक राहिलेल्या चारांतून पूर्वीचे दोन व एक हे आकडे वजा करावे. लागून असणारे हे दोन आकडे वजा होत असल्याने मिळणारा गुरु शेवटच्या आकड्यांनी प्राप्त होत असल्याने, सहा आकड्यांनी गुरूचे प्लुतस्वरूप होते. मग खालच्या ओळीत पुन्हा योजना केली असता एक हा आकडा वजा होत असल्याने लघु मिळतो. म्हणून लघु व प्लुत या स्वरूपाचा पहिला भेद असे उत्तर मिळते.

श्रीनिःशङ्कशार्ङ्गदेवप्रणीत

संगीतरत्नाकर

अध्याय सहावा : वाद्य

षष्ठो वाद्याध्यायः

सहावा अध्याय — वाद्य

ततं येनावनद्धं च भुवनं निजमायया।
आनन्दघनमध्येमि तं ब्रह्मसुषिरे हरम् ॥ १ ॥
चित्रा वाचः प्रवर्तन्ते धातुवृत्तिविचित्रिताः।[१]

ज्याने आपल्या मायेने विश्व विस्तारले व (एकत्र) बांधले, त्या आनंदघन हराला ब्रह्मसुषिरात (म्हणजे हृदयकमलात) मी स्मरतो. (१)

धातु व वृत्ति यांनी विविध स्वरूपाच्या अनेकविध वाचा ज्यापासून प्रवृत्त होतात अशा त्या विस्तार व तत्त्वांच्या समूहाने अनुसरणाऱ्या शिवाला मी स्तवितो. (२)

क. आता गीताला उपयोगी म्हणून त्यानंतर निर्देशिलेल्या वाद्याचे प्रकरण आरंभणारा ग्रंथकार, आरंभी सुयोग्य व इष्ट देवतेचे स्मरण करून, (पहिल्या दोन श्लोकांनी) तिची स्तुति करीत आहे.

सुधाकर टीका– अधि + इ या धातूचा अर्थ स्मरणे असा आहे. ब्रह्मसुषिर म्हणजे ब्रह्मरंध्र (सुषिर याचा अर्थ छिद्र). तेच परमेश्वराचे उपासना-स्थान होय. 'आनन्दघन' याचा अर्थ आनंदाने व्यापलेला असा घ्यावा किंवा आनंद म्हणजे सुखस्वरूपाचा व घन म्हणजे कूटस्थ (अचल) स्वरूपाचा असा घ्यावा. परमेश्वराचे हे सर्व धर्म मायेमुळे होत, सत्यस्वरूपाने नव्हेत. सूचित होणाऱ्या वाद्य या पक्षी, 'मी वाद्य स्मरतो, इच्छितो' असा अर्थ होय. या दृष्टीने पहिल्या श्लोकाचा आशय असा –

वीणा इत्यादी तत, मुरज इत्यादी अवनद्ध, आनंद देणारे कांस्यताल इत्यादी घन व वंश इत्यादी सुषिर असे ब्रह्म म्हणजे मोठे विस्तृत स्वरूप ज्या वाद्याने आपल्या मायेने म्हणजे विस्ताराने (घडवून आणले) त्या कल्याणस्वरूपाच्या वाद्याचे मी स्मरण करतो, त्याची इच्छा करतो. दुसऱ्या श्लोकाच्या प्रस्तुत 'त्या शिवाला मी स्तवितो' या अर्थी –

प्रकृति इत्यादी चौवीस तत्त्वांत आपल्या विस्ताराने व्यापून राहिलेला. त्यापासूनच विविध स्वरूपाची वेदरूपी वाणी प्रवृत्त होते. त्वचा इत्यादी सात धातू होत. त्यांच्या विशेष व्यापाराने विविध स्वरूपाची होणारी अशी ती वाचा असते. किंवा धातू म्हणजे कफ इत्यादी घ्यावेत. दुसऱ्या अप्रस्तुत 'त्या कल्याणस्वरूपाच्या वाद्याला मी स्तवितो' अशा अर्थी –

'विस्तारयुक्त नाद असल्याने विस्तार नावाचा धातु म्हटला आहे' असे ज्याचे लक्षण पुढे सांगितले जावयाचे आहे तो विस्तार धातु होय. तत्त्व व ओघ हे वादनप्रकार पुढे सांगितले जावयाचे आहेत. ज्यापासून विविध अशी वाद्याक्षरे व चित्रा वृत्ति इत्यादी प्रवृत्त होतात ते हे वाद्य होय. 'विशिष्ट प्रहारांनी उत्पन्न होणारे स्वर धातू मानले आहेत,' (असे धातूचे सामान्य लक्षण पुढे सांगितले जावयाचे आहे). 'दृश्यम व मुख्य असा व्यवहार वृत्ति मानली आहे.'

ज्या परमेश्वराने आपल्या मायेच्या साधनाने (हे) विश्व तत (म्हणजे विस्तारले आहे) आणि अवनद्ध (म्हणजे बांधून टाकले आहे) त्या आनंदघन (म्हणजे परमानंद स्वरूपाच्या) हराला (म्हणजे शंकराला) ब्रह्मसुषिरात (म्हणजे हृदयकमळात) मी स्मरतो. (असा या पहिल्या श्लोकाचा आशय आहे.)

हृदयकमळ म्हणजेच ब्रह्मसुषिर असे पिण्डोत्पत्ति प्रकरणात पूर्वी 'चेतनस्थाना'चे स्पष्टीकरण देताना प्रतिपादिलेले आहे. येथे तत, अवनद्ध, घन व सुषिर या शब्दांनी पुढे सांगितले जावयाचे हे वाद्यभेद सूचित केलेले आहेत. (दुसऱ्या श्लोकाचा आशय असा–) भू (म्हणजे होणे, असणे) इत्यादी धातू व वृत्ती म्हणजे समास किंवा अभिधा, गौणी इत्यादी शब्दव्यापार यांनी विविध स्वरूपाची अशी अनेकविध वाक्ये म्हणजे वेद इत्यादी ज्या शिवापासून प्रवृत्त होतात आणि जो महत् इत्यादी तत्त्वांचा समूह असा जो विस्तार त्याने अनुसरला जातो त्या शिवाला मी स्तवितो.

या दुसऱ्या श्लोकाचा या पक्षी आशय असा –

'धातु व वृत्ति यांनी विविधतापूर्ण असणारे अनेकविध बोल ज्यापासून प्रवृत्त होतात, जे विस्तार, तत्त्व आणि ओघ यांनी अनुसरलेले असते, अशा त्या कल्याणप्रद वाद्याला मी स्तवितो.'

१ कल्लिनाथाने 'धातुवृत्तिविचित्रिताः' यामधील 'धातु' या शब्दाने भू म्हणजे होणे, असणे इत्यादी धातू घेतले आहेत व 'वृत्ति' या शब्दाने समास किंवा अभिधा, गौणी इ. शब्दवृत्ती घेतल्या आहेत. संस्कृत व्याकरणात शब्दांच्या पाच वृत्ती मानल्या आहेत. त्या अशा – (१) कृद्वृत्ति (म्हणजे कृदन्त, उदा. आसीन, कृत्वा इ., (धातूंना प्रत्यय लागून कृदन्त होते.), (२) तद्धितवृत्ति – (नामांना व विशेषणांना प्रत्यय लागून तद्धित होते), उदा. सौभद्र, मीमांसक, समता इ.; (३) धातुवृत्ति (म्हणजे नामधातु, इच्छार्थक धातुरूपे), उदा. पुत्रीयति चिकीर्षति इ.; (४) समासवृत्ति (म्हणजे समास) उदा. राजपुरुष, अविद्या, चक्रपाणि इ.; (५) एकशेषवृत्ति (म्हणजे अनेक शब्दांचा योग असताना त्यांतील एक शिल्लक राहणे) उदा. माता च पिता च पितरौ, भ्राता च स्वसा च भ्रातरौ इ.

'वृत्ति' या शब्दाचे दुसरे स्पष्टीकरण अभिधा, गौणी इ. वृत्ती असे कल्लिनाथाने दिले आहे. साहित्यशास्त्रात शब्दांच्या तीन वृत्ती मुख्यतः मानलेल्या आहेत. त्या अशा – (१) अभिधा-शब्दाचा मुख्यार्थ देणारा मानसिक व्यापार, उदा. घोडा, मनुष्य इ. शब्दांचा मुख्यार्थ अभिधेने कळतो; (२) गौणी किंवा लक्षणा – उदा. एखाद्या माणसाला उद्देशून बैल हा शब्द वापरला तर तो मुख्यार्थाने लागू पडत नाही. म्हणून मुख्यार्थाशी संबद्ध असा दुसरा अर्थ म्हणजे बैल जसा जडपणा, मंदपणा इत्यादी गुणांनी युक्त असतो तसा तो माणूस जडपणा, मंदपणा इत्यादी गुणांनी युक्त आहे असा अर्थ प्रभावीपणाने लक्षित होतो. म्हणून ही गौणी किंवा लक्षणा-वृत्ति होय. (३) व्यञ्जना – या वृत्तीने शब्दाचा मुख्यार्थ कळल्यावर आणखी वेगळा असा अर्थ सूचित होतो. उदा. 'तळघातील कमळाच्या पानावर बगळी निश्चल बसली आहे' असे प्रियकराने प्रियेस सांगताना 'ही जागा जनरहित असल्याने एकांतास योग्य आहे' असा अर्थ सूचित होतो.

सुधाकरटीकेत 'धातु' या शब्दाने त्वचा इ. सात धातू किंवा कफ इ. तीन धातू घेतले आहेत. शरीरधारण करीत असल्याने यांना 'धातु' असे म्हटले आहे. त्वचा, रक्त, मांस, मेद, हाडे, मज्जा व वीर्य असे सात धातू होत; किंवा कफ, पित्त व वात हे तीन धातू होत.

यतस्तं नौमि विस्तारतत्त्वौघानुगतं[२] शिवम् ॥ २ ॥
गीतं चतुर्विधाद्वाद्याज्जायते चोपरज्यते ।
मीयते च ततोऽस्माभिर्वाद्यमद्य निगद्यते ॥ ३ ॥


चार प्रकारच्या वाद्यापासून गीत उत्पन्न होते व उपरंजक होते आणि (तालक्रियेने) मोजले जाते. म्हणून आम्ही आता वाद्य सांगतो. (३)

महत् इत्यादी तत्त्वांच्या विस्ताराने तो अनुसरला जातो किंवा त्यांच्या उत्पत्ति, स्थिति व लय यांचा आधार असल्याने त्यांस अनुसरतो असे जाणावे. 'ते निर्माण करून त्याने त्यातच नंतर प्रवेश केला' (तै. उ. २–६) अशी श्रुति आहे. येथे धातु इत्यादी शब्दांनी पुढे सांगितले जावयाचे वादनप्रकार सूचित होतात. (१–२)

क० येथे गीताच्या प्रकरणानंतर वाद्याचे प्रतिपादन करण्यातील तर्कयुक्त संगति दाखवीत आहे. ती संगति 'गीत चार प्रकारच्या वाद्यापासून उत्पन्न होते'–– इत्यादीने सांगितली आहे. तत, सुषिर, अवनद्ध व घन या चार प्रकारच्या वाद्यांतील पहिल्या दोन्हींच्या म्हणजे तत व सुषिर यांच्यापासून श्रुती इत्यादींच्या द्वारे संगीत उत्पन्न होते. 'श्रुती इत्यादि' यातील 'इत्यादि' या शब्दाने स्वर, मूर्च्छना, क्रम, तान, अलंकार व जाती हे सर्व घ्यायचे आहे. नंतर अवनद्ध वाद्याने गीत रंजक

---

२. तत्त्वौघ म्हणजे तत्त्वांचा समूह. ही तत्त्वे मूळ प्रकृति धरून चौवीस आहेत ती अशी—



'ते निर्माण करून त्याने त्यातच नंतर प्रवेश केला' हे वाक्य तैत्तिरीय उपनिषद् (२–६) यातील आहे. 'त्या परमात्म्याने इच्छा केली की मी पुष्कळ व्हावे, निर्मिति करावी. त्याने तप करून हे सर्व (विश्व) निर्माण केले व ते निर्मून त्यातच नंतर प्रवेश केला.' असा हा संदर्भ आहे.

तत्ततं सुषिरं चावनद्धं घनमिति स्मृतम् ।
चतुर्धा तत्र पूर्वाभ्यां श्रुत्यादिद्वारतो भवेत् ॥ ४ ॥
गीतं ततोऽवनद्धेन रज्यते मीयते घनात् ।
वाद्यतन्त्री(त्रि)ततं वाद्यं सुषिरं सुषिरं मतम् ॥ ५ ॥
चर्मावनद्धवदनमवनद्धं तु वाद्यते ।
घनो मूर्तिः साभिघाताद्वाद्यते यत्र तद्घनम् ॥ ६ ॥
ततं वीणा द्विधा सा च श्रुतिस्वरविवेचनात् ।
तत्र श्रीशार्ङ्गदेवेन श्रुतिवीणोदिता पुरा ॥ ७ ॥

ते तत, सुषिर, अवनद्ध व घन असे चार प्रकारचे म्हटले आहे. त्यांतील पहिल्या दोन्हींमुळे श्रुति इत्यादी द्वारे गीत (उत्पन्न) होते. मग अवनद्ध (वाद्याने) ते रंजक होते व घन (वाद्याने) (तालद्वारा) ते मोजले जाते.

वाजवायची तार ज्यात (लावलेली) असते ते तत (होय); छिद्रयुक्त ते सुषिरं (वाद्य) मानले आहे. (४, ५)

ज्याचे चामड्याने मढवलेले तोंड वाजवले जाते ते अवनद्ध (वाद्य होय). घन म्हणजे (घनतायुक्त) मूर्ति (होय); ती ज्यात एकमेकावर प्रहार करून वाजवली जाते ते घन (वाद्य होय). (६)

तत (वाद्य म्हणजे) वीणा (होय); व ती श्रुति आणि स्वर अशा भिन्नपणामुळे दोन प्रकारची (असते). त्यांतली श्रुतिवीणा श्रीशार्ङ्गदेवाने पूर्वी सांगितली आहे. (७)

होते; म्हणजे त्या त्या जागी नादाचा सारखेपणा निर्माण होईल असा आवाज उत्पन्न झाल्याने अत्यंत रंजकतेने युक्त असे होते. घनवाद्याने लघु इत्यादी तालक्रियेने गीत मोजले जाते. अशा रीतीने चारी प्रकारच्या वाद्यांचे गीतालाच साहाय्य होते असे समजावे. (३, ४, ५–)

तत इत्यादी वाद्यांचे सामान्य लक्षण सांगत आहे– 'वाद्यतन्त्रि' म्हणजे 'वाजवायची तार ज्यात (लावलेली) असते' हे ततवाद्याचे लक्षण होय. सुषिर म्हणजे छिद्र ज्यात आहे ते सुषिर, हे सुषिर वाद्याचे लक्षण होय. 'चामडघाने मढवलेले तोंड ज्यात असते' हे अवनद्ध वाद्याचे लक्षण होय. घन म्हणजे मूर्ति (अर्थात काठिण्ययुक्त टाळ इ०). गीत इत्यादीत, एकमेकावर आपटून टाळासारखे घन वाद्य वाजवले जाते (५, ६)

क० त्या वाद्याचे भेद दाखवण्यासाठी सांगत आहे–

श्रुतिवीणा पूर्वी स्वरगत अध्यायात सांगितली आहे. स्वरवीणेतही सूक्ष्मबुद्धीने संगीततज्ज्ञ, दण्ड इत्यादीवर षड्ज इ० स्वरांच्या चारश्रुती इ० प्रदेशांच्या खुणा करून तीव्रा इ० श्रुती

---

३. 'ततं तन्त्रीततं' असा पाठ सुधाकरटीकेत घेतलेला आहे; व त्याचे स्पष्टीकरण 'तन्त्रीने विस्तारलेले ते तत' असे दिले आहे. 'वाद्यतन्त्रीततं' असा पाठ अडचार आवृत्तीत आहे. त्याचा अर्थ 'वाजवायच्या तारेने युक्त तत (वाद्य होय).' कल्लिनाथ पाठ 'वाद्यतन्त्रि ततं' असा मिळतो.

वक्ष्यते स्वरवीणात्र तस्यामपि विचक्षणाः ।
अङ्कित्वा स्वरदेशानां भागानुद्भिन्दते श्रुतीः ॥ ८ ॥
तद्भेदास्त्वेकतन्त्री स्यान्नकुलश्च त्रितन्त्रिका ।
चित्रा वीणा विपञ्ची च ततः स्यान्मत्तकोकिला ॥ ९ ॥
आलापिनी किंनरी च पिनाकीसंज्ञिता परा ।
निःशङ्कवीणेत्याद्याश्च शार्ङ्गदेवेन कीर्तिताः ॥ १० ॥
वंशः पावः पाविका च मुरली मधुकर्यपि ।
काहलातुण्डकिन्यौ च चुक्का शृङ्गमतः परम् ॥ ११ ॥
शङ्खादयश्च वाद्यस्य सुषिरस्य भिदा मताः ।
पटहो मर्दलश्चाथ हुडुक्का करटा घटः ॥ १२ ॥
घडसो ढवसो ढक्का कुडुक्का कुडुवा तथा ।
रुञ्झा डमरुको डक्का मण्डिडक्का च डक्कुली ॥ १३ ॥
सेल्लुका झल्लरी भाणस्त्रिवली दुन्दुभिस्तथा ।
भेरीनिःसाणतुम्बक्यो भेदाःस्युरवनद्धगाः ॥ १४ ॥

येथे स्वरवीणा सांगतो. सूक्ष्मबुद्धीचे (संगीतनिष्णात) तिच्यामध्येही स्वरस्थानांच्या भागांवर खुणा करून श्रुती उत्पन्न करतात. (८)

एकतन्त्री, नकुल, त्रितन्त्रिका, चित्रावीणा, विपञ्ची, मग मत्तकोकिला, आलापिनी, किंनरी, नंतर पिनाकी नावाची, (हे भेद) व निःशङ्कवीणा प्रथम असणारे (प्रकार) इत्यादी त्या (स्वरवीणेचे) भेद शार्ङ्गदेवाने सांगितले आहेत. (९, १०)

वंश, पावा, पाविका, मुरली व मधुकरी, काहला आणि तुण्डकिनी, चुक्का, मग शृंग (म्हणजे शिंग), (११) आणि शंख इत्यादी हे सुषिरवाद्याचे भेद होत.

पटह, मर्दल, नंतर हुडुक्का, करटा, घट, घडस, ढवस, ढक्का, कुडुक्का, तसेच कुडुवा, रुञ्झा, डमरु, डक्का, मण्डिडक्का, डक्कुली, (१२, १३) सेल्लुका, झल्लरी, भाण, त्रिवली, तसेच दुंदुभि, भेरी, निःसाण आणि तुंबकी हे अवनद्ध (वाद्याचे) भेद होत. (१४)

आविष्कृत करतात. त्या त्या श्रुतींचे स्वरूप कमी किंवा जास्त न होईल अशा प्रकारे या खुणा केलेल्या असतात. श्रुतिवीणेत स्वर स्वतःच उत्पन्न होतात. (७–८)

आता स्वरवीणांचे प्रकार सांगत आहे–

'निःशंकवीणा– इत्याद्याः' यातील 'आद्य' या शब्दाने दुसऱ्या देशात अत्यंत प्रसिद्ध असणारी इतरही स्वरवीणा जाणून घेतली जाते. निःशंकवीणा अशी स्वतःचे नाव वेऊन तयार केलेली वीणा सांगितली असल्याने, अप्रसिद्ध असणारीही दुसरी वीणा स्वतःच्या बुद्धीने तयार करून स्वतःच्या इच्छेने तिचे नाव ठेवावे असे कळून येते. याप्रमाणे सुषिर इत्यादींच्या बाबतीतही जाणावे. (९–१०)

क० सुषिर इत्यादी वाद्यांचे भेद नामनिर्देशाने सांगत आहे (११–१५, १६–)

तालोऽथ कांस्यतालः स्याद्घण्टा च क्षुद्रघण्टिका ।
जयघण्टा ततः कम्रा शुक्तिपट्टादयस्तथा ॥ १५ ॥
प्रभेदा घनवाद्यस्य प्रोक्ताः सोढलसूनुना ।
शुष्कं गीतानुगं नृत्तानुगमन्यद् द्वयानुगम् ॥ १६ ॥
चतुर्धेति मतं वाद्यं तत्र शुष्कं तदुच्यते ।
यद्विना गीतनृत्ताभ्यां तद्वोष्ठीत्युच्यते बुधैः ॥ १७ ॥
ततः परं तु त्रितयं भवेदन्वर्थनामकम् ।
वाद्यं दक्षाध्वरध्वंसोद्वेगत्यागाय शंभुना ॥ १८ ॥
चक्रे कौतुकतो नन्दिस्वातितुम्बुरुनारदैः[४] ।
अभिषेके नरेन्द्राणां यात्रायामुत्सवे तथा ॥ १९ ॥

ताल व कांस्यताल, घण्टा आणि क्षुद्रघण्टिका, जयघण्टा, मग कम्रा, तसेच शुक्ति, पट्ट इत्यादी (१५) घनवाद्याचे भेद सोढलपुत्र (शार्ङ्गदेवाने) सांगितले आहेत. (१६–)

शुष्क, गीतानुग (म्हणजे गीताला अनुसरणारे), नृत्तानुग (म्हणजे नृत्ताला अनुसरणारे) आणखी द्वयानुग (म्हणजे गीत व नृत्त या दोन्हींना अनुसरणारे) (१६) असे चार प्रकारचे वाद्य मानले आहे. त्यांतले, जे गीत व नृत्त यांशिवाय (स्वतंत्रपणे) प्रवृत्त होते ते शुष्क म्हटले जाते; त्याला जाणकार गोष्ठी असे म्हणतात. (१७)

त्यानंतरचे तीन प्रकार नावाप्रमाणे सार्थ होत.

दक्षयज्ञाचा विध्वंस केल्यावर उत्पन्न झालेला उद्वेग नाहीसा होण्यासाठी शंकराने वाद्य (१८) निर्माण केले (व) नन्दि, स्वाति, तुम्बुरु आणि नारद यांच्यांकडून ते कौतुकाने (प्रवृत्त केले).

राजांचा अभिषेक, यात्रा, तसेच उत्सव (१९) विवाह, उपनयन इत्यादी सर्व मंगल

क० स्वरूपानुसार चार प्रकारच्या असणाऱ्या वाद्यांचे पुन्हा प्रयोगानुसार होणारे चार प्रकार शुष्क इत्यादींनी दाखवीत आहे.

वाद्य ईश्वरनिर्मित आहे हे सांगत आहे– शंकराने नन्दि, स्वाती इत्यादींकडून ते प्रयुक्त केले. 'अभिषेके' इत्यादीने वाद्यांच्या प्रयोगाचे प्रसंग व काळ सांगत आहे.

वाद्यांच्या प्रतिपादनाबाबत, गीतातील व नृत्तातील उणीव झाकण्यात निष्णात असणे हेही उद्दिष्ट आहे हे 'अपि' (म्हणजे सुद्धा) शब्दाने दाखवीत आहे. येथील 'न्यून' (म्हणजे उणीव)

---

४. सुधाकरटीकेत, 'स्वात्यादिभिर्गणैः अनन्दि सम्यक्कृतम्' असे म्हटले आहे. त्याचा अर्थ, 'स्वाति इत्यादी गणांच्या कडून आनंदित केले गेले म्हणजे उत्कृष्टपणे प्रयुक्त केले गेले' असा होतो. यावरून या टीकेत घेतलेला पाठ 'चक्रे कौतुकतोऽनन्दि स्वातितुम्बुरुनारदैः' असा दिसतो. 'उत्पात' म्हणजे भूताने पछाडणे इत्यादि संकट असे स्पष्टीकरण सुधाकरटीकेत दिले आहे.

मङ्गलेषु च सर्वेषु विवाहोपनयादिषु ।
उत्पाते संभ्रमे युद्धे नाटके वीररौद्रिणि ॥ २० ॥
सर्वातोद्यानि वाद्यन्ते कानिचित्त्वल्पमङ्गले ।
विश्रान्तौ रङ्गसंस्थानां गायतां नृत्यतामपि ॥ २१ ॥
एतान्युत्साहकारीणि वीराणां मङ्गलाय च ।
कुर्वन्ति हृदयस्फूर्तिं दुःखमुन्मूलयन्ति च ॥ २२ ॥
गीतनृत्तगतन्यूनप्रच्छादनपटून्यपि ।
वाद्यान्यतस्ततादीनि,
तत्रादौ ब्रूमहे ततम्[५] ॥ २३ ॥
तस्य वादनभेदांश्च विविधाः करसारणाः ।
सुषिरं पटहं तस्य पाटांस्तद्रचनास्तथा ॥ २४ ॥

कार्ये, उत्पात, संभ्रम, युद्ध आणि वीर व रौद्र या रसांनी युक्त नाटक यांत (२०) सर्व वाद्ये वाजविली जातात. थोडा मंगल प्रसंग असता (आणि) रंगभूमीवरील गाणाऱ्या व नृत्य करणाऱ्या (पात्रांच्या) विश्रान्तीसाठी (यांपैकी) काहीच (वाद्ये वाजविली जातात). (२१)

ही (वाद्ये) वीरांमध्ये उत्साह उत्पन्न करतात व (त्यांच्या) कल्याणास (कारणीभूत होतात); त्यांच्या हृदयांत स्फूर्ति उत्पन्न करतात आणि त्यांचे (शस्त्रप्रहार इत्यादींनी निर्माण होणारे) दुःख नष्ट करतात. (२२)

तत इत्यादी (वाद्ये), गीत व नृत्त यांत निर्माण झालेली उणीव झाकून टाकण्यातही निष्णात असतात (म्हणून) त्यांचे वादन करावे.

त्यांतील प्रथम तत (वाद्ये) आम्ही सांगतो. (२३)

त्या (ततवाद्याचे) वादनप्रकार आणि विविध करसारणा, सुषिर (वाद्य), पटह तसेच त्याचे पाट व त्यांच्या रचना, (२४) पाटांपासून उत्पन्न होणारे वादनप्रकार, वादनावर

हा शब्द धर्मवाचक समजावा. या (न्यूनताप्रच्छादनात, म्हणजे उणीव झाकण्यात) तत इत्यादी वाद्ये निष्णात आहेत म्हणून त्यांचे वादन करावे असा अर्थ होय. (१६–२३)

---

५. 'तत्रादौ ब्रूमहे वयम्' असा पाठ अडचार आवृत्तीत (भा० ३ पृ० २३२) घेतलेला आहे. आनंदाश्रम आवृत्तीत (पृ० ४८२) 'तत्राऽऽदौ ब्रूमहे ततम्' असा पाठ मिळतो. संगीत-सारामृतातही (पृ० ११४) 'तत्रादौ ब्रूमहे ततम्' असाच पाठ आहे. आनंदाश्रम आवृत्तीतल्या कल्लिनाथाच्या टीकेतही हाच पाठ उद्धृत केला आहे. आरंभी तत वाद्य सांगणे हे क्रमप्राप्तच आहे. म्हणून 'वयम्' च्या ऐवजी 'ततम्' हा पाठ येथे घेतला आहे.

पाटप्रभववाद्यानि प्रबन्धान्वाद्यसंश्रयान् ।
मर्दलाख्यं ततो वाद्यं भेदान्मार्दलिकस्य च ॥ २५ ॥
गुणान्दोषांश्च तद्वृन्दं स्वरूपस्य च लक्षणम् ।
हुडुक्काद्यवनद्धानां स्वस्वपाटसमन्वितम् ॥ २६ ॥
घनस्य च गुणान्दोषान् वाद्यवादकसंगतान् ।
हस्तयोश्च गुणानत्र वाद्याध्याये यथाक्रमम् ॥ २७ ॥
अङ्गुष्ठपर्वदैर्घ्यं स्यादङ्गुलं[६] द्वादशाङ्गुलम् ।
वितस्तिस्तद्द्वयं हस्तो वाद्यभाण्डमितौ भवेत् ॥ २८ ॥
ग्रन्थिव्रणभिदा हीनः श्लक्ष्णः खदिरदारुजः ।
सुवृत्तः सरलो दण्डो वितस्तिपरिधिर्भवेत् ॥ २९ ॥
त्रिहस्तदैर्घ्यस्तावच्च सुषिरं दधदन्तरा ।
सार्धाङ्गुलपरीणाहमूर्ध्वाधो वदने तथा ॥ ३० ॥

आधारलेले प्रबंध, मग मर्दल नावाचे वाद्य व मार्दलिकाचे (म्हणजे मर्दलवादकाचे) भेद, (२५) गुण आणि दोष, त्या (मर्दलवादकांचा) वृंद, व त्यांच्या त्यांच्या पाटांसह, हुडुक्का इत्यादी अवनद्ध वाद्यांच्या स्वरूपाचे लक्षण, (२६) आणि घन (वाद्याच्या) स्वरूपाचे लक्षण), (तसेच) वादन व वादक यांचे गुण व दोष आणि दोन्ही हातांचे गुण (हे सर्व) यथाक्रम येथे (या) वाद्याध्यायात (आम्ही सांगू). (२७)

अंगठ्याच्या पेराइतके लांब अंगुळ होय; वीत बारा अंगुळांची (असते); त्या दोन (वितींनी) हात होतो. (असे हे) वाद्याचे भाण्डे मोजण्यातील (मापाचे प्रमाण) होय. (२८)

(एकतन्त्री वीणा) –

(या वीणेची) दांडी खैराच्या लाकडाची (असून) ती गाठ, व्रण व चीर नसलेली, गुळगुळीत, गोलाकार आणि सरळ (असावी). तिचा घेर एक वीत (२९) व लांबी तीन हात असावी आणि तेवढ्याच (लांबीची) व दीड अंगुळ मापाची पोकळी तिच्यामध्ये असावी. तसेच वर व खाली अशी दोन तोंडे तिला असावी. (३०) व करंगळीच्या

क० त्यात, श्रुति व स्वर यांतला वेगळेपणा दाखविण्यामुळे गीत उत्पन्न करणारे म्हणून प्रथम निर्देशिलेले जे तत वाद्य, त्यापासून आरंभ करून या अध्यायात क्रमाने प्रतिपादन करावयाचे विषय सांगत आहे.

वाद्यांचे स्वरूप निश्चितपणे कळण्यासाठी अंगुळ इत्यादी मापांचे लक्षण देत आहे. (२३–२८)

---

६. हाताचे माप अंदाजे १८ इंच मानले जाते. त्यावरून वितीचे माप अंदाजे ९ इंच व अंगुळाचे $\frac{3}{4}$ इंच ठरते.

कनिष्ठाङ्गुलिमानं वाभग्नं रन्ध्रत्रयं दधत् ।
त्रेताग्निसंस्थितं यद्वा द्वे रन्ध्रे तर्जनीमिते ॥ ३१ ॥
एकमेव त्वधः शङ्कुस्थाने सार्धाङ्गुलायतम् ।
दधानः ककुभं[७] सारं खादिरं वान्यदारुजम् ॥ ३२ ॥
तिर्यक्संस्थेन दैर्घ्येणाष्टाङ्गुलं त्र्यङ्गुलायतम् ।
अङ्गुलाधिकपार्श्वं च मध्ये कूर्मोन्नताकृतौ ॥ ३३ ॥
स्थितेन पत्रिकाधारगर्तेन च समन्वितम् ।
गर्तमध्ये च रन्ध्रेण योन्याकारेण संयुतम् ॥ ३४ ॥
रन्ध्रे तस्य निविष्टेन रन्ध्रास्थौल्येन शङ्कुना ।
अन्वितां पत्रिकां मिश्रलोहजां द्व्यङ्गुलायताम् ॥ ३५ ॥
चतुरङ्गुलदैर्घ्यां च मध्ये कूर्मोन्नतां बहिः ।
निम्नमध्यं मनागन्तर्धारयन्तमधः पुनः ॥ ३६ ॥

मापाची, न फुटलेली, त्रेताग्नीप्रमाणे (म्हणजे त्रिकोणाच्या आकाराप्रमाणे) असणारी तीन भोके तिला असावी किंवा तर्जनीच्या (म्हणजे पहिल्या बोटाच्या) मापाची दोन भोके (३१) व खाली शंकूच्या जागी दीड अंगुळ विस्ताराचे एकच भोक (तिला असावे). (ही दांडी) आठ अंगुळे लांबीचा, तीन अंगुळे रुंदीचा व अंगुळापेक्षा अधिक (म्हणजे सव्वा किंवा दीड अंगुळ) बाजूची (जाडी) असणारा आणि आडवा बसविलेला असा खैराचा किंवा दुसऱ्या झाडाच्या लाकडाचा मजबूत ककुभ धारण करणारी असावी. (तो ककुभ) कासवाच्या आकाराप्रमाणे उंच असणाऱ्या (आपल्या) मध्यभागी (त्यावर योजायच्या) पट्टीचा आधार असणाऱ्या खाचेने युक्त असून त्या खाचेमध्ये योनीच्या आकाराचे भोक असावे. (३२, ३३, ३४)

त्याच्या (या) भोकात, भोकाच्या इतकी जाडी नसणारा (म्हणजे त्या भोकात जाऊ शकणारा) शंकू घातलेला असावा. तो (ककुभ) (त्या शंकूने युक्त अशी) (कासे इत्यादी धातूनी) मिश्र अशा लोखंडापासून बनवलेली दोन अंगुळे रुंदीची व चार अंगुळे लांबीची आणि कासवाप्रमाणे मध्ये उंच असणारी अशी पट्टी बाहेरून धारण करणारा असावा व खालच्या बाजूचा मध्यभाग थोडा आतून खोलगट असणारा असा असावा. (३५, ३६)

---

७. वाद्यांच्या वर्णनातील तपशील स्पष्ट करणारा भाग कल्लिनाथाच्या टीकेत दिलेला नाही. सिंहभूपालाने काही प्रमाणात स्पष्टीकरण दिले आहे. त्याचा उपयोग भाषांतर करताना यथासंभव व योग्यता ध्यानी घेऊन केला आहे. 'ककुभ' हा वीणेचा भाग वीणावादकांत प्रसिद्ध आहे एवढेच सिंहभूपालाने म्हटले आहे.

मध्ययुगीन शिल्पांत मिळणाऱ्या, एक तार असणाऱ्या वीणांच्या आकृतीमध्ये, एका कडेला आडवा असा भाग बसवला असल्याचे दिसून येते व दुसऱ्या बाजूला भोपळा जोडलेला दिसून येतो. हा आडवा भागच 'ककुभ' असावा असे वाटते.

द्विदण्डिकं शङ्कुनाष्टाङ्गुलदैर्घ्ययुजा तथा ।
वृत्तेन त्र्यङ्गुलस्थूलोत्तरार्धश्लक्ष्णमूर्तिना ॥ ३७ ॥
कूर्मपृष्ठोन्नतं मध्यमुत्तरार्धस्य बिभ्रता ।
दण्डवक्त्रमितस्थौल्याधरभागयुतेन च ॥ ३८ ॥
दण्डवक्त्रप्रविष्टाधोभागेन च विराजितम् ।
एवंविधस्य दण्डस्योर्ध्वाग्रात्सप्तदशाङ्गुले ॥ ३९ ॥
अधोभागेऽक्षिसदृशं विधाय विवरद्वयम् ।
एकद्वित्रिगुणां तन्त्रीं क्षिप्त्वा रन्ध्रे परत्र तु ॥ ४० ॥
तन्त्रीप्रान्तान्तरे क्षिप्त्वा प्रोतं तद् द्विगुणे ततः ।
द्विगुणाकर्षणात्कर्षेत्पुनरेवं समाचरेत् ॥ ४१ ॥
षष्ट्यङ्गुलपरीणाहं सुपक्वं वर्तुलं च यत् ।
तुम्बस्योत्सेधतस्तस्य वदनं द्वादशाङ्गुलम् ॥ ४२ ॥
वृत्तस्थानस्थया नाभ्याधोमुख्या मध्यरन्ध्रया ।
त्र्यङ्गुलायतया युक्तं पृष्ठसंश्लिष्टपूर्वया ॥ ४३ ॥

दोन लहान दांड्या असणारा, वरच्या अर्ध्याभागाचा मध्यभाग कासवाच्या पाठीप्रमाणे उंच असा धारण करणाऱ्या, आठ अंगुळे लांबीच्या, तसेच गोलाकार व वरचा अर्धा भाग तीन अंगुळे जाडीचा आणि गुळगुळीत आकाराचा असणाऱ्या शंकूने युक्त असणारा व दाण्डीच्या तोंडाच्या मापाची जाडी असणाऱ्या खालच्या भागाने युक्त आणि दाण्डीच्या तोंडात घातलेल्या खालच्या भागाने युक्त असणाऱ्या (शंकूने) शोभिवंत असणारा (ककुभ धारण करणारी ती दांडी असते). अशा प्रकारच्या दांडीच्या वरच्या टोकापासून सतरा अंगुळे (अंतरावर) खालच्या भागात डोळ्यासारखी दोन भोके योजून आणि अन्य भोकात एकेरी दुहेरी किंवा तिहेरी तार घालून ती दोन भोके दुहेरी तारेच्या दोन टोकांनी ओवून घ्यावी. मग ती दुहेरी टोके ओढून (तार) ओढावी. पुन्हा याप्रमाणे करावे. (३७, ३८, ३९, ४०, ४१)

जो (वीणेचा भोपळा) साठ अंगुळे घेराचा, चांगला पक्व व गोलाकार असा (ध्यायचा) ल्या भोपळ्याचे तोंड उंचीच्या दृष्टीने बारा अंगुळे (असावे). (४२)

तो (भोपळा) वृत्ताच्या (म्हणजे फलक जोडलेल्या) ठिकाणी खाली तोंड असणाऱ्या, मध्ये भोक असणाऱ्या, तीन अंगुळे रुंदीच्या व पूर्व (म्हणजे पुढचा भाग) भोपळ्याच्या पाठीला लागलेल्या अशा नाभीने युक्त (असावा) (४३)

तुम्बकं मध्यरन्ध्रं स्यात्कर्परं नालिकेरजम् ।
अन्तस्थरन्ध्रसंलग्नं पृष्ठमध्येन रन्ध्रिणा ॥ ४४ ॥
तं दधद्रन्ध्रमध्येऽथ तन्त्रीप्रान्ते निवेश्य तौ ।
संवेष्ट्य कीलकेऽन्तस्थे कीलकं भ्रामयेन्मुहुः ॥ ४५ ॥
तावद्यावद् दृढो बन्धस्तुम्बकस्यैव जायते ।
एवं तुम्बकमुत्तानं दण्डे तज्ज्ञैर्निबध्यते ॥ ४६ ॥
दोरकं नागपाशेन द्विगुणेनान्वितं तथा ।
सुबलश्लक्ष्णसूत्रोत्थं दण्डे तुम्बोर्ध्वदेशतः ॥ ४७ ॥
संवेष्ट्य नागपाशेऽस्मिन् बद्धप्रान्तां दृढां घनाम् ।
श्लक्ष्णां स्नायुमयीं तन्त्रीं कृष्ट्वा संपीड्य पत्रिकाम् ॥ ४८ ॥
तन्त्र्या संवेष्ट्य ककुभं निबध्नीयाद् दृढं ततः ।
वैणवी यवविस्तारा तन्त्री द्व्यङ्गुलदैर्घ्यभाक् ॥ ४९ ॥
तन्त्रीपत्रिकयोरन्तर्जीवा नादस्य सिद्धये ।
संदिग्धपत्रिका तन्त्रीश्लेषं क्षेप्या कलावता[८] ॥ ५० ॥

भोपळा मध्ये भोक असलेला असून तो छिद्र असलेल्या पाठीच्या मधल्या भागाने आतल्या भोकाशी जोडलेल्या नारळाच्या कवटीने युक्त असावा. (४४)

मग (त्या) भोकाच्या मध्ये तो तारेची दोन्ही टोके घालून, आत असणाऱ्या खिळ्याला गुंडाळून तो खिळा हळू हळू एवढा फिरवावा (४५) की ज्यामुळे भोपळ्याचेच बंधन घट्ट होईल. अशा रीतीने जाणकार भोपळा वर तोंड असलेला असा दाण्डीला बांधतात. (४६)

नंतर बळकट व गुळगुळीत अशा सुतांनी तयार केलेली, दुहेरी नागपाशाने युक्त असलेली दोरी दाण्डीला भोपळ्याच्या वरच्या बाजूला (४७) गुंडाळून, या नागपाशात टोक बांधलेली, बळकट, भरीव (व) गुळगुळीत अशी स्नायूची तात पट्टीवर घट्ट दाबून ओढून, (४८) मग (ती) तात ककुभाला गुंडाळून घट्ट बांधावी. एक यव रुंदीची व दोन अंगुळे लांबीची बांबूची तार (४९) नादाच्या सिद्धीसाठी तात व पट्टी यांमध्ये जीवा (म्हणजे जवारी) (म्हणून योजावी). ती पट्टीला व तातेला लागून असणारी अशी कलाकाराने ठेवावी. (५०)

---

८. 'कलावता' असा पाठ अडचार व आनंदाश्रम आवृत्तीत छापलेला आहे. संगीतसारामृतात (पृ. ११५) 'कला च सा' असा पाठ घेतलेला आहे. हा पाठ आनंदाश्रम आवृत्तीत (पृ. ४८४), ४ ह्न. ड. या तळटीपेत दिलेला आहे. 'तार व पत्रिका यांमध्ये केलेली जी जवारीची (जीवेची) योजना ती कला होय' असा आशय या पाठामुळे मिळतो. या आशयाच्या ज्ञानाने पुढे दिलेले निष्कल वाद्याचे वर्णनही स्पष्ट होते. म्हणून 'कला च सा' हा पाठ स्वीकारणे योग्य ठरते.

या पक्वेणुवल्कोत्था दोरिका त्रिवृता शुभा ।
कनिष्ठाङ्गुलिविस्तारा द्वादशाङ्गुलदैर्घ्यभाक् ॥ ५१ ॥
सुवृत्ता मसृणा तुम्बादधस्तादङ्गुलत्रये ।
दण्डे संवेष्टयेन्मन्द्रस्वरस्थानोपलक्षिकाम् ॥ ५२ ॥
यत्राभिदधिरे धीरास्तां वीणामेकतन्त्रिकाम् ।
प्रकृतिः सर्ववीणानामेषा श्रीशार्ङ्गिणोदिता ॥ ५३ ॥
दर्शनस्पर्शने चास्या भोगस्वर्गापवर्गदे ।
पुनीतो विप्रहत्यादिपातकैः पतितं जनम् ॥ ५४ ॥
दण्डः शम्भुरुमा तन्त्री ककुभः कमलापतिः ।
इन्दिरा पत्रिका ब्रह्मा तुम्बं नाभिः सरस्वती ॥ ५५ ॥
दोरको वासुकिर्जीवा सुधांशुर्दोरिका रविः ।
सर्वदेवमयी तस्माद्वीणेयं सर्वमङ्गला ॥ ५६ ॥
अधस्तुम्बमधोवक्त्रमूर्ध्वं तन्त्री यथा भवेत् ।
तथास्या दोरिकादेशं वामस्कन्धे निधाय च ॥ ५७ ॥

जी तिहेरी, गोल, गुळगुळीत, करंगळीएवढ्या रुंदीची व बारा अंगुळे लांबीची, पक्क्या बांबूच्या सालीपासून तयार केलेली अशी शुभ दोरी, ती भोपळ्यापासून खाली तीन अंगुळे (अंतरावर), मंद्र स्वरांचे स्थान निर्देशित करणारी (अशी) दांडीला गुंडाळावी. (५१, ५२)

(अशा प्रकारचे लक्षण) जिच्यात (असते) त्या वीणेला विद्वानांनी एकतंत्री (वीणा) म्हटले आहे.

ही श्रीशार्ङ्गदेवाने सर्व वीणांची प्रकृति (म्हणजे मूळ अशी) म्हटली आहे. (५३)

हिचे दर्शन व (हिचा) स्पर्श हे भोग, स्वर्ग आणि मोक्ष देणारे असून ब्राह्मणहत्या इत्यादी पापांमुळे पतित होणाऱ्या माणसाला पवित्र करतात. (५४)

दंड (अर्थात दांडी) म्हणजे शंकर, तात म्हणजे उमा, ककुभ म्हणजे कमलापति (विष्णु), पट्टी म्हणजे इंदिरा, भोपळा म्हणजे ब्रह्मा, नाभि म्हणजे सरस्वती, (५५) दोरक म्हणजे वासुकि, जीवा म्हणजे चंद्र, दोरिका म्हणजे सूर्य अशी (ही) सर्वदेवमय आहे. म्हणून ही वीणा सर्वमंगल (होय.) (५६)

तोंड खाली असणारा भोपळा खालच्या बाजूला आणि तार वर होईल अशा रीतीने हिचा दोरी (बांधलेला) भाग डाव्या खांद्यावर (५७) ठेवून व उजव्या पायाच्या टाचेने

ककुभं दक्षिणस्याङ्घ्रेः पार्ष्ण्या संधाय यत्नतः ।
न्यस्तां पृष्ठे कनिष्ठाया वामहस्तस्य कम्रिकाम् ॥ ५८ ॥
सारणात्सारणेत्युक्तामनामाङ्गुलिवेष्टिताम् ।
आकुञ्चन्मध्यमापार्श्वलग्नां तर्जनिकाग्रतः ॥ ५९ ॥
निपीड्योरःस्थलासन्नां तन्त्रीमधिनिधाय च ।
ऊर्ध्वाधः सारयेन्नादसिद्धयै हस्तं तु दक्षिणम् ॥ ६० ॥
त्यक्त्वा वितस्तिं जीवातस्तन्त्रीं विन्यस्य सारयेत् ।
अन्यत्रोपरिवाद्यात्तं नोर्ध्वं वक्षःस्थलान्नयेत् ॥ ६१ ॥
कम्रिका[९] तात्क्रिया चोक्ता सारणा सा चतुर्विधा ।
उत्क्षिप्ता संनिविष्टाख्योभयी स्यात्कम्पितेत्यपि ॥ ६२ ॥
श्लिष्टा तन्त्रीं यदोत्प्लुत्य निपतेत्सारणान्मुहुः ।
तदोत्क्षिप्ता संनिविष्टा स्पृष्ट्वैव सारणे भवेत् ॥ ६३ ॥

यत्नपूर्वक ककुभ स्थापित करून (ही धारण करावी). डाव्या हाताच्या करंगळीच्या मागच्या बाजूला ठेवलेली (५८) (व) अनामिकेने (म्हणजे तिसऱ्या बोटाने) वेढलेली आणि थोडया वाकलेल्या मधल्या बोटाच्या बाजूला लागलेली अशी (बांबूची) कम्रिका (वाजविण्यासाठी ध्यावी). (ही तारेवर) सारायची असल्याने (तिला) सारणा असे म्हटले आहे. तर्जनीच्या (म्हणजे पहिल्या बोटाच्या) टोकाने (५९) ती दाबून धरून छाती-जवळ असणाऱ्या तारेवर ठेवून वर खाली अशी नाद उत्पन्न करण्यासाठी सारावी. आणि उजवा हात (६०) जव्हारीपासून एक वीत अंतर सोडून तारेवर ठेवून सारावा. उपरिवाद्य (हा वादनप्रकार) सोडून (इतरत्र) तो छातीच्या वर नेऊ नये. (६१)

कम्रिका व तिचा वापर (या दोन्हींना) सारणा म्हटले आहे. ती चार प्रकारची आहे– उत्क्षिप्ता, संनिविष्टा, (हे दोन्ही असल्याने) उभयी व कंपिता. (६२) जेव्हा (कम्रिका) तारेला चिकटून असलेली (अशी) ठेवून (नंतर) वर घेऊन, (मग) वारंवार सारून खाली आणायची असते तेव्हा ती उत्क्षिप्ता (सारणा होय). जेव्हा (तारेला) स्पर्श करूनच (कम्रा) सारली जाते तेव्हा ती संनिविष्टा (सारणा होय). (६३) या

---

९. 'कम्रिका' याचे स्पष्टीकरण सिंहभूपालाने 'वाजवायची बांबूची दांडी' असे दिले आहे. प्राचीन व मध्ययुगीन शिल्पांतील वीणेच्या आकृतीत काही वेळा डाव्या हातात धरलेली एका बाजूला थोडी निमुळती होत जाणारी छोटीशी काठी वाजवण्यासाठी योजलेली आढळते. तीच 'कम्रिका' असावी असे वाटते. नाट्यशास्त्रात वीणा वाजवायसाठी वापरलेली अशा तऱ्हेची छोटी काठी 'कोण' या नावाने सांगितली आहे.

क्रमादेतद्द्वयाभ्यासादुभयी सारणा मता ।
स्वरस्थाने कम्पनेन कम्पिता कम्रिकोच्यते ॥ ६४ ॥

घातः पातश्च संलेखस्तथोल्लेखावलेखकौ ।
भ्रमरः संधितच्छिन्नौ नवमी नखकर्तरी ॥ ६५ ॥

व्यापारा दक्षिणस्येति पाणेर्वामस्य तु द्वयम् ।
स्फुरितः खसितश्चेति करयोरुभयोस्त्वमी ॥ ६६ ॥

घोषो रेफोऽथ बिन्दुः स्यात्कर्तरी चार्धकर्तरी ।
निष्कोटिताख्यः स्खलितः शुकवक्त्रश्च मूर्च्छना ॥ ६७ ॥

तलहस्तोऽर्धचन्द्रश्च प्रसारः कुहरोऽपरः ।
त्रयोदशेति सर्वेऽमी स्युश्चतुर्विंशतिर्युताः ॥ ६८ ॥

करनामान्यपीमानि मन्वते वाद्यवेदिनः ।
घातः स्यान्मध्यमाक्रान्ततर्जन्या तन्त्रिकाहतिः ॥ ६९ ॥

इति घातः (१)

घातः केवलया पातः,

इति पातः (२)

दोन्ही (सारणा) क्रमाने पुन्हापुन्हा केल्याने उभयी सारणा मानली आहे. कम्रिका स्वरस्थानाच्या ठिकाणी कंपित ठेवली असता कंपिता (सारणा) म्हटली आहे. (६४)

घात, पात, संलेख तसेच उल्लेख व अवलेखक, भ्रमर, संधित आणि छिन्न (व) नववी नखकर्तरी (६५) हे उजव्या (हाताचे) व्यापार (होत). आणि डाव्याचे स्फुरित व खसित हे दोन (होत). दोन्ही हातांचे (व्यापार) (पुढे सांगितलेले) हे (असे–) (६६) घोष, रेफ मग बिंदु हा होय. (नंतर) कर्तरी व अर्धकर्तरी, (तसेच) निष्कोटित नावाचा, स्खलित, शुकवक्त्र आणि मूर्च्छना, (६७) तलहस्त, अर्धचंद्र, प्रसार (आणि) पुढचा कुहर असे तेरा. हे सर्व मिळून चौवीस होत. (६८)

वाद्यांचे जाणकार यांना (हस्तव्यापारांची नावे असेच केवळ न मानता) हातांची नावे असेही मानतात.

मधले बोट (वरच्या बाजूला ?) जोडलेल्या तर्जनीने तारेवर आघात करणे हा घात होय. (६९)

हा घात होय (१)

फक्त (तर्जनीनेच) आघात करणे हा पात (होय).

हा पात होय (२)

संलेखोऽन्तस्तया हतिः ।

इति संलेखः (३)

अन्तर्मध्यमया घातमुल्लेखं संप्रचक्षिरे ॥ ७० ॥

इत्युल्लेखः (४)

अवलेखो मध्यमया स्यात्तन्त्रीताडनं बहिः ।

इत्यवलेखः (५)

अङ्गुल्यान्येऽन्ययाप्याहुरुल्लेखं चावलेखकम् ॥ ७१ ॥

सर्वाभिस्तिसृभिस्ताभ्यामथवेति च ते जगुः ।

अन्तर्बहिर्मुखौ घातौ तयोस्ते ब्रुवते क्रमात् ॥ ७२ ॥

इति मतान्तरेणोल्लेखावलेखौ

भ्रमरोऽन्तःक्रमाच्छीघ्रं चतुरङ्गुलिताडनम् ।

इति भ्रमरः (६)

मध्यमानामिकाभ्यां तु बहिर्घातोऽत्र संधितः ॥ ७३ ॥

इति संधितः (७)

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय 1934 2

ल्या (तर्जनीने) आतल्या बाजूने प्रहार करणे हा संलेख (होय).

हा संलेख होय. (३)

मधल्या बोटाने आतल्या बाजूने आघात करणे यास उल्लेख म्हटले आहे. (७०)

हा उल्लेख होय. (४)

मधल्या बोटाने तारेवर बाहेरून आघात करणे हा अवलेख होय.

हा अवलेख होय. (५)

दुसऱ्या (आचार्यांनी) उल्लेख व अवलेख हे दुसऱ्या बोटानेही सांगितले आहेत. (७१)

किंवा सर्व (चारी बोटांनी), तिन्हींनी अथवा दोन्हींनी त्यांनी (उल्लेख व अवलेख) सांगितले आहेत. ते त्यांचे प्रहार क्रमाने आतून व बाहेरून सांगतात. (७२)

हे दुसऱ्या मतानुसार उल्लेख व अवलेख होत. चारी बोटांनी क्रमाने आतल्या बाजूने जलद प्रहार करणे हा भ्रमर (होय).

हा भ्रमर होय. (६)

मधले बोट व अनामिका (म्हणजे तिसरे बोट) यांनी (तारेवर) बाहेरून आघात करणे हा संधित (होय). (७३)

हा संधित होय. (७)

तर्जनीपार्श्वलग्नायास्तन्त्र्या बहिरनामया ।
हननं छिन्नमाचष्टे श्रीमत्सोढलनन्दनः ॥ ७४ ॥
इतिच्छिन्नः (८)
क्रमाद् द्रुतं नखैर्घातश्चतुर्भिर्नखकर्तरी ।
इति नखकर्तरी (९)
इति नव दक्षिणहस्तव्यापाराः
स्फुरिते कम्पिता तन्त्रीपृष्ठलग्नेव सारणा ॥ ७५ ॥
इति स्फुरितः (१)
मुहुः सारणया तन्त्रीघर्षणं खसितो मतः ।
इति खसितः (२)
इति वामहस्तव्यापारद्वयम्
तन्त्री लग्नाङ्गुष्ठपार्श्वा कर्तरीवच्च हन्यते ॥ ७६ ॥
कनिष्ठासारणाभ्यां वा यत्रासौ घोष उच्यते ।
इति घोषः (१)

तर्जनीच्या बाजूस लागलेल्या तारेवर अनामिकेने बाहेरून आघात करणे याला श्री सोढलपुत्र (शार्ङ्गदेव) छिन्न म्हणतो. (७४)

हा छिन्न होय. (८)

चारी (बोटांच्या) नखांनी क्रमाने जलद आघात करणे ही नखकर्तरी (होय).

ही नखकर्तरी होय. (९)

हे नऊ उजव्या हाताचे वापर होत.

स्फुरितात तारेला वरच्या बाजूस लागलेली कम्रिका कंपित (सारणे) प्रमाणे (योजली जाते). (७५)

हा स्फुरित होय. (१)

सारणेने (म्हणजे कम्रिकेने) वारंवार तारेवर घर्षण केल्याने खसित मानला आहे.

हा खसित होय. (२)

हे डाव्या हाताचे दोन वापर होत.

ज्यात (उजव्या हाताच्या) अंगठ्याची बाजू जिला लागलेली आहे अशा तारेवर कर्तरीप्रमाणे आघात केला जातो (७६) किंवा करंगळी व कम्रा यांनी आघात केला जातो तो घोष म्हटला आहे.

हा घोष होय. (१)

दक्षिणानामया यत्र तन्त्रीरन्तर्निहन्यते ॥ ७७ ॥
वामस्य मध्यमाङ्गुल्या बहिस्तं रेफमूचिरे ।
इति रेफः (२)
अनामया बहिस्तन्त्रीघाताज्जातो यदा ध्वनिः ॥ ७८ ॥
तर्जन्या धार्यते बिन्दुर्निःशङ्केनोदितस्तदा ।
इति बिन्दुः (३)
अङ्गुलीभिश्चतसृभिः क्रमेण करयोर्द्वयोः ॥ ७९ ॥
बहिस्तन्त्रीहतिस्तूर्णं कर्तरी कीर्तिता बुधैः ।
इति कर्तरी (४)
दक्षिणः कर्तरीं कुर्याद्वामहस्तस्तु तन्त्रिकाम् ॥ ८० ॥
यत्र सारणया हन्ति प्राहुस्तामर्धकर्तरीम् ।
इत्यर्धकर्तरी (५)
उत्सृष्टसारणां यत्र हन्ति तन्त्रीं प्रदेशिनी ॥ ८१ ॥
निष्कोटिताभिधं पाणिममुं वाद्यविदो विदुः ।

उजव्या हाताच्या अनामिकेने (म्हणजे तिसऱ्या बोटाने) ज्यात तारेवर आतल्या बाजूला आघात केला जातो (७७) आणि डाव्या हाताच्या मधल्या बोटाने बाहेरच्या बाजूला (आघात केला जातो), त्याला रेफ म्हटले आहे.

हा रेफ होय. (२)

अनामिकेने बाहेरील बाजूस तारेवर आघात करून उत्पन्न झालेला नाद जेव्हा (७८) तर्जनीने धारण केला जातो तेव्हा त्याला निःशंक (शार्ङ्गदेवाने) बिंदु म्हटले आहे.

हा बिंदु होय. (३)

दोन्ही हातांच्या चारी बोटांनी क्रमाने तारेवर (७९) बाहेरील बाजूला आघात करणे याला जाणकारांनी कर्तरी म्हटले आहे.

ही कर्तरी होय. (४)

ज्यात उजवा हात कर्तरी (प्रमाणे वादन) करीत असतो व डावा हात (८०) कम्रिकेने तारेवर आघात करतो त्यास अर्धकर्तरी म्हणतात.

ही अर्धकर्तरी होय. (५)

ज्यात कम्रिका टाकून देऊन, पहिल्या बोटाने तारेवर आघात केला जातो (८१) त्या हाताला निष्कोटित या नावाने वाद्यांचे जाणकार जाणतात.

इति निष्कोटितः (६)

उत्क्षिप्तया सारणया वामस्तन्त्रीं द्रुतं यदा ॥ ८२ ॥
निहन्ति कर्तरीतुल्यो दक्षिणः स्खलितस्तदा ।

इति स्खलितः (७)

तन्त्रीकर्षोऽङ्गुष्ठतर्जन्यग्राभ्यां शुकवक्त्रकः ॥ ८३ ॥

इति शुकवक्त्रकः (८)

उद्वेष्टपरिवर्ताभ्यां[१०] तन्त्र्या भ्राम्यति दक्षिणे ।
स्वरस्थाने द्रुतं कम्रासारणं मूर्च्छना मता ॥ ८४ ॥

इति मूर्च्छना (९)

तलेन दक्षिणो हस्तस्तन्त्रीं हन्तीतरः पुनः ।
प्रदेशिन्या स्पृशेद्यत्र तलहस्तो भवेदसौ ॥ ८५ ॥

इति तलहस्तः (१०)

हा निष्कोटित होय. (६)

उत्क्षिप्त सारणेने जेव्हा डावा हात तारेवर जलद (८२) आघात करतो व उजवा हात कर्तरीप्रमाणे (आघात करतो) तेव्हा (तो) स्खलित (म्हटला जातो).

हा स्खलित होय. (७)

अंगठा व पहिले बोट यांच्या टोकांनी तार खेचून (वाजविल्यास) (तो) शुकवक्त्रक (म्हटला आहे). (८३)

हा शुकवक्त्रक होय. (८)

उद्वेष्ट व परिवर्त यांनी, ज्यात, उजवा हात तारेच्या (डाव्या व उजव्या बाजूला) फिरत असता स्वराच्या जागी कम्रिकेने जलद सारणा केली जाते त्यास मूर्च्छना मानले आहे. (८४)

ही मूर्च्छना होय. (९)

ज्यात उजवा हात तळव्याने तारेवर आघात करतो व दुसरा (म्हणजे डावा हात) पहिल्या बोटाने तारेला स्पर्श करतो तो तलहस्त होय. (८५)

हा तलहस्त होय. (१०)

---

१०. ज्यात पहिल्या बोटापासून आरंभ करून क्रमाने सर्व बोटे बाहेर वळवली जातात व हात छातीपासून दूर गोलाकार फिरतो ते उद्वेष्टित होय. ज्यात करांगुळीपासून आरंभ करून सर्व बोटे क्रमाने बाहेर वळवली जातात ते परिवर्तित होय.

स्पर्शोऽङ्गुष्ठकनिष्ठाभ्यामर्धचन्द्रोऽभिधीयते ।
इति अर्धचन्द्रः (११)
चतुरङ्गुलिसंघाते कुञ्चिताङ्गुष्ठके तले ॥ ८६ ॥
कनिष्ठातर्जनीपार्श्वस्पर्शस्तन्त्र्याः प्रसारकः ।
इति प्रसारकः (१२)
करस्य किंचित्साङ्गुष्ठसकलाङ्गुलिकुञ्चने ॥ ८७ ॥
कनिष्ठाङ्गुष्ठसंस्पर्शस्तन्त्र्याः स्यात्कुहरः करः ।
इति कुहरः (१३)
इति त्रयोदशोभयहस्तव्यापाराः
एतद्धस्तसमायोगाद्वादनं वाद्यमुच्यते ॥ ८८ ॥
छन्दो धारा कैकुटी च कङ्कालं वस्तु च द्रुतम् ।
गजलीलं दण्डकं चोपरिवाद्यमतः परम् ॥ ८९ ॥
वाद्यं पक्षिरुतं चेति दशधा परिकीर्तितम् ।
खसितस्फुरितौ यत्र क्रियेते बहुधा करौ ॥ ९० ॥
तारं च स्पृश्यते स स्याच्छन्दो यतिमनोहरः ।

अंगठा व करंगळी यांनी (तारेला) स्पर्श केला असता तो अर्धचंद्र म्हटला आहे.
हा अर्धचंद्र होय. (११)

अंगठा वाकलेला व चार बोटे जुळलेली असा (एका) हाताचा तळवा असता (८६) (दुसऱ्या हाताची) करंगळी व तर्जनी यांच्या बाजूने तारेला स्पर्श करणे हा प्रसारक होय.
हा प्रसारक होय. (१२)

अंगठ्यासह हाताची सर्व बोटे थोडी आकुंचित करून (८७) (दुसऱ्या हाताची) करंगळी व अंगठा यांनी तारेला स्पर्श करणे हा कुहर हस्त होय. (८८–)
हा कुहर होय. (१३)
हे तेरा दोन्ही हातांचे वापर होत.
या हातांच्या मिश्रणाने होणारे वादन वाद्य म्हटले जाते. (८८)

छंद, धारा, कैकुटी, कंकाल, वस्तु, द्रुत, गजलील, दंडक व नंतर उपरिवाद्य, (८९) आणि पक्षिरुत असे दहा प्रकारचे वाद्य सांगितले आहे.

ज्यात खसित व स्फुरित हे हात वारंवार योजले जातात, (९०) आणि तारस्थानाला स्पर्श केला जातो ते यतींनी मनोहर (असणारे वादन) छंद होय.

इति च्छन्दः (१)

स्खलितो मूर्च्छना चाथ कर्तरीरेफसंयुतौ ॥ ९१ ॥
उल्लेखरेफौ यत्रास्तां धारां ब्रूते हरप्रियः ।

इति धारा (२)

शुकवक्त्रः स्फुरितको घोषः स्यादर्धकर्तरी ॥ ९२ ॥
क्रमादेते करा यत्र तामाहुः कैकुटीं बुधाः ।

इति कैकुटी (३)

स्फुरितैर्मूर्च्छनासंज्ञैः कर्तरीत्रितयेन च ॥ ९३ ॥
युक्तं करैः क्रमादेभिः कङ्कालं कथितं बुधैः ।

इति कङ्कालम् (४)

स्पष्टतारमुपेतं यत्कर्तर्या खसितेन च ॥ ९४ ॥
कुहरेणाथ तद्वाद्यं वस्तु वस्तुविदो विदुः ।

इति वस्तु (५)

कर्तरीखसितौ यत्र क्रमेण कुहरः करः ॥ ९५ ॥

हा छंद होय. (१)

जिच्यात स्खलित व मूर्च्छना (हे हात योजून) मग कर्तरी आणि रेफ यांनी युक्त असलेले (वादन केले जाते) व उल्लेख आणि रेफ हे (योजलेले) असतात तिला हरप्रिय (शार्ङ्गदेव) धारा म्हणतो.

ही धारा होय. (२)

शुकवक्त्र, स्फुरित, घोष आणि अर्धकर्तरी (९२) हे हात जिच्यात क्रमाने (योजलेले) असतात तिला जाणकार कैकुटी म्हणतात.

ही कैकुटी होय. (३)

स्फुरितांनी, मूर्च्छनानावाच्या (हातांनी) व तीन कर्तरींनी (९३) अशा या हातांनी क्रमाने युक्त असलेले (वादन) जाणकारांनी कंकाल म्हटले आहे.

हे कंकाल होय. (४)

जे कर्तरी व खसित आणि कुहर यांनी युक्त असून (ज्यात) तारस्थान स्पष्टपणे (योजलेले असते) ते वाद्य वस्तुजाणकार (म्हणजेच वाद्यतज्ज्ञ) वस्तु म्हणून जाणतात.

हे वस्तुवाद्य होय. (५)

ज्यात कर्तरी, खसित व कुहर हात क्रमाने (योजलेले असतात), (९४, ९५)

रेफभ्रमरघोषाश्च तद् द्रुतं ब्रुवते बुधाः ।
इति द्रुतम् (६)
बहुधा मूर्च्छना हस्ताः स्फुटिताः कर्तरी ततः ॥ ९६ ॥
खसितो यत्र तत्प्राहुर्गजलीलं कलाविदः ।
इति गजलीलम् (७)
स्खलितो मूर्च्छनाख्यश्च कर्तरीरेफसंयुतः ॥ ९७ ॥
खसितो यत्र वाद्यज्ञा दण्डकं तद्बभाषिरे ।
इति दण्डकम् (८)
ऊर्ध्वाधोगौ[११] क्रमाद्धस्तौ रेफकर्तरिकाह्वयौ ॥ ९८ ॥
निष्कोटिते तले हस्ते द्वावप्युपरिवाद्यके ।
इत्युपरिवाद्यकम् (९)
समस्तहस्तवाद्यं तु वाद्यं पक्षिरुतं मतम् ॥ ९९ ॥

व रेफ, भ्रमर आणि घोष (हे असतात) ते विद्वान द्रुत म्हणून म्हणतात.

हे द्रुत होय. (६)

ज्यात मूर्च्छना हात पुष्कळ व अनेक स्फुरित, मग कर्तरी (हे हात योजले जातात), (९६) (आणि) खसित (योजला जातो) ते (वादन) कलाजाणकार गजलील म्हणून म्हणतात.

हे गजलील होय. (७)

ज्यात स्खलित, कर्तरी व रेफ यांनी युक्त मूर्च्छना नावाचा (हात) (९७) (आणि) खसित हे (योजलेले असतात) त्याला वाद्यजाणकारांनी दंडक म्हटले आहे.

हे दंडक होय. (८)

रेफ व कर्तरी या नावाचे हस्त क्रमाने वर व खाली प्रचार असलेले (असे असतात) (९८) (व) निष्कोटित आणि तल या हातांतील दोन्हीही (योजलेले असतात) (अशी हातांची योजना) उपरिवाद्यकात (असते).

हे उपरिवाद्यक होय. (९)

सर्व हातांनी (मिळून) केलेले वादन पक्षिरुत हे वाद्य मानले आहे. (९९)

---

११. सुधाकर टीका – "उजवा हात वर प्रचार असणारा व डावा हात खाली प्रचार असणारा असतो. नंतर उजवा हात रेफ व डावा कर्तरी योजतो. मग उजवा निष्कोटित आणि डावा तलहस्त योजतो; ते उपरिवाद्य होय." पहा – संगीतसार द्वितीय वाद्याध्याय – (पृ. २१–२२) यातले उपरिवाद्याचे लक्षण :– 'तारेच्या वरच्या भागात रेफ व खालच्या भागात कर्तरी योजलेला असतो. आणि निस्कोटिक (निष्कोटित) व तलहस्त हे ज्यात असतात ते उपरिवाद्य जाणावे.'

इति पक्षिरुतम् (१०)
इति दशविधं वाद्यम् ।
सकलं निष्कलं चेति द्विविधं वाद्यमुच्यते ।
तन्त्रीसंलग्नजीवातः स्थूलो यत्र ध्वनिर्भवेत् ॥ १०० ॥
तदुक्तं सकलं वाद्यमपरे त्वन्यथा जगुः ।
आधोरिकां [१२] पत्रिकां चेत्तर्जनीस्पर्शवर्जितम् ॥ १०१ ॥
सार्यते कम्रिकावाद्यं तदाहुः सकलाभिधम् ।
अपनीय कलां कम्रामधो नैषाददेशतः ॥ १०२ ॥
न नयेत्तर्जनीस्पर्शं [१३] तन्त्र्याश्चेन्निष्कलं तदा ।
सूक्ष्मश्चात्र भवेन्नादः सारणामत्र केचन ॥ १०३ ॥

हे पक्षिरुत होय. (१०)
हे दहाप्रकारचे वाद्य होय.

सकल व निष्कल असे दोन प्रकारचे वाद्य सांगितले आहे. तारेला लागून असलेल्या जीवा (म्हणजे जवारी) मुळे जेव्हा आवाज स्थूल (म्हणजे मोठा) असा उत्पन्न होतो (१००) तेव्हा ते सकल वाद्य म्हटले आहे. दुसऱ्या (आचार्यांनी ते) वेगळ्या प्रकारे सांगितले आहे. तर्जनीचा (म्हणजे पहिल्या बोटाचा) स्पर्श न करता जर आधोरिका पत्रिका (योजली) (१०१) व कम्रिकेने सारणा केली तर ते सकल या नावाने ते (आचार्य) सांगतात. जर कला दूर करून, निषादाच्या स्थानापासून खाली कम्रा (१०२) तारेवर तर्जनीचा स्पर्श न करता नेली तर ते निष्कल होय. या (निष्कल वादनात) नाद सूक्ष्म असा (उत्पन्न) होतो. काहींनी यात सारणा (सांगितली आहे) (१०३) व

---

१२. 'आधोरिकां पत्रिकां' असा पाठ अडचार आवृत्तीत घेतलेला आहे. सिंहभूपालाने सकल वाद्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे दिले आहे – 'ज्यात आधोरिक व पत्रिका तर्जनीने स्पर्शिलेली नसते व कम्रिका सारली जाते ते वाद्य सकल होय.' 'आधोरिका' म्हणजे काय याचे स्पष्टीकरण त्याने दिलेले नाही. आनंदाश्रम आवृत्तीत (पृ. ४८९) 'आदोरिकं पत्रिकं' असा पाठ दिला आहे व तळटीपेत 'आदोरिकां पत्रिकां' हा पाठ निर्दिष्ट केला आहे. संगीत सारामृतात (पृ. १२०) 'आदोरिकं पत्रिकं' असाच पाठ मिळतो. 'दोरिका व पत्रिका' हे दोन्ही शब्द या वीणेच्या वर्णनात आलेले आहेत. आनंदाश्रम पाठानुसार भाषांतर पुढीलप्रमाणे होईल– 'दोरिके-पर्यंत व पत्रिके(पर्यंत), तर्जनीचा स्पर्श नसलेले, कम्रिकावाद्य सारले जाते ते सकल या नावाने सांगतात.'

१३. आनंदाश्रम आवृत्तीत (पृ. ४८९) तळटीपेत स्पर्शस्तन्त्र्यां असा पाठ दिला आहे. या पाठानुसार ही संपूर्ण ओळ – न नयेत्तर्जनीस्पर्शस्तन्त्र्याश्चेन्निष्कलं तदा ॥ अशी होईल. व या संपूर्ण श्लोकाचा आशय पुढीलप्रमाणे होईल – 'कला दूर करून, निषादस्थानाच्या खाली कम्रा नेऊ नये व तारेला तर्जनीने स्पर्श करावा, तेव्हा ते निष्कल होय.'

आमध्यमस्वरस्थानं सारणायां प्रपेदिरे ।
अवोचदिति निःशङ्कः शिष्याभ्यासाय वादनम् ॥ १०४ ॥
श्रुत्यादिक्रमतो गीतनिष्पत्तौ त्विदमादिशेत् ।
वक्ष्यामः स्वररन्ध्राणां यद्वंशेऽष्टादशाङ्गुले ॥ १०५ ॥
प्रथमे सप्तके स्थानं वीणायामपि तन्मतम् ।
स्वराणां किंतु वैणानामधराधरतारता ॥ १०६ ॥
मध्यमे सप्तके स्थानं ततः स्याद् द्विगुणान्तरम् ।
तृतीये सप्तके स्थानं ततोऽपि द्विगुणान्तरम् ॥ १०७ ॥
अङ्केत च स्वरस्थानान्यमूनि सुखबुद्धये ।
यथास्वं स्वरभेदानां विभागाच्छ्रुतिदेशधीः ॥ १०८ ॥
स्याद्ग्राममूर्च्छनादीनामुद्बोधः सुकरस्ततः ।
एषाऽपि[१४] जनकः प्रोक्ता घोषकश्चैकतन्त्रिका ॥ १०९ ॥

सारणेत मध्यम स्वराच्या जागेपर्यंत (सारणेचा वापर) स्वीकारला आहे. निःशंक (शार्ङ्गदेवाने) शिष्यांच्या अभ्यासासाठी असे हे वादन सांगितले आहे. (१०४)

श्रुती इत्यादी क्रमाने गीत निष्पन्न होण्यासाठी हे वादन सांगावे. जे स्थान पहिल्या सप्तकात अष्टादशांगुळ वंशात स्वररंध्रांच्या बाबतीत आम्ही पुढे सांगणार आहो, (१०५) ते (स्थान) वीणेमध्येही (पहिल्या सप्तकात) मानले आहे. पण (फरक एवढाच की) वीणेचे स्वर खाली खाली तार होत जातात. (१०६)

मध्यम सप्तकात स्वरांचे स्थान त्यापेक्षा दुप्पट अंतराचे व तिसऱ्या सप्तकात त्यापेक्षाही (म्हणजे मध्यम सप्तकापेक्षाही) दुप्पट अंतराचे असते. (१०७)

श्रुतींच्या जागा जाणणाऱ्याने, भिन्नभिन्न स्वरांच्या विभागानुसार ही स्वरांची स्थाने आपापल्या जागी, सुखाने ज्ञान होण्यासाठी, अंकित करावी. (१०८) त्यापासून ग्राम, मूर्च्छना इत्यादींचे ज्ञान सुलभ होईल. जनक व घोषक (या नावाने) ही ही एकतन्त्रिका म्हटली जाते. (१०९)

क० नकुल इत्यादी वीणांच्या लक्षणांचा अर्थ स्पष्ट आहे. त्यातली त्रितन्त्रिका ही लोकांमध्ये जंत्र म्हणून म्हटली जाते. मत्तकोकिला ही स्वरमंडल म्हणून म्हटली जाते. ही मत्तकोकिला सर्व वीणांत मुख्य म्हणजे मूळ होय; कारण ती मंद्र, मध्य व तार या तिन्ही स्थानांत उत्पन्न होणाऱ्या सात स्वरांनी संपन्न असते. मत्तकोकिलाखेरीजच्या बाकीच्या वीणा तिच्या विकृती होत.

---

१४. 'एषोऽपि जनकः प्रोक्ता घोषकश्चैकतन्त्रिका ।' असा पाठ अडचार आवृत्तीत घेतला आहे. सुधाकरटीकेत याचे स्पष्टीकरण 'हा वीणाजनक घोष एकतन्त्री असा म्हटला जातो.' असे दिले आहे. यावरून सुसंगत असा अर्थ निघत नाही. आनंदाश्रम आवृत्तीत (पृ. ४९०) 'एषा

तन्त्रीद्वयेन नकुलः स्यादन्वर्था त्रितन्त्रिका ।
तन्त्रीभिः सप्तभिश्चित्रा विपञ्ची नवभिर्मता ॥ ११० ॥
कोणाङ्गुलीवादनीया चित्रा तद्वद्विपञ्चिका ।
क्रमादन्येऽङ्गुलीकोणव्यवस्थामूचिरे[१५] तयोः ॥ १११ ॥
चित्रायामङ्गुलीमात्रं विपञ्च्यामुभयं परे ।
तन्त्रीणामेकविंशत्या कीर्तिता मत्तकोकिला ॥ ११२ ॥

दोन तारांनी युक्त (वीणा) नकुल होय. त्रितन्त्रिका (नावाप्रमाणेच) सार्थ होय (म्हणजे तीन तारांनी युक्त होय). सात तारांनी युक्त वीणा चित्रा आणि नऊ (तारांनी) युक्त विपंची मानली आहे. (११०)

चित्रा व त्याचप्रमाणे विपंची ही कोण व बोटे यांनी वाजवायची असते. दुसऱ्या (आचार्यांनी) बोटे व कोण यांनी त्यांच्या (वाजवण्याची) व्यवस्था क्रमाने सांगितली आहे. (म्हणजे चित्रा ही बोटांनी वाजवायची व विपंची कोणाने.) (१११) आणि इतर (काही आचार्यांनी) चित्रा (वीणेच्या वादनात) फक्त बोटांचा (उपयोग) व विपंचीच्या बाबतीत दोन्हींचा (म्हणजे बोटे व कोण यांचा सांगितला आहे). एकवीस तारांनी युक्त (वीणा) मत्तकोकिला म्हटली आहे. (११२).

(माती ही प्रकृति म्हणजे मूळ कारण होय. तिच्यापासून निर्माण केलेले घोडा, थाळा इत्यादी विकृती म्हणजे मूळकारणापासून, बदल होऊन झालेली स्वरूपे होत. तसेच मत्तकोकिला ही मूळ कारण स्वरूपाची प्रकृति होय व इतर वीणा तिच्या विकृती म्हणजे बदल असणारी स्वरूपे होत.)
(१०९–११३)

पिञ्जरकः(?) प्रोक्ता घोषकश्चैकतन्त्रिका । ' असा पाठ छापला असून, खाली तळटीपेत ' एषाऽपि जनकः ' व ' एषोऽपि जनकः ' हे पाठभेद दिलेले आहेत. संगीतसारामृतात (पृ १२१)– ' एषाऽपि जनकप्रोक्ता घोषकश्चैकतन्त्रिका ' असा पाठ घेतला आहे. त्याचे भाषांतर ' ही एकतन्त्रिकाही जनकाने सांगितली आहे; व (तीच) घोषक होय.'

विपंची व चित्रा या वीणा अंग (म्हणून मुख्य) व कच्छपी, घोषक इत्यादी प्रत्यंग (म्हणून दुय्यम) अशा नाट्यशास्त्रात दिलेल्या आहेत. (पहा– नाट्यशास्त्र, बडोदा आवृत्ती भाग ४ पृ. ४०६) घोषक याचे दुसरे नाव पिष्टनका असे अभिनवगुप्ताने दिले आहे. यावरून एकतन्त्री वीणेचे घोषक हे नाव निश्चित मिळते. आनंदाश्रम आवृत्तीत छापलेले पिंजरक हे नाव व अभिनवगुप्ताने दिलेले पिष्टनका हे नाव आणि पाठभेदामुळे आणखी एक मिळणारे जनक हे नाव यांच्या बाबतीत संदेह आहे.

१५. नाट्यशास्त्रात, (बडोदा आवृत्ति, भाग ४ पृ. १२४) ' विपंची ही कोणाने वाजवायची व चित्रा ही बोटांनी वाजवायची' असे सांगितले आहे.

मुख्येयं सर्ववीणानां त्रिस्थानैः सप्तभिः स्वरैः ।
संपन्नत्वात्तदन्यास्तु तस्याः प्रत्यङ्गमीरिताः ॥ ११३ ॥
करणैश्चित्रयन्त्यस्तास्तस्याः स्युरुपरञ्जिकाः ।
रूपं कृतप्रतिकृतं प्रतिभेदस्ततः परम् ॥ ११४ ॥
स्याद्रूपशेषमोघश्च प्रतिशुष्केति षड्विधम् ।
करणं तस्य वक्ष्यामि लक्ष्मोदाहरणैः समम् ॥ ११५ ॥
मुख्यवीणाप्रयुक्तस्य गुर्वादेर्भञ्जनेन यत् ।
युगपद्वादनं रूपं विपञ्च्यादिषु तद्यथा ॥ ११६ ॥
वाद्यते गुरु मुख्यायां यदा द्वे लघुनी तदा ।
विपञ्च्यादौ यदा त्वस्या लस्तदान्यासु द्वयम् ॥ ११७ ॥
इति रूपम् (१)
एतत्कृतप्रतिकृतं पश्चात्प्रत्यङ्गवादने[१६] ।
इति कृतप्रतिकृतम् (२)
रूपक्रियाविपर्यासात्प्रतिभेदो भवेद्यथा ॥ ११८ ॥

तिन्ही स्थानांतील साती स्वरांनी संपन्न असल्याने सर्व वीणांमध्ये ही मुख्य होय. तिच्याखेरीजच्या इतर (वीणा) तिचे प्रत्यंग म्हणून म्हटल्या आहेत. (११३)

करणांनी विविधता आणणाऱ्या त्या (इतर वीणा) तिचे (म्हणजे मत्तकोकिलेचे) रंजकत्व (वाढवण्यास) साहाय्यभूत होतात. रूप, कृतप्रतिकृत, प्रतिभेद, नंतर (११४) रूपशेष होय; (मग) ओघ आणि प्रतिशुष्का, असे सहा प्रकारचे करण (आहे.) त्याचे लक्षण उदाहरणांसह सांगतो. (११५)

मुख्य वीणेत योजलेल्या गुरु इत्यादींचा भंग करून जे त्याचवेळी विपंची इत्यादींत वादन (केले जाते) ते रूप होय. ते असे– (११६)

जेव्हा मुख्य वीणेत गुरु वाजत असतो त्याच वेळी विपंची इत्यादींत दोन लघू (वाजवले जातात); जेव्हा त्या (मुख्य वीणेत) लघु वाजत असतो त्याच वेळी इतर (वीणांत) दोन द्रुत (वाजवले जातात). (११७)

हे रूप होय. (१)

हे (रूपकरण) नंतर प्रत्यंगांमध्ये (म्हणजे मुख्यवीणेखेरीज इतर वीणांत) वाजवले असता (ते) कृतप्रतिकृत होय.

हे कृतप्रतिकृत होय. (२)

रूपात योजलेल्या वादनाच्या उलटप्रकारचे (वादन) प्रतिभेद होय. जसे– (११८)

---

१६. सु. टी. 'तेच रूप नंतर प्रत्यंग वीणांमध्ये सर्वही गुरु इत्यादीत वाजवले असता ते कृतप्रतिकृत होय.'

वाद्यते लघ्वयं तज्ज्ञैर्मत्तकोकिलया यदा ।
गुरुस्तदा विपञ्च्यादिवीणाभिरिति तद्विधिः ॥ ११९ ॥
इति प्रतिभेदः (३)
यदा विदारीविच्छेदं कुरुते मुख्यवैणिकः ।
तदान्यासां वादनं यद्रूपशेषं तदुच्यते ॥ १२० ॥
इति रूपशेषम् (४)
यदा विलम्बितलयं प्रयुङ्क्ते मुख्यवैणिकः ।
तदैवातिद्रुतलयं[१७] करचातुर्ययोगतः ॥ १२१ ॥
वैपञ्चिकाद्याः कुर्युश्चेदोघमाचक्षते तदा ।
इत्योघः (५)
अंशसंवाद्यन्यतरस्वरव्यञ्जिकया[१८] यदा ॥ १२२ ॥

जेव्हा मत्तकोकिला वीणेने तज्ज्ञांकडून दोन लघू (इ.) वाजवले जातात तेव्हा विपंची इत्यादी वीणांनी गुरु (इ.) वाजवला जातो. असा त्याचा (म्हणजे प्रतिभेदाचा) प्रयोग (होय). (११९)

हा प्रतिभेद होय. (३)

जेव्हा मुख्य वीणावादक विदारींचा (म्हणजे गीतभागांचा) विच्छेद करतो (म्हणजे वादन थांबवतो) तेव्हा जे इतर वीणांचे (चालू राहणारे) वादन ते रूपशेष म्हटले जाते. (१२०)

हे रूपशेष होय. (४)

जेव्हा मुख्य वीणावादक विलंबित लयीत वाजवतो तेव्हा त्याचवेळी विपंची इत्यादींचे वादक हस्तकौशल्याच्या योगाने अति द्रुत लयीत वाजवतात. जेव्हा असे (वादन केले जाते) तेव्हा त्यास ओघ म्हणतात.

हा ओघ होय. (५)

मुख्य व अमुख्य (म्हणजे प्रत्यंग) वीणांत अंश आणि (त्याचा) संवादी स्वर

---

१७. अडयार आवृत्तीत 'तथैव' ... असा पाठ घेतलेला आहे. तोच पाठ सुधाकर टीकेतही आहे. आनंदाश्रम आवृत्तीत (पृ. ४९१) 'तदैव' ... असा पाठ घेतलेला आहे या पाठाने मिळणारा अर्थ योग्य वाटतो.

१८. 'अंशसंवाद्यन्यतर' ... याचे स्पष्टीकरण सुधाकरटीकेत 'अंश व संवादी स्वर सोडून इतर' असे दिले आहे. संगीतसार (वाद्याध्याय पृ. २३) यात 'अंश स्वर व संवादी स्वर यांमधले (स्वर)' असे वर्णन या करणाच्या बाबतीत दिले आहे. नाट्यशास्त्रात (बडोदा, भा. ४ पृ. १२३) अभिनवगुप्ताने प्रतिभेदाचे स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की जेव्हा वैणिक दोन लघू वाजवतो तेव्हा (विपंचीवादक) एक गुरु वाजवतो व जेव्हा वैणिक दोन गुरू वाजवतो तेव्हा (विपंचीवादक) प्लुत व लघु वाजवतो. व पुढे म्हटले आहे की जेव्हा विपंचीवादक अंशसंवादी अशा एकाच तारेवर अल्पत्व इत्यादी प्रयुक्त करतो तेव्हा (प्रतिशुष्का) होय.

तन्त्र्यैकयैव करणं स्यान्मुख्यामुख्यवीणयोः।
प्रतिशुष्कां तदाचष्ट शार्ङ्गदेवो विदांवरः ॥ १२३ ॥
इति प्रतिशुष्का (६)

इति षट् करणानि ।

पुष्णन्ति वीणावाद्यं ये रक्तिं दधति चातुलाम् ।
कुर्वन्त्यदुष्टपुष्टिं च तान्धातूनधुना ब्रुवे ॥ १२४ ॥
ये प्रहारविशेषोत्थाः स्वरास्ते धातवो मताः ।
विस्तारकरणाविद्धव्यञ्जनाश्चेति धातवः ॥ १२५ ॥
चतुर्धा तेषु विस्तारश्चतुर्धा बोधितो बुधैः ।
विस्तारजश्च संघातजोऽथ स्यात्समवायजः ॥ १२६ ॥
अनुबन्धश्चेति चतुर्भेदः संघातजो भवेत् ।
द्विरुत्तरो द्विरधरोऽप्यधराद्युत्तरान्तकः ॥ १२७ ॥
उत्तराद्यधरान्तश्चेत्यष्टधा समवायजः ।
त्रिरुत्तरस्त्रिरधरोऽथ द्विरुत्तरपूर्वकः ॥ १२८ ॥
अधरान्तो द्विरधरोत्तरान्तश्चोत्तरादिकात् ।
परो द्विरधरोऽथ स्यादधरादिर्द्विरुत्तरः ॥ १२९ ॥

यांपैकी एक स्वर स्पष्ट करणाऱ्या एकाच तारेने वादन केले जाते तेव्हा त्यास जाणकारांत श्रेष्ठ शार्ङ्गदेवाने प्रतिशुष्का म्हटले आहे. (१२१–१२३).

ही प्रतिशुष्का होय. (६)

ही सहा करणे समाप्त.

जे वीणावादनाचा परिपोष करतात व अतुल रंजकता निर्माण करतात आणि दोषरहित (नादाची) पुष्टि करतात ते धातू आता (मी) सांगतो. (१२४)

विशिष्ट प्रहारांनी जे स्वर उत्पन्न होतात त्यांना धातू मानले आहे. विस्तार, करण, आविद्ध आणि व्यंजन असे धातू (१२५) चार प्रकारचे (आहेत). त्यांतला विस्तार धातु विद्वानांनी चार प्रकारचा जाणलेला आहे. विस्तारज, संघातज, समवायज (१२६) व अनुबंध (या चार प्रकारचा तो) होय. संघातज हा चार प्रकारचा असतो– द्विरुत्तर, द्विरधर, अधरादि-उत्तरांतक (१२७) व उत्तरादि-अधरांत (हे ते प्रकार होत). समवायज आठ प्रकारचा (असतो). त्रिरुत्तर, त्रिरधर, द्विरुत्तर-अधरांत, द्विरधर-उत्तरांत, उत्तरादि-द्विरधर, अधरादि-द्विरुत्तर, मध्योत्तर-द्विरधर, अधरमध्य-द्विरुत्तर (हे ते आठ प्रकार होत). अशा तऱ्हेने विस्तार (धातु) श्रीशार्ङ्गदेवाने चवदा प्रकारचा सांगितला आहे. (१२८, १२९, १३०).

मध्योत्तरद्विरधरोऽधरमध्यद्विरुत्तरः ।
एवं चतुर्दशविधो विस्तारः शार्ङ्गिणोदितः ॥ १३० ॥
करणस्य तु भेदाः स्यू रिभितोच्चयसंज्ञकौ ॥
तथा नीरटितो ह्रादोऽनुबन्ध इति पञ्च ते ॥ १३१ ॥
क्षेपः प्लुतोऽतिपातश्चातिकीर्णोऽप्यनुबन्धकः ।
इत्याविद्धे पञ्च भेदा दश तु व्यञ्जने मताः ॥ १३२ ॥
पुष्पं कलं तलं बिन्दू रेफोऽनुस्वनितं ततः ।
निष्कोटितमथोन्मृष्टमवमृष्टनिबन्धनौ ॥ १३३ ॥
इति सर्वे चतुस्त्रिंशन्मिलिता धातवो मताः ।
विस्तीर्णनादभेदत्वाद्विस्तारो धातुरुच्यते ॥ १३४ ॥
प्रहारलाघवात्कृत्वा स्वरानेकीकृतानिव ।
वैचित्र्यात्क्वापि विश्रान्तः स्वरो विस्तारजो भवेत् ॥ १३५ ॥

रिभित व उच्चय या नावांचे, तसेच नीरटित, ह्राद आणि अनुबंध असे ते पाँच भेद करण (धातूचे) होत. (१३१) क्षेप, प्लुत, अतिपात, अतिकीर्ण व अनुबंध हे आविद्ध (धातू) मधले पाच भेद (होत). व्यंजन (धातू) मध्ये दहा (भेद) मानले आहेत. (१३२)

पुष्प, कल, तल, बिंदु, रेफ, मग अनुस्वनित, निष्कोटित, आणि उन्मृष्ट, अवमृष्ट व निबंधन (हे ते दहा भेद होत). (१३३)

असे सर्व मिळून चौतीस धातू मानले आहेत. (१३४–)

नादाचा प्रकार विस्तारयुक्त असल्याने (तो) धातु विस्तार म्हटला जातो. (१३४)

(कौशल्याने केलेल्या) प्रहारांच्या शीघ्रतेमुळे स्वरांना एकत्र आणल्यासारखे करून, वैचित्र्यामुळे कोठेतरी थांबलेला स्वर विस्तारज (म्हणजे विस्तारधातूपासून उत्पन्न झालेला) होय. (१३५)

क० विस्तार धातूचे लक्षण सांगत आहे– 'विस्तीर्ण असा नादभेद' हा कर्मधारय समास होय. नादभेदाचे विस्तीर्णत्व म्हणजे हा अमका स्वर आहे असे वेगळेपणाने ज्ञान होणे. प्रहारलाघव म्हणजे वादनातले हस्तकौशल्य. एकाच स्वराचे वेगळे स्वरूप (यात) असल्याने एकविस्तार हे नाव (सार्थ) होय. या विस्तारजाचे केवळ स्वरस्वरूपच नाही तर विशिष्ट अशी वर्णरचना हेही स्वरूप आहे. असा हा एका प्रहारामुळे उत्पन्न होणारा विस्तारज होय. दोन प्रहारांनी उत्पन्न होणारा संघातज (आणि) तीन प्रहारांनी उत्पन्न होणारा समवायज होय. यथासंभव या भेदांच्या मिश्रणाने उत्पन्न होणारा अनुबंध हा धातु नावाप्रमाणे सार्थ होय असे जाणावे. (१३४–१३६)

एकविस्तारसंज्ञं तमपरे सूरयो जगुः ।
अलंकारत्वमप्यस्य निःशङ्को निरदीधरत् ॥ १३६ ॥

इति विस्तारजः

अत्रोत्तराधरौ ज्ञेयौ मन्द्रतारौ स्वरौ क्रमात् ।
उत्तराधरघातौ हि तयोर्निष्पादकाविह ॥ १३७ ॥
संघातजे ये चत्वारस्तथाष्टौ समवायजे ।
भेदास्तेऽन्वर्थनामानस्तल्लक्ष्मोक्तिरनर्थिका ॥ १३८ ॥
तथापि बालबोधाय तान्वयं विवृणीमहे ।
मन्द्रस्वरद्विरुच्चाराद्धातुरत्र द्विरुत्तरः ॥ १३९ ॥

इति द्विरुत्तरः (१)

तारस्थाने द्विराघाताद्धातुर्द्विरधरो भवेत् ।

इति द्विरधरः (२)

यस्त्वादितारो मन्द्रान्तः सोऽधराद्युत्तरान्तकः ॥ १४० ॥

दुसऱ्या (आचार्यांनी) त्याला एकविस्तार या नावाने म्हटले आहे. निःशंक (शार्ङ्गदेवाने) याचे अलंकार (म्हणूनही) स्वरूप निश्चित केले आहे. (१३६)

हा विस्तारज होय.

या बाबतीत (म्हणजे वीणेच्या बाबतीत) उत्तर (स्वर) व अधर (स्वर) हे क्रमाने मंद्र व तार (असे) जाणावे. येथे (तारेवर) वर व खाली केलेले प्रहार त्यांना उत्पन्न करणारे होत. (१३७)

संघातज धातूमधले जे चार तसेच समवायज धातूमधले आठ भेद (आहेत) ते नावाप्रमाणे सार्थ असल्याने त्यांचे लक्षण सांगणे निरर्थक (होय) (१३८)

तथापि अज्ञ लोकांना ज्ञान व्हावे यासाठी आम्ही त्यांचे विवरण देत आहो.

यात मंद्र स्वर दोनदा वाजल्याने (होणारा) धातु द्विरुत्तर होय. (१३९)

हा द्विरुत्तर होय. (१)

तार स्थानात दोन वेळा आघात केल्याने (उत्पन्न होणारा) धातु द्विरधर होय.

हा द्विरधर होय. (२)

ज्याचा आरंभ तार (स्वराने) व शेवट मंद्र (स्वराने) होतो तो अधरादि-उत्तरांतक (होय). (१४०)

वीणेमध्ये उत्तर (म्हणजे तारेच्या वरच्या भागांत उत्पन्न होणारा) स्वर मंद्र व अधर (म्हणजे तारेच्या खालच्या भागात उत्पन्न होणारा) स्वर तार होय. याने विपरीत स्वरूप दाखवले आहे. शरीरात अधर स्वर मंद्र व उत्तर स्वर तार असे जाणावे. याची उपपत्ति अशी की तारेवर

इत्यधराद्युत्तरान्तकः (३)
आदौ मन्द्रस्ततस्तार उत्तराद्यधरान्तके ।
इत्युत्तराद्यधरान्तकः (४)
एते संघातजे भेदा द्विःप्रहारभवे मताः ॥ १४१ ॥
इति संघातजस्य भेदचतुष्टयम् ।
मन्द्रस्वरत्रिराघाताद्धातुमाहुस्त्रिरुत्तरम् ।
इति त्रिरुत्तरः (१)
त्रिस्तारस्वरघातेन धातुस्त्रिरधरो भवेत् ॥ १४२ ॥
इति त्रिरधरः (२)
द्विरुत्तराधरान्तो द्विर्मन्द्रस्तारान्तगो भवेत् ।
इति द्विरुत्तराधरान्तः (३)
तारस्थानं द्विः प्रहृत्य विदध्यान्मन्द्रमन्ततः ॥ १४३ ॥
यदा तदा द्विरधरोत्तरान्तो धातुरुच्यते ।
इति द्विरधरोत्तरान्तः (४)

हा अधरादि-उत्तरांतक होय. (३)

आरंभी मंद्र व मग (शेवटी) तार (स्वर) उत्तरादि-अधरांतकात (असतात.)

हा उत्तरादि-अधरांतक होय. (४)

हे दोन वेळा प्रहार केल्याने उत्पन्न होणारे संघातज धातूमधील भेद मानले आहेत. (१४१)

मंद्र स्वराच्या (स्थानात तारेवर) तीनदा आघात केल्याने (उत्पन्न होणाऱ्या) धातूला त्रिरुत्तर म्हणतात.

हा त्रिरुत्तर होय. (१)

तार स्वराच्या (स्थानात) तीनदा आघात केल्याने त्रिरधर धातु होतो. (१४२)

हा त्रिरधर होय. (२)

दोनदा मंद्र व शेवटी तार स्वर असणारा (धातु) द्विरुत्तर-अधरांत होय.

हा द्विरुत्तर-अधरांत होय. (३)

तार स्थानात दोनदा प्रहार करून जेव्हा शेवटी मंद्र स्वर योजला जातो (१४३) तेव्हा तो द्विरधर-उत्तरांत धातु म्हटला जातो.

हा द्विरधर-उत्तरांत होय. (४)

वरच्या भागात केलेला आघात मंद्र स्वर निष्पन्न करतो व खालच्या भागात केलेला आघात तार स्वर उत्पन्न करतो. (१३७–१४१)

उत्तरादिद्विरधरे मन्द्रतारो[१९] द्विरिष्यते ॥ १४४ ॥
इत्युत्तरादिद्विरधरः (५)
सकृत्तारोऽथ मन्द्रो द्विरधरादिद्विरुत्तरे ।
इत्यधरादिद्विरुत्तरः (६)
मध्योत्तरद्विरधरे तारौ मध्यस्थमन्द्रकौ ॥ १४५ ॥
इति मध्योत्तरद्विरधरः (७)
मन्द्राद्यन्तो भवेत्तारोऽधरमध्यद्विरुत्तरे ।
इत्यधरमध्यद्विरुत्तरः (८)
त्रिप्रहारभवे भेदाः स्युरिमे समवायजे ॥ १४६ ॥
इत्यष्टौ समवायजभेदाः ।
सजातीयविजातीयभेदसंमिश्रणोद्भवः ।
अनुबन्धाभिधो धातुः शार्ङ्गदेवेन कीर्तितः ॥ १४७ ॥

उत्तरादि-द्विरधर धातूत (आरंभी) मंद्र व (शेवटी) दोनदा तार (स्वर) मानला आहे. (१४४)

हा उत्तरादि-द्विरधर होय. (५)

अधरादि-द्विरुत्तर धातूत एकवेळ तार व मग दोनदा मंद्र (योजलेला असतो).

हा अधरादि-द्विरुत्तर होय. (६)

मध्योत्तर-द्विरधरात मध्ये मंद्र स्वर असणारे असे दोन तार स्वर (योजलेले असतात. म्हणजे आरंभी तार, मध्ये मंद्र व शेवटी तार, असे स्वर असतात.) (१४५)

हा मध्योत्तरद्विरधर होय. (७)

अधरमध्यद्विरुत्तरात मंद्र आरंभी व शेवटी असणारा असा तार स्वर असतो; (म्हणजे आरंभी मंद्र, मध्ये तार व शेवटी मंद्र असे स्वर असतात).

हा अधरमध्यद्विरुत्तर होय. (८)

तीन प्रहारांमुळे उत्पन्न होणाऱ्या समवायज धातूमधले हे प्रकार होत. (१४६)

हे आठ समवायज भेद होत.

सजातीय व विजातीय भेदांच्या मिश्रणाने निर्माण होणारा धातु अनुबंध या नावाचा शार्ङ्गदेवाने सांगितला आहे. (१४७)

---

१९. अडचार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तींत 'मन्द्रतारो' असा पाठ आहे. 'मन्द्रस्तारो' असा पाठ असणे अधिक योग्य वाटते. कारण या धातुभेदाचे स्पष्टीकरण सुधाकर-टीकेत, 'मंद्र एकवार उच्चारून तार दोनवेळा उच्चारण्याने उत्तरादि-द्विरधर होतो' असे दिले आहे.

इत्यनुबन्धः (९)
इति चतुर्दश विस्तारजधातुभेदाः ।
लघुगुर्वात्मकैर्धातैः करणाविद्धयोः क्रियाः ।
करणोऽल्पगुरुस्तत्र तद्भेदाँल्लक्षयेऽधुना ॥ १४८ ॥
रिभितो द्वौ लघू गान्तौ,
इति रिभितः (१)
चतुर्लोऽन्तगुरुच्चयः ।
इत्युच्चयः (२)
षड्लोऽन्तगुर्नीरटितः,
इति नीरटितः (३)
ह्रादोऽष्टलघुरन्तगः ॥ १४९ ॥
इति ह्रादः (४)
करणस्यानुबन्धस्तु स्याद्विस्तारानुबन्धवत् ।
इत्यनुबन्धः (५)

हा अनुबंध होय. (९)
हे चौदा विस्तारज धातूचे भेद होत.

लघु व गुरु या स्वरूपाच्या प्रहारांनी करण व आविद्ध या धातूंचे प्रयोग (निष्पन्न होतात). त्यातला करण हा थोडे गुरू असणारा (होय). त्याच्या प्रकारांची आता लक्षणे देतो. (१४८) दोन लघू (व) शेवटी गुरु असणारा रिभित होय.

हा रिभित होय. (१)
चार लघू (व) शेवटी गुरु असणारा उच्चय होय.

हा उच्चय होय. (२)
सहा लघू (व) शेवटी गुरु असणारा नीरटित होय.

हा नीरटितं होय. (३)
आठ लघू (व) शेवटी गुरु असणारा ह्राद होय. (१४९)

हा ह्राद होय. (४)
विस्ताराच्या अनुबंधासारखा करणाचा अनुबंध असतो.

हा अनुबंध होय. (५)

क० यथासंभव रिभित इत्यादी भेदांच्या मिश्रणाने करणाचा अनुबंध निष्पन्न होतो. (१४८-१५०)

इति पञ्च करणधातुभेदाः ।
भूरिगुर्गुरुहीनो वाविद्धोऽस्य विवृतेर्भिदाः ॥ १५० ॥
क्षेपो लघुगुरुभ्यां[२०] स्यात्,
इति क्षेपः (१)
प्लुतो लघुगुरुर्भवेत् ।
इति प्लुतः (२)
अतिपातो लगाभ्यां द्विः,
इत्यतिपातः (३)
चतुर्वारं लगौ ततः ॥ १५१ ॥

हे पाच करण धातूचे भेद होत.

पुष्कळ गुरू असणारा किंवा गुरु नसणारा आविद्ध (हा धातु होय). त्याच्या प्रकटीकरणाचे प्रकार (पुढील होत). (१५०)

लघु व (दोन ?) गुरू यांनी क्षेप होतो.

हा क्षेप होय. (१)

लघु व गुरु असणारा प्लुत होय.

हा प्लुत होय. (२)

दोन वेळा लघु व गुरु योजण्याने अतिपात होतो.

हा अतिपात होय. (३)

चार वेळा लघु व गुरु आणि नंतर (१५१)

क० यथासंभव क्षेप इत्यादी भेदांच्या मिश्रणाने आविद्ध धातूचा अनुबंध उत्पन्न होतो. (१५१–१५२)

---

२०. सुधाकर टीकेत एक लघु व दोन गुरू यांनी क्षेप होतो असे स्पष्टीकरण दिले आहे. नाटयशास्त्रात (बडोदा आ० भाग ४ पृ. ९८; घोष संपादित आ० अध्याय २९, श्लोक ९४) आविद्ध धातु दोन, तीन, चार व नऊ अशा, क्रमाने केलेल्या प्रहारांनी होतो असे त्याच्या लक्षणात म्हटले आहे. यावरून क्षेप या प्रकारात दोन प्रहारांचा उपयोग असे. त्यामुळे एक लघु व एक गुरु अशी योजना त्यात होती असे मानता येते. प्लुताच्या लक्षणांत अड्यार व आनंदाश्रम आवृतींत एक लघु व एक गुरु दिलेला आहे. पण आनंदाश्रम आवृत्तीत (पृ. ४९५ वरील तळटीपेत) 'लगुरुलैः' हा पाठ दिला आहे. सुधाकरटीकेत या प्लुताचे स्पष्टीकरण देताना 'लघु, गुरु व लघु' यांनी तो होतो असे म्हटले आहे. हे स्पष्टीकरण आनंदाश्रम आवृत्तीतील तळटीपेत दिलेल्या पाठानुसार आहे. नाटयशास्त्राप्रमाणे प्लुतात तीन प्रहार होते. त्यानुसारही लघु, गुरु, लघु, अशी योजना प्लुतात जुळते.

लघुर्यत्रातिकीर्णोऽसौ,
इत्यतिकीर्णः (४)
अनुबन्धस्तु पूर्ववत् ।
इत्यनुबन्धः (५)
द्वाभ्यां त्रिभिश्चतुर्भिश्च नवभिर्लघुभिः क्रमात् । ॥ १५२ ॥
क्षेपादयोऽत्र चत्वारो भवन्तीत्यपरेऽब्रुवन् ।
इति पञ्चाविद्धधातुभेदाः ।
अङ्गुलीभेदमात्रेण व्यञ्जनस्तद्भिदा ब्रुवे ॥ १५३ ॥
अङ्गुष्ठाभ्यां कनीयस्या तन्त्रीरेका निहन्यते ।
युगपद्यत्र तत्पुष्पमभिलेषुः पुरातनाः ॥ १५४ ॥
इति पुष्पम् (१)
एकस्वरं यदा नानास्थानकं तन्त्रिकाद्वयम् ।
अङ्गुष्ठाभ्यामेककाले निहन्ति स्यात्कलं तदा ॥ १५५ ॥

लघु ज्यात (योजलेले असतात) तो अतिकीर्ण होय.
हा अतिकीर्ण होय. (४)
अनुबंध पूर्वीप्रमाणेच होय.
हा अनुबंध होय. (५)

दोन, तीन, चार आणि नऊ लघूंनी क्रमाने (१५२) क्षेप इत्यादी चार (प्रकार) होतात असे दुसऱ्या (आचार्यांनी) सांगितले आहे.

हे पाच आविद्ध धातूचे भेद होत.

केवळ बोटांच्या भिन्न (भिन्न योजनेमुळे) व्यंजन धातु (उत्पन्न होतो.) त्याचे प्रकार सांगतो. (१५३)

ज्यात दोन्ही आंगठे व करंगळी यांनी एका तारेवर एकाच वेळी प्रहार केला जातो त्याला प्राचीन (आचार्यांनी) पुष्प म्हणून इच्छिले आहे. (१५४)

हे पुष्प होय. (१)

जेव्हा नाना (म्हणजे वेगवेगळ्या) स्थानांतील एकच स्वर (बोलणाऱ्या) दोन तारांवर एकाच वेळी दोन्ही अंगठ्यांनी प्रहार करतात तेव्हा ते कल होय. (१५५)

क० व्यंजन धातूचे भेद सांगत आहे– व्यंजन धातूत प्रहारांच्या संख्येचा नियम तसेच लघु-गुरू या संबंधीचा नियम विवक्षित नसतो.

याचा अनुबंध यथासंभव पुष्प इत्यादी भेदांच्या मिश्रणाने उत्पन्न होतो.

या चार अनुबंधांच्या संबंधी, दुसऱ्या इत्यादी अनुबंधांच्या लक्षणात 'पूर्वीच्या प्रमाणे' असा अतिदेश सांगितला आहे. तेव्हा चारींचे एकच लक्षण दिसत असल्याने वेगवेगळी केलेली गणना

इति कलम् (२)

दक्षिणाङ्गुष्ठतो हन्ति वामाङ्गुष्ठनिपीडिताम् ।
तन्त्रीं यत्र तदाचष्ट तलं सोढलनन्दनः ॥ १५६ ॥

इति तलम् (३)

बिन्दुरेकत्र तन्त्र्यां स्यात्प्रहारो गुरुनादकृत् ।

इति बिन्दुः (४)

रेफस्त्वेकस्वरो घातः क्रमात्सर्वाङ्गुलीकृतः ॥ १५७ ॥

इति रेफः (५)

तलं कृत्वावरोहेण घातोऽनुस्वनितं मतम् ।

इत्यनुस्वनितम् (६)

वामाङ्गुष्ठेन तूर्ध्वाधोघातो निष्कोटितं मतम् ॥ १५८ ॥

इति निष्कोटितम् (७)

घातोऽतिमधुरध्वानस्तर्जन्योन्मृष्टमुच्यते ।

हे कल होय. (२)

ज्यात डाव्या अंगठ्याने दाबलेल्या तारेवर उजव्या अंगठ्याने (वादक) प्रहार करतो त्याला सोढलपुत्राने तल म्हटले आहे. (१५६)

हे तल होय. (३)

तारेवर एका जागी दीर्घ नाद उत्पन्न करणारा प्रहार बिंदु (धातु निष्पन्न करतो).

हा बिंदु होय. (४)

सर्व बोटांनी क्रमाने केलेला, एकच स्वर निर्माण करणारा, प्रहार रेफ होय. (१५७)

हा रेफ होय. (५)

तल योजून अवरोहाने केलेला प्रहार अनुस्वनित मानला आहे.

हे अनुस्वनित होय. (६)

डाव्या अंगठ्याने (तारेवर) वर व खाली केलेला प्रहार निष्कोटित (म्हणून) मानला आहे. (१५८)

हे निष्कोटित होय. (७)

अत्यंत गोड आवाज उत्पन्न करणारा असा तर्जनीने केलेला प्रहार उन्मृष्ट म्हटला आहे.

अयोग्य होय. असा आक्षेप घेऊन त्याचे समाधान ग्रंथकार करत आहे. त्या त्या धातूंच्या भेदांचा-वेगळेपणा असताना, 'पूर्वीप्रमाणे' या अतिदेशाचा विषय केवळ (त्या त्या धातूच्या भेदांचे) मिश्रण हा असल्याने चारींचे लक्षण वेगवेगळे (विसून येते). म्हणून वेगवेगळी गणना योग्य ठरते. (१५४–१६२)

इत्युन्मृष्टम् (८)

कनिष्ठया दक्षिणयाङ्गुष्ठाभ्यामप्यधः सरन् ॥ १५९ ॥
हन्ति त्रिस्थानकं तन्त्रीत्रयमेकस्वरं पृथक् ।
यत्रावमृष्टमाचष्ट तद्यज्ञपुरमण्डनः ॥ १६० ॥

इत्यवमृष्टम् (९)

उक्तानुबन्धवद्बोध्यमनुबन्धस्य लक्षणम् ।

इत्यनुबन्धः (१०)

नन्वेकलक्ष्मभेदोऽयं गण्यते किं पृथक् पृथक् ॥ १६१ ॥
मैवं तद्धातुभेदानां बाहुल्यं यत्र दृश्यते ।
विशिष्टो धातुना तेन सोऽनुबन्धो भिदां व्रजेत् ॥ १६२ ॥
इत्येते धातवः प्रोक्ताः सर्ववाद्योपयोगिनः ।
यथास्थानं प्रयोक्तव्यास्ते च वृत्तिसमाश्रयाः ॥ १६३ ॥

हे उन्मृष्ट होय. (८)

उजवी करंगळी व दोन अंगठे यांनी, खाली जात, (१५९) तीन तारांवर तिन्ही स्थानांतील एकच स्वर निर्माण करणारा वेगवेगळा प्रहार (वादक) करतो त्यास यज्ञपुराचे भूषण (असणाऱ्या शार्ङ्गदेवाने) अवमृष्ट म्हटले आहे. (१६०)

हे अवमृष्ट होय. (९)

(पूर्वीच्या धातूसंबंधी) सांगितलेल्या अनुबंधाप्रमाणे अनुबंधाचे लक्षण जाणावे.

हा अनुबंध होय. (१०)

पण (अनुबंध हा) एकच लक्षण असलेला प्रकार असता (त्याची) वेगवेगळी गणना का केली आहे ? (१६१) असे कोणी म्हणू नये. त्या (त्या) धातूच्या भेदांचा पुष्कळपणा ज्यात दिसून येतो, त्या धातूमुळे तो अनुबंध विशेष प्रकारचा (होतो). म्हणून तो भिन्नतेला (म्हणजे वेगळ्या प्रकारच्या स्वरूपाला) प्राप्त होतो. (१६२)

असे हे सर्व वाद्यांत उपयोगी पडणारे धातू सांगितले आहेत. वृत्तींचा आश्रय होणारे ते यथास्थान (म्हणजे त्या त्या योग्य ठिकाणी) योजावे. (१६३)

क० धातूंच्या लक्षणांचा उपसंहार करीत आहे.–

'सर्व वाद्यांत उपयोगी' यांतील 'सर्व' शब्दाचा अर्थ संकुचित करून तत वाद्यविषयकच जाणावा. कारण इतर वाद्यांत विशेष प्रकारच्या प्रहारांनी उत्पन्न होणारे सर्व स्वर संभवत नाहीत. पुढे सांगितल्या जाणाऱ्या चित्रा इ० वृत्ती होत. 'त्यांचा आश्रय होणारे' असा हा 'वृत्तिसमाश्रय' शब्द तत्पुरुष समास होय. ज्या रागात ज्या धातूने रंजकतेचा विशेष आविष्कार मिळतो तो त्याचे स्थान होय. त्याला अनुसरून धातूंची योजना करावी. (१६३–१६४)

तत्र जातिरुदात्ता स्याद्विस्तारे करणे घना ।
आविद्धधातौ रिभिता व्यञ्जने ललिता मता ॥ १६४ ॥
इति चतुस्त्रिंशद्धातवः ।
वृत्तिर्गुणप्रधानत्वरूपा व्यवहृतिर्मता ।
चित्रा वृत्तिर्दक्षिणा च तिस्रः स्युरिति वृत्तयः ॥ १६५ ॥
चित्रा वाद्यप्रधानत्वं गीतस्य गुणतोच्यते ।
उभयोः समभावेन वृत्तिर्वृत्तिरुदाहृता ॥ १६६ ॥
गीतप्रधानतावाद्यगुणता दक्षिणा मता ।
द्रुतादिकाँल्लयानामां नियच्छन्ति क्रमात्परे[२१] ॥ १६७ ॥

त्यामध्ये विस्तार धातूत उदात्त जाति, करणात घन जाति, आविद्ध धातूत रिभिता आणि व्यंजनात ललिता जाति मानली आहे (१६४)

हे चौतीस धातू होत.

गौण व मुख्य अशा स्वरूपाचा व्यवहार वृत्ति (म्हणून) मानला आहे. चित्रा, वृत्ति व दक्षिणा अशा तीन वृत्ती होत. (१६५)

वाद्य मुख्य व गीत गौण असलेली चित्रा म्हटली आहे. दोन्हींचे (म्हणजे वाद्य व गीत यांचे) समान स्वरूप असल्याने (ती) वृत्ति वृत्ति (म्हणून) म्हटली आहे. (१६६)

गीत मुख्य व वाद्य गौण असणारी दक्षिणा मानली आहे. दुसरे (आचार्य) यांच्या बाबतीत द्रुत इत्यादी (म्हणजे द्रुत, मध्य व विलंबित) लयी क्रमाने नियमित करतात. (१६७)

क० आता धातूंचा आश्रय म्हणून प्राप्त होणाऱ्या वृत्ती त्यांच्या सामान्य लक्षणासह सांगत आहे–

'गौण व मुख्य स्वरूपाचा व्यवहार' यात गौण व मुख्य हा व्यवहार गीत व वाद्य यांचा होय हे कळून येते. कारण प्रस्तुत चालू वाद्य एवढेच घेतल्यास एकाचे एकावेळी गौण व मुख्य स्वरूप संभवत नाही. म्हणून (गीत व वाद्य हे) दोन्ही घ्यायला हवेत. त्यात प्रस्तुत विषयाच्या साहचर्यामुळे गीत व नृत्त ही दोन्ही प्राप्त होत असली तरी त्या दोहोंमध्ये नृत्ताच्या पेक्षा वाद्याच्या बाबतीत गीताचेच अंतरंग स्वरूप असल्याने ते घेणे योग्य ठरते. म्हणून गीत व वाद्य यांचा व्यवहार असा अर्थ घ्यायचा.

---

२१. चित्रा इत्यादी तीन वृत्तींत यती इत्यादींचा क्रम असा– चित्रात समा यति, मागधी गीति, ओघ वादन, चित्र मार्ग व अनागत ग्रह; वृत्तीत स्रोतोगता यति, संभाविता गीति, अनुगत वादन, वार्तिक मार्ग व सम ग्रह; दक्षिणात गोपुच्छा यति, पृथुला गीति, तत्त्व वादन, दक्षिण मार्ग व अतीत ग्रह.

समां स्रोतोगतां तद्वद्गोपुच्छां च यतिं क्रमात् ।
मागधीं संभाविताख्यां गीतिं च पृथुलां क्रमात् ॥ १६८ ॥
ओघं चानुगतं तत्त्वं वाद्यान्येतान्यनुक्रमात् ।
मार्गं चित्रं वार्तिकाख्यं दक्षिणाख्यं यथाक्रमम् ॥ १६९ ॥
अनागतसमातीतान् ग्रहानिह च मन्वते ।
इति वृत्तित्रयम् ।
तत्त्वं भवेदनुगतमोघश्चेति निरूपितम् ॥ १७० ॥
गीतानुगं त्रिप्रकारं वाद्यं तल्लक्ष्म कथ्यते ।
लयं तालं विरामं च यतिं गीतिं तथाक्षरम् ॥ १७१ ॥
वर्णग्रामविभागं च नानाजात्यंशकादिकम् ।
व्यञ्जद्गीतगतं गीतमिलितं तत्त्वमुच्यते ॥ १७२ ॥
इति तत्त्वम्

क्रमाने समा, स्रोतोगता व गोपुच्छा या यती, क्रमाने मागधी, संभाविता आणि पृथुला या गीती, (१६८)

अनुक्रमे ओघ, अनुगत व तत्त्व ही वादने, क्रमाने चित्र, वार्तिक व दक्षिण नावाचा मार्ग (तसेच) (१६९) अनागत, सम व अतीत हे ग्रह यांत मानतात. (१७०–)

या तीन वृत्ती होत.

तत्त्व, अनुगत व ओघ असे गीताला अनुसरणारे तीन प्रकारचे वादन वर्णिलेले आहे. त्याचे लक्षण सांगतो. गीतातील लय, ताल, विराम, यति, गीति, तसेच अक्षरे, (१७०, १७१) वर्ण व ग्राम यांचा विभाग आणि नाना जातींचे अंश इत्यादि स्पष्ट करीत गीताशी मिसळून गेलेले वादन तत्त्व म्हटले आहे. (१७२)

हे तत्त्व होय.

चित्रा इत्यादींची विशेष लक्षणे स्पष्ट अर्थ असलेली आहेत. (दुसरे आचार्य) चित्रामध्ये द्रुत लय, वृत्तीत मध्य लय व दक्षिणामध्ये विलंबित लय अशा लयी क्रमाने नियमित करतात. या प्रमाणेच यती, गीती, वादन, मार्ग व ग्रह यांची क्रमाने योजना करावी (१६५ ते १६९–१७०)

क० अशा रीतीने वृत्तींचा प्रयोग सांगताना प्राप्त होणारे तत्त्व इ० वादन त्यांचे सामान्य लक्षण देऊन सांगत आहे–

यात गीतानुग (म्हणजे गीताला अनुसरणारे) हे तत्त्व इ० तिन्ही प्रकारच्या वादनांचे सामान्य लक्षण होय. त्या प्रत्येक वादनाची विशेष लक्षणे स्पष्ट आहेत. त्यात विराम शब्दाचा अर्थ अंत (म्ह० थांबणे) असा असल्याने लयीपासून त्याचा वेगळेपणा जाणावा. तसाच तो विरति या शब्दाच्या संबंधीही जाणावा. (१७०–१७७)

किंचिद्गीतानुहरणाद्वाद्यं त्वनुगतं मतम् ।
यथा विरतिरन्यत्र स्थितिः स्थानान्तरेष्वपि ॥ १७३ ॥
विलम्बिते गीतलये चैदग्ध्याद् द्रुतवादनम् ।
इत्यनुगतम्
गीतस्यान्तेऽनुकर्तापि भागशश्चातुरीवशात् ॥ १७४ ॥
निरन्तरैः पाणिघातैः समुदायानुकारितम् ।
वादको दर्शयेद्वाद्ये यत्रौघं तं प्रचक्षते ॥ १७५ ॥
इत्योघः
एकविंशतितन्त्रीस्थमेतद्धात्वादिवादनम् ।
एकतन्त्र्यादिवीणासु यथायोगं प्रवर्तयेत् ॥ १७६ ॥
एकतन्त्र्यां तु यत्प्रोक्तं तज्ज्ञेयं नकुलादिषु ।
वेणावपि तदिच्छन्ति वेणुप्रावीण्यशालिनः ॥ १७७ ॥
इति गीतानुगं वाद्यम् ।

गीताला किंचित (म्हणजे काही अंशी) अनुसरण्यामुळे (होणारे) वादन अनुगत मानले आहे. जसे अन्यत्र (म्ह. गीतात) विराम (योजतात) तसेच यातही (योजतात); स्थान बदलणेही तसेच असते; (१७३) पण गीताची लय विलंबित असता चातुर्याने द्रुतलयीत वादन केले जाते.

हे अनुगत होय.

गीताच्या शेवटी (त्याचे) अनुकरण करणारा (वादकही) भागशः, कौशल्यामुळे (१७४) सलग अशा हाताच्या प्रहारांनी (गीतभागांच्या) समुदायाचे अनुकरण ज्या वादनात दाखवितो त्याला ओघ म्हणतात. (१७५)

हा ओघ होय.

हे धातू इत्यादींचे वादन एकवीस तारांच्या वीणेतले होय. ते एकतन्त्री इत्यादी वीणांत यथासंभव योजावे. (१७६)

एकतन्त्रीत जे (वादन) सांगितले ते नकुल इत्यादींत जाणावे. वंशवादनात निष्णात असणारे (वादक) ते वंशातही इच्छितात. (१७७)

हे गीतानुसारी वादन होय.

भेदान्निर्गीतवाद्यस्य वैणस्याथ प्रचक्ष्महे ।
आश्रावणारम्भविधिर्वक्त्रपाणिस्ततः परम् ॥ १७८ ॥
संखोटना चतुर्थी च पञ्चमी परिघट्टना ।
मार्गासारितकं लीलाकृतमासारितत्रयम् ॥ १७९ ॥
दशेति शुष्कवाद्यानि तल्लक्ष्म व्याहरेऽधुना ।
विस्तारधातुभेदानामादिमं[२२] द्विः प्रयुज्यते ॥ १८० ॥
द्वितीयं च प्रयुज्य द्विराद्यं भेदं द्वितीयकम् ।
लीनाकृतिं द्विरुच्चार्य तद्वद्युग्मान्तराण्यपि ॥ १८१ ॥
प्राक्प्राग्युग्मोत्तरादीनि प्रयुञ्जीत तदा भवेत् ।
आश्रावणं शुष्कवाद्यमत्र त्वाह विशाखिलः ॥ १८२ ॥

वीणेसंबंधीच्या निर्गीत (म्हणजे गीतरहित) वादनाचे प्रकार आता सांगतो. आश्रावणा, आरंभविधि, वक्त्रपाणि नंतर (१७८) चवथी संखोटना, पाचवी परिघट्टना, मार्गासारितक, लीलाकृत (आणि) तीन आसारिते (१७९) अशी ही दहा शुष्क वादने (म्हणजे गीतविरहित योजलेली वीणावादने) होत. त्यांचे लक्षण आता सांगतो.

विस्तार धातूच्या प्रकारातील पहिला दोन वेळा योजला जातो. (१८०) नंतर दुसरा दोन वेळा योजून (मग) पहिला प्रकार, दुसरा प्रकार अंतर्भूत होणारा असा दोन वेळा वाजवून, त्याप्रमाणेच बाकीच्या जोड्याही (१८१) पूर्वपूर्व जोडी नंतरच्या प्रकाराने सुरवात होणारी अशी जेव्हा (वादक) योजतो तेव्हा आश्रावणा हे शुष्कवादन (म्हणजे गीतविरहित असे वीणावादन) होते. यात विशाखिल म्हणतो (१८२)

क० अशा रीतीने गीतानुसारी वादनाच्या संदर्भात मनात आरूढ झालेल्या संगीतवादन प्रकारांचे लक्षण देण्यासाठी सांगत आहे–

वीणेसंबंधीचे ते वैण होय. तीन आसारिते ज्येष्ठ, मध्यम व कनिष्ठ ही होत. निर्गीत वादनेच शुष्कवादने म्हणून म्हटली जातात. विस्तारधातूच्या चवदा भेदांतील पहिला म्हणजे विस्तारज नावाचा भेद दोन वेळा योजून, दुसरा द्विरुत्तर नावाचा दोन वेळा प्रयुक्त करून, मग पहिला विस्तारज भेद, दुसरा द्विरुत्तर अंतर्भूत असणारा असा दोन वेळा योजावा. नंतर त्याप्रमाणेच बाकीच्या जोड्याही पूर्वपूर्व जोडी नंतरच्या प्रकाराने सुरू होणारी याप्रकारे योजाव्या. याचा अर्थ असा– पहिला व दुसरा भेद ही पहिली जोडी. त्यानंतरचा तिसरा भेद द्विरुत्तर नावाचा. तो आरंभी ज्यांच्या आहे त्या जोडचा तशाप्रकारे सांगितल्या आहेत. तिसरा व चवथा भेद ही दुसरी

---

२२. 'आदिमं' असा पाठ अडचार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तींत मिळतो. 'प्रयुज्यते' या क्रियापदाच्या दृष्टीने 'आदिमो' असा पाठ असणे योग्य आहे. कल्लिनाथ व सिंहभूपाल या दोघांनीही 'आदिमं विस्तारजं नाम भेदं द्विः प्रयुज्य' असे आपल्या टीकेत म्हटले आहे. 'प्रयुज्य' असे पूर्वकालवाचक रूप असता 'आदिमं' हा पाठ योग्य ठरतो.

विस्तारधातुभेदानां प्रयोगे द्रुतरूपताम् ।
आद्यखण्डे यदाद्यौ द्वावेकादशचतुर्दशौ ॥ १८३ ॥
वर्णः पञ्चदशस्तद्वच्चतुर्विंशो गुरुर्भवेत् ।
लघवोऽष्टादशान्ये स्युरेवं खण्डे द्वितीयके ॥ १८४ ॥
तृतीये तु तृतीयो गोऽष्टमपञ्चदशौ तथा ।
शेषा द्वादश लाः खण्डैस्त्रिभिरेवं ध्रुवा भवेत् ॥ १८५ ॥
आश्रावणायां गेया सा सूरिभिः सिद्धिमीप्सुभिः ।
वक्ष्यामहे मुनिमतादस्यां पातकलाविधिम् ॥ १८६ ॥
द्वाविंशतिं कलाः केचित्केऽप्यष्टाविंशतिं कलाः ।
अन्ये द्वात्रिंशतं प्राहुस्तत्रैवं तालयोजना ॥ १८७ ॥

की विस्तारधातूच्या प्रकारांच्या प्रयोगात द्रुत स्वरूप असते.

पहिल्या खंडात पहिले दोन, अकरावा व चवदावा (१८३) (आणि) पंधरावा तसेच चोविसावा वर्ण गुरु असतो. बाकीचे अठरा लघू असतात. याप्रमाणेच दुसऱ्या खंडात (वर्णांचे स्वरूप) असते. (१८४). तिसऱ्या (खंडात) तिसरा तसेच आठवा व पंधरावा (वर्ण) गुरु असून बाकीचे बारा लघू असतात. अशी या तीन खंडांनी ध्रुवा होते. (१८५)

ती सिद्धि इच्छिणाऱ्या विद्वानांनी आश्रावणेत गावी. (भरत) मुनींच्या मताप्रमाणे हिच्यात पातकलांची योजना सांगतो. (१८६) काही (आचार्य हिच्यात) बावीस कला तर काही अठ्ठावीस कला आणि दुसरे (काही) बत्तीस कला सांगतात. त्यात तालयोजना अशी– (१८७) यात अनागत ग्रहात तीन शम्या, मग तीन ताल, नंतर सम ग्रहात

जोडी. याप्रमाणेच पाचवा व सहावा भेद ही तिसरी जोडी. सातवा व आठवा ही चवथी जोडी. अशा रीतीने सात जोड्या योजल्या असता आश्रावणा नावाचा शुष्कवावनाचा प्रकार होतो. विशाखिल आचार्याने द्रुतरूपता म्हणजे द्रुतलयीने युक्त स्वरूप सांगितले आहे. (१७८ ते १८३)

आश्रावणेतील ध्रुवाचे लक्षण देत आहे–

पहिले दोन म्हणजे पहिला व दुसरा. चौवीस वर्णांच्या पहिल्या खंडात पहिला, दुसरा, अकरावा, चौदावा, पंधरावा व चौविसावा हे सहा गुरु असून बाकीचे अठरा लघू असतात. दुसऱ्या खंडाची वर्णसंख्या व गुरुलघूंची योजना पहिल्या खंडाप्रमाणेच करावी. तिसऱ्या खंडात तिसरा वर्ण गुरु योजावा. तसेच आठवा व पंधरावा हेही गुरु योजावे. राहिलेले बारा लघू योजावे. यावरून या खंडाचे स्वरूप पंधरा वर्णांचे दाखवले आहे.

सिद्धि इच्छिणाऱ्यांनी म्हणजे दृष्ट व अदृष्ट फलाची इच्छा करणाऱ्यांनी. (१८३ ते १८५, १८६–)

शम्यात्रयं ततस्तालाख्रयोऽत्रानागतग्रहे ।
ततः समग्रहे शम्याद्वयं तालद्वयं तथा ॥ १८८ ॥
ततोऽतीतग्रहे शम्यातालौ द्वादश ताः कलाः ।
यथाक्षरस्योत्तरस्य षट् चतस्रस्तु युग्मजाः ॥ १८९ ॥
कला द्वाविंशतावेवम्, अथाष्टाविंशतौ विधिः ।
द्वादशात्र कलाः प्राग्वद् द्विकलोत्तरवत्ततः ॥ १९० ॥
कला द्वादश शेषास्तु स्युरेककलयुग्मवत् ।
अथ द्वाविंशतिः[२३] प्राच्याः स्युश्चतुर्विंशतिः कलाः ॥ १९१ ॥

दोन शम्या तसेच दोन ताल, (१८८) नंतर अतीत ग्रहात शम्या व ताल (अशा) ल्या बारा कला (योजून) यथाक्षर उत्तराच्या सहा व युग्माच्या चार (१८९) कला (योजाव्या). बावीस कलांमध्ये अशी (योजना करावी).

आता अठ्ठावीस कलांसंबंधी योजना–

(यात) पूर्वीप्रमाणे बारा कला, नंतर द्विकल उत्तर तालाप्रमाणे (१९०) बारा कला व बाकीच्या (चार) एककल युग्माप्रमाणे होत.

आता बत्तीस कला (या संबंधीची योजना अशी–)

(यात) अगोदरच्या चौवीस कला (१९१) दुसऱ्या पक्षाप्रमाणे (म्हणजे अठ्ठावीस कला मानणाऱ्या मताप्रमाणे) होत; व शेवटी आठ द्विकल युग्माप्रमाणे होत.

या आश्रावणेतील पातकलांची योजना सांगत आहे–

बावीस कला मानणाऱ्या मतानुसार–पहिल्या तीन कलांत तीन शम्या योजाव्या. मग चवथी इत्यादी तिन्हींत (म्हणजे चवथी, पाचवी व सहावीत) तीन ताल योजावे. अनागत ग्रहात म्हणजे गीत इत्यादी थोडे आरंभी तालरहित सुरू करून नंतर या सहा कला योजाव्या. मग सातवी इत्यादी चार कलांत (म्हणजे सातवी, आठवी, नववी व दहावीत) दोन शम्या व दोन ताल समग्रहात म्हणजे गीतसमकालात योजावे. नंतर अतीतग्रहात म्हणजे गीत सुरू होणाच्या आधी तालाचा थोडा आरंभ झाला असता अकरावी व बारावी या कलांत शम्या व ताल योजावे. याप्रमाणे बारा कला प्रयुक्त करून तेरावी इत्यादी राहिलेल्या दहा कलांतील पहिल्या सहांत संताशताशता योजावे. एकोणिसाव्या इत्यादी शेवटच्या चार कलांत संशताश योजावे. याप्रमाणे बावीस कलांत पातकलांची योजना करावी. (१८६–१८९)

अठ्ठावीस कलांतील पातकला योजना–

बारा कला पूर्वीप्रमाणे म्हणजे बावीसकलांतल्याप्रमाणे; पहिल्या बारा कलांत शम्या इ० पूर्वी सांगितलेल्या बारा पातकला योजाव्या. तेरावीपासूनच्या पुढच्या बारा कला द्विकल उत्तर तालाप्रमाणे निप्रता शनिता निशता प्रनिस या पातकलांनी योजाव्या. पंचवीसापासूनच्या चार एककल युग्माप्रमाणे संशताश यांनी योजाव्या (१९०–१९१).

---

२३. बावीस व अठ्ठावीस कला मानणारी मते सांगितल्यावर बत्तीस कला मानणारे मत ग्रंथकार सांगत आहे. तेव्हा ' द्वाविंशतिः ' (म्हणजे बावीस) हा पाठ निरर्थक ठरतो. आनंदाश्रम

द्वितीयपक्षवत्प्रान्ते त्वष्टौ द्विकलयुग्मवत् ।
एषु त्रिष्वपि पक्षेषूत्तरश्चच्चत्पुटस्तथा ॥ १९२ ॥
अतीतेन ग्रहेण स्याद्विदारीरथ कीर्तयेत् ।
शम्यात्रयेण प्रथमा परा तालत्रयेण तु ॥ १९३ ॥
शम्याद्वया तृतीया स्यात्तुर्या तालद्वयेन तु ।
पञ्चमी शम्यातालाभ्यां षष्ठी स्यात्पञ्चपाणिना ॥ १९४ ॥
चच्चत्पुटा सप्तमी स्यात्तास्तिस्रो मन्वते परे ।
यथाक्षरस्य युग्मस्य द्विरावृत्त्या विदारिका ॥ १९५ ॥
आद्या तथा द्वितीया स्यात्तयोरन्ते कलाद्वयम् ।
एवमष्टादश कलास्ततो युग्माद्यथाक्षरात् ॥ १९६ ॥
विदारी स्यात्तृतीयान्ये विदारीरन्यथा जगुः ।
आद्या द्विकलयुग्मेन द्वितीया च तथा भवेत् ॥ १९७ ॥

या तिन्ही मतांत उत्तर तसेच चच्चत्पुट ताल (१९२) अतीत ग्रहाने योजावा. आता विदारी (म्हणजे वादनाचे भाग) (पुढीलप्रमाणे) सांगाव्या.

पहिली तीन शम्यांनी व दुसरी तीन तालांनी, (१९३) (मग) तिसरी दोन शम्यांनी (आणि) चवथी दोन तालांनी योजावी. पाचवी शम्या व ताल यांनी आणि सहावी पंचपाणि ताल ने (१९४) (तसेच) सातवी चच्चत्पुट ताल असलेली होय. दुसरे (आचार्य) तीन (विदारी) मानतात. पहिली तसेच दुसरी विदारी यथाक्षर युग्माच्या दोन वेळा होणाऱ्या आवृत्तीने असते. त्यांच्या शेवटी दोन कला (असतात). अशा अठरा कला होत. मग यथाक्षर युग्माने तिसरी विदारी (योजलेली) असते. इतर (आचार्यांनी) दुसऱ्या तऱ्हेने विदारी सांगितल्या आहेत. पहिली द्विकल युग्माने व दुसरीही तशीच (म्हणजे द्विकल युग्माने) असते. (१९५, १९६, १९७) यथाक्षर उत्तर ताल ने तिसरी (योजलेली असते.)

बत्तीस कला मानणाऱ्या मतानुसार पातकला योजना–

पहिल्या चौवीस कला, अठ्ठावीस कलांतल्याप्रमाणे. पंचवीसापासूनच्या शेवटच्या आठ द्विकलयुग्माप्रमाणे निशनिताशप्रनिसा यांनी योजाव्या. विदारी म्हणजे गीतखंड असे पूर्वी सांगितले आहे. येथे वादनखंड असे जाणावे. (१९१–१९९).

व अडघार आवृत्तींत तो दिला आहे. पण ' द्वात्रिंशति ' असा पाठ असणेच योग्य ठरते. त्याचा अर्थ ' बत्तीस कला या पक्षी ' असा होतो.

यथाक्षरेणोत्तरेण तृतीयान्येऽन्यथा जगुः ।
पूर्वोक्ता द्वादश कला विदार्याद्या परा पुनः ॥ १९८ ॥
यथाक्षरेणोत्तरेण शेषा युग्माद्यथाक्षरात् ।
एवमाश्रावणामाह श्रीमान्यज्ञपुराग्रणीः ॥ १९९ ॥

इत्याश्रावणा

स्युरारोहावरोहाभ्यां युक्ता विस्तारधातुजाः ।
भेदास्तलेन रिभितह्रादाभ्यां मिश्रिताः क्रमात् ॥ २०० ॥
ततः करणभेदं द्विस्त्रिर्वाभ्यस्य विलीनवत् ।
बहुलेन प्रयुक्ते चैकविस्तारे पुनस्तथा ॥ २०१ ॥
द्विरभ्यस्येदेवमेव करणस्य भिदाः पराः ।
यत्रारम्भविधिः स स्यात् ; अथ तस्य ध्रुवां ब्रुवे ॥ २०२ ॥

दुसऱ्या (काही आचार्यांनी) वेगवेगळ्या प्रकारे (त्या) सांगितल्या आहेत. पूर्वी सांगितलेल्या बारा कला असणारी पहिली विदारी, मग दुसरी (१९८) यथाक्षर उत्तराने आणि राहिलेली (म्हणजे तिसरी) यथाक्षर युग्माने (योजलेली) असते. श्रीमान यज्ञपुरश्रेष्ठ (शार्ङ्गदेव) आश्रावणा अशाप्रकारे सांगतो. (१९९)

(आरंभविधीत) आरोह व अवरोह यांनी युक्त असणारे विस्तारधातूचे भेद (योजलेले) असतात व ते तल, रिभित आणि ह्राद यांनी क्रमाने मिश्रित असतात. (२००)

नंतर करण धातूचा एक प्रकार दोन वेळा किंवा तीन वेळा आवृत्त करून, विलीन झाल्याप्रमाणे पुष्कळपणे योजलेला एकविस्तार नावाचा विस्तारधातूचा भेद पुन्हा प्रयुक्त केल्यावर (२०१) त्याप्रमाणे करण धातूचे दुसरे भेद दोन वेळा अशाच प्रकारे आवृत्त करावे. (अशी योजना) ज्यात असते तो आरंभविधि होय. आता त्याची ध्रुवा सांगतो, (२०२) आठ गुरू, बारा लघू व (मग) पाच गुरू असा पंचवीस अक्षरांचा पहिला खंड

क० आता आरंभविधि दाखवीत आहे– विस्तारधातूचे विस्तारज इत्यादी चौदा भेद आरोह व अवरोह यांनी युक्त असे योजावे. ते तल या व्यंजन धातूच्या भेदाने व रिभित आणि ह्राद या करण धातूच्या भेदांनी क्रमाने मिश्रित असावे. म्हणजे प्रथम तलाने, मग रिभिताने आणि नंतर ह्रादाने मिश्रित असणारे असे ते विस्तारधातूचे भेद प्रत्येकी आरोह व अवरोह यांनी युक्त असणारे असे योजावे. मग करण धातूच्या रिभित इत्यादी पाच भेदांतील एक भेद दोन किंवा तीन वेळा योजून, 'विलीन झाल्याप्रमाणे पुष्कळ पणाने' म्हणजे स्वरांचे ऐक्य पुष्कळ असणाऱ्या प्रयोगाने एकविस्तार हे दुसरे नाव असणाऱ्या विस्तारज या विस्तार धातूच्या भेदाचा पुन्हा प्रयोग केल्यावर, बाकीचे करण धातूचे भेद म्हणजे प्रथम योजलेल्या भेदांखेरीजचे इतर भेद अशाच रीतीने म्हणजे एकविस्ताराने युक्त असे दोन वेळा योजावे. अशी योजना ज्या वादनप्रकारात असते तो आरंभविधि होय. (२००–२०२)

गुरवोऽष्टौ द्वादशाथ लघवः पञ्च गा इति ।
पञ्चविंशत्यक्षरं स्यादाद्यखण्डं ततः परम् ॥ २०३ ॥
लघवोऽष्टौ गुरुर्लाश्च चत्वारो गश्चतुर्लघुः ।
गश्चेत्येकोनविंशत्या वर्णैः खण्डं द्वितीयकम् ॥ २०४ ॥
यस्यास्तृतीयखण्डेऽष्टौ ला गोऽन्ते स्याद् ध्रुवात्र सा ।
एकविंशे गुरौ कार्या विश्रान्तिः पूर्वखण्डके ॥ २०५ ॥
द्वितीयखण्डे विश्राम्येद् गुरौ वर्णे चतुर्दशे ।
स्याद् द्वादशकलं खण्डमाद्यमन्यत्तु षट्कलम् ॥ २०६ ॥
चतुष्कलं तृतीयं स्यादथ तालोऽत्र कथ्यते ।
तालत्रयं च शम्यैका तालौ द्वौ शम्ययोर्द्वयम् ॥ २०७ ॥
द्वौ तालौ संनिपातौ द्वावित्याद्ये शकले कलाः ।
यथाक्षरस्योत्तरस्य क्रमाच्चचत्पुटस्य च ॥ २०८ ॥
कला भवन्ति शकले द्वितीये च तृतीयके ।

इत्यारम्भविधिः

असतो. नंतर (२०३) आठ लघू, गुरु, चार लघू, गुरु, चार लघू आणि गुरु अशा एकोणीस अक्षरांनी दुसरा खंड (होतो). (२०४)

जिच्या तिसऱ्या खंडात आठ लघू व शेवटी गुरु असतो अशी ती यातील ध्रुवा होय. पहिल्या खंडात एकविसाव्या गुरूवर विराम योजावा. (२०५)

दुसऱ्या खंडात चौदाव्या गुरु अक्षरावर थांबावे. पहिला खंड बारा कलांचा व दुसरा सहा कलांचा असतो. (२०६) तिसरा चार कलांचा असतो. आता यातील ताल सांगतो. तीन ताल, एक शम्या, दोन ताल, दोन शम्या (२०७) दोन ताल व दोन संनिपात अशा पहिल्या खंडातील कला (होत). यथाक्षर उत्तर व चच्चत्पुट यांच्या (२०८) कला दुसऱ्या व तिसऱ्या खंडांत क्रमाने असतात. (२०९–)

हा आरंभविधि होय.

त्या आरंभविधीची ध्रुवा सांगत आहे–

पहिला खंड पंचवीस अक्षरांचा आणि बारा कलांचा असतो. एकोणीस अक्षरांचा व सहा कलांचा दुसरा खंड असतो. तिसरा खंड नऊ अक्षरांचा व चार कलांचा असतो. यात लघु व गुरु या स्वरूपाची अक्षरे, पाच लघू अक्षरांच्या उच्चारणाचे प्रमाण असणाऱ्या कलांत लयीसहित योजावी. (२०३ ते २०८, २०९–)

बहुलाविद्धकरणः स्तोकव्यञ्जनधातुकः ॥ २०९ ॥
विस्तारधातुना हीनो वक्त्रपाणिः प्रकीर्तितः ।
मुखप्रतिमुखे स्यातां तालाङ्गे द्वे च नाथवा ॥ २१० ॥
प्रवृत्तं चैककं वर्णाङ्गमत्राथ ध्रुवाम् ।
गुरवः पञ्च लाः षट् च गुरवः षड् लघुद्वयम् ॥ २११ ॥
चत्वारो गास्तथा लाः स्युस्त्रयो गा लघवोऽष्ट च ।
यत्र स्याद् गुरुरन्ते सा वक्त्रपाणौ ध्रुवा भवेत् ॥ २१२ ॥
या मात्रा वस्तुनोऽन्त्या स्याद् द्विकले मद्रके स्थिता ।
तस्यास्तालोऽत्र कर्तव्यः कलास्वष्टासु [२४] तन्मुखम् ॥ २१३ ॥
अथ प्रतिमुखं कार्यं चतुरावृत्तियोगिना ।
उत्तरेणापरेत्याहुः पूर्वोक्तो यः कलाष्टकः ॥ २१४ ॥

आविद्ध व करण धातू पुष्कळ असलेला, व्यंजन धातु थोडा असलेला (२०९) आणि विस्तार धातु नसलेला असा वक्त्रपाणि (हा प्रकार) सांगितला आहे. (यात) मुख व प्रतिमुख ही दोन तालाची अंगे असतात किंवा ती (योजलेली) नसतात. (२१०)

यात प्रवृत्त वा एकक हे वर्णाचे अंग (असते). आता ध्रुवा सांगतो. पाच गुरू, सहा लघू, सहा गुरू, दोन लघू, (२००) चार गुरू तसेच (म्हणजे चार) लघू, तीन गुरू, आठ लघू, असे जिच्यात असतात व शेवटी गुरु असतो ती वक्त्रपाणीतील ध्रुवा होय. (२१२)

द्विकल मद्रकात असलेली जी वस्तूची शेवटची मात्रा तिचा ताल हिच्यात योजावा. या (वक्त्रपाणीतील) मुख हे (तालांग) आठ कलांत (२१३) आणि प्रतिमुख (हे तालांग) चार आवृत्तींनी युक्त असणाऱ्या उत्तर तालात योजावे असे दुसरे (आचार्य) सांगतात. या (प्रतिमुखात), पूर्वी सांगितलेल्या ज्या आठ कला (२१४) त्यांच्या तीन आवृत्तींनी (तालयोजना) करावी.

क० आता वक्त्रपाणीचे लक्षण देत आहे–

या वक्त्रपाणीत मुख व प्रतिमुख ही तालांगे विकल्पाने असतात. प्रवृत्त आणि एकक यांतील एक वर्णांग असते. ध्रुवामध्ये, चोवीस कलांच्या, द्विकल मंद्रकातील वस्तूच्या, शेवटी असणारी जी आठ कलांची मात्रा तिचा ताल योजावा. तो शताताश (ताश) तासं हा होय. वक्त्रपाणीतील ध्रुवामध्ये तो पहिल्या अठरा (?) कलांमध्ये योजावा. ते मुख नावाचे तालांग होय. दुसऱ्या मतानुसार प्रतिमुख सांगत आहे. चार आवृत्तींनी युक्त असणाऱ्या उत्तर म्हणजे षट्पितापुत्रक या तालाने ते योजावे असे दुस-या आचार्यांचे मत प्रथम दिले आहे. नंतर स्वतःच्या मतानुसार

---

२४. कल्लिनाथाच्या टीकेत 'अष्टादशसु' (अठरा कलांत) असा शब्द अडचार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तींत मिळतो. त्याऐवजी तो शब्द 'अष्टासु' असाच असणे योग्य आहे.

सोऽत्र कार्यस्त्रिरावृत्तो मात्रया तु विदारिका ।
इति वक्त्रपाणिः
अङ्गुष्ठाभ्यां च तर्जन्या तन्त्रीं निष्पीड्य वादयन् ॥ २१५ ॥
बिन्दुं मिथो मेलयेत वादिसंवादिनौ स्वरौ ।
बहुधा तद्गुणत्वेन प्रयुञ्जीतानुवादिनः ॥ २१६ ॥
विवादिनोऽल्पकान्कुर्याद्विस्तारस्य भिदास्तथा ।
धात्वन्तरैर्मिश्रयित्वाभ्यसेद् द्विस्त्रिः पृथक्कृतः ॥ २१७ ॥
केवलास्ताः प्रयुज्य द्विस्तासु मग्नानिवापरान् ।
धातून्यत्र प्रयुञ्जीत प्राहुः संखोटनाममूम् ॥ २१८ ॥

विदारिका मात्रेने (योजावी). (२१५–)

हा वक्त्रपाणि होय.

दोन आंगठे व तर्जनी यांनी तार दाबून बिंदु धातु वाजवीत, वादी व संवादी स्वर एकमेकांशी मिळवावे. त्यांना अंगभूत असे अनुवादी स्वर पुष्कळ प्रकारे योजावे. (२१५, २१६)

विवादी स्वर अल्प योजावे. तसेच विस्ताराचे भेद दुसऱ्या धातूंशी मिसळवून वेगवेगळे दोन किंवा तीन वेळा आवृत्त करावे. नंतर (२१७) ते (विस्ताराचे भेद) केवळ (म्हणजे दुसऱ्या धातूबरोबर न मिसळता) दोन वेळा योजून, त्यांत लीन झाल्यासारखे इतर धातू जिज्यात योजतात तिला संखोटना म्हणतात. (२१८)

प्रतिमुख सांगत आहे. या प्रतिमुखात पूर्वी सांगितलेला आठ कलांचा जो शताताश (ताश) तासंतो तीन वेळा योजावा. आठ कलांच्या मात्रेने विदारी योजावी. (२०९ ते २१४, २१५–)

क० आता संखोटनेचे लक्षण देत आहे– दोन आंगठे व तर्जनी यांनी तार दाबून व्यंजन धातूचा बिंदु हा प्रकार वाजवीत, ज्यांच्यांत बारा किंवा आठ श्रुतींचे अंतर आहे असे षड्ज व पंचम, ऋषभ व धैवत, गांधार व निषाद किंवा विकृत असणारे इतरही वादी व संवादी स्वर एकमेकांशी संगतीपूर्वक वाजवावे. त्या वादी स्वरांना गुणीभूत (म्हणजे अंगभूत) असे अनुवादी स्वर अनेक प्रकारे प्रयुक्त करावे. वादी स्वराला स्थायी म्हणून योजून त्याचा परिवार म्हणून अनुवादी स्वर प्रयुक्त करावे असा याचा अर्थ. विवादी स्वर अल्प योजावे. म्हणजे ज्या वादनप्रयोगात जो विवादी स्वर असतो त्याची आवृत्ति करू नये किंवा तो मुळीच योजू नये. विस्तारज इत्यादी विस्तार धातूचे चौदा प्रकार, दुसऱ्या म्हणजे करण इ० धातूंच्या भेदांबरोबर मिसळून दोन किंवा तीन वेळा वेगवेगळे आवृत्त करावे. मग ते विस्तार धातूचे भेद केवळ म्हणजे दुसऱ्या धातूंशी मिश्रित नसणारे असे दोन किंवा तीन वेळा योजून त्यांत लीन म्हणजे एकरूप झाल्यासारखे दुसऱ्या म्हणजे करण इत्यादी धातूंचे भेद जिच्यात प्रयुक्त करतात तिला संखोटना या नावाचा निर्गीत वादनाचा प्रकार म्हणतात. (२१५ ते २१८)

गुरू द्वौ लघवोऽष्टौ च द्वौ गुरू च लघुर्गुरुः ।
यत्र द्वादश ला गोन्ते सा स्यात्संखोटना ध्रुवा ॥ २१९ ॥
यथाक्षरद्विकलयोः स्युरत्रोत्तरयोः कलाः ।
नात्र संख्या विदारीणां भणिता भरतादिभिः ॥ २२० ॥

इति संखोटना

भेदा व्यञ्जनधातूत्था भेदैः कारणधातुजैः ।
चित्रिता ललिताः स्निग्धाः क्रियन्ते करलाघवात् ॥ २२१ ॥
आरोहबहुला यस्यां तामाहुः परिघट्टनाम् ।
गुरूण्यष्टौ च लघवः स्युश्चतुर्विंशतिर्गुरू ॥ २२२ ॥
द्वौ षोडश लघून्यन्ते गुरुर्यत्र ध्रुवात्र सा ।
संपक्वेष्टाकवद्यद्वा स्युः संपिष्टकवत्कलाः ॥ २२३ ॥

दोन गुरू व आठ लघू, (मग) दोन गुरू व एक लघु आणि एक गुरु, (नंतर) बारा लघू व शेवटी गुरु जिच्यात असतो ती संखोटना ध्रुवा होय. (२१९)

हिच्यात यथाक्षर व द्विकल उत्तर तालाच्या कला (योजायच्या) असतात. भरत इत्यादींनी हिच्यात विदारींची संख्या सांगितलेली नाही. (२२०)

ही संखोटना होय.

व्यंजनधातूपासून उत्पन्न झालेले भेद, करणधातूपासून उत्पन्न झालेल्या भेदांशी (मिसळून), हस्तचातुर्याने ते त्रिविधतापूर्ण, सुकुमार व रमणीय (२२१) आणि आरोह पुष्कळ असणारे असे जिच्यात योजले जातात तिला परिघट्टना म्हणतात.

आठ गुरु, चौवीस लघू, दोन गुरु (२२२), सोळा लघू व शेवटी गुरु जिच्यात असतात ती येथे (म्हणजे परिघट्टनेतील) ध्रुवा होय. संपक्वेष्टाक तालाप्रमाणे किंवा संपिष्टक तालाप्रमाणे (हिच्यात) कला (असतात). (२२३)

आता हिच्यातील ध्रुवा सांगत आहे. सत्तावीस अक्षरांचे स्वरूप असणाऱ्या संखोटना ध्रुवामध्ये यथाक्षर षट्पितापुत्रकाच्या संताशताशता या कला व द्विकल त्याच तालाच्या निप्रताशनिता निशताप्रनिसं या कला यथासंभव योजाव्या. बाकीचे स्पष्ट आहे. (२१९, २२०)

क० आता परिघट्टनेचे लक्षण देत आहे–

व्यंजनधातूचे भेद पुष्प इत्यादी वहा होत. ते करण धातूच्या घात इत्यादी पाच भेदांशी यथासंभव मिसळल्याने चित्रित म्हणजे दुसऱ्या स्वरूपांना प्राप्त होतात. ते येथे आरोहीवर्णाने प्रचुर असतात. (२२१, २२२–)

तिच्यातील ध्रुवा व पातकलायोजना सांगत आहे. (२२२ ते २२६)

संपिष्टके कलाः प्रोक्ता दश द्वादश वा पुरा ।
संपिष्टककलास्त्वत्र द्वादशैवेति संमतम् ॥ २२४ ॥
द्वादशानां दशानां च प्राहुरन्ये समुच्चयम् ।
संपक्वेष्टाकतालं च द्विकलीकृत्य केचन ॥ २२५ ॥
तद्द्वादशकलातालयोगमत्र[२५] प्रचक्षते ।
यथाक्षरद्विकलयोः संपक्वेष्टाकयोरिह ॥ २२६ ॥
अष्टादशकलाः केचिदाचक्षत समुच्चिताः ।
इति परिघट्टना
विस्ताराविद्धकरणभेदमिश्रप्रयोगतः ॥ २२७ ॥
यथा[२६] कलतलाख्याभ्यां मार्गासारितकं भवेत् ।
अन्ये कलतलोन्मिश्रकरणं लक्ष्म चक्ष्महे ॥ २२८ ॥

पूर्वी संपिष्टकात दहा किंवा बारा कला सांगितल्या आहेत. येथे संपिष्टकाच्या बारा-कलाच मान्य आहेत. (२२४)

दुसरे (आचार्य) बारा व दहा कलांचा समुच्चय (म्हणजे दोन्ही मिळून बावीस कला) सांगतात. काही संपक्वेष्टाक ताल द्विकल करून (२२५) त्याच्या बारा कलांची तालयोजना यात सांगतात.

येथे यथाक्षर व द्विकल संपक्वेष्टाक तालांच्या (२२६) मिळून अठरा कला काहींनी सांगितल्या आहेत. (२२७–)

ही परिघट्टना होय.

विस्तार, आविद्ध व करण या धातूंच्या भेदांच्या मिश्र प्रयोगाने (२२७) तसेच (व्यंजन धातूच्या) कल व तल या (भेदांनी) मार्गासारित होते. दुसरे (आचार्य) कल व तल यांनी मिश्रित करण (धातु) (असे त्याचे) लक्षण सांगतात. (२२८)

---

२५. 'तद्द्वादशकला ताल०० ' असा पाठ अड्यार व आनंदाश्रम आवृत्तीत छापलेला आहे. तो ' तद्द्वादशकलाताल ' असा असणे योग्य आहे.

२६. सुधाकरटीकेत विस्तार, आविद्ध व करण या धातूंच्या मिश्रित भेदांच्या प्रयोगाने तसेच पूर्वी सांगितलेल्या कल व तल यांच्या प्रयोगाने मार्गासारित होते असे स्पष्टीकरण दिले आहे. ' यथा ' ऐवजी ' तथा ' म्हटले आहे. त्यानुसार वर भाषांतर केले आहे. नाट्यशास्त्रात (बडोदा आ० भा० ४ पृ. ११७) मार्गासारिताचे लक्षण पुढीलप्रमाणे मिळते–

" मार्गासारितवाद्यं विस्ताराविद्धकरणसंयुक्तम् ।
सकलैः सतलैः करणैः ..... ॥

गाश्चत्वारो लघून्यष्टौ गौ द्वावष्टौ लघून्यथ ।
गो ल इत्याद्यखण्डं स्यादेवं खण्डद्वयं परम् ॥ २२९ ॥
यस्यामसौ ध्रुवा ज्ञेया मार्गासारितसंश्रया ।
एकं चच्चत्पुटे खण्डमुत्तरे शकलद्वयम् ॥ २३० ॥
कनिष्ठासारितोक्तेन कार्यस्तालकलाविधिः ।
इति मार्गासारितम्
प्रयोगोऽभिसृतस्य स्यात्तथा परिसृतस्य चेत् ॥ २३१ ॥
तथा लयान्तरगतो वाद्यतालकलाविधौ ।
माधुर्यं सौकुमार्यं च तदा लीलाकृतं भवेत् ॥ २३२ ॥
षड्जग्रामस्थजात्यंशे यद्गीतं वार्तिके पथि ।
आसारितं तदेवोक्तं धीरैरभिसृताह्वयम् ॥ २३३ ॥

चार गुरू, आठ लघू दोन गुरू मग आठ लघू आणि गुरु व लघु असा पहिला खंड असतो. नंतरचे दोन खंड याप्रमाणेच (असतात). (२२९) जिच्यात (अशी) योजना असते ती मार्गासारितावर आधारलेली ध्रुवा जाणावी. एक खंड चच्चत्पुट तालात व (पुढचे) दोन खंड उत्तर तालात (योजावे) (२३०) कनिष्ठासारितात सांगितलेल्या (प्रकाराने) तालाच्या कलांची योजना करावी. (२३१–)

हे मार्गासारित होय.

अभिसृत तसेच परिसृत त्याचप्रमाणे लयांतर यांचा प्रयोग वादनातील तालाच्या कलांच्या योजनेत असेल व गोडवा आणि नाजूकपणा असेल तर ते लीलाकृत (वादन) होते. (२३१,२३२).

षड्जग्रामात जातीचा अंश स्वर असता, वार्तिक मार्गातील जे आसारित गीत तेच विद्वानांनी अभिसृत या नावाने सांगितले आहे. (२३३)

क० कल व तल हे व्यंजन धातूचे भेद होत.

'कनिष्ठासारितात सांगितलेल्या प्रकाराने,' या बाबत 'कनिष्ठासारितात युग्म, नंतर शम्या आरंभी असलेले दोन उत्तर ताल (योजावे); हे यथाक्षर (असून) त्यात शेवटचा संनिपात अधिक (असतो)', इत्यादी पूर्वी सांगितलेले सर्व जोडून घ्यावे. (२२७ ते २३०, २३१–)

क० आता लीलाकृत नावाच्या निर्गीत वादनाचे लक्षण देत आहे– वादनातील तालकलांच्या योजनेत अभिसृत, परिसृत तसेच लयांतर यांचा प्रयोग असतो. यात मधुरपणा व सुकुमारता असल्याने त्याचे लीलाकृत हे नाव होय. (२३१ ते २३३)

याचे स्पष्टीकरण देताना अभिनवगुप्तांनी म्हटले आहे– "व्यंजन धातु सोडून तिन्ही धातू यात योजावे. व्यंजन धातूचे तल व कल हे भेद सांगितलेल्या धातुभेदांवरोबर (योजावे). दुसरे (आचार्य) करण धातूचे भेद अशाप्रकारे कल व तल यांनी मिश्रित करावे असे सांगतात." अभिनवगुप्तांच्या या स्पष्टीकरणानुसार २२८ व्या श्लोकाचे भाषांतर केले आहे.

जात्यंशे मध्यमग्रामसंस्थे परिसृतं त्विदम् ।
अन्ये तु मापघातादिसप्ताङ्गमपरान्तकम् ॥ २३४ ॥
ब्रुवतेऽभिसृतं तत्तु प्रदानादिनवाङ्गकम् ।
प्राहुः परिसृतं मृग्यं तालाध्याये लयान्तरम् ॥ २३५ ॥
गीतकत्रयसंयोगादेवं लीलाकृतं त्रिधा ।
प्रयोगौ द्वौ पदैश्चान्यः सार्थकैश्च निरर्थकैः ॥ २३६ ॥
वीणावाद्यं[२७] मानतालयुक्तं शम्यादिवर्जितम् ।
आहुरेके मानहीनमपि त्वाह विशाखिलः ॥ २३७ ॥

हेच जातीचा अंश मध्यमग्रामात असता परिसृत (होय). दुसरे (आचार्य) मापघात इत्यादी सात अंगे असणारे अपरांतक (२३४) अभिसृत म्हणून सांगतात. व तेच प्रदान इत्यादी नऊ अंगे असणारे परिसृत म्हणून म्हणतात. लयांतर तालाध्यायात शोधावे. (२३५)

तीन गीतांच्या संयोगामुळे अशा रीतीने लीलाकृत तीन प्रकारचे असते. याचे दोन प्रयोग (म्हणजे अभिसृत व परिसृत हे) अर्थयुक्त शब्दांनी (योजतात) व तिसरा (म्हणजे लयांतर हा) अर्थहीन (शब्दांनी योजतात). (२३६)

हे वीणावादन, मान (म्हणजे कालाचे प्रमाण) व ताल यांनी युक्त (असते); काही (आचार्य) शम्या इत्यादींनी विरहित (म्हणजे तालरहित) सांगतात. पण विशाखिलाने मानविरहितही सांगितले आहे. (२३७)

अभिसृत व परिसृत यांचे दुसऱ्या मतानुसार स्वरूप सांगत आहे–

मापघात इत्यादी सात अंगे असणारे अपरांतक अभिसृत व प्रदान इत्यादी नऊ अंगे असणारे अपरांतक परिसृत होय. लयांतर तालाध्यायातून शोधून जाणावे. तेथे 'त्याप्रमाणे मार्ग व लय यांनी द्रुप्पट असणारे लयांतर' असा कनिष्ठ आसारिताच्या द्रुप्पटीने सांगितलेला आसारिताचा प्रकार पहावा. अभिसृत, परिसृत व लयांतर या तीन गीतांच्या प्रयोगाने लीलाकृत तीन प्रकारचे होते. याचे अभिसृत व परिसृत हे दोन प्रयोग सार्थ म्हणजे वाचक, लक्षक व व्यंजक शब्दांनी होतात. तिसरा म्हणजे लयांतर हा प्रयोग अर्थहीन तेन तेन इ० किंवा अनुकरणवाचक शब्दांनी होतो. (२३४ ते २३६)

क० या वादनात तालप्रमाणाविषयी मतभेद सांगत आहे. अपरांतक–आसारित स्वरूपाच्या लीलाकृताच्या ध्रुवामध्ये चतुरश्र व त्र्यश्र असा दोन्ही प्रकारचा ताल योजतात. (२३७, २३८–)

---

२७. लीलाकृताचे स्पष्टीकरण देताना अभिनवगुप्तांनी तालयोजनेसंबंधीचे मतभेद पुढीलप्रमाणे सांगितले आहेत– (पहा– नाटचशास्त्र बडोदा आ० भा० ४ पृ. ११८–११९)

(१) तालयुक्त प्रयोग.

(२) काहींच्या मते तालशून्य प्रयोग; पण ध्रुवाप्रयोग मात्र तालयुक्त.

(३) दुसरे विशाखिलमताला अनुसरणारे जे आचार्य त्यांच्या मते सर्वत्र तालरहित असा वीणावादनाचा प्रयोग.

ध्रुवायां तूभयस्तालः परैस्त्वनियमात्मकः ।
इति लीलाकृतम्
आसारितत्रयं पूर्वं तालाध्याये निरूपितम् ॥ २३८ ॥
यथाक्षरं द्विसंख्यातं त्रिसंख्यातमिति त्रिधा ।
प्रत्येकं तस्य चावृत्तिर्वर्णालंकारशोभना ॥ २३९ ॥
वृत्तित्रयेण वाद्यैश्च तत्त्वाद्यैः करणेन च ।
धातुना चित्रिता कार्या बुधैर्वीणाविधाविह ॥ २४० ॥
इत्यासारितत्रयम्
इति नकुलादिपञ्चवीणालक्षणम् ।
आलापिनीगतं लक्ष्म वक्ष्ये लक्ष्यविदां मतम् ।
नवमुष्टिमितो दैर्घ्ये वैणवः सुषिरान्तरः ॥ २४१ ॥

(यातील) ध्रुवामध्ये दोन्ही प्रकारचा (म्हणजे चतुरश्र व त्र्यश्र) ताल (योजतात). दुसऱ्या (आचार्यांनी) यात अनिश्चित स्वरूपाचा (ताल सांगितला आहे). (२३८–)

हे लीलाकृत होय.

तीन आसारिते पूर्वी तालाध्यायात वर्णन केली आहेत; (२३८) (ती) यथाक्षर, द्विसंख्यात व त्रिसंख्यात ही (होत). त्या प्रत्येकाची वर्ण व अलंकार यांनी शोभिवंत अशी तीन प्रकारची आवृत्ती (२३९) तीन वृत्तींनी व तत्त्व इत्यादी तीन वादनांनी आणि करण धातूने विविधतायुक्त असणारी अशी, या वीणावादनाच्या बाबतीत जाणकारांनी योजावी. (२४०)

ही तीन आसारिते होत.

नकुल इत्यादी पाच वीणांची लक्षणे समाप्त.

आलापिनीसंबंधीचे लक्ष्यजाणकारांनी मानलेले लक्षण (आता) सांगतो. तिची दांडी बांबूची (असून) ती नऊ मुठी मापाच्या लांबीची, आत पोकळ असणारी (२४१) व

क० तीन वृत्ती चित्रा, वृत्ति व वक्षिणा या होत. तत्त्व इत्यादी वादने म्हणजे तत्त्व, ओघ व अनुगत ही तीन प्रकारची वीणावादने. (वर्णालंकार, तीन वृत्ती, तीन वादने) व करण धातु या आठांनी प्रत्येकी आवृत्ति योजावी. (२३८ ते २४०)

क० आलापिनी तसेच लहान इत्यादी किनरी–प्रकार यांची लक्षणे स्पष्ट असल्याने मूळ ग्रंथातूनच ती जाणून घ्यावी. (२४१ ते ३२७)

---

(४) इतर काही आचार्यांच्या मताने ध्रुवागान हेच फक्त दोन्ही प्रकारच्या तालाने युक्त. सुधाकरटीकेत पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण आहे–

ततवादन मान व ताल यांनी युक्त योजावे. काही हे या दोन्हींनी रहित असे सांगतात. विशाखिल याने मानरहित व तालरहित सांगितले आहे. याच्या ध्रुवेत कोणते तरी तालद्वय इच्छेनुसार योजावे. वरील दोन्ही स्पष्टीकरणांचा विचार करून भाषांतर केले आहे.

अङ्गुलद्वन्द्वपरिधिः प्राग्वद् ग्रन्थ्यादिवर्जितः ।
श्लक्ष्णः समः सुवृत्तश्च दण्डः स्यात्ककुभं दधत् ॥ २४२ ॥
अङ्गुलद्वयविस्तारमङ्गुलार्धायतं तथा ।
तदर्धं पिण्डसंयुक्तमुन्मुखं पत्रिकोज्झितम् ॥ २४३ ॥
एकदण्डमधोभागे शङ्कुना तु विराजितम् ।
चतुरङ्गुलदैर्घ्येण बहिर्मध्योन्नतेन च ॥ २४४ ॥
तस्य तुम्बं परीणाहे द्वादशाङ्गुलसंमितम् ।
चतुरङ्गुलवक्त्रं च दन्तनाभिसमन्वितम् ॥ २४५ ॥
अग्रादधस्तात्पादोने मुष्टियुग्मे निबध्यते ।
अत्र मेषान्त्रतन्त्री स्यात्सूक्ष्मा श्लक्ष्णा समा दृढा ॥ २४६ ॥
कर्परं नारिकेलोत्थं दोरकः[२८] सारिकास्तथा ।
त्रीण्येतानि निबध्यन्ते यत्र सालापिनी मता ॥ २४७ ॥



दोन अंगुळे घेराची असते. पूर्वीप्रमाणे (म्हणजे एकतंत्रीच्या दांडीप्रमाणे) ती गाठ इत्यादी नसलेली, गुळगुळीत, (आरंभी, मध्ये व शेवटी) सारख्या (प्रमाणाची) व गोलाकार (असून) ककुभ धारण करणारी (असते). (२४२)

तो (ककुभ) दोन अंगुळे लांबीचा व अर्धे अंगुळ रुंदीचा (असतो). त्याचा अर्धा भाग गोळ्याने युक्त, वर तोंड असलेला, पट्टीविरहित (२४३) व एक दांडा असणारा (असा असतो). (ककुभाच्या) खालच्या भागात, तो चार अंगुळे लांबीच्या व बाहेरून मधला भाग उंच असणाऱ्या शंकूने शोभिवंत असतो. (२४४)

त्या (दांडीच्या) वरच्या टोकापासून खाली पावणे दोन मुठीच्या अंतरावर, बारा अंगुळे मापाचा घेर असलेला, चार अंगुळे (प्रमाणाचे) तोंड असलेला व हस्तिदंताच्या नाभीने युक्त असा भोपळा बांधलेला असतो. हिच्यात बकऱ्याच्या आंतड्याची सूक्ष्म, गुळगुळीत, एकसारखी व बळकट अशी (तात) तार म्हणून (योजलेली) असते. (२४५, २४६)

नारळाची कवटी, दोरक तसेच सारिका ही तिन्ही जिच्यात बांधलेली असतात ती आलापिनी मानली आहे. (२४७)

---

२८. आनंदाश्रम आवृत्तीत (पृ. ५०९) 'दोरको दोरिकास्तथा' असा पाठ घेतलेला आहे. तसेच तळटीपेत 'निबध्यन्ते' ऐवजी 'न विद्यन्ते' असा पाठ दिला आहे.
संगीतसारामृतात (पृ. १२३).
'खर्परं नारिकेलोत्थं दोरको दोरिका तथा ।
त्रीण्येतानि न विद्यन्ते यत्र सालापिनी मता ॥

दशमुष्टिमितं दण्डमन्ये प्राहुः खादिरं परे ।
पट्टसूत्रमयीं तन्त्रीं यद्वा कार्पाससूत्रजाम् ॥ २४८ ॥
रक्तचन्दनजान्सर्वान् वीणादण्डान्परे जगुः ।
दशमुष्टयधिकं मानं क्वचिल्लक्ष्येषु दृश्यते ॥ २४९ ॥
तुम्बं वक्षसि निक्षिप्य वामाङ्गुष्ठेन तस्य च ।
मूलमुत्पीड्य धृत्वा तामथ मध्यमया[२९] सुधीः ॥ २५० ॥
दक्षिणस्यानामया वा वादयेद्बिन्दुधातुवत् ।
बिन्दुहस्तेन वा मन्द्रे मध्ये तारे च वादयेत् ॥ २५१ ॥
त्रयस्तु दक्षिणात्पाणेश्चत्वारो वामतः स्वराः ।
इत्युक्तं कैश्चिदाचार्यैरपरे त्वन्यथा जगुः ॥ २५२ ॥
मध्यमो मुक्तया तन्त्र्या तर्जन्याद्यङ्गुलीत्रयात् ।
वामस्यानामिकावर्ज्यास्त्रयः स्युः पञ्चमादयः ॥ २५३ ॥

दुसरे (आचार्य) हिच्यात दहा मुठी मापाची खैराची दांडी सांगतात; (तसेच) रेशमाच्या दोऱ्याची किंवा कापसाच्या दोऱ्याची तार (सांगतात). (२४८) इतर (काही आचार्यांनी) सर्व वीणांच्या दांड्या रक्तचंदनाच्या सांगितल्या आहेत. प्रचारांत दहा मुठीपेक्षा अधिक लांबीचे (दांडीचे) प्रमाण क्वचित् दिसून येते. (२४९)

भोपळा छातीवर ठेवून व त्याचे मूळ डाव्या अंगठ्याने दाबून ती धरून, मग जाणकाराने उजव्या हाताच्या मधल्या बोटाने किंवा अनामिकेने (म्हणजे तिसऱ्या बोटाने) बिंदुधातूप्रमाणे वाजवावी अथवा बिंदु या हस्तव्यापाराने मंद्र, मध्य आणि तार स्थानांत वाजवावी. (२५०, २५१) काही आचार्यांनी उजव्या हाताने तीन स्वर व डाव्या हाताने चार स्वर (वाजवावे) असे सांगितले आहे. दुसऱ्या (आचार्यांनी) वेगळ्या प्रकाराने सांगितले आहे. (ते असे–) मुक्त तारेने मध्यम (वाजवून) डाव्या हाताच्या अनामिका सोडून (२५२) तर्जनी इत्यादी तीन बोटांनी (म्हणजे तर्जनी, मधले बोट व करंगळी यांनी) (क्रमाने) पंचम इत्यादी तीन स्वर (म्हणजे पंचम, धैवत व निषाद) (वाजवावे). (२५३)

– असा हा श्लोक मिळतो. अडघार आवृत्तीतील 'सारिका' या ऐवजी 'दोरिका' हा शब्द आनंदाश्रम आवृत्ति व संगीतसारामृत यांत मिळत असल्याने तसेच दुसऱ्या ओळीत 'निबध्यन्ते' या ऐवजी 'न विद्यन्ते' असा पाठ मिळत असल्याने या वीणेला सारिका म्हणजे पडदे नसण्याची शक्यता जास्त वाटते.

२९. सुधाकरटीकेत, 'डाव्या अंगठ्याने भोपळ्याचे मूळ दाबून, मधल्या बोटाने ती आलापिनी धरून, उजव्या हाताच्या अनामिकेने पूर्वी सांगितलेल्या बिंदुधातूप्रमाणे वाजवावी' असे म्हटले आहे. पण या स्पष्टीकरणात 'दक्षिणस्यानामया वा' म्हणजे 'किंवा उजव्या अनामिकेने' यामधील 'वा' म्हणजे 'किंवा' याचा अर्थ मिळत नाही.

मुक्ततन्त्र्याथ षड्जः स्यादृषभस्तर्जनीभवः ।
गान्धारो मध्यमाङ्गुल्या दक्षिणेनाथ वादनम् ॥ २५४ ॥
आरोहेणावरोहेण सप्तकद्वितये भवेत् ।
एभिः स्वरैर्विरचितं विचित्रं रागमालपेत् ॥ २५५ ॥
गायेद्गीतं निबद्धं च प्रवीणो वीणयानया ।
इदमालापिनीलक्ष्म श्रीनिःशङ्केन कीर्तितम् ॥ २५६ ॥
इत्यालापिनीलक्षणम्
किंनरी द्विविधा लघ्वी बृहती चेति कीर्तिता ।
तत्र लघ्वीगतं लक्ष्म सांप्रतं प्रतिपाद्यते ॥ २५७ ॥
स्याद्वितस्तित्रयं दैर्घ्ये मानं पञ्चाङ्गुलाधिकम् ।
पञ्चाङ्गुलः परीणाहो वेणुदण्डस्य यत्र च ॥ २५८ ॥
गर्भेऽस्य व्यापकं रन्ध्रं ककुभः शाकदारुजः ।
सार्धद्व्यङ्गुलविस्तारो दैर्घ्ये पञ्चाङ्गुलश्च सः ॥ २५९ ॥
तस्मादर्धाङ्गुलन्यूना दैर्घ्यविस्तारयोर्भवेत् ।
मध्ये कूर्मोन्नता लौही पत्रिका ककुभस्थिता ॥ २६० ॥

मग मुक्त तारेने षड्ज, उजव्या हाताच्या तर्जनीने ऋषभ आणि मधल्या बोटाने गांधार (हे वाजवावे). (हे) वादन (२५४) आरोह व अवरोहाने दोन सप्तकांत होते. या स्वरांनी रचलेला विविधतायुक्त राग आळवावा. (२५५) कुशल वादकाने या (वीणेच्या साथीने) निबद्ध गीत गावे. श्रीनिःशंकाने (असे) हे आलापिनीचे लक्षण सांगितले आहे. (२५६)

हे आलापिनीचे लक्षण होय.

लहान व मोठी अशी दोन प्रकारची किंनरी सांगितली आहे. त्यातील लहान (किंनरी) संबंधीचे लक्षण आता प्रतिपादितो. (२५७)

तिच्यामधील बांबूच्या दांडीची लांबी तीन विती व पाच अंगुळे मापाची असते व घेर पाच अंगुळांचा (असतो). (२५८)

तिच्या आत (सर्व दांडीला) व्यापणारी पोकळी (असते).

सागाच्या लाकडापासून तयार केलेला, अडीच अंगुळे रुंदीचा व पाच अंगुळे लांबीचा ककुभ (या किंनरीत असतो). (२५९).

या ककुभात असणारी लोखंडी पट्टी लांबी व रुंदीमध्ये त्याच्यापेक्षा अर्धे अंगुळ कमी असणारी व मध्यभागी कासवाच्या (पाठीप्रमाणे) उंच असणारी अशी असते. (२६०)

गृध्रवक्षोऽस्थिनलिका कनिष्ठाङ्गुलिसंमिता ।
लौही कांस्यमयी यद्वा कीर्तिता सारिकाख्यया ॥ २६१ ॥
श्लिष्टा वस्त्रमषीमिश्रमदनेन[३०] चतुर्दश ।
चतुर्दशस्वरस्थाने दण्डपृष्ठे निवेशयेत् ॥ २६२ ॥
सप्तकस्य द्वितीयस्य यो निषादो भवेदधः ।
तस्य स्थाने भवेदाद्या सारिकान्योर्ध्वमङ्गुलात् ॥ २६३ ॥
स्थापयेदन्तरे किंचित्किंचित्पूर्वाधिके परा ।
द्व्यङ्गुलावध्यष्टमीं तु पूर्वस्यास्त्र्यङ्गुलान्तरे ॥ २६४ ॥
स्थापयित्वा पराः षट् च पूर्वपूर्वाधिकान्तरे ।
चतुरङ्गुलपर्यन्तं सारिकाः संनिवेशयेत् ॥ २६५ ॥
तुम्बं दण्डस्थककुभस्याधःसंधौ निवेशयेत् ।
तृतीयतुर्यसार्योस्तु मध्येऽधस्ताद् द्वितीयकम् ॥ २६६ ॥

गिधाडाच्या छातीच्या हाडाची करंगळीच्या मापाची नळी किंवा लोखंडाची अथवा काशाची (तेवढ्याच मापाची नळी) सारिका या नावाने सांगितली आहे. (२६१).

(अशा) चौदा सारिका, (जळलेल्या) कापडाची काजळी मिसळलेल्या मेणाने, दांडीच्या पृष्ठभागावर चौदा स्वरांच्या जागी चिकटलेल्या अशा बसवाव्या. (२६२)

दुसऱ्या सप्तकाचा जो निषाद खाली असतो, त्याच्या जागी पहिली सारिका (बसवायची) असते. दुसरी एक अंगुळापेक्षा थोड्या अधिक अंतरावर स्थापावी. पहिलीपेक्षा थोडया अधिक (अंतरावर) पुढची, अशा नंतरच्या (पाच सारिका) दोन अंगुळे अंतर होईपर्यंत (स्थापाव्या). (म्हणजे सहाव्या व सातव्या सारिकेमधले अंतर दोन अंगुळांचे असावे.) आठवी (सारिका) मात्र पूर्वीच्या (म्हणजे सातव्या सारिके) पासून तीन अंगुळे अंतरावर स्थापून पुढच्या सहा सारिका, मागच्यापेक्षा नंतरची थोडी अधिक अंतरावर, अशा चार अंगुळे अंतर होईपर्यंत स्थापाव्या. (म्हणजे तेरावी व चौदावी सारिका यांत चार अंगुळे अंतर असावे). (२६३, २६४, २६५)

दांडीला (जोडलेल्या) ककुभाच्या खालच्या सांध्याच्या जागी एक भोपळा योजावा. दुसरा (भोपळा) तिसऱ्या व चवथ्या सारिकांच्या मध्ये (दांडीच्या) खालच्या बाजूस (बांधावा). (२६६)

---

३०. 'वस्त्रमषीमिश्रमर्दनेन' असा पाठ अडचार आवृत्तीत घेतला आहे. त्याचे स्पष्टीकरण सुधाकरटीकेत 'जळलेल्या कापडाच्या काजळीने मिश्रित मेणाने मर्दनाने (म्हणजे मळण्याने) उत्पन्न झालेल्या (मिश्रणाने)' असे दिले आहे. पण आनंदाश्रम आवृत्ति (पृ. ५१०) व संगीतसारामृत (पृ. १२३) यांत 'वस्त्रमषीमिश्रमदनेन' असा पाठ आहे. मदन म्हणजे मेण. तोच पाठ येथे घेतला आहे.

पूर्वस्मादपरं तुम्बं विस्तारेऽभ्यधिकं मनाक् ।
दण्डाग्राद् द्वयङ्गुलेऽधस्ताद्रन्ध्रं कृत्वाथ निक्षिपेत् ॥ २६७ ॥
चलशङ्कुं गले रन्ध्रं दधमानमतोऽङ्गुलात् ।
अधस्ताद्ङ्गुलोत्सेधं मेढकं बाणपुङ्खवत् ॥ २६८ ॥
कृत्वा ततोऽग्रतः किंचित्स्थिरशङ्कुं निवेशयेत् ।
ततो लोहमयीं श्लक्ष्णां वर्तुलां च समां दृढाम् ॥ २६९ ॥
गजकेशोपमां तन्त्रीं निबध्य ककुभे दृढम् ।
सारिकामस्तकन्यस्तामानीतां मेढकोपरि ॥ २७० ॥
लग्नां द्वितीयप्रान्तेन वेष्टयेच्चलकीलके ।
शङ्कुं तं भ्रामयेत्तावद्यावत्तन्त्री दृढा भवेत् ॥ २७१ ॥
भ्रामणं वैपरीत्येन तन्त्रीशैथिल्यकारणम् ।
तन्त्रीदैर्घ्येऽथ दाढर्याय चलशङ्कोर्गलस्थिते ॥ २७२ ॥
छिद्रे न्यस्याथ संकीलं स्थिरशङ्कौ निवेशयेत् ।
लघ्वी सा किंनरी प्रोक्ता शार्ङ्गदेवेन सूरिणा ॥ २७३ ॥

पहिल्या पेक्षा दुसरा भोपळा विस्ताराने थोडा अधिक (असावा). दांडीच्या टोकापासून दोन अंगुळे खाली भोक करून त्यात चल शंकु (म्हणजे फिरणारी खुंटी) बसवावी. (२६७) (त्या शंकूच्या) गळ्याच्या जागी भोक धारण केलेले (असावे). त्यापेक्षा एक अंगुळ खाली, एक अंगुळ उंचीचा, बाणाच्या पंखमय भागाप्रमाणे असलेला मेढक (२६८) (स्थापित) करून त्याच्या किंचित पुढे स्थिर असणारा (म्हणजे न फिरणारा) शंकु बसवावा. नंतर गुळगुळीत, गोल, एकसारखी व बळकट अशी लोखंडाची, (२६९) हत्तीच्या केसाप्रमाणे असणारी, तार ककुभात बळकटपणे बांधून सारिकांच्या डोक्यावरून घेऊन मेढकावरून आणलेली (अशी योजावी). (२७०) दुसऱ्या टोकाने (फिरणाऱ्या खुंटीला) जोडलेली (ती तार) (त्या) फिरणाऱ्या खुंटीभोवती गुंडाळावी. आणि ती खुंटी इतकी फिरवावी की ती तार दृढ (ताणलेली) अशी होईल. (२७१) (शंकु म्हणजे खुंटी) उलट फिरवणे तार ढिली करण्यास कारणीभूत होते. तार लांब असल्यास ती दृढपणे (ताणली जाण्यासाठी) फिरणाऱ्या शंकूच्या गळ्याच्या जागी असणाऱ्या भोकात (लोखंडी) खिळा घालून, मग स्थिर शंकूमध्ये योजावी.

विद्वान शार्ङ्गदेवाने ती लहान किंनरी (अशा लक्षणाने) सांगितली आहे. (२७२, २७३)

अस्यां स्थायिनमारभ्य गणयेत्सप्तकद्वयम् ।
सारीककुभयोर्मध्ये तर्जन्याद्यङ्गुलित्रयात् ॥ २७४ ॥
वादयेत्किंनरीवीणातन्त्रीं दक्षिणपाणिना ।
वामस्य तिसृभिस्ताभिरङ्गुलीभिस्तु तन्त्रिकाम् ॥ २७५ ॥
तत्तत्सारीप्रदेशस्थां स्वरव्यक्त्यै निपीडयेत् ।
वितस्त्यभ्यधिका दैर्घ्ये परिणाहेऽङ्गुलाधिका ॥ २७६ ॥
लघ्व्याः स्याद् बृहती स्नायुमया तन्त्रीस्त्रितुम्बिका ।
आलापिनीवदस्यां च स्थाप्यं तुम्बं तृतीयकम् ॥ २७७ ॥
अन्यल्लघ्वीगतं लक्ष्म बृहतीं किंनरीं श्रयेत् ।
इति द्विविधकिंनरीलक्षणम्
किंनरीत्रितयं तत्र देशीसंसिद्धमन्यथा ॥ २७८ ॥
बृहती मध्यमा लघ्वीत्यथासां लक्ष्म कथ्यते ।
तिर्यग्यवोदरैः षड्भिर्निस्तुषैः स्यादिहाङ्गुलम् ॥ २७९ ॥
बृहतीदण्डमानं स्याद्दैर्घ्ये पञ्चाशदङ्गुलम् ।
षडङ्गुलोऽत्र परिधिर्दण्डे दैर्घ्यं तु ककुभे ॥ २८० ॥

हिच्यात स्थायी स्वरापासून आरंभ करून दोन सप्तके मोजावी. उजव्या हाताने तर्जनी इत्यादी तीन बोटांनी किंनरी वीणेची तार सारी व ककुभ यांमध्ये वाजवावी. डाव्या हाताच्या त्याच तीन बोटांनी (म्हणजे पहिले बोट, मधले बोट व तिसरे बोट यांनी), त्या त्या सारीच्या ठिकाणी असणारी तार (तो तो) स्वर निर्माण होण्यासाठी दाबावी.

मोठी किंनरी लहान किंनरीपेक्षा एक वीत जास्त लांबीच्या व एक अंगुळ जास्त घेर असणाऱ्या (दांडीची) असते. तिला तीन भोपळे (असतात) व स्नायूची तात (असते). हिचा तिसरा भोपळा आलापिनीप्रमाणे योजावा. (२७४, २७५, २७६, २७७)

लहान किंनरीचे बाकीचे (सर्व) लक्षण मोठ्या किंनरीत (जोडून) ध्यावे. (२७८–)

हे दोन प्रकारच्या किंनरींचे लक्षण होय.

त्यात देशीप्रसिद्ध अशा वेगळ्या तीन किंनरी (आहेत). (२७८) त्या मोठी, मध्यम व लहान अशा होत. यांचे लक्षण सांगतो. त्यांच्याविषयी अंगुळ (हे प्रमाण) आडव्या ठेवलेल्या, कोंडाविरहित सहा यवांनी होते. (२७९)

मोठ्या (किंनरीच्या) दांडीचे माप पन्नास अंगुळे लांबीचे असते. तिचा घेर सहा अंगुळांचा असतो. ककुभाची दांडी सहा अंगुळे लांबीची व त्याचे मस्तक चार अंगुळे मापाची लांबी व रुंदी असलेले आणि दोन अंगुळे उंचीचे असते. (२८०, २८१).

षडङ्गुलं शिरस्त्वस्य दैर्घ्यविस्तारयोर्भवेत् ।
चतुरङ्गुलसंमानं द्वयङ्गुलं तु तदुच्छ्रये ॥ २८१ ॥
निक्षिपेत्काकुभं दण्डं वीणादण्डोत्तरे तथा ।
दण्डांशः परिशेषोऽत्र तावान्यावति शेषिते ॥ २८२ ॥
वीणादण्डान्तककुभशिरोमध्यान्तरे स्थितः ।
तन्त्रीभागस्तृतीयांशाधिकत्र्यङ्गुलको भवेत् ॥ २८३ ॥
मध्ये कूर्मोन्नतां लौहीं पत्रिकां शिरसि क्षिपेत् ।
परितोऽर्धाङ्गुलन्यूना शिरसोऽसौ प्रकीर्तिता ॥ २८४ ॥
वीणाशीर्षादधस्ताच्च सार्धद्वयङ्गुलतः स्थितम् ।
ऊर्ध्वाधो दैर्घ्यभाग्रन्ध्रं विस्तारेऽर्धाङ्गुलायतम् ॥ २८५ ॥
तिर्यग्दैर्घ्यं तावदन्यद्रन्ध्रं चोभयतोमुखम् ।
तिर्यग्रन्ध्रे चलं शङ्कुमूर्ध्वरन्ध्रनिविष्टया ॥ २८६ ॥
लौह्या सारिकया युक्तं न्यसेत्प्रान्तान्तरं पुनः ।
सारिकायाः शिरोमूले बध्नीयात्काकुभे सुधीः ॥ २८७ ॥
तन्त्रीरन्ध्रात्पुरः स्वाङ्घ्रिद्वयङ्गुले मेढको भवेत् ।
स च स्यात्कर्तरीयुक्तो गले रन्ध्रान्वितोऽथवा ॥ २८८ ॥
कर्तर्या गलरन्ध्रे वा सारिकां तां निवेशयेत् ।
तद्रन्ध्रे दण्डान्तरालं विदध्यात्सयवाङ्गुलम् ॥ २८९ ॥

ककुभाची दांडी वीणेच्या दांडीवर अशी बसवावी की बाकी राहिलेला दांडीचा जेवढा भाग, तेवढ्या राहिलेल्या (भागात) वीणेच्या दांडीचे टोक व ककुभाच्या मस्तकाचा मध्य, यांमध्ये असणारा तारेचा भाग ३½ अंगुळांचा राहील. (२८२,२८३). मध्ये कासवाच्या (पाठीप्रमाणे) उंच अशी लोखंडाची पट्टी (ककुभाच्या) मस्तकावर ठेवावी. ती मस्तकाच्या सर्व भागापेक्षा अर्धे अंगुळ कमी (मापाची) सांगितली आहे. (२८४). वीणेच्या मस्तकाच्या खाली अडीच अंगुळांवर असणारे, आरपार जाणाऱ्या लांबीचे व अर्ध्या अंगुळाच्या रुंदीचे आडवे भोक (करावे). दुसरे आडवे भोक तेवढ्याच लांबीचे व दोन्ही बाजूला तोंड असणारे (करावे). वरच्या (भोकात) घातलेल्या लोखंडी सारिकेने (म्हणजे नळीने) युक्त असणारी फिरणारी खुंटी आडव्या भोकात घालावी. जाणकाराने सारिकेचे दुसरे टोक ककुभाच्या मस्तकाच्या मुळाशी बांधावे. (२८५, २८६, २८७) तारेच्या भोकाच्या पुढे २½ अंगुळांवर मेढक योजावा. तो कातरी असलेला किंवा गळ्याच्या जागी भोक असणारा असावा. (२८८) कातरीने (?) किंवा गळ्याच्या जागी असणाऱ्या भोकात ती सारिका घालावी. त्या भोकात एक अंगुळ व यव एवढा दांडीचा मधला भाग ठेवावा. (२८९) मेढकाच्या पुढे दीड

मेढकात्पुरतः शङ्कुः स्थिरः सार्धाङ्गुलान्तरे ।
तिर्यग्रन्ध्रे निवेशोऽस्य चलशङ्कुवदिष्यते ॥ २९० ॥
चलशङ्कुभ्रामणादि ज्ञेयं पूर्वोक्तरीतितः ।
गृध्रवक्षोस्थिजा यद्वा तत्पादास्थिसमुद्भवाः ॥ २९१ ॥
कांस्यमय्योऽथवा लौह्यो नलिकाः सारिका मताः ।
सार्धाङ्गुलास्ताः परितौ दण्डपृष्ठे निवेशयेत् ॥ २९२ ॥
यन्मेढकशिरोमध्यादुपक्रम्यान्तरं भवेत् ।
सारीमस्तकमध्यानां तदिदानीं निरूप्यते ॥ २९३ ॥
आद्यान्तरं तत्र यवाधिकं पञ्चाङ्गुलं मतम् ।
द्वितीयमन्तरालं तु चतुरङ्गुलमुत्तरम् ॥ २९४ ॥
तस्मात्तृतीयतुर्यं तु यवन्यूने मते सताम् ।
यवाधिकं त्र्यङ्गुलं तु ज्ञेयं पञ्चममन्तरम् ॥ २९५ ॥
यवोनद्व्यङ्गुलं* षष्ठं सयवद्व्यङ्गुलं पुनः ।
अन्तरालं सप्तमं स्यात्सार्धद्व्यङ्गुलमष्टमम् ॥ २९६ ॥
नवमं तु यवार्धोनं सार्धाङ्गुलमितं मतम् ।

अंगुळ अंतरावर स्थिर शंकु (योजावा). तो फिरणाऱ्या शंकूप्रमाणे आडव्या भोकात बसवणे इष्ट होय. (२९०).

फिरणारा शंकु (म्हणजे खुंटी) फिरवणे इत्यादी पूर्वी सांगितलेल्या रीतीने जाणावे. गिधाडाच्या छातीच्या हाडांच्या किंवा पायाच्या हाडांपासून उत्पन्न झालेल्या (२९१) अथवा काशाच्या किंवा लोखंडाच्या नलिका सारिका म्हणून मानल्या आहेत. दीड अंगुळ परीघ असणाऱ्या त्या (सारिका) दांडीवर बसवाव्या. (२९२)

मेढकाच्या मस्तकाच्या मध्यापासून आरंभ करून सारिकांच्या मस्तकाच्या मध्यभागाचे जे (क्रमाने) अंतर असते ते आता सांगतो. (२९३)

त्यात पाच अंगुळे व यव हे पहिले अंतर मानले आहे. दुसरे अंतर चार अंगुळांचे (असते). (२९४)

तिसरे व चवथे त्यापेक्षा एक यव कमी असे सज्जनांना मान्य आहे. पाचवे अंतर तीन अंगुळे व यव (या प्रमाणाचे) जाणावे. (२९५)

सहावे दोन अंगुळांत एक यव कमी आणि सातवे अंतर दोन अंगुळे व यव (तसेच) आठवे अडीच अंगुळे (२९६) व नववे दीड अंगुळात अर्धा यव कमी या मापाचे मानले आहे.

---

* मु. टी. (अडचार आ० भा० ३ पृ. २९१) ' सहावे अंतर एक यव कमी तीन अंगुळे.' (षष्ठमन्तरं यवोनत्र्यङ्गुलम् ।)

दशमं द्व्यङ्गुलं हीनं यवेनैकादशं ततः ॥ २९७ ॥
द्वादशं तु तृतीयांशन्यूनं तस्मात्त्रयोदशम् ।
सतृतीयांशाङ्गुलं स्यादङ्गुलं तु चतुर्दशम् ॥ २९८ ॥
द्वितीयान्तरतोऽधस्तान्न्यस्येत्तुम्बमधोमुखम् ।
अन्यत्ककुभमूर्ध्वाधस्तुम्बकं संनिवेशयेत् ॥ २९९ ॥
षट्त्रिंशदङ्गुलं चक्रे[३१] परिधिस्त्वाद्यतुम्बके ।
किंचिन्न्यूनं ततस्तुम्बं[३२] परिधौ स्यादधस्तनम् ॥ ३०० ॥
ईषदस्पष्टसरिका सारिकास्ता निवेशयेत् ।
मदनेनेष्टकाचूर्णमिश्रेण श्लेषणं दृढम् ॥ ३०१ ॥
सारीणामथवा वस्त्रमषीमिश्रणे संमितम् ।
मुक्ततन्त्रीभवं कृत्वा स्वरमाद्यं चतुर्दशम् ॥ ३०२ ॥
स्वराः परे स्युः सारीणां चतुर्दशभिरन्तरैः ।
सप्तकद्वयमेवं स्यादेकतारस्वराधिकम् ॥ ३०३ ॥

दहावे दोन अंगुळांचे व अकरावे दोन अंगुळांत एक यव कमी, (२९७) बारावे त्यापेक्षा (अंगुळाच्या) एकतृतीयांशाने कमी, तेरावे १⅓ अंगुळाचे व चौदावे एक अंगुळाचे असावे. (२९८) दुसऱ्या अंतराच्या खालच्या भागी, खाली तोंड असलेला भोपळा ठेवावा. दुसरा भोपळा ककुभावर खालच्या बाजूस बांधावा. (२९९)

पहिल्या भोपळ्याचा वर्तुळाकृति घेर छत्तीस अंगुळांचा व खालच्या बाजूच्या (दुसऱ्या) भोपळ्याचा घेर त्यापेक्षा थोडा कमी असावा. (३००)

थोड्या अस्पष्टपणे हलणाऱ्या (?) अशा त्या सारिका योजाव्या. विटेची पूड मेणात मिसळून त्या (मेणाने) सारिकांच्या दांडीवरला जोड घट्ट (करावा), किंवा (जळलेल्या) वस्त्राची काजळी मिसळलेल्या मेणाने (तो घट्ट करावा) हे योग्य होय. पहिला म्हणजे चौदावा स्वर मुक्त तारेवर वाजवून (३०१, ३०२) बाकीचे स्वर सारिकांच्या चौदा अंतरांनी उत्पन्न होतात. अशा रीतीने एक तार स्वर अधिक असणारी दोन सप्तके उत्पन्न होतात. (३०३)

---

३१. सु. टी. "पहिल्या भोपळ्याच्या मुखातील (वक्त्रे) घेर (म्हणजे) वर्तुळाचे प्रमाण छत्तीस अंगुळे." या स्पष्टीकरणावरून 'चक्रे' या ऐवजी 'वक्त्रे' असा पाठ या टीकाकारासमोर असावा असे वाटते.

३२. अड्यार आवृत्तीत 'त्वधस्तुम्बं' असा पाठ घेतला आहे. सुधाकरटीकेतील स्पष्टीकरणावरून, आनंदाश्रम आवृत्तीतील (पृ. ५१३) 'ततस्तुम्बं' या पाठाला दुजोरा मिळतो.

यथास्वं स्वरदेशांशैः श्रुतिस्तस्या वितन्वते ।
द्वित्रास्ततोऽधिकाः सारीर्निबध्नीयात्परे त्विह ॥ ३०४ ॥
लक्षयन्त्यन्तराण्यासां स्वराविर्भावतो बुधाः ।
श्रीशार्ङ्गदेवोपदेशात्तद्बोधः सुलभो नृणाम् ॥ ३०५ ॥
केचित्त्रयोदशैवात्र सारीर्निदधते बुधाः ।
बृहती किंनरीत्येषा शार्ङ्गदेवेन कीर्तिता ॥ ३०६ ॥

इति बृहती किंनरी

मध्यमायां दण्डदैर्घ्यं त्रिचत्वारिंशदङ्गुलम् ।
परिधिर्दृश्यते तत्र द्वियवोनषडङ्गुलः ॥ ३०७ ॥
सार्धत्र्यङ्गुलविस्तारं प्राग्दैर्घ्यं काकुभं शिरः ।
क्षिपेत्ककुभदण्डस्य वीणादण्डेऽङ्गुलत्रयम् ॥ ३०८ ॥
तावांश्च परिशेषोऽसौ यावतः परिशेषणे ।
दण्डान्तशीर्षमध्यान्तः सारिकावयवस्थितिः ॥ ३०९ ॥
तृतीयभागरहिताङ्गुलत्रयमितो भवेत् ।
दण्डान्ते सारिकोत्सेधः स्याद्यवोनाङ्गुलद्वयः ॥ ३१० ॥

तिच्या बाबतीत त्या त्या (स्वराच्या) स्वरस्थानाच्या भागांनी श्रुति–विस्तार करतात. दुसरे (आचार्य) हिच्यात त्यापेक्षा दोन किंवा तीन अधिक सारिका बांधाव्या (असे सांगतात). (३०४) जाणकार (हिच्यातली) सारिकांमधली अंतरे स्वरांच्या आविष्कारानुसार निर्दिष्ट करतात. श्रीमान शार्ङ्गदेवाच्या उपदेशामुळे त्यांचे ज्ञान लोकांना सुलभपणे (होईल). (३०५) काही तज्ज्ञ हिच्यात तेराच सारिका योजतात. अशी ही मोठी किंनरी शार्ङ्गदेवाने सांगितली आहे. (३०६)

ही मोठी किंनरी होय.

मध्यम (किंनरीत) दांडीची लांबी त्रेचाळीस अंगुळे व घेर दोन यव कमी सहा अंगुळे दिसून येतो. (३०७)

साडेतीन अंगुळे विस्ताराची पुढची लांबी असणारे ककुभाचे मस्तक (असावे). ककुभाच्या दांडीचा तीन अंगुळे (एवढा भाग) वीणेच्या दांडीत बसवावा. (३०८)

तिचा इतका भाग बाकी ठेवावा की त्या राहिलेल्या भागातील दांडीचे टोक व मस्तकाचा मध्यभाग यांतील सारिकेचे स्थान असणारे अंतर तीन अंगुळांत एकतृतीयांश अंगुळ कमी (म्हणजे २$\frac{2}{3}$ अंगुळे) या मापाचे होईल. दांडीच्या शेवटी सारिकेची उंची दोन अंगुळांत एक यव कमी असावी. (३०९, ३१०)

तदर्धो मेढकोपान्त्ये सारीणामन्तरं त्विह ।
प्रथमं प्रथितं प्राज्ञैः सार्धाङ्गुलचतुष्टयम् ॥ ३११ ॥
द्वितीयमन्तरं मेयं सयवैरङ्गुलैस्त्रिभिः ।
तृतीयं तु तृतीयांशाभ्यधिकैस्त्रिभिरङ्गुलैः ॥ ३१२ ॥
चतुर्थं त्र्यङ्गुलं प्रोक्तं पञ्चमं सारिकान्तरम् ।
यवाधिकाभ्यां सार्धाभ्यामङ्गुलाभ्यां मितं मतम् ॥ ३१३ ॥
षष्ठं यवद्वयन्यूनद्व्यङ्गुलं सप्तमं पुनः ।
सयवार्धाङ्गुलद्वन्द्वमष्टमं[३३] त्वङ्गुलद्वयम् ॥ ३१४ ॥
अङ्गुलं सयवद्वन्द्वं नवमं दशमं पुनः ।
यवोनमङ्गुलद्वन्द्वमन्तरात्रितयं पुनः ॥ ३१५ ॥
इतः परस्याः प्रत्येकं सपादाङ्गुलसंमितम् ।
विशेषोऽयमिहान्यत्तु लक्ष्म स्याद् बृहतीगतम् ॥ ३१६ ॥

इति मध्यमा किंनरी

मेढकाच्या जवळची (सारिकेची उंची) त्याच्या अर्धी असावी. या (वीणेत) तज्ज्ञांनी सारिकांचे पहिले अंतर साडेचार अंगुळे घोषित केले आहे. (३११)

दुसरे अंतर एक यव व तीन अंगुळे मापाचे असावे. तिसरे ३$\frac{1}{3}$ अंगुळांनी (होते). (३१२)

चवथे तीन अंगुळांचे सांगितले आहे. पाचवे सारिकेचे अंतर २$\frac{1}{2}$ अंगुळे व एक यव मापाचे मानले आहे. (३१३)

सहावे दोन अंगुळात दोन यव कमी व सातवे दोन अंगुळे व अर्धा यव आणि आठवे दोन अंगुळे (मापाचे असावे). (३१४)

नववे एक अंगुळ व दोन यव आणि दहावे दोन अंगुळांत एक यव कमी (असावे). या पुढच्या सारिकांची तीन अंतरे प्रत्येकी १$\frac{1}{4}$ अंगुळ प्रमाणाची मानली आहेत. या (वीणेतील) हा विशेष (होय). बाकीचे लक्षण मोठ्या (किंनरी) संबंधीचे होय. (३१५, ३१६)

ही मध्यम किंनरी होय.

---

३३. सुधाकर टीका : 'सातवे अंतर अडीच अंगुळे व यव.'

लघ्वीदण्डगतं दैर्घ्यं स्यात्पञ्चत्रिंशदङ्गुलम् ।
परिधिस्तु तृतीयांशाभ्यधिकाङ्गुलपञ्चकः ॥ ३१७ ॥
अङ्गुलत्रयविस्तारं ककुभस्य शिरो भवेत् ।
पूर्ववत्काकुभो दण्डो वीणादण्डे निधीयते ॥ ३१८ ॥
परिशेषस्तथा सा स्याद्यथा दण्डान्ततन्त्रिका ।
आ ककुभशिरोमध्याद्भवेत्त्र्यङ्गुलसंमिता ॥ ३१९ ॥
दण्डान्ते सारिकोत्सेधः स्यात्सार्धाङ्गुलसंमितः ।
तदर्धे मेढकोपान्ते तत्राद्यं सारिकान्तरम् ॥ ३२० ॥
प्रोक्तं यवेनाभ्यधिकैश्चतुर्भिर्मितमङ्गुलैः ।
द्वितीयं द्वियवोपेताङ्गुलद्वन्द्वमितं भवेत् ॥ ३२१ ॥
यवोनाभ्यामङ्गुलीभ्यां तृतीयं मीयते बुधैः ।
पादोनत्र्यङ्गुलं तुर्यमथ पञ्चममन्तरम् ॥ ३२२ ॥
यवार्धोनाङ्गुलद्वन्द्वं षष्ठं सार्धाष्टभिर्यवैः ।
सप्तमं तु यवोनेनाङ्गुलद्वन्द्वेन मीयते ॥ ३२३ ॥
सार्धाङ्गुलं त्वष्टमं स्यान्नवमं त्वष्टभिर्यवैः ।
दशमैकादशे प्रोक्ते सपादाङ्गुलके पृथक् ॥ ३२४ ॥

लहान (किंनरीच्या) दांडीची लांबी पस्तीस अंगुळे व घेर ५$\frac{1}{2}$ अंगुळे असतो. (३१७)

ककुभाचे मस्तक तीन अंगुळे विस्ताराचे असते. पूर्वीप्रमाणे ककुभाची दांडी वीणेच्या दांडीत बसविली जाते. (३१८)

शिल्लक राहिलेला भाग एवढा असावा की ज्यामुळे दांडीच्या शेवटी असणारी तार ककुभाच्या मस्तकाच्या मध्यापासून तीन अंगुळे मापाची होईल. (३१९)

दांडीच्या शेवटी सारिकेची उंची १$\frac{1}{2}$ अंगुळ प्रमाणाची असावी. मेढकाच्या जवळ ती त्याच्या अर्ध्याने (असावी). त्यात सारिकेचे पहिले अंतर (३२०) चार अंगुळे व एक यव मापाचे सांगितले आहे. दुसरे दोन अंगुळे व दोन यव प्रमाणाचे असते. (३२१)

जाणकारांनी तिसरे (अंतर) दोन अंगुळांत एक यव कमी या मापाचे दिले आहे. चवथे २$\frac{3}{4}$ अंगुळांचे व पाचवे अंतर (३२२) दोन अंगुळांत अर्धा यव कमी (आणि) सहावे ८$\frac{1}{2}$ यव (प्रमाणाचे असते). सातवे दोन अंगुळांत एक यव कमी या मापाचे असते. (३२३) आठवे १$\frac{1}{2}$ अंगुळाचे व नववे आठ यवांचे असते. दहावे व अकरावे (प्रत्येकी) वेगवेगळे १$\frac{1}{4}$ अंगुळाचे सांगितले आहे. (३२४)

यवन्यूनाङ्गुलमितं द्वादशं च त्रयोदशम् ।
अन्यत्तु लघुकिंनर्या लक्ष्म पूर्ववदिष्यते ॥ ३२५ ॥

इति लघ्वी किंनरी

न बृहत्यधिकं मानं न हीनं त्रिंशदङ्गुलात् ।
आदर्तव्यं किंनरीणां रक्तिमाधुर्यवर्जनात् ॥ ३२६ ॥
एतयोरन्तराले तु यथेष्टं मानकल्पना ।
शक्ता विवेक्तुमत्रापि स्वरस्थानानि तद्विदः ॥ ३२७ ॥
प्रदर्शनार्थं केषांचिद्रागाणां वादनक्रमम् ।
अस्यां किंनरवीणायां वक्ति श्रीकरणेश्वरः ॥ ३२८ ॥
स्थायिनं मध्यमं मन्द्रं मध्यं वा स्थायिनः परान् ।
आरुह्य पनिसान्पञ्चावरोह्य क्रमतः स्वरान् ॥ ३२९ ॥
षड्जतः स्थायिपर्यन्ताद्यदाहन्यात्तु धैवतम् ।
मध्यमादेः समाख्यातं स्वस्थानं प्रथमं तथा ॥ ३३० ॥

बारावे व तेरावे एक अंगुळात एक यव कमी या प्रमाणाचे (असते). लहान किंनरीच्या बाबतीत बाकीचे लक्षण पूर्वीप्रमाणे (म्हणजे मोठ्या किंनरीत सांगितल्याप्रमाणे) मानले आहे. (३२५)

ही लहान किंनरी होय.

किंनरींच्यासंबंधी मोठ्या (किंनरी) पेक्षा जास्त (लांबीच्या) प्रमाणाचा (तसेच) तीस अंगुळांपेक्षा कमी प्रमाणाचा आदर करू नये. (तसे प्रमाण योजले असता) रंजकता व मधुरपणा यांचा लोप होतो. (३२६)

या दोन्हींच्या (म्हणजे मध्यम व लहान किंनरींच्या) (स्वरस्थानांच्या) अंतराबाबत प्रमाण योजण्याची कल्पना स्वेच्छेने (करून), त्यातले जाणकार या (वीणांत)ही स्वरांच्या स्थानांचा निश्चय करण्यास समर्थ असतात. (३२७)

उदाहरणादाखल काही रागांचा वादनक्रम या किंनरी वीणेत श्रीकरणेश्वर (शार्ङ्गदेव) सांगत आहे. (३२८)

मंद्र मध्यम किंवा मध्य मध्यम स्थायी स्वर योजून, (त्या) स्थायीच्या वरच्या प, नि, स या (स्वरांवर) आरोह करून (नंतर) क्रमाने षड्जापासून स्थायी स्वरापर्यंत पाच स्वर अवरोह करून, जेव्हा धैवत आघातयुक्त (म्हणजे गमकयुक्त) योजतात तेव्हा ते मध्यमादीचे पहिले स्वस्थान म्हटले आहे. (३२९, ३३०). तसेच पुढच्या तीन स्वस्थानां-

---

क० आता, काही सध्याच्या प्रसिद्ध रागांचा वादनक्रम किंनरी वीणेत दाखवण्यासाठी ग्रंथकार सांगत आहे– त्यात प्रथम मध्यमादीच्या चार स्वस्थानातील स्वरयोजना सांगत आहे. मंद्र किंवा मध्य मध्यम स्थायी करून, त्या स्थायी मंद्र मध्यमापासून किंवा मध्य

द्व्यर्धमर्धस्थितं तद्वदारुह्य द्विगुणं स्वरम् ।
आद्यं स्वस्थानमातिष्ठेत्स्वस्थानत्रितये परे ॥ ३३१ ॥
असंभवे पूर्वपूर्वस्वरस्य तु परं परम् ।
क्रमेण स्वरमारोहेत्सर्वरागेष्विति स्थितिः ॥ ३३२ ॥

इति मध्यमादिः

किंनरीवादकाः प्रायः स्थायिनं पञ्चमस्वरम् ।
रागे कुर्वन्ति बङ्गाले तदज्ञानविजृम्भितम् ॥ ३३३ ॥

तील (दुसऱ्या स्वस्थानात) द्व्यर्ध स्वरापर्यंत (म्हणजे स्थायीपासून चवथ्या स्वरापर्यंत) आरोह करून, (तिसऱ्या स्वस्थानात) अर्धस्थित स्वरापर्यंत (म्हणजे द्व्यर्ध आणि दुप्पटीचा यांमधील स्वरापर्यंत) आरोह करून आणि (चवथ्या स्वस्थानात) दुप्पटीच्या (म्हणजे स्थायीपासून आठव्या) स्वरापर्यंत आरोह करून पहिले स्वस्थान (परत) योजावे (३३१).

(वर्ज्य असल्याने) पूर्व पूर्व स्वर संभवत नसेल तर (त्याच्या) वरच्या वरच्या स्वरापर्यंत क्रमाने आरोह करावा. सर्व रागांत अशी स्थिति (जाणावी). (३३२)

हा मध्यमादि होय.

किंनरीवादक सामान्यतः बंगाल रागात पंचम स्वर स्थायी करतात. ते अज्ञानप्रदर्शक होय. (३३३)

मध्यमापासून वरच्या प नि स या स्वरांपर्यंत आरोह करावा. स्थायी म्हणजे रागाचे स्थान असा अर्थ. तसे स्थायीचे लक्षण पूर्वीच सांगितले आहे; ते असे : 'ज्या स्वरावर राग स्थापित होतो तो स्थायी म्हटला जातो.' या सांगितलेल्या आरोहावरून या रागात धैवत व त्याचा संवादी ऋषभ हे स्वर वर्ज्य असल्याचे जाणावे. क्रमाने षड्जापासून स्थायीपर्यंत स नि ध प म असा पाच स्वरांचा अवरोह करावा. यावरून अवरोहात क्वचित वर्ज्य स्वराचेही उच्चारण रागहानी न करणारे आहे असे समजावे. धैवत स्वर आघातयुक्त म्हणजे गमकयुक्त योजावा. तेव्हा हे मध्यमादीचे पहिले स्वस्थान होते. पुढच्या तीन स्वस्थानांत म्हणजे दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या स्वस्थानात असा अर्थ घ्यायचा. दुसऱ्यात द्व्यर्ध स्वरापर्यंत आरोह करावा. द्व्यर्ध म्हणजे स्थायीपासून चवथा स्वर. तिसऱ्यात अर्धस्थित स्वरापर्यंत आरोह करावा. अर्धस्थित म्हणजे द्व्यर्ध व दुप्पटीचा यांमधील स्वर. चवथ्यात दुप्पटीच्या म्हणजे स्थायीस्वरापासून आठव्या स्वरापर्यंत आरोह करावा. त्या त्या स्वरापर्यंत आरोह करून याचा अर्थ असा की द्व्यर्ध इत्यादी स्वरावर थांबून राग प्रदर्शित करावा. (नंतर) परत पहिले स्वस्थान योजावे. सर्व रागांना समान नियम दाखवीत आहे—मागचा मागचा स्वर न संभवणे हे तो वर्ज्य असल्याने जाणावे. (३२८ ते ३३२)

क० आता बंगाल नावाच्या देशी रागप्रकारासंबंधी लक्ष्य (म्हणजे प्रचार) व (शास्त्रात सांगितलेले) लक्षण यांमधील विरोध उपस्थित करून तो ग्रंथकार दूर करीत आहे—

ग्रहो हि मध्यमो रागस्यास्य शास्त्रे प्रकीर्तितः ।
यद्वा लक्ष्यप्रधानानि शास्त्राण्येतानि मन्वते ॥ ३३४ ॥
तस्माल्लक्ष्यविरुद्धं यत्तच्छास्त्रं नेयमन्यथा ।
मध्यमादिपदं ज्ञेयं पञ्चमाद्युपलक्षणम् ॥ ३३५ ॥
प्राथम्यसाम्यतो यद्वा नियमादृष्टकल्पना[३४] ।
मध्यमादिग्रहे कार्या नन्वस्मिन्मध्यमे ग्रहे ॥ ३३६ ॥

या रागाचा ग्रह शास्त्रात मध्यम सांगितला आहे. किंवा ते ही शास्त्रे लक्ष्य मुख्य असणारी अशी मानतात. (३३४)

म्हणून जे शास्त्र लक्ष्याला विरोध असेल ते बदलून (लक्ष्याप्रमाणे) योजावे. पहिले असणे या सारखेपणामुळे मध्यम इत्यादि शब्द पंचम इत्यादीचा निदर्शक जाणावा. अथवा नियमामुळे मध्यम इत्यादी ग्रहाच्या बाबतीत अदृष्ट फळाची कल्पना करावी. पण या मध्यम ग्रहात खालचा स्वर गांधार असतो व पंचम ग्रहात मध्यम असतो. अशा रीतीने चवथा इत्यादींची विरुद्धता असताही रागसाम्य कसे होईल ? (३३५, ३३६, ३३७)

काही किंनरीवादक सामान्यतः बंगाल रागात पंचम स्वर स्थायी म्हणून योजतात, ते त्यांच्या अज्ञानाचे प्रदर्शन होय. म्हणजे त्यांना लक्षणाचे पूर्ण ज्ञान नसल्याने त्यांनी योजलेला लक्ष्याचा प्रयोग प्रमाणरहित होय. त्याचे शास्त्रात सांगितलेले लक्षण दाखवीत आहे– याचा ग्रह शास्त्रात मध्यम सांगितला आहे. या प्रमाणे लक्षणाशी येत असलेल्या विरोधामुळे लक्ष्याची अयोग्यता सांगून विषयव्यवस्थेच्या दृष्टीने लक्ष्याचेच मुख्यत्व येथे (म्हणजे या देशी रागांच्या बाबतीत) दाखवीत आहे. ही देशीविषयक शास्त्रे लक्ष्याचे मुख्यत्व असलेली होत असे आचार्य मानतात. त्या कारणाने लक्ष्याच्या विरुद्ध असे जे बंगाल इत्यादी रागांचे मध्यम इत्यादी ग्रह सांगणारे शास्त्र ते लक्ष्याला विरोधी न होईल अशा तऱ्हेने मांडावे. (३३३ ते ३३५–)

ते कसे मांडावे ते दाखवीत आहे–

मध्यम इत्यादि शब्द पंचम इत्यादीचा निदर्शक मानावा. तो पंचम इत्यादीचा निदर्शक मानण्यामागील कारण सांगत आहे. ते म्हणजे प्राथम्यसाम्य हे होय. याचा अर्थ असा– मूर्च्छनांचे

---

३४. लक्ष्यात म्हणजे प्रचारात या रागात पंचम स्वर स्थायी दिसून येतो व शास्त्रात मध्यम स्वर स्थायी म्हणून सांगितला आहे. हा विरोध दूर करण्याचा एक मार्ग म्हणून शास्त्रातले विधान नियमवाक्य समजावे असे शाङ्गदेवाने सांगितले आहे व हा नियमविधि अदृष्ट फळासाठी समजावा असे म्हटले आहे. नियमविधि हा मीमांसकांनी मानलेला वाक्यप्रकार होय. एक क्रिया अनेक साधनांनी करता येते. त्यातले जे साधन प्राप्त असते ते न घेता अप्राप्त साधन स्वीकारण्याचे विधान नियमविधीत असते. उदा० 'मंत्रांनीच स्मरण करावे' हे वैदिक वाक्य नियमविधीचे होय. यागाच्या अनुष्ठानात करायचे अर्थस्मरण ब्राह्मणवाक्यांनी करता येते किंवा मंत्रांनी करता येते. अशा वेळी ब्राह्मणवाक्यांचा प्राप्त पक्ष न स्वीकारता अप्राप्त असा 'मंत्रांनीच अर्थस्मरण करावे' असा नियम या वाक्याने शास्त्रात विहित केला आहे. अर्थात शास्त्राच्या या नियमामुळे

अधस्तनः स्याद्गान्धारो मध्यमः पञ्चमे ग्रहे ।
तुर्यादिव्यत्ययेऽप्येवं रागसाम्यं कथं भवेत् ॥ ३३७ ॥
निःशङ्कोऽत्र समाधत्ते गान्धाराद्यप्रयोजकम् ।
किंतु स्थायिनमारभ्य ये स्युस्तुर्यादयः स्वराः ॥ ३३८ ॥
रागाभिव्यक्तिशक्ताः स्युर्ननु शास्त्रेष्वनर्थिका ।
षड्जाद्युक्तिः प्रसज्येत सत्यं तत्रोच्यते त्विदम् ॥ ३३९ ॥
मध्यमादिग्रहः शास्त्रे नियतस्तदपेक्षया ।
तुर्यादयो निषादाद्या भवन्तीत्युपपाद्यते ॥ ३४० ॥

निःशंक (शार्ङ्गदेव) या विषयी समाधान करत आहे. (मध्यम ग्रह असता) गांधार (खालचा स्वर असणे) इत्यादी अप्रयोजक होय. परंतु स्थायी स्वराला आरंभ करून जे चवथा इत्यादी स्वर असतात ते रागाची अभिव्यक्ति करण्यास समर्थ असतात; पण षड्ज इत्यादि वचन शास्त्रांत निरर्थक ठरण्याचा प्रसंग येईल ? खरे आहे. त्या बाबतीत (आम्ही) हे म्हणतो की मध्यम इत्यादि ग्रह शास्त्रात निश्चित आहे. त्याच्या अपेक्षेने चवथा इत्यादी निषाद इत्यादी होतात हे (म्हणणे) योग्य होय. (३३८,३३९,३४०)

स्वरूप सांगण्याच्या वेळी 'षड्जाच्या जागी असणाऱ्या निषाद इत्यादींनी दुसरे आचार्य रजनी इ. (मूर्च्छना) जाणतात' असे जे सांगितले आहे ते देशीगानाचा विस्तार लक्षात ठेवूनच. त्यावरून देशीमध्ये षड्जाच्या जागीच निषाद इत्यादींचा समावेश केला जातो. तेव्हा सर्वांचे प्रथम असणे हे स्वरूप समान होते. म्हणून प्रथम असणे या समानतेच्या कारणाने मध्यम इत्यादि शब्द पंचम इत्यादीचा निदर्शक होतो. म्हणून देशी रागस्वरूप असलेल्या या बंगालाच्या लक्षणात ग्रह म्हणून मध्यम असल्याचे सांगणे लक्ष्यात प्रसिद्ध असलेल्या पंचमाचे निदर्शक होते. अशा रीतीने, लक्ष्याचे मुख्यत्व असल्याने त्याविरोधी असणारे लक्षण त्याच्या प्रमाणे योजावे असे मानावे. दुसऱ्या मतानुसार विरोध दूर करण्यासाठी सांगत आहे. किंवा बंगाल इत्यादींच्या मध्यम इत्यादी ग्रहासंबंधी, लक्ष्यात प्रसिद्ध असलेले पंचम इत्यादींचे ग्रहस्वरूप दूर सारून, शास्त्रात सांगितलेले मध्यम इत्यादींचे ग्रहस्वरूप योजले असता, ग्रहाच्या बाबतीत नियमामुळे प्राप्त होणाऱ्या अदृष्ट फळाची कल्पना करावी. येथे रंजकतेचा लाभ हेच दृष्ट फळ आहे. ते ज्या त्या

अदृष्ट फळ प्राप्त होते असे मानावेच लागते. चालू विषयाच्या बाबतीत या नियमविधीचे स्पष्टीकरण असे– इच्छेनुसार कोणतातरी स्वर म्हणजे म किंवा प स्थायी योजल्याने राग उत्पन्न होईलच. लक्ष्यात पंचम स्वर स्थायी योजीत असल्याने रंजकतेचा लाभ होतो हे दृष्ट फळ होय. संगीत शास्त्रातील मध्यम स्वर स्थायी योजण्याचे विधान नियमविधीचे मानल्याने त्याचे अदृष्ट फळ मानावे. ज्याचे दृष्ट फळ दिसून येत नाही असे शास्त्रातले विधान अदृष्ट फळासाठी असते असे मीमांसक मानतात.

(पहा– सं. रं. भाग १ पृ. ११९ तळटीप २१ आणि सं. र. भा. १ पृ. १५९–१६० तळटीप १३).

ग्रहांशन्यासनियमो यद्वा शास्त्रस्य गोचरः ।
गुम्फः स्वरान्तराणां तु लक्ष्यस्थो न विरुध्यते ॥ ३४१ ॥
सर्वत्र परिहारोऽयं लक्ष्ये लक्ष्माविरोधिनि ।
देशीरागेषु निर्णीतः शार्ङ्गदेवेन सूरिणा ॥ ३४२ ॥

अथवा ग्रह, अंश व न्यास यांविषयीचा नियम शास्त्राचा विषय (होय), पण लक्ष्यात (म्हणजे प्रचारात) असणारी इतर स्वरांची गुंफण विरोधी ठरत नाही. (३४१)

लक्षणाला विरोधी नसणाऱ्या लक्ष्याच्या विषयी हा परिहार सर्वत्र देशीरागांत विद्वान शार्ङ्गदेवाने निश्चित केला आहे. (३४२)

तऱ्हेने होतेच कारण स्थानाचे स्वरूप एक असते. असा नियम नसण्याचा प्रसंग प्राप्त झाला असता शास्त्राने नियमाचे विधान केले आहे. त्या नियमाच्या योगाने अदृष्ट फळ प्राप्त होते. म्हणून नियमाचे पालन केल्याने जास्त असे अदृष्ट फळ मिळते. जसे पूर्वेकडे तोंड करून जेवणे यामुळे (प्राप्त होते), तसे बंगालाचा ग्रह मध्यम योजल्याने जास्त असे अदृष्ट फळ मिळते. ह्या मताचा अवलंब करून सांगत आहे की बंगाल रागात मध्यम स्वर ग्रह असता त्या मध्यमाच्या खालचा गांधार असतो व पंचम ग्रह असता त्या पंचमाच्या खालचा मध्यम असतो. अशा रीतीने दोन्ही मतांच्या बाबतीत (स्पष्टीकरण होय). मध्यम ग्रह असता निषाद चवथा होतो व पंचम ग्रह असता षड्ज चवथा होतो. 'आदि' (म्हणजे इत्यादि) या शब्दाने अर्धस्थित आठवा इत्यादी घ्यायचे. याप्रमाणे सर्व स्वरांची उलटापालट होत असता रागाचे स्वरूप समान कसे राहील असा आक्षेप घेऊन त्याचे समाधान करण्यासाठी सांगत आहे–

मध्यम ग्रह असता गांधार हा खालचा स्वर, तसेच 'आदि' (म्हणजे इत्यादि) या शब्दावरून पंचम ग्रह असता मध्यम हा खालचा स्वर हे सर्व अप्रयोजक म्हणजे रागाभिव्यक्तीला कारणीभूत न होणारे होय. पण स्थायीपासून म्हणजे षड्जाच्या जागी असलेल्या स्वरापासून आरंभ करून, त्या त्या स्थानाच्या मुख्यत्वानुसार त्या त्या ग्रहाप्रमाणे असणारे खालील (तसेच) चवथा इत्यादी स्वर रागाचा आविष्कार करण्यास समर्थ असतात हे उत्तर होय. असे जर असेल तर शास्त्रांत सांगितलेले षड्ज इत्यादींचे विधान निरर्थक ठरण्याचा प्रसंग उत्पन्न होतो. अशी शंका ग्रंथकार घेत आहे व ती अर्ध्याचा स्वीकार करून दूर करीत आहे. षड्ज इत्यादींचे विधान म्हणजे षड्ज इत्यादी ग्रह इत्यादी असण्याचे विधान. या बाबतीत रंजकता प्राप्त होणे या स्वरूपाच्या दृष्ट फलासाठी स्थानच प्रयोजक (म्हणजे कारणीभूत) असल्याने त्याकरता षड्ज इत्यादींचे विधान निरर्थक होय एवढा भाग स्वीकारला आहे. तरीही ते (विधान) निरर्थक नाहीही. अदृष्ट फलाच्या दृष्टीने शास्त्रात मध्यम इत्यादी निश्चित केले असल्याने ती शंका (त्या पुरती) दूर होते. शास्त्रात निश्चित केलेल्या मध्यम इत्यादी ग्रहांच्या दृष्टीने निषाद इत्यादी चवथा इत्यादी होतात (३३५–३४०)

दुसऱ्या प्रकारानेही निरर्थक स्वरूप (असण्याची शंका) दूर करण्यासाठी सांगत आहे–

ग्रह, अंश व न्यास यांचाच नियम शास्त्राचा विषय होय. लक्ष्यात असणारी स्वरान्तरांची गुंफण (म्हणजे इतर स्वरयोजना) विरोधी ठरत नाही. स्वरांतरे म्हणजे ग्रह, अंश व न्यास या खेरीजचे अपन्यास इत्यादी तसेच अंतरमार्गाचे स्वर होत. त्यांची लक्ष्यात असणारी गुंफण

मध्यमं स्थायिनं कृत्वा गान्धारात्तदधस्तनात् ।
पञ्चारुह्य निषादान्तान् गपर्यन्तावरोहणम् ॥ ३४३ ॥
कृत्वा स्थायिनिषादौ च विधायाहत्य धैवतम् ।
स्थाप्यन्तमवरोहेच्चेद्बङ्गालो जायते तदा ॥ ३४४ ॥

इति बङ्गालः

धैवतं स्थायिनं कृत्वा तृतीयं च चतुर्थकम् ।
तस्मात्कृत्वावरोहेण स्थायिपर्यन्तमेत्य च ॥ ३४५ ॥

मध्यम स्वर स्थायी करून, त्या खालच्या गांधारापासून निषादाअखेर पाच स्वर आरोह करून, गांधारापर्यंत अवरोह (३४३) करावा. (मग) स्थायी स्वर व निषाद योजून, धैवतावर आघात करून स्थायी स्वराअखेर अवरोह करावा. (अशी योजना केली जाते) तेव्हा बंगाल राग निर्माण होतो. (३४४)

हा बंगाल होय.

धैवत स्थायी करून त्यापासून तिसरा व चवथा स्वर अवरोहाने घेऊन व स्थायीपर्यंत

शास्त्राला विरोधी ठरत नाही अशी ही अर्ध्यभागाचा स्वीकार करून शंका दूर करता येते. हा सांगितलेला शंका दूर करण्याचा मार्ग इतरत्रही योजावा. रागांग, भाषांग, क्रियांग व उपांग राग देशी राग म्हणून पूर्वी सांगितले आहेत. त्यांच्या बाबतीत हा विरोध दूर करण्याचा मार्ग निश्चित केला आहे. शुद्धसाधारित इत्यादी ग्रामरागांत, मार्गरागस्वरूपाच्या योगाने लक्षणच मुख्य असल्याने, त्यानुसार लक्ष्य योजायचे असल्यामुळे विरोध प्राप्त होतच नाही; तेव्हा तो दूर करण्याचा संभव कोठून असा अभिप्राय समजावा. उवा० मूर्च्छनांचे लक्षण सांगताना–

'मध्यस्थानच्या षड्जाने पहिली मूर्च्छना आरंभिली जाते; त्या खालच्या निषाद इत्यादीनी बाकीच्या सहा मूर्च्छना क्रमाने होतात' असे म्हटले आहे. (सं० र० १–४–१२, १३)

तसेच 'मध्यस्थानच्या मध्यमापासून आरंभ करून सौवीरी मूर्च्छना होते; त्याच्या खालच्या खालच्या स्वरापासून आरंभ करून बाकीच्या सहा क्रमाने होतात' असे म्हटले आहे. (सं. रं. १–४–१३, १४) असा जाती इत्यादींच्या अंतरभाषाविषयक अंतरमार्गाचा विषय म्हणून जो पक्ष सांगितला त्यामध्ये षड्ज इत्यादी ग्रह असणे या म्हणण्याचे भिन्न स्वरूप संभवत नसल्याने विरोध उत्पन्नच होत नाही. (३४१–३४२)

या रीतीने देशी रागांच्या संबंधी लक्ष्य व लक्षण यांमधील विरोध दूर करून प्रस्तुत विषय पुढे चालू करणारा ग्रंथकार बंगाल रागाची स्वरयोजना दाखवीत आहे–

मध्यम स्वर स्थायी म्हणून योजून त्या खालच्या गांधारापासून पाच स्वर म्हणजे ग म प ध नि असा आरोह करावा. मग गपर्यंत (नि ध प म ग) असा अवरोह करून स्थायी (म्हणजे म) व नि योजून, धैवत आहत या गमकाने युक्त योजावा. नंतर मध्यमापर्यंत अवरोह करावा. अशी स्वरयोजना केली असता बंगाल राग उत्पन्न होतो. हे बंगालाचे पहिले स्वस्थान होय. बाकीची तीन स्थाने मध्यमादीत सांगितल्याप्रमाणे तर्काने जाणून योजावी. (३४३–३४४)

क० आता भैरव राग सांगत आहे. लक्षणात धैवत स्थायी सांगितला आहे. लक्ष्यात निषाद स्थायी मानला आहे. (३४५, ३४६)

तृतीयं च ततोऽधस्थं विधाय स्थायिनं व्रजेत् ।
यदा तदा भैरवः स्याल्लक्ष्ये स्थायी निरिष्यते ॥ ३४६ ॥
इति भैरवः

स्थायिनो धैवतात्पूर्वं स्वरमागत्य तत्परान् ।
पञ्चानारुह्य तुर्यं च द्वितीयं द्विः प्रयुज्यते ॥ ३४७ ॥
स्थायिनि न्यस्यते रागो वराटी जायते तदा ।
लक्ष्ये तु दृश्यते स्थायी किंनर्यामृषभस्वरः ॥ ३४८ ॥
इति वराटी

स्थायिनं मध्यमृषभं कृत्वा द्वौ तदधस्तनौ ।
गत्वा स्थायिनमारभ्य त्रीनारुह्यावरुह्य तु ॥ ३४९ ॥
पञ्च स्वरान्न्यस्यते चेदृषभे गुर्जरी तदा ।
ग्रहो गान्धार एवास्या दृश्यते लक्ष्यगोचरे ॥ ३५० ॥
इति गुर्जरी

(आरोहाने) येऊन (३४५) मग त्या खालचा तिसरा (म्हणजे मध्यम स्वर) योजून स्थायी स्वराला जावे. तेव्हा भैरव (राग) होतो. लक्ष्यात निषाद स्थायी मानला आहे. (३४६)

हा भैरव होय.

स्थायी (म्हणून योजलेल्या) धैवताच्या पूर्वीच्या (म्हणजे पंचम) स्वरावर येऊन, त्या पुढच्या पाच स्वरांचा आरोह करून, चवथा व दुसरा दोन वेळा योजला जातो; (३४७) (व) स्थायीवर न्यास (म्हणजे शेवट) केला जातो तेव्हा वराटी राग उत्पन्न होतो. लक्ष्यात मात्र ऋषभ हा स्वर स्थायी म्हणून दिसून येतो. (३४८)

हा वराटी होय.

मध्य ऋषभ स्थायी करून, त्याच्या खालच्या दोन स्वरांपर्यंत जाऊन, स्थायीपासून आरंभ करून तीन स्वर आरोहाने घेऊन व पाच स्वर अवरोहाने घेऊन ऋषभावर न्यास केला जातो तेव्हा ती गुर्जरी (होय). लक्ष्यात हिचा गान्धार हाच ग्रह दिसून येतो. (३४९, ३५०)

ही गुर्जरी होय.

या पुढे, ' धैवत या स्थायी स्वराच्या पूर्वीचा ' या पासून ते ' या प्रमाणे काही राग (सांगितले आहेत) ' या पर्यंतच्या ग्रंथभागात दिलेली वराटी इत्यादी रागांची स्वरयोजना सांगितल्या प्रकाराने जाणावी. या प्रकरणात स्थायी हा ग्रह याचा पर्यायशब्द म्हणून मानावा. कोठेही ग्रह इत्यादीपेक्षा अतिरिक्त असा अंश संभवत असला तरी त्याचा पर्याय म्हणून नव्हे.

मध्यषड्जाद् ग्रहात्पूर्वं स्वरमेत्य तृतीयकम् ।
तुर्यं चोक्त्वा द्वितीयादींस्त्रीनारुह्यावरुह्य च ॥ ३५१ ॥
ग्रहन्यासाद्वसन्तः स्याल्लक्ष्ये त्वस्यर्षभो ग्रहः ।

इति वसन्तः

मध्यषड्जं ग्रहं कृत्वा तृतीयं च चतुर्थकम् ॥ ३५२ ॥
उक्त्वा द्वितीयतृतीयौ स्पृष्ट्वा तुर्यं च पञ्चमम् ।
एतत्क्रमेणावरोहस्त्यक्त्वा स्थायिद्वितीयकम् ॥ ३५३ ॥
स्थायिपूर्वान्तमागत्य ग्रहं तस्मात्तृतीयकम् ।
तुर्यं ततस्तृतीयं च प्रोच्यते न्यस्यते ग्रहे ॥ ३५४ ॥
धन्नासी[३५] स्यात्तदा दृष्टो लक्ष्ये स्यात्पञ्चमो ग्रहः ।

इति धन्नासी

मध्य षड्ज या ग्रहाच्या पूर्वीच्या स्वरावर येऊन, तिसरा व चवथा स्वर म्हणून, दुसऱ्यापासून आरंभ करून तीन स्वर आरोहाने व अवरोहाने घेऊन (३५१) ग्रहावर न्यास केल्याने वसंत (राग) होतो. लक्ष्यात याचा ग्रह ऋषभ (दिसून येतो). (३५२–)

हा वसंत होय.

मध्य षड्ज ग्रह योजून, तिसरा व चवथा स्वर (३५२) म्हणून, दुसरा, तिसरा, चवथा व पाचवा स्वर यांना स्पर्श करून, या क्रमाने स्थायीपासून दुसरा स्वर सोडून अवरोह (करावा). (३५३) (मग) स्थायीच्या पूर्वीच्या स्वरावर येऊन, ग्रह, त्यापासून तिसरा, चवथा नंतर तिसरा म्हटला जातो आणि ग्रहावर न्यास केला जातो (३५४) तेव्हा धन्नासी[३५] होते. लक्ष्यात हिचा ग्रह पंचम दिसून येतो. (३५५ –)

ही धन्नासी होय.

नाहीतर येथे स्थायी व ग्रह यांचा वेगळेपणा स्वीकारल्यास, ' गुर्जरीत स्थायी ऋषभ करून ' असे सांगून 'हिचा ग्रह लक्ष्यात गांधार दिसून येतो' असे म्हटले आहे. तसेच देशी नावाच्या रागात, 'ऋषभ स्थायी करून' असे म्हणून ' देशीजाणकारांत देशीचा ग्रह गांधार दिसून येतो' असे सांगितले आहे; त्याप्रमाणे देशाख्य नावाच्या रागात ' स्थायी मध्यगांधार करून ' असे म्हणून ' लक्ष्यात हिचा ग्रह मध्यम दिसून येतो ' असे सांगितले आहे; या अशा विधानांत लक्ष्य व लक्षण यांचा विरोध मानणे अयोग्य ठरेल. आणि बंगालरागात किंनरीवादक पंचम स्वर स्थायी म्हणून योजतात इत्यादीच्या आक्षेपपरंपरेची, ' या रागाचा ग्रह शास्त्रांत मध्यम सांगितला आहे ' इत्यादी विधानाने मोठ्या प्रयत्नाने केलेली परिहारपरंपरा निरर्थक होईल. म्हणून येथे ग्रह हाच स्थायी व स्थायी हाच ग्रह मानावा. बाकीचे स्पष्ट आहे. (३४७–४००)

---

३५. हिचे नाव धनाश्री असे सुधाकरटीकेत दिले आहे.

ऋषभं स्थायिनं कृत्वा परं स्पृष्ट्वा ततः परम् ॥ ३५५ ॥
विलम्ब्य तुर्यमान्दोल्य स्पृष्ट्वा तुर्याधस्तनौ ।
ग्रहान्निःसरणं कृत्वा परौ प्रोच्य द्वितीयकम् ॥ ३५६ ॥
एत्य स्थायिनि चेन्न्यासो देशीरागस्तदा भवेत् ।
गान्धारस्तु ग्रहो देश्यां देशीवेदिषु दृश्यते ॥ ३५७ ॥

इति देशी

स्थायिनं मध्यगान्धारं कृत्वाधस्तुर्यमेत्य च ।
तस्मादाषष्ठमारुह्य स्वरांस्तानवरुह्य च ॥ ३५८ ॥
ग्रहाधस्तात्तृतीयं च कृत्वा चेन्न्यस्यते ग्रहे ।
देशाख्या सा तदा लक्ष्ये दृष्टोऽस्या मध्यमो ग्रहः ॥ ३५९ ॥

इति देशाख्या

इति रागाङ्गाणि

ग्रहान्मध्यस्थितात्षड्जाद् द्वितीयं स्वरमेत्य च ।
तृतीयं तदधस्थं च विलम्ब्य स्थायिनं स्पृशेत् ॥ ३६० ॥

ऋषभ स्थायी योजून, (त्याच्या) पुढच्या (म्हणजे दुसऱ्या) स्वराला स्पर्श करून (म्हणजे तो जलद वाजवून), मग (त्याच्या) पुढचा (म्हणजे तिसरा) (३५५) विलंबित वाजवून, चवथा आंदोलित योजून, चवथ्याच्या खालचे दोन (म्हणजे तिसरा व दुसरा स्वर) यांना स्पर्श करून (म्हणजे ते जलद वाजवून), ग्रहापासून निःसरण करून (म्हणजे तो स्खलितासारखा योजून), पुढचे दोन स्वर वाजवून, दुसऱ्या स्वराला येऊन, स्थायीवर न्यास केला तर तो देशी राग होतो. पण देशीजाणकारांत देशीमध्ये गांधार ग्रह दिसून येतो. (३५६, ३५७)

हा देशी होय.

मध्यगांधार स्थायी योजून, त्या खालच्या चवथ्या स्वरावर येऊन, त्यापासून सहाव्या स्वरापर्यंत आरोह करून व तेच स्वर अवरोहाने योजून (३५८) ग्रहाच्या खालचा तिसरा स्वर घेऊन, ग्रहावर न्यास केला जातो तेव्हा ती देशाख्या (होते). लक्ष्यात हिचा ग्रह मध्यम दिसून येतो. (३५९)

ही देशाख्या होय.

ही रागांगे होत.

मध्यस्थानच्या षड्ज या ग्रहापासून दुसऱ्या स्वरावर येऊन व तिसरा आणि त्या खालचा विलंबित योजून स्थायीला स्पर्श करावा (म्हणजे तो एकदा योजावा). (३६०)

अधस्तृतीयतुर्यौ च तं तृतीयं पुनः स्वरम् ।
कृत्वा स्थायिस्वरे न्यासो डोम्बक्री जायते तदा ॥ ३६१ ॥
भूपाली सा जनैरुक्ता स्थाय्यस्या मध्यमो मतः ।

इति डोम्बक्री

(लोके प्रसिद्धा भूपाली)

मन्द्रस्थं पञ्चमं कृत्वा स्थायिनं सह तेन च ॥ ३६२ ॥
आरुह्य षट् स्वरानेषामवरोहे तृतीयकम् ।
विलम्ब्य कम्पितं कृत्वा तुर्यं स्थायिनमाव्रजेत् ॥ ३६३ ॥
क्रमेण यदि जायेत तदा प्रथममञ्जरी ।
अस्यास्तु मन्द्रगान्धारः स्थायी लक्ष्येषु दृश्यते ॥ ३६४ ॥

इति प्रथममञ्जरी

धैवतं स्थायिनं कृत्वान्दोल्य तस्मादधस्तनम् ।
आरुह्य चतुरस्तस्मादवरोहे ग्रहं व्रजेत् ॥ ३६५ ॥
यदा तदा स्यात्कामोदा मध्यमोऽस्या ग्रहो भवेत् ।

इति कामोदा

इति भाषाङ्गाणि

(नंतर स्थायीच्या) खालचे तिसरा व चवथा हे स्वर घेऊन (आणि) तो तिसरा स्वर पुन्हा योजून स्थायी स्वरावर न्यास (केला जातो) तेव्हा डोंबक्री उत्पन्न होते. (३६१) लोकांकडून ती भूपाली (या नावाने) म्हटली जाते. हिचा स्थायी (लक्ष्यात) मध्यम मानला आहे. (३६२–)

ही डोंबक्री होय.

(ही लोकांत प्रसिद्ध भूपाली होय.)

मंद्र स्थानातील पंचम स्थायी करून व त्याच्यासह (३६२) सहा स्वर आरोह करून त्यांच्या अवरोहात तिसरा विलंबित योजून (आणि) चवथा कंपित योजून क्रमाने स्थायीला यावे. (३६३) (अशी स्वरयोजना केली जाते) तेव्हा प्रथममंजरी उत्पन्न होते. लक्ष्यांत हिचा स्थायी मंद्र गांधार दिसून येतो. (३६४)

ही प्रथममंजरी होय.

धैवत स्थायी करून, त्याखालचा (म्हणजे पंचम) स्वर आंदोलित घेऊन, त्यापासून चार स्वर आरोह करून (मग) अवरोहात ग्रहाला जावे. (३६५) तेव्हा ती कामोदा होते. हिचा ग्रह (लक्ष्यात) मध्यम असतो. (३६६–)

ही कामोदा होय.

ही भाषांगे होत.

षड्जं तु स्थायिनं कृत्वा तत्पूर्वस्वरमेत्य च ॥ ३६६ ॥
स्वरद्वयं द्विरारुह्य तृतीयं च चतुर्थकम् ।
प्रकम्प्याथ तृतीयं च विलम्ब्याहत्य पञ्चमम् ॥ ३६७ ॥
स्थाय्यन्तमवरोहेच्चेत्स्वरानृषभवर्जितान् ।
मध्यषड्जं ग्रहं कृत्वा सह प्राचा परौ स्वरौ ॥ ३६८ ॥
प्रोच्य तुर्यं विलम्ब्याथ तृतीयं सद्वितीयकम् ।
स्पृष्ट्वा यदा ग्रहे न्यासस्तदा रामकृतिर्भवेत् ॥ ३६९ ॥

इति रामकृतिः

स्थायिनं मध्यमं कृत्वाधश्चतुर्थमुपेत्य च ।
ग्रहाधरांस्त्रीनारुह्य स्वरं स्पृष्ट्वा तृतीयकम् ॥ ३७० ॥
ग्रहाधस्तुर्यपर्यन्तमागत्याप्यवरोहिणा ।
ततस्तृतीयमारुह्य क्रमादेत्य प्रकम्प्य च ॥ ३७१ ॥
ग्रहे न्यासो यदा रागस्तदा गौडकृतिर्भवेत् ।
पञ्चमो लक्ष्यते स्थायी लक्ष्ये स्याल्लक्ष्यवेदिभिः ॥ ३७२ ॥

इति गौडकृतिः

षड्ज स्थायी करून, त्याच्या पूर्वीच्या स्वराला येऊन, (३६६) (मग) दोन स्वर दोनदा आरोहाने घेऊन आणि तिसरा व चवथा कंपित करून नंतर तिसरा विलंबित योजून (आणि) पाचवा स्वर आहत (या गमकाने युक्त) घेऊन (३६७) ऋषभ वगळून (त्या) स्वरांचा स्थायीपर्यंत अवरोह करावा. (मग) मध्य षड्ज ग्रह योजून, त्या पूर्वीच्या स्वरासह पुढचे दोन स्वर म्हणून (अर्थात वाजवून), चवथा विलंबित घेऊन, मग दुसरा व तिसरा या स्वरांना स्पर्श करून ग्रहावर न्यास (केला जातो) तेव्हा रामकृति होते. (३६८,३६९)

ही रामकृति होय.

मध्यम स्थायी करून, त्या खालच्या चवथ्या स्वरावर येऊन, ग्रहापासून खालचे तीन स्वर आरोह करून, (मग) तिसऱ्या स्वराला स्पर्श करून, (३७०) अवरोहाने ग्रहाच्या खालच्या चवथ्या स्वरापर्यंत येऊन, नंतर तिसऱ्या स्वरावर आरोहाने क्रमाने जाऊन तो स्वर कंपित (गमकाने युक्त) योजून (३७१) ग्रहावर न्यास केला जातो तेव्हा ती गौडकृति होते. लक्ष्यजाणकारांनी हिचा स्थायी लक्ष्यात पंचम असतो असे मानले आहे. (३७२)

ही गौडकृति होय.

मध्यषड्जं ग्रहं कृत्वाधस्थमेत्य पुनर्ग्रहम् ।
कृत्वा तृतीयतुर्यौ च कम्पितं पञ्चमं स्वरम् ॥ ३७३ ॥
वादयित्वा ग्रहात्तुर्यं तृतीयं स्थायिनं तथा ।
द्वितीयं कम्पयित्वा च तृतीयं स्वरमास्पृशेत् ॥ ३७४ ॥
ततो यदि ग्रहे न्यासस्तदा देवकृतिर्भवेत् ।
अस्यास्तु मध्यमो न्यासो लक्ष्ये श्रीशार्ङ्गिणोदितः ॥ ३७५ ॥

इति देवकृतिः

इति क्रियाङ्गाणि

धैवतं स्थायिनं कृत्वा गं चाधःस्थं पुनर्ग्रहम् ।
तत्परं स्थायिनं तस्मात्पूर्वमागत्य च ग्रहम् ॥ ३७६ ॥
आरुह्य त्रींस्तृतीयादीन् पञ्चमादवरुह्य च ।
षट् स्वरान् ग्रहमुच्चार्य तृतीयं कम्पयेत्ततः ॥ ३७७ ॥
तुर्यपञ्चमतुर्यांश्च स्पृष्ट्वा प्रोच्य तृतीयकम् ।
द्वितीयं च ग्रहे न्यासो यदास्याद्भैरवी तदा ॥ ३७८ ॥
अस्य रागस्य गान्धारः स्थायी लक्ष्येषु दृश्यते ।

इति भैरवी

मध्य षड्ज ग्रह करून, त्या खालच्या स्वरावर येऊन, पुन्हा ग्रह घेऊन व तिसरा आणि चवथा स्वर योजून, (मग) पाचवा स्वर कंपित योजून (३७३) ग्रहापासून चवथा, तिसरा तसेच स्थायी (म्हणजे ग्रह) वाजवून, दुसरा कंपित योजून, तिसऱ्या स्वराला स्पर्श करावा. (३७४) नंतर ग्रहावर न्यास केला असता ती देवकृति होते. श्रीशार्ङ्गदेवाने हिचा न्यास लक्ष्यात मध्यम सांगितला आहे. (३७५)

ही देवकृति होय.

ही क्रियांगे होत.

धैवत स्थायी करून, गांधार, (धैवताच्या) खालचा (पंचम) व पुन्हा ग्रह घेऊन, त्यावरचा (निषाद), स्थायी (म्हणजे ग्रह), त्या पूर्वीचा आणि ग्रह या स्वरांवर येऊन, (३७६) तिसरा इ. तीन स्वर (म्हणजे तिसरा चवथा व पाचवा हे) आरोहाने घेऊन, पाचव्यापासून सहा स्वर अवरोहाने योजून, ग्रह वाजवून तिसरा कंपित करावा. मग (३७७) चवथा, पाचवा व चवथा यांना स्पर्श करून, तिसरा व दुसरा वाजवून ग्रहावर न्यास (करावा). जेव्हा (अशी स्वरयोजना केली जाते) तेव्हा भैरवी होते. (३७८)

लक्ष्यांत या रागाचा स्थायी गांधार दिसून येतो. (३७९–)

ही भैरवी होय.

मन्द्रषड्जं ग्रहं कृत्वा मध्यषड्जमुपेत्य च ॥ ३७९ ॥
अवरोहिक्रमादेत्य ग्रहमारोहिणा ततः ।
पमागत्य विलम्ब्यामुं स्पृष्ट्वा धैवतमाव्रजेत् ॥ ३८० ॥
ग्रहाच्चेदवरोहेण[३६] च्छायानट्टा तदा भवेत् ।
इति च्छायानट्टा
मध्यषड्जं ग्रहं कृत्वा तत्परौ द्वौ च पञ्चमम् ॥ ३८१ ॥
षष्ठं कृत्वावरुह्यैमौ तृतीयादवरुह्य च ।
आग्रहं प्राक्तृतीयाद्वावरुह्य प्राक्तृतीयकम् ॥ ३८२ ॥
प्रकम्प्य तत्परं प्रोच्य ग्रहे चेन्न्यस्यते तदा ।
रामक्री स्यादसौ प्रोक्ता बहुलीपूर्विका जनैः ॥ ३८३ ॥
इति बहुलीरामक्री
धैवतं स्थायिनं कृत्वा तत्परं तु विलम्बितम् ।
स्पृष्ट्वा ग्रहद्वितीयौ च ग्रहात्तु प्राक्तृतीयकम् ॥ ३८४ ॥

मंद्र षड्ज ग्रह योजून व मध्य षड्जाला जाऊन (३७९) अवरोही क्रमाने ग्रहावर येऊन मग आरोहाने पंचमावर येऊन, तो विलंबित करून आणि धैवताला स्पर्श करून (३८०) अवरोहाने ग्रहावर यावे. तेव्हा छायानट्टा होते. (३८१–)

ही छायानट्टा होय.

मध्य षड्ज ग्रह करून, त्यापुढचे दोन स्वर व पाचवा (३८१) आणि सहावा घेऊन हे दोन स्वर अवरोहाने योजून (मग) तिसऱ्यापासून ग्रहापर्यंत अवरोह करावा. किंवा तिसऱ्या पूर्वीच्या पासून (ग्रहापर्यंत) अवरोह करावा. (नंतर) तिसऱ्या स्वरापूर्वीचा (३८२) कंपित करून, त्यानंतरचा वाजवून ग्रहावर न्यास केला असता रामक्री होते. ही लोकांनी बहुलीरामक्री म्हटली आहे. (३८३)

ही बहुलीरामक्री होय.

' धैवत स्थायी करून, त्यापुढचा विलंबित (योजावा). (मग) ग्रह व दुसरा स्वर यांना स्पर्श करून, ग्रहापूर्वीचा तिसरा (३८४) थोडा विलंबित घेऊन, ग्रह इत्यादी तीन

---

३६. ' ग्रहात् ' असा पंचमीचा प्रयोग अडचार व आनंदाश्रम या आवृत्तीत घेतलेला आहे. त्यावरून अर्थबोध होत नाही. संगीतसारात (वाद्याध्याय पृ. ४३) ' धैवत उच्चारून, धैवतापासून अवरोह क्रमाने षड्जावर यावे ' असे म्हटले आहे. अर्थात या रागात षड्ज हा ग्रह आहे. म्हणून ' ग्रहं ' अशी द्वितीया विभक्ति घेतल्याने अर्थ नीटपणे कळत असल्याने त्यानुसार भाषांतर केले आहे.

ईषद्विलम्ब्य चारुह्य ग्रहादीन्वा तृतीयकम् ।
विलम्ब्य तदधःस्थं वावरुह्य स्पर्शनात्ततः ॥ ३८५ ॥
ग्रहादींस्त्रीन्स्वरान्स्पृष्ट्वा ग्रहमुच्चार्य तत्परम् ।
ग्रहे चेन्न्यस्यते रागो मल्हारो जायते तदा ॥ ३८६ ॥
रागेऽत्र पञ्चमः स्थायी दृश्यते लक्ष्यगोचरः ।

इति मल्हारः

स्थायिनो मध्यमा (सा?) त्पञ्चावरुह्य यदि मावधीन्[३७] ॥ ३८७ ॥
मात्तृतीयं व्रजेत्तस्मादारुह्य चतुरः स्वरान् ।
स्पृष्ट्वा स्थायिनमेतस्मात्पूर्वं कृत्वा विलम्बितम् ॥ ३८८ ॥
षड्जे चेन्न्यस्यते गौडकर्णाटो जायते तदा ।
लक्ष्ये तु पञ्चमः स्थायी गौडस्यास्य विलोक्यते ॥ ३८९ ॥

इति कर्णाटगौडः

ग्रहान्मन्द्रनिषादाच्चेत्समुच्चार्य स्वरं परम् ।
ततस्तृतीयतुर्यौ च गत्वा स्थायितृतीयकम् ॥ ३९० ॥

स्वर (म्हणजे ध नि स हे) आरोहाने योजून किंवा तिसरा विलंबित योजून व त्याखालचा अवरोहाने घेऊन नंतर ग्रह इत्यादी तीन स्वरांना स्पर्श केल्याने व ग्रहाला स्पर्श करून त्यापुढचा वाजवून ग्रहावर न्यास केला असता मल्हार राग उत्पन्न होतो. (३८५, ३८६) लक्ष्यात या रागात पंचम स्थायी दिसून येतो. (३८७–)

हा मल्हार होय.

स्थायी मध्यमापासून (मध्य षड्ज ते मंद्र) मपर्यंत पाच स्वर अवरोहाने घेऊन (३८७) मपासून तिसऱ्या स्वराला जावे. त्यापासून चार स्वर आरोह करून, स्थायीला स्पर्श करून, त्या पूर्वीचा (विलंबित) घेऊन (३८८) षड्जावर न्यास केला असता गौडकर्णाट उत्पन्न होतो. या गौडाचा स्थायी लक्ष्यात पंचम दिसून येतो. (३८९)

हा कर्णाटगौड होय.

मंद्र निषाद या ग्रहापासून जर पुढचा स्वर वाजवून मग तिसऱ्या व चवथ्या स्वराला जाऊन, स्थायीपासून तिसरा व स्थायीपासून चवथा हे स्वर घेऊन, या स्वरापासून पाच स्वर अवरोहाने योजून, स्थायीच्या खालचा चवथा, (पुन्हा) स्थायीच्या खालचा व

---

३७. या रागात स्थायी मध्यम दिला आहे. संगीतसारात (वाद्याध्याय पृ. ४४) 'मध्य स्थानच्या षड्जापासून मंद्र मध्यमापर्यंत अवरोह करावा' असे म्हटले आहे– मध्य षड्जापासून पांच स्वर अवरोहाने घेतल्यास तो अवरोह मंद्र मध्यमापर्यंत होतो. येथे रागांत स्थायी स्वरावर न्यास सांगितला आहे. या रागात न्यास षड्जावर आहे. म्हणून 'मध्यमात्' या ऐवजी 'मध्यसात्' असा पाठ योग्य असणे संभवते.

स्थायितुर्यं च कृत्वास्मात्स्वरान्पञ्चावरुह्य च ।
स्थायिनोऽधस्तुरीयं च स्थायिनोऽधस्तनं ततः ॥ ३९१ ॥
स्थायिनं तत्परं चोक्त्वा स्थायितुर्यं ग्रहात्परम् ।
कृत्वा न्यासे ग्रहे गौडस्तुरुष्को जायते तदा ॥ ३९२ ॥
स एव मालवीत्युक्तः स्थायी लक्ष्येऽस्य पञ्चमः ।

इति तुरुष्कगौडः

ग्रहं मालविनः कृत्वा द्वितीयं प्रोच्य तत्परम् ॥ ३९३ ॥
लङ्घयेल्लङ्घितादूर्ध्वं त्रीण्यारुह्यावरुह्य च ।
प्रकम्प्य लङ्घितं तस्मात्पूर्वं प्रोच्य ग्रहं व्रजेत् ॥ ३९४ ॥
यदा तदा द्राविडः स्याद्गौडोऽसौ सालगो जनैः ।
अस्यापि स्थायिनं प्राहुर्लक्ष्यज्ञाः पञ्चमं स्वरम् ॥ ३९५ ॥

इति द्राविडगौडः

(लोके प्रसिद्धः सालगः)

स्थायिनो धैवतात्प्राच्यादवरुह्य ग्रहान्तरम्[३८] ।
ग्रहं चोक्त्वा तृतीयं च तुर्यं कृत्वा विलम्बितम् ॥ ३९६ ॥

नंतर स्थायी आणि त्यावरचा स्वर वाजवून, स्थायीपासून चवथा व ग्रहाच्या वरचा स्वर घेऊन ग्रहावर न्यास केला तर तेव्हा तुरुष्कगौड उत्पन्न होतो (३९०, ३९१, ३९२).

तोच मालवी असेही म्हटला जातो. लक्ष्यात याचा स्थायी पंचम (दिसून येतो). (३९३–)

हा तुरुष्कगौड होय.

मालवीचा ग्रह योजून व (त्यापासून) दुसरा स्वर वाजवून त्यावरचा (३९३) लंघित करावा (म्हणजे त्या स्वराला थोडा स्पर्श करावा). (या) लंघित स्वराच्या वरच्या तीन स्वरांचा आरोह व अवरोह करून, लंघित स्वर कंपित योजून, त्याच्या पूर्वीचा स्वर वाजवून ग्रहाला जावे. (३९४).

(अशी स्वरयोजना जेव्हा केली जाते) तेव्हा तो द्राविडगौड होय. लोकांकडून तो सालग (म्हटला जातो). लक्ष्यजाणकार याचाही स्थायी स्वर पंचम सांगतात. (३९५)

हा द्राविडगौड होय. (लोकांत प्रसिद्ध सालग होय.)

स्थायी धैवतापासून पुढच्या स्वरावरून अवरोह करून ग्रहानंतरचा व ग्रह वाजवून, तिसरा व चवथा स्वर विलंबित घेऊन (३९६) त्याखालच्या दोन स्वरांना स्पर्श करून

---

३८. 'स्थायिनो धैवतात्प्राच्यादवरुह्य ग्रहान्तरम्'– याचे स्पष्टीकरण सुधाकरटीकेत, 'धैवत स्थायी करून, त्या पूर्वीचे दोन स्वर अवरोहाने घेऊन, ग्रहापासून खालचा म्हणजे

तस्मादधस्तनौ स्पृष्ट्वा तृतीयं तु विलम्बयेत् ।
स्पृष्ट्वा ग्रहात्परं पूर्वौं पूर्वं चोक्त्वा ग्रहे यदि ॥ ३९७ ॥
कम्पिते न्यस्यते रागस्तदा स्याल्ललिताभिधः ।
अत्र गान्धारमेवाहुः स्थायिनं लक्ष्यवेदिनः ॥ ३९८ ॥

इति ललिता

इत्युपाङ्गानि

एवं कतिपये रागाः प्रोक्ताः संमुग्धबुद्धये ।
वस्तुतः सर्वयन्त्रेषु रागाणां वादनं समम् ॥ ३९९ ॥
ग्रहादिस्वरसंभूतिद्वारतोऽन्विष्यतां बुधैः ।
किंनर्यां यैः स्वरैः स्वस्वस्थानजैर्यस्य संभवः ॥ ४०० ॥
रागस्य तस्य तैरेव वंशादावपि दृश्यते ।

इति किंनरीलक्षणम्

तिसरा विलंबित योजावा. (मग) ग्रहाच्या पुढच्या स्वराला स्पर्श करून, त्यापूर्वीचे दोन व पूर्वीचा स्वर वाजवून जर कंपित ग्रहावर न्यास केला तर तो ललिता नावाचा राग होय. यात लक्ष्यजाणकार गांधारच स्थायी म्हणून सांगतात. (३९६, ३९७, ३९८).

ही ललिता होय.

ही उपांगे होत.

असे काही राग मूढ लोकांच्या माहितीसाठी सांगितले आहेत. वस्तुतः सर्व वाद्यांमध्ये रागांचे वादन सारखे (असते). (३९९)

ग्रह इत्यादी स्वरांची निष्पत्ति या द्वारे जाणत्यांनी ते शोधावे. ज्या आपापल्या स्थानी उत्पन्न होणाऱ्या स्वरांनी किंनरीमध्ये ज्या रागाची उत्पत्ति होते, त्याची (उत्पत्ति) त्याच (स्वरांनी) वंश इत्यादीमध्येही दिसून येते. (४००, ४०१–)

किंनरीचे लक्षण समाप्त.

पूर्वीचा (उच्चारून)' असे दिले आहे. 'ग्रहात् स्थायिनः अधरं' या विवरणावरून 'ग्रहान्तरम्' या ऐवजी 'ग्रहाधरम्' असा पाठ सिंहभूपालासमोर असावा असे वाटते. तसेच 'प्राच्यौ' असा शब्द असल्यास 'पूर्वीचे दोन स्वर' हा अर्थ जुळतो. मग 'प्राच्याववरुह्य ग्रहाधरम्' असा पाठ असणे संभवते. या सुधाकरटीकेतील स्पष्टीकरणाने अर्थ सुस्पष्ट होतो. 'स्पृष्ट्वा ग्रहात्परं पूर्वौं पूर्वं चोक्त्वा'– याचे स्पष्टीकरण सुधाकरटीकेत, 'मग ग्रहस्वराला स्पर्श करून, ग्रहस्वराच्या पूर्वीचा पूर्वं (म्हणजे) खालचा तिसरा उच्चारून' असे दिले आहे. यावरून 'स्पृष्ट्वा ग्रहं परं पूर्वात् पूर्वं चोक्त्वा' असा पाठ संभवनीय वाटतो.

आनंदाश्रम आवृत्तीत या रागाचे नाव ललित असे दिले आहे.

पिनाक्यां धनुषः कर्म्मैकचत्वारिंशदङ्गुला ॥ ४०१ ॥
दैर्घ्ये स्यान्मध्यविस्तारः स्यात्सपादाङ्गुलद्वयम् ।
अन्ते चाङ्गुलमानेन शिखां कुर्यादधस्तनीम् ॥ ४०२ ॥
सपादाङ्गुलमात्रा तु कार्मुकस्योत्तरा शिखा ।
कार्यावङ्गुलदैर्घ्यौ च पादोनाङ्गुलपिण्डकौ ॥ ४०३ ॥
खेटकौ शिखयोर्लग्नौ ताभ्यां त्ववर्गुपान्त्ययोः ।
पादोनमङ्गुलद्वन्द्वं विस्तारे मानमिष्यते ॥ ४०४ ॥
मध्यप्रान्तान्तराले तु विस्तारं कल्पयेत्सुधीः ।
तन्त्रीमानेन बध्नीयाच्छिखयोर्निपुणो गुणम् ॥ ४०५ ॥
मानं वादनचापे स्यादङ्गुलान्येकविंशतिः ।
दैर्घ्ये मुष्टौ तु विस्तारोऽत्राङ्गुलित्रितयोन्मितः ॥ ४०६ ॥
स त्वङ्गुलतृतीयांशः शिखे त्यक्त्वान्तयोर्भवेत् ।
ऊर्ध्वाधरशिखाद्वन्द्वमानं पादोनमङ्गुलम् ॥ ४०७ ॥
अश्ववालधिकेशोत्थो गुणो वादनधन्वनः ।
तुम्बं धृत्वाथ पादाभ्यां भुवि न्यस्तमधोमुखम् ॥ ४०८ ॥

पिनाकीच्या बाबतीत धनुष्याची दांडी एकेचाळीस अंगुळे लांबीची असावी (४०१) व मध्यभागाची रुंदी सव्वादोन अंगुळे असावी. शेवटी एक अंगुळ प्रमाणाची शिखा खालच्या बाजूस करावी. (४०२) धनुष्याची वरची शिखा सव्वा अंगुळ प्रमाणाची (असावी). एक अंगुळ लांब व पाऊण अंगुळ गोल असे दोन खेटक दोन्ही शिखांना त्यांपासून मागे जोडलेले असे योजावे. उपान्त्यांचे (म्हणजे लागून असलेल्या भागांचे) प्रमाण पावणेदोन अंगुळे रुंदीचे मानले आहे. (४०३, ४०४) मधल्या प्रदेशातील अंतराळाची रुंदी, कुशल जाणकाराने कल्पनेने योजावी. निपुण (वादकाने) शिखांना तारेच्या प्रमाणाने दोरी बांधावी. (४०५) वाजवायच्या धनुष्याचे प्रमाण एकवीस अंगुळे लांबीचे व मुठीच्या बाबतीत तीन अंगुळे मापाच्या रुंदीचे असावे. (४०६) एक तृतीयांश अंगुळ शिखा सोडून टोकांना ती (मूठ) असावी. वरच्या व खालच्या या दोन्ही शिखांचे प्रमाण तीनचतुर्थांश अंगुळ (जाणावे). (४०७)

वाजवायच्या धनुष्याची दोरी घोडयाच्या शेपटीच्या केसापासून तयार केलेली (असावी). जमिनीवर खाली तोंड करून ठेवलेला भोपळा दोन्ही पायांनी धरून, (४०८)

तत्र लग्नशिखाधोर्ध्वा पिनाकीस्कन्धसंश्रिता ।
आक्रम्य वामहस्तस्थतुम्बमूलेन तद्गुणम् ॥ ४०९ ॥
ततो दक्षिणहस्तस्थधनुषो वादयेज्ज्यया ।
रालासंलिप्तयास्यां च स्वरस्थानानि निर्णयेत् ॥ ४१० ॥
एकतन्त्रीवदधराधरतारतया सुधीः ।

इति पिनाकीलक्षणम्

बध्यप्रान्तातिरिक्तऽशे तन्त्री दैर्घ्ये चतुष्करा ॥ ४११ ॥
उपरिस्थे क्वचित्काष्ठे प्रान्तेनैकेन बध्यते ।
प्रान्तान्तरेणान्यकाष्ठेऽधःस्थे सार्धकरायते ॥ ४१२ ॥
स्थौल्येनालापिनीतुल्ये त्यक्त्वाग्रादङ्गुलद्वयम् ।
तन्त्रीं बद्ध्वा ततोऽधस्तात्तुम्बमाबद्ध्य दारु तत् ॥ ४१३ ॥
वामोरुमूलाक्रान्ताग्रं जङ्घायां कुञ्चिताकृतौ ।
भूलग्नबाह्यपार्श्वायां वामायां न्यस्य जङ्घया ॥ ४१४ ॥
आक्रम्य वामेतरया पिनाक्यामिव वादनम् ।
धनुषा वामहस्तस्थतुम्बकेन च सारणा ॥ ४१५ ॥

तेथे जोडलेली वरची शिखा पिनाकीच्या स्कंधप्रदेशाचा आधार असलेली (ठेवावी). तिची दोरी (म्हणजे तार) डाव्या हातात असलेल्या भोपळ्याच्या मूळभागाने दाबून (४०९) मग उजव्या हातातील धनुष्याच्या राळ लावलेल्या दोरीने (ती) वाजवावी. हिच्यामध्ये एकतन्त्रीप्रमाणे खाली खाली तार होत जाणारी अशी स्वरस्थाने ज्ञात्याने निश्चित करावी. (४१०, ४११–)

पिनाकीचे लक्षण समाप्त.

(निःशंकवीणेत) चार हात लांबीची तात, बांधायच्या जागेच्या खेरीजच्या भागात वर कोठेतरी असणाऱ्या काठीला एका टोकाने बांधली जाते. खालच्या बाजूस असणाऱ्या दीड हात लांबीच्या व आलापिनी एवढी जाडी असणाऱ्या दुसऱ्या काठीला टोकापासून दोन अंगुळे सोडून, तात दुसऱ्या टोकाने बांधून, मग खालच्या बाजूस भोपळा बांधून ते लाकूड डाव्या मांडीच्या मूळभागाने टोक दाबून धरलेले (असे योजावे). (ते) आकुंचित केलेल्या व बाहेरची बाजू जमिनीला लागलेल्या अशा डाव्या पोटरीवर ठेवून, उजव्या पोटरीने दाबून धनुकलीने पिनाकीप्रमाणे वादन (करावे) व डाव्या हातात धरलेल्या भोपळ्याने सारणा (करावी). (४११–४१५)

आर्द्रचर्मकृतां शुष्कां पेशीं कोणान्वितां खराम् ।
वामेनादाय तत्कोणेनाथवा सारणा भवेत् ॥ ४१६ ॥
यत्र निःशङ्कवीणा सा शार्ङ्गदेवेन कीर्तिता ।
त्रिस्थानस्वररागादिव्यक्तिः संजायते तया ॥ ४१७ ॥

इति निःशङ्कवीणालक्षणम्

यथा यथा स्वरे व्यक्ती रक्तेः प्रचुरता भवेत् ।
तथा तथा विधातव्यं ततं लोकानुसारतः ॥ ४१८ ॥
सम्यक्स्वरोपयोगीनि तन्त्रीवाद्यानि कानिचित् ।
उक्तान्यन्यान्यपि प्राज्ञस्तर्कयेदनया दिशा ॥ ४१९ ॥
यो वीणावादनं वेत्ति तत्त्वतः श्रुतिजातिवित् ।
तालपातकलाभिज्ञः सोऽक्लेशान्मोक्षमृच्छति ॥ ४२० ॥
तस्माद्वीणा निषेव्येति याज्ञवल्क्यादयोऽब्रुवन्[३९] ।
नादश्रुतिस्वरग्रामजातिरागादितत्त्ववित् ॥ ४२१ ॥

किंवा ओल्या कातड्याचा सुकलेला व कठिण झालेला कोणयुक्त तुकडा डाव्या हाताने घेऊन त्या कोणाने सारणा करावी. (४१६)

जिच्यात (अशी योजना असते) ती निःशंकवीणा शार्ङ्गदेवाने सांगितली आहे. तिच्या योगे तीन स्थानचे स्वर व राग इत्यादींची स्पष्टता उत्पन्न होते. (४१७)

निःशंकवीणेचे लक्षण समाप्त.

जशी जशी स्वराची स्पष्टता व रंजकतेची प्रचुरता (निर्माण) होईल तसे तसे ततवाद्य लोकात प्रचलित असल्याप्रमाणे योजावे. (४१८)

उत्कृष्टपणे स्वरनिर्मिती होण्यास उपयोगी अशी काही तंत्रीवाद्ये (मी) सांगितली आहेत. जाणकाराने इतरही (तंत्रीवाद्ये) या तऱ्हेने अनुमानाने जाणावी. (४१९)

श्रुती व जाती जाणणारा, ताल, पात व कला यांत निपुण असा जो (वादक) वीणावादन सत्यस्वरूपाने जाणतो तो कष्टाविना मोक्षाला जातो. (४२०)

म्हणून वीणेचा आश्रय घ्यावा असे याज्ञवल्क्य इत्यादींनी सांगितले आहे. नाद, श्रुति, स्वर, ग्राम, जाति व राग इत्यादींचे तत्त्व जाणणारा, (४२१) शरीरसौष्ठवाने युक्त,

---

क० वीणावादनातील संपूर्ण ज्ञानाचे फल ग्रंथकार सांगत आहे. (तसेच) प्रसंगप्राप्त वीणावादनाचे गुण सांगत आहे. (४१८–४२३)

---

३९. याज्ञवल्क्याचा श्लोक सुधाकरटीकेत उद्धृत केला आहे. तो पुढीलप्रमाणे—

' वीणावादनतत्त्वज्ञः श्रुतिजातिविशारदः ।
तालज्ञश्चाप्रयासेन मोक्षमार्गं नियच्छति ॥

(याज्ञवल्क्यस्मृति, प्रायश्चित्ताध्याय, ३–४–११५)

देहसौष्ठवसंपन्नः स्थिरासनपरिग्रहः ।
जितश्रमकरद्वन्द्वस्त्यक्तभीतिर्जितेन्द्रियः ॥ ४२२ ॥
प्रगल्भधीः सुशरीरो गीतवादनकोविदः ।
सावधानमनाश्चेति वैणिके वर्णिता गुणाः ॥ ४२३ ॥

इति ततवाद्यलक्षणम् ।

वैणवः खादिरो दान्तश्चान्दनो रक्तचन्दनः ।
आयसः कांस्यजो रौप्यो वंशः स्यात्काञ्चनोऽथवा ॥ ४२४ ॥
वर्तुलः सरलः श्लक्ष्णो ग्रन्थिभेदव्रणोज्झितः ।
कनिष्ठाङ्गुलिविस्तारं गर्भे च सुषिरं दधत् ॥ ४२५ ॥
स्वदैर्घ्यमानदैर्घ्यं च समाकृति समन्ततः ।
तस्य द्वे त्रीणि चत्वारि चाङ्गुलानि शिरःस्थलात् ॥ ४२६ ॥

आसनस्वीकार स्थिर असणारा, दोन्ही हातांच्या श्रमावर विजय मिळविलेला, इंद्रिये जिंकलेला, (४२२) प्रौढ बुद्धीचा, चांगले शारीर प्राप्त झालेला, गीत व वादन यांत निष्णात आणि सावधान मनाचा असे गुण वैणिकाच्या (म्हणजे वीणावादकाच्या) बाबतीत वर्णिलेले आहेत. (४२३)

ततवाद्याचे लक्षण समाप्त.

वंश हा बांबूचा, खैराचा, हस्तिदंताचा, चंदनाचा, रक्तचंदनाचा, लोखंडाचा, काशाचा, रुप्याचा किंवा सोन्याचा असतो. (४२४)

(तो) गोलाकार, सरळ, गुळगुळीत, गाठ, चीर व भोक नसलेला. आणि आतल्या बाजूला करंगळी एवढे रुंद भोक धारण करणारा असतो. (४२५) (ते भोक) त्या (वंशाच्या) लांबीइतकी लांबी असणारे व सर्व बाजूंनी सम आकाराचे (असते). त्याच्या (म्हणजे त्या वंशाच्या) डोक्याच्या भागापासून (म्हणजे वरच्या टोकापासून) दोन, तीन किंवा चार अंगुळे (४२६) सोडून एक अंगुळ मापाचे फुंकण्याचे भोक

क० आता सुषिरवाद्यांतील प्रथम निर्देशिलेल्या वंशाचे लक्षण देत आहे–

दांत म्हणजे हस्तिदंतापासून निर्माण केलेला. वंशाचे शिरःस्थल म्हणजे वंशाच्या दांडीचा मूळ भाग, लाकडाचा मूळ भाग. त्या शिरःस्थलापासून दोन, तीन किंवा चार अंगुळे सोडणे या तीन मतांतील एका मतानुसार अंगुळांचे प्रमाण सोडून, एक अंगुळ मापाचे गोलाकार असे

कल्लिनाथाने हा श्लोक, पहिल्या अध्यायातील पहिल्या प्रकरणामधील तिसाव्या श्लोकावरील आपल्या टीकेत उद्धृत केला आहे. 'नियच्छति' या ऐवजी 'स गच्छति' असे तेथे आहे. 'नियच्छति' म्हणजे 'प्राप्त करून घेतो.'

त्यक्त्वा फूत्कारसुषिरं कार्यमङ्गुलसंमितम् ।
मुखरन्ध्रात्तारारन्ध्रं भवेदेकाङ्गुलान्तरम् ॥ ४२७ ॥
अर्धाङ्गुलान्तराणि स्यू रन्ध्राण्यन्यानि सप्त च ।
तान्यष्टौ बदरीबीजसंकाशानि[४०] प्रचक्षते ॥ ४२८ ॥
वंशेऽधः सर्वरन्ध्रेभ्यः परिशेष्याङ्गुलद्वयम् ।
तेषु स्वरविभागाय सप्तरन्ध्राणि मन्वते ॥ ४२९ ॥

करावे. या मुखरंध्रापासून (म्हणजे फुंकण्यासाठी असलेल्या भोकापासून) एक अंगुळ अंतरावर तारारंध्र (म्हणजे तारस्वर निर्माण करणारे भोक) असावे. (४२७)

बाकीची सात भोके (प्रत्येकी) अर्धे अंगुळ अंतर असणारी असावी. ती आठ (भोके) बोराच्या बीएवढी (असावी असे आचार्य) सांगतात. (४२८)

वंशात, सर्व भोकांच्या खालच्या बाजूला दोन अंगुळे (एवढा भाग) (भोक न पाडता) राखून ठेवलेला (असावा).

त्या (भोकांतील) सात भोके स्वरविभागासाठी मानतात. (४२९)

फूत्कारसुषिर म्हणजे तोंड लावून फुंकीने वारा भरण्यासाठी असणारे भोक ठेवावे. त्यालाच मुखरंध्र असे म्हटले जाते. तारारंध्र म्हणजे तारस्वर प्रकट होण्यासाठी कारणीभूत असणारे भोक. फूत्काररंध्राजवळच्या या भोकातून तारस्वरच उत्पन्न होतो. ज्याप्रमाणे शरीरात सर्व स्वरांना समान असणाऱ्या तालु, ओठ इत्यादींच्या व्यापाराने अभिवादन केले असता, त्यांना जवळ असण्यामुळे मस्तकातून तारस्वरच उत्पन्न होतो; किंवा एकतंत्री इत्यादी वीणेत सर्व स्वरांना समान असणाऱ्या उजव्या हाताच्या बोटांच्या वापराने तारेवर वादन केले जात असता त्याजवळच्या सारिका इत्यादींत तारस्वरच उत्पन्न होतो तसेच येथेही जाणावे. ते तारारंध्र मुखरंध्रापासून एक अंगुळ अंतरावर ठेवावे. अंगुळाचा अर्धा भाग म्हणजे अर्धांगुळ. अर्धांगुळ अंतर मध्ये असणारी सात भोके असावी. ती बोरीच्या बी एवढी असावी. जरी भोक पोकळी या स्वरूपाचे म्हणजेच अमूर्त अस-

---

४०. स्वरांची भोके बोरीच्या बीएवढचा प्रमाणाची असावी असे सांगितले आहे. भोक म्हणजे आकाश (पोकळी) या स्वरूपाचे. आकाश हे आकारयुक्त कसे असू शकेल ? व आकार असल्याशिवाय माप कसे सांगता येईल ? अशी शंका रास्त असल्याने या सांगण्यात विरोध भासतो. त्याचे निरसन करण्यासाठी कल्लिनाथाने हे प्रमाण औपाधिक मानावे असे म्हटले आहे. उपाधि म्हणजे मर्यादित करणारा पदार्थ. उदा० 'घटाकाश' असे आपण म्हणतो, घटाकाश म्हणजे घागरीतले आकाश अर्थात पोकळी. आकाश निराकार आहे कारण ते सर्वव्यापक व अखंड आहे. त्यामुळे घागरीतले आकाश असा त्याचा वेगळा भाग पडू शकत नाही. घागरीबाहेरचे व घागरीतले आकाश एकच आहे. तरीही घागरीच्या आकाराच्या मर्यादेमुळे 'घटाकाश' असे आपण म्हणतो. अर्थात घागर या उपाधीमुळे घागरीतील आकाश असा आकाशाला घागरीच्या प्रमाणाची मर्यादा घालणारा शब्दप्रयोग केला जातो. हेच औपाधिक प्रमाण होय. तसेच येथेही औपाधिक प्रमाण समजावे.

नादहेतोर्मारुतस्य निर्गमायाष्टमं मतम् ।
फूत्कारप्रभवो वायुः पूर्यते मुखरन्ध्रतः ॥ ४३० ॥
वंशस्थैर्नवभी रन्ध्रैरेकवीरो निगद्यते ।
वंशस्य मुखरन्ध्रस्य तारारन्ध्रस्य चान्तरे ॥ ४३१ ॥
एकैकाङ्गुलवृद्ध्या स्युरन्ये वंशाश्चतुर्दश ।
आष्टादशाङ्गुलाद्वंशादेतदङ्गुलवर्धनम् ॥ ४३२ ॥
उमापतिर्द्व्यङ्गुलः[४१] स्यात्त्रिभिस्त्रिपुरुषोऽङ्गुलैः ।
चतुर्मुखश्चतुर्भिः स्यात्पञ्चवक्त्रस्तु पञ्चभिः ॥ ४३३ ॥

नाद उत्पन्न होण्यासाठी वारा बाहेर जाण्याकरता आठवे भोक मानले आहे. फुंकीमुळे उत्पन्न झालेला वारा मुखरंध्रातून भरला जातो. (४३०)

वंशातील नऊ भोकांनी (युक्त असणारा हा वंश) एकवीर म्हटला जातो. (४३१–)

वंशाचे मुखरंध्र आणि तारंध्र यांच्यामधील अंतरात (४३१) एकेक अंगुळ वाढवल्याने इतर चौदा वंश होतात. ही अंगुळांची वाढ अठरा अंगुळांचे (अंतर असणाऱ्या) वंशापर्यंत (जाणावी). (४३२)

दोन अंगुळे (अंतर असणारा) उमापति होय. तीन अंगुळांनी त्रिपुरुष, चारांनी चतुर्मुख व पाचांनी पंचवक्त्र होय. (४३३)

ल्याने बोरीच्या बी एवढे असे सांगणे योग्य ठरत नाही तरी बोरीच्या बीचा प्रवेश होण्यास योग्य असणे या दृष्टीने उपाधीने प्राप्त होणारे प्रमाण सांगितले आहे असे म्हटल्याने विरोध रहात नाही. सर्व म्हणजे नऊ रंध्रांच्या खालचा भाग म्हणजे सर्वात पुढचा भाग. तो दोन अंगुळे शिल्लक ठेवून म्हणजे त्यात भोक नसलेला असा योजावा. याबरून या वंशाच्या लांबीच्या प्रमाणाचा मूळभाग दोन अंगुळांचा असेल तर तो बारा अंगुळे मापाचा, तीन अंगुळांचा असेल तर तेरा अंगुळे मापाचा व चार अंगुळांचा असेल तर तो चौदा अंगुळे मापाचा असतो असे सांगितले आहे. याप्रमाणे नऊ भोकांतील पहिले व शेवटचे सोडून मधल्या सात भोकांतून (सात) स्वरांचा विभाग निर्माण होतो. हा वंश एकवीर या नावाने म्हटला जातो. मुखरंध्र व तारारंध्र यांमध्ये एक अंगुळ अंतर असल्याने नावाची सार्थकता जाणावी. (४२४ ते ४३०, ४३१––)

क. मुखरंध्र व तारारंध्र यांमधील अंतरात अंगुळांच्या वाढीमुळे होणारे इतर चौदा प्रकारचे वंश ग्रंथकार सांगत आहे. अंगुळांचे अंतर वाढविण्याची जास्तीत जास्त मर्यादा अठरा

---

४१. उमापति, चतुर्मुख, वसु, रुद्र, आदित्य, मनु इत्यादी वंशांची नावे त्या त्या वंशातली, मुखरंध्र व तारारंध्र यांच्यामधल्या अंतराची जी अंगुळांची संख्या, तिच्यावरून सार्थपणे दिलेली दिसतात. उदा.– उमापतीमध्ये अंगुळांची संख्या दोन आहे; चतुर्मुखात चार आहे; वसूत आठ आहे, (कारण वसू आठ आहेत); रुद्रात अकरा आहे, (कारण रुद्र अकरा आहेत); आदित्यात बारा आहे, (कारण आदित्य बारा आहेत); मनूत चौदा आहे, (कारण मनू चौदा आहेत); कलानिधीत सोळा आहेत, (कारण चंद्राच्या कला सोळा आहेत).

षडङ्गुलः षण्मुखः स्यान्मुनिः सप्ताङ्गुलो मतः ।
वसुरष्टाङ्गुलः प्रोक्तो नाथेन्द्रस्तु नवाङ्गुलः ॥ ४३४ ॥
दशाङ्गुलो महानन्दो रुद्रस्त्वेकादशाङ्गुलः ।
द्वादशाङ्गुल आदित्यो मनुर्वंशश्चतुर्दशः ॥ ४३५ ॥
कलानिधिः षोडशः स्यादन्वर्थोऽष्टादशाङ्गुलः ।
अविस्पष्टान्तरत्वेन नेष्टः सप्तदशाङ्गुलः ॥ ४३६ ॥
त्रयोदशाङ्गुलस्तद्वन्न च पञ्चदशाङ्गुलः ।
मुरल्याख्योऽपरैर्वंशो विंशत्यङ्गुलकः श्रितः ॥ ४३७ ॥

सहा अंगुळे (अंतर असणारा) षण्मुख होय. सात अंगुळे (अंतर असणारा) मुनि मानला आहे. आठ अंगुळे (अंतर असणारा) वसु म्हटला आहे व नाथेंद्र नऊ अंगुळे (अंतर असणारा होय). (४३४)

दहा अंगुळे (अंतर असणारा) महानन्द, अकरा अंगुळे (अंतर असणारा) रुद्र, बारा अंगुळे (अंतर असणारा) आदित्य व चौदा (अंगुळे अंतर असणारा) मनु (होय).(४३५)

सोळा (अंगुळे अंतर असणारा) कलानिधि व अष्टादशांगुळ (वंश) नावाप्रमाणे (अठरा अंगुळे अंतर असणारा) होय.

सतरा अंगुळे (अंतर असणारा वंश) अस्पष्ट अंतर असल्याने इष्ट नव्हे, (४३६) त्याच प्रमाणे तेरा अंगुळे व पंधरा अंगुळे (अंतर असणारे इष्ट नव्हत). दुसऱ्या (आचार्यांनी) वीस अंगुळे (अंतर असणारा) मुरली नावाचा वंश स्वीकारला आहे. (४३७) तज्ज्ञांमध्ये

अंगुळे सांगितली आहे. अष्टादशांगुळ वंश नावाप्रमाणे अठरा अंगुळे (अंतर असणारा) सांगितला जाणार आहे. त्यापर्यंत मुखरंध्र व ताररंध्र यामधील अंतरात एकेक अंगुळाने वाढ करावी. ज्या वंशात हे प्रस्तुत अंतर दोन अंगुळांचे असते तो उमापति म्हटला आहे. चौदावा म्हणजे चौदा अंगुळे अंतर असणारा असा अर्थ घ्यायचा, क्रमाने चौदावा नव्हे. तसेच सोळावा याचाही अर्थ सोळा अंगुळे अंतर असणारा, क्रमाने सोळावा नव्हे. अष्टादशांगुळ हे नाव आणि लक्षण दोन्ही एकाच (शब्दाने सांगितले आहे). (अठरा अंगुळे अंतर असणाऱ्या वंशाचे नाव अष्टादशांगुळ होय.) 'एकेक अंगुळ अंतर वाढवल्याने (इतर वंश प्रकार) होतात' असे म्हणून क्रमाने ते देत असता तेरा, पंधरा व सतरा अंगुळे या अंतरांचा त्याग करण्यामधील कारण सांगत आहे. अंतर म्हणजे भिन्नता स्पष्ट होत नाही हे ते कारण होय. याचा अर्थ असा–पूर्वीचा सोळा अंगुळे असणारा व नंतरचा अठरा अंगुळे असणारा यांच्याशी समान स्वरूप असल्याने त्यांच्या मध्ये असणाऱ्या सतरा अंगुळे अंतर असणाऱ्या वंशाची भिन्नता असूनही तो भेद सुस्पष्ट नसल्याने त्यांची भ्रांति उत्पन्न करतो. त्याच कारणाकरिता तेरा अंगुळे व पंधरा अंगुळे अंतर असणारे वंश इष्ट नव्हत. बारा अंगुळांपेक्षा कमी अंतर असणाऱ्या वंशांच्या बाबतीत अंगुळांच्या अल्पसंख्येमुळे भेद स्पष्ट जाणवत असल्याने भ्रांती उत्पन्न होत नाही असा आशय जाणावा. याप्रमाणे एकवीर इत्यादी पंधरा प्रकारचे वंश असतात. (४३१ ते ४३८)

द्वाविंशत्यङ्गुलोऽप्यन्यो वंशस्तज्ज्ञेषु दृश्यते ।
तं च श्रुतिनिधिं प्राहुर्वंशं वंशविदो जनाः ॥ ४३८ ॥
अतिमन्द्रध्वनित्वेन नेष्यतेऽसौ विचक्षणैः ।
विरलाश्चातितारत्वाद्वंशा पञ्चाङ्गुलादधः[४२] ॥ ४३९ ॥
अष्टादशाङ्गुले वंशे स्वररन्ध्रेषु सप्तसु ।
मुद्रितेषु भवेत्षड्जो मन्द्रसप्तकसंस्थितः ॥ ४४० ॥

बावीस अंगुळे (अंतर असणाराही) दुसरा एक वंश दिसून येतो. वंशजाणणारे लोक त्याला श्रुतिनिधि म्हणतात. (४३८) पण अत्यंत मंद्र नाद असल्याने विद्वान तो इच्छित नाहीत. (४३९-)

पाच अंगुळांच्या पेक्षा कमी (अंतर असणारे) वंश अत्यंत तार नाद उत्पन्न होण्यामुळे विरळ (होत). (४३९) अष्टादशांगुळ वंशात सात स्वररंध्रे (बोटांनी) झाकली असता मंद्र सप्तकातला षड्ज उत्पन्न होतो. (४४०)

क० पांच अंगुळांच्या खालचे म्हणजे चार, तीन, दोन व एक अंगुळ अंतर असणारेच वंश होत. आशय असा की वंशाची लांबी फार असल्यास उत्पन्न होणारे अत्यंत मंद्र नादस्वरूप किंवा फार आखुडपणा असल्यास उत्पन्न होणारे अत्यंत तार नादस्वरूप सर्व गायकांच्या बाबतीत साधारणपणे संभवत नसल्याने ते (वंशाच्या बाबतीत) बोधस्वरूपच होय.

अष्टादशांगुळ वंशात, वारा बाहेर जाण्यासाठी असलेले आठवे भोक सोडून, दोन्ही हातांच्या बोटांच्या टोकांनी सातवे इत्यादी सात भोके शास्त्रात सांगितल्याप्रमाणे झाकल्यावर मंद्र सप्तकाचा आरंभीचा षड्ज उत्पन्न होतो. याप्रमाणे बाकीच्या सहा वंशांत ऋषभ इत्यादी क्रमाने उत्पन्न होतात; म्हणजे कलानिधीत सात भोके झाकल्यावर मंद्र ऋषभ उत्पन्न होतो, मनूत मंद्र गांधार, आदित्यात मंद्र मध्यम, रुद्रात मंद्र पंचम, महानंदात मंद्र धैवत आणि नायेंद्रात मंद्र निषाद असे स्वर क्रमाने उत्पन्न होतात असे जाणावे. आठ अंगुळे अंतर असणाऱ्या वसु नावाच्या वंशापासून आरंभ करून खाली क्रमाने सात वंशांत, याप्रमाणे योजना केली असता मध्यस्थानचे षड्ज इत्यादी सात स्वर उत्पन्न होतात. स्वरांची सात भोके झाकली असता, वसूत मध्य षड्ज, मुनीत मध्य ऋषभ, षण्मुखात मध्य गांधार, पंचवक्त्रात मध्य मध्यम, चतुर्मुखात मध्य पंचम, त्रिपुरुषात मध्य धैवत व उमापतीत मध्य निषाद असे स्वर क्रमाने उत्पन्न होतात.

---

४२. 'पञ्चाङ्गुलादधः' असा पाठ अडयार व आनंदाश्रम आवृत्तीत आहे. कल्लिनाथाचे स्पष्टीकरण या पाठानुसारच आहे. सुधाकरटीकेत 'पञ्चाङ्गुलाद्या वंशा अतितारत्वात् विरलाः' असे म्हटले आहे. या विरळ असणाऱ्या वंशांत पंचांगुळ वंशाचाही समावेश आहे. त्यामुळे 'पञ्चाङ्गुलादयः' असा पाठ या टीकाकारासमोर असावा का ? कीर्तिधर आचार्यांनी तार स्वर निर्माण करणारे वंश सहा अंगुळे, सात अंगुळे व आठ अंगुळे अंतर असणारे असे दिले आहेत.

षट्स्वेवमन्यवंशेषु स्युः क्रमादृषभादयः ।
आरभ्याष्टाङ्गुलादेवमधो वंशेषु सप्तसु ॥ ४४१ ॥
मध्यस्थानगताः सप्तोद्यन्ति षड्जादयः क्रमात् ।
तारस्थानस्थितः षड्जस्त्वेकवीरस्य जायते ॥ ४४२ ॥
सर्वेष्वेतेषु वंशेषु मुक्ते रन्ध्रद्वयेऽन्तिमे ।
स्वरो द्वितीयो जायेत तृतीयाद्यास्ततः परम् ॥ ४४३ ॥
सप्तमान्ताः प्रजायन्ते त्र्यादिरन्ध्रविमोचनात् ।
मुक्ते तु तारेरन्ध्रेऽन्यरन्ध्रेषु पिहितेषु च ॥ ४४४ ॥
अष्टमस्वरसंभूतिः पूर्वाचार्यैरुदीरिता ।
व्यक्तमुक्ताङ्गुलित्वेन समग्रो जायते स्वरः ॥ ४४५ ॥

याप्रमाणे इतर सहा वंशांत (म्हणजे कलानिधि, मनु, आदित्य, रुद्र, महानंद आणि नांथेंद्र यांत) क्रमाने (मंद्रस्थानचे) ऋषभ इत्यादी उत्पन्न होतात. अशाच प्रकारे आठ अंगुळे अंतर असणाऱ्या (वसु) पासून आरंभ करून त्यापेक्षा खालचे (म्हणजे कमी कमी अंतर असणारे मुनि, षण्मुख, पंचवक्त्र, चतुर्मुख, त्रिपुरुष आणि उमापति या) सात वंशांत (४४१) मध्य स्थानातले षड्ज इत्यादी सात (स्वर) क्रमाने उत्पन्न होतात. आणि एकवीरात तारस्थानातला षड्ज उत्पन्न होतो. (४४२) या सर्व वंशांत शेवटची दोन भोके मोकळी सोडल्यास दुसरा स्वर उत्पन्न होतो. नंतर तीन इत्यादी भोके मोकळी सोडल्यास तिसऱ्यापासून सातव्या पर्यंतचे (स्वर क्रमाने) उत्पन्न होतात. तारंध्र मोकळे सोडले असता व बाकीची भोके झाकली असता, पूर्वीच्या आचार्यांनी आठव्या स्वराची उत्पत्ती सांगितली आहे. भोकापासून बोट स्पष्टपणे मोकळे ठेवल्याने संपूर्ण स्वर उत्पन्न होतो. (४४३, ४४४, ४४५)

याप्रमाणेच सात स्वररंध्रे झाकली असता एकवीर या वंशात तार षड्ज उत्पन्न होतो. या अष्टादशांगुळ इत्यादी वंशांत शेवटची दोन भोके मोकळी सोडल्यावर, ज्या वंशात जो स्वर पहिला म्हणून उत्पन्न झालेला असतो त्यादृष्टीने त्या वंशात दुसरा स्वर उत्पन्न होतो; म्हणजे अष्टादशांगुळ वंशात मंद्र ऋषभ, कलानिधीत मंद्र गांधार इ. अशातऱ्हेने सर्वत्र तर्काने जाणावे. मग तीन भोके मोकळी सोडली असता तिसरा इत्यादी प्रकाराने सातापर्यन्त क्रमाने उत्पन्न होतात. अर्थात त्या त्या पूर्वीच्या स्वराच्या दृष्टीने तिसरा इत्यादी स्वर जाणावे. म्हणजे अष्टादशांगुळ वंशात शेवटची दोन भोके मोकळी सोडल्यावर मंद्र षड्जापासून तिसरा मंद्र गांधार, कलानिधीत तीन भोके मोकळी सोडली असता मंद्र ऋषभापासून तिसरा मंद्र मध्यम उत्पन्न होतो याप्रमाणे सर्वत्र जाणावे. तसेच चार भोके मोकळी सोडली असताही त्या त्या प्रथम उत्पन्न झालेल्या स्वराच्या दृष्टीने चवथा स्वर इत्यादी प्रकाराने जाणावे. ज्या वंशात तारंध्र इत्यादी सात भोके झाकली असता जो स्वर उत्पन्न होतो, त्यात बाकीची भोके झाकून तारंध्र मोकळे ठेवले असता तोच आठवा म्हणून (म्हणजे दृष्टीचा) उत्पन्न होतो.

अङ्गुल्याः कम्पने तत्र श्रुतिरेकापचीयते ।
श्रुतिद्वयं त्वर्धमुक्ते तत्कम्पे तु श्रुतित्रयम् ॥ ४४६ ॥
अन्यथा वर्णयन्तीह केचित्सप्तस्वरोदयम् ।
अर्धेन्दुनागफणवद्वंशे[४३] स्थाप्यं करद्वयम् ॥ ४४७ ॥
वामस्यानामिकाङ्गुल्या षड्जो मध्यमया पुनः ।
ऋषभः स्यात्प्रदेशिन्या गान्धार इति वामतः ॥ ४४८ ॥
त्रयः स्वराः प्रजायन्ते चत्वारो दक्षिणात्करात् ।
कनिष्ठया मध्यमः स्यात्पञ्चमोऽनामया स्वरः ॥ ४४९ ॥

ल्या ठिकाणी बोटाचे कंपन योजल्यास स्वराची एक श्रुति कमी होते. अर्धे भोक मोकळे सोडल्यास दोन श्रुती कमी होतात; व ल्या (बोटाचे) कंपन योजल्यास तीन श्रुती कमी होतात. (४४६)

काही (आचार्य) यात सात स्वरांची उत्पत्ति वेगळ्या प्रकाराने वर्णितात. अर्धचंद्र व नागफणा याप्रमाणे दोन्ही हात वंशावर ठेवून (४४७) डाव्या हाताच्या अनामिका या बोटाने (म्हणजे तिसऱ्या बोटाने) षड्ज आणि मधल्या बोटाने ऋषभ व प्रदेशिनीने (म्हणजे पहिल्या बोटाने) गांधार उत्पन्न होतो असे डाव्या हाताने (४४८) तीन स्वर उत्पन्न होतात. उजव्या हाताने चार स्वर (उत्पन्न होतात). करंगळीने मध्यम व तिसऱ्या बोटाने पंचम स्वर उत्पन्न होतो. (४४९)

समग्र स्वर म्हणजे शुद्ध अवस्थेत सांगितलेल्या श्रुतींनी युक्त असा स्वर. बोट कंपित ठेवल्यास तो स्वर आपल्या जवळ मागील लागून असणाऱ्या श्रुतिस्थानाला जातो. भोक अर्धे मोकळे ठेवल्यास दोन श्रुति कमी होतात. अर्धे मोकळे ठेवलेल्या भोकावरचे बोट कंपित योजल्यास तीन श्रुती कमी होतात. (४३९–४४६)

क. दुसऱ्या मताने वंशांत स्वरांची उत्पत्ति दाखविण्यासाठी सांगत आहे–

अर्धेन्दु म्हणजे अर्धचंद्र हस्त व नागफण म्हणजे सर्पशीर्ष हस्त; (त्यांची लक्षणे सातव्या अध्यायात) ग्रंथकार सांगणार आहे. ती अशी–

"जुळलेली सर्व बोटे एका बाजूला व अंगठा दुसऱ्या बाजूला ठेवला असता जो चंद्राच्या कोरीप्रमाणे दिसतो तो (हस्त) अर्धचंद्र म्हटला जातो." (अडधार आवृत्ति ७.११७) "मध्ये खोलगट असलेला पताक (हस्त) तो सर्पशीर्ष होय." (अडधार आवृत्ति– ७–१५२) 'याप्रमाणे' यावरून हे नृत्यातले हात योजायचे म्हणजे त्यासारखे योजायचे, तेच नव्हेत असे कळून येते. सांगितले आहे ते हे की दोन्ही हातांचे अंगठे वेगळे वेगळे ठेवल्याने प्रत्येक हात अर्धचंद्राप्रमाणे आणि बाकीची वर केलेली बोटे वाकवल्याने प्रत्येक हात नागफणासारखा जाणवतो. अशाप्रकारचे दोन्ही हात वंशावर ठेवावे. अर्थात अंगठ्याच्या मागाने वंश धरून व

---

४३. सु. टी. डावा हात अर्धचंद्राप्रमाणे विमुख व उजवा नागफणाप्रमाणे संमुख.

धैवतः स्यान्मध्यमया प्रदेशिन्या निषादवान् ।
स्थानत्रयस्य निष्पत्तिर्नैवास्मिन्नन्यथा जगुः[४४] ॥ ४५० ॥
सुशिक्षितेन रचितात्फूत्कारान्मध्यसप्तके ।
जायन्ते वैणशारीरस्वरसंवादिनः स्वराः ॥ ४५१ ॥
तारस्था मुखसंयोगसंकटे मुखरन्ध्रके ।
तं वादनप्रकारं च टीपामाचक्षते जनाः ॥ ४५२ ॥
तया यद्वाद्यते रन्ध्रे तत्स्वरो द्विगुणो भवेत् ।
रन्ध्रस्य मुखसंयोगविप्रकर्षात्तु मन्द्रगाः ॥ ४५३ ॥

मधल्या बोटाने धैवत व पहिल्या बोटाने निषाद उत्पन्न होतो. यामध्ये तिन्ही स्थानांची उत्पत्ति होतच नाही. (दुसऱ्या आचार्यांनी) दुसऱ्या तऱ्हेने (ती) सांगितली आहे. (४५०) (वंशवादनाचे) चांगले शिक्षण घेतलेल्या (वादकाने) योजिलेल्या फुंकीपासून, वीणा व कंठ यांतून निघालेल्या स्वरांशी संवादी (म्हणजे एकरूप असणारे) मध्यसप्तकातले स्वर उत्पन्न होतात. (४५१)

मुखरंध्र तोंडाच्या अत्यंत जवळ ठेवून (योजलेल्या फुंकीने) तारस्थानातले (स्वर उत्पन्न होतात). या वाजविण्याच्या प्रकाराला लोक टीपा असे म्हणतात. (४५२) तिच्यामुळे भोकातून जे वादन होते त्यापासूनचा स्वर दुप्पटीचा असतो. तोंडापासून मुखरंध्र दूर ठेवून (फुंकल्याने) मंद्र स्थानातले (स्वर उत्पन्न होतात). (४५३)

बोटांचे भाग त्यावर ठेवून (तो धारण करावा). 'डाव्या हाताच्या तिसऱ्या बोटाने षड्ज उत्पन्न होतो' इत्यादी सांगण्याने हातांची ठेवण उलटापालटीची असल्याचे सूचित होते. या मताने मंद्र, मध्य व तार या तिन्ही स्थानांची उत्पत्ति होतच नाही. दुसऱ्या आचार्यांनी दुसऱ्या प्रकाराने सांगितले आहे. सुशिक्षिताने योजलेली फुंक सर्वसाधारण नव्हे. तोंड व फुंकायचे भोक त्यांच्या विशेष प्रकारच्या संयोगाने ती उत्पन्न होते. वीणा व गळा यांतून निघणाऱ्या स्वराशी एकरूप असे मध्य सप्तकातले स्वर या फुंकीने निर्माण होतात. तोंड अत्यंत जवळ ठेवल्याने दुप्पट स्वर उत्पन्न होतो; अर्थात या विशिष्ट फुंकीमुळे तारस्थानचे स्वर उत्पन्न होतात. तोंड फुंकायच्या भोकापासून दूर ठेवल्याने फुंकीच्या प्रयत्नात शिथिलपणा निर्माण होऊन मंद्र स्थानचे स्वर निर्माण होतात. (४४७–४५३)

---

४४. 'स्थानत्रयस्य निष्पत्ति ते चास्मिन्नन्यथा जगुः'।
असा पाठ संगीतसारामृतात आहे. (पृ. १२७) आनंदाश्रम आवृत्तीतही यासारखा पाठ आहे. (पृ. ५३१) या पाठाप्रमाणे अर्थ असा– 'यामध्ये तिन्ही स्थानांची उत्पत्ति त्यांनी वेगळ्या प्रकाराने सांगितली आहे.' अडचार आवृत्तीत (भाग ३. पृ. ३२७) सुधाकरपाठ असाच आहे. पण त्यात 'निष्पत्ति ते' या ऐवजी 'निष्पत्तिस्ते' असे आहे. ते अर्थातच बरोबर नाही.

तीव्रातीव्रतया वायोः शीघ्रमन्थरभावतः ।
पूरणापूरणाभ्यां चोपचयापचयाद् ध्वनेः ॥ ४५४ ॥
कुर्वन्त्येकत्र रन्ध्रेऽपि तज्ज्ञा नानास्वरोदयम् ।
कम्पिता वलिता मुक्तार्धमुक्ता च निपीडिता ॥ ४५५ ॥
इति वंशे गतिः प्रोक्ता शार्ङ्गदेवेन पञ्चधा ।
अधरस्थस्य वंशस्य कम्पनात्कम्पिता मता ॥ ४५६ ॥
वर्णालंकारनिष्पत्तिः प्रयोगेऽस्याः प्रयोजनम् ।

इति कम्पिता

भवेत्संचारिनिष्पत्तौ वलिताङ्गुलिचालनम् ॥ ४५७ ॥

इति वलिता

वारा जोराने किंवा हळू (फुंकून), (तसेच) जलद वा सावकाश (योजून), नाद पूर्ण वा अपूर्ण भरून आणि भरदार वा क्षीण योजून (४५४) तज्ज्ञ (वादक) एका भोकातूनही नाना स्वर निर्माण करतात.

कंपित, वलित, मुक्त, अर्धमुक्त, व निपीडित (४५५) अशी पाच प्रकारची गति (म्हणजे वादनपद्धति) शार्ङ्गदेवाने वंशाच्या बाबतीत सांगितली आहे.

ओठाशी धरलेला वंश कंपित योजल्याने कंपित गति मानली आहे. (४५६) वर्ण वा अलंकार यांची निर्मिति हे हिच्या प्रयोगातले प्रयोजन होय.

ही कंपित गति होय.

बोट हलविल्यामुळे वलित (गति) होते; (ती) संचारी वर्ण निर्माण करण्यासाठी (असते) (४५७)

ही वलित गति होय.

क० या तऱ्हेने, फुंकीच्या प्रयत्नातील भिन्नतेमुळे तिन्ही स्थानांची उत्पत्ति सांगितल्यावर, त्याहीपेक्षा कुशल असणारे एकाच भोकातून अनेक स्वर उत्पन्न करतात असे ग्रंथकार सांगत आहे. (४५४, ४५५)

नंतर वंशातील पाच गती दाखवीत आहे. अर्धमुक्ति म्हणजे बोटाच्या टोकाच्या अर्ध्या भागाने, भोकाचे टोक मोकळे ठेवणे. धृतशब्दविधायिनी म्हणजे उत्पन्न झालेला नाद धारण करणारी. (४५६ ते ४५९)

डाव्या हाताच्या बोटांनी तीन व उजव्या हाताच्या बोटांनी चार असे स्वरसप्तक निर्माण करावे असे ज्या आचार्यांनी सांगितले आहे त्यांनीच तिन्ही स्थानांची निष्पत्तीही कशी करावी हेही वेगळ्या प्रकाराने सांगितले आहे असा आशय या पाठानुसार कळतो. त्यामुळे हा पाठ अधिक सुसंगत वाटतो.

रन्ध्रेऽखिलेऽङ्गुलीमुक्ते मुक्ता स्यान्मुक्तशब्दकृत् ।
इति मुक्ता
अर्धमुक्तार्धमुक्तेः स्याद् धृतशब्दविधायिनी ॥ ४५८ ॥
इत्यर्धमुक्ता
समन्तात्सर्वरन्ध्राणि पिधायाङ्गुलिभिर्यदा ।
वंशं पूरयते तज्ज्ञैस्तदा ज्ञेया निपीडिता ॥ ४५९ ॥
इति निपीडिता
अत्र कीर्तिधरस्त्वन्यां व्यवस्थामभ्युपागमत् ।
षट्सप्ताष्टाङ्गुला वंशास्तारस्वरविधायकाः ॥ ४६० ॥
मध्यस्वरा नवदशैकादशाङ्गुलकास्त्रयः ।
अङ्गुलैर्यो द्वादशभिः स्यात्त्रयोदशभिश्च यः ॥ ४६१ ॥

सर्व भोकापासून बोट मोकळे केले असता ती मुक्त (गति) होय; (ती) मोकळा नाद निर्माण करते.

ही मुक्त गति होय.

अर्ध्या (भोकापासून बोट) मोकळे ठेवल्यास ती अर्धमुक्त (गति) होय; (ती निर्माण झालेला) नाद धारण करते. (४५८)

ही अर्धमुक्त गति होय.

जेव्हा बोटांनी सगळी भोके सर्व बाजूंनी झाकून (वादक) वाऱ्याने वंश भरून टाकतो तेव्हा तज्ज्ञांनी ती निपीडित गति जाणावी. (४५९)

ही निपीडित गति होय.

या (वंशांच्या) बाबतीत कीर्तिधराने दुसरी व्यवस्था स्वीकारली आहे. (त्याच्या मताने) सहा, सात व आठ अंगुळे (अंतर) असणारे वंश तारस्वर निर्माण करणारे (असतात); (४६०) नऊ, दहा व अकरा अंगुळे (अंतर) असणारे तीन मध्य स्वर निर्माण करतात. जो बारा अंगुळे (अंतराने युक्त) आणि जो तेरा अंगुळे (अंतराने युक्त) असतो (४६१) ते दोन मंद्र स्वरांचे कारण होत. आणि सर्ववंशमय (म्हणजे या आठी

दुसऱ्या मतानुसार वंशांची व्यवस्था सांगत आहे. या वंशाच्या बाबतीत कीर्तिधराने तिन्ही स्थानांच्या संबंधी दुसरी व्यवस्था मान्य केली आहे. तीच ग्रंथकार दाखवीत आहे. सर्ववंशमय म्हणजे सांगितलेल्या आठ प्रकारच्या वंशांच्या स्वरूपाचा (त्या सर्वांचा समावेश असलेला). यात तिन्ही स्थानचे स्वर साधणारा हे हेतुगर्भित विशेषण होय. (म्हणजे हा वंश तिन्ही स्थानांतील स्वर निर्माण करण्यास कारणीभूत होतो.) (४६०–४६३)

हेतू मन्द्रस्वराणां तौ सर्ववंशमयः पुनः ।
चतुर्दशाङ्गुलो वंशस्त्रिस्थानस्वरसाधकः ॥ ४६२ ॥
वर्णालंकारधात्वादि वाद्यसंवादनक्षमः ।
एवं वंशा नवैवेति युक्तायुक्तविदो विदुः ॥ ४६३ ॥
केचिद्देशीविदो वंशानेकवीरादिकानमून ।
मानान्तरेणाभिदधुस्तेषां मतमिदं ब्रुवे ॥ ४६४ ॥
प्राक् चतुर्दशवंशात्तेऽङ्गुलं पञ्चयवं जगुः ।
चतुर्दशादिवंशेषु सार्धपञ्चयवं त्विदम् ॥ ४६५ ॥
चतुर्दशाङ्गुलं दण्डमेकवीरे प्रचक्षते ।
सार्धाङ्गुलौ शिरःप्रान्तौ पृथग्जातिमुखेऽङ्गुलम् ॥ ४६६ ॥

वंशांचे स्वरूप असणारा) जो चौदा अंगुळे (अंतर असणारा) वंश तो तिन्ही स्थानचे स्वर देणारा (४६२) (तसेच) वर्ण, अलंकार, धातू इत्यादींच्या वादनात एकरूप होण्याची पात्रता असलेला होय.

योग्यायोग्यतेचे ज्ञान असणारे, या प्रमाणे वंश नऊच होत असे जाणतात. (४६३)

काही देशीजाणकारांनी या एकवीर इत्यादी वंशांचे दुसरे माप सांगितले आहे. त्यांचे हे मत सांगतो. (४६४)

चौदा अंगुळे अंतर असणाऱ्या (मनु या) वंशाच्या पूर्वीच्या (वंशांच्या बाबतीत) त्यांनी पाच यवांचे अंगुळ सांगितले आहे. चौदा अंगुळे अंतर असणाऱ्या (मनु) इत्यादी वंशांत (म्हणजे मनु, कलानिधी व अष्टादशांगुळ यांत) हे (अंगुळ) साडेपांच यवांचे (म्हटले आहे.) (४६५)

एकवीराच्या बाबतीत ते दंड चौदा अंगुळांचा सांगतात. त्याचा मस्तकप्रदेश (म्हणजे मुळाकडचा भाग) व टोकाकडचा भाग हे प्रत्येकी दीड अंगुळ (मापाचे) आणि जातिमुख (म्हणजे फुंकण्याचे भोक) एक अंगुळ (४६६) प्रमाणाचे (असते).

क० आता काही देशीजाणकारांच्या मताप्रमाणे वेगळ्या प्रमाणांमुळे वेगळ्या लक्षणांचे असणारे एकवीर इत्यादी वंश सांगत आहे. ते देशीजाणकार चौदा अंगुळे अंतराच्या मनु या वंशापूर्वीचे आदित्य ते एकवीर या वंशांबाबत अंगुळाचे माप पाच यवांचे सांगतात. चौदा अंगुळे अंतर असणारा व नंतरचे म्हणजे मनु, कलानिधि व अष्टादशांगुळ या तीन वंशांच्या बाबतीत अंगुळाचे माप साडेपाच यवांचे सांगतात. अर्थात पूर्वीच्या वंशापेक्षा भिन्न माप सांगतात. शिरःप्रान्त म्हणजे मूळ व टोकाकडचा भाग. जातिमुख म्हणजे फूत्काररंध्र. (४६४–४७२)

मानं तारादिरन्ध्राणि प्रत्येकं त्रियवानि तु ।
त्रियवान्यन्तरालानि पृथक् स्थानेषु मूलतः ॥ ४६७ ॥
पञ्चमांशोनितं मानं कनिष्ठापर्वमध्यतः ।
उमापतेस्तु वंशस्य दण्डः पञ्चदशाङ्गुलः ॥ ४६८ ॥
पादोनेन यवद्वन्द्वेनाधिकोऽस्यान्तरेषु तु ।
सपादत्रितयं मानं पृथगन्यत्तु पूर्ववत् ॥ ४६९ ॥
अङ्गुलैः सप्तदशभिर्यवयुग्माधिकैर्मतः ।
दण्डस्त्रिपुरुषे वंशे पृथगन्तरसप्तके ॥ ४७० ॥
यवोनमङ्गुलं मानमपरं लक्ष्म पूर्ववत् ।
यवद्वयाधिकैः सार्धैरष्टादशभिरङ्गुलैः ॥ ४७१ ॥
मितश्चतुर्मुखे दण्डे शिरोन्तौ तु मितौ पृथक् ।
पादोनाभ्यामङ्गुलाभ्यां लक्षणं पूर्ववत्परम् ॥ ४७२ ॥
यवस्य सार्धपादेन न्यूना द्वात्रिंशतिर्मता ।
अङ्गुलानां दण्डमानं पञ्चवक्त्रे शिरोन्तयोः ॥ ४७३ ॥
साधाङ्गुलद्वयं मानं पृथगन्तरसप्तके ।
चतुर्यवी सार्धपादाभ्यधिकान्यत्तु पूर्ववत् ॥ ४७४ ॥

तार इत्यादी भोके प्रत्येकी तीन यव (मापाची असतात). मधली अंतरे प्रत्येकी तीन यव (मापाची असून) स्थानांतील प्रमाण मुळापासून (४६७) एक पंचमांश कमी करंगळीचे मधले पेर एवढे असते (?).

उमापति वंशाचा दंड पंधरा अंगुळे (४६८) व एकपूर्णांक तीन चतुर्थांश यव (या मापाचा असून) याच्यातील अंतरांचे प्रमाण प्रत्येकी तीन पूर्णांक एकचतुर्थांश यव (एवढे असते). बाकी सर्व पूर्वीच्या प्रमाणे (होय). (४६९)

त्रिपुरुषाचा दंड सतरा अंगुळे व दोन यव (मापाचा) मानला आहे. सात अंतरे प्रत्येकी (४७०) एक यव कमी अंगुळ या प्रमाणाची असतात. बाकीचे लक्षण पूर्वीच्या प्रमाणे होय. चतुर्मुखाचा दंड साडे अठरा अंगुळे व दोन यव मापाचा (असून) मस्तक प्रदेश व दुसरे टोक प्रत्येकी एकपूर्णांक तीनचतुर्थांश अंगुळे मापाची (असतात). बाकीचे लक्षण पूर्वीच्या प्रमाणे (होय). (४७१, ४७२)

पंचवक्त्र वंशाचा दंड तीन अष्टमांश यव कमी बावीस अंगुळे या मापाचा मानला आहे. मूळ भाग व दुसऱ्या टोकाचा भाग (४७३) अडीच अंगुळे प्रमाणाचा असून, मधली सात अंतरे प्रत्येकी चार पूर्णांक तीन अष्टमांश यव प्रमाणाची (असतात). बाकी (सर्व) पूर्वीच्या प्रमाणे (होय). (४७४)

षण्मुखे यवपादाभ्यां सपादाभ्यां सहाङ्गुलैः ।
चतुर्विंशतिसंख्यैः स्याद्दण्डः परिमितस्ततः ॥ ४७५ ॥
ताराद्यष्टसु रन्ध्रेषु सपादस्त्रियवा मितिः ।
प्रत्येकमन्तरालेषु षोडशांशोनिता यवाः ॥ ४७६ ॥
पञ्चमानमिताः शेषं लक्ष्म स्यात्पञ्चवक्त्रवत् ।
इतः परेषु वंशेषु सप्तस्वभ्यधिको यवः ॥ ४७७ ॥
स्वमानाद् दृश्यते तारारन्ध्रे जातिमुखान्तरे ।
युक्ता यवेन सार्धेनाङ्गुलषड्विंशतिर्भवेत् ॥ ४७८ ॥
प्रमाणं मुनिदण्डस्य मानं रन्ध्राष्टके पुनः ।
यवत्रयं सार्धपादाधिकं प्रत्येकमीरितम् ॥ ४७९ ॥
पृथक्पञ्चयवौ सार्धान्तरेष्वन्यत्तु पूर्ववत् ।
वसुवंशे तु दण्डस्याङ्गुलाष्टाविंशतिर्मितिः ॥ ४८० ॥
यवाधिका जातिमुखं यवेनाधिकमङ्गुलम् ।
यवाधिकाङ्गुला ज्ञेयान्तरालेषु मितिः पृथक् ॥ ४८१ ॥
शेषं तु पूर्ववद्वंशे नाथेन्द्रे दण्डसंमितिः ।
यवपादाधिका त्रिंशदङ्गुलानां शिरोन्तयोः ॥ ४८२ ॥

षण्मुख वंशाचा दंड चोवीस अंगुळे व पाऊण यव मापाचा असतो. नंतर (४७५) तार इत्यादी आठभोकांचे प्रमाण तीनपूर्णांक एक चतुर्थांश यव असते. (त्या भोकांमधील) अंतरे प्रत्येकी एक सोळांश कमी (४७६) पाच यव (म्हणजे ४$\frac{15}{16}$ यव) मापाची (असतात). बाकीचे लक्षण पंचवक्त्राप्रमाणेच असते. या पुढील सात वंशांत, तारंध्र व फुंकण्याचे भोक यांमध्ये, आपल्या प्रमाणापेक्षा एक यव अधिक असे माप दिसून येते. मुनि वंशाचा दंड सव्वीस अंगुळे व दीड यव मापाचा असतो. आणि आठ भोकांचे प्रमाण प्रत्येकी तीन पूर्णांक तीन अष्टमांश यव सांगितले आहे. (४७७,४७८,४७९) (भोकांमधील) अंतरे प्रत्येकी साडेपाच यव (प्रमाणाची असतात). बाकीचे (लक्षण) पूर्वीच्या प्रमाणे (होय).

वसुवंशाचा दंड अठ्ठावीस अंगुळे अधिक एक यव या मापाचा असून फुंकण्याचे भोक एक अंगुळ अधिक एक यव (या प्रमाणाचे असते). (भोकांमधील) अंतरे प्रत्येकी एक अंगुळ व एक यव मापाची जाणावी. (४८०, ४८१) बाकी (लक्षण) पूर्वीच्या प्रमाणे (होय).

नाथेंद्र वंशाच्या दंडाचे माप तीस अंगुळे व एकचतुर्थांश यव (एवढे असते). मूळभाग व दुसरे टोक (४८२) (प्रत्येकी) दोन पूर्णांक तीनचतुर्थांश अंगुळे प्रमाणाचे

पादोनत्र्यङ्गुलं मानं पृथगन्तरसप्तके ।
सपादमङ्गुलं मानं खानिमानं तु मूलतः ॥ ४८३ ॥
षष्ठभागविहीनं स्यात्कनिष्ठापर्वमध्यमम् ।
अन्यत्तु पूर्ववद्दण्डे महानन्दस्य संमितिः ॥ ४८४ ॥
पादन्यूनेन पादेन यवस्याभ्यधिका भवेत् ।
द्वात्रिंशदङ्गुलानां तच्छिरोन्तौ त्र्यङ्गुलौ पृथक् ॥ ४८५ ॥
सपादाङ्गुलकं जातिमुखमन्तरसप्तके ।
पृथक्सपादपादेनाभ्यधिकं मानमङ्गुलम् ॥ ४८६ ॥
मूलतः सप्तमांशोनकनिष्ठामध्यपर्वणा ।
मिता खानिः परं लक्ष्म पूर्वोक्तं तैरुदीरितम् ॥ ४८७ ॥
सपादानि चतुस्त्रिंशदङ्गुलानि मितिर्भवेत् ।
यवार्धसहिता रुद्रदण्डस्यान्तरसप्तके ॥ ४८८ ॥
सार्धाङ्गुलं पृथङ्मानं कनिष्ठामध्यपर्वणा ।
खानिः परिमिता शेषं पूर्ववंशवदिष्यते ॥ ४८९ ॥

असून सात अंतरे प्रत्येकी एकपूर्णांक एकचतुर्थांश अंगुळ मापाची (असतात). खानीचे (म्हणजे दंडाच्या आतील पोकळीचे) माप मुळापासून (४८३) करंगळीच्या मधल्या पेराचा एक षष्ठांश कमी (म्हणजे $\frac{5}{6}$ पेर एवढे) असते. बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय).

महानंदाच्या दंडाचे माप (४८४) बत्तीस अंगुळे व तीन षोडशांश यव एवढे असते. त्याचा वरचा भाग व दुसऱ्या टोकाचा भाग प्रत्येकी तीन अंगुळांचा (असतो). (४८५)

फुंकण्याचे भोक एक पूर्णांक एक चतुर्थांश अंगुळ (मापाचे) असून सात अंतरे प्रत्येकी एकपूर्णांक पाच षोडशांश अंगुळ मापाची (असतात) (४८६) मुळापासून आतील पोकळीचे माप करंगळीच्या मधल्या पेराचा एकसप्तमांश भाग कमी (म्हणजे $\frac{6}{7}$ पेर एवढे) असते. त्यांनी बाकीचे लक्षण पूर्वी सांगितलेले सांगितले आहे (४८७).

रुद्र वंशाच्या दंडाचे माप सव्वाचौतीस अंगुळे व अर्धा यव एवढे असते. सात अंतरे (४८८) प्रत्येकी दीड अंगुळ मापाची असून खानि करंगळीच्या मधल्या पेराच्या प्रमाणाची असते. बाकीचे पूर्वीच्या वंशाप्रमाणेच मानले आहे. (४८९) आदित्य वंशाच्या

क० खानि म्हणजे दंडाच्या इतक्याच लांबीची आतील पोकळी. तिचे प्रमाण $\frac{1}{6}$ कमी करंगळीचे मधले पेर या मापाचे असते. मुळापासून म्हणजे दंडाच्या वरच्या भागापासून. या मतानुसार वंशांची लक्षणे ग्रंथामध्येच स्पष्ट आहेत. (४८३ ते ५०१)

सप्तत्रिंशद्यवार्धेनाभ्यधिकान्यङ्गुलानि तु ।
आदित्ये दण्डमानं स्यात्पादोनं त्वङ्गुलद्वयम् ॥ ४९० ॥
अन्तरेषु पृथङ्मानमपरं रुद्रवंशवत् ।
मनोर्दण्डे सपादैकोनचत्वारिंशदङ्गुलम् ॥ ४९१ ॥
यवाधिकं सपादेनाष्टमांशेन यवस्य च ।
सहितं मानमाख्यातं पादन्यूनाङ्गुलत्रयैः ॥ ४९२ ॥
शिरःप्रान्तौ पृथग्जातिमुखे स्यान्मानमङ्गुलम् ।
षोडशांशोनपादेनाधिकं रन्ध्राष्टके पुनः ॥ ४९३ ॥
यवत्रयं पृथक्सार्धमन्तरेषु च सप्तसु ।
प्रत्येकं यवपादेन न्यूनं स्यादङ्गुलद्वयम् ॥ ४९४ ॥
मानं लक्षणमन्यत्तु भेदादादित्यवंशवत् ।
यवस्य सार्धपादाभ्यां द्वात्रिंशांशे नवाधिकैः[४५] ॥ ४९५ ॥
चतुश्चत्वारिंशता स्यात्पादोनैरङ्गुलैर्मितः ।
दण्डः कलानिधौ वंशे शिरोन्तौ त्र्यङ्गुलौ पृथक् ॥ ४९६ ॥

दंडाचे माप सदतीस अंगुळे व अर्धा यव होय. अंतरांचे माप प्रत्येकी पावणे दोन अंगुळे असून बाकीचे रुद्रवंशाप्रमाणे होय. मनु वंशाचा दंड सव्वाएकुणचाळीस अंगुळे व एकपूर्णांक तीन अष्टमांश यव या मापाचा सांगितला आहे. वरचा भाग व दुसऱ्या टोकाचा भाग प्रत्येकी पावणे तीन अंगुळे असून फूत्काररंध्र एकपूर्णांक तीनषोडशांश अंगुळ मापाचे असते. आणि आठ भोके प्रत्येकी साडेतीन यव (मापाची) असून सात अंतरे प्रत्येकी एकचतुर्थांश यव कमी दोन अंगुळे या मापाची (असतात). या वेगळेपणाखेरीजचे बाकीचे लक्षण आदित्यवंशाप्रमाणे होय.

कलानिधि वंशाचा दंड पावणे चव्वेचाळीस अंगुळे व एकवीसवत्तिशांश यव या मापाचा असतो. वरचा भाग व दुसऱ्या टोकाचा भाग प्रत्येकी तीन अंगुळांचा असून अंतरांचे माप प्रत्येकी दोन अंगुळे व एकपूर्णांक एकचतुर्थांश यव सांगितले आहे. बाकीचे लक्षण मनुवंशाप्रमाणे मानले आहे. (४९०–४९७)

---

४५. कलानिधि वंशाच्या दंडाचे माप सुधाकरटीकेत ' सार्धयवपादाभ्यां द्वात्रिंशांशविभागेन चाधिकपादोनचतुश्चत्वारिंशदङ्गुलः ' असे दिले आहे. त्यानुसार $\frac{1}{2} + \frac{1}{4} + \frac{1}{32}$ यव अधिक ४३$\frac{3}{4}$ अंगुळे असे हे माप होते. ' द्वात्रिंशांशे नवाधिकैः ' असा पाठ अडचार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तीत आहे. ' नवाधिकैः ' हे ' अङ्गुलैः ' याचे विशेषण घेतल्यास ते माप अष्टादशवंशापेक्षाही जास्त होईल. म्हणून ' नवाधिकैः ' हा शब्द योग्य ठरत नाही. ' द्वात्रिंशांशे ' या सप्तमी विभक्तीतल्या शब्दाचीही संगति लागत नाही. सुधाकरटीकेवरून ' द्वात्रिंशांशेन चाधिकैः ' असा पाठ मानल्यास सर्व संगति जुळते. म्हणून सुधाकरटीकेनुसार भाषांतर केले आहे.

अन्तरेष्वङ्गुलद्वन्द्वं सपादयवसंयुतम् ।
प्रत्येकं मानमाख्यातं लक्ष्मान्यन्मनुवन्मतम् ॥ ४९७ ॥
यवस्याष्टमभागेन सपादेन समन्वितैः ।
अष्टाचत्वारिंशता स्यात्पादोनैः संमितोऽङ्गुलैः ॥ ४९८ ॥
अष्टादशाङ्गुले दण्डः सार्धं त्वङ्गुलयोर्द्वयम् ।
अन्तरेषु पृथङ्मानं वेद्यमन्यत्कलानिधेः ॥ ४९९ ॥
नात्र त्रयोदशो वंशो न वा पञ्चदशाङ्गुलः ।
इष्यतेऽल्पान्तरत्वेन न च सप्तदशाङ्गुलः ॥ ५०० ॥
एवं पञ्चदशैवैते वंशास्तेषामिमे मताः ।
माधुर्यरक्तिसंयुक्ता रागाभिव्यक्तिहेतवः ॥ ५०१ ॥
यदिदं लक्ष्म शास्त्रोक्तं यच्च देशीगतं मतम् ।
ते द्वे रञ्जयितुं शक्ते न मनांसि कलाविदाम् ॥ ५०२ ॥

अष्टादशांगुळ वंशाचा दंड पावणे अठ्ठेचाळिस अंगुळे व तीनअष्टमांश यव मापाचा असतो. अंतरांचे प्रमाण प्रत्येकी अडीच अंगुळे (असते). बाकीचे (लक्षण) कलानिधीचे जाणून घ्यावे. (४९८, ४९९).

यामध्ये तेरा अंगुळे अंतराचा किंवा पंधरा अंगुळे अंतराचा तसेच सतरा अंगुळे अंतराचा वंश (त्याजवळच्या वंशापासून) थोडे अंतर असल्यामुळे मानलेला नाही. असे त्यांनी हे पंधराच वंश मानलेले आहेत; (कारण) ते गोडवा व रंजकता यांनी युक्त असलेले (व) रागाचा आविष्कार होण्यासाठी कारणीभूत असलेले (असे आहेत). (५००, ५०१)

जे हे शास्त्रात सांगितलेले लक्षण आणि जे देशीविषयक मानलेले (लक्षण) ती दोन्ही कलाजाणकारांच्या मनाचे रंजन करण्यास समर्थ नाहीत. (५०२)

क० ' जे हे लक्षण ' इत्यादी ग्रंथभागाने पूर्वी सांगितलेली दोन्ही लक्षणे रंजक नाहीत असे सांगून अंगठ्याच्या पेरा इतकी लांबी असणे हे जे अंगुळाचे प्रमाण त्याची प्रशंसा ग्रंथकार करीत आहे.

कोणच्या विशालकाय वंशवादकाचे अधिक लांब हात असणारे हातही स्वररंध्रांना पोचतील ? (अर्थात पोचणार नाहीतच असा अर्थ, काकूमुळे म्हणजे आवाजाच्या बदलामुळे कळतो.) फुंकण्यामुळे उत्पन्न होणाऱ्या नादाच्याच अधीन तोसुद्धा होतो असा आशय. पुन्हा शास्त्रात सांगितलेल्या लक्षणभागाचीही निंदा करीत आहे. राग या शब्दाने येथे ग्रामराग व

वक्त्रे [४६] फूत्काररन्ध्रस्थे कस्य वा विततात्मनः ।
स्वररन्ध्राण्याप्नुयातामपि दीर्घतरौ करौ ॥ ५०३ ॥
अन्तरं स्वररन्ध्राणामुक्तमर्धाङ्गुलं च यत् ।
शास्त्रेण तेन कस्यापि स्वरस्य व्यक्तिरीरिता ॥ ५०४ ॥
ये पूर्वोक्तक्रमाः सप्त स्वराः सरिगमादयः ।
मानेऽत्र दृश्यते तेषां नासौ क्रमपरिक्रमः ॥ ५०५ ॥
मूर्च्छनारागभाषादेः सुदूरोत्सारिता कथा ।
किंचिच्छास्त्रकृतां प्राचामाचार्याणां महात्मनाम् ॥ ५०६ ॥
उपालम्भोऽपि दोषाय किं तया कथयापि नः ।
तदास्तामुच्यते किंतु केचिद्देशीविदः प्रति ॥ ५०७ ॥

फुंकण्याच्या भोकावर तोंड असताना कोणत्या विशाल आकाराच्या (वंशवादकाचे) अधिक लांब हातदेखील स्वरांच्या भोकांना प्राप्त करून घेतील (म्हणजे पोचतील) ? (५०३)

स्वरांच्या भोकांचे जे अर्धे अंगुळ अंतर शास्त्राने सांगितले आहे त्याने कोणत्याही स्वराची निष्पत्ति सांगितली आहे. (५०४)

जे पूर्वी सांगितलेले सरिगम इत्यादी क्रमाने सात स्वर त्यांची या क्रमाने निष्पत्ति या प्रमाणामुळे दिसून येत नाही. (५०५)

मूर्च्छना, राग, भाषा इत्यादींची गोष्ट तर दूरच नेली जाते, (म्हणजे त्यांची निष्पत्ति होत नाहीच). शास्त्र रचणारे जे पूर्वीचे महात्मे असे आचार्य त्यांची किंचितशी (५०६) निंदाही दोषास्पद होय. त्या गोष्टीचे आम्हाला काय (प्रयोजन) ? ते असूदे. पण काही देशीजाणकारांच्या बद्दल आम्ही म्हणतो– (५०७) पाच यवांचे (अंगुळ)

उपराग सांगितले आहेत तसेच भाषा या शब्दाने भाषा, विभाषा व अंतरभाषा सांगितल्या आहेत. 'इत्यादी' याने रागांग, भाषांग, क्रियांग व उपांग घ्यायचे. त्यांची गोष्ट खूप दूरच. म्हणजे मूर्च्छना इत्यादी निष्पन्न होतच नाहीत असा अर्थ (५०२-५०६)

शास्त्रात सांगितलेली काही वंशलक्षणे देऊन, त्यांच्या बाबतीत लक्ष्यात दिसून येणारा विरोध दाखवून तसेच शास्त्रात अमान्य असलेल्या तेरा अंगुळे अंतर असणारा इत्यादी वंशांचा लक्ष्यात आढळणारा व्यवहार दाखवून प्राचीन आचार्यांच्या मताला दोष लावीत आहे. (५०७)

---

४६. कलानिधि व सुधाकर या दोन्ही टीकांत दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, पुढील श्लोक 'ते द्वे–' या ५०२ व्या श्लोकानंतर योजावा असे म्हणून तो श्लोक सं० र० अडचार आवृत्ती भा० ३ पृ० ३३७ वर तळटीपेत दिला आहे. तो असा –

अङ्गुष्ठपर्वदैर्घ्यं यदङ्गुलं तत्समीरितम् ।
तेन मानेन वंशेषु कृतेष्वष्टादशादिषु ॥

याचा अर्थ– 'अंगठ्याच्या पेराच्या लांबीचे जे अंगुळ सांगितले आहे त्या प्रमाणाने अठराअंगुळे (अंतर असणारा) इत्यादी वंश केले असता'.

माने पञ्चयवे कस्माद् दृश्यतेऽत्र यवोऽधिकः ।
सप्ताङ्गुलादिवंशेषु कथं चोर्ध्वं चतुर्दशात् ॥ ५०८ ॥
पूर्वमानाधिकाः सन्ति ते सप्ताष्ट नवा[४७] (१) यवाः ।
सार्धपञ्चयवे माने लक्ष्म स्यादव्यवस्थितम् ॥ ५०९ ॥
त्रयोदशादयो ये च त्रयो वंशा निराकृताः ।
न तत्र युक्तिलेशोऽस्ति येन तुष्यन्ति सूरयः ॥ ५१० ॥
अल्पान्तरत्वमुक्तं यत्तदसारतरं पुनः ।
वंशान्तरान्तरैस्तुल्यमन्तरं तेषु दृश्यते ॥ ५११ ॥
द्वादशोऽर्धस्वरन्यूनो[४८] यथैकादशवंशतः ।
मुद्रितः स्वररन्ध्रः स्यात्तथा तस्मात्त्रयोदश (शः१) ॥ ५१२ ॥

हे माप असता सात अंगुळांचे (अंतर असणारा इ.) वंशांत एक यव अधिक का दिसून येतो ? (तसेच) चौदा अंगुळे (अंतर असणाऱ्या वंशाच्या) नंतरच्या (वंशांत) पूर्वीच्या प्रमाणापेक्षा अधिक असे (क्रमाने) सात, आठ व नऊ यव कसे आहेत ? साडेपाच यव (हे अंगुळाचे) प्रमाण घेतल्यास लक्षण अव्यवस्थित होते. (५०८, ५०९) तेरा अंगुळे (अंतर असणारा) इत्यादी जे तीन वंश अमान्य केले आहेत त्यात युक्तीचा (म्हणजे तर्काचा) लेशही नाही की ज्यामुळे विद्वान संतुष्ट होतील. (५१०) आणि थोडे अंतर असणे हे (जे कारण) सांगितले आहे ते दुर्बळ आहे. त्यांच्यांत इतर वंशांतील अंतरासारखे अंतर दिसून येते. (५११) स्वररंध्रे झाकलेला बारा अंगुळे (अंतर असणारा वंश) जसा अकरा अंगुळे (अंतर असणाऱ्या) वंशापेक्षा अर्ध्या स्वराने कमी तसा तेरा अंगुळे (अंतर असणारा) त्यापेक्षा कमी असतो; (५१२) याप्रमाणेच चौदा अंगुळे (अंतर असणाऱ्या पेक्षा)

---

४७. 'नवा' असा पाठ अडचार आवृत्तीत आहे. सुधाकर टीकेत नऊ (यव) असे म्हटले आहे. आनंदाश्रम आवृत्तीत 'न वा' असा पाठ आहे. सुधाकरटीकेतल्या स्पष्टीकरणानुसार 'नऊ' असा अर्थ घेण्यासाठी 'नव' असा पाठ पाहिजे. पण तो वृत्ताला जुळत नाही. 'न वा' असा पाठ घेतल्यास 'चवदा अंगुळे (अंतर असणाऱ्या वंशाच्या) नंतरच्या वंशांत पूर्वीच्या प्रमाणापेक्षा ते सात व आठ यव कसे अधिक आहेत अथवा नाहीत ?' असा अर्थ निष्पन्न होईल. पण हाही अर्थ समाधान देत नाही. म्हणून सुधाकरटीकेनुसार भाषांतर दिले आहे.

४८. 'द्वादशार्धस्वरन्यूनो' असा पाठ अडचार व आनंदाश्रम आवृत्तींत आहे. आनंदाश्रम आवृत्तीत पृ. ५३७ वरील तळटीपेत १ ग, घ. उ.

'दशोर्ध' असा पाठ दिला आहे. 'द्वादशोर्ध–' या पाठाने अर्थ स्पष्ट होत असल्याने तो येथे घेतला आहे. तसेच याच ५१२ व्या श्लोकात 'त्रयोदश' या मिळणाऱ्या पाठाऐवजी 'त्रयोदशः' असा शब्द घेतल्यास अर्थबोध चांगल्या तऱ्हेने होतो.

एवं चतुर्दशात्पञ्चदशो वंशात्तु षोडशात् ।
वंशः सप्तदशो लक्ष्माप्रसिद्धमिति चेन्न तत् ॥ ५१३ ॥
वक्तुं तदुक्तरीत्या हि शक्यं तेष्वपि लक्षणम् ।
त्रयोदशाङ्गुलो वंशो विश्वमूर्तिरुदाहृतः ॥ ५१४ ॥
अधिकं यवपादेन स्याच्चत्वारिंशदङ्गुलम् ।
विश्वमूर्तौ दण्डमानं तारादौ सुषिराष्टके ॥ ५१५ ॥
प्रत्येकं त्रियवी सार्धा मानमन्तरसप्तके ।
अङ्गुलद्वितयं मानं पृथगादित्यवत्परम् ॥ ५१६ ॥
युक्तैर्यवेन पादेन द्वाचत्वारिंशदङ्गुलैः ।
यवस्य चाष्टमांशेन सपादेनाधिकैर्मतः ॥ ५१७ ॥
दण्डः श्रीशार्ङ्गदेवोक्तो वंशे पञ्चदशाङ्गुले ।
अङ्गुलत्रितयं मानं शिरःप्रान्ते प्रदेशयोः ॥ ५१८ ॥
प्रत्येकमन्तरालेषु सप्तस्वर्धयवादिकम् ।
अङ्गुलद्वितयं मानं मनुवल्लक्षणं परम् ॥ ५१९ ॥

पंधरा अंगुळे (अंतर असणारा) व सोळा अंगुळे (अंतर असणाऱ्या) वंशापेक्षा सतरा अंगुळे (अंतर असणारा कमी वाजतो). लक्षण प्रसिद्ध नाही असे म्हणाल तर तसे नाही. (५१३)

कारण त्यांच्याही बाबतीत, सांगितलेल्या रीतीने लक्षण सांगणे शक्य आहे. तेरा अंगुळे (अंतर असणारा) वंश विश्वमूर्ति हा सांगितला आहे. (५१४)

विश्वमूर्तीच्या दंडाचे माप चाळिस अंगुळे व एकचतुर्थांश यव एवढे असते. तार इत्यादी आठ रंध्रांचे (५१५) प्रमाण प्रत्येकी साडेतीन यव असून सात अंतरांचे प्रमाण प्रत्येकी दोन अंगुळे (असते). बाकीचे आदित्य वंशाप्रमाणे होय. (५१६)

पंधरा अंगुळे (अंतर असणाऱ्या) वंशाचा दंड बेचाळिस अंगुळे व पाचअष्टमांश यव एवढा श्रीशार्ङ्गदेवाने सांगितलेला मानला आहे. वरचा भाग व दुसऱ्या टोकाचा भाग यांचे (प्रत्येकी) प्रमाण तीन अंगुळांचे (असते). (५१७, ५१८)

सात अंतरांचे प्रमाण प्रत्येकी दोन अंगुळे व अर्धा यव (असून) बाकीचे लक्षण मनु वंशाप्रमाणे (असते). (५१९)

यवस्य सार्धपादेन द्वात्रिंशांशयवाधिकः ।
षट्चत्वारिंशता पादन्यूनैः स्यादङ्गुलैर्मितः ॥ ५२० ॥
दण्डः सप्तदशे वंशेऽन्तरेषु त्वङ्गुलद्वयम् ।
पृथक्सद्वियवं मानं स्यात्कलानिधिवत्परम् ॥ ५२१ ॥
एवं प्रसिद्धलक्ष्माणो रागादिव्यक्तिहेतवः ।
त्रयोदशादयो वंशा निषिध्यन्ते मुधा परैः ॥ ५२२ ॥
अपि पञ्चयवं मानं वंशेष्वष्टादशस्वपि ।
व्यक्तं प्रगल्भते वक्तुं सूरिः श्रीकरणाग्रणीः ॥ ५२३ ॥
तस्माद्देश्यनुसारेण लक्ष्यलक्षणतत्त्ववित् ।
शार्ङ्गदेवोऽन्यथा वंशस्वरूपं प्रत्यपादयत् ॥ ५२४ ॥
अङ्गुलं निबबन्धासौ सिद्धं गणितशास्त्रतः ।
न ह्यङ्गुलं पञ्चयवं दृश्यते शास्त्रलोकयोः ॥ ५२५ ॥
अङ्गुलं निस्तुषैः षड्भिस्तिर्यग्भिः स्याद्यवोदरैः ।
दक्षिणस्य करस्य स्यात्खानिमाने कनिष्ठिका ॥ ५२६ ॥

सतरा अंगुळे (अंतर असणाऱ्या) वंशाच्या दंडाचे माप पावणेसेहेचाळिस अंगुळे व सातवत्तिसांश यव हे असते. अंतरांचे प्रमाण प्रत्येकी दोन अंगुळे व दोन यव असून बाकीचे कलानिधीप्रमाणे (असते). (५२०, ५२१)

असे प्रसिद्ध लक्षण असलेले व राग इत्यादींचा आविष्कार करण्यास कारणीभूत होणारे तेरा अंगुळे (अंतर असणारा) इत्यादी वंश दुसऱ्यांनी उगीचच नाकारले आहेत. (५२२)

आणि विद्वान श्रीकरणाग्रणी (शार्ङ्गदेव) अठराही वंशांच्या बाबतीत पाच यवांचे (अंगुळ) हे प्रमाण सांगण्यास स्पष्टपणे समर्थ आहे. (५२३)

म्हणून लक्ष्यलक्षण जाणकार शार्ङ्गदेवाने देशीमतानुसार वंशांचे स्वरूप वेगळ्या प्रकारे प्रतिपादिले आहे. (५२४)

गणितशास्त्राप्रमाणे सिद्ध असलेले अंगुळप्रमाण त्याने निश्चित केले आहे. शास्त्रात व लोकांत पाच यवांचे अंगुळ दिसून येत नाही. (५२५)

कोंडारहित सहा आडव्या यवांनी अंगुळ (हे प्रमाण) होते. उजव्या हाताची करंगळी हे खानीचे (म्हणजे वंशाच्या आंतल्या पोकळीचे) प्रमाण होय. (५२६) (ही

क० आता देशीमतानुसार स्वतःला मान्य असणारे वंशांचे लक्षण ग्रंथकार सांगत आहे. (५२४).

न स्थूला न कृशात्यन्तं गृह्यते किंतु मध्यमा ।
मूलशब्दोऽन्वयं याति मध्यमेनात्र पर्वणा ॥ ५२७ ॥
समा सर्वत्र खानिः स्याद्विषमः[४९] स्वरभङ्गकृत् ।
चतुर्दशाङ्गुलो दण्ड एकवीरस्य दृश्यते ॥ ५२८ ॥
तच्छिरःप्रान्तयोर्मानमङ्गुलद्वितयं पृथक् ।
मानं जातिमुखाख्ये स्यात्फूत्कारसुषिरेऽङ्गुलम् ॥ ५२९ ॥
तारर्रन्ध्रं ततोऽधस्तादङ्गुलान्तरितं मतम् ।
षोडशांशाधिकं तस्य मानमर्धाङ्गुलं विदुः ॥ ५३० ॥
तदधोऽधश्च तावन्ति सप्त रन्ध्राणि कल्पयेत् ।
तेष्वष्टास्वूर्ध्वरन्ध्राणि सप्त स्युः स्वरसिद्धये ॥ ५३१ ॥
अन्तिमं वायुरन्ध्रं स्यादन्तरालानि सप्त च ।
पृथगर्धाङ्गुलान्येषां गर्भरन्ध्रं तु संमितम् ॥ ५३२ ॥
मूलतः पञ्चमांशोनकनिष्ठामध्यपर्वणा ।
खानिस्तदुच्यते देश्यां पूर्वोक्तास्त्रिस्वरादयः ॥ ५३३ ॥

करंगळी) फार स्थूल किंवा फार बारीक नसलेली (अशी) म्हणजे मध्यम प्रमाणाची घेतली जाते. मूळ या शब्दाचा संबंध येथे मधल्या पेराबरोबर (जोडला) जातो. (५२७)

सर्वत्र खानी सम प्रमाणाची असावी. (ती) विषम असल्यास स्वरबदल निर्माण करेल. एकवीराचा दंड चौदा अंगुळे (लांबीचा) दिसून येतो. (५२८) त्याचा वरचा भाग व दुसऱ्या टोकाचा भाग प्रत्येकी दोन अंगुळ प्रमाणाचा असून जातिमुख नांवाच्या फुंकण्याच्या भोकाचे प्रमाण एक अंगुळ असते. (५२९) त्याच्या खाली एक अंगुळ अंतरावर तारर्रंध्र मानले आहे. त्याचे प्रमाण नऊ षोडशांश अंगुळ जाणतात. (५३०) त्याच्या खाली खाली तेवढ्याच (प्रमाणाची) सात भोके ठेवावी. त्या आठ (भोकांतील) वरची सात भोके स्वरनिर्मितीसाठी असतात. (५३१)

शेवटचे (वारा जाण्यासाठी असणारे) वायुरंध्र होय. सात अंतरे प्रत्येकी अर्धा अंगुळ प्रमाणाची असून यांचे गर्भरंध्र मुळापासून, करंगळीच्या मधल्या पेरातून एकपंचमांश भाग कमी (म्हणजे $\frac{४}{५}$ करंगळीचे मधले पेर) या प्रमाणाचे असते. त्यालाच देशीमध्ये खानि म्हणतात. तीन स्वर इत्यादी पूर्वी सांगितले आहेत. (५३२, ५३३)

---

४९. आनंदाश्रम व अड्यार आवृत्तींत ' विषमः ' असा पाठ आहे. तो. ' विषमा ' असा पाहिजे.

त्रयोदशापरे तारारन्ध्रजातिमुखान्तरे ।
एकैकाङ्गुलवृद्ध्या स्युराचतुर्दशवंशतः ॥ ५३४ ॥
उमापतौ दण्डमानं भवेत्पञ्चदशाङ्गुलम् ।
एकवीरवदन्यत्तु लक्ष्म त्रिपुरुषे पुनः ॥ ५३५ ॥
दण्डः सार्धैः षोडशभिः सयवार्धैर्मितोऽङ्गुलैः ।
सप्तान्तराण्यधस्तारात्पृथक्सार्धैस्त्रिभिर्यवैः ॥ ५३६ ॥
मितानि लक्षणं शेषं पूर्ववंशवदिष्यते ।
दण्डश्चतुर्मुखे सार्धाष्टादशाङ्गुलसंमितः ॥ ५३७ ॥
पृथक्सप्तान्तरालानि चतुर्भिः साङ्घ्रिभिर्यवैः ।
मितानि पूर्ववच्छेषं पञ्चवक्त्रे तु संमितिः ॥ ५३८ ॥
दण्डश्च (स्य?) यवयुग्मेनाभ्यधिकाङ्गुलविंशतिः ।
सप्तानामन्तरालानां पृथक्पञ्चयवा मितिः ॥ ५३९ ॥
अन्यत्तु पूर्ववल्लक्ष्म दण्डमानं तु षण्मुखे ।
अङ्गुलानां यवार्धानां द्वाविंशतिरुदीरिता ॥ ५४० ॥
सार्धपञ्चयवं मानं पृथगन्तरसप्तके
शेषं तु पूर्ववद्वंशे मुनौ दण्डमितिः पुनः ॥ ५४१ ॥

चौदाव्या (म्हणजे जातिमुख व तारारंध्र यांत चौदा अंगुळे अंतर असणाऱ्या) वंशापर्यंतचे बाकीचे तेरा (वंश), तारारंध्र व जातिमुख यांमधील अंतरात एकेक अंगुळाची वाढ केल्याने होतात. (५३४)

उमापतीच्या दंडाचे माप पंधरा अंगुळे असते. बाकीचे लक्षण एकवीराप्रमाणे (होय). त्रिपुरुष वंशाचा (५३५) दंड साडेसोळा अंगुळे व अर्धा यव या मापाचा असतो. तारारंध्राच्या खालची सात अंतरे प्रत्येकी साडेतीन यव (५३६) प्रमाणाची असून बाकीचे लक्षण पूर्वीच्या वंशाप्रमाणे मानले आहे. चतुर्मुख वंशाचा दंड साडेअठरा अंगुळे मापाचा असतो. (५३७) सात अंतरे प्रत्येकी सव्वाचार यव प्रमाणाची असून बाकीचे लक्षण पूर्वीच्या प्रमाणे असते. पंचवक्त्र वंशाच्या दंडाचे माप वीस अंगुळे व दोन यव असून सात अंतरांचे प्रमाण प्रत्येकी पाच यव असते. (५३८, ५३९) बाकीचे लक्षण पूर्वीच्याप्रमाणे (होय). षण्मुखाच्या दंडाचे माप बावीस अंगुळे व अर्धा यव सांगितले आहे. (५४०)

सात अंतरे प्रत्येकी साडेपाच यव प्रमाणाची असून बाकीचे पूर्वीच्याप्रमाणे (होय.) आणखी मुनि वंशाच्या दंडाचे माप (५४१) साडेतेवीस अंगुळे असून सात अंतरांचे

त्रयोविंशत्याङ्गुलानां सार्धयान्तरसप्तके।
प्रत्येकमङ्गुलं मानं शेषं पूर्ववदिष्यते ॥ ५४२ ॥
वंशे वसौ दण्डमानं चतुर्भिरधिका यवैः।
पञ्चविंशतिराख्याताङ्गुलानामन्तराणि तु ॥ ५४३ ॥
पृथक्सप्तयवानि स्युः शेषं पूर्वोक्तमिष्यते।
नाथेन्द्रदण्डमानं स्यात्सपादा सप्तविंशतिः ॥ ५४४ ॥
अङ्गुलानामन्तराणि स्युः सपादाङ्गुलानि तु।
प्रत्येकं मूलतः षष्ठांशोनमध्यमपर्वणा ॥ ५४५ ॥
कनिष्ठाया मिता खानिरन्यल्लक्ष्म तु पूर्ववत्।
मानं महानन्ददण्डे त्रिंशदङ्गुलकं मितम् ॥ ५४६ ॥
पृथक्सार्धाङ्गुलानि स्युरन्तरालानि सप्त च।
नाथेन्द्रवत्परं लक्ष्म रुद्रे दण्डमितिः पुनः ॥ ५४७ ॥
सपादानि त्रयस्त्रिंशदङ्गुलान्यन्तरेषु तु।
प्रत्येकं मानमाख्यातं पादन्यूनाङ्गुलद्वयम् ॥ ५४८ ॥
रन्ध्रेष्वष्टसु तारादिष्वष्टमांशसमन्वितम्।
अङ्गुलार्धं पृथङ्मानं खानेर्मानं तु मूलतः ॥ ५४९ ॥

प्रमाण प्रत्येकी एक अंगुळ असते. बाकीचे पूर्वीच्याप्रमाणे मानले आहे. (५४२)

वसु वंशाच्या दंडाचे माप पंचवीस अंगुळे व चार यव सांगितले आहे. (सात) अंतरे (५४३) प्रत्येकी सात यव (प्रमाणाची) असून बाकीचे पूर्वीच्या (वंशाच्या बाबतीत) सांगितलेले मानले आहे. (५४४–)

नाथेंद्र वंशाच्या दंडाचे माप सत्तावीसपूर्णांकएकचतुर्थांश अंगुळे असते. अंतरे प्रत्येकी सव्वा अंगुळ (प्रमाणाची) असतात. खानीचे प्रमाण मुळापासून, करंगळीचे एकषष्ठांशकमी मधले पेर (म्हणजे $\frac{5}{6}$ मधले पेर) असते. बाकीचे लक्षण पूर्वीच्याप्रमाणे होय.

महानंदाच्या दंडाचे माप तीस अंगुळे प्रमाणाचे असते. (५४४, ५४५, ५४६)

सात अंतरे प्रत्येकी दीड अंगुळ (प्रमाणाची) असतात. बाकीचे लक्षण नाथेंद्राप्रमाणे (होय). रुद्र वंशाच्या दंडाचे माप (५४७) सव्वातेहतीस अंगुळे (असते). अंतरांचे प्रमाण प्रत्येकी पावणे दोन अंगुळे सांगितले आहे. (५४८)

तार इत्यादी आठ रंध्रांचे प्रमाण प्रत्येकी पाचअष्टमांश अंगुळ असून खानीचे प्रमाण मुळापासून, (५४९) करंगळीचे एकसप्तमांश कमी मधले पेर (म्हणजे $\frac{6}{7}$ मधले पेर) असते.

सप्तमांशविहीनं स्यात्कनिष्ठापर्वमध्यमम् ।
पूर्वोक्तमन्यदादित्ये वंशे दण्डस्तु कथ्यते ॥ ५५० ॥
अष्टमांशाधिकैः पञ्चत्रिंशता संमितोऽङ्गुलैः ।
अन्तरेष्वष्टमांशोनमङ्गुलद्वितयं पृथक् ॥ ५५१ ॥
मानं खानौ त्वष्टमांशन्यूनमामूलदेशतः ।
कनिष्ठामध्यपर्वोक्तमपरं रुद्रवंशकम् ॥ ५५२ ॥
षोडशांशोनितैः सार्धैः सप्तत्रिंशन्मिताङ्गुलैः ।
मितो दण्डो विश्वमूर्तावन्तरेष्वङ्गुलद्वयम् ॥ ५५३ ॥
षोडशांशाधिकं माने प्रत्येकं मध्यपर्वणा ।
कनिष्ठाया मिता खानिः शेषमादित्यवंशवत् ॥ ५५४ ॥
मनौ दण्डस्तु पादोनैकचत्वारिंशताङ्गुलैः ।
मितः शिरःपृथक्प्रान्तदेशौ सार्धाङ्गुलद्वयौ ॥ ५५५ ॥
प्रत्येकमन्तरालेषु सपादद्व्यङ्गुला मितिः ।
विश्वमूर्तिवदन्यत्तु लक्ष्म श्रीशार्ङ्गिणोदितम् ॥ ५५६ ॥
वंशाश्चतुर्दशैवैवं प्रोक्ताः सोढलसूनुना ।
नातः परं तु वंशानामीदृशामस्ति संभवः ॥ ५५७ ॥

बाकीचे पूर्वीच्या (वंशाच्या बाबतीत सांगितलेले होय.). आदित्य वंशाचा दंड सांगतो. (५५०) (तो) पसतीसपूर्णांकएकअष्टमांश अंगुळे या प्रमाणाचा असतो. अंतरांचे (प्रमाण) प्रत्येकी एकपूर्णांकसातअष्टमांश अंगुळांचे असून (५५१) खानीचे प्रमाण मुळापासून, करंगळीचे एक अष्टमांश कमी मधले पेर (म्हणजे ⅞ मधले पेर) एवढे सांगितले आहे. बाकीचे (लक्षण) रुद्रवंशाचे (होय). (५५२)

विश्वमूर्तीचा दंड सदतीसपूर्णांकसातसोळांश अंगुळे या प्रमाणाचा असतो. अंतरांचे प्रमाण प्रत्येकी दोनपूर्णांकएकषोडशांश अंगुळे असून खानीचे प्रमाण करंगळीचे मधले पेर एवढे असते. बाकीचे आदित्यवंशाप्रमाणे (होय). (५५३, ५५४)

मनु वंशाचा दंड पावणेएक्केचाळिस अंगुळे मापाचा असतो. वरचा भाग व दुसऱ्या टोकाचा भाग प्रत्येकी अडीच अंगुळे (प्रमाणाचा असतो). (५५५)

अंतरांचे प्रमाण प्रत्येकी सव्वादोन अंगुळांचे असून बाकीचे लक्षण, श्रीशार्ङ्गदेवाने विश्वमूर्तीप्रमाणे सांगितले आहे. (५५६)

अशा प्रकारे सोढलपुत्र (श्रीशार्ङ्गदेव) याने चौदाच वंश सांगितले आहेत. अशा तऱ्हेचे वंश यापेक्षा अधिक संभवत नाहीत. (५५७)

तेषु रन्ध्राङ्गुलीप्राप्तिर्न कस्यापि हि दृश्यते ।
अतिमन्द्रध्वनित्वाच्च न ते तत्त्वविदां मताः ॥ ५५८ ॥
गतानुगतिकत्वेन त्वेकवीरादयस्त्रयः ।
कथिता न तु तेष्वस्ति रक्तिमाधुर्यधुर्यता ॥ ५५९ ॥
चतुर्मुखादयस्तस्मादेकादश मनोहराः ।
स्वमतेऽभ्युपगम्यन्ते वंशाः सोढलसूनुना ॥ ५६० ॥
शार्ङ्गदेवोऽन्यमानेन वंशरूपं न्यरूपयत् ।
तिर्यग्यवोदरैः सार्धैश्चतुर्भिर्निस्तुषैरिह ॥ ५६१ ॥
अङ्गुलं तेन पूर्वोक्तरीत्यारभ्यैकवीरतः ।
सन्ति द्वाविंशतिर्वंशविशेषास्तेषु चक्ष्महे ॥ ५६२ ॥
वंशश्रेणीमिमामाह निःशङ्कोऽनुपमाभिधाम् ।
एकवीरे दण्डमानं स्यात्षोडशभिरङ्गुलैः ॥ ५६३ ॥
सार्धेन यवपादेनाभ्यधिकैस्तच्छिरोन्तयोः ।
सार्धाङ्गुलद्वयं मानं प्रत्येकं परिकीर्तितम् ॥ ५६४ ॥

कारण त्यांत भोकांच्या जागी बोटे पोचणे कोणाच्याही बाबतीत दिसून येत नाही. आणि अत्यंत मंद्र नादामुळे ते (वंशाचे) तत्त्व जाणणाऱ्यांनी मानलेले नाहीत. (५५८)

गतानुगतिकतेने (म्हणजे पूर्वी प्रसिद्ध असल्याचा आश्रय घेऊन) एकवीर इत्यादी तीन सांगितले आहेत पण त्यांमध्ये रंजकता व गोडी यांचा प्रकर्ष असत नाही. (५५९)

म्हणून चतुर्मुख इत्यादी अकरा वंश सोढलपुत्राने मनोहर म्हणून आपल्या मताने मानलेले आहेत. (५६०)

शार्ङ्गदेवाने दुसऱ्या प्रमाणाने वंशाचे स्वरूप वर्णिले आहे. यात कोंडा नसलेल्या, साडेचार आडव्या (ठेवलेल्या) यवांनी (५६१) अंगुळ (मानले आहे). त्या (प्रमाणाने) पूर्वी सांगितलेल्या प्रकाराने, एकवीरापासून आरंभ करून (वेगवेगळे) बावीस विशेष (स्वरूपाचे) वंश आहेत. त्यांच्याबाबत (आम्ही) सांगतो. या वंशश्रेणीला निःशंक (शार्ङ्गदेव) अनुपमा या नावाने म्हणतो.

एकवीराच्या दंडाचे माप सोळा अंगुळे व तीनअष्टमांश यव एवढे असते. त्याचा वरचा भाग व दुसऱ्या टोकाचा भाग प्रत्येकी अडीच अंगुळे प्रमाणाचा सांगितला आहे. (५६२–५६४)

सपादमङ्गुलं जातिमुखे रध्राष्टके पुनः ।
पृथक्तृतीयभागोनमङ्गुलं मानमिष्यते ॥ ५६५ ॥
अर्धाङ्गुलानि प्रत्येकमन्तरालानि सप्त च ।
मूलतः पञ्चमांशोनकनिष्ठामध्यपर्वणा ॥ ५६६ ॥
मिता खानिर्भवेत्तारर न्ध्रजातिमुखान्तरम् ।
एकवीरादिसंज्ञाभिः सर्ववंशेषु वेदितम् ॥ ५६७ ॥
अष्टमांशविहीनेन यवार्धेनाधिकैर्भवेत् ।
अङ्गुलैः सप्तदशभिर्दण्डमानमुमापतौ ॥ ५६८ ॥
एकाङ्गुलाधिकस्तस्माद्दण्डस्त्रिपुरुषे मतः ।
अनयोर्वंशयोः शेषं लक्ष्म स्यादेकवीरवत् ॥ ५६९ ॥
मानं स्याद्यवपादोनविहीनाङ्गुलविंशतिः ।
चतुर्मुखस्य दण्डस्यान्तरालेष्वर्धमङ्गुलम् ॥ ५७० ॥
अष्टमांशाधिकं मानं पृथगन्यत्तु पूर्ववत् ।
सद्वात्रिंशांशपादोनद्वियवाधिकया मतः ॥ ५७१ ॥

जातिमुखाचे (म्हणजे फुंकण्याच्या भोकाचे प्रमाण) सव्वा अंगुळ व आठ भोके प्रत्येकी दोनतृतीयांश अंगुळ प्रमाणाची मानली आहेत. (५६५)

सात अंतरे प्रत्येकी अर्धे अंगुळ (प्रमाणाची असून), मुळापासून, करंगळीचे एक-पंचमांश कमी मधले पेर (म्हणजे $\frac{४}{५}$ मधले पेर) (५६६) या प्रमाणाची खानि असते. तारंध्र व जातिमुख यांतील अंतर एकवीर इत्यादी नावांनीच सर्व वंशांत जाणले जाते. (५६७)

उमापति वंशाच्या दंडाचे माप सतरा अंगुळे व तीन अष्टमांश यव एवढे असते. (५६८)

त्रिपुरुषाचा दंड त्यापेक्षा एक अंगुळ जास्तीचा मानला आहे. या दोन्ही वंशांचे बाकीचे लक्षण एकवीराप्रमाणे होय. (५६९)

चतुर्मुख वंशाच्या दंडाचे माप वीस अंगुळांतून एकचतुर्थांश यव कमी एवढे असते. अंतरांचे माप प्रत्येकी पाचअष्टमांश अंगुळ असून बाकीचे पूर्वीच्याप्रमाणे होय. पंचवक्त्राचा दंड एकवीस अंगुळे व एकपूर्णांकपंचवीसबत्तिसांश यव या मापाचा सांगितला आहे. सात अंतरे प्रत्येकी अकराषोडशांश अंगुळ या प्रमाणाची असतात. बाकीचे लक्षण पूर्वीच्याप्रमाणे होय. (५७०, ५७३–)

दण्डोऽङ्गुलैकविंशत्या पञ्चवक्त्रस्य कीर्तितः ।
अङ्गुलस्य त्रिभिः पादैः पादोनैरन्तराणि तु ॥ ५७२ ॥
मितानि सप्त प्रत्येकं पूर्ववल्लक्षणं परम् ।
सार्धत्रयोविंशतिः स्यादङ्गुलानां यवाधिका ॥ ५७३ ॥
मानं षण्मुखदण्डस्य पादोनं त्वङ्गुलत्रयम् ।
पृथक्शिरोन्तयोर्मानमन्तरेषु तु सप्तसु ॥ ५७४ ॥
यवपादाधिकं मानं पृथक्पादोनमङ्गुलम् ।
शेषं तु पूर्ववद्वंशे मुनौ स्याद्दण्डसंमितिः ॥ ५७५ ॥
यवपादोनपादोनाङ्गुलषड्विंशतिर्मता ।
अङ्गुलं यवपादेन न्यूनमन्तरसप्तके ॥ ५७६ ॥
प्रत्येकं मानमाख्यातं शेषं षण्मुखवंशवत् ।
वसौ वंशे यवार्धेन द्वात्रिंशांशयुजाधिका ॥ ५७७ ॥
स्यात्सप्तविंशतिः सार्धाङ्गुलानां दण्डसंमितिः ।
सपादेन तु पादेन द्वात्रिंशांशयुतेन च ॥ ५७८ ॥
यवस्याभ्यधिकं मानमन्तरेष्वङ्गुलं पृथक् ।
शेषं तु मुनिवद्दण्डे नाथेन्द्रस्य तु संमितिः ॥ ५७९ ॥

षण्मुखाच्या दंडाचे माप साडेतेवीस अंगुळे व एक यव एवढे असते. वरचा भाग व दुसऱ्या टोकाचा भाग प्रत्येकी पावणेतीन अंगुळे प्रमाणाचा असून सात अंतरांचे माप प्रत्येकी पाऊण अंगुळ व एकचतुर्थांश यव (असते.) बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय.)

मुनिवंशाच्या दंडाचे माप पावणेसवीस अंगुळांत एकचतुर्थांश यव कमी एवढे मानले आहे. सात अंतरांचे प्रमाण प्रत्येकी एकचतुर्थांश यव कमी एक अंगुळ सांगितले आहे. बाकीचे षण्मुखवंशाप्रमाणे (होय). वसु वंशाच्या दंडाचे माप साडेसत्तावीस अंगुळे व सतराबत्तिसांश यव एवढे असते. अंतरांचे प्रमाण प्रत्येकी एक अंगुळ व अकराबत्तिसांश यव असून बाकीचे मुनि वंशाप्रमाणे (होय).

नाथेंद्राच्या दंडाचे माप एकुणतीसपूर्णांकतीनअष्टमांश अंगुळे व एकअष्टमांश यव सांगितले आहे. तार इत्यादी आठ भोकांचे प्रमाण प्रत्येकी अर्धे अंगुळ व एक यव असते. अंतरांचे प्रमाण प्रत्येकी एकपूर्णांकएकअष्टमांश अंगुळ असून बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय). (५७३–५८२–)

यवाष्टमांशसहितैरेकोनत्रिंशदङ्गुलैः ।
सार्धपादाधिकैरुक्ता पृथक्तु सुषिराष्टके ॥ ५८० ॥
तारादौ यवयुक्तेनार्धाङ्गुलेन मितिर्भवेत् ।
अन्तरेषु पृथङ्मानमष्टमांशाधिकाङ्गुलम् ॥ ५८१ ॥
शेषं तु पूर्ववद्दण्डे महानन्दस्य संमितिः ।
उक्ता यवाष्टमांशोनाङ्गुलैकत्रिंशदिष्यते[५०] ॥ ५८२ ॥
सपादावन्तरालेषु प्रत्येकं मानमुच्यते ।
सपादमङ्गुलं शेषं पूर्वोक्तं शार्ङ्गिणोदितम् ॥ ५८३ ॥
अङ्गुलानि त्रयस्त्रिंशदष्टमांशयुतानि तु ।
यवाष्टमांशयुक्तानि रुद्रे दण्डमितिर्भवेत् ॥ ५८४ ॥
युक्तं सार्धेन पादेनाङ्गुलमन्तरसप्तके ।
प्रत्येकं मानमाख्यातं खानेर्मानं तु मूलतः ॥ ५८५ ॥

महानंदाच्या दंडाचे माप सव्वाएकतीस अंगुळातून एकअष्टमांश यव कमी सांगितलेले इष्ट होय. अंतरांचे प्रमाण प्रत्येकी सव्वाअंगुल सांगितले आहे. बाकीचे पूर्वीच्या बाबतीत सांगितलेले शार्ङ्गदेवाने म्हटले आहे. (५८२ ते ५८३)

रुद्र वंशाच्या दंडाचे माप तेहतीसपूर्णांकएकअष्टमांश अंगुळे व एक अष्टमांश यव एवढे असते. (५८४)

सात अंतरांचे प्रमाण प्रत्येकी एकपूर्णांकतीनअष्टमांश अंगुळ सांगितले आहे. खानीचे प्रमाण मुळापासून, (५८५) करंगळीचे एक षष्ठांश कमी मधले पेर (म्हणजे $\frac{5}{6}$ मधले पेर) सांगितले आहे. बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय.) नंतर आदिल्याच्या दंडाचे माप पसतीस अंगुळे व एक अष्टमांश यव एवढे असते आणि एकेक अंतर दीड अंगुळाचे

---

५०. महानंदाच्या दंडाचे माप सुधाकरटीकेत एकतीस अंगुळे अधिक एकअष्टमांश यव असे स्पष्ट केले आहे. मूळ ग्रंथात 'यवाष्टमांशोना' हे 'अङ्गुलैकत्रिंशत्' याचे विशेषण आहे. त्यानुसार 'एक अष्टमांश यव कमी एकतीस अंगुळे' असा अर्थ होतो. या पुढच्या ओळीत 'सपादावन्तरालेषु' असा शब्द आहे. 'अन्तरालेषु' यांचा संबंध पुढील वर्णनाशी आहे. त्यामुळे 'सपादौ' याचा अन्वय कळत नाही. 'सपादा' असे जर विशेषण मानले व त्याचा यवाशी संबंध मानला तर $\frac{1}{8}$ यव – $\frac{1}{8}$ यव मिळून + $\frac{1}{8}$ यव मिळतो. व 'सपादा' याचा संबंध अंगुळाशी मानला तर ३१$\frac{1}{8}$ अंगुळे – $\frac{1}{8}$ यव असा अर्थ मिळतो.

'सपादा त्वन्तरालेषु' असा मूळ पाठ असेल का ?

षष्ठांशोनं मध्यपर्व कनिष्ठायाः प्रकीर्तितम् ।
शेषं प्राग्वदथादित्ये स्यात्पञ्चत्रिंशताङ्गुलैः ॥ ५८६ ॥
यवाष्टमांशसहितैर्दण्डमानमथान्तरम् ।
सार्धाङ्गुलकमेकैकं खानिमानं तु कीर्तितम् ॥ ५८७ ॥
मूलतः सप्तमांशोनं कनिष्ठापर्व मध्यमम् ।
प्राग्वत्परं विश्वमूर्तौ वंशे दण्डस्य संमितिः ॥ ५८८ ॥
यवाष्टमांशसहितैः स्यात्सप्तत्रिंशताङ्गुलैः ।
सार्धपादाधिकैः शीर्षप्रान्तौ त्र्यङ्गुलकौ पृथक् ॥ ५८९ ॥
अन्तरेष्वष्टमांशोनाधिकं सार्धाङ्गुलं पृथक् ।
मानं खानेस्त्वष्टमांशन्यूनमामूलतो मतम् ॥ ५९० ॥
मध्यपर्व कनिष्ठायाः पूर्वोक्तं शेषमिष्यते ।
दण्डमानं मनोरेकोनचत्वारिंशताङ्गुलैः ॥ ५९१ ॥
सपादैरष्टमांशेन यवस्य सहितैरपि ।
पादोनमङ्गुलद्वन्द्वं पृथगन्तरसप्तके ॥ ५९२ ॥
मानं खानिस्तु मातव्या कनिष्ठामध्यपर्वणा ।
पूर्वोक्तमपरं सार्धैकचत्वारिंशताङ्गुलैः ॥ ५९३ ॥

(असते.) खानीचे प्रमाण मुळापासून, करंगळीचे एकसप्तमांश कमी मधले पेर (म्हणजे $\frac{6}{7}$ मधले पेर) सांगितले आहे. बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय).

विश्वमूर्ति वंशाच्या दंडाचे माप, (५८६, ५८७, ५८८) सदतीसपूर्णांकतीन-अष्टमांश अंगुळे व एकअष्टमांश यव असते. वरचा भाग व दुसऱ्या टोकाचा भाग प्रत्येकी तीन अंगुळे (प्रमाणाचा असतो). (५८९)

अंतरांचे प्रमाण प्रत्येकी एकपूर्णांकतीनअष्टमांश अंगुळ असून, खानीचे (प्रमाण) मुळापासून, करंगळीचे एकअष्टमांशकमी मधले पेर (म्हणजे $\frac{7}{8}$ मधले पेर) मानले आहे. बाकीचे पूर्वीच्याबाबतीत सांगितलेले मानले आहे.

मनुवंशाच्या दंडाचे माप एकुणचाळिसपूर्णांकएकचतुर्थांश अंगुळे व एकअष्टमांश यव (एवढे असते). सात अंतरांचे प्रमाण प्रत्येकी पावणे दोन अंगुळे असून खानीचे प्रमाण करंगळीच्या मधल्या पेराएवढे असते. बाकीचे पूर्वीच्या बाबतीत सांगितलेले (जाणावे). (५९०–५९३–)

युक्तैर्यवस्य पादोनपादद्वन्द्वेन संमितिः ।
दण्डे पञ्चदशस्य स्याच्चतः सार्धयवत्रया ॥ ५९४ ॥
प्रत्येकमष्टरन्ध्री स्यादन्तरेष्वङ्गुलद्वयम् ।
अष्टमांशोनितं मानं प्रत्येकं मनुवत्परम् ॥ ५९५ ॥
कलानिधौ सपादैः स्यात् त्रिचत्वारिंशताङ्गुलैः ।
यवाधिकैर्दण्डमानमन्तरालेषु सप्तसु ॥ ५९६ ॥
प्रत्येकमङ्गुलद्वन्द्वं सपादं पूर्ववत्परम् ।
दण्डोऽष्टादशवंशस्याष्टाचत्वारिंशताङ्गुलैः ॥ ५९७ ॥
यवान्वितैः सपादेन सपादेनाधिकैर्मितः[५१] ।
प्रत्येकं षोडशांशोनसार्धाङ्गुलयुगं मतम् ॥५९८ ॥
प्रमाणमन्तरालेषु परं पूर्ववदिष्यते ।
दण्डं त्वेकोनविंशस्य साङ्घ्रिपञ्चाशदङ्गुलम् ॥ ५९९ ॥
यवेनाभ्यधिकं मानमन्तरेषु तु सप्तसु ।
प्रत्येकं षोडशांशो(शे ?)नाधिकं सार्धाङ्गुलद्वयम् ॥ ६०० ॥

पंचदश वंशाचा दंड साडेएकेचाळिस अंगुळे व सातसोळांश यव या मापाचा असतो. नंतर आठ भोके प्रत्येकी साडेतीन यव (प्रमाणाची असून) एकपूर्णांकसातअष्टमांश अंगुळे असते. बाकीचे मनुवंशाप्रमाणे अंतरांचे प्रमाण प्रत्येकी (असते). (५९३–५९५).

कलानिधी वंशाच्या दंडाचे माप सव्वात्रेचाळिस अंगुळे व एक यव एवढे असते. सात अंतरांचे प्रमाण (५९६) प्रत्येकी सव्वादोन अंगुळे असून बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय). अष्टादश वंशाचा दंड अठ्ठेचाळीसपूर्णांकपाचषोडशांश अंगुळे व एक यव या मापाचा असतो. अंतरांचे प्रमाण प्रत्येकी दोनपूर्णांकसातषोडशांश अंगुळे मानले आहे. बाकीचे पूर्वीच्याप्रमाणे मानले आहे.

एकोनविंश वंशाच्या दंडाचे माप सव्वापन्नास अंगुळे व एक यव एवढे असते. सात अंतरांचे (प्रमाण) प्रत्येकी दोनपूर्णांकनऊषोडशांश अंगुळे (?) (असते) (५९७–६००) बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय).

---

५१. ५९८ व्या श्लोकांत 'सपादेन सपादेनाधिकैर्मितः' असे शब्द आहेत. 'सपादेन' हा शब्द यात दोन वेळा आला आहे. सुधाकरटीकेत 'सचतुर्थांशपादाधिक–' असे स्पष्टीकरण दिले आहे. त्यानुसार $\frac{1}{4}+\frac{1}{16}=\frac{5}{16}$ (अंगुळाने अधिक अठेचाळिस अंगुळे म्हणजे $48\frac{5}{16}$ अंगुळे) असे घेऊन भाषांतर त्याप्रमाणे केले आहे. किंवा $\frac{1}{2}+\frac{1}{4}=\frac{1}{2}$ (अंगुळाने अधिक) असाही अर्थ घेता येईल. त्यानुसार $48\frac{1}{2}$ अंगुळे असे भाषांतर होईल.

प्राग्वत्परं मुरल्यां तु दण्डमानं यवाधिकम् ।
द्वापञ्चाशद्भवेत्सार्धाङ्गुलानामन्तराणि तु ॥ ६०१ ॥
पादोनत्र्यङ्गुलानि स्युः प्रत्येकं पूर्ववत्परम् ।
एकविंशे दण्डमानं पञ्चपञ्चाशदङ्गुलम् ॥ ६०२ ॥
सपादं षोडशांशेनाभ्यधिकं यवसंयुतम् ।
अङ्गुलान्यन्तराणि स्युः प्रत्येकं पूर्ववत्परम् ॥ ६०३ ॥
दण्डमानं श्रुतिनिधावष्टापञ्चाशदङ्गुलम् ।
सार्धं यवाधिकं तस्य त्वन्तरेष्वङ्गुलत्रयम् ॥ ६०४ ॥
सपादषोडशांशो(शे ?)नाधिकं [५२] मानं पृथङ्मतम् ।
पूर्वोक्तमपरं लक्ष्म शार्ङ्गदेवेन कीर्तितम् ॥ ६०५ ॥
सर्वेषामपि वंशानां पिण्डः सार्धयवो भवेत् ।
रक्तिमाधुर्यविरहात्पञ्चवक्त्रादधस्तनाः ॥ ६०६ ॥
चतुर्मुखादयो वंशा नेष्टाः श्रीशार्ङ्गिसूरिणा ।
देशीवंशेषु सर्वेषु मुद्रितात्पूर्ववंशतः ॥ ६०७ ॥

मुरलीच्या दंडाचे माप साडेबावन अंगुळे व एक यव एवढे असते. अंतरे (६०१) प्रत्येकी पावणेतीन अंगुळे असतात. बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय).

एकविंश वंशाच्या दंडाचे माप पंचावनपूर्णांकपाचषोडशांश अंगुळे व एक यव एवढे असते. अंतरे प्रत्येकी तीन अंगुळे प्रमाणाची असतात. बाकीचे पूर्वीच्याप्रमाणे (होय). (६०२, ६०३)

श्रुतिनिधीच्या दंडाचे माप साडे अठ्ठावनअंगुळे व एक यव असून त्याच्या अंतराचे प्रमाण प्रत्येकी तीनपूर्णांकपाचषोडशांश अंगुळे मानले आहे. बाकीचे लक्षण पूर्वीच्या (वंशाबाबत) सांगितलेले शार्ङ्गदेवाने वर्णिले आहे. (६०४, ६०५)

सगळ्याच वंशांचा पिंड (म्हणजे जाडपणा) दीड यव असावा. पंचवक्त्राच्या खालचे चतुर्मुख इत्यादी वंश रंजकता व गोडी यांच्या अभावामुळे श्रीशार्ङ्गदेवाला मान्य नाहीत. सर्व देशी वंशांत, (स्वरांची भोके बोटांनी) झाकलेल्या अगोदरच्या वंशापेक्षा (६०६, ६०७)

---

५२. 'सपादषोडशांशोनाधिकं' याचे स्पष्टीकरण सुधाकरटीकेत 'षोडशांशाधिकसपाद'– असे दिले आहे. त्यानुसार $\frac{3}{4} + \frac{1}{16} = \frac{13}{16}$ अंगुळ अधिक (तीन अंगुळे) म्हणजे $3\frac{13}{16}$ अंगुळे असे अंतराचे प्रमाण मिळते. या स्पष्टीकरणानुसार 'सपादषोडशांशेनाधिकं' असा पाठ मूळात असणे संभवते. यास ६०३ या श्लोकातील शब्दयोजनेचाही आधार मिळतो.

उत्तरो मुद्रितो वंशः स्वरार्धेनाधिको भवेत् ।
वंशानामल्पमानानां सर्वत्रोत्तरता मता ॥ ६०८ ॥
स्वरार्धं स्यादूर्ध्वतया दक्षिणस्य कनिष्ठया ।
अतस्तस्या[५३] मुद्रितायां पूर्ववंशस्य जायते ॥ ६०९ ॥
उत्तरो मुद्रितो वंशः पूर्वतुल्यस्वरोदयः ।
उद्धृताङ्गुलिवृद्धौ तु तस्मादप्युत्तरोत्तरे ॥ ६१० ॥
मिलन्ति मुद्रिता वंशा यथासंख्यं पुरातनैः ।
स्वरोदयेऽप्यङ्गुलयः शास्त्रीये लौकिके तथा ॥ ६११ ॥
वंशे तुल्यप्रकाराः स्युरिति श्रीशार्ङ्गिणोदितम् ।
एकस्वराणि रन्ध्राणि संनिधौ व्यवधावपि ॥ ६१२ ॥

(स्वरांची भोके बोटांनी) झाकलेला नंतरचा वंश अर्ध्या स्वराने चढा असतो. थोडे प्रमाण असणाऱ्या वंशाची सर्वत्र उत्तरता (म्हणजे नंतरची स्थिति) मानली आहे. (६०८)

उजव्या हाताची करंगळी (स्वराच्या भोकापासून) वर केल्याने (म्हणजे भोक मोकळे ठेवल्याने) अर्धा स्वर उत्पन्न होतो. म्हणून त्या (करंगळीने भोक) झाकले असता, पूर्वीच्या वंशातून (जो स्वर) उत्पन्न होतो, त्या पूर्वस्वरासमान स्वर नंतरच्या (स्वररंध्र) झाकलेल्या वंशातून निर्माण होतो. त्याहीपेक्षा नंतरनंतरच्या (वंशात) वर उचललेल्या बोटांची संख्या (क्रमाने) वाढविली असता, (६०९, ६१०) (भोके) झाकलेले (नंतरचे) वंश यथाक्रम मागील (वंशांशी) मिळून जातात. स्वरनिर्मितीच्या बाबतीतही शास्त्रीय तसेच लौकिक (म्हणजे देशी) वंशात बोटे (वापरणे) सारख्या प्रकारचे असते असे श्री शार्ङ्गदेवाने सांगितले आहे. (६११) सर्व वंशांची एक स्वर निर्माण करणारी भोके जवळ किंवा दूर असताही (६१२) मिळून जातात (म्हणजे समान नादाची असतात) असे हरप्रिय (शार्ङ्गदेव) म्हणतो.

---

५३. 'तस्या मुद्रितायां' असा पाठ अडचार व आनंदाश्रम आवृत्तीत आहे; त्यानुसार भाषांतर केले आहे. पण आनंदाश्रम आवृत्तीत (पृ. ५४४. तळटीप २ घ. ड.) 'तस्यामुद्-धृतायां' असा पाठ नमूद केला आहे. हा पाठ व्याकरणदृष्टचा निर्दोष असून अर्थाच्याही दृष्टीने समर्पक आहे. कारण पुढे 'वर उचललेल्या बोटांची (संख्या क्रमाने) वाढविली असता' इत्यादी वर्णन आले आहे. या पाठानुसार ६०९ व्या श्लोकाची दुसरी ओळ, ६१० वा श्लोक व ६११ व्या श्लोकाची पहिली ओळ यांचे भाषांतर पुढील प्रमाणे होईल–

"म्हणून ती वर केली असता, (स्वरांची भोके) झाकलेला नंतरचा वंश, पूर्वीच्या वंशा-मधून (जो स्वर) उत्पन्न होतो त्या पहिल्या (स्वराशी) समान स्वर निर्माण होणारा असा होतो. वर उचललेल्या बोटांची संख्या (क्रमाने) त्याहून नंतर नंतरच्या (वंशात) वाढविली असता (भोके झाकलेले नंतरचे) वंश यथाक्रम मागील वंशाशी मिळून जातात."

मिलन्ति सर्ववंशानामिति ब्रूते हरप्रियः ।
मानहीनं तु यद्रन्ध्रं खानिर्वा यत्र तादृशी ॥ ६१३ ॥
न तद्रन्ध्रैः स्वजातीयैर्मिलन्ति स्वरभङ्गतः ।
चतुर्दशादिवंशानामावंशादेकवीरतः ॥ ६१४ ॥
यथैकैकस्वराधिक्यं वंशे स्यादुत्तरोत्तरे ।
मुद्रिते पूर्वपूर्वस्माद्वंशान्मुद्रितरन्ध्रकात् ॥ ६१५ ॥
इदानीं तादृशीं वंशस्वरूपरचनामिमाम् ।
शार्ङ्गदेवः समाचष्टे शिवानुग्रहशुद्धधीः ॥ ६१६ ॥
वंशपद्धतिरेषा च शार्ङ्गविद्याभिधीयते ।
अङ्गुलं षड्यवं चात्र रन्ध्रादिमितये मतम् ॥ ६१७ ॥
एकवीरे दण्डमानं सपादद्वादशाङ्गुलम् ।
यवार्धेनाधिकं तस्य शिरोन्तौ द्व्यङ्गुलौ पृथक् ॥ ६१८ ॥
मुखरन्ध्रेऽङ्गुलं मानं तारादौ सुषिराष्टके ।
प्रत्येकमङ्गुलदलं तेषां त्वन्तरसप्तके ॥ ६१९ ॥
यवद्वयं पृथद्ध्यानमुक्तं श्रीशार्ङ्गिसूरिणा ।

जे भोक प्रमाणरहित असते किंवा ज्या (वंशात) खानि तशा तऱ्हेची (म्हणजे प्रमाणरहित) असते, (तेथे ती भोके) आपल्या जातीच्या (म्हणजे समान नाद उत्पन्न करणाऱ्या) भोकांशी स्वरभिन्नतेमुळे मिळत नाहीत (म्हणजे समान नादाची असत नाहीत).

चतुर्दश इत्यादि वंशांच्या बाबतीत, एकवीर वंशापर्यंत, नंतर नंतरचा (स्वररंध्रे बोटांनी) झाकलेला वंश, पूर्व पूर्व (स्वररंध्रे बोटांनी) झाकलेल्या वंशापेक्षा एकेक स्वराने ज्याप्रकारे चढा असतो तशाप्रकारची ही वंशस्वरूपाची रचना आता शंकराच्या अनुग्रहाने शुद्ध बुद्धि प्राप्त झालेला शार्ङ्गदेव सांगत आहे. (६१२ ते ६१६)

ही वंशांची पद्धत शार्ङ्गविद्या म्हटली जाते. भोके इत्यादी मोजण्याच्या मापासाठी हिच्यात अंगुळ सहा यवांचे मानले आहे. (६१७)

एकवीराच्या दंडाचे माप सव्वाबारा अंगुळे व अर्धा यव असून त्याचा वरचा भाग व दुसऱ्या टोकाचा भाग प्रत्येकी दोन अंगुळ (प्रमाणाचा असतो). (६१८)

मुखरंध्राचे प्रमाण एक अंगुळ, तार इत्यादी आठ भोकांचे प्रत्येकी अर्धा अंगुळ (आणि) त्यांच्या सात अंतरांचे (६१९) प्रमाण प्रत्येकी दोन यव श्रीशार्ङ्गदेवाने सांगितले आहे.

सर्ववंशेषु तारस्य मुखरन्ध्रस्य चान्तरे ॥ ६२० ॥
एकवीरादिसंज्ञाभिर्विज्ञेयाङ्गुलसंमितिः ।
उमापतौ त्रिपुरुषे चैकैकाङ्गुलवर्धितम् ॥ ६२१ ॥
दण्डमानं परं लक्ष्म त्वेकवीरवदिष्यते ।
चतुर्मुखे दण्डमानं पादन्यूनयवाधिकैः ॥ ६२२ ॥
अङ्गुलैः पञ्चदशभिः सार्धैरस्यान्तरेषु तु ।
सपादद्वियवी मानं पृथगन्यत्तु पूर्ववत् ॥ ६२३ ॥
सपादैः सप्तदशभिः पादन्यूनयवाधिकैः ।
अङ्गुलैर्दण्डमानं स्यात्पञ्चवक्त्रेऽन्तरेषु तु ॥ ६२४ ॥
षोडशांशाधिका मानं पादोनत्रियवी पृथक् ।
शेषं तु पूर्ववद्दण्डे षण्मुखस्य तु संमितिः ॥ ६२५ ॥
युक्ता यवेन सार्धेनाष्टमांशसहितेन च ।
एकोनविंशतिः प्रोक्ताङ्गुलानामन्तरेषु तु ॥ ६२६ ॥
यवस्य सार्धपादाभ्यां युक्तमर्धाङ्गुलं पृथक् ।
पूर्वोक्तमपरं लक्ष्म दण्डे तु स्यान्मितिर्मुनेः ॥ ६२७ ॥
अङ्गुलैरेकविंशत्या सार्धपादद्वयाधिकैः ।

सर्व वंशांच्या बाबतीत, तारंध्र व मुखरंध्र यांमधील अंतरांचे (६२०) अंगुळप्रमाण एकवीर इत्यादी नावांनी जाणावे. उमापति व त्रिपुरुष यांच्या दंडाचे माप एकेका अंगुळाने वाढलेले असावे. बाकीचे लक्षण एकवीराप्रमाणे मानले आहे. चतुर्मुखाच्या दंडाचे माप साडेपंधरा अंगुळे व पाऊण यव असून याच्या अंतरांचे प्रमाण प्रत्येकी सव्वादोन यव असते. बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय.) (६२१–६२३)

पंचवक्त्राच्या दंडाचे माप सव्वासतरा अंगुळे व पाऊण यव एवढे असते. अंतरांचे प्रमाण (६२४) प्रत्येकी दोनपूर्णांकतेरा षोडशांश यव असून बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय). षण्मुखाच्या दंडाचे माप (६२५) एकोणीस अंगुळे व एकपूर्णांकपाचअष्टमांश यव सांगितले आहे. अंतरांचे (प्रमाण) (६२६) प्रत्येकी अर्धे अंगुळ व पाचअष्टमांश यव (असून) बाकीचे लक्षण पूर्वीच्या बाबतीत सांगितलेले (होय).

मुनि वंशाच्या दंडाचे माप (६२७) एकवीसपूर्णांक पाचअष्टमांश अंगुळे व तीन-

यवस्य चाष्टमांशेन सपादेन समन्वितैः ॥ ६२८ ॥
सपादयवपादेन द्वात्रिंशांशयुतेन च ।
युक्तमन्तरमानं स्यात्पृथक्पादोनमङ्गुलम् ॥ ६२९ ॥
शेषं तु पूर्ववल्लक्ष्म ज्ञेयं वंशे वसौ पुनः ।
अष्टमांशविहीनेन यवेनाधिकया भवेत् ॥ ६३० ॥
चतुर्विंशत्यङ्गुलानां चरणन्यूनया मितिः ।
पृथगष्टसु रन्ध्रेषु सपादत्रियवी मितिः ॥ ६३१ ॥
प्रत्येकमन्तरालेषु साष्टमांशयवाधिकम् ।
पादोनमङ्गुलं मानमपरं लक्ष्म पूर्ववत् ॥ ६३२ ॥
सपादयवसंयुक्ताङ्गुलषड्विंशतिर्भवेत् ।
मानं नाथेन्द्रदण्डस्यान्तरालेषु तु सप्तसु ॥ ६३३ ॥
अष्टमांशाधिकं मानमङ्गुलं पूर्ववत्परम् ।
यवाष्टमांशसहिता सार्धाष्टाविंशतिर्मता ॥ ६३४ ॥
अङ्गुलानां दण्डमानं महानन्देऽन्तरेषु तु ।
सपादमङ्गुलं सार्धयवपादाधिकं पृथक् ॥ ६३५ ॥

अष्टमांश यव (असते) (६२८) अंतराचे प्रमाण प्रत्येकी पाऊण अंगुळ व अकराबत्तिसांश यव असते. (६२९) बाकीचे लक्षण पूर्वीच्या प्रमाणे जाणावे.

आणि वसु वंशाच्या (दंडाचे) माप तेवीसपूर्णांकतीनचतुर्थांश अंगुळे व सातअष्टमांश यव असते. आठ भोकांचे प्रमाण प्रत्येकी सव्वातीन यव (असून), (६३०, ६३१) अंतरांचे प्रमाण प्रत्येकी पाऊण अंगुळ व एकपूर्णांकएकअष्टमांश यव (असते). बाकीचे लक्षण पूर्वीच्या प्रमाणे (होय). (६३२)

नाथेंद्राच्या दंडाचे माप सव्वीस अंगुळे व सव्वा यव होय. सात अंतरांचे (६३३) प्रमाण (प्रत्येकी) एकपूर्णांकएकअष्टमांश अंगुळ असून बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय).

महानंदाच्या दंडाचे माप साडेअट्ठावीस अंगुळे व एक अष्टमांश यव मानले आहे. आणि अंतरांचे (प्रमाण) प्रत्येकी सव्वा अंगुळ व तीनअष्टमांश यव (मानले आहे). (६३४, ६३५) बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय).

प्राग्वत्परं रुद्रदण्डे त्वङ्गुलानां यवाधिका ।
एकत्रिंशन्मिता मानमथ सार्धयवत्रया ॥ ६३६ ॥
प्रत्येकमष्टरन्ध्री स्यादन्तरालेषु सप्तसु ।
सार्धाङ्गुलं पृथङ्मानं पूर्वोक्तं शेषमिष्यते ॥ ६३७ ॥
दण्डस्य मानमादित्ये स्याच्चतुस्त्रिंशदङ्गुलम् ।
यवेन च सपादेन द्वात्रिंशांशयुजाधिकम् ॥ ६३८ ॥
द्वात्रिंशांशोनपादाभ्यां यवस्य सहितं पृथक् ।
पादोनमङ्गुलद्वन्द्वं मानमन्तरसप्तके ॥ ६३९ ॥
प्राग्वत्परं विश्वमूर्तौ स्यात्सप्तत्रिंशदङ्गुलम् ।
दण्डमानं युतं सार्धयवपादद्वयेन च ॥ ६४० ॥
प्रत्येकमन्तरालेषु त्वङ्गुलद्वितयं मतम् ।
यवस्य सार्धपादेनाभ्यधिकं पूर्ववत्परम् ॥ ६४१ ॥
दण्डो यवाष्टमांशेन सपादेन समन्वितैः ।
चतुश्चत्वारिंशता स्यादङ्गुलैः संमितो मनोः ॥ ६४२ ॥
सार्धाङ्गुलद्वयमितौ शिरःप्रान्तौ मतौ पृथक् ।
सार्धेन षोडशांशेन यवस्याभ्यधिकैस्त्रिभिः ॥ ६४३ ॥

रुद्रवंशाच्या दंडाचे माप एकतीस अंगुळे व एक यव या प्रमाणाचे असते व आठ भोके प्रत्येकी साडेतीन यव प्रमाणाची असतात. सात अंतरांचे प्रमाण प्रत्येकी दीड अंगुळ असून बाकीचे पूर्वीच्या बाबतीत सांगितलेले मानले आहे. (६३६, ६३७)

आदित्याच्या दंडाचे माप चौतीस अंगुळे व एकपूर्णांकनऊबत्तिसांश यव एवढे असते. (६३८) सात अंतरांचे प्रमाण प्रत्येकी पावणे दोन अंगुळे व पंधराबत्तिसांश यव (असते). (६३९) बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय).

विश्वमूर्तीच्या दंडाचे माप सदतीस अंगुळे व पाचअष्टमांश यव एवढे असते. (६४०)

अंतरांचे (प्रमाण) प्रत्येकी दोन अंगुळे व तीनअष्टमांश यव मानले आहे. बाकीचे पूर्वीच्या प्रमाणे (होय). (६४१)

मनुवंशाचा दंड चव्वेचाळिस अंगुळे व तीनअष्टमांश यव या मापाचा असतो. (६४२) वरचा भाग व दुसऱ्या टोकाचा भाग प्रत्येकी अडीच अंगुळे प्रमाणाचे मानले आहेत. सात अंतरांचे प्रमाण (प्रत्येकी) पावणेतीन अंगुळे व नऊषोडशांश यव असून

पादोनैरङ्गुलैर्मानमन्तरालेषु सप्तसु ।
पूर्वोक्तं लक्षणं शेषमवोचत्करणाग्रणीः ॥ ६४४ ॥
खानिः सर्वेषु वंशेषु कनिष्ठामध्यपर्वणा ।
मूलेन संमिता कार्येत्युक्तं सोढलसूनुना ॥ ६४५ ॥
सर्वमन्यत्तु वंशानां देशीशास्त्रश्रुवां समम् ।
एकवीरादयोऽत्रापि त्रयः प्राग्वन्न संमताः ॥ ६४६ ॥
धातून्वृत्तित्रयं तत्त्वानुगतौघांश्च यान्पुरा ।
वाद्यान्याश्रावणादीनि वीणायां यान्यवादिषम् ॥ ६४७ ॥
गेयं श्रुतिस्वरग्राममूर्च्छनादि च यन्मतम् ।
तत्सर्वं वंशवाद्येऽत्र विशेषेणोपदर्शयेत् ॥ ६४८ ॥
वंशवीणाशरीराणि त्रयोऽमी स्वरहेतवः ।
ललितो मधुरः स्निग्धस्तेषु वंशः प्रशस्यते ॥ ६४९ ॥
वंशवीणाशरीराणामेकीभावेन यो ध्वनिः ।
तत्र रक्तिविशेषस्य प्रमाणं विबुधा विदुः ॥ ६५० ॥

बाकीचे लक्षण पूर्वीच्या बाबतीत सांगितलेले करणाग्रणी (शार्ङ्गदेव) याने म्हटले आहे. (६४३, ६४४).

सर्व वंशांत, करंगळीच्या मधल्या पेराच्या मुळाएवढ्या प्रमाणाची खानि करावी असे सोढलपुत्राने सांगितले आहे. (६४५)

देशी व शास्त्रानुसार निर्माण केलेल्या वंशांच्या संबंधी बाकी सर्व समान असते. एकवीर इत्यादी तीन, यातही पूर्वीप्रमाणेच मान्य नाहीत. (६४६)

धातू, तीन वृत्ती, आणि जे तत्त्व, अनुगत व ओघ (हे वादनप्रकार) मी पूर्वी वीणेच्या बाबतीत सांगितले (तसेच) जी आश्रावणा इत्यादी वादने (सांगितली) (६४७) व श्रुति-स्वर-ग्राम-मूर्च्छना इत्यादि जे गेय मानले आहे ते सर्व या वंशवादनात विशेष तऱ्हेने दाखवावे. (६४८)

वंश, वीणा व शरीर (म्हणजे गळा) ही तीन स्वरनिर्मितीची कारणे होत. त्यांत स्निग्ध, गोड व रम्य असा वंश अधिक स्तुत्य होय. (६४९)

वंश, वीणा व शरीर यांतून एकरूपाने मिळून निघणारा जो नाद त्यात ज्ञानी लोक विशेष रंजकतेचे प्रमाण जाणतात. (६५०)

क० वीणेप्रमाणेच वंशातही धातू इत्यादी योजावे म्हणून ग्रंथकार सांगत आहे; (तसेच) वंश वीणा व शरीर यांच्या मिलाफाने उत्पन्न होणाऱ्या नादाच्या रंजकतेची स्तुति करून वंशाचा विनियोग दाखवीत आहे. (६४७ ते ६५२, ६५३—)

अध्वन्यानां प्रवासेषु कामिनीनिर्जितेषु च ।
शोकार्तेषु प्रयुञ्जीत मृदुमध्यलयध्वनिम् [५४] ॥ ६५१ ॥
वंशं प्रयुञ्जीत शृङ्गारे द्रुतादिललितध्वनिम् ।
कम्पितस्फुरितध्वानं वंशं द्रुतलयाश्रयम् ॥ ६५२ ॥
क्रोधाभिमानयोः कुर्यान्मतङ्गेनेति कीर्तितम् ।

(फूत्कारगुणाः)

स्निग्धता [५५] घनता रक्तिर्व्यक्तिः प्रचुरता ध्वनेः ॥ ६५३ ॥

प्रवाशांच्या प्रवासांत, कामिनींनी जिंकलेल्या (पुरुषांच्या) बाबतीत, व शोकाने व्याकुल झालेल्यांच्या बाबतीत मृदु व मध्य लयीतील नाद उत्पन्न करणारा वंश योजावा; शृंगारात द्रुत इत्यादी व ललित (म्हणजे रम्य) नाद असणारा (योजावा); कंपित व स्फुरित नाद असणारा आणि द्रुत लयीचा आश्रय करणारा वंश क्रोध व अभिमान (या भावांच्या आविष्कारात) योजावा, असे मतंगाने म्हटले आहे. (६५१,६५२,६५३–)

स्निग्धपणा, भरदारपणा, रंजकता, स्पष्टता, नादाची विपुलता, (६५३) सुरेखपणा,

---

क० आता फूत्काराचे गुण सांगत आहे —

या बारा गुणांमधील सावधानता सोडून बाकीचे स्निग्धपणा इत्यादी अकरा गुण, प्रकीर्णक अध्यायात मृष्ट इत्यादी पाच गुण सांगितले आहेत, तेथेच सांगितलेल्या लक्षणांनी जाणावे. सांगितलेले लक्षण शरीर व वंश यांच्या आवाजाची एकरूपता केल्याने होते. येथे फूत्कार या शब्दाने मुखरंध्रातून उत्पन्न होणारा नाद म्हटला आहे. (६५३ ते ६५५, ६५६–)

---

५४. सुधाकरटीका– मृदुमध्यलयध्वनि असणारा वंश म्हणजे मंद्र–मध्यलयनाद असणारा वंश.

५५. सुधाकरटीका– " स्निग्धता म्हणजे स्नेह, घनता म्हणजे अंतःसारता, रक्ति म्हणजे रंजकता, व्यक्ति म्हणजे प्रकटता, प्रचुरता म्हणजे बाहुल्य, लालित्य म्हणजे स्त्रियांमधील प्रसिद्ध असे वैदग्ध्य, कोमलपणा म्हणजे सुकुमारता, अनुरणन म्हणजे पडसाद, त्रिस्थानत्व म्हणजे तिन्ही स्थानांची व्याप्ति, श्रावकत्व म्हणजे श्रोत्यांना सुखकर होणे, माधुर्य म्हणजे मधुरता व सावधानत्व म्हणजे एकाग्रता. "

' फूत्कारैः ' हा पाठ कलानिधि व सुधाकर या दोन्ही टीकांमध्ये घेतलेला आहे. (अड्यार आवृत्ति, भा. ३ पृ ३५७, ३५८) आनंदाश्रम आवृत्तीत (पृ. ५४७) ' फूत्कृतेः ' असा पाठ मूळ ग्रंथात व कलानिधि टीकेत दिला आहे. संगीतसारामृतात (पृ. १२९) 'फूत्कृतेः' हाच शब्द आहे. या पाठाने ' फुंकीची सावधानता म्हणजे एकाग्रता ' असा अर्थ मिळतो.

संगीतसारात (वाद्याध्याय पृ. ९७–९८) या गुणांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे दिले आहे–

ज्यामुळे रूक्षता व फूट (म्हणजे चिरटेपणा) नसणारा नाद निघतो तो, फुंकीचा स्निग्धता हा गुण; गोल व भरदार नाद निघतो तो घनता हा गुण; मनाला वश करून घेणारा नाद निघतो तो रक्ति हा गुण; गीत, प्रबंध इत्यादींचे ताल, सुर, अक्षरे, पाटाक्षरे, जाती, लय इत्यादी

लालित्यं कोमलत्वं च नादानुरणनं तथा।
त्रिस्थानत्वं श्रावकत्वं माधुर्यं सावधानता ॥ ६५४ ॥
द्वादशेति गुणाः प्रोक्ताः फूत्कारे सूरिशार्ङ्गिणा।
तत्र शब्दगुणेष्वेवैकादश प्रोक्तलक्षणाः ॥ ६५५ ॥
फूत्कारैः सावधानत्वं न्यूनताधिक्यवर्जनम्।

(फूत्कारदोषाः)

फूत्कारो [५६] यमलः स्तोकः कृशः स्खलित इत्यमी ॥ ६५६ ॥

कोमलपणा, तसेच नादाचे गुंजन, तिन्ही स्थानांची व्याप्ति, श्रावकत्व, गोडवा आणि सावधानता (६५४) हे फुंकीचे बारा गुण शार्ङ्देवाने सांगितले आहेत. त्यांतील (सावधानता खेरीजच्या) अकरा (गुणांची) शब्दाच्या गुणांमध्येच लक्षणे सांगितली आहेत. (६५५) फूत्कारांशी संबद्ध सावधानता म्हणजे स्वराचा कमीपणा (म्हणजे कणसूर) व अधिकपणा (म्हणजे चढा स्वर) नसणे. (६५६-)

(हे फूत्काराचे बारा गुण होत.)

फूत्कार, यमल, स्तोक, कृश व स्खलित हे (६५६) फुंकीचे दोष (होत). प्रतिफूत्कृ-

---

क० आता फूत्काराचे दोष सांगत आहे--

कफोपहत म्हणजे कफाने दाटलेले. तुंब हा अनुकरणवाचक शब्द होय. तुसु असाही पाठ दिसून येतो. तुसु हाही अनुकरणवाचक शब्द होय. तारन्यूनतेने म्हणजे तारस्थानात श्रुति कमी

स्पष्टपणे दाखवतो तो व्यक्ति हा गुण; सगळ्या वाद्यांत ठळकपणे ऐकू येणारा व फार मंद नसणारा नाद (निघतो) तो प्रचुरता हा गुण; जो (निघणारा) नाद ऐकण्यासाठी मन उत्सुक होते तो लालित्य गुण; जो (उत्पन्न होणारा) नाद दुर्बळ, सबळ, रोगी, निरोगी, स्त्री, पुरुष, बाल, वृद्ध व तरुण इत्यादी सर्वांना आवडतो तो कोमलता हा गुण; गुंजनयुक्त नाद निघतो तो नादानुरणन हा गुण; जो नाद मंद्र, मध्य व तार या तिन्ही स्थानांत सारखाच सुरेल (उत्पन्न होतो) तो त्रिस्थानत्व हा गुण; वंशवादकाने मनात ठरवल्याप्रमाणे गमक इत्यादींनी युक्त असे केलेले वादन ऐकणाऱ्याला तसेच जाणवते तो श्रावकत्व हा गुण; जो निघणारा नाद ऐकण्यामुळे गोडी उत्पन्न होते तो माधुर्य हा गुण; व जो उत्पन्न होणारा नाद कमी अधिक नसतो तसेच फार सूक्ष्म नसतो तो फुंकीचा सावधानता हा गुण होय.'

५६. सुधाकरटीकेत फूत्कारात यमल, स्तोक, कृश व स्खलित हे चार दोष होत असे म्हटले आहे. पण संगीतरत्नाकराच्या अडचार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तींत तसेच संगीतसारामृतात (पृ. १२९) शेवटी ' इति दश फूत्कारदोषाः ' म्हणजे ' हे दहा फुंकीचे दोष होत ' असे दिले आहे. त्यामुळे फूत्कार इत्यादी पाच व कपिल इत्यादी पाच असे घेतल्याशिवाय ही संख्या पुरी होत नाही. अर्थात 'फूत्कार' या शब्दाने कोणता दोष समजायचा हे निश्चितपणे कळत नाही. (फुंकताना फू फू अशासारखा होणारा आवाज ऐकू येणे म्हणजे फूत्कार हा दोष ?) सुधाकरटीकेत ' स्तोक ' याचे स्पष्टीकरण 'स्थूल असूनही स्थानप्राप्तीमध्ये असमर्थ,' ' कृश ' याचे स्पष्टीकरण 'स्थानप्राप्तीमध्ये समर्थ असूनही बारीक ' व ' स्खलित ' याचे स्पष्टीकरण ' मध्ये मध्ये थांबणारा ' असे दिले आहे.

फूत्कारदोषा यमलं ब्रुवते प्रतिफूत्कृतिम् ।
एवमन्वर्थनामत्वान्नोच्यते लक्षणं पृथक् ॥ ६५७ ॥
[५७] कपिलस्तुम्बकी काकी संदष्टश्चाव्यवस्थितः ।
पञ्चेति फूत्कृतेर्दोषानपरानूचिरे परे ॥ ६५८ ॥
यः कफोपहताद्वक्त्राद्विस्वरः स्फुटितो भवेत् ।
कपिलोऽसौ [५८] तुम्बध्वानप्रायः प्रोक्तस्तु तुम्बकी ॥ ६५९ ॥
तारन्यूनतया काकस्वरः काकीति कथ्यते ।
अल्पः संदष्टवद्भाति [५९] योऽसौ संदष्ट उच्यते ॥ ६६० ॥

तीला (म्हणजे दुसऱ्या फुंकीने फुंक पूर्ण करणे यास) यमल म्हणतात. अशा रीतीने सार्थ नाव असल्याने (बाकीच्यांचे) वेगवेगळे लक्षण सांगितलेले नाही. (६५७) दुसऱ्या (काही आचार्यांनी) कपिल, तुंबकी, काकी, संदष्ट व अव्यवस्थित हे फुंकीचे पाच दोष सांगितले आहेत. (६५८) कफाने भरलेल्या तोंडातून (फुंकल्याने) जेव्हा बेसूर व फुटका (नाद उत्पन्न होतो तेव्हा तो) कपिल (हा दोष) होय. तुंब असा आवाज ज्यात पुष्कळ निघतो तो तुम्बकी म्हटला आहे. (६५९) तारस्थानात कणसूर झाल्याने कावळ्यासारखा आवाज उत्पन्न होतो तो काकी म्हटला आहे. जो थोडा असा संदष्टाप्रमाणे भासतो तो संदष्ट म्हटला आहे. (६६०) कणसूर किंवा चढा असा जो रूक्ष (आवाज उत्पन्न होतो)

असल्याने. ज्याप्रमाणे लोकात संदष्ट म्हणजे उपदंश इत्यादी काही अवयव नसलेले असे थोडे दिसून येते त्याप्रमाणे फुंकही थोडी असल्याने संदष्टाप्रमाणे म्हणून म्हटली आहे. कंठाचे म्हणजे शरीराच्या नादाचे गुण मृष्ट इ. व दोष रूक्ष इत्यादी होत. (६५६–६६१, ६६२–)

---

५७. ' कपिल ' या ऐवजी ' कम्पित ' असा पाठ अडचार आवृत्तीत (भाग ३ पृ. ३५८) मिळतो. त्याच्या लक्षणात ' स्फुटित ' ऐवजी ' स्फुरित ' हा शब्द मिळतो. सुधाकरटीकेत या दोषाचे स्पष्टीकरण दिले आहे ते असे– 'जो कफाने दाटलेल्या तोंडातून विकृत स्फुरण असणारा ध्वनि उत्पन्न होतो तो कंपित होय.' यावरून ' स्फुरित ' हा पाठ या टीकाकारासमोर असल्याचे दिसून येते. आनंदाश्रम आवृत्तीत (पृ. ५४८) व संगीतसारामृतात (पृ. १२९) ' स्फुटित ' हा पाठ घेतलेला आहे. ' कपिल ' या ऐवजी संगीतसारामृतात ' कफिल ' हा शब्द आहे.

५८. ' तुम्ब ' या ऐवजी ' तुसु ' हा पाठ संगीतसारामृतात (पृ. १२९) मिळतो.

५९. ' संदष्ट ' याचे स्पष्टीकरण कल्लिनाथाने ' उपदंश इत्यादि ' असे दिले आहे. ' उपदंश ' याचा ' तोंडी लावणे ' असाही अर्थ आहे. ' तोंडी लावणे ' हे अल्प असते. तसा नादाचा थोडेपणा असल्याने संदष्टासारखे स्वरूप असते म्हणून संदष्ट या नांवाने हा दोष सांगितला आहे. शारीर नादाच्या दोषा बाबत ' रूप इ. ' असा शब्द कल्लिनाथाच्या टीकेत आनंदाश्रम व अडचार या दोन्ही आवृत्तींत मिळतो. तो अर्थात ' रूक्ष इ. ' असा पाहिजे.

ऊनोऽधिको वा रूक्षः स कथ्यते सोऽव्यवस्थितः ।
कण्ठस्य गुणदोषा ये पुरोक्तास्तेषु केचन ॥ ६६१ ॥
फूत्कारेऽपि यथायोगं योजनीया मनीषिभिः ।

(वांशिकगुणाः)

अङ्गुलीसारणाभ्यासः सुस्थानत्वं सुरागता ॥६६२ ॥
सुरागव्यक्तिमाधुर्यान्विता वेगाद्गतागते ।
गीतवादनदक्षत्वं गातॄणां [६०] स्थानदायिता ॥ ६६३ ॥
तद्दोषाच्छादनं मार्गदेशीरागेषु कौशलम् ।
स्वस्थानवदपस्थाने रागोद्भूतिप्रगल्भता ॥ ६६४ ॥

तो अव्यवस्थित म्हटला आहे. गळ्याचे जे गुण व दोष पूर्वी सांगितले आहेत त्यांतील काही (६६१) फुंकीच्या बाबतीतही जाणकारांनी यथासंभव योजावे. (६६२ –)

(हे फूत्काराचे दहा दोष होत.)

बोटांच्या सारणाक्रियेचा (म्हणजे बोटांनी स्वरांची भोके झाकणे किंवा ती त्यांपासून दूर करणे याचा) सराव, योग्य स्थानचे स्वर घेणे, वेगाने आरोह व अवरोह करीत असता उत्कृष्टपणे राग आविष्कृत करण्याच्या गोडव्याने युक्त असणारी सुरेख रंजकता, गीताचे वादन करण्यातील तत्परता, गायकांच्या (मंद्र, मध्यम व तार या) स्थानांची (साथ) देणे, (६६२, ६६३) त्यांचे दोष झाकून टाकणे, मार्ग व देशी राग यांमधील कुशलता, स्वस्थानाप्रमाणे इतर स्थानांत राग आविष्कृत करण्यामध्ये प्रगल्भता (६६४)

क० आता वंशवादकाचे गुण सांगत आहे. गत म्हणजे आरोह व आगत म्हणजे अवरोह. आरोह व अवरोह वेगाने केला असताही, उत्कृष्टपणे राग प्रकट करण्यातील गोडव्याने युक्त असणे हा गुण होय. गायक गाताना जी तान घेण्याची इच्छा करतो ती त्या त्या रागाला अनुसरून प्रथम दाखवणे म्हणजे गायकांची तानदायिता (हा गुण); 'स्थानदायिता' असा पाठ असता मंद्र, मध्य व तार ही स्थाने दाखविणे (असा अर्थ घ्यायचा). त्या गायकांचे संदष्ट इत्यादी पूर्वी सांगितलेले पंचवीस दोष झाकणे, म्हणजे श्रोत्यांचा रागभंग होणार नाही अशा तऱ्हेने वंशवादकाने गायकाचे दोष झाकून टाकणे. स्वस्थाने पूर्वी सांगितलेली मुखचालन इ. चार होत. त्यापेक्षां इतर स्वस्थाने अपस्थाने म्हटली आहेत. या बाबतीत जरी स्वस्थानातच राग प्रकट होतो, अपस्थानात

---

६० 'स्थानदायिता' हा पाठ घेऊन सुधाकरटीकेत स्पष्टीकरण दिले आहे. हाच पाठ संगीतसारामृत (पृ. १२९) व संगीतदर्पण (पृ. ९६) यांतही घेतलेला आहे. आनंदाश्रम आवृत्तीतही (पृ. ५४८) हाच पाठ आहे. म्हणून तोच येथे घेतला आहे. 'तानदायिता' हा पाठ प्रथम घेऊन त्याप्रमाणे कल्लिनाथाने स्पष्टीकरण दिले आहे व मग 'स्थानदायिता' या पाठानुसार स्पष्टीकरण दिले आहे. अड्यार आवृत्तीत 'तानदायिता' हा पाठ घेतलेला आहे.

वांशिकस्य गुणानेतान् वक्ति श्रीकरणाग्रणीः ।

(वांशिकदोषाः)

मिथ्याप्रयोगबाहुल्यमेतद्गुणविपर्ययः ॥ ६६५ ॥

इष्टस्थानानवाप्तिश्च शिरसः कम्पनं तथा ।

वांशिकस्येति दोषाः स्युर्वर्जनीयाः प्रयत्नतः ॥ ६६६ ॥

(वांशिकवृन्दम्)

एकः स्याद्वांशिको मुख्यश्चत्वारोऽस्यानुयायिनः ।

वांशिकानामिति प्रायस्तज्ज्ञैर्वृन्दं निगद्यते ॥ ६६७ ॥

अधुना मुग्धबोधार्थमुदाहरणमात्रतः ।

वंशे देशीस्थरागाणां केषांचिद्वादनं ब्रुवे ॥ ६६८ ॥

हे वंशवादकाचे गुण श्रीकरणाग्रणी (शार्ङ्गदेव) सांगतो.

(हे वांशिकाचे गुण होत.)

चुकीचे खूप आलाप घेणे, या (बोटांचा कुशल वापर इत्यादी) गुणांच्या उलट स्वरूप असणे, (६६५) इच्छित स्थान प्राप्त न होणे तसेच डोके हलवणे हे वंशवादकाचे दोष होत. (ते) प्रयत्नपूर्वक टाळावे. (६६६)

(हे वांशिकाचे दोष होत.)

एक मुख्य वंशवादक व त्याला अनुसरणारे चार (वंशवादक) (वृंदात) असावेत. हा सामान्यतः तज्ज्ञांनी वंशवादकांचा वृंद सांगितला आहे. (६६७)

(हा वांशिकांचा वृंद होय.)

आता अज्ञांना बोध व्हावा यासाठी केवळ उदाहरण म्हणून काही देशी रागांचे वंशामधील वादन सांगतो. (६६८)

नाही; तरीही वंशवादक स्वतःच्या कौशल्याने अपस्थानातही स्वस्थानाप्रमाणे राग प्रकट करेल तर तो त्याचा गुण होय. (६६२ ते ६६४, ६६५–)

आता वंशवादकाचे दोष सांगत आहे–

मिथ्याप्रयोग म्हणजे अस्थानी गमकालाप. पूर्वी सांगितलेच आहे की–

' अक्षररहित गमकालप्ति आलाप मानली आहे. तीच शार्ङ्गदेवाने प्रयोग या शब्दाने सांगितली आहे. ' (सं. र. ४. ३६०) त्या मिथ्याप्रयोगाची प्रचुरता, या अंगुलीसारणाचा सराव इ. गुणांचा विपर्यय म्हणजे त्यांच्या उलट स्वरूप असणे. (६६५, ६६६)

क० त्यात प्रथम मध्यमादि रागाचा वाजवण्याचा क्रम दाखवीत आहें––

स्थायी करणे म्हणजे ग्रह म्हणून योजणे. यात मध्यमाच्या उदाहरणाच्या क्रमाने तिसरा स्वर धैवत होय. पण तो येथे विवादी असल्याने वाजवल्यास रागहानि होणारच. म्हणून तो सोडून देऊन त्यावरचा निषाद येथे तिसरा स्वर म्हणून घ्यावा असे जाणावे. त्याप्रमाणे पूर्वी म्हटलेच आहे––

मध्यमं स्थायिनं कृत्वा तृतीये[६१] कम्पिते स्वरे।
विलम्बिते द्वितीयेऽथ स्थायिनि न्यस्यते यदा ॥ ६६९ ॥

मध्यम स्वर स्थायी करून, (त्यापासून) तिसरा (म्हणजे निषाद) कंपित योजून, दुसरा स्वर (म्हणजे पंचम) विलंबित योजून नंतर जेव्हा स्थायी स्वरावर न्यास केला जातो (६६९) तेव्हा जाणकारांनी (ते) मध्यमादीचे पहिले स्वस्थान म्हटले आहे. तिसरा

"पूर्वपूर्व स्वर संभवत नसता, त्यावरचा वरचा क्रमाने आरोहाने घ्यावा. सर्व रागांत अशी स्थिति (जाणावी). " (सं. र. ६.३३२)

हा स्वराचा असंभव (तो त्या रागात) वर्ज्य असल्याने होय असे पूर्वीच म्हटले आहे व त्याप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे. त्यापासूनचा तिसरा स्वर म्हणजे निषाद कंपित योजल्यावर व दुसरा म्हणजे पंचम विलंबित योजल्यावर स्थायी म्हणजे मध्यमावर जेव्हा न्यास केला जातो तेव्हा ते मध्यमादीचे पहिले स्वस्थान म्हटले आहे. तिसऱ्या स्वराचे म्हणजे निषादाचे कंपन

६१. सुधाकरटीकेत तिसरा स्वर म्हणजे धैवत असे म्हटले आहे. पण वर्ज्यस्वराविषयीचे या बाबतीतले कल्लिनाथाचे स्पष्टीकरण सुसंगत वाटते. म्हणून भाषांतर त्याप्रमाणे केले आहे. कल्लिनाथाने तिसरा स्वर धैवत न घेता तो वर्ज्य असल्याने त्यावरचा निषाद तिसरा म्हणून घेतला आहे. पुढे चवथा स्वरही निषाद म्हणून घेतला आहेच. तसेच सहावा स्वर ऋषभ न घेता तो वर्ज्य असल्याने त्यावरचा गांधार सहावा स्वर म्हणून घेतला आहे. मध्यमापासून क्रमाने तिसरा असणारा स्वर धैवत हा होय व चवथा निषाद हा होय. पण निषादालाच तिसरा व चवथा स्वर असे मानणे यात मुख्यार्थाच्या दृष्टीने अडचण उत्पन्न होते. निषाद हाच क्रमाने खरोखरी चवथा स्वर आहे. पण तिसरा याचा मुख्य अर्थ घेण्याने धैवत हा स्वर मिळतो. आणि तो तर या रागात वगळायचा आहे. म्हणून तिसरा हा शब्द मुख्यार्थाने वापरणे जुळत नसल्याने तो त्याला लागून असणारा वरचा चवथा स्वर निषाद हा लक्षित करतो. म्हणजे तिसरा याचा, हा लक्षणेने हा अर्थ घ्यायचा. जेव्हा मुख्यार्थ लागू पडत नाही तेव्हा शब्दाचा लक्ष्यार्थ घ्यावा लागतो.

शब्दाच्या अभिधा, लक्षणा व व्यंजना या तीन वृत्ती म्हणजेच शक्ती साहित्यशास्त्रात मानलेल्या आहेत. अभिधेने मुख्यार्थ, लक्षणेने लक्ष्यार्थ व व्यंजनेने व्यंग्यार्थ मिळतो. ज्यावेळी मुख्यार्थ लागू पडत नाही त्यावेळी लक्षणेचा आश्रय घ्यायचा असतो. पण मुख्यार्थ व लक्ष्यार्थ यांमध्ये काहीतरी संबंध पाहिजे. लक्षणेचा सामान्यतः वापर हेतुपूर्वक केला जातो. 'कुशल' सारख्या काही शब्दांच्या बाबतीत जरी हेतु दिसत नसला तरी तो लक्ष्यार्थ देणारा शब्द मुख्यार्थानेच रूढ झाल्यामुळे होय. 'कुश म्हणजे दर्भ (तोडून) घेतो' तो 'कुशल.' (कुशान् लाति गृह्णाति।) धार्मिक कार्यासाठी लागणारे दर्भ तोडून घेताना इतर गवतापासून त्यांचे वेगळेपण माहीत असणारी विवेचक बुद्धि वापरावी लागते. अशी विवेचकबुद्धि वापरून इतर कामे करणाऱ्यांनाही 'कुशल' हे विशेषण लावले गेल्याने कुशल याचा अर्थ 'चतुर' असा सामान्यपणाने झाला; व 'चित्रे काढण्यात कुशल' अशासारखे शब्दप्रयोग वापरात आले. कालांतराने 'कुशल' हा शब्द चतुर या अर्थानेच भाषेत रूढ झाला. त्याचा 'दर्भ (तोडून) घेणारा' हा मुख्य अर्थ लुप्त झाला. अशी काही थोडी उदाहरणे सोडली तर भाषेत लक्षणेचा प्रयोग सहेतुकच

स्वस्थानं प्रथमं प्रोक्तं मध्यमादेस्तदा बुधैः ।
तृतीयकम्पनादूर्ध्वं चतुर्थं पञ्चमं ततः ॥ ६७० ॥
तुर्यस्वरं द्वितीयं च कृत्वा न्यासो ग्रहे यदा ।
तदा द्वितीयं स्वस्थानं शार्ङ्गदेवेन कीर्तितम् ॥ ६७१ ॥

स्वर (म्हणजे निषाद) कंपित केल्यावर, चवथा (म्हणजे निषाद), नंतर पाचवा (म्हणजे षड्ज), (६७०) (पुन्हा) चवथा आणि दुसरा योजून ग्रहावर जेव्हा न्यास (केला जातो) तेव्हा (ते) शार्ङ्गदेवाने दुसरे स्वस्थान म्हटले आहे. (६७१) चवथ्या स्वरावर

योजून नंतर चवथा स्वर म्हणजे निषादच घ्यावा. पण एकाच निषादाचे तिसरे व चवथे अशी दोन्ही स्वरूपे कशी असे म्हटल्यास त्याला उत्तर हे की त्याचे तिसरे हे स्वरूप लक्षणेचा आश्रय घेऊन मानले आहे. चवथे हे स्वरूप मुख्य अर्थानेच होय. गौण अर्थ व मुख्य अर्थ या दोन्हींचे एकाच शब्दाच्या बाबतीत केलेले वापर विरोधी असल्याचे दिसून येत नाही. ज्याप्रमाणे 'गंगेवर गौळवाडा' असे म्हटले असता गंगा या शब्दाने तट हा अर्थ लक्षणेने मिळतो म्हणून तट या शब्दाचा मुख्यार्थ सोडला जात नाही. तसेच येथेही असल्याने दोष येत नाही. लक्षणवाक्यातही लक्षणावृत्तीचा आश्रय करण्यामध्ये जवळच्या लागून असणाऱ्या स्वराप्रमाणे जवळ नसणाऱ्या स्वराची जुळणी करून घेणे हे असा प्रयोग करण्यातील उद्दिष्ट जाणावे. याप्रमाणे प्रत्यक्ष प्रचारा-

---

केलेला असतो. 'गंगेवर गौळवाडा आहे' या उदाहरणात लक्षणेचा वापर करण्यातील तिन्ही कारणे म्हणजे मुख्यार्थ लागू न पडणे, त्यामुळे मुख्यार्थाशी संबंधित असा लक्ष्यार्थ मिळणे व मुख्यार्थवाचक शब्द न वापरता असा लक्ष्यार्थ देणारा प्रयोग हेतुसिद्धीसाठी असणे ही आपणास दिसून येतात. 'गंगा' हा शब्द मुख्यार्थाने प्रवाह हा अर्थ देतो. शीतल, पवित्र अशा विशिष्ट जलप्रवाहाला गंगा हे नाव आहे. पण 'पाण्यावर गौळवाडा' हे म्हणणे जुळत नाही. यामुळे मुख्यार्थ लागू पडत नाही. गंगेचा प्रवाह व काठ यामध्ये जवळपणा हा संबंध आहे. त्यामुळे गंगा हा शब्द गंगेचा काठ हा अर्थ लक्षित करतो. हा अर्थ घेतला की वरील विधान सुसंगत ठरते. पण मग 'गंगेच्या काठावर गौळवाडा आहे' असे म्हटले असते तर भागले नसते का ? याला उत्तर असे, गंगेच्या प्रवाहाचे 'शीतलता, पावनता इ०' गुण मुख्यतः कळण्यासाठी 'गंगेवर' असा शब्दच मुद्दाम वापरला आहे. यामुळे त्या गौळवाडचालाही हे गुण संबद्ध होतात. म्हणून 'शीतलता, पावनता' इ० गुणांची प्रतीति म्हणजे ज्ञान व्हावे या हेतूनेच असा लक्षणेचा आश्रय घेऊन प्रयोग केला आहे. येथे तिसरा याने चवथा असा अर्थ लक्षणेने घेण्याचे कारण त्या मुख्यार्थाने असणारा स्वर या रागात वर्ज्य आहे. त्यामुळे मुख्यार्थ लागू पडत नाही. मुख्यार्थ व लक्ष्यार्थ यांत समीपता हा संबंध आहे व क्रमाने जवळ लागून असणाऱ्या स्वराप्रमाणे, (तो वर्ज्य असल्याने,) क्रमाने जवळ लागून नसणाऱ्या वरच्या स्वराचा प्रयोग करणे हे यातले उद्दिष्ट आहे.

'गंगेवर गौळवाडा' यामध्ये गंगाप्रवाह हा मुख्यार्थ, गंगातट हा लक्ष्यार्थ व शीतलता, पावनता इ० गुणांची प्रतीति हा व्यंग्यार्थ होय. लक्षणेमधील प्रयोजन म्हणजेच हेतु. हा मुख्यार्थही नाही तसेच लक्ष्यार्थही नाही. पण तो अर्थ 'गंगा' या शब्दानेच सूचित होतो. म्हणून तो गंगा या शब्दापासून मिळणारा व्यंग्यार्थ म्हटला आहे.

चतुर्थस्वरमाहत्य स्थायिनं तत्परं ततः ।
समुच्चार्य स्वरं तुर्यं पञ्चमं तु विलम्ब्य च ॥ ६७२ ॥
षष्ठं च पञ्चमं कृत्वा द्वितीयं च ग्रहे यदा ।
न्यासस्तदा तृतीयं स्यात्स्वस्थानमिति तद्विदः ॥ ६७३ ॥
ग्रहद्वितीयतुर्यांश्च पञ्चमं सप्तमं ततः ।
कृत्वाष्टमं विलम्ब्याथ द्वितीयं तत्परं ततः ॥ ६७४ ॥
द्वितीयं सप्तमं कृत्वा पञ्चमं च चतुर्थकम् ।
द्वितीयं च ग्रहे न्यासः स्वस्थानं तुर्यमिष्यते ॥ ६७५ ॥

आघात करून (म्हणजे तो स्वर गमकयुक्त घेऊन) नंतर स्थायी स्वर व त्यावरचा (म्हणजे पंचम) घेऊन, चवथा स्वर वाजवून आणि पांचवा विलंबित योजून (६७२) (मग) सहावा (म्हणजे गांधार), पाचवा व दुसरा स्वर घेऊन जेव्हा ग्रहावर न्यास (केला जातो) तेव्हा त्यांचे (म्हणजे स्वस्थानांचे) जाणकार ते तिसरे स्वस्थान होय असे (म्हणतात). (६७३)

ग्रह, दुसरा, चवथा व पाचवा, नंतर सातवा (म्हणजे गांधार) घेऊन आठवा (म्हणजे तार मध्यम) विलंबित योजून, दुसरा, त्यावरचा, नंतर (६७४) (पुन्हा) दुसरा, सातवा, पाचवा व चवथा आणि दुसरा घेऊन ग्रहावर न्यास (केला असता) ते चवथे स्वस्थान मानले आहे. (६७५)

नुसार देशीच्या बाबतीत लक्ष्याशी विरोध असणारे शास्त्र दुसऱ्या तऱ्हेने सर्वत्र योजावे, (म्हणजे लक्ष्याशी जुळवून घ्यावे). (दुसऱ्या स्वस्थानात) पाचवा स्वर षड्ज हा होय. त्या षड्जानंतर चौथा स्वर म्हणजे निषाद. मग दुसरा स्वर म्हणजे पंचम वाजवून ग्रहावर न्यास केला जातो तेव्हा ते दुसरे स्वस्थान म्हटले आहे. चवथा स्वर म्हणजे निषाद आघातयुक्त योजून म्हणजे गमकयुक्त योजून, नंतर स्थायी म्हणजे मध्यम व त्यावरचा वाजवून, चवथा म्हणजे निषाद योजून, पाचवा म्हणजे षड्ज विलंबित घ्यावा, नंतर ऋषभ विवादी असल्याने सहावा स्वर म्हणजे येथे त्यावरचा गांधार घेऊन, पांचवा म्हणजे षड्ज व दुसरा म्हणजे पंचम स्वर योजून ग्रह असलेल्या मध्यमावर न्यास केला असता ते तिसरे स्वस्थान होते. ग्रह, दुसरा व चवथा म्हणजे मध्यम, पंचम व निषाद, नंतर पाचवा म्हणजे षड्ज, आणि सातवा म्हणजे गांधार घेऊन नंतर आठवा म्हणजे तारस्थानातला मध्यम घ्यावा. पाचवा, चवथा व दुसरा म्हणजे षड्ज, निषाद व पंचम योजून ग्रहावर म्हणजे मध्यमावर न्यास केला असता ते चवथे स्वस्थान मानले आहे. यावरून या वंश-प्रकरणातही स्थायी व ग्रह या शब्दांचा एकाच अर्थाने उपयोग जाणावा.

'वंशांत' या बहुवचनावरून अष्टादशांगुळ इत्यादी वंशांत त्या त्या मतानुसार सांगितलेल्या लक्षणांमध्ये, ज्या वंशात जो मुद्रित स्वर असतो– उदा. अष्टादशांगुळ वंशात सात स्वरांची भोके बोटांनी झाकल्यावर षड्ज उत्पन्न होतो तो तेथे मुद्रित होय; कलानिधि वंशात मंद्र ऋषभ मुद्रित होय; मनु वंशात मंद्र गांधार मुद्रित होय; तोच मुद्रित स्वर त्या त्या वंशात मध्यमादि राग

दृश्यते मध्यमादेस्तु ग्रहो वंशेषु मुद्रितः ।
इति मध्यमादिः
षड्जे ग्रहे ममाहत्य षड्जं कृत्वा हतौ रिमौ ॥ ६७६ ॥
पमान्दोल्य प्रकम्प्यापि पमगान्द्विः प्रयुज्य च ।
आन्दोल्य मं प्रकम्प्यापि लघुषड्जं विधाय च ॥ ६७७ ॥
कम्पयित्वा रिमौ द्वित्रान् वारानावर्त्य षड्जगौ ।
स्थायिन्यासाद्भवेदाद्यं स्वस्थानं मालवश्रियः ॥ ६७८ ॥
आद्यस्वस्थानविधिना विधाय स्वरपञ्चकम् ।
निं [६२] विलम्ब्यावरोही चेत्पूर्वः स्वस्थानगः कृतः ॥ ६७९ ॥

(प्रचारात) मात्र वंशांमधील मुद्रित स्वर मध्यमादीचा ग्रह दिसून येतो.
हा मध्यमादि राग होय.

षड्ज ग्रह असता मध्यमावर आघात करून (पुन्हा) षड्ज योजून ऋषभ व मध्यम आघातयुक्त (योजावे). (६७६) (मग) पंचम आंदोलित करून व कंपितही योजून, पंचम, मध्यम व गांधार दोन वेळा प्रयुक्त करून, मध्यम आंदोलित घेऊन व कंपितही योजून आणि षड्ज जलद योजून, (६७७) ऋषभ व मध्यम कंपित करून, षड्ज व गांधार दोन तीन वेळा आवृत्त करून, स्थायीवर न्यास केल्याने मालवश्रीचे पहिले स्वस्थान होते. (६७८)

पहिल्या स्वस्थानाच्या प्रकाराने पाच स्वर योजून, निषाद विलंबित घेऊन पूर्वीच्या स्वस्थानातील अवरोही (वर्ण) योजला असता (६७९) ते रागजाणकारांनी दुसरे स्वस्थान जाणले

वाजवायचा असता त्याचा ग्रह म्हणून लक्ष्यात योजलेला दिसून येतो. नंतरही जेथे मुद्रित हा ग्रह म्हणून म्हटले असेल तेथे या प्रकारे जाणावे. (६६८ ते ६७५, ६७६ –)

क० आता मालवश्रीची स्वस्थाने सांगत आहे–

'षड्ज ग्रह असता' या म्हणण्याने, लक्ष्यानुसार दुसऱ्या स्वराचेही ग्रह स्वरूप मान्य करावे असे कळून येते. म्हणून जेव्हा षड्ज स्थायी म्हणून योजलेला असतो तेव्हा त्या षड्जाच्या अपेक्षेने जो मध्यम स्वर तो आघातयुक्त (म्हणजे गमकयुक्त) योजून याप्रमाणे बाकीचे स्वरही षड्जाच्या अपेक्षेने जाणावे. हाच अर्थ ग्रंथकार 'षड्ज किंवा दुसरा स्वर' इत्यादीने स्वतःच सांगत आहे. यातही मध्यमादिप्रमाणे मुद्रित स्वरच स्थायी असतो. (६७६ ते ६८४, ६८५–)

---

६२. 'धैवत विलंबित योजून' असे सुधाकरटीकेत म्हटले आहे. पण 'निं' हाच पाठ आनंदाश्रम व अडयार आवृत्तीत आहे.

तदा द्वितीयं स्वस्थानमाश्रितं रागवेदिभिः ।
कृत्वा द्वितीयं स्वस्थानं धान्तमान्दोल्य सप्तमम् ॥ ६८० ॥
आहत्य च द्वितीयस्य स्वस्थानस्यावरोहणम् ।
कृतं यत्र तृतीयं तत्स्वस्थानमुदितं बुधैः ॥ ६८१ ॥
आहत्य मं द्विगुणसं कृत्वा रिं तत्परं ततः ।
तं सं प्रोच्य निमाहत्य विलम्ब्य पुनरप्यमुम् ॥ ६८२ ॥
कृत्वा तृतीयं स्वस्थानावरोही क्रियते यदा ।
तदा चतुर्थं स्वस्थानमाख्यातं मालवश्रियः ॥ ६८३ ॥
षड्जोऽन्यो वा स्वरो वंशे ग्रहोऽस्या मुद्रितः स्वरः ।
प्रकल्प्य तस्य षड्जत्वं परेषामृषभादिताम् ॥ ६८४ ॥
लक्ष्मेदं योजयेत्सर्वामित्युक्तं सूरिशार्ङ्गिणा ।

इति मालवश्रीः

स्थायिनं मध्यमं कृत्वा कम्पयित्वा परं स्वरम् ॥ ६८५ ॥
तुर्यं विलम्ब्य कृत्वा च तृतीयं तं द्रुताहतम् ।

आहे. दुसरे स्वस्थान धैवताअखेर योजून, सातवा स्वर (म्हणजे निषाद) आंदोलित करून (६८०) व आघातयुक्त योजून, दुसरे स्वस्थान अवरोहाने ज्यात घेतले जाते ते जाणकारांनी तिसरे स्वस्थान म्हटले आहे. (६८१) मध्यमावर आघात करून व द्रुपटीचा षड्ज (म्हणजे तार षड्ज) घेऊन, मग ऋषभ व त्यावरचा (म्हणजे गांधार) योजून तो षड्ज वाजवून, निषाद आघातयुक्त (म्हणजे गमकयुक्त) घेऊन तो विलंबित (योजावा); पुन्हा तो घेऊन (६८२) तिसरे स्वस्थान जेव्हा अवरोही योजले जाते तेव्हा ते मालवश्रीचे चवथे स्वस्थान म्हटले आहे. (६८३) वंशाच्या बाबतीत षड्ज किंवा दुसरा मुद्रित स्वर हिचा (म्हणजे मालवश्रीचा) ग्रह (जाणावा). त्याचे षड्ज स्वरूप मानून व इतरांचे ऋषभ इत्यादि स्वरूप मानून (६८४) हे सर्व लक्षण योजावे असे विद्वान शार्ङ्गदेवाने म्हटले आहे. (६८५–)

हा मालवश्री होय.

मध्यम स्वर स्थायी करून पुढचा स्वर (म्हणजे पंचम) कंपित योजून, (६८५) चवथा (म्हणजे निषाद) विलंबित योजून, तिसरा घेऊन व तो वेगाने आघातयुक्त (६८६) योजून आणि तो पुन्हा वाजवून प्रहावर न्यास केल्याने तोडीचे पहिले स्वस्थान उत्पन्न होते असे मुनिश्रेष्ठांनी म्हटले आहे.

क० या पुढे तोडी इत्यादींची स्वस्थाने मूळ ग्रंथावरूनच सहज कळण्यासारखी आहेत. (६८५ ते ६८९, ६९०–)

विधाय तं पुनः प्रोच्य ग्रहन्यासेन जायते ॥ ६८६ ॥
स्वस्थानं प्रथमं तोड्याः प्रोक्तं मुनिवरैरिति ।
प्राक्स्वस्थानवदारुह्य पञ्चमादवरुह्यते ॥ ६८७ ॥
स्थायिस्वरान्तं यत्रादः स्वस्थानं स्याद् द्वितीयकम् ।
प्राग्वदाषष्ठभारोहावरोही च ग्रहावधिः ॥ ६८८ ॥
अस्यास्तृतीये स्वस्थाने चतुर्थे त्वष्टमावधौ ।
आरोहिण्यवरोही स्यात्पूर्ववत्तद्विदां मतः ॥ ६८९ ॥
मुद्रितस्तु ग्रहः प्रोक्तो लक्ष्ये स्याल्लक्ष्मवेदिभिः ।

इति तोडी

मध्यमं स्वरमास्थाय प्राञ्चं प्रोच्य ततो ग्रहम् ॥ ६९० ॥
सद्वितीयं कम्पयित्वा तृतीयं सचतुर्थकम् ।
लघूकृत्य तृतीयं चोच्चार्याहत्य च तं ततः ॥ ६९१ ॥
प्राचीनं स्वरमुच्चार्य स्थायिनि न्यस्यते यदा ।
भवेद् बङ्गालरागस्य स्वस्थानं प्रथमं तदा ॥ ६९२ ॥

ज्यात पूर्वीच्या स्वस्थानाप्रमाणे आरोह करून पंचमापासून स्थायीस्वराअखेर अवरोह केला जातो ते हे दुसरे स्वस्थान होय. हिच्या तिसऱ्या स्वस्थानात पूर्वीच्या (स्वस्थाना–) प्रमाणे सहाव्या स्वरापर्यंत आरोह व ग्रहस्वरअखेर अवरोह (केला जातो). आणि आठव्यास्वरापर्यंत आरोह असणाऱ्या चवथ्यात पूर्वीप्रमाणे अवरोह (योजलेला) असतो, असा तो ती (स्वस्थाने) जाणणाऱ्यांनी मानला आहे. (६८६–६८९) लक्षण जाणणाऱ्यांनी लक्ष्यात मुद्रित स्वर ग्रह म्हणून सांगितला आहे. (६९०–)

ही तोडी होय.

मध्यम स्वर ग्रह योजून, त्या पूर्वीचा (म्हणजे गांधार) वाजवावा. नंतर ग्रह स्वर (६९०) (त्यापासूनच्या) दुसऱ्या स्वरासह कंपित योजून, चवथ्यासह तिसरा जलद वाजवून व तिसरा स्वर वाजवून आणि तो आघातयुक्त योजून नंतर (६९१) पूर्वीचा स्वर वाजवून स्थायीवर जेव्हा न्यास केला जातो तेव्हा ते बंगालरागाचे पहिले स्वस्थान होते. (६९२)

क० या बंगालरागात 'लक्ष्यात सर्व वंशांत असणारा दुसरा स्वर याचा ग्रह मानला आहे' असे म्हटले आहे. षड्ज इत्यादींत मधल्या दोन स्वरांमध्ये मुद्रित स्वर असतो. त्याच्या अपेक्षेने दुसरा ऋषभ इत्यादी यात स्थायी होतो. तो दुसरा स्वरही शेवटची दोन भोके मोकळी असता उत्पन्न होतो असे पूर्वीच सांगितले आहे. पुढेही भैरव इत्यादी रागांत 'दुसरा स्वर याचा

आरोही पञ्चमान्तः स्यात्स्वस्थानेऽस्य द्वितीयके ।
सप्तमान्तस्तृतीये स्यात्तुर्ये स्यादष्टमावधि ॥ ६९३ ॥
प्राक्प्राग्वदवरोही स्यात्स्वस्थाने तूत्तरोत्तरम् ।
लक्ष्ये तु सर्ववंशस्थो द्वितीयोऽस्य ग्रहो मतः ॥ ६९४ ॥

इति बङ्गालः

धैवतं स्थायिनं कृत्वा प्राञ्चं तं च तृतीयकम् ।
पुनः प्राञ्चं विधायाथ कम्पयित्वा तृतीयकम् ॥ ६९५ ॥
विलम्ब्य चाहतं कृत्वा द्वित्रिवारं द्वितीयकम् ।
ग्रहे न्यासाद्भैरवस्य स्वस्थानं प्रथमं भवेत् ॥ ६९६ ॥
द्वितीये पञ्चमान्तः स्यादारोहोऽथ तृतीयके ।
षष्ठान्तः सप्तमान्तो वा चतुर्थे त्वष्टमावधिः ॥ ६९७ ॥
परे परेऽवरोही स्यात्स्वस्थाने पूर्वपूर्ववत् ।
द्वितीयोऽत्र स्वरः स्थायी सर्व वंशेषु दृश्यते ॥ ६९८ ॥

इति भैरवः

याच्या दुसऱ्या स्वस्थानात पाचव्या स्वरापर्यंत, तिसऱ्यात सातव्या स्वरापर्यंत व चवथ्यात आठव्या स्वरापर्यंत आरोह असतो. (६९३)

पुढच्या पुढच्या स्वस्थानात पूर्वपूर्व स्वस्थानाप्रमाणे अवरोह असतो. लक्ष्यात मात्र सर्व वंशांत असणारा दुसरा स्वर याचा ग्रह मानलेला आहे. (६९४)

हा बंगालराग होय.

धैवत स्थायी करून, त्या पूर्वीचा, तो व (त्यापासूनचा) तिसरा (आणि) पुन्हा त्या पूर्वीचा स्वर योजून मग तिसरा स्वर (म्हणजे षड्ज) कंपित करून (६९५) व विलंबित योजून आणि आघातयुक्त घेऊन दुसरा स्वर दोनतीन वेळा (वाजवून) ग्रहावर न्यास केल्याने भैरवाचे पहिले स्वस्थान होते. (६९६)

दुसऱ्या (स्वस्थानात) पाचव्या स्वरापर्यंत मग तिसऱ्यात सहाव्या किंवा सातव्या स्वरापर्यंत आणि चवथ्या (स्वस्थानात) आठव्या स्वरापर्यंत आरोह असतो. (६९७)

नंतर नंतरच्या स्वस्थानात पूर्वीपूर्वीच्या (स्वस्थाना-) प्रमाणे अवरोह असतो. यात सर्व वंशांत दुसरा स्वर स्थायी दिसून येतो. (६९८)

हा भैरव होय.

स्थायी ' इत्यादि जे म्हटले आहे त्यात शेवटची दोन भोके मोकळी ठेवल्याने उत्पन्न होणारा स्वर स्थायी योजावा असे जाणावे. (६९० ते ६९४)

स्थायिनं द्विगुणं षड्जं कृत्वार्धं वादयेत्ततः ।
पूर्वं ग्रहं द्वितीयं च तृतीयमथ वादयेत् ॥ ६९९ ॥
अथ द्वितीयमागत्य न्यस्यते स्थायिनि स्वरे ।
यदा वराट्याः स्वस्थानं प्रथमं जायते तदा ॥ ७०० ॥
इह भैरववत्कार्यं स्वस्थानत्रितयं परम् ।
स्वस्थानप्रक्रियैषैव ज्ञेया रागान्तरेष्वपि ॥ ७०१ ॥
द्वितीयोऽस्याः स्वरो लक्ष्ये ग्रहत्वेनोपलक्ष्यते ।

इति वराटी

ऋषभे स्थायिनि प्राञ्चं कम्पयित्वार्धमस्य च ॥ ७०२ ॥
कृत्वा ग्रहं द्वितीयं च तृतीयं तदधःस्वरम् ।
ग्रहमेत्य ततः प्राञ्चं प्रकम्प्योक्त्वार्धमस्य च ॥ ७०३ ॥

दुप्पटीचा षड्ज (म्हणजे मध्य षड्ज किंवा तार षड्ज) स्थायी करून नंतर अर्ध (म्हणजे स्थायीपासून चवथा स्वर) वाजवावा (मग) (स्थायी–) पूर्वीचा, ग्रह, (त्यापासून) दुसरा आणि तिसरा स्वर वाजवावा. (६९९) नंतर दुसऱ्या स्वरावर येऊन स्थायी स्वरावर जेव्हा न्यास केला जातो तेव्हा वराटीचे पहिले स्वस्थान उत्पन्न होते. (७००)

यात पुढची तीन स्वस्थाने भैरवाप्रमाणे योजावी. दुसऱ्या रागांमध्येही स्वस्थानांची हीच प्रक्रिया जाणावी. (७०१)

लक्ष्यात दुसरा स्वर हिचा ग्रह या रूपाने दिसून येतो. (७०२–)

ही वराटी होय.

ऋषभ स्वर स्थायी असता, (त्या) पूर्वीचा (म्हणजे षड्ज) कंपित करून व याचा (म्हणजे स्थायीचा) अर्ध (म्हणजे त्या पासूनचा चवथा स्वर) घेऊन (७०२) (मग) ग्रह, दुसरा, तिसरा व त्या खालचा स्वर योजून, ग्रहावर येऊन नंतर त्या पूर्वीचा कंपित करून, याचा अर्ध (म्हणजे चवथा स्वर) वाजवून (७०३) ग्रहावर न्यास केल्याने

क० वराटीमध्ये द्विगुण षड्ज म्हणजे मध्य षड्ज किंवा तार षड्ज (स्थायी असतो). त्या मध्य किंवा तार षड्जाचे दुप्पटीचे स्वरूप पूर्वीपूर्वीच्या स्वराच्या अपेक्षेने संभवते. अर्ध म्हणजे द्वयर्ध अर्थात स्थायीपासूनचा चवथा स्वर असा अर्थ. (६९९ ते ७०१, ७०२–)

क० गुर्जरीत 'हिच्यात प्रायः लक्ष्यात तिसरा स्वर ग्रह म्हणून दिसून येते' असे म्हटले आहे. येथेही मुद्रित स्वरापासून तिसरा घ्यावा. तो शेवटची तीन मोके मोकळी सोडल्याने उत्पन्न होतो असे पूर्वी सांगितले आहेच. पुढे वसंत इत्यादींमध्येही याप्रमाणे पहावे. (७०२ ते ७०४)

ग्रहे न्यासेन गुर्जर्याः स्वस्थानं प्रथमं भवेत् ।
तृतीयो दृश्यते प्रायो ग्रहोऽस्यां लक्ष्यगोचरे ॥ ७०४ ॥

इति गुर्जरी

षड्जे ग्रहे द्वितीयं च तृतीयं सकृदाहतम् ।
वेगात्कृत्वाथ तुर्यं च तृतीयं तदधस्तनम् ॥ ७०५ ॥
उक्त्वा तृतीयतुर्यौ च तृतीयं तदधस्तनम् ।
ग्रहे न्यासो वसन्तस्य स्वस्थाने प्रथमे भवेत् ॥ ७०६ ॥
तृतीयस्त्वस्य वंशेषु स्थायित्वेनोपलक्ष्यते ।

इति वसन्तः

स्थायिनि द्विगुणे षड्जे तदर्धं लघु वादयेत् ॥ ७०७ ॥
ततस्तत्सकृदाहत्य ग्रहं तस्मात्तृतीयकम् ।
तुर्यं चोक्त्वा तृतीयं च सकृदाहत्य तत्परम् ॥ ७०८ ॥
द्रुतं कृत्वा पञ्चमं तु विलम्ब्यास्मादधस्तनौ ।
लघूकृत्य ग्रहे न्यासः स्वस्थाने प्रथमे भवेत् ॥ ७०९ ॥
धन्नास्या दृश्यते वंशे स्याद् द्वितीयस्वरो ग्रहः ।

इति धन्नासी

गुर्जरीचे पहिले स्वस्थान होते. हिच्यात लक्ष्यामध्ये प्रायः तिसरा स्वर ग्रह दिसून येतो. (७०४)

ही गुर्जरी होय.

षड्ज ग्रह असता, दुसरा व तिसरा स्वर एक वेळा वेगाने आघातयुक्त घेऊन मग चवथा, तिसरा आणि त्या खालचा स्वर (७०५) वाजवून, तिसरा, चवथा, तिसरा व त्या खालचा स्वर घेऊन ग्रहावर न्यास वसंताच्या पहिल्या स्वस्थानात असतो. (७०६) वंशात तिसरा स्वर याचा स्थायी म्हणून मिळतो. (७०७–)

हा वसंत होय.

दुप्पटीचा षड्ज ग्रह असता त्याचा अर्ध (म्हणजे त्यापासूनचा चवथा स्वर) जलद वाजवावा. (७०७) मग तो एकवार आघातयुक्त योजून, ग्रह, त्या (ग्रहा–) पासून तिसरा व चवथा वाजवून, तिसरा स्वर एकवेळा आघातयुक्त योजून, त्यावरचा (म्हणजे चवथा) स्वर (७०८) जलद घेऊन, पाचवा विलंबित योजून, याच्या खालचे दोन वेगाने घेऊन ग्रहावर न्यास धन्नासीच्या पहिल्या स्वस्थानात असतो. वंशात (हिचा) दुसरा स्वर ग्रह दिसून येतो. (७०९, ७१०–)

ही धन्नासी होय.

तमेव स्थायिनं कृत्वा द्वितीयं वादयेद् द्रुतम् ॥ ७१० ॥
लघू ग्रहद्वितीयौ च कृत्वा ताभ्यां परं स्वरम् ।
विलम्ब्य स्फुरितं तु द्विर्विदध्यात्पञ्चमं ततः ॥ ७११ ॥
अधरांस्त्रीन्क्रमादुक्त्वा स्थायिनि न्यस्यते यदा ।
देश्यास्तदाद्यं स्वस्थानं द्वितीयोऽस्या ग्रहो जने ॥ ७१२ ॥

इति देशी

गान्धारे स्थायिनि प्रोच्य द्वितीयं च तृतीयकम् ।
तुर्यं विलम्ब्य तत्प्राञ्चं कृत्वा स्पृष्ट्वा द्वितीयकम् ॥ ७१३ ॥
दीर्घीकृत्य तृतीयं चोक्त्वा द्वितीयं ग्रहस्वरे ।
न्यासो यदा स्यात्स्वस्थानं देशाख्यायास्तदादिमम् ॥ ७१४ ॥
मुद्रितोऽस्या ग्रहो वंशे लक्ष्यते लक्ष्यवेदिभिः ।

इति देशाख्या

इति रागाङ्गाणि

ग्रहं द्विगुणसं कृत्वा पूर्वं स्पृष्ट्वा तृतीयकम् ॥ ७१५ ॥

तोच (म्हणजे दुप्पटीचा षड्ज) स्थायी करून दुसरा स्वर द्रुत वाजवावा. (७१०)

(मग) ग्रह व दुसरा स्वर वेगाने घेऊन त्या दोन्हींच्या पुढचा स्वर विलंबित योजून नंतर स्फुरित गमकयुक्त पाचवा स्वर दोन वेळा योजावा. (७११)

मग खालचे तीन स्वर क्रमाने वाजवून स्थायीवर जेव्हा न्यास केला जातो तेव्हा ते देशीचे पहिले स्वस्थान (होय). लोकात (म्हणजे प्रचारात) हिचा ग्रह दुसरा स्वर (दिसून येतो). (७१२)

ही देशी होय.

गांधार स्वर स्थायी असता, दुसरा व तिसरा स्वर वाजवून, चवथा विलंबित योजून व त्यापूर्वीचा स्वर घेऊन, दुसऱ्या स्वराला स्पर्श करून, (७१३) तिसरा स्वर दीर्घ (म्हणजे विलंबित) योजून आणि दुसरा स्वर वाजवून ग्रहस्वरावर जेव्हा न्यास (केला जातो) तेव्हा देशाख्येचे पहिले स्वस्थान होय. (७१४)

लक्ष्यजाणकारांनी वंशात मुद्रित स्वर हिचा ग्रह म्हणून निर्दिष्ट केला आहे. (७१५–)

ही देशाख्या होय.

रागांगे समाप्त.

दुप्पटीचा षड्ज ग्रह योजून, त्यापूर्वीच्या स्वराला स्पर्श करून, तिसरा स्वर (७१५) घेऊन, ग्रहाला स्पर्श करून, त्यापुढचा स्वर वाजवून स्फुरितगमकयुक्त ध्यावा

कृत्वा स्पृष्ट्वा ग्रहं प्रोच्य तत्परं स्फुरितौ [६३] वदेत् ।
द्विस्त्रिर्वा ग्रहतत्पूर्वो न्यस्यते कम्पिते ग्रहे ॥ ७१६ ॥
यदा डोम्बक्रियः प्रोक्तं स्वस्थानं प्रथमं तदा ।
सा भूपाली श्रुता लोके द्वितीयं ग्रहमाश्रिता ॥ ७१७ ॥

इति डोम्बक्रीः

(लोके प्रसिद्धा भूपाली)

धैवते स्थायितां नीते द्विरुच्चार्य परं लघुम् ।
तं चाथ प्राञ्चमस्यार्धं पूर्वं पूर्वं विधाय तम् ॥ ७१८ ॥
विलम्ब्य कम्पयित्वार्धं तस्याहत्य च तन्मुहुः ।
पूर्वं प्रकम्प्य तस्यार्धं दीर्घीकृत्य ग्रहं व्रजेत् ॥ ७१९ ॥
अथोऽर्धप्रेरितौ पूर्वग्रहौ कृत्वा द्वितीयकम् ।
प्रोच्य स्पृष्ट्वा ग्रहं तस्मात्परं प्रोच्य प्रकम्प्य तु ॥ ७२० ॥
तृतीयं ग्रहपाश्चात्यग्रहौ तूच्चारयेन्मुहुः ।
ततस्तृतीयमाकम्प्य विलम्ब्य तदधस्तनम् ॥ ७२१ ॥

(मग) ग्रह आणि त्यापूर्वीचा स्वर दोन किंवा तीन वेळा (नंतर) कंपित ग्रहस्वरावर जेव्हा न्यास केला जातो (७१६) तेव्हा ते डोंबक्रीचे पहिले स्वस्थान म्हटले आहे. लोकात ती भूपाळी म्हणून प्रसिद्ध आहे. ती दुसऱ्या स्वराचा ग्रह म्हणून आश्रय करते. (७१७)

ही डोंबक्री होय.

(लोकांत ही भूपाळी म्हणून प्रसिद्ध आहे.)

धैवत स्थायी या स्वरूपाला नेल्यावर, पुढचा स्वर दोन वेळा जलद वाजवून, तो (म्हणजे स्थायी) आणि मग त्यापूर्वीचा (आणि) याचा अर्ध (म्हणजे चवथा स्वर) पूर्व पूर्व योजून, तो (म्हणजे स्थायी) (७१८) विलंबित (वाजवावा). त्याचा (म्हणजे स्थायीचा) अर्ध (म्हणजे चवथा स्वर) कंपित करून व तो वारंवार आघातयुक्त योजून, त्यापूर्वीचा स्वर कंपित करून व त्याचा अर्ध विलंबित योजून ग्रहाला जावे. (७१९)

मग पूर्वस्वर व ग्रह स्वर अर्धेच प्रेरित करून (म्हणजे वाजवून), दुसरा वाजवून, ग्रहाला स्पर्श करून, त्या पुढचा स्वर वाजवून आणि तिसरा स्वर कंपित योजून, ग्रहापूर्वीचा स्वर व ग्रहस्वर वारंवार वाजवावेत. नंतर तिसरा स्वर थोडा कंपित करून, त्या खालचा

---

६३. ' वदेत् ' या ऐवजी अडचार आवृत्तींत ' भवेत् ' असा पाठ आहे. ' वदेत् ' या पाठाने अर्थ सहजपणे जुळतो. पुढच्या ओळीत ' ग्रहतत्पूर्वो ' याऐवजी ' ग्रहतत्पूर्वौ ' असा पाठ असणे अधिक योग्य वाटते.

ईषद्विरम्य स्पृष्ट्वा च द्वितीयं न्यस्यते ग्रहे ।
यदा तदाद्यं स्वस्थानं वेलावल्याः प्रकीर्तितम् ॥ ७२२ ॥
तृतीयग्रहता त्वस्या दृश्यते वंशगोचरे ।

इति वेलावली

पञ्चमं ग्रहमास्थायारोहिणा पञ्चमं ततः ॥ ७२३ ॥
गत्वा विलम्ब्य तं तस्मादधरं द्रुततां नयेत् ।
ततोऽधःस्थं द्राघयित्वा स्पृष्ट्वा च द्राघितात्परम् ॥ ७२४ ॥
तत्परं दीर्घतां नीत्वा पुनः प्रोच्यावरोहिणा ।
तस्मादेत्य ग्रहन्यासे स्वस्थानं प्रथमं भवेत् ॥ ७२५ ॥
रागे प्रथममञ्जर्यां द्वितीयोऽस्या ग्रहो जने ।

इति प्रथममञ्जरी

[६४]स्थायिनोऽर्धात्समारुह्य तृतीयादिचतुःस्वरीम् ॥ ७२६ ॥

विलंबित योजून, थोडे थांबून व दुसऱ्या स्वराला स्पर्श करून जेव्हा ग्रहावर न्यास केला जातो तेव्हा ते वेलावलीचे पहिले स्वस्थान म्हटले आहे. (७२०, ७२१, ७२२)

वंशात हिचा ग्रह तिसरा स्वर दिसून येतो. (७२३–)

ही वेलावली होय.

पंचम स्वर ग्रह योजून मग आरोहाने पाचव्या स्वराला (७२३) जाऊन, तो विलंबित घेऊन, त्याखालचा स्वर द्रुत स्वरूपाला न्यावा, (म्हणजे तो जलद वाजवावा). मग त्याखालचा स्वर दीर्घ (म्हणजे विलंबित) योजून, या दीर्घ योजलेल्या स्वराच्या वरच्या स्वराला स्पर्श करून (७२४), त्यावरचा स्वर दीर्घस्वरूपाला नेऊन (म्हणजे विलंबित योजून) व पुन्हा वाजवून, त्यापासून अवरोहाने येऊन ग्रहावर न्यास केला असता ते प्रथममंजरी रागात पहिले स्वस्थान होते. हिचा ग्रह लोकात दुसरा स्वर (दिसून येतो). (७२५, ७२६–)

ही प्रथममंजरी होय.

धैवत या स्थायी स्वरापासून, तिसऱ्या स्वराने आरंभ करून (क्रमाने) चार स्वर आरोहाने घेऊन, (७२६) सहावा स्वर कंपित करून व विलंबित घेऊन आणि चवथा

---

६४. 'स्थायिनोऽर्धात्' असा पाठ अडचार व आनंदाश्रम या आवृत्तींत आहे. सुधाकर टीकेत या रागाच्या स्पष्टीकरणात 'धैवत स्थायी करून' असे म्हटले आहे. मिळणाऱ्या पाठावरून या रागाच्या ग्रहस्वराचा बोध होत नाही. हा पाठ 'स्थायिनो धात्' असा असेल तरच सुधाकरटीकेत दिलेले स्पष्टीकरण जुळते. हे स्पष्टीकरण घेऊन भाषांतर केले आहे.

कम्पयित्वा विलम्ब्यापि षष्ठतुर्यं[६५] विधाय च ।
एत्य पञ्चममेतस्माद् ग्रहान्तमवरुह्य च ॥ ७२७ ॥
ग्रहार्धं ग्रहपूर्वं च गत्वा स्पृष्ट्वा ग्रहं ततः ।
द्वितीयं कम्पितं कृत्वा तृतीयं स्फुरितं ततः ॥ ७२८ ॥
स्थायिनि न्यस्यते यत्र स्वस्थानं स्यात्तदादिमम् ।
आदिकामोदिकायाः स्याद् द्वितीयग्रहता जने ॥ ७२९ ॥

इत्यादिकामोदी

स्थायिनि द्विगुणे षड्जे द्विराहत्य तृतीयकम् ।
त्रिश्चतुर्वा ततः स्पृष्ट्वा ग्रहं पूर्वमुदीर्य च ॥ ७३० ॥
कम्पिते स्थायिनि न्यासात्स्वस्थानं प्रथमं भवेत् ।
रागे शुद्धवराट्यां सा द्वितीयस्थायिका जने ॥ ७३१ ॥

इति शुद्धवराटी

तमेव स्थायिनं कृत्वा तं तदर्धं द्विराहतम् ।
द्विस्त्रिर्वोक्त्वाथ द्वितीयं कम्पयित्वा विलम्ब्य च ॥ ७३२ ॥

स्वर योजून, पाचव्या स्वराला येऊन, त्यापासून ग्रहापर्यंत अवरोह करावा. (७२७) (मग) ग्रहाचा अर्ध (म्हणजे ग्रहापासून चवथा स्वर) याला व ग्रहापूर्वीच्या स्वराला जाऊन, ग्रहाला स्पर्श करून नंतर दुसरा स्वर कंपित करून आणि तिसरा स्फुरित गमकाने युक्त योजून (७२८) ज्यात स्थायी स्वरावर न्यास केला जातो ते आदिकामोदिकेचे पहिले स्वस्थान होय. लोकात दुसरा स्वर (हिचा) ग्रह असतो. (७२९)

ही आदिकामोदिका होय.

दुप्पटीचा षड्ज स्थायी (म्हणजे ग्रह) असता तिसरा स्वर दोनदा आघातयुक्त योजून, ग्रह स्वराला तीन किंवा चार वेळा स्पर्श करून व त्या पूर्वीचा स्वर वाजवून, (७३०) कंपित ग्रह स्वरावर न्यास केल्याने शुद्धवराटीरागातील पहिले स्वस्थान होते. ती लोकात दुसरा स्वर ग्रह असणारी (अशी आहे) (७३१)

ही शुद्धवराटी होय.

तोच (म्हणजे दुप्पटीचा षड्ज) ग्रह योजून, तो व त्याचा अर्ध (म्हणजे त्यापासून चवथा स्वर) दोन वेळा आघातयुक्त असलेला असा दोन किंवा तीन वेळा वाजवून, मग दुसरा स्वर कंपित करून व विलंबित योजून (७३२) (नंतर) दोन किंवा चार वेळा

---

६५. सुधाकरटीकेत 'सहावा स्वर कंपित व विलंबित योजून, चवथा गाऊन' असे स्पष्टीकरण दिले आहे. त्यावरून 'षष्ठतुर्यं' या ऐवजी 'षष्ठं तुर्यं' असा पाठ त्या टीकेत घेतल्याचे दिसते. त्याप्रमाणे वर भाषांतर केले आहे. आनंदाश्रम व अडयार या दोन्ही आवृत्तींत 'षष्ठतुर्यं' असा पाठ आहे.

आहत्य द्विश्चतुर्वास्मात्परं कृत्वा लघुं ग्रहम् ।
उक्त्वा ग्रहार्धपूर्वं तु दीर्घीकृत्य[६६] ग्रहे यदा ॥ ७३३ ॥
न्यस्यते शुद्धनट्टायाः स्वस्थानं प्रथमं तदा ।
वंशेष्वस्यामपि प्रायो द्वितीयो दृश्यते ग्रहः ॥ ७३४ ॥

इति शुद्धनट्टा

इति भाषाङ्गाणि ।

ग्रहं द्विगुणसं प्रोच्य तदर्धं च द्वितीयकम् ।
विलम्बिते तृतीयेऽथ द्वितीयं द्रुततां नयेत् ॥ ७३५ ॥
ग्रहार्धे च स्थिरीभूय कम्पयित्वा ग्रहं ततः ।
परौ स्वरौ द्रुतीकृत्य लघूकृत्य परं ग्रहे ॥ ७३६ ॥
न्यासे कृते रामकृतेः स्वस्थानं प्रथमं भवेत् ।
द्वितीयस्वरमेवास्या वंशे वीक्षामहे ग्रहम् ॥ ७३७ ॥

इति रामक्रीः

आघातयुक्त असा त्याच्या वरचा स्वर योजून, ग्रहस्वर जलद वाजवून, ग्रहाचा अर्ध (म्हणजे त्यापासून चवथा स्वर) व त्यापूर्वीचा स्वर योजून जेव्हा विलंबित ग्रहावर (७३३) न्यास केला जातो तेव्हा ते शुद्धनट्टेचे पहिले स्वस्थान (होय). हिच्यातही वंशांमध्ये बहुशः दुसरा स्वर ग्रह म्हणून दिसून येतो. (७३४)

ही शुद्धनट्टा होय.

भाषांगे समाप्त.

द्विप्टीचा षड्ज ग्रह योजून, त्याचा अर्ध (म्हणजे त्यापासून चवथा स्वर) व दुसरा स्वर वाजवून, तिसरा विलंबित योजल्यावर दुसरा द्रुतस्वरूपाला न्यावा (म्हणजे जलद वाजवावा). (७३५) (मग) ग्रहाच्या अर्धावर (म्हणजे ग्रहापासून चवथ्या स्वरावर) स्थिर होऊन, ग्रहस्वर कंपित योजून नंतर त्यापुढचे दोन स्वर (म्हणजे दुसरा व तिसरा) द्रुत करून व पुढचा (म्हणजे चवथा) जलद योजून ग्रहावर (७३६) न्यास केला असता रामकृतीचे पहिले स्वस्थान होते. वंशात दुसरा स्वरच हिचा ग्रह म्हणून आम्ही पाहतो. (७३७)

ही रामक्री होय.

---

६६. या श्लोकाचे सुधाकरटीकेतील स्पष्टीकरण असे आहे– "त्याच्या वरचा स्वर दोन किंवा चार वेळा ताडित करून, ग्रह जलद वाजवून, ग्रहाच्या पूर्वीचा स्वर वाजवल्यावर, दीर्घ योजलेल्या ग्रहावर जेव्हा (समाप्ति केली जाते...)"

तस्मिन्नेव ग्रहे कृत्वा द्वितीयं च तृतीयकम् ।
ग्रहार्धं द्रुतमुच्चार्य स्पृष्ट्वा पूर्वं ग्रहस्य च ॥ ७३८ ॥
अर्धं प्रोच्य विरम्याथ पूर्वं स्पृष्ट्वा तृतीयकम् ।
लघूकृत्य लघोः पूर्वौ स्पृष्ट्वाथ स्थायिनः परौ ॥ ७३९ ॥
लघूकृत्य द्रुतं कृत्वा द्वितीयं न्यस्यते ग्रहे ।
यदा तदा गौडकृतेर्भवेत्स्वस्थानमादिमम् ॥ ७४० ॥
द्वितीयोऽस्यामपि प्रायो ग्रहो लक्ष्येषु दृश्यते ।

इति गौडक्रीः

धैवते स्थायिनि प्राञ्चं ग्रहं ग्रहतृतीयकम् ॥ ७४१ ॥
तुर्यं कृत्वा तमाहत्य द्वितीयं कम्पयेत्ततः ।
अवरुह्य तृतीयादिक्रमेण चतुरः स्वरान् ॥ ७४२ ॥
ग्रहन्यासादेवकृतेराद्यं स्वस्थानमादिशेत् ।
तृतीयग्रहतां त्वस्याः पश्यामो वंशगोचरे ॥ ७४३ ॥

इति देवक्रीः

इति क्रियाङ्गाणि ।

त्याच स्वरावर (म्हणजे दुप्पटीच्या षड्जावर) ग्रह योजून, दुसरा व तिसरा स्वर घेऊन, ग्रहाचा अर्ध द्रुत वाजवून, मागच्या स्वराला स्पर्श करून व ग्रहाचा (७३८) अर्ध वाजवून, थांबून मग पूर्वीच्या स्वराला स्पर्श करून, तिसरा स्वर जलद घेऊन, या जलद घेतलेल्या स्वराच्या पूर्वीच्या दोन स्वरांना स्पर्श करून, मग स्थायीच्या नंतरचे दोन स्वर (७३९) जलद योजून, दुसरा स्वर द्रुत घेऊन ग्रहावर जेव्हा न्यास केला जातो तेव्हा ते गौडकृतीचे पहिले स्वस्थान होते. (७४०) हिच्यातही प्रायः लक्ष्यात दुसरा स्वर ग्रह म्हणून दिसून येतो. ((७४१-)

ही गौडक्री होय.

धैवत ग्रह योजून, त्या पूर्वीचा स्वर, ग्रह, ग्रहापासून तिसरा, (७४१) व चवथा योजून तो आघातयुक्त घेऊन, दुसरा स्वर कंपित योजावा. मग तिसऱ्या स्वरापासून आरंभ करून चार स्वर अवरोहाने घेऊन (७४२) ग्रहावर न्यास केल्याने देवकृतीचे पहिले स्वस्थान निदर्शित करावे. वंशात तिसरा स्वर हिचा ग्रह म्हणून आम्ही पाहतो. (७४३)

ही देवक्री होय.

क्रियांगे समाप्त.

धैवतं ग्रहमास्थाय तृतीयादवरुह्य च ।
स्वरत्रयं विरम्याथ ग्रहं परमथ ग्रहम् ॥ ७४४ ॥
पूर्वं कृत्वा तमाहत्य ग्रहन्यासेन जायते ।
स्वस्थानमाद्यं भैरव्यास्तृतीयोऽस्या ग्रहो जने ॥ ७४५ ॥

इति भैरवी

स्थायिनि द्विगुणे षड्जेऽधस्तृतीयं विधाय च ।
अधस्तनं प्रकम्प्याथ विलम्ब्य स्थायिनं ततः ॥ ७४६ ॥
प्राचीनं लघुतां नीत्वा द्विस्त्रिर्वाहत्य तं ग्रहम् ।
लघूकृत्याधरस्यार्धमास्पृश्य ग्रहपञ्चमम् ॥ ७४७ ॥
विलम्ब्य तं द्रुतीकृत्य तृतीयस्पर्शमाचरेत् ।
अथोक्त्वा पञ्चमं तं च दीर्घीकृत्याधरं मनाक् ॥ ७४८ ॥
कम्पयित्वा ग्रहन्यासाद्भवेत्स्वस्थानमादिमम् ।
छायानट्टाख्यरागस्य ग्रहो वंशे तृतीयकः ॥ ७४९ ॥

धैवत ग्रह योजून, (त्यापासून) तिसऱ्या स्वरावरून तीन स्वर अवरोह करून, थांबून, मग ग्रह, त्यावरचा, ग्रह (आणि) (७४४) त्या पूर्वीचा योजून, तो आघातयुक्त घेऊन ग्रहावर न्यास केल्याने भैरवीचे पहिले स्वस्थान उत्पन्न होते. लोकात तिसरा स्वर हिचा ग्रह (म्हणून दिसून येतो). (७४५)

ही भैरवी होय.

दुप्पटीचा षड्ज स्थायी असता त्या खालचा तिसरा स्वर योजून व खालचा स्वर कंपित करून, मग स्थायी विलंबित योजून नंतर (७४६) त्यामागचा स्वर शीघ्र घेऊन, तो दोन किंवा तीन वेळा आघातयुक्त योजून, ग्रह जलद घेऊन, खालच्या स्वराला थोडा स्पर्श करून, ग्रहापासून पाचवा स्वर (७४७) विलंबित घेऊन व तो द्रुत योजून, तिसऱ्याला स्पर्श करावा. मग पाचवा स्वर वाजवून व तो दीर्घ योजून, खालचा स्वर थोडा (७४८) कंपित करून, ग्रहावर न्यास केल्याने छायानट्टा नावाच्या रागाचे पहिले स्वस्थान होते. वंशात तिसरा स्वर (याचा) ग्रह (म्हणून दिसून येतो). (७४९)

क० ' अधरस्यार्धम् ' यातील अधर म्हणजे अधस्तन अर्थात खालचा स्वर होय. येथे तो ग्रह असणाऱ्या षड्जाच्या अपेक्षेने खालचा निषाद होय. त्याचा अर्ध म्हणजे थोडा स्पर्श होय. म्हणजे ' त्याला थोडा स्पर्श करून ' असा अर्थ ' एतां सालगनट्टा तु ' हा शब्द निश्चय या अर्थी असून तो क्रम सोडून योजायचा. म्हणजे ' एतां तु ' असे घ्यायचे. या ' छायानट्टेलाच ' असा अर्थ. ' गं स्पृष्ट्वा ' म्हणजे गांधाराला स्पर्श करून, ' ऋषभार्धं ' म्हणजे ऋषभाला थोडा स्पर्श करून. ' अधं पुनर्व्रजेत् '– पुन्हा या शब्दाने तोच ऋषभार्ध असे कळून येते. ऋषभार्ध दोनदा योजावा असा अर्थ. (७४६ ते ७५२)

एतां सालगनट्टां तु भाषन्ते लक्ष्यवेदिनः ।
अन्ये तु पञ्चमं कृत्वा स्थायिनं रिं विधाय च ॥ ७५० ॥
मं प्रकम्प्य स्थिरीभूय पञ्चमे द्विः पमध्यमौ ।
कृत्वा गमृषभार्धं च संस्पृश्यार्धं पुनर्व्रजेत् ॥ ७५१ ॥
ततो दीर्घौं रिमौ कृत्वा ग्रहे चेन्न्यस्यते तदा ।
आद्यं सालगनट्टायाः स्वस्थानं तद्विदो विदुः ॥ ७५२ ॥

इति च्छायानट्टा

मं विधाय ग्रहं तं च द्रुतीकृत्य परं ततः ।
उक्त्वा तुर्यं विलम्ब्याथ परमास्पृश्य पञ्चमम् ॥ ७५३ ॥
विलम्ब्यातोऽवरोहेण ग्रहमेति यदा तदा ।
स्वस्थानमादिमं रामकृतेर्वंशे द्वितीयकः ॥ ७५४ ॥
ग्रहश्चिन्धमरामक्रीः सा सिद्धा लोकवर्त्मनि ।

इति चिन्धमरामक्रीः ।

रिमेव ग्रहमाश्रित्य द्विस्त्रिर्वाहत्य मं[६७] ततः ॥७५५ ॥

लक्ष्यजाणकार हिला सालगनट्टा म्हणतात. बाकीचे (आचार्य हिचे लक्षण असे देतात–) पंचम स्वर स्थायी योजून, व ऋषभ घेऊन, (७५०) मध्यम कंपित करून, पंचमावर स्थिर होऊन, पंचम व मध्यम दोनदा घेऊन, गांधाराला स्पर्श करून व ऋषभाला थोडा स्पर्श करून (ऋषभाच्या) अर्धाला पुनः जावे (म्हणजे ऋषभाला पुन्हा थोडा स्पर्श करावा (. (७५१) नंतर ऋषभ व मध्यम दीर्घ योजून जेव्हा ग्रहावर न्यास केला जातो तेव्हा ते सालगनट्टेचे पहिले स्वस्थान म्हणून तज्ज्ञ जाणतात. (७५२)

ही छायानट्टा होय.

मध्यम स्वर ग्रह योजून व तो जलद घेऊन नंतर त्यापुढचा स्वर वाजवून, चवथा विलंबित घेऊन मग त्यापुढच्या स्वराला स्पर्श करून, पाचवा (७५३) विलंबित योजून, त्यापासून अवरोहाने जेव्हा (वादक) ग्रहावर येतो तेव्हा ते रामकृतीचे पहिले स्वस्थान (होय). वंशात दुसरा स्वर (७५४) (हिचा) ग्रह (म्हणून दिसून येतो). लोकप्रचारात ती चिंधमरामक्री म्हणून सिद्ध आहे. (७५५–)

ही चिंधमरामक्री होय.

ऋषभ हाच ग्रह योजून, दोन किंवा तीन वेळा मध्यम आघातयुक्त वाजवून, नंतर (७५५) तो विलंबित करून व तो मध्यम दीर्घ योजून, ऋषभ, गांधार व ऋषभाचा अर्ध हे

---

६७. सुधाकरटीकेत 'गांधार दोन किंवा तीन वेळा ताडित करून' असे म्हटले आहे. यावरून 'मं' याऐवजी 'गं' असा पाठ या टीकाकाराने घेतलेला दिसतो. तसेच पुढे 'निषादाचा अर्ध वाजवावा' असे म्हटले आहे. त्यावरून 'रेरर्धं' याऐवजी 'नेरर्धं' असा पाठ या टीकाकारासमोर असावा.

तं विलम्बिततां नीत्वा दीर्घीकृत्य तु मध्यमम् ।
रिगौ रिदलमेतानि द्रुतीकृत्य विलम्ब्य निम् ॥ ७५६ ॥
पुनरुच्चार्य तं कृत्वा धैवतं सकृदाहतम् ।
वादयित्वा निषादं च ग्रहन्यासेन जायते ॥ ७५७ ॥
नाट्यरामकृतेराद्यं स्वस्थानमिति तद्विदः ।
अथवा मध्यमं कृत्वा ग्रहमाहत्य पञ्चमम् ॥ ७५८ ॥
द्विस्त्रिर्वाप्यवरोहेण धात्क्रमाद्दषभं द्रुतम् ।
एत्यार्धं तस्य षड्जं च रेरर्धं वादयेत्पुनः ॥ ७५९ ॥
अथोच्चार्य रिमौ पं तु विलम्ब्य न्यस्यते ग्रहे ।
यत्र स्वस्थानमाद्यं तन्नाट्यरामकृतेर्मतम् ॥ ७६० ॥

इति नाट्यरामक्रीः ।

ग्रहं कृत्वा धमाहत्य सकृद् ग्रहपरं स्वरम् ।
कृत्वा ग्रहात्परौ द्विस्तु ग्रहमाहत्य पूर्वकम् ॥ ७६१ ॥
द्वितीयं च क्रमादुक्त्वा ग्रहे चेन्न्यस्यते तदा ।
स्वस्थानमाद्यं मल्हारे ग्रहो वंशे द्वितीयकः ॥ ७६२ ॥

इति मल्हारः ।

जलद घेऊन, निषाद विलंबित योजून, (७५६) तो पुन्हा वाजवून, धैवत एकवार आघातयुक्त योजून आणि निषाद वाजवून ग्रहावर न्यास केल्याने नाट्यरामकृतीचे पहिले स्वस्थान उत्पन्न होते असे त्याचे (म्हणजे रागाचे) जाणकार जाणतात.

किंवा (दुसऱ्या मताने), मध्यम स्वर ग्रह योजून, पंचम स्वर आघातयुक्त असा दोन किंवा तीन वेळा घेऊन, धैवतापासून क्रमाने अवरोहाने ऋषभावर जलद येऊन, मग त्याचा अर्ध, षड्ज व ऋषभाचा अर्ध पुन्हा वाजवावा (७५७–७५९). नंतर ऋषभ व मध्यम वाजवून, पंचम विलंबित घेऊन ज्यात ग्रहावर न्यास केला जातो ते नाट्यरामकृतीचे पहिले स्वस्थान मानले आहे. (७६०).

ही नाट्यरामक्री होय.

धैवत हा ग्रह योजून ग्रहाच्या पुढचा स्वर (म्हणजे निषाद) एकवार आघातयुक्त योजून, ग्रहाच्या पुढचे दोन स्वर घेऊन, ग्रह दोनदा आघातयुक्त वाजवून, त्यामागचा (७६१) व दुसरा क्रमाने वाजवून जेव्हा ग्रहावर न्यास केला जातो तेव्हा ते मल्हारात पहिले स्वस्थान होय. वंशात दुसरा स्वर (याचा) ग्रह (होय). (७६२)

हा मल्हार होय.

ग्रहं द्विगुणसं कृत्वा द्रुतीकृत्य ततोऽधरम् ।
तमान्दोल्य द्वितीयं तु विधायाथ तृतीयकम् ॥ ७६३ ॥
स्फुरितं ग्रहतत्पूर्वौ वादयित्वा ग्रहे यदा ।
न्यासः कर्णाटगौडस्य स्वस्थानं प्रथमं तदा ॥ ७६४ ॥
वंशे ग्रहस्तृतीयोऽस्य गृह्यते लक्ष्यवेदिभिः ।

इति कर्णाटगौडः ।

ग्रहं तमेव सं कृत्वा प्रोच्य तुर्यतृतीयकौ ॥ ७६५ ॥
स्थायिनं तद्दलं चोक्त्वा पूर्वस्थायिदलं ततः ।
स्थायिन्यासादेशवालगौडस्वस्थानमादिमम् ॥ ७६६ ॥
जायतेऽस्यापि वंशे तु द्वितीयो दृश्यते ग्रहः ।

इति देशवालगौडः ।

निषादे स्थायिनि प्रोच्य पूर्वं ग्रहमथोत्तरम् ॥ ७६७ ॥

दुप्पटीचा षड्ज ग्रह करून मग त्याखालचा स्वर द्रुत घेऊन, तो आंदोलित करून, दुसरा स्वर घेऊन मग तिसरा (७६३) स्फुरित योजून, ग्रह व त्याच्या पूर्वीचा वाजवून जेव्हा ग्रहावर न्यास (केला जातो) तेव्हा ते कर्णाटगौडाचे पहिले स्वस्थान होय. (७६४) लक्ष्यजाणकारांकडून वंशात तिसरा स्वर याचा ग्रह म्हणून घेतला जातो. (७६५–)

हा कर्णाटगौड होय.

तोच षड्ज (म्हणजे दुप्पटीचा षड्ज) ग्रह योजून, चवथा व तिसरा वाजवून, (७६५) स्थायी व त्याचा अर्ध वाजवून नंतर पूर्व स्थायीचा अर्ध घेऊन, स्थायीवर न्यास केल्याने देशवाल–गौडाचे पहिले स्वस्थान (७६६) उत्पन्न होते. वंशात याचाही दुसरा स्वर ग्रह म्हणून दिसून येतो. (७६७–)

हा देशवालगौड होय.

निषाद स्वर स्थायी असता, त्यापूर्वीचा, ग्रह मग त्यानंतरचा (७६७) व चौथा स्वर

क० देशवालगौडात 'तोच षड्ज ग्रह योजून' असे सांगितले आहे. पूर्वीच्या रागातील ग्रहाचा विचार केल्याने दुप्पटीचा षड्ज असा अर्थ कळतो. 'त्याचे दल' यातील तो प्रस्तुत स्थायी होय. 'पूर्वस्थायिदल' यातील पूर्वस्थायी, म्हणजे दुप्पट या शब्दाने मध्य षड्ज घेतला असेल तर मंद्र षड्ज होय ; तार षड्ज घेतला असेल तर मध्य षड्ज होय ; त्याचे दल म्हणजे अर्ध. देशवालगौडालाच लोकांनी केदारगौड म्हटले आहे. (७६५ ते ७६६, ७६७–)

'निषादे स्थायिनि' म्हणजे निषाद स्थायी असता, प्रथम पूर्वीचा, मग ग्रह म्हणजे निषाद वाजवून नंतर दुसरा वाजवावा असा अर्थ. (७६७, ७६८, ७६९–)

तुर्यं द्वितीयतस्तु त्रीनवरुह्य ग्रहे यदा ।
न्यासस्तुरुष्कगौडस्य तदा स्वस्थानमादिमम् ॥ ७६८ ॥
लोके मालवगौडोऽसौ तृतीयोऽस्य ग्रहो मतः ।

इति तुरुष्कगौडः ।

(मालवगौड इति लोके)

निषादाद् ग्रहतां नीतादारोहेदाचतुर्थकम् ॥ ७६९ ॥
तं विलम्ब्य ततो गच्छेद् ग्रहे चेदवरोहिणा ।
तदा द्राविडगौडस्य स्वस्थानं प्रथमं भवेत् ॥ ७७० ॥
लोके सालगगौडोऽयं द्वितीयोऽस्य ग्रहो मतः ।

इति द्राविडगौडः ।

(लोके सालगगौडः)

इत्युपाङ्गानि ।

पञ्चमं ग्रहमास्थाय तृतीयं च द्वितीयकम् ॥ ७७१ ॥

वाजवून, दुसऱ्यापासून तीन स्वर अवरोहाने घेऊन, जेव्हा ग्रहावर न्यास (केला जातो) तेव्हा ते तुरुष्कगौडाचे पहिले स्वस्थान (होय). (७६८) लोकात तो मालवगौड (या नावाने प्रसिद्ध आहे). याचा ग्रह तिसरा स्वर मानला आहे. (७६९–)

हा तुरुष्कगौड होय.

(लोकात मालवगौड होय.)

ग्रहस्वरूपाला नेलेल्या (म्हणजेच ग्रह म्हणून योजलेल्या) निषादापासून चवथ्या स्वरापर्यंत आरोह करावा. (७६९) तो विलंबित योजून त्यानंतर अवरोहाने ग्रहावर गेले असता द्राविडगौडाचे पहिले स्वस्थान होते. (७७०) हा लोकात सालगगौड (म्हणून प्रसिद्ध आहे). (वंशात) दुसरा स्वर याचा ग्रह मानला आहे.

हा द्राविडगौड होय.

(लोकात सालगगौड होय.)

उपांगे समाप्त.

पंचम स्वर ग्रह योजून मग तिसरा व दुसरा स्वर वाजवून, (७७१) तिसऱ्याला

लोकात द्राविडगौड हा सालगगौड (म्हटला जातो) असे सांगितले आहे पण आता लोकात सालग एवढाच शब्द वापरला जातो. तो कसा योग्य आहे असे म्हटल्यास त्याला उत्तर असे की जसे भीमसेन याबद्दल भीम असा शब्द वापरला जातो तसेच हेही योग्यच आहे. (७६९, ७७०, ७७१–)

[६८]मुक्त्वा (?) तृतीयं स्पृष्ट्वा च प्रान्तमुक्त्वा तृतीयकम् ।
स्पृष्ट्वा विलम्ब्य द्वितीये न्यस्यते कम्पिते ग्रहे ॥ ७७२ ॥
यदा भवति कैशिक्याः स्वस्थानं प्रथमं तदा ।
तृतीयोऽस्याः स्वरो वंशे ग्रहो लक्ष्येषु दृश्यते ॥ ७७३ ॥

इति कैशिकी ।

स्थायिनं द्विगुणं षड्जं द्रुतीकृत्य द्वितीयकम् ।
उक्त्वा द्वितीयतृतीयौ द्रुतीकृत्याधराधरम् ॥ ७७४ ॥
उदीर्य तं द्रुतीकृत्य द्वितीयं वादयेत्ततः ।
तृतीयं द्विस्त्रिराहत्य स्थायिनि न्यस्यते यदा ॥ ७७५ ॥
ललितायास्तदा प्रोक्तं स्वस्थानं प्रथमं बुधैः ।
अस्यामपि स्वरो लक्ष्ये तृतीयो दृश्यते ग्रहः ॥ ७७६ ॥

इति ललिता ।

इति भाषाद्वयम् ।

स्पर्श करून, त्या पूर्वीचा वाजवून, तिसऱ्याला स्पर्श करून, दुसरा विलंबित योजून जेव्हा कंपित ग्रहावर न्यास केला जातो (७७२) तेव्हा ते कैशिकीचे पहिले स्वस्थान होते. लक्ष्यांत वंशातील तिसरा स्वर हिचा ग्रह दिसून येतो. (७७३)

ही कैशिकी होय.

द्रुपटीचा स्थायी षड्ज द्रुत योजून, दुसरा स्वर वाजवून, दुसरा व तिसरा स्वर जलद घेऊन, खालच्याच्या खालचा (७७४) वाजवून, तो द्रुत योजून, दुसरा स्वर वाजवावा. नंतर तिसरा स्वर दोन किंवा तीन वेळा आघातयुक्त योजून जेव्हा स्थायीवर न्यास केला जातो, (७७५) तेव्हा ते जाणकारांनी ललितेचे पहिले स्वस्थान म्हटले आहे. लक्ष्यात हिच्यामध्येही तिसरा स्वर ग्रह दिसून येतो. (७७६)

ही ललिता होय.

या दोन भाषा होत.

---

६८. 'मुक्त्वा' याऐवजी 'उक्त्वा' असा पाठ सुसंगत वाटतो. अडयार व आनंदाश्रम दोन्ही आवृत्तींत 'मुक्त्वा' असा पाठ आहे. त्याचा अर्थ 'सोडून'. पण सुधाकरटीकेत 'दुसरा व तिसरा हे दोन स्वर गावे,' असे म्हटले आहे. त्यावरून 'उक्त्वा' हा पाठच या म्हणण्याशी जुळतो. पुढे ललितेच्या लक्षणातही 'द्वितीयकम् उक्त्वा' (श्लोक ७७४) असेच आहे. 'प्रान्तम्' या ऐवजी आनंदाश्रम आवृत्तीत (पृ. ५६२) तळटीप १ घ. ङ. मध्ये 'प्राञ्चम्' हा पाठही दिला आहे. 'प्राञ्चम्' याने 'पूर्वीचा' हा अर्थ सहज स्पष्ट होतो.

ग्रहं द्विगुणसं कृत्वाधस्तनं स्थायिनं तथा ।
कृत्वा द्वितीयतुर्यौ च द्वितीयस्थायिनौ स्पृशेत् ॥ ७७७ ॥
विलम्बिते द्वितीयेऽथ स्थायिनि न्यस्यते यदा ।
श्रीरागस्य बुधैः प्रोक्तं तदा स्वस्थानमादिमम् ॥ ७७८ ॥
स्वरो वंशे द्वितीयोऽस्य ग्रहत्वेनोपलक्षितः ।
इति श्रीरागः ।
यो ग्रहः क्रियते वंशे तमपेक्ष्यात्र योजयेत् ॥ ७७९ ॥
लक्षणस्थं द्वितीयादि यदा किंतु ग्रहादयः[६९] ।
यावन्तो यत्र रागे स्युः स्वरा लक्ष्मणि तावताम् ॥ ७८० ॥
संभवः स्थायिना येन स्थायिनं तत्र तं श्रयेत् ।
अनुग्रहाय मुग्धानामित्येते कतिचिन्मया ॥ ७८१ ॥

दुप्पटीचा षड्ज ग्रह योजून, त्याखालचा, तसेच ग्रह घेऊन, दुसरा व चवथा स्वर वाजवून, दुसरा व स्थायी या स्वरांना स्पर्श करावा. (७७७) मग दुसरा स्वर विलंबित घेऊन जेव्हा स्थायी स्वरावर न्यास केला जातो तेव्हा ते विद्वानांनी श्रीरागाचे पहिले स्वस्थान म्हटले आहे. (७७८)

वंशात दुसरा स्वर याचा ग्रह म्हणून दिसून येतो. (७७९–)

हा श्रीराग होय.

जो ग्रह वंशामध्ये योजला जातो त्याच्या दृष्टीने येथे लक्षणातील दुसरा स्वर इत्यादि योजावा. पण ज्या रागात ग्रह इत्यादी स्वर जेवढे असतात (त्या रागाच्या) लक्षणात ज्या स्थायीमुळे तेवढ्या स्वरांचा संभव असतो तो स्थायी तेथे योजावा. अज्ञांच्यावर अनुग्रह

क० आता सर्व रागांना साधारण असणारा नियम सांगत आहे व त्यातील विशेष सांगत आहे. ज्या रागात ग्रह इत्यादी स्वर जेवढे असतात, त्या रागलक्षणात ज्या स्थायीमुळे तेवढे स्वर संभवतात त्या रागात त्या स्थायीचा आश्रय घ्यावा. याचा अर्थ असा– ज्या देशी रागात मंद्र व तार यांची मर्यादा म्हणून जे दोन स्वर असतात, त्यांच्यासह त्यांमधील स्वरांची जी संख्या असते तिच्यात कमी स्वरूप ज्या तऱ्हेने होणार नाही त्याप्रकारे स्थायिस्वर म्हणजे ग्रह योजावा ; असा उद्देश सांगितला आहे. असेच इतरत्रही लागू करावे. (७७९–७८१)

---

६९. सु. टी. ग्रहाच्या खालचे जितके स्वर वाजवायचे म्हणून सांगितले आहेत तेवढे स्वर ज्या स्थायीमुळे संभवतील त्या स्थायीचा आश्रय करावा.

रागाः प्रोक्ताः पथानेन संपश्यध्वं बुधाः परान् ।
इति वंशप्रकरणम् ।
पावो वेणुसमुत्पन्नः स्यान्नवाङ्गुलवंशवत्[७०] ॥ ७८२ ॥
कृतावेष्टो वंशपत्रैर्लोकरीत्यैष वाद्यते ।
इति पावलक्षणम् ।
पाविका वैणवी कार्या द्वादशाङ्गुलदैर्घ्यभाक् ॥ ७८३ ॥
स्थौल्येऽङ्गुष्ठमिता गर्भे स्वदैर्घ्ये सुषिरं श्रिता ।
कनिष्ठाग्रमितस्थौल्यमस्या लोकानुसारतः ॥ ७८४ ॥
फूत्कारररन्ध्रमेकं स्यात्पञ्च स्युः स्वरसिद्धये ।
वादनं विविधं नागयक्षावेशविधायकम् ॥ ७८५ ॥
इति पाविकालक्षणम् ।
हस्तद्वयाधिका माने मुखरन्ध्रसमन्विता ।
चतुःस्वरच्छिद्रयुता मुरली चारुनादिनी ॥ ७८६ ॥
इति मुरली ।

करण्यासाठी हे काही राग मी सांगितले आहेत. हे जाणकारांनो, या मार्गाने दुसरे (राग) योग्यपणे जाणून घ्या. (७७९ ते ७८२–)

वंशप्रकरण समाप्त.

बांबूपासून उत्पन्न झालेला पाव (म्हणजेच पावा) नवांगुळ वंशाप्रमाणे (म्हणजे नाथेंद्र वंशाप्रमाणे) असतो. (७८२) बांबूच्या पानांनी लपटलेला असा तो लोकरीतीप्रमाणे वाजविला जातो.

हे पाव्याचे लक्षण होय.

पाविका बांबूची असून बारा अंगुळे लांबीची करावी. (७८३) तिची जाडी अंगठ्या-एवढी असून मध्ये आपल्या इतक्या लांबीचे करंगळीच्या टोकाएवढे भोक ती धारण करते. लोकानुसार हिचे (७८४) एक फुंकण्याचे भोक असते व पाच भोके स्वरसिद्धीसाठी असतात. नाग, यक्ष यांचा आवेश उत्पन्न करणारे हिचे वादन विविध प्रकारचे असते. (७८५)

हे पाविकेचे लक्षण होय.

दोन हातांपेक्षा (थोडे) अधिक (लांबीचे) माप असलेली, मुखरंध्राने युक्त व स्वरांची चार भोके असलेली मुरली सुंदर नादयुक्त असते. (७८६)

ही मुरली होय.

---

७०. सुधाकरटीकेत पावा 'नऊ अंगुळे प्रमाणाचा' असे स्पष्टीकरण दिले आहे.

शृङ्गजा दारवी वा स्यात्काहलाकृतिधारिणी ।
अष्टाविंशत्यङ्गुला च दैर्घ्ये मधुकरी शुभा ॥ ७८७ ॥
मुखरन्ध्रं च तस्याः स्यात्तुवरीबीजसंनिभम् ।
मुखरन्ध्रादङ्गुलानि त्यक्त्वा चत्वारि वंशवत् ॥ ७८८ ॥
विधाय सप्त रन्ध्राणि कुर्वीत विवरान्तरम् ।
तेषां च मुखरन्ध्रस्य मध्येऽधोभागसंस्थितम् ॥ ७८९ ॥
मधुरध्वानसिद्ध्यै तन्मुखरन्ध्रे तु ताम्रजा ।
निधातव्या यवस्थूला नलिका चतुरङ्गुला ॥ ७९० ॥
तदूर्ध्वं चक्रिका स्थाप्या दन्तजा शुक्तिजाथवा ।
रन्ध्रमध्ये काशमयीं यद्वा देवनलोद्भवाम् ॥ ७९१ ॥
शुक्तिकां किंचिदुन्निद्रमालतीकलिकाकृतिम् ।
मृदुलां क्षीरपाकेन क्षिप्त्वा मधुकरीं ततः ॥ ७९२ ॥
वंशवद्वादयेद्रन्ध्रं पिदधीताप्यधस्तनम् ।
वामाङ्गुष्ठाग्रभागेनेत्युक्तं निःशङ्कसूरिणा ॥ ७९३ ॥

इति मधुकरीलक्षणम् ।

ताम्रजा राजती यद्वा काञ्चनी सुषिरान्तरा ।
धत्तूरकुसुमाकारवदनेन विराजिता ॥ ७९४ ॥

काहलेचा आकार धारण करणारी शुभ अशी मधुकरी शिंग किंवा लाकूड यापासून बनवलेली असते. तिची लांबी अट्ठावीस अंगुळे असते. (७८७)

तिचे मुखरंध्र तुरीच्या दाण्यासारखे असते. वंशाप्रमाणेच मुखरंध्रापासून चार अंगुळे सोडून (७८८) सात भोके ठेवून, त्यांच्या व मुखरंध्राच्या मध्ये खालच्या बाजूस असलेले दुसरे छिद्र ठेवावे. (७८९) तिच्या मुखरंध्रात, मधुर नाद मिळण्यासाठी यवाएवढी जाड व चार अंगुळे प्रमाणाची तांब्याची नळी ठेवावी. (७९०)

तिच्यावर हस्तिदंताची किंवा शिंपल्याची चकती ठेवावी. भोकामध्ये, काश गवताची किंवा देवनळापासून तयार केलेली (७९१) थोड्या उमललेल्या मालतीच्या कळीच्या आकाराची, दुधात शिजवून मऊ झालेली शुक्तिका घालून मग मधुकरी (७९२) वंशाप्रमाणे वाजवावी. खालचे भोकही डाव्या अंगठ्याच्या टोकाने झाकावे असे निःशङ्कसूरीने सांगितले आहे. (७९३)

हे मधुकरीचे लक्षण होय.

तांबे, रुपे किंवा सोने यापासून बनवलेली, मध्ये भोक (म्हणजे पोकळ) असलेली, धोतऱ्याच्या फुलाच्या आकाराच्या तोंडाने शोभिवंत असणारी (७९४) (व) तीन हात

हस्तत्रयमिता दैर्घ्ये काहला वाद्यते जनैः ।
हाहूवर्णवती वीरबिरुदोच्चारकारिणी ॥ ७९५ ॥

इति काहलालक्षणम् ।

हस्तद्वयकृता या सा सैव तुण्डकिनी मता ।
तुरुतुर्यपि सा लोके तित्तिरी च निगद्यते ॥ ७९६ ॥
यमलं तुण्डकिन्योश्च वाद्यं वाद्यविदो विदुः ।

इति तुण्डकिनीलक्षणम् ।

तुण्डकिन्येव चुक्का स्यादैर्घ्ये हस्तचतुष्टया ॥ ७९७ ॥

इति चुक्कालक्षणम् ।

करेणुवदनाकारवदनं दोषवर्जितम् ।
शृङ्गं यन्माहिषं श्लक्ष्णं स्निग्धं सुघटितं कृतम् ॥ ७९८ ॥
शृङ्गस्यानडुहस्याथ धत्तूरकुसुमाकृति ।
खण्डमष्टाङ्गुलं न्यस्य मूलेऽस्य ध्वनिवृद्धये ॥ ७९९ ॥
अग्रं द्वित्राङ्गुलं तस्य च्छित्वा फूत्काररन्ध्रकम् ।
विधाय तुथुकारेण वादयेद्विविधध्वनिम् ॥ ८०० ॥

लांबीची काहला लोकांकडून वाजवली जाते. ती 'हा हू' या अक्षरांसारख्या (ध्वनींनी) युक्त व वीरांच्या बिरुदांचा आवाज उत्पन्न करणारी (अशी असते). (७९५)

हे काहलेचे लक्षण होय.

तीच दोन हात (लांबीची) केली असता तुण्डकिनी मानली आहे. लोकात ती तुरुतुरी व तित्तिरी म्हटली जाते. (७९६) दोन तुण्डकिनींनी जोडीने वादन (केले जाते) असे वाद्यजाणकार जाणतात. (७९७--)

हे तुण्डकिनीचे लक्षण होय.

चार हात लांबीची तुण्डकिनीच चुक्का होय. (७९७)

हे चुक्केचे लक्षण होय.

हत्तीच्या सोंडेप्रमाणे तोंड असणारे, निर्दोष असे जे गुळगुळीत व चकचकीत आणि चांगले घडवलेले रेड्याचे शिंग (असते) (७९८) त्याच्या मूळभागात बैलाच्या शिंगाचा, धोतऱ्याच्या फुलाच्या आकाराचा आठ अंगुळांचा तुकडा, नाद वाढण्यासाठी ठेवून, (७९९) त्याचे टोक दोन किंवा तीन अंगुळे छाटून फुंकण्याचे भोक योजून, तु थु (या सारखे ध्वनी) उत्पन्न करून विविध नाद वाजवावे. (८००) गवळ्यांच्या खेळांत

एतद्वै ध्वानगम्भीरं वाद्यं गोपालकेलिषु ।
इति शृङ्गलक्षणम् ।
निर्दोषस्योत्खातनाभेः शङ्खस्यैकादशाङ्गुलम् ॥ ८०१ ॥
शिखरं निर्मितं धातुसिक्थकाभ्यां मनोहरम् ।
मूलतश्चाग्रपर्यन्तं ह्रस्वमानाकृति क्रमात् ॥ ८०२ ॥
रन्ध्रमर्धाङ्गुलमितं शिखरस्य मुखे भवेत् ।
अन्तस्तु माषमात्रं स्याच्छङ्खमेवंविधं सुधीः ॥ ८०३ ॥
धृत्वा कर्कटहस्तेन[७१] भूरिश्वासभृतोदरम् ।
हुंधुंथो दिगिदित्येतद्वर्णोद्बोधेन वादयेत् ॥ ८०४ ॥
इति शङ्खलक्षणम् ।
इति सुषिरवाद्यलक्षणम् ।
मार्गदेशीगतत्वेन पटहो द्विविधो भवेत् ।
मार्गस्थपटहस्यात्र लक्षणं तावदुच्यते ॥ ८०५ ॥

नादगंभीर असे हे (शिंगाचे) वादन (केले जाते). (८०१—)

हे शिंगाचे लक्षण होय.

ज्याची नाभि (म्हणजे आतला भाग) पोकळ केलेला आहे अशा निर्दोष शंखाचे अकरा अंगुळे मापाचे (८०१) शिखर, धातु व मेण यांनी मनोहर असे निर्माण केलेले (असावे). ते मुळापासून टोकापर्यंत क्रमाने कमी (कमी) आकाराचे (म्हणजे निमुळते होत जाणारे) (असे योजावे). (८०२)

शिखराच्या तोंडात अर्धे अंगुळ प्रमाणाचे भोक असावे. त्याचा मध्य उडदाच्या प्रमाणाचा असावा. अशा प्रकारचा शंख जाणकाराने (८०३) कर्कट हाताने धरून, पुष्कळ श्वासाने त्याची पोकळी भरून टाकून, 'हुं धुं थो दिगित्' या वर्णांच्या नादोच्चाराने वाजवावा. (८०४)

हे शंखाचे लक्षण होय.

सुषिरवाद्यांचे लक्षण समाप्त.

मार्ग व देशी या संबंधामुळे पटह दोन प्रकारचा असतो. येथे प्रथम मार्गविषयक पटहाचे लक्षण सांगतो. (८०५) त्याची लांबी अडीच हात व घेर साठ अंगुळांचा असतो.

---

७१. कर्कट या हस्तात, दोन्ही हातांची बोटे एकमेकांच्या अंतरांमधून बाहेर येऊन आतल्या व बाहेरच्या बाजूला दिसतात.

सार्धहस्तद्वयं तस्य दैर्घ्यं स्यात्परिधिः पुनः ।
षट्त्यङ्गुलो मध्यदेशः पृथुलो दक्षिणं मुखम् ॥ ८०६ ॥
कर्तव्यं संमितं सार्धैरेकादशभिरङ्गुलैः ।
वामं तु दशभिः सार्धैः संमितं दक्षिणे मुखे ॥ ८०७ ॥
आयसं वलयं कार्यं वामे वल्लीसमुद्भवम् ।
षाण्मासिको मृतो वत्सो यस्तस्यादाय पारिकाम् ॥ ८०८ ॥
तयावगुण्ठ्य वलयं वल्लीजं वामवक्त्रगम् ।
सप्तरन्ध्रान्वितं कृत्वा सुदृढैः सूक्ष्मदोरकैः ॥ ८०९ ॥
निक्षिप्तैस्तेषु रन्ध्रेषु बन्धव्याः कलशाः श्लथम् ।
ते हेमादिमयाः सप्त दैर्घ्येण चतुरङ्गुलाः ॥ ८१० ॥
त्यक्त्वाङ्गुलानि चत्वारि वामे स्याल्लोहपत्रिकाम् ।
अङ्गुलत्रयविस्तारां पटहे वेष्टयेद् दृढम् ॥ ८११ ॥
बाह्यकायस्य यच्चर्म पशोस्तेन घनेन च ।
कवलाख्येन बध्नीयात्पिहितं वदनद्वयम् ॥ ८१२ ॥
दक्षिणास्यस्य कवलं परितः कृतरन्ध्रकम् ।
रन्ध्रक्षिप्तैर्गुणैर्गाढमाकृष्येतरवक्त्रगैः ॥ ८१३ ॥
वलये तान्गुणान्सम्यग्बध्नीयाद्दार्ढ्यसिद्धये ।
वामास्यकवलान्तःस्थसप्तरन्ध्रनिवेशितैः ॥ ८१४ ॥

त्याचा मधला भाग रुंद (असतो). (त्याचे) उजवे तोंड (८०६) साडे अकरा अंगुलांच्या प्रमाणाचे व डावे तोंड साडेदहा अंगुलांच्या प्रमाणाचे करावे. उजव्या तोंडावर (८०७) लोखंडी गोल कडे व डाव्या तोंडावर वेलीपासून बनवलेले (गोल कडे) बसवावे. सहा महिन्याचे मेलेले जे वासरू त्याची पारिका (आतले कातडे ?) घेऊन (८०८) तिने वेलीपासून बनवलेले डाव्या तोंडावरचे कडे वेढून, त्याला सात भोके पाडून, त्या (भोकांत) घातलेल्या बळकट बारीक दोऱ्यांनी कळसे शिथिल बांधावे. ते सात (कळसे) सोने इत्यादी धातूचे व चार अंगुळे लांबीचे (असावे). (८०९,८१०). डाव्या (तोंडाच्या बाजूला) चार अंगुळे सोडून पटहावर तीन अंगुळे रुंदीची लोखंडी पट्टी घट्टपणे वेढून बसवावी. (८११) पशूच्या बाह्य शरीराचे जे जाड कवळ नावाचे कातडे असते त्याने, झाकलेली (?) दोन्ही तोंडे बांधावी. (८१२) भोवती सात भोके पाडलेले उजव्या तोंडाचे कवळ, भोकांत घातलेल्या दोऱ्यांनी ताणून ओढून घेऊन, दुसऱ्या तोंडाकडील (दोऱ्यांनी) (८१३) त्या दोऱ्या कड्यात बळकटपणा येण्यासाठी चांगल्या बांधाव्या. डाव्या तोंडाच्या कवळातील सात भोकांत घातलेल्या (८१४) दोऱ्यांनी कळसे वेढून, ते आत घालून, बळकट लोखंडी

गुणैरावेष्टय कलशानायसैर्वलयैर्दृढैः ।
अन्तः क्षिप्त्वा समाकृष्टैर्वलये गाढतां नयेत् ॥ ८१५ ॥
कलशेभ्यो बहिर्वामवलयान्ते च बध्यते ।
वेष्टनाय कटेः कच्छेत्युक्तोऽयं स्कन्ददैवतः ॥ ८१६ ॥
श्रीयज्ञपुरवर्येण पटहो मार्गसंभवः ।
इति मार्गपटहः
देशीस्थोऽप्येवमेव स्यादैर्घ्येऽसौ सार्धहस्तकः ॥ ८१७॥
सप्ताङ्गुलं दक्षिणास्यमन्यत्सार्धषडङ्गुलम् ।
आन्तरं जाठरं वाङ्क्ष्णं पशोर्गदितमुद्दली ॥ ८१८ ॥
तया तु स्वेच्छया वक्त्रं वाममस्य निबध्यते ।
विशेषोऽयं भवेदस्मिन्नुभौ खादिरदारुजौ ॥ ८१९ ॥
त्रिधोक्तोऽयं द्वयोरन्यैरुत्तमो मध्यमोऽधमः ।
उत्तमः प्रोक्तमानः स्याद् द्वादशांशोनितः पुनः ॥ ८२० ॥
मध्यमः षष्ठभागेन विहीनस्त्वधमो मतः ।
इति देशीपटहः

कड्यांनी ताणलेल्या अशा त्यांनी, कडयावर घट्ट करावे. (८१५) कळशांच्या बाहेरच्या बाजूला, डाव्या कड्याच्या शेवटी, कमरेला वेढण्यासाठी कच्छा बांधली जाते. असा हा स्कंद ही देवता असलेला (८१६) मार्गात उत्पन्न झालेला पटह श्रीयज्ञपुरश्रेष्ठाने सांगितला आहे. (८१७–)

हा मार्गपटह होय.

देशी (पटह) ही अशाच तऱ्हेचा होय. त्याची लांबी दीड हात (८१७) उजवे तोंड सात अंगुळे (मापाचे) व दुसरे (म्हणजे डावे) साडेसहा अंगुळे (मापाचे असते). जनावराच्या पोटाच्या आतील मांडीच्या सांध्याच्या (जवळचे) कातडे उद्दली म्हटले जाते. (८१८) तिने स्वतःच्या इच्छेनुसार या (देशी पटहाचे) डावे तोंड बांधले जाते. यात विशेष हा होय. हे दोन्ही (पटह) खैराच्या लाकडाचे केलेले असतात. (८१९) इतरांनी दोन्हींच्या बाबतींत हा उत्तम, मध्यम व अधम असा तीन प्रकारचा सांगितला आहे. उत्तम हा (वर) सांगितलेल्या प्रमाणाचा असतो. एकबारांश भागाने कमी असणारा (८२०) मध्यम असून सहाव्या भागाने कमी असणारा तो अधम होय.

हा देशी पटह होय.

अथाद्यवर्णाः —
ङवर्जितः कवर्गश्च टतवर्गौ रहावपि ॥ ८२१ ॥
इति षोडश वर्णाः स्युरुभयोः पाटसंज्ञकाः ।
संयोगविप्रयोगाभ्यां क्रमव्युत्क्रमयोगतः ॥ ८२२ ॥
सस्वरत्वास्वरत्वाभ्यां पाटास्ते स्युरनेकधा ।
उद्दल्यामेव झेंकारो देंकारः कवलेऽधिकः ॥ ८२३ ॥
देशीपटहमेवाहुरिममड्डावजं जनाः ।
अष्टादशाङ्गुलः किंचिन्नताग्रो मध्यतः पृथुः ॥ ८२४ ॥
कोणः कार्यो मूलदेशे मदनाम्बरवेष्टितः ।
पद्मासनोपविष्टेन गोष्ठ्यामूरुद्वयोपरि ॥ ८२५ ॥

आता आद्य वर्ण—

ङ सोडून कवर्ग, टवर्ग व तवर्ग आणि र व ह (८२१) असे हे दोन्ही (प्रकारच्या पटहांच्या) मधून (निघणारे) पाट नांवाचे सोळा वर्ण होत. (वर्णांचा) संयोग (म्हणजे संयुक्त प्रयोग) व वेगवेगळेपणाने प्रयोग, क्रम व उलटक्रम यांची योजना (८२२) स्वरांनी युक्त असणे किंवा स्वररहित असणे यांमुळे ते पाट अनेक प्रकारचे असतात. झेंकार फक्त उद्दलीवर आणि कवळावर देंकार हे अधिक वर्ण (वादनात उत्पन्न होतात.) (८२३)

या देशी पटहालाच लोक अड्डावज म्हणतात. (वाजवण्यासाठी) अठरा अंगुळे लांबीचा, टोक थोडे वाकलेले असणारा, मध्ये रुंद (८२४) व मुळाकडचा भाग मेणयुक्त कपड्याने गुंडाळलेला असा कोण करावा.

सभेमध्ये पद्मासन घालून बसलेल्या (वादका–) ने दोन्ही मांड्यांवर (८२५)

क० क ख ग घ ट ठ ड ढ ण त थ द ध न र आणि ह असे हे सोळा वर्ण होत. दोन्ही म्हणजे मार्ग व देशी या पटहांच्या बाबतीत (उत्पन्न होणारे हे वर्ण) पटहपाट म्हटले जातात. 'अन्तररहित व्यंजने म्हणजे संयोग' असे ज्याचे लक्षण (पाणिनीने) दिले आहे (पा. १–१–७) तो संयोग (म्हणजेच जोडाक्षर) होय. विप्रयोग म्हणजे त्याउलट (अर्थात वर्णांचे प्रत्येकी वेगळे स्वरूप योजणे). वर्णांचे क्रमाने उच्चारण क्रम होय त्याउलट उच्चारण व्युत्क्रम होय. 'स्वरांनी युक्त असणे' यातील स्वर षड्ज इत्यादी विवक्षित आहेत, अकार इत्यादी नव्हेत. कारण त्यांचे ग्रहण विप्रयोग या शब्दानेच होते. षड्ज इत्यादी स्वर घेण्यातही स्वरसहितत्व याने रागसहितत्वच विवक्षित आहे. नाहीतर स्वररहितत्वही निरर्थक ठरेल कारण त्याने ज्याचे वैशिष्ट्ययुक्त ज्ञान व्हायचे तेच असणार नाही. स्वराचे स्थायित्व या शब्दाचा संभव षड्ज इत्यादीपैकी एकादा स्वर नसता, रहात नाही. म्हणून येथे स्वर हा शब्द राग याचा निदर्शक जाणावा. या सांगितलेल्या विशेषणांच्यामुळे ते पाट अनेक प्रकारे भिन्न होतात.

संस्थाप्य मार्गपटहो वाद्यो वर्णोद्भवे पटुः ।
नाटके त्वर्धवक्त्रोऽयं वाद्यते घटवाद्यवत् ॥ ८२६ ॥
कोणेन पाणिना वास्य वादनं सूरयो विदुः ।

इति पटहलक्षणम्

ये पाटाः पटहे प्रोक्तास्तेषां विविधगुम्फनात् ॥ ८२७ ॥
हस्तोद्भवाः पाटभेदा हस्तपाटाः प्रकीर्तिताः ।
ते चानन्ता न शक्यन्ते प्रत्येकं वेदितुं जनैः ॥ ८२८ ॥
प्रदर्शनार्थमेतेषु कतिचित्प्रतिपादये ।
[७२] सद्योजातान्नागबन्धः स्वस्तिको वामदेवतः ॥ ८२९ ॥

मार्ग पटह ठेवून, वर्ण उत्पन्न होण्यात निष्णात असणारा (असा तो) वाजवावा. नाटकामध्ये मात्र अर्ध्या तोंडाचा असा हा घटवाद्याप्रमाणे वाजवला जातो. (८२६) विद्वान लोक याचे वादन कोणाने किंवा हाताने जाणतात. (८२७–)

पटहाचे लक्षण समाप्त.

जे पाट पटहाच्या बाबतीत सांगितले आहेत त्यांच्या विविध गुंफणीने (८२७) हातापासून निर्माण झालेले पाटभेद हस्तपाट म्हटले जातात. ते अनंत आहेत. (म्हणून त्यांतल्या) प्रत्येकाची जाणकारी लोकांना होणे शक्य नाही. (८२८) त्यांतील काहींचे उदाहरणादाखल प्रतिपादन करतो. (ईश्वराच्या) सद्योजात (या मुखा–) पासून नागबंध, वामदेवापासून स्वस्तिक, (८२९) अघोरापासून अलग्न (व) तत्पुरुषापासून शुद्धि (हा हस्तपाट)

उद्दली म्हणजे देशीपटहाच्या डाव्या तोंडावर योजलेले विशिष्ट कातडे होय. त्यावर वाजवल्याने झेंकार हाच अधिक उत्पन्न होतो. म्हणजे पूर्वी सांगितलेल्या सोळा वर्णांपेक्षा अधिक उत्पन्न होतो. कवळ म्हणजे मार्गपटहाच्या उजव्या तोंडावर योजलेले विशिष्ट कातडे होय. त्यावर वाजवल्याने देंकार हा पूर्वीप्रमाणेच अधिक उत्पन्न होतो. वादकाने पद्मासन घालून (पटह वाजविण्यासाठी बसायचे असते). (८२१ ते ८२६, ८२७–)

---

७२. देवीपुराणात शिवाची पाच मुखे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत– 'पश्चिम मुखात सद्योजात, उत्तर मुखात वामदेव, पूर्व मुखात तत्पुरुष आणि दक्षिण मुखात अघोर जाणावे. मध्यभागी ईशान हे पाचवे सर्वांच्या वर होय. ही पाच मुखे पापनाशक व ग्रहनाशक होत. सद्योजात शुक्ल वर्णाचे, वामदेव पीत (म्हणजे पिवळ्या) वर्णाचे, तत्पुरुष रक्त वर्णाचे, अघोर कृष्ण वर्णाचे (असून) यातले पाचवे ईशान सर्व वर्णांनी युक्त होय. (शब्दकल्पद्रुम, तृतीयभाग पृ. १३)

अलग्नोऽभूदघोरात्तु शुद्धिस्तत्पुरुषाभिधात् ।
आसीदीशानवक्त्रात्तु समस्खलितसंज्ञकः ॥ ८३० ॥
जाताः पञ्चेति पञ्चभ्यो मुखेभ्यः पार्वतीपतेः ।
अतस्ते सर्वपाटानां पाटा मुख्यतमा मताः ॥ ८३१ ॥
क्रमात्तद्देवता ब्रह्मविष्णुशर्वरवीन्दवः ।
नागबन्धश्च पवनस्तथैकैकसराभिधौ ॥ ८३२ ॥
ततो दुःसरसंचारविक्षेपा नागबन्धजाः ।
सप्तेत्यथ स्वस्तिकजाः स्वस्तिको बलिकोहलः ॥ ८३३ ॥
फुल्लपूर्वश्च विक्षेपः कुण्डलीपूर्वकश्च सः ।
संचारविखली खण्डनागबन्धश्च पूरकः ॥ ८३४ ॥
भेदाः सप्तेत्यलग्नस्य त्वेते सप्त प्रकीर्तिताः ।
अलग्नोत्सारविश्रामा विषमाद्या खली सरी ॥ ८३५ ॥

उत्पन्न झाला; आणि ईशान या मुखापासून समस्खलित नांवाचा (हस्तपाट) उत्पन्न झाला. (८३०)

पार्वतीपति (श्रीशंकरा)च्या पाच तोंडांपासून हे पाच (हस्तपाट) उत्पन्न झाले आहेत, म्हणून ते सर्व पाटांत मुख्यतम मानले आहेत. (८३१) त्यांच्या देवता क्रमाने ब्रह्मा, विष्णु, शिव, सूर्य व चंद्र (या होत).

नागबंध, पवन, तसेच एक व एकसरनावाचा, (८३२) मग दुःसर, संचार आणि विक्षेप हे नागबंधापासून उत्पन्न झालेले सात (भेद होत). मग स्वस्तिकापासून उत्पन्न झालेले स्वस्तिक, बलिकोहल, (८३३) फुल्लविक्षेप, कुंडलीविक्षेप, संचारविखली, खंड-नागबंध व पूरक (८३४) हे सात भेद होत. अलग्नाचे सात भेद सांगितले आहेत ते हे– अलग्न, उत्सार, विश्राम, विषमखली, सरी, (८३५) स्फुरी व स्फुरणक. शुद्धीच्या (भेदांतील)

क० आता पटहापासून उत्पन्न होणारे पाट (त्यांची) लक्षणे देऊन सांगत आहे. यथा-संभव ळँकार व दँकार यांच्यासह क इत्यादी सोळा वर्णांच्या, संयोग इत्यादी प्रकारच्या विविध गुंफणीमुळे हातापासून उत्पन्न होत असल्याने (यांना हस्तपाट म्हटले जाते). 'हातापासून उत्पन्न होणारे' हे हेतुगर्भ विशेषण आहे. 'हातापासून उत्पन्न होण्यामुळे' असा कारणाचा निर्देश जाणावा. कोणाचा वापरही हाताच्या वापराच्या अधीन असल्याने त्या (कोणा)–पासून उत्पन्न होणे याचे स्वरूप हातापासून उत्पन्न होणे हेच जाणावे. तंतुवाद्यात हाताचा वापर असतानाही तेथे बोटांचा वापर मुख्य असल्याने हातापासून उत्पन्न होणे असा निर्देश नसतो. (८२८–८२९) त्यांतील नागबंध इत्यादी मुखपाटांची उत्पत्ति दाखवीत आहे. नागबंध इत्यादी पाचांच्या नावांच्या सारखेपणावरून नागबंध इत्यादी अवांतर भेद जाणावे. 'एकैकसराभिधौ' म्हणजे 'एक व एकसर या नावांचे' हस्तपाटांचेच दुसरे नाव तलपाट हे होय. (८३० ते ८३८, ८३९–)

स्फुरी स्फुरणकश्चेति शुद्धेः स्याच्छुद्धिरादिमः ।
स्वरस्फुरणकोत्फुल्लवलितावघटास्ततः ॥ ८३६ ॥
तकारो माणिक्यवच्छी भेदाः सप्तेति संमताः ।
समस्खलितकस्याद्यः समस्खलितसंज्ञकः ॥ ८३७ ॥
विकटः सदृशः पाटखली चाडुखली ततः ।
अनुच्छल्लस्तथा खुत्तो भेदाः सप्तेति सन्त्यमी ॥ ८३८ ॥
पञ्चत्रिंशद्धस्तपाटास्तलपाटाश्च कीर्तिताः ।
कोणाहतश्च संभ्रान्तो विषमार्धसमाविति ॥ ८३९ ॥
चत्वारो हस्तपाटाः स्युर्नन्दिकेश्वरभाषिताः ।
उत्फुल्लः खलकस्तद्वत्पाण्यन्तरनिकुट्टकः ॥ ८४० ॥
दण्डहस्तः पिण्डहस्तो युगहस्तोर्ध्वहस्तकौ ।
स्थूलहस्तोऽर्धार्धपाणिः पार्श्वपाण्यर्धपाण्यपि ॥ ८४१ ॥
कर्तरीसमकर्तर्यौ ततो विषमकर्तरी ।
समपाणिश्च विषमपाणिः स्यात्पाणिहस्तकः ॥ ८४२ ॥

पहिला शुद्धि हा होय; मग स्वरस्फुरण, उत्फुल्ल, वलित, अवघट (८३६), तकार व माणिक्य-वछी (हे होत); असे हे (शुद्धीचे) सात भेद मानले आहेत. समस्खलिताचा पहिला भेद समस्खलित नांवाचा (होय). (८३७) मग विकट, सदृश, पाटखली, अडुखली, अनुच्छल्ल तसेच खुत्त (हे होत); हे सात भेद (समस्खलिताचे) होत. (८३८) हे पस्तीस हस्तपाट तलपाट म्हटले जातात. (८३९–)

कोणाहत व संभ्रांत, (आणि) विषम व अर्धसम हे (८३९) नंदिकेश्वराने सांगितलेले चार हस्तपाट होत. उत्फुल्ल, खलक, तसेच पाण्यंतरनिकुट्टक, (८४०) दंडहस्त, पिंडहस्त, युगहस्त, ऊर्ध्वहस्तक, स्थूलहस्त, अर्धार्धपाणि, पार्श्वपाणि व अर्धपाणि, (८४१) कर्तरी, समकर्तरी, मग विषमकर्तरी, समपाणि व विषमपाणि, पाणिहस्तक, (८४२)

क० दुसऱ्या मताप्रमाणे पटहाच्या बाबतीतले चार पाट सांगत आहे. (नंतर) उत्फुल्ल इत्यादी एकवीस हस्तपाट पटह इत्यादी वाद्यांना समान असणारे असे सांगत आहे. पटह इत्यादींना समान असूनही प्रायशः हुडुक्का या वाद्याच्या बाबतीत असणारे उल्लोल इत्यादी सोळा पाट देत आहे. (तसेच) अपाट हे दुसरे नाव असणारे आठ विषमपाट सांगत आहे नंतर संच इत्यादी इतर चार पाट देत आहे. सर्व मिळून हस्तपाटांची एकूण संख्या अठ्ठ्याऐंशी सांगत आहे. (८३९ ते ८४९)

नागबन्धोऽप्यवघटः स्वस्तिकश्च समग्रहः ।
इत्येकविंशतिर्हस्तपाटाः स्युः पटहादिषु ॥ ८४३ ॥
उल्लोलः पाण्यन्तरश्च निर्घोषः खण्डकर्तरी ।
दण्डहस्तः समनखो बिन्दुर्यमलहस्तकः ॥ ८४४ ॥
रेचितो भ्रमरो विद्युद्विलासोऽप्यर्धकर्तरी ।
अलग्नाख्यस्ततो रेफः समपाणिरतः परम् ॥ ८४५ ॥
परिवृत्तः षोडशेति वाद्येषु पटहादिषु ।
एतान्प्रायो हुडुक्कायां कुर्वते वाद्यवेदिनः ॥ ८४६ ॥
अष्टौ विषमपाटाः स्युरपाटाख्यान् ब्रुवेऽधुना ।
तलप्रहारः प्रहरो वलितो गुरुगुञ्जितः ॥ ८४७ ॥
अर्धसञ्चस्त्रिसञ्चश्च विषमोऽभ्यस्त इत्यमी ।
स्यातामलगपाटौ द्वौ सञ्चविच्छुरिताभिधौ ॥ ८४८ ॥
भ्रमरः कुञ्चितश्चेति चित्रपाटावुभौ मतौ ।
अष्टाशीतिरिमे हस्तपाटा निःशङ्ककीर्तिताः ॥ ८४९ ॥
शिववक्त्रोत्थपाटानां स्वरूपं प्रतिपादये ।
तेषामुत्पादकान्पाणीँल्लोकतो लक्षयेत्सुधीः ॥ ८५० ॥

नागबंध, अवघट, स्वस्तिक आणि समग्रह, असे हे पटह इत्यादीमध्ये एकवीस हस्तपाट होत. (८४३)

उल्लोल, पाण्यंतर, निर्घोष, खंडकर्तरी, दंडहस्त, समनख, बिंदु, यमलहस्तक, (८४४) रेचित, भ्रमर, विद्युद्विलास, अर्धकर्तरी, अलग्ननावाचा, मग रेफ, समपाणि, नंतर (८४५) परिवृत्त, असे हे पटह इत्यादी वाद्यांत सोळा (हस्तपाट होत). वाद्यजाणकार हे बहुशः हुडुक्केमध्ये योजतात. (८४६) अपाट नावाचे आठ विषमपाट होत. (ते) आता सांगतो- तलप्रहार, प्रहर, वलित, गुरुगुञ्जित, (८४७) अर्धसंच, त्रिसंच, विषम व अभ्यस्त असे हे होत. संच व विच्छुरित नावाचे दोन अलगपाट होत. (८४८) भ्रमर व कुंचित हे दोन चित्रपाट मानले आहेत. असे हे अठ्ठ्याऐंशी हस्तपाट निःशंकाने सांगितले आहेत. (८४९)

शंकराच्या तोंडांपासून उत्पन्न झालेल्या पाटांचे स्वरूप (आता) स्पष्ट करतो. त्यांना निर्माण करणारे पाणी (म्हणजे हात) जाणत्याने लोकांपासून निर्दिष्ट करावे. (८५०)

क० आता लोकात प्रसिद्ध असल्याप्रमाणे नागबंध इत्यादी पसतीस हस्तपाटांचे स्वरूप दाखवीत आहे. त्यांतील एकसर नावाच्या हस्तपाटात किटतत ही अक्षरे लिहून मग दोन हा आकडा लिहिला आहे. त्यावरून त्या वर्णाचे किटतट किटतट असे दोनदा उच्चारण समजावे. या प्रमाणे सर्व ठिकाणी पाटांची संख्या सोडून मध्ये योजलेल्या दोन इत्यादी संख्यावाचक आकड्यांनी त्या पूर्वीच्या अक्षरसमुदायाचे दोनदा उच्चारण इत्यादी जाणावे. (८५०)

तद्यथा– (१) टनगिन गिननगि, इति नागबन्धः ; (२) ननगिड गिडदगि, इति पवनः; (३) गिडगिड गिडदत्था, इत्येकः; (४) किटतत २, इत्येकसरः[७३]; (५) नखु नखु, इति दुःसरः; (६) खिरतकिट, इति संचारः; (७) थोंगि थोंथि, इति विक्षेपः ।

इति सद्योजातोद्भवाः सप्त हस्तपाटाः ।

(१) ततकिटकि, इति स्वस्तिकः ; (२) थों हंता, इति बलिकोहलः; (३) थोंगिन थोंगिन थोंगिन, इति फुल्लविक्षेपः ; (४) थों थों गों गों, इति कुण्डलीविक्षेपः ; (५) थोंगिणतत्ता, इति [७४]संचारविरवली; (६) किटथोंथों गिनखेंखें, इति खण्डनागबन्धः ; (७) टकु झेंझें, इति पूरकः ।

इति वामदेवोद्भवाः सप्त हस्तपाटाः ।

(१) नग गिडगिड दगिदा, [७५]इत्यलग्नः ; (२) दत्थरिकि दत्थरिकि,

ते (पाट) असे– टनगिन गिननगि हा नागबंध; (२) ननगिड गिडदगि हा पवन; (३) गिडगिड गिडदत्था हा एक; (४) किटतत किटतत हा एकसर; (५) नखु नखु हा दुःसर; (६) खिरतकिट हा संचार; (७) थोंगि थोंथि हा विक्षेप.

हे सद्योजातापासून उत्पन्न झालेले सात हस्तपाट होत.

(१) ततकिटकि हा स्वस्तिक होय; (२) थों हंता हा बलिकोहल होय; (३) थोंगिन थोंगिन थोंगिन हा फुल्लविक्षेप होय; (४) थोंथों गोंगों हा कुंडलीविक्षेप होय; (५) थोंगिणतत्ता हा संचारविखली होय; (६) किटथोंथों गिनखेंखें हा खंडनागबंध होय; (७) टकुझेंझें हा पूरक होय.

हे वामदेवापासून उत्पन्न झालेले सात हस्तपाट होत.

(१) नग गिडगिड दगिदा हा अलग्न होय; (२) दत्थरिकि दत्थरिकि हा उत्सार

---

७३. एकसराची अक्षरे अडयार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तीत किटतत अशी मूळ ग्रंथात दिली आहेत. कल्लिनाथाने आपल्या टीकेत किटतत असे प्रथम दिले आहे. पण दोनदा उच्चारण सांगताना किटतट असे म्हटले आहे. सुधाकरटीकेत किटतट २ असे दिले आहे. संगीतसारामृतात (पृ. १३५) किटतत असे स्वरूप मिळते.

७४. अडयार व आनंदाश्रम आवृत्तींत या पाटाचे स्वरूप देताना 'संचारविलिखी' असे नाव मिळते. पण नामनिर्देशात ते 'संचारविखली' असे दिले आहे. संगीतसारामृत (पृ. १३४) व संगीतसार (भा. २ पृ. ५०) यातही हेच नाव असल्याने 'संचारविखली' असा पाठ येथे घेतला आहे.

७५. अलग्न या हस्तपाटाची अक्षरे अडयार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तींत 'नग गिडगिड दगिदा' अशी मिळतात. सुधाकरटीकेत ती 'ततकिट दगिडदा' अशी दिली आहेत. संगीतदर्पण (पृ. ९८) व संगीतसार (भा. २ पृ ५०) यात ती 'नन गिडगिड दगिदा' अशी मिळतात. संगीतसारामृतात (पृ. १३६) ती अडयार आवृत्तीप्रमाणेच आहेत.

इत्युत्सारः ; (३) तकि धिकि तकि धिकि, इति विश्रामः; (४) टगु नगु टगुनगु, इति विषमखली, विषमस्खलितो वा; (५) खिरितु खिरितु, इति सरी; (६) खिरि खिरि, इति स्फुरी; (७) नरकित्थरिकि, इति स्फुरणः ।

इत्यघोरोद्भवाः सप्त हस्तपाटाः ।

(१) दरिगिड गिडदगिदा, इति शुद्धिः ; (२) टटकुटट, इति स्वरस्फुरणः ; (३) ननगिन खरिखरि, [७६]इत्युच्छल्लः ; (४) दखें दखें दखें खे, इति वलितः ; (५) थों गिनगि थों गिनगि, इत्यवघटः; (६) तत्ता, इति तकार; (७) धिधि इति माणिक्यवल्ली ।

इति तत्पुरुषोद्भवाः सप्त हस्तपाटाः ।

(१) तझें तझें झें, इति समस्खलितः समस्खली वा; (२) गिरिग्ड, गिरिग्ड, इति विकटः; (३) किणकिणकि, इति सदृशः, (४) धिधिकिटकि, इति खली स्खलितो वा; (५) दिगिनगि दिगिनगि, इत्यडुखली अडुस्खलितो वा; (६) धरकट धरकट, इत्यनुच्छल्लः; (७) दोंनकट दोंनकट, इति खुत्तः ।

इतीशानोद्भवाः सप्त हस्तपाटाः ।

होय; (३) तकि धिकि तकि धिकि हा विश्राम होय; (४) टगुनगु टगुनगु हा विषमखली किंवा विषम स्खलित होय; (५) खिरितु खिरितु हा सरी होय; (६) खिरि खिरि हा स्फुरी होय; (७) नरकित्थरिकि हा स्फुरण होय.

हे अघोरापासून उत्पन्न झालेले सात हस्तपाट होत.

(१) दरिगिड गिडदगिदा हा शुद्धि होय; (२) टटकुटट हा स्वरस्फुरण होय; (३) ननगिन खरिखरि हा उच्छल्ल होय; (४) दखें दखें दखें खे हा वलित होय; (५) थों गिनगि थों गिनगि हा अवघट होय; (६) तत्ता हा तकार होय; (७) धिधि हा माणिक्यवल्ली होय.

हे तत्पुरुषापासून उत्पन्न झालेले सात हस्तपाट होत.

(१) तझें तझें झें हा समस्खलित किंवा समस्खली होय;
गिरिग्ड गिरिग्ड हा विकट होय; (३) किणकिणकि हा सदृश होय; (४) धिधिकिटकि हा खली किंवा स्खलित होय; (५) दिगिनगि दिगिनगि हा अडुखली किंवा अडुस्खलित होय; (६) धरकट धरकट हा अनुच्छल्ल होय; (७) दोंनकट दोंनकट हा खुत्त होय.

हे ईशानापासून उत्पन्न झालेले सात हस्तपाट होत.

---

७६. या हस्तपाटाचे नाव नामनिर्देशात अडचार आवृत्तीत उत्फुल्ल असे दिले आहे. पण स्वरूप सांगताना ते ' उच्छल्ल ' असे दिले आहे. उच्छल्ल हे नाव आनंदाश्रम आवृत्तीत नामनिर्देशात व स्वरूप सांगतानाही मिळते. सुधाकरटीकेत उत्फुल्ल हे नाव आहे. संगीतसारामृतातं नामनिर्देशात उच्छल्ल (पृ. १३४) व स्वरूप सांगताना उत्फुल्ल (पृ. १३६) असे नाव मिळते.

इति सदाशिवपञ्चवक्त्रोद्भवाः पञ्चत्रिंशद्धस्तपाटाः ।

कनिष्ठाङ्गुष्ठसंयोगाच्छेषाङ्गुलिविवर्तनात् ।
कोणाहतो हस्तपाटः शार्ङ्गदेवोदितो यथा ॥ ८५१ ॥
खुंखुंधरि खुंखुंधरि करगिड करगिड ।

इति कोणाहतः (१)

सर्वाङ्गुल्यग्रघातश्च सर्वाङ्गुलिविवर्तनम् ।
यस्य निष्पादकं सोऽत्र संभ्रान्तः कथितो यथा ॥ ८५२ ॥
दरगिड दरगिड गिरिगिडद दाणकिट मटटकु ।

इति संभ्रान्तः (२)

चलनं मणिबन्धस्य पताकस्याथ कम्पनम् ।
पादकम्पोऽथ जनको यस्यासौ विषमो यथा ॥ ८५३)
दर्‍हें दर्‍हें खुंखुं दर्‍हें खुंखुं दर्‍हें ततकि ततकि ।

इति विषमः (३)

शंकराच्या पाच तोंडांपासून उत्पन्न झालेले पस्तीस हस्तपाट समाप्त.

करंगळी व अंगठा जोडल्याने (आणि) बाकीची बोटे वळवल्याने (उत्पन्न होणारा) कोणाहत हा हस्तपाट शार्ङ्गदेवाने सांगितला आहे. तो असा– (८५१)

खुंखुंधरि खुंखुंधरि करगिड करगिड.

हा कोणाहत होय. (१)

सर्व बोटांच्या टोकांनी आघात व सर्व बोटे वळवणे यांनी जो उत्पन्न होतो तो येथे संभ्रांत म्हटला आहे. तो असा– (८५२)

दरगिड दरगिड गिरिगिडद दाणकिट मटटकु.

हा संभ्रांत होय. (२)

मनगट हलवणे व पताक हस्त कंपित योजणे आणि पायाचा कंप हे ज्याला उत्पन्न करतात तो विषम होय. तो असा– (८५३)

दर्‍हें दर्‍हें खुंखुं दर्‍हें खुंखुं दर्‍हें ततकि ततकि.

हा विषम होय. (३)

क० नंदिकेश्वराने सांगितलेल्या पाटांचे स्वरूप, वाजवण्याचा प्रकार देऊन दाखवीत आहे. (८५१ ते ८५३, ८५४–)

पूर्वलक्ष्मविपर्यासाद्भवेदर्धसमो यथा।
ददगिद गिगिरिकिटदगि थों थों गिदथोंगिद।
इत्यर्धसमः (४)
इति नन्दिकेश्वरोक्ताश्चत्वारो हस्तपाटाः।
उत्फुल्लो नखराघातादलपद्मस्य जायते॥ ८५४॥
कन्हें कन्हें। इत्युत्फुल्लः (१)
यदा प्रसारिताङ्गुष्ठः शुकतुण्डस्य हन्यते।
विरलाङ्गुलिभिर्वाद्यं क्रमेण खलकस्तदा॥ ८५५॥
दांगिड गिडदगिदा। इति खलकः (२)
यस्तु दक्षिणहस्तस्य तर्जन्यङ्गुष्ठघाततः।
क्रमव्युत्क्रमघातात्तु वामहस्तेन रेफवत्॥ ८५६॥
जायते शार्ङ्गिणोक्तोऽसौ पाण्यन्तरनिकुट्टकः।

पूर्वीच्याचे (म्हणजे विषमाचे) लक्षण उलट योजल्याने अर्धसम (हा हस्तपाट) होतो. तो असा– (८५४–)

ददगिद गिगिरिकिटदगि थों थों गिदथोंगिद.

हा अर्धसम होय. (४)

नंदिकेश्वराने सांगितलेले चार हस्तपाट समाप्त.

अलपद्माच्या नखाच्या आघाताने उत्फुल्ल उत्पन्न होतो. (८५४)

कन्हें कन्हें.

हा उत्फुल्ल होय. (१)

जेव्हा अंगठा पसरलेला असता शुकतुंडाच्या विरल बोटांनी वाद्यावर क्रमाने प्रहार केला जातो तेव्हा (तो) खलक होय. (८५५)

दांगिड गिडदगिदा.

हा खलक होय. (२)

जो उजव्या हाताच्या पहिल्या बोटाच्या व अंगठ्याच्या आघाताने आणि रेफाप्रमाणे डाव्या हाताने क्रमाने व उलट क्रमाने केलेल्या आघाताने (८५६) उत्पन्न होतो तो शार्ङ्गदेवाने पाण्यंतरनिकुट्टक म्हटला आहे.

क० आता एकवीस हस्तपाट दाखवीत आहे– "व्यावर्तित नावाचे करण योजूनच ज्याची बोटे हाताच्या तळव्यावर स्थिर ठेवलेली व बाजूला जाणारी असतात तो अलपल्लव होय. तोच अलपद्म होय. याच्या बाबतीत बोटांच्या व्यावर्तित (करणाच्या) जागी काहींनी (परिवर्तित करण) सांगितले आहे; (अडचार आ. ७–१४४, १४५) असे अलपद्म– हस्ताचे लक्षण

दगिडदां खरिक्कदां खरिक्क खरिक्कदांदां खरिखरिदां गिडदां ।
इति पाण्यन्तरनिकुट्टकः (३)
ऊर्ध्वघातं पताकेन कृत्वैकमथ रेफतः ॥ ८५७ ॥
कृतौ यत्रोर्ध्वघातौ द्वौ दण्डहस्तो भवेदसौ ।
दातरिकिट दां खरिखरिदां । इति दण्डहस्तः (४)
क्रमाद्रेफोर्ध्वहस्ताभ्यां पिण्डहस्तः प्रजायते ॥ ८५८ ॥
थरिकटझें थरिकटझें । इति पिण्डहस्तः (५)
रेफात्मभ्यां कराभ्यां चेदूर्ध्वघातद्वयं पृथक् ।
क्रियते पाटनिष्पत्त्यै युगहस्तस्तदा भवेत् ॥ ८५९ ॥
द्रेंद्रें दांदां । इति युगहस्तः (६)
ऊर्ध्वहस्तो दक्षिणेन तलेनोद्गाढघातकः ।
दरगिड दांदां । उत्यूर्ध्वहस्तः (७)

दगिडदां खरिक्कदां खरिक्क खरिक्कदांदां खरिखरिदां गिडदां.
हा पाण्यंतरनिकुट्टक होय. (३)

पताक हस्ताने वरच्या भागावर एक आघात करून मग रेफाने (८५७) वरच्या भागावर ज्यात दोन आघात केले जातात तो दंडहस्त होय.

दातरिकिट दां खरिखरिदां.
हा दंडहस्त होय. (४)

रेफ व ऊर्ध्वहस्त क्रमाने योजल्याने पिंडहस्त उत्पन्न होतो. (८५८)

थरिकटझें थरिकटझें.
हा पिंडहस्त होय. (५)

रेफ स्वरूपाच्या दोन हातांनी, पाट उत्पन्न होण्यासाठी, जेव्हा वरच्या भागावर दोनदा वेगवेगळा आघात केला जातो तेव्हा (तो) युगहस्त होय. (८५९)

द्रेंद्रें दांदां.
हा युगहस्त होय. (६)

उजव्या हाताने तळव्याने तीव्र आघात केल्याने ऊर्ध्वहस्त (होय).

दरगिड दांदां.
हा ऊर्ध्वहस्त होय. (७)

ग्रंथकार (नर्तनाध्यायात) सांगणार आहे. त्याच्या नखाचा आघात इत्यादी व्यावृत्तिकरणाने केल्याने असा अर्थ घ्यायचा. पुढेही वादनाला उपयोगी म्हणून सांगितलेल्या हातांची लक्षणे नृत्ताध्यायातूनच जाणून घ्यावी. (८५४–८६०)

ऊर्ध्वघातद्वयं कृत्वा तलहस्तेन हन्यते ॥ ८६० ॥
यदा वाद्यपुटद्वन्द्वं स्थूलहस्तस्तदोदितः ।
खुंखुंद खुंखुंद । इति स्थूलहस्तः (८)
अर्धार्धपाणिरर्धाभ्यां करयोस्ताडनाद्भवेत् ॥ ८६१ ॥
खुदां खुदां । इत्यर्धार्धपाणिः (९)
वादनं नखराग्रेण पार्श्वपाणिरुदाहृतः ।
थरगिड दागिड दगिड दगिड । इति पार्श्वपाणिः (१०)
अर्धपाणिर्भवेदेककराग्रकृततादनात् ॥ ८६२ ॥
दगिड दागिड दरगिड दरगिड । इत्यर्धपाणिः (११)
प्रचालनाद्वामहस्ताङ्गुलीनां कर्तरी मता ।
टिरि टिरि टिरि किटथों दिगिदां तिरि टिरि
किटझेंझें तकिकिट । इति कर्तरी (१२)

जेव्हा वरच्या भागावर दोनदा आघात करून तलहस्ताने वाद्याच्या दोन्ही पुड्यांवर प्रहार केला जातो तेव्हा तो स्थूलहस्त म्हटला आहे.

खुंखुंद खुंखुंद.

हा स्थूलहस्त होय. (८)

हातांच्या अर्ध्या भागांनी प्रहार केल्याने अर्धार्धपाणि होतो. (८६०, ८६१)

खुदां खुदां.

हा अर्धार्धपाणि होय. (९)

नखाच्या टोकाने (केलेले) वादन पार्श्वपाणि म्हटला आहे.

थरगिड दागिड दगिड दगिड.

हा पार्श्वपाणि होय. (१०)

एका हाताच्या टोकाने केलेल्या प्रहाराने अर्धपाणि होतो. (८६२)

दगिड दगिड दरगिड दरगिड.

हा अर्धपाणि होय. (११)

डाव्या हाताच्या बोटांच्या प्रचालनाने (म्हणजे क्रमाने केलेल्या कंपयुक्त आघाताने) कर्तरी मानली आहे.

टिरि टिरि टिरि किटथों दिगिदां तिरि टिरि किटझेंझें तकिकिट.

हा कर्तरी (हस्तपाट) होय. (१२)

क० ' वाद्यपुटद्वन्द्व ' म्हणजे पटह इत्यादी वाद्यांच्या दोन्ही पुडचा अर्थात त्यांची डावे व उजवे ही दोन तोंडे. (८६१ ते ८६९, ८७०–)

कर्तरीभ्यां समं घातः कराभ्यां समकर्तरी ॥ ८६३ ॥
झिंनकिट कनकिट किटझेंथों दिगिद तिरिटि तिरिटिकि ।
इति समकर्तरी (१३)
क्रमेण ताडनाद् द्वाभ्यां भवेद्विषमकर्तरी ।
टिरि टिरि थों दिगिद टिरि टिरि किद ।
इति विषमकर्तरी (१४)
अङ्गुष्ठाङ्गुलिसंघातौ हस्तयोर्युगपद्यदा ॥ ८६४ ॥
पीडयेतां पुटद्वन्द्वं समपाणिस्तदा भवेत् ।
दां गिडगिड दांदां । इति समपाणिः (१५)
व्यत्ययाद्व्यापृतौ हस्तौ साङ्गुष्ठाङ्गुलिभिः क्रमात् ॥ ८६५ ॥
यस्मिन्विषमपाणिं तं ब्रूते शंकरवल्लभः ।
दांदां गिड गिड दांदां । इति विषमपाणिः (१६)
समपाणेस्तु विरलाङ्गुलित्वे पाणिहस्तकः ॥ ८६६ ॥

दोन्ही कर्तरी हातांनी एकाच वेळी (केलेला) आघात समकर्तरी (होय). (८६३)

झिंनकिट कनकिट किटझेंथों दिगिद तिरिटि तिरिटिकि.

हा समकर्तरी होय. (१३)

दोन्ही (कर्तरी हातांनी) क्रमाने प्रहार केल्याने विषमकर्तरी होतो.

टिरि टिरि थों दिगिद टिरि टिरि किद.

हा विषमकर्तरी होय. (१४)

दोन्ही हातांच्या जुळलेल्या अंगठा व बोटे यांनी जेव्हा दोन्ही पुड्यांवर एकाच वेळी दाबून वादन केले जाते तेव्हा (तो) समपाणि होय.

दां गिड गिड दांदां.

हा समपाणि होय. (१५)

ज्यामध्ये दोन्ही हातांचा वापर अंगठ्यासह बोटांनी क्रमाने (व) व्यत्ययाने (म्हणजे उजवा डाव्या बाजूला व डावा उजव्या बाजूला असा) होतो त्याला शंकरप्रिय (शार्ङ्गदेव) विषमपाणि म्हणतो.

दांदां गिड गिड दांदां.

हा विषमपाणि होय. (१६)

समपाणीची बोटे विरळ योजल्यास (तो) पाणिहस्तक होय. (८६४–८६६)

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/934
2
मंत्रालय

तरगिड दरगिड इति पाणिहस्तकः (१७)
नागबन्धो[७७] विपर्यासात्पुटयोः करघाततः ।
प्रत्येकं वा पुटद्वन्द्वे कराभ्यां ताडनादयम् ॥ ८६७ ॥
इति नागबन्धः (१८)
तलेन हत्वा प्रहरेत्साङ्गुष्ठाङ्गुलिभिः क्रमात् ।
पुटमेकैकपाणिश्चेद्भवेदवघटस्तदा ॥ ८६८ ॥
ततगिड गिड दगिटन गिनगिननगि । इत्यवघटः (१९)
पुटमेकं निहन्यातां स्वस्तिके स्वस्तिकौ करौ ।
तकिट तकिटतकि । इति स्वस्तिकः (२०)
समं करतलाभ्यां तु पुटघातात्समग्रहः ॥ ८६९ ॥
तले केचिदिह प्राहुरङ्गुष्ठाङ्गुलिवर्जिते ।

तरगिड दरगिड.

हा पाणिहस्तक होय. (१७)

उलट क्रमाने पुडयांवर हातांनी आघात केल्याने नागबंध (होतो). किंवा दोन्ही पुड्यांवर प्रत्येकी दोन्ही हातांनी आघात केल्याने हा (होतो). (८६७)

हा नागबंध होय. (१८)

तळ्याने आघात करून एकेक हाताने अंगठ्यासह बोटांनी क्रमाने पुडीवर प्रहार केला असता अवघट होतो. (८६८)

ततगिड गिड दगिटन गिनगिननगि.

हा अवघट होय. (१९)

स्वस्तिकात स्वस्तिक हातांनी एका पुडीवर आघात केला जातो.

तकिट तकिटतकि.

हा स्वस्तिक होय. (२०)

दोन्ही हातांच्या तळ्यांनी एकाच वेळी पुडीवर आघात केल्याने समग्रह (होतो). (८६९) यात काही अंगठा व बोटे सोडून तळवे सांगतात.

क० आता प्रायशः हुडुक्केमध्ये योजले जाणारे सोळा हस्तपाट दाखवीत आहे– (८७० ते ८८५, ८८६–)

---

७७. नागबंधाची अक्षरे अडचार व आनंदाश्रम आवृत्तींत मिळत नाहीत. संगीतसार (भा. २ पृ. ५३) यात ती 'तत गिडिकिट' अशी दिली आहेत.

स्वस्तिक हस्ताचे लक्षण नर्तनाध्यायात पहावे. (अडचार आवृत्ती. ७. १९२–१९४)

तकिट किटतक । इति समग्रहः (२१)

इत्येकविंशतिर्हस्तपाटाः ।

लोलो व्यवहिताङ्गुष्ठो दक्षिणो यस्य साधकः ॥ ८७० ॥

वामश्चोच्छलितो हस्तमुल्लोलं तं प्रचक्षते ।

अङ्गुष्ठमध्यमन्येऽत्र ब्रुवते दक्षिणं करम् ॥ ८७१ ॥

पुटमध्ये दक्षिणेन साङ्गुष्ठेन हतिं परे ।

झेंथां झेंथां थांथां झें ।

इत्युल्लोलः (१)

व्यङ्गुष्ठो दक्षिणो हस्तः पुटे चेन्मुहुरुल्लसेत् ॥ ८७२ ॥

स्वपुटं पीडयेद्वामस्तदा पाण्यन्तरो भवेत् ।

विश्लिष्टाङ्गुलिसंचारमङ्गुष्ठार्धार्धताडनम् ॥ ८७३ ॥

पाण्यन्तरस्य जनकं केचिदाचक्षते बुधाः ।

अन्ये पाण्यन्तरं प्राहुर्व्यङ्गुष्ठाद्युक्तलक्षणम् ॥ ८७४ ॥

हस्तान्तरं ततो भिन्नं विश्लिष्टादिकलक्षणम् ।

तकिट किटतक.

हा समग्रह होय. (२१)

एकवीस हस्तपाट समाप्त.

अंगठा बाजूला केलेला असा उजवा कंपित हात ज्याला उत्पन्न करतो (८७०) व (ज्यात) डावा हात वर उचललेला असतो त्या हाताला (म्हणजे हस्तपाटाला) उल्लोल म्हणतात. दुसरे (आचार्य) यात अंगठा मध्ये असलेला उजवा हात सांगतात; (८७१) (तर) इतर (आचार्य) यात अंगठ्यासह उजव्या हाताने पुडीच्या मध्यभागावर आघात (सांगतात).

झेंथां झेंथां थांथां झें.

हा उल्लोल होय. (१)

अंगठा सोडून उजवा हात (बाकीच्या बोटांनी) (उजव्या) पुडीवर वारंवार वाजवेल (८७२) आणि डावा हात स्वतःच्या पुडीवर (म्हणजे डाव्या तोंडावर) दाबून वाजवेल तेव्हा पाण्यंतर होतो. विरळ बोटांचा संचार असलेला असा अंगठ्याने केलेला अर्धार्ध प्रहार (८७३) पाण्यंतराला उत्पन्न करणारा (असतो) असे काही विद्वान सांगतात. दुसरे (विद्वान) ' अंगठा सोडून ' इत्यादी लक्षण सांगितलेला पाण्यंतर म्हणतात; (८७४) (व) त्या पेक्षा भिन्न असा ' विरळ इत्यादी लक्षण असलेला ' दुसरा हात (सांगतात).

नखें नखें नखें खेंखेंखें नखें नखें नखें खेंखेंखेंखें
दखुं खुंद खुंद । इति पाण्यन्तरः (२)
कोणघातेन निर्घोषं निःशङ्कः समभाषत ॥ ८७५ ॥
नखखि थोंथों दिगिदा ।
इति निर्घोषः (३)
घाताद्दक्षिणहस्तेन विरलाङ्गुलिना ततः ।
अङ्गुष्ठघातैर्वामेन पीडनात्खण्डकर्तरी ॥ ८७६ ॥
दां खुखुदां२ खुखुग थोंटझेंदें झेंदों गिथोंटे ।
इति खण्डकर्तरी (४)
अङ्गुल्यग्रैः पीडयित्वाङ्गुष्ठेन परिघट्टनात् ।
वामेन पीडनाद्वाद्ये दण्डहस्तोऽभिजायते ॥ ८७७ ॥
खुखुणं खुखुणं झेंद्रझेंद्र टिरिटिरि ।
इति दण्डहस्तः (५)
समत्वं पाटवर्णानामङ्गुलीनखराहते ।
दृश्यते यत्र तं प्राहुः पाटं समनखाभिधम् ॥ ८७८ ॥

नखें नखें नखें खेंखेंखें नखें नखें नखें खेंखेंखेंखें दखुं खुंद खुंद.
हा पाण्यंतर होय. (२)

निःशंकाने निर्घोष हा कोणाच्या आघाताने सांगितला आहे. (८७५)

नखखि थोंथों दिगिदा.
हा निर्घोष होय. (३)

विरळ बोटें असलेल्या उजव्या हाताने केलेल्या आघाताने (व) नंतर डाव्या हाताच्या अंगठ्याने दाबून केलेल्या प्रहारांनी खंडकर्तरी (होतो.). (८७६)

दां खुखुदां खुखुदां खुखुग थोंटझेंदें झेंदों गिथोंटे.
हा खंडकर्तरी होय. (४)

(उजव्या हाताच्या) बोटांच्या टोकांनी दाबून वाजवून अंगठ्याने प्रहार केल्याने व डाव्या हाताने वाद्यावर दाबून वाजवल्याने दंडहस्त उत्पन्न होतो. (८७७)

खुखुणं खुखुणं झेंद्रझेंद्र टिरिटिरि.
हा दंडहस्त होय. (५)

ज्यात बोटांनी व नखांनी आघात केल्यावर पाटाक्षरांचे साम्य दिसून येते त्याला समनख नावाचा पाट म्हणतात. (८७८)

रह रह तरकिट धिकिट तकिधकि टेहेंटहेंत्रः ।
इति समनखः (६)
अवष्टभ्य पुटं वामपाणिना तर्जनीहते ।
बिन्दुरुत्पद्यते प्रोक्तमिति सोढलसूनुना ॥ ८७९ ॥
देंदिगि देंदिगि गिरिगिड २ ।
इति बिन्दुः (७)
समवष्टभ्य वामेन पुटं दक्षिणपाणिना ।
संपीडनं वादयेच्चेत्तदा यमलहस्तकः ॥ ८८० ॥
कुंद कुंद झेंद्र झेंद्र झेंहें झेंहें ।
इति यमलहस्तः (८)
उत्तुङ्गीकरणं वाद्ये स्कन्धस्य स्फुरणं तथा ।
अङ्गुष्ठतर्जनीघातः पाटं कुर्वन्ति रेचितम् ॥ ८८१ ॥
देंदें थांथों देंदें नखझें३ नहनझें ।
इति रेचितः (९)
भ्रमरो हस्तपाटः स्यात्समस्ताङ्गुलिताडनात् ।

रह रह तरकिट धिकिट तकिधकि टेहेंटहेंत्रः
हा समनख होय. (६)

डावा हात पुडीवर ठेवून (उजव्या हाताच्या) पहिल्या बोटाने आघात केला असता बिंदु उत्पन्न होतो असे सोढलपुत्राने सांगितले आहे. (८७९)

देंदिगि देंदिगि गिरिगिड गिरिगिड.
हा बिंदु होय. (७)

डावा हात पुडीवर ठेवून उजव्या हाताने दाबून (वादक) वाजवेल तर तो यमलहस्त (होय) (८८०)

कुंद कुंद झेंद्र झेंद्र झेंहें झेंहें.
हा यमलहस्त होय. (८)

वाद्य वर उचलणे तसेच खांद्याचे स्फुरण (व) अंगठा आणि पहिले बोट यांनी आघात रेचित (पाट) उत्पन्न करतात. (८८१)

देंदें थांथों देंदें नखझें नखझें नखझें नहनझें.
हा रेचित होय. (९)

सगळ्या बोटांनी आघात केल्याने भ्रमर हा हस्तपाट होतो.

खेखेणं खुखुणं खु३णं झेंद्र२णह करें झें ।
इति भ्रमरः (१०)
अङ्गुष्ठतर्जनीघाताद्वलितार्धार्धहस्तकः ॥ ८८२ ॥
विद्युद्विलासो भणितो विद्युद्विलसितोऽथवा ।
तणे३ तिर झोंझों द्रि३ त्रां ।
इति विद्युद्विलासः (११)
तर्जनीमध्यमानामा विरलाः प्रहरन्ति चेत् ॥ ८८३ ॥
श्रीश्रीकरणनाथेन तदा प्रोक्तार्धकर्तरी ।
दोखुंखुं३ ग्रेह घेट३ झेहें धिगिगि थोंटें ।
इत्यर्धकर्तरी (१२)
हस्तौ न [७८]कुण्डलीलग्नौ यत्रालग्नं तमूचिरे ॥ ८८४ ॥
खुंखुं२ नखें झेहेगि२ थोंटें ।
इत्यलग्नः (१३)
स्याद्रेफः स्कन्धसञ्चेन समस्ताङ्गुलिघाततः ।

खेखेणं खुखुणं खुखुखुणं झेंद्र झेंद्र णह करें झें.
हा भ्रमर होय. (१०)

वलित, अर्धार्धपाणि (योजून) अंगठा व पहिले बोट यांनी केलेल्या आघाताने (उत्पन्न होणारा) (८८२) विद्युद्विलास किंवा विद्युद्विलसित म्हटला आहे.

तणे तणे तणे तिर झोंझोंद्रिद्रिद्रि त्रां.
हा विद्युद्विलास होय. (११)

पहिले बोट, मधले बोट व तिसरे बोट विरळ राहून जर प्रहार करतील (८८३) तर श्री श्रीकरणनाथ (शार्ङ्गदेवाने) (ती) अर्धकर्तरी म्हटली आहे.

दोखुंखुं दोखुंखुं दोखुंखुं ग्रेह घेट घेट घेट झेहें धिगिगि थोंटें.
हा अर्धकर्तरी होय. (१२)

ज्यात हात सर्पाकार जुळलेले नसतात त्याला अलग्न म्हटले आहे. (८८४)

खुंखुं खुंखुं नखें झेहेगि झेहेगि थोंटें.
हा अलग्न होय. (१३)

खांद्याचा संच योजून सगळ्या बोटांनी प्रहार केल्याने रेफ होतो.

---

७८. सुधाकरटीकेत 'ज्यात दोन्ही हात सापाच्या आकाराने जुळलेले असतात तो अवलग्न' असे या पाटाचे स्पष्टीकरण दिले आहे.

हनथों झेंझें द्रंर२ झेंद्र झेंहेंद्र ।

इति रेफः (१४)

समपाणिरविश्रान्तविरलाङ्गुलिघाततः ॥ ८८५ ॥

ननगि२ देगि थों गिनह२ झें ।

इति समपाणिः (१५)

परिवृत्तो हस्तपाटः स्यात्पुटद्वन्द्वताडनात् ।

झें थों४ गिणना३ ।

इति परिवृत्तः (१६)

इति षोडश प्रायिकहौडुक्कहस्तपाटाः ।

तलप्रहारहेतुः स्याद्वामस्कन्धप्रचालनम् ॥ ८८६ ॥

मध्येवामपुटं वामपाणिना च निपीडनम् ।

दें थों द्रें धिकिट किट झेंधितिरि२ त्रा ।

इति तलप्रहारः (१)

हनथों झेंझें द्रंद्रं झेंद्र झेंहेंद्र.

हा रेफ होय. (१४)

अखंडितपणे (म्हणजे न थांबता) विरळ बोटांनी केलेल्या आघाताने समपाणि (होतो). (८८५)

ननगि ननगि देगि थों गिनह गिनह झें.

हा समपाणि होय. (१५)

दोन्ही पुडयांवर प्रहार केल्याने परिवृत्त हस्तपाट होतो. (८८६–)

झें थोंथोंथोंथों गिणना गिणना गिणना.

हा परिवृत्त होय. (१६)

प्रायशः हुडुक्केमध्ये योजले जाणारे सोळा हस्तपाट समाप्त.

डावा खांदा हलवणे व डाव्या हाताने डाव्या पुडीवर मध्य भागी दाबून वाजवणे तलप्रहाराचे (निर्माण–) कारण होय.

दें थों द्रें धिकिट किट झेंधितिरि झेंधितिरि त्रा.

हा तलप्रहार होय. (१)

क० आता अपाट नावाचे आठ पाठ दाखवीत आहे. (८८६ ते ८९२)

तलाङ्गुष्ठप्रहारेण प्रहरोऽभिहितो बुधैः ॥ ८८७ ॥
झेदां थों गिदिगिद२ किट धों धों ।
इति प्रहरः (२)
ऊर्ध्वाग्रे पटहादौ तु तर्जन्यङ्गुष्ठधारिते ।
वादनेन समुद्भूतमपाटं वलितं विदुः ॥ ८८८ ॥
खुंखुदरि२ दां थोंगि थोंगि ।
इति वलितः (३)
अङ्गुष्ठानामिकाभ्यस्तवलनाद्दक्षिणे पुटे ।
उच्छ्वासाद्वामपाणेश्च जायते गुरुगुञ्जितः ॥ ८८९ ॥
थुकर४ थोंरगिडिदा२ धिकि थोंटें ।
इति गुरुगुञ्जितः (४)
कम्पनं वामपादस्य नितम्बचलनं तथा ।
उच्छ्वासनं करतलस्यार्धसञ्चप्रपञ्चकम् ॥ ८९० ॥
खें खें दरि२ खें खेटः२ ।
इत्यर्धसञ्चः (५)

तळवा व अंगठा यांनी प्रहार केल्याने विद्वानांनी प्रहर म्हटला आहे. (८८६, ८८७)

झेदां थों गिदिगिद गिदिगिद किट धों धों.

हा प्रहर होय. (२)

पहिले बोट व अंगठा यांनी पटह इत्यादींमधील वरचे टोक धारण करून केलेल्या वादनाने उत्पन्न झालेला अपाट वलित म्हणून जाणतात. (८८८)

खुंखुदरि खुंखुदरि दां थोंगि थोंगि.

हा वलित होय. (३)

उजव्या पुडीवर अंगठा व तिसरे बोट पुन्हा पुन्हा वळवून व डावा हात मोकळा ठेवून (केलेल्या वादनाने) गुरुगुंजित उत्पन्न होतो. (८८९)

थुकर थुकर थुकर थुकर थोंरगिडिदा थोंरगिडिदा धिकि थोंटे.

हा गुरुगुंजित होय. (४)

डावा पाय कंपित करणे, तसेच नितंब (म्हणजे मागचा मध्यभाग) हलवणे व हाताचा तळवा सैल ठेवून (वाजवणे) अर्धसंचाचा विस्तार करतात (म्हणजे अर्धसंच हा अपाट उत्पन्न करतात). (८९०)

खें खें दरि दरि खें खेटः खेटः.

हा अर्धसंच होय. (५)

त्रिकस्य चलनाद्वामाङ्गुष्ठस्य परिघट्टनात् ।
स्कन्धसञ्चाच्च[७९] सञ्जातं त्रिसञ्चं परिचक्षते ॥ ८९१ ॥
खेंद खें खें दखेंद ।
इति त्रिसञ्चः (६)
हस्तवैषम्यसंजातो विषमः संमतः सताम् ।
खेंदंधरि२ थों दिगिधरिखें४ खरकट२ ।
इति विषमः (७)
अपाटोऽभ्यस्तसंज्ञस्तु भवेत्करविवर्तनात् ॥ ८९२ ॥
खणगिणखङ्गि२ तकिधिकित्त ।
इत्यभ्यस्तः (८)
इत्यष्टावपाटाख्या हस्तपाटाः ।
अर्धाङ्गुल्यग्रघातोत्थं सञ्चमाचक्षते यथा ।

त्रिक (म्हणजे कमरेचा भाग) हलविणे, डाव्या अंगठ्याने प्रहार करणे आणि खांदा कंपित करणे (स्कंधसंच) यांनी उत्पन्न होणारा त्रिसंच म्हणून सांगतात. (८९१)

खेंद खें खें दखेंद.

हा त्रिसंच होय. (६)

हातांच्या विषमतेने (म्हणजे उजव्याच्या जागी डावा व डाव्याच्या जागी उजवा योजण्याने) उत्पन्न होणारा (अपाट) सज्जनांना विषम म्हणून मान्य आहे.

खेंदंधरि खेंदंधरि थों दिगिधरिखें दिगिधरिखें दिगिधरिखें दिगिधरिखें खरकट खरकट.

हा विषम होय. (७)

हात गोल फिरवून (उत्पन्न होणारा) अपाट अभ्यस्त नावाचा होय. (८९२)

खणगिणखङ्गि खणगिणखङ्गि तकिधिकित्त.

हा अभ्यस्त होय. (८)

अपाट नावाचे आठ हस्तपाट समाप्त.

बोटाच्या अर्ध्या टोकाच्या आघाताने उत्पन्न होणारा संच (या नावाचा अलगपाट) म्हणतात. जसे–

---

७९. सुधाकरटीकेत 'स्कन्धसञ्च' याचे स्पष्टीकरण खांदा थोडा वाकवणे असे दिले आहे.

थुकर २ गिणणं २ ।

इति सञ्चः (१)

करसञ्चेन शुद्धेनाङ्गुष्ठघातेन च क्रमात् ॥ ८९३ ॥

उत्पन्नोऽलगपाटः स्यान्नाम्ना विच्छुरितो यथा ।

झेंद्र२ झेंगिरि गिडिदा नगिरि गिडनम् ।

इति विच्छुरितः (२)

इत्यलगपाटद्वयम् ।

तलप्रहारो वलितभेदितो भ्रमरो यथा ॥ ८९४ ॥

दं थं द्रें झेंद्र४ खुंखुंधरि दर्थोंगिं ।

इति भ्रमरः (१)

संकरात्करपाटानां कुञ्चितः कथितो यथा ।

खुंखुंधरि२ धरिगिगिड२ दर्न्हें२ खुंखुं दर्न्हें२

गिरिगिडिद२ दर्त्थोंगि थोंगि२ ।

थुकर थुकर गिणणं गिणणं.

हा संच होय. (१)

शुद्ध करसंचाने (म्हणजे हाताच्या कंपाने) व अंगठ्याच्या आघाताने क्रमाने (८९३) उत्पन्न होणारा अलगपाट विच्छुरित नावाचा होय. जसे–

झेंद्र झेंद्र झेंगिरि गिडिदा नगिरि गिडनम् .

हा विच्छुरित होय. (२)

हे दोन अलगपाट होत.

वलिताने मिश्रित तलप्रहार भ्रमर (होय). जसे– (८९४)

दं थं द्रें झेंद्र झेंद्र झेंद्र झेंद्र खुंखुंधरि दर्थोंगिं.

हा भ्रमर होय. (१)

हस्तपाटांच्या मिश्रणाने (उत्पन्न होणारा) कुंचित म्हणून सांगितला आहे. जसे–

खुंखुंधरि खुंखुंधरि धरिगिगिड धरिगिगिड दर्न्हें दर्न्हें खुंखुं दर्न्हें दर्न्हें

गिरिगिडिद गिरिगिडिद दर्त्थोंगि थोंगि थोंगि.

क० आता अलगपाटाचे दोन भेद दाखवीत आहे. (८९३, ८९४–)

आता चित्रपाटाचे दोन भेद दाखवीत आहे. (८९४, ८९५–)

इति कुञ्चितः (२)

इति चित्रपाटद्वयम् ।

इत्यष्टाशीतिहस्तपाटलक्षणम् ।

पटहस्य हुडुक्कायाः पञ्च सञ्चान् ब्रुवेऽधुना ॥ ८९५ ॥

स्कन्धकूर्परयोस्तद्वदङ्गुष्ठमणिबन्धयोः ।

वामस्य चरणस्यापि कम्पः सञ्चोऽभिधीयते ॥ ८९६ ॥

श्रेष्ठः पाटहिकः सञ्चादङ्गुष्ठमणिबन्धयोः ।

स्कन्धकूर्परसञ्चात्तु नीचः पटहवादकः ॥ ८९७ ॥

वरो हौडुक्किकोऽङ्गुष्ठकूर्परस्कन्धसञ्चतः ।

सञ्चाभ्यां मणिबन्धोत्थकूर्पराभ्यां तु मध्यमः ॥ ८९८ ॥

असौ वामाङ्घ्रिसञ्चेन वादनादधमो भवेत् ।

इति पञ्चसञ्चलक्षणम् ।

पाटविन्यासभेदाः स्युर्वाद्यानि पटहादिषु ॥ ८९९ ॥

हा कुंचित होय. (२)

हे दोन चित्रपाट होत.

अठ्याऐंशी हस्तपाटांचे लक्षण समाप्त.

पटहाचे (व) हुडुक्केचे पाच संच आता सांगतो. (८९५) खांदा व कोपर, तसेच अंगठा व मनगट आणि डावा पाय यांचा कंप संच म्हणून म्हटला जातो. (८९६) अंगठा व मनगट यांच्या संचाने (वाजवणारा) पटह– वादक श्रेष्ठ (होय). पण खांदा व कोपर यांच्या संचामुळे पटहवादक कनिष्ठ प्रतीचा (ठरतो). (८९७) अंगठा, कोपर व खांदा यांच्या संचामुळे हुडुक्कावादक श्रेष्ठ (ठरतो); मनगट व कोपर यांच्या संचाने मध्यम (प्रतीचा ठरतो) (८९८) तो डाव्या पायाच्या संचाने वाजवण्याने अधम होय. (८९९–)

पाच संचांचे लक्षण समाप्त.

पटह इत्यादींमध्ये पाटांच्या रचनेने उत्पन्न होणारे प्रकार वाद्ये होत. (८९९)

आता पाच संचांचे लक्षण देत आहे. (८९५ ते ८९८, ८९९–)

क० आता पटह इत्यादी जातीच्या वाद्यांना समान असणारी पंचवीस वाद्ये (म्हणजे वादनप्रकार) सांगून त्यांचे लक्षण देण्यासाठी प्रथम त्यांचे सामान्य लक्षण ' पाटांच्या रचनेचे प्रकार ' असे सांगत आहे. पाट पूर्वी सांगितलेले अठ्याऐंशी या संख्येचे; त्यांच्या रचनेचे प्रकार.

बोल्लावणी च चल्लावण्युडुवश्च कुचम्बिणी ।
चारुश्रवणिकालग्नपरिश्रवणिका ततः ॥ ९०० ॥
समप्रहारः कुडुवचारणा करचारणा ।
दण्डहस्तो घनरवस्तानीति द्वादशावदन् ॥ ९०१ ॥
वल्लिश्च वल्लिपाटः स्याद्धत्ताभेदौ झडप्पणी ।
अनुश्रवणिका हस्तो जोडणी त्रिगुणा ततः ॥ ९०२ ॥
पञ्चहस्तः पञ्चपाणिर्वाद्यं स्यात्पञ्चकर्तरी ।
ततश्चन्द्रकला प्राहुर्वाद्यानीति त्रयोदश ॥ ९०३ ॥
प्रायेणैतानि दृश्यन्ते हुडुक्कावाद्यगोचरे ।
वाद्यानामुभयेषां स्यात्पञ्चविंशतिरित्यसौ ॥ ९०४ ॥
आदिमध्यावसानेषु देंकारबहुलं भवेत् ।
आद्यखण्डं द्वितीयं च तादृशं वाद्यते पृथक् ॥ ९०५ ॥
यत्र बोल्लावणी सोक्ता पटहे वाद्यवेदिभिः ।
यथा– दें३ थोंं३ देंं३ ।

बोल्लावणी, चल्लावणी, उडुव, कुचंबिणी, चारुश्रवणिका, अलग्न, परिश्रवणिका, नंतर (९००) समप्रहार, कुडुवचारणा, करचारणा, दंडहस्त व घनरव, अशी ती बारा सांगितली आहेत. (९०१)

वल्लि, वल्लिपाट, धत्ता, भेद, झडप्पणी, अनुश्रवणिका, हस्त, जोडणी, त्रिगुणा, मग (९०२) पंचहस्त, पंचपाणि, व पंचकर्तरी होय, आणि नंतर चंद्रकला, अशी तेरा वाद्ये सांगितली आहेत; (९०३) बहुशः ही हुडुक्केच्या वादनात दिसून येतात.

दोन्ही वाद्यांची मिळून ती संख्या पंचवीस होय. (९०४)

जीत पहिला खंड सुरवातीला, मधे व शेवटी देंकार पुष्कळ असलेला असतो व दुसरा त्यासारखा वेगळा वाजवला जातो ती वाद्यजाणकारांनी पटहात बोल्लावणी म्हटली आहे. (९०५, ९०६–)

जसे– देंदेंदें थोंथोंथों देंदेंदें.

पाटांच्या यथासंभव योजनेमुळे वाद्ये निष्पन्न होतात, असा अर्थ. त्यांतील पटह इत्यादींना समान असणाऱ्या बारा वाद्यांचा नामनिर्देश करत आहे. नंतर बहुशः हुडुक्केत वाजवली जाणारी तेरा वाद्ये देत आहे. धत्ता व भेद हा द्वन्द्व समास होय. झडप्पणी हा एक प्रकार होय. बाकीचे बोल्लावणी इत्यादी नावे रूढिप्रसिद्ध शब्द म्हणून जाणावे. (८९९–९०४)

क० त्यांतील बोल्लावणीचे लक्षण आता देत आहे– जेव्हा पटहावर बोल्लावणी वाजविली जाते तेव्हा ते वादन देंकार पुष्कळ असलेले असे असते. दुसरे खंडही त्यासारखे म्हणजे देंकार

अस्याः खण्डद्वयं वाद्यान्तरे स्याद्योजनान्वितम् ॥ ९०६ ॥
झेंकृतिर्देंकृतिस्थाने हुडुक्कायां भवेदिह ।
डक्कायां मर्दले चैव थों त्रिवल्ल्यां तु दों भवेत् ॥ ९०७ ॥
करटायां तु टेमेव प्रधानाक्षरयोजना ।
वाद्यान्तरेष्वपि प्राज्ञैः प्रोह्यतामनया दिशा ॥ ९०८ ॥
इति बोल्लावणी (१)
मण्डले चाल्यते यत्र प्रोचुश्चल्लावणीममूम्[८०] ।

हिचे दोन खंड दुसऱ्या वाद्यात (पुढे सांगितलेल्या) योजनेने युक्त असतात. हुडुक्केत हिच्यात देंकाराच्या जागी झेंकार असतो; डक्का व मर्दल यांत थों आणि त्रिवल्लीत दों असतो; (९०६, ९०७)

करटेत मात्र टें हाच असतो. (अशी) मुख्य अक्षरांची योजना इतर वाद्यांतही या प्रकारे तज्ज्ञांनी तर्काने जाणावी. (९०८)

ही बोल्लावणी होय. (१)

जीत मंडलावर (गोल भागावर ?) (पाटाक्षरांची) कंपित योजना केली जाते तिला चल्लावणी म्हटले आहे.

पुष्कळ असलेले योजावे. या बोल्लावणीची (वर) सांगितलेल्या स्वरूपाची दोन खंडे योजनेने युक्त म्हणजे त्या त्या वाद्यात सांगितलेल्या मुख्य अक्षरांनी व बाकीच्या साधारण स्वरूपाच्या अक्षरांनी युक्त असता दुसऱ्या हुडुक्का इत्यादी वाद्यात बोल्लावणी निष्पन्न होते. तेच काही वाद्यांच्या बाबतीत दाखवीत आहे. 'इह' म्हणजे या दोन खंडांत, पटहाच्या दृष्टीने आरंभी, मधे व शेवटी योजलेल्या देंकाराच्या जागी झेंकार योजला तर हुडुक्केमधील बोल्लावणी होते. हुडुक्केत झेंकार असतो. आरंभी, मधे व शेवटी 'थों' योजला तर डक्केत, तसाच थों योजला तर मर्दलात, 'दों' योजला तर त्रिवल्लीत व 'टें' योजला तर करटेत (बोल्लावणी) होते. अशा प्रकारे मुख्य अक्षरे योजण्याने इतरही डक्का इत्यादी वाद्यांत याप्रकारे तर्काने जाणावे. म्हणजे त्या त्या वाद्यात सांगितलेल्या मुख्य अक्षरांची यथासंभव क इत्यादी सोळा वर्णांबरोबर योजना करून ती ती बोल्लावणी योजावी असा अर्थ. पण मुख्य अक्षर एक व बाकीची अक्षरे पुष्कळ असता दुसऱ्या वाद्याचे ज्ञान कसे होईल असे म्हटल्यास सांगतो की ज्याप्रमाणे षड्ज इत्यादी स्वरांपैकी एक स्वर अंश असता, बाकीचे स्वर पुष्कळपणे असताही त्यात अंशच मुख्य म्हणून त्याचा प्रयोग प्रचुरपणे होत असल्याने इतर स्वर तो राग भूषवीत असता दुसऱ्या रागाची जाणीव उत्पन्न होते, त्याप्रमाणेच येथेही 'देंकार' इत्यादी मुख्य अक्षरांमुळे, बाकीची अक्षरे त्या त्या ठिकाणी योजल्याने तो तो भूषित होत असताही त्या त्या वाद्याचे ज्ञान होते. म्हणून हे म्हणणे काहीच नव्हे. (९०५ ते ९०८)

---

८०. संगीतसार (भा० २ पृ० ५७) यात 'पाटाक्षरांचा समूह जेथे भिन्न भिन्न अक्षरांचा असतो तेथे देंकार इत्यादींचा प्रयोग केला असता ती चल्लावणी जाणावी', असे म्हटले आहे.

इति चल्लावणी (२)

वामेन तलहस्तेन दक्षिणेन तु पाणिना ॥ ९०९ ॥
लुलितेन सकोणेन ताडनादुडुवो भवेत् ।

इत्युडुवः (३)

उद्दलीपिहिते वक्त्रे हस्तस्वस्तिकताडनात् ॥ ९१० ॥
खुंकारबहुलं वाद्यं कीर्तयन्ति कुचुम्बिणीम् ।

इति कुचुम्बिणी (४)

बोल्लावण्येव पाणिभ्यां क्रमाद्वा युगपत्कृतैः ॥ ९११ ॥
भूरिभिः संभृता पाटैश्चारुश्रवणिका भवेत् ।
शुद्धैश्चित्रैः क्रमात्पाटैः शुद्धा चित्रेति सा द्विधा ॥ ९१२ ॥

इति चारुश्रवणिका (५)

अलग्नः कुण्डलीस्पर्शं विना कोणप्रहारतः ।

इत्यलग्नः (६)

कर्तरी समपाणिश्चावघटो यत्र तु क्रमात् ॥ ९१३ ॥
सोक्ता परिश्रवणिका श्रीयज्ञपुरसूरिणा ।

ही चल्लावणी होय. (२)

डाव्या तळहाताने व कोणयुक्त लुलित (कंपित ?) उजव्या हाताने प्रहार केल्याने उडुव होतो.

हा उडुव होय. (३)

उद्दलीने झाकलेल्या तोंडावर हाताच्या स्वस्तिकाने आघात केला असता जे खुंकार पुष्कळ असणारे वाद्य (निर्माण होते) त्याला कुचुंबिणी म्हणतात.

ही कुचुंबिणी होय. (४)

दोन्ही हातांनी क्रमाने किंवा एकसाथ (वादनाने) निर्माण केलेल्या पुष्कळ पाटांनी युक्त असणारी बोल्लावणीच चारुश्रवणिका होय. क्रमाने (योजलेल्या) शुद्ध व चित्र पाटांनी ती शुद्धा व चित्रा अशी दोन प्रकारची होते. (९०९, ९१०, ९११, ९१२)

ही चारुश्रवणिका होय. (५)

कुंडलीला स्पर्श न करता केलेल्या कोणाच्या प्रहाराने अलग्न (होतो).

हा अलग्न होय. (६)

जिच्यात कर्तरी, समपाणि व अवघट क्रमाने (योजले जातात) (९१३) तिला श्रीयज्ञपुरस्थित विद्वानाने (म्हणजे शार्ङ्गदेवाने) परिश्रवणिका म्हटले आहे.

इति पारिश्रवणिका (७)

समप्रहारो युगपत्करद्वन्द्वेन घाततः ॥ ९१४ ॥

इति समप्रहारः (८)

कुडुवोद्भवपाटाभ्यां वाद्यं कुडुवचारणा ।

उच्यते वादनः दण्डः कोणः कुडुव इत्यपि ॥ ९१५ ॥

इति कुडुवचारणा (९)

जाता हस्तजपाटैस्तु केवलैः करचारणा ।

इति करचारणा (१०)

एकैको यः करद्वन्द्वान्मृदुदक्षिणपाणिकात् ॥ ९१६ ॥

जायते तादृशैः पाटैर्दण्डहस्तोऽभिधीयते ।

इति दण्डहस्तः (११)

यः करेण कराभ्यां वा कृतैः पाटैर्निरन्तरैः ॥ ९१७ ॥

निरन्तरघनध्वानः स स्याद्घनरवाभिधः ।

इति घनरवः (१२)

इति द्वादश पटहादिजातानि वाद्यानि ।

ही परिश्रवणिका होय. (७)

एकाच वेळी दोन्ही हातांनी केलेल्या आघाताने समप्रहार होतो. (९१४)

हा समप्रहार होय. (८)

कुडुवाने उत्पन्न होणाऱ्या दोन पाटांनी कुडुवचारणा हे वाद्य होते. वाजवायचा दंड कोण व कुडुवही म्हटला जातो. (९१५)

ही कुडुवचारणा होय. (९)

केवळ हातांपासून उत्पन्न होणाऱ्या पाटांनी करचारणा निष्पन्न होते.

ही करचारणा होय. (१०)

ज्यात उजवा हात मऊपणाने योजला आहे अशा दोन्ही हातांनी जो एकेक (पाट) (९१६) उत्पन्न होतो तशा पाटांनी दंडहस्त (वाद्य) म्हटले आहे.

हे दंडहस्त होय. (११)

जो एका हाताने किंवा दोन्ही हातांनी निर्माण केलेल्या सलग पाटांनी (९१७) अखंड व भरदार आवाज असलेला असतो तो घनरव नावाचा होय. (९१८–)

हा घनरव होय. (१२)

ही पटह इत्यादीमधील बारा वाद्ये होत.

स्कन्धेन मणिबन्धेन कुडुवेन च चालनात् ॥ ९१८ ॥
सोल्लासाज्जायते वल्लिस्त्रिविधा पटहादिषु ।
इति वल्लिः (१)
अर्धं वार्धद्वयं वल्ल्यां स्वैः स्वैः पाटैरयोजनम् ॥ ९१९ ॥
कृतं संयोजनं वा चेद्वल्लिपाटस्तदा भवेत् ।
इति वल्लिपाटः (२)
निबद्धं वादयेदाद्यं झेंकारार्धं पुरातनम् ॥ ९२० ॥
अनिबद्धं स्वबुद्ध्यार्धं कराभ्यां वादयेदथ ।
वाद्येनाद्यं निबद्धं चेत्पुनर्घत्ता तदोच्यते ॥ ९२१ ॥
इति घत्ता (३)
योगेनैकेन[८१] निष्पन्नस्तदुपाङ्गभवोऽपरः ।

(अनुक्रमे) खांदा, मनगट व कुडुव यांच्या उल्हासयुक्त कंपाने पटह इत्यादीत तीन प्रकारचे वल्लि हे वाद्य उत्पन्न होते.

ही वल्लि होय. (१)

वल्लीमध्ये अर्धा भाग किंवा दोन अर्धे भाग आपापल्या पाटांनी सहित अथवा रहित योजले असता वल्लिपाट होतो.

हा वल्लिपाट होय. (२)

(आधी) झेंकाराचा पहिला अर्धा भाग निबद्ध (म्हणजे तालात बांधलेला) वाजवावा; (९१८, ९१९, ९२०) (मग) पूर्वीचा (राहिलेला) अर्धा भाग स्वतःच्या बुद्धीने दोन्ही हातांनी अनिबद्ध (म्हणजे तालात न बांधलेला असा) वाजवावा; (नंतर) पुन्हा पहिला निबद्ध वाजवल्याने (ते वाद्य) घत्ता म्हटले जाते. (९२१)

हे घत्ता वाद्य होय. (३)

एका (अंगाच्या) संयोगाने उत्पन्न झालेला (एक पाट), त्याच्या उपांगाने निर्माण झालेला दुसरा पाट, (अशा रीतीने) परस्पर अंगांच्या मुळे उत्पन्न झालेल्या पाटपूर्तींनी

---

८१ भेदाचे वेमाने दिलेले लक्षण असे–

'अंग, उपांग व इतर अंगांनी उत्पन्न झालेल्या, पाटांची संख्या पूर्ण होण्यास कारणीभूत असणाऱ्या व नानाप्रकारच्या वाद्यांतून निर्माण झालेल्या पाटांनी होणारे वादन जाणकारांनी भेद (म्हणून) सांगितले आहे'.

याचेच मोक्षदेवाने दिलेले लक्षण असे–

'ज्या अंगाने एक पाट उत्पन्न झालेला असतो, त्याच्या उपांगाने दुसरा निर्माण होतो व तिसरा याच्या (इतर ?) अंगाने उत्पन्न होतो. असा, पाटहस्तांनी मिश्रित असणाऱ्या नाना वाद्यांतून निर्माण झालेल्या पाटांनी, लयींच्या क्रमामुळे तीन प्रकारचा भेद उत्पन्न होतो.'

पहा– भरतकोश पृ. ४४३

पाटोऽन्योन्याङ्गजातैर्यः संमिश्रैः पाटपूरणैः ॥ ९२२ ॥
नानावाद्योद्भवैः पाटैर्भेदस्त्रेधा लयत्रयात् ।
इति भेदः (४)
यस्यामुपक्रमे मध्येऽन्तेऽथ वाद्यैरनेकधा ॥ ९२३ ॥
सर्ववाद्यानि वाद्यन्ते जगदुस्तां झडप्पणीम् ।
इति झडप्पणी (५)
पाटः पाटाक्षरं यद्वा श्रूयते चेत्पुनःपुनः ॥ ९२४ ॥
अनुश्रवणिकां प्राह शंकरानुचरस्तदा ।
इत्यनुश्रवणिका (६)
द्वे चत्वारि भवन्त्यष्टौ यद्वा खण्डानि षोडश ॥ ९२५ ॥
दैंकारादीनि यत्रासौ हस्तः स च चतुर्विधः ।
चतुरश्रत्र्यश्रमिश्रखण्डतालप्रयोगतः ॥ ९२६ ॥
इति हस्तः (७)
तदर्धार्धादिभेदेन क्रमेण व्युत्क्रमेण वा ।
अखण्डतालाः पाटाश्चेद्युज्यन्ते जोडणी तदा ॥ ९२७ ॥

मिसळलेल्या (९२२) (अशा) अनेक वाद्यांतून निर्माण झालेल्या पाटांनी, तीन लयींच्या मुळे तीन प्रकारचा भेद उत्पन्न होतो.

हा भेद होय. (४)

जीत आरंभी, मध्ये व शेवटी अनेक प्रकारच्या वादनांनी (९२३) सर्व वाद्ये वाजविली जातात तिला झडप्पणी म्हटले आहे. (९२४–)

ही झडप्पणी होय. (५)

पाट किंवा पाटाचे अक्षर जेव्हा पुन्हा पुन्हा ऐकले जाते (९२४) तेव्हा (त्या वादनास) शंकरसेवक (शार्ङ्गदेव) अनुश्रवणिका म्हणतो.

ही अनुश्रवणिका होय. (६)

ज्यात दैंकार आरंभी असलेले दोन, चार, आठ किंवा सोळा खंड असतात तो हस्त होय. अनुक्रमे चतुरश्र, त्र्यश्र, मिश्र व खंड या तालांच्या योजनेनुसार तो चार प्रकारचा (असतो). (९२५, ९२६)

हा हस्त होय. (७)

त्याच्या अर्ध्या किंवा अर्ध्याच्या अर्ध्या इत्यादी भेदाने क्रमाने किंवा उलट क्रमाने खंडताल नसलेले पाट योजले जातात तेव्हा ती जोडणी होय. (९२७)

इति जोडणी (८)

खण्डानि त्रीणि यत्र स्युरेकैकं त्रिगुणं तथा ।
वाद्यते यत्र सा प्रोक्ता त्रिगुणा त्रिविधा च सा ॥ ९२८ ॥
आदिमध्यान्तखण्डानां त्रैगुण्यात्सा पुनर्द्विधा ।
क्रमव्युत्क्रमतोऽथास्यास्तत्त्रैगुण्यमुदाहरेत् ॥ ९२९ ॥
प्रयुज्य त्रीणि खण्डानि प्रयुञ्जीतादिमद्वयम् ।
ततश्चाद्यमिति प्रोक्तं खण्डे त्रैगुण्यमादिमे ॥ ९३० ॥
इत्यादित्रिगुणा मध्ये त्रिगुणा तु द्विधा भवेत् ।
त्रैगुण्यान्मध्यखण्डस्य द्विःप्रकारात्तदुच्यते ॥ ९३१ ॥
खण्डत्रयं ततः खण्डद्वयमाद्यं प्रयुज्यते ।
ततो मध्यममित्येवं यद्वा खण्डद्वयात्परम्[८२] ॥ ९३२ ॥
अन्त्यद्वयं वादयित्वा प्रयोज्यं मध्यमं दलम् ।
अथान्तस्त्रिगुणायां प्राक् खण्डत्रितयवादनम् ॥ ९३३ ॥

ही जोडणी होय. (८)

जिच्यात तीन खंड असतात तसेच एकेक (खंड) त्रिवार वाजवला जातो ती त्रिगुणा म्हटली आहे. आरंभीचा, मधला व शेवटचा खंड त्रिवार योजल्याने ती तीन प्रकारची होते. ती पुन्हा क्रमाने व उलट क्रमाने (वाजवण्यामुळे) (प्रत्येकी) दोन प्रकारची होते. आता तिचे त्रिवार (योजनेचे स्वरूप) सांगायचे. (९२८, ९२९)

तीन खंड योजून (मग) पहिले दोन खंड योजावे, नंतर पहिला योजावा अशी ही पहिल्या खंडाची त्रिवार योजना सांगितली आहे. (९३०) ही (आरंभीचा खंड त्रिवार असलेली) आदित्रिगुणा होय. (मधला खंड त्रिवार असलेली) मध्यत्रिगुणा मधल्या खंडाच्या त्रिवार योजनेच्या दोन प्रकारांमुळे दोन तऱ्हेची असते. ते (स्वरूप) सांगतो. (९३१) (प्रथम) तीन खंड व नंतर पहिले दोन खंड योजले जातात, मग मधला (खंड योजला जातो) या तऱ्हेने किंवा दोन खंडांनंतर (९३२) शेवटचे दोन खंड वाजवून मधला खंड योजावा (यातऱ्हेने). आता (शेवटचा खंड त्रिवार असलेल्या) अन्तस्त्रिगुणेत प्रथम तीन खंडांचे वादन (९३३) व नंतर शेवटच्या दोन खंडाचे वादन करून,

---

८२ 'मध्ये त्रिगुणा' हिच्या दुसऱ्या स्वरूपात 'आधी तीन खंड' असे सुधाकरटीकेत म्हटले आहे तेच योग्य दिसते. त्यानुसार 'खण्डत्रयात्परम्' असा पाठ असणे उचित आहे.

ततोऽन्तिमद्वयं खण्डमन्तिमं वादयेत्तथा ।
एवमष्टविधामाह त्रिगुणां भववल्लभः ॥ ९३४ ॥
अथवा चतुरश्रादौ क्वापि ताले दलत्रयम् ।
प्रयुज्यैकस्य खण्डस्य मानेनाथ दलद्वयम् ॥ ९३५ ॥
कुर्याद्दलत्रयं तावद्यत्र सा त्रिगुणा भवेत् ।
चतुरश्रत्र्यश्रमिश्रयुक्तैर्वैषा क्रमाद्दलैः ॥ ९३६ ॥
अन्ये त्वेककले ताले द्विकलेऽथ चतुष्कले ।
क्रमाद्विरचितैः खण्डैस्त्रिगुणामभणन्बुधाः ॥ ९३७ ॥
एकं चच्चत्पुटे खण्डद्वयं चाचपुटे ततः ।
मिश्रे खण्डत्रयं यत्र त्रिगुणां तां जगुः परे ॥ ९३८ ॥
पदैश्चतुर्भिरस्यां स्यात्खण्डमेकं पदं पुनः ।
मितं कलाभिरष्टाभिरित्युक्तं सूरिशार्ङ्गिणा ॥ ९३९ ॥
इति त्रिगुणा (९)
पञ्चहस्तो हस्तपाटैर्हस्तशब्दान्विताभिधैः ।
इति पञ्चहस्तः (१०)

शेवटचा खंड वाजवावा. या रीतीने शंकरप्रिय (शार्ङ्गदेव) आठ प्रकारची त्रिगुणा सांगतो. (९३४)

किंवा (दुसऱ्या मतानुसार) चतुरश्र इत्यादी कोणत्यातरी तालात तीन खंड योजून मग एका खंडाच्या तालाच्या प्रमाणाने दोन खंड (९३५) योजावे (अशी योजना केल्याने) ती त्रिगुणा होते. अथवा चतुरश्र, त्र्यश्र व मिश्र तालांनी युक्त खंडांनी क्रमाने (ती होते). (९३६)

दुसऱ्या विद्वानांनी एककल, द्विकल, व चतुष्कल तालांत क्रमाने योजलेल्या तीन खंडांनी त्रिगुणा सांगितली आहे. (९३७)

इतर (काही विद्वानांनी) एक खंड चच्चत्पुट तालात, मग दोन खंड चाचपुट तालात आणि तीन खंड मिश्र तालात जिच्यात असतात ती त्रिगुणा म्हटली आहे. (९३८)

हिच्यात चार पदांनी (योजलेला) एक खंड असून एक पद आठ कलांच्या प्रमाणाचे असते असे विद्वान शार्ङ्गदेवाने सांगितले आहे. (९३९)

ही त्रिगुणा होय. (९)

हस्त शब्दाने युक्त असलेल्या नावाच्या (पाच) हस्तपाटांनी पंचहस्त होतो. (९४०–)

हा पंचहस्त होय. (१०)

पञ्चपाणिस्तु पाटैः स्यात्पाणिशब्दयुताभिधैः ॥ ९४० ॥
इति पञ्चपाणिः (११)
कर्तरीपदवत्संज्ञैः पाटैः स्यात्पञ्चकर्तरी ।
इति पञ्चकर्तरी (१२)
वर्धन्ते च ह्रसन्ते चेन्मात्राश्चन्द्रकला इव ॥ ९४१ ॥
तालश्चन्द्रकलाख्यश्च तदा चन्द्रकला भवेत् ।
द्वात्रिंशन्मात्रिकामन्ये प्राहुश्चन्द्रकलामिमाम् ॥ ९४२ ॥
द्विमात्राः षोडशकला वृद्धिह्रासयुजो विदुः ।
तादृक्चतुःषष्टिकलां तामाहुर्दक्षिणे पथि ॥ ९४३ ॥
इति चन्द्रकला (१३)
इति त्रयोदश प्रायिकहौडुकवाद्यानि ।
इति पञ्चविंशतिरुभयवाद्यानि ।
उद्ग्राहादिनिबद्धाः स्युरत्र गीतप्रबन्धवत् ।
वाद्यप्रबन्धास्तद्भेदलक्ष्माण्यभिदधेऽधुना ॥ ९४४ ॥

पाणि शब्दाने युक्त असलेल्या नावाच्या (पाच) पाटांनी पंचपाणि होतो. (९४०)
हा पंचपाणि होय. (११)
कर्तरी शब्दाने युक्त असलेल्या नावाच्या (पाच) पाटांनी पंचकर्तरी होतो. (९४१–)
हा पंचकर्तरी होय. (१२)
चंद्राच्या कलांप्रमाणे मात्रा वाढत असतील व कमी होत असतील (९४१) आणि चंद्रकला नावाचा ताल (योजला) असेल तर चंद्रकला होते. दुसरे (आचार्य) ही चंद्रकला बत्तीस मात्रांची सांगतात. (९४२) (ते) वाढ व ऱ्हास यांनी युक्त दोन मात्रांच्या सोळा कला जाणतात. दक्षिण मार्गात तशा तऱ्हेच्या चौसष्ट कला असणारी ती (चंद्रकला) सांगतात. (९४३)
ही चंद्रकला होय .(१३)
ही तेरा प्रायः हुडुक्केत (योजली जाणारी) वाद्ये होत.
दोन्ही मिळून पंचवीस वाद्ये समाप्त.
यात गीत प्रबंधाप्रमाणे उद्ग्राह इत्यादी ज्यात बांधलेले असतात ते वाद्यप्रबंध होत. (ते व) त्यांच्या प्रकारांची लक्षणे आता सांगतो. (९४४)

क० अशा तऱ्हेने वाद्ये सांगून त्यांचे प्रबंध दाखवीत आहे– यात म्हणजे या वाद्यप्रकरणात, गीतप्रबंधाप्रमाणे उद्ग्राह इत्यादी योजलेले असता यति इत्यादी वाद्यप्रबंध होत. उद्ग्राह इत्यादी म्हणजे उद्ग्राह, मेलापक, ध्रुव, विकल्पाने अंतर व आभोग हे प्रबंधाध्यायात सांगितलेले धातू होत.

यतिरोता च गजरो रिगोणी कवितं पदम् ।
मेलापकश्चोपशमोद्ग्राहप्रहरणान्यथ ॥ ९४५ ॥
अवत्सकश्छण्डणश्च तुडुका मलपं ततः ।
मलपाङ्गं च मलपपाटश्छेदोऽथ रूपकम् ॥ ९४६ ॥
अन्तरोऽन्तरपाटश्च खोजः खण्डयतिस्ततः ।
खण्डच्छेदोऽप्यवयतिः खण्डपाटश्च खण्डकः ॥ ९४७ ॥
खण्डहुल्लः समः पाटो ध्रुवकोऽङ्गाङ्गरूपके ।
तालो वितालः खलकः समुदायश्च जोडणी ॥ ९४८ ॥
उडवस्तलपाटश्चोड्डवणी तुण्डकस्ततः ।
अङ्गपाटश्च पैसारश्चित्वारिंशदित्यमी ॥ ९४९ ॥
उक्ताः श्रीकरणाग्रण्या प्रबन्धा वाद्यसंश्रयाः ।
[८३]शीतोदकास्तथा स्नानगर्वोऽन्यो गर्वनिर्णयः ॥ ९५० ॥

यति, ओता, गजर, रिगोणी, कवित, पद, मेलापक, उपशम, उद्ग्राह, प्रहरण, मग (९४५) अवत्सक, छंडण, तुडुका, मलप, नंतर मलपांग, मलपपाट, छेद व रूपक, (९४६) अंतर, अंतरपाट, खोज, खंडयति, नंतर खंडच्छेद व अवयति, आणि खंडपाट, खंडक (९४७) खंडहुल्ल, सम, पाट, ध्रुवक, अंग, अंगरूपक, ताल, वताल, खलक, समुदाय व जोडणी, (९४८) उडव, तलपाट, उड्डवणी, तुंडक, मग अंगपाट, आणि पैसार असे हे त्रेचाळीस (९४९) वाद्यसंश्रित प्रबंध श्रीकरणाग्रणी (शार्ङ्गदेव) याने सांगितले आहेत. शीतोदक तसेच स्नानगर्व व तिसरा गर्वनिर्णय (९५०) हे केवळ कल्पनाजन्य व लक्षणरहित असल्याने

त्यानी बांधलेले एला इत्यादी प्रबंध जसे गीतप्रबंधांत सांगितले तसेच या वाद्यप्रकरणातही त्यांनी बांधलेले यति इत्यादी वाद्यप्रबंध होत. गीतप्रबंधाप्रमाणे यावरून अतिदेशानेच मेलापक व आभोग यांचा यथासंभव अभाव असता दोनधातूंचा इत्यादी तीन भेद जाणावे. वाद्यप्रबंधात योजलेल्या उद्ग्राह इत्यादींची मांडिक लोकांनी (म्हणजे वादकांनी) योजलेली नावे म्हणजे लहरी हे उद्ग्राहाचे, येडुपु हे मेलापकाचे, अंतर् हे ध्रुवाचे, उपान्तर् हे वैकल्पिक अंतराचे व मुक्तायी हे आभोगाचे अशी जाणावी. त्या वाद्यप्रबंधांचे यति इत्यादी प्रकार व त्यांची लक्षणे देत आहे. (९४४–९५१)

---

८३. अडचार व. आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तींत 'शीतोदकास्तथा' असा पाठ आहे. सुधाकरटीकेत 'शीतोदक, स्थानगर्व व गर्वनिर्णय नावाचे हे तीन केवळ कल्पनेने निर्मित व लक्षणहीन असल्याने आम्ही उपेक्षिले आहेत' असे स्पष्टीकरण मिळते. यावरून 'शीतोदकस्तथा' असा मूळ ग्रंथातला पाठ घेणे योग्य आहे. 'स्नानगर्व' याबद्दल सुधाकरटीकेत 'स्थानगर्व' असा शब्द मिळतो.

उत्प्रेक्षामात्रजा लक्ष्महीनास्तेऽस्मदुपेक्षिताः ।
प्रायो वाद्यप्रबन्धानां देंकारोऽन्ते निधीयते ॥ ९५१ ॥
काभ्यांचित्कूटवर्णाभ्यां रचितोऽत्यन्तकोमलः ।
एकरूपाक्षरस्तालच्छन्दोभिव्यञ्जनोज्ज्वलः ॥ ९५२ ॥
यो वाद्यते वाद्यखण्डो विरामैर्बहुभिर्मुहुः ।
यतिर्जक्का च सा तज्ज्ञैर्वाद्या मण्ठादिसालगे ॥ ९५३ ॥
आदौ वाद्यप्रबन्धस्य कस्याप्यङ्गतया यदा ।
तद्विदो वादयन्त्येतां वदन्त्युट्टवणं तदा ॥ ९५४ ॥
पाटानां रचनां केचिदत्र नेच्छन्ति सूरयः ।
गड्दगथों गक्कथोंटें गड्दगथों गक्कथोंटें गड्दगथों गक्कथोंटें ।
इति यतिः ।

ते आम्ही (म्हणजे शाङ्गदेवाने) उपेक्षिले आहेत. वाद्यप्रबंधांच्या शेवटी प्रायः देंकार ठेवला (म्हणजेच योजिला) जातो. (९५१)

कोणत्यातरी दोन कूटवर्णांनी रचलेला, अत्यंत कोमल, एकरूप अक्षर असलेला, ताल व छंद यांच्या प्रकटीकरणाने उजळून निघालेला (९५२) जो वाद्यखंड पुष्कळ विरामांनी वारंवार वाजवला जातो ती यति (होय) व तीच जक्का (होय). ती जाणकारांनी मंठ इत्यादी सालग (प्रबंधांत) वाजवावी. (९५३) वाद्यजाणकार जेव्हा ती कोणत्याही वाद्यप्रबंधाच्या आरंभी अंगरूपाने वाजवतात तेव्हा तिला उट्टवण म्हणतात. (९५४)

काही विद्वान हिच्यात पाटांची रचना इच्छित नाहीत. (९५५–)

गड्दगथों गक्कथोंटें गड्दगथों गक्कथोंटें गड्दगथों गक्कथोंटें.

ही यति होय.

क० त्यातील यतीचे लक्षण देत आहे–

पटह इत्यादींच्या वादनात योजले जाणारे साधारण वर्ण कूटवर्ण म्हटले जातात. त्यांतील परस्परांशी योजायला योग्य अशा कोणत्याही दोन अक्षरांनी (उदा.) 'तथोंग कथोंटिग' इत्यादी अक्षरांनी निर्माण केलेला, रचनेत कठिणपणा नसलेला, एकरूप अक्षर असलेला म्हणजे प्रारंभ केलेल्या वर्णाला अनुसरूनच समाप्त केलेला, ताल व छंद यांच्या प्रकटीकरणाने प्रकाशित झालेला व पुष्कळ विच्छेदांनी युक्त असा जो वाद्यखंड अनेकवार वाजवला जातो ती यति व जक्का होय. जक्का हे यतीचे दुसरे नाव असा अर्थ. ती सालगसूडातील मंठ इत्यादी गीतात वाजवावी म्हणजे त्यांच्या रचनेत योजावी. ही यति, ओता, गजर इत्यादी कोणत्याही वाद्यप्रबंधाच्या आरंभी त्याचे अंग म्हणून जाणकार वाजवतात तेव्हा तिला उट्टवण म्हणतात. या यतीत काही विद्वान नागबंध इत्यादी पाटांची रचना इच्छित नाहीत, या म्हणण्यावरून काही, ती इच्छितात हे कळते. (९५२ ते ९५४, ९५५–)

द्विरुद्ग्राहस्ततः खण्डं यस्यां द्विर्भूरिदेंकृति ॥ ९५५ ॥
तत्किंचिदधिकं वारे द्वितीयेऽथ तृतीयकम् ।
कियद्दीर्घं शुद्धकूटखण्डैः पाटैर्विमिश्रितैः ॥ ९५६ ॥
व्यस्तैः समस्तैः रचितं ततो देंकृतिमत्पुनः ।
सकृत्तच्च प्रयोक्तव्यमथ वर्णस्वरात्मकम् ॥ ९५७ ॥
दीर्घं खण्डं ततोऽल्पं च प्राच्यं शुद्धादिनिर्मितम् ।
ओता सोक्ता छण्डणान्ता कैश्चिद्देंकृतिमुक्तिका[८४] ॥ ९५८ ॥
एषैककलयुग्मे स्यान्निःसारौ छण्डणौ भवेत् ।
उद्धतो ध्वनिरत्र स्यात्प्रायो मानं विलम्बितम् ॥ ९५९ ॥

(जिच्यात) दोन वेळा उद्ग्राह (योजून) मग पुष्कळ देंकार असलेला खंड दोन वेळा (योजला जातो), (९५५) दुसऱ्या वेळा तो (पहिल्या वेळेपेक्षा) थोडा अधिक (योजला जातो); नंतर तिसरा खंड (पूर्वीच्या पेक्षा) काहीसा दीर्घ, शुद्ध, कूट व खंड (पाटांनी) मिश्रित असलेल्या, वेगवेगळेपणाने अथवा एकत्रपणे योजलेल्या पाटांनी रचलेला असा (प्रयुक्त केला जातो); मग देंकारयुक्त (म्हणजे दुसरा खंड) पुनः एक वेळ योजायचा असतो. नंतर वर्णसर स्वरूपाचा दीर्घ खंड व मग शुद्ध इत्यादी पाटांनी रचलेला पूर्वीचा खंड अल्प स्वरूपात (योजला जातो), ती छंडण शेवटी असणारी ओता म्हटली आहे. काहींनी ती देंकार शेवटी असणारी (सांगितली आहे). (९५६, ९५७, ९५८) ही एककल युग्म (म्हणजे यथाक्षर चच्चत्पुट) तालात योजावी. छंडण निःसारु तालात योजावा. हिच्यात प्रायः उद्धत (म्हणजे जोरदार) नाद असून (लयीचे) प्रमाण विलंबित (९५९)

क० नंतर ओतेचे लक्षण देत आहे–

या ओतेमध्ये उद्ग्राह दोन वेळा योजायचा असतो. उद्ग्राहानंतर पुष्कळ देंकार असणारा मेलापक नावाचा दुसरा खंड दोन वेळा योजायचा असतो. दुसऱ्या वेळी तो खंड पहिल्या वेळेपेक्षा थोडा जास्त योजायचा असतो. थोडा अधिक यावरून दुसरा खंडही दोन वेळा योजायचा असा अर्थ घ्यायचा. दुसऱ्या वेळेचा हा थोडा अधिकपणा काही पाटाक्षरांनी करायचा. मग तिसरा ध्रुव नावाचा खंड शुद्ध, कूट व खंड पाटांनी मिश्रित अशा व्यस्त म्हणजे वेगळेपणाने आणि समस्त म्हणजे एकत्रपणे योजलेल्या पाटांनी रचायचा. 'शुद्धकूटखण्ड' हे पाट याचे विशेषण आहे. शुद्ध, कूट, व खंड असा हा द्वंद्व समास घ्यायचा. म्हणून या पाटांनी मिश्रित व्यस्त व समस्त पाटांनी तो रचलेला असतो (असे म्हटले आहे). हा तिसरा खंड पूर्वीच्या खंडापेक्षा किंचित दीर्घ असतो. तिसऱ्या खंडानंतर दुसरा देंकारखंड पुन्हा एक वेळा योजावा. 'देंकृतिमत्' या शब्दाने येथे दुसरा खंड समजायचा. मग वर्णसर नावाचा आणखी एक दीर्घ खंड शुद्ध इत्यादी पाटांनी

८४. 'देंकृतिमुक्तिका' याचे स्पष्टीकरण सुधाकरटीकेत 'ही ओता देंकृतिमुक्तिका म्हणून म्हटली जाते' असे दिले आहे.

दीप्तं नृत्तं च तामाहुः केचित्केदार इत्यपि ।
इमामावहनीं प्राहुरेकेऽन्ये त्वन्यथा जगुः ॥ ९६० ॥
पाटैर्बहुलदेंकारैस्तालैश्च निखिलैः कृता ।
बहुधा स्थापना यस्यामाहुराहवनीं बुधाः ॥ ९६१ ॥
आदौ देंकारखण्डं चेद्देंकारादिस्तदोच्यते ।

यथा – तद्धिटें कत्थोंकट नगनथोंगकुथोंगदा २, धिकट २, तकटथोंगक धिधिक थोरघटे२, इत्युद्ग्राहो द्विवारं कर्तव्यः । गड्दगदे गिनदेंगकू तु थं हं देंगकू देंगनथ गनतदिगि नत्तत्तेकटदेंदेंगिनतकट खुखुघंघं देंगकू, इति देंकार-खण्डं द्विः ॥

व (योजायचे) नृत्त दीप्त (म्हणजे विकट) असते. काही तिला केदार असेही म्हणतात. दुसरे काही हिला आवहनी म्हणतात तर इतर काही दुसऱ्या प्रकारे (तिचे लक्षण) सांगतात. (९६०)

जाणकार, जिच्यात पुष्कळ देंकार असलेल्या पाटांनी व सर्व तालांनी बहुधा स्थापना केली जाते, तिला आहवनी म्हणतात. (९६१)

आरंभी देंकारखंड असेल तेव्हा ती देंकारादि (म्हणजे देंकार आरंभी असलेली) म्हटली जाते. (९६२–)

जसे– तद्धिटें कत्थोंकट नगनथोंगकुथोंगदा नगनथोंगकुथोंगदा धिक्कट धिक्कट तकटथोंगक धिधिक थोरघटे थोरघटे, असा उद्ग्राह दोन वेळा योजावा.

योजावा. ही ओता छंडण शेवटी असणारी असते. छंडण हा पुढे सांगितला गेलेला वाद्यप्रबंधाचा प्रकार होय. 'प्रायः वाद्यप्रबंधांच्या शेवटी देंकार योजला जातो' असे सामान्यपणे पूर्वी म्हटले आहे. त्याचा क्वचित दुसऱ्या मताने अपवाद 'देंकारमुक्तिका' याने दाखविला आहे. ही ओता एकफल युग्म म्हणजे यथाक्षर चच्चत्पुट तालात असते. ओतेचे अंग म्हणून छंडण तिच्या शेवटी योजावा. छंडण निःसारु तालात असतो. ओतेमध्ये प्रचुरपणे घोषाक्षरांनी उत्पन्न होणारा उद्धत नाद असतो व विलंबित प्रमाणाची लय आणि दीप्त नृत्त योजायचे असते. या ओतेचीच दुसऱ्या मतानुसार अन्य नावे सांगत आहे.

जे हिला आहवनी म्हणतात त्यांतील काहींनी तिचे लक्षण दुसऱ्या तऱ्हेने सांगितले आहे. ते 'पुष्कळ देंकार असलेल्या पाटांनी–' इत्यादी वाक्याने दाखवले आहे. ओतेत आरंभी म्हणजे उद्ग्राह खंडाच्या पूर्वी देंकारखंड प्रयुक्त केला तर ती ओता 'देंकारादि' म्हटली जाते. (९५५ ते ९६१, ९६२–)

क० लक्षणानुसार प्रस्तार करून दाखवीत आहे–'तद्धिटें...' इत्यादी प्रस्तार ग्रंथामधूनच जाणून घ्यावा. यात प्रथम दोनदा आवृत्ति झालेला खंड उद्ग्राह होय. नंतरचा देंकार पुष्कळ असलेला, दोनदा योजलेला, दुसऱ्या वेळी अधिक स्वरूप असणारी आवृत्ति असणारा दुसरा खंड

द्वितीयवारे त्वधिकं कथ्यते यथा—गड्पक् देंगक् गडड्दक् देंगक्, इति । तदेंगडदक्टें थोंकदथोंगक् तटे कटदकट् दरे होंकथोरेहेटैतकें धिकथोंटैं थों टैं थों टैं, इति तृतीयखण्डं शुद्धादिपाटरचितम् ॥

ततः पुनः प्राचीनदेंकारखण्डं सकृत् । ततः गड्दक् दग्निनधिकाधिक तकदेंगि कथन हकदक दडक दरगड धिरिगिड धरगड्दक् । दरगरदग धिरगडदग२, तकधिंगथोंगटे धिकथोंगटै थिक थोडिं खुं खुततक् थोरगड२, तक् थोरगडदक् थोतक् थोतक् थोरगड थोरगड तक् धिकथोंगटें, इति वर्णसरात्मकं खण्डम् ।

ततः प्राचीनं शुद्धादिनिर्मितं स्वल्पम् । एतावत्पर्यन्तं चच्चत्पुटे । गड्दग् टेंद्रग् थोहटें हेते दहं थो२, तद धिधि थों थों रघटे टैं थों तथों तकथों

गड्दगदे गिनदेंगक् तु थं हं देंगक् देंगनथ गनतदिगि नत्तत्तेक्कटेंदेंगिनतक्कट खुखुघंघं देंगक्, असा देंकारखंड दोनदा (योजावा). दुसऱ्या वेळा अधिक (स्वरूप) सांगितले आहे ते असे– गड्पक् देंगक् गडड्दक् देंगक्.

तदेंगडदक्टें थोंकदथोंगक् तटे कटदकट् दरे होंकथोरेहेटैतक्कें धिकथोंटैं थों टैं थों टैं, असा तिसरा खंड शुद्ध इत्यादी पाटांनी रचलेला (योजावा).

नंतर पूर्वीचा देंकारखंड एक वेळा (योजावा).

मग गडदक् दग्निनधिकाधिक तकदेंगि कथन हकदक दडक दरगड धिरिगिड धरगड्दक्; दरगरदग धिरगडदग धिरगडदग तकधिंगथोंगटे धिकथोंगटै थिक थोडिं खुं खुततक् थोरगड थोरगड तक् थोरगडदक् थोतक् थोतक् थोरगड थोरगड तक् धिकथोंगटें असा वर्णसरस्वरूपाचा खंड (योजावा).

नंतर शुद्ध इत्यादी पाटांनी निर्माण केलेला पूर्वीचा अल्प खंड (योजावा). येथपर्यंत चच्चत्पुट तालात (योजावे).

गड्दग् टेंद्रग् थोहटें हेते दहं थो थो तद धिधि थों थों रघटे टैं थों तथों तकथों

मेलापक होय. मग शुद्ध इत्यादी पाटांनी निर्मिलेला तिसरा खंड ध्रुव होय. मग ध्रुवाचा शेष असणाऱ्या, एकवार योजलेल्या देंकारखंडानंतर वर्णसर स्वरूपाचा चवथा दीर्घ खंड अंतर होय. नंतर शुद्ध इत्यादी पाटांनी निर्मिलेला अल्प असा पाचवा खंड आभोग होय. या रीतीने इतरत्रही उद्ग्राह इत्यादी भाग यथासंभव पहावे. येथपर्यंतचे ओतेचे स्वरूप चच्चत्पुट तालात सांगितले आहे. छंडण हा वेगळा वाद्यप्रबंध असूनही ओतेचे अंग म्हणून (येथे दिलेला असल्याने), ओतेमध्येच अंतर्भूत असलेला असा, निःसारुक तालात योजावा.

धिकथोंटें, इति निःसारुके छण्डणः । टेंकारस्थाने देंकार इत्यन्ये ॥
इत्योता ।

कृत्वैकवारमुद्ग्राहं नातिदीर्घो न चाल्पकः ॥ ९६२ ॥
वादकोद्घोषगम्भीरो ध्वनिमुच्चतरं दधत् ।
त्रिः खण्डोऽभ्यस्यते कूटैर्बद्धो वर्णसरेण वा ॥ ९६३ ॥
मुहुर्विधायोपशमं छण्डणो यत्र रज्यते ।
गजरोऽसावुट्टवणं स्यादस्यादौ पुनः पुनः ॥ ९६४ ॥
एकताल्यामुट्टवणं तस्यां निःसारुकेऽथवा ।
भवेदुपशमोऽन्यत्र नास्य तालो नियम्यते ॥ ९६५ ॥
गजरावयवाः सर्वे वाद्यन्ते ते निरन्तराः ।

धिकथोंटें असा निःसारु तालातील छंडण होय.

दुसरे (विद्वान) टेंकाराच्या जागी देंकार (मानतात).
ही ओता होय.

ज्यात फार दीर्घ किंवा फार थोडा नसणारा उद्ग्राह एक वेळा योजून, (९६२) वादकाच्या (पाटाक्षरांच्या उच्चारण्याच्या) नादाने गंभीर असा उच्चतर आवाज असणारा, कूट पाटांनी रचलेला किंवा वर्णसराने रचलेला खंड तीन वेळा योजला जातो (९६३) (आणि) उपशम (नावाचा वाद्यप्रबंध) वारंवार योजून रंजकपणे छंडण योजला जातो तो गजर होय. त्याच्या आरंभी उट्टवण पुन्हा पुन्हा असते. (९६४) (ते) उट्टवण एकताली तालात (असते). त्या (एकतालीत) किंवा निःसारुकात उपशम योजलेला असतो. इतरत्र या (उपशमाचा) ताल नियमित केलेला नसतो. (९६५)

गजराचे ते सर्व भाग अखंडपणे वाजवले जातात. (९६६–) जसे–तथोह तथोह

क० आता गजराचे लक्षण देत आहे–

या गजरात प्रथम एकवेळा उद्ग्राह योजून, कूटवर्णांनी म्हणजे पटह इत्यादी वाद्यांमध्ये साधारणपणे वाजवल्या जाणाऱ्या अक्षरांनी किंवा वर्णसराने रचलेला खंड तीन वेळा वाजवला जातो. 'अतिदीर्घ नसणे' इत्यादी खंडाची विशेषणे जाणावी. फार दीर्घ नसणारा किंवा फार ह्रस्व नसणारा. वादकाच्या उद्घोषाने गंभीर असा उच्चतर नाद असणारा तो खंड असतो. 'वादक' या शब्दाने स्वतःच्या तोंडानेच पाटांची अक्षरे म्हणण्यात निष्णात असणारा तालधारक किंवा पटह इत्यादी वाद्यांचा वादक सांगितला आहे; त्याचा उद्घोष म्हणजे म्हणणे किंवा वाजवणे यांचा भरदार नाद, त्या नादाने गंभीर. उपशम नावाचा पुढे सांगितला जाणारा वाद्यप्रबंध वारंवार योजून ज्यात छंडण रंजकपणे योजला जातो तो गजरप्रबंध होय. पुढे सांगितले जाणारे उट्टवण या गजराच्या आरंभी पुन्हा पुन्हा योजले जाते. ते उट्टवण एकताली तालात असते. त्या एकतालीत किंवा निःसारुकात उपशम योजलेला असतो. गजराचे अंग याखेरीज इतरत्र म्हणजे दुसऱ्या प्रबंधाचे अंग असता किंवा स्वतंत्रपणे योजला असता या उपशमाचा तालनियम असत नाही. येथेच फक्त तालनियम असतो. (९६२ ते ९६५, ९६६–)

यथा– तथोह तथोह धिथों२, हटे। थोंहदग थोहटें, इत्युद्ग्रवणमेकताल्यां पुनः पुनः। थोंटें दंदगेन थोंगटें गें धिकतक, इत्युद्ग्राहः। प्रतिग्राहणा वोच्यते। अयं किलैकताल्यां कृतः। गड्दगत देंगगनग्दिहिक् कथोंगतकधिक थोंगटेंहें थोदगक्। गिड्दक्थोंगक्थों३, देंथोंहटगथों३, दें इति त्रिरेकताल्यां खण्डः। केवलोऽप्ययं खण्डो गजर इत्युच्यते। गड्दक्थोंगक्थोंगक्थोहरघट थरे, इत्येकताल्यां पुनः पुनरुपशमः। थोहटें, इति च्छण्डणः। एतत्सर्वं नैरन्तर्येण वाद्यते॥

इति गजरः।

प्रत्येकं द्विः प्रयुक्तेनोपशमेनान्तयोगिना॥ ९६६॥
युक्तं खण्डत्रयं शुद्धैः कूटैः खण्डैश्च निर्मितम्।
पाटैर्व्यस्तैः समस्तैश्च बद्धं वर्णसरेण वा॥ ९६७॥

धिथों धिथों हटे, थोंहदग थोहटें, हे उद्ग्रवण एकतालीत पुन्हा पुन्हा (योजले जाते.) थोंटें दंदगेन थोंगटें गें धिक्तक हा उद्ग्राह होय. किंवा (याला) प्रतिग्राहणा म्हटले जाते. हा खरोखर एकतालीत योजला जातो–गड्दगत देंगगनग्दिहिक्. कथोंगतकधिक थोंगटें-हें थोदगक्. गिड्दक्थोंगक्थों गिड्दक्थोंगक्थों गिड्दक्थोंगक्थों देंथोंहटगथों देंथोंहटगथों देंथोंहटगथों दें हा खंड एकतालीत तीन वेळा (योजला जातो). केवळ हा खंडही गजर म्हणून म्हटला जातो. गड्दक्थोंगक्थोंगक्थोहरघट थरे, हा उपशम एकतालीत पुन्हा पुन्हा (योजला जातो). थोहटें हा छंडण होय. हे सर्व अखंडपणे वाजवले जाते.

हा गजर होय.

प्रत्येकी दोन वेळा योजलेल्या अशा शेवटी असणाऱ्या उपशमाने (९६६) युक्त, शुद्ध, कूट व खंड (वर्णांनी) निर्माण केलेले, वेगवेगळेपणाने योजलेल्या व एकत्रपणे योजलेल्या पाटांनी किंवा किंवा वर्णसराने बांधलेले तीन खंड जिच्यात असतात व वादकाचा

क० त्याचा प्रस्तार दाखवीत आहे–

उद्ग्राहाचा प्रस्तार देऊन 'किंवा प्रतिग्राहणा म्हटली जाते' असे सांगितले आहे; त्यावरून उद्ग्राहाचे हे दुसरे नाव सांगितले आहे. लोकात तांडिक तसे म्हणतात. प्राकृत स्वरूपात 'पडिघा' म्हणून गजराचे सर्व भाग वाजवले जातात. 'अखंडपणे' असे म्हटले असल्याने यात अवयव म्हणून सांगितलेली उपशम, छंडण व उद्ग्रवण ही तीन अखंडपणे योजावी. उद्ग्राह व ध्रुव यामुळे हा गजर दोन धातूंचा जाणावा. उपशम इत्यादी वेगळे असणारे प्रबंधही अंगरूपाने सांगितलेले योजले जातात. याप्रमाणे इतरत्रही जाणावे.

क० आता रिगोणीचे लक्षण देत आहे–

दोनदा योजलेल्या अशा खंडाच्या शेवटी असणाऱ्या उपशमाने युक्त, शुद्ध, कूट व खंड यांनी निर्मिलेले, वेगवेगळेपणाने व एकत्रपणे योजलेल्या नागबंध इत्यादी पाटांनी किंवा वर्णसराने बांधलेले, असे प्रत्येकी तीन खंड जिच्यात असतात ती रिगोणी होय.

यस्यां स्याद्वादकस्थूलमिलत्कोलाहलाकुलम् ।
छण्डणान्ता रिगोणी सा दधती ध्वनिमुत्तमम् ॥ ९६८ ॥
अस्यामुद्भवणं कार्यं वैकल्पिकमुपक्रमे ।
दीप्तनृत्ते भवेदेषोपशमा ललिता मता [८५] ॥ ९६९ ॥
ललितं यद्युद्भवणं तदा तल्ललिते भवेत् ।
अन्त्यखण्डात्सोपशमच्छण्डणादीप्तनर्तनम् ॥ ९७० ॥

स्थूल (म्हणजे मोठा) आवाज मिसळत असल्याने कोलाहलपूर्ण उत्तम नाद जी धारण करते व जिच्या शेवटी छंडण असतो ती रिगोणी होय. (९६७, ९६८)

हिच्यात आरंभी विकल्पाने उद्भवण योजावे. ही दीप्त (म्हणजे उद्धत) नृत्तात योजावी. उपशम ललितात (म्हणजे लास्य नृत्यात) मानले आहेत. (९६९)

जर उद्भवण ललित असेल तर ते ललित (नृत्तात) योजायचे असते. उपशम व छंडण यांनी युक्त शेवटच्या खंडापासून दीप्त नर्तन (प्रयुक्त करावे). (९७०)

शुद्ध म्हणजे त्या त्या वाद्यात ठराविक असणारे वर्ण, कूट म्हणजे सर्व वाद्यांना साधारण वर्ण होत; येथे खंड या शब्दाने वर्णसमुदायाचे अवयव असणारे वर्ण म्हटले आहेत, त्यांनी निर्मिलेले (खंड).

वादक मध्ये मध्ये वाद्याच्या नादाशी मिळवून कोलाहल स्वरूपाचा मोठा आवाज उत्पन्न करतो; त्या आवाजाने मिश्रित उत्तम म्हणजे ऐकण्यास सुखद असा आवाज धारण करणारी ही रिगोणी असते. तिच्या शेवटी छंडण असतो. या रिगोणीत आरंभी उद्भवण वैकल्पिक योजावे. ही रिगोणी दीप्त म्हणजे उद्धत नृत्तात योजायची असते. खंडांच्या शेवटी त्यांचे अंग म्हणून योजलेले उपशम ललित म्हणजे लास्यनृत्यात मानले आहेत. उद्भवण जर स्वतः ललित असेल तर ते उद्भवण ललित नृत्तात योजायचे असते. यावरून उद्भवणाचे स्वरूप केव्हा उद्धतही असते (हे कळते). शेवटच्या खंडापासून आरंभ करून उपशमयुक्त छंडणात उद्धत नृत्त प्रयुक्त करावे. (९६६–९७०)

---

८५. 'उपशमा ललिता मता' असा पाठ अडचार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तींत छापलेला आहे. कल्लिनाथाने–

'उपशमाः खण्डान्तेष्वङ्गत्वेन प्रयुक्ताः । ललिते लास्यनृत्ये मताः' । असे स्पष्टीकरण दिले आहे. याचा अर्थ 'खंडांच्या शेवटी अंगरूपाने योजलेले उपशम ललित म्हणजे लास्यनृत्यात मानले आहेत' असा होतो. सिंहभूपालाचे स्पष्टीकरण यास जुळणारे असे आहे. यावरून मूळ पाठ 'उपशमा ललिते मताः' असा घ्यायला हवा. म्हणून हा पाठ स्वीकारून भाषांतर केले आहे. 'उपशमा ललिता मता' या पाठाने अर्थ नीट कळत नाही.

यथा—तक्कें धिक्कें तकधिक तककि थोंकटगेन२ थोंगक्कथों२ इति प्रथमखण्डम् । टैथोटेंगें त्थोंदिथोंद्दधिहटें । इत्युपशमो द्विः । तक्कर्ग दडरद कुथिकुर्गदडधिक दक्कर्ग दडग्दक्थोंगत्तकधिक कधिकत धिककधि टेंगेंनथोंग२ थोंगक्कथों इति द्वितीयखण्डम् । टें थों हटगें थोंटें । इत्युपशमो द्विः । थोंगटं दरगड धिरगड धित्थाः थोंकट तक्थों कटधिक्कक् । थोंधिक तद्धितक् । इति तृतीयखण्डम् । कत्थोंटक थोंहकटगे धिकटै थौ हटगें थों हटें इत्युपशमो द्विः । तथों गिड्दक् दिगनदिगन दिगनक थोंगतद्धितक् । थोंहटें । इतिछण्डणः । इत्येकताल्यामुदाहरणम् ।

इति रिगोणी ।

नातिदीर्घं द्विराद्यं स्यात्खण्डं शुद्धादिनिर्मितम् ।
यद्वा वर्णसरेणाथ तादृक्खण्डं सकृद्भवेत् ॥ ९७१ ॥

जसे– तक्कें धिक्कें तकधिक तककि थोंकटगेन थोंकटगेन थोंगक्कथों थोंगक्कथों थोंगक्कथों, हा पहिला खंड.

टैथोटेंगें त्थोंदिथोंद्दधिहटें, हा उपशम दोनदा (योजायचा).

तक्कर्ग दडरद कुथिकुर्गदडधिक्क दक्कर्ग दडग्दक्थोंगत्तकधिक कधिकत धिककधि टेंगेंनथोंग टेंगेंनथोंग थोंगक्कथों, हा दुसरा खंड. टें थों हटगें थोंटें, हा उपशम दोन वेळा (योजायचा). थोंगटं दरगड धिरगड धित्थाः थोंकट तक्थों कटधिक्कक्; थोंधिक तद्धितक्, हा तिसरा खंड. कत्थोंटक्क थोंहकटगे धिकटै थौ हटगें थों हटें, हा उपशम दोनदा (योजायचा). तथों गिड्दक् दिगनदिगन दिगनक थोंगतद्धितक्; थोंहटें, हा छंडण. हे एकतालीमधले उदाहरण.

ही रिगोणी होय.

शुद्ध इत्यादी (पाटांनी) किंवा वर्णसराने निर्मिलेला, फार दीर्घ नसणारा पहिला खंड दोन वेळा योजावा. नंतर तशा प्रकारचा (दुसरा) खंड एकवेळ योजावा. (९७१)

क० ' तक्कें धिक्कें ' इत्यादी प्रस्तार जाणावा. लिहिलेला प्रस्तार हे एकताली तालातील उदाहरण होय. या रीतीने दुसऱ्या तालातीलही पहावे. तीन खंड असल्याने हा (वाद्यप्रबंध) तीन घातूंचा जाणावा.

क० आता कवितेचे लक्षण देत आहे–

या कवितात शुद्ध इत्यादींनी किंवा वर्णसराने निर्मिलेला, फार दीर्घ नसणारा पहिला खंड दोन वेळा योजायचा असतो. ' शुद्ध इत्यादि ' यातील ' इत्यादि ' या शब्दाने कूट व खंड (पाट) घ्यायचे. नंतर पहिल्या खंडासारखा असणारा दुसरा खंड एकवार योजायचा असतो. येथे दोन

इत्युद्ग्राहध्रुवौ कृत्वा स्वोद्ग्राहान्त्यदलेऽथवा ।
स्वोद्ग्राहे यत्र मुक्तिस्तत्कवितं कवयो विदुः ॥ ९७२ ॥
अस्य नामान्तरं प्राहुरन्येऽवच्छेद इत्यपि ।
भवेदिह द्रुतं मानं वर्णाः प्रायः स्युरुद्धताः ॥ ९७३ ॥
बाहुल्यान्नर्तनं दीप्तं निःशङ्केनेति कीर्तितम् ।

यथा – गड्दकूदगिनदंदं गिनथोंग धिक्कट नकाधितक देंहकदर गडदरिक्थ रिक्थ रिदरगड थरिक थों गंडके । धिक्थोंटें२, इत्युद्ग्राहो द्विः । झेंकक नखखिन२ तहें हके नखखिनथों, इति ध्रुवाख्यं खण्डम् । ततो देंहकडर-गडेत्यादिनोद्ग्राहान्त्यखण्डेनोद्ग्राहेण वा सकलेन गड्दगित्यादिना त्यागः । निःसारुतालेचेदमुदाहरणम् ।

इति कवितम् ।

असे उद्ग्राह व ध्रुव हे योजून, स्वतःच्या उद्ग्राहाच्या शेवटच्या अर्ध्या भागात किंवा स्वतःच्या (सर्व) उद्ग्राहात ज्यामध्ये शेवट केला जातो त्याला विद्वान कवित म्हणतात. (९७२)

दुसरे (आचार्य) याचे दुसरे नाव अवच्छेद म्हणूनही सांगतात. यात (लयीचे) प्रमाण द्रुत असते. वर्ण बहुशः उद्धत असतात. (९७३) बाहुल्याने (यात) दीप्त नर्तन (असते) असे निःशंकाने सांगितले आहे. (९७४–)

जसे– गडदकूदगिनदंदं गिनथोंग धिक्कट नकाधितक देंहकदर गडदरिक्थ रिक्थ रिदरगड थरिक थों गंडके । धिक्थोंटें धिक्थोंटें असा उद्ग्राह दोन वेळा. झेंकक नखखिन नखखिन तहें हके नखखिनथों हा ध्रुव नावाचा खंड. मग देंहकडरगड इत्यादी उद्ग्राहाच्या शेवटच्या खंडाने किंवा गड्दक् इत्यादी सगळ्या उद्ग्राहाने शेवट. हे उदाहरण निःसारु-तालातील (होय).

हे कवित होय.

वेळा योजलेला पहिला खंड उद्ग्राह व नंतर एकवेळ योजलेला ध्रुव होय. ते योजून स्वतःच्या उद्ग्राहाच्या शेवटच्या अर्ध्या भागाने किंवा स्वतःच्या सर्व उद्ग्राहाने ज्यात न्यास म्हणजे शेवट केला जातो त्याला कवित म्हणून जाणतात असा संबंध घ्यायचा. दुसरे विद्वान या कवितांचे दुसरे नाव अवच्छेद म्हणून सांगतात. कवितात लयीचे प्रमाण द्रुत असते व प्रचुरतेने उद्धत (म्हणजे जोरदार) वर्ण असतात. वर्णांना अनुसरून दीप्त नर्तन असते. (९७१ ते ९७३, ९७४–)

क० लक्षणाला अनुसरून ' गड्दग्दगिन ' - - इत्यादि प्रस्तार पहावा. मेलापक व आभोग नसल्याने हे कवित दोन धातूंचे जाणावे.

उद्ग्राहोऽल्पो ध्रुवो नातिदीर्घः शुद्धादिनिर्मितः ॥ ९७४ ॥
स्याद्वर्णसरबद्धो वा छण्डणोऽन्ते यदा तदा ।
पदं वदन्ति वाद्यज्ञाः प्रायस्तद्दीप्तनर्तने ॥ ९७५ ॥
वादयित्वा यतिं मध्ये प्रबन्धस्य विमुच्यते ।
पाटेन यत्र तत्प्रोक्तमपरैः सूरिभिः पदम् ॥ ९७६ ॥

यथा—तदेहें तदें ततक्तदै । इत्युद्ग्राहः । तकट धिकट धिधिकिट-धिकिटर्गाड्दगधिकतक धिकथोंगटें । इति ध्रुवः । गत कटधिधि कटधिक्किग्ड-दगधिधिकट धिक्किरडाडगधिगक्किग्डाहगथोंटैं हंधिक्कथोंगटें । इति च्छण्डणः । इदमुदाहरणं वर्णताले ॥

इति पदम् ।

एकताल्यां द्रुते माने नर्तनारम्भगोचरे ।
समं च करटाटीपिकाहलावादने सति ॥ ९७७ ॥

अल्प उद्ग्राह, शुद्ध इत्यादी (पाटांनी) किंवा वर्णसराने बांधलेला फार दीर्घ नसणारा ध्रुव व शेवटी जेव्हा छंडण असतो तेव्हा त्याला वाद्यजाणकार पद म्हणतात. ते प्रायः दीप्त नर्तनात (योजले जाते.) (९७४, ९७५) (या) प्रबंधाच्या मध्ये यति वाजवून पाटाने ज्यात शेवट केला जातो त्याला दुसऱ्या विद्वानांनी पद म्हटले आहे. (९७६) जसे– तदेहें तदें ततक्तदै, हा उद्ग्राह. तकट धिकट धिधिकिटधिकिटर्गाड्दगधिकतक धिकथोंगटें, हा ध्रुव. गत कटधिधि कटधिक्किग्डदगधिधिकट धिक्किरडाडगधिगक्किग्डाहगथोंटैं हंधिक्कथोंगटें, हा छंडण. हे उदाहरण वर्णतालातले होय.

हे पद होय.

नर्तनाचा आरंभ हा विषय असता, एकताली तालात व द्रुत लयीच्या प्रमाणात, करटेची टीपि व काहलेचे वादन समकाल योजले असता, (९७७) एका (म्हणजे केवळ)

क० आता पदाचे लक्षण देत आहे–

'फार दीर्घ नसणारा ध्रुव' या म्हणण्याने उद्ग्राहाच्या दृष्टीने दुप्पट दीर्घपणा विवक्षित आहे; त्यापेक्षा दीर्घ असण्याचा निषेध केला आहे. बाकीचे (लक्षण) स्पष्ट आहे. दुसऱ्या मताने पदाचे लक्षण सांगत आहे–

वर सांगितलेले लक्षण असणाऱ्या पदप्रबंधाच्या मध्ये म्हणजे उद्ग्राह व ध्रुव यांमध्ये, अर्थात उद्ग्राहानंतर व ध्रुवाच्या पूर्वी प्रथम सांगितलेला यतिप्रबंध वाजवून, त्यापूर्वी सांगितलेल्या हस्तपाटांतील कोणत्या तरी एका पाटाने ज्यात शेवट केला जातो ते पद म्हटले आहे. उद्ग्राह व ध्रुवक असल्याने हे पद दोन धातूंचे होय. (९७४,९७५,९७६) तदेहें तदें-असा हा प्रस्तार होय.

क० आता मेलापकाचे लक्षण देत आहे–

'नर्तनारम्भगोचरे' म्हणजे नृत्ताचा आरंभ या विषयामध्ये 'समं' म्हणजे एकाच वेळी. करटेची टीपि व काहलेचे वादन यांचा करटाटीपिकाहलावादन या शब्दात द्वन्द्व समास असून

अभ्यस्तो वाद्यखण्डोऽल्पः कूटेनैकेन निर्मितः ।
तद्धीमिति च्छण्डनान्तः स्मृतो मेलापको बुधैः ॥ ९७८ ॥
विद्यावन्तः स्वसमये प्राहुर्मेलापनीमिमाम् ।
वर्णानां टिरिकीत्येषामावृत्तिष्टीपिरुच्यते ॥ ९७९ ॥

यथा– थोंगटें गड्दग्नं थोंगटें । इति यावत्प्रबन्धपूर्तिं पुनःपुनर्वादनीयम् । तद्धीमिति । इति च्छण्डणः ।

इति मेलापकः ।

खण्डं शुद्धादिभिः पाटैर्बद्धं वर्णसरेण वा
अल्पं कोमलनादं च सुकुमाराक्षरान्वितम् ॥ ९८० ॥
अभ्यस्तं कोमले नृत्ते भवेदुपशमाभिधम् ।
यथा– टेंथोंक्रगे थोटेटे थोंहटगे थाथें थोंटे ॥

इत्युपशमः ।

कूट (पाटाने) निर्मिलेला अल्प असा वाद्यखंड ज्यात आवृत्त होतो आणि 'तद्धीं' असा छंडण ज्याच्या शेवटी असतो तो विद्वानांनी मेलापक मानला आहे. (९७८)

विद्यावान आपल्या संकेतानुसार हिला मेलापनी म्हणतात. 'टिरिकि' या वर्णांची आवृत्ति टीपि म्हटली जाते. (९७९) जसे–'थोंगटें गड्दग्नं थोंगटें', असे प्रबंध पूर्ण होईपर्यंत पुन्हा पुन्हा वाजवायचे. 'तद्धीं' हा छंडण होय.

हा मेलापक होय.

शुद्ध इत्यादी पाटांनी किंवा वर्णसराने बांधलेला, अल्प, कोमल नाद असणारा, सुकुमार अक्षरांनी युक्त, असा जो आवृत्त होणारा खंड कोमल नृत्तात (योजला जातो) तो उपशम नावाचा होय. (९८०, ९८१–)

जसे–टेंथोंक्रगे थोटेटे थोंहटगे थाथें थोंटे.

हा उपशम होय.

तो एकवचनी योजला आहे. एका कूटाने म्हणजे शुद्ध व खंड वगळून (केवळ कूट पाटाने). 'तद्धीं' हा अनुकरणवाचक शब्द आहे. तशा स्वरूपाचा छंडण ज्याच्या शेवटी असतो तो (मेलापक) होय. 'विद्यावान' म्हणजे केवळ लक्ष्याचा प्रयोग करणारे. त्यांनाच कन्नडलोक लौकिक भाषेत 'विद्यावंतरु' म्हणतात. 'टिरिकि' या वर्णांची आवृत्ती म्हणजे टिरिकि टिरिकि टिरिकि टिरिकि अशी (योजणे) हे टीपीचे स्वरूप सांगितले आहे. (९७७–९७९)

'थोंगटें गड्दग्नं' ... इत्यादी प्रस्तार होय. यात फक्त मेलापक हाच खंड असल्याने तो एक धातूचा जाणावा.

क० आता उपशमाचे लक्षण देत आहे– 'शुद्ध इत्यादि' यातील 'इत्यादि' शब्दाने कूट पाट घ्यायचे. (९८०, ९८१–) टेंथोंकट इत्यादि प्रस्तार होय. हाही प्रबंध एक धातूचा आहे.

आदौ वाद्यप्रबन्धानां शुद्धकूटादिनिर्मितः ॥ ९८१ ॥
यः खण्डो वाद्यते प्राहुरुद्ग्राहं तं महत्तमाः ।
उद्ग्राहोपशमादीनां यद्यप्यन्याङ्गतोदिता ॥ ९८२ ॥
यावत्पूरणमावृत्तेस्तथापि स्यात्प्रबन्धता ।
द्विरावृत्तिरनावृत्तिर्वा स्यादङ्गतया स्थितौ ॥ ९८३ ॥

यथा – तें टें है तट्टें तक्रतटे, इति यावत्प्रबन्धपूरणमभ्यासादुद्ग्राहः प्रबन्धः । अङ्गत्वं तु द्विः सकृद्वा । प्राक्प्रयोगस्त्वङ्गप्रबन्धयोस्तुल्यः ॥

इत्युद्ग्राहः ।

शुद्ध, कूट इत्यादी (पाटांनी) निर्मिलेला जो खंड वाद्यप्रबंधांच्या आरंभी वाजवला जातो त्याला श्रेष्ठ (आचार्य) उद्ग्राह म्हणतात. उद्ग्राह, उपशम इत्यादी जरी प्रबंधाची अंगे म्हणून सांगितले आहेत तरी आवृत्तींची संख्या पुरी होईपर्यंत त्यांचे प्रबंधस्वरूप होय. (९८१, ९८२) (ते) अंग म्हणून (योजले) असताना (त्यांची) दोन वेळा आवृत्ति असते किंवा आवृत्ति नसते. (९८३–)

जसे– तें टें है तट्टें तक्रतटे, अशी प्रबंधाची पूर्णता होईपर्यंतच्या संख्येची आवृत्ति योजल्याने उद्ग्राह हा प्रबंध (होतो). अंगस्वरूप असता दोन वेळा किंवा एक वेळ (योजना केली जाते). अंग व प्रबंध (या दोन्ही स्वरूपांत) (त्याचा) पूर्वप्रयोग समानच (असतो).

हा उद्ग्राह होय.

क० आता उद्ग्राहाचे लक्षण देत आहे–

'शुद्ध, कूट इत्यादींनी निर्मिलेला' यातील 'इत्यादि' शब्दाने खंड (पाट) घ्यायचे. 'महत्तमाः' म्हणजे अत्यंत महान असे आचार्य. पण उद्ग्राह इत्यादी प्रबंधाचे भाग म्हणून सांगितले आहेत; मग त्यांचे स्वतंत्र असे प्रबंधाचे स्वरूप कसे ? असे म्हटल्यास सांगत आहे–

'उद्ग्राह, उपशम इत्यादींचे' यातील 'इत्यादि' या शब्दाने मेलापक, छंडण वगैरे घ्यायचे. यांचे दुसऱ्याचे म्हणजे दुसऱ्या प्रबंधाचे अंगस्वरूप जरी सांगितले असले तरीही जितक्या आवृत्तींनी प्रबंधाची आकांक्षाबुद्धि पूर्ण होते तेवढ्या आवृत्तींच्या मुळे प्रबंधस्वरूप असते. अर्थ असा की उद्ग्राह इत्यादी भागांतील जेथे एकच प्रबंधरूपाने सांगितलेला असतो तेथे इतर भागांच्या जागी तोच योजून अवयवीस्वरूपाने प्रबंध पुरा करावा. म्हणूनच उद्ग्राह, उपशम इत्यादी प्रबंधांच्या बाबतीत एकधातु असण्याचा दोषही दूर करावा. एक धातु असता प्रबंध नसण्याचा दोष प्राप्त होतो; कारण प्रबंधांच्या बाबतीत अनेक अवयव म्हणजे भाग नियमाने असतात. एक धातु असता त्या (अवयवांचा) अभाव असतो. त्यात आवृत्तीने निर्माण केलेले अनेकत्व स्वीकारले म्हणजे तो दोष येत नाही. असे सर्व योग्य ठरते. पण असे जर असेल तर प्रबंधस्वरूप असणे व दुसऱ्या (प्रबंधाचे) अंगस्वरूप असणे यात फरक काय ? असे म्हटल्यास सांगत आहे– अंगस्वरूप असता दोन वेळा आवृत्ति असते किंवा एकवेळा प्रयोग केलेला असतो; पुष्कळदा आवृत्ति योजल्यास प्रबंधस्वरूप होते. (९८१ ते ९८३)

उद्धतं ध्वनितं कूटबद्धं खण्डं मुहुर्मुहुः ।
प्रयुक्तं स्यात्प्रहरणं ध्रुवाद्याभोगगोचरे ॥ ९८४ ॥
नृत्ते प्रायः प्रयोक्तव्यमन्यत्रापीच्छया भवेत् ।

यथा—कथोंगक्क थोंगत्थोंगटथोंगक्क थोग थोगथोक् कथोगक् थोंकट थोगक्थोकटं थोगक् । गड्दक्काधिक थोंगक् । टगें दंथोंह । दिङ्निकुकुधित्थो हधिक्कं धिटं इति पुनः पुनः प्रयोज्यम् । एकताल्यामिदमुदाहरणम् ।

इति प्रहरणम् ।

उद्ग्राहः स्यात्ततः खण्डं शुद्धकूटादिनिर्मितम् ॥ ९८५ ॥
तद्वर्णसरबद्धं वा प्रयुज्य द्विरिदं द्वयम् ।
ततः प्राक्खण्डसहितं तादृक्कूटमयं दलम् ॥ ९८६ ॥

कूट (पाटांनी) बांधलेला (व) उच्च नाद असणारा खंड जर वारंवार प्रयुक्त केला तर ते प्रहरण होय. ध्रुव इत्यादी व आभोग असणाऱ्या नृत्तात ते प्रायः योजावे. इच्छेनुसार इतरत्रही ते योजावे. (९८४, ९८५–)

जसे–कथोंगक्क थोंगत्थोंगटथोंगक्क थोग थोगथोक् कथोगक् थोंकट थोगक्थोकटं थोगक्. गड्दक्काधिक थोंगक्. टगें दंथोंह. दिङ्निकुकुधित्थो हधिक्कं धिटं. असे पुन्हा पुन्हा प्रयुक्त करावे. हे उदाहरण एकताली तालातले होय.

हे प्रहरण होय.

(आरंभी) उद्ग्राह योजावा; मग शुद्ध व कूट इत्यादी (पाटांनी) निर्मिलेला (९८५) किंवा वर्णसराने बांधलेला (दुसरा) खंड (योजावा); हे दोन, दोन वेळा प्रयुक्त करून, नंतर पूर्वीच्या (म्हणजे दुसऱ्या) खंडासह तशासारखा कूट (वर्ण) प्रचुर (तिसरा)

' तें टें हें तट्टें ' हा प्रस्तार होय. उद्ग्राह दुसऱ्या (प्रबंधाचा) भाग म्हणून असताना किंवा स्वतंत्रपणे प्रबंध म्हणून असताना प्रथम प्रयोग सारखाच असतो. आवृत्तीच भेद निर्माण करणाऱ्या असतात. हाही एक धातूचा होय.

क० आता प्रहरणाचे लक्षण देत आहे–

' उद्धतं ध्वनितं ' म्हणजे उद्धत नादयुक्त; कूटबद्ध म्हणजे कूट (पाटांनीच) फक्त बांधलेला. असा खंड वारंवार योजला असता प्रहरण होते. ध्रुव इत्यादी सर्व भागांनी मर्यादित असे जेवढे नृत्त असते तेवढ्या नृत्तात खंडाची अनेकवार आवृत्ति करून ते प्रायः योजावे. इतरत्र म्हणजे खंडनृत्तात ते इच्छेनुसार योजावे. (९८४, ९८५–)

' कथों गक्कथोम् ' इत्यादी प्रस्तार होय. हाही प्रबंध एक धातूचा आहे.

क० आता अवत्सकाचे लक्षण देत आहे–

उद्ग्राह व दुसरा खंड दोनदा योजून नंतर पूर्वीच्या म्हणजे दुसऱ्या खंडासह कूटमय म्हणजे कूट वर्ण प्रचुरपणे असलेला तशा सारखा म्हणजे दुसऱ्या खंडासारखा खंड अर्थात तिसरा खंड

वाद्यते छण्डणोऽन्ते च यत्र सोऽवत्सको भवेत् ।
[८६]प्रयोज्यं नर्तने दीप्ते शार्ङ्गदेवेन कीर्तितः ॥ ९८७ ॥

यथा—गड्दग्दंदं गड्दक्थिक्कट तकधिक्कट तक्थित्तक्क् । इत्युद्ग्राहः । खडि खडि खखनख खिदक् झेंखखनख खिदत्तदक्क धिक्कककगिणनग थोंगदिहिकिं थोगदिहिक्कितक धिकथोंगटे गडक् । तकधिक थोंगटें । इति द्वितीयं खण्डम् । एतच्च सहोद्ग्रोहण पुनः पुनर्वादयेत् । झक झखिखिन्नखनखखित हूं खखनखझें खन खरिब तुडि हिदिहि । कथोंगक् । इति तृतीयखण्डं पूर्वखण्डेन सह वादयेत् । तकधिक तक्करे घटथथोंगक्क थोंगक्कटें, इति च्छण्डणः । इदमुदाहरणं रङ्गविद्याधरताले ।

इत्यवत्सकः ।

कूटादिबद्धः खण्डः स्याच्छण्डणो वाद्यमोक्षकः ।

खंड ज्यात वाजवला जातो व शेवटी छंडण (प्रयुक्त केला जातो) तो अवत्सक होय. दीप्त नर्तनात तो योजावा म्हणून शार्ङ्गदेवाने सांगितला आहे. (९८५, ९८६, ९८७)

जसे--गड्दग्दंदं गड्दक्थिक्कट तकधिक्कट तक्थित्तक्क्, हा उदग्राह होय. खडि खडि खखनख खिदक् झेंखखनख खिदत्तदक्क धिक्कककगिणनग थोंगदिहिकिं थोगदिहिक्कितक धिकथोंगटे गडक्; तकधिक थोंगटें, हा दुसरा खंड होय. उदग्राहासह हा पुन्हा पुन्हा(?) वाजवावा. झक झखिखिन्नखनखखित हूं खखनखझें खन खरिब तुडि हिदिहि; कथोंगक्, असा तिसरा खंड मागच्या खंडासह वाजवावा. तकधिक तक्करे घटथथोंगक्क थोंगक्कटें, हा छंडण होय. हे उदाहरण रंगविद्याधरतालातले होय.

हा अवत्सक होय.

कूट इत्यादी (पाटांनी) बांधलेला जो खंड वादनाचा शेवट करतो तो छंडण होय. (९८८–)

ज्यात वाजवला जातो व शेवटी छंडण वाजवला जातो तो अवत्सक होय. (९८५,९८६,९८७)

'गड्दग्दंदं' इत्यादी प्रस्तार होय. हा तीन धातूंचा (प्रबंध) आहे.

क० आता छंडणाचे लक्षण देत आहे–

'वाद्यमोक्षक' म्हणजे वाद्यप्रबंधाचा शेवट करणारा. हे (लक्षण) दुसऱ्या प्रबंधाचा भाग म्हणून असताना. स्वतंत्र प्रबंधाचे स्वरूप असता उद्ग्राहात सांगितलेला न्याय जाणावा. यात दोन्हींच्या बाबतीत (म्हणजे अंगस्वरूप असता व स्वतंत्र स्वरूप असता) शेवटी योजायचे स्वरूप सारखे असते. (९८८–)

---

८६. 'प्रयोज्यं' या ऐवजी 'प्रयोज्यो' असा पाठ योग्य वाटतो.

यथा -- गड्दग् टैंदवर तकथों थोंहटें हतटहें धों२ तकथों तकथों धिकथों तत धिधि थों थों रघ टै टै थोः तथोटे ॥

इति च्छण्डणः ।

शुद्धकूटादिभिर्बद्धः खण्डो वर्णसरेण वा ॥ ९८८ ॥
अभ्यस्तः स्याद् द्रुते माने तुडुका दीप्तनर्तने ।
द्रुताद् द्रुततरं मानमत्र लक्ष्येषु दृश्यते ॥ ९८९ ॥
उद्ग्राहध्रुवकाभोगे यत्रान्यतमखण्डकम् ।
वादनीयं परे प्राहुरन्ये तु तुडुकां जगुः ॥ ९९० ॥
उद्ग्राहध्रुवकाभोगोद्ग्राहाणां वादनं क्रमात् ।

जसे– गड्दग् टैंदवर तकथों थोंहटें हतटहें धों धों तकथों तकथों धिकथों तत धिधि थोंथों रघ टै टै थोः तथोटे.

हा छंडण होय.

शुद्ध व कूट इत्यादी (पाटांनी) किंवा वर्णसराने बांधलेला खंड (९८८) द्रुत लयीच्या प्रमाणात अनेकवार आवृत्त केला असता ती तुडुका (होय). ती दीप्त नर्तनात (योजावी).

हिच्यात लक्ष्यांमध्ये द्रुतापेक्षा अधिक द्रुत लयीचे प्रमाण दिसून येते. (९८९)

दुसरे (आचार्य) जिच्यात उद्ग्राह, ध्रुवक व आभोग यांपैकी कोणता तरी एक खंड वाजवायचा असतो (ती तुडुका म्हणून) सांगतात. इतर (आचार्यांनी) उद्ग्राह, ध्रुवक, आभोग व उद्ग्राह असे क्रमाने केलेले वादन तुडुका म्हणून सांगितले आहे. (९९०, ९९१–)

'गड्दगटें' इत्यादि प्रस्तार होय. हाही एक धातूचा प्रबंध होय.

क० आता तुडुकेचे लक्षण देत आहे–

द्रुत लयीच्या प्रमाणात, पुन्हा पुन्हा आवृत्त केलेला असा दीप्त नर्तनात योजलेला खंड तुडुका होय. देशी स्वरूप असल्याने अनियमितपणामुळे लक्ष्यांत द्रुतापेक्षा अधिक द्रुत लय दिसून येते. हिचेच दुसऱ्या मतानुसार लक्षण सांगत आहे–

दुसरे आचार्य हिच्यात म्हणजे तुडुकेमध्ये उद्ग्राह, ध्रुवक व आभोग यांतील कोणतातरी एक खंड वाजवावा असे म्हणतात. तेव्हा ही दोन धातूंची होय. पुन्हा आणखी दुसऱ्या मताने दुसरे लक्षण सांगत आहे–इतर आचार्यांनी उद्ग्राह, ध्रुवक, आभोग व उद्ग्राह यांचे क्रमाने केलेले वादन तुडुका म्हटले आहे. तेव्हा ही तीन धातूंची होते. (९८८ ते ९९०, ९९१–)

यथा– टें देंदगि तथोंगटेंधिकतः रघटे हे कथीः टेगेधिक तटथोंगः गण नगिः थोंगतक धिकथोंगटें, एकताल्यामिदमुदाहरणम् ॥

इति तुडुका ।

यत्र शुद्धादिभिर्बद्धः खण्डो वर्णसरेण वा ॥ ९९१ ॥
विशालः[८७] स्याद् द्रुतलयः पर्यन्ते तु विलम्बितः ।
दीप्तैर्वर्णैः क्वचित्क्वापि कोमलैश्चारुगुम्फितः ॥ ९९२ ॥
यत्रासौ मलपः प्रोक्तः प्रायिको दीप्तनर्तने ।
यत्रोद्ग्राहः सकृद् द्विर्वा ध्रुवकोऽथ सकृद्भवेत् ॥ ९९३ ॥
व्यापकाक्षरमिश्रैस्तद्धिथोंटेंदेंभिरक्षरैः ।
बद्धं निरन्तरयतिं प्राहुस्तं मलपं परे ॥ ९९४ ॥

जसे- टें देंदगि तथोंगटेंधिकतः रघटे हे कथीः टेगेधिक तटथोंगः गण नगिः थोंगतक धिकथोंगटें, हे एकताली मधील उदाहरण होय.

ही तुडुका होय.

ज्यात शुद्ध इत्यादी (पाटांनी) किंवा वर्णसराने बांधलेला खंड (९९१) विशाल असा द्रुत लयीत (योजलेला) असतो पण शेवटी (म्हणजे चवथ्या भागात) विलंबित लयीत (योजलेला असतो); आणि कोठे दीप्त वर्णांनी तर कोठे कोमल वर्णांनी तो सुंदरपणे गुंफलेला असतो (९९२) तो मलप म्हटला आहे. प्रायः तो दीप्त नर्तनात (योजतात).

ज्यात उदग्राह एक किंवा दोन वेळा योजून मग ध्रुव एकवेळ (योजलेला) असतो (९९३) व जो व्यापक अक्षरांनी मिश्रित तद्धिथोंटेंदें या अक्षरांनी बांधलेला (आणि) अखंड यति असणारा असतो त्याला दुसरे (आचार्य) मलप म्हणतात. (९९४)

' टेंदगित '– इत्यादि प्रस्तार होय. या मताने ही एक धातूची आहे.

क० आता मलपाचे लक्षण देत आहे–

या मलपात शुद्ध इत्यादींनी किंवा वर्णसराने रचलेला खंड असतो. आरंभापासून सुरवात करून हा खंड पहिल्या तीन भागांत द्रुतलयीत योजावा; शेवटी म्हणजे चवथ्या भागात विलंबित लयीत योजावा असा अर्थ. दुसऱ्या मताने दुसरे लक्षण सांगत आहे–

क इत्यादी सोळा अक्षरे व्यापक होत, त्यांनी मिश्रित असणारी कूट अक्षरे ' तद्धिथोंटेंदें ' ही अक्षरे त्या त्या मर्दलात ठराविक असल्याने शुद्ध होत. त्यांनी बांधलेला व विलंबरहित विच्छेद असणारा तो मलप होय असे दुसरे म्हणतात. या पक्षी हा दोन धातूंचा होय. (९९१ ते ९९४)

---

८७. मलपाच्या लक्षणात आनंदाश्रम आवृत्तीत (पृ. ५९५) ' विशाल ' असा पाठ आहे. कल्लिनाथाच्या टीकेत ' द्रुतलयः सन्विशालः स्यात् ' असा मूळ ग्रंथ घेतला असून, टीकेत ' खंड आरंभापासून सुरवात करून तीन भागांत द्रुत लयीत योजावा ' असे स्पष्ट केले आहे. सुधाकर-टीकेत ' विताल ' असा पाठ घेतला असून त्याचे स्पष्टीकरण ' तालशून्य ' असे दिले आहे.

यथा -- गड्दक् तद्धित्थों हथोंहरे घट गगनगतक धिकक थौं हटें हैं थोदगक्। तक्क तहधिक थोकथोहक थो३ हट्टै डिं खिखरखिखिखेरथटैं हैं थोहगक्। दिहं कटदहं कटगड्द गथरिकटं२ थरिकटतक३ ततक धिधिक थोऽ थोंदटें। इदमुदाहरणं मुद्रितमण्ठताले।

इति मलपः।

सोदाहरणलक्ष्माणि बालबोधार्थमभ्यधाम्।
लक्ष्ममात्रमथो वक्ष्ये विस्तरत्रस्तमानसः॥ ९९५॥
मलपाङ्गं तु मलपेनाङ्गेन मलपेन च।

इति मलपाङ्गम्

पाटैर्मलपपाटः स्याद्विषमैर्मलपोपमः॥ ९९६॥

इति मलपपाटः

जसे--गड्दक् तद्धित्थों हथोंहरे घटैं गगनगतक धिकक थौं हटें हैं थोदगक्. तक्क तहधिक थोकथोहक थो थो थो हट्टै डिं खिखरखिखिखेरथटैं हैं थोहगक्. दिहं कटदहं कटगड्द गथरिकटं गथरिकटं थरिकटतक थरिकटतक थरिकटतक ततक धिधिक थोऽथोंदटें. हे मुद्रित मंठ तालातले उदाहरण होय.

हा मलप होय.

अज्ञांना कळावे यासाठी उदाहरणांसह लक्षणे मी सांगितली. (अकारण) विस्तार होईल हे भय मनात असल्याने यापुढे मी फक्त लक्षणेच सांगणार आहे. (९९५)

मलपाने व अंग (म्हणून योजलेल्या) मलपाने मलपांग हा (प्रबंध होतो).

हे मलपांग होय.

विषम पाटांनी (युक्त) असा मलपासारखा असणारा तो मलपपाट होय. (९९६)

हा मलपपाट होय.

गड्दक् तद्धित्थों -- इत्यादि प्रस्तार होय. या पक्षी हा एक धातूचा होय.

क० आता मलपांग इत्यादींचे लक्षणच फक्त थोडक्यात सांगत आहे. त्यातील मलपांगाचे लक्षण देत आहे.

जेव्हा मलपच मुख्य म्हणून व अंग म्हणून प्रयुक्त केला जातो तेव्हा मलपांग नावाचा प्रबंध होतो.

विषम पाटांनी रचलेला मलपासारखा असणारा तो मलपपाट होय.

छेदात मूळ द्रुत लय प्रस्तुत असल्याने मध्य व विलंबित लय विकृत म्हटली आहे.

यापुढील रूपक इत्यादींची लक्षणे मूळ ग्रंथातूनच सहज कळतात. (९९५ ते ९९९)

द्रुतैः करतलाघातैर्विकृतैर्यत्र वाद्यते ।
वाद्यं विच्छिद्य विच्छिद्य च्छेदमिच्छन्ति तं बुधाः ॥ ९९७ ॥

इति च्छेदः

ओतां कृत्वा द्विरुद्ग्राहः सकृद्वा व्यापकाक्षरैः ।
सपाटैर्विहितो यत्र प्रान्ते रचितदेंकृतिः ॥ ९९८ ॥
मध्ये लये छण्डणः स्याद्रूपकं तन्निरूपितम् ।

इति रूपकम्

निबद्धो वादितो गीतवाद्यसन्धौ मतोऽन्तरः ॥ ९९९ ॥

इत्यन्तरः

अन्तरं वादयित्वा चेदनिबद्धस्य वादनम् ।
क्रियतेऽन्तरपाटः स्यात्तदा निःशङ्कसंमतः ॥ १००० ॥

इत्यन्तरपाटः

समाश्लिष्टघनश्लक्ष्णपाटवर्णविनिर्मितः ।

हाताच्या तळ्याच्या द्रुत व विकृत (म्हणजे वेगळ्या अशा मध्य व विलंबित) प्रहारांनी ज्यात विच्छेद योजून योजून वादन केले जाते त्याला विद्वान छेद म्हणून इच्छितात (९९७)

हा छेद होय.

ज्यात ओता योजून पाटयुक्त व्यापक अक्षरांनी युक्त असा उद्ग्राह दोन वेळा किंवा एक वेळ योजला जातो आणि कडेला देंकार असलेला (९९८) छंडण मध्य लयीत योजलेला असतो ते रूपक म्हटले आहे.

हे रूपक होय.

(पाटांनी) रचलेला (आणि) गीत व वाद्य यांच्या संधीमध्ये वाजवलेला अंतर मानला आहे. (९९९)

हा अंतर होय.

अंतर वाजवून जर अनिबद्ध (प्रकारचे) वादन केले तर तो निःशङ्काला मान्य असणारा अंतरपाट होय. (१०००)

हा अंतरपाट होय.

समान, आश्लिष्ट (म्हणजे परस्परांशी जुळलेल्या), निबिड व कोमल पाटवर्णांनी

हस्तलाघवसंपन्नः खोजः संजल्पितो बुधैः ॥ १००१ ॥

इति खोजः

कृत्वा खण्डं पाटबद्धं यतिवद्वादनं भवेत् ।
एवमावृत्तिकरणादाहुः खण्डयतिं बुधाः ॥ १००२ ॥

इति खण्डयतिः

८८ खण्डच्छेदसमायोगात्खण्डच्छेदप्रबन्धयोः ।
छेदैर्व्यक्तैः समायुक्तं खण्डच्छेदं परे जगुः ॥ १००३ ॥

इति खण्डच्छेदः

यस्यां विरतिरन्ते च तालस्य व्यापकाक्षरैः
सपाटैर्बद्धखण्डा या साऽवयातावयतिर्बुधैः ॥ १००४ ॥

इत्यवयतिः

निर्माण केलेला (आणि) हस्तकौशल्याने युक्त असणारा विद्वानांनी खोज म्हटला आहे. (१००१)

हा खोज होय.

पाटांनी बांधलेला खंड योजून यतीप्रमाणे वादन करावे. याप्रमाणे (वादनाची) आवृत्ति केल्याने (म्हणजे दोन वेळा वादन केल्याने) विद्वान त्याला खंडयति म्हणतात. (१००२)

हा खंडयति होय.

खंड व छेद या (प्रबंधांच्या) संयोगाने (खंडच्छेद होतो). दुसऱ्या (आचार्यांनी) खंड व छेद या प्रबंधांच्या व्यक्त (म्हणजे स्पष्ट अशा) छेदांनी (म्हणजे अवयवपाटांनी) युक्त असणारा तो खंडच्छेद म्हणून सांगितला आहे. (१००३)

हा खंडच्छेद होय.

जिच्यात तालाच्या शेवटी विराम असतो व पाटयुक्त व्यापक अक्षरांनी खंड बांधलेला असतो, ती विद्वानांनी अवयति म्हटली आहे. (१००४)

ही अवयति होय.

---

८८. सुधाकरटीकेत 'दुसरे (आचार्य) व्यक्त अशा छेदांनी म्हणजे अवयवपाटांनी युक्त हा जाणतात' असे दुसरे मत स्पष्ट केले आहे. त्यावरून पहिल्या मतानुसार खंड व छेद या प्रबंधांच्या संयोगाने खंडच्छेद होतो असा या श्लोकाच्या पहिल्या ओळीचा अर्थ होतो. त्यामुळे या ओळीचा मूळ पाठ 'खंडच्छेदः समायोगात्खण्डच्छेदप्रबन्धयोः' असा असेल का ?

पाटस्य खण्डनाद्वाद्ये खण्डपाटोऽभिधीयते ।

इति खण्डपाटः

खण्डः स्यात्खण्डमध्येऽपि खण्डशो वादने सति ॥ १००५ ॥

इति खण्डकः

स्रोतोगताख्यया यत्या खण्डहुल्लोऽभिधीयते ।

इति खण्डहुल्लः

गीतनृत्तसमो माने प्रबन्धः प्रोच्यते समः ॥ १००६ ॥

इति समः

निष्पन्नः केवलैः पाटैः पाट इत्यभिधीयते ।

इति पाटः

ध्रुवको भूरिवाद्येषु स्यादावृत्तोऽन्तरेऽन्तरे ॥ १००७ ॥

इति ध्रुवकः

अङ्गमङ्गीकृतं सान्द्रैरपाटैर्व्यापकाक्षरैः ।

इत्यङ्गम्

वादनात पाट खंडित केल्याने खंडपाट म्हटला आहे.

हा खंडपाट होय.

खंडामध्येही अवयवशः वादन केले असता तो खंड होय. (१००५)

हा खंडक होय.

स्रोतोगता या नावाच्या यतीने (केलेल्या वादनाने) खंडहुल्ल म्हटला जातो.

हा खंडहुल्ल होय.

गीत व नृत्त यांच्याशी लयप्रमाण समान असणारा प्रबंध सम म्हटला जातो. (१००६)

हा सम होय.

केवळ पाटांनी निष्पन्न होणारा पाट म्हणून म्हटला जातो.

हा पाट होय.

पुष्कळ वाद्यांमध्ये मधे मधे आवृत्त होणारा ध्रुवक होय. (१००७)

हा ध्रुवक होय.

पाटरहित(व)निबिड अशा व्यापक अक्षरांनी अंग म्हणून योजलेला अंग होय.

हा अंग होय.

द्विरुद्ग्राहो ध्रुवाभोगं ध्रुवाख्यः क्रमशस्ततः ॥ १००८ ॥
यत्राङ्गरूपकं प्राह तत्तेजोन्वयदीपकम् ।
इत्यङ्गरूपकम्
तालश्चतुःषष्टिकलो युग्मे मार्गे च दक्षिणे ॥ १००९ ॥
इति तालः
वितालस्त्वादिमध्यान्तविकृतस्ताल इष्यते ।
इति वितालः
हस्तेन विततागुष्ठविरलाङ्गुलिना क्रमात् ॥ १०१० ॥
पताकेन हतैर्जातैः पाटैः स्यात्खलकाभिधः ।
इति खलकः
समुदायो निजैः पाटैः समस्तातोद्यवादनात् ॥ १०११ ॥
इति समुदायः
पाटानां पृथगुक्तानां मिश्रणाज्जोडणी मता ।
इति जोडणी

दोन वेळा उद्ग्राह, (मग) ध्रुव आणि आभोग व नंतर ध्रुव असे ज्यात क्रमाने (योजले जातात) (१००८) त्याला तेजसंबद्ध दीप्त अंगरूपक (असे शार्ङ्गदेव) म्हणतो.

हे अंगरूपक होय.

चच्चत्पुट तालात, दक्षिण मार्गात, चौसष्ट कला असणारा तो ताल होय. (१००९)

हा ताल होय.

आरंभी, मध्ये व शेवटी भिन्न ताल असणारा विताल मानला आहे.

हा विताल होय.

पसरलेला अंगठा व विरळ बोटे असणाऱ्या पताक हस्ताने क्रमाने (१०१०) प्रहार करून उत्पन्न होणाऱ्या पाटांनी (निष्पन्न होणारा) खलक नावाचा होय.

हा खलक होय.

आपापल्या पाटांनी सर्व वाद्यांच्या केलेल्या वादनाने समुदाय होतो. (१०११)

हा समुदाय होय.

वेगवेगळ्या सांगितलेल्या पाटांच्या मिश्रणाने जोडणी मानली आहे.

ही जोडणी होय.

उडवः सलयात्तालाद् द्वितालाच्च[८९] लयोज्झितात् ॥ १०१२ ॥

इत्युडवः

तलपाटस्तु मलपोन्मिश्रपाटप्रबन्धजः ।

इति तलपाटः

निजैर्या तद्विथोंदेभिर्व्यापकैरक्षरैस्तथा ॥ १०१३ ॥

पाटैर्वा रचिता किञ्चिद्विलम्बितलयाश्रया ।

देंकारालंकृताद्यन्ता वदन्त्युट्टवणीममूम् ॥ १०१४ ॥

इत्युट्टवणी

वाद्यैकदेशं वर्गान्तमयं वाद्यादिमध्ययोः ।

वादयेल्लघुहस्तत्वाद्यं तमाख्याति तुण्डकम् ॥ १०१५ ॥

इति तुण्डकः

लयीसहित ताल व लयरहित वियाल योजल्याने उडव (हा प्रबंध होतो). (१०१२)

हा उडव होय.

मलपमिश्रित पाट या प्रबंधापासून उत्पन्न होणारा तलपाट होय.

हा तलपाट होय.

(जी) स्वतःच्या तद्विथोंदे (या अक्षरांनी), तसेच व्यापक अक्षरांनी (१०१३) किंवा पाटांनी रचलेली, थोडी विलंबित लय असलेली आणि आरंभी व शेवटी देंकाराने भूषित केलेली (असते) तिला उट्टवणी म्हणतात. (१०१४)

ही उट्टवणी होय.

वादनाच्या आरंभी व मध्ये (कवर्ग इत्यादी) वर्गांच्या शेवटच्या वर्णाने युक्त असा वादनाचा जो एक भाग (वादक) हस्तकौशल्याने वाजवतो त्याला (शार्ङ्गदेव) तुंडक म्हणतो. (१०१५)

हा तुंडक होय.

---

८९. आनंदाश्रम व अडचार दोन्ही आवृत्तींत 'द्वितालाच्च' असा पाठ आहे. सुधाकर-टीकेत या वाद्यप्रबंधाचे स्पष्टीकरण– 'पूर्वी सांगितलेल्या तालासह लयप्रबंधापासून व लयरहित वितालप्रबंधापासून निर्माण होणारा उडव होय' असे दिले आहे. या स्पष्टीकरणात 'लयीसह पूर्वी सांगितलेल्या ताल प्रबंधापासून' असे समजणे आवश्यक आहे. तसेच या स्पष्टीकरणावरून 'द्वितालाद्' याऐवजी 'वितालाद्' असा जो पाठ मिळतो तो योग्य वाटतो.

पाटैरेव यतिः सान्द्रैः प्राञ्जलैरङ्गपाटकः ।
इत्यङ्गपाटकः
खण्डः स्यात्पृथगातोद्यवाद्यैः पैसारसंज्ञकः ॥ १०१६ ॥
इति पैसारः
इति त्रिचत्वारिंशद्वाद्यप्रबन्धाः ।
प्रदर्शनार्थमित्युक्ताः प्रबन्धाः कतिचिन्मया ।
अन्यानपि पथानेन विदांकुर्वन्तु तद्विदः ॥ १०१७ ॥
पाटभेदाश्च वाद्यानि प्रबन्धा वाद्यसंश्रयाः ।
यथायोगं मर्दलादिसर्ववाद्येष्विमे मताः ॥ १०१८ ॥
इति वाद्यप्रबन्धलक्षणम् ।

(मर्दलः–)

निर्दोषबीजवृक्षोत्थः पिण्डेऽर्धाङ्गुलसंमितः ।
एकविंशत्यङ्गुलः स्याद्दैर्घ्ये वामे मुखे पुनः ॥ १०१९ ॥

निबिड व सरळ पाटांनीच युक्त यति अंगपाटक होय.

हा अंगपाटक होय.

वेगवेगळ्या वाद्यांच्या वादनांनी (निष्पन्न होणारा) खंड पैसार नावाचा होय. (१०१६)

हा पैसार होय.

हे त्रेचाळीस वाद्यप्रबंध समाप्त.

प्रदर्शनासाठी म्हणून काही प्रबंध मी सांगितले आहेत. त्यातल्या जाणकारांनी या मार्गाने इतरही (वाद्यप्रबंध) जाणून घ्यावे. (१०१७) हे पाटभेद, वादने व वाद्यसंबद्ध प्रबंध यथासंभव मर्दल इत्यादी सर्व वाद्यांत मानले आहेत. (१०१८)

वाद्यप्रबंधांची लक्षणे समाप्त.

(मर्दलाचे खोड) निर्दोष अशा म्हाळुंगाच्या झाडापासून बनवलेले असते. (त्याची) जाडी अर्ध्या अंगुळाची व त्याची लांबी एकवीस अंगुळांची असते. (त्याचे) डावे तोंड

क० सांगितलेल्या रीतीने इतरही प्रबंधांची कल्पना करणे शक्य आहे म्हणून सांगत आहे. पटहात सांगितलेले हस्तपाट इत्यादी यथासंभव मर्दल इत्यादीमध्ये अतिदेशाने सांगत आहे. पाटभेद म्हणजे नागबंध इत्यादी अठ्ठ्याऐंशी हस्तपाट होत. बोल्लावणी प्रभृति पंचवीस वादने होत. वाद्यसंबद्ध प्रबंध यति इत्यादी त्रेचाळीस होत. (१०१७, १०१८)

क० आता मर्दलाचे लक्षण देत आहे– अर्थ स्पष्ट आहे.

या मर्दलात उजव्या तोंडावर तद्धिथोंटेंहेंनदें हे, सात वर्ण पाट म्हणून सांगितले आहेत. 'अन्यत्र' म्हणजे मर्दलाच्या डाव्या तोंडावर तटहा व दधला हे सहा वर्ण पाट म्हणून

चतुर्दशाङ्गुलानि स्युर्दक्षिणे तु त्रयोदश ।
मानं यस्य मनाङ्मध्यः पृथुरेकाङ्गुलाधिके ॥ १०२० ॥
वक्त्राभ्यां चर्मणी वृत्ते घने ये प्रान्तयोस्तयोः ।
चत्वारिंशत्पृथग्रन्ध्राण्यङ्गुलान्तरवन्ति च ॥ १०२१ ॥
वध्रे तद्रन्ध्रविन्यस्ते सीवनप्रक्रियावति ।
प्रोतोर्ध्वाधःस्थिता दृष्टोदरपृष्ठा च विग्निका[९०] ॥ १०२२ ॥
क्रियते वेष्ट्यते मध्ये त्रिभिर्बन्धैर्दृढं तथा ।
कार्यो गोमूत्रिकाबन्धस्तत्र[९१] वध्रद्वयेन च ॥ १०२३ ॥
तथा यथा पिनद्धास्ये भवेतां चर्मणी दृढे ।
कुण्डल्योः प्रान्तयोर्वामकुण्डल्यां संनिवेश्य च ॥ १०२४ ॥

(१०१९) चौदा अंगुळे व उजवे तेरा अंगुळे या मापाचे (असते). याचा मध्यभाग थोडा मोठा (असतो). तोंडांपेक्षा एक अंगुळ अधिक (प्रमाणाची) जी दोन गोल व निबिड कातडी (याच्यात असतात) त्यांच्या कडांना एक अंगुळ अंतर असणारी चाळीस वेगवेगळी भोके (पाडलेली असतात). (१०२०, १०२१). त्या भोकांतून घातलेल्या (व) शिवणकाम असलेल्या वादीत वरच्या व खालच्या बाजूला असणारी पोट व पाठ दिसणारी विग्निका ओवलेली असते. (१०२२) ती मध्ये योजलेली असून तीन बांधण्यांनी घट्ट वेढलेली असते. त्यात दोन वाद्यांनी गोमूत्रिका बंध असा योजावा (१०२३) की तोंडे झाकून टाकणारी दोन्ही कातडी घट्टपणे (ताणलेली अशी) होतील. कडेला असणाऱ्या दोन कड्यांमधील डाव्या कड्यात कच्छा (म्हणजे दोऱ्यांची चपटी पट्टी) घालून ती

मानतात. या मर्वलात पटहात सांगितलेले 'क' इत्यादी सोळा वर्ण असतात. दुसरे आचार्य या मर्वलात 'भ ञ म' हे अधिक वर्ण सांगतात. असे मिळून मर्दलात बत्तीस पाट होतात. यांतील काहींचे स्वरूप एकच असले तरीही ते वेगवेगळ्या प्रयत्नाने निष्पन्न होत असल्याने त्यांचे वेगळे असे वर्णस्वरूप जाणावे.

या बत्तीस वर्णातील 'तद्धि'–इत्यादी सात म्हणजे 'तद्धिथोंटेंटेंहेंनंवें' हे वर्ण केवळ म्हणजे दुसऱ्या वर्णांनी मिश्रित नसता शुद्ध नावाचे होत.

कूट वर्णांचे स्वरूप दाखवीत आहे– सस्वर इत्यादींचे स्पष्टीकरण पूर्वी दिले आहेच. तशा तऱ्हेच्या, व्यापक म्हणजे सर्व वाद्यांत साधारण स्वरूपाने असणाऱ्या 'क ख' इत्यादी सोळा वर्णांनी मिश्रित असता ते शुद्धच कूट नावाचे होतात.

---

९०. सुधाकरटीकेत 'या वाद्यशास्त्रात विग्निका ही कर्परा (अर्थात खापर) म्हणून म्हटली आहे' असे उद्धरण पुढील ११०९ व्या श्लोकावरून दिले आहे.

९१. गोमूत्रिकाबंध म्हणजे सापाच्या गतीसारखी कुटिल अशी बांधणीची रचना; गाय चालतांना मुतत असता अशी आकृती तयार होते. दोन वाद्यांनी अशा प्रकारे कातडचांच्या भोकांतून बांधून घेतल्याने गजऱ्यासारखी रचना होते.

कच्छां क्षिप्त्वा दक्षिणस्यां कृष्ट्वा द्विगुणतां नयेत् ।
साञ्चलद्वितयां पट्टमयीमष्टाङ्गुलायताम् ॥ १०२५ ॥
यद्वान्यवस्त्रजां शोभानुगां न्यस्येत्कटीतटे ।
निगदन्ति मृदङ्गं तं मर्दलं मुरजं तथा ॥ १०२६ ॥
प्रोक्तं मृदङ्गशब्देन मुनिना पुष्करत्रयम् [९२] ।
अत्यन्ताव्यवहार्यत्वान्निःशङ्को न तनोति तत् ॥ १०२७ ॥
भूतिमिश्रेण भक्तेन चिक्कणेनातिमर्दनात् ।
पिण्डिकां [९३] पूरिकाकारां वामवक्त्रे निवेशयेत् ॥ १०२८ ॥

उजव्या कड्यातून घेऊन ओढून दुहेरी करावी. रेशमी दोऱ्यांची किंवा दुसऱ्या कापडापासून बनवलेली दुपदरी व आठ अंगुळे लांबीची अशी ती (कच्छा) शोभिवंतपणे कटिप्रदेशावर ठेवावी. त्या मर्दलाला मृदंग तसेच मुरज म्हणतात. (१०२४, १०२५, १०२६)

भरतमुनीने मृदंग या शब्दाने त्रिपुष्कर वाद्य सांगितले आहे. पण अत्यंत अव्यवहार्य असल्याने निःशंक त्याचा विस्तार (येथे) करत नाही. (१०२७)

खूप मळण्याने चिक्कण झालेल्या राखमिश्रित भाताची पुरीच्या आकाराची गोळी (करून ती) डाव्या तोंडावर थापावी. (१०२८)

खंडांचे स्वरूप दाखवीत आहे– ते शुद्ध तद्धि इ. सात वर्ण जर कूटवर्णांनी मिश्रित झाले तर ते खंड या नावाने मानले आहेत.

आता श्लोकाचा दृष्टांत देऊन वाद्यप्रबंधाच्या निर्मितीचा प्रकार सांगत आहे– स्फूर्ति म्हणजे प्रतिभा ; तीच ज्याची मूर्ति तो स्फूर्तिमूर्ति होय. उदारधी म्हणजे अविकलबुद्धीचा. असा कवि ज्याप्रमाणे कानांना आनंद देणाऱ्या शब्दांनी श्लोक रचतो, त्याप्रमाणे वादकही (वाद्य-प्रबंधाची रचना करतो). कोठे अनेक तालांनी असे म्हणण्याने इतरत्र एका तालाने किंवा क्वचित दोन तालांनी बांधलेले; वर्णत्रयमनोहर म्हणजे शुद्ध, कूट व खंड या तीन वर्णांनी मनोहर, अर्थात

---

९२. भरताने 'त्रिपुष्कर' या नावाचे वाद्य सांगितले आहे. (घोषसंपादित नाट्यशास्त्र भाग २ पृ. १४८). 'त्रिपुष्कर' म्हणजे तीन तोंडांचा मृदंग होय असे काही विद्वानांचे मत आहे. शार्ङ्गदेव याचे मतही असेच दिसते. पुष्कर म्हणजे वाद्याचे तोंड. शार्ङ्गदेवाने पुष्करत्रय हा शब्द वापरला आहे. तीन तोंडांच्या मृदंगाचा उपयोग फार कमी प्रमाणात होता असे प्राचीन व मध्ययुगीन भारतीय शिल्पांच्या पुराव्यावरून वाटते. शार्ङ्गदेवाच्या वेळी तो अत्यल्प असल्यामुळे त्याने अत्यंत अव्यवहार्य असे त्याचे वर्णन केले आहे.

(या बद्दलच्या चर्चेसाठी पहा– 'भारतीय वाद्यांचा इतिहास' (पृ. २८))

९३. सुधाकरटीकेत 'पूरिका गुडमिश्रः, पूला इति महाराष्ट्रे प्रसिद्धः' असे म्हटले आहे. गूळमिश्रित अशी पूरिका महाराष्ट्रात पूर्वी 'पूला' म्हणून प्रसिद्ध होती असा याचा अर्थ.

बोहणाख्येन तेनास्यं लिम्पेदल्पेन दक्षिणम् ।
एवं जलधरध्वानगम्भीरो भवति ध्वनिः ॥ १०२९ ॥
निःशङ्केनात्र च प्रोक्तो देवता नन्दिकेश्वरः ।
रक्तचन्दनजो यद्वा खादिरोऽन्यैरयं मतः ॥ १०३० ॥
त्रिंशदङ्गुलदैर्घ्यश्च पिण्डे त्वङ्गुलसंमितः ।
एतस्य वामं वदनं द्वादशाङ्गुलसंमितम् ॥ १०३१ ॥
दक्षिणं तु मितं सार्धैरेकादशभिरङ्गुलैः ।
पाटाश्च तद्धिथोंटेंहेंनंदेमित्यत्र कीर्तिताः ॥ १०३२ ॥
तटह्वा दधलाश्चेति पाटानन्यत्र मन्वते ।
इह स्युः पटहोक्ताश्च वर्णाः षोडश कादयः ॥ १०३३ ॥
अधिकान्भझमान्वर्णान्वर्णयन्त्यपरे त्विह ।
तेषु तद्धचादयः सप्त केवलाः शुद्धसंज्ञकाः ॥ १०३४ ॥

त्या थोड्या बोहणाचा लेप उजव्या तोंडावर द्यावा. या तऱ्हेने (मृदंगाचा) नाद मेघासारखा गंभीर (उत्पन्न) होतो. (१०२९)

या मर्दलाची देवता निःशंकाने नंदिकेश्वर ही सांगितली आहे. हा रक्तचंदन किंवा खैराच्या लाकडाचा दुसऱ्या (आचार्यांनी) मानला आहे. (१०३०) (तसेच) त्याची लांबी तीस अंगुळे व लाकडाची जाडी एक अंगुळ मानली आहे. याचे डावे तोंड बारा अंगुळे प्रमाणाचे (१०३१) व उजवे साडेअकरा अंगुळे प्रमाणाचे (सांगितले आहे).

यात (उजव्या तोंडावर) 'तद्धिथोंटेंहेंनंदें' हे पाट सांगितले आहेत. (१०३२)

दुसरीकडे (म्हणजे डाव्या तोंडावर) 'तटह्वा' व 'दधला' हे पाट मानतात. यात पटहात सांगितलेले 'क' इत्यादी सोळा वर्ण असतात. (१०३३)

दुसरे (आचार्य) यात 'भझम' हे वर्ण अधिक सांगतात. त्यांतील 'तद्धि'– इत्यादी सात केवळ शुद्ध नावाचे होत. (१०३४)

शोभिवंत होईल अशा तऱ्हेने रचलेल्या शुद्ध इत्यादी तीन वर्णांनी रम्य असे अनेक वाद्यप्रबंध योजून ते गुंफण्यास तो योग्य होतो. लोक म्हणजे भांडिकलोक अर्थात वादक. ते या प्रबंधनिर्मात्या वादकास कवितकार या नावाने संबोधतात. (१०१९ ते १०३८)

सस्वैररस्वरैर्युक्तैरयुक्तैर्वा कखादिभिः ।
व्यापकाख्यैः षोडशभिर्मिश्रास्ते कूटसंज्ञकाः ॥ १०३५ ॥
कूटमिश्रास्तु ते शुद्धा बुधैः खण्डाभिधा मताः ।
छन्दसा भूरिहृद्येन स्फूर्तिमूर्तिरुदारधीः ॥ १०३६ ॥
कविः कवयति श्लोकं श्रवणोत्सवदैः पदैः ।
यथा तथा क्वचित्तालैर्वर्णत्रयमनोहरान् ॥ १०३७ ॥
विधाय वादको वाद्यप्रबन्धान्बन्द्धुमर्हति ।
इमं कवितकाराख्यं वादकं ब्रुवते जनाः ॥ १०३८ ॥

इति मर्दललक्षणम् ।

चतुर्विधो मार्दलिको वादको मुखरी तथा ।
ततः प्रतिमुखर्याख्यस्तुर्यो गीतानुगो मतः ॥१०३९ ॥
वादको वादकर्ता स्याद्वादः पक्षपरिग्रहः ।
स्वपक्षसाधनं तद्वत्परपक्षस्य दूषणम् ॥ १०४० ॥

ते, स्वरयुक्त किंवा स्वररहित, जोडाक्षर असलेल्या किंवा जोडाक्षर नसलेल्या 'कख' इत्यादी व्यापक म्हटले जाणाऱ्या, सोळा वर्णांनी मिश्रित झाल्यास कूट नावाचे होत. (१०३५).

ते शुद्ध कूटमिश्रित असल्यास विद्वानांनी खंड नावाचे मानले आहेत. जसा अत्यंत रम्य छंदात, मूर्तिमंत स्फूर्ति असणारा असा विशाल बुद्धीचा (१०३६) कवि कानाला आनंद देणाऱ्या शब्दांनी श्लोक रचतो तसाच कोठे अनेक तालांनी (तर कोठे एक किंवा दोन तालांनी), तीन (म्हणजे शुद्ध, कूट व खंड या) वर्णांनी मनोहर (१०३७) असे वाद्यप्रबंध योजून त्यांची रचना करण्यास वादक योग्य ठरतो. या वादकाला लोक कवितकार या नावाने संबोधतात. (१०३८)

मर्दलाचे लक्षण समाप्त.

मार्दलिक (म्हणजे मर्दलवादक) चार प्रकारचा म्हणजे वादक, तसेच मुखरी, मग प्रतिमुखरी (व) चवथा गीतानुग (म्हणजे गीताला अनुसरणारा) मानला आहे. (१०३९)

वादक हा वाद करणारा होय. (आपल्या) पक्षाचा (म्हणजे बाजूचा) स्वीकार म्हणजे वाद होय; अर्थात आपला पक्ष सिद्ध करणे तसेच प्रतिपक्षाचे दोष दाखविणे. (१०४०)

क० आता मार्दलिकांचे प्रकार सांगत आहे–

जल्प, तण्डा इत्यादी वादाचे प्रकार तर्कशास्त्रात सांगितलेली लक्षणे असणारे जाणावे. 'त्राटनाभिध' म्हणजे त्राटन हे ज्याचे नाव आहे ते. त्राटनाचे स्वरूप सांगत आहे– वेहडडग्

येऽन्ये [९४]जल्पवितण्डाद्या वादभेदाः सलक्षणाः ।
न तान्ब्रवीम्यहं ग्रन्थप्रपञ्चभयभङ्गुरः ॥ १०४१ ॥

वादे च वादनं कार्यं प्रथमं त्राटनाभिधम् ।
मर्दले तालरहिते बोहणेन विना ध्वनिः ॥ १०४२ ॥

जल्प, वितण्डा इत्यादि वादाचे जे इतर प्रकार लक्षणासह तर्कशास्त्रात दिलेले आहेत ते, ग्रंथविस्ताराच्या भयाने मृदु (मन) झालेला असा मी सांगत नाही. (१०४१)
वादात प्रथम त्राटन नावाचे वादन योजावे. बोहणाशिवाय मर्दलात तालरहित

इत्यादी अनुकरणात्मक असे वर्णांचे उच्चारण होय. 'इत्यादि' शब्दाने अनुकरणाला योग्य असे इतरही वर्ण घ्यावयाचे. अशा प्रकारे उत्पन्न केलेला हा देहडडग् इत्यादी नाद त्राटण मानला आहे.

९४. तत्त्व जाणण्याच्या इच्छेने केलेला प्रश्नोत्तररूप संवाद म्हणजे वाद होय. म्हणूनच 'वादावादातून तत्त्वाचे ज्ञान उत्पन्न होते' असे सुवचन रूढ आहे. तर्कशास्त्रात वाद व त्यासाठी योजायचे वादप्रकार सोदाहरण स्पष्ट केलेले असतात. त्या जल्प, वितंडा इत्यादी वादभेदांचे थोडक्यात स्वरूप असे– वादात जय मिळावा यासाठी केल्या जाणाऱ्या दोन्ही बाजूंच्या प्रश्नोत्तरांना जल्प असे म्हणतात. जल्पात दुसऱ्या बाजूचा दोष दाखवून आपल्या बाजूचे मत सिद्ध केलेले असते. आपले मत स्थापन न करता केलेला जल्प म्हणजे वितंडा होय. वितंडेमध्ये दुसऱ्या बाजूचे दोष दाखवून त्या बाजूचे केवळ खंडनच केलेले असते. 'जल्प, वितंडा इत्यादि' असे जे शार्ङ्गदेवाने म्हटले आहे त्यातील 'इत्यादि' या शब्दाने हेत्वाभास, छल, जाति, निग्रहस्थान वगैरे प्रकार घ्यायचे. हेत्वाभास म्हणजे अयोग्य हेतु. योग्य हेतु असेल तरच अनुमान बरोबर ठरते. 'जेथे धूर असतो तेथे अग्नि असतो' या ज्ञानावरून पर्वतावर धूर दिसल्याने तेथे अग्नि आहे असे अनुमानाने कळते. यात 'धुराचे अस्तित्व' या हेतूवरून पर्वतावरील अग्नीचे केलेले अनुमान योग्य ठरते. ज्यावेळी एखादा 'कार्य असणे' या हेतूवरून नित्यत्वाचे अनुमान करतो त्या वेळी ते चुकीचे ठरते. उदा. शब्द हा नित्य आहे कारण तो कार्य (म्हणजे उत्पन्न केलेला आहे) असे विधान केल्यास, या विधानावरून शब्दाच्या नित्यत्वाचे केलेले अनुमान. 'कार्य असणे' हा हेतु अनित्यत्व सिद्ध करतो. कारण जे जे कार्य असते ते ते अनित्य असतेच. म्हणून नित्यत्व सिद्ध करण्यास 'कार्य असणे' हा हेतु विरोधी असल्याने तो अयोग्य होय. अशा तऱ्हेचे अयोग्य हेतु, हेतूसारखे भासतात पण ते चुकीचे असतात म्हणून त्यांना हेत्वाभास म्हणतात. एका अर्थाने शब्द उच्चारला असता त्याचा वेगळा अर्थ घेऊन बोलणाऱ्याच्या बोलण्यातला दोष दाखवणे म्हणजे छल होय. उदा. 'नवकंबलवान गोपाळ' असे म्हटल्यास 'नव' याचा 'नवीन' हा अर्थ न घेता 'नऊ' असा घेऊन दरिद्री गोपाळाजवळ नऊ कांबळी असणे शक्य नसल्याने बोलणाऱ्याच्या विधानातील दोष दाखविणे. जाति म्हणजे अयोग्य उत्तर. उदा. 'शब्द हा अनित्य आहे कारण तो कार्य आहे, जसा घट' असे म्हटल्यावर, घटाप्रमाणे शब्द हा अवयवयुक्त आहे असे विधान करणे. पण खरोखरी शब्द हा सावयव नसल्याने हे विधान अयोग्य ठरते. निग्रहस्थान म्हणजे वादात आपला पराजय होण्याचे कारण. आपणांस जे सांगायचे आहे त्यापेक्षा कमी किंवा जास्ती सांगणे, आपला सिद्धांत चुकीचा ठरेल असे आपणच बोलणे इत्यादींमुळे वादात पराजय होत असल्याने ही निग्रहस्थाने म्हटली आहेत. (पहा– पंडित केशवमित्रविरचित तर्कभाषा, प्रकरण ११ व १२)

यो [९५]देहडडगित्यादिकृतोऽसौ त्राटनं मतम् ।
वोडवाडं घनरवं हस्तावर्त्यर्थमाचरेत् ॥ १०४३ ॥

मुक्तशब्दात्मकं देहदडादप्रमुखं ततः ।
उधारं स्थापनं पश्चाद्वादयेत्तदथोच्यते ॥ १०४४ ॥

मुखयोर्बोहणं दत्वा वादयेद्वाममाननम् ।
गड्दग्धोमिति वक्त्रं तु गड्दग्धामिति दक्षिणम् ॥ १०४५ ॥

ततो मध्यलये ताले द्वितीये मुखयोर्द्वयोः ।
कुर्यान्नादसमायोगमथोच्चोच्चं दलत्रयम् ॥ १०४६ ॥

असा जो देहडडग् इत्यादि नाद उत्पन्न केला जातो तो त्राटन म्हणून मानला आहे. (हलका होऊन) हात वळावा यासाठी भरदार आवाजाचा वोडवाड वाजवावा. (१०४२, १०४३) मग खुला नाद असणारे, देहदडाद मुख्य असणारे उधार (नावाचे) वादन करावे. त्यानंतर स्थापन वाजवावे. ते आता सांगतो. (१०४४)

दोन्ही तोंडावर बोहणाचा लेप देऊन डावे तोंड गड्दग्धों असे व उजवे गड्दग्धां असे वाजवावे. (१०४५)

मग द्वितीय तालात, मध्य लयीत दोन्ही तोंडांमधील नाद (एका स्वरूपात किंवा वादिसंवादिरूपाने) मिळवावा. नंतर (एकापेक्षा अधिक दीर्घ दुसरा अशा प्रकारे) दीर्घ दीर्घ तीन खंड (१०४६) वेगवेगळे विलंबित, मध्य व द्रुत लयींत क्रमाने (वाजवावे). तसेच (ते तीन खंड) एक, दोन व तीन थोंकारांनी (क्रमाने) रचलेले आणि ग्रह व मोक्ष

वोडवाडाचा उद्देश हात वळण्यासाठी असा सांगितला आहे. हाताचा जडपणा दूर व्हावा यासाठी, अंगठा व करंगळी जोडून केलेल्या आघातांनी युक्त असे दोन्ही हातांनी केले जाणारे वादन म्हणजे वोडवाड असे त्याचे स्वरूप जाणावे. मग खुला आवाज असणारे अनुकरणयुक्त नाद-स्वरूपाचे, देहडडाद हे ध्वनी मुख्य असणारे उधार नावाचे वादन करावे. उधारानंतर स्थापन वाजवावे. आता त्या स्थापनाचे स्वरूप ग्रंथकार स्पष्ट करीत आहे– 'दोन्ही तोंडांवर बोहण देऊन,' म्हणजे राखमिश्रित मळलेल्या भाताची, पुरीच्या आकाराची चपटी गोळी करून ती डाव्या तोंडावर थापून व त्याच थोड्या भाताने उजव्या तोंडावर लेप देऊन, डाव्या तोंडावर 'गड्दग्धों' याचे अनुकरण करणारे वादन करावे; आणि उजव्या तोंडावर 'गड्दग्धां' असे अनुकरण करणारे वादन करावे. मग द्वितीय तालात मध्य लयीत डाव्या व उजव्या या दोन्ही तोंडांमधून निघणारा नाद मिळवावा. ते दोन्ही नाद एकस्वरूपाचे असल्यास एकात एक मिळवावे

---

९५. 'देहडडगित्यादि कृतो०' असा पाठ अडयार व आनंदाश्रम आवृत्तींत आहे. 'देहडडगादिकृतः' असे सुधाकरटीकेत दिले आहे. 'देहडडगित्यादिकृतो०' असा पाठ संगीत-सारामृतात (पृ० १३८) मिळतो व तोच अधिक बरोबर वाटतो.

पृथग्विलम्बिते मध्ये द्रुते चैव लये क्रमात् ।
तथैकद्वित्रिथोंकाररचितं ग्रहमोक्षभाक् ॥ १०४७ ॥
आलप्तिवच्च त्रिस्थानशुद्धं हस्तद्वयेन यत् ।
मधुरं वाद्यते तज्ज्ञैः स्थापनं तदुदाहृतम् ॥ १०४८ ॥
ततस्थोंकारबहुलग्रहमोक्षोऽन्तरो भवेत् ।
चतुरश्रत्र्यश्रमिश्रखण्डेष्वेकेन केनचित् ॥ १०४९ ॥
तालेन टाकणीवादौ कर्तव्यौ तदनन्तरम् ।
तयोरेकसरो जोडा चेति भेदद्वयं मतम् ॥ १०५० ॥

यांनी युक्त (असावे). आलप्तीप्रमाणे तीन स्थानांत शुद्ध (असे हे) जे मधुर वादन दोन्ही हातांनी केले जाते ते तज्ज्ञांनी स्थापन म्हटले आहे. (१०४७, १०४८) मग थोंकार पुष्कळ असणारे ग्रह व मोक्ष ज्यात आहेत असा अंतर योजावा. त्यानंतर, चतुरश्र, त्र्यश्र, मिश्र व खंड यांपैकी कोणत्या तरी एका तालात टाकणी व वाद योजावे. त्यांचे एकसर व जोडा असे दोन भेद मानले आहेत. (१०४९, १०५०)

व भिन्न स्वरूपाचे असल्यास वादिसंवादिस्वरूपाचे असे ते मिळवावे. नंतर दीर्घदीर्घ असे तीन खंड विलंबित, मध्य व द्रुतलयीत वेगवेगळे वाजवावे. म्हणजे असे की पहिल्या खंडापेक्षा दुसरा खंड दीर्घ, अर्थात त्याच्या अपेक्षेने त्याच्यापेक्षा दुसरा खंड दीर्घ, त्याच्या पेक्षा तिसरा खंड दीर्घ, असे तिन्ही लयीत योजावे हा 'वेगवेगळे' या शब्दाचा आशय होय. या लयीच्या क्रमानुसार, एक, दोन व तीन थोंकारांनी रचिलेले तेच तीन खंड ग्रह व मोक्ष यांनी युक्त असे वाजवले जातात. अर्थ हा की विलंबित लयीत ग्रह व मोक्ष यांत एकेक थोंकार योजलेला, मध्य लयीत ग्रह व मोक्ष यांत दोन दोन थोंकार योजलेला व द्रुत लयीत ग्रह व मोक्ष यांत तीन तीन थोंकार योजलेला पहिला खंड वाजवावा. अशीच योजना दुसऱ्या व तिसऱ्या खंडांच्या बाबतीतही करावी. 'आलप्तिवत् ... इत्यादीचा अर्थ असा–आलप्ति जशी मंद्र, मध्य व तार या स्थानांत शुद्ध म्हणजे अपस्वररहित योजायची असते तसेच मर्दल-वादनात स्थापनही तिन्ही स्थानांत म्हणजे विलंबित, मध्य व द्रुत लयींत शुद्ध म्हणजे एकमेकात न मिसळलेले (अर्थात स्पष्टपणे प्रतीत होणारे) योजावे. किंवा आलप्तिवत् म्हणजे आलप्तिवान असे घेऊन आलप्ति म्हणजे रागालाप व आलप्तिवत् म्हणजे रागालापयुक्त असा अर्थ ध्यावा. या मताप्रमाणे 'तिन्ही स्थानांत शुद्ध' याचा अर्थ मंद्र इत्यादी स्थानांत अपस्वर नसलेले असा होतो. म्हणजे वादकाने स्वतः रागालापयुक्त उद्घट्टन योजून त्याला गोडवा देणारी साथ या दृष्टीने मधे मधे मर्दलवादन करावे. असे दोन्ही हातांनी जे मधुर वादन केले जाते ते वाद्यजाणकरांनी स्थापन म्हणून म्हटले आहे. स्थापनानंतर थोंकार पुष्कळ असणारे ग्रह व मोक्ष ज्यात आहेत असा अंतर नावाचा खंड योजावा. अंतरानंतर चतुरश्र, त्र्यश्र, मिश्र व खंड या तालांपैकी कोणत्यातरी एका तालात टाकणी व वाद योजावे. त्या टाकणी व वाद यांचे प्रत्येकी एकसर व जोडा असे दोन भेद आहेत म्हणजे एकसरटाकणी व जोडाटाकणी तसेच एकसरवाद व जोडावाद असे ते भेद आहेत. (१०३९ ते १०५०)

कृत्वा श्रमस्य वहनीं यस्तालेऽष्टकलादिके ।
वाद्यखण्डस्तालकलाप्रस्तारानुगतः कृतः ॥ १०५१ ॥
अखण्डितष्टाकणी सैकसरत्वं सकृत्कृतेः ।
एकद्वित्रिचतुर्वारं शुद्धाभ्यसनतो भवेत् ॥ १०५२ ॥
इह श्रमवहन्याख्यः प्रकारो वादने यथा ।

तद्धितोटें ततधिधिथोंथोंटेंटें तततधिधिधिथोंथोंथोंटेंटेंटें तततधिधिधिधिथोथोथोथोटेटेटेटे ।[९६] इति श्रमवहनीं कृत्वा, एकसरटाकणी[९७] यथा– तकधिकट तकधिकट धिकटतक तकधिकट तकतकधिकट धिकटतकधिकट इत्यष्टौ वाद्यखण्डस्य खण्डा अष्टासु कलासु, सैव द्विवारं जोडा ॥

श्रमाची वहनी योजून, जो वादन-खंड अष्टकल इत्यादी तालात, तालकलांच्या प्रस्तारानुसार अखंडितपणे वाजवला जातो ती टाकणी होय. तो एक वेळा वाजवल्याने (तिचे) एकसर स्वरूप होय. (तद्धि . . . इत्यादी सात) शुद्ध (वर्णांतील) काहींची एकवेळा, दोनवेळा, तीनवेळा व चारवेळा योजना केल्याने या वादनातला श्रमवहनी नावाचा प्रकार होतो. (१०५१, १०५२, १०५३-) जसे– तद्धितोटें ततधिधिथोंथोंटेंटें तततधिधिधिथोंथोंथोंटेंटेंटें तततततधिधिधिधिथोथोथोथोटेटेटेटे; अशी – श्रमवहनी योजून, एकसर टाकणी (वाजवावी). (ती) अशी– तकधिकट तकधिकट धिकटतक तकतकधिकट धिकटकतधिकट, असे वादनखंडाचे आठ भाग आठ कलांत योजावे. तीच दोन वेळा योजल्यास जोडा (टाकणी) होय.

क० त्यातील टाकणीचे सामान्य लक्षण देत आहे. श्रमाची वहनी योजून अष्टकल इत्यादी म्हणजे एककल चचत्च्पुट इत्यादी तालात (वाद्यखंड वाजवावा). 'इत्यादि' शब्दाने द्विकल चच्चत्पुट चतुष्कल चच्चत्पुट वगैरे ध्यायचे. त्यातील एकातालात, दक्षिण इत्यादी मार्गानुसार तालाची जेवढचा मात्रांची कला होते तिच्या प्रस्ताराप्रमाणे हा वाद्यखंड अखंडित म्हणजे सगळा

---

९६. श्रमवहनीचे स्वरूप देताना आरंभी 'तद्धितोटें' अशी चार शुद्ध वर्णांची एकवार योजना आनंदाश्रम व अडचार आवृत्तींत दिली आहे. पण ही योजना 'तद्धिथोंटें' अशी असणे यास आनंदाश्रम आवृत्ति (पृ० ६०४) वरील तळटीपेवरून क्वचित असा पाठ मिळत असल्याने पुरावा मिळतो. तसेच चार वेळा या वर्णांची आवृत्ती योजतांना 'थोथोथोथो टेटेटेटे' असा जो अनुस्वारहित पाठ आहे त्या ऐवजी तो 'थोंथोंथोंथों टेंटेंटेंटें' असा अनुस्वारयुक्त असण्यासही एका हस्तलिखिताचा पुरावा वरील टीपेवरून मिळतो.

९७. एकसरटाकणीच्या वादनाचे आठ खंड मिळायला पाहिजेत. पण अडचार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तीतील पाठानुसार ते स्पष्टपणे मिळत नाहीत. त्या आठ खंडांचे स्वरूप संगीतसारामृतात (पृ० १३९) पुढीलप्रमाणे दिले आहे—

तकधिकट, तकधिकट, धिकटतक, तकधिकट, तकतकधि, धिकततक, धिकटधिक, ततधिकट.

टाकणीवत्समस्तं प्राक्खण्डं कृत्वा ततः परम् ॥ १०५३ ॥
खण्डं खण्डं द्विर्द्विर्वारं वाद्यते वाद्यसंज्ञके [९८] ।
तत्रैकसरजोडात्वं टाकणीवदुदाहृतम् ॥ १०५४ ॥

यथा– दंदंटिरिटिट्टिकड्द कडदगझे कडदगझे थरिक्कथरि टगणगणधरि गणगणधरि दथरिगडदग दथरिगडदग दथरिगडदग दथरिदथरितर्गड्दक्थरिकटतत्तक् इति षोडशकले ताले षोडशकलासु षोडशखण्डकं वाद्यं कृत्वा तान् षोडशखण्डान् द्विर्द्विः कुर्यात् ।

इत्येकसरवादः

तकारेण च सर्वेषामेतेषां त्याग इष्यते ।
कुर्यात्ततो दिगिदिगिं ताटवादादिकं पुनः ॥ १०५५ ॥

टाकणी प्रमाणे सर्व पहिला खंड योजून मग पुढचा (१०५३)

खंड खंड दोन दोन वेळा वाद्य (वाद ?) नावाच्या वादनात वाजवला जातो. त्यात एकसर व जोडा हे स्वरूप टाकणीप्रमाणे सांगितले आहे. (१०५४)

जसे– दंदंटिरिटिट्टिकड्द कडदगझे कडदगझे थरिक्कथरि टगणगणधरि गणगणधरि दथरिगडदग दथरिगडदग दथरिगडदग दथरिदथरितर्गड्दक्थरिक्कटतत्तक् असे षोडश कल तालातील सोळा कलांत सोळा खंडांचे वादन करून ते सोळा खंड दोन दोन वेळा योजावे.

हा एकसरवाद होय.

या सर्वांची समाप्ति तकाराने मानली आहे. मग दिगिदिगि तसेच ताटवाद इत्यादी योजावे. (१०५५) दिगिदिगिमध्ये दिगिदिगि ही अक्षरे विद्वानांनी सांगितली आहेत.

वाजवला असता ती टाकणी होय. तो एकवार वाजवला असता एकसरटाकणी होते. टाकणीचे अंग म्हणून प्राप्त झालेल्या श्रमवहनीचे लक्षण सांगत आहे– तद्धि - - - इत्यादी सात शुद्ध वर्णांतील काहींची एकवेळा, दोन वेळा, तीन वेळा किंवा चार वेळा आवृत्ति केल्याने श्रमवहनी होते. प्रस्तार दाखवण्यासाठी ' जसे ' म्हणून सांगत आहे – (१०५१, १०५२, १०५३–)

तद्धितोंटें इत्यादी अष्टकलतालापर्यंत श्रमवहनीचा प्रस्तार जाणावा. ती टाकणी दोन वेळा योजल्यास जोडाटाकणी होय.

क० आता वादाचे लक्षण देत आहे. वादनावाच्या वादनात त्याचा पहिला खंड टाकणीप्रमाणे एकवार योजून नंतर पुढचा पुढचा खंड दोन दोन वेळा वाजवला जातो. त्यात एकसर व जोडा हे स्वरूप टाकणीप्रमाणे सांगितले आहे. म्हणजे वर सांगितलेल्या लक्षणाचे वादन एक वेळ योजल्यास ते एकसरवाद व त्याच्या तिन्हींचा समुदाय दोन वेळा योजल्यास जोडावाद होय. (१०५३, १०५४)

---

९८. ' वाद्यसंज्ञके ' असा पाठ सर्वत्र मिळतो. पण कल्लिनाथाने टीकेत ' वादसंज्ञके ' असे म्हटले आहे (आनंदाश्रम आवृत्ति पृ० ६०५) वादाचे लक्षण ग्रंथकार देत असल्याने ' वाद-

वर्णा दिगिदिगीत्येते प्रोक्ता दिगिदिगौ बुधैः ।
यः खण्डोऽतिद्रुते माने ताटवादः स कथ्यते ॥ १०५६ ॥
अन्येऽपि वादविधयोऽभ्यूह्यन्तामध्वनामुना ।
इति वादप्रकाराणां सम्यक्त्वे विजयो भवेत् ॥ १०५७ ॥

इति वादकः

कर्ता वाद्यप्रबन्धानां नृत्तशिक्षाविचक्षणः ।
गीतवादननिष्णातः सुरेखोऽन्तर्मुखश्च यः ॥ १०५८ ॥
अर्धाङ्गमिव नर्तक्या वादयेद्रङ्गभूमिगः ।
वादकैः प्रेक्षितमुखो वादनार्थं मुखर्यसौ ॥ १०५९ ॥

इति मुखरी

किंचिद्धीनो मुखरिणः प्रोक्तः प्रतिमुखर्यसौ ।

इति प्रतिमुखरी

जो अतिद्रुत लयीच्या प्रमाणात (वाजवलेला वादनाचा) खंड असतो तो ताटवाद म्हटला जातो. (१०५६).

दुसरेही वादाचे प्रकार या मार्गाने तर्काने जाणून घ्यावे. अशा रीतीने वादप्रकारांचे समुचित स्वरूप योजल्याने (वादात) विजय होतो. (१०५७)

वादकाचे (लक्षण) समाप्त.

वाद्यप्रबंधांचा कर्ता, नृत्तशिक्षणात निष्णात, गीत व वादन यांत कुशल, सुरेख (म्हणजे सौष्ठवयुक्त) आणि अंतर्मुख, (१०५८) जो रंगभूमीवर असता नर्तकीचे अर्धांग असल्यासारखा वाजवतो व (इतर) वादक वादनासाठी ज्याच्या तोंडाकडे पाहतात तो मुखरी होय. (१०५९)

हा मुखरी होय.

मुखरीपेक्षा (गुणांच्या बाबतीत) थोडा कमी असणारा तो प्रतिमुखरी म्हटला आहे. (१०६०–)

हा प्रतिमुखरी होय.

दं दं टिरि इत्यादी एकसरवादाचा प्रस्तार होय. जोडावादात तोच दोनदा योजावा.

क० सर्वांना लागू पडणारा लक्षणाचा एक भाग 'तकारेण–इत्यादीने' सांगत आहे.

मग दिगिदिगि हे वर्ण वाजवावे. तसेच दिगिदिगि नंतर 'ताटवाद इत्यादी' योजावे. यातील 'इत्यादी' शब्दाने वादकांत प्रसिद्ध असलेले वादन विशेष जाणावे. पूर्वी सांगितलेले बोल्लावणी इत्यादी देशीप्रसिद्ध वादनप्रकार वादात सांगितलेल्या या मार्गाने तर्काने

नावाच्या (वादनात) ' असा लक्षणात निर्देश असणे योग्य ठरते. प्रस्तारात दिलेल्या स्वरूपावरून सोळा खंड स्पष्ट होत नाहीत.

शुद्धसालगगीतानां वर्णान् कठिनकोमलान् ॥ १०६० ॥
समांश्च विषमान् नादं मन्द्रं मध्यं च तारकम् ।
प्रौढं वा मधुरं सम्यगनुगच्छति वादनात् ॥ १०६१ ॥
पूर्वभागे तथाभोगे जक्काप्रहरणे क्रमात् ।
कुर्याद्वैकल्पिके यद्वा समग्रं गीतमाश्रिते ॥ १०६२ ॥
समुत्थिते वानुलोम्याद्वैलोम्याद्वोभयेन वा ।
निःसारौ सालगे गीते यस्तं गीतानुगं विदुः ॥ १०६३ ॥
क्रमात्तकारथोंकारौ स कुर्याद् ग्रहमोक्षयोः ।
इति गीतानुगः
वर्णव्यक्तिः सुरेखत्वमनुयायप्रवीणता[९९] ॥ १०६४ ॥

शुद्ध व सालग गीतांच्या कठिण व कोमल (तसेच) सम व विषम अक्षरांना आणि मंद्र, मध्य व तार (स्थानांतील) जोरदार किंवा मधुर नादाला जो (आपल्या) वादनाने योग्य तऱ्हेने अनुसरतो, (१०६०, १०६१) जो निःसारु तालातील सालग गीतात, पूर्वभागात (म्हणजे उद्ग्राहात) तसेच आभोगात जक्का (म्हणजे यति) व प्रहरण क्रमाने किंवा विकल्पाने अथवा संपूर्ण गीताच्या आश्रयाने उत्पन्न झालेले (असे योजतो) (तसेच ते) अनुलोमाने (म्हणजे ठराविक क्रमाने), विलोमाने (म्हणजे उलट क्रमाने) किंवा दोन्ही प्रकारांनी (योजतो) त्याला गीतानुग (म्हणजे गीताला अनुसरणारा) असे जाणतात. (१०६२, १०६३)

त्याने ग्रह व मोक्ष यांत क्रमाने तकार व थोंकार वाजवावे. (१०६४–)

हा गीतानुग होय.

वर्णांची स्पष्टता, सौष्ठवयुक्तता, (वादनाच्या) अनुकरणातील प्रावीण्य, (१०६४)

जाणावे. सुयोग्य रीतीने सांगितलेल्या प्रकाराप्रमाणे वादन केल्याने विजय मिळतो असे फळ दाखवले आहे. (१०५५ ते १०५७)

क० आता मुखरीचे लक्षण देत आहे– (मुखरी हा) यति इत्यादी वाद्यप्रबंध निर्माण करतो. तो नृत्तशिक्षणात निष्णात असतो. म्हणजे नटाने नर्तकांना प्रथम शिकवलेल्या नृत्ताचा, तो नट जवळ नसला तरी त्यांच्याकडून रियाज करून घेण्यात तत्पर असतो. तो मध्ये मध्ये नादाच्या अनुकरणाने गीत रंजक होईल असे वादन करण्यात निपुण असतो. तो सुरेख म्हणजे वादाच्या वेळी शरीर सौष्ठवयुक्त ठेवतो. तो अंतर्मुख म्हणजे एकाग्रचित्त असतो. रंगभूमीवर तो नर्तकीचे अर्धांग असल्याप्रमाणे वाजवतो. हात, पाय इत्यादी अंगे जशी नर्तकी नृत्तात योजते तसेच मुखरी ही नृत्ताला अनुसरणारी लय देऊन अंगाप्रमाणे उपयुक्त होत असल्याने अर्धांगासारखा असे त्याला

---

९९. सुधाकरटीका– अनुयाय म्हणजे गीताच्या छायेचे अनुसरण.

मधुरोद्धतवाद्येषु विज्ञता हस्तलाघवम् ।
अवधानं श्रमजयो मुखवाद्येषु पाटवम् ॥ १०६५ ॥
रक्तिराविद्धकस्यानुवृत्तिर्बहुलता तथा [१००] ।
यतितालल्यज्ञत्वं गीतानुगमनं तथा ॥ १०६६ ॥
गुणा मार्दलिकस्यैते दोषः स्यात्तद्विपर्ययः ।
इति मार्दलिकगुणदोषाः
तद्वृन्दं द्वित्रिचतुरैस्तज्ज्ञैर्मदलधारिभिः ॥ १०६७ ॥
प्राधान्येन विधातव्यं तैर्मुखर्यनुवर्तनम् ।
इति मार्दलिकवृन्दम्

मधुर व जोरदार वादनांतले विशेष ज्ञान असणे, हाताचा हलकेपणा, अवधान (म्हणजे मनाची सावधानता), श्रमावर जय, तोंडाने वादनांतले (बोल म्हणण्यात) कुशलता, रंजकता, आविद्धक (म्हणजे हुडुक्कावादक) यास अनुसरणे (१०६५) तसेच पुष्कळपणा, यति, ताल व लय यांचे ज्ञान, तसेच गीताला अनुसरणे (१०६६) हे मर्दलवादकाचे गुण होत. त्याच्या उलट असणारा तो दोष होय. (१०६७–)

हे मर्दलवादकाचे गुणदोष होत.

त्यांचा (म्हणजे मर्दलवादकांचा) वृंद दोन, तीन किंवा चार तज्ज्ञ अशा मर्दलवादकांनी (होतो). (१०६७)

त्यांनी मुख्यतः मुखरीचे अनुसरण करावे. (१०६८–)

हा मर्दलवादकांचा वृंद होय.

म्हटले आहे. बाकीचे वादक त्यांच्या तोंडाकडे पाहून वाजवतात. म्हणजे बाकीच्या वादकांचे वादन मुखरीच्या अधीन असते. प्रतिमुखरी व गीतानुग यांची लक्षणे मूळ ग्रंथातच स्पष्ट आहेत. त्यात 'जक्का ही यति म्हटली जाते. यति ही जक्का होय' असे म्हटले आहे. ग्रहात तकार व मोक्षात थोंकार योजावा असा क्रम जाणावा. (१०५८ ते १०६३, १०६४–)

क० आता मार्दलिकाचे गुण व दोष सांगत आहे–

अनुयाय म्हणजे अनुसरण, वादनाचे अनुकरण, त्यात प्रवीणता.

त्या गुणांच्या उलट असणारा तो दोष होय.

आता मार्दलिकांच्या वृंदाचे लक्षण देत आहे–

त्या मार्दलिकांचा वृंद म्हणजे समाज (अर्थात समूह) (१०६४ ते १०६७, १०६८–)

---

१००. सु. टी.– आविद्धक म्हणजे हुडुक्कावादक.

(हुडुक्का-)

या हस्तसंमिता दैर्घ्येऽष्टाविंशत्यङ्गुला पुनः ॥ १०६८ ॥
परिधावङ्गुलमिता पिण्डे सप्ताङ्गुले मुखे ॥
मण्डल्यौ वक्त्रयोर्वल्लीमध्यावेकादशाङ्गुले ॥ १०६९ ॥
सपादाङ्गुलकस्थौल्ये उद्वलीकृतबन्धने ।
वदनाभ्यां सह स्यातां कुर्याद्रन्ध्राणि षट् तयोः ॥ १०७० ॥
बद्धरज्जुनिवेशार्थं पुरोभागेऽर्गलात्रयम् ।
कलशाकलितद्वयन्तं पश्चाद्भागेऽर्गलाद्वयम् ॥ १०७१ ॥
बन्धसूत्रान्तरे मध्ये भवेदुदरपट्टिका ।
अङ्गुलत्रयविस्तारा श्लक्ष्णा हृदयहारिणी ॥ १०७२ ॥
द्वात्रिंशत्तन्तुसंजातरज्ज्वा पक्षद्वयं दृढम् ।
बद्ध्वा तत्रोत्कक्षकौ च विधाय स्कन्धपट्टिकाम् ॥ १०७३ ॥
तयोर्द्विगुणतां न्यस्येदङ्गुलार्धार्धसंमितम् ।
छिद्रं यस्याश्चतुर्थांशे नादोद्बोधविधायकम् ॥ १०७४ ॥

(हुडुक्का–)

हिची लांबी एक हात व घेर अठ्ठावीस अंगुळे मापाचा (असतो); खोडाची जाडी एक अंगुळ मापाची (असते) (आणि) दोन्ही तोंडे सात अंगुळे (व्यासाच्या) मापाची असतात. तोंडावरची कडी, वेलीमधून तयार केलेली (असून) अकरा अंगुळे (मापाची) (१०६८, १०६९) सव्वा अंगुळ जाडीची (व) उद्वलीने बांधलेली अशी तोंडांबरोबर ठेवलेली असावी. त्या (कड्यांत), बांधायची दोरी घालण्यासाठी सहा भोके करावी. (१०७०) पुढच्या बाजूस, दोन्ही टोकांना कळसे ठेवलेल्या तीन अर्गला (म्हणजे लाकडी तुकडे) व मागच्या बाजूला दोन अर्गला (योजाव्या). (१०७१) बांधायच्या दोरीमध्ये, मधल्या भागी उदरपट्टी असावी. ती तीन अंगुले लांबीची गुळगुळीत व मनोहर (असावी) (१०७२) बत्तीस दोऱ्यांनी वळून तयार केलेल्या दोरीने दोन्ही (तोडांच्या) बाजू बळकट बांधन तेथे दोन टोके वर असलेली अशी ती योजून त्यांत दुहेरी अशी (दोन्ही) खांद्यांवरून घेता येणारी पट्टी (बांधून) ठेवावी. या (हुडुक्केच्या) चवथ्या भागात अर्धार्ध (म्हणजे पाव अंगुळ) मापाचे भोक नाद स्पष्ट उत्पन्न होण्यासाठी असते. (१०७३, १०७४)

क० आता हुडुक्केचे लक्षण देत आहे–

पटहात सांगितलेल्या वर्णांपेक्षा या हुडुक्केत मकार व ओंकार हे वर्ण जास्ती सांगितले आहेत ; याचा अर्थ असा की पटहात सांगितलेल्या वर्णांच्यासह मकार व ओंकार योजावे. या हुडुक्केला लक्ष्यजाणकार आवज तसेच स्कंधावज या दुसऱ्या दोन नांवानी संबोधितात.

हुडुक्का सा बुधैः प्रोक्ता तस्याश्च स्कन्धपट्टिकाम् ।
न्यस्य स्कन्धे दक्षिणेन पाणिना वादनं भवेत् ॥ १०७५ ॥
उदरे पट्टिका प्रोक्ता तस्यां वामं निवेशयेत् ।
देवता मातरः सप्त शार्ङ्गदेवेन कीर्तिताः ॥ १०७६ ॥
कुर्वीत पाटहान्वर्णानिह देंकारवर्जितान् ।
अत्रान्यैरधिकावुक्तौ मङ्गेंकारौ मनीषिभिः ॥ १०७७ ॥
लक्ष्यज्ञास्त्वावजं प्राहुरिमां स्कन्धावजं तथा ।

इति हुडुक्कालक्षणम् ।

(करटा—)

बीजवृक्षोद्भवा पिण्डेऽङ्गुलतुर्यांशसंमिता ॥ १०७८ ॥
एकविंशत्यङ्गुला स्याद्दैर्घ्ये हस्तमिताथवा ।
परिधौ दधते मानं या चत्वारिंशदङ्गुलम् ॥ १०७९ ॥
चतुर्दशाङ्गुले वक्त्रे केषांचिद् द्वादशाङ्गुले ।
मण्डल्यौ लोहजे सूत्रवेष्टिते चर्मबन्धने ॥ १०८० ॥

अशी ती हुडुक्का विद्वानांनी सांगितली आहे. तिची खांद्यावरून घ्यायची पट्टी खांद्यावर ठेवून उजव्या हाताने तिचे वादन करावे. (१०७५) उदरावर (म्हणजे मध्यभागी) जी पट्टी सांगितली आहे तिच्यावर डावा हात ठेवावा. सात मातृका या देवता (हुडुक्केच्या बाबतीत) शार्ङ्गदेवाने सांगितल्या आहेत. (१०७६)

देंकार सोडून पटहात निष्पन्न होणारे (बाकीचे) वर्ण हिच्यात योजावे. हिच्यात दुसऱ्या विद्वानांनी मकार व झेंकार हे वर्ण अधिक सांगितले आहेत. (१०७७) लक्ष्य-जाणकार हिला आवज तसेच स्कंधावज असे म्हणतात. (१०७८)

हुडुक्केचे लक्षण समाप्त.

(करटा–)

हिचे खोड म्हाळुंगाच्या झाडापासून तयार केलेले असून पाव अंगुळ जाडीचे असते. (१०७८) तिची लांबी एकवीस अंगुळे किंवा एक हात या प्रमाणाची असते. तिचा घेर चाळीस अंगुळे या मापाचा असतो. (१०७९) तिची तोंडे चौदा अंगुळे किंवा काहींच्या (मतानुसार) बारा अंगुळे (व्यासाची) असतात. दोन्ही कडी लोखंडाची असून ती दोऱ्यांनी वेढलेली व चामड्याने बांधलेली असतात. (१०८०) त्यांचा घेर बेचाळीस

क० आता करटेचे लक्षण देत आहे–

करट हा एक वर्णसमूह; तिरिकि तिरिकिरि हा दुसरा. प्रायः म्हणजे प्रचुरपणाने. सामान्यपणे पटह इत्यादीतले कूट पाट जाणावे. (१०७८ ते १०८५)

परिधौ संमिते ते च द्वाचत्वारिंशताङ्गुलैः ।
तिस्रस्तिस्रस्तथा तन्त्रीर्मुखयोर्वलयद्वयम् ॥ १०८१ ॥
दधते कवलव्याप्तं चतुर्दशभिरन्वितम् ।
रन्ध्रैस्तेष्वेकान्तरेषु विम्रिकास्तावतीः क्षिपेत् ॥ १०८२ ॥
द्वाभ्यां द्वाभ्यां विम्रिकाभ्यां बन्धो मत्स्याकृतिर्भवेत् ।
यस्यास्तां करटामाहुः प्रान्तयोः प्रान्तबद्धया ॥ १०८३ ॥
कच्छया स्कन्धदेशे तां कट्यां वा वादने वहेत् ।
चर्चिका देवता चास्यां पाटास्तु करटेत्यमी ॥ १०८४ ॥
वादनं कुडुपाभ्यां तु शार्ङ्गदेवेन कीर्तितम् ।
तिरिकितिरिकिरीति प्रायः पाटद्वयं मतम् ॥ १०८५ ॥

इति करटालक्षणम्

(घटः)

घनः श्लक्ष्णः सुपक्वश्च स्तोकवक्त्रो महोदरः ।
पाणिभ्यां वाद्यते तज्ज्ञैश्चर्मनद्धाननो घटः ॥ १०८६ ॥
कथिताः पाटवर्णा ये मर्दले ते घटे मताः ।

इति घटलक्षणम् ।

अंगुळे या मापाचा असतो. तसेच तीन तीन तारा तोंडांवरची दोन्ही कडी धारण करतात; ती कवळाने व्यापलेली असून चौदा भोकांनी युक्त असतात; त्यांत एकेक (भोक) मध्ये सोडून त्याप्रमाणे तेवढ्या विम्रिका ठेवाव्या. (१०८१, १०८२) दोन दोन विम्रिकांची मिळून बांधणी माशाच्या आकारासारखी होते. अशी (रचना असलेल्या) तिला करटा म्हणतात. वाजवताना दोन्ही बाजूच्या कडेला बांधलेल्या पट्टीने खांद्यावरून घेऊन किंवा कमरेला बांधून ती धारण करावी. हिची देवता चर्चिका असून करट हे पाट हिच्यात (उत्पन्न होतात). (१०८३, १०८४) हिचे वादन शार्ङ्गदेवाने दोन कुडुपांनी (म्हणजे वाजवायच्या कोणांनी) सांगितले आहे. हिच्यात प्रायः (करट व) तिरिकितिरिकिरि हे दोन पाट मानले आहेत. (१०८५)

करटेचे लक्षण समाप्त.

(घट–)

मोठे उदर व लहान तोंड असलेला, चांगला भाजलेला, मजबूत, गुळगुळीत व चामड्याने तोंड मढवलेला घट तज्ज्ञांकडून दोन्ही हातांनी वाजवला जातो. (१०८६)

मर्दलात जे पाटवर्ण सांगितले आहेत ते घटात मानले आहेत. (१०८७–)

घटाचे लक्षण समाप्त.

(घडसः)

हुडुक्कयैव घडसो व्याख्यातः किंतु मण्डली ॥ १०८७ ॥
दक्षिणस्योद्दलीबद्धा वामा रज्वा नियन्त्रिता ।
ओदर्यां पट्टिकायां च वामोऽत्र न निवेश्यते ॥ १०८८ ॥
गोंकारबहुलं चामुं वादयेदिति तद्विदः ।
अङ्गुष्ठमध्यमाङ्गुल्यौ मदनाक्ताग्रभागतः ॥ १०८९ ॥
दक्षिणेन करेणास्ये घर्षणाद्गोंकृतिर्भवेत् ।
घातोऽङ्गुलीभिर्वामस्य वामाङ्गुष्ठेन पीडनम् ॥ १०९० ॥

इति घडसलक्षणम् ।

(ढवसः)

स्याद्धस्तैर्द्व्यः परिधौ सनवत्रिंशदङ्गुलः ।
द्वादशाङ्गुलके वक्त्रे वल्लीवलयसंयुते ॥ १०९१ ॥
यो धत्ते सप्त सप्तापि रन्ध्राणि वलयद्वये ।
तथा कवलयोस्ताभ्यां तुण्डे वलयसंयुते ॥ १०९२ ॥

(घडस-)

हुडुक्केनेच घडस सांगितला गेला आहे. पण (फरक इतकाच की) उजव्या बाजूचे कडे उद्दलीने बांधलेले असते व डावीकडचे दोरीने बांधलेले असते. यात उदरपट्टिकेवर डावा हात ठेवला जात नाही. (१०८७, १०८८)

याचे जाणकार गोंकार पुष्कळ असणारे असे याचे वादन करावे म्हणून सांगतात. मेणाचा लेप असलेल्या टोकाने, अंगठा व मधले बोट यांच्या योगे उजव्या हाताने तोंडावर घासून वाजवल्याने गोंकार उत्पन्न होतो. डाव्या हाताच्या बोटांनी (डाव्या तोंडावर) आघात करावा व डाव्या अंगठ्याने दाबून (वाजवावे). (१०८९, १०९०)

घडसाचे लक्षण समाप्त.

ढवस-

(ढवस हा) एक हात लांबीचा असून त्याचा घेर एकूण चाळीस अंगुळाचा असतो. त्याची दोन्ही तोंडे बारा अंगुळे (व्यासाची) असून ती वेलींच्या कड्यांनी युक्त असतात. (१०९१)

दोन्ही कड्यात तसेच कवळात (प्रत्येकी) सात सात भोके तो धारण करतो. त्या (दोन कवळांनी) कड्यांनी युक्त असणारी दोन्ही तोंडे (१०९२) झाकून, भोकांतून

क० आता घट - घडस - ढवस- ढक्का - कुडुक्का- कुडुवा - रुञ्जा - डमरुक - डक्का - मण्डिडक्का - डक्कुली - सेल्लुका - झल्लरी - झाण - त्रिवली - दुन्दुभि - भेरी - निःसाण तुम्बकी यांची लक्षणे मूळ ग्रंथातच स्पष्ट आहेत. (१०८६ ते ११५७)

पिधाय गाढं बध्येते रन्ध्रविन्यस्तदोरकैः ।
यस्यासौ ढवसः प्रोक्तः शार्ङ्गदेवेन सूरिणा ॥ १०९३ ॥
स्कन्धे निक्षिप्य कच्छान्तं वामहस्तेन वादयेत् ।
वामास्ये दक्षिणस्थेन कुडुपेन तु दाक्षिणे ॥ १०९४ ॥
ढेंकारपाटवर्णैश्च रूढोऽयं ढवसो जने ।

इति ढवसलक्षणम् ।

(ढक्का–)

व्याख्याता ढवसेनैव ढक्का किंतु मुखद्वयम् ॥ १०९५ ॥
त्रयोदशाङ्गुलं तस्या धृत्वा तां वामपाणिना ।
तज्ज्ञो दक्षिणहस्तस्थकोणघातेन वादयेत् ॥ १०९६ ॥
ढेंकारः पाटवर्णाः स्युर्निःशङ्केनेति कीर्तितम् [१०१] ।

इति ढक्कालक्षणम् ।

(कुडुक्का–)

हुडुक्केवार्गलाहीना कुडुक्का किंतु वादनम् ॥ १०९७ ॥
अस्याः करेण कोणेन क्षेत्रपालस्तु देवता ।

इति कुडुक्कालक्षणम् ।

घातलेल्या दोऱ्यांनी ती घट्ट बांधली जातात. असा हा ढवस विद्वान शार्ङ्गदेवाने सांगितला आहे. (१०९३) पट्टीचे टोक खांद्यावर ठेवून तो डाव्या हाताने डाव्या तोंडावर वाजवावा व उजव्या हातात घेतलेल्या कुडुपाने उजव्या (तोंडावर वाजवावा). (१०९४) ढेंकारयुक्त पाटवर्णांनी हा लोकांत रूढ आहे. (१०९५–)

ढवसाचे लक्षण समाप्त.

(ढक्का–)

ढवसानेच ढक्केचे वर्णन सांगितले गेले आहे. पण (फरक एवढाच की) तिची दोन्ही तोंडे (१०९५) तेरा अंगुळे (मापाची असतात). तज्ज्ञाने ती डाव्या हातात धरून उजव्या हातात घेतलेल्या कोणाच्या आघाताने वाजवावी. (१०९६)

ढेंकार (व) पाटवर्ण (हिच्यात असतात) असे निःशंकाने सांगितले आहे.

(कुडुक्का–)

अर्गला नसलेली हुडुक्काच कुडुक्का होय. पण हिचे वादन (१०९७) हाताने व कोणाने (केले जाते). (हिची) देवता क्षेत्रपाल (होय).

---

१०१. आनंदाश्रम आवृत्ति पृ० ६१० वरील तळटीपेत 'पाटवर्णः स्यान्निःशं...' व 'पाटवर्णैश्च निः०० ' असे दोन पाठ दिले आहेत. पहिल्याचा अर्थ– 'ढेंकार हा पाटवर्ण असतो' असा होतो दुसऱ्याचा अर्थ– 'ढेंकार व पाटवर्ण यांनी' असा होईल. यानुसार भाषांतर दिले आहे.

(कुडुवा–)

बीजदारुमयी सप्ताङ्गुलगर्भमुखद्वया ॥ १०९८ ॥

एकविंशत्यङ्गुला च यस्या दैर्घ्ये समाकृतिः ।
संहताग्नित्रयाकारत्र्यङ्गुलस्थूलतायुते ॥ १०९९ ॥

वृत्ते नवाङ्गुले गर्भे वलये वल्लिनिर्मिते ।
सप्तसप्तच्छिद्रयुते यस्याः स्यातां मुखद्वये ॥ ११०० ॥

कवलाभ्यां पिनद्धेते मुखे च वलयान्विते ।
सरन्ध्रे कवले रन्धन्यस्ततन्त्रीसुयन्त्रिते ॥ ११०१ ॥

कुडुवा सा हुडुक्कोक्तवर्णात्क्रेंकारभूयसी ।
कोणाभ्यां मदनाक्ताभ्यां वाद्यते त्यक्तझेंकृतिः ॥ ११०२ ॥

इति कुडुवालक्षणम् ॥

(रुञ्जा—)

अष्टादशाङ्गुला दैर्घ्ये दृढा रुञ्जा समाकृतिः ।
एकादशाङ्गुले तस्या वदने कुण्डलीयुते ॥ ११०३ ॥

(कुडुवा–)

(ही) म्हाळुंगाच्या झाडापासून बनवलेली असून हिची दोन्ही तोंडे सात अंगुळे व्यासाची असतात (१०९८) व लांबी एकवीस अंगुळे असते. हिचा आकार एकसारखा असतो. हिच्या दोन्ही तोंडांवरची कडी वेलीपासून बनवलेली, एकत्र असणाऱ्या तीन अग्नींच्या आकाराच्या (म्हणजे तिकोनी) तीन अंगुळे जाडीने युक्त, गोल, आतली पोकळी नऊ अंगुळे असलेली व प्रत्येकी सात सात भोके असलेली अशी असतात. (१०९९, ११००).

कडयांनी युक्त असणारी ही तोंडे दोन कवळांनी बांधलेली असतात. कवळे छिद्रयुक्त असून, भोकांतून घातलेल्या तारेने बांधून पक्की केलेली असतात. (११०१)

ही कुडुवा हुडुक्केत सांगितलेल्या वर्णांनी, क्रेंकारप्रचुर व झेंकाररहित अशी मेणाने माखलेल्या दोन कोणांनी वाजविली जाते. (११०२)

हे कुडुवेचे लक्षण होय.

रुंजा–

रुंजा ही एकसारख्या आकाराची, बळकट व अठरा अंगुळे लांबीची असते. तिची दोन्ही तोंडे अकरा अंगुळे (मापाची) व कडयांनी युक्त असतात. (११०३) ती चामड्याने बांधावी. डाव्या तोंडाच्या आतल्या बाजूला दोन कडी (योजावी). (त्यांतले)

नद्धव्ये चर्मणा वामवक्त्रान्तःकुण्डलीद्वयम् ।
तत्रैका वक्त्रमात्रा स्यादपरा चतुरङ्गुला ॥ ११०४ ॥
कुण्डल्योरन्तराले स्यान्नलिका स्नायुनिर्मिता ।
सैकच्छिद्रं वामवक्त्रं सूत्रतन्त्वञ्चनीयुतम् ॥ ११०५ ॥
पूर्ववद्विग्निकाः कार्या वक्त्रयोः सप्त सप्त च ।
पादोनहस्तमात्रां च नागपाशवतीं दृढाम् ॥ ११०६ ॥
कच्छां स्कन्धे निवेश्यास्या वादनं वेदितं बुधैः ।
रुंकारजननाद्रुञ्जा सा भवेद्भृङ्गिदैवता ॥ ११०७ ॥
मतङ्गोक्ताःस्त्वमे वर्णाः कतदा वनमा रवौ ।
उक्तास्त्वन्यैरिमे वर्णाः करगा घटनाः खहौ ॥ ११०८ ॥
विग्निका वाद्यशास्त्रेऽस्मिन्कर्पराः परिकीर्तिताः ।

इति रुञ्जालक्षणम् ।

(डमरुकः)

वितस्तिमात्रदैर्घ्यः स्यादष्टाङ्गुलमुखद्वयः ॥ ११०९ ॥

एक तोंडाच्याएवढेच व दुसरे चार अंगुळे (प्रमाणाचे असावे). (११०४) (या) दोन्ही कड्यांच्या मधल्या अंतरात स्नायूपासून बनवलेली नलिका ठेवावी. डावे तोंड एक छिद्राने युक्त असून ते सुतांनी वळलेल्या दोरीने युक्त असे असते. (११०५)

पूर्वीप्रमाणे दोन्ही तोंडांवर (प्रत्येकी) सात सात विग्निका योजाव्या. पाऊण हात लांबीची नागपाशयुक्त अशी बळकट पट्टी खांद्यावरून घेऊन विद्वानांनी हिचे वादन जाणले आहे. रुंकार हा (नाद) उत्पन्न होत असल्यामुळे ही रुंजा होय. तिची देवता भृंगि होय. (११०६, ११०७)

कतद, वनम, र आणि व हे वर्ण (हिच्यात) मतंगाने सांगितले आहेत; इतर (आचार्यांनी) करग, घटन, ख आणि ह हे सांगितले आहेत. (११०८)

या वाद्यशास्त्रात विग्निका या खापरे म्हणून सांगितल्या आहेत.

रुंजेचे लक्षण समाप्त.

(डमरुक–)

(डमरुक) फक्त एक वीत लांबीचा व दोन्ही तोंडे आठ अंगुळे मापाची असणारा असा असतो. (११०९) त्याची कड्यांनी युक्त असणारी तोंडे चामड्याने बांधलेली असतात. (त्याचा) मध्यभाग लिवलीप्रमाणे लहान असून सुताच्या दोऱ्यांनी बांधलेला

यो यस्य मण्डलीयुक्ते मुखे बद्धे च चर्मणा ।
त्रिवलीवत्क्षाममध्यो निबद्धः सूत्रदोरकैः ॥ १११० ॥
मध्ये च गाढतां नीतावञ्चन्यौ वादनाय च ।
भवेतां प्रान्तसंलग्नसमृन्मदनगोलकैः ॥ १११ १ ॥
असौ डमरुको मध्ये धृत्वा हस्तद्वयेन च ।
डघवर्णौ वादनीयः प्रोक्तो निःशङ्कसूरिणा ॥ १११२ ॥
अन्यैः कखरटा वर्णाः प्रोक्ता डमरुकेऽधिकाः ।

इति डमरुकलक्षणम् ।

वितस्तिमात्रं दैर्घ्यं स्यान्मध्यः किंचित्कृशो भवेत् ॥ १११३ ॥
मुखे त्वष्टाङ्गुलैः पिण्डोऽर्धाङ्गुलस्तन्त्रिकाद्वयम् ।
मुखे मुखे शङ्कवश्च चत्वारस्ताम्रनिर्मिताः ॥ १११४ ॥
तेषामधो द्वावूर्ध्वं द्वौ तन्त्रीबन्धनसिद्धये ।
तन्त्र्योस्तृणशलाकां च निदध्याद्ध्वनिपुष्टये ॥ १११५ ॥
अन्यल्लक्ष्म हुडुक्कावद्यस्याः पाटाक्षराण्यपि ।
स्याद्दशाङ्गुलदैर्घ्येण कुडुपेन तु वादनम् ॥ १११६ ॥

असतो. (१११०) (त्याच्या) मध्यभागी वादनासाठी सुतांनी वळलेल्या दोन दोऱ्या घट्टपणे बांधलेल्या असतात; त्यांच्या टोकांना माती व मेण यांच्या गोळ्या योजलेल्या असतात. (११११) हा डमरुक दोन्ही हातांनी मध्यभागी धरून डघ हे वर्ण उत्पन्न (करीत) वाजवावा असे निःशंक या विद्वानाने सांगितले आहे (१११२)

इतर (आचार्यांनी) कखरट हे वर्ण डमरुकात जास्ती सांगितले आहेत. (१११३-)

हे डमरुकाचे लक्षण होय.

(डक्का–)

(डक्का ही) वीतभर लांबीची असून तिचा मध्य भाग थोडा बारीक असतो. (१११३) दोन्ही तोंडे (प्रत्येकी) आठ अंगुळे मापाची असून, (खोडाची) जाडी अर्धे अंगुळ असते. प्रत्येक तोंडात दोन तारा असून तांब्यांचे चार शंकू असतात. (१११४) तारेची बांधणी सिद्ध होण्यासाठी त्या (शंकूपैकी) दोन खाली व दोन वर असतात. दोन्ही तारांत नाद पुष्ट होण्यासाठी गवताची काडी घालावी. (१११५) हिचे बाकीचे लक्षण व पाटाक्षरेही हुडुक्केप्रमाणे (होत). हिचे वादन दहा अंगुळे लांबीच्या कुडुपाने करावे. (१११६) अशी ही डक्का निःशंक शार्ङ्गदेवाने सांगितली आहे. दुसरे (आचार्य) हिचे

निःशङ्कशार्ङ्गदेवेन डक्का सा परिकीर्तिता ।
अन्येऽस्या वादनं प्राहुः करेण कुडुपेन च ॥ १११७ ॥
हस्तघातेन डंकारो वादने कुडुपेन तु ।
घटस्ततो डगिश्चेति मुखान्पाटान्वदन्त्यमी[१०२] ॥ १११८ ॥
नगौ खकरटा वर्णा मुख्याः प्रोक्ताः परैरिह ।
अस्यां च सूरयः प्राहुर्देवतां विन्ध्यवासिनीम् ॥ १११९ ॥
अङ्गुलोना मध्यमा सा द्व्यङ्गुलोना कनीयसी ।

इति डक्कालक्षणम् ।

(मण्डिडक्का–)

डक्कैव मण्डिडक्का स्यात्किं त्वस्याः षोडशाङ्गुलम् ॥ ११२० ॥
दैर्घ्यमष्टाङ्गुलौ गर्भौ स्यातां वदनयोर्द्वयोः
षोडशाङ्गुलको मध्यपरिधिर्नात्र चार्गला ॥ ११२१ ॥
न च कच्छोत्कक्षकस्तु मध्ये स्यादञ्चनीद्वयम् ।
उत्कक्षं चाञ्चनीद्वन्द्वं वामाङ्गुष्ठाङ्गुलित्रयात् ॥ ११२२ ॥

वादन हाताने व कुडुपाने सांगतात. (१११७) (या) वादनात हाताच्या आघाताने डंकार व कुडुपाने घट व नंतर डगि असे मुख्य पाट हे (आचार्य) सांगतात. (१११८) इतर (काही आचार्यांनी) हिच्यात नग खकरट हे वर्ण मुख्य (पाट) म्हणून सांगितले आहेत. विद्वानांनी हिच्या बाबतीत विन्ध्यवासिनी ही देवता सांगितली आहे. (१११९) (लांबी) एक अंगुळ कमी असता ती मध्यम (प्रकारची) व दोन अंगुळे कमी असता कनिष्ठ (प्रकारची) होय.

डक्केचे लक्षण समाप्त.

(मंडिडक्का –)

डक्का हीच मंडिडक्का होय; पण हिची लांबी अठरा अंगुळे असून दोन्ही तोंडांचा आतला भाग आठ अंगुळांचा असतो. मधल्या भागाचा घेर सोळा अंगुळांचा असून यात अर्गला नसते. (११२०, ११२१). हिच्यात पट्टी नसते पण उत्कक्षक (म्हणजे वर असणारे दोरीचे टोक) असून (सुतानी वळलेल्या) दोन दोऱ्या मध्यभागी असतात. उत्कक्ष व या दोन्ही दोऱ्या डावा अंगठा व तीन बोटे यांनी (११२२) धरून कड्याचा शेवटचा भाग तर्जनीने दाबून उजव्या गुडघ्यावर धारण केलेल्या तोंडावर उजव्या हाताने प्रहार

---

१०२. 'मुखान् पाटान्' याचे स्पष्टीकरण सुधाकरटीकेत 'पाटमुखान्' असे दिले आहे. पुढच्या श्लोकाच्या पहिल्या ओळीत मुख्य वर्ण अशी शब्दयोजना असल्याने, मुख्य पाट असे भाषांतर केले आहे.

धृत्वा संपीड्य तर्जन्या मण्डलीप्रान्तमाननम् ।
अस्या दक्षिणजानुस्थं हन्याद्दक्षिणपाणिना ॥ ११२३ ॥
उत्कक्षं मणिबन्धोर्ध्वं यद्वान्यस्याश्चनीद्वयम् [१०३] ।
कनिष्ठानामिकाङ्गुष्ठैः संयुज्यापीड्य मण्डलीम् ॥ ११२४ ॥
तर्जन्या मध्यया वाथ हस्तेनान्येन वादयेत् ।
वदन्ति वादनं तस्याः करेण कुडुपेन वा ॥ ११२५ ॥
चर्यागाने च पूजायां शक्तेः सा विनियुज्यते ।
इति मण्डिडक्कालक्षणम् ।

(डक्कुली–)

कांस्याद्गोशृङ्गतो दन्तिदन्ताद्वा डक्कुली भवेत् ॥ ११२६ ॥
दैर्घ्ये पञ्चाङ्गुला वक्त्रे तस्याश्च चतुरङ्गुले ।
मेषपार्युद्दलीबद्धे स्वस्वचक्रसमन्विते ॥ ११२७ ॥

करावा. (११२३) किंवा उत्कक्ष मनगटाच्यावर ठेवून, दोन्ही दोऱ्या करंगळी, अनामिका (म्हणजे तिसरे बोट) व अंगठा यांनी धरून कडे (११२४) पहिल्या बोटाने दाबून, दुसऱ्या हाताने वादन करावे. (काही) तिचे वादन हाताने किंवा कुडुपाने सांगतात. (११२५)

शक्तिदेवतेच्या पूजेत व चर्यागानात तिचा उपयोग केला जातो. (११२६–)

मंडिडक्केचे लक्षण समाप्त.

(डक्कुली–)

डक्कुली, कासे, बैलाचे शिंग किंवा हस्तिदंत यापासून (निर्माण केलेली) असते. (११२६) तिची लांबी पाच अंगुळे असून दोन्ही तोंडे चार अंगुळे (मापाची) असतात. मेंढ्याच्या कातडयाच्या उद्दलीने ती बांधलेली असतात व आपापल्या चक्राने युक्त असतात. (११२७) (ती) दोन्ही चक्रे काशाची, तांब्याची किंवा लोखंडाची असून प्रत्येकी पाच भोके असलेली असतात. तसेच दोन्ही उद्दल्या, भोकांतून घातलेल्या, सुतांनी वळलेल्या दोऱ्यांनी मध्ये (ताणून) घट्ट बांधल्या जातात. मध्यभाग, फार सैल नाही व फार घट्ट नाही अशा रीतीने सुताने वेढलेला असतो. सुतावर अनामिका (म्हणजे तिसरे बोट) ठेवून,

---

१०३. अड्यार आवृत्तीत 'यद्वान्यस्या०००' असे छापले आहे. आनंदाश्रम आवृत्तीत 'यद्वाऽन्यस्या०००' असे दिले आहे.

वादनाचा दुसरा प्रकार स्पष्ट करीत असता सुधाकरटीकेत '०००अञ्चनद्वयं मणिबन्धे ऊर्ध्वप्रदेशे निक्षिप्य असे म्हटले आहे.' 'निक्षिप्य' हे 'न्यस्य' यांचे स्पष्टीकरण आहे. म्हणून 'यद्वा न्यस्य' असा अर्थाच्या दृष्टीने उचित वाटणारा पाठ भाषांतरासाठी घेतला आहे.

चक्रे च कांस्यजे ताम्रमये वा लोहजे पृथक् ।
पञ्चरन्ध्रे तथोद्दल्यौ रन्ध्रविन्यस्तदोरकैः ॥ ११२८ ॥

सौत्रैर्गाढं निबध्येते मध्ये सूत्रेण वेष्टितम् ।
नातिश्लथं नातिगाढं मध्यं सूत्रे त्वनामिकाम् ॥ ११२९ ॥

निधाय मध्यतर्जन्यौ विवृते चक्रसंयुते ।
कृत्वाङ्गुष्ठं त्वन्यचक्रे[१०४] न्यस्याथ मदनाञ्चिताम् ॥ ११३० ॥

विधायाञ्चनिकामेकां तां दुंदुमिति वादयेत् ।
तुंतुमित्यपरे प्राहुः पाटा मर्दलसंभवाः ॥ ११३१ ॥

यथासंभवमेतस्यां शार्ङ्गदेवेन कीर्तिताः ।

इति डक्कुलीलक्षणम् ।

(सेल्लुका–)

षड्विंशत्यङ्गुला दैर्घ्ये परिधौ त्रिंशदङ्गुला ॥ ११३२ ॥
समकाया सेल्लुका स्याद्बीजकाष्ठेन निर्मिता ।
दशाङ्गुले मुखे तस्याः परैस्त्वेकादशाङ्गुले ॥ ११३३ ॥

मधले बोट व पहिले बोट एकमेकापासून दूर असे चक्राशी जोडून व अंगठा दुसऱ्या चक्रावर ठेवून, मग मेणाने युक्त एक अञ्चनी (म्हणजे सुताची दोरी) योजून ती (डक्कुली) दुंदुं अशी वाजवावी. दुसरे (आचार्य) तुं तुं (अशी वाजवावी) असे म्हणतात. मर्दलात उत्पन्न होणारे पाट (११२८, ११२९, ११३०, ११३१) हिच्यात यथासंभव शार्ङ्गदेवाने सांगितले आहेत. (११३२–)

डक्कुलीचे लक्षण समाप्त.

(सेल्लुका–)

सेल्लुका ही म्हाळुंगाच्या लाकडापासून निर्मिलेली असून ती एकसारख्या आकाराची, सव्वीस अंगुळे लांबीची व तीस अंगुळे घेराची असते. तिची दोन्ही तोंडे दहा अंगुळे (मापाची) असतात. दुसऱ्या (आचार्यांनी) ती अकरा अंगुळे (मापाची) सांगितली आहेत. (११३२, ११३३) त्यांपेक्षा एक अंगुळ अधिक असणाऱ्या अशा

---

१०४. सुधाकरटीकेत 'अङ्गुष्ठमन्यस्मिन् वक्त्रे न्यस्य स्थापयित्वा' म्हणजे 'अंगठा दुसऱ्या तोंडावर ठेवून' असे स्पष्टीकरण दिले आहे. यावरून 'त्वन्यचक्रे' याऐवजी 'त्वन्यवक्त्रे' असा पाठ सिंहभूपालासमोर असला पाहिजे. आनंदाश्रम आवृत्तीत (पृ० ६१३) तळटीप २च. मध्ये 'त्वन्यवक्त्रे' हा पाठ दिला आहे.

उक्ते न बन्धनोद्ग्र्यौ ताभ्यामेकाङ्गुलाधिके ।
वल्लीजं तर्जनीस्थौल्यं मुखयोर्वलयद्वयम् ॥ ११३४ ॥

सरन्ध्रषट्कं रन्ध्रस्थरज्जुभिर्गाढयन्त्रितम् ।
एकाङ्गुलाधिकं तच्च वक्त्राभ्यां वदनं पुनः ॥ ११३५ ॥

तन्त्रिकागर्भितं वामं वामहस्तेन वादयेत् ।
मुखं दक्षिणपाणिस्थकुडुपेन तु दक्षिणम् ॥ ११३६ ॥

मुखे वामे तु झेंकारो धिंकारो दक्षिणे मुखे ।

इति सेल्लुकालक्षणम् ।

(झल्लरी–)

पलैः[१०५]स्यात्पञ्चविंशत्या दैर्घ्ये तु द्वादशाङ्गुला ॥ ११३७ ॥

अष्टादशाङ्गुलमिता परिधौ समविग्रहा ।
ससूत्रकटकं रन्ध्रद्वयं कण्ठे च बिभ्रती ॥ ११३८ ॥

बांधायच्या उद्ग्र्या नसतात. वेलीपासून बनवलेली, तर्जनी एवढी जाड अशी दोन कडी तोंडांवर (बसवलेली असतात). (११३४) ती (प्रत्येकी) सहा भोके असलेली व भोकांतून घातलेल्या दोऱ्यांनी घट्ट बांधलेली असून तोंडांपेक्षा एक अंगुळ अधिक (प्रमाणाची असतात). आत तार असलेले डावे तोंड डाव्या हाताने वाजवावे व उजवे तोंड उजव्या हातात धेतलेल्या कुडुपाने (वाजवावे). (११३५, ११३६).

(हिच्यात) डाव्या तोंडावर झेंकार व उजव्या तोंडावर धिंकार (उत्पन्न होतो). (११३७–)

सेल्लुकेचे लक्षण समाप्त.

(झल्लरी–)

(झल्लरी) पंचवीस पळे (वजन असलेली) व बारा अंगुळे लांबीची असते. (११३७) ती एकसारख्या आकाराची असून तिचा घेर अठरा अंगुळे मापाचा असतो. दोऱ्याचे कडे असलेली दोन भोके ती गळ्यामध्ये धारण करते. (११३८) तिचे तोंड

---

१०५. पल किंवा पळ हे चार कर्ष वजनाचे माप होय. एक कर्ष = सोळा मासे. अर्थात पळ = चौसष्ट मासे. पंचवीस पळे = सोळाशे मासे = एकशेतेहतीसपूर्णांकएकतृतीयांश तोळे.

चर्मणानद्धवदना झल्लरी परिकीर्तिता ।
वामहस्तधृता सा च वाद्या दक्षिणपाणिना ॥ ११३९ ॥
इति झल्लरीलक्षणम् ।

(भाणः)

स्वात्तदर्धपलो भाणः परिधौ द्वादशाङ्गुलः ।
अन्यत्तु झल्लरीलक्ष्म तस्य श्रीशार्ङ्गिणोदितम् ॥ ११४० ॥
इति भाणलक्षणम् ।

(त्रिवली–)

सप्ताङ्गुलमुखद्वन्द्वात्त्रिवली हस्तदैर्घ्यभाक् ।
मुष्टिग्राह्यश्च मध्योऽस्या वदने कवलावृते ॥ ११४१ ॥
कवले लोहमण्डल्यौ सप्तरन्ध्रे पृथक्पृथक् ।
रन्ध्रन्यस्तैर्गुणैर्बद्धो [१०६] मध्ये गाढं च वेष्टनम् ॥ ११४२ ॥

चामड्याने बांधलेले असते. (अशी ही) झल्लरी सांगितली आहे. ती डाव्या हातात घेऊन उजव्या हाताने वाजवावी. (११३९)

झल्लरीचे लक्षण समाप्त.

(भाण–)

(झल्लरीच्या वजनाच्या) अर्ध्या पळांचे (म्हणजे साडेबारा पळांचे वजन असणारा) भाण बारा अंगुळे घेराचा असतो. बाकीचे त्याचे (लक्षण) झल्लरीचे लक्षण (होय असे) श्रीशार्ङ्गदेवाने सांगितले आहे. (११४०)

हे भाणाचे लक्षण होय.

(त्रिवली–)

त्रिवली ही एक हात लांबीची असून, सात अंगुळे मापाची दोन तोंडे असणारी (अशी असते). तिचा मध्यभाग मुठीत घेण्यासारखा (म्हणजे मुठीत मावेल इतका लहान) असतो. हिची तोंडे कवळाने झाकलेली असतात. (११४१) दोन्ही कवळे लोखंडी कड्यांनी युक्त असून प्रत्येकी सात सात भोके (असलेली असतात). भोकांतून घातलेल्या दोऱ्यांनी ती बांधलेली (असतात). मध्यभागी बळकट वेष्टण (असते). तिची खांद्यावरून घ्यायची सुतांच्या दोरीने केलेली पट्टी हातभर (लांबीची असते). तिचे वादन शार्ङ्गदेवाने

---

१०६. ' रन्ध्रन्यस्तैर्गुणैर्बद्धो ' असा पाठ अड्यार व आनंदाश्रम या दोन्ही आवृत्तींत आहे. या पाठाने अर्थ स्पष्ट होत नाही. आनंदाश्रम आवृत्तीत (पृ० ६१४) ' रन्ध्रन्यस्तगुणैर्बद्धैः ' असा पाठ तळटीपेत दिला आहे. सुधाकरटीकेत ' रन्ध्रन्यस्तैर्गुणैः मध्यभागे वेष्टनं कार्यम् ' म्हणजे ' भोकांतून घातलेल्या दोऱ्यांनी मध्यभागी वेष्टन करावे ' असे म्हटले आहे व पुढे ' सुतांच्या

सूत्ररज्ज्वा हस्तमात्रा कच्छा स्कन्धावलम्बिनी ।
वादनं करयुग्मेन शार्ङ्गदेवेन कीर्तितम् ॥ ११४३ ॥
तदांदोंदेति वर्णाः स्युस्त्रिपुरा चात्र देवता ।
एकादशाङ्गुलमुखी विंशत्यङ्गुलदैर्घ्यभाक् ॥ ११४४ ॥
मुखार्धमानमध्यासौ मध्ये चाञ्चनिकायुता ।
तदर्धवर्णसंयुक्ता त्रिकुल्या चोच्यते बुधैः ॥ ११४५ ॥
इति त्रिवली लक्षणम् ।

(दुन्दुभिः)

आम्रद्रुमसमुद्भूतो महागात्रो महाध्वनिः ।
कांस्यभाजनसंभारगर्भो वलयवर्जितः ॥ ११४६ ॥
चर्मनद्धाननो बद्धो वध्रैर्गाढं समन्ततः ।
दृढचार्मेण कोणेन वाद्यो वर्णेन दुन्दुभिः ॥ ११४७ ॥

दोन्ही हातांनी सांगितले आहे. (११४२, ११४३) तदांदोंद हे वर्ण (हिच्या वादनात) उत्पन्न होतात. त्रिपुरा ही हिची देवता होय.

अकरा अंगुळे (मापाची) तोंडे असणारी, वीस अंगुळे लांबीची, तोंडाच्या मापाच्या अर्ध्या प्रमाणाचा (म्हणजे साडे पाच अंगुळांचा) मध्यभाग असणारी व मध्ये (सुतांनी वळलेल्या) दोरीने युक्त आणि तिच्या (म्हणजे त्रिवलीच्या) अर्ध्या वर्णांनी संयुक्त अशी विद्वानांनी त्रिकुल्या म्हटली आहे. (११४४, ११४५).

हे त्रिवलीचे लक्षण होय.

(दुंदुभि–)

आंब्याच्या झाडापासून तयार केलेला, मोठ्या आकाराचा व मोठा आवाज असणारा असा दुंदुभि (असतो). त्याच्या आतील भागात काशाच्या पात्रांचा समूह असतो. त्याला कडे (बसवलेले) नसते. (११४६) त्याचे तोंड चामड्याने मढवलेले असून तो सभोवार वाद्यांनी घट्ट बांधलेला असतो. दुंदुभि हा बळकट अशा चामडी कोणाने वर्णाने (म्हणजे वर्ण उत्पन्न करीत) वाजवावा. (११४७) यात मेघांच्या गर्जनेसारख्या गंभीर अशा घोंकाराचे

दोरीने एक हात मापाची खांद्यावरून घ्यायची कच्छा म्हणजे पट्टी करावी ' असे सांगितले आहे. ० ' बद्धः ' असे पुंलिंगी विशेषण फक्त ' मध्यः ' याचेच होऊ शकते. त्यानुसार मध्यभाग ' भोकांतून घातलेल्या दोऱ्यांनी बांधलेला असून मध्ये बळकट वेष्टन असते ' असा अर्थ घेता येईल. मी ' बद्ध ' या विशेषणाचा संबंध ' कवले ' याकडे घेतला आहे. अर्थात् ' बद्धे ' असे त्याचे रूप घेतले आहे.

मेघनिर्घोषगम्भीरघोंकारस्यात्र मुख्यता ।
मङ्गले विजये चैव वाद्यते देवतालये ॥ ११४८ ॥
इति दुन्दुभिलक्षणम् ।

(भेरी–)

वितस्तित्रयदैर्घ्या स्याद्भेरी ताम्रेण निर्मिता ।
चतुर्विंशत्यङ्गुले च वदने वलयान्विते ॥ ११४९ ॥
तस्याः सवलये चर्मच्छन्ने छिद्रसमन्विते ।
रज्ज्वा नियन्त्रिते गाढं मध्ये सूत्रेण बन्धनम् ॥ ११५० ॥
दक्षिणस्थेन कोणेन वामहस्तेन ताडनात् ।
उद्भटो भवति ध्वानो गम्भीरोऽरिभयंकरः ॥ ११५१ ॥
तंकारः पाटवर्णोऽस्यां मुख्यो निःशङ्ककीर्तितः ।
इति भेरीलक्षणम् ।

(निःसाणः)

कांस्यजस्ताम्रजो लौहो वोत्तमो मध्यमोऽधमः ॥ ११५२ ॥
एकवक्त्रो महान्वक्त्रे स्वल्पोऽधोऽर्धयवाकृतिः ।
भृतगर्भः कांस्यपात्रभारैर्महिषचर्मणा ॥ ११५३ ॥

मुख्य स्वरूप असते. तो मंगल प्रसंगी, विजय मिळाला असता आणि देवळात वाजविला जातो. (११४८)

हे दुंदुभीचे लक्षण होय.

(भेरी–)

तांब्याची तयार केलेली भेरी तीन विती लांबीची असते. तिची तोंडे चोवीस अंगुळे (प्रमाणाची) व कड्यांनी युक्त असतात. (११४९). ती कड्यांनी युक्त असणारी (तोंडे) भोके असलेली, चामड्याने झाकलेली व दोरीने घट्ट बांधलेली असतात. तिच्या मधल्या भागी सुताच्या दोरीचे बंधन असते. (११५०) उजव्या हातातल्या कोणाने व डाव्या हाताने आघात केल्याने गंभीर व शत्रूंना भयकारक असा मोठा आवाज उत्पन्न होतो. (११५१) निःशंकाने हिच्यात तंकार हा मुख्य पाटवर्ण सांगितला आहे.

भेरीचे लक्षण समाप्त.

(निःसाण–)

(निःसाण) कासे, तांबे व लोखंड यांचा (क्रमाने) उत्तम, मध्यम व कनिष्ठ (प्रकारचा होय). (११५२)

तो एक तोंडाचा असून मोठ्या (आकाराचा असतो). त्याचे तोंड लहान असून, त्याच्या खालचा भाग अर्ध्या यवाच्या आकाराचा असतो. त्याचा आतला भाग काशाच्या

छन्नाननो बद्धचर्मा तद्रन्ध्रन्यस्तवध्रकैः ।
क्षिप्तोऽधो वध्रवलये निवेश्यावर्तितैर्मुहुः ॥ ११५४ ॥
द्विषद्वित्रासजननो निःसाणः शार्ङ्गिणोदितः ।
चार्मणेनास्य कोणेन सद्वितीयस्य वादनम् ॥ ११५५ ॥
दृढशब्देन भीरूणां भिनत्ति हृदयान्ययम् ।
स्यादस्माद्युद्धवीराणां रोमाञ्चोपचितं वपुः ॥ ११५६ ॥

इति निःसाणलक्षणम् ।

(तुम्बकी–)

निःसाणवत्तुम्बकी स्यात्ततोऽल्पा गात्रनादयोः ।

इति तुम्बकीलक्षणम् ।

(काष्ठलक्षणम्–)

उक्तौ प्रकृतिदारूणामनुक्तौ वा विकल्पतः ॥ ११५७ ॥

पात्रांनी भरलेला असून रेड्याच्या कातड्याने त्याचे तोंड झाकलेले असते. खालच्या बाजूस असलेल्या वादीच्या कड्यातून घालून वरचेवर दुहेरी वळवलेल्या, त्याच्या भोकांतून घेतलेल्या वाद्यांनी ते कातडे बांधलेले असते. (११५३, ११५४) शत्रूंचा थरकाप उडवणारा असा हा निःसाण शार्ङ्गदेवाने सांगितला आहे. दुसऱ्या निःसाणाबरोबर याचे चामड्याच्या कोणाने वादन (करायचे असते). (११५५)

आपल्या दणकट आवाजाने हा शत्रूंची हृदये भेदून टाकतो. याच्या योगाने युद्धवीरांचे शरीर रोमांचांनी भरून जाते. (११५६)

हे निःसाणाचे लक्षण होय.

(तुंबकी–)

निःसाणासारखीच तुंबकी असते; (पण तिचा) आकार व आवाज त्यापेक्षा लहान असतो. (११५७–)

हे तुंबकीचे लक्षण होय.

(काष्ठलक्षण–)

(वाद्यांच्या लक्षणात) मूळ लाकडे सांगितली असतील तेथे किंवा सांगितली नसतील तेथे विकल्पाने (११५७) लाकडाच्या वाद्यांच्या बाबतीत खैर किंवा रक्तचन्दन (यांचे

क० आता अवनद्ध वाद्याचे मूळ असणाऱ्या लाकडांचे विशेष व त्यांचे गुण सांगत आहे– जेथे वाद्याचे मूळ लाकूड सांगितले असेल उदाहरणार्थ पटह इत्यादींत खैर इत्यादींचे व जेथे सांगितले नसेल उदा. कुडुक्का इत्यादींत तेथे दोन्ही ठिकाणी. लाकडापासून बनवलेल्या पटह इत्यादी वाद्यांच्या बाबतीत मूळ लाकूड म्हणून विकल्पाने खैर किंवा रक्तचंदन यांचे लाकूड जाणावे. म्हणजे

ज्ञेयो दारववाद्यानां खदिरो रक्तचन्दनः ।
सर्वेषु स्युर्यथायोगं पाटाः पाटहमार्दलाः ॥ ११५८ ॥
नीरसोच्छ्रितभूजाताज्जीर्णाद्वाताहताक्षरोः ।
निर्भिद्योत्सारिते गर्भे शेषाद्वाद्यानि कारयेत् ॥ ११५९ ॥
पूर्वप्ररोहे छिन्नेऽन्यो यः प्ररोहः प्ररोहति ।
तदुद्भवद्रुमोद्भूतं वाद्यं सर्वं प्रशस्यते ॥ ११६० ॥
गर्भस्योत्सारणं त्वेतद्वेणोरन्यत्र पादपे ।
तरूणां जातयस्तिस्रः पित्तला वातला तथा ॥ ११६१ ॥
श्लेष्मला चेति तत्र स्यात्पित्तला नीरसक्षितौ ।
अत्यल्परसभूजाता वातला श्लेष्मला पुनः ॥ ११६२ ॥
जलाशयसमीपस्थरससंप्लुतभूमिजा ।
पित्तलात्युत्तमा जातिर्वातला त्वधमा भवेत् ॥ ११६३ ॥
श्लेष्मला वर्ज्यते शुष्के वृक्षेऽपि च्छेदनात्पुरा ।

इति काष्ठलक्षणम् ।

लाकूड) जाणावे. सर्व (वाद्यांमध्ये) यथासंभव पटह व मर्दल यांचे पाट (योजायचे) असतात. (११५८)

कोरड्या व उंच जमिनीवर वाढलेल्या, जुनाट आणि वाऱ्याने (नेहमी) हेंदकाळत असलेल्या झाडाच्या, फोडून आतला भाग दूर केल्यावर राहिलेल्या भागामधून वाद्ये बनवावी. (११५९) पहिला अंकुर छाटून काढल्यावर जो दुसरा अंकुर वाढतो त्यापासून वाढलेल्या झाडापासून निर्माण केलेले सर्व वाद्य स्तुत्य होय. (११६०)

आतला भाग काढून टाकणे हे बांबूखेरीज इतर झाडांच्या बाबतीत (जाणावे). झाडांच्या पित्तल, वातल तसेच श्लेष्मल अशा तीन जाती आहेत. कोरड्या जमिनीवरील (झाड) पित्तल (जातीचे) होय; अत्यंत थोड्या पाण्याने युक्त असणाऱ्या जमिनीवरील वातल जातीचे होय; आणि जलाशयाच्या जवळ असलेल्या (व त्यामुळे) पाण्याने भरून गेलेल्या जमिनीवरील श्लेष्मल जातीचे होय. पित्तल जाति अति उत्तम व वातल जाति कनिष्ठ होय. (११६१, ११६२, ११६३)

वाळलेले झाड असले तरीही ते श्लेष्मल (जातीचे) असल्यास तोडण्यापूर्वीच वगळावे. (११६४–)

काष्ठलक्षण समाप्त.

खैराचे लाकूड घ्यावे किंवा रक्तचंदनाचे घ्यावे. तुडुक्का इत्यादी सर्व वाद्यांत, पटहातले करख इत्यादी सोळा पाट व मर्दलातले अन्य मतानुसार सांगितलेले पाट धरून तद्वि इत्यादी सोळा पाट, यथासंभव म्हणजे ज्या पाटांनी ज्या वाद्याचे अनुकरण स्पष्टपणे होते तेथे योजावे.

कोमलत्वं व्रणग्रन्थिभेदान्दारुषु वर्जयेत् ॥ ११६४ ॥

इति काष्ठदोषाः ।

(चर्मगुणाः)

षाण्मासिकस्य वत्सस्य चर्म स्यात्पुटबन्धने ।
अन्ये द्विवत्सरस्याहुस्तन्न लक्ष्येषु दृश्यते ॥ ११६५ ॥
वृद्धस्य वृषभस्यास्य चर्मणा वध्रकल्पना ।
कुन्देन्दुहिमसंकाशमाम्रपल्लवसंनिभम् ॥ ११६६ ॥
स्नायुमांसविहीनं च चर्म गोसंभवं च यत् ।
शीतोदके निशामेकां वासयित्वा समुद्धृतम् ॥ ११६७ ॥
वाद्यावनहनार्थं तद् ग्राह्यं श्रीशार्ङ्गिणोदितम् ।

इति चर्मगुणाः ।

(चर्मदोषाः)

मेदोदुष्टं जराक्रान्तं क्लिन्नं काकमुखाहतम् ॥ ११६८ ॥

लाकडांच्या बाबतीत मऊपणा, छिद्र, गाठ, व फुटका भाग हे (दोष) वगळावे. (११६४)

काष्ठदोष समाप्त.

(चर्मगुण–)

पुडी बांधताना सहा महिन्याच्या वासराचे चामडे योजावे. दुसरे (आचार्य) दोन वर्षांच्या वासराचे (चामडे) सांगतात. पण लक्ष्यांत ते दिसून येत नाही. (११६५) यांच्या वाद्या म्हाताऱ्या बैलाच्या कातड्याच्या कराव्या. कुंदाचे फूल, चंद्र किंवा बर्फ यासारखे (उजळ), आंब्यांच्या पालवीप्रमाणे (थोडे तांबूस), स्नायू व मांस नसलेले असे जे बैलाचे कातडे ते एक रात्र थंड पाण्यात ठेवून, नंतर बाहेर काढून वाद्याचे तोंड मढवण्यासाठी घ्यावे असे श्रीशार्ङ्गदेवाने सांगितले आहे. (११६६, ११६७, ११६८–)

हे चर्मगुण होत.

(चर्मदोष–)

चरबीने दूषित, म्हातारपणाने ग्रासलेले, ओलसर, कावळ्याच्या चोचीने प्रहार

मऊपणा इत्यादी लाकडांचे दोष सांगत आहे– (११५७ ते ११६४)
चामड्याचे गुण सांगत आहे– (११६५ ते ११६७)
चामड्याचे दोष सांगत आहे– (११६८, ११६९–)

अग्निधूमहतं जीर्णं न वाद्ये चर्म कर्मकृत् ।

इति चर्मदोषाः ।

गुणैर्भूरितरोदारैर्यस्य नद्धं जगत्त्रयम् ॥ ११६९ ॥

अवनद्धमिदं तेन शार्ङ्गदेवेन कीर्तितम् ।

इत्यवनद्धवाद्यप्रकरणम् ।

अथ घनवाद्यम्––

कांस्यजे[१०७] घनवाद्ये स्यात्कांस्यमग्नौ सुशोधितम् ॥ ११७० ॥

केलेले (११६८) आग व धूर यांनी खराब झालेले व जीर्ण असे चामडे वाद्यासाठी कामाचे नाही.

हे चर्मदोष होत.

ज्याच्या विपुल उदार गुणांनी तिन्ही जगे बांधली गेली आहेत (११६९) त्या शार्ङ्गदेवाने हे अवनद्ध वाद्य वर्णिले आहे. (११७०—)

अवनद्ध वाद्यांचे प्रकरण समाप्त.

आता घनवाद्ये (सांगत आहे)–

काशाच्या घनवाद्यातले कासे अग्नीत (तापवून) चांगले शुद्ध केलेले असते. (११७०)

अवनद्ध वाद्यांचे प्रकरण पूर्ण करीत आहे– (११६९, ११७०–)

क० आता घनवाद्याचे लक्षण देण्यासाठी सांगत आहे–

काशापासून बनवलेले असणे हे घनवाद्याचे सामान्य लक्षण होय. ते कासे आगीतून चांगले शुद्ध केलेले असे घ्यावे.

आता तालाचे लक्षण देत आहे–

'द्रुतादिसिद्धीसाठी' यातील 'आदि' (म्हणजे इत्यादी) या शब्दाने लघु इत्यादी घ्यायचे ; द्रुत इत्यादी प्रमाणाचा काळ दाखविण्यासाठी असा अर्थ. दोन्ही हातांत, तर्जनी व अंगठा यानी दोन्ही टाळ धरलेले असल्याने त्या खेरीजची बाकीची बोटे वर करून, त्या टाळांच्या नादाच्या अनुकरणाने आकाराने दीर्घ दीर्घ असलेल्या नादाचा थांबवून शेवट करणे, तो ह्रस्व

---

१०७. अडघार आवृत्तीत 'कांस्यजे घनवाद्ये' असा पाठ घेतलेला आहे. तो सुधाकर टीकेनुसार आहे. आनंदाश्रम आवृत्तीतही हाच पाठ आहे. संगीतसारामृतात (पृ. १४१) 'कांस्यजं घनवाद्यं' असा पाठ मिळतो. कल्लिनाथाने 'कांस्यज हे घनवाद्याचे सामान्य लक्षण होय' असे म्हटले आहे. त्याच्या समोरही 'कांस्यजं घनवाद्यं' हाच पाठ असल्याचे दिसून येते. 'घनवाद्य काशापासून बनवलेले असते' असा याचा अर्थ होतो व तो सामान्यलक्षण या दृष्टीने योग्य वाटतो.

(तालः)

कांस्यजो वर्तुलस्तालः सपाद्द्व्यङ्गुलाननः ।
मध्योऽस्याङ्गुलविस्तारो निम्नो रन्ध्रं च मध्यगम् ॥ ११७१ ॥
पादोनगुञ्जामात्रं स्यात्पिण्डस्तु यवमात्रकः ।
सार्धाङ्गुलः स्यादुत्सेधः समाश्लक्ष्णशुभाकृतिः ॥ ११७२ ॥
कार्या तथा यथा नादो भवेच्छ्रुतिमनोहरः ।
नेत्रवस्त्राञ्चलाग्राणि रज्जूकृत्य निवेशयत् ॥ ११७३ ॥
रन्ध्रेऽग्राणामनिर्गत्यै ग्रन्थिं च रचयेद् दृढम् ।
ईदृक्तालयुगं कृत्वा तालमेकमथाञ्चलैः ॥ ११७४ ॥
आवेष्टय तर्जनीं वामामङ्गुष्ठेन च वेष्टनम् ।
आक्रम्य तलमध्यस्थं धृत्वा तिर्यङ्मुखीकृतम् ॥ ११७५ ॥
शेषाङ्गुलीः प्रसार्योर्ध्वाद्दक्षिणेन तु पाणिना ।
तालमन्यतरस्यान्तलम्बमानाचलावलिम्[१०८] ॥ ११७६ ॥

(टाळ–)

काशाचा केलेला टाळ गोलाकार असून त्याचे तोंड सव्वा दोन अंगुळे (मापाचे असते). त्याचा मध्यभाग एक अंगुळ रुंदीचा व खोलगट असून मध्यभागी तीनचतुर्थांश गुंजेएवढे भोक असते. (टाळाची) जाडी एक यव असून उंची दीड अंगुळ असते. त्याचा आकार एकसारखा, गुळगुळीत व रमणीय करावा की ज्यामुळे त्याचा नाद ऐकण्यास मनोहर असा (उत्पन्न) होईल. रेशमी वस्त्राच्या काठाच्या टोकांची दोरी करून ती (मधल्या भागी असणाऱ्या) भोकात घालावी. टोके बाहेर निघून जाऊ नयेत यासाठी घट्ट गाठ मारावी. अशी टाळांची जोडी करून मग एक टाळ (वस्त्राच्या) काठांनी गुंडाळून, डावी तर्जनी व (ते) वेष्टन यांवर अंगठा ठेवून, तोंड तिरके करून तळव्याच्या मध्ये धरून, बाकीची बोटे पसरून वरून उजव्या हाताने तर्जनी व अंगठा यांच्या टोकांनी, दुसऱ्या (टाळाच्या) शेवटी लोंबणारी (वस्त्राच्या) कांठांची पंक्ति, तो टाळ तिरके तोंड होईल अशा प्रकारे धरून, त्याच्या टोकाने दुसऱ्या (टाळाच्या) मध्यभागी

करणे म्हणजे 'त्याच्या नादाचे धारण होय.' लक्ष्यजाणकार टाळवादक याला कल्पना असे म्हणतात. या टाळधारकाचे काम वर सांगितलेल्या तऱ्हेने दोन्ही टाळ धरणे तसेच त्यांचा नाद धारण करणे हे होय. तिन्ही प्रकारच्या वाद्यांच्या कालमापनाचे कारण टाळ असल्याने, या टाळाच्या बाबतीत सर्व पाट सांगितले आहेत. (११७० ते ११८१)

---

१०८. 'अचलावलिम्' या शब्दाने अर्थ कळत नाही. 'अञ्चलावलिम्' हा शब्द योग्य अर्थ देतो.

तर्जन्यङ्गुष्ठयोरग्रभागतस्तिर्यगाननम् ।
धृत्वा तस्याग्रभागेण मध्यमन्यस्य ताडयेत् ॥ ११७७ ॥
अल्पनादो भवेच्छक्तिर्भूरिनादः शिवो भवेत् ।
शिवे स्निग्धे घनो नादः शक्तौ स्यात्तद्विपर्ययः ॥ ११७८ ॥
वामेन धारयेच्छक्तिं शिवं दक्षिणपाणिना ।
अश्वमेधफलं चैव प्राप्नुयादोषमन्यथा ॥ ११७९ ॥
देवता तुम्बरुर्युग्मे शक्तिः शक्तौ शिवे शिवः ।
द्रुतादिसिद्धयै तन्नादधृतिरूर्ध्वाङ्गुलीकृता ॥ ११८० ॥
कल्पनेत्युच्यते कार्यमस्य स्यात्तालधारणम् ।
निःशङ्कशार्ङ्गदेवेन पाटाः सर्वेऽत्र कीर्तिताः ॥ ११८१ ॥

इति तालल्क्षणम् ।

(कांस्यतालौ)

नलिनीदलसंकाशौ कांस्यतालौ समाकृती ।
त्रयोदशाङ्गुलौ वक्त्रे कांस्यजे[१०९] द्व्यङ्गुलौ तले ॥ ११८२ ॥

प्रहार करावा. (११७१ ते ११७७) नाद लहान असलेला टाळ शक्ति होय व नाद मोठा असणारा शिव होय. स्निग्ध शिवाने (प्रहार केल्याने) नाद भरदार उत्पन्न होतो, शक्तीने त्याच्या उलट (उत्पन्न) होतो. (११७८) डाव्या हातात शक्ति व उजव्या हातात शिव धरावा. असे केल्याने तो टाळ वाजवणारा अश्वमेध यज्ञाचे फळ मिळवतो; नाहीतर त्याला दोष प्राप्त होतो. (११७९) टाळांच्या जोडीची देवता तुंबरु, शक्तीची शक्ति व शिवाची शिव होय. द्रुत इत्यादी (लयीच्या) सिद्धीसाठी, बोटे वर करून टाळाचा नाद धारण करणे (११८०) यास कल्पना म्हणून म्हटले आहे. या टाळधारकाचे काम ताल धरणे हे होय. निःशंक शार्ङ्गदेवाने यात सर्व पाट सांगितले आहेत. (११८१)

हे टाळाचे लक्षण होय.

(कांस्यताल–)

दोन कांस्यताल काशापासून बनवलेले, कमळाच्या वेलीच्या पानाप्रमाणे असून

क० येथून पुढची कांस्यताल इत्यादींची लक्षणे मूळ ग्रंथातूनच सहजपणे कळतात. त्यांतील कत्रिका व पट्टवाद्य ही लाकडाची असली व इतर काशाची असली तरीही आकार स्वरूपामुळे त्यांचे घनवाद्य हेच स्वरूप होय असे जाणावे. (११८१–१२०६)

---

१०९. ' कांस्यजे ' असा पाठ आनंदाश्रम आवृत्ति, अडचार आवृत्ति व संगीतसारामृत यांत आहे. पण ' कांस्यज ' हे ' वक्त्र ' याचे विशेषण घेण्यातले औचित्य कळत नाही. सुधाकर-टीकेत ' कांस्यज ' हे विशेषण ' कांस्यताल ' याचे घेतले आहे. त्यानुसार ' कांस्यजौ ' असा पाठ अपेक्षित आहे. त्यानुसार भाषांतर केले आहे.

मध्येऽङ्गुलमितौ निम्नौ तयोरन्यत्तु तालवत् ।
पाटा झनकटा मुख्याः सन्ति पाटान्तराण्यपि ॥ ११८३ ॥
नारदो देवता चात्रेत्युक्तं सोढलसूनुना ।

इति कांस्यतालस्य लक्षणम् ।

(घण्टा—)

अर्धाङ्गुलमिता[११०] पिण्डे घण्टा कांस्यमयी भवेत् ॥ ११८४ ॥
उच्छ्रायेऽष्टाङ्गुला वक्त्रे विशाला मूलतोऽल्पिका ।
सा च प्रासादसंबद्धा शलाकाकारधारिणी ॥ ११८५ ॥
मूले दण्डं त्रिशृङ्गाग्रं दधती मूलसंयुता ।
षडङ्गुलायतं सार्धाङ्गुलपिण्डं च लम्बितम् ॥ ११८६ ॥
लोहजं लालकं[१११] गर्भे दधानां तामधोमुखीम् ।
दण्डे धृत्वा टणत्कारबहुलं वादयेत्सुधीः ॥ ११८७ ॥

एकसारख्या आकाराचे व तेरा अंगुळे (मापाची) तोंडे असलेले असतात. त्यांचा तळ दोन अंगुळांचा असतो. (११८२)

(त्यांचा) मध्यभाग एक अंगुळ प्रमाणाचा व खोलगट असतो. त्यांचे बाकीचे (लक्षण) टाळा प्रमाणे (जाणावे). त्यांच्यांत झनकट हे मुख्य पाट निर्माण (होत) असून इतरही पाट (निर्माण) होतात. (११८३) त्यांची देवता नारद होय असे सोढलपुत्राने सांगितले आहे. (११८४—)

हे कांस्यतालाचे लक्षण होय.

(घंटा—)

घंटा ही काशाची असून अर्धे अंगुळ जाडीची असते. (११८४) तिची उंची आठ अंगुळे असून तोंडाशी विशाल व मुळाशी लहान अशी ती प्रासादसंबद्ध शलाकेच्या (?) आकाराची (म्हणजे निमुळती) असते. (११८५) मूळ असलेली अशी ती मुळाशी तीन टोके असणारा (म्हणजे त्रिकोणी) दांडा धारण करते. सहा अंगुळे लांबीचा, अर्धा अंगुळ जाडीचा व लोंबणारा असा लोखंडी लालक (म्हणजे लोळी) आत धारण करणारी

---

११० '००मिता' असा पाठ आनंदाश्रम आवृत्ति (पृ. ६१९) व संगीतसारामृत (पृ० १४२) यांत आहे. अडचार आवृत्तीत सुधाकरटीकेनुसार मिळणारा '०० मिते' हा पाठ घेतलेला आहे. ''००मिता' हा पाठ स्वीकारून भाषांतर केले आहे.

१११. 'लालक' हा पाठ आनंदाश्रम आवृत्ति (पृ. ६१९) व संगीतसारामृत (पृ. १४२) यांत आहे. 'जालक' हा पाठ अडचार आवृत्तीत असून तो सुधाकरटीकेनुसार मिळतो. 'लालक' हा पाठ घेऊन भाषांतर केले आहे.

सा सर्वदेवता तज्ज्ञैर्वाद्यते देवतार्चने ।
इति घण्टालक्षणम् ।

(क्षुद्रघण्टिकाः)

तैक्ष्ण्यगोलकगर्भाः स्युः कांस्योद्भवपुटद्वयाः ॥ ११८८ ॥
सुघनाः सूक्ष्मजातीयबदरीबीजसंमिताः ।
शिरःसुषिरविन्यस्तरज्जवः क्षुद्रघण्टिकाः ॥ ११८९ ॥
ताश्च घर्घरिका लोके भाष्यन्ते मर्मरास्तथा ।
ताभिर्घर्घरभेदानां कृतिः पेरणिनर्तने ॥ ११९० ॥
इति क्षुद्रघण्टिकालक्षणम् ।

(जयघण्टा–)

कांस्यजा हस्तमात्रा स्यात्पिण्डे त्वर्धाङ्गुला घना ।
जयघण्टा समा श्लक्ष्णा वृत्ता प्रान्ते द्विरन्ध्रभाक् ॥ ११९१ ॥
धृत्वा तद्रन्ध्रविन्यस्तरज्जौ तां वामपाणिना ।
दक्षिणे दक्षिणस्थेन दृढकोणेन वादयेत् ॥ ११९२ ॥

अशी ती खाली तोंड करून दांड्याने धरून विद्वानाने टणत्कार (म्हणजे टण् टण्) नाद पुष्कळ निर्माण करीत वाजवावी. (११८६, ११८७)

सर्व देवता असलेली ती तज्ज्ञांकडून देवपूजेत वाजविली जाते. (११८८–)

घंटालक्षण समाप्त.

(क्षुद्रघण्टिका –)

दोन्ही पुटे (म्हणजे झाकणे) काशाची बनवलेल्या अशा क्षुद्रघंटिका, आत लोखंडी गोळ्या असणाऱ्या, बळकट, सूक्ष्म जातीच्या बोरीच्या बीच्या प्रमाणाच्या व डोक्यातील भोकांत दोरी घातलेल्या अशा असतात. (११८८, ११८९) त्यांना लोक घर्घरिका (म्हणजे घुंगरू) तसेच मर्मरा म्हणतात. पेरणिनर्तनात घर्घरप्रकारांच्या बाबतीत त्यांचा उपयोग (करतात). (११९०)

हे क्षुद्रघंटिकालक्षण होय.

(जयघंटा–)

जयघंटा ही काशाची, एक हात मापाची, भरीव, अर्धे अंगुळ जाडीची, एकसारख्या आकाराची, गुळगुळीत व गोलाकार असते. तिच्या कडेला दोन भोके असतात. (११९१)

त्या भोकांत घातलेल्या दोरीने, डाव्या हाताने ती धरून, उजव्या हातात घेतलेल्या बळकट कोणाने उजव्या भागावर (प्रहार करून) वाजवावी. (११९२)

डेंकारबहुलाः पाटाः सर्वेऽस्याः शार्ङ्गिणोदिताः ।

इति जयघण्टालक्षणम् ।

(कम्रा–)

खादिरं घनवेणूत्थं यद्वा कम्राचतुष्टयम् ॥ ११९३ ॥
श्लक्ष्णं द्व्यङ्गुलविस्तारं द्वादशाङ्गुलदैर्घ्यकम् ।
मध्ये पिण्डो यथाशोभं किंचिन्न्यूनस्ततोऽन्तयोः ॥ ११९४ ॥
यस्य तत्कम्रिकावाद्यं तत्र द्वे द्वे तु कम्रिके ।
एकैकहस्तन्यस्ते ये तयोरेकैककम्रिकाम् ॥ ११९५ ॥
मध्यमाङ्गुष्ठयोर्मूले धृत्वा प्रान्ते तयोः पुनः ।
अपरामपरां धृत्वा शिथिलां वादयेद्भिया ॥ ११९६ ॥
कम्पेन मणिबन्धस्य कम्रिकावादनं मतम् ।
पाटाः किटकिटामुख्यास्तत्र पाटान्तराण्यपि ॥ ११९७ ॥
कम्राणामन्तरं कृत्वानामया दक्षिणस्थया ।
तलाघाताङ्गुष्ठमुष्टेर्वामस्येत्यपरे जगुः ॥ ११९८ ॥

इति कम्रालक्षणम् ।

हिच्यात डेंकार पुष्कळ असणारे सर्व पाट शार्ङ्गदेवाने सांगितले आहेत. (११९३–)

जयघंटेचे लक्षण समाप्त.

(कम्रा–)

खैर किंवा भरीव बांबू यापासून बनवलेल्या चार कम्रा, (११९३) (प्रत्येकी) दोन अंगुळे रुंदीच्या, बारा अंगुळे लांबीच्या व गुळगुळीत असतात. त्यांचा मध्यभाग, शोभिवंत होईल अशा रीतीने, दोन्ही टोकांपेक्षा किंचित कमी जाडीचा असतो. (११९४) असे हे कम्रिकावाद्य होय. त्यांतील ज्या दोन दोन कम्रा एकेका हातात घेतलेल्या असतात त्यांपैकी एकेक कम्रा मधले बोट आणि अंगठा यांच्या मुळाशी धारण करून व त्यांच्या टोकाशी दुसरी दुसरी सैल धरून, बुद्धीने वाजवावी. (११९५, ११९६)

कम्रिकावादन मनगटाच्या कंपाने मानले आहे. त्यात किटकिटा हे मुख्य पाट (उत्पन्न होतात. तसेच) इतरही पाट (उत्पन्न होतात). (११९७)

उजव्या हाताच्या तिसऱ्या बोटाने कम्रांमध्ये अंतर ठेवून, (आणि) डाव्या हाताचा अंगठा व मूठ यांनी तळव्यावर आघात करून (कम्रावादन करावे) असे दुसऱ्या (आचार्यांनी) सांगितले आहे. (११९८)

कम्रालक्षण समाप्त.

(शुक्तिः)

सर्पाकृतिरथो निम्ना कांस्यजा लोहजाथवा ।
शुक्तिस्त्र्यङ्गुलविस्तारा सार्धहस्तद्वया मता ॥ ११९९ ॥
तिर्यग्रेखाराजिता च मृगशृङ्गोपमेन सा ।
ऋजुना लोहकोणेन सरेखेन विघर्षणात् ॥ १२०० ॥
वाद्यते किरिकिट्टेति पाटा यक्षास्तु देवताः ।
यतिमात्रावबोधेऽत्रेत्युक्तं निःशङ्कसूरिणा ॥ १२०१ ॥
किरिकिट्टकमित्युक्तं तल्लोके रुद्रवल्लभम् ।
इति शुक्तिवाद्यम् ।

(पट्टः)

श्रीपर्णीदारुजः पट्टश्चतुरश्रायतो भवेत् ॥ १२०२ ॥
द्वात्रिंशदङ्गुलो दैर्घ्येऽन्यैरुक्तस्त्रिंशदङ्गुलः ।
विस्तारो हस्तमात्रः स्यादूर्ध्वाधःस्थितयोर्द्वयोः ॥ १२०३ ॥
लोहमय्योः सरिकयोस्त्रिवृद्रज्जूपमायुजोः ।
क्षिप्ताभिस्तादृशक्षुद्रवलयावलिभिर्युतः ॥ १२०४ ॥

(शुक्ति–)

शुक्ति ही सापाच्या आकाराची व खोलगट असून ती काशाची किंवा लोखंडाची असते. ती तीन अंगुळे रुंदीची व अडीच हात (लांबीची) मानली आहे. (११९९)

आडव्या रेघांनी ती भूषित असते. हरिणाच्या शिंगासारख्या सरळ अशा लोखंडी रेखायुक्त कोणाने घासून ती (१२००) वाजविली जाते. (तिच्यात) किरिकिट्ट हे पाट (उत्पन्न होतात). (तिच्या) देवता यक्ष (होत). या (वाद्यात) केवळ यतींचे ज्ञान होणे (एवढाच उद्देश असतो) असे निःशंकसूरीने सांगितले आहे. (१२०१) लोकांत त्याला किरिकिट्टक असे म्हटले जाते. ते रुद्राचे आवडते आहे. (१२०२–)

हे शुक्तिवाद्य होय.

(पट्ट–)

पट्ट हा श्रीपर्णीच्या झाडापासून बनवलेला असून चौकोनी असतो. (१२०२) त्याची लांबी बत्तीस अंगुळांची असते. दुसऱ्या (आचार्यांनी) तो तीस अंगुळे लांबीचा सांगितला आहे. त्याची रुंदी हातभर असते. वर व खाली असणाऱ्या तिहेरी दोरीसारख्या लोखंडी दोन सारिकांत घातलेल्या तशाच लहान कड्यांच्या पंक्तीनी तो युक्त असतो. छातीवर किंवा दोन गुडघ्यांमध्ये धरून तो वाजवला जातो. राळेचा लेप लावलेला असा तो हाताच्या बोटाच्या टोकांनी घासून (वाजवतात). (१२०३, १२०४, १२०५) यात

वक्षोग्रे जानुनोर्मध्ये यद्वा संधार्य वाद्यते।
अयं च करशाखाग्रै रालालिप्तो विघृष्यते ॥ १२०५ ॥
करवचास्थडरटाः पाटाः पाटहाश्चेह संमताः।
सप्तात्र देवमुनयो देवताः शार्ङ्गिणोदिताः ॥ १२०६ ॥

इति पट्टवाद्यम्।

सन्त्यन्यान्यपि वाद्यानि लोके भूयांसि यानि च।
तेषु विस्तारसंत्रासादुदास्ते सोढलात्मजः ॥ १२०७ ॥

इति घनवाद्यलक्षणम्।

(वाद्यगुणदोषाः)

रक्तं विरक्तं[११२] मधुरं समं शुद्धं कलं घनम्।
स्फुटप्रहारः सुभरं विघुष्टं च गुणैरिति ॥ १२०८ ॥

करवच थडरट हे पाट व पटहात उत्पन्न होणारे पाट मानले आहेत. याच्या देवता सात देवर्षी (होत असे) शार्ङ्गदेवाने सांगितले आहे. (१२०६)

हे पट्टवाद्य होय.

इतरही जी पुष्कळ वाद्ये लोकांत (प्रचलित) आहेत, त्यांबाबत (ग्रंथ-) विस्ताराच्या भीतीमुळे सोढलपुत्र उदासीन रहात आहे. (१२०७)

घनवाद्यलक्षणसमाप्त.

(वादनाचे गुण व दोष-)

रंजक, विरक्त (म्हणजे दुसऱ्या वाद्याबरोबर वाजत असता आपला विशिष्ट मधुरपणा प्रगट करणारे), गोड, सम, शुद्ध, सूक्ष्म, भरदार, स्पष्ट प्रहार असणारे, सुभर (म्हणजे

क० इतरही वाद्ये लोकांत प्रचलित आहेत, त्यानुसार जाणावी. (१२०७)

११२. संगीतसारातील वाद्याध्यायात (भाग २ पृ० ११४, ११५) या वादनगुणांचे जे स्पष्टीकरण दिले आहे त्यानुसार काहींच्या बाबतीतली पुढील माहिती देत आहे.

" विरक्त- जे वाद्य दुसऱ्या वाद्याबरोबर वाजत असता आपली गोडी दाखवते.
लयसम- जे वाद्य द्रुत, मध्य व विलंबित या तालाच्या तिन्ही लयी दाखविते.
न्याससम- गीताचा न्यास स्वर येताच वाद्यही थांबते ते न्याससम.
कल- जे वाद्य गीताला अनुसरून असणाऱ्या अकारादी अक्षरांविनाही, त्या अक्षरांची नक्कल करून अनुरंजन करते.
सुभर- ज्याच्या गुंजारवाने कंठनाद मनोहर वाटतो ते सुभर होय.
विघुष्ट- जे वाजवताना अथवा ऐकतांना उदासीनता दूर करते, मनोरंजन करते ते विघुष्ट जाणावे. "

[विघुष्ट याचा अर्थ उच्च घोष म्हणजे नाद असणारे असा असेल का ? सुधाकर-टीकेत विघुष्ट याचा अर्थ गंभीर असा दिला आहे.]

दशभिः संयुतं वाद्यमुक्तं सोढलसूनुना ।
अन्वर्थान्यत्र नामानि समं त्वष्टविधं मतम् ॥ १२०९ ॥
अक्षराद्यङ्गपूर्वं च तालादि यतिपूर्वकम् ।
लयादि न्यासापन्यासपूर्वं पाणिसमं तथा ॥ १२१० ॥
स्यादक्षरसमं गीतगुरुलघ्वक्षरानुगम् ।
गीतस्य ग्रहमोक्षादीन्यङ्गान्यत्रेति यत्पुनः ॥ १२११ ॥
स्यात्तदङ्गसमं तालानुगं तालसमं मतम् ।
यतेर्लयस्य न्यासस्यापन्यासस्य च साम्यतः ॥ १२१२ ॥
यत्यादिपूर्वकं ज्ञेयं क्रमात्समचतुष्टयम् ।
गीतग्रहैः पाणिसंज्ञैः समं पाणिसमं मतम् ॥ १२१३ ॥
वाद्यस्यैते गुणाः प्रोक्ता दोषः स्यात्तद्विपर्ययः ।

इति वाद्यगुणदोषाः ।

(वादकगुणदोषाः)

हस्तकोणप्रहारज्ञो गीतवादनकोविदः ॥ १२१४ ॥

चांगल्या रागस्वरूपाने युक्त) व विघुष्ट (म्हणजे गंभीर) असे दहा गुणांनी युक्त वादन सोढलपुत्राने सांगितले आहे. ही नावे सार्थ आहेत. सम मात्र आठ प्रकारचे मानले आहे. (१२०८, १२०९)

अक्षरसम, अंगसम, तालसम, यतिसम, लयसम, न्याससम, अपन्याससम तसेच पाणिसम (हे ते आठ प्रकार होत). (१२१०) गीतातल्या गुरु व लघु अक्षरांना अनुसरणारे ते अक्षरसम होय. गीताच्या ग्रह (म्हणजे आरंभ) व मोक्ष (म्हणजे शेवट) इत्यादी अंगांना अनुसरणारे ते अंगसम होय. तालाला अनुसरणारे ते तालसम मानले आहे. यति, लय, न्यास व अपन्यास यांच्या सारखेपणामुळे यतिसम इत्यादी चार प्रकारचे समवादन क्रमाने जाणावे. पाणिनावाच्या गीताच्या ग्रहांशी असणाऱ्या सारखेपणामुळे पाणिसम मानले आहे. (१२११, १२१२, १२१३) हे वादनाचे गुण सांगितले आहेत. त्यांच्या उलट स्वरूप असणे म्हणजे दोष होय. (१२१४–)

हे वादनाचे गुणदोष होत.

(वादकाचे गुणदोष–)

हाताने व कोणाने (योग्य) प्रहार (कसे करावे) ते जाणणारा, गीत व वादन

क० आता वादनाचे गुण सांगत आहे–

गीताचे ग्रह सम, अतीत व अनागत हे होत. पाणि म्हणजे समपाणि, अवपाणि व उपरिपाणि हे होत. (१२०८ ते १२१३, १२१४–)

यतितालल्याभिज्ञः पाटज्ञः पञ्चसञ्चवित् ।
दशहस्तगुणोपेतः पात्राभिप्रेतवादकः ॥ १२१५ ॥
आतोद्यध्वनितत्त्वज्ञः समादिग्रहवेदिता ।
गीतवादननृत्यस्थच्छिद्रच्छादनपण्डितः ॥ १२१६ ॥
ग्रहमोक्षप्रदेशज्ञो गीतनृत्तप्रमाणवित् ।
वाद्ये समस्तभेदज्ञो रूपरेखान्वितस्तथा ॥ १२१७ ॥
उद्घट्टनपटुः सर्ववाद्यभेदविवेचकः ।
नादवृद्धिक्षयापत्तिकोविदो वादको वरः ॥ १२१८ ॥
गुणैः कतिपयैर्हीनः[११३] सर्वैर्वा वादकोऽधमः ।

इति वादकगुणदोषाः ।

(हस्तगुणाः)

वाञ्छानुगौ दृढौ व्यक्तौ स्निग्धौ दृढनखौ लघू ॥ १२१९ ॥

यांत निष्णात, (१२१४) यति, ताल व लय यांचा जाणकार, पाटांचे ज्ञान असणारा, पाच संच माहीत असणारा, हाताच्या दहा गुणांनी युक्त, पात्राला (म्हणजे नर्तकाला) अभिप्रेत असल्याप्रमाणे वाजवणारा, (१२१५), वाद्यांच्या आवाजाचे तत्त्व जाणणारा, सम इत्यादी ग्रहांचा जाणकार, गीत, वाद्य व नृत्य यांतील दोष झाकून टाकण्यात पटाईत, (१२१६) ग्रह व मोक्ष यांच्या जागा (बरोबर) जाणणारा, गीत व नृत्त यांचे तालप्रमाण माहीत असणारा, वादनातले सर्व प्रकार जाणणारा, तसेच सौष्ठवसंपन्न, (१२१७) उद्घट्टनात (म्हणजे तोंडाने बोल म्हणण्यात) पटाईत, सर्व वादनप्रकारातले फरक जाणणारा, वाद्याचा आवाज वाढवणे व कमी करणे यांत निष्णात असा वादक श्रेष्ठ होय. (१२१८) (यांतल्या) काही गुणांनी कमी असणारा किंवा सर्व गुण नसणारा वादक कनिष्ठ प्रतीचा होय.

हे वादकाचे गुणदोष होत.

(हाताचे गुण–)

इच्छेप्रमाणे वळणारे, बळकट, स्पष्टता असणारे, स्निग्ध, बळकट नखे असणारे, हलके,

---

क० आता वादकाचे गुणदोष सांगत आहे– उद्घट्टन म्हणजे पाठाक्षरांचे उच्चारण. भांडिक त्याला उद्घट्टना म्हणतात. या सांगितलेल्या गुणांनी युक्त असणारा वादक श्रेष्ठ होय. यांतील काही गुण कमी असणारा मध्यम प्रतीचा होय. सर्व गुणांनी हीन असणारा कनिष्ठ म्हटला आहे. (१२१४ ते १२१८, १२१९–)

११३. सुधाकर टीका– काही म्हणजे थोड्या गुणांनी युक्त अथवा हीन तो मध्यम व सर्व गुणांनी हीन तो अधम.

विधायाङ्गुलिसंचारौ[११४] खेदहीनौ जितश्रमौ ।
युक्तप्रहारौ च करौ प्रोक्तौ दशगुणाविति ॥ १२२० ॥

इति हस्तगुणाः ।

॥ वाद्याध्यायः षष्ठः समाप्तः ॥

(१२१९) बोटांची हालचाल स्वाधीन असणारे, घाम न येणारे, श्रमावर जय मिळवलेले (म्हणजे न थकणारे) व योग्य प्रकारे प्रहार करणारे दोन्ही हात दहा गुण असणारे म्हणून सांगितले आहेत. (१२२०)

हे हस्तगुण होत.

वाद्याध्याय हा सहावा अध्याय समाप्त.

वादकाच्या हातांचे गुण सांगत आहे– (१२१९, १२२०)

स्तुत्य गुण असलेल्या व वाद्यांचा विभाग जाणणाऱ्या कल्लिनाथाने आपल्या विद्येने वाद्याध्यायाचे विवरण केले आहे.

---

११४. सुधाकरटीकेत 'विधेयः अधीनः अङ्गुलिसंचारो ययोः' असे स्पष्टीकरण दिले आहे. त्यावरून 'विधाय०००' या ऐवजी 'विधेय०००' असा पाठ सिंहभूपालास अभिप्रेत आहे. विधेय म्हणजे स्वाधीन, हा अर्थ येथे बरोबर जुळतो. त्यास अनुसरून 'बोटांची हालचाल स्वाधीन असणारे' असे भाषांतर केले आहे.

साहाय्यक संदर्भ ग्रंथ व लेख यांची सूची

१ **अभिनयदर्पण** (नन्दिकेश्वरकृत)–
द्वि. आ., संपादक डॉ. घोष, कलकत्ता, १९५७.

२ **काशिकावृत्तिः** –
वामनजयादित्यविरचिता, (तृतीयो भागः) प्राच्यभारती प्रकाशन, वाराणसी, १९६६.

३ **कुट्टनीमतम्** –
दामोदरगुप्तविरचितम् – } संपादक– मधुसूदन कौल,
रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल, कलकत्ता, १९४४.

४ **कुवलयावली** –
श्रीशिङ्गभूपालप्रणीता, त्रिवेन्द्रम् संस्कृत सीरीज, त्रिवेन्द्रम्, १९४१.

५ **चतुर्दण्डीप्रकाशिका** –
श्रीवेङ्कटमखिविरचिता, मद्रास म्यूझिक अॅकॅडमी, मद्रास, १९३४.

६ **दत्तिलम्**–
दत्तिलमुनिप्रणीतम्, त्रिवेन्द्रम् संस्कृत सीरीज, त्रिवेन्द्रम्, १९३०.

७ **ध्वनि और संगीत** –
ले. प्रो. ललितकिशोरसिंह, भारतीय ज्ञानपीठ, काशी, १९५५.

८ **नाटकलक्षणरत्नकोशः** –
सागरनन्दिकृतः, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९३७.

९ **नाट्यशास्त्रम्–भरतमुनिप्रणीतम्**
(बडोदा आ.) भाग–४, ओरिएण्टल इन्स्टिट्यूट, बडोदा, १९६४.

१० ,, घोषसंपादित आ. भाग २, एशियाटिक सोसायटी, कलकत्ता, १९५६.

११ **नारदीया शिक्षा** –
श्रीपीताम्बरापीठ संस्कृत परिषद्, दतिया (म. प्र.), १९६४.

१२ **नृत्तरत्नावली–जायसेनापतिविरचिता**, –
संपादक– डॉ. व्ही. राघवन्, गव्हर्मेंट ओरिएण्टल मॅन्युस्क्रिप्ट लायब्ररी, मद्रास, १९६५.

१३ **बालसंगीतबोध** –
ले. ना. दा. बनहट्टी, पुणे, १९०६.

१४ **बृहद्देशी–श्रीमतंगमुनिविरचिता** –
त्रिवेन्द्रम् संस्कृत सीरीज, त्रिवेन्द्रम्, १९२८,

१५ **भरतभाष्यम्** –
भाग– १ व २, संपादक– श्रीचैतन्य देसाई, इंदिरा-कला-संगीत-विश्वविद्यालय, खैरागढ (म. प्र.) भाग–१, १९६१ व भाग–२, १९७६.

,, **हस्तलिखित**– भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर, क्र. १११, १८६९–७०.

१६ **भारतीय संगीत** –
ले. कृ. ग. मुळे, दादर, मुंबई, १९४०.

१७ भारतीय संगीत व संगीतशास्त्र –
ले. बा. गं. आचरेकर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९७४.

१८ भावप्रकाशनम्– शारदातनयविरचितम् –
जी. ओ. एस्., बडोदा, १९३०.

१९ महाभारत –
B. O. R. I. शान्तिपर्व, वनपर्व, विराटपर्व.

२० मानसोल्लासः –
भाग-३, ओरिएण्टल इन्स्टिटयूट, बडोदा, १९६१.

२१ रसार्णवसुधाकरः –
त्रिवेन्द्रम् संस्कृत सीरीज, त्रिवेन्द्रम्, १९१६.

२२ रसगंगाधर –
पंडितराजजगन्नाथकृत, (खंड १), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, १९५३.

२३ वायुपुराणम् –
उत्तर खंड, अध्याय २४, वेंकटेश्वर प्रेस, मुंबई.

२४ वैदिक संगीत –
ले. धुंडिराजशास्त्री बापट, भारत गायन समाज, पुणे.

२५ शिशुपालवधम् –
महाकविमाघप्रणीतम्, निर्णय सागर प्रेस, मुंबई, १९५७, १२ वी आ.

२६ सुश्रुतसंहिता –
निर्णयसागर मुद्रणालय, मुंबई, १९४५.

२७ संगीतचूडामणिः –
जगदेकमल्लप्रणीतः, जी. ओ. एस्., बडोदा, १९५८.

२८ संगीतदर्पणम् –
चतुरदामोदरविरचितम्, सरस्वती महाल सीरीज, तंजावर, १९५२.

२९ संगीतपारिजातः –
अहोबलविरचितः, सरस्वती प्रेस, कलकत्ता, १८८४.

३० संगीतमकरंदः –
नारदकृतः, जी. ओ. एस्. बडोदा, १९२०.

३१ संगीतराजः –
महाराणाकुंभकृतः, भाग–१, बनारस हिंदु युनिव्हर्सिटी, वाराणसी, १९६३.

३२ संगीतसमयसारः –
पार्श्वदेवविरचितः, त्रिवेन्द्रम् संस्कृत सीरीज, त्रिवेन्द्रम्, १९२५.

३३ संगीतसार –
सवाई प्रतापसिंहदेवकृत, पूना गायन समाज, पुणे, १९१०.

३४ संगीतसारामृतम् –
तुलजेन्द्रभूपालप्रणीतम्; म्यूझिक ॲकॅडमी, मद्रास, १९४२

३५ संगीतसुधा –
श्रीरघुनाथभूपविरचिता, म्यूझिक ॲकॅडमी, मद्रास, १९४०

1. **Ancient India–**
by– R. C. Majumdar; Motilal Banarsidass, Delhi, 8th Ed. 1977.

2. **Early History of the Deccan—**
by– R. G. Bhandarkar; Reproduced from the Bombay Gazetteer, Susil Gupt (India) Private Ltd., Calcutta, 1957.

3. **History of Classical Sanskrit Literature—**
by– M. Krishnamachariar, Motilal Banarsidass, Delhi, First Reprint, 1970.

4. **Introduction to the Study of Musical Scales—**
by– Alain Danie Lou, The Indian Society, London, 1943.

5. **Jātaka Vol. II—**
pp. 224–226, 249; Ed. by V. Fausboll and T. W. Rhy Davids, London.

6. **Later Sangita Literature—**
by– V. Raghavan, Journal of the Music Academy, Madras, Vol. IV Nos. 1–4, 1933.

7. **Musical Acoustics—**
by– Charles Culver, Edition Fourth, Mc Graw Hill Book Company, Inc. New York, 1956.

8. **Musical Instruments in Indian Sculpture—**
by– G. H. Tarlekar and Mrs. Nalini Tarlekar,
Pune Vidyarthi Griha Prakashan, Pune 1972.

9. **Musical Instruments of India –**
by– B. Chaitanya Deva, Firma KLM Pvt. Ltd. Calcutta, 1978.

10. **Saṅgītaratnākara of Śārṅgadeva—**
Text and Translation, Vol. I. by– R. K. Shringy and Prem Lata Sharma; Motilal Banarsidass, Varanasi, 1978.

11. **Shilappadikāram—**
Translation by– V. R. R. Dikshitar, Oxford University Press, 1949.

12. **The Rehla of Ibn Baṭṭūṭa—**
Translation and Commentary by– Mahdi Hussain, Oriental Institute, Baroda, 1953.

13. **The Yādavas and their Times—**
by– O. P. Varma; Vidarbha Samshodhan Mandal, Nagpur, 1970.

शब्दसूची

(शब्दापुढील आकडे पृष्ठांचे आहेत.)

अंश २७, ३०, ३४, ५९, २१८, २३०
अकृतार्थ १५०, १५१, १५२, १८१
अक्षर २१, २८, २३०
अक्षरसम ४३९
अङ्कश्रेणी १४८
अङ्ग ३७७, ३९७
अङ्गपाट ३७७, ४००
अङ्गरूपक ३७७, ३९८
अङ्गसम ४३९
अङ्गुलि ३४
अञ्चनी ४१९, ४२१–४२३
अञ्चल ४०२
अडुखली–अडुस्खलित ३४९, ३५२
अडुतालिका ११७
अडुताली १४१
अडुावज ३४६
अतिकीर्ण २२०, २२६
अतिपात २२०, २२५
अतीत (ग्रह) २३, २३४, २३५
अधरमध्यद्विरुत्तर २२०, २२३
अधरादिद्विरुत्तर २१९, २२३
अधराद्युत्तरान्त २१९, २२२
अध्वन्य ३१३
अनङ्ग ११६, ११७, १३२
अनागत (ग्रह) २२, २३
अनामा–अनामिका १५, २०५, २०७, २०९, २८२
अनिर्युक्त २५
अनुगत २३०, २३१
अनुच्छल्ल ३४९, ३५२
अनुद्ग्राह ११३
अनुपमा ३००
अनुबन्ध २१९, २२३, २२४, २२६, २२८
अनुयायप्रवीणता ४११
अनुवादी ३०, ५९
अनुवृत्ति ४१२
अनुश्रवणिका ३६८, ३७३
अनुस्वनित २२०, २२७
अन्त ६३, ७८, ७९, ८८, ९७
अन्तर ३७७, ३९५
अन्तर्मुख ४१०
अन्तान्त ६५
अन्ताहरण ६१, ६५, ६७, ७६, ७८, ८२, १०८, १०९
अन्तरक्रीडा ११७, १३९
अपन्यास २७, ५९, ४३९
अपरान्तक २५, ३९, ४०, ४३, ४४, ४६, ४९, ५१, ५३, ५५, ५८
अपस्थान ३१६
अपाट ३५०, ३६५
अभङ्ग ११७, १३४
अभिनन्द ११७, १३२
अभिसृत २४३
अभ्यस्त ३५०, ३६५, ३८८
अयुक्–अयुग्म ६१, ६३, ६७, ६८, ६९, ७०, ७१
अर्गला ४१३, ४२१
अर्धकर्तरी २०६, २०९, २१२, ३५०, ३६२
अर्धचन्द्र २०६, २११
अर्धपल ४२५
अर्धपाणि ३४९ ३५६
अर्धमात्र ११८
अर्धमुक्ता २८४, २८५
अर्धसञ्च ३५०, ३६४
अर्धसम ३४९, ३५४
अर्धसामुद्ग २९
अर्धार्धपाणि ३४९, ३५६

अलंकार २२१
अलगपाट ३५०, ३६६
अलग्न ३४८, ३५०, ३५१, ३६२, ३७०
अलपद्म ३५४
अल्प ३१५
अवगाढ ५९, ७९
अवघट ३४९, ३५०, ३५२, ३५८, ३७०
अवच्छेद २८६
अवत्सक ३७७, ३९१
अवधान ४१२
अवनद्ध १९३, १९६, १९७, २००
अवपाणि २३, ७९
अवमृष्ट २२०, २२८
अवयति ३७७, ३९६
अवरोह २३६, २४७, २६३–२७१
अवरोही ५९, २६७, २६९, ३२१, ३२२, ३२३, ३२४
अवलेख २०६, २०७
अवान्तरा २९
अव्यवस्थित ३१५, ३१६
अशब्द–अशब्दक १२७, १२८
अश्ववालधि २७३
आतोद्य १९९
आदिकामोदिका ३३०
आदिताल ११६, ११९
आदित्य (वंश) २७९, २९०, २९९, ३०४, ३११
आधारगर्त २०१
आधोरिका २१४
आनन्दघन १९३
आभोग ११३, ३९०, ३९२, ३९८
आरम्भविधि २३२, २३६
आरोह २३६, २४०, २४७, ३२३, ३२४
आरोहिवर्ण ५९
आलप्ति ४०७
आलापिनी १९७, २४४, २४५, २४७
आवज ४१४
आवहनी ३८०
आवाप ४, ५, १३, १६, ५२
आविद्ध (धातु) २१९, २२०, २२५, २२६, २२९, २४१
आविद्धक ४१२
आवृत्ति २०, ८४, ९७, २४४
आश्रावणा २३२, २३३, २३६, ३१२
आसारित १२, ९६, ९७, ९८, १०१, १०२, १०६
आसारिताभास ९८
आहत ३२२, ३२४, ३२६, ३३०, ३३५
इन्दिरा २०४
इन्दु ३४८
इष्टताल १५७, १६८
इष्टस्थान ३१७
ईशान (वक्त्र) ३४८, ३५२
उच्चय २२०, २२४
उट्टवण ३७८, ३८२–३८४
उट्टवणी ३७७, ३९९
उडव ३७७, ३९९
उडुव ३६८, ३७०
उत्कक्ष ४२१, ४२२
उत्क्षिप्ता २०५
उत्तर ९, ३२, ३३, ४४, ६२, १०८, २३४, २३७, २३८, ३०७
उत्तरादिद्विरधर २२३
उत्तरादि–अधरान्त २२२
उत्तान २०३
उत्पात १९९
उत्फुल्ल ३४९, ३५२, ३५४
उत्सव (ताल) ११७, १३९
उत्सार ३४८, ३५२
उत्सृष्टसारणा २०९
उदरपट्टिका ४१३
उदीक्षण (ताल) ११६, १३१
उदात्ता २२९
उद्गीथक ११२
उद्ग्राह ११३, ३७६, ३७९, ३८०, ३८२, ३८३, ३८६, ३८७, ३८९

उद्घट्ट १०, १६, १७, ६२, १००
उद्ली ३४५, ३४६, ३७०, ४१३, ४१६, ४२२
उद्दिष्ट १४४, १५३, १८२, १८३
उद्भट ४२७
उद्वेष्ट २१०
उधार ४०६
उन्मृष्ट २२०, २२८
उपद्रव ११२
उपपात ७६, ७८, ७९
उपरिपाणि २३
उपरिवाद्य २११, २१३
उपवर्तन ४४, ४७, ४८, ४९, ५१, ५२, ५४, ५५, ८७
उपशम ३७७, ३८२, ३८३, ३८४, ३८५, ३८८, ३८९
उपोहन २६, २८, ३१, ३२, ३४, ३७, ४४, ५२, ७२, ७३, ९५, ९६, ९८, १००, १०४
उभयी २०५
उमा २०४
उमापति (वंश) २७८, २८७, २९७, ३०९
उल्लेख २०६, २०७, २१२
उल्लोप्य–उल्लोप्यक २५, ६०, ६४–७१, ८७, १०८, १०९
उल्लोल ३५०, ३५९
ऊर्ध्वहस्त ३४९, ३५५
ऋचा २५, १११
ऋषभ (स्वर) २४७, २६३, २६४, २६५, २६७, २८१, २८२, ३२२, ३२५, ३३५
एकक ६०, ६२, ६३, ७९, ८३, १०८, ११२, २३८
एककल ७, ११, १२, १६, २७, २८, ३४, ३६, ३७, ६४, ८८, ३७५
एककलयुग्म २३४, ३७९
एकतन्त्री १९७, २०४, २१५, २७४
एकताली ११७, १३४, ३८२, ३८७
एकरूपाक्षर ३७८
एकवक्त्र ४२७
एकवस्तुक २८, ३७
एकवाक्यत्व २५
एकविस्तार २२१, २३६
एकवीर (वंश) २७८, २८१, २८६, २९६, ३००, ३०८
एकसर ३४८, ४०७, ४०८, ४०९
एकाङ्गक ६३
ओंकार १११, ११२
ओघ २१७, २१८, २३०, २३१
ओज १५
ओता ३७७, ३७९, ३८२
ओवेणक २५, ७५, ७९
कंदर्प (ताल) ११६, १२२
ककुभ २०१, २०३, २०४, २४५, २४७, २४८, २५०, २५१, २५३ २५४, २५६
कंकाल ११७, १३३, २११, २१२
कच्छा ३४५, ४०२, ४१५, ४१७, ४१९, ४२१, ४२६
कण्डिका ९८, १००, १०१, १०२, १०४, १०६
कण्डिकावर्धमान ९८
कनिष्ठा १५, २०५, २८२, २८७, २८९
कनिष्ठासारित ७२, ७५, ९१, ९२, १०७, २४२,
कन्दुक (ताल) ११७, १३३
कपिल ३१५
कम्पन २०६, २८२, ३१७, ३१९
कम्पित २६६, २६८, २७२, ३१३, ३१८
कम्पिता २०५, २०८, २८४
कम्रा–कम्रिका १९८, २०५, २१०, २१४, २७३, ४३६
कम्रिकावाद्य २१४, ४३६
करचारणा ३६८, ३७१
करटा १९७, ३८७, ४१४, ४१५
करण ११७, १४०, २१७, २१९, २२०, २२४, २२५, २२९, २३६, २४१
करणयति ११७, १३७
करविवर्तन ३६५
करसञ्च ३६६
करसारण १९९

करेणु ३४२
कर्कटहस्त ३४३
कर्णाटगौड ३३६
कर्तरी २०६, २०८–२१०, २१२, २१३, २५१, ३४९, ३५६, ३७०, ३७६
कर्पर २०३, २४५, ४१९
कल २२०, २२७, ४३८
कलध्वनि ११७, १४२
कलश ३४४, ३४५
कला ३, ४, ५, ८, ९, १२–१७, १९, ३१, ३२, ३७, ४५, ५२, ५८, ६०, ६२, ६४, ७२, ७४, ७७, ९५, ९६, ९८, १०१, १०२, १११, ११२
कलानिधि १
कलानिधि (वंश) २७९, २९०, २९५, ३०५
कलापात ७३
कलाविधि ६५
कल्पना ४३३
कवल ३४४, ३४६, ४१६, ४१८
कवित ३७७, ३८६
कवितकार ४०४
काकी ३१५
कामोदा २६६
कार्मुक २७३
काल ३, २०
काहला १९७, ३४१, ३४२, ३८७
किंनरी १९७, २४७, २४९, २५०, २५४, २५५, २५७, २७२
किंनरीवादक २५८
किरकिट्टक ४३७
कीलक २०३
कीर्तिताल ११६, १३०
कीर्तिधर २८५
कुचम्बिणी ३६८, ३७०
कुञ्चित ३५०, ३६६, ३६७
कुडुक्क ११६, १२६
कुडुक्का १९७, ४१७
कुडुप ४१५, ४१७, ४२१, ४२२, ४२४
कुडुव ३७१
कुडुवचारणा ३६८, ३७१
कुडुवा १९७, ४१८
कुण्डली ३७०, ४१९
कुण्डलीविक्षेप ३४८, ३५१
कुमुद ११७, १३४
कुलक २५
कुविन्द ११७, १४१
कुहर २०६, २११
कूट ३८३, ३९०, ३९१, ४०४
कूर्पर (सञ्च) ३६७
कृतप्रतिकृत २१७
कृश ३१४
कृतार्थ १८१
कैकुटी २११, २१२
कैशिकी ३३८
कोकिलाप्रिय ११६, १२९
कोण ३४७, ३६०, ३७०, ३७१, ४१८
कोणाङ्गुली २१६
कोमलत्व ३१४, ४३०
कोलाहल ३८४
कोल्लक १३६
कोष्ठ–कोष्ठक १५९–१७१, १८०
क्रिया ३, २०, ११४, २०५
क्रीडा ११६, १२९, १३०
क्षीरपाक ३४१
क्षुद्रघण्टिका १९८, ४३५
क्षेत्रपाल ४१७
क्षेप ४, २२०, २२५
खण्ड १९, १३३, ३९६, ३९७, ४००
खण्डक ३७७, ३९७
खण्डकर्तरी ३५०, ३६०
खण्डच्छेद ३७७, ३९६
खण्डताल ३७३
खण्डनागबन्ध ३४८, ३५१
खण्डपाट ३७७, ३९७
खण्डप्रस्तारक १४४, १७९
खण्डयति ३७७, ३९६

खण्डहुल्ल ३७७, ३९७
खलक ३४९, ३५४, ३७७, ३९८
खली (स्खलित) ३५२
खसित २०६, २०८, २११, २१२
खानि २८९, २९६, २९८, २९९, ३०१, ३०३, ३०४, ३०८, ३१२
खानिमान २८९
खुत्त ३४९, ३५२
खेटक २७३
खोज ३७७, ३९६
गज ११७, १३९
गजझम्प ११७, १३५
गजर ३७७, ३८२, ३८३
गजलील ११६, १२४, २११, २१३
गद्य ११३
गर्वनिर्णय ३७७
गाथा ११२
गान्धर्व १९
गान्धर्वमार्ग १८
गान्धार २४७, २६०, २६२, २६३, २६५, २६६, २६८, २७२, २८२
गायत्री ११३
गारुगि ११७, १३७
गीत ३
गीतक ६१
गीतप्रबन्ध ३७६
गीतानुग १९८, २३०, २३१, ४११
गीति ७९, ८३, २३०
गुण २००, २७६, ३१४, ३१७
गुणदोष ३१६
गुरु ६, ८, २७, २८, २९, ११८, १२२, १३०, १३१, १३३, १३४, १३६, १४०, १४१, १४२, १४३
गुरुगुञ्जित ३५०, ३६४
गुरुमेरु १४४, १६५, १८९, १९०
गुर्जरी २६३, ३२६
गोपालकेलि ३४३
गोपुच्छा २२, २३०
गोमूत्रिकाबन्ध ४०१
गोष्ठी १९८, ३४६
गौडकर्णाट २७०
गौडकृति २६७, ३३२
गौरी ११७, १४२
ग्रह २२, २३, २५९, २६०, २६१, २६४–२७२, ३१९–३३९
घट १९७, ३४७, ४१५
घडस १९७, ४१६
घण्टा १९८, ४३४, ४३५
घत्ता ११७, १४१
घन १९६, २००, ३९५, ४१५, ४३३, ४३८
घनता ३१३
घना २२९
घर्घरिका ४३५
घात २०६
घोष २०६, २०८
घोषक २१५
चक्रिका ३४१
चच्चत्पुट ७, ८, १२–१५, १९, २३५, २४२, ३७५
चच्चरी ११६, १२३
चण्डताल ११७, १४०
चण्डनिःसारुक १२९, १३०
चतुरश्र ६, ७६, ७९, ९१, १२५, ३७३, ३७५, ४०७
चतुरश्रक ७७, ९०
चतुर्थक ११६, १२१
चतुर्मुख (ताल) ११७, १३६
चतुर्मुख (वंश) २७८, २९७, ३०१, ३०६, ३०९
चतुष्कल ७–१०, १४, १७, १८, २८, ३१, ३५, ५१, ५३, ५५, ५८, ६०, ६४, ६५, ७६, ८७, २३७
चतुष्कलमात्रा ६६–७१
चतुस्ताल (चतुस्ताली) ११७, १३४
चन्द्रकला ११७, १४०, ३६८, ३७६
चर्चिका ४१५

चर्यागान ४२२
चल्लावणी ३६८, ३६९, ३७०
चाचपुट ७, ८, १०, १२, १३, १४, १००, ३७५
चारुश्रवणिका ३६८, ३७०
चित्र १, ५, ९७, १०६, २३०
चित्रा १९७, २१६, २२९, ३७०
चिन्धरामक्री ३३४
चुक्का १९७, ३४२
छत्रक ८९
छण्डण ३७७, ३७९, ३८२, ३८४, ३८७, ३८८, ३९१, ३९२
छन्द ११३, २११, २१२
छन्दक ९०, ९१
छन्दकासारित २५
छायानट्टा २६९, ३३३, ३३४
छिन्न २०६, २०८
छेद ३७७, ३९५
छेद्यक २५
छोटिका ४
जक्का ३७८, ४११
जगण १३७
जनक (ताल) ११७, १३८
जनक (वीणा) २१५
जय ११६, १२६
जयमङ्गल ११६, १२९
जयश्री ११६, १३०
जल्प ४०५
जाति २२९, २३०, २७५
जातिमुख २८८, २८९, २९६, ३०१
जितश्रम ४४१
जीवा २०३, २०४
जोडणी ३६८, ३७३, ३७४, ३७७, ३९८
जोडा ४०७, ४०८
ज्येष्ठ (आसारित) ९१, ९३, ९४, १०७
ज्येष्ठताल १०५
झडप्पणी ३६८, ३७३
झम्पा ११७, १३५
झल्लरी १९७, ४२४, ४२५
झेंकार ३४६
झेंकृति ३६९
टाकणी ४०७, ४०८, ४०९
टिरिकि ३८८
डक्का १९७, ३६९, ४२१
डक्कुली १९७, ४२२, ४२३
डमरु १९७, ४१९, ४२०
डोम्बक्री २६५, २६६, ३२८
डोम्बुली ११७, १३४
ढक्का १९७, ४१७
ढवस १९७, ४१६, ४१७
ढेंकार ४१७
ढेंकी ११६, १३२
तकार ३४९, ३५२, ४११
तत १९३, १९६, १९९
तत्पुरुष ३४८, ३५२
तत्त्व २३०, २४४
तन्त्रिका–तन्त्री १९६, २०२–२११, २१४, २१६, २२६, २२७, २२८, २४६, २४९, २५०, २५३, २७३, २७४
तर्जनिका–तर्जनी १५, २०५, २०६, २०८, २०९, २११
तल २१०, २२०, २२७, २३६, ३५८
तलघात ४३६
तलपाट ३७७, ३९९
तलप्रहार ३५०, ३६३, ३६६
तलहस्त २०६, २१०, ३५६
तानदायिता ३१६
तार (स्थान) २११, २२१, २२२, २४६
ताल १, ३, ४, ६, १२, १६, १९, २२, २४, २८, ३५, ३८, ७३, १००, ११४, ११७, ११९, १२१, १२९, १३८, १७७, २३०, २३३, २३४, २३५, २३७, २४२
ताल (वाद्य) १९८, ४३२, ४३३
ताल(वाद्यप्रबन्ध) ३७७, ३९८
तालसम ४३९
तालिका ३८–४४, ४६–५१, ५३–५८

तित्तिरी ३४२
तुडुका ३७७, ३९२, ३९३
तुण्डकिनी १९६, ३४२
तुथुकार ३४२
तुम्बकी १९७, ३१५, ४२८
तुम्बुरु–तुम्बरु १९८, ४३३
तुरङ्गलील ११६, १२६, १२७
तुरुतुरी ३४२
तुरुष्कगौड २७१, ३३७
तुवरीबीज ३४१
तृणशलाका ४२०
तृतीय ११६, १२१
तोडी ३२३
त्राटन ४०५
त्रिकुल्या ४२६
त्रिगुणा ३६८, ३७४, ३७५
त्रितन्त्रिका १९७, २१६
त्रिपुट १४१
त्रिपुरा ४२६
त्रिपुरुष २७८, २९७, ३०१, ३०९
त्रिभङ्गि ११६, १२७
त्रिमात्र ११८
त्रिरधर २१९, २२२
त्रिरुत्तर २१९, २२२
त्रिवली १९७, ४२५, ४२६
त्रिसंख्यात ९७, २४४
त्रिसञ्च ३५०, ३६५
त्रिस्थानत्व ३१४
त्रेताग्नि २०१
त्र्यङ्ग ११८
त्र्यश्र ६, ९, १०, ६१, ६२, ६५, ९५, १२५, ३७३, ३७५, ४०७
दक्षाध्वर १९८
दक्षिण (मार्ग) १, ५, ६, ४४, ५२, ९७, २३०
दक्षिणा (वृत्ति) २२९
दत्तिल ४५, ६१, ७३
दण्ड २००, २०२, २०३, २०४, २४५–२४८, २५०–२५२, २५४, २५६, २८६–२९१, २९४–३०६, ३०८–३११
दण्डहस्त ३४९, ३५०, ३५५, ३६०, ३६८, ३७१
दन्तजा ३४१
दन्तिदन्त ४२२
दर्पण ११६, १२२
दारवी ३४१
दीपक ११६, १३१
दीप्त ११८, १३५, १३९, १४०
दीप्तनर्तन–दीप्तनृत्त ३८०, ३८६, ३८७, ३९१, ३९२, ३९३
दीर्घ ११८
दुन्दुभि १९७, ४२६, ४२७
दुःसर ३४८, ३५१
देंकार–देंकृति ३७८, ३७९, ३८०
देवक्री–देवकृति २६८, ३३२
देशवालगौड ३३६
देशाख्या २६५, ३२७
देशी ३, २६५, ३२७, ३४३
देशीताल १९, ११४, ११५
देशीपटह ३४५
देशीराग २६१, २६५, ३१६
देशीवंश ३०६
दोरक २०३, २०४, २४५, ४२३
दोरिका २०४, २४५
दोष २००, ३१५
दोषाच्छादन ३१६
द्राविडगौड ३३७
द्रुत २०, ११५, ११८, १२१–१२७, १२९–१३५, १३७–१४०, १४२, १४३, १४५, १४८, १५१, १५७, १६०, १७७, १७९, ३३६
द्रुतमेरु १४४, १६०
द्रुतमेरुकोष्ठक १६१
द्विकल ७–१०, १३, १६, १७, ३१, ३२, ३३, ३६, ४४, ५१, ५२, ६२, ६४, ६६, ७६, ७८, ९९, १००
द्विकलयुग्म ६२, २३५
द्वितीयक ११६, ११९

द्विरधर २१९, २२१
द्विरुत्तर २१९, २२१
द्विसंख्यात ९७, २४४
द्वैगेयक २९, ३४
धत्तूरकुसुम ३४१, ३४२
धन्नासी २६४, ३२६
धातु २१९, २२०, २२२–२२६, २२८, ३४३
धारा २११, २१२
धैवत २५७, २६२, २६३, २६६, २६८, २६९, २७१, २८३, ३२४, ३२८, ३३२, ३३३, ३३५
ध्रुव १, ४, ५, ९६, ३८६, ३९०, ३९८
ध्रुवक ५, ११३, ३७७, ३९२, ३९३, ३९७
ध्रुवक–ध्रुवा ५, ६
ध्रुवमार्ग ९७
ध्रुवा २३३, २३७, २३८, २४०, २४२, २४४
ध्रुवासारित ९७
नकुल १९७, २१६
नखकर्तरी २०६, २०८
नगण १२४, १२८
नन्दन ११६, १३१
नन्दि-नन्दिकेश्वर १९८, ३४९, ३५४, ४०३
नलिका २५२, ३४१, ४१९
नष्ट १४४, १५०, १५१, १५३, १८७, १८८, १८९, १९०, १९१
नष्टप्रश्न १५०
नष्टाङ्क १८०, १८६
नागपाश २०३, ४१९
नागबन्ध ३४७, ३४८, ३५०, ३५८
नाटक १९९, ३४७
नाटचरामकृति ३३५
नाथेन्द्र २८८, २९८, ३०२, ३१०
नादानुरणन ३१४
नान्दी (ताल) ११७, १३२
नाभि २०२, २०४, ३४३
नारद १९८
नि शङ्कलील ११६, १२१
निःशङ्कवीणा १९७, २७५
निःशब्द ३
निःसाण १३७, ४२७, ४२८
निःसारु ३७९, ४११
निःसारुक ११६, १२९, ३८२
निधन ११२
निपीडिता २८४, २८५
निबन्धन २२०
नियमादृष्टकल्पना २५९
निरन्तरयति ३९३
निर्गीतवाद्य २३२
निर्घोष ३५०, ३६०
निर्युक्त २५, ६५
निषाद २४८, २६२, २७०, २८३, ३३५, ३३६, ३३७
निष्कल २१४
निष्क्राम ४, १६
निष्कोटित २०६, २०९, २१०, २१३, २२०, २२७
नीरटित २२०, २२४
नृत्त ३
नृत्तानुग १९८
न्यास २७, २९, ३०, ५९, २६१, २६४–२६८, ३१९, ३२०, ३२६, ३२७, ३३०, ३३१, ३३३, ३३६, ३३७
न्याससम ४३९
पक्षपरिग्रह ४०४
पक्षिरुत २११, २१३
पञ्चकर्तरी ३६८, ३७६
पञ्चपाणि ९, १५, २८, ३१, ३५, ३७, ३८, ७८, ८४, ८८
पञ्चम (ताल) ११६, १२१
पञ्चम (स्वर) २५८–२६०, २६४, २६६–२७१, २८२, ३२१, ३२४, ३२६, ३२९, ३३४
पञ्चवक्त्र (वंश) २७८, २८७, ३०२, ३०६, ३०९
पञ्चसञ्चवित् ४४०
पञ्चहस्त ३६८, ३७५
पटह १९७, १९९, ३४३, ३४५, ३४७, ३६७

पटहवादक ३६७
पट्टिका ४१३, ४१४, ४१६
पताक ३५३, ३५५, ३९८
पताका ५
पतिता ५
पत्रिका २०१, २०४, २१४, २४७, २५१
पद ३७७, ३८७
पदनिर्युक्त २५
पद्मासन ३४६
पद्मिनी ५
परिक्रम १२२
परिघट्टना २३२, २४०, २४१
परिवर्त १००, २१०
परिवर्तन २०
परिवृत्त ३५०, ३६३
परिश्रवणिका ३६८, ३७०, ३७१
परिसृत २४२, २४३
पवन ३४८, ३५१
पाट ३४६, ३४७, ३७०–३७३; ३८७, ३९७
पाटखली ३४९
पाटज्ञ ४४०
पाटभेद ३४७, ४००
पाटवर्ण ३९५, ४१५, ४१७
पाटविन्यास ३६७
पाटहिक ३६७
पाणिक २५
पाणिका १२, १०८, १०९
पाणिसम ४३९
पाणिहस्तक ३४९, ३५७
पाण्यन्तर ३५०, ३६०
पाण्यन्तरनिकुट्टक ३४९, ३५५
पात ४, २०६
पातकला ११, ३२, ३४, २३३
पाताल १४४, १५८
पाद ७५, ७६, ७८, ८०, ८२, ९१
पादकम्प ३५३
पादभाग ८, १३, १५, २०, ३२–३४, ७३, ९५
पारिका ३४४
पार्वतीलोचन ११७, १३६
पार्श्वपाणि ३४९, ३५६
पाव १९७, ३४०
पाविका १९७, ३४०
पिण्ड ३०६
पिण्डहस्त ३४९, ३५५
पित्तला ४२९
पिनाकी १९७, २७३, २७४
पुटद्वन्द्व ३५७, ३५८
पुटबन्धन ४३०
पुष्करत्रय ४०२
पुष्प २२०, २२६
पूरक ३४८, ३५१
पूरिका ४०२
पूर्ण १३३
पृथुला २३०
पेरणिनर्तन ४३५
पैसार ३७७, ४००
प्रकरण २४
प्रकरी २५, ७२, ७४, ७५
प्रकृति २०४
प्रथममञ्जरी २६६, ३२९
प्रतापशेखर ११७, १३५
प्रतिताल ११६, १३०
प्रतिनिधि १५७, १६०, १६३
प्रतिपाद ७५, ७६, ८०
प्रतिफूत्कृति ३१५
प्रतिभेद २१७, २१८
प्रतिमण्ठ ११७, १३६
प्रतिमुख ५९, ९१, ९५, १०८, १०९, २३८
प्रतिमुखरी ४१०
प्रतिवक्त्रक ९०
प्रतिशाखा ३७–५१, ५३–५८, ६१, ६७, ८९
प्रतिशुष्का २१७, २१९
प्रतिहार ११२
प्रत्यङ्ग ११६, १२३
प्रत्युपोहन २६, २८, ३२, ३७, ५२, ७२
प्रत्यय १४४

प्रबन्ध २००, ३७७, ३८७, ३९७, ४००
प्रवृत्त ५९, ६१–६४, ६९, ७९, ८४, २३८
प्रवेणी ७६, ७८, ७९, ८१
प्रवेश ४
प्रसार-प्रसारक २०६, २११
प्रस्तार ३१, ३३, ३५, ३८, ४५, ४९, ५३, ५५, ६६, ७४, ८०, ९१–९४, १०१, १०३–१०५, १०७, १०९, १४४, १४५
प्रस्ताव १११, ११२
प्रहर ३५०, ३६४
प्रहरण ३७७, ३९०
प्लुत ७, ९, १०, ११५, ११८, १२१, १४०, २२०, २२५
प्लुतमेरु १४४, १६७
फुल्लविक्षेप ३४८, ३५१
फूत्कारदोष ३१४
बङ्गाल (राग) २५८, २६२
बलिकोहल ३४८, ३५१
बहुलीरामक्री २६९
बिन्दु-बिन्दुक ११८, १३८, १४०, १४१, १४२, २०६, २०९, २२०, २२७, २३९, ३५०, ३६१
बिन्दुमाली ११६, १३१
बृहती (किंनरी) २४७, २५०, २५४
बोल्लावणी ३६८, ३६९, ३७०
बोहण ४०३, ४०५
ब्रह्मसुषिर १९३
ब्रह्मदेव-ब्रह्मा १११, ११२, ११८, २०४, ३४८
भग्न (ताल) ११७, १४२
भरत ३०, ३७, ९९, २४०
भाण १९७, ४२५
भूपाली २६६, ३२८
भृङ्गी ४१९
भेरी १९७, ४२७
भैरव २६३
भैरवी २६८
भ्रमर २०६, २०७, २१३, ३५०, ३६२
मकरन्द-मकरन्दक ११६, १३०
मगण १२३, १२४, १४०
मण्ठ-मण्ठक ११६, १२८
मण्ठिका ११६, १३१
मण्डली ४१४, ४१६, ४२०, ४२२
मण्डिडक्का १९७, ४२१, ४२२
मतङ्ग ३१३, ४१९
मत्तकोकिला १९७, २१६, २१८
मदन ११७, १३६
मद्रक ८, २५, २७, २८, ३०, ३२, ३४, ७३, ८३, ८५, २३८
मधुकरी १९७, ३४१
मधुर ३१२, ४११
मध्यगान्धार २६५
मध्यम (आसारित) ९१, ९३, ९९
मध्यम (आसारिताभासवर्धमान) १०४
मध्यम (स्वर) २४६, २५९, २६०, २६२, २६६–२६८, २८२, ३१८, ३२२, ३२३
मध्यमग्राम २४३
मध्यमादि २५७, २५८, ३१९, ३२१
मनु (वंश) २७९, २९०, २९४, २९७, ३०५
मन्त्रस्तोभ ११३
मन्द्र २४६, २५७, २६६, २८३
मन्द्रगान्धार २६५
मन्द्रनिषाद २७०
मन्द्रषड्ज २६९
मन्द्रसप्तक २८०
मर्दल १९७, २००, ४००–४०४, ४१५, ४२३
मर्मरा ४३५
मलप ३७७, ३९३, ३९४
मलपाङ्ग ३७७, ३९४
मल्ल (ताल) ११७, १३२, १३३
मल्लिकामोद (ताल) ११६, १२९
मल्हार २७०, ३३५
मस्तक २५२
महती (विदारी) २९
महाजनिक ६१–६३, ६८–७१
महानन्द (वंश) २७९, २८९, २९८, ३०३, ३१०

मागधी २३०
माणिक्यबल्ली ३४९, ३५२
मात्रा ६, ८, ३३, ३५, ५८, ६४, ६६, ६७–६९, ७२–७४, ८५–८७
मात्रामात्र ६५
मात्रावृत्त ११२
मार्ग १, ३, ५, २१, ८९, २३०, ३४३
मार्गपटह ३४३–३४५
मार्गदेशीराग ३१६
मार्गसारितक २३२, २४२
मार्दलिक २००, ४०४, ४१२
मालवगौड ३३७
मालवश्री ३२२
मालवी २७१
माषघात ७५, ७६, ७९, ८०, ८५, २४३
मुकुन्द ११७, १४१
मुक्ता २८४, २८५
मुख ५८, ९०, ९१, ९५, ९८, १०८, २३८
मुखताल ९०
मुखरन्ध्र ३०८, ३४०, ३४१
मुखरी ४०४, ४१०
मुख्यवीणा २१७
मुद्रित ३०६, ३०७, ३२१, ३२२, ३२७
मुद्रितमण्ठ १२८
मुनि १२, ४५, १११, ११८, २३३
मुनि (वंश) २७९, २८८, २९७, ३०२, ३०९
मुरज ४०२
मुरली १९७, २७९, ३०६, ३४०
मूर्च्छना २०६, २१०, २१२, २१३, २९२, ३१२
मूर्ति १९६
मृदङ्ग ४०२
मेढक २४९, २५१, २५२, २५५, २५६
मेलापक ३७७, ३८८
मेषपारी ४२२
यगण १२२, १२६
यति १, २१, २३०, ३७७, ३७८, ३९६, ४३९
यतिलग्न ११६, १२३
यतिसम ४३९
यथाक्षर ७–१०, ३१–३३, ३७, ३८, ४४, ६२, ७६, ७८
यथाक्षर (आसारित) ९७
यमल ३१४, ३१५, ३४२
यमलहस्त ३५०, ३६१
युगहस्त ३४९, ३५५
युग्म (अंत) ६१, ६३, ६७, ८२
युग्म (ताल) १९, ६२, १००
युग्मप्रवृत्त ६८–७१
युग्मस्थित ६७–७१
योजन (ताल) १३२
रक्त ४३८
रक्तचन्दन ४०३, ४२९
रक्ति २१९, २५७, २९१, ३००, ३०६, ३१२, ३१३, ४१२
रगण १३०, १३२, १३४, १३८
रङ्ग (ताल) ११६, १२३
रङ्गप्रदीपक (ताल) ११६, १२४
रङ्गाभरण ,, ११६, १२७
रङ्गोद्योत ,, ११६, १२४
रति ,, ११७, १३६
रतिलील ,, ११६, १२२
रागवर्धन ,, ११७, १३८
राजचूडामणि ,, ११६, १२४
राजताल ११६, १२५
राजनारायण ,, ११७, १३७
राजमार्तण्ड ,, ११७, १४२
राजमृगाङ्क ,, ११७, १४२
राजविद्याधर ,, ११६, १२९
रामकृति २६७
रायवङ्कोल (ताल) ११७, १३५
रास ११९
रिगोणी ३७७, ३८३–३८५
रिभित २२०, २२४, २३६
रिभिता २२९
रुञ्जा १९७, ४१८, ४१९
रुद्र (वंश) २७९, २८९, २९८, ३०३, ३११

रुद्रवल्लभ ४३७
रूक्ष ३१६
रूप (अंक) १५७
रूप (करण) २१७
रूपक ३७७, ३९५
रूपशेष २१७, २१८
रेचित ३५०, ३६१
रेफ २०६, २०९, २१२, २१३, २२०, २२७, ३५०, ३६२, ३६३
रोविन्द २५, ८३, १०८
रौद्र (रस) १९९
लक्ष्मीश (ताल) ११७, १३७
लघु ३, ६, २७, ११८, ११९, १२९, १३०, १३२–१३६, १३८–१४३, ३२६, ३२७, ३३१, ४४०
लघुमेरु १४४, १६३, १८६, १८७, १८८, १९०
लघुशेखर (ताल) ११७, १३५
लय १, २०, २३, ४०७
लय (ताल) ११७, १४०
लयान्तर ९१, ९२, ९५, ९७, ९९, १०७, २४२, २४३
लयान्ताभासवर्धमान १०३
ललित (ताल) ११७, १३७
ललितप्रिय ,, ११७, १३८
ललिता २२९
लीला (ताल) ११७, १३६
लीलाकृत २३२, २४२–२४४
लुलित ३७०
लोहकोण ४३७
वंश १९७, २१५, २७२, २७६, २७८–२८२, २८४–२९१, २९३–२९५
वंशपद्धति ३०८
वक्त्र २९२, ३४५
वक्त्रपाणि २३२, २३८, २३९
वक्र ११८, १३७, १३८, १४०
वज्र ७६, ७९
वनमाली (ताल) ११६, १२६
वराटी २६३, ३२५
वर्ण ७७, १११, ११२, २४४, २८४, २८६
वर्ण (ताल) ११६, १२५
वर्णभिन्न ,, ११६, १२४
वर्णमण्ठिका ,, ११६, १३२
वर्णयति ,, ११७, १३९
वर्णसर ३७९, ३८२, ३८३, ३८५, ३८७, ३९०, ३९२, ३९३
वर्णानुकर्षण ६१
वर्धन (ताल) ११७, १३८
वर्धमान–वर्धमानक ९८, १०२, १०३, १०४, १०६
वर्धमानाभास १०७
वर्धमानासारित ९८, १०६
वलय ३४४, ३४५
वलित ३४९, ३५०, ३५२, ३६४
वलिता २८४
वल्लि ३६८, ३७२
वल्लिपाट ३६८, ३७२
वसन्त (ताल) ११७, १३५
वसन्त (राग) २६४, ३२६
वसु (वंश) २७९, २८८, २९८, ३०२, ३१०
वस्तु २५, २७–४१, ४३–५६, ५८, ७२–७६
वस्तु (वादन) २११, २१२
वातला ४२९
वादक २००, ४०४, ४४०.
वादन १९९, २५७, ३१७, ३४०
वादी २३९
वाद्य ३, १९५, १९६, १९८–२००, २११, २१३, २१४, २३०, २३१, २३२, २४४
वाद्यखण्ड ३७८, ३८८
वाद्यप्रबन्ध ३७६, ३७८, ३८९, ४१०
वामदेव ३४७, ३५१
वामाङ्घ्रिसञ्च ३६७
वार्त्तिक ५, ५२, १०६, २३०, २४२
वासुकि २०४
विकट ३४९, ३५२
विक्षिप्ता ५
विक्षेप ४, १३


विग्निका ४०१, ४१५, ४१९
विघुष्ट ४३८
विच्छुरित ३५०, ३६६
विजय (ताल) ११६, १३०
विजयानन्द (ताल) ११६, १२९
वितण्डा ४०५
वितस्ति ४१९, ४२०, ४२७
विताल ३७७, ३९८
विदारिका-विदारी २९, ३०, ५९,७२, १०८, २१८, २३५, २३९, २४०
विद्युद्विलास ३५०, ३६२
विन्यास ५९
विपञ्ची १९७, २१६, २१७, २१८
विप्रयोग ३४६
विरक्त ४३८
विरति २३१
विराम ११८, १२१, १२३–१२६
विलम्ब-विलम्बित २०, २३, ३१८, ३३१, ३३९, ३७९, ४०७
विलोकित (ताल) ११७, १३९
विवादी २३९
विविध २९, ३४, ४५, ५८, ६१, ६२, ६३, ७९, ८३, ८४, ११२
विवृत्त २९
विशाखिल ३७, ५९, २३२
विशाला ९८, ९९, १०१, १०२, १०३, ४३४
विश्रान्ति २०
विश्राम ३४८, ३५२
विश्वमूर्ति (वंश) २९४, २९९, ३०४
विषम (ताल) ११६, १३३
विषम (हस्तपाट) ३४९, ३५३, ३६५
विषमकर्तरी ३४९, ३५७
विषमखली ३४८, ३५२
विषमपाट ३५०
विषमपाणि ३४९, ३५७
विषमस्खलित ३५२
विष्णु ३४८
विसर्जिता ५
विस्तार २१९, २२०, २२९, २३२, २३३, २४१
विस्तारज २२०, २२१, २२४
वीणा १९६, १९७, २०४, २१५, २१७, २१९, २३१, २४३, २४४, २४७, २५१, २५४, २५६, २७५
वीर (रस) १९९
वीरबिरुद ३४२
वीरविक्रम (ताल) ११६, १२२, १२३
वृत्त ६१, ७२, ८३, ११०
वृत्ति १, ९७, १९३, २२९, २४४
वेणी ७६, ७८, ७९
वेलावली ३२९
वैणिक २७६
वैहायस ६०, ६१, ६४, ६५, ६७–७१
वोडवाड ४०६
व्यञ्जन १११
व्यञ्जन (धातु) २१९, २२०, २२६, २२९, २३८, २४०
व्यस्त ३७९
व्यापक ११८
व्यापकाक्षर ३९५–३९७
शंभु ११८, १९८, २०४
शक्ति ४३३
शङ्कु २०१, २०२, २४५, २५१, २५२
शङ्ख १९७, ३४३
शङ्खमार्ग ८९
शम्या ४, ११, १२, २८, ७३, ९१, ९५, २३४, २३५, २३७, २४३
शरभलील (ताल) ११६, १२७
शरीर ८३, ८४, ८७, ८८, ९०, ९१, ९५, १०८, १०९
शर्व ३४८
शाखा ३६, ३७, ३९, ४१–४४, ४७–५१, ५५–५७, ८८, ८९
शाङ्गविद्या ३०८
शिखा २७३, २७४
शिव १९५, ३०८, ४३३

शीर्ष-शीर्षक २७, २८, ३१, ३२, ३३, ३६–५१ ५३, ५४–५८, ८४, ८७, ८८, ९०, ९१, १०८, १०९
शुकवक्त्र २०६, २१०
शुक्ति १९८, ३४१, ४३७
शुद्धकूटखण्ड ३७९
शुद्धनट्टा ३३१
शुद्धवराटी ३३०
शुद्धसालग (गीत) ४११
शुद्धि ३४९, ३५२
शुष्क (वाद्य) १९८, २३२
शृङ्ग १९७, ३४२, ३४३
शृङ्गार ३१३
श्रमवहनी ४०८
श्रावकत्व ३१४
श्रीकीर्ति (ताल) ११६, १३०
श्रीनन्दन ,, ११७, १३८
श्रीरङ्ग ,, ११६, १२३
श्रुति २७५
श्रुतिनिधि (वंश) २८०, ३०६
श्रुतिवीणा १९६
षट्ताल ११७, १३८
षट्पितापुत्रक ९, १०, १२, १३, १६
षड्ज २४७, २५७, २६०, २६४, २६५, २६७–२७०, २८१, २८२, ३२१, ३२६, ३२७, ३३०, ३३१, ३३३, ३३६, ३३८, ३३९
षड्जग्राम २४२
षण्मुख (वंश) २७९, २८८, २९७, ३०२, ३०९
संकृति ११३
संख्या १४४, १४९, १५०, १५३, १५७, १५९, १६०, १६३, १८०
संखोटना २३२, २३९, २४०
संगता ९८, ९९, १०१–१०४
संघातज २१९, २२२
संचार ३४८, ३५१
संचारविखली ३४८, ३५१
संदष्ट ३१५
संधि ७६, ७७
संधित २०६, २०७
संनिपात ४, ५, १६, ६५, ७५, ९१, ९५, ९६
संनिविष्टा २०५
संन्यास २७, ५९
संपक्वेष्टाक १०, १६, १७, १८, २४०, २४१
संपिष्ट-संपिष्टक ७६, ७७, ७९, ८१, १०८, २४०, २४१
संभाविता २३०
संयोग ३४६
संयोगमेरु १४४, १६८, १७८
संलेख २०६, २०७
संवादी ३०, ५९, २१८, २३९
संहरण ६१, ६७, ७२, ७४, ७५
सकल २१४
सम ३९५, ४३९
समा २१, २३०, ४३२, ४३५
समुदाय ३७७, ३९८
सरस्वती २०४
सरस्वतीकंठाभरण (ताल) ११७, १४२
सरिका ४३७
सर्पिणी ५
साम ११२, ११३
सामगान ११३
सामाङ्ग १११, ११२
सामुद्ग २९
सामोद्भव ११८
सारणा २०५, २०८–२१०, २७५, ३१६
सारस (ताल) ११७, १४०
सारी-सारिका २४५, २४८–२५६
सालग २७१, ३७८, ४११
सालगगौड ३३७
सालगनट्टा ३३४
सिक्थ ३४३
सिंह (ताल) ११७, १४०
सिंहनन्दन ,, ११६, १२७
सिंहनाद ,, ११६, १२६
सिंहलील ,, ११६, १२२
सिंहविक्रम ,, ११६, १२२
सिंहविक्रीडित ,, ११६, १२५, १२६
सीवन ४०१


सुधांशु २०४
सुनन्दा ९८, १००–१०२, १०४
सुमुखी ९८, १००–१०२, १०४
सुभर ४३८
सुरागता ३१६
सुरेख ४१०
सुरेखत्व ४११
सुषिर १९६, १९७, १९९, २००, २७६, ३४०
सुस्थानत्व ३१६
सेल्लुका १९७, ४२३, ४२४
स्कन्द (ताल) ११७, १४०
स्कन्धपट्टिका ४१३
स्कन्धसञ्च ३६५, ३६७
स्कन्धावज ४१४
स्खलित २०६, २१०, ३१४, ३५२
स्तोभ १११–११३
स्तोभाक्षर ११२
स्थापन ४०६, ४०७
स्थायी २५०, २५८, २६०, २६२–२७२, ३१८, ३२२, ३२४–३२७, ३२९, ३३०, ३३२, ३३३, ३३८
स्थित ६१–६४, ६७, ६९, ७०, ७१
स्फुटप्रहार ४३८
स्फुरण ३४९, ३५२
स्फुरित २०६, २०८, २११–२१३
स्फुरी ३४९, ३५२
स्फूर्तिमूर्ति ४०४
स्रोतोगता २१, २३०, ३९७
स्वरभङ्ग–३०८
स्वरवीणा १९७
स्वरस्फुरणक ३४९, ३५२
स्वस्थान २५७
स्वर्ग २०४
स्वस्तिक ३४८, ३५१
स्वस्थान २५७, २५८, ३१९, ३३९
स्वाति १९८
स्वेदहीन ४४१
हंस (ताल) ११७, १३९
हंसनाद ,, ११६, १२६
हंसलील ,, ११६, १२४
हकार १११
हर १९३
हस्तपाट ३४७, ३४९–३५२, ३६५, ३६७
हिंकार ११३
हुडुक्का १९७, २००, ३५०, ३६७–३६९, ४१३, ४१४, ४१६, ४१७, ४२०
हौडुक्किक ३६७
ह्रस्व ११८
ह्राद २२०, २२४, २३६

वाद्यांची रेखाचित्रे


1




एकतन्त्री




2 आलापिनी



3 किन्नरी [लहान]



4 (मार्गी) किन्नरी [मोठी]



५ देशी किन्नरी (मोटी)




६ देशी किन्नरी (मध्यम)



७ देशी किन्नरी (लहान)







८ पिनाकी




एकवीर वंश




मनुवंश




पावा




पाविका




मुरली



मधुकरी
तुण्डकिनी
काहला
शृङ्ग
शङ्ख




मार्ग पटह

देशी पटह





मृदङ्ग




हुडुक्का



करटा




घट



ढक्स



कुडुवा




रुञ्जा



डमरु




डक्का




सेह्वुका




डक्कुली




झल्लरी




भाण



त्रिवली



दुन्दुभि



भेरी


निःसाण



ताल



कांस्यताल




घण्टा




क्षुद्रघण्टिका




जयघण्टा



कम्रा



शुक्तिवाद्य



पट्टवाद्य

शुद्धिपत्रक

पृष्ठांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
प्रस्ता. (१५)	९	छादोग्य०	छांदोग्य०
,, (२६)	१४	गान्धर्व,	गान्धर्व',
,, (२७)	२	होय	होय'
,, (२९) खालून	९	उच्चारणानंतर...प्राप्त	उच्चारणापेक्षा
,, ,, ,,	८	व्हावयाच्या...बरेच उच्च	उच्च
,, (४४)	१३	नन्दा	नन्दी
,, (७२)	शेवटची	संगीतसुधेत	संगीतसुधाकरात
,, (७९)	२२	कूर्म	कूर्मा
,, (८०)	२२	लावल्था	लावल्या
,, (८१)	शेवटची	होय.	होय."
,, (९०)	खालून ९	दामोदर	दर्पण
२	२१	ध्रव	ध्रुव
६	२३	ध्रुवका	ध्रुवका
७	१०	होय'	होय"
११	१०	ऽऽ।ऽ	ऽऽ।ऽ̀
,,	२१	,,	,,
१२	१	ऽऽ।ऽ ऽऽ।ऽ	ऽऽ।ऽ̀ ऽऽ।ऽ̀
,,	१०	ऽ।ऽऽ।ऽ	ऽ̀।ऽऽ।ऽ̀
,,	१४	ऽऽ।ऽ ऽऽ।ऽ	ऽऽ।ऽ̀ ऽऽ।ऽ̀
,,	२०	ऽऽ।ऽ ऽऽ।ऽ	ऽ।।ऽ ऽ।।ऽ
,,	२५	ऽ।ऽऽ।ऽ	ऽ̀।ऽऽ।ऽ̀
२४	१३	मार्गताल प्रकरण	मार्गताल लक्षण
३५	५	आविविता	आनिविता
६५	४	०निर्युक्त०	०निर्मुक्त०
७८	१०	पंचपाणी	पंचपाणि
७९	२२	कलाप्रयोग रहित	कलाप्रयोगरहित
८३	खालून ५	पाद भागांनी	पादभागांनी

पृष्ठांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
९७	८	लयान्तरे	लयान्तरं
९८	७	०दिमा	०दिमौ
१०१	१७	प्रथम	प्रथम,
११०	१०	ऋग्वेदातल्या	ऋग्वेदातल्या
११३	५	ऋग्व्यूढ०	ऋच्यूढ०
११६	४	०वच्चर्यौ	०चच्चर्यौ
,,	खालून ८	मंठिक	मंठिका
११७	११	०स्कन्दोऽङ्तालिकाः	०स्कन्दाङ्तालिकाः
१२२	खालून ४	लघ्वद्यन्ते	लघ्वाद्यन्ते
१४२	१०	रघुरथो	लघुरथो
१४८	२	लिक्षे०	लिखे०
१६४	१	गुरुमरा०	गुरुमेरा०
१६५	१	०श्चतुःष्कोष्ठ०	०श्चतुष्कोष्ठ०
१७६	२५	भेदींत	भेदांत
१७९	३ ऱ्या ओळीनंतर	—	इति खण्डप्रस्तारः
,,	६ व्या ,,	—	हा खण्डप्रस्तार होय.
१९१	२	तदङ्कावधस्तनैः	तदङ्काधस्तनैः
२०२	११	षट्य०	षष्ठ्य०
२१३	३	स्फुटिताः	स्फुरिताः
२३९	७	०भ्यसेद्	०भ्यस्येद्
,,	१८	जिज्यात	जिच्यात
२४०	६	कारण०	करण०
२५१	१३	न्यसे०	न्यसे (स्ये ?)
,,	१५	खाङ्घ्रि०	खा (सा?) ङ्घ्रि०
२५३	१०	०मिश्रणे	०मिश्रेण
२५४	८	०दङ्लम्	०दङ्गुलम्
२७४	७	०रिक्तऽशे	०रिक्तेऽशे
२७६	१२	मिळविलेला,	मिळविलेला, भयरहित,
,,	१९	नसलेला.	नसलेला
२८६	३	०धात्वादि वाद्य०	०धात्वादिवाद्य०
,,	५	०नमून	०नमून्
२८७	१०	सार्धे०	सार्धं०

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
५/१३५
२
मंत्रालय.

पृष्ठांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२८८	३	०स्त्रियवा	०त्रियवा
२९४	खालून ५	पाचअष्टमांश	एकपूर्णांकपाचअष्टमांश
२९५	१६	सातबत्तिसांश	तेराबत्तिसांश
२९६	२१	नऊ षोडशांश	नऊषोडशांश
३०१	१	ध्राष्टके	रन्ध्राष्टके
,,	२	०मङ्गगुलं	०मङ्गुलं
,,	खालून ३	०पंचवीसबत्तिसांश	०तेवीसबत्तिसांश
३०५	१६	यव (प्रयाणाची असून) अंतरांचे प्रमाण प्रत्येकी	यव (प्रमाणाची असून)
,,	१७	अंतरांचे प्रमाण प्रत्येकी	———
३०६	२०	साडे अष्टावनअंगुळे	साडेअष्टावनअंगुळे
३०७	६	उद्धृता	उद्धृता
३२४	१३	सर्व वंशेषु	सर्ववंशेषु
३२९	११	प्रथमक्षरी	प्रथममक्षरी
३३३	खालून ५	असा अर्थ	असा अर्थ.
३४८	,, पहिली	नावांचे '	नावांचे.'
३६८	२	चारुश्रवणिकालग्न०	चारुश्रवणिकालग्न (ग्नः)
३८६	१८	गडदक्०	गड्दक्०
३९४	१	घट	घटैं
४०८	८	धिकटतक०	धिकटकत०
,,	१६	धिकटतक	धिकटतक तकधिकट
४१६	४	ओदर्यां	औदर्यां
४१७	१४	हुडुक्केवा०	हुडुक्कैवा०
४१९	२०	भृंगि	भृंगी
४२६	७	त्रिवली लक्षणम्	त्रिवलीलक्षणम्
४२७	२३	(तोडे)	(तोंडे)
,,	खालून दोन व एक	मोठ्या....भाग	तोंड मोठे व खाली लहान असलेला असा
४२९	खालून ३	कररव	करव
४३६	१४	तला०	तल०
४३८	११	स्फुटप्रहारः	स्फुटप्रहारं
,,	खालून ३	विघृष्ट	विघुष्ट